# मुघल साम्राज्याचा ऱ्हास

## भाग १

अनुवादक
ग. श्री. देशपांडे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

सर जदुनाथ सरकारकृत

# मुघल साम्राज्याचा ऱ्हास

## भाग-पहिला

–अनुवाद–

ग. श्री. देशपांडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती :
मे, १९९०

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन, मुंबई-४०० ०३२.



मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर–४१६ ००३.

किंमत : रु. Price Rs. 100-00

# प्रस्तावना

आपण ज्या नवभारतात आज रहात आहो, तो अस्तित्वात येण्यापूर्वी तेथे असलेल्या एका विशिष्ट राजकीय व सामाजिक व्यवस्थेची घडी मोडून ती नामशेष पावली होती. तिच्या प्रभावाखाली या देशातील लक्षावधी लोकांच्या जीवनाची जडणघडण, अडीच शतके होत होती आणि त्याच राजकीय व सामाजिक रचनेनेच येथील नागरिकांना अनेक बहुमोल, मोठ्या गोष्टींचा लाभ मिळवून दिला होता. १५५६ मध्ये स्थापन झालेल्या मुघल साम्राज्याने, भरतखंडाचा खूपच मोठा भाग एकाच राजदंडाच्या हुकमतीखाली एकत्र जोडला होता. त्याने, सर्वांना समान अशी एक विशिष्ट संस्कृति मिळवून दिली होती आणि या विजयेत्सु संस्कृतीच्या प्रकाशाने साम्राज्याच्या सीमा बाहेरही पसरून आपला प्रभाव पाडला होता. या विकासातून जनतेच्या सर्वसाधारण सुख-समाधानाची एकंदरीत इतकी जोपासना केली होती की, दूरच्या जुन्या पौराणिक काळाव्यतिरिक्त, त्यानंतरच्या इतर कोणत्याही काल-खंडाला याबाबत त्याच्या जवळपास येता आले नव्हते. देशातील निरनिराळ्या भागांमध्ये असलेला प्रत्येकाचा सवतासुभा व वेगळेपणा आणि हिंदुस्तान व त्या बाहेरील जग यांच्या दरम्यान असलेली दुराव्याची भिंत, ही या साम्राज्याने नाहीशी केली आणि एखाद्या दूरच्या भविष्यात हिंदुस्तानचे आधुनिकीकरण करण्यासाठी व त्याच्या राष्ट्रीयत्वाचा विकास करण्यासाठी अवश्य ते पहिले पाऊल टाकिले, अकबर व जहांगिर, शहाजहान व औरंगजेब या चार थोर सम्राटांच्या कारकीर्दीत त्या साम्राज्याने केलेले कार्य व मिळविलेले यश म्हणजे त्यांच्या कारकीर्दीच्या इतिहासकारांना लाभलेले सुयोग्य, मोलवान विषयच होत. पण या साम्राज्यामधील, संस्कृति व सुधारणावर्धक सामर्थ्याचा प्रवाह अखेरी आटला आणि परिणामतः देशाचा नाश ओढवला. या ऱ्हास काळाचा इतिहास लिहिण्यापासून मात्र इतिहासकारांचे पाऊल आतापर्यंत तरी मागेच ओढले गेले आहे. साम्राज्याच्या इतिहासातील या काळातल्या घटना अतिशय खिन्न करणाऱ्या असून मानवी मनाला उच्च पातळीवर नेण्यासारखी वा मानवी हृदयाला भावनिक उबारा देऊन हेलावण्यासारखी एकही घटना वा दृश्य त्यामध्ये आढळत नाही. म्हणूनच बहुधा इतिहासकार या ऱ्हास काळाचा इतिहास गुंफण्याच्या कामापासून आजपावेतो माघार घेत असावेत.

आधुनिक काळानजिकच्या भूतकाळाच्या इतिहासाचा ओघ एखाद्या शोकपर्यवसायी घटनांच्या ओघासारखाच असूनही त्यात एक भावनोत्तेजक वा मानवी मनाला स्फूर्तिदायक घटना नव्हती तरीही त्यात काही विशेष सामर्थ्यही आहे. एखाद्या अस्सल शोकपर्यवसायी नाट्यामध्ये, मानवी हृदयात दया आणि भीती निर्माण करून त्यातून मानवी आत्म्याचे उन्नयन करण्याचे सामर्थ्य असते. असे सामर्थ्य या नजीकच्या भूतकाळाच्या इतिहासातही असून या दृष्टीने तो खऱ्या शोकपर्यवसायी नाट्यापेक्षा किंचितही कमी समर्थ नाही. इतकेच नव्हे तर प्रस्तुत जीवनाला उत्कृष्ट, सखोल मार्गदर्शन करण्याच्या बाबतीतही मुळीच कमी प्रभावी नाही. हिंदुस्थानातील अनेक शतकांच्या मुसलमानी सत्तेचा झपाट्याने झालेला नाश आणि त्याचबरोबर नव्यानेच उदयास आलेल्या मराठ्यांनी साम्राज्याची उभारणी करण्यासाठी

केलेल्या हिंदुंच्या अखेरच्या प्रयत्नाला आलेले संपूर्ण अपयश, हे दोन प्रवाह एकमेकाशी अगदी निगडित आहेत. आपणाला जर आधुनिक हिंदुस्थानपुढील कूट प्रश्नांची खरी सोडवणूक करण्याचा मार्ग शोधावयाचा असेल आणि देशाला भूतकाळात ज्या अडचणी व धोके यांच्या खाचखळग्यातून जावे लागले ते टाळावयाचे असतील तर मुघल साम्राज्याचा ऱ्हास व मराठ्यांचे अपयश या एकमेकात गुंतलेल्या, एकमेकाशी निगडित असलेल्या प्रवाहामधील सत्य घटनांचा अगदी बिनचूक, तपशीलवार अभ्यास काटेकोरपणे करणे अवश्य आहे. तसेच या मुघल ऱ्हासाची व मराठा अपयशाची कारणे शोधून निश्चित करण्यासाठी सखोल विश्लेषणात्मक अभ्यास करणेही आवश्यक आहे. यातूनच आधुनिक जीवनातील कूट प्रश्नांच्या सोडवणुकीचा मार्ग सापडणार आहे.

आजच्या काळात, आपल्या लोकांच्या भवितव्याची जडणघडण करणारे, त्याला मार्गदर्शन करणारे जे आहेत, त्यांना, त्यांची पाउले योग्य दिशेने व योग्य रीतीने पडावीत म्हणून आपल्या पूर्वजांच्या अनुभवांचे मार्गदर्शन अपरिहार्य व अत्यावश्यक आहे. अशी मार्गदर्शक माहिती, पूर्वी कल्पनाही नव्हती इतकी भरपूर आता उपलब्ध आहे ही एक मोठ्या आनंदाची गोष्ट होय. हिंदुस्तानातील समाजाची मुघलकालीन जुनी घडी पूर्णपणे विस्कटली हे खरे पण ती विस्कटल्यावर तेथे अंधार मात्र पसरला नाही. समाजाची प्रस्थापित घडी विस्कटल्यावरही मानवी मनाची जागरूकता व हालचाल आणि मानवी बुद्धीचे व हाताचे कार्य चालूच राहिले. यातील निर्मितीचे अवशेष व स्मृतिचिन्हेही आज उपलब्ध आहेत. हिंदुस्तानातील १८ व्या शतकावर इतिहासकाराच्या दृष्टीने, अनेक दिशांनी भरपूर प्रकाश पडला असून, अनेक मार्गांनी त्याची माहिती आता उपलब्ध झाली आहे. निरनिराळ्या जाती–जमातींनी ( Race ), निरनिराळ्या धर्मपंथियांनी, निरनिराळ्या भाषिक गटांनी, आपापल्या दृष्टिकोनातून, झालेल्या घटना, हालचाली, व्यक्ती यांच्यावर प्रकाश टाकणारी माहिती लिहून ठेविलेली आहे. अशा प्रकारे सर्वप्रकारच्या विविधांगी दृष्टिकोनातून, सर्व घटनांची नमूद केलेली सर्वांगिण माहिती, या काळाच्या इतिहासकाराला उपलब्ध आहे. अकबर आणि त्याच्या लगेच नंतरचे चार सम्राट यांच्याबद्दल सखोल, सविस्तर लिहिलेले अधिकृत शासकीय वृत्तांत उपलब्ध आहेत. असे वृत्तांत यानंतरच्या राज्यकर्त्यांबाबत व घटनांबाबत नाहीत हे खरे, पण त्याऐवजी, या काळातील जीवनात भाग घेतलेल्या हिंदी व्यक्ती, तसेच तिऱ्हाइताच्या दृष्टिकोनातून या घटनांकडे पहाणारे परदेशी निरीक्षक, अशा अनेकांनी खाजगी आठवणी वा आत्मचरित्रे आणि वार्तापत्रे अशा-रूपाने ठेविलेली विपुल माहिती आधुनिक इतिहासकाराला उपलब्ध झालेली आहे. अशा प्रकारच्या लिखाणामध्ये अधिकृत शासकीय वृत्तांत व वार्तापत्रे यांच्यामानाने, घटनांच्या तारखा व संबंधित नावे याबाबत तपशील मात्र कमी असतो. तथापि इतर काही बाबतीत तरी हे लिखाण अधिकृत शासकीय वृत्तांतापेक्षा अधिक मोलाचे आहे. या शतकाशी संबंधित हस्तलिखित कागदपत्रांचा खूपच मोठा साठा जतन करण्यात आला असून तो आपल्याला तत्कालिन माहिती अगदी ताज्या वार्तांच्या शैलीत देतो. मराठा राज्य शासनाची सर्वच्या सर्व दप्तरे आता, या काळाच्या अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. इंग्रज आणि फ्रेंच सरकारांचे कागदपत्र तर आपल्या पिढीच्या काळात, छापलेलेच उपलब्ध झाले आहेत. शिवाय या भाषातून जी अन्य हस्तलिखिते अद्यापही न छापता राहून, सार्वजनिक ग्रंथालयात जतन केलेली आहेत, त्यांच्या अतिशय उपयुक्त याद्या वा सूचीही आता प्रसिद्ध केलेल्या आहेत. [ यातील उल्लेखनीय कागदपत्र असे : Hill's Home Miscellaneous

हिलची, सर्वसाधारण गृह पत्रसूचि (भा. इंग्लंडला पाठविलेली–ई. इं. कंपनीची...... असावी ) आणि Calendar of Persion Correspondence पर्शियन भाषेतील पत्रव्यवहार जंत्री, हे स्रोत ]. हिंदुस्तानात आरंभी आलेल्या युरोपियनांनी लिहिलेली प्रवास वर्णने, दैनंदिनी आणि आठवणी, अशा प्रकारच्या साहित्याचाही फार मोठा साठा आहे. यापैकी बहुतेक वाङ्मय आता सहज मिळविण्यासारखे नाही हे खरे पण यातून अनेक वेळा, विशिष्ट मुद्द्यांबाबत अमोल माहिती मिळते. शिवाय, कोणत्याही देशी ग्रंथातून व लिखाणातून मिळत नाही अशी तत्कालीन आर्थिक व सामाजिक स्थितीबद्दलची माहिती यातून मिळते.

अशा प्रकारे या काळाबद्दल माहिती देणारी साधने, प्रचंड संख्येने आणि विविधांगी स्वरूपात उपलब्ध आहेत. तथापि त्यांची अशी विपुलता व विविधता, ही मात्र या काळाच्या इतिहासकाराला अडचणीची होत नाहीत. एकेकाळी बहुतेक सर्व हिंदुस्तान ज्याने व्यापिल त्या साम्राज्याचे विघटन झाले व त्या जागी, स्वतंत्र राज्ये वा राजकीय गट आणि घटना केंद्रे, फार मोठ्या संख्येने निर्माण झाली. ही प्रचंड संख्या मात्र या काळाच्या इतिहासकारापुढील अधिक मोठी समस्या आहे. अठराव्या शतकातील हिंदुस्तानच्या इतिहासकाराने, यापैकी प्रत्येकाची, त्याच्या सर्व हालचालीसहित माहिती देण्याचा प्रयत्न केला तर त्यातून तयार होणाऱ्या इतिहासाची अवस्था, सतत एकमेकावर आदळणारे सुटे सुटे दगड भरलेल्या पोतडीसाखीच होऊन अशा प्रयत्नातून, एकजिनसी, भक्कम अशा एका इतिहास मंदिराची घडण होणार नाही.

नादिरशहाने १७३९ मध्ये मुघल साम्राज्यावर स्वारी केली. तेथून पुढे या साम्राज्याचा ऱ्हास होत गेला. अखेरी १८०३ मध्ये ब्रिटिशानी दिल्ली जिंकली व तेथील नामधारी पादशहाच्या पालनकर्त्याची जबाबदारी स्वीकारली. या इतिहास खंडातील ओघाची व घटनांची माहिती पर्शिअन, मराठी, इंग्रजी, फ्रेंच, हिंदी, राजस्थानी अशा विविध भाषांतील मूलभूत, लिखित आधारावरून निश्चित करणे जरूर असून, त्यातून मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाच्या सुसूत्र हकीगतीची एकत्र गुंफण करणे अवश्य आहे. अशी ही पुनर्बांधणी करण्याचा पहिलाच प्रयत्न प्रस्तुत लेखक या ग्रंथाद्वारे करीत आहे. तथापि हाती घेतलेल्या या विषयाच्या विशिष्ट स्वरूपामुळे, लेखकावर काही ठाम मर्यादा पडली आहे. साम्राज्याचे केंद्रस्थान म्हणजे बादशहा आणि त्याच्या स्थानाचे राखणदार याच व्यक्ती आणि प्रस्तुत विषयाच्या बांधणीत याच प्रमुख व्यक्ती व त्यांच्या कृती यावरच लक्ष केंद्रित करणे अवश्य आहे. पण प्रस्तुत विषयाच्या बांधणीसाठी, उपलब्ध असलेल्या प्रचंड साधनसामुग्रीमुळे, इतिहासकाराचे लक्ष मुख्य विषयापासून विचलित होण्याचा संभव आहे. हे टाळण्यासाठी त्याने आपले लक्ष या विषयाच्या केंद्र स्थानावर कटाक्षाने स्थिर राखले पाहिजे. यासाठी मध्यवर्ती विषयापासून लक्ष विचलित करणाऱ्या अन्य घडामोडी काटेकोरपणे बाजूला सारल्या पाहिजेत. या काळात साम्राज्यातील अनेक सुभ्यांनी निरनिराळ्या वेळी, आपला जीवनप्रवाह, साम्राज्याच्या मुख्य प्रवाहापासून अलग केला आणि आपला स्वतंत्र मार्ग चोखाळला :—उदा. इंग्रजांच्या वर्चस्वाखाली, बंगाल व बिहार यांनी १७५७ नंतर, माळवा व गुजराथने १७४१–५० पासून पुढे, पंजाबने १७५८ नंतर, औधने १७६१ नंतर आणि दक्षिणेतल्या सहा सुभ्यांनी १७४८ पासूनच, साम्राज्यापासून वेगळे होऊन आपापले स्वतंत्र मार्ग स्वीकारले. साम्राज्याच्या केंद्रस्थानाच्या हकीगतीवर लक्ष केंद्रित करताना, प्रस्तुत ग्रंथात, या स्वतंत्र झालेल्या सुभ्यातील घडामोडींची हकीगत सामान्यतः येथे दिली जाणार नाही. पण साम्राज्याच्या केंद्रस्थानापुढील

काही प्रश्न व त्यांच्या हालचाली यांची नीट उकल होण्यासाठी, स्वतंत्र झालेल्या अशा सुभ्यातील काही घडामोडींची माहिती अवश्य असेल, अशा वेळीच फक्त व जरूर तवढीच हकीगत संक्षेपाने, अपवादात्मक म्हणून येथे दिली जाईल. हिंदुस्तानात साम्राज्य स्थापन करण्यासाठी, इंग्रज व फ्रेंच यांच्या दरम्यान झालेल्या झगड्याचा विषय या ग्रंथामधून पूर्णपणे वगळला आहे. साम्राज्याने गमावलेल्या सुभ्यांच्या निष्ठेपेक्षा, राजपुताना व बुंदेलखंड यांची साम्राज्यनिष्ठा फक्त थोडीच अधिक असली तरी हे दोन भाग, उत्तर हिंदुस्तानातील या काळातील घडमोडींचा आखाडाच होते. दिल्ली ज्यांच्या हातात असे त्यांच्या हालचाली या दोन्ही भागांत पसरत असत. अशी स्थिती या शतकाच्या अखेरीपर्यंत राहिली. यामुळे प्रस्तुत ग्रंथामध्ये या दोन भागांतील घडामोडींचा आढावा घेतला जाईल. मराठा राज्यातील अंतर्गत घडामोडीशी, दिल्लीच्या इतिहासकाराचा सामान्यतः काही संबंध नाही पण उत्तर हिंदुस्तानातील मराठ्यांच्या काही हालचालींच्या बुडाशी त्यांच्या अंतर्गत घडामोडी आहेत. तेव्हा या हालचालींच्या अभ्यासासाठी मात्र, दिल्लीच्या इतिहासकाराला मराठ्यांच्या संबंधित घडामोडींची दखल घ्यावी लागते. एवढ्यापुरतेच या घडामोडीकडे प्रस्तुत ग्रथात लक्ष दिले जाईल.

स्वीकृत विषयाला अशा मर्यादा घालूनच प्रस्तुत इतिहास ग्रंथाला एकसंध आकार देण्याची व त्यातील विषयामध्ये एकजिनसीपणा राखण्याची आशा बाळगता येईल. प्रस्तुत इतिहासाची गुंफण करताना अनेक संबंधित घटनांच्या निरनिराळ्या केंद्रस्थानांशी संबंध साधणे अवश्य आहे. घटनांच्या विविधतेमुळे वाचकांचे लक्ष काही वेळी मूळ प्रवाहापासून विचलीत होते, काही घटनांची विस्मृतीही होते. तथापि स्वीकृत इतिहास विषयामधील मुख्य ओघ सतत दृष्टीसमोर ठेवून, उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा व्यवस्थित उलगडा करणे अवश्य आहे. तेव्हा वाचकांचे लक्ष मुख्य विषयापासून बाजूला जाऊ नये, विविधतेमुळे होणारी विस्मृती टळून, संबंधित घडामोडी सतत डोळ्यापुढे रहाव्या, पुढे येणाऱ्या प्रश्नांचा, घडामोडींचा अन्वयार्थ स्पष्टपणे कळावा म्हणून जाणीवपूर्वकच काही ठिकाणी काही हकीगतींची पुनरावृत्ती केलेली आहे.

वुइल्यम आर्यविन ( William Irvine ) यांचा "उत्तर कालीन मुघल सम्राट" –' Later Mughals '. हा एक अपुरा ग्रंथ आहे. मी त्याचे संपादन करून, त्यातील हकीगत १७३९ पर्यंत आणिली आहे. मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाच्या प्रारंभिक काळाच्या, या संपादित ग्रंथाचे परीक्षण करताना, पी. ई. रॉबर्टस् या समीक्षकाने एक अतिशय अर्थपूर्ण, सुयोग्य दृष्टांत दिला आहे. तो म्हणतो :........ "अतिशय गुंतागुंतीच्या घनदाट जंगलामधून, या ग्रंथरूपाने (उत्तरकालीन मुघल) एक प्रशस्त रस्ताच तयार केलेला आहे. ......हे काम करण्याची खूपच निकडही होती. आता ते विस्मयचकित करण्याइतक्या पूर्णपणे पुरे केलेले आहे. ........यातील अतिशय मोलाचा भाग म्हणजे, पर्शिअन व मराठी भाषेतील, अद्याप प्रसिद्ध न झालेल्या कागदपत्रातील माहितीचा काळजीपूर्वक समावेश या ग्रंथात केलेला आहे, हा होय." प्रस्तुत ग्रंथ–मुघल साम्राज्याचा ऱ्हास–( Fall of the Mughal Empire) हा, आर्यविनच्या निर्दिष्ट ग्रंथाच्या पुढचा भागच असून, याच्या रचनेमध्ये, पूर्वीचीच "जंगलातून मार्ग काढण्याची" पद्धती वापरली आहे. पण हे पुढचे जंगल मात्र, खूपच अधिक दाट, गुंतागुंतीचे आहे. १७३८ सालापर्यंत (आर्यविनच्या ग्रंथाचा विषय संपतो तेथपर्यंत) दिल्ली साम्राज्यात सर्वसमान अशी एकच "प्रमुख व्यक्ती"–एकच बादशहा असून तात्विक दृष्टीने नेहमीच आणि व्यवहारातही बहुतेक नेहमीच, साम्राज्याच्या शासनाचे एकच केंद्र, अशी तरी स्थिती

होती. पण नादिरशहाच्या स्वारीनंतर साम्राज्याचे विघटन वेगाने होऊ लागले आणि यातून अनेक स्वतंत्र सत्ताकेंद्रे निर्माण झाली व त्यांच्यामध्ये आंतरसंघर्ष व संबंध निर्माण होऊन त्यातून या पुढील काळाचा इतिहास अतिशयच गुंतागुंतीचा बनला. या स्थितीत "दिल्ली फार दूर नाही " असे सतत वाचकाच्या कानात सांगत रहाणारा इतिहासकार त्याच्याजवळ असला तरच या अनेकविध गुंतागुंतीच्या जंगलात, दिल्लीच्या इतिहासाचा मार्ग, तो वाचक बहुधा चुकणार नाही.

प्रस्तुत ग्रंथासाठी विषयाची ही व्याप्ती विचारपूर्वक निश्चित केल्यावर, त्याला सुसूत्र अशी रचनाही करावी लागली. या ग्रंथाच्या पहिल्या खंडातील "काळव्याप्ती" निश्चित केल्यावर, या व्याप्तीला अगदी प्रमाणशीर दृष्टीने योग्य, इतकीच या खंडातील विषयाची मांडणी न करिता, ती अधिक विस्तारपूर्वक करावी लागली आहे. हिंदुस्तानातील आपली स्वारी संपवून नादिरशहा परत गेला, या घटनेनंतरच्या हकीगतीने या खंडाची सुरवात होते व पुढे अहमदशहाच्या सम्राटपदाचा शेवट झाला या घटनेच्या अखेरी हा खंड संपतो. काही थोडीतरी स्वतंत्रबुद्धी व स्वतंत्र व्यक्तित्व दाखविणाऱ्या मुघल सम्राटापैकी अहमदशहा हा अखेरचा होय. शिवाय त्याच्या आधीच्या पिढीपैकी, अस्तित्वात असलेल्या सर्वच मोठ्या व्यक्तीही त्याच्या मृत्यूच्या वेळेपर्यंत नाहीशा झाल्या होत्या. स्वीकृत विषय या अवस्थेला पोहोचतो तेथे पहिला खंड संपेल व पुढे दुसरा खंड सुरू होईल. अहमदशहाच्या जागी सिंहासनावर आलेला नामधारी बादशहा आलमगीर २ रा, १७५४–१७५९, याच्या कारकीर्दीची व त्याचा वजिर गाझिउद्दिन इमाद-उल्-मुल्क याच्या कारभाराची हकीगत अगदी थोडक्यात देण्यात येईल, कारण या काळातील इतिहासाच्या रंगभूमिवर प्रभाव पडला आहे तो अहमदशहा अब्दालीचा. याच्या कारकीर्दीचा सर्वोच्च बिंदू, त्याच्या पानिपत येथील विजयाने (१७६१) गाठला. त्याच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारी विपुल साधने आता उपलब्ध असून, अद्याप कोणी लेखकाने त्यांचा वापर केलेला नाही. या न वापरलेल्या विपुल साधनसामग्रीच्या आधारावर अधिक सखोल अभ्यास करण्यासारखीच अहमदशहाची कामगिरी आहे. या नंतरचा १२ वर्षांचा कालखंड हा एकूण निर्जीव व गोंधळ–अस्वास्थ्य यानीच भरलेला असून, कोणी इतिहासकाराने लक्ष देण्याच्या लायकीचा नाही. यानंतर महादजी शिंदे यांचा उदय होऊन पुढील दोन दशके उत्तर हिंदुस्तानच्या सर्व मैदानी प्रदेशावर, महादजी एखाद्या विराट पुरुषाप्रमाणे वावरतो. या महादजीच्या उदयापासून येथील इतिहासाच्या ओघाला नवे रूप येऊ लागते व यातून नवे दृश्य उभे राहू लागते. महादजीचा उदय व कार्य याबाबत, जवळजवळ आश्चर्यचकित करण्याइतक्या विपुल प्रमाणात, अनेक भाषेतील विविध लिखाण मला आता जमविता आले आहे. या विपुल साधनांवरून, या शौर्यशाली व्यक्तित्वाचा सविस्तर अभ्यास करून सर्व हकीगत मांडण्याचा माझा हेतू आहे. (भा. मुख्यत: खंड ३ रा)

महादजीच्या मृत्यूपासून (१७९४) ते ब्रिटिशानी दिल्ली जिंकून घेई तोपर्यंतची हकीगत तर चांगली सर्वश्रुतच आहे. माझ्या या ग्रंथ विषयाचा व्यवस्थित समारोप करण्यापुरतीच फक्त या अखेरच्या भागाची हकीगत मी देणार आहे. [प्रथमावृत्ती : १९३२] [दुसरी आवृत्ती : एप्रिल १९४९]

## ग्रंथकाराचे निवेदन

प्रस्तुत ग्रंथाची प्रथमावृत्ती १९३२ मध्ये प्रकाशित झाल्यानंतर याच विषयाशी संबंधित असे, तीन विशेष अभ्यासपूर्ण, प्रबंधात्मक ग्रंथ ( Treatised ) प्रसिद्ध झाले आहेत. माझ्या विषयाच्या तीन भागांची विस्तृत माहिती यातील एका एका प्रबंधात लहानसहान बारकावे व त्यांचे तपशील आणि त्यावरील सूक्ष्म, सुंदर टीकात्मक विवेचन यासहीत आलेली आहे. माझा ग्रंथ हा सर्वसाधारण इतिहासाचा असून, इतक्या बारकाव्याने विवेचन करीत, विस्तृत स्वरूपात माहिती त्यात देण्याचे प्रयोजन नाही. प्रसिद्ध झालेले निर्दिष्ट प्रबंधरूप **ग्रंथ असे :** (१) **"औंधचे पहिले दोन नबाब"** *"First Two Nababs of Audh"* ले. डॉ. आशिर्वादीलाला श्रीवास्तव–(१९३३.–यानंतर **"शुजा-उद्-दौला"** हा द्विखंडीय ग्रंथही प्रसिद्ध झाला). (२) **"माळव्यांचा संक्रमण काळ"**– *Malava in transition* (१९३६) ले. डॉ. रघुवीरसिंह ; आणि (३) **"शिखांचा इतिहास"** *History of the Sikhs* –तीन खंड ले. हरिराम गुप्ता : (१९३३–४४.–यांचे पाठोपाठ **"उत्तर मुघल कालीन पंजाबचा इतिहास :** Studies in the later *Mugal History of Punjab 1944* हाही ग्रंथ प्रसिद्ध झाला). या ग्रंथाच्या लेखकानी आपल्या ग्रंथासाठी, मी वापरलेली पर्शियन, मराठी आणि इंग्रजी भाषांतील मूलसाधने तर वापरली आहेतच शिवाय, विशेषत: या निरनिराळ्या पोट विषयांकडेच विशेष लक्ष देऊन त्यांची विशेष माहिती देणाऱ्या मूळ साधनांचाही वापर केला आहे. माझ्या ग्रंथविषयाचा हेतु वेगळ्या रीतीने सीमित केलेला असल्यामुळे, त्याच्या रचनेतही विशेष साधने वापरण्याचे प्रयोजन नाही असे माझे मत होते. यासाठी, या निरनिराळ्या पोट विषयांचा सखोल अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्या अभ्यासकांनी या तीन प्रबंधात्मक ग्रंथांचाच उपयोग करणे अवश्य आहे.

माझ्या ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतरच्या १७ वर्षांच्या काळात, माझ्या स्वत:जवळच्या साधनांमध्येही नव्याने उपलब्ध झालेल्या मराठीतील साधनांची आणखी पुष्कळच भर पडलेली आहे. ही भर मुख्यत: पुढीलप्रमाणे आहे:— (१) अलीकडेच उपलब्ध झालेली मराठीमधील कागदपत्रे : उदा. **१. पेशवे दप्तरातील निवडक पत्र संग्रहाचे आणखी प्रसिद्ध झालेले खंड.** (आता हा संपूर्ण निवडक लेखसंग्रह एकूण ४५ खंडांमध्ये उपलब्ध झालेला आहे.). २. **पुरंदरे दप्तर** (३ खंड), **३. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने** (२ खंड–बी. बी. ठाकूर संपादित) आणि यापेक्षाही अधिक महत्त्वाचे, मराठीतील नवे कागदपत्र म्हणजे : ४. आता प्रसिद्ध झालेले : सरदार गुलगुले यांचे **"कोटादप्तर"**. या मराठीतील कागदपत्राव्यतिरिक्त, पर्शिअन भाषेतील आणखी कागदपत्रेही आता उपलब्ध झाली आहेत. ती अशी...... (१) अनेक देशातून व ठिकाणातून मिळालेली **"अखबारात"** ; (२) १९३८ मध्ये संपूर्ण पहाणी करण्यात आलेला जयपूर राज्याचा पुरातत्त्व दप्तरखाना, आणि (३) अहमदशहा अब्दालीने पाठविलेले खलिते–(यातील निवडक पत्रांचे–फर्मानांचे इंग्रजी रूपांतर, मे १९४६ च्या मॉडर्न रिव्ह्यूच्या अंकात मी प्रसिद्ध केलेले आहे). या दोन गटांव्यतिरिक्त साधनांचा आणखीही एक गट आता उपलब्ध आहे

तो असा : **'पुणे रेसिडन्सी पत्रव्यवहार'** या कागदपत्रांच्या मालेचे संपादन, मुंबई-शासनाकरिता, गो. स. सरदेसाई व मी केले असून, ही माला आता १४ खंडात जवळ जवळ पूर्ण झाली आहे. उपलब्ध मराठी व पर्शियन कागदपत्रात, १७९४ नंतरच्या हकीगतींच्या दृष्टीने माहितीचा बराच अभाव आहे. हे दुर्भिक्ष्य कमी करून त्या माहितीत भर घालण्याचे बरेच काम, आम्ही संपादन केलेली, पुणे रेसिडेन्सी कागदपत्रांची ही माला करीते.

माझ्या प्रस्तुत ग्रंथाची दुसरी आवृत्ती तयार करण्याच्या कामी, आता उपलब्ध झालेला, हा विपुल कागदपत्रांचा नवा संभार मी वापरला आहे. या नव्या माहितीमुळे व मध्यंतरीच्या काळातील माझ्या आणखी चिंतनामुळे माझ्या काही माहितीत व निष्कर्षात बदल झाले आहेत. हे बदल ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीत सामावलेले असून, शिवाय या संधीचा उपयोग करून पहिल्या आवृत्तीत राहिलेले काही दोष व काही छपाईतील दोष, हेही आता काढून टाकले आहेत.

या ग्रंथाची पहिली आवृत्ती छापून तयार केली त्यावेळेपेक्षा ग्रंथ निर्मितीचा खर्च आता चौपटीने वाढला आहे. या वस्तुस्थितीमुळे ग्रंथाची ही नवी आवृत्ती छापून प्रसिद्ध करताना ग्रंथाच्या बाह्यांगाबाबत मला निग्रहाने अतिशय साधेपणा ठेवणे भाग पडले आहे.

ग्रंथात निर्देशिलेल्या काही व्यक्तींबाबत, निरनिराळ्या लेखकांनी वा निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळी नावे वा बिरूदे वापरली आहेत. यातून होणारा संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी मी, सर्व ठिकाणी अशा व्यक्तीसाठी प्रत्येकी विशिष्ट एकच नामाभिदान वापरले आहे. अशा व्यक्ती व त्यांची वापरलेली नांवे अशी :

(१) **मुइन-उल्-मुल्क** (युरोपियन लेखकानी 'मिरमन्नू' Mir Mannoo असे संबोधिलेला.)

(२) **इन्तिझाम** (इतिमाद-उद्-दौला खान-इ-खानान) आणि

(३) **इमाद-उल्-मुल्क** (गाझिउद्दिन २ रा याबद्दल)

**जदुनाथ सरकार**

---

# विशेष संदर्भ सूची

## पर्शियन भाषेतील

१. **आनंद** : आनंदराम मुखलिस याचे **तझकिरा-** Tazkira [ इलियट (८) ७६ ].–अलिगड विद्यापीठ—हस्तलिखित–इलियटच्या ग्रंथाची भाषांतरकार लेफ्टनंट पर्किन्स, याने वापरलेलीच प्रत. यातील हकीगत, १७४८ ला संपते.

२. **अशब** (Ashab): **तारिख-इ-शहादात-इ फरुखसियार वा**(Wa) **जुलुस इ-महंमद** (Md) **शहा.** लेखक– महंमद बक्ष, महंमदशहाचा ( Foster ) बरोबर वाढवलेला व मानलेला भाऊ. ( E. L. २३२ ), I. O. L. ( इंडिया ऑफिस लायब्ररी ) हस्तलिखिते.

३. **बयान : बयान-इ-वकाई,** ले.– ख्वाजा अब्दुल करिम कश्मिरी ( E. L. १२४), लाहोर P. L. हस्तलिखित.

४. **च. गुल : चहार गुलझार-इ-शुजाई-ले.**– हरचरणदास, १७८४ मध्ये पुरे केले. (E. L. २०४), पाटणा हस्तलिखित.

५. **जी. आय. आर.** ( G. I. R. ) **गुलिस्तान-इ-रहमत** ले–मुस्तजब खान ( Kh ) ( E. L. ३०१)–इंग्लिश भाषांतर–सी. इलियट १८३१. यातून उद्धृत घेतली आहेत.

६. **हकिकत-उल-आलम**, ले.-मिर आलम, यातील हकीगत १७९९ पर्यंतची (लिथो, हैदराबाद).

७. **हुसेन शाहि : तरिख-इ-हुसेन शाहि,** ले.–सय्यिद इमामुद्दिन अल हुसैनि, लेखन-१७९७, पटना ( O. P. L. ) हस्तलिखित.

८. **इमाद : इमाद-उस्-सादत :** ले.–सय्यद घुलाम अलि नकबि. लेखन–१८०७ (लखनौ लिथो). (E. L. ३९४).

९. **जहांकुश : तरिख-इ-जहां-कुश-इ-नादिरी.** ले.– मिर्झा महमद महदि (मुंबई लिथो) ( E. L. ९९).

१०. **खजाना-इ-अमिरा** Khazan-E-Amira : ले.– घुलाम अलि अझाद, लेखन–१७६३ (लखनौ लिथो).

११. **मिरात-इ-अहमदि :** ले.– अलि महमदखान. ग्रंथातील हकीगत १७६१ अखेर (गायकवाड ओरिएंटल (पौर्वात्य) माला, बरोडा), ३ खंड.

१२. **मिस्किन : तहमास्प खान याच्या आठवणी** ( Memories ) (लेखकाचे टोपण नाव–मिस्किन याच्या पदव्या : मुहकम-उद-दौला इतिकाद जंग ( E. L. १००), लेखन १७८०, ब्रिटिश म्युझियम–पर्शियन ८८०७–एफ् ६२ बी पासून आणि यापूर्वीच्या नबाब

सदर यार जंग याच्या हस्त लिखितातील काही भागातूनही, आधार म्हणून उद्धृते दिली आहेत.

१३. **मुजमिल-उत्-तवारिख बाद नादिरिया :** ले.– इब्ज महंमद अमिन अबुल हसन **गुलिस्तानी** ओ. मॅन ची ( O. Mann ) आवृत्ती ( लेडन Leyden १८९६ ). लेखन १७८२.

१४. **मुझ : तारिख-इ-मुझफ्फरि :** ले.– महंमद अलि खान अन्सारि (पानिपतचा). लेखन १८०० ( E. L. ३१६ ) O. P. L. हस्तलिखित.

१५. **रियाझ : रियाझ-उस्-सलातिन :** ले.– घुलाम हुसेन सलिम, लेखन १७८८ ( Biblio India ).

१६. **सलिमुलाह : तारिख-इ-बंगाल,** लेखन सुमारे १७६३.

१७. **शाकिर : तझकिरा**— शाकिरखान याचा–लुत्फुल्लाखान ब. सादिक (पानिपतचा) याचा मुलगा.–हे हस्तलिखित मला पाटणा येथे शोधताना सापडले.–ब्रिटिश संग्रहालयातील पूरक अनुक्रम ६५८५ या सारखेच हे 'शाकिर' आहे. ( पण ६५८५ हे अधिक पूर्ण आहे.)

१८. **सियार : सियार-उल्-मुतख्खरिन**–ले.– सय्यद घुलामहुसेन तबातबाय (E. L. १९४). लेखन पूर्ण केले १७८२. १८३३ मध्ये, हकिम अब्दुल मजिदने कलकत्त्यात छापलेली आवृत्ती, या ग्रंथात संदर्भासाठी वापरली आहे.

१९. त-इ-अ–( Tah. ) : **तारिख-इ-अहमदशाही** ले.– निनावी.–हा निनावी लेखक "सर्व काळी हजर असलेला असून.....याने स्वतःच्या डोळ्यानी बादशहा अहमदशहाची संपूर्ण दुर्दशा पाहिली आणि अश्रु ढाळले." ( **फोलिओ** ६८ अ. ). हा ग्रंथ, या कारकीर्दीचा सर्वात सविस्तर व अतिशय बिनचूक इतिहास सांगणारा आहे. ( E. L. १०४). सर हेन्री इलियटने याची हस्तलिखित प्रत तयार केली असून त्यावर त्याने पेन्सिलीने एक टीपही लिहिलेली आहे. ( मिर्झा फख्रुद्दिन शहा बी. यांच्या ग्रंथ संग्रहालयात ). ही पेन्सिल टीप अशी : " या प्रतिवरून मि. फॉरसिथने भाषांतरही केलेले आहे." Mr. Mus. Prs. or 2005 हीहि एक प्रत आहे **यातील पृष्ठावर चुकीचे अनुक्रमांक घातलेले असून या पृष्ठांची बांधणीही चुकीची आहे.** त्यातील बरोबर अनुक्रम असा : १ अ–६६ ब, ६८ अ–७२ ब, ६७ अ व ब, ७३ अ ते अखेरपर्यंत.

२०. **वारिद : तारिख-इ-छघ्तइ** किंवा **मिरात बारिदात** ले.– महमदशहा तेहराणि (लेखकाचे टोपण नाव–**वारिद** ). लेखन १७३४ ( E. L. २१). पाटणा O. P. L. हस्तलिखित.

२१. **युसुफ अलि : अहवल-इ-महबत जंग** ( ब्रिटिश म्युझिअम ), लेखन-सुमारे १७६७.

२२. **करमअलि : मुझफ्फर नामा,** लेखन १७७२, प्रो. एच् अस्करि यानी शोधून काढिलेल्या वैशिष्ट्यपूर्ण हस्तलिखितापैकी, याचे मी केलेले इंग्रजी भाषांतर, बंगाल–पूर्वीचा व आताचा यात आहे.

२३. **डी. सी.** ( D. C. ) : दिल्ली क्रॉनिकल ( वार्तापत्र वा बखर :–१७३८ ते १७९८ या काळात दिल्लीमध्ये लिहिलेली, घडामोडींची वार्तापत्रे. **इंडिअन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या** ( हिंदुस्तानचे एतिहासिक कागदपत्र-कमिशन ) **कामकाजात व अहवालात** ( २–१९२१), मी, वर्णन केलेली हस्तलिखित बखर वा वार्तापत्रे.

### मराठी संदर्भ

२४. **ऐतिहासिक पत्रव्यवहार,** खंड २ रा, ( आवृत्ती २ री ). संपादन–गो. स. सरदेसाई व इतर.

२५. **राजवाडे : मराठ्यांच्या इतिहासाची साधने.** संपादक– व्ही. के. राजवाडे आणि इतर २१ खंड.

२६. **एस्. पी. डी.** ( पे. द. नि. प. ) : **पेशवे दफ्तरातील निवडक कागदपत्र.** संपादक– गो. स. सरदेसाई, मुंबई सरकारचा छापखाना, संदर्भ देताना जेथे निश्चित पृष्ठ अनुक्रमांक दिलेला नाही तेथे 'खंड' क्रमांक व **पत्र क्रमांक,** ही दिली आहेत.

२७. **वाड : सातारचे राजे आणि पेशवे यांच्या रोजनिशांमधील निवडक उतारे.** संपादन– जी. सी. वाड आणि इतर.

२८. **डी. वाय.** ( D. Y. ) : **दिल्ली येथील मराठा राजकारणे किंवा हिंगण्यांचे खलिते.** संपादन–डी. बी. पारसनीस–२ खंड व पुरवणी. यानंतर "**हिंगण दप्तर**" या संग्रहाचेही २ खंड प्रसिद्ध झाले आहेत.

२९. **पुरंदरे दप्तर,** ३ खंड

३०. **होळकरशाहीच्या इतिहासाची साधने.** संपादक–बी. बी. ठाकुर, २ खंड.

३१. **फाळके : शिंदे-शाहीच्या इतिहासाची साधने :** संपादक– ए. बी. फाळके-४ खंड. (यातील तीन, गुलगुले दप्तरापैकी आहेत.

### हिंदी-इत्यादी

३२. **सुजन चरित्र**–किंवा सुरजमल जाटाचे चरित्र. ले.– सुदन. ( यामध्ये १७४५ ते १७५३ या काळातील फक्त सात घटनांची हकीगत आहे. ) दुसरी आवृत्ती. ( बनारस नागरी प्रचारिणी सभा. )

३३. **विर विनोद :** ले.– कविराज श्यामलदास, ४ खंड.

३४. **वंश भास्कर :** ले.– सुरजमल मिश्रन. ८ खंड (लेखन : १८४१ ).

वापरलेल्या इतर संदर्भ ग्रंथांची नोंद, प्रस्तुत ग्रंथाच्या ओघातच ज्या त्या ठिकाणी केली आहे किंवा त्यांची माहिती पुढे देण्यात येईल.

### इंग्रजी-संदर्भ

३५. (C. P. C.) **कॅलेंडर ऑफ पर्शिअन कॉरस्पॉंडन्स**–पर्शिअन भाषेतील पत्रव्यवहार दिनदर्शिका.....हिंदुस्तान सरकारचे प्रकाशन. ८ खंड.

३६. **फॉरेस्ट जी :** या लेखकाचे दोन ग्रंथांचा संदर्भ वापरला आहे.....

१. **लंडन आवृत्ती**– यात वॉरन हेस्टिंग्जचे "शासकीय कागदपत्र" (State Papers) आहेत ते दोन खंडांत प्रकाशित केलेले आहेत.

२. **कलकत्ता आवृत्ती–** हा अगदी वेगळाच ग्रंथ असून यात 'कौन्सिलच्या' गुप्त समितीच्या बैठकांच्या कामकाजाची नोंद आहे. ( परराष्ट्र खाते–१७७२–८५), हे ३ खंड आहेत–प्रकाशन १८९०.

**इंडिअन अॅटलास :** "सर्व्हे ऑफ इंडिया" मार्फत प्रकाशित केलेल्या, हिंदुस्तानच्या जुन्या नकाशांचे पुस्तक. या नकाशासाठी वापरलेले प्रमाण (स्केल)–१/४ इंच = १ मैल.

ही संदर्भ सूची निरनिराळ्या भाषांमधील मूळ आधारांची, ( Original Sources ) आहे. अशा आधारावरून व अन्य पण संबंधित विषयांचा सखोल अभ्यास करून लिहिलेले काही महत्त्वाचे ग्रंथही प्रस्तुत ग्रंथातील विषयावर पुष्कळच प्रकाश पाडतात. अशा महत्त्वाच्या आठ नऊ इतिहास ग्रंथांचा निर्देश, लेखकानी (सरकार) प्रस्तावनेत केला आहे. तेही ग्रंथ प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास करण्याला, उपयुक्त ठरतील. उदा. अनेक प्रवास वर्णने, "औधचे पहिले दोन नबाव" "माळवा–बदलता माळवा" इ.

---

# ग्रंथाची पार्श्वभूमी

## What goes Before

तैमूरवंशीय राजपुत्र बाबर याने हिंदुस्तानात १५२६ मध्ये स्थापन केलेल्या मुसलमान साम्राज्याच्या प्रत्यक्ष **ऱ्हासाची** संपूर्ण हकीगत सांगण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. ग्रंथाची सुरुवात स. १७३८ पासून केलेली असली तरी या आधीच सुमारे एक शतक, या साम्राज्याच्या **ऱ्हासाला** सुरुवात झाली होती. या ऱ्हासातील नैतिक अवनतीचे अदृश्य मूळ आणि यातून पुढे हळूहळू वाढत गेलेला अधःपात, यांचा अभ्यास मी, माझ्या आधीच्या ग्रंथांमधून केलेला आहे. तेव्हा दिल्ली साम्राज्याच्या राजकीय प्रकृतिमध्ये, ऱ्हासाच्या या वीषाने, क्रमाक्रमाने आपला अंमल कसकसा बसविला याचा अभ्यास करण्याची वाचकाला जर इच्छा असेल तर त्याने माझ्या, या आधीच्या ग्रंथांकडे वळले पाहिजे. वरवर पाहिले तर हे साम्राज्य, शहाजहानाच्या कारकीर्दीत (१६२८–१६५८) कळसास पोहोचलेले दिसते, पण याच कारकीर्दीत त्याच्या ऱ्हासालाही सुरवात झाली. **औरंगजेबाचा इतिहास** या माझ्या इतिहास ग्रंथाचे पाच खंड आहेत. या ग्रंथाची सुरवात या शहाजाद्याने, आपल्या पित्याचा प्रतिनिधी म्हणून, दख्खन, बाल्ख आणि कंदाहारकडे काढलेल्या मोहिमांपासून होते. नंतर औरंगजेब, सुभेदार म्हणून पुन्हा दख्खनमध्ये आला व त्याची ही कारकीर्द, असाधारण कर्तृत्वाची झाली. या कारकीर्दीतील औरंगजेबच्या शासकीय ( Administrative ) व लष्करी कार्याची आणि अशाच अन्य घटनांची हकीगतही याच खंडात येते. या कारकीर्दीतच शहाजहानाच्या आजारीपणामुळे (१६५७) त्याला त्याचे सिंहासन गमवावे लागले, तीही हकीगत त्यात आहे. विजापूर, गोवळकोंडा ( Golkonda ) सुलतान शाह्यांची आधीची हकीगत आणि थोर, मराठा राष्ट्रपुरुष शिवाजी याच्या उदयाची हकीगतही याच खंडात आहे. **दुसऱ्या खंडात**, शहाजहानाच्या मुलामध्ये झालेल्या वारसायुद्धाची सविस्तर माहिती दिलेली आहे.

या ग्रंथाचा **तिसरा खंड**, औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या पहिल्या अर्ध्या भागासाठीच वापरला आहे. या काळात सरहद्दीवरील अफगाण जमातीशी ( Tribes ) आणि राजपुताबरोबर अशी दोन दीर्घ युद्धे चालली. तथापि ही दोन दीर्घ युद्धे वगळली तर आपल्या कारकीर्दीचा हा अर्धा भाग, औरंगजेबाने उत्तर हिंदुस्तानांतच, शांततेत घालविला. औरंगजेबाचे कुटुंब व मंत्री, शासकीय धोरण आणि नैतिक नियम व कायदे, त्याचा धार्मिक हटवाद वा कडवेपणा ( Bigotry ) व यामुळे झालेली राजपूत व शीख यांची प्रतिक्रिया याही गोष्टींची माहिती या खंडात आहे. "इस्लाम" धर्मानिष्ठित, इस्लामी राज्याच्या आधारभूत कल्पनांचे सखोल विश्लेषण करून त्यातून व्यवहारात झालेल्या परिणामांची सोदाहरण चर्चा याच खंडात केली आहे. याचबरोबर टॉडच्या "राजस्थान" या ग्रंथात आलेल्या बऱ्याच मुद्द्याबाबत दुरुस्तीही यात केली आहे.

**चवथ्या खंडात** औरंगजेबाच्या कारकीर्दीतील १६५८ ते १६८९ या काळांतील, फक्त दक्षिण हिंदुस्थानमधील घटना व हालचालींची हकीगत आहे. पण यांच्या आकलनासाठी

उपयुक्त म्हणून मराठ्यांच्या इतिहासाच्या इ. स. १६४४ इतक्या आधीच्या पार्श्वभूमिकडे व मूळच्या परिस्थितीकडेही लक्ष दिलेले आहे. या खंडामध्ये विजापूर व गोवळकोंडा या सुलतानशाह्यांची अखेरची वर्षे व नाश आणि शिवाजी व संभाजी यांच्या कारकीर्दी, यांची सविस्तर हकीगत आली आहे. या माहितीचे संकलन अनेक मूलभूत साधनांच्या आधारावरून केलेले असून तिची नव्याने गुंफण केलेली आहे. बादशहाच्या जीवनाची अखेरची १८ वर्षे हा पाचव्या खंडाचा विषय आहे. त्याच्या जीवनाचा हा काळ त्याने केलेल्या अति कष्टप्रद, प्रयत्नांचा व त्याच्या जीवनात निराशानी व्यापलेल्या व्यथांचा होता. या कालखंडातील, त्याच्या जीवनाच्या संदर्भात याच भागामध्ये आणखीही काही अनुषंगिक विषय येतात ते असे :—१) मद्रासच्या किनाऱ्यावरील जिल्हे आणि म्हैसूरचे पठार, येथील इतिहासाची माहिती २) 'जिंजीचा वेढा'–यालाच "पूर्वेकडील ट्रॉय" ची कथा असे म्हणतात. ३) मराठ्यांचा यशस्वी स्वातंत्र्य लढा ४) पूर्वेकडील समुद्रातील युरोपियनांची चाचेगिरी ५) मुघल शासन आणि इंग्रज व्यापारी यांच्यामधील लढा, ६) तीस वर्षे चाललेले राजपुतान्यातील युद्ध आणि ७) या प्रदीर्घ कारकीर्दीतील अनेक सुभ्यांचा सामान्य इतिहास–या खंडाचा शेवट साम्राज्याच्या ऱ्हासाच्या कारणांचे विवेचन करून होतो.

परंतु या सर्व खंडात, देशाच्या सामाजिक स्थितीचे विवेचन व अभ्यास मात्र काही संक्षिप्त उल्लेखाव्यतिरिक्त केलेला नाही. पण प्रस्तुत लेखकाचाच या विषयावर "मुघल शासन" 'Mughal Administration' या नावाचा एक स्वतंत्र ग्रंथ मात्र आहे. शाही शासनाची रचना, "पोप व पवित्र (Holy) रोमन सम्राट" या दोघांचीही पदे एकत्र केलेल्या मुघल सम्राट पदाचे महात्म्य, अधिकार आणि कार्ये, कारभारातील खात्यांतर्गत कार्यपद्धति, सुभ्यांचा कारभार, करपद्धति, मुस्लिम कायदा व न्याय, अमीर-उमराव वर्गियांचे स्थान वा दर्जा, शासकीय कारखाने वा उद्योग आणि शासकीय पत्रव्यवहारविषयक नियम, असे विषय या ग्रंथात आहेत. त्याचा शेवट केला आहे तो, हिंदुस्थानातील मुसलमानी अंमल–त्याचे यश आणि त्याचे अपयश–या विषयाने. या ग्रंथाव्यतिरिक्त, 'औरंगजेबाच्या कथा'–Anecdote of Aurangzib-या नावाचे आणखीही एक, माझे प्रकाशन आहे. या ग्रंथाचे मूळ पर्शिअन हस्तलिखित मला मिळाले. त्याची मी संपादित प्रत तयार करून, भाषांतर केले व ते या ग्रंथरूपाने प्रकाशित केले. या ग्रंथामध्ये औरंगजेबाची व्यक्तिगत स्वभाव वैशिष्ट्ये, सोदाहरण स्पष्ट झालेली आहेत. सुटसुटीत व जोरदार शब्दातील, औरंगजेबचे "वाक्प्रचार वा म्हणी" त्याची भेदक बोलणी व शेरे, त्याची शासकीय तत्त्वे, आपल्या मुलांना व अधिकाऱ्यांना हिंदुना व शिखांना त्याने दिलेली वागवणूक आणि त्याचे अखेरचे मृत्यूपत्र व संपती वाटप–Testament अशी माहिती या ग्रंथामध्ये आहे. हे प्रकाशन म्हणजे प्रत्यक्षात चाललेल्या त्याच्या राज्यकारभाराचे चित्रणच होय.

औरंगजेबाच्या कारकीर्दीतील पहिल्या अर्धात, दक्षिण हिंदुस्तानाच्या राजकीय मंचावर शिवाजीने आपला प्रभाव पाडला होता. त्याचे संपूर्ण व्यक्तित्व व कार्य, "**शिवाजी आणि त्याचा काळ**" (Shivaji and his Times) या माझ्या ग्रंथात सविस्तरपणे रेखाटले आहे. (आता या ग्रंथाची ४ थी आवृत्ती निघाली आहे.) या ग्रंथाला आणखी जोड दिली आहे ती, "**शिवाजीचे घराणे**" (House of Shivaji) या मराठ्यांच्या इतिहासावरील माझ्या आणखी एका ग्रंथाने, या ग्रंथात मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित

असलेले अनेक कागदपत्र व त्यांच्या आधाराने या विषयाची अभ्यासपूर्ण माहिती व चर्चा आहे. "**औरंगजेबाचा इतिहास**" ( History of Aurangzib ) या ग्रंथात, दिल्ली आणि त्या साम्राज्याचे सुभे, यावरच प्रामुख्याने लक्ष केंद्रित केल्याने, दक्षिण हिंदुस्तानच्या हकीगतीकडे स्वाभाविकच कांहीसे दुर्लक्ष झालेले आहे. पण मराठ्यांच्या इतिहासावरील माझे हे निर्दिष्ट ग्रंथ, हिंदुस्तानातील हकीगतींची सविस्तर माहिती देऊन औरंगजेबवरील ग्रंथात काही अंशी राहिलेली उणीव भरून काढतात. अशा रीतीने या सर्व ग्रंथात मिळून, तत्कालीन हिंदुस्तानचा इतिहास पूर्ण होतो. महान राजा शिवाजी याची मुघल बादशहाशी जी इतिहास प्रसिद्ध मुलाखत झाली त्याची अगदी बिनचूक हकीगत "**शिवाजीचे घराणे**" या ग्रंथात सापडेल. तसेच शिवाजीचा पिता शहाजी याचे चरित्र, त्याचा मुलगा संभाजी याची कारकीर्द आणि औरंगजेबाचा बंडखोर पुत्र शहाजादा अकबर याने केलेली साहसी कृत्ये यांचीही अगदी बिनचूक माहिती या ग्रंथात आहे.

हिंदुस्तानची संस्कृती आणि समाज यांच्या विकासाचे समालोचन, "**काळाच्या ओघामधील हिंदुस्थान**" (India Through the Ages) या माझ्या ग्रंथात केलेले आहे. हिंदुस्तानची संस्कृती आणि समाज यांच्या विकसनात, मुसलमान राजवटींनी भर घातली आहे तशीच आर्य, बौद्ध आणि ब्रिटिश या कालखंडानीही आपापली भर घातली आहे. आजच्या हिंदुस्तानची संस्कृति व समाज हा या सर्वांच्या मिलाफातून अंतिम तयार झालेला समाईक परिपाक आहे. माझ्या या एकूण "**मुघल कर्मशाळेमध्ये**"(Mughal Workshop) म्हणजे अभ्यासातून केलेल्या मुघल काळावरील निर्मितीमध्ये समाजाचे सांस्कृतिक पैलू घडवीत असताना, आणखी काही छोटे छोटे ढलपे–विषय बाजूला रहातात ते सगळे मी, "औरंगजेबाच्या कारकीर्दीतील कांही अभ्यास" (Studies in Aurangzib's Reign) या नावाच्या माझ्या आणखी एका ग्रंथात एकत्र केले आहेत. या ग्रंथाची १८ प्रकरणे असून, या सम्राटाची दिनचर्या, त्याचे मुलगे व मुलगी ( कवयित्री जेबुन्निसा–Zebunnisa ), त्याची साधुवृत्ती, वडील बहीण जहानआरा (भारतीय अँटीगॉन), त्याच्या कारकीर्दीचा इतिहास **पर्शियन भाषेमध्ये** लिहिणारे तत्कालीन दोन हिंदु इतिहासकार, चितगावचे ( Chittagong ) पोर्तुगीज चाचे, साम्राज्यातील उद्योगधंदे व व्यापार, अशा विषयांची या ग्रंथात चर्चा व माहिती आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतरची (१७०७) हकीगत, वुइल्यम आर्यावन यांच्या "**अखेरचे मुघल सम्राट**" (Later Mughals–William Irwine) या ग्रंथात पुढे चालू केली आहे. आर्यावनच्या हस्त लिखितात १७३७ पर्यंतची हकीगत आहे. त्याची ही हस्तलिखिते दुरुस्त करून मी त्याना टीपाही जोडल्या आणि त्यात आणखी तीन प्रकरणांची भर घातली. या तीन प्रकरणात नादिरशहाच्या हिंदुस्तानवरील स्वारीची (१७३८–३९) हकीगत दिली आहे. अशा प्रकारे संपादन व विस्तार केलेले हे सर्व लिखाण '**अखेरचे मुघल**' या नावाच्या ग्रंथात प्रसिद्धही केले. हा ग्रंथ दोन खंडांचा आहे. या इतिहास भागावर प्रकाश टाकणारी जी माहिती पौर्वात्य व युरोपियन भाषांमधील साधनांमधून आर्यावनला उपलब्ध झाली, तिचे एकत्रीकरण व संकलन, त्याने अतिशय प्रभुत्वाने केले आहे. पण १७२० नंतरच्या मुघलांच्या इतिहासावर नवा प्रकाश टाकणारा, त्याच्यानंतर उपलब्ध झालेला आणखी एक अतिशय बहुमोल साधनांचा साठा त्याला वापरता येणे शक्य नव्हते. हा साधन-संच, या शतकाच्या दुसऱ्या अर्धातील माहितीबाबत आता आमचा मुख्य आधार आहे. असा हा संच म्हणजे **मराठी भाषेतील "राज्याचे कागद आणि**

पत्रे" ( State Papers and Letters ) यांचा साठा होय. पर्शियन व इंग्रजी भाषेतील कागदपत्रावरून तयार केलेल्या आर्यावनच्या वृत्तांतामध्ये, या नव्याने मिळालेल्या साधनावरून निश्चित झालेल्या माहितीची मी योग्य तशी गुंफण केलेली आहे.

आर्यावनचा ग्रंथ (भा. लेखकाने संपादन केलेला) ज्या ठिकाणी संपतो, म्हणजे १७३९ च्या सुरवातीला त्या ठिकाणी "**मुघल साम्राज्याचा ऱ्हास**" Fall of the Mughal Empire या माझ्या प्रस्तुत ग्रंथाची सुरवात होते. या ग्रंथासाठी इतिहासकाराला प्रमुख आधार म्हणून उपयोगी पडतात ती साधने म्हणजे पर्शियन व मराठी भाषेतीलच असून, ती बहुतांशी न छापलेलीच आहेत.

प्रस्तुत ग्रंथाच्या **पहिल्या खंडात** महमदशहा आणि अहमदशहा या बादशहांच्या कारकीर्दीची हकीगत दिली असून, हा खंड १७५४ या वर्षाला संपतो. या वर्षी मुघल घराण्यातील **वंशपरंपरागत वारसा हक्काने** सम्राट पदावर आलेल्या अखेरच्या बादशहाचा खून झाला. येथून पुढे दुसरा खंड सुरू होतो. या काळात अफगाण व मराठे यांच्यामध्ये मोठा अटीतटीचा ( Classic Contest ) झगडा होऊन त्याचे पर्यवसान पानिपतच्या लढाईत झाले (१७६१). याच काळात जाटांचे राज्य उदयास आले व त्याचा अस्तही झाला आणि राजपुताना, माळवा व पंजाब या प्रांतातील राजकीय घडी विस्कळीत होऊन मोडली. या तीन्ही प्रवाहांची व घटनांची हकीगत **दुसऱ्या खंडात** येते. यापुढील भाग, **तिसऱ्या खंडात** सुरू होतो. या काळात नामधारी बादशहाला आपल्या मुठीत ठेवण्यासाठी, त्याच्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी, मुसलमान उमरावांच्या प्रतिस्पर्धी गटात झगडा चालला आणि त्याचा शेवट झाला तो मात्र, साम्राज्याच्या पालकाचा–कारभाऱ्याचा, कार्यकारी प्रतिनिधी म्हणून ( Vicegerent ) महादजी शिंद्याची स्थापना होऊनच (डिसेंबर १७८४). (भा. यावेळचे मुसलमान उमरावांच्या गटातील झगडे व महादजीच्या हालचाली यातून अखेरी पालक वा वजिर म्हणून पेशव्यांचे नांवे वजिरीची वस्त्रे व सनदा देण्यात आल्या व या वजिराचा–पेशव्यांचा–प्रतिनिधी म्हणून महादजी दिल्लीचा खरा पालक व राज्यकर्ता बनला). मुसलमान उमरावामधील या झगड्याची किळसवाणी हकीगत व महादजीचे अधिकारग्रहण ही हकीगत या खंडात येते. यावेळी महादजीने आपल्या अधिकाराचा प्रत्यक्ष वापर करण्यासाठी चार वर्षे मोठ्या निकराचा झगडा केला व घुलाम कादि रोहिल्याने, बादशहा शहा अलम २ रा, त्याचे कुटुंबिय आणि नोकर यांचा अनन्वित छळ केला. (१७८८) हीही सर्व हकीगत याच खंडात येते. या पुढील भाग **चौथ्या खंडात** आहे. महादजी शिंद्याने, आपले प्रतिस्पर्धी होळकर आणि राजपूत यांच्यावर मोठ्या कष्टाने मिळविलेले जय, पुढे पेशव्यांच्या साम्राज्याचे झालेले विघटन आणि यशवंतराव होळकर या राजकीय धूमकेतूचा एकाएकी झालेला उदय ही हकीगत चौथ्या खंडात येत असून अखेरी १८०३ पर्यंत या सर्वातून ब्रिटिशांच्या अधिसत्तेचा (British Paramountsy) उदय होतो या ठिकाणी हा चौथा खंड संपतो.

---

# अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

# महमदशहाची कारकीर्द--नादिरशहाच्या निर्गमनानंतर

## § १ : दिल्लीचे साम्राज्य

दिल्लीच्या पहिल्या मुसलमान राजाचा उदय बारावे शतकाच्या अखेरीस झाला. पुढे दोनशे वर्षे सतत कमीजास्त प्रमाणात यश मिळत मिळत, त्याचा दिल्ली-केंद्रापासून दूरवर विस्तारच होत गेला. शेवटी त्याने सर्व उत्तर हिंदुस्थान व्यापला, इतकेच नव्हे तर विंध्य पर्वताच्या रांगाही ओलांडून, पलीकडे दक्षिण हिंदुस्थानातही प्रवेश केला. अशा रीतीने संपूर्ण हिंदुस्थानात एक संस्कृति आणि कारभाराची एक अधिकृत भाषा रूढ झाली. यापैकी काही छोटयाछोटया व अनिश्चित कालखंडामध्ये तर तो, एकाच राजसत्तेच्या अंमलाखालीही आला होता. या सर्व काळाला सुलतानशाहीचा कालखंड असेही म्हणतात. या नंतर मात्र दिल्लीच्या राजघराण्याची अतिशय दुरवस्था झाली ; राज्याला एकसंध राखणारे, त्याचे संरक्षण करणारे मध्यवर्ती सरकारही नाहीसे झाले आणि एकसंध मुसलमान साम्राज्याची छकले होऊन त्याचे जागी आपापसात सतत झगडणारी अनेक राज्ये निर्माण झाली. पुढील सव्वाशे वर्षांचा कालखंड या छोटया छोटया राज्यांची आपापसातील भांडणे व परिणामतः त्यातून संस्कृति व समृद्धी यांच्या मार्गात आलेले अडथळे, त्यांची झालेली पिछेहाट, यांच्या हकीगतींनीच भरलेला आहे. ही परिस्थिती इ. स. १५२६ पर्यंत म्हणजे साहसी तुर्कीवीर[१] बाबर याने एका नव्या, बलाढ्य मुसलमान साम्राज्याचा पाया घालेतोपर्यंत टिकली. नव्यानेच स्थापन झालेल्या या मुघल साम्राज्याला सुरवातीच्या काळातच 'सूर' या अफगाण घराण्याशी, थोडा काळ पण तीव्र लढा द्यावा लागला, तो प्राणघातक मात्र ठरला नाही इतकेच. पुढे इ. स. १५६० नंतर लवकरच, बाबराचा नातू अकबर याच्या अंमलाखाली हे साम्राज्य स्थिर होऊन, त्याच्याकडे कोणीही वाकडया नजरेने पाहू शकणार नाही, त्याला कोणीही आव्हान देऊ शकणार नाही, इतके बलाढ्य झाले. पुढील १३० वर्षांच्या कालखंडात, राज्यविस्तार, लष्करीसामर्थ्य, समृद्धी कला व व्यापार-उद्योग, याबाबत, या साम्राज्याची नेत्रदीपक प्रगती व भरभराट झाली. ही भरभराट या काळात सतत चालू राहून, अविरोध व जलदही झाली. अशा या भरभराटीने आशियाई जगताला, इतकेच नव्हे तर आशिया-बाहेरून येणाऱ्या प्रवाशांनाही चकीत करून सोडले. सबंध उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थानाचाही फार मोठा प्रदेश, या काळात एकाच साम्राज्य सत्तेखाली येऊन, या खंडप्राय देशाच्या सर्व भागावर एकाच प्रकारची राज्य यंत्रणा व एकाच प्रकारची संस्कृति प्रस्थापित झाली. त्यातील प्रमुख हमरस्ते, प्रवासी आणि व्यापारी यांच्या दृष्टीने सुरक्षित झाले.

१ सामान्यतः "बाबर" हा मुघल असे मानले जाते पण वस्तुतः तो मुघल नसून 'तुर्क' होता. त्याच्या बापाकडून तो, तैमुरलंगानंतरच्या पाचव्या पिढीतील वंशज, म्हणजे 'तुर्क' होय. त्याची आई मात्र प्रसिद्ध 'मुघल' चंगीझखान याच्या वंशातील, म्हणून तो 'मुघलही' होता. तथापि बाबर हा मुघलाकडे काहीशा तुच्छतेनेच पाही. त्यांची वागण्याची पद्धतीही त्याला आवडत नसे....... (ईश्वरी प्रसाद : हिंदुस्थानातील मुसलमानी रियासतीचा संक्षिप्त इतिहास : प्रकरण १३ वरून.)

देशातील आर्थिक साधन संपत्तीचा विकास झाला आणि या खंडप्राय देशाबाहेरील अन्य देशाशीही या देशाचे फायदेशीर व घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले. अशा रीतीने देशाला शांतता व समृद्धी यांचा लाभ होऊन सुसंस्कृत दरबाराकडून मिळणारे प्रोत्साहनही उपलब्ध झाले. यामुळे नव्या वळणाच्या हिंदुस्थानी मनाचा विकास झाला ; हिंदुस्थानच्या साहित्याची, चित्रकलेची, शिल्पशास्त्राची आणि हस्त व्यवसायांची मोठी प्रगती झाली. या सर्वांगीण प्रगतीमुळे, पुन्हा एकदा हा देश सुसंस्कृत जगातील देशांच्या पहिल्या रांगेत येऊन बसला आणि 'हिंदुस्थान' या एकसंध महान नवराष्ट्राची निर्मिती हेही, अशक्य कोटीतील स्वप्न असे राहिले नाही.

पण औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात, सुरळीत व नैसर्गिक रीतीने चाललेल्या या विकासाला प्रथम खीळ बसली ती मुख्यत: दक्षिणेत, मराठ्यांबरोबर चाललेल्या संघर्षामुळे. पुढे ती तोडण्यासाठी या बादशहाने पाव शतकभर तीव्र झुंज दिली ; पण अखेरी इ. स. १७०७ मध्ये, केवळ वृद्धापकाळामुळे, जेव्हा या बादशहाचा मृत्यू झाला त्यावेळी या साम्राज्यावर नाशाची अवकळा पसरू लागल्याचे, त्याचा ऱ्हास सुरू झाल्याचे, निश्चितपणे दिसू लागले. मुघल साम्राज्याच्या अनुषंगाने जी, नवी "हिंदुस्थानी-मुघल" ( Indo-Mughal ) अशी मिश्र संस्कृति विकास पावली होती, ती आता मृतप्राय झाली आणि यापुढे काहीही चांगले करण्याइतके सामर्थ्य तिच्यामध्ये उरले नाही. तथापि औरंगजेबाच्या मृत्यूनंतर लगेच, त्याच्या साम्राज्याचे विसर्जन मात्र झाले नाही. औरंगजेबाची आश्चर्यचकित करणारी कर्तबगारी, त्याचा कणखर स्वभाव आणि त्याची आपल्या कर्तव्यावरील आजन्म निष्ठा, यामुळे साम्राज्यात एकप्रकारचे सामर्थ्य निर्माण झाले होते आणि त्याच्या जोरावर मुघल साम्राज्याच्या राज्य यंत्रणेची एकूण चौकट त्यांच्या मृत्यूनंतर तीस वर्षेपर्यंत, दिसण्यात तरी, जशीच्या तशी टिकली. या काळात सरहद्दीवरील सुभ्यामध्ये कशाही बऱ्यावाईट घडामोडी होत राहिल्या तरी केंद्र सरकार मात्र अबाधित राहिले. तथापि सिंहासनावर या काळात, शरिराने व मनानेही दुर्बळ असलेले बादशहा एकामागून एक असे आल्यामुळे साम्राज्याचा ऱ्हास अटळच झाला. मुघल साम्राज्याच्या केंद्रस्थानी वाढत असलेली ही कीड व त्यामुळे होत असलेली अवनती अखेर सर्वांच्या दृष्टीसमोर उघडी पडली ती, इ. स. १७३७ मध्ये, बाजीरावाच्या घोडदळाने राजधानीवरच जेव्हा धडक मारली व तिचा अवमान केला त्यावेळी. या उदाहरणाने तर नादिरशहाला स्वारी करण्याचे आमंत्रणच दिले आणि यातून इ. स. १७३८ मध्ये दिल्ली साम्राज्याचा कारभार पूर्णपणे कोसळला.

## § २ : नादिरशहाच्या स्वारीनंतरचा हिंदुस्थान

नादिरशहाच्या स्वारीमधील क्रौर्यामुळे निर्माण झालेले मोठे भय, एप्रिल १७३९ च्या अखेरी, स्वाभाविकपणेच संपुष्टात आले. आशियामधील सर्वांत समृद्ध साम्राज्यांत लुटलेल्या संपत्तीचे ओझे बरोबर घेऊन या पर्शिअन विजेत्याने, आपल्या देशाकडे परतीच्या रस्त्याला लागण्यासाठी, ५ मे, रोजी मुघल राजधानी सोडली. नंतर आठ दिवसांनी महमदशहाने, पुन्हा अधिकारावर आल्यानंतरचा पहिला जाहीर दरबार भरविला. आपल्या नावाची नाणी पुन्हा पाडली आणि ती, मध्यंतरी नादिरशहाच्या नावाने प्रचारात आणलेल्या नाण्याऐवजी वापरात आणली. या प्रसंगी अमीर-उमरावानी बादशहाला नजराणे दिले आणि बादशहानेही

त्याना मानाचे पोषाख व बक्षिसे बहाल केली असे या प्रसंगाबाबत दरबारी अखबर नवीसानी लिहून ठेविले आहे. अशा रीतीने शाही दरबाराच्या समारंभाचे सर्व रूढविधी पुन्हा एकदा पार पाडण्यात आले तें जणूकाही, दरम्यानच्या काळात साम्राज्यावर अतिशय घोर, राजकीय संकट आलेच नव्हते अशा थाटात! तथापि परत गेलेला पर्शियन विजेता येण्यापूर्वी असलेल्या परिस्थितीत, आमूलाग्र फरक होऊन आताची स्थिती पूर्णतया वेगळी झाली आहे हे मात्र यावेळी हजर असलेला कोणीही विसरू शकत नव्हता. बादशहा आणि त्याचा वजीर हे पूर्वीप्रमाणेच जाग्यावर होते खरे पण वजीराच्या खालोखाल मानलेला साम्राज्याचा दुसरा अधिकारी–शाही सैन्याचा सर्व प्रमुख, खान-ई-दौरान–याचा नाश झाला होता. त्याचप्रमाणे सुभेदारापैकी सर्वात बलाढय, सादतखान बुरहाण-उल्-मुल्क (Burhan–ul–Mulk) व बादशहाचा व्यक्तीगत आवडता सरदार मुजफ्फर खान या दोघांचा आणि शिवाय खालच्या पदावर असलेल्या पण उच्च दर्जाच्या लोकांच्या नात्यातील अनेक व्यक्तींचाही नाश झाला होता. खडया सैन्यापैकी दहा ते बारा हजार सैनिक कर्नाळच्या युद्ध भूमीवर मृत्यूमुखी पडून, खुद्द दिल्ली शहरामध्येही २०,००० लोक तलवारीला बळी पडले होते. ठाणेश्वर, पानिपत, सोनिपत इत्यादी कमी प्रतीची लहान लहान शहरेही लुटालूट व कत्तल यामुळे उध्वस्त झाली होती. विजेत्या नादिरशहाने, खंडणी वा भरपाई म्हणून, रोख १५ कोट रुपये, शिवाय जडजवाहीर, मौल्यवान कपडालत्ता व बैठकीचे सामान अशा आणखी पन्नास कोट किंमतीच्या वस्तू, अशी मागणी केली होती. या सक्तीच्या मागणीची भरपाई करण्यासाठी शाही खजिना आणि सरदारांचे वाडे रिते झाले. याप्रसंगी शाही राजचिन्हापैकी सर्वात जास्त प्रसिद्ध व मौल्यवान असलेले दोन अलंकार–कोह-इ-नूर[1] हा हिरा व मयूर सिंहासन[2]—हीही नादिरशहाने हिसकावून नेली. शाही कुटुंबीय आणि साम्राज्यातील सर्वात मानी व बलाढय अमीर उमराव याना तर अपमानाच्या, याहीपेक्षा खोल दरीत त्याने लोटले होते. चामडयाचे कपडे तयार करणाऱ्या खुरासानी चर्मकार कोष्टयाच्या मुलाने[3]-नादिरशहाने–आपल्या मुलाबरोबर, पादशाही कुटुंबातील एका शहाजादीचा विवाह लाविला आणि लढाईत नुकताच मारल्या गेलेल्या मुजफ्फर खानाच्या सर्व सुंदर बायकांना आणि अविवाहित मुलींना तर त्याने स्वत:च भ्रष्ट केले. [ D. C. दिल्ली क्रॉनिकल–(हकिगत) आशव (२) ३६७ व ३७५ ]

१ कोह–इ–नूर :

२ मयूर सिंहासन : बादशाही वैभवाचे प्रदर्शन करण्यासाठी शहाजहानने हे सिंहासन मुद्दाम बांधविले (१६३४). यासाठी शाही जामदारखान्यातून तत्कालीन किंमतीनुसार ८६ लक्ष रुपये किंमतीची निवडक रत्ने—हिरे, माणिक, पाचू, मोती इत्यादी व एक लाख तोळे सोने (१४ लक्ष रुपये) वापरले होते. हे सिंहासन $3\frac{1}{4}$ यार्ड लांब $2\frac{1}{2}$ यार्ड रुंद, ५ यार्ड ऊंच होते. सिंहासनावरील छत, बैठक, छताचे खांब, पायऱ्या सर्व रत्नजडित असून, छताला १२ खांबांचा आधार दिला होता. प्रत्येक खांबावर दोन रत्नजडित मोर व दोन मोरांमध्ये रत्नजडित झाड होते. याच्या बांधणीस सात वर्षं लागली.

हे सिंहासन नादिरशहाने पर्शियात नेले पण आज ते अस्तित्वात नाही. ते मोडले गेले. त्याच्या काही भागांचा वापर करून एक नवे आधुनिक पद्धतीचे सिंहासन पुढे तयार करण्यात आले ते आज तेहरान राजवाडयातील म्युझियममध्ये आहे. इराणमध्ये तख्त-इ-ताऊस (ताऊस-मयूर) या नावाचे जें सिंहासन आहे ते हिंदुस्थानातील मयूर-सिंहासन नव्हे असे लॉर्ड कर्झनने केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले आहे..... (ईश्वरीप्रसाद : हिंदुस्थानातील मुसलमानी रियासत-प्रकरण. १६ वरून.)

३ खुरासानी चर्मकार कोष्टयाचा मुलगा म्हणजे नादिरशहा : हा मूळचा कॅस्पियन समुद्राच्या काठावरील 'काजार' नावाच्या तुर्क टोळीचा एक सरदार होता तो पुढे नादिरशहा नावाने प्रसिद्धीस आला. याचा बाप मेंढयांच्या चामडयाचे कोट, टोप्या करून विकी. प्रस्तुत निर्देश या पार्श्वभूमीवरून आहे. (गो. स. सरदेसाई : मुसलमानी रियासत भा. २, पृ. ४०४, १९५८ ची आवृत्ती.)

या स्वारीमुळे उत्तर हिंदुस्थानातील जनतेची अतिशय दैन्यावस्था झाली हे खरे पण लगेच पुढील काही महिन्यातच परमेश्वराने त्यांच्यावर दया दाखविली असे दिसते. यावेळच्या पावसाळ्यात भरपूर व वेळेवर पाऊस पडला, धरणीमातेने भरघोस पीक दिले आणि "जणूकाही प्रजेने नुकत्याच भोगलेल्या दुःखाबद्दल भरपाई करण्यासाठीच" सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ विपुल व स्वस्त मिळू लागले. पण कोणत्याही राष्ट्राची हानी होण्यात व त्याला हालअपेष्टा भोगाव्या लागण्यात माणसाची जितकी जबाबदारी असते त्याच्या निम्म्यानेही निसर्गाची नसते. "नादिरने हिंदुस्थान सोडल्यावर, दर्जा व वैभवाचा दिमाख, ही दिल्ली दरबारात पुन्हा दिसू लागली. बादशहा व सरदार यांनी सर्व प्रकारच्या रूढ धार्मिक नियमांविरोधी व बेकायदेशीर, वागण्याच्या सवयी बाजूला सारल्या व ते पुन्हा राज्यकारभाराकडे लक्ष देऊ लागले." असे वरवर पाहिले तर दिसू लागले. पण मुघल साम्राज्यातील नैतिक अध:पाताची वाहती जखम ही, अशा रीतीने वरवरच्या, दिखाऊ धार्मिक पावित्र्याने व निर्जीव रूढींच्या पालनाने नाहीशी करता येणार नाही इतकी खोलवर गेली होती. या परिस्थितीत बादशहाची व त्याच्या प्रमुख मंत्र्यांची घसरलेली दानत, शील व वृत्ती यांच्यामुळे, साम्राज्याच्या भवितव्यावर, सूड देवतेने कठोर आघात केलाच.[ आशब (२) ४१६ ].

## § ३ : महमदशहाचा स्वभाव

महमदशहा[१] इ. स. १७१९ मध्ये सिंहासनावर बसला. त्यावेळी तो १७ वर्षांचा होता. या घटनेपूर्वी सात वर्षे त्याला राजवाड्यातील जनानखान्यात डांबून ठेविले होते. माणसाला राज्य कारभार करता येण्यासाठी वा सैन्याचे नेतृत्व करता येण्यासाठी जरूर असे काहीही शिक्षण त्याला तेथे मिळाले नाही. त्याच्याजवळ नैसर्गिक बुद्धिमत्ता व बरीच दूरदृष्टी होती हे खरे ; पण याचबरोबर त्याच्या आधीच्या राजपुत्रांना, त्यांच्या वजिरांनी गादीवर बसविले व त्यानीच त्याना गादीवरून खाली ओढले होते हेही त्याने पाहिले होते. यामुळे स्वत: कारभार करण्याची व सरदारावर नियंत्रण ठेवण्याची, यदाकदाचित काही इच्छा त्याच्याजवळ एकेकाळी असलीच तर ती, पूर्णपणे चिरडली गेली होती. यामुळे सार्वजनिक कारभार क्षेत्रातून पूर्णपणे निवृत्त होऊन, त्याने हा कारभार आपल्या मंत्र्यांच्यावर सोपविला आणि तो स्वत: सुखलोलुप बनून ख्याली-खुशालीत मश्गूल होऊन राहिला. आपल्या २८ वर्षाच्या कारकीर्दीत, तो क्वचितच दिल्लीबाहेर जात असे आणि गेलाच तर, दिल्लीच्या जवळपासचे एखादे उद्यान पहाणे (सामान्यत: 'लोणी' येथील) व प्रसंगविशेषी पूर्वेस सुमारे १०० मैलांवर असलेल्या गढ मुक्तेश्वर येथील वार्षिक जत्रा पहाणे, अशा कारणांव्यतिरिक्त अन्य कारणासाठी नाही! आपल्या कारकीर्दीत तो लष्करी मोहिमांवर बाहेर पडला ते फक्त दोनदाच आणि तेसुद्धा आपल्या वजिराच्या परिवारापाठीमागून जणूकाय त्याचाच एक भाग असल्याप्रमाणे! शिवाय या दोन्ही मोहिमाही तशा अल्पकालीन आणि अपयशीच होत्या. यातील एक नादिरशहाविरुद्ध व दुसरी महमद रोहिल्याविरुद्ध होती.

तो प्रथम सिंहासनावर बसला तेव्हा एक तरतरीत, अतिशय देखणा, थोराड व दणकट बांध्याचा जवान होता. पण आळशी, बैठे जीवन व विषय-लोलुपतेचा अतिरेक यामुळे त्याची प्रकृती लवकरच ढासळली आणि वयाची फक्त चाळीसी गाठण्याच्यावेळी, तो कायमचा

१ आनंदराम ३०९, वारिद ११७–११८ सियार (३) २५, शाकीर ३३, चहारगुलझार ३९७-अ—३९८-अ, ता-इ-अ-२ ब, आशब (२) ४२०, बयान २४२–२४४, ताइ-अ-२.

रोगजर्जर व दुर्बल बनला. त्याला आता अफूचीही सवय जडली असल्याने ही स्थिती जास्तच विकोपाला गेली आणि या व्यसनामुळे शेवटी तो इतका अशक्त व कृश झाला की अखेर त्याला राजवाड्यातून हलविणेही अशक्य झाले.

जनानखान्याबाहेर त्याच्या करमणुकीची एकुलती एक गोष्ट म्हणजे यमुनेच्या तीरावरील वाळवंटात जनावरांच्या झुंजी वा साठमाऱ्या पहाणे ही होय. सकाळच्या वेळी प्रजेला दर्शन देऊन तिचा कुर्निसात स्वीकारण्यासाठी दिल्लीच्या शाहीवाड्याला एक झरोका (खिडकी) वा छोटासा सज्जा होता. त्याच्याच खाली यमुनेचे वाळवंट असून तेथे प्राण्यांच्या या झुंजी व साठमाऱ्या करीत व त्या तो पहात बसे. यातही एखादेवेळी तो बदल करी ते पक्षांचा शौकिन म्हणून त्याला वाटणारी रुखरुख व आनंद यामुळे हत्तींच्या झुंजी, वाटकरा आणि साठमाऱ्या.[1] हा मोठा धाडसी व धोकादायक खेळ त्याच्या वाडवडिलांनी फक्त "बादशाही विशेषाधिकार" म्हणूनच राखून ठेविला होता. अशा या खेळातील मजा, चैतन्य व खळबळ, सुरक्षित अंतरावरून पहात बसण्याची त्याची आवड आपण समजू शकतो. पण तो आपला सकाळचा वेळही कसा घालवी हे वाचले की आश्चर्य वाटते. महमदशहाच्या आधीचे बादशहा, आपला सकाळचा वेळ, जनतेला न्याय देण्यात वा मंत्र्याबरोबर कारभारविषयक विचारविनिमय करण्यात खर्च करीत. पण याऐवजी महमदशहा, दोन अस्वलांमधील झुंज पहात बसे किंवा "अस्वलांच्या तीन जोड्या, एक बकरा, एक मेंढा व एक रानडुक्कर हे सर्व मिळून एकाच वेळी हत्तीवर हल्ला करून त्याच्याशी झुंज देत आहेत असा खेळ पहाण्यात आपला वेळ खर्च करी. या जनावरांना यावेळी वाघाची कातडी गुंडाळलेली असत आणि त्यांना हत्तीवर हल्ला करून सर्वांनी मिळून एकत्रपणे झुंज देण्याचे शिकविलेलेही असे." (२५ एप्रिल १७४३ ला त्याने असे केल्याची नोंद आढळते.) बालक नाही वा गावंढळ विदूषकही नाही अशा कोणाही व्यक्तीला, आपले मुख्य कर्तव्य बाजूला ठेवून, अशा प्रकारच्या करमणुकीत आपला सकाळचाही वेळ खर्च करणे शोभण्यासारखे कसे मानता येईल असा प्रश्न उभा रहातो, आणि महमदासारख्या, १५ कोटी जनतेच्या धन्याला वयाच्या ४१ व्या वर्षाइतक्या प्रौढावस्थेत, यापेक्षा जास्त गंभीर आवडी-निवडी नसाव्यात, आपल्या वेळेचा यापेक्षा जास्त गंभीर कामासाठी उपयोग करता येण्यासारखे नसावे याबद्दल आश्चर्य वाटते. (अखबारत)

तारुण्यातील मनोविकार व आवडी यांचा पूर ओसरल्यावर मात्र महमदशहाच्या वृत्तीवर गंभीर विषण्णतेचा पगडा बसला आणि जीवनाच्या अखेरच्या कालखंडात, फकीर

---

१ या दोन्ही खेळासाठी भोवताली उंच भिंती असलेले मैदान वापरीत. यामध्ये माजलेले दोन हत्ती सोडीत त्यावर माहूतही असत व ते आपापल्या हत्तीला चेतवीत व या दोन हत्तींची झुंज लावीत ती कोणता हत्ती दुसऱ्याला मागे रेटतो हे पहाण्यासाठी असा हा खेळ असे. साठमारी हा आणखी एक विशेष धाडसी खेळ होता. याच मैदानात एक मस्त हत्ती मोकळा सोडीत. त्याच्या आसपास अनेक लोक, भाला, चित्रविचित्र निशाणे इत्यादी घेऊन, विचित्र हावभाव, आरडाओरड करीत त्याला बाजू बाजूने वा मागून डिवचीत व अतिशय चिडवीत. हत्ती त्यांचा पाठलाग करी. ते त्याला चुकवीत. पुन्हा बुजगावणे दाखवीत, चिडवीत व पळत. हत्ती त्यांचा पुन्हा पाठलाग करी. पुनःपुन्हा चाललेला हा पाठलाग व त्यातून लोकानी सुटणे असा हा खेळ बराच काळ चालल्यावर अतिशय चिडलेल्या हत्तीला मागील पायाला चिमटे लावून पुन्हा डांबून ठेवावयाचे, हा शेवट. या खेळात हत्तीला चिडविण्यास काही प्राणी व भुस्सा भरलेल्या माणसांच्या आकृत्याही वापरीत. या खेळात प्रसंगी प्राणी-माणसे दगावतही. असा हा खेळ क्वचित, संस्थानातून २० व्या शतकाच्या पहिल्या चतुर्थातही पहावयास मिळे. उदा. कोल्हापूर संस्थानात १९२१–२२ पर्यंत हा खेळ चाले.

समाजात वारंवार मिसळण्याची, त्यांच्याशी संभाषणात वेळ घालविण्याची व त्यावेळी अध्यात्मिक प्रश्नावर एखाद्या नवशिक्याप्रमाणे चर्चा करीत बसण्याची आवड त्याच्यामध्ये निर्माण झाली. या फकीर समाजापैकी तिघे फकीर त्याचे अध्यात्मिक गुरु बनले आणि दरबारातील अमीरउमराव व सामान्य जनता यानीही त्याचेच अनुकरण केले.[१]

अशा रीतीने आपल्या दीर्घ अमदानीत, तो स्वतःच साम्राज्याचा सर्वश्रेष्ठ प्रमुख असूनही त्याने राज्यकारभाराकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. परिणामतः अमीरउमरावांनी, जणूकाही त्या सर्वांवर सत्ता चालविणारा असा, एक धनी अस्तित्वातच नव्हता, अशा थाटात सर्व प्रदेशाची व राजकीय सत्तेची आपापसात वाटणी करून घेतली वा काही ठिकाणी अशा वाटणीसाठी झगडे व लढाया चालविल्या. महमदशहा आपल्या वजिराचा वा अन्य कोणाही मंत्र्याचा चांगला सल्ला मान्य करी पण त्यानुसार जरूर ती कृती करण्याचे धैर्य मात्र तो कधीही दाखवीत नसे. अशी कृती करणे तो दर दिवशी पुढे ढकली आणि असे करण्यातच सर्वांत मोठे शहाणपण व चातुर्य आहे असे त्याला, इतर दुर्बल माणसाप्रमाणे वाटेही. अशी चालढकल चाले ती अखेर यातून निर्वाणीची, गंभीर परिस्थिती निर्माण होईतो. मग मात्र आणीबाणीची परिस्थिती निर्माण होई व परिस्थितीच्या रेट्यापुढे, घडेल ते घडेल अशी स्थिती होऊन घटनांचा ओघ चालू राही. अशा दुर्बल राज्यकर्त्याच्या नशिबी आपल्या लाडक्या खुशामत-खोरांच्या आहारी जाण्याचे व ते सांगतील तसेच वागण्याचे येते. त्यातच महमदशहाच्या मर्जीतल्या या व्यक्ती चाणाक्ष असून त्यांची वागणूक अतिशय लाघवी व आकर्षक होती आणि त्यांची इच्छाशक्ती व स्वभावही कणखर होता. अशा परिस्थितीत त्यांच्या हातातील बाहुले बनण्याची नामुष्की महमदाचे नशिबी आली.

अशा प्रकारे सार्वजनिक कर्तव्यांच्या दृष्टीने तो एक केवळ नामधारी बनला असला तरी त्याच्या खाजगी जीवनातील स्वभावधर्मात या नामुष्कीची भरपाई करण्यासारख्या काही छटाही होत्या. स्वभावतःच तो चंचल व भित्रा असला तरी उर्मटपणा, लहर व अविचारी क्रौर्याची आवड, यापासून मात्र तो मुक्त होता. इतकेच नव्हे तर दुसऱ्याबाबत आस्था व त्यासाठी लागणारे एक प्रकारचे धैर्य यांची, त्याच्याजवळ वाण नव्हती, याचीही उदाहरणे आहेत. नादिरशहाची यशस्वी चढाई चालू असताना त्याच्या मित्रांनी त्याला बंगालकडे पळ काढण्याचा सल्ला दिला. यामुळे त्याचा स्वतःचा अपमान होण्याचे टळले असते पण तसा पळ काढण्याऐवजी तो आपणहून नादिरच्या स्वाधीन झाला. तसे केले नसते तर शत्रू अधिकच चिडला असता व त्याने विशेषच क्रौर्याने हल्ला करून प्रजेला सक्तीने शरण यावयाला लाविले असते. यातून निर्माण होणाऱ्या भयानक हालापासून प्रजेचे व राजधानीचे संरक्षण करणे हाच, नादिरच्या स्वाधीन होण्यात त्याचा उद्देश होता. "परमेश्वराने निर्माण केलेल्या प्राण्यांचे रक्त सांडण्याला वा त्याना इजा करण्याला त्याने कधीही अनुमती दिली नाही. त्याच्या कारकीर्दीत

---

१ यावेळी "शहा मुबारक याला बुऱ्हाण-उल-तरिकत; शहाबद्दा याला बुऱ्हाण-उल्-हकीकत, शहा राम्झ याला फासिह-उल्-बयान, अशा पदव्या बादशहाने दिल्या. त्यांच्या संगतीत तो वारंवार राहू लागला. त्याचे सर्व मंत्री व श्रीमंत अमीर-उमराव यानीही पाठोपाठ त्याचेच अनुकरण केले आणि इतर सामान्य जनतेनेही तेच सुरू केले. हे पुढे इतके वाढले की, प्रत्येक सुभ्यातील खेड्यातून, बाजारातील कारागीरसुद्धा जणूकाही फकिरीची दीक्षाच घेतली आहे अशा थाटात, फकिरी पद्धतीची पागोटी घालून 'तकदीर' पद्धतीची जाकिटे पाठीवर टाकू लागले आणि अखेरी तर स्त्रियांनीसुद्धा हीच पद्धती उचलली. (शाकीर. ३३).

जनतेने आपले जीवन स्वस्थतेने घालविले आणि साम्राज्याने आपली प्रतिष्ठा व मोठेपणही बाह्यात्कारी तरी टिकविली.[१] दिल्लीच्या राजसत्तेचा पाया खरोखरीच पोखरलेला– किडलेला होता तथापि महमदशहाने तो आपल्या हुशारीने टिकविला. त्याच्यानंतर मात्र दिल्लीच्या शाहीपदामध्ये केवळ नावाशिवाय काहीही शिल्लक राहिले नाही, तेव्हा महमदशहा हाच बाबरच्या घराण्यातील शेवटचा राज्यकर्ता असे म्हणता येईल." [सियार (३) २५].

अठराव्या शतकाच्या दुसऱ्या चतुर्थात हिंदुस्थानच्या साम्राज्याचा प्रमुख हा असा होता. आता आपण सर्वोच्च पातळीवरील त्याच्या अधिकाऱ्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे परिक्षण करू.

## § ४ : वजीर कम्र-उद्-दिन खानाचा स्वभाव

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल बादशहा नामधारी होते. बहादुरशहा १ ला, वृद्ध व स्वभावतःच गरीब, नरम होता. तो नामधारीच राहिला. त्याच्यानंतर गादीवर आलेले बादशहा, वजिरानी गादीवर बसविलेली व काढून टाकलेली अशी त्यांच्या हातातील निव्वळ बाहुली होती. परिणामतः तत्कालीन हिंदुस्थानच्या, कोटयवधी प्रजेचे भवितव्य साम्राज्याच्या वजिरांच्या हातातच राहिले. या परिस्थितीत वजिरांचा स्वभाव आणि त्यांच्या अधिकार-पदाचे महात्म्य व त्यांचे सामर्थ्य यावरूनच केवळ या खंडप्राय पसरलेल्या साम्राज्याच्या कारभाराची दिशा व प्रकारही ठरू लागली. सय्यदबंधूचा पाडाव झाल्यानंतरचा पहिला वजीर महमद अमीनखान (कुलनाम Surname इतिमाद्-उद्-दौला १ ला) हा होय. हा वजीर म्हणजे निजामाच्या चुलत आजोबाचा (Grand-father's Brother) मुलगा. याला बादशहाने नोव्हेंबर १७२० मध्ये वजिरीची वस्त्रे दिली. पण पुढे फक्त दोन महिन्यानीच तो मरण पावला. (१६ जानेवारी १७२१) पैगंबराच्या नातलगांचा व वंशजांचा (Barha–बारहाचे सय्यदांचा) रक्तपात करण्यासाठी या वजिराने मदत केली म्हणूनच त्याला अशी दैवी शिक्षा झाली असा लोकप्रवाद या मृत्यूबाबत होता. याच्या जागी निजाम-उल्-मुल्क हा वजीर झाला पण खऱ्याखोटयाची चाड नसलेला व चंचल बादशहा आणि त्याच्या विश्वासातील उलटया काळजाचे, पापपुण्याची चाड नसलेले लोक यानीच त्याची अडवणूक केली. या सर्वांची किळस वाटून, उद्वेगाने त्याने १७२४ मध्ये वजीरीचा राजिनामा दिला. याच्यानंतर महमद अमिनखानाचा मुलगा कम्र-उद्-दिन (इतिमाद्-उद्-दौला २ रा हा किताब असलेला)[२] हा वजीर झाला. तो कमालीचा दारुडया होता, पण

१ चहार-गुलझार (३९७ अ) मध्ये नमूद केलेली पुढील कथा, महमदाच्या स्वभावाबाबत नमुनेदार अशी मानता येईल. ही कथा अशी.....बादशाही रत्नभांडारावर रक्षक म्हणून एक बक्सारी पायदळ सैनिक नेमला होता. एके रात्री त्या भांडाराच्या छपराला भोक पाडून तोच आत शिरला व त्याने एक रत्न-खचित कंठी चोरली. नंतर त्या भोकातून सरपटत बाहेर येण्याचा प्रयत्न करीत असताना, खाली जमिनीवर पडून त्याचा एक पाय मोडला व तेथेच तो असहाय्य होऊन पडला. दुसरे दिवशी तो तेथे सापडला व त्याला बादशहापुढे उभे करण्यात आले. महमदशहाने त्याला विचारले.... "अरे निर्लज्ज करंटया! तुला जेथे रखवालदार नेमले तेथेच तू चोरी केलीस. चोरी करण्यासाठी जास्त योग्य दुसरे ठिकाण तुला मिळू शकले नाही का?" रखवालदाराने उत्तर दिले.... "माझा बारा महिन्यांचा पगार सरकारकडून मिळावयाचा राहिला आहे. तेव्हा माझा पगार या कोठडीत रहावा व मी चोरी मात्र दुसरीकडे करावी हे योग्य नव्हे. शिवाय मला असेही वाटले की, चोरी करण्यासाठी खाविंदांचे (बादशहांचे) वाडयापेक्षा दुसरे कोणते ठिकाण अधिक चांगले असणार!" हे उत्तर ऐकून बादशहाने स्मित केले, त्या माणसाचा थकलेला पगार दिला आणि त्याला पहारेकरी म्हणूनच आपल्या नोकरीत पुन्हा ठेवून घेतले.

२ आशब (२) ४२२; सियार (३) १३ व २४, २५ चहार गुलझार ३९८ ब.

कमालीचा आळशीही असल्याने त्याच्या दारूबाजीची झळ जनतेला लागली नाही हे तिचे भाग्य. वजिरीच्या म्हणजेच साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ कार्यकारी अधिकारपदावर, तो पावशतक (१७२४–१७४८) राहिला आणि या दीर्घ मुदतीत, अशा या वृद्ध, निरुपयोगी व दयाळू व्यक्तीच्या कारकीर्दीत साम्राज्याचा कारभार परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वाहवत चालला. चालू असलेल्या घटनांच्या ओघाची दिशा आणि तद्नुषंगाने हाती घेतलेल्या प्रत्येक कृतीचे परिणाम आधी दिसण्याइतका चाणाक्षपणा या वजिराच्या अंगी होता हे खरे पण बादशहाला या परिस्थितीचा प्रवाह व परिणाम याबाबत वास्तव स्थिती व आपले अंदाज सांगण्याचे वा या धन्याने ठरविलेल्या एखाद्या चुकीच्या मार्गापासून त्याला परावृत्त करण्याचे धैर्य मात्र त्याला कधीच नव्हते. इतकेच नव्हे तर केवळ आपले अधिकारस्थान सांभाळणे आणि शक्य तितके कमी काम करणे यातच सर्वोत्तम शहाणपण आहे असेच त्याला वाटे.

यामुळे नादिरशहाने साम्राज्यावर प्राणघातक हल्ला करण्यापूर्वीही साम्राज्याची स्थिती इतकी वाईट झाली होती की, त्यातून साम्राज्याला वाचवावयाचे झाल्यास, एखाद्या मुत्सद्दी, खंबीर व उद्योगी वजिराने आपले अधिकार हुकुमशाही पद्धतीने वापरणे आवश्य होते. पण बादशहा आणि वजीर हे दोघेही आपल्या कर्तव्याबाबत जागृत राहण्याऐवजी बहुधा असून नसल्यासारखेच राहिले. इतिहासकार वारिदने महमदशहाच्या कारकीर्दीतील या परिस्थितीचे वर्णन अतिशय कटु अंतःकरणाने केले आहे. या इतिहासकाराच्या तारुण्याची घडण, औरंगजेबाच्या मोठ्या उमद्या, मोठेपणा मिळविलेल्या नि सतत परिश्रमानी भरलेल्या कारकीर्दीत झाली होती. तो लिहितो :–"गेल्या काही वर्षात शाही दरबारात प्रथा पडली आहे की ज्या ज्या वेळी, दख्खन वा गुजराथ आणि माळवा येथील सुभेदार, मराठ्यांनी साम्राज्याच्या एखाद्या भागावर आक्रमण केल्याचा अहवाल पाठवीत, त्या त्या वेळी बादशहा राजधानीतून बाहेर पडे आणि अंतःकरणाला झालेले दुःख शमविण्याच्या इराद्याने बागाकडे जाई ते नव्याने लावलेल्या व अद्याप पानही न फुटलेल्या, रोपट्याकडे वा झुडुपाकडे पहाण्याच्या निमित्ताने ! किंवा काही वेळी घोड्यावरून जाई ते मैदानात शिकार करण्याच्या निमित्ताने ! याचवेळी साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ अधिकारी वजीर इतिमाद्-उद्-दौला हाही आपले दुःख विसरण्यासाठी बाहेर पडे, ते दिल्ली बाहेरील सुमारे चारच लींगच्या (म्हणजे सुमारे १०-१२ मैलाच्या) थोड्याशाच अंतरावर असलेल्या एखाद्या छोट्याशाच तलावातील कमळे पहात बसण्यासाठी म्हणून ! तेथेच तो, नदीत माशांची वा मैदानावर हरिणांची शिकार करीत, तंबूमध्ये ऐषआरामात महिना महिनाभर, कधी कधी जास्त काळही राही. अशा रीतीने मराठ्यांच्या स्वाऱ्यांच्या काळात बादशहा व वजीर हे दोघेही, कारभार, महसूल वा सैन्याच्या गरजा याबाबतचे आपले कर्तव्य पूर्णपणे विसरून आपला वेळ घालवीत. याचबरोबर साम्राज्यातील कोणताही प्रमुख वा अन्य कोणतीही व्यक्ती, त्यातील अशा अडचणी, अस्वस्थता, दिवसेंदिवस वाढत असतानाही, साम्राज्याचे संरक्षण वा जनतेचे रक्षण यांचा विचारही करीत नाही." (मिरात-इ- वारिदात् ११७–११८).

## § ५ : दरबारातील दुफळी--विविध गट

मूर्ख, आळशी व चंचलवृत्तीचा धनी सिंहासनावर असल्याने, दरबारातील अमिर-उमरावांनी जास्तीत-जास्त हीन प्रकारच्या स्वार्थी कारवाया, मनमानेल तशा करण्यास सुरवात केली. स्वतःला आधार मिळावा, आपले कार्य साधावे, निदान आपले स्थान टिकविता

यावे म्हणून त्याना आपापले पक्ष वा गट तयार करणे अवश्य वाटू लागले. राज्य यंत्रणेवर ताबा ठेवून, ती एकसंध राखणारे शासनाचे केंद्रच मुळी आपले काम करीनासे झाल्यामुळे, खुद्द दरबारी व्यवस्थेतच विस्कळितपणा येणे अटळ झाले. स्वत:चे अस्तित्व सांभाळण्याची नैसर्गिक प्रवृत्ती सर्वांमध्येच असते. यामुळे सरदारांना आपापल्या जमातिनुसार गट करणे, राज्य कारभारातील कामे आपापसात वाटून घेणे आणि साम्राज्यांतर्गत मांडलिक राजेरजवाडे व सुभेदार यांच्या विशिष्ट गटांचे एक संरक्षक वा मदतनिसांचे कडेच आपल्या भोवती निर्माण करणे, अशा गोष्टी कराव्या लागल्या. यातून दरबाराची विभागणी तुराणी [१] आणि दुराणी [१] अशा दोन सशस्त्र गटात होऊन प्रत्येक गट सदैव आपल्या तरवारीच्या मुठीवर हात ठेवून तयारीत राहू लागला. अशा प्रकारे आपापसातील ही विभागणी सर्व साम्राज्यभर पसरली.

'इतिमाद्-उद्-दौलाचे' घराणे मूळ समरकंदहून आलेले. या मूळ स्थानाला अनुरूप म्हणूनच वजीर इतिमाद्-उद-दौला २ रा, हा तुराणी पक्षाचा प्रमुख नेता व आश्रयदाता (Patron) होता अर्थातच परिस्थितीच्या दडपणामुळे त्याचे प्रतिस्पर्धी व शत्रू त्याच्या विरोधी गटाला मिळाले. हा विरोधी पक्ष पर्शियनांचा (इराणी) होता. त्याचे नेतृत्व सादतखानाच्या मृत्यूनंतर (मार्च १७३९), औंधचा सुभेदार, अबुल मन्सूरखान सफदरजंग याने आपल्या हाती घेतले. या परिस्थितीत इ. १७३६ नंतरच्या मुघल सम्राटांच्या इतिहास म्हणजे केवळ या दोन पक्षामधील झगड्याचाच इतिहास होय. पुढे १७६५ पासून औंध हे इंग्रजांचे मांडलिक राज्य बनले आणि निजाम उत्तरेच्या राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त राहू लागला. या नंतरदेखील मुघलांच्या शाही दरबारातील झगडे पूर्ववतच चालू राहिले. मात्र आता अधिकारासाठी झगडणारे गट बदलले. नंतरच्या या काळात कोणत्याही जमातीच्या संबंधातून निर्माण झालेल्या संघटित पक्षाऐवजी, हे झगडणारे स्पर्धक, मुख्यत: अफगाण सरदार वा वैयक्तिक जबाबदारीवर झगडणाऱ्या, इतर जमातीतील साहसी व्यक्ती होत्या.

## § ६ : साम्राज्याच्या ऱ्हासाचे कारण

राजाच्या अंगी राज्यकारभार करण्याची जन्मजात कर्तबगारी नसेल तर, त्याचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्याला एकच पर्याय राहतो, तो जबाबदार वजिराने कारभार करणे हाच होय. हा पर्याय उपलब्ध नसेल तर देशातील कारभार व्यवस्था कोलमडेल व अखेर राज्याचेही विघटन होईल. इंग्लंडच्या दुसऱ्या जॉर्जने, वॉलपोल व नंतर पीट याना कारभार करण्याची योग्य संधी दिली व यातून राजा आणि प्रजा या दोघांचाही अतिशय चांगला फायदा झाला. पण स्वत: काही न करणाऱ्या कोणत्याही मुघल बादशहाने मात्र अशी संधी आपल्या वजिराला दिली नाही. फरुखसियारप्रमाणे महमदशहासुद्धा इतका दुर्बल व अस्थिर वृत्तीचा होता की, मुत्सद्दीपणाच्या धोरणाचा पुरस्कार करणे, स्वारीवरील हालचालींचे मार्गदर्शन व नियंत्रण करणे किंवा आपल्या अधिकाऱ्यांना हुकमतीखाली राखणे, त्याला शक्य नव्हते. पण तो इतका कावेबाज होता की, चारचौघात उघडपणे जबाबदार असलेल्या वजिराविरूद्ध

---

१ हे गट मुख्यत: यातील व्यक्तींच्या धर्मपंथातील फरक आणि या व्यक्तींचे पूर्वज वा त्या स्वत: मूळ ज्या भागातून आल्या त्यातील फरक यावर आधारले होते. तुराणी गट हा तुराणी वा तुर्की मुघलांचा गट, हे कट्टर सुन्नी पंथीय होते. याउलट दुराणी गट हा इराणातून आलेल्या मुसलमानांचा गट, हे शिया पंथीय होते. तुराणी अधिक शूर, लढवय्ये, लष्करीदृष्टचा अधिक कर्तबगार तर दुराणी अधिक हुषार, सुसंस्कृत, मुत्सद्दी होते. या दोन जमातीत मूळचेच कट्टु हेवेदावे होते.

विरुद्ध केलेला कट निव्वळ पहात बसे, इतकेच नव्हे तर अशा कटाला आपल्या स्वतःच्या आवडत्या माणसांमध्ये सुरुवातही करून देई. तसेच वजिराच्या प्रतिस्पर्ध्याच्या बंडखोरीला आपल्या नावाचा वा उच्च पदाचा उपयोगही करून देई. अशा गोष्टी करण्याइतकी त्याच्या कावेबाजपणाने मजल गाठली होती. परिणामतः एखाद्या विश्वासू व कर्तबगार वजिराने, जर कारभारामध्ये विशेष कार्यक्षमता व पावित्र्य आणण्याचा आग्रह धरला किंवा धोरणामध्ये स्थिरता व प्रामाणिकपणा, बादशहाने राखावा असा आग्रह धरला वा प्रयत्न केला तर, आपणच आत्मघात घडवित आहोत असे त्याच्या लवकरच लक्षात येई. सय्यद बंधूंच्या नशिबी ज्या प्रकारचा शेवट आला त्यातून आपल्याला वाचवावयाचे असेल तर आपण आपल्या सगळ्या उदात्त महत्त्वाकांक्षा आणि मुत्सद्देगिरीच्या योजना सोडून दिल्या पाहिजेत व राज्य-कारभारात वारा वाहील तशी पाठ फिरविली पाहिजे हे त्या वजिराच्या लक्षात येई. आपल्या कारकीर्दीत अतिशय मोठ्या आकस्मिक आपत्तीपासून साम्राज्य वाचले तर एका व्यक्तीला जास्तीत जास्त साधता येण्यासारखे तेवढे आपण साधले, एवढ्या कल्पनेवरच त्याला बहुधा समाधान मानावे लागे.

नादिरशहा निघून गेल्यानंतर, दिल्लीच्या दरबारी निर्माण झालेल्या परिस्थितीत, कम्र-उद्-दिन खान, इतिमाद्-उद्-दौला हाच पूर्वीप्रमाणे वजीर म्हणून राहिला. या अधिकार-पदाच्या खालोखाल महत्त्वाचे अधिकारपद म्हणजे सैन्याच्या प्रमुखाचे-'मिर बक्षी'-हे होय. या अधिकाऱ्याला "अमिर-उल्-उम्दा" हा किताब असे. हे अधिकारपद वजिराचा पुतण्या असफ्-जाह निजाम-उल्-मुल्क् याला नुकतेच दिले होते.

महमदशहाच्या उर्वरित कारकीर्दीत ही दोन्ही अधिकारपदे याच दोन व्यक्तीकडे राहिली. शाही खाजगी खात्याच्या ( Imperial Household ) प्रमुख अधिकाऱ्याला 'खान-इ-सामान' ( Lord High Steward ) हा किताब असे. प्रथम लुत्फुल्ला-खान हा त्या अधिकारपदावर होता, पण नादिरशहा परत गेला त्याच सुमाराला, तो मरण पावला आणि त्याच्या जागी 'दानिशमंद खान' हा आला (२१ मे). पण लवकरच त्याचाही मृत्यू झाल्यामुळे त्याची कारकीर्द जेमतेम वीस दिवसच टिकली आणि नंतर सादुद्दिन खान त्या हुद्द्यावर आला (१२ जून), या तिसऱ्या उमरावाकडे 'मिर आतिश' म्हणजे तोफखाना प्रमुख हेही अधिकारपद होते. या दुसऱ्या अधिकारपदामुळे त्याच्याकडे किल्ल्यातील शाही राजवाड्याचा ताबा व व्यवस्था आणि म्हणून बादशहाची व्यक्तीगत सुरक्षितता व शाही खजिन्याचे संरक्षण याही जबाबदाऱ्या होत्या, त्याच्या या पदामुळे बादशहाशी त्याचा सतत संपर्क रहाण्याची निश्चिती असे. यामुळे प्रत्यक्ष राज्ययंत्रणेवरील त्याच्या अधिकारपदाच्या महत्त्वापेक्षासुद्धा, बादशहाच्या मनावर पडणारा त्याचा प्रभाव फारच होता. अशीच परिस्थिती शाही जमीनजुमल्यावरील प्रमुख अधिकाऱ्याची-दिवाणाचीही (Diwan of crown lands) होती.

## § ७ : महमदशहावर त्याच्या मर्जीतल्या लोकांचे वर्चस्व

महमदशहासारखा भित्रा व मूर्ख बादशहा आणि कम्र-उद्-दिनसारखा सुखलोलुप व निष्काळजी वजीर असताना, साम्राज्य शासनाच्या प्रमुखस्थानी असणाऱ्या प्रधानांना, साम्राज्याची धोरणे आखण्याबाबत आणि जनतेचे भवितव्य घडविण्याबाबत फारसे महत्त्व

नव्हते. त्यांच्याऐवजी बादशहाच्या सतत जवळपास असणारे खाजगी खात्यातील अधिकारी व व्यक्तिशः बादशहाभोवती सतत राहाणारे त्याचे आवडते सोबती यानाच अधिक महत्त्व होते. कारण अशा व्यक्तींचाच प्रभाव बादशहाच्या मनावर सतत पडत असे व अखेरीस हाच प्रभाव सर्वात अधिक परिणामकारक ठरे.

आपल्या सर्व जीवनात महमदशहाने कोणत्याही प्रश्नावर स्वतः कधी विचार केला नाही वा कोणताही निर्णय घेतला नाही. त्याच्या मर्जीतल्या लोकांनीच त्याला नेहमी मार्ग-दर्शन केले. त्याच्या तारुण्याच्या प्रारंभीच सय्यदबंधूंच्या बंधनातून तो बाहेर पडला हे खरे. पण ही त्याची सुटका जणू काय लगेच कोकिजी नावाच्या एका हलक्या, बदफैली स्त्रीच्या व शहा अब्दुल गफुर आणि पानिपतचा रोशन-उद्-दौला, या तिच्या दोन साथीदारांच्या वर्चस्वाखाली पूर्णपणे सापडण्यासाठीच होती !

इ. स. १७३२ मध्ये हे तिघे त्याच्या मर्जीतून उतरले आणि मग त्यांची बदनामी होईल अशा पद्धतीनेच त्याने त्यांची हकालपट्टी केली. यानंतर सात वर्षे बादशहाच्या दुर्बल मनावर, समसाम-उद्-दौला खान-इ-दौरान व त्याचा भाऊ मुजफ्फरखान या दोघांचा पगडा बसला. त्यांच्या या वर्चस्वाबाबत त्याना कोणी प्रतिस्पर्धीही नव्हता. १७३९ मध्ये समसाम व मुजफ्फर दोघेही मरण पावले. बादशहाचे मार्गदर्शक देवदूत अशी त्यांची जागा, अमिरखान व त्यानेच बादशहाच्या निदर्शनास आणून दिलेले आणखी तिघे यानी घेतली. या तिघांपैकी महमदइशाक व आसदयार याना, अमीरखानाने प्रथम बादशहाच्या निदर्शनास आणून दिले असून पुढे (चार वर्षानी) सफदरजंगालाही निदर्शनास आणून दिले होते. तेव्हा बादशहाच्या कमकुवत मनावर पगडा बसविणाऱ्या या चौघांचा जीवनवृत्तांत व स्वभाव वैशिष्ठ्ये यांचा सविस्तर अभ्यास करणे जरूर आहे.

## § ८ : अमिरखान : त्याचा स्वभाव

बादशहाच्या विश्वासातल्या आणि व्यक्तीगत आवडत्या, लोकांमध्ये सर्वोच्च स्थान, अमिरखान दुसरा, उमदात-उल्-मुल्क याचे होते. अमिरखान २ रा हा, अमिरखान १ ला, मिर-इ-मिरान याचा, म्हणजेच काबूल येथे २२ वर्षे 'गव्हर्नर" असलेला, औरंगजेबाचा सुप्रसिद्ध सुभेदार.[1] मिर-इ-मिरान याचा मुलगा, हे खान कुटुंब अतिशय उच्च कुलीन असून

१ सुभेदार, गव्हर्नर, व्हाइसरॉय, नबाब अशी पदनामे व त्यांच्या संदर्भात निर्माण झालेली डेप्युटी वा नायब सुभेदार इत्यादी त्यांच्या प्रतिनिधींची वा हाताखालच्या म्हणजे नंबर दोनच्या अधिकाऱ्यांची पदनामे, प्रस्तुत ग्रंथात विशेष श्लेषार्थाकडे लक्ष न देता वापरलेली दिसतात. मुघल साम्राज्याच्या कालौघातही यांचा वापर व या अधिकाऱ्यांच्या नेमणुका इ. बाबत लवचिकपणा आला होता. मुघल साम्राज्याच्या कारभाराची घडी व्यवस्थित होती त्यावेळी 'सुभा' हा कारभारासाठी केलेला साम्राज्याचा सर्वांत मोठा भाग होता. त्यावरील सर्वोच्च अधिकारी म्हणजे सुभेदार. हा बादशहाचा प्रतिनिधी असेच मानले जाई. त्याची नेमणूक बादशहा करी व त्याच्यावर योग्य नियंत्रण व वचक रहावा म्हणून त्याच्या वरचेवर बदल्याही बादशहा करी. सामान्यतः हा आपल्या सुभ्यात राहूनच बादशहाच्या वतीने सुभ्याचा कारभार चालवी, त्यावर नियंत्रण ठेवी. साम्राज्याच्या ऱ्हासकाळात ही घडी विस्कटली. सुभेदार बलाढ्य झाले. आपले अधिकारपद वंशपरं-परागत मानू लागले. दिल्लीला राहून शाहीदरबारात गटबाजी, कारवाया करू लागले. आपल्या सुभ्याचा कारभार प्रतिनिधीमार्फत करू लागले. अनेक (३–४) सुभेदार पदे एकालाच देण्यात येऊ लागली आणि बलिष्ठ सुभेदार स्वतंत्र होऊ लागले. निजाम-उल-मुल्क. अलिवर्दीखान अशी अनेक उदाहरणे आहेत. सुभेदार या पदासाठी व्हाइसरॉय गव्हर्नर अशी पदेही या ग्रंथात वापरली आहेत. गव्हर्नर हा एखाद्या ठाण्याचाही अधिकारी असे.

[ पुढील पानावर ]

या कुटुंबाला पर्शियामध्ये मोठा मान होता. एवढेच नव्हे तर, हिंदुस्थानातही या कुटुंबाला सर्वोच्च प्रतिष्ठेला चढविलेले होते. अमिरखान २ रा, याची आजी (बापाकडून) ही सुप्रसिद्ध सम्राज्ञी मुमताजमहल हिच्या बहिणीची मुलगी. त्याचा चुलता म्हणजे औरंगजेबाच्या कारकीर्दीतील सर्वात कर्तबगार बक्षी[1] रुहुल्लाखान १ ला हा होय. शिवाय त्याच्या स्वतःच्या बहिणीचा विवाह, रुहुल्लाखान २ रा, या त्याच कारकीर्दीतील दुसऱ्या एका बक्षीबरोबर झाला होता. अमीरखान २ रा याची नाती व संबंध, अशा थोर व्यक्ती व घराणी यांच्याशी असले आणि कर्तबगारी दाखवून आणखी वरच्या पदाला जाण्यासाठी उत्तेजन देण्यासारखी स्थिती असली तरी, त्याने, मुलकी कारभार करण्यास वा मोहिमा चालविण्यास जरूर अशी कर्तबगारी कधीच दाखविली नाही, आणि तिसऱ्या श्रेणीच्या बक्षीपदापेक्षा उच्चस्थानावर तो कधीच चढला नाही. पण खाजगी जीवनामध्ये मात्र तो बादशहाचा अतिशय लाडका बनला. त्याची वैयक्तिक हुषारी व त्याने संपादिलेले विविध गुण यामुळे विद्वान व कलावान लोक त्याच्याकडे आकर्षित होत. त्याचे अंगी शीघ्र कवित्व, योग्य उत्तरे देण्याचे कौशल्य, वक्तृत्वपूर्ण शैलीत प्रत्येक विषयाचे सुबोध स्पष्टीकरण करण्याची हातोटी होती. शिवाय या सर्वापेक्षाही विनोदी वाक्प्रचारावरील त्याचे प्रभुत्व व नेहमीच्या संभाषणात न चुकता विनोद करण्याचे कौशल्य हे त्याचे गुण तर विशेषच होते. या त्याच्या गुणांमुळे, त्याच्याशी संभाषण करणारा अपरिहार्यपणे भारावून जाई. अर्थातच उथळ व हलक्या मनाचा महमदशहावर तर त्याचा अतिशयच प्रभाव पडला. त्याला अनेक विषयांचे, विविधांगी सामान्यज्ञान असून, कोणत्याही कामाबाबत सखोल माहिती चटकन आत्मसात करण्याचे सामर्थ्यही त्याच्याजवळ होते. यामुळे तो मोठा शहाणा आहे या तत्कालीन प्रचलित मताला काही आधारही होता. पण त्याची खरी योग्यता फारच कमी होती. बादशहाच्या मनावर त्याचे वर्चस्व पूर्णपणे स्थापन झाल्यामुळे त्याला अतिशय गर्व झाला आणि त्याचा मानसिक तोल इतका ढळला की साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ अमिरांनाही तुच्छ लेखून, तो त्यांचा अपमान करू लागला. अखेरी या त्याच्या गर्विष्ठपणामुळे त्याचा शोचनीय अधःपात व शेवट झाला. त्याचा हा गर्विष्ठपणा व अधःपात उत्तमरितीने स्पष्ट होतो तो, त्याने वजीर व निजाम यांना दिलेल्या उत्तरावरून. त्याने एकदा उत्तर दिले–"जोपर्यंत माझ्या धन्याच्या कृपेचे छत्र माझ्या डोक्यावर आहे तोपर्यंत गॅब्रीअल आणि मायकेल अशा देवदूतांनाही

---

[ मागील पानावरून ]

सुभ्याखालोखाल त्यातील उपभाग म्हणजे 'प्रांत' तत्कालीन प्रांत हा साधारणतः आधुनिक जिल्हाच होय. यावरील मुख्य अधिकाऱ्याला अनेकवेळी 'नबाब' म्हणत. साम्राज्याच्या उत्तरकालात याही पदाची स्थिती सुभेदार पदासारखीच झाली. अर्काटचा नबाब, सावनूरचा नबाब, औंधचा नबाब अशी याची कांही उदाहरणे आहेत.

सुभेदार, व्हाइसरॉय-गव्हर्नर-नबाब अशा पदांच्या संदर्भात 'डेप्युटी वा नायब' अशी पदेही होती ती संबंधित अधिकाऱ्याचा प्रतिनिधी वा दुय्यम यासाठी वापरीत.

प्रस्तुत ग्रंथाच्या वाचकाने ही सर्व पार्श्वभूमि व या ग्रंथातील या पदनामांचा लवचिक वापर लक्षात घेऊन मुख्यतः संदर्भावरूनच निश्चित अर्थ लावावा.

१ 'बक्षी'–म्हणजे Paymaster वा Paymaster General. . . . . .मुघल कारभार यंत्रणेतील एक महत्त्वाचा अधिकारी. मुख्यतः सैन्याचा खर्च–हिशेब, हे याचे अधिकारक्षेत्र पण सर्वसामान्यपणे हा अर्थमंत्री वा अर्थसचिवच होता. केंद्राचा कारभार, सुभ्याचा कारभार अशा ठिकाणी हा अधिकारी असून वजिराखालोखाल महत्वाचा असे मानले जाई. सर्वांचे पगार, अन्य देणी-घेणी व यांचे हिशेब हे त्याचे कार्यक्षेत्र केंद्रासारख्या ठिकाणी अनेक बक्षी,–– दुय्यम बक्षी असे असत. पहिला बक्षी-मिरबक्षी, दुसरा बक्षी, तिसरा बक्षी इत्यादी त्यांची श्रेणी असे.

विरोध करण्याला मी तयार आहे मग तुमच्यासारख्या उमरावांची पर्वा मी करीन हे संभवनीय कसे ? " [ शाकीर ८६, सियार (३) १३ ]

## § ९ : महमद इशाकखान, १ ला

महमद इशाकखान पहिला हा अमिरखानापेक्षाही बादशहाचा अधिकच लाडका होता. मुतामन्-उद्-दौला असा त्याला किताब वा पदवी ( lit आडनाव Surname ) होती. त्याचा बाप, पर्शियामधील शुस्तारमधून, हिंदुस्थानमध्ये आपले नशीब काढण्यासाठी आला होता पण त्याचा काही फारसा उत्कर्ष झाला नाही. इशाक हा स्वतःही दीर्घ काळपर्यंत शाही तोफखान्यामध्ये मासिक रोख २०० रुपये पगारावर एक छोटा अधिकारी होता. तो उत्कृष्ट वक्ता असून, पर्शिअन या आपल्या मातृभाषेतील एक शीघ्र कवि होता. त्याच्या आवडी निवडीतील चोखंदळपणा, वागण्याच्या निर्दोष पद्धति आणि योग्यायोग्य निवडीबाबत अंतःस्फूर्त क्षमता, यामुळे त्याच्या प्रत्यक्ष अधिकार पातळीपेक्षा फार वरच्या सामाजिक पातळीवर तो सहज अग्रस्थान मिळवू शके. अमिरखान २ रा व तो असे दोघेही पर्शियन जमातिपैकी व शियापंथी असल्यामुळे, अमीरखानाच्या खाजगी जीवनातील एक जोडीदार (—मुसाहिब—) म्हणून त्याच्याशी त्याने सलगी करून लवकरच त्याची मर्जी संपादन केली. अमीरखानाला अर्थातच अशा अमोल जोडीदार मित्राची, बादशहाजवळ स्तुती केल्याशिवाय राहवणे शक्य नव्हते. अशी स्तुती ऐकून बादशहानेही त्याला भेटीस आणण्यास सांगितले, आणि त्यानुसार अमीरखानाने महमद इशाकला बादशहापुढे सादर केले. इशाकची चतुर वागणूक. शिष्टाचार पद्धति आणि ओघवती भाषा यांची बादशहाच्या मनावर छाप पडली आणि त्याने लगेच, त्याला आपल्या वैयक्तिक नोकरवर्गात (खवास) दाखल केले. नादिरशहाच्या स्वारीचे भयानक काळात, रात्रंदिवस, इशाक महमदशहाचे सान्निध्यात, हजर होता. कर्नाळ येथे पर्शियन विजेत्याच्या तंबूत, महमदशहा रहात असता, खालच्या दर्जासारख्या नोकरीवर काम करीत असलेल्या इशाकची बोलण्याची ढब व त्याची पारख वा निर्णयक्षमता पाहून, नादिरच्याही मनावर इतका प्रभाव पडला की त्याने महमदशहाला विचारले : "तुमच्या नोकरीत महमद इशाक असताना, कम्र्-उद्-दिनला वजीर म्हणून नेमण्याची काय जरूरी होती ? "

पुढे कर्नाळ येथील आपल्या छावणीमधून, घोर मानखंडना झालेला महमदशहा, खिन्न मनस्थितीत, मुकाट्याने परत येत असताना त्याच्यावरोबर, त्याच हत्तीवर बसून इशाकही येत होता व बादशहाची वृत्ती उल्हासित ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. यावेळेपावेतो बादशहाचे मन त्याने पूर्णपणे जिंकून घेतले असल्याने यापुढे आश्चर्यचकित होण्यासारख्या जलदगतीने त्याला बढत्या मिळाल्या. ३ जून १७३९ ला तो शाही बागांवर देखरेख करणारा अधिकारी होता. त्यादिवशी त्याला शहाजाद्याच्या (बादशहाचा मोठा मुलगा) सैन्य विभागाचा तपासनीस (इन्स्पेक्टर) ( inspector of the crown princes contingent ) म्हणून बढती मिळाली. नंतर लवकरच शाही जमिनींचा (crown lands ) "दिवाण" या पदावर त्याची बढती होऊन त्याला सहाहजारी मनसबदारीचा दर्जा आणि 'मुतामन्-उद्-दौला' हा किताब मिळाला. शिवाय इतर अनेक लहान लहान पण किफायतशीर, अधिकारपदेही मिळाली. अखेरी (८ नोव्हेंबर) त्याला "माही" आणि "मुरातिब" ही सर्वश्रेष्ठ सन्मान पदकेही मिळाली. अशा रीतीने अतिशय जलद गतीने, आपल्या जीवनातील

मोठेपणाच्या कळसाला पोहोचला. तथापि धुमकेतूप्रमाणे उच्च पदावर पोहोचलेल्या त्याच्या जीवनाचा शेवट, तितक्याच जलदीने झाला. तो, थोड्याच महिन्यात झालेल्या त्याच्या मृत्यूमुळे (१८ एप्रिल १७४०).

इशाक हा बादशहाचा, एकनिष्ठ सेवक व खरा हितचिंतक होता. स्वतःच्या हित-संबंधाचा विचार न करता तो, मोठ्या प्रामाणिकपणे, त्याला योग्य सल्ला देत असे. त्याच्यावर बादशहाचा अतिशय विश्वास आणि मर्जी होती. तथापि त्याने आपल्या अधिकाराचा कधीही दुरुपयोग केला नाही. इशाकानंतर त्याच्या जागी त्याचा मोठा मुलगा मिर्झा महमद हा आला व त्याला इशाक २ रा (नज्म्-उद्-दौला) हा किताब इ. स. १७४० मध्ये मिळाला व पुढे सात वर्षांनी (१३ ऑगस्ट १७४७) त्याच्या वडिलांचे 'दिवाण-इ-खालसा' हे, अधिकारपदही त्याला देण्यात आले. –इशाक २ रा यानंतर, आपल्या बापापेक्षाही जास्त प्रमाणात, बादशहाचा विश्वास आणि व्यक्तिगत प्रेम संपादन केले आणि बादशहाचा जणूकाही दुसरा प्राणच, तो बनला. अखेर ही स्थिती इतक्यावर येऊन ठेपली की महमदशहा म्हणू लागला "महमद इशाक खानाने जर आपल्यामागे, मिर्झा महमदाला ठेवले नसते तर त्याच्यामागे मी कसा जिवंत राहू शकलो असतो ते कळत नाही." पहिल्या इशाक खानाचे इतर मुलगेही शाही नोकरीत उच्च पदावर चढले. तसेच त्याच्या मुलीचा (पुढे ही बहुबेगम नावाने ओळखली जाई) विवाह, बादशहाचेच स्पष्ट आज्ञेनुसार, सफ्दरजंगाचा मुलगा व वारस, शुजा-उद्-दौला याच्या बरोबर झाला. पुढे तिला जो मुलगा झाला तो औंधचा नबाब असफ्-उद्-दौला हा होय.[सियार (२) १००, (३) ३,–चहार गुलझार ३८७ ब].

## § १० : असद् यार खान

अमीरखानाचा दुसरा एक आश्रित म्हणजे आग्ऱ्याचा रहिवाशी असद् यार खान हा होय. प्रथम त्याने खालच्या दर्जाच्या काही जागावर कामे केल्यावर, अमीरखानाने, ३ जून १७३९ ला त्याला बादशहासमोर सादर केले. तेव्हा बादशहानेही त्याला लगेच पाचहजारी मनसबदारीचा दर्जा देऊन 'हरकऱ्यांचा दारोगा' म्हणजे पोस्टमास्तर जनरल या आणि माहिती व हेर खात्याचा (इंटेलिजन्स खाते) प्रमुख, अशा दोन्हीही पदावर नेमले. पुढे (८ नोव्हेंबर) काही काळातच त्याची सहाहजारी मनसबदारीच्या पदावर बढती झाली आणि त्याला 'असद्-उद्-दौला' हा किताब व 'माही' आणि मुरातिब' ही उमरावपदाची सर्वश्रेष्ठ सन्मान चिन्हेही मिळाली.

कला व विज्ञान शाखातील त्याचे शिक्षण प्राथमिकच होते तरी याची वृत्ती सर्वांशी जमवून घेणारी आणि पुष्कळ समतोल होती. तो पर्शियनमध्ये, काहीही पूर्वतयारी न करता जागच्याजागी कविता करू शके. या कविता जरी विद्वत्ताप्रचुर नसल्या तरी ऐकायला गोड असत. तो परोपकारी व धोरणीही होता. त्या काळी, थोरामोठ्यांच्या घरी, विनंती करण्यासाठी आलेल्या अनेक अर्जदारांची दिवाणखान्यात गर्दी होई. अशाना त्याने आपले दरवाजे, कधीही बंद केले नाहीत. इतकेच नव्हे तर प्रत्येकाबरोबर तो सहानुभूतीचे चारदोन शब्द तरी बोले. चांगल्या कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तींना, मग प्रत्यक्षात त्या कितीही गरिबीत असल्या वा खालच्या पदावर असल्या तरी, तो मित्राप्रमाणे आणि भावाप्रमाणे वागवी. अशी अतिशय सभ्य वागणूक आणि दुसऱ्याबद्दलची आस्था, यामुळे तो सर्वांचा आवडता झाला पण अखेर मत्सरामुळे अमीरखानच त्याचा विरोधी बनला आणि त्याने बादशहावरील

आपले वजन खर्च करून, असदचा सैन्य विभाग (शमशिर-डाग) विसर्जित करावयाला लावले. तथापि अमीरखानाने पूर्वी केलेले उपकार लक्षात घेऊन, असद् यार त्याच्याशी कृतज्ञच राहिला. पुढे अमीरखानाच्या सैन्याचा पगार थकल्यामुळे ते बंडाला प्रवृत्त झाले. तेव्हा असदने आपले स्वतःचे जडजवाहीर आणि घरगुती सामानही विकले आणि बंडास प्रवृत्त झालेल्या त्या सैन्याचे देणे भागविले व अशा रीतीने आपल्या पूर्वीच्या आश्रयदात्याला अपमान आणि बेअब्रू यापासून वाचविले. [ चहार गुलझार ३८३, सियार (३) ११. ]

## § ११ : सफदर जंग

'अबुल मन्सूर खान' आणि 'सफ्दरजंग' असे किताब मिळालेला, मिर्झा मुकिम, हा पैगंबरवासी सादतखान बुऱ्हाण-उल-मुल्क याचा भाचा व जावई होय. सादतच्या मृत्यूनंतर लगेच (१७३९) तो त्याच्या औंधच्या सुभेदारीवर आला. यावेळी सफ्दरजंग सुमारे ३५ वर्षांचा असून त्याची कर्तबगारी परिपक्व अवस्थेत होती आणि त्याने निजामाच्या खालोखाल, साम्राज्यामध्ये सर्वात उत्तम प्रकारे सुसज्ज केलेला व सर्वात जास्त युद्धनिपुण असा सैन्य विभाग (Contigent) बाळगला होता. त्याच्या सैन्याचा सर्वात महत्त्वाचा गाभा म्हणजे सहा ते सात हजार किजिलबाश (पर्शियात स्थाइक झालेले तुर्की), सैनिकांचा होता हे किजिलवाशी एकेवेळी नादिरशहाच्या सैन्यात होते पण त्याच्याबरोबर हिंदुस्थानात आल्यानंतर त्यांनी तेथेच रहाण्याचे ठरविले होते. सफ्दरजंग, आपल्या सैन्यासाठी अतिशय सढळ हाताने खर्च करी. आपल्या सैन्यासाठी सुप्रसिद्ध सैनिकी नेते वा अधिकारी (कॅप्टन्स) आणि चांगले सैनिक मिळविता यावे म्हणून काहीही आढेवेढे न घेता व थोडाही विचार न करता, लागेल तो पैसा तो खर्च करी, त्याकाळी आशियात उपलब्ध असलेल्या लढाऊ जमातींमध्ये इराणी तुर्क हे सर्वात चांगले लढवय्ये लोक होते. (हिंदुस्थानातील लोक याना 'मुघल' म्हणत.) हे सैनिक सफ्दरचे विशेष आवडते असून त्यांच्यातील प्रत्येक घोडेस्वाराला दरमहा पन्नास रुपये तो देत असे. याउलट हिंदुस्थानात जन्मलेल्या स्वाराला त्याच काळात मासिक फक्त ३५ रुपये मिळत सैन्याची पहाणी करीत असता जर एखाद्या सैनिकाचा तरतरीतपणा वा कार्यक्षमता निदर्शनास आली तर तेथल्यातेथेच त्या सैनिकाचा पगार, तो स्वार असल्यास दरमहा रुपये दहानी व पायदळ सैनिक असल्यास रुपये दोहोंनी, तो वाढवी. आपल्या सैनिकाना चांगला पगार देण्याशिवाय आणखीही, त्यांची विशेष काळजी तो घेई ती त्यांना जरूर त्या सर्वप्रकारची सामुग्री आणि चांगली शस्त्रे पुरविण्याची आणि त्यांना सुखसोयी मिळून समाधानात रहाता यावे, याची.

सैनिकांबाबत, सफ्दरजंगाने ठेवलेले उदार धोरण आणि त्यांच्या सुखसोयींबाबत तो स्वतः घेत असलेली दक्षता, यांची कीर्ती परदेशातही पसरली आणि त्याच्या सैन्यात भरती होण्यासाठी अनेक उमेदवार जमा होऊ लागले एका लेखकाचे म्हणण्यानुसार–"त्याच्याकडे २०,००० मुघल सैनिक होते. तथापि त्यांच्यामध्ये अनेक हिंदुस्थानी सैनिकही मिसळले होते, ते मुघलांप्रमाणे पोषाख करीत, पर्शियन भाषा बोलत आणि त्यांच्यामध्ये मिसळून जात व त्यांच्याच प्रमाणे जास्त पगारही घेत. विशेषतः काश्मीरमधील जडिवाल जिल्ह्यातून आलेल्या शियापंथीय लोकांबाबत ही स्थिती होती." शिवाय सफ्दरजंग स्वतःही शियापंथीय होता हेही याचे एक कारण असावे. थोडक्यात अर्थ असा की हिंदुस्थानातील शियापक्षाचा शस्त्रधारी हात म्हणजे सफ्दरजंग असे मानले जाऊ लागले. महमदशहानंतरच्या कारकीर्दीत पाच

वर्षे तर, सफदरजंगाचेच दिल्लीच्या जीवनावर प्रभुत्व होते. यासाठी त्याच्या स्वभावाचे वर्णन पुढील कारकीर्दीच्या इतिहासात केले जाईल. [ इमाद्-उस्-सादत, ३१, आशब (२) ४१९–४२० ]

महमदशहाच्या कारकीर्दीतील अखेरच्या ९ वर्षांमध्ये, त्याच्या दरबारी ही अशी प्रत्यक्ष स्थिती होती. यावरून त्या काळातील घटनांना कशा प्रकारचे वळण मिळाले असेल हे आपणाला अधिकच सहजपणे कळून येईल.

## § १२ : शाही कारभार कोलमडतो

नादिरशहा हिंदुस्थान सोडून परत गेला त्यावेळी, या परदेशीय स्वारीच्या धक्क्यामुळे मुघल साम्राज्याचा कारभार कोलमडून पडला असे दिसले. प्रचलित सरकारबद्दल, त्याकाळी, लोकांमध्ये धाक असे पण आता या सरकारचीच पूर्णपणे नाचक्की (utterly discredited) झाली होती आणि परिणामतः सरकारबद्दलचा हा लोकांमधील दबदबा नाहीसा झाला होता. ज्या सुभ्यावर बलवान सुभेदार नव्हता त्यामधील शांतता नष्ट झाली होती. लोकांमधील, लुटमार करण्यासारख्या स्वाभाविक वृत्ती, मुघल राज्यव्यवस्था वा साम्राज्याचा दबदबा यामुळे यावेळेपर्यंत, नियंत्रणाखाली राखलेल्या होत्या. आता त्यानी आपले वर्चस्व, साम्राज्याच्या मध्यभागातच, पुन्हा स्थापिले. या संदर्भात "चहार गुलझार" (फ, ३७३ अ) मध्ये नमूद केलेले आपल्याला वाचायला मिळते की, नादिरशहाच्या स्वारीनंतर पहिल्याच वर्षात जाट व शीख फार मोठ्या संख्येने एकत्र जमले व त्यानी सरहिंदकडे चाल केली. तेथे दरानात शहा नावाच्या एका व्यक्तीला आपला नायक करून तेथील बरीच खेडी त्यानी ताब्यात घेतली व मोठा गोंधळ उडवून दिला. ही त्यांची बंडाळी मोडता आली ती, दरबारकडून 'अझीमुल्ला खान' याच्या हाताखाली सैन्य देऊन, मोहीम काढल्यानंतरच ! हिंदुस्थानच्या दुसऱ्या एका कोपऱ्यात आणखी एक घटना घडली, ती बाळाजीराव पेशवे (नानासाहेब) यांचा एक प्रतिनिधी, त्याना बंगालच्या नबाबाने दिलेला पैसा घेऊन जात असताना, पेशव्यानी नबाबाला रघुजी भोसल्याविरुद्ध सशस्त्र सैन्याची मदत दिली होती, (१७४३), त्यासाठी ही रक्कम त्याना द्यावयाची होती. हा पैसा घेऊन जात असलेल्या पेशव्यांच्या प्रतिनिधीबरोबर, वाटेत संरक्षणासाठी पाटण्याच्या सुभेदाराचे काही सैन्यही दिले होते. तरीही वाटेत, ससेराम येथे, एका पर्शियन सैनिकाने या, पेशव्यांच्या प्रतिनिधीवर हल्ला केला आणि तो खजिना लुटला. हा पर्शियन सैनिक म्हणजे आपले नशीब काढण्यासाठी नेहमी हिंडणारा असला तरी यावेळी तो औंधच्या सुभेदाराचे नोकरीत होता. गंगा-यमुना दोआबामधील अशीच आणखी एक घटना पहा : "नादिरशहाच्या स्वारीनंतरच्या कारभाराकडे दुर्लक्ष झालेल्या काळात अलिमहमद रोहिला हा रोज आपले सामर्थ्य वाढवीतच होता आणि दरबारातील कोणीही उमराव याकडे लक्ष देत नव्हता. हा रोहिला तर यापूर्वी स्थानिक सुभेदाराचा एक केवळ आश्रित (Retainer) होता पण आता मात्र तो आपले सामर्थ्य दररोज वाढवित होता. आपल्या परिसरातील प्रांतात तो लुटालूट करीत असून लवकरच त्याने कुमाऊं टेकडयापर्यंतचा सर्वच प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. बानगडच्या आपल्या बळकट किल्ल्यामुळे, बलाढ्य होऊन तो शाही प्रांतावर हल्ले करू लागला आणि त्याला, शेरशहा व सलिमशहा यांच्याशी स्पर्धा करण्याची, त्यांच्यासारखे थोर सत्ताधारी होण्याची, स्वप्नेही पडू लागली. (भा. शेरशहा हा संदर्भ बाबर-हुमायून काळातील शेरशहा सूर यांचा होय) [ सियार (३) ७, आशब (२) ४२३–४२४ ].

अशी अंदाधुंदी निर्माण झाली असली तरी ती नाहीशी करून शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्याला जरूर ते सैन्य बादशहाकडे नव्हते. नादिरशहाचे स्वारीच्यावेळी कर्नाळ येथील युद्धात वा दिल्ली येथील कत्तलीमध्ये शाही सैन्यापैकी बरेच मारले गेले होते आणि यातून वाचलेले सैनिक, निर्माण झालेला गोंधळ आणि अन्नाचा तुटवडा यातून सुटका करून घेण्यासाठी दाही दिशाना निघून गेले होते. महमदशहाची जेव्हा पुनर्स्थापना झाली त्यावेळी आपल्याजवळ काहीही संरक्षण व्यवस्था वस्तुतः शिल्लकच नाही असे त्याला आढळून आले. यावेळी आसद्-यार-खान नावाची एक नवीच व्यक्ती त्याच्या मर्जीत आलेली होती, ती मात्र मोठी विचारी आणि शहाणी होती. या माणसाने प्रचलित परिस्थितीच्या गांभिर्याची व त्याबाबत ताबडतोबीने तरतूद करण्याची जरूरी असल्याची खात्री बादशहाला पटवून दिली आणि १०,००० सैनिकांची भरती करण्याची परवानगी त्याच्याकडून मिळविली. या सैनिकांना घोडेस्वार व पायदळ सैनिक मिळून, सरासरीने, प्रत्येकी दरमहा ५० रुपये पगार द्यावयाचा होता. या घोडदळातील प्रत्येक घोड्यावर 'तरवारीचा शिक्का' (डाग) मारावयाचे हुकूम त्याने दिले. यावरून या सबंध सैन्य विभागालाच, 'समशीर डाग रिसाला' असे नाव देण्यात आले (१७४०). [ चहार. गुल. ३७३ अ. ].

## § १३ : वजिराला अधिकारावरून हुसकून लावण्याचा अमीरखानाचा कट

अमीरखान व त्याचा आश्रित इशाकखान, या दोन शियापंथीय पर्शियनांना बादशहाच्या संपूर्ण विश्वासात एकदा स्थान मिळाल्यावर, त्यानी, सुन्नी पंथीय तुराणी अमीरउमरावाना अधिकारपदावरून हुसकावून लावण्यासाठी कारवाया करण्यास सुरवात केली. या सुन्नी पंथीय तुराणी गटाचे नेते म्हणजे, साम्राज्याचे दोन सर्वश्रेष्ठ अधिकारी, वजीर कमरूद्दिन आणि बक्षी असफ-जाह् निजाम-उल-मुल्क हे होते. या तुराणी उमरावाबाबत, बादशहाच्या मनात दीर्घकाळ संशय होताच आणि नुकत्याच झालेल्या पर्शियन स्वारीच्या वेळची त्यांची वागणूक पाहून तर त्यांच्या संपूर्ण स्वार्थी वृत्तीबद्दल आणि त्यांच्यातील स्वामीभक्तीच्या अभावाबद्दल त्याची खात्रीच पटली होती. यामुळे आता तो अमीरखानाच्या सल्ल्याकडे साहजिकच विशेष लक्ष देऊ लागला. या परिस्थितीत कमरूद्दिनऐवजी अमीरखान स्वतःच वजिरीची जबाबदारी जास्त यशस्वीपणे व धन्याचे दृष्टीने जास्त फायदेशीरपणे पार पाडू शकेल असे त्याने बादशहाला पटवून दिले. यातून शाहीवाड्याच्या अगदी आतल्या गोटातील गुप्ततेच्या वातावरणात एक कट शिजला आणि त्यानुसार कमरूद्दिनला वजिरीच्या पदावरून काढून त्याच्या जागी अमीरखानाला वजीर नेमावयाचे, असे ठरले.

पण प्रत्यक्ष मांजराच्या गळ्यात घाट कशी बांधावयाची ? साम्राज्यात जास्त श्रीमंत आणि सर्वात चांगले, सुसज्ज सैन्य बाळगणारा उमराव म्हणजे निजाम हाच होता. तो कमरूद्दिनचा चुलतभाऊ[1] व एक दोस्तही होता. दोघाना समान धोका निर्माण झाला तर त्यांची मैत्री जास्तच घनिष्ट होणार होती. यासाठी बेत ठरला तो असा की, आपल्या दख्खनच्या सुभ्याकडे जाण्यासाठी, राजधानी सोडून निजाम निघाला आणि दिल्लीतील आपल्या चुलतभावाला मदत करता येणार नाही इतका दूर गेला म्हणजे वजीरपदाबाबत

१ निजाम-उल्-मुल्क याच्या चुलत आजोबाचा कमरूद्दिन हा नातू म्हणजे निजामाचा चुलत भाऊ होय. पहा §४ परि. २.

बदल अमलात आणावयाचा. यावेळी दख्खनच्या सुभ्यावर, निजामाचा मुलगा नासिरजंग हा, त्याचा प्रतिनिधी म्हणून अधिकारावर होता. यावेळी त्याच्यावर, मराठ्यांचे दडपण वाढत असल्यामुळे, स्वतः निजामानेच तेथे जाणे जरूर झाले होते. अशा स्थितीत, ३ एप्रिल १७४० ला, दक्षिणेत जाण्यासाठी निजामाने दिल्ली येथून कूच केले. पण आपल्या प्रवासाची तयारी पूर्ण करण्यासाठी त्याने राजधानीच्या बाहेरच, जयसिंगपुरा येथे काही दिवस मुक्काम केला.

अमीरखानाला मात्र आणखी जास्त काळ धीर धरवेना. जणू काय वजीरीचे पद आपणास आधीच बहाल केलेले आहे अशा थाटात तो स्वतःच्या खाजगी मित्रमंडळात मोठ्या आढ्यतेने बोलू लागला आणि यातच कम्रूद्दिनबाबत तर उद्धटपणे व तिरस्काराने बोलू लागला[१]. त्याचे हे शब्द चहाडखोरांनी वजीराला सांगितले. यामुळे या वजीराविरुद्ध झालेल्या कटाची कल्पना त्याला सहजच आली व त्याने शाही दरबारातील या हालचालींची सविस्तर माहिती निजामाला लिहून कळविली, आणि त्याचा सल्ला विचारला. निजामाने आपल्या चुलतभावाला सल्ला दिला की, आपल्या कृतघ्न धन्याविरुद्ध शस्त्र उचलून सय्यद बंधूसारखा शोचनिय शेवट आणि दुर्लोकिक अंगावर ओढवून घेऊ नये, पण आपल्या अधिकारपदाचा राजिनामा द्यावा व नालायक बादशहाला स्वतःच्याच करामतीवर सोपवून टाकावे आणि आपण स्वतः निजामाबरोबर दख्खनमध्ये चलावे.

यावेळी दिल्लीचा खजिना रिता पडला होता. राजवाड्यातील गुप्त खजिने, पर्शियन विजेता घेऊन गेला होता. साम्राज्यातील सुभ्यामधून यावयाची खंडणी वा महसुलातील केंद्राचा वाटा पाठविणे सुभेदार स्थगित करीत होते, आणि शाही जमिनीबाबत यावयाचा महसूलही त्या जमिनींचे व्यवस्थापक थांबवून ठेवीत होते. अशा रीतीने दिल्ली दरबारापुढे उपासमार उभी राहिली होती. यातून मार्ग काढण्यासाठी अमीर-उमरावांची पिळवणूक करून पैसा उकळण्याचे प्रयत्न अमीरखान करू लागला आणि यामुळे त्याने अधिकच झपाट्याने आणिबाणीची परिस्थिती निर्माण केली. मरण पावणाऱ्या सरदाराची मालमत्ता खालसा करण्याच्या एका जुन्या नियमाची अंमलबजावणी करण्याचा सल्ला त्याने बादशहाला दिला. यावेळी वजीर कम्र-उद्-दिनाचा मुलगा बद्र-उद्-दिन् नुकताच मरण पावला होता. त्याने १२½ लाख रुपयांची मालमत्ता मागे ठेविली होती. बादशहातर्फे अमीरखानाने, वजीराकडे त्याच्या मुलाच्या जहागिरीच्या वसुलाच्या एकूण यादीची मागणी केली. यामागे अर्थातच ती देणगीची जहागीर परत बादशहाकडे घेण्याचा हेतु होता. या संदर्भात वजीराने त्याला समज देणारे एक पत्र पाठविले, त्यात तो म्हणतो—"बादशहाच्या सेवकांनी, बादशहासाठी प्राणांचा त्याग केला असताना, या त्यागाची भरपाई (!) म्हणून, जर बादशहा त्यांच्या जहागिरीच पुन्हा स्वतःकडे परत घेणार असेल तर त्याच्याशी चिरकाल निष्ठावंत रहाणाऱ्या त्यांच्या या वंशपरंपरागत गुलामाला त्यांच्याकडून काही बढती व आधार मिळण्याची आशा कशी बाळगता येणार ?" या पत्राला अमीरखानाने मुद्दामपणे उत्तर पाठविले. "जोपर्यंत माझ्यावर माझ्या धन्याचे कृपाछत्र आहे तोपर्यंत मी 'गॅब्रीअल' आणि 'मायकेल' यांच्याविरुद्धही उभा

१ या संदर्भात सियार (२) ९९ मध्ये नमूद केलेल्या हकीगतीवर माझा (लेखक) विश्वास नाही. त्यातील ही हकीगत अशी : निजामाने दिल्लीबाहेर कूच केल्यानंतर लगेच महमदशहाने, अमीरखानाला वजीरीचे प्रतीक (लेखणी ठेवण्याची सोनेरी पेटी– Pen Case ) गुप्तपणे बहाल करून वजीरपद दिले आणि नंतर अमीरखानाच्या अविवेकी उतावीळपणामुळे ही गुप्त गोष्ट बाहेर फुटली.

रहाण्यास तयार आहे. मग तुम्ही व असफ्जहा यासारख्या दोन उमरावाविरुद्ध उभे ठाकण्याबाबत कशाला बोलावयाला पाहिजे!" (शाकीर ८४).

## § १४ : बादशहाच्या मनातील भीती व अस्थिरता आणि अमीरखानाची पदच्युती

यावेळेपर्यंत हा कट पूर्णतया उघडकीस आला होता. आता कम्रुद्दिनने तातडीने दिल्ली सोडली व उपनगरात राहिलेल्या निजामाकडे जाऊन, तो त्याला मिळाला. तेथून त्याने बादशहाला लिहिले...."माझ्या शहेनशहांचे बाबतीत मी कधीही बेईमान नव्हतो आणि त्यांच्याशी यापुढेही कधी बेइमानी करणार नाही. पण आता त्यांचे कृपाछत्र मी गमावले आहे म्हणून माझ्या अधिकारपदाचा राजीनामा देण्याची व अशा रीतीने त्यांच्या अधिक विश्वासातील एखाद्या व्यक्तीकडून माझे काम करवून घेणे, त्यांच्यावरच सोपविण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करितो."

हे पत्र आणि रागावलेला निजाम व वजीर यांची हातमिळवणी झाली ही बातमी बादशहाला मिळाली आणि हा भ्याड बादशहा अतिशय घाबरला व गोंधळला. पूर्णपणे गोंधळलेल्या या मनःस्थितीत, त्याने अमीरखान व इशाकखान याना सल्लामसलतीसाठी बोलविले. यानंतर सुरू झालेली मनोरंजक घटना म्हणजे साम्राज्याच्या तत्कालीन ऱ्हासाचे खरेखुरे स्वाभाविक वैशिष्ठयच होय. बादशहा व अमीरखान यांच्यामध्ये आधीच झालेला करार पाळण्याबद्दल अमीरखानाने आग्रह धरला. तेव्हा याबाबत बादशहाने मुग्धता पाळून त्या दिवसापुरते अमीरखानाला परत पाठवून दिले. नंतर त्याने इशाकखानाला बाजुला आपल्या खाजगी दिवाणखाण्यात नेले, आणि तेथे त्याला जास्तीत जास्त गंभीर शपथा घालून, साम्राज्याच्या दृष्टीने खरोखरी अतिशय योग्य वाटेल असा सल्ला, कोणतीही भीती वा फायद्याची अपेक्षा न बाळगता, देण्याचा आग्रह केला. इशाकखानाला, कोणाचे लक्षही जाणार नाही अशा परिस्थितीतून, अमीरखानानेच उच्च प्रतिष्ठेच्या जागी चढविले होते, आणि अमीरखान हाच त्याचा पहिल्या पुरस्कर्ता व आश्रयदाता होता. त्याने अमीरखानाला वचनही दिले होते की, आपल्या पहिल्या आश्रयदात्याच्या-धोरणाविरुद्ध बादशहाला सल्ला, तो कधीही देणार नाही. अशा परिस्थितीत बादशहाच्या प्रस्तुत आग्रहामुळे इशाकखान पेचात पडला आणि त्याने बादशहाला काहीही उत्तर दिले नाही. महमदशहाने पुन्हा एकदा जास्तीत जास्त गंभीर शपथा घातल्या आणि त्याला खरोखरच योग्य वाटेल तो सल्ला देण्यास सांगितले. इशाकने आपल्या दोन्ही आश्रयदात्यासंबंधीच्या आपल्या कर्तव्यामधील विरोधाचे स्पष्टीकरण केले आणि प्रस्तुत प्रश्नाला उत्तर न देण्याबद्दल क्षमा करावी अशी विनवणी केली. पुन्हा तिसऱ्यांदा बादशहाने त्याचा सल्ला विचारलाच आणि तोही आणखी जास्तच विनवणी करून! अशा परिस्थितीत उत्तर देण्याशिवाय इशाकला मार्गच उरला नाही. तो म्हणाला...."अमीरखान हा स्वतः अमीर आहे, अमीराचा पुत्रही आहे आणि एकूण व्यवस्था वा कारभार करण्यासाठी लागणारे कौशल्य व शौर्य हीही त्याच्याजवळ आहेत. तथापि हिंदुस्थानातील अमीरउमरावांमध्ये आणि जनतेमध्ये मात्र समजूत आहे की, तो, स्वभाव व वागणूक या दृष्टीने उथळ आहे. मी आणि अन्य काही सरदार यांना तर 'मनसबदारीचे' पदावर अगदी अलीकडेच चढविलेले आहे. याउलट हिंदुस्थानातील सर्वच प्रमुख लोक, असफजाह आणि इतिमाद-उद्-दौला यांच्याकडे मोठ्या आशा-अपेक्षानी पहात असतात आणि त्यांच्या आज्ञा मानण्याने आपला फायदा होईल, आपले भले होईल असे मानतात. तेव्हा माझे नम्र मत असे की, आमच्यासारख्यावर

अवलंबून राहून असफ्-जाह व इतिमाद-उद्-दौला अशा उमरावांना तोडून टाकणे हे प्रस्तुत आपणाला उचित नाही. तथापि आपल्या स्वतःच्या हितसंबंधाला योग्य काय याचा निर्णय घेण्यास आपणच सर्वापेक्षा जास्त समर्थ आहात."

हा सल्ला मिळाल्यावर महमदशहाने आपला आधीचा बेत सोडून दिला आणि इतिमाद्-उद्-दौला व असफ्-जाह यांचे मन वळवून त्यांच्याशीच जमवून घेण्याचे ठरविले. दुसरे दिवशी अमीरखान जेव्हा बादशहाकडे आला तेव्हा पूर्वी ठरलेला बेत बादशहाने पूर्णपणे सोडून दिल्याचे त्याला आढळून आले. बादशहा त्याला म्हणाला की, "ज्यांच्या हाती असे निरंकुश सामर्थ्य आहे अशा तुराणी अमिरांना विरोधी बनविणे शहाणपणाचे नाही. त्यांच्याशी समझोता घडवून आणण्याचे धोरणच ठेवणे सर्वात चांगले होय. तेव्हा माझ्याशी निष्ठा राखण्यासाठी म्हणून तुम्हीच यापुढे, त्यांचा राग वा वैर चेतविले जाईल असे काहीही करण्यापासून स्वतःला आवरले पाहिजे." [ सियार (२) ९९–१०० ].

अशा रीतीने, 'वजीर' पदावर आरूढ होणार असे वाटत असणाऱ्याच्याच आता लक्षात आले की आपण काही वजीर होत नाही. अमीरखानाची योजना आता ढासळली होती. बादशहाचा आधार घेऊन, कमरुद्दिनला वजीरपदावरून हुसकून लावण्याची अपेक्षा करण्यामध्ये तो मोडक्या काठीचाच आधार घेत होता हे त्याला आता समजून आले. त्याचा धनी व स्वतः तो यांचे स्थान टिकविण्याचा आता एकच मार्ग राहिला होता तो म्हणजे लाजिरवाण्या शरणागतीचा एखाद्या अपराध्याची दोन्ही मनगटे एकत्र बांधावी तशी त्याची मनगटे रुमालाने एकत्र बांधून त्याला आता बादशहाने आपल्यातर्फे, त्या दोन्ही उमरावांच्याकडे पाठविले, आणि तेथे त्याने आपल्या धन्याचा निरोप सादर केला :—"या माणसाने तुम्हाविरुद्ध अपराध केलेला आहे तेव्हा मर्जीला येईल त्याप्रमाणे त्याची विल्हेवाट तुम्ही लावा." या अपयशी कटवाल्यानेही, आपल्या चुकीची सर्व जबाबदारी, इशाकखान व अन्य दरबारी यांनी कुटील सल्ला दिला यावरच आहे अशी सबब सांगून क्षमा याचना केली. तेव्हा दोन्ही अमीरांनी, असला हा मनुष्य आपण तिरस्कार करण्याच्याही लायकीचा नाही असेच मानले. पण निजामाने मात्र त्याला सल्ला देण्याच्या मिषाने दरबार सोडून जाण्याची आज्ञा केली ती अशा शब्दात :–"तू आणि वजीर यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले असल्यामुळे, दरबार सोडून, तू आता, काही काळ आपल्या अलाहाबादच्या सुभ्याकडे निघून जावे हे उत्तम." [आशब (२) ४१८, सियार (२) १००].

बादशहाच्या सहवासात जो अमीरखान इतके दिवस केवळ खोडसाळ हालचालीच करीत होता त्याला अशा रीतीने बादशहाभोवतालच्या मंडळीतून घालवून देण्यात आले. तथापि अनेक निरनिराळ्या सबबी सांगून प्रत्यक्ष राजधानी सोडून जाण्याचे त्याने शक्य तितके पुढे ढकलण्याचे चालविले. यात त्याला आशा इतकीच होती की, दरम्यानच्या काळात त्याच्या बाजूची अशी एखादी अनपेक्षित घटना घडेल आणि त्याची हाकलपट्टी रद्द होईल. पण निजाम आपल्या या हुकमाबाबत अतिशय ताठरच राहिला आणि अमीरखान प्रत्यक्ष निघून जाईतो स्वतः दिल्ली सोडून जाण्याचे त्याने नाकारले. अशा रीतीने जवळजवळ चार महिने फुकट गेले. अखेरी अमीरखान अलाहाबादेला जाण्यासाठी निघाला आणि मगच जयसिंगपुरा उपनगरातून निजामाने पुन्हा कूच सुरू केले (२७ जुलई १७४०). दरम्यान, १८ एप्रिलला इशाकखानाचाही मृत्यू झाला होता आणि अशा रीतीने आता बादशाही दरबार इराणी कारस्थान्यांपासून मुक्त झाला.

## § १५ : बंगाल, बिहार आणि ओरिसावर मराठ्यांची स्वारी : बादशाही सरकारने केलेले उपाय

अशा परिस्थितीत आणखी विशेष काही न घडता तीन वर्षे गेली. नंतर मात्र राजकीय मंचावर नाट्यपूर्ण फरक घडून आला. साम्राज्याच्या वायव्य सरहद्दीवर गाढ शांतता राहिली होती; इतकेच नव्हेतर खात्रीलायक संरक्षण व्यवस्थाही झाली होती. ती मात्र पर्शियाच्या राजाला सिंधुनदीपलीकडील सुभ्यांची किंमत देऊनच मिळविली होती. पण आता पूर्वभागात एक नवे संकट निर्माण झाले. एप्रिल १७४२ पासून, नागपूरच्या मराठ्यांनी (भोसले) बंगाल, बिहार आणि ओरिसा या सुभ्यावर दरवर्षी स्वाऱ्या करण्यास सुरवात केली होती या स्वाऱ्या, पुढे नऊ वर्षे चालू राहिल्या आणि शेवटी थांबल्या त्या, साम्राज्याने ओरिसाचा सुभा गमावल्यानंतरच. या काळातच बिहारवरील या मराठ्यांचे आक्रमण, बिहार ओलांडून पश्चिमेला अलाहाबादेच्या रोखाने पुढे येण्याची भीती निर्माण झाली, तीही अशावेळी की बादशहाने माळव्याचा सुभा मराठ्यांना (भा. हे मराठे म्हणजे पेशव्यांच्या नेतृत्वाखालील शिंदे-होळकर इ. होत) जवळजवळ (Virtual Surrender) देऊन टाकूनच साम्राज्याच्या दक्षिण सरहद्दीवर शांतता मिळविली होती त्यावेळी ! याचबरोबर पूर्वेकडे बंगालचा सुभेदारही मदतीसाठी निकडीच्या विनंत्या करू लागला होता. या विनंत्यांना प्रतिसाद म्हणून बादशहाने १७४२ च्या पावसाळ्यात, औंधचा सुभेदार सफ्दरजंग याला, बिहारमध्ये कूच करून जाण्याचा हुकूम दिला. पुढे जरूर तर बंगालमध्येसुद्धा जाण्याचा व तेथून मराठ्यांना हाकलून देऊन शाही सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा हुकूमही दिला. सफ्दरजंगाच्या या सेवेसाठी त्याच्या अधिकाराखालील मुलुखाची वाढ, त्यात चुनार किल्ल्याचा समावेश करून केली. या घटनेच्या खऱ्या अंतर्भूत अर्थाबाबत स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे.

शाही दरबारातून अमीरखानाला सक्तीने बाहेर काढले होते ते या घटनांचे पूर्वी. या सक्तीने लादलेल्या दरबारातील गैरहजेरीच्या काळातील तीन वर्षे त्याने अलाहाबादेमध्ये घालविली. या मुदतीत त्याचा बादशहाशी सतत पत्रव्यवहार चालू असून आपले दिल्लीच्या दरबारातील स्थान पुन्हा मिळविण्यासाठी उपायाबाबत तो सतत विचार करीत होता. त्याच्या बाजूला एखादा कर्तृत्ववान सेनापती व त्याच्या नेतृत्वाखाली बलाढ्य सेना, ही मिळाली तरच निजामाच्या सामर्थ्याला स्वाभाविक तोडीसतोड निर्माण होणार होती, आणि यावरच अमीरखानाचे यश अवलंबून होते. इराणी पक्षीयांचा असा खड्गधारी हात म्हणजे शेजारचा औंधचा सुभेदार सफ्दरजंगच होय हे त्याला दिसून आले. तेव्हा आपण एकदा ज्या-प्रमाणे इशाकखान १ ला, याला उच्च पदावर चढविले त्याचप्रमाणे आता सफ्दरजंगाचे सामर्थ्य वाढवावे याकडे त्याने आपल्या सर्व योजनांचा रोख वळविला. याच सुमारास पूर्वेकडे मराठ्यांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. या परिस्थितीचा फायदा घेण्याचे त्याने ठरविले व दुर्बल बादशहाच्या लोभी वृत्तीला चाळवित व उत्तेजन देत देत आपली मूळ योजना पुढे दामटण्याचे काम चालविले. मुर्शिदकुली जाफरखान (१७१३–१७२७) याच्या सुभेदारी-पासूनच बंगाल, बिहार आणि ओरिसा हे सुभे व्यवहारतः स्वतंत्रच झाले होते व तेव्हा-पासून त्याच्याच कुटुंबियांचे वर्चस्वाखाली स्वतंत्र राहिले होते. या सुभ्यांचा शिलकी महसूल हे सुभेदार, शाही दरबाराकडे नियमित पाठवीत होते, पण निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका, त्यांचे नियंत्रण आणि सार्वजनिक पैशाचा विनियोग याबाबतीत ते स्वतःच्याच

इच्छेप्रमाणे पूर्ण अधिकार चालवीत. मुर्शिदकुलीखानाचा नातू सराफ्राझखान याचा वध करून अलिवर्दीखानाने बंगालची सुभेदारी बळकावली (१० एप्रिल १७४०). [अलिवर्दीखानाला अधिकृतपणे हिसामदु-दौला महाबत्जंग असे संबोधित]. या आधीच्या दोन सुभेदारांची— शुजाखान व सराफ्राझखान यांची मालमत्ता तत्कालिन कायद्यानुसार आता शाही दरबाराच्या मालकीची झाली होती आणि यावेळी पैशाबाबत उपासमार होत असलेल्या दिल्ली-दरबाराला हा लाभ अतिशय स्वागतार्ह वाटत होता. कायद्याने लाभलेली ही मालमत्ता दिल्लीला पाठविण्याबाबत अलिवर्दीखानाने दिरंगाई चालविली. ही परिस्थिती म्हणजे आपणाला संधी आली आहे असे अमीरखानाला दिसून आले आणि त्याने बादशहाला लिहिले: "आपल्या धन्याला ठार मारणारा अलिवर्दीखान आता मराठ्यांबरोबरील झगड्यात गुंतला असून, अन्य कारणासाठी वापरण्याला त्याच्याजवळ आता कांही सैन्यही नाही. अशावेळी तुम्ही जर सफ्दरजंगाला हुकूम दिलात तर अलिवर्दीखानाचा सुभा तो सहज जिंकून तुम्हाला देईल. सफ्दरजंग हा एक विश्वासू सेवक असून, त्या सुभ्याकडून यावयाची खंडणी (Tribute) प्रतिवर्षी तुम्हाला देईल." (इमाद ३३).

हा सल्ला महमदशहाला पटला आणि त्यानुसार त्याने सफ्दरजंगाला खलिता पाठविला. यानंतर औंधचा सुभेदार-सफ्दरजंग-बिहारवर चाल करून गेला आणि त्या प्रांतात शिरला. तेथील लोकांची मराठ्यांकडून आलेल्या संकटातून सुटका करण्याचा उद्देश सांगत तो बिहारात आला हे खरे पण त्याच्या या स्वारीमुळे लोकात मात्र सुटकेची व सुरक्षिततेची भावना निर्माण होण्याऐवजी जास्त घबराटच निर्माण झाली. यावेळेपावेतो (जानेवारी १७४३) अलिवर्दीखानाने स्वारी करून आलेल्या मराठ्यांवर वरचष्मा मिळविला असून त्याला आता दुसऱ्याकडून मदतीची गरज राहिली नव्हती. यामुळे सफ्दरजंग पाटण्याहून आपल्या सुभ्यात परत आला. (फेब्रुवारीच्या प्रारंभी). पण ही अल्पकालीन क्षुल्लक मोहिम म्हणजे सफ्दरजंगाने मिळविलेले मोठे यश व त्याच्या लष्करी कर्तबगारीचा पुरावा असेच बादशहापुढे मांडण्यात आले, आणि अमीरखानाने, स्वतःला व सफ्दरजंगाला, खलिता पाठवून दरबारात येण्याला हुकूम देण्याबाबत बादशहाचे मन वळविले. पुढे (ऑगस्ट १७४३) अशीच निमंत्रणे त्या सुभ्यातील प्रमुख उमराव आणि राजेरजवाडे यांनाही पाठविण्यात आली. शाही दरबारी या, व पूर्वेकडील सुभ्यावर दरवर्षी येणाऱ्या मराठ्यांच्या संकटाला कसे तोंड द्यावे याबाबत सल्ला द्या असे यातून कळविले होते [ सियार (३) ५; इमाद ३४ ].

## § १६ : शाही दरबारात इराणी पक्षाचे संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित होते (१७४४)

५, नोव्हेंबर १७४३ ला अमीरखान दिल्लीला पोहोचला आणि लगेच त्याने बादशहाचे मनावर आपले वर्चस्व पूर्वीसारखेच पुन्हा प्रस्थापित केले. अमीरखानानंतर पुढे सुमारे आठ दिवसानी सफ्दरजंगही तेथे येऊन पोहोचला आणि भपकेदार पोशाख केलेल्या १०,००० सैनिकांच्या अग्रभागी राहून, संपूर्ण थाटामाटत त्याने शहरात प्रवेश केला. शहराभोवतालच्या तटाच्या आत असलेल्या दारा शुकोच्या राजवाड्यात त्याचा मुक्काम ठेवण्यात आला. आता इराणी पक्षाचे संपूर्ण वर्चस्व, शाही दरबारी प्रस्थापित होऊन तुराणी पक्षाची पिछेहाट झाली. याकाळी "मिर आतिश" (तोफखाना प्रमुख) हे अधिकारपद फार महत्त्वाचे असे. या अधिकाऱ्याकडे, दिल्लीच्या शाही वाड्याच्या अंतर्गत परिसरात, बादशहाचे व्यक्तीगत शारीरिक संरक्षण करणे, त्याच्या कुटुंबियांचे व खजिन्याचे संरक्षण करणे आणि यासाठी

त्या सर्वांभोवती योग्य पहारा व नियंत्रण ठेवणे अशी जबाबदारी असे. यावेळी या पदावर सादुद्दिनखान हा होता. तो मेल्यावर (२० जून १७४३) हे अधिकारपद त्याचा मुलगा हफीजुद्दिन याला बहाल केले होते. हा हफिज तुराणी पक्षाचा असून वजीराचा आश्रीत व बगलबच्चा होता. पुढे अमीरखान दिल्लीत आल्यावर आणि तदनुषंगाने बादशहाचा, आपल्या तुराणी उमरावावरील सर्व विश्वास नाहीसा झाल्यावर, अमीरखानाच्या सूचनेनुसार 'मिर-आतिश' हे अधिकारपद, ११ मार्च १७४४ ला हफीझकडून काढून घेऊन सफदरजंगाला देण्यात आले. या अधिकारपदामुळे आता सफदरजंगाने आपला मुक्काम शाहीवाडयाच्या किल्ल्यात ठेवला आणि नंतर आणखी अनेक अधिकारपदे त्याच्याकडे भराभर येऊ लागली.

यापुढे बादशहाच्या विचारविनिमयावर वजिराच्या प्रभावाऐवजी, त्याचाच प्रभाव जास्त पडू लागला. याचा पहिला अविष्कार म्हणजे अओनला ( Aonla ) आणि बाणगडचा मालक अली महमदखान रोहिला याचेविरुद्ध हाती घेतलेली शाही मोहीम (१७४५) ही होय. या अली महमदखानाचा पुरस्कर्ता तर वजिरच होता आणि तरीही ही मोहिम हाती घेतली होती. या घटनेची माहिती पुढे प्रकरण दोनमध्ये दिली आहे.

शिया पक्षियांचे वर्चस्व आता शाही दरबारामध्ये जलद गतीने पसरले. यातून लवकरच १७४५ च्या अखेरी सफदरचा मुलगा व वारस शुजा-उद्-दौला आणि बादशहाचा सर्वात लाडका सरदार इशाकखान २ रा-नज्मुदौला याची बहीण यांचा विवाह करावयाला, बादशहाने आज्ञा केली. ही सुप्रसिद्ध स्त्री म्हणजे 'बहुबेगम' ही होय. औंधच्या ज्या बेगमांना वाईटरीतीने वागविल्याबद्दल, पुढे, वॉरन हेस्टिंग्जची "हौस ऑफ लॉर्डस" मध्ये चौकशी चालली होती त्यापैकीच ही, दुर्दैवी प्रमुख नायिका होय. पुढे, १२ जुलई १७४७ ला नज्मुदौला याला बादशहाच्या खाजगी जमिनींचा ( Crown lands ) दिवाण-प्रमुख व्यवस्थापक-या पदावर नेमले. हे पद पूर्वी त्याच्या पित्याकडे, मृत्यू होईतोपर्यंत होते. (चहार गुल. ३९३, इमाद ३५.).

## § १७ : असद्यार खानाची बदनामी आणि मृत्यू

दरबारात शिया पक्षियांचे वर्चस्व जलद गतीने वाढत होते. त्याच वर्षी (१७४५), या इराणी पक्षाचा शाही दरबारातील एक प्रमुख आधारस्तंभ असद यार खान हा मृत्यू पावला. १०,००० सैनिकांचा एक नवा घोडदळ विभाग शमशीर डाग उभारण्याची त्याची योजना होती.[1] पण या काळातील आर्थिक अडचणीमुळे ही योजना मोडकळीस आली. शमशीर डाग या पथकांना वार्षिक ३० लाख रुपये खर्च येणार होता. पण नादिरशहा परत गेल्यानंतर, निरनिराळ्या ठिकाणी पळून गेलेल्या जुन्या शाही सैन्यातील सैनिकांपैकी, बरेच आपल्या धन्याच्या निशाणाखाली हळूहळू पुन्हा जमू लागले होते. यामुळे लवकरच राज्याचे उत्पन्न सैन्याचा खर्च भागविण्यासाठी अपुरे ठरले. यासाठी नव्या शमशीर डाग पथकांपैकी निम्मी पथके बंद करण्याचा निर्णय बादशहाने प्रथम घेतला.

दरबारात आधी कोणालाही माहीत नसलेल्या असद्-यार-खानाला प्रथम बादशहाच्या निदर्शनाला आणून उच्च पदावर चढविण्याचे काम, पूर्वी अमीरखानानेच केले होते

१ पहा §१२ शेवटचा परिच्छेद ही योजना मूळ १७४० मधील.

तथापि आपले वर्चस्व व अधिकार दरबारात पुन्हा प्रस्थापित झाल्यावर मात्र तोच अमीरखान आता क्षुद्र मनाने असद्-यार-खानाचा मत्सर करू लागला आणि आपला नवा बगलबच्चा सफ्दरजंग याचेवर आपली सर्व मेहेरनजर दाखवू लागला. असद्-यार याचेकडे यावेळी काश्मीरची सुभेदारी असून, काश्मीरमध्ये न जाताच तो, ते पद उपभोगित होता. २४ सप्टेंबर १७४४ ला, असद्-यारची ही सुभेदारी काढून घेवविण्याची कारवाई त्याने केली, आणि अशा रीतीने सफ्दरजंगाला आणखी एक अधिकारपद मिळविता येण्यासाठी मोकळे केले. यानंतर खर्चात बचत करण्यासाठी म्हणून सर्वच "शमशीर-डाग" पथके बंद करण्याचा निर्णय घ्यावयासही बादशहाचे मन त्याने वळविले. यावेळी यातील सैनिकांचा नऊ महिन्याचा पगार रु. २२½ लाख द्यावयाचा बाकी राहिला होता. पथके बंद करण्याचे वेळी त्यांचे हे २२½ लाख रुपये देऊन टाका असे बादशहाचे आर्जव असद्-यारने केले. तेव्हा या सैनिकांनी ४½ वर्षे आपल्या पगाराचा उपभोग घेतला पण साम्राज्याची सेवा मात्र काहीही केली नाही असे म्हणून राहिलेली ही रक्कम देण्यास अमीरखानाने विरोध केला! यामुळे नेभळट बादशहाने ही बाकी देऊन टाकण्यास नकार दिला. हे कळल्यावर त्या सैनिकांनी, बंडखोरी आरंभिली व गर्दी-गोंधळ करीत ते राजवाड्याभोवती फिरू लागले. असे फिरत असताना वाटेतच, बादशहाच्या भेटीसाठी जात असलेला अमीरखान त्यांना दिसला. त्याबरोबर त्यानी त्याला, मनःपूर्वक शिव्या देऊन, दगड व विटांचे तुकडेही त्याच्यावर फेकले.

अखेरी, त्यांच्या पगाराची बाकी देऊन टाकण्याची जबाबदारी स्वतःवर घेऊन असद्-यारने त्यांना शांत केले. अशा रीतीने स्वतःवर लादून घेतलेली ही जबाबदारी त्याने आपले घरगुती सामानसुमान व जडजवाहिर विकून पुरी केली. (चहार गुलझार, ३७३ अ-३८४अ). तथापि त्याच्या मागची संकटे मात्र त्याच्या मृत्यूनेच संपविली. (सुमारे १५ एप्रिल १७४५).

## § १८ : अमीरखानाचा खून (१७४६)

आधी असद्-यारचा पुरस्कर्ता असलेला पण पुढे छळ करणारा अमीरखान हासुद्धा, असद्-यारच्या मृत्यूनंतर फक्त २० महिनेच जगला. शहाणपणा वा आत्मसंयमन यासाठी अमीरखान कधीही नावाजलेला नव्हताच आणि आता तर कोणत्याही सरकारी अधिकारपदाच्या औपचारिक कर्तव्याची जबाबदारी त्याच्याकडे औपचारिक उघडपणे नसतानाही, बादशहाच्या सल्लामसलतीत अनिर्बंध वर्चस्व त्याला मिळाले होते व यामुळे तो फारच शेफारला होता. अलिमहमद रोहिल्याविरुद्ध नुकत्याच झालेल्या मोहिमेच्या काळात, आता लवकरच कम्रुद्दिनच्या जागी अमीरखानाला वजीर पदावर नेमतील, अशी सगळीकडे जनमानसात अपेक्षा निर्माण झाली होती. पण प्रत्यक्षात असे काही न होताच, आपण जणूकाही आधीच धन्याचाही धनी झालो आहोत आणि सय्यद हुसेन अलिप्रमाणे, एखाद्याला सिंहासनावर बसविण्याचे वा तेथून काढण्याचे, असे सामर्थ्य आपल्याजवळ आहे असे त्याला वाटू लागले व तो मूर्खासारखा गर्विष्ठपणाने वागू लागला. अपमानास्पद वाटेल इतक्या दांडगाईने व आरडाओरड करीत तो, आपला सल्ला व मागण्या, याबाबत बादशहाजवळ आग्रह धरू लागला. इतर अमीर-उमराव हे तर कोणी बाजारबुणगेच होत अशा रीतीने त्याना, तो वागवू लागला. इशाकखान (२ रा) व त्याचे भाऊ यांच्यासारख्या बादशहाच्या व्यक्तीगत मित्रांना व आवडत्या मंडळीनाही, अमीरखानाकडून, लोकांच्या देखत, उघडउघड, तुच्छतादर्शक वागणूक सहन करावी लागली. पण या क्षुद्र किड्याला अखेर उताणे पडावे लागले. एके दिवशी बादशहाच्या

तैनातीतील एक प्रमुख, एकनिष्ठ खोजा (Eunuch) रोझ अफ्झुन खान, (हा राजवाड्यातील देखरेख करणारा मुख्य अधिकारी–अधीक्षक वा सुपरिंटेन्डंट होता) याने, अमीरखानाच्या एका विशिष्ट कृतीबद्दल वा शब्दाबद्दल, ती कृती वा शब्द आपल्या धन्यालाच अपमानास्पद आहेत अशी तक्रार करण्याचे धैर्य दाखविले. ही तक्रार केल्याबद्दल लगेच दरबारातच चमत्कारिक देखावा निर्माण झाला. अमीरखानाच्या संतापाचा आणि धमक्यांचा मोठा लोंढाच वाहू लागला. रोझ अफझुनला अधिकारावरून बडतर्फ करावे आणि त्याच्या जागी अमीरखानाने सांगितलेला त्याचाच एक माणूस नेमावा अशी त्याने मागणी चालविली. या रागाच्या आणि मागणीच्या लोंढ्यापुढे भित्र्या बादशहाचे अवसान गळाले आणि त्याने ही मागणी मान्य केली. शाही वाड्यातील प्रमुख व्यवस्थापकपदासंबंधीच्या या बदलामुळे, बादशहा, अमीरखानाचा एक अगतिक गुलामच बनणार होता. यामुळे अमीरखानाची ही मागणी मान्य केल्यावरही बादशहाने रोझ अफझुन खानाला, अमीराचा काटा काढण्यास चिथावणी दिली. यानुसार रोझ अफझुनने, अमीरखानाकडून दुखावल्या गेलेल्या, त्याच्याच एका नोकराकडे त्याला भोसकून ठार मारण्याचे काम दिले. अमीरखान, निवडक व्यक्तींच्या मुलाखतींच्या वेळी, बादशहाकडे मुलाखतीसाठी जात असताना, दिवाण-इ-आमच्या जाळीदार दरवाजाजवळ हे काम उरकावयाचे होते. (२५ डिसेंबर १७४६. भा. तसे ते पार पडलेही.)

अमीरखानाच्या सैन्य विभागातील ( Contingent ) सैनिकांचा पगार, त्याने १४ महिने दिला नव्हता. या सैनिकांनी अमीरच्या मृत्यूनंतर लगेच त्याच्या वाड्याला वेढा घातला आणि आपले बाकी असलेले देणे चुकते केल्याशिवाय, ते, त्याचे दफन करू देईनात. अशा रीतीने चार दिवस गेले आणि त्याचा मृत देह स्वाभाविकच सडू लागला. अशावेळी हे देणे चुकते करण्याची जबाबदारी सफ्दरजंगाने स्वतःवर घेतली आणि या देण्याचे पोटी त्यांना दोन जामीनही दिले. तेव्हाच अखेरी, खानाच्या मृत देहाचे थडग्यात दफन करण्याला त्यांनी मोकळीक दिली. या अमीरखानाला मूलबाळही काही नव्हते. त्याने आपल्या घरात ५० ते ६० लाख रुपये किंमतीचे रत्नजडित दागदागिने (Jewellery) साठवून ठेविलेले होते. असा हा अमीरखान आपल्या सैनिकांची व नोकरांची उपासमार करीत होता. आता या दागदागिन्यांची फक्त १० लाख रुपये इतकी अवाजवी किंमत करून बादशहाने ते स्वतःसाठी घेतले. [ सियार (३) १४-१५; वय.न २०७ ].

असद्-यारखानाच्या मृत्यूनंतर (सुमारे १५ एप्रिल १७४५) दोन महिन्यांनी पंजाबचा कर्तबगार सुभेदार झकेरिया खान हाही मरण पावला. या घटनेमुळे दिल्लीबादशहीच्या भविष्याबाबत अतिशय महत्त्वाचा बदल निर्माण झाला. त्याचे वर्णन पुढे प्रकरण पाचमध्ये दिले जाईल.

---

## प्रकरण दुसरे

# गंगा–यमुना दो–आबातील अफगाण वसाहती

### § १ : हिंदुस्थानातील मुघल रियासतीमधील अफगाण

दिल्लीला काही शतके पठाण सत्ता होती. मुघलानी या पठाण सत्तेचा अंतिम पाडाव केला तो १५५६ मध्ये. मुघलांच्या, या पठाण विरोधी, अंतिम यशानंतरच्या अर्धशतकातच, भारताच्या निरनिराळ्या भागात राज्य करीत असलेल्या पठाण घराण्यांची सत्ताही नाहीशी करण्यात आली, आणि त्या जमातीच्या हाती भारतात कोठेही, एकसुद्धा स्वतंत्र राज्य राहिले नाही. तरीही या काळातही हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्द भागात मात्र, आपल्या जमातीचे स्वातंत्र्य, आणि अतिप्राचीन काळापासून प्रमुख रस्त्यावर लुटालूट करण्याचा प्रघात, यांच्या रक्षणासाठी त्यांच्या बांधवांनी अनेक उठाव केले. हिंदुस्थानातून काबूलच्या मुघल सुभ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खिंडी ते अडवीत असत. पण अशा उठावांच्या व अडवणुकांच्या प्रत्येक वेळी मुघलांच्या शाही सरकारचाच जय झाला—कधी शस्त्रांचे जोरावर तर कधी युक्त्या प्रयुक्त्यांचे सहाय्याने—हिंदुस्थानातील, वेगळेपणे स्पष्ट दिसू शकणाऱ्या अनेक भागात, अलग अलग पडलेले अफगाणांचे गट या काळात रहात, या बाबतही शंका नाही पण तेथेही ते सर्वच जिंकीत जात असलेल्या मुघलांचे प्रजाजन वा नोकर म्हणूनच होते. जहांगीर, शहाजहान आणि औरंगजेब यांच्या संपूर्ण कारकीर्दीत अफगाण सेनाधिकारी[१] आणि सैनिक[१] साम्राज्याच्या निशाणाखाली लढले. आपला व्यवसाय व चरितार्थ चालविण्यासाठी अफगाण सारवान (उंट बाळगणारे) आणि व्यापारी, १७ व्या शतकात दीर्घकाळ चाललेल्या "दख्खन युद्धांच्या" काळात सैन्याच्या मागोमाग जात. पण या सर्व व्यक्ती, केवळ पैशासाठी, स्वतःच्या व्यवसायाकडे पहाणाऱ्या, स्वार्थी व्यक्तीच होत्या. अफगाण जमातीला, एखाद्या स्वकीय राज्यकर्त्याच्या, निदान प्रांतीय महत्त्वाच्या मोठ्या, स्वकीय व्यक्तीच्या, ताब्यात असलेला असा एखादा भागही स्वतःची मायभूमी म्हणून हिंदुस्थानात राहिलेला नव्हता. ज्या केंद्राभोवती त्यांच्या राजकीय हालचाली एकत्र गुंफता येतील, ज्या ठिकाणी ते जमात म्हणून एकत्र जमू शकतील अशा प्रकारचे त्यांचे मूलभूत केंद्र राहिले नव्हते.

अशा परिस्थितीत एक संपूर्ण शतक गेल्यानंतर सर्वांवर वर्चस्व गाजविणाऱ्या मुघल साम्राज्यात, दुर्बलता येत असल्याची, त्याचे विघटन होत असल्याची चिन्हे दिसू लागली. महमदशहा सिंहासनावर बसल्यानंतर, बंगाल, दख्खन आणि औंध अशा सुभ्यावरील सुभेदारानी[२] स्वतःच्या महत्त्वाकांक्षांचा पाठपुरावा करण्यास सुरवात केली. यातून, उघडपणे

---

१ 'कॅप्टन्स आणि जनरल्स' हे शब्द या पुस्तकात आधुनिक सैन्यातील दर्जा निदर्शक, अशा अर्थाने वापरलेले नसून सामान्यतः 'कॅप्टन्स'–'जनरल्स' हे शब्द, स्वतःची लहान मोठी सैनिकी पथके बाळगून वेळोवेळी विशिष्ट कराराने, दुसऱ्याकडे, लष्करी सेवा करणारे सेनानायक, अशा अर्थाने वापरले आहेत.

२ (हस्तलिखित पृ. २९ अ)/ग्रंथ पृ. ११ पहा.

नसली तरी वस्तुत: स्वतंत्रच अशी स्थानिक राज्यकर्त्यांची घराणी स्थापन होण्यास सुरवात झाली..... ही उदाहरणे पाहून आपणही त्यांचाच मार्ग स्वीकारावा, एके काळी हिंदुस्थानवर असलेली आपली राज्यसत्ता परत मिळविण्याचा प्रयत्न करावा असा मोह अफगाणांनाही झाला. नादिरशहाच्या स्वारीने मुघल सम्राटाच्या प्रतिष्ठेचा उरला सुरला अखेरचा दिमाखही नाहीसा करून तो एक सामर्थ्याचा नकली व दिखाऊ डोलाराच आहे हे सिद्ध केले. दिल्लीच्या सम्राटा-भोवती एक प्रकारचे दैवी वलय असे, ते आता उरले नाही. यामुळे साम्राज्यातील अनिर्बंध बेकायदेशीर शक्तींना, बादशहाविरुद्ध उठाव करण्याला, यापुढे भीती वाटेनाशी झाली. नादिरशहाने आपल्यामागे एक प्रकारचा तेजस्वी वारसा ठेविला होता. त्याच्याच हाताखालील अधिकाऱ्यात सर्वात कर्तबगार अधिकारी अशी कीर्ती असलेल्या एका अफगाणानेच[1] नादिर-शहानंतर त्याच्या जागी राज्यपदावर येऊन तो वारसा १७४७ मध्ये मिळविला. इराणमधील या घटनेमुळे हिंदुस्थानातील अफगाणांची महत्त्वाकांक्षाही, पुन्हा उत्साहाच्या शिगेला पोहचली हे खरे पण या वेळेच्या पुष्कळच आधीपासून, त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या पुन्हा होणाऱ्या या उदयाची तयारी गाजावाजा न करता, केली जात होती.

## § २ : दो-आबातील अफगाण वसाहती

१५ व्या व १६ व्या शतकातील अधिक जुन्या राज्यकर्त्या पठाण जमातींचे वंशज, आता शांतताप्रिय जमीन मालक किंवा भाडोत्री सैनिकांचे कॅप्टन्स वा नायक म्हणून ओरिसा, सिल्हेट, दरभंगा आणि अलाहाबाद या भागात स्थायिक झाले होते. पण १७ व्या शतकात, या पठाणांच्या ओसाड व डोंगराळ मायभूमीतून, त्यांच्याच जमातीच्या नवनव्या टोळ्या हिंदुस्थानात आल्या, आणि ओरिसा इत्यादी पूर्वीच्या भागापेक्षा, दिल्लीला अधिक जवळ अशा ठिकाणी, अधिक वस्तीचे पण आटोपशीर असे एक मोठे नवे अफगाण केंद्र त्यांनी निर्माण केले.[2] नव्याने आलेल्या या अफगाणांनी अशा रीतीने, एक बहुतांशी एकसंध असा आपला भाग निर्माण केला. यामुळे मुघल साम्राज्यातील अतिशय महत्त्वाचे, पश्चिमेकडील दिल्ली

१ हा अफगाण लष्करी अधिकारी व राज्यकर्ता म्हणजे अहमदखान अब्दाली हा होय. नादिरशहाच्या क्रौर्यास अखेरी त्याचे काही लाडके अफगाणही कंटाळले व त्यांच्यापैकी एकाने १७४७ मध्ये नादिरशहाचा खून केला. या अफगाणांपैकी दुसरा एक, अहमदखान हा होता. याने लवकरच अफगाण लोकांचे नेतृत्वही मिळविले व इराणच्या ताब्यातून अफगाणिस्तानचे राज्य सोडवून कंदाहार येथे आपणास राज्याभिषेक करवून घेतला. अशा रीतीने तुर्क नादीरची सत्ता जाऊन तेथे अफगाण अब्दालीची सत्ता प्रस्थापित झाली. हाच पुढे प्रसिद्धीस आलेला अहमदशहा अब्दाली होय. [ गो. स. सरदेसाई, मुसलमानी रियासत; भा. २ पृ. ४०४,४०५ वरून. आवृत्ती १९५८ ].

२ अफगाण वसाहती आणि त्यांचा प्रारंभीचा इतिहास यासाठी संदर्भ : अटकिनसनचे वायव्य प्रांत गॅझेटिअर ( N. W. P. Gazetteer ) १ ली आवृत्ती. फरुखाबाद पृ. १५२–१५८, बदाऊ (Badaun) १०५–१०९. बरेली १६५६–१६७१, बिजनोर ३४८–३५०, शहाजहानपूर १४२–१४५.

या अफगाण नायकांच्यासाठी, त्यांचे इतिहास वा हकीगती त्यांच्या सचिवानी (Secretaries) लिहिले आहेत ते सर्व १७५० नंतर बऱ्याच वर्षांनी, आणि पर्शिअन भाषेत लिहिलेले या भागासंबंधी निरनिराळे स्थानिक इतिहास तयार केले गेले ते, १९ व्या शतकात. या निरनिराळ्या इतिहासातून अनेक चुका आहेत. यातील काही दुरुस्त करता येणे शक्य आहे ते मी वापरलेल्या, त्याच काळात तयार झालेल्या दिल्ली साम्राज्याच्या निरनिराळ्या इतिहासाशी पडताळून. 'जी. फॉर्स्टरचा बंगाल ते इंग्लंड प्रवास G. Forster's Journey from Bengal to England. [ " रोहिल्यांचा इतिहास " (१) १०१–१३०— "History of Rohillas" (1) 101–130] आणि हफीज रहमतखान याचे चरित्र [ सी. इलिअट याने केलेले भाषांतर.

[ पुढील पानावर ]

व आग्रा हे सुभे, पूर्वेकडील औंध आणि अलाहाबाद या सुभ्यापासून अलग पडले. अफगाण लोकांच्या या नव्या वसाहतीमुळे, १८ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास, दिल्लीच्या शाही सरकारापुढे गंभीर धोका निर्माण झाला. अफगाणांच्या हिंदुस्थानातील या नव्या मायभूमीला पूर्वी कटेहर ( Katehr ) या नावाने ओळखीत. आता या भागातील नव्या, अधिक प्रभावी, जमातीमुळे[१] तिला **'रोहिलखंड'** हे नवे नाव मिळाले. पश्चिम सरहद्दीवर वहाणारी गंगा, पूर्व सरहद्दीवर वहाणारी गर्रा ( Garra हिला देवहा Deoha असेही म्हणतात.) आणि या दोन नद्यांमधील प्रदेशात बहुतांशी मध्यावरून वहाणारी रामगंगा या नद्या असणारा हा भूभाग होय. अशा रीतीने स्पष्ट झालेल्या रोहिलखंडाबाहेरही अफगाणांच्या आणखी दोन नव्या वसाहती झाल्या होत्या. त्या अनुक्रमे या प्रांताचे दक्षिणेला आणि पूर्वेला होत्या. दक्षिणेची वसाहत गंगेच्या पश्चिमेला काली नदीपर्यंत आणि त्याच्याही पलीकडे अशी आणि पूर्वेची वसाहत गर्रा नदीच्या पूर्वेला साई नदीपर्यंत, अशी पसरली होती.

ज्या भागाला आज शहाजहानपूर जिल्हा म्हणतात त्या भागात, १७ व्या शतकाच्या पहिल्या अर्धात अफगाण लोकांपैकी 'दाउदझाई'[१] घराण्यातील, अनेक लष्करीनेते—कॅप्टन्स स्थायिक झाले होते. हा भाग औंध प्रांताच्या वायव्य कोपऱ्यापलीकडे अगदी जवळचाच व त्याला लागूनच आहे. शहाजहानपूर हे त्याचे प्रमुख शहर असून अफगाणिस्तानमधील ५२ वेगवेगळ्या टोळ्यांनी ( Tribes ) तेथे वसाहती केल्या होत्या. त्याच्या दक्षिणेस २० मैलावर असलेला शहाबाद किल्ला नंतर काही वर्षांनी बांधला होता. शहाजहानपुराच्या वायव्येला सुमारे १० मैलावरील, उम्रपूर, हे यापेक्षाही लहान ठाणे एका **युसुफझाई** पठाणाने स्थापिले होते. रोहिलखंडाच्या बाहेर म्हणजे अफगाणांच्या मुख्य वसाहतींच्या बाहेर, दूर पूर्वेला असलेल्या, या भागातील त्यांच्या वसाहती, आटोपशीर—सलग वसविलेल्या

[ मागील पानावरून ]

१८३१.] ही दोन्ही निर्दिष्ट अफगाण इतिहासावर आधारित आहेत. आर. एस. व्हाइटवे ( R. S. Whiteway ) यांचे अफगाण रोहिले– Rohila Afghans [ कलकत्ता रिव्ह्यू खंड ६१ ( LXI ), १८७५, पृ. २०१–२२५ यातील] याचा बराचसा उपयोग वायव्य-प्रांताच्या गॅझेटियरमध्ये केला आहे. तथापि त्यातील अनेक बाबी उघडउघड चुकीच्या असून त्यांना निर्दिष्ट [ अफगाण व पर्शिअन ] संदर्भ आधाराव्यतिरिक्त अन्य कोणताही स्वतंत्र संदर्भ नाही. या गॅझेटिअरमधील सर्वात मोलाचे आणि विद्वत्ताप्रचुर वर्णन 'फरुखाबाद' या खंडामध्ये डब्ल्यू. आर्यविन ( W. Irvine ) यांनी केलेले होय. पण तेही ६० वर्षांपूर्वी लिहिलेले असून त्या लिखाणानंतर उपलब्ध झालेल्या नव्या साधनांच्या आणि टीकात्मक लिखाणाच्या संदर्भात त्यातही आता दुरुस्त्यांची आवश्यकता आहे. १७३९ पूर्वीच्या घटना व प्रथा यासंबंधी हे अफगाणी आधार हेच फक्त उपलब्ध संदर्भ आहेत (मग ते फॉर्स्टर, इलिअट वा गॅझेटिअर यापैकी कशातही मूळ नमूद असोत.) यापुढील काळातील घटनाबाबत मात्र मी अन्य व अधिक विश्वसनीय आधारावर भिस्त ठेवली आहे. अफगाण इतिहासाच्या पैकी बहुतेक सर्व, हस्तलिखितांच्या स्वरूपात, अलिगड युनिव्हर्सिटीमध्ये, अब्दुससलाम मृत्यूपत्रानुसार मिळालेल्या संग्रहात पहाण्यास मिळू शकतात.

१ या प्रकरणात Race, Clan, Tribe असे शब्द वारंवार वापरले आहेत, या समूहामधील सूक्ष्मभेद वाचकानी लक्षात घ्यावा. Race या शब्दाने विस्तृत अर्थाने "वंश" निर्दिष्ट होतो. Clan म्हणजे विशिष्ट 'कूळ' वा 'घराणे'. यातील उपकुटुंबे, सामान्य अर्थाने "वंशामध्ये" अंतर्भूत असतात. उदा. 'अफगाण' वा 'पठाण' वंश व दाउदझाई 'कूळ' Tribe व Race ही जवळजवळ सारख्याच अर्थाने वापरातात पण सूक्ष्म भेद असा की, Race या समूहात, अनुवंशिक व शारीरिक गुणधर्म समानता अधिक असते, व यावरच विशेष भर असतो, Tribe हाही एक 'समूह' पण वरील गुणधर्माबाबत, या समूहात अधिक भिन्नता संभवते. शिवाय Tribe हा शब्द मुख्यतः अशिक्षित समूहाबाबतच वापरतात. Race हा, शिक्षित व सुधारलेल्या समूहासाठी ही वापरतात. प्रस्तुत ग्रंथात हे भेद फारसे विचारात घेतलेले नसावेत.

व एकजिनसी नव्हत्या आणि त्यांना एकत्र करून अधिक सत्ता मिळवून देऊ शकेल अशा एकाच बलाढ्य नेत्याच्या हुकमतीत रहाणाऱ्याही नव्हत्या. हा भाग म्हणजे त्यांच्या लहान लहान व एकमेकापासून अलग अलग रहाणाऱ्या वसाहतींचा एक संचच होता. या कारणामुळे आणि त्यांच्या विशिष्ट भागाच्या भौगोलिक स्थितीमुळे, या भागातील अफगाण, त्यांच्यापासून दूर असलेल्या, पश्चिमेकडील बांधवांच्या वाटयास येणारे 'नशीब' व त्यांची धोरणे यात सहभागी होत नसत; तर त्यांच्या वसाहतींच्या पूर्व सरहद्दीपलीकडील औंध—राजघराण्याच्या राजकारणाकडे ते सामान्यतः आकर्षित होत.

## § ३ : फरुखाबादेचा महमद बंगश

आणखी एक अलग असलेला भाग, अफगाणानी व्यापिला होता. हा दुसरा तुटक भाग, वरील भागाच्या दूरच्या नैर्ऋत्य टोकाला म्हणजे मुख्य रोहिलखंडाच्या दक्षिणेला लागून असलेला भाग होय. महमद बंगश नावाच्या एका मोठ्या गुणी व आपले नशीब काढण्यासाठी खटपट करीत असलेल्या यशस्वी सैनिकाने निर्माण केलेले हे राज्य होते. या बंगशने आपल्या आयुष्यात अखेरी, मुघल अमीरउमरावामधील सर्वोच्च पातळीही गाठली. त्याच्या ताब्यातील प्रदेशाचे एकूण क्षेत्र वेळोवेळी खूपच कमीजास्त होत होते पण त्याचा जास्तीत जास्त विस्तार झाला तेव्हा ते सुमारे ७५०० चौरस मैल होते. फरुखाबादचा सबंध जिल्हा, कानपूर जिल्ह्याचा पश्चिमेकडील अर्धा भाग, माइनपुरी व एटाहचा ( ETAH ) जवळजवळ सर्वच प्रदेश, बदाऊन जिल्ह्यातले दोन परगणे आणि शहाजहानपूर जिल्ह्याचे काही भाग व अलीगड आणि इटावा हे जिल्हे, इतका प्रदेश त्यात समाविष्ट झाला होता. त्याचे घराणे पूर्व अफगाणीस्तानमधील, बंगश प्रांतातील (म्हणजे आधुनिक कोहर, कुरम आणि पइवार या भागातील), कागझाई-कुर्लाई वंशातले ( Clan) होते. त्याचा जन्म १६६५ च्या सुमारास माऊ रशिदाबाद (आताचे नाव––काइमगंज––) या, फरुखाबाद जिल्ह्यातील एका खेड्यात झाला. वयाच्या विसाव्या वर्षी तो पठाण लुटारूत सामील झाला. हे लुटारू प्रत्येक वर्षी कटेहरला येत. तेथील स्थानिक हिंदू 'नायक' सतत आपापसात लढत असत. दरवर्षी कटेहरला येणारे हे पठाण लुटारू. या हिंदू नायकामध्ये आपापसात सतत चालणाऱ्या लढायासाठी त्यांच्या पदरी, पैशाच्या मोबदला, भाडोत्री सैनिक म्हणून रहात. काही काळातच या भाडोत्री लुटारूंचा यशस्वी नायक होण्यापर्यंत बंगशने मजल मारली. पुढे १७१३ मध्ये फरुखझिआरने जेव्हा दिल्लीचे तख्त मिळविण्यासाठी प्रयत्न चालविले तेव्हा बंगशने त्याची बाजू घेतली आणि यामुळे पुढे येण्याला त्याला चांगली संधी मिळाली. यानंतर त्याची प्रगती जलद होऊ लागली आणि तिला सीमाच राहिली नाही. साम्राज्यातील पहिल्या प्रतीच्या मनसबदार––नबाब––अशा चढत्या पदावर तो चढला आणि अलाहाबाद, माळवा अशा अतिशय महत्त्वाच्या सुभ्यांवर शाही प्रतिनिधी––सुभेदार––म्हणून त्याची नेमणूक झाली. फरुखाबाद ही त्याची स्वतःची राजधानी असून ती त्याने १७१४ मध्ये वसविली होती व तिचे नामकरण आपल्या पुरस्कर्त्या धन्याचे नावावरून केले होते. १७४३ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यावर, त्याच्या राज्याच्या नबाब पदावर त्याचा मोठा मुलगा काइमखान हा आला. ( Qaim Khan )

"महमदखान हा एक खरोखरीच अतिशय उत्साही व ताकदवान मनुष्य होता. त्याच्या संवयी साध्या आणि सैनिकाला शोभेशाच होत्या. तो नेहमी कपडे वापरी ते जाड्याभरड्या कापडाचे. त्याच्या वाड्यातील मुलाखतीच्या दिवाणखान्यात पसरलेले गालिचे म्हणजे

सामान्य चटयांच्या रांगाच असत. तो कधीही बढाई मारीत नसे आणि त्याच्या वागण्याच्या पद्धतीत शिरजोरपणा दिसत नसे. तो मोठा आतिथ्यशीलही होता. पण.... या एकूण चांगल्या गुणसमुच्चयाना मागे टाकण्याइतके दुर्गुणही त्याच्यामध्ये असलेले दिसतात. महमद क्रूर आणि खुनशी होता. स्त्रियांबाबत, थोरपुरुषाला शोभणार नाही इतका तो विषयासक्त होता." त्याच्या अंतःपुरात फक्त एकच कायदेशीर म्हणजे विवाह केलेली पत्नी होती पण कायदेशीर विवाह न केलेल्या अन्य प्रकारच्या २६०० स्त्रिया होत्या. त्याच्या राज्याच्या पूर्व सरहद्दीपलीकडेच असलेल्या रोहिल्यांच्या राज्यात एकजिनसीपणा व विशिष्ट सामर्थ्य होते, तसे मात्र महमदाच्या राज्यात नव्हते. कारण हे राज्य म्हणजे, त्या प्रदेशाचा धनी आणि त्याची कुळे, फक्त असाच संबंध असलेल्या लोकांचा प्रदेश होता. या लोकांमध्ये आपण एकाच वंशापैकी वा जमातीपैकी असल्याची भावना व त्या अनुषंगाने त्यांच्यातील सर्व प्रमुख नायक आणि त्यांचे आश्रित यामध्ये स्वाभाविकपणे आढळणारा बंधुभाव व गाढ एकोपाही दिसून येत नव्हता. (आर्याविन-फरुख सियार गॅझेटिअरमध्ये, १५७).

## § ४ : अलिमहमद रोहिला-जीवन वृत्तांत (Career)

रोहिलखंडाच्या सरहद्दीजवळील प्रदेशाची माहिती दिल्यानंतर आता आपण खुद्द रोहिलखंडाकडे वळू.

रोहिल्यांच्या सत्तेचा उत्तर हिंदुस्थानातील मुख्य गाभा म्हणजे बरिली ( Barily ) जिल्ह्याच्या नैर्ऋत्य कोपऱ्यातील एक खेडेगाव होते. हे बदाऊन (Badaun ) जिल्ह्याची ईशान्य सरहद्द ओलांडली की पलीकडे लागूनच आहे. आपले नशीब काढण्यासाठी कंदहार प्रांतातून आलेल्या दाऊद नावाच्या एका सैनिकाने, १८ व्या शतकाच्या आरंभी हे संपादन केले होते. त्याच्या बरोबर असलेली धाडसी अफगाणांची टोळी व तो, असे प्रारंभी जमीनदारांच्या व पुढेपुढे त्या प्रांताच्या शाही सुभेदाराच्या नोकरीत रहात. यातूनच दाऊदने आपल्या सत्तेच्या जहागिरीचा, छोटासा पाया घातला. १७२१ च्या सुमारास तो मेल्यावर, त्याचा मानलेला वा दत्तक पुत्र, अलिमहमदखान (हा धर्मांतर केलेला, मूळचा एक जाट मुलगा होय.) त्याच्या आश्रित सैनिकांचा नेता बनला आणि त्याच्याच महत्त्वाकांक्षेचा कार्यक्रमही त्याने स्वीकारला. पुढे लवकरच त्याने आपली अशी, एक साधारण मोठीशी जहागीर बरीली जिल्ह्यात संपादन केली. ती, मुरादाबाद येथील शाही फौजदाराची कधी कधी नोकरी करून आणि बऱ्याच वेळा स्थानिक जमीनदार व जहागीरदार यांना त्यांच्या वतनवाडीतून वा जहागिरीतून हाकून लावून, संपादिली होती. या त्याच्या जहागिरीचे मुख्य ठाणे, बरीली शहराच्या नैर्ऋत्येस १८ मैलावर, बदाऊन जिल्ह्याच्या उत्तर सीमेजवळ असलेल्या अवोनला (Aonla) या खेडे गावी होते.

त्याच्या भाग्याची सुरवात झाली ती, त्याने महमद सालिह नावाच्या, शाही दरबारातील एका खोजाचा (eunuch ) १७२७ मध्ये[१] पराभव केला त्यातून. (ही घटना अवोनलाच्या पश्चिमेस १ मैलावरील मनौना ( Manauna ) या ठिकाणी घडली.) ..........

१ ही तारीख जॉर्ज फोर्स्टरचा 'प्रवास' (जर्नी) या पुस्तकात दिली आहे. [ जर्नी (१) १०५ न] पण हा काही फारसा विश्वसनीय लेखक नव्हे. याच्या मतानुसार हरनंद'चा मृत्यू १७४९ मध्ये झाला. [ (१) १०६ न] (भा.) (या मृत्यू काळाचा संदर्भ यापुढील पृष्ठातील परि. २ शीही आहे.]

या विजयामुळे अलिमहमदाने बळकाविलेली खेडी, पूर्वी महंमद सालिहा याला खंडाने दिली होती आणि यातूनच हा लढा सुरू झाला होता. यावेळी मिळालेल्या लुटीमुळे त्याला आणखी जास्त अफगाण सैनिक आपल्या पदरी ठेवता आले. ज्याला नोकरीत ठेवल्यामुळे यश व लूट मिळण्याची शक्यता दिसेल अशा सेनानायकांना बोलावून आपल्या नोकरीत ठेवणारे, वतनदार—जहागिरदार—उमराव त्या काळी होते.[1] अशा सतत लढायामध्ये गुंतणाऱ्या लोकांना, अलिमहमदसारखा सेनानायक व त्याची पथके आपल्या नोकरीत असावी असे वाटू लागले. सालीहाचा पराभव केल्यानंतर, आपल्याला यापुढे "नबाब" असेच म्हणावे असा हुकूम अलिमहमदाने, उच्च व खालच्या दर्जाच्या सर्वच लोकांना केला, एखाद्या शाही दरबारात सामान्यत: असावेत तसे अधिकारी त्याने नेमले, आणि दिल्लीच्या सम्राटांचाच विशेष अधिकार असा मानला जाणारा गडद लाल वा किरमिजी रंगाचा तंबूही त्याने आपल्यासाठी उभा केला. वजीर कम्रुद्दिन खानाला पैसे चारून, त्याच्या मध्यस्थीने स्वत:च बळी घेतलेल्या सालिहाच्या जागी, महसूल अधिकारी (Revenue Collector) म्हणून, आपल्यालाच नेमल्याचे फर्मान त्याने "दिल्ली दरबाराकडून" मिळविले.

यानंतर सुमारे दहा वर्षांनी सय्यद सैफुद्दिन अलिखान याचा पाडाव करण्यासाठी वजीराने एक मोहिम पाठविली. [सैफुद्दिन हा, एकेवेळी, बादशहाला सिंहासनावर बसवावयाचे व मनमानेल तेव्हा काढून त्या जागी दुसऱ्याला बादशहा बनवावयाचे असे करणाऱ्या (King Makers) व आता मृत असलेल्या दोघा सय्यद बंधूंचा भाऊ होय.] या स्वारीत अलिमहमद सामील झाला व यातून जन्सथ येथे झालेल्या लढाईत, त्याच्या अफगाण पथकाने, बंदुकीच्या अचूक नेमबाजीने सय्यदाला ठार मारले आणि बादशहाच्या मोहिमेचे यश निश्चित केले. या कामगिरीसाठी दिल्लीच्या दरबाराने, नबाब हे पद व नौबत[2] बाळगण्याचा मान असे बक्षीस अलिमहमदाला दिले.

नादिरशहाच्या स्वारीने दिल्ली सरकारला तात्पुरते उद्ध्वस्त केल्यामुळे, इतरांना सत्ता विस्ताराची संधी मिळाली. ही संधी उपयोगात आणण्यामध्ये अलिमहमदाने मुळीच दिरंगाई केली नाही. त्याने आपल्या जहागिरीच्या उजव्या व डाव्या अशा दोन्ही बाजूंच्या प्रदेशावर हल्ले करून ते स्वत:च व्यापले. हे प्रदेश मुरादाबाद जिल्ह्यात असून हा जिल्हा वजीराची लष्करी जहागीर म्हणून होता, आणि त्यावर राजा हरनंद अरोरा हा वजीराचा स्थानिक प्रतिनिधी म्हणून, अधिकारी होता. अलिमहमदाच्या या भागावरील चढाईची वार्ता दरबारात पोहोचल्यावर, रोहिला या रोहिला दरोडेखोराला बाहेर घालवून द्या असे हुकूम, वजीराने हरनंदाला दिले. पण या मोहिमेत, आरल नदीचे काठावरील 'असालतपूर-जराई' खेड्याजवळ, एका रात्रीचे हल्ल्यामध्ये राजा हरनंदाचा पराभव होऊन तो मारला

१ त्या काळी आपल्या अनुयायांची लढाऊ पथके तयार ठेवून त्यांच्यासह, तत्कालीन राज्यकर्ते, जहागीरदार, वतनदार यांच्याकडे, पगार, लूट व असेच अन्य फायदे यासाठी तात्पुरती नोकरी करणारे सेनानायक (Captains) असत. त्यांना मागणीही मोठी होती. हे सेनानायक वरचेवर आपला धनी व आपली नोकरीही बदलीत ती, मिळणारा फायदा हेरून. अशा सेनानायकांना व त्यांच्या पथकांना 'मर्सीनरीज'–भाडोत्री सैनिक–म्हणत. (शिवाय पहा भा. टीप§१)

२ सियार (२) ९२, जी (१) आर (G. I. R.). १२. वायव्य प्रांत गॅझे. ( N. W. P. Gazz. ) (३) ६०५, यानुसार ही लढाई भैन्सी येथे १७३७ मध्ये झाली. जन्सथ हे मीरतच्या उत्तरेला २३ मैलावर आहे आणि भैन्सी जन्सथच्या पश्चिमेस ७ मैलावर आहे. ही दोन्हीही मुजफ्फरनगर जिल्ह्यात आहेत. (पहा : हिंदुस्थान नकाशासंग्रह-ॲटलस-४९ नवी आवृत्ती]

गेला. (१७४१)[१] आणि त्याची सर्व मालमत्ता व त्याचे सर्व युद्धसाहित्य अफगाणानी हस्तगत केले. दूरपर्यंत गाजावाजा होणाऱ्या या यशामुळे, एकाएकी वर चढलेल्या या उपटसुंभ रोहिल्याची साधनसामुग्री आणि कीर्ती अतिशय वाढली, हा प्रदेश त्याच्या पायाशी, असहाय होऊन पडला आणि त्याच्या विजयी निशाणाखाली हजारो अफगाण गोळा झाले. [सियार (२) ९–१०, इमाद ४२, G.I.R. १६, फॉर्स्टर (१) १०६].

राजा हरनंदाचा शेवट झाल्यानंतर अलिमहमदाचे प्रभुत्व सबंध बरीली जिल्हा आणि मुरादाबाद, हरडोई व बदौनचे काही भाग इतक्या प्रदेशावर झपाट्याने पसरले. अशा रीतीने आपल्या धन्याच्या शाही-शासनावर उघड उघड हल्ला करणाऱ्याला आणि वजिराच्या स्वतःच्याच प्रतिनिधीची कत्तल करणाऱ्या बंडखोराला, वजिराने शिक्षाच करावयाला पाहिजे होती. पण याचवेळी हा वजीर व त्याचा प्रतिस्पर्धी इराणीपक्ष, यांचा झगडा सुरू होण्याची वेळ आली होती. या झगड्यात आपल्याला सतत विजयी होणाऱ्या या रोहिल्याची मैत्री व मदत उपयोगी पडेल असे वाटून, या लुटारूला शिक्षा करण्याऐवजी, त्याच्याशी मैत्री संपादन करणेच अधिक बरे असा, या तत्त्वशून्य वजीराने विचार केला. त्याने अलिमहमद रोहिल्याबरोबर मैत्री संपादन करण्याच्या हेतूने देवाण घेवाणीच्या अटीही ठरविल्या. यानुसार वार्षिक खंडणी देण्याचे रोहिल्याने दिलेले वचन त्याने स्वीकारिले, व आपल्या थोरल्या मुलासाठी वधू म्हणून त्याच्या मुलीचा स्वीकार केला. याच्या मोबदल्यात, जबरदस्तीने 'कटेहर' प्रांत म्हणजे रोहिल्यांचा भूप्रदेश बळकावणाऱ्या, या अलिलाच, त्या प्रांताचा बादशहाने नेमलेला कायदेशीर सुभेदार म्हणून 'शाही फर्मान' वजीराने मिळवून दिले. या सर्वाचा एकूण परिणाम, नमूद करून ठेवला आहे (बिजनोर गॅझेटिअर, ३४८) तो पुढील शब्दात... "यावेळी अलिमहमद ही व्यक्ती रोहिल्यांच्या सामर्थ्याचे व सत्तेचे प्रतिक बनली; व प्रारंभी बदाऊन आणि बरीली या जिल्ह्यापैकी काही परगण्यातच असलेली ही सत्ता क्रमाक्रमाने पश्चिमेकडे पसरली. सुमारे १७४०[२] (१७४१) पर्यंत तर त्याने मुरादाबाद जिल्ह्याचाही बहुतेक भाग काबीज केला."

१७४१ आणि १७४८ या काळात त्याने आपण जिंकीत असलेले भाग उत्तरेकडे व पूर्वेकडेही वाढविले, या सत्तेच्या विस्तारामध्ये पिलभिट जिल्हा आणि कुमाँऊचे राज्य, हीही त्याने मिळविली (१७४२) आणि यापैकी कुमाँऊच्या राज्याची तर एका खंडणी देणाऱ्या मांडलिक राज्याच्या दर्जापर्यंत अवनती केली. १७४८ मध्ये त्याने सबंध बिजनोर जिल्हाही मिळविला.

तत्कालिन राजकीय परिस्थिती, त्याचे सामर्थ्य वाढविण्याला फारच पोषक होती. नादिरच्या विजयामुळे पर्शियावरील अफगाण सत्तेचाच तेवढा शेवट झाला असे नव्हे तर या शिवाय त्यामुळे कंदाहार प्रांतातील अफगाण जमातीनाही, नादिरशहाने आपले मांडलिक आणि बेकार बनविले होते. हे अफगाण, लोकांमध्ये, 'रोहिले' अथवा डोंगरी लोक म्हणून ओळखिले जात. बेकार झालेले हे लोक आता चरितार्थासाठी हिंदुस्थानात गर्दी करू लागले. तेथे रोहिलेखंडात पूर्वी आलेले त्यांच्याच जमातीचे लोक, त्यांचे स्वागत करण्यास तयारच होते.

---

१ या संदर्भात याच पोटभागातील परि. ३ मधील १७२७ बाबत टीप पहा. या टीपेतील २ रा संदर्भ याच हरनंदाचे मृत्यूबाबत आहे.

२ ही घटना १७४१ च्या उत्तरार्धातील असली पाहिजे. हरनंद अरोराचा पराभव होऊन तो मारला गेल्यानंतरची (१७४१) ही घटना आहे.

हिंदुस्थानात जात असताना वाटेत खैबर घाटातील आफ्रिडी टोळीवाल्यांपैकी अनेक साहसी लोकही त्यांना मिळत. येणाऱ्या या लोकातून, १७४२ साल उजाडेतो, अलिमहमदाचे हुकमतीखाली, रोहिलखंडात पूर्वीच स्थायीक झालेल्या त्याच्या अनेक देशबांधवांशिवाय, आणखी तीस ते चाळीस हजार अफगाणांचे नवे सैन्य तयार झाले.

## § ५ : रोहिला सैन्याचे लष्करी महत्त्व : रोहिल्यांचा स्वभाव

रोहिल्यांचे सैन्य संख्येने खूप मोठे होतेच, शिवाय त्याची लष्करी रचना व त्यातील सैनिकांचे वांशिक गुणधर्म यामुळे तर, ते आणखी अधिकच बलाढ्य झाले होते. १७४५ मधील, अलिमहमदाविरुद्ध केलेली बादशाही मोहिम स्वतः पहाणाऱ्याने, त्यांच्याबद्दल आपल्या रोजनिशीत लिहिले आहे की, ...."त्याच्या सैन्यातील प्रत्येक सैनिक, मग तो घोडेस्वार असो की पायदळ सैनिक असो, आपल्या बरोबर चापाची बंदूक बाळगतो, दहा व शंभर पायदळ सैनिकांच्या प्रत्येक पथक प्रमुखाचे, स्वतःचे एक लहानसे रंगीबेरंगी कापडाचे केलेले स्वतंत्र निशाण असे आणि त्याचे सैन्य कूच करू लागले म्हणजे ही पथके आपापली निशाणे आपल्यापुढे धरून चालवीत. यामुळे जणूकाय फुलांचा एखादा बगीच्याच त्या सैन्याबरोबर प्रवास करीत आहे असे वाटे." (आनंदराम २६१.)

अठराव्या शतकाच्या सुरवातीपासून हिंदुस्थानातील लढायांच्या पद्धतीमध्ये क्रांती घडून आली होती. औरंगजेबाच्या वारसामधील युद्धात तोफखाना हा निर्णायक घटक होता. पूर्वी आततायी राजपुतांच्या टोळ्या मोठी आरडाओरड वा गलबला करीत शत्रूवर धावून जात किंवा अवजड चिलखते घातलेली मुघल घोडदळ पथके पद्धतशीर चाल करून धडक मारीत आणि आपल्या वाटेत येणारा प्रत्येक अडथळा बाजूला लोटून टाकीत. अशा पद्धतीना सोयिस्कर घटकांच्या, फारच क्वचित व केवळ योगायोगानेच होणाऱ्या मिलाफाचे प्रसंग सोडले तर, या पद्धतींचे लष्करी महत्त्व आता नाहीसे झाले होते व त्या इतिहासजमा झाल्या होत्या. यावेळी बंदुकांच्या वापराबाबत फार झपाट्याने प्रगती झाली होती. नादिरशहाच्या यशामुळे इकडे तिकडे सहज नेता येण्यासारख्या बंदुकधारी पथकांचा वापर करण्याबाबत या वेळेपर्यंत फार जलद प्रगती झाली होती. अशी पथके दोन प्रकारची असत. एक-घोडेस्वारांचे पथक, यांच्या हातात बार ठेचून भरावयाच्या बंदुका[1] (Matchlocks) असून, दुसरे-सांडणीस्वारांचे, या दुसऱ्या प्रकारच्या पथकाजवळ गोल कड्यामधून फिरविता येण्यासारख्या लांबट बंदुका[1] (Swivels) उंटावर ठेविलेल्या असत. ही दोन्ही पथके जलद हालचाल करू शकणारी असून नादिरशहाच्या यशामुळे या दोन्हीही प्रकारच्या पथकांचे बिनतोड सामर्थ्य दिसून आले होते. अशा पथकांच्या फैरी, जर योग्य मार्गदर्शनाखाली वापरल्या, तर त्यांचा फार उपयोग होत असे. अलिवर्दीखानाच्या मोहिमानीही,[2] ही गोष्ट सिद्ध करून दाखविली होती. इतकेच नव्हे तर हलक्या बंदुका वापरणारी व झपाट्याने जाऊन हल्ला करणारी पायदळ पथकेही यावेळी

---

१ बंदुकांचे तीन प्रकार दिसतात :—

(१) बरकंदाजाची हलकी बंदूक. (२) घोडेस्वाराजवळची बंदूक (मॅच लॉक) (३) उंटावरून न्यावयाची लांबट, गोलकडीमधून फिरविता येणारी बंदूक. या सर्वच ठेचून भरावयाच्या व तोंडघाने उडवावयाच्या असत

२ प्रकरण १§१५ व प्रकरण ३ पहा.

यशस्वी ठरली होती. त्याना बरकंदाज फलटण म्हणत. अशा बरकंदाज पलटणीने, एकसाथ हालचाली करीत व आपल्या बंदुकांचा मारा करीत करीत झपाट्याने हल्ला केला तर ही पलटण, जुन्या पद्धतीच्या अतिशय चपळ आणि अधिक मोठ्या घोडदळ पथकाविरुद्धही यशस्वी होत असे, हेही सिद्ध झाले होते, कारण या जुन्या पद्धतीच्या घोडदळ पथकाजवळ जुन्या पद्धतीची तरवार व भाला हीच शस्त्रे असत. या क्रांतीकारी नव्या वास्तवाने १८ व्या शतकाच्या मध्यकाळात हिंदुस्थानच्या इतिहासावर संपूर्ण प्रभाव पाडला आणि या नव्या विशिष्ट युद्धपद्धतीकडे, अफगाण जमातीचा स्वाभाविकपणेच विशेष कल असल्यामुळे, तिने या अफगाणांना एक विशेष महत्त्व मिळवून दिले.

पुढे इंग्रज व हिंदुस्थानी यांच्या लढायामध्ये ज्या गुणाबद्दल अफगाण सैनिक प्रसिद्धीला आले ते गुण आधीच्या या काळीसुद्धा त्यानी दाखविले[१]. बंदुकीचा नेम, ते स्थिरचित्ताने व अचूक मारीत असत. जेथे लढाईच्या हालचाली चालल्या असतील त्या ठिकाणच्या जमिनीच्या स्वाभाविक रचनावैशिष्ठ्यांचा फायदा उठविण्यात तज्ञ, व रात्रीचे हल्ले करण्यात आणि लपतछपत छापे घालण्यातही ते हुषार होते. शिवाय, पायी अतिशय जलद हालचाल करणारे असूनही, त्याचबरोबर, सर्वांनी मिळून योजनाबद्ध एकसाथ हालचाली करण्यात आणि पुढाऱ्याच्या सूचनानुसार आपल्या बंदुकांच्या फैरींची दिशा नियंत्रित करण्यातही ते पटाईत होते. योग्य रीतीने नियंत्रण केलेल्या आणि योग्यक्षणी झाडलेल्या त्यांच्या बंदुकांच्या फैरी, त्यांच्या शत्रूंचे मनोधैर्य हादरून खच्ची करण्याच्या कामी व एकाच तडाख्यात लढाईचा निकाल लावण्याच्या कामी विद्युत्वेगाने व परिणामकारक होत. अफगाण साम्राज्यातील विशिष्ट कुल-पद्धतिमुळे, त्यांच्या पुरुषवर्गाचे, स्वाभाविकपणेच शिस्तबद्ध असलेल्या, लढाऊ टोळ्यात रूपांतर झाले होते. त्यातील सर्व माणसे एकसाथ हालचाली करीत. स्वतःबद्दल काहीही विचार न करता, आपल्या सर्वांचा, असे मानलेल्या एकाच नेत्याच्या आज्ञेनुसार हालचाली करीत. अशाच प्रकारच्या स्कॉटलंडमधील डोंगरी लोकांच्या उदाहरणावरून मेकॉलेने सिद्ध केल्याप्रमाणे या पठाणी लढवय्यांची बरोबरी, कोणतेही भाडोत्री सैन्य वा लष्करी कामासाठी सक्तीने नोंदवून आणलेले सैन्य, करू शकत नसे. आपल्या बंदुकीच्या माऱ्यावरील नियंत्रण, युद्धाबद्दल शिस्तबद्ध उत्साह, आणि व्यक्तीगत बुद्धीचा सदैव जागरूकतेने उपयोग करण्याचे सामर्थ्य याबाबत पठाण सैनिक हिंदुस्थानात आज तर अजोड आहे, आणि या सरसपणात तो त्या काळीसुद्धा, किंचितही कमी नव्हता.

घराण्या घराण्यामधील वा टोळ्या टोळ्यामधील परस्पर भांडणे बाजूला सारून, एकंदर अफगाण जमातीतील एकजिनसीपणाची व एकीची जाणीव ठेवण्याची वृत्ती, या लोका-मध्ये जागृत असते. आपल्या दीर्घ इतिहासामध्ये काही वेळीच राजपूत एकत्र आले पण त्यांच्या-पेक्षा कितीतरी जास्त वेळा व जास्त परिणामकारकपणे पठाणांच्या निरनिराळ्या टोळ्या आपल्या समान शत्रूला विरोध करण्यासाठी एकत्र आल्या आहेत. त्यांच्या सबंध जमातीच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून त्यांना आवाहन केले की, अती सहजपणे व जलदीने त्यांचे सह-

---

१ १८५२ ची वायव्य सरहद्द ( N. W. F. ) मोहिम चालू असताना सर कॉलिन कँपबेल यानी अफगाणाबाबत लिहिले आहे की, "त्यांच्या झुंडीच्या झुंडी मुसंडी मारून, वाटेत आढळणाऱ्या जमिनीच्या प्रत्येक नैसर्गिक वैशिष्ठ्याचा, फायदा घेत घेत, पुढे येत होत्या. यावरून दिसते की, खाचखळगे, ऊंचवटे आणि थळी यानी भरलेल्या प्रदेशात, कोणत्याही एकएकट्या स्वतंत्र लढाईमधील कौशल्याबाबत फार थोडे सैनिक त्यांची बरोबरी करू शकतील" [ Life (१) २७८].

कार्य मिळते. हे पठाण आपल्या स्त्रियाना फार मान देतात. एखाद्या नायकाच्या पत्नीने अडचणीत सापडलेला आपला पति वा मुलगा यांच्या संरक्षणासाठी मदत करण्यास या, अशा विनंतीचे प्रतिक म्हणून, आपला बुरखा, आपल्या जमातीच्या लोकामध्ये फिरविला तर तिच्या बाजूने शस्त्र उचलण्यात माघार घेण्याइतका कोणताही पठाण स्त्रीदाक्षिण्याला पारखा नसे या शिवाय रहाणीत ते साधे आणि काटक होते. हिंदुस्थानच्या सुपीक प्रदेशात स्थायीक होऊन तेथील ऐषआरामामुळे पर्शिअन आणि तुर्क लोक नरम बनले होते तसेही ते नरम झाले नव्हते; वा अखेरच्या राजपूत काळातील राजपुतांप्रमाणे मादक पदार्थांच्या व्यसनात गुंतून स्वतःचा नाशही त्यांनी करून घेतलेला नव्हता.

अशा या अफगाण जमातीच्या लष्करी टोळयांचा दोषमात्र असा की कोणत्याही दीर्घ मोहिमेची योजना आखून त्यानुसार ती चालविणे आणि त्यासाठी अवश्य ती तयारी करणे हे त्यांना शक्य नसे. प्रत्यक्ष हल्ला झालेल्या युद्धभूमिपासून दूर असले म्हणजे ते दरोडेखोरापेक्षा कोणत्याही प्रकारे चांगले नसत. शिवाय व्यवहारचातुर्य आणि विधायक मुत्सद्देगिरी यातही ते उणे वा अपयशीच असत. हे त्यांचे दोष, त्यांनी शस्त्रबळाने मिळविलेला फायदा, आत्मसात व दृढ करून आणखी वाढविण्याच्या कामात नेहमीच आड आलेले आहेत. याचप्रमाणे त्यांच्या या राजकीय दोषामुळे, त्यांची लष्करी उपयुक्तता निरुपयोगी ठरली आहे. म्हणूनच अफगाण हे नेहमीच मोठे कणखर व चिवट असे शत्रू असले तरी, साम्राज्य निर्माते मात्र कधीच झाले नाहीत.

## § ६ : रोहिलखंडातील नैसर्गिक गढया व रोहिल्यांची कारभारव्यवस्था

रोहिलखंडात वसाहत केलेल्या अफगाणाना दोन मोठे मौलिक स्थानिक फायदे होते. त्यांची बळकट ठाणी बांबूच्या दाट, स्वाभाविक कुंपणानी वेढलेली असून त्या दाट पट्ट्यामधून कोणतेही घोडदळ वा तोफखाना पथक आत शिरू शकत नसे. त्यातून पायदळ पथकानाही यायचे झाले तरी, मुद्दाम बांबू तोडून तयार केलेल्या पायवाटेनेच येणे शक्य होई. या भागातील हे बांबूचे मेढे कोट, पुढे १८५७ च्या "शिपायांच्या उठावा" नंतरही (ले. बंडानंतरही) काही काळ कायमच राहिले. दुसरी मौलिक फायद्याची परिस्थिती म्हणजे त्यांच्या या प्रदेशाच्या उत्तर सरहद्दीला लागूनच असलेला व टेकडयांचा बनलेला 'तराई' नावाचा भूपट्टा. सालवक्षांच्या दाट जंगलानी व प्राणघातक साथींच्या रोगानी व्यापलेला हा दलदलीचा पट्टा होता. मैदानावरील लढयात जर एखादा पराभव झालाच तर या पट्ट्यामध्ये त्यांना सुरक्षित जागा मिळे. असले हे नैसर्गिक अडथळे ओलांडून अथवा इथल्या हवेत फार काळ टिकाव धरून कोणताही शत्रू त्यांचा पाठलाग करू शकत नसे.

अफगाण जमातीपैकी इतर टोळयांप्रमाणेच, रोहिले हेसुद्धा क्रौर्य[१] सूडबुद्धी आणि विश्वासघात या दुर्गुणापासून, व्यक्तीचा संबंध येईल तेव्हा मुक्त नव्हते. पण 'राज्यकर्ते'

१ अहमदखान बंगशने अलाहाबाद किल्ल्याला घातलेल्या अपयशी वेढयाचे (जानेवारी-एप्रिल १७५१) अखेरी, त्याच्या अफगाण शिपायांनी, काहीही संरक्षण नसलेल्या आणि काहीही त्रास न देणाऱ्या अशा अलाहाबाद शहराला आग लावली ती खुल्दाबाद दरवाज्यापासून ते किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत. ते शहर लुटले आणि उच्च पदस्थ व उच्चकुलीन ४००० स्त्रिया बरोबर नेऊन आपल्या कैदेत ठेवल्या. शेख अफझल अलाहाबादीचा 'दाइरा' आणि महल्ला दरियाबाद या दोनच वसाहती या क्रौर्यातून त्यानी वगळल्या आणि याचे कारण त्यातील रहिवासी अफगाण होते हे होय. [ सियार (३) ३४].

या दृष्टीने याबाबत स्थिती वेगळी होती. 'राज्यकर्ते' म्हणून असतील तेव्हा, सोन्याची अंडी देणारी कोंबडी मारण्यामध्ये काही शहाणपणा नाही हे त्यांच्या लक्षात असे. अनधिकृत लोकाकडून होणाऱ्या जुलमापासून, आपल्या ताब्यातील प्रदेशामधील शेतकरी व व्यापारी यांचे संरक्षण ते करीत आणि फक्त आपणच वसूल करावा म्हणून राखून ठेवलेल्या प्रदेशात कोणी इतर लुटारू येतील तर त्यांना हाकलून देण्यास ते उत्सुक असत. याबाबतीत मराठ्यांशी तुलना केली तर या अफगाणामध्ये, सन्माननीय वेगळेपणा दिसून येतो. मराठे आले की प्रजेकडून चौथ उकळीत आणि निघून जात. ज्या प्रजेला, चौथ वसुली करून त्यानी लुबाडले आहे, ज्यांच्यावरील नित्याचा प्रस्थापित राज्यकारभार त्यानी उधळून लावला आहे, त्या प्रजेचे संरक्षण करण्याच्या नैतिक जबाबदारीची जाणीवही न ठेवता ते निघून जात. रोहिले नायक यापेक्षा वेगळे होते. आपल्या प्रांतातील महसूल गोळा करण्याचे काम आपल्या हिंदु मुख्याधिकाऱ्यांकडे—दिवाणाकडे—आणि आपल्या कौटुंबिक जमाखर्च व पत्रव्यवहार हिंदु सेक्रेटरीकडे—मुन्शीकडे—ते सोपवीत. हे अधिकारी सामान्यतः, व्यवहाराबाबत अतिशय कार्यक्षम आणि आपल्या धन्याच्या हितसंबंधाबाबत विश्वासू असत. परिणामतः एखादा प्रदेश जिंकून आपल्या राज्याला जोडण्याची दांडगाईची, हिंसक कृती एकदा संपली की नंतर मात्र राज्यकर्ते आणि प्रजा या दोघांचीही त्यांच्या राज्यात भरभराट होई.[१]

## § ७ : अलिमहमद रोहिल्याविरुद्ध बादशहाची मोहीम

१७४४ मध्ये सफदरजंगाला बादशहाने मिर-आतिष या पदावर नेमले होते.[२] यावेळी निजाम-उल-मुल्क हा शाही सैन्याच्या प्रमुख पदावर–मिरबक्षी या पदावर–होता पण प्रत्यक्षात तो नामधारी मुख्यच होता. दिल्लीत न रहाता तो दूर दक्षिणेत १७४० सालापासूनच रहात असून त्याने आपला मुलगा गाझी-उद-दिन पहिला याला दरबारातील आपला प्रतिनिधी म्हणून ठेवले होते हेच याचे कारण होते. या परिस्थितीत मिर-अतिश या पदामुळे सफदरजंग हाच, शाही सैन्याचा प्रत्यक्षात कार्यकारी प्रमुख झाला. या पदावर आल्यावर लष्करी कीर्ती मिळविण्याच्या उद्देशाने, त्याने स्वतःच्या नेतृत्वाखाली एक मोहिम काढण्याची योजना आखली. दिल्ली येथे वर्चस्व मिळविण्याच्या आपल्या मार्गातील सर्प म्हणजे रोहिले खंडातील अफगाण होत. असे त्याला वाटे. यामुळे अलिमहमद रोहिल्याला लगाम घालण्यासाठी, युद्ध करावयाला मंजुरी देण्याबाबत, त्याने बादशहाचे मन वळविले. या मंजुरीबाबत वजीराचा[३]– सल्ला घेतला नव्हता कारण तो, बंडखोर रोहिला अलिमहमद याचाच पक्षपाती होता. असे लोकामध्ये उघडउघड मानले जात असून शिवाय वैवाहिक संबंधातून तो त्याचा

१ मद्रासचा एक मुलकी नोकर (सिव्हिल सर्व्हंट जॉर्ज फॉस्टर हा एक "जॉर्जिअन व्यापारी" या मिशाने रोहिलखंडात प्रवास करीत होता, त्यावेळी त्याने फेब्रुवारी १७८३ मध्ये लिहिले आहे ते असे.... "आपल्या राज्यकारभाराच्या हितावह पद्धतिमुळे रोहिल्यांनी आपल्या प्रदेशात समृद्धी आणि आपल्याबद्दल आदर, ही निर्माण केली आहेत........देश दाट वस्तीचा आणि संपन्न बनविला आहे.".... आणि तो पुन्हा लिहितो...... "या नायकाच्या (फैजुल्लाखानाच्या) सर्वच प्रदेशात, शेतीला उत्तेजन दिल्यामुळे आणि उद्योगी राज्यकर्त्याकडून मिळालेल्या मदतीमुळे चांगले फायदे झाल्याचे दिसून येते. भोवताली खूपच पसरलेली धान्यशेती असलेली दाट वस्तीची खेडी, या प्रदेशात सगळीकडे दिसतात." [प्रवास, (१) ९८–९९].

२ प्रकरण १ § विभाग १६ पहा.

३ यावेळी कमरूद्दिन हा वजीर होता. पहा :–प्रकरण १ §१४ §१६.

नातेवाईकही होता. पण हे युद्ध एकदा सुरू झाल्यावर सभ्यता वा उचित व्यवहार या दृष्टीने, बादशहाने मंजूर केलेल्या या मोहिमेमध्ये गैरहजर रहाणे वजीराला शक्य नव्हते. या परिस्थितीत त्याचे वर्चस्व टाळण्यासाठी, या स्वारीचा औपचारिक व दर्शनी प्रमुख म्हणून, सफदरजंगाने बादशहालाच बरोबर घेतले. [आशब (२) ४२६].

महमदशहाच्या या रोहिला मोहिमेमुळे (१७४५) शाही सरकाराचा गाभाच पूर्णपणे सडलेला आहे आणि त्याची लष्करी यंत्रणाही निरुपयोगी बनलेली आहे हे वास्तव उघडे पडले. हे युद्ध शेकडो लढायात जय मिळवीत आलेले, कसलेले सैन्य बरोबर घेऊन येणाऱ्या, नादिरशहासारख्या एखाद्या परक्या स्वारी करणाराबरोबर नव्हते, की एखाद्या मोठ्या, सरंजामशाहीतील अमिराच्या, व्यवस्थित रचना केलेल्या सैन्याविरुद्धही नव्हते. ते एका लहानशा बंडखोराविरुद्ध होते. शिवाय हा बंडखोर तर प्रथम, भाडोत्री सैनिकांच्या टोळ्यांपैकी एक अशा रीतीने आपले जीवन सुरू केलेला साधा शिपाई असून, आजही स्वतःच्या जमातीपैकी खेडुत सैनिकांचाच फक्त पाठिंबा असलेला असाच होता[१].

तरीही या मोहिमेवर, खुद्द बादशहा, त्याचा वजीर आणि स्वतः मुख्य सेनापति-मिरबक्षी—अशांच्या नेतृत्वाखाली साम्राज्याचे सर्व सैन्य निघाले. ही मोहीम तीन महिने चालूनही त्यातून यश मिळाले तेही नुसतेच वरवरचे आणि क्षणिक होते. शिवाय ते सामर्थ्याच्या जोरावर मिळविण्यापेक्षा शत्रूचे मन वळवूनच मुख्यतः मिळविले होते. या वेळच्या नेत्याना चेतविणारा त्यांच्यामधील अंधस्वार्थ आणि अक्कलशून्य वेडा मत्सर, हे त्यांचे दुर्गुण, स्पष्ट दिसून आले. शिवाय अधिकाऱ्यासकट सर्वच थरातील सैनिकामध्ये असलेले ऐषआरामाबद्दल लाजिरवाणे प्रेम व आपल्या कर्तव्याच्या जाणिवेचा संपूर्ण अभाव, असे दुर्गुणही, या मोहिमेमुळे सर्वांच्या नजरेसमोर उघडे पडले. या वास्तवाची माहिती पुढील पिढ्यासाठी चिरस्थायी करून ठेवण्याचे काम केले आहे ते, "आनंदराम मुखलिस" याने रसभरित शैलीत लिहिलेल्या या मोहिमेच्या 'दैनंदिनीने'. ( Diary of the expedition. )

ही मोहिम दिल्लीपासून दोआबामध्ये फक्त १२० मैलांचीच होती. तिच्यामध्ये साम्राज्याची सर्व लष्करी शक्ती सामील झाली होती आणि क्वचित व दूर अंतरावर होणारे तोफांचे आवाज याशिवाय अन्य प्रत्यक्ष लढाईही नव्हती. पण असे हे क्वचित व लांबून ऐकू येणारे तोफांचे आवाजही या मोहिमेच्या प्रमुखाची झोप उडवीत! अशा या मोहिमेतील मामुली हालअपेष्टांबाबत, मोहिमेच्या मुख्याची—उच्चपदस्थ खादाड शौकिनाची-करुणाजनक विव्हळणी ऐकली की, हसावे का रडावे हे आपल्याला कळत नाही! इतर अमीर-उमराव—सरदार हेही अशा बादशहाइतकेच नाजूक आणि मनाने दुर्बल होते. अशा राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालील साम्राज्याने अस्तित्वात रहाण्याचा आपला हक्क आधीच गमावला होता. या युद्धाची एकूण व्यवस्था व नेतृत्व, सफदरजंगाकडे, त्याच्या विशेष अखत्यारीतील कामगिरी म्हणून सोपविलेली असून, हे युद्ध त्याच्याच सल्ल्यानुसार, आणि ते वजिराच्या धोरणाविरुद्ध असूनही, हाती घेतले होते. यामुळे आरंभापासूनच वजीर आपल्या तंबूत एकटाच, दुर्मुखलेल्या स्थितीत किंवा आपल्या प्रतिस्पर्ध्याला येणाऱ्या अडचणी व त्याची होत असलेली गडबड, धांदल आणि पिछेहाट, फक्त यातच आनंद मानीत बाजूला राहू लागला.

---

१ "यावेळी बादशहाची मानखंडना झाली ती, त्यांच्या सरदारांना, कांही थोड्याच खेड्यावरील या तालुकदाराचाही मोड करता आला नाही म्हणून!" आनंदराम पृ. २५५.

१५ फेब्रुवारी १७४५ ला, दिल्ली सोडल्यावर महमदशहाने, तिच्याच परिसरात 'लोणी' (Loni) येथील 'फऱ्हात-अफझा' बागेत १८ दिवस फुकट घालविले (दिल्लीच्या पूर्वेस, नदीपलीकडे.) उत्तर दोआब (गंगा-यमुनेचा) भागातील भयानक उन्हाळा जवळ येत होता. या उन्हाळ्याबरोबर वाळूची वादळे, चटके देऊन फोड आणणारे उष्ण वारे आणि कोरडे पडणारे पाणवठे, या अडचणी येणार होत्या, तरीही ठरविलेल्या ठिकाणापर्यंत पोहोचून हाती घेतलेली मोहीम झटपट संपविण्यासाठी काहीही प्रयत्न मोहिमनियंत्रकानी केले नाहीत. प्रत्यक्ष मोहिमेवर निघण्याला त्याने, ५ मार्चपर्यंत सुरवात केलीच नाही. ५ मार्चला खरी सुरवात केल्यावरही या सैन्याने नव्हे, तंबूच्या चालत्याहलत्या या शहराने, सावकाश रमतगमत आणि कंटाळवाणे असे कूच चालविले. वाटेत वरचेवर व दीर्घ मुक्काम करीत करीत शेवटी एकदा १४ मेला, म्हणजे प्रथम दिल्ली सोडल्यापासून पूर्ण ३ महिन्यानी, बानगढ या शत्रूच्या बळकट ठिकाणापासून सुमारे आठ मैलावर, बादशहाची स्वारी येऊन पोहोचली! हे ठिकाण तर, सपाट मैदानावरून सरळ रेषेत येणाऱ्या रस्त्याने दिल्लीपासून फक्त ११० मैलावर असून, ओलांडता येण्यास कठीण अशी एकही नदी वाटेत नव्हती! अशी ही शाही मोहिमेची वाटचाल होती!

या मोहिमेत शत्रूविरुद्ध सैन्याने दाखविलेली आपली गुणवत्ताही, या शाही थाटात चाललेल्या मोहिमेला शोभण्यासारखीच होती! ही गोष्ट "आनंदरामाने" लिहून ठेवलेल्या दैनंदिनीवरून वारंवार सोदाहरण दिसून येते. ही उदाहरणे पहा:

"३ मे..... आज दिवसभर सोसाट्याचा वारा वहात आहे. छावणीतील अनेक लोक, निरनिराळी निमित्ते काढून गुपचूप दिल्लीला गेले." (पृ. २४५)

"१६ मे.... बानगढवर हल्ला करण्यासाठी, काईमजंग (Qaimjang), घोड्यावरून निघतो पण ३ मैल वाटचाल झाली नाही तोच वाटेत एका झाडीत थांबला, नंतर गाड्या पाहिजेत म्हणून, सूर्यास्तापूर्वीच, छावणीत परत आला. या काळात चिलखते घातलेल्या त्याच्या सैनिकांच्या अंगाची, उष्णतेमुळे आणि पाणी न मिळाल्याने लाही लाही झाली आणि त्यावर फोड उठले." [1] (पृ. २५३).

"१८ मे: शाही सैन्यातील सेनापती, छावणी बाहेर बानगढच्या दिशेने थोड्या अंतरावरील मदानापर्यंत कूच करतात, तेथे थांबतात, विहीरी खणतात, तोफांचे मोर्चे उभे करतात, बानगढवर तोफा डागतात—. पण यातून काहीही साधले नाही. अर्थातच, युद्धाच्या दृष्टीने खरोखरी काही कार्य करावे असे या सरदारांच्या मनातच नव्हते हे उघड आहे." (पृ.२५५).

"२० मे. (शाही छावणीच्या समोरच) सुमारे दोन मैलावर खंदक खणले. बानगढबरोबर गोळागोळी झाली. सायंकाळी खंदकाजवळील आपल्या तंबूत सरदारांनी माघार घेतली." (पृ. २५७).

## § ८ : रोहिला नायकाबरोबर तह करण्यात आला

२० मे रोजी रात्री, शत्रूनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला पण तो बादशाही तोफखान्याने परतवून लावला. तथापि आता एखाद्या महिन्याभरातच पावसाळा सुरू होण्याची

१ हेही पहा व तुलना करा:... "खंदकातील सैनिक धुळीने इतके भरले होते की ते संन्याशांच्या जथ्याप्रमाणे दिसत होते. १९ मे" (पृ. २५६).

अपेक्षा होती. त्यावेळी नद्यांना पूर येऊन बादशाही छावणीचा अन्नपुरवठाच तुटणार होता आणि बानगढला तर अद्याप स्पर्शही झाला नव्हता वा काहीच धक्का बसला नव्हता. या परिस्थितीत, आपल्या राजधानीकडे लवकर परतता यावे म्हणून अलिमहमदबरोबर तह घडवून आणावा असे, वजिराने बादशहाचे मन वळविले. रोहिल्यांच्या नायकाने, आपण बळकावून घेतलेल्या लष्करी जहागिरी, बादशहाच्या नव्या अधिकाऱ्याच्या (फरीद-उन्-दिन्-खान,–मुरादाबादेचा शेख अजमतुल्लाखान, याचा मुलगा–) ताब्यात देण्याचे आणि बानगढची तटबंदी पाडून टाकण्याचे मान्य केले (२३ मे). यानंतर काही काळानेच या रोहिला नायकाला, चार हजारी मनसब देऊन, बादशहाचा सर्रहिंद येथील फौजदार म्हणून, तिकडे पाठविले. पण त्याच्या निष्ठेबाबत जामीन म्हणून त्याच्या दोन मुलांना मात्र दरबारात ठेवून घेण्यात आले.

या व्यवस्थेनंतर लगेच, या लज्जास्पद मोहिमेवरून, बादशहा आणि त्याच्या सैन्याने दिल्लीला परतण्यासाठी घाईने प्रवास सुरू केला. या परतीच्या प्रवासात, त्यानी मोहिमेवर पुढे जातेवेळच्या प्रवासापेक्षाही जास्त हाल सोसले ते वादळी वारे, मोठा पाऊस, चिखलाने भरलेले रस्ते आणि पुराने भरून वहाणाऱ्या नद्या यांच्यामुळे! या परतीच्या प्रवासाला २५ दिवस लागले.

## § ९ : रोहिलखंडातून बादशाही सत्तेचे उच्चाटन

फरुखाबादेचा अधिपती महमदखान बंगश १७४३ मध्ये मृत्यू पावला आणि त्याच्या तख्तावर त्याचा वडील मुलगा काइमखान (Qaim Khan) हा बसला. हा काइमखान उत्तम सैनिक असून खिलाडू वृत्तीचाही होता पण महत्त्वाकांक्षी जीवन जगण्याच्या दृष्टीने पाहिल्यास धार्मिक वृत्तीच्या आहारी, नको इतका तो गेलेला होता. शिवाय बंगश घराण्यातील 'नायक' हे बादशाही सरकारचे, बऱ्यापैकी राजनिष्ठा असलेले नोकर असून शाही सरदारामध्ये, त्यांना कायदेशीर स्थानही होते. रोहिल्याचा पुढारी अलिमहमद हा मात्र अशा बंगश जहागिरदारापेक्षा, याबाबत निराळाच होता. रोहिल्यांच्या तुलनेने बंगशांची सत्ता अधिक मान्यता असलेली होती, त्यांच्या प्रदेशात अधिक स्थैर्य होते आणि त्यांचा महसूल अधिक वक्तशीर होता. यामुळे काइमखानाने दिल्ली दरबाराला काहीही त्रास दिला नाही उलट त्याला निष्ठापूर्वक बऱ्याच वेळा मदतही केली, आणि तो जिवंत असेतोपर्यंत फरुखाबाद जिल्हा शांत राहिला.

अलिमहमद याने बळकावून घेतलेली खुद्द रोहिलखंडामधील सत्ता, त्याला मे १७४५ मध्ये बादशहाने केलेल्या क्षमेच्या अटीनुसार, रद्द करण्यात आली होती. त्याने पूर्वी जबरदस्तीने घेतलेल्या जहागिरी त्यांच्या आधीच्या कायदेशीर मालकांचे ताब्यात द्याव्यात असे हुकूम दिलेले होते. पण असे हुकूम देण्याचे काम, ते प्रत्यक्ष अमलात आणण्यापेक्षा सहज करता आले. अलिमहमद खोडसाळ कारवाया करीत असलेल्या प्रदेशातून, आता त्यालाच दूर करून प्रथम काही महिने दिल्लीला थांबवून ठेवले होते. पुढे त्याला सर्रहिंदचा फौजदार म्हणून तिकडे दूर पाठविले आणि याचबरोबर, त्याच्या चांगल्या वर्तणुकीचे जामीन म्हणून त्याच्या दोघा प्रौढ मुलांना दरबारातच ठेवून घेतले, हे सर्व खरे पण यामुळे एका बलाढ्य, सत्ता बळकावणाऱ्या व्यक्तीच्या कारभाराऐवजी रोहिलखंडामध्ये अराजक मात्र पसरले.

यावेळी बरीलीमध्ये "सियार-उल्-मुताख्खरीन" चा लेखक स्वत: हजर होता. त्याने या ग्रंथात वरील संदर्भात नमूद केले आहे की—"हजारो अफगाण लोक तेथे रहात होते. तेथे आपले पाय एकदा रोवल्यावर ते तेथील जमिनीचे मालकच बनले आणि त्यांनी दुसऱ्या कोणालाही त्या भागावर सत्ता चालविणे व कारभार करणे अशक्य केले." [सियार-उल्-मुताख्खरीन, (३) २०].

बरीली आणि इतर १७ महाल हे जहागीर म्हणून पूर्वी निजामाला दिले होते; पण या भागात अफगाण लोकांचे वर्चस्व निर्माण झाल्यामुळे आता बराच काळ निजामाच्या ताब्यातून ते निसटले होते. निजामाचा मोठा मुलगा गाझिउद्दीन फिरुझजंग हा, यावेळी दिल्लीच्या दरबारात त्याचा प्रतिनिधी म्हणून होता. त्याने हिदायत अलिखान (सियारच्या लेखकाचा पिता) याला या जहागिरीचा व्यवस्थापक म्हणून १७४६ मध्ये पाठविले. या नव्या महसूल अधिकाऱ्याच्या हाती असलेली साधने फार अपुरी असून, त्याने ज्या प्रजेवर अधिकार चालवावयाचा होता ती अफगाण प्रजा मात्र संख्येने मोठी आणि वृत्तीने बंडखोर होती. यामुळे या नव्या अधिकाऱ्याचे नियोजित काम अतिशय अवघड होते. याचवेळी या भागामध्ये, हीच जहागीर, पूर्वीच ज्याला दिली होती अशीही एक व्यक्ती असून ती स्वाभाविकच रोहिल्यांची शत्रूच होती. पण तिचा या नव्या अधिकाऱ्यालाही, एक प्रतिस्पर्धी म्हणून, मत्सरामुळे विरोधच होता. (भा. ही व्यक्ती म्हणजे कुत्व-उद्-दिन ही होय.... याची माहिति पुढील परिच्छेदात आहे). या आणखी एका वास्तवामुळे, हिदायत या नव्या अधिकाऱ्याचे स्थान जास्तच गुंतागुंतीचे झाले होते.

लखनौच्या शेखजादा कुटुंबापैकी, शेख अझमतुल्लाखान याने फरुखसियारच्या कारकीर्दीपासून ते १७३७ मध्ये आपला मृत्यू होईपर्यंत, शाही दरबाराने नेमलेला, रोहिलखंडाचा फौजदार म्हणून काम केलेले होते. मुरादाबाद येथे त्याचे मुख्य ठाणे असे. या मुदतीतील काही काळ, त्याचा मोठा मुलगा—मुइन-उद्-दिन—याने बरीलीचा फौजदारी—न्यायाधीश (मॅजिस्ट्रेट) म्हणून काम केले होते. अलिमहमद रोहिल्याने, आपल्या तरुणपणी, म्हणजे तो फारसा कोणाला माहीत नव्हता अशा वेळी या दोन्हीही शेख अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक सैन्यपथकात 'जमादार' या छोट्याशा पदावर राहून, त्यांची नोकरी केली होती. अजमतुल्लाच्या मृत्यूनंतर रोहिलखंडाचा प्रमुख शासक (गव्हर्नर-फौजदार) हे पद त्याच्या कुटुंबातून जाऊन ते प्रथम मिर अहमदखान या दुसऱ्याच व्यक्तीकडे आणि नंतर अलिमहमद याकडे गेले. (भा. हेच प्रकरण § ४ पहा). पुढे १७४५ मध्ये अलिमहमदाला काढून टाकल्यावर हे पद पुन्हा अजमतुल्लाच्या कुटुंबात, त्याचाच दुसरा मुलगा फरिद्-उद्-दिन याच्याकडे देण्यात आले. पुढे हिदायत अलिखानाला बरीलीचा शासक म्हणून गाझिउद्दिनाने पाठविले त्यावेळी फरीदचा पुतण्या (मुइन या पहिल्या मुलाचा मुलगा असावा) शेख कुत्व-उद्-दिन मुरादाबादेपासून १३ मैलावर असलेल्या "चाजलाइत" (Chajlait)[१] या आपल्या मातीच्या किल्ल्यात, मोठ्या दारिद्र्यात रहात होता. हा भाग बळकाविणारा रोहिला आता बाजूला झाल्यामुळे हे क्षेत्र उघडे पडले होते. या परिस्थितीत आपल्या कुटुंबाची पूर्वी असलेली वतनदारी आणि

१ सियार (३) २१ मध्ये या नावाचे स्पेलिंग (वर्णविन्यास) – Chachhat – "चछात" असे वापरले आहे, हे चूक होय असे मला वाटते. इमाद ३५ प्रमाणे याच्या कुटुंबाचे घर "अमेथी" Amethi (औधमधील सुलतानपूर जिल्ह्यात) येथे होते.

वर्चस्व परत मिळवावे अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून हिदायत अली, बरीलीला आल्यावर कुत्वने त्याच्या कामात अडथळे आणले. पण हिदायत मोठ्या चातुर्याने वागला; त्याने सामर्थ्य व डावपेच दोन्हीही उपयोगात आणली आणि चाजलाइतच्या छोट्या किल्ल्याला वेढा घालून कुत्वला वश करून घेतले. याचबरोबर रोहिला जमातीच्या लोकांवर ताबा ठेवता यावा म्हणून त्याने निरनिराळ्या खेड्यातील त्यांच्या प्रमुख नेत्यानाही आपल्या नोकरीत घेतले. यातून तयार केलेल्या पूरक सैनिकी तुकड्यांचा प्रमुख, पिर अहमद रोहिला (अफगाणांचा एक पिरजादा) हा होता. पण लवकरच हा पिरजादा आपल्याला नोकरीवर ठेवणाऱ्या मालकावर उलटला. तो कडवा सुन्नी आणि हिदायत अली हा शिया होता, हे याचे अंशतः कारण होते. पिर-अहमदाच्या हाताखाली यावेळी १७०० लोकांचे पथक होते. हिदायताशी झालेल्या पहिल्याच चकमकीत त्याचा हिदायतने पराभव केला हे खरे पण हे पथक, बरीलीच्या या नव्या अधिकाऱ्याला–हिदायतला सतत विरोध करणाऱ्या अफगाण सैन्याचे बीजच होते असे लवकरच सिद्ध झाले.

हिदायतने या पथकाचा जरी प्रथम पराभव केला तरी, पुढे १७४८ च्या आरंभी परिस्थिती त्याच्यावर उलटली. अब्दालीने लाहोर जिंकले असून, दिल्लीवर चाल करून येण्याचा त्याचा विचार आहे अशी, पहिलीच बातमी मिळाल्याबरोबर, अलिमहमद रोहिला याने सरहिंदमधील आपली अधिकाराची जागा सोडली[1] (फेब्रुवारीच्या मध्याला) आणि आपले सर्वच्या सर्व अफगाण सैन्य बरोबर घेऊन तो रोहिला खंडाला परतला. लगेच तेथील त्याच्या टोळीवाल्यांनी आपले नांगर बाजूला सारले, आपल्या तोड्याच्या बंदुका हाती घेतल्या आणि हजारोनी येऊन, ते त्याला मिळाले. या मोठ्या बलाढ्य सैन्याच्या सहाय्याने त्याने महिन्याभरात, कायदेशीरपणे नेमलेल्या जहागिरदारांच्या अधिकाऱ्याना या जिल्ह्यातून हाकलून दिले, आपली सत्ता पुन्हा स्थापिली ; आपले मॅजिस्ट्रेट (कोतवाल) पुन्हा नेमले आणि गंगानदी ओलांडून बिजनोर व मुरादाबाद जिल्ह्यातही प्रवेश केला.

अशा रीतीने सबंध राष्ट्रानेच[2] शस्त्र उगारल्यामुळे, त्याच्याविरुद्ध हिदायत अलीला टिकाव धरता आला नाही. बरीलीपासून वीस मैलावर अलिमहमद चाल करून आला असताना, हिदायतने बाळगलेल्या भाडोत्री अफगाण सैनिकांनी त्याच्याच विरुद्ध उठाव केला. आपल्या पगाराची बाकी मिळविण्यासाठी त्यानी बरीली येथील त्याच्या घराला वेढा घालून त्याला अडकवून ठेवले. तेव्हा त्याने या सैनिकांची राहिलेली बाकी देऊन टाकली व आपली बहुतेक मालमत्ता सोडून देऊन तो दिल्लीकडे परत फिरला. अशा रीतीने त्याने आपली यावेळी सुटका करून घेतली (एप्रिल मध्याला). पण या वेळेपर्यंत तिकडे बादशहा महमदशहा मरण पावला होता, आणि यानंतर नवा बादशहा सिंहासनावर स्थिर होण्यापर्यंतच्या मध्यंतरात सगळीकडे गोंधळ व गैरव्यवस्था निर्माण करणाऱ्या शक्ती मोकाट सुटल्या होत्या. (मुघल साम्राज्यात नवा बादशहा गादीवर येण्याचे वेळी असेच घडत असे). यातून "पूर्वी

१ (G.I.R.) गु-इ-र २४ यामध्ये अधिकारपद सोडून जाण्याच्या या घटनेबाबत, संयुक्तिक वाटेल असे कारण देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार अलिमहमद, अब्दालीला मिळेल, तेव्हा अशी संभाव्य घटना आधीच थांबवावी म्हणून बादशहानेच त्याची कटेहारला गव्हर्नरपदावर नेमणूक करून त्याला तिकडे पाठवून दिले.

२ रोहिलखंड हे अफगाणांचे राष्ट्रच हा अर्थ येथे अभिप्रेत आहे. रोहिलखंडात अफगाण जमाती पिढयान् पिढ्या स्थायीक झाल्या होत्या. त्यांची संख्याही मोठी होती व ते स्थानिक सत्ताधारीही होते. या दृष्टीने रोहिलखंड हे त्यांचे राष्ट्र असे लेखकाने सुचविले आहे.

कधीही नव्हता इतका वाईट" [सियार (३) २३] बेकायदेशीर गोंधळ निर्माण होऊन गुंडगिरी आणि भररस्त्यावर लूटमार, अशी स्थिती या सर्व भागात धुमाकूळ घालू लागली. अशा परिस्थितीत, आपण घेतलेली माघारही व्यवस्थित पार पाडण्यात हिदायत अलीला पुष्कळ अडचणींना तोंड द्यावे लागले. अशा रीतीने १७४५ च्या बाणगडवरील बादशाही मोहिमेने मिळविलेले फायदेही १७४८ मध्ये महिन्याभरातच नाहीसे झाले.

---

प्रकरण तिसरे

# बंगाल, बिहार आणि ओरिसामध्ये मराठ्यांच्या स्वाऱ्या–१७४६ पर्यंत

## § १ : मुघल साम्राज्यावर मराठ्यांचे वर्चस्व कसे वाढत गेले

मुघल साम्राज्याला उतरती कळा लागली तेव्हा निर्माण झालेल्या संधीचा फायदा हिंदुस्थानातील कोणत्याही लोकांपेक्षा मराठ्यांना अधिक झाला. औरंगजेबाच्या मृत्यूपूर्वीच, त्यांनी आपल्या मायभूमीमध्ये होणारा मुघल साम्राज्याचा विस्तार थोपविला होता आणि दिल्ली सत्तेला पराभव मान्य करण्यास भाग पाडले होते. या बादशहाचे वंशज तर इतके दुर्बल होते की, दक्षिणेत गमावलेली त्यांची सत्ता परत मिळविण्यासाठी काहीही प्रयत्न करणे त्यांना शक्य नव्हते, इतकेच नव्हे तर उरलीसुरली सत्ता टिकविण्यासाठी त्यांना फारच फारच कठीण पडत होते. उत्तरकालीन मुघल बादशहांचा व त्यांच्या सैन्याचा नैतिक अधःपात आणि परिणामांच्या दृष्टीने यापेक्षा काहीही कमी नव्हती अशी दिल्ली येथील अमीर उमरावामधील स्वार्थी भांडणे, यामुळे दक्षिणेतील शाही सत्तेचा ऱ्हास अधिकच त्वरेने झाला. गुजराथ वा दख्खन यापैकी कोणतीही सुभेदारी मिळविण्यासाठी ज्यावेळी उमराव-उमरावामध्ये लढा होई, त्यावेळी, कोणीही जिंको, अपरिहार्य परिणाम नेहमीच होई तो म्हणजे, तुलनेने मराठ्यांचे सामर्थ्य वाढविण्याचा. याच काळात म्हणजे बंदिवासातून मुक्त होऊन (१७०७) शाहू स्वगृही परत आल्यानंतरच्या काळात, फार मोठ्या अराजकाने, अनेक वर्षे महाराष्ट्रही उध्वस्त होत होता आणि मराठा सरदारांमध्ये पक्षीय मत्सर उफाळत होता. पण मुघलशाहीला या परिस्थितीचा काहीही फायदा मिळविता आला नाही.

पुढे लवकरच शाहूला, त्याचा मुख्य प्रधान, बाळाजी विश्वनाथ याची अलौकिक बुद्धिमत्ता व कर्तबगारी यांच्यामुळे, आपल्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविता आला. एवढेच नव्हे तर या पेशव्यामुळेच त्याला आपल्या राज्यावरील व प्रजेवरील प्रत्यक्ष अधिकार वा नियंत्रण याबाबतही स्थैर्य मिळविता आले. याच्यानंतरचा पेशवा–बाळाजीचा मुलगा पहिला बाजीराव–हा एक महत्त्वाकांक्षी, योजक बुद्धीचा व धाडसी सैनिक आणि अतिशय साहसी नेता होता. याच्या कारकीर्दीत (१७२०–१७४०) मराठ्यांनी गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड येथील प्रस्थापित बादशाही सरकारावर आपले वर्चस्व पूर्णपणे बसविले, शिवाय या काळात दख्खनचा सुभा तर मराठ्यांना देऊन टाकल्यासारखाच झाला. बाजीरावाला मत्सरग्रस्त प्रतिस्पर्ध्यांचा, विशेषतः सेनापती त्रिंबकराव दाभाडे आणि सेना साहेबसुभा, रघुजी भोसले यांचा विरोधही होता.–हे दोघे मराठा जातीचे आणि पेशवे ब्राह्मण होते.–या प्रतिस्पर्ध्यांच्या विरोधामुळे, मराठ्यांच्या राज्यकारभारात स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात आणि या चारी (गुजराथ, माळवा, बुंदेलखंड, दख्खन)–सुभ्यावर कोणालाही आव्हान देता येणार नाही अशी अबाधित सत्ता बसविण्याच्या कामात बाजीरावाला अडथळे आले. तथापि यामुळे झालेली अडचण वा पिछेहाट ही तात्पुरती होती. या प्रतिस्पर्ध्यामधील झगड्यात काही काळ

यशापयश इकडून तिकडे असे झुकत राहिले आणि उभयतानाही विघातक अशी रक्तपाती युद्धेही झाली. (उदा. दभोईची लढाई.–या लढाईत १ एप्रिल १७३१ ला दाभाडे मारले गेले–आणि फेब्रुवारी १७३९ मध्ये रघूजी भोसले यांच्याबरोबर झालेली लढाई). पण आपल्या जीवनाच्या अखेरी अखेरी, बाजीरावाला स्वतःच्या सामर्थ्याच्या प्रत्यक्ष व्यवहारातील सीमा शहाणपणाने लक्षात आल्या आणि त्याने प्रतिस्पर्धी मराठा सरदारांना प्रत्येकाचे स्वतंत्र वर्चस्व क्षेत्र सलोख्याने ठरवून देण्यासाठी मुघल सुभ्यांची विभागणी करण्याच्या एका योजनेला मान्यता दिली. या विभागणीच्या मागे उघडच विशिष्ट हेतू होते. प्रत्येक सरदाराला त्याच्या वर्चस्वासाठी निश्चित असा स्वतंत्र भाग ठरवून मिळावा ; शिकारीच्या या राखीव कुरणात मनमानेल तसे कर लुटण्यास आणि वर्चस्व गाजविण्यास मोकळीक मिळावी ; या कामात त्याच्या धन्याचा–छत्रपतींचा–अन्य कोणी अधिकारी हस्तक्षेप करील वा अडथळा आणील अशी भिती राहू नये; असे यात प्रमुख हेतू होते. या योजनेनुसार, गुजराथ, वऱ्हाड (बेरार) आणि धार, हे सुभे अनुक्रमे दाभाडे, भोसले आणि पवार यांच्या कुटुंबाकडे गेले. माळवा व बुंदेलखंड हे प्रांत पेशव्यांचा स्वतःचा राखीव भाग म्हणत त्यांच्या वाट्याला आले आणि यामुळे त्यांना दिल्लीच्या दरबारात थेट पोहोचण्यास सोयही मिळाली. मद्रासकडील कर्नाटक सुभ्यांची लूट अनेक सरदारांनी संयुक्तपणे[1] करावयाची असे ठरले. मुघल साम्राज्याची अशी ही वाटणी हा मराठा सरदारांच्या दृष्टीने उत्तम मार्ग होय, या दृष्टीने शाहूनेही तिला अंतिम रूप व मंजुरी दिली.

आपल्या धन्यावर व्यवहारात: वर्चस्व मिळवून म्हणजेच अप्रत्यक्षपणे धन्याचा–छत्रपतींचा धनी होऊन, पेशव्यांचे ऐवजी स्वतःच छत्रपतींचा कारभार, साताऱ्यास चालवावा ही रघूजी भोसल्यांची महत्त्वाकांक्षा होती. पण याबाबत त्याचा पराभव झाला तो बाजीरावाचे अधिक चांगले शिक्षण आणि युद्ध व संघटना करण्यामध्ये असलेली जन्मजात अलौकिक बुद्धीमत्ता यामुळे. असा पराभव पत्करावा लागल्यावर आपल्या सत्तेचा विस्तार करण्याला त्याला मार्ग मोकळा राहिला तो, त्याच्या नागपूर राज्याच्या ईशान्येला आणि पूर्वेला; म्हणजेच त्याच्या राज्याच्या तिकडील सरहद्दीला लागून असलेली जंगले आणि टेकड्या ओलांडून पलीकडील बंगाल, बिहार आणि ओरिसा या प्रांतावर हल्ले करण्याचा, स्वाभाविकच त्याने आता हा मार्ग चोखाळला. याच वेळी त्याला या भागातील नबाबांच्या अंतःस्थ शत्रूकडून निमंत्रणेही आली. हे प्रांत म्हणजे मुघल साम्राज्याच्या सर्वात पूर्वेकडील सरहद्दीवरचा सुभा असून त्यात अंतःस्थ शत्रूही होते. त्यांच्याकडून आलेली ही निमंत्रणे म्हणजे रघूजीला ईश्वराने दिलेली संधीच होती. नुकतेच त्याने कर्नाटकात स्वारीचे साहस केले होते. पण त्या भागात लूट जमा करण्याच्या दृष्टीने योग्य नव्हे इतक्या मोठ्या संख्येने लोभी प्रतिस्पर्धी शिरले असल्याने त्याला या साहसातून काहीही फायदा मिळाला नव्हता. पेशव्यांच्या वर्चस्वाखालील भागातही त्याने छापे घातले होते पण तेही अयशस्वी ठरले होते. या दोन्ही अपयशी साहसासाठी झालेल्या खर्चातून कर्जाचा ढीग उभा राहून त्यात तो डोक्यापर्यंत बुडाला होता. या परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी आता त्याच्यापुढे एकच मार्ग मोकळा राहिला होता तो म्हणजे बंगालची लूट करणे हा. त्या काळातील बंगालमधील संपत्ती सबंध हिंदुस्थानात लोकप्रसिद्ध असून या बंगालने आतापर्यंत मराठ्यांना चौथही दिलेला नव्हता हेही यामागील कारण होते.

---

१ या सरदारांमध्ये ब्राह्मण-मराठे असे सर्वच होते.

## § २ : बंगाल सुभ्याचे स्वतंत्र राज्यकर्ते-नबाब

औरंगजेबाच्या मृत्यूसमयी (१७०७), मुर्शीद–कुलिखान (पुढे जाफरखान नासिरि, नासिरजंग, मुतामन्-उल-मुल्क या आडनावाने ओळखला जाणारा) हा बंगालचा डेप्युटी गव्हर्नर (नायब नाझिन–सुभेदाराचा दुय्यम हाताखालचा) आणि ओरिसाचा पूर्ण सुभेदार होता. शिवाय या दोन्हीही प्रांतांचा तो 'दिवाण' – मुख्य महसूल अधिकारीही होता. फरूख सियारनेही तख्तावर बसल्यावर (१७१३) त्याला बंगालचा (डेप्युटी) नायब सुभेदार केले आणि पुढे १७१७ मध्ये त्यालाच पूर्ण सुभेदार म्हणून कायम केले. या त्याच्या नेमणुका त्याचे दिवाणपद कायम ठेवून शिवाय आणखी जास्त होत्या.[१] १७१४ मध्ये अशाच प्रकारे ओरिसाची पूर्ण सुभेदारीही त्याला देण्यात आली. मुर्शिदकुलीचा राज्यकारभार, खंबीर, प्रामाणिक आणि कार्यक्षम होता. त्याला न्यायाची आवड असून त्याने शांतता व सुव्यवस्था यांची कडकपणे अंमलबजावणी केली. यामुळे प्रजेमध्ये सुख व समृद्धी यांची खूप वाढ होऊन देशात व्यापारवाढीलाही उत्तेजन मिळाले. त्याच्या मृत्यूनंतर (३० जून १७२७) दोन्हीही सुभ्यांच्या, त्याच्या अधिकारपदावर त्याचा जावई शुजा-उद्-दिन महमदखान आला. (त्याचे आडनाव शुजा-उद्-दौला आसद्जंग असे होते–भा. आडनावे मिळालेल्या पदव्यावरून वापरली जात असे दिसते. यातूनच निरनिराळी आडनावे –Surnames– आली आहेत).–पुढे १७३३ च्या सुमारास या दोन्ही प्रांतांच्या अधिकारपदाबरोबरच आणखी बिहारचे अधिकारपदही बादशहाने त्याला दिले. शुजालासुद्धा शांतता व समृद्धी नांदत असलेली कारकीर्द उपभोगावयाला मिळाली. [ डाक्का विद्यापीठ, 'बंगालचा इतिहास' (२) २३१ आणि ३९९ ].

शुजाचा मृत्यू झाल्यावर (१३ मार्च १७३९) त्याचा मुलगा सराफ्राज खान (अला-उद्-दौला हैदरजंग अशी याची पदवी होती). हा बंगाल, बिहार व ओरिसाचा सुभेदार झाला. पण हा तरूण राज्यकर्ता अतिशय विषयासक्त होता. या आसक्तित तो गुंतला ते भक्तीभावाच्या सबबीने,—सतत धार्मिक आचार, आचरीत रहाण्याच्या निमित्ताने, (पूर्वेकडील देशात अनेक वेळी असेच घडते) आणि सतत धार्मिक तत्त्वज्ञानाच्या मागे लागलेल्या लोकांच्या संगतीत राहण्याच्या सबबीने! या दोन्हींमुळे राज्यकारभाराची सतत अवनती होऊ लागली. ही वाईट स्थिती अधिकच वाईट होऊ लागली ती या नव्या नबाबाने अलिवर्दीखान व त्याचा थोरला भाऊ हाजी अहमद, यांच्याशी मत्सरामुळे शत्रुत्व धरले म्हणून. यापूर्वीच्या दोन्ही कारकीर्दीत हे दोघेही, कुणाहीपेक्षा जास्त कर्तबगार आणि उत्तम प्रकारे सुसज्ज असे अधिकारी होते. अलिवर्दीला आता कळून चुकले की तो, काहीही अडचणीत आलेला सापडला की, त्याचा हा नवा नालायक धनी, त्याच्या जिवावर आणि प्रतिष्ठेवर हल्ला करील. तेव्हा स्वतःच्या रक्षणासाठी आपणच प्रथम प्रहार करावा असे त्याने ठरविले आणि विलक्षण कौशल्य व धाडस दाखवून पाटण्याहून (या ठिकाणी तो दुय्यम-सुभेदार-डेप्युटी गव्हर्नर होता) बंगालवर स्वारी करून तो गेला. या मोहिमेमधील

---

१ आधी (१७०७) हीच पदे त्याच्याकडे होती असे परिच्छेदाचे सुरूवातीसच आहे म्हणजे फरुखसियारने बादशहा झाल्यावर याच त्याच्या पदांना पुन्हा "शाही मंजुरी" दिली असे दिसते कदाचित यापूर्वी ही पदे "तात्पुरती" म्हणून त्याच्याकडे असावीत. शिवाय या उदाहरणावरून यावेळी एखादे सुभेदारपद एखादे डेप्युटी सुभेदारपद व दिवाणपद अशी अनेक पदे काही वेळा एकालाच देत असे दिसते. ओरिसा-बाबतही हीच स्थिती दिसते.

'घेरीयाचे' लढाईत (१० एप्रिल १७४०) त्याने सराफराजचा पराभव करून त्याला ठार मारले आणि त्याच्या तिन्ही प्रांतांचे नबाबपद स्वतःकडे घेतले. शस्त्र सामर्थ्याच्या जोरावर केलेल्या या कृतीला, पुढे त्याने भरपूर लाच देऊन बादशहाकडून मान्यताही मिळविली. अशाप्रकारे सामर्थ्याच्या जोरावर त्याने अधिकारपद हिसकावून घेतले. यामुळे त्याच्या या बेकायदेशीर व दांडगाईच्या कृतीचे अनुकरण करण्यास आणि शाही सरकारला उघडउघड धाब्यावर बसविण्यास, दुसऱ्यानाही उत्तेजन मिळाले. आणि यातून बंगालवर अडचणींचा पूरच येण्याला दरवाजे सताड उघडले गेले [ सियार (२) १०१–१०५].

## § ३ : अलिवर्दीखानाने 'ओरिसा' जिंकला आणि घालविला ; पुन्हा १७४१ मध्ये जिंकला

शुजाचा जावई ओरिसाचा दुय्यम सुभेदार (डेप्युटी गव्हर्नर) रुस्तुमजंग (याला प्रथम मुर्शिदकुली हे नाव होते) याला त्याची पत्नी दर्दाना बेगम हिने वारंवार टोचणी लावून तिचा सावत्र भाऊ सराफराज याच्या मृत्यूबद्दल सूड घेण्यास उद्युक्त केले. तेव्हा त्याने बंगालच्या नबाबास ठार करणाऱ्या अलिवर्दीसारख्या राजवध करणाऱ्याची सत्ता मान्य करण्यास नकार देऊन आपले स्वातंत्र्य जाहीर केले. यानंतरच्या हिवाळ्यात बंगाल जिंकून घेण्याच्या उद्देशाने कटकहून बलेसारकडे तो चालून गेला. या संकटास तोंड देण्यासाठी आपल्या राजधानीतून अलिवर्दीही पुढे आला. पुढे काही आठवडे बलेसारजवळ दोन्हीही सैन्ये एकमेकासमोर आपापल्या खंदकात दबा धरून बसली. या काळात फक्त त्यांच्या टेहळ्या तुकड्यामध्ये कधी कधी चकमकी होत इतकेच. अखेरी रुस्तुमचा उतावळा जावई बाकर अलि याने ३ मार्च १७४१ ला एक लढाई घडवून आणली. त्याने आपले अभेद्य खंदक सोडले, आपला बराचसा तोफखानाही मागेच ठेवला आणि फुलवारीच्या मैदानावर येऊन (बलेसार शहराच्या उत्तरेस चार मैल) अलिवर्दीवर हल्ला केला. यावेळी झालेल्या निकराच्या लढाईत त्याची दाणादाण होऊन पूर्ण पराभव झाला. पण समाधानाची गोष्ट इतकीच की, यावेळी बंदराजवळच त्याच्या एका मित्राचे जहाज नांगर टाकून उभे होते. त्यातून रुस्तुमजंग मच्छलीपट्टणला पळून गेला. अलिवर्दीने कटक व्यापले आणि तेथे आपला जावई सइद अहमद (आडनाव : महाम्-उद्-दौला-सौलतजंग) याची आपल्यातर्फे डेप्युटी सुभेदार म्हणून स्थापना केली. [सियार (२) १०७–१०९ ; युसुफ २५–३४, करम १६अ–१८ ब].

पुढे कर्नाटकमधील मराठ्यांना पैसे देऊन त्यांची मदत बाकरअलिने मिळविली आणि त्यांना बरोबर घेऊन ऑगस्टमध्ये तो ओरिसात परत आला. नंतर त्याने कटकवर अकस्मात हल्ला केला आणि तेथल्या नालायक व लोकात अप्रिय झालेल्या डेप्युटी सुभेदाराला व त्याच्या सबंध कुटुंबाला कैद करून या प्रांताचा कारभार हाती घेतला. यामुळे अतिशय दुःखी झालेल्या अलिवर्दीखानाने बलाढ्य सैन्य एकत्र करून पुन्हा ओरिसावर चाल केली, तेथे महानदीच्या काठावर बाकरअलिचा पराभव केला[1]. आपल्या जावयाची मुक्तता केली.

---

१ २३, डिसेंबर १७४१ चे "बंगाल पत्र", यानुसार ही घटना 'रायपूर' येथे घडली आणि 'रियाझ' पृ. ३३५ नुसार 'घाट चोप्रा' येथे घडली. पळून आलेला रुस्तम जंग आणि त्याचे कुटुंब, यांचे निजामाने स्वागत केले. [हदीकत-उल-आलम, (२) १७३].

आणि बाकरअलि व त्याचे मराठा मित्र यांना दक्षिणेकडे पिटाळून लावले. (१७४१ डिसेंबरचा आरंभ), [सियार (२) १११-११४ ; रियाझ–३१७–३३८].

दरम्यान अलिवर्दीच्या राज्यातील दुसऱ्या एका कोपऱ्यात रामगढ (आधुनिक हजारीबाग) या जंगली भागाचा राजाही–जमीनदार–शिरजोर झाला होता. त्याला ताब्यात ठेवण्यासाठी अलिवर्दीच्या तेथील स्थानिक अधिकाऱ्याने एक सैन्यपथक पाठविले होते. यामुळे अर्थातच त्या जमीनदाराला राग आला व त्याने, त्याच्या प्रदेशातून बंगालवर स्वारी करण्यासाठी नागपुरचे मराठे येत असताना त्यांना काहीही विरोध केला नाही. [सियार (२) ११६].

## § ४ : मराठ्यांची पहिली मोहीम, १७४२

बाकर अलिकडून कटक परत मिळविल्यानंतर नबाबाने तेथे राज्यकारभाराची घडी पुन्हा बसविण्यात आणि जरूर ती अन्य व्यवस्था करण्यात दोन-तीन महिने घालविले. नंतर बंगालकडे परत येण्यास तो निघाला. नुकत्याच झालेल्या युद्धात मयूरभंजच्या राजाने त्याच्याशी वैरभाव दाखविला असल्याने त्याला शिक्षा करावयाची होती. यासाठी बंगालच्या परतीच्या प्रवासात तो बलेसार येथे थांबला. तेथून त्याला आपल्या सैन्याच्या काही तुकड्या मयूरभंज प्रदेशात पाठवावयाच्या होत्या. अशा रीतीने त्याला वेळ लागला असता वाटेतच जयगढ येथे त्याला कळले की, रघूजी भोसल्यानी त्याचा मुख्य प्रधान भास्कर राम कोल्हटकर याला बरोबर बलाढ्य सैन्य देऊन बंगालवर स्वारी करण्यास व त्या प्रांतातून चौथ वसूल करण्यास पाठविले आहे. प्रवासात आणखी पुढे आल्यावर मुबारक मंझिल[१] येथे त्याला आणखी बातमी मिळाली की, मराठे आधीच पाचेटमधून पुढे गेले असून बरद्वान जिल्ह्यात शिरले आहेत. तेव्हा एक रात्र व दिवस अशी सतत तातडीने चाल करून तो बरद्वानला येऊन पोहोचला आणि शहराबाहेर "राणी तलावाच्या" काठावर त्याने आपली छावणी ठेवली (१५ एप्रिल १७४२). [ सियार (२) ११६–११७ ; युसुफ ३५–४८ ; करम १८ ब].

दुसऱ्या दिवशी मोठ्या सकाळीच त्याच्या लक्षात आले की, रात्रीच मराठ्यांच्या चपळ आणि सुटसुटीत घोडदळाने (Light Horse) त्याच्या छावणीला संपूर्ण वेढा घातला आहे. तेव्हा त्याला अतिशय आश्चर्य वाटले. या घोडदळाची हालचाल व चढाई इतकी जलद आणि गुप्तपणे चालली होती की, नबाबाच्या हेरांना त्यांच्या ठाव-ठिकाणाबाबत आणि चढाईच्या रोखाबाबत काहीही बातमी वेळेवर मिळाली नाही. अखेर मिळाली ती इतक्या वेळाने की, ही चढाई थोपविण्यासाठी काहीतरी करता येण्यासारखी वेळ निघून गेली होती.

---

१ महमद अंझाम याने, "प्रवासी" मासिक-अशार (Asharh) १३३८ पृ. ३८२ मध्ये सिद्ध केल्याप्रमाणे. या ठिकाणाचे आधुनिक नाव 'शाहिनबंदी' (Shahin Bandi) असे आहे. ते हुगळी जिल्ह्याच्या आराम बाग उपविभागात आहे.

मराठा रेकॉर्डस-कागदपत्रे-यांचा आधार घेऊन ग्रँट डफने [ (२) ११ ] भास्कररावांच्या *सैन्याचा अंदाज केला आहे. त्यानुसार ते १०,००० ते १२,००० होते. सियार [ (२) ११७ ] प्रमाणे ते २५००० होते आणि पसरलेल्या अफवेनुसार हा आकडा तर ४०,००० पर्यंत फुगविला होता. चंद्रनगर येथील वखारीच्या एका पत्रात अशाच दुसऱ्या अफवेचा आधार घेऊन ही संख्या ८०,००० अशी दिली आहे.

§ वरील टीपेतील 'भास्करराव' व ग्रंथातील याच *उपविभागात निर्देशिलेला 'भास्करराम' हे एकच होते.

आता अलिवर्दी अतिशय धोक्याच्या परिस्थितीत सापडला होता. ओरिसा परत जिंकल्यावर, त्याच्या दृष्टिसमोर दुसरा शत्रू नसल्याने आपल्या सैन्यापैकी बरेच आपण निघण्यापूर्वीच त्याने मुर्शीदाबादेला परत पाठविले होते. बरद्वानला यावेळी त्याच्याबरोबर फक्त ३००० ते ४००० घोडदळ आणि ४००० ते ५००० बंदुकधारी पायदळ होते. आलेल्या मराठा पथकांनी या छोटचा सैन्याला तात्काळ वेढा घातला आणि एकदाही समोरासमोर लढाईचा धोका न पत्करता त्यांचा अन्नपुरवठा परिणामकारकपणे तोडला. अलिवर्दीखानाची पथके, घोडयांना दाणावैरण मिळविण्यासाठी रोज बाहेर पडत, आणि मराठा पथकाशी त्यांच्या चकमकी होत, पण यातून या लढयाचा काहीही निर्णय लागेना की, त्याला सुटून जाण्यासाठी रस्ताही मोकळा करता येईना. अशा रीतीने एक आठवडा गेला. भास्कररावाने स्वतःचे ठाणे बरद्वानला ठेवले, व नबाबाच्या छावणीभोवतालचा वेढा चालविण्यास हाताखालील १४ सेनाधिकाऱ्याना ( Captains ) आपल्याबरोबर ठेवले. याचवेळी त्याचे इतर दहा कॅप्टन्स आपापली पथके घेऊन भोवतालच्या प्रदेशात सगळीकडे हिंडून दूरदूर अंतरापर्यंतची खेडी लुटू लागले. परिणामतः कोणाही धान्य व्यापाऱ्याला बंगाल-नबाबाच्या छावणीपर्यंत पोहोचता येईना. याचबरोबर बरद्वान भोवतालचा धान्य पुरवठा करणाऱ्या सर्व केंद्रांचाही मराठयांनी नाश केला.[1] या परिस्थितीत आपल्या छावणीत पाय रोवून स्वस्थ रहाणे म्हणजे अखेरी उपासमारीने येणाऱ्या मृत्यूला आमंत्रण देणे हे अलिवर्दीखानाला कळून चुकले.

जुना मुघल रस्ता बरद्वानपासून (दामोदर नदीच्या उत्तरेला) ईशान्येला ३५ मैलावर असलेल्या कटव्याकडे जातो. या रस्त्यावर बरद्वानपासून २१ मैलावर निगुनसराई येथे प्रवासात मध्येच थांबण्यासाठी एक स्थानक असून येथून कट्वा पुढे फक्त १४ मल अंतरावरच आहे. कट्व्याजवळ, गंगा नदीचे मुख्य पात्र–भागीरथी वा मुर्शीदाबाद आणि कलकत्त्याच्या नदीचे पात्र–या रस्त्याने ओलांडले असून पुढे तोच रस्ता उत्तरेला ४० मैल मुर्शीदाबादेला जातो. मुर्शिदाबाद हे, मुघल कारकीर्दीच्या शेवटच्या खंडात, बंगालची राजधानी होती. नदीच्या प्रवाहाच्या वरच्या बाजूस पूर्व किनाऱ्यावर कटव्यापासून ११ मैलावर पालाशी हे खेडेगाव आहे. पालाशी म्हणजेच प्लासी. पुढे ज्या ऐतिहासिक लढाईने इंग्रजांना बंगाल मिळवून दिला त्याच लढाईचे हे स्थान. हा सबंध प्रदेश म्हणजे पुराने वाहून आलेल्या चिकण मातीने बनलेले असे अगदी सपाट मैदान आहे.

---

१ मराठयांच्या मोहिमांची मी (लेखक) लिहिलेली हकीगत ही मुख्यतः सियार (२) ११६–१९०, यावर आधारलेली आहे. तथापि त्यामध्ये, सलिमुल्ला यांच्या 'तारीख-इ-बंगाल' वरून कांही भरही घातली आहे. (या 'तारीख' बाबत I. O. L. इंडिया ऑफीस लायब्ररी हस्तलिखित २९९५ वापरले आहे. याचे कारण असे की, या 'तारीख'चे F. Gladwin /एफ्. ग्लॅडविन, याने केलेले भाषांतर, जास्त संक्षिप्त असून त्यात चुकीचे पाठभेद आहेत आणि कांही चुकीची भाषांतरेही आहेत. ग्लॅडविन याने केलेल्या भाषांतराचे नाव "बंगालमधील घडामोडीचे वर्णन" 'Narrative of Transactions in Bengal' असे आहे. सियारवर आधारलेल्या माहितीत मी काही भरही घातली असून काही दुरुस्त्याही केल्या आहेत. त्या 'मराठी रेकॉर्ड' (S. P. D.–पेशवे दप्तरातील निवडक कागदपत्रे) व इंग्रज आणि फ्रेंच यांच्या वखारीतील (फॅक्टरी) पत्रांचा आधार घेऊन बंगाल्यांनी लिहून ठेवलेला तत्कालीन मूळ आधार (Sources) म्हणजे गंगाराम यानी लिहिलेले 'महाराष्ट्र पुराण' (यातील हकीगत १७४४ पर्यंत संपते) आणि वाणेश्वर यांनी लिहिलेले 'चित्रचंपू' (१७४४ मध्ये). 'रियाझ-उस-सलातिन' (३४०–३६२) यामध्येही स्वतःचा असा कांही उपयुक्त तपशील आहे, पण बऱ्याच वेळा त्यात सलिमउल्लाची पुनरावृत्ती असून एकूण हे रियाझ बरेच संक्षिप्त आहेत.

## § ५ : अलिवर्दी लढत लढत कटव्याला परतला

स्वस्थ बसले तर उपासमारीने मत्यू ओढवणार अशा परिस्थितीत निवडक सैन्य व हलका सरंजाम बरोबर घेऊन रात्री कूच करावयाचे, भोवताली असलेल्या मराठ्यांच्या कड्यावर अचानक हल्ला करावयाचा व ते तोडून त्यातून आपला मार्ग काढावयाचा असे अलिवर्दीखानाने ठरविले. अतिशय गुप्तपणे व शत्रूपेक्षा अधिक जलद हालचाली करण्यावरच, सर्वस्वी या योजनेचे यश अवलंबून होते. या दोन्हीं बाबतीत त्याला अपयश आले. आपले असंख्य नोकर आणि इतर बिनलष्करी लोक यांना बरद्वानमध्येच रहा असा हुकूम देऊन, तो सैन्य तेवढे बरोबर घेऊन छावणीबाहेर पडला. तेव्हा मागे रहावयास सांगितलेल्या लोकांना भीती वाटली की, नबाब स्वतःचे संरक्षण पथक तेवढे बरोबर घेऊन पळून जात असून मागे ठेवलेल्या लोकांना कोणत्याही संरक्षण साधन-सोयींशिवाय, त्याने शत्रूपुढे सोडून दिले आहे ; आता त्यांना स्वारी करून आलेल्या शत्रूच्या केवळ दयाबुद्धीवरच सोपविलेले आहे. भीतीच्या या भावनेमुळे मागे रहावयास सांगितलेला प्रत्येकजण जाण्यासाठी वेगळ्या केलेल्या पथकाला खेटून त्यात सामील होण्याचा प्रयत्न करू लागला. परिणामतः त्या जाणाऱ्या पथकांचे रूपांतर गोंगाट करीत असलेल्या नियंत्रण करता येणार नाही इतक्या अवजड आणि हळूहळू चालणाऱ्या अशा घोळक्यात झाले. यामुळे शत्रूवर अकस्मात हल्ला करून झपाट्याने जाण्याची योजना सर्वस्वी फसली.

असा हा बंगाली घोळका मराठ्यांना सकाळी दिसला तेव्हा त्यांच्या चपळ घोडेस्वारांनी त्याला घेरले आणि त्याला पुढे जाण्यास प्रतिबंध सुरू केला. सायंकाळी चार वाजेपर्यंत या घोळक्याची प्रगती पूर्णपणे थांबविली गेली आणि अखेरी तो थांबला. ते चिखलाने भरलेल्या भाताच्या शेतात ! यावेळी अलिवर्दीखानाच्या सैन्याचा मुख्य आधार म्हणजे त्याचे अफगाण सैनिक होते. तेव्हा, निर्माण झालेल्या परिस्थितीत त्याने त्यांना हुकूम दिला की, हल्ला करून पुढचा रस्ता मोकळा करा. पण त्यांनीही शत्रूवर खरोखरी हल्ला करण्याऐवजी, लढाई करीत असल्याचा केवळ देखावा केला. याचे कारणही होते ते असे की, या अफगाण पुढाऱ्यांच्या काही लोभी इच्छा होत्या त्या अलिवर्दीने पुऱ्या केल्या नव्हत्या व यामुळे ते त्याच्यावर नाराज होते. आता या घोळक्याची पुढील चाल तर मराठ्यांनी रोखलीच शिवाय याचवेळी त्यांच्यापैकी काहींनी, या घोळक्याच्या भोवती वळसा घेऊन पाठीमागूनही त्यावर हल्ला केला. यामुळे हळूहळू चालणारे घोळक्यातले लोक व पिछाडी सांभाळणारे सैनिक यांना, मागून सावकाश येणारे सामानसुमान व तंबू, सोडून देऊन, संरक्षणासाठी आपल्याच मध्यभागात, गर्दी करीत शिरणे भाग पडले. ही संधी साधून शत्रूने, तंबूना आग लावली, छावणीतील मालमत्ता लुटली आणि मागे रेंगाळणाऱ्यांना कापून काढले. यातून फक्त थोडेच सुटून पळाले. अशा गोंधळात अलिवर्दीच्या सबंध स्वारीने—घोळक्याने, त्या भातशेतीच्या खाचरात, सर्व रात्र अन्नाशिवाय व आसऱ्याशिवाय घालविली. त्यांना पुढेही जाता येईना की मागेही फिरता येईना.

आता मात्र अलिवर्दीखान खरोखर एक बंदिवान बनला. येणारी मदत आपल्यापर्यंत पोहोचण्याला वेळ मिळविता यावा म्हणून त्याने मराठ्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. पण यावेळच्या आपल्या परिस्थितीतील भक्कमपणा भास्कररावाने ओळखला होता. तेव्हा हल्ला थांबवून शांतता तह पाहिजे असल्यास त्याची किंमत म्हणून नबाबाने एक कोटी रुपये व

शिवाय आपले सर्व हत्ती द्यावे अशी त्याने मागणी केली. यानंतरच्या रात्री अलिवर्दीखानाने आपल्या अफगाणांच्या औदार्य भावनेला आवाहन केले. बरोबर एकही नोकर वा मशालजीसुद्धा न घेता आणि आपला छोटा नातू सिराज्-उद्-दौला याला हाताने धरून, तो अफगाणांच्या तंबूकडे अतिशय नम्रपणे गेला आणि आपली प्रतिष्ठा व उभयतांचा प्राणही त्याने त्यांच्या प्रमुखांच्या पायाशी ठेविली. अलिवर्दीच्या या कृतीमुळे अफगाणांचा प्रमुख सेनापती मुस्तफाखान याला अलिवर्दीला आपल्या बाजूला वळवून घेता आले. यानंतर मुस्तफाच्या वक्तत्वपूर्ण व दिलदार भाषणाने भारावून जागृत झालेल्या अफगाणानी, प्राण जाईतो आपल्या धन्याचे रक्षण करण्याची शपथ घेतली.

नंतर सकाळीच बंगालच्या सैन्याने पुन्हा कटव्याकडे कूच सुरू केले. या सैन्याने आपले सर्व तंबू, सामानसुमान आणि अन्नपुरवठा गमावला होता पण त्यांचा तोफखाना मात्र अद्याप शिल्लक होता. मराठा भालाइताना जरूर इतक्या अंतरावर, रोखून धरण्यास हा तोफखाना फार उपयुक्त ठरला. अशा रीतीने अलिवर्दिखानाच्या या सैनिकांनी लढत लढत, निगुनसराई-पर्यंत आपला मार्ग काटला. दरम्यान त्यांची संख्याही फार कमी झाली होती. निगुनसराई येथे पाठीमागून हल्ला करणाऱ्या शत्रूला थांबविण्यासाठी व आपली पिछाडी सांभाळत पुढे कूच करता येण्यासाठी अतिशय निकराची पाठमोरी (Rearguard action) लढाई झाली, त्यात मुसाहिबखान मारला गेला. यानंतर दुसऱ्या दिवशी या सैन्याने कटवा गाठले. बंगाल सैन्याचे असे हे कूच चालू असताना ज्या ज्या वेळी नबाबाचे सैन्य थांबे, मुक्काम करी त्या त्या वेळी पाठलाग करणारे मराठेही थांबत, ते मात्र "जिझाइ"च्या—तोफखान्याच्या—माऱ्याच्या टप्प्याबाहेर—थोडेसे पलीकडे. असे ते थांबले की, त्यांच्या फिरत्या टोळ्या मात्र प्रत्येक मुक्कामाचे वेळी, रस्त्याच्या दोन्ही बाजूला दहादहा मैलांचे टापूतील खेडी लुटीत आणि जाळीत. अशा परिस्थितीत उपाशी पोटावर रोज लढत लढत नबाब आणि त्याचे सैन्य आपला फक्त जीव बचावून अखेरी कटव्याला पोहोचले. हे लहानसे शहर या आधीच मराठ्यांनी लुटले होते. जाळले होते. तथापि उपासमार झालेल्या या सैन्याला शहरातील घरांच्या राखेत बारकाईने शोधल्यावर जो काही अर्धवट जळालेला तांदूळ मिळविता आला तेवढ्यावरच आपली भूक भागविण्यासही आनंदच वाटला! यानंतर लवकरच अन्नपुरवठा, तोफखाना आणि ताजे सैन्य मुर्शिदाबादेहून कटव्याला येऊन पोहोचले आणि नबाबाचे सैन्य संख्या व सुखसोयी या दृष्टीने पुन्हा पूर्ववत सज्ज करण्यात आले. (सियार. (२) ११७-१२१].

## § ६ : मिरहबीब–जीवन व स्वभावविशेष

बरद्वानपासून माघार चालू असताना नबाबाचा एक अधिकारी-मिरहबीब-याला शत्रूने कैद केले. तेव्हा लगेच आपल्या पहिल्या नोकरीचा त्याग करून त्याने मराठ्यांची नोकरी पत्करली. हा हबीब मराठ्यांचा अतिशय उपयुक्त मित्र आणि बंगालच्या दृष्टीने त्यावर आघात करणारे सर्वात मोठे अरिष्टच असल्याचे लवकरच सिद्ध झाले. पूर्वेकडील तीन सुभ्यावरील मराठ्यांची स्वारी दीर्घकाल चिकाटीने निष्ठूरपणे चालविण्यात आली आणि ती सर्व प्रदेश उध्वस्त करणारी ठरली ती केवळ मिरहबीबचे या प्रातांबाबत स्थानिक ज्ञान, त्याची कर्तबगारी आणि चिकाटी यामुळेच. मिरहबीब हा जन्माने पर्शियामधील शिराझचा नागरिक. तेथून देशांतर करून तो हुगळीला आला. त्या बंदरात आधीच स्थायिक

झालेले त्याच्या देशातील काही व्यापारीही होते. त्यांच्याकडून जो काही माल त्याला उधारीवर मिळे तो घरोघर जाऊन तो विकी आणि अशा रीतीने आरंभी तो कशीबशी उपजीविका करी. तो पूर्णपणे निरक्षर होता पण त्याची तरतरीत बुद्धी, त्याच्या भाषणातील अतिशय माधुरी कमालीचा गोडवा आणि त्याचे पर्शियन भाषेवरील संपूर्ण प्रभुत्व (ही त्याची मातृभाषा होती) यामुळे समाजाच्या सगळ्यात वरच्या स्तरामधील लोकात शिरकाव करणे त्याला लवकरच शक्य झाले. या फेरीवाल्याने पुढे आपला पहिला व्यवसाय सोडून 'रुस्तमजंगा'ची नोकरी पत्करली आणि लवकरच त्याच्या विश्वासातील एक प्रमुख सल्लागार व त्याचा नायब प्रतिनिधी वा कारभारी म्हणून त्याचा उत्कर्षही झाला. यापुढे एकामागून एक येणाऱ्या नबाबांच्या नोकरीत त्याचा धनी रुस्तमजंग जसजसा चढत गेला तसतसा हाही चढत गेला, याचाही उत्कर्ष होत गेला. पुढे रुस्तमजंगाची नेमणूक डाक्का येथील गव्हर्नर म्हणून झाली त्यावेळी हबीबने कारभारातील बारकाव्याकडे चांगले लक्ष देऊन व कटाक्षाने मोठी काट-कसर करून, सरकारचे छोटेसे आरमार, तोफखाना आणि लष्कर या खात्यांच्या खर्चात मोठी बचत केली. याशिवाय खाजगी व्यापारावर अनधिकृत आक्रमण करून आणि टिप्पेरा[1] भागात हल्ले व लूटमार करून त्याने आपल्या धन्याचा खजिना आणखी भरला. उमरावपद मिळेतोपर्यंत त्याने असेच चालविले होते. पुढे रुस्तमजंग ओरिसामध्ये सुभेदार झाल्यावर त्याचा नायब म्हणून त्याने सबंध कारभारही चालविला. यावेळी त्याने सार्वजनिक कारभार कर्तबगारीने केला, जमीनदाराना नियंत्रणाखाली राखले, धन्याचे उत्पन्न पुष्कळच वाढविले आणि अशा प्रकारे स्वतःही मोठा नावलौकिक संपादला. त्याची कर्तबगारी आणि न थकता सतत चालविलेला उद्योग यांची बरोबरी होई ती फक्त त्याच्या अनिर्बंध महत्त्वाकांक्षेने, अलिवर्दीखानाबरोबरच्या कडव्या शत्रुत्वाने आणि नीतीबद्दल संपूर्ण बेफिकीर रहाण्याच्या व कोणत्याही उदार भावनेचा संपूर्ण अभाव असलेल्या वृत्तीने!
[रियाझ २९९–३०३; युसुफ ४१]

## § ७ : मुर्शिदाबादेकडे मराठ्यांची दौड–हल्ला ६ मे १७४२

अलिवर्दी कटव्याला येऊन पोहोचला त्यावेळी मे महिन्याची (१७४२) सुरुवात झाली होती. या महिन्यांत बंगालमध्ये जोराचा पाऊस सुरू होतो आणि लवकरच रस्ते जाण्या-येण्याला निरुपयोगी होतात, नद्या, उतार पाहून ओलांडता येणार नाहीत इतक्या भरतात. म्हणून भास्कररावाला विरभूम पठाराच्या वाटेने, जलदी करून नागपूरला परत यावयाचे होते. पण यावेळी मिरहबीबने याला दाखवून दिले की, नबाबाच्या गैरहजेरीत बंगालच्या समृद्ध राजधानीत संरक्षण व्यवस्थाही नाही; तेव्हा ही संधी साधून मराठ्यांनी त्या शहरावर विद्युतगतीने हल्ला केला तर ते शहर सहजासहजी त्यांच्या भक्ष्यस्थानी पडेल व त्यांना मनमुराद लूट मिळेल. हे काम त्याने स्वतः स्वीकारलेही, त्याला त्या शहराबाबत सर्व माहिती होती आणि यावेळी त्याची बायकामुले तेथेच, त्याच्या भावाच्या देखरेखी-खाली रहात होती ही याची कारणे होती.

बरोबर ७०० सुसज्ज घोडेस्वार घेऊन, मिरहबीबने रात्रभर कूच केले आणि ६ मे ला सकाळीच मुर्शिदाबादेच्या समोर, नदीपलीकडे असलेल्या 'दाहापारा' 'Dahapara'

१ टिप्पेरा.... म्हणजे त्रिपुरा असावा.

या ठिकाणी तो पोहोचला. लगेच त्याने तेथील बाजार जाळला आणि हाजीगंजच्या तरीतून, नदी ओलांडून, तो मुर्शिदाबाद शहराला आला. या शहराभोवती तट नव्हता. यावेळी नबाबाचा वडीलभाऊ हाजी अहमद हा शहराचा प्रमुख अधिकारी होता. शहरातील सैन्येही यावेळी बाहेर नेलेली असल्यामुळे आणि मुख्यत: तेथील मुख्य अधिकाऱ्याच्या भित्रेपणामुळे आलेल्या शत्रूविरुद्ध या शहराचे काहीही संरक्षण करण्यात आले नाही. यामुळे तो सबंध दिवस आणि रात्र या बंगालच्या राजधानीत अतिशय भीती आणि गोंधळ यांनी थैमान घातले. शहराला नशिबाच्या हवाली सोडून काय होईल ते होवो अशा वृत्तीने शहर सोडून हाजी अहमद किल्ल्यात पळून गेला होता. शहराच्या उपनगर भागातील फत्तेचंदाचे (आडनाव; जगतशेट–म्हणजेच मुख्य पेढीवाला बँकर) घरातून मराठ्यांनी जवळजवळ ३ लाख रुपये लुटले आणि अशाच प्रकारे आणखी अनेक श्रीमंतांचे वाडेही लुटले ते थोडाही अडथळा वा विरोध न होता! नंतर सायंकाळी परत नदी ओलांडून, 'तिरथकोण' Tirathkona (मुर्शिदाबादेच्या पश्चिमेस) या ठिकाणी ते आले आणि तेथे त्यांनी रात्रीसाठी मुक्काम केला.

पण मराठ्यांच्या या हालचालींची माहिती मिळाल्याबरोबर लगेच कटव्याहून अलिवर्दीनेही घाईने त्यांच्या पाठोपाठ कूच केले आणि तो आपल्या राजधानीला ता. ७ ला सकाळी पोहोचला. इकडे 'तिरथकोण' आणि त्याच्या आसमंतातील खेडी या हल्लेखोरांनी लुटली, त्यांनी आगी लावल्या आणि नंतर घाईने त्यांनी कटव्याकडे माघार घेतली.

नबाबाने आपल्या राजधानीतून सर्व शत्रूंना घालवून दिल्यानंतर मे महिन्याच्या आरंभीच मराठे कटव्याकडे परत गेले. तेथून बंगालमधील मोसमी पाऊस चुकविण्यासाठी ते स्वदेशी जाण्यास निघाले, पण या परतीमुळे त्यांच्यात काही हिंमत दिसत नाही असे टोचून बोलत, उपहास करीत, मिरहबीबने त्यांना चिडविले आणि इकडील लुटीच्या भुलविणाऱ्या आशा अपेक्षा दाखवीत बिरभूमपासून रस्त्यातूनच पुन्हा माघारी फिरविले. अशा रीतीने जूनपासून कटवा हे मराठ्यांचे पुन्हा मुख्य ठिकाण झाले आणि मिरहबीब त्यांचा मुख्य सल्लागार बनला. यापुढे त्यांच्या सर्व कारवाया मागील प्रमुख व्यक्तीही (मदार-उल्-महाम) तोच झाला. आता गंगेच्या पश्चिमेकडील जिल्हे त्यांच्या हाती पडले. "आपल्या प्रमुख लष्करी केंद्राच्या कक्षेत पण केंद्रापासून दूरदूर पसरलेली अशी अनेक उपठाणी (Out-Posts) त्यांनी स्थापन केली आणि राजमहालपासून मेदिनीपूर व जलेसारपर्यंतचा प्रदेश व्यापला. सर्व श्रीमंत व प्रतिष्ठित लोक, आपल्या स्त्रियांच्या अब्रूचे (honour) रक्षण करण्यासाठी आपल्या घरांचा त्याग करून गंगेच्या पूर्व बाजूला निघून गेले." [सलिमउल्ला १२० अ, सियार (२) १२१–१२२; इंग्रजी F. R. युसुफ ४५].

## § ८ : मराठे हुगळीचा किल्ला जिंकतात

बंगालच्या दक्षिण भागात, गंगेच्या पश्चिम तीरावर, हुगळी हे मुघल राज्यकारभाराचे सर्वात महत्त्वाचे ठाणे होते. या ठाण्याच्या कक्षेत कलकत्ता, चंद्रनगर आणि चिन्सुरा या अनुक्रमे इंग्रज, फ्रेंच व डच यांच्या प्रमुख व्यापारी वखारी येत होत्या. समुद्रातून जाणाऱ्या-येणाऱ्या, बंगालमधील सर्व व्यापारी जहाजांना अवश्य असणारा कारभारविषयक सर्व अधिकृत व्यवहार या ठाण्याशीच करावा लागे. पश्चिम बंगालमधील मुघलांच्या आरमारी सत्तेचे प्रमुख केंद्रही येथेच असून नबाबाच्या प्रजेसाठी परदेशी व्यापाराचे प्रमुख केंद्रही

हेच होते. अशा या हुगळी ठाण्याचा यावेळी प्रमुख अधिकारी—फौजदार—"महमद रझा" हा होता. हा फौजदार आपल्या कर्तव्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून आपल्या रात्री, आकंठ पिण्यात आणि तरुण नर्तिकांच्या व गाणाऱ्यांच्या संगतीत मजा करण्यात घालवी.[1] येथील पर्शियन व्यापाऱ्यांमध्ये मीरहबीबचे अनेक जुने मित्र असून त्यातील एक अबुल हसन हा त्यांचा पुढारी होता. हबीबने त्यांच्याकडे गुप्तपणे दूत पाठविले आणि या विश्वासघातकी लोकांनी किल्ला शत्रूच्या ताब्यात देण्याचा एक कट रचला. ठरविलेल्या रात्री शेषरावाच्या अधिपत्याखाली २००० मराठा सैन्य घेऊन मीरहबीब गुपचूप किल्ल्याबाहेर येऊन पोहोचला. कटात ठरल्याप्रमाणे अबुल हसन याने महमद रझाला कळविले की, "तुमचा जुना मित्र मीरहबीब दरवाजाजवळ उभा असून तुमच्याबरोबर खाजगी मुलाखत मिळावी अशी नम्र विनंती करीत आहे." दारूची नशा चढलेल्या फौजदाराने काहीही चौकशी न करता किंवा नित्याचे सावधगिरीचे उपायही न योजता दरवाजा उघडण्याचा हुकूम दिला. दरवाजातून आत हबीब जाऊ लागला असतानाच, काही मराठे त्याच्याबरोबरच एकाएकी आत घुसले व त्यांनी पहारेकऱ्यांना नेस्तनाबूद करून किल्ला ताब्यात घेतला आणि नबाबाच्या तेथील अधिकाऱ्यांना गिरफदार केले (जुलईच्या आरंभी).

## § ९ : संपूर्ण पश्चिम बंगाल मराठ्यांनी व्यापला

अशा प्रकारे हुगळी मराठ्यांच्या ताब्यात गेली आणि त्या ठिकाणी जे त्यांचा मुख्य कारभारी—गव्हर्नर म्हणून शेषरावाची नेमणूक झाली. अन्य मराठा सरदारापेक्षा तो निराळा होता. विनयशील इतरांबाबत विचारपूर्वक वागणारा न्यायी व दयाळू असा तो होता. त्याने चांगला कारभार करून लवकरच जमिनीचे मालक आणि या भागातील युरोपियन व्यापारीसुद्धा आपल्या बाजूला वळविले. मीरहबीब मराठ्यांच्या वतीने बंगालचा दिवाण म्हणून काम करू लागला. जमीन महसूल गोळा करण्याची व्यवस्था करण्यासाठी जमीनदारांना आपल्यासमोर बोलावून आणण्यास त्याने हाताखालचे नोकर (बेलीफ) पाठविले आणि वसुलीसंबंधीच्या सर्व प्रश्नांबाबत आपण नागपुरच्या राजाचा सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी आहोत असेच तो वागू लागला.

शिवाय मीरहबीबने काही तोफा व एक तोफ बसविलेले एककाठी गलबत (Sloop mountaining guns) हेही कटव्याला नेली. या वेळेपर्यंत हल्ला करणारी मराठा सैन्ये हलक्या शस्त्रांनीच सुसज्ज असत. त्यांच्याकडे नसलेली ही दोन नवी शस्त्रे या तोफा व हे गलबत मीरहबीबने अशा रीतीने त्यांना मिळवून देऊन त्यांच्या सामर्थ्यात भर घातली. त्याने ही शस्त्रे मिळवून दिली नसती तर ती मिळण्याची शक्यता मराठ्यांच्या स्वप्नातही आली नसती.

---

१ सियार (२) १२२ नुसार या बंदराचा मुख्य अधिकारी (बंदराचा गव्हर्नर याला हाकिम म्हणत.) म्हणून अलिवर्दीचा नामांकित भाऊ महमद यारखान हा होता. याला लोकामध्ये मिर्झा प्यारे (Piare) असे म्हणत. चंद्रनगर येथील वखारवाल्यानी, मराठ्यांच्या कैदेतून त्याला सोडविण्यासाठी रु. ४०००, खंडणीपोटी पाठविले होते. 'रियाझ ३४४' मध्ये महमद रझा याला 'नायब फौजदार' म्हटले आहे. 'सलिमुल्ला ११९ ब" मध्ये चुकीचे लिहिले आहे की, त्यावेळी हुगळी 'महमद रझा आणि मिर्झा प्यारे.' फौजदार यांच्या अधिकाराखाली होती. 'महाराष्ट्र पुराण' मध्ये 'शेरखान' हा हुगळीचा 'फौजदार' असा चुकीचा निर्देश आहे. युसुफ ४६.

अशा रीतीने नबाबाचा राज्यकारभार आता पश्चिम बंगालपुरता संपला पण उत्तर बंगालमध्ये म्हणजे मुर्शिदाबादेपासून उत्तरेकडे व पूर्वेकडे आणि तसाच पूर्व बंगालमध्ये मात्र तो चालू राहिला. तरीही पूर्वेकडील प्रदेश मराठ्यांचे हल्ले व त्यांच्याकडून होणारी नासधूस यापासून नेहमीच सुरक्षित राहिला असे मात्र नाही. जूनमध्ये मोहीमेवरून भास्कर परत आल्यानंतर त्याच्या सैन्याचा मुख्य भाग कटवा येथे राहिला, पण त्यांच्या लहान लहान तुकड्या कासिमबझार बेटाच्या आसपास फिरू लागल्या. एकदा-दोनदा तर या तुकड्या पलाशी आणि दाऊदपूर (पलाशीच्या उत्तरेस ७ मैल आणि मुर्शिदाबादेच्या दक्षिणेस वीस मैल) येथपर्यंत दूर शिरल्या आणि आसपासची खेडी जाळून परत कटव्याला आल्या. मीर-हबीबने, जवळपासच्या आणि दूरच्याही भागातून लष्कराकरिता जबरदस्तीने नावा आणविल्या आणि त्यांचा एक पूल दाइनहाट येथे बांधला. या पुलामुळे हल्ला करणाऱ्या मराठ्यांना एका काठावरून दुसऱ्या काठावर सहज नदी ओलांडता येऊ लागली. महिन्याभराने पावसा-मुळे गंगा नदी भरून वाहू लागली आणि नंतर मात्र मराठ्यांना नदी ओलांडून पूर्व किनाऱ्यावर येता येईनासे झाले.

## § १० : मराठ्यांनी केलेली जुलमी कृत्ये आणि नासधूस

ज्या प्रदेशामधून नबाबाची सत्ता नाहीशी झाली होती त्या प्रदेशात जिकडेतिकडे रस्त्यावर आणि खेड्यांमधून मराठ्यांच्या टोळ्यांनी काहीही विचार न करता, लहर येईल तसा नाश आणि वर्णन करता येणार नाही इतका जुलूम केला.

त्यांच्या या जुलमी कृत्यामुळे सबंध बंगालमध्ये संपूर्ण धास्ती पसरली. इंग्रज वखारी-तील पत्रामध्ये देशातील स्थितीचे रसभरीत वर्णन केले आहे ते असे: "मराठे बिरभूम लुटीत असून (जुलई १७४२) सर्व व्यापार बंद पडला आहे आणि व्यापारी व विणकर शक्य असेल तिकडे पळून जात आहेत."

ही स्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पहाणारा बंगाली कवी गंगाराम लोकांना सहन कराव्या लागलेल्या हालअपेष्टांचे वर्णन करतो ते असे: "बार्गीजानी खेडी लुटण्यास सुरुवात केली. सर्व वर्गाचे लोक आपआपली मालमत्ता घेऊन पळ काढू लागले. एकाएकी बार्गीज आले आणि त्यांनी मैदानावरच लोकांना वेढले, त्यांच्याकडील सोने व चांदी हिसकावून घेतली आणि इतर सर्व सोडून दिले. काही लोकांचे त्यांनी हात कापले, काहीचे नाक आणि कान कापले आणि काहीना त्यांनी ठार मारले. सुंदर स्त्रियांना त्यांची बोटे दोरीने मानेला बांधून, त्यांनी फरफटत ओढून नेले. एका बारगीने एका स्त्रीवर बलात्कार संपविला की दुसरा तिला पकडी[1] आणि अशा या बलात्काराच्या तीव्र वेदनांनी स्त्रिया किंचाळत. अशा रीतीने सर्वच प्रकारची पापी कृत्ये केल्यावर या स्त्रियांना त्यांनी सोडून दिले. नंतर या उघड्या, मोकळ्या मैदानात लुटालूट करून हे 'बार्गीज' खेड्यात शिरले. तेथे त्यांनी लहान व मोठी घरे, देवालये आणि रहाण्याची इतर ठिकाणे यांना आगी लावल्या. खेडी जाळल्यावर लुटालूट करीत सगळ्या बाजूंना, इकडेतिकडे ते भटकले. यामध्ये हाती सापडलेल्या

१ बार्गी हा बारगीर शब्दाचा अपभ्रंश होय. (बारगीर: पर्शिअन भाषेतून मराठीत उसना आलेला शब्द) याचा अर्थ असा: सरकारने ज्याला घोडा आणि शस्त्रे पुरविली आहेत असा घोडेस्वार. याच्या उलट अर्थाचा शब्द 'शिलेदार' हा होय. 'शिलेदार' म्हणजे स्वतःच्या खर्चाने घोडा व शस्त्रे बाळगणारा घोडेस्वार.

[पुढील पानावर]

काही बळींचे हात पिरंगळून त्यांनी पाठीशी बांधून ठेवले, काहींना खाली आपटून त्यांनी आपल्या पादत्राणासहित पायांनी लाथा मारल्या. अशावेळी हे बारगी सारखे ओरडत "आम्हाला रुपये द्या, आम्हाला रुपये द्या, आम्हाला रुपये द्या." ज्यांच्याकडे त्यांना रुपयाही सापडला नाही अशा पकडीत सापडलेल्या बळींच्या नाकपुड्यात पाणी घातले किंवा त्यांना तलावात बुडवून टाकले. काही जणांचा श्वास कोंडून त्यांनी ठार मारले. ज्यांच्याजवळ पैसा होता त्यांनी तो देऊन टाकला आणि ज्यांच्याजवळ काहीच पैसा नव्हता त्याना मरण पत्करावे लागले. भागीरथी ओलांडून गेल्यावरच लोकांना सुरक्षितता लाभली."

या घटनांचा आणखी एक समकालीन, बरदवानच्या महाराजांचा पंडित–बाणेश्वर विद्यालंकार–याने नोव्हेंबर १७४४ मध्ये लिहिले आहे ते असे :–"शाहूराजाचे सैनिक, दया दाखविण्याच्या दृष्टीने मोठे कंजूष आहेत. गर्भवती स्त्रिया, लहान बालके, ब्राह्मण आणि गरीब यांना ते ठार मारणारे, वृत्तीने उग्र, प्रत्येकाची मालमत्ता लुबाडण्यात आणि हरएक प्रकारचे पापी कृत्य करण्यात पटाईत आहेत. त्यांनी तर या प्रदेशापुरता, एक सर्वभक्षक प्रलय निर्माण केला आणि एखाद्या अभद्र धूमकेतूचा उदय व्हावा तसे येऊन बंगालमधील खेड्यातील लोकांचा समूळ नायनाट केला . . . एका दिवसांत ते १०० योजने जाऊ शकतात. निःशस्त्र, गरीब, स्त्रिया आणि मुले यांना ते ठार मारतात, सर्व मालमत्ता लुटतात आणि पतिव्रता स्त्रियांना पळवून नेतात. प्रत्यक्ष लढाईची वेळ आली तर अन्य प्रदेशाकडे ते गुपचूप पळून जातात. त्यांचे मुख्य सामर्थ्य आहे ते आश्चर्य वाटण्यासारख्या त्यांच्या चपळ घोड्यांमध्ये. बारगी सैन्याचा असा हा, तुफानी महासागर होता."

सलिमउल्ला आणि गुलाम हुसेन सलिम हे मुसलमान इतिहासकारही या वर्णनाला पुष्टी देतात. ते लिहितात : "बारगींनी अनेक लोकांचे कान, नाक आणि हात कापले किंवा अनेक प्रकारांनी छळ करून त्यांना ठार मारले ते, त्यांना अनेक प्रकारच्या यातना भोगावयाला लावून त्यांची तोंडे मातीच्या तोबऱ्यांनी बंद करून वा त्यांना बुडवून ! त्यांनी लोकांची अब्रू व प्रतिष्ठाही नाहीशी केली." (म्हणजेच स्त्रियांची अब्रूही घेतली). चंदरनगर येथील फ्रेंच वखार आणि कलकत्त्याची इंग्रज वसाहत येथून आलेली पत्रेही, जुलुमाची हीच कथा सांगतात.

---

[ मागील पानावरून ]

फार जुन्या काळापासून मराठा सैनिक हे त्यांनी हल्ला केलेल्या मुलुखात गटागटाने सामुहिक बलात्कार करण्याबाबत (Gang Rape) कुप्रसिद्ध होते. स. १६८३ साली, प्रत्यक्ष त्यांचा राजा संभाजी याच्या नेतृत्वाखाली जेव्हा त्यांनी गोव्यावर स्वारी केली तेव्हा अशाप्रकारचा बलात्कार त्यांनी केला होता. त्या युद्धाच्या, एका तत्कालीन पोर्तुगीज वर्णनामध्ये लिहिले आहे ते असे: "हे शत्रू इतके रानटी होते की ज्यावेळी एखादी स्त्री फार सुंदर (अक्षरशः सर्वात सुंदर) आहे असे त्यांना वाटे त्यावेळी त्यांच्यापैकी पाचसहाजण त्या एकाच स्त्रीवर बलात्कार करीत. आतापर्यंत असा रानटीपणा, हिंदुस्तानात अन्य कोणत्याही ठिकाणी दिसून आलेला नाही, इतकेच नव्हे तर काफी (निग्रो) लोकांमध्येही नाही. या कारणामुळे मडगावच्या अनेक स्त्रियांनी तेथील छोट्या तलावात उड्या टाकल्या आणि त्या बुडून मरण पावल्या. ज्या अन्य स्त्रियांनी शत्रू सैन्यापैकी काही जणांच्या अशा (कामुक) बेताना शौर्याने विरोध केला त्या, या सैनिकांच्या रुंद पात्याच्या तरवारींच्या घावांनी ठार मारल्या गेल्या आणि इतर काहींची स्तने कापली गेली." [पिसुर्लेकरांचे—पोर्तुगीज व मराठे–(२) ४९ याचे भाषांतर. पोर्तुगीज रेकॉर्डस –'नोटिसिआ-दा-इंडिया'—खंड १ विभाग २ चे या संदर्भाचे आणखी एक इंग्रजी भाषांतर O. L. मध्ये आहे. तंजावरमध्ये अशाच प्रकारचे बलात्कार झाले याबाबत पहा : बर्ट्रांडचे वृत्त—मिशन द प्रदुरे—(मदुरेची कामगिरी (३) २७०).

## § ११ : कटवा येथील मराठा छावणीवर नबाबाचा अचानक हल्ला २७ सप्टेंबर १७४२

असे हे सर्व, आपल्या प्रजेला सहन करावे लागत असताना, अलिवर्दीने प्रथम आपल्या राजधानीचे संरक्षण करण्याच्या कामाकडेच सर्व लक्ष केंद्रीत केले. यासाठी त्याने राजधानी-बाहेर, अमानीगंज आणि तारकपूर येथे छावण्या स्थापल्या आणि शत्रूविरुद्ध मोहीम काढण्याचे काम, येणाऱ्या हिवाळ्यापर्यंत पुढे ढकलण्याचे ठरविले. त्यावेळेपर्यंत, पूर्णिया आणि पाटणा येथील त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांकडून मागविलेली मदत येऊन पोहचणार होती. ते अधिकारी, पावसाळा संपण्यापूर्वीच, अनुक्रमे ५००० आणि १२००० सैनिक बरोबर घेऊन त्याच्याकडे आलेही.

झइनउद्दीन अहमद (पाटण्याचा नायब नझीम) याने आग्रह धरल्यामुळे, अलिवर्दीने शहाणपणाने आपली योजना बदलली. रस्ते कोरडे झाल्यावर आणि नदीच्या पाण्याची पातळी खाली गेल्यावर, चपळ मराठा घोडदळाला, त्यांच्या जलद हालचालींचा स्वाभाविक फायदा परत उपलब्ध होईल हे लक्षात घेऊन त्यापूर्वीच त्यांच्यावर हल्ला करण्याचे त्याने ठरविले. दरम्यान, पश्चिम बंगालवर मिळविलेला ताबा निश्चित व सुरक्षित झाल्याचे पाहून, दुर्गापूजा हा बंगाली हिंदूंचा सर्वात मोठा सण, भास्कर अतिशय डामडौलात साजरा करीत होता[१], ते सगळ्या जमीनदाराकडून सक्तीने वर्गणी गोळा करून अशा समारंभात तो दंग असताना या सणाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे नवमीला—२७, सप्टेंबर १७४२ सकाळी अगदी लवकर अलिवर्दीने त्याच्यावर अकस्मात हल्ला केला.

कटवा शहर दोन नद्यांच्या संगमावर वसलेले आहे—पैकी एक, गंगानदी ही उत्तरेकडून दक्षिणेकडे वहाते आणि दुसरी अजय नावाची लहान नदी पश्चिमेकडून येऊन तिला मिळते. नबाब मुर्शिदाबादेहून येणार असल्याने, त्याला कटव्यावर दक्षिणेकडून स्वारी करावयाची असेल तर फक्त गंगानदीच ओलांडावी लागणार होती आणि जर उत्तरेकडून व पश्चिमेकडून हल्ला करावयाचा तर दोन्हीही नद्या ओलांडणे अवश्य होते. यावेळी कटव्याच्या तीरातीराने गंगानदीमधून शत्रूचे एक शस्त्रसज्ज गलबत फिरत असून नदीच्या त्याच बाजूवर मराठा सैन्यही हुशारीत होते, यामुळे या ठिकाणी गंगा ओलांडणे त्याला अशक्य होते. तरीही त्याने कटव्यासमोर शहराकडे तोंड करून, नदीच्या पूर्व किनाऱ्यावर आपले खंदक खणून पाय रोवले होते. तेथून त्याने नदीपलीकडील मराठ्यांच्या ठाण्यावर आठ दिवस तोफांचा माराही केला पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तेव्हा त्याने ठरविले की, गुप्तपणे शत्रू सैन्या-पाशी पोहोचण्यासाठी, उत्तर व पश्चिमेकडून बऱ्याच लांबून फेरा मारावयाचा आणि संरक्षण व्यवस्था नसलेल्या शत्रूच्या पश्चिम बाजूवर अकस्मात हल्ला चढवावयाचा. यावेळी कटव्याच्या उत्तरेला, बऱ्याच मैल अंतरापर्यंत, गंगेचे दोन्ही किनारे नबाबाच्या ताब्यात असून, त्या बाजूला एकही मराठा पथक दृष्टीपथात नव्हते. अशा या भागात उद्धरणपूरजवळ नबाबाने गंगेवर मोठमोठ्या नावांचा पूल बांधला आणि आपल्या निवडक सैनिकांची, तुफानी हल्ला करणारी पथके ( Storm troops ) त्या पुलावरून अजय नदीच्या उत्तर किनाऱ्यावर नेली.

---

१ (भा. पृ. ४६–४७ वरील—टीप ही पहा.) गंगारामच्या म्हणण्याप्रमाणे—बंगाली भाषेतील महाराष्ट्र पुराण, यानुसार—"दैनहाट" मध्ये हा सण साजरा होत होता. ऑगस्टच्या अखेरीस, भास्कराने आपल्या दोन सेनाधिकाऱ्यांना रघूजी भोसले यांच्याकडे कुमक पाठवा असा आग्रह करण्यासाठी पाठविले होते. हे अधिकारी राजाच्या दरबारात १५ सप्टेंबरला पोहोचले. [राजवाडे (३) पत्र २२२].

मराठा छावणीच्या पश्चिमेला, म्हणजे डाव्या बाजूला, सुमारे एक मैलावर, नबाबाने, हळूहळू शत्रूला संशयही येऊ न देता आणि त्याचा काहीही विरोध न होता, अनेक लहान लहान नावा एकत्र केल्या. हे त्याने साधले ते एका कावेबाज युक्तीने-एकावेळी एकच नाव, प्रथम गंगेमधून व पुढे अजय नदीतून, वर प्रवाहाच्या उलट दिशेने, हळूहळू सरकवत पाठविण्याच्या कावेबाज युक्तीने. या नावा वापरून नबाबाच्या इंजिनियरानी अतिशय परिश्रम करून, जलदीने व आवाज न करता, एक पूल मध्यरात्रीपर्यंत पुरा केला. नंतर या पुलावरून, पलीकडील मराठ्यांच्या बाजूकडे, नबाबाचे सैन्य नदी ओलांडू लागले. असे ते जात असताना, पुलाच्या मध्यावरील एक नाव, त्यावरून जाणाऱ्या माणसांच्या आणि जनावरांच्या ओझ्यामुळे मोडली आणि बुडाली, आणि चालू असलेला, सैन्याचा ओघ थांबविता येईपर्यंत, बंगालच्या नबाबाचे १५०० सैनिक बुडून मेले. नबाबाने लगेच, आपल्या सर्व मशाली विझविल्या आणि कोणत्याही प्रकारची धोक्याची सूचना मराठ्यांच्या छावणीपर्यंत पोहोचण्याचे वाचविले. काही तासातच, झालेल्या मोडतोडीची दुरुस्ती करून सैन्याचे नदी ओलांडणे पुन्हा सुरू झाले. पहाट उजाडत असल्याची अगदी पहिली चिन्हे दिसेतोपर्यंत नबाबाच्या सैन्यापैकी सुमारे २५०० लोकच अजयच्या दक्षिण काठावर पोहोचले. आलेले सैनिक थोडे आहेत हे आता वाढत्या प्रकाशामुळे मराठ्यांना समजून येऊन हा सर्वच प्रयत्न अयशस्वी झाला असता. यासाठी बाकीच्या सैन्याने नदी ओलांडण्याची यापुढे वाट न पहाता, आलेल्या सैन्यानेच, मराठ्यांच्या छावणीपर्यंतचे एक मैल अंतर झपाट्याने काटून, मोठमोठ्याने आरोळ्या मारीत त्या छावणीवर हल्ला केला. चाल करून आलेले सैन्य किती आहे हे पहाण्यासाठी न थांबता व प्रतिहल्लाही न करता मराठ्यांनी पळ काढला. इंग्रज वखारीतील एका पत्रात नमूद केल्याप्रमाणे "कोणत्याही बाजूचे फारसे सैनिक मारले गेले नाहीत" पण नबाबाला पूर्ण विजय मिळाला. मराठ्यांच्या या धांदलीमुळे त्यांना आपले सर्व तंबू, सामानसुमान आणि मालमत्ता मागे टाकून पळावे लागले. सबंध सकाळभर नदीपलीकडील आपले सैन्य व सामानसुमान अशी कुमक, नावातून अजय नदी ओलांडून नबाबाने आणविली आणि स्वतः युद्धाच्या ठिकाणी येऊन, काही अंतरापर्यंत शत्रूचा पाठलागही आपल्या हाती घेतला. नंतर शत्रूने सोडून दिलेल्या छावणीत तो परत आला. [सियार (२) १२४–१२६; महाराष्ट्र पुराण; सलीम्-उल्ला १२१ अ–१२२ अ; युसुफ ४९; करम १९ अ–२० ब.]

## § १२ : नबाबाने चिल्का सरोवरापर्यंतचा प्रांत, मराठ्यापासून मुक्त केला, डिसेंबर १७४२

भास्कराने पाचेटच्या बाजूने पळ काढला. जिकडेतिकडे विखुरलेल्या त्याच्या पथकानीही, बरद्वान, हुगळी, हिजली आणि इतरही ठिकाणे सोडून दिली. पण भास्करचा पाठलाग करण्यामध्ये बंगालच्या सैन्याला जंगलाचा अडथळा झाला. भास्करनंतर दक्षिणेकडे वळला आणि चंद्रकोण।चे बाजूने पुढे सरकून त्याने मेदिनीपूर जिल्ह्यात आपले डोके पुन्हा वर काढले. तेथे नारायणगढला आपला मुख्य तळ स्थापून, त्याने राधानगर व इतर मोठी ठाणी लुटली आणि जाळली. तेथून त्याने एक पथक कटकला पाठविले. या पथकाने त्या शहराचा मुख्य अधिकारी शेख मसुमऱ्याचा जाजपूर येथे पराभव करून त्याला ठार मारले आणि कटक शहर जिंकले. या हालचालींची माहिती मिळाल्यावर, अलिवर्दी, पाचेटपासून बाजूला, मेदिनीपूरच्या दिशेने वळला. पुढे मराठ्यांचा सतत पाठलाग करून, त्यांना, चिल्का सरोवराच्या पलीकडे, त्याने पिटाळून लावले. (डिसेंबर १७४२). अशा रीतीने अखेरी, बंगाल आणि

ओरिसा, हल्लेखोरांच्या हातातून पूर्णपणे मोकळे केले गेले. नंतर, राज्यकारभाराची पुन्हा घडी बसविण्यासाठी, नबाब कटकला काही आठवडे थांबला आणि पुढे ९ फेब्रुवारी १७४३ च्या सुमारास, अशा रीतीने विजयी होऊन मुर्शिदाबादेकडे परत आला.

## § १३ : औंधचे सैन्य पाटण्याला आले, डिसेंबर १७४२

बंगाल-ओरिसा-बिहार या सुभ्यावरील मराठ्यांची पहिली मोहिम, त्यांचा पराभव करून, डिसेंबर १७४२ पर्यंत परत पिटाळून लावली होती पण दरम्यान एका अनपेक्षित संकटाने बिहारला धोका निर्माण केला होता. यातून दिल्ली साम्राज्याला पूर्णपणे लागलेली कीडही दिसून आली. भास्कराने ओरिसामध्ये प्रथम हल्ला केला त्यावेळी अलिवर्दीखानाने, बादशहाकडे मदतीसाठी, कळकळीची विनंती केली होती. त्यानुसार बादशहाने, औंधचा सुभेदार सफ्दरजंग याला तिकडे जाऊन बिहारच्या सुभ्याचे रक्षण करण्याचा आणि नंतर जरूर तर बंगालमध्ये जाण्याचा हुकूम दिला होता. [1]यानुसार सफ्दरजंगाने बरोबर ६००० पर्शिअन घोडेस्वार (हे पूर्वी नादीरशहाचे सैन्यात होते). १००००, हिंदुस्थानातील चांगले सैनिक आणि बलाढ्य, शक्तीशाली तोफखाना बरोबर घेऊन, आपले मुख्य ठाणे–फैजाबाद–सोडले. सफ्दरजंगाचे सैनिक अतिशय अनावर, बेबंद असून, त्यानी बिहारमध्ये सर्व प्रकारचे जुलूम, बलात्कार केले. अर्थातच संरक्षक म्हणून आलेल्या या सैनिकांचे क्रौर्य आणि लोभीपणा यांची बिहारच्या लोकांना अतिशय धास्ती वाटली.

पाटणा शहराला भेट दिल्यावर आणि त्याचा किल्ला पाहिल्यानंतर (७ डिसेंबरचे सुमारास), या शहराच्या पश्चिमेस पाच मैलावर बंकीपूर येथे सफ्दरजंगाने आपला तळ ठेवला, आणि जणूकाय आपण त्या प्रांताचा कायदेशीर धनी आधीच झालो आहोत अशा प्रकारे तो वागू लागला. पुढे ओरिसाहून अलिवर्दी परत आला असून त्याला मदत करण्यासाठी पेशवा बाळाजीराव जलदीने बिहारकडे येत आहे अशी बातमी मिळाल्याबरोबर, सफ्दरजंगाने घाईने पाटण्याहून माघार घेतली आणि मुनीरजवळ, नावांच्या पुलावरून गंगा ओलांडून (१५ जानेवारी १७४३ च्या सुमारास), आपल्या प्रांतात परत प्रवेश केला. [सियार (२) १२७–१२९; युसुफ ५३; इमाद्-उस्-सादत, ३३–३४].

## § १४ : मराठ्यांची दुसरी स्वारी, १७४३

भास्करने केलेल्या विनंतीनुसार[2] रघूजी भोसल्यांनी बरोबर मोठे सैन्य घेऊन रामगढच्या रस्त्याने कटव्याकडे स्वतः कूच केले. (तेथे तो मार्चच्या आरंभी पोहोचला.). तो आला ते, या तिन्ही प्रांतातून सक्तीने चौथ वसूल करण्याचा निर्धार करून; कारण मुघल बादशहाने हा चौथ शाहूला देण्याचे वचन दिले होते आणि त्या राजाने तो वसूल रघूजीला नेमून दिला होता. रघूजीच्या या हालचालीला प्रतिशह देण्यासाठी, त्याचा प्रतिस्पर्धी आणि व्यक्तीगत शत्रू पेशवा बाळाजीराव याला, बादशहाने कळकळीची विनंती केली आणि पेशव्यानेही रघूजीला विरोध करण्यासाठी, बंगालमध्ये सैन्य नेण्याचे मान्य केले (ही मान्यता नोव्हेंबर १७४२ इतक्या पूर्वीच दिली होती).

१ प्रकरण १ § १५ पहा.
२ पहा § ११, परि. २ मधील संदर्भ टीप.

## § १५ : पेशवा बाळाजीराव बिहारमध्ये शिरतो, फेब्रुवारी १७४३

फेब्रुवारी १७४३ च्या आरंभीच, बरोबर बलाढ्य सेना घेऊन पेशवा दक्षिणेकडून बिहारमध्ये शिरला. त्यावेळच्या अफवेनुसार या सैन्यात अर्धा लाख लोक होते.[1] पेशवा, मित्राचे रूपाने येत असला तरी, तो येत असल्याच्या बातमीमुळे सबंध प्रांतात अतिशयच धास्ती निर्माण होऊन सर्वांची पाचावर धारण बसली, आणि याला कारणही चांगलेच होते. त्याच्या सैन्याला प्रतिकार करणे शक्य नव्हते,–"त्याच्या मार्गावर असणाऱ्यापैकी ज्यानी त्याला,

---

१ बिहार व बंगालमधून पेशव्यांच्या या मोहिमेचा मार्ग त्यांच्या रोजनिशीत दिला आहे तो पुढीलप्रमाणे: [वाड (२) पृ. २४२–२४३, दुरुस्त केल्याप्रमाणे. वाड––साताऱ्याचे राजे व पेशवे यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे.... जी. मी. वाड व इतर यानी संकलित केलेले].... (टीप: भा. प्रस्तुत टीपेमध्ये ठिकाणे, दिशा, यांची नावे व मैलांची संख्या यांचे निर्देश फारच आहेत. यासाठी भाषांतरात हे निर्देश संक्षिप्त रूपात केले आहेत ते असे:.... मैल-मै. दिशांचे निर्देश: पू., प., द., उ, ई. (ईशान्य), आ. (आग्नेय) नै. (नैऋत्य) वा. (वायव्य), आ. पू. (आग्नेय पूर्व) इत्यादी संक्षेप वापरले आहेत. तसेच पर. (परगाणा) S. S. E. जि. (जिल्हा-प्रांत) हेही संक्षेप वापरले आहेत. मुक्कामाच्या ठिकाणांची नावे अधोरेखित केली आहेत.)

मार्ग पुढीलप्रमाणे: १७४३ जानेवारी २६–३०, अलाहाबाद, दक्षिण काठ..... फेब्रुवारी ४, मिर्झापूर-जवळ, विंध्याचल...... ८–१०, बनारसजवळ रामपुरा (रामनगर)..... १३–१४, दुर्गावती नदी (जहानाबादजवळ),..... १५, ससेराम.... १६–१७ शोणनदी दाऊदनगरजवळ ओलांडली...... १८, पुनपुननदी.... २३ गया..... मार्च ८, ९ गंगानदी (मोंगीर जवळ).... १४, खरगपूर टेकड्या-मध्ये जामडा (२२ मै. वैद्यनाथ देवगरचे ईशान्येस)..... १५, लक्ष्मीपूर परगण्यामध्ये, गोकुळ..... १६ हुंडआ परगण्यात, धनवा (दुमकाची उ. २५ मै.)..... १७–१८. सारंगपाणी (नवा दुमकाचे उ. स १४ मै.)..... १९ फत्तेपूर, (दुमकाचे द. स. ९ मै.)..... २० भाडू (बहारू, नगरचे उ. स. १० मै. आणि सूरचे उ. स. १५ मै. मोर नदीच्या उत्तर किनाऱ्यावर)..... २१ बिरभूममधील रणगाव पाथरा (बहुधा पाथरगंज, सुरीचे पश्चिमेस ७ मै.)..... २२ लोणी बिरभूम पर पैकी पुराना (बहुधा परनगाव, सुरीच्या ईशान्येस, १० मै.),.... २३–२५, बिरभूमपैकी कोटमोमलेश्वरमधील काल्पीपुरा (कल्पापूर, मयुरेश्वरचे द. स. २ मै. मयुरेश्वर सुरीचे ई. स. १५ मैल. रेनेल याचे म्हणण्याप्रमाणे कोट मोलिश्वर) ... २६, बुहालिया. फत्तेसिंह पर (कांदी गोपिनाथपूरच्या द स. २ मै.). .... २७–३० चौरियागाचा (रांगमतीचे द. स. ४ मै. गंगेचा प. किनारा). ३० मार्चला पेशवा अलिवर्दीखानाला भेटला...... एप्रिल १–२ बसुरा (पलाशीचे प. ३ मै. गंगेच्या प. काठावर आणि चौरिया घाटाच्या द. स.).... बारोद पर. मोकादमध्ये .....४, बरदवान जिल्ह्यात-बऱ्हाणपूर (बहुधा उधनपूर उतार, कटव्याचे उत्तरेस ३ मै.).... ७ एप्रिलला अलिवर्दी पेशव्याला छावणीत भेटला.... ९, दिगनगर (बरदवानच्या वा. स. १८ मै.) येथून एकदम पेशव्याने आपले सैन्य घेऊन पुढे जलद कूच केले.... १०–१३ कक्षा (दिगनगरच्या पश्चिमेस १५ मै.).... १५ विष्णुपूर परगोण्यातील बाम्हणी?.... १६ माजगाव (आधुनिक मेजिआ. कक्षाचे वा. स. २४ मै. दामोदर नदीचे द. स.).... १७, सिरापूर (आधुनिक सिरपुरा, मेजियाच्या प. स. १४ मै.).... १८ बेदो (सिरपुराचे नै. स. ५ मै. व खजुरा रेल्वे स्थानका-पासून २ मै.).... १९, सका (आधुनिक संका. आद्रागोमोह रेल्वे रस्त्यावरील स्थानक).... २०, भाइगथ (आधुनिक बाइकाठ, छद्रपरग, पैकी शेवटचे म्ह. छद्र–हे आद्र–पुरुलिया रेल्वेरस्त्यावरील शेवटचे स्थानक)..... २१–२४ हिसाक, सिकार भुईपर. (आधुनिक हेसा, छद्रच्या नैऋत्येस १२ मै., व पुरुलियाचे नै. स. ८ मै.).... २५, बेंगन कोदार, पाचेत परगण्यात, पुरुलियाचे प. स. २० मै. आणि झाल्डाचे पू. स ७ मै.)..... २६–२७ बरिशा, परगणा राहिशा, राजा नवलशहाचे राज्य, (बहुधा बर्गाह, झाल्डाचे वा. स. ११ मै.).... २८ बेदुगढ छोटा नागपूरमध्ये (बहुधा रामगढ हजारी बागच्या द. आ. स. २६ मै.)... २९ जिती, सिरि पर. (१ जयन्ती नदी).... ३० सिया, परगणा बिशनगढ (बहुधा सिला इचाक, हजारी बागचे प. स. १२ मै.).... मे १, गोविंदपूर? .. गोरी अनंतपूर (बहुधा जोरी, हंटरगंजच्या द. स. १० मै., लिलाजान नदीचा पूर्वकाठ).... १२ अकबरपूर (रोहटस-गढच्या पू. स. ४ मै., शोणनदीच्या प. काठावर). ... १४, ससेराम..... १५ जहानाबाद, दुर्गावती नदीवर.... १८ मुघल सराई..... १९ गंगेच्या काठी.... २१ मिर्झापूर.

धमकीमुळे वा भिऊन पैसे दिले किंवा मौल्यवान देणग्या दिल्या त्यानी आपले प्राण आणि मालमत्ता वाचविली, ज्यानी संरक्षणाचा प्रयत्न केला ते मारले गेले आणि त्यांच्या घरादारांची लुटालूट झाली."–पाटणा शहर आपल्या प्राणाच्या रक्षणासाठी थरथर कापत होते. त्यातील नागरिकांना एकच काळजी होती, ती आपल्या स्त्रियांना नदीपलीकडे अन्य ठिकाणी पाठवून आपल्या कुटुंबियांची अब्रू वाचविण्याची व बलात्कारापासून वाचविण्याची. इंग्रजांच्या वखारीतून पाठविलेल्या एका अहवालात, या स्वारीबाबत काही माहिती नमूद केलेली आहे त्यानुसार –"लक्षणीय असे एकही कुटुंब शहरात शिल्लक राहिले नव्हते"–तथापि आनंदाची गोष्ट ही की, पेशवा पाटण्याला आलाच नाही. बनारसहून पुढे ससेराम, दाऊदनगर, गया आणि मोंगिर या मार्गाने तो जलदीने बंगालकडे गेला–जाताना त्याच्या वाटेतील शहरांचे त्याने मोठे नुकसान करून तेथे खूपच गोंधळ उडविला. या रस्त्यावर असलेल्या टेकड्या आणि जंगले ओलांडून तो बिरभूमच्या मदानावर आला व पुढे मुर्शीदाबादेच्या रस्त्याला लागला. या हालचाली चालू असताना दुसरीकडे रघूजीने बरदवान जिल्हा व्यापला आणि आपला मुक्काम कटव्याला ठेवला. अशा रीतीने मराठ्यांच्या दोन अफाट सेना, प्रत्येकी, त्यांच्यापैकी एका प्रथम श्रेणीतील नेत्याच्या अधिपत्त्याखाली, एकमेकाजवळ बंगालमध्ये गोळा झाल्या आणि या दोन सैन्यांमधील लढा, जवळ आल्यासारखे दिसले. [सियार (२) १२९–१३०, युसुफ ५७–५९].

## § १६ : पेशवा आणि नबाब यांची मुलाखत, रघूजीला प्रांताबाहेर घालविले

बाळाजी मुर्शीदाबादेपासून २० मैलावर आल्याचे अलिवर्दीला कळले, तेव्हा त्याने आपला जमादार गुलाम मुस्तफा याला, गंगाधरराव व अमृतराव या पेशव्यांकडून आलेल्या प्रतिनिधीबरोबर, पिलाजी जाधवांच्याकडे पाठविले. हे पिलाजी पेशव्यांच्या आघाडीच्या पथकांचे प्रमुख सेनापती होते. आलेल्या माणसांचे बरोबर पिलाजी नबाबाकडे आला. तेथे त्याने व नबाबाने एकमेकाशी इमानी रहाण्याचा व मैत्रीची खात्री देणाऱ्या शपथांची देवाण-घेवाण केली आणि नंतर पिलाजी आपल्या धन्याकडे परत आला. यानंतर नबाबाने बाळाजीच्या छावणीच्या दिशेने पुढे जाऊन लावडा या खेड्याजवळ (बऱ्हामपूर Berhampur कॅन्टोन्‌मेंटपासून ७ मैलावर) आपली छावणी ठेवली. या खेड्यापासून बाळाजीची छावणी फक्त ६ मैलावरच होती. या दोन छावण्यांच्या साधारण मध्यावर दोघांच्या मुलाखतीसाठी शामियाने उभे करण्यात आले.

पिलाजी जाधव, मल्हार होळकर आणि इतर काही सेनापतींना बरोबर घेऊन, बाळाजी ३१ मार्चला, भेटीच्या ठिकाणी आला. नबाब व बाळाजी यांची मुलाखत झाल्यावर, चार हत्ती, दोन दुभती जनावरे (म्हशी) आणि पाच घोडे अशा भेटी देऊन पेशव्याची परत पाठवणी झाली. आपल्या सुभ्याबाबत, नबाबाने शाहूना **चौथ** आणि शिवाय पेशव्याना सैन्याच्या खर्चासाठी २२ लाख रुपये द्यावे आणि रघूजीबाबत अंतिम तडजोड पेशव्याने घडवून आणून भविष्यकाळात तो पुन्हा बंगालला त्रास देणार नाही, असे करावे, अशी व्यवस्था, या मुलाखतीत उभयपक्षी मान्य झाली. ठरल्याइतकी मोठी रक्कम अलिवर्दीला प्रथम, एकदम देता येईना. तेव्हा, रघूजीच्या नाजूक दयाबुद्धीवर बंगालला सोपवून आपण निघून जाऊ अशी धमकी पेशव्याने दिली आणि नबाबाला ही रक्कम पेशव्याला देणे भाग पडले.[1]

१ "मराठा सेनापतीनी, शाहूराजाच्या नावे बंगालच्या चौथाईची मागणी केली. याबाबत आपण स्वतः व नबाब यांची मुलाखत व्हावी अशी बाळारावाने सूचना केली. ही मुलाखत ३१ मार्चला प्लासी येथे झाली. यावेळी

[पुढील पानावर]

यानंतर हे दोघे नवे मित्र, रघूजीला नवाबाच्या प्रदेशातून पिटाळून लावण्यासाठी निघाले. ते आपल्या बाजूने पुढे येत आहेत हे कळल्यावर रघूजीने कटवा आणि बरद्वान यांच्या दरम्यान असलेली आपली छावणी उठवून, बिरभूमकडे पळ काढला. त्याच्या दिशेने एक–दोन मुक्कामाच्या अंतरापर्यंत एकत्र कूच झाल्यावर बाळाजीने नबाबाला सांगितले की, त्याचे बंगाली सैनिक, चपळ दख्खन घोडदळाबरोबर दौड करू शकत नाहीत. या परिस्थितीत पेशव्याने एकट्याने, फक्त आपल्याच घोडदळाला घेऊन रघूजीचा पाठलाग केला नाही तर तो निसटून जाईल. नबाबाने याला मान्यता दिली आणि दुसरे दिवशी (१० एप्रिल) बाळाजीने जलद कूच सुरू केले व रघूजीला गाठले, लढाईत त्याचा पराभव केला आणि त्याला पश्चिमेकडील टेकड्यात पिटाळून लावले. यावेळी रघूजीचे पुष्कळ सैनिक मारले गेले व आपले बरेचसे सामानसुमान आणि छावणी लुटायला मोकळी सोडून त्याला पळ काढावा लागला. नागपूर सैन्यातील बरेच अधिकारीही पेशव्याला येऊन मिळाले.

अलिवर्दी, दिगनगरपासून (कटव्याच्या नैऋत्येस ३२ मैलावर) मागे फिरला आणि कटव्याला पोहोचून (२४ एप्रिल) तेथे त्याने आपली मुख्य छावणी स्थापली. यानंतर लवकरच त्याला बाळाजीकडून खलिते आले की रघूजी मानभूम भागातून पलिकडे गेला असून, तो आता संबळपूर रस्त्याला लागला आहे आणि नंतर बाळाजी पाचेट रस्त्याने गयेला गेला आहे. त्या क्षेत्रामध्ये रूढीनुसार आपल्या पूर्वजांच्या नावाने श्राद्ध, दानधर्म इत्यादी करून नंतर बाळाजीने पुण्याच्या रस्त्याने प्रयाण केले.

## § १७ : मराठ्यांच्या धास्तीमुळे झालेली या प्रदेशातील स्थिती

मराठ्यांच्या या दुसऱ्या मोहिमेमुळेही (मार्च-मे १७४३), मागील वर्षातील मोहिमे–सारख्याच जनतेच्या हालअपेष्टा झाल्याचे लिहून ठेवलेले आढळते. फरक इतकाच की, या. वेळेच्या हालअपेष्टा तुलनेने लहानशा प्रदेशात आणि अधिक थोड्या काळापुरत्याच झाल्या या संदर्भात कलकत्त्याचे इंग्रज व्यापारी लिहितात. "काही काळ, कलकत्ता, कासिमबझार आणि पाटणा येथील आमचा व्यापार-व्यवहार पूर्ण बंद करण्यात आला". कलकत्त्याला संरक्षणासाठी केलेल्या तयारीचे वर्णन केलेले आहे ते असे : "मराठे परत स्वारी करून आल्यामुळे, १७ मार्चला (१७४३) आमच्या तोफा सुस्थितीत ठेवण्याचे हुकूम आम्ही दिले आणि १०० बक्सारी, आमच्या नोकरीत ठेवले. ४ एप्रिलला नागरिकामधून एक तात्पुरती फौजही (Militia) तयार केली. व्यापाऱ्यानी आपल्या घरांचे रक्षण करण्यासाठी, शहराभोवती आपल्या खर्चाने एक खंदक खणण्याची योजना मांडली. कौन्सिलने या योजनेला २९ मार्चला संमती देऊन, चार लोकांच्या जामिनकीवर आणि तीन महिन्यात परत कर-ण्याच्या अटीवर २५००० रुपये त्यांना उसने दिले. हा खंदक आता किल्ल्याच्या दरवाजा–पासून मोठ्या तलावाकडे जाणाऱ्या 'मोठ्या रस्त्यापर्यंत' पुराही झाला असून पुढे, गोविंदपूर–पर्यंत असलेल्या कंपनीच्या हद्दीपर्यंत तो खणत नेण्याला सुरवातही झाली आहे. कलकत्त्याच्या

[ मागील पानावरून ]

शाहूराजाला चौथ देण्याचे आणि बाळाजीला त्याच्या सैन्याच्या खर्चासाठी २२ लाख रुपये देण्याचे नबाबाने मान्य केले..... बाळाजीनेही मान्य केले की या एकण व्यवस्थेत तो रघूजीचीही तरतूद करील. रघूजी यावेळी बिरभूमपर्यंत परतला.", 'बंगाल पत्र १३ ऑगस्ट १७४३'.... "बंगालमध्ये बाळाजी". यासंबंधी माहितीसाठी पहा––'अखबारत' २५, २६, २९ एप्रिल आणि ४,१०, ११, १७, २० आणि २८ मे १७४३ पहा :––यासाठी लेखकाने डिसेंबर १९३१ च्या I. B. & O. R. S. मध्ये केलेले भाषांतर पहा. तसेच–– पहा : सियार (२) १३१.

सुप्रसिद्ध 'मराठा खंदकाची' ही मूळ कथा. (बंगाल पत्र ३ फेब्रुवारी, १७४४). पाटण्याला नायब नाझिम झइन-उद्-दिन अहमद हैबतजंग, यानेही शहराभोवती एक मातीचा तट बांधला.

## § १८ : मराठ्यांची तिसरी स्वारी, मार्च १७४४

जून १७४३ ते फेब्रुवारी १७४४ हे नऊ महिने, या तीन प्रांतांना शांततेचे गेले. नंतर मार्च १७४४ च्या प्रारंभी, भास्करने, ओरिसा आणि मेदिनीपूर या बाजूने बंगालवर पुन्हा स्वारी सुरू केली. पहिल्या मोहिमेमध्ये, अखेरी त्याला जेव्हा कटव्याहून घाईने पळ काढावा लागला होता (२७ सप्टेंबर १७४२). (भा. प्र. ३ § १२ पहा.) त्यावेळी आणि दुसऱ्या मोहिमेत, बाळाजीने त्याला बंगालमधून आपल्यासहित घालवून दिले (एप्रिल १७४३) त्यावेळी अशा दोन्ही मोहिमात त्याची सर्व लूट आणि छावणीचे सामानसुमान असे सर्व नाहीसे झाले होते. यामुळे या तिसऱ्या मोहिमेच्या वेळी तो अतिशय चिडलेल्या, कठोर मनःस्थितीत होता. पेशव्यांनी या प्रांतांतून सहजासहजी २२ लाख रुपये मिळविले होते पण भोसल्यांना मात्र, बंगालमधील धाडसावर फार मोठा खर्च केला असूनही त्याच्या मोबदल्यात एक पैसाही मिळाला नव्हता. म्हणून भास्करने आपली तिसऱ्या वर्षातील स्वारी, पाशवी क्रौर्यातच सुरू केली आणि नागपूरची सैन्ये, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे या प्रदेशात संचार करू लागली. (युसुफ ६३).

तत्कालीन लेखक गंगाराम लिहितो:—"पुन्हा भास्कर तेथे आल्याबरोबर, त्याने आपल्या सर्व सेनाधिकाऱ्यांना बोलाविले आणि त्यांना हुकूम दिला:—'आपल्या तरवारी उपसा आणि तुम्हाला दिसेल त्या प्रत्येक पुरुषाला आणि स्त्रीला ठार मारा.'··· जेव्हा सरसेनापतीच असे बोलला तेव्हा त्यानी, ठार करा, ठार करा अशा आरोळ्या मारीत, जिकडेतिकडे लुटालूट करून लोकांची कत्तल केली.... यावेळी ब्राह्मण, वैष्णव, संन्यासी, स्त्रिया आणि गायी यांची शेकड्यांनी कत्तल झाली." निरीक्षकाने लिहून ठेवल्याप्रमाणे या लुटारूंनी स्त्रियांवर केलेले सार्वत्रिक बलात्कार आधीच नमूद केले आहेत. (भा. पहा प्र. ३ § १०).

असा बलात्कार आणि कत्तल यामधून सुटून जाण्यासाठी पळ काढणाऱ्या निर्वासित जनतेला, वर्णन करता येणार नाहीत अशा हालअपेष्टा व आवश्यक वस्तूंचा तुटवडा सहन करावा लागला.

## § १९ : अलिवर्दीला पेशव्यानी फसविले—त्याची असहायता

मराठ्यांचा असा हा त्रास पुन्हा सुरू झाल्यामुळे अलिवर्दी अतिशय गोंधळून गेला. फक्त एकच वर्षापूर्वी त्याने बाळाजीला फार मोठी रक्कम दिली होती ती अशा अटीवर की, पेशव्याने रघूजी भोसल्याकडून काही टिकाऊ तडजोड मान्य करून घ्यावी आणि त्यानुसार भविष्यकाळात पुन्हा होणाऱ्या बारगी सेनेच्या हल्ल्यापासून बंगालची सुटका व्हावी. पूर्वीच्या संकटाचेवेळी (एप्रिल १७४३) बाळाजीने रघूजीला या प्रांताचे बाहेर पिटाळून लावले होते हे खरे पण ही मानवी टोळधाड पुन्हा पूर्वीप्रमाणेच कोट्यवधी (Locusts-reappeared in their Myriads.) संख्येने परत आली होती.

याला कारणही होते.––दरम्यानच्या काळात हे दोघे मराठा नेते त्यांच्या राजाच्या दरबारी एकत्र भेटले होते. त्यावेळी, ३१ ऑगस्ट १७४३ ला शाहूने त्या दोघांना एक तडजोड मान्य करावयाला लावले होते. त्यानुसार ठरले होते की, माळवा, आग्रा, अजमीर आणि अलाहाबाद हे चार सुभे आणि शिवाय बिहार सुभ्यापैकी टिकारी आणि भोजपूर (दाऊदनगरसहित) या वार्षिक १२ लाख रुपये उत्पन्नाच्या दोन वतनदाऱ्या, असा एकूण भाग पेशव्यांना चौथाईसाठी नेमून देण्यात आला. हा सर्व भाग म्हणजे पाटण्याच्या पश्चिमेचा आणि अलाहाबादेच्या पूर्वेचा भाग होय. याबरोबर रघूजीच्या भोगवटयाला, संपूर्ण बंगाल (ओरिसासहित) आणि संपूर्ण औंध व पेशव्यांना दिलेले १२ लाख उत्पन्नाचे दोन महाल सोडून बाकीचा सर्व बिहार, असा एकूण भाग देण्यात आला. यापुढे प्रत्येकाने दुसऱ्याच्या वाटणीच्या भागात मुळीच हस्तक्षेप करावयाचा नाही असाही दंडक शाहूने घातला. [ऐतिहासिक पत्र व्यवहार. (२) ३५ व ३६]. यात तडजोडीचा प्रत्यक्ष व्यवहारात अर्थ इतकाच की, एका सुभ्याची (भा. बिहारची) दोघांमध्ये, फक्त वाटणी करण्यात आली. त्यानुसार बिहारमधील प्रत्येकाच्या वर्चस्वाचा असा वेगळा भाग ठरविला गेला आणि याचबरोबर उभयतांनीही मान्य केले की, आपण दुसऱ्यासाठी मुद्दाम राखून ठेवलेल्या कुराणमध्ये––(वसूलीच्या भागामध्ये) मुळीच हस्तक्षेप करणार नाही. यामुळे प्रत्येकाला आपल्या वाटयास आलेल्या सुभ्याच्या भागात मन मानेल तसे वागण्यास मोकळीक राहिली आणि शिवाय दुसऱ्याच्या भागातील रहिवाशाला जबरदस्तीने धाकदपटशाने मागितलेली रक्कम द्यावी लागली तरी, त्याचे संरक्षण करण्याची नैतिक वा कायदेशीर जबाबदारी मात्र त्याच्यावर राहिली नाही.[1]

आता नबाबाला आढळून आले की, मागील वर्षी त्याने केलेल्या एकूण मोठया खर्चाचा त्याला मिळालेला मोबदला म्हणजे एक खात्रीचा संरक्षक मिळाला हा नसून प्रत्यक्षात मिळाले ते, एका रक्तशोषकाऐवजी दोन रक्त शोषक! पेशव्याने वचनभंग केला असून नबाबाची बाजू निर्दयपणे व बेमुर्वतपणे सोडली होती. यामुळे नबाबाची घोर निराशा होऊन त्याला फार राग आला. मराठा जमातीच्या अशा या विश्वासघातकी वृत्तीमुळे, राग आणि दुःख यानी तो चरफडला आणि विश्वासघाताचेच हत्यार वापरून आपल्या प्रजेला मराठयांच्या असह्य जुलुमातून मुक्त करण्याचे त्याने ठरविले. यावेळी त्याची स्वतःची परिस्थिती निराशेने व्यापलेली, जवळजवळ जिवावर उदार होण्यासारखीच होती. लागोपाठ दोन वर्षे झालेल्या स्वाऱ्यांमुळे, त्याचा महसूल निम्म्यापेक्षाही अधिक कमी झाला होता आणि याचबरोबर त्याचा संचित खजिनाही आता संपला होता, तो कराव्या लागलेल्या अफाट खर्चामुळे. हा करावा लागलेला प्रचंड खर्च असा होता :. . . (१) तो सुभेदारीच्या अधिकारावर आल्याबरोबर बादशहाला द्याव्या लागलेल्या रकमा,[2] (२) बाळाजीने सैन्याच्या खर्चासाठी

१ चौथाई घेतली की त्या भागाचे त्यातील रहिवाशांचे संरक्षण करण्याची जबाबदारी चौथाई घेणाऱ्यावर येत असे.

२ बादशहा व त्याच्या जवळच्या लोकांना दिलेल्या रकमा : (१) तीन सुभ्यांच्या महसुलापैकी खर्च जाऊन वार्षिक रहाणाऱ्या शिलकेपोटी बादशहास द्यावयाची रक्कम : (सियार, १०७ नुसार ही रक्कम १ कोटी रुपयाची होती). (२) मयत सराफराझ खानाच्या मालमत्तेबाबत ४० लक्ष रुपये. (३) स्वतः अधिकारपदावर आल्याबाबत बादशहाला नजराणा वा 'पेशखश' म्हणून दिली ती रक्कम रु. ४० लक्ष. शिवाय (४) आपण अधिकारावर आल्यावेळी बादशहाच्या वजिराला तीन लाख व निजामाला १ लाख रुपये आणि अन्य उमरावांनाही लहान लहान रकमा दिल्या त्या. . . असा मोठा खर्च अलिवर्दीला करावा लागला होता. [रियाझ ३२५; सियार (२) १०७].

म्हणून १७४३ मध्ये सक्तीने वसूल केलेली रक्कम (२२ लाख).... (३) सुभ्याच्या संरक्षणासाठी आता त्याला, फारच वाढवून मोठे सैन्य ठेवावे लागले त्याचा पगार व बक्षिसी या पोटी खर्च. (४) आणि युद्धामध्ये खर्च झालेला दारूगोळा आणि सामानसुमान यांचा खर्च. असा हा त्याचा एकुण प्रचंड खर्च झाला होता. परिणामतः त्याचे शासन दिवाळखोर झाले होते. प्रत्येक वर्षी मोहिमेवर जावे लागल्याने त्याचे सैनिक थकलेले होते. त्याची स्वतःची प्रकृतीही यथातथाच असून तो आपल्या सैन्याबरोबर, त्याचा प्रमुख म्हणून बाहेर मोहिमेवर जाऊ शकत नव्हता. त्यातच आता भास्करच्या या मोहिमेच्या वेळी नुकताच भयानक उन्हाळाही सुरू होत होता. अशा एकूण परिस्थितीमुळे, चपळाईने वरचेवर निसटून जाणाऱ्या मराठ्यांच्या विरुद्ध आणखी एक नवी मोहिम काढण्याचे काहीही करून टाळणे त्याला अवश्य होते.

## § २० : एका भेटीचे वेळी, अलिवर्दी मराठा सरदारांची कत्तल करतो

आपला प्रमुख अफगाण सेनापती गुलाम मुस्तफाखान याच्याशी नबाबाने सल्लामसलत करून, आपल्या प्रस्तुत अडचणीतून बाहेर पडण्यासाठी एक कट रचला. यावेळी आपल्या कामगिरीसाठी बिहारची सुभेदारी देण्याचे वचन जर नबाब देणार असेल तर भास्कर आणि त्याचे प्रमुख सेनाधिकारी याना मित्रत्वाच्या मुलाखतीसाठी बोलावून आणून त्यांची कत्तल करावयाची कामगिरी स्वीकारण्याचे मुस्तफाने मान्य केले. मुस्तफाची ही अट अलिवर्दीने मान्य केली व उभयतानी यासाठी एक सविस्तर योजना अतिशय गुप्तपणे आखली. यावर्षी सरसेनापती भास्कर याच्या हाताखाली वीस मराठा सेनापती व दोन मुसलमान सेनापती आले होते. मुसलमान सेनापतींची नावे शहामत खान व अलिभाई कराव्वल (Qarawwal) अशी होती. अलिवर्दीने आपला दिवाण राजा जानकीराम व मुस्तफाखान याना दिग्नगर येथील भास्करच्या छावणीत पाठविले. या दोघा वकिलांनी तेथे गेल्यावर जाहीरपणे सांगितले की उभयतांच्या संमतीने जी वार्षिक चौथाईची रक्कम ठरेल ती देऊन, प्रस्तुत भांडणे संपविण्यासाठी नबाब उत्सुक असून, अशी व्यवस्था व रक्कम ठरविण्यासाठी उभयता प्रमुख नेत्यामध्ये व्यक्तीगत चर्चा होणे अवश्य आहे. हिंदूना व मुसलमानाना आपापल्या पद्धतीनुसार शक्य तितक्या जास्तीत जास्त गंभीर शपथा घेऊन, त्यानी, सांगितले की भास्कर व त्यांचे सेनापती जर नबाबाना भेटण्यास आले तर त्यांच्याबाबत काहीही विश्वासघात होणार नाही. यानंतर अशा भेटीसाठी येण्याचे भास्कररावाने मान्य केले आणि नंतर यासाठी एक शुभदिवसही (बंगाली नववर्षाचा दुसरा दिवस, ३१ मार्च १७४४) निश्चित करण्यात आला.

या भेटीसाठी "मानकरा" नावाच्या मैदानाची निवड करण्यात आली. हे मैदान हल्लीच्या बेऱ्हामपूर (Berhampur) कॅन्टोनमेंट रेल्वे स्थानकापासून दक्षिणेला चार मैलांवर आहे. ३१ मार्चला सरसेनापती भास्कर मानकरा येथे पोहोचला आणि त्याच्या सैन्याचे काही विभाग मागे कटवा आणि पलाशी (मानकराच्या दक्षिणेस १८ मैलांवर) येथेच राहिले. मुलाखतीच्या मोठ्या तंबूकडे भास्कर पायीच चालत गेला आणि याच्या दरवाजाजवळ जानकीराम आणि मुस्तफाखान यानी, त्याचे स्वागत केले. याच्या समवेत यावेळी २१ सेनापती असून रघूजी गायकवाड हा एकटाच सेनापती यावेळी गैरहजर होता. अलिवर्दी विश्वासघात करील असा रघूजीला नेहमीच संशय वाटत असल्याने, यावेळी आजारीपणाच्या सबबीवर तो मागेच राहिला होता. या सेनापतींच्या शिवाय या ताफ्यामध्ये आणखी सुमारे २० खालच्या दर्जाचे सेवकही होते.

यावेळी या मोठ्या तंबूच्या दुसऱ्या टोकाला एका व्यासपीठावर नबाब आपल्या अधिकाऱ्यासह बसला होता. तंबूतील सबंध जमिनीवर सतरंज्या व रुजामे पसरलेले होते. भास्कर व त्याचे सहकारी या रुजाम्यावरून नबाबाच्या दिशेने पुढे चालू लागले. ही मंडळी फक्त पाव अंतर आली असतील नसतील येवढ्यातच भास्कर खरोखरीच आला आहे अशी खात्री करून घेऊन नबाब ओरडला " या भिकारड्या काफरांना (wretched misbelievers) ठार मारून टाका." लगेच तंबूच्या दोन्ही बाजूकडील पडद्यामागे लपलेल्या नबाबाच्या सैनिकांनी बाहेर मुसंडी मारली व आलेल्या मराठा पाहुण्यांना गराडा घालून अडविले आणि थोडयाशा हाणामारीनंतर त्या सर्वांना कापून टाकले.

अशी कत्तल सुरू झाल्याबरोबर, तंबूच्या मागच्या दरवाजाने बाहेर पडून मागील बाजूस ठेवलेल्या आपल्या लोकांना, नबाब मिळाला आणि त्याने मराठा सेनापतीबरोबर आलेल्या संरक्षक पथकावर हल्ला करण्याचा हुकूम दिला. आता नेताहीन झालेल्या या लोकांनी, हल्ल्यास तोंड देण्यासाठी कुठेही प्रयत्न न करता पळ काढला. या कत्तलीतून वाचला तो एकटा रघूजी गायकवाड. या प्रकारातील पहिलीच गडबड सुरू झाल्याबरोबर, आपले पथक घेऊन त्याने दौड मारली आणि पलाशी व कटवा येथील छावण्यात तो पोहोचला. तेथे असलेली सैन्यपथके व झटपट आवरून घेता येईल तितकी मालमत्ता व सामानसुमान घेऊन, आपल्या मायभूमिकडे जाण्यास, तो त्वरेने निघाला. नबाबाच्या या सुभ्यांच्या सर्वच भागातून मराठा सैनिकांच्या फिरत्या टोळ्यांनीही नागपूरकडे पळ काढला. अशा रीतीने एकाच तडाख्याने बंगाल व ओरिसा हे सुभे शत्रू सैन्यापासून मुक्त करण्यात आले. नबाबाने आपल्या सैन्यात दहा लाख रुपयांची खैरात वाटली आणि त्याच्याच शिफारशीनुसार, बादशहाने बंगाल सैन्यातील सर्व अधिकाऱ्यांना बढत्या आणि पदव्या बहाल केल्या.[1]

भास्कररावाच्या मृत्यूनंतर १५ महिने, पूर्वेकडील या सुभ्याना शांतता व सौख्य उपभोगावयास मिळाले. आपल्या सेनापतींचा खून झाला याचा ताबडतोब सूड घेण्याच्या परिस्थितीत नागपूरचा राजा नव्हता. यावेळेपावेतो त्याच्या पैशाच्या अडचणी अधिकच वाईट झाल्या होत्या. १७४३ मध्ये केलेल्या तडजोडीला, पेशवा व तो, अशा उभयतांनी संमती दिल्यावरही, दुसऱ्याच्या विशिष्ट राखीव वर्चस्व क्षेत्रामध्ये अधिक्षेप करण्याचे प्रयत्न, उभयतांनी चालूच ठेवले होते. यामुळे ती तडजोड मोडून, त्याचे पेशव्याशी असलेले जुने मतभेद व घासाघीस बऱ्याच ठिकाणी पुन्हा उपस्थित झाली होती.

## § २१ : नबाबाच्या पैशाच्या अडचणी व त्याने जबरदस्तीने केलेली वसुली

या वेळेपुरती तरी मराठ्यांच्या हल्ल्याची धास्ती नाहीसी करण्यात आली हे खरे पण नबाबाची राज्ययंत्रणा मात्र, पैशाची तरतूद करण्याबाबत हतबुद्ध झाली. या वेळेपर्यंत झालेल्या मराठ्यांच्या तीन, वार्षिक हल्ल्यांमुळे संपत्तीचा प्रचंड नाश आणि महसुलात घट झाली होती. डिसेंबर १७४६ मध्ये नबाबाच्या दरबारी असलेला पेशव्यांचा प्रतिनिधी त्याला म्हणाला की, "तुमच्या देशात आल्यावर, त्या देशाच्या 'चौथाईच्या' दसपट किंमतीची संपत्ती, रघूजीने लुटली आणि नाश केली." शिवाय याचवेळी नबाबाला आपल्या संरक्षक

१ पहा : सियार (२) १३४–१३६, रियाझ ३५०–३५२. चंद्रनगरहून पाँडेचरीला पाठविलेले पत्र, १२ मे (नवी मालिका), कलकत्त्याहून कंपनीला पाठविलेले पत्र, ३ ऑगस्ट, युसुफ ६६, कारोम २० ब--२१ ब

फौजा फार मोठ्या प्रमाणात वाढवाव्या लागल्या आणि केवळ या फौजांवरील त्याचा खर्च वार्षिक एक कोटी ऐंशी लक्ष रुपये इतका वाढला. परिणामतः त्याच्यासमोर दिवाळखोरी, डोळे विस्फारून उभी राहिली आणि न्याय्य वा अन्याय, चांगल्या वा वाईट, कोणत्याही मार्गाने का असेना, पण पैसा उभा करणे त्याला भाग पडले.

यावेळी तीन युरोपिअन देशांच्या कंपन्या, त्याच्या राज्यात व्यापार करीत होत्या. १७४३ मध्ये यातील प्रत्येक कंपनीवर त्याने २००० रुपयांचा युद्धकर बसविला होता. पण त्याच्या एकूण गरजेच्या महासागरात हा पैसा म्हणजे एक थेंबच होता. पुढे जुलई १७४४ च्या आरंभीच त्याने, कासिमबझार येथील इंग्लीश वखारीच्या मुख्याकडे "एक, मोठी विलक्षण मागणी " केली. या मागणीबाबत तो म्हणतो : "आता इंग्लिश लोक सर्व जगाचा व्यापार करीत आहेत. पूर्वी त्यांची फक्त चार किंवा पाचच जहाजे असत, पण आता ते ४०–५० जहाजे आणीत असून ती त्यांच्या कंपनीच्याही मालकीची नसतात ..........." "गेली पाच वर्षे या इंग्रजांची त्याने दररोज सेवा केली आहे, त्यांचे काम केले आहे पण त्यानी मात्र केलेल्या सेवेची व केलेल्या मदतीची, आठवण ठेवलेली नाही. आता मराठ्यांपासून आपल्या देशाचे संरक्षण करण्यात तो गुंतला असताना, त्याला मदत करण्याऐवजी ते शत्रूला मात्र दारूगोळ्याचा पुरवठा करीत आहेत. तेव्हा त्याचा आता हुकूम असा की, इंग्रजानी त्याच्या सैन्याचा दोन महिन्यांचा पगार म्हणजे सुमारे ३० लक्ष रुपये त्याला दिल्याशिवाय, त्याच्या राज्यात कोठेही आणि काहीही व्यापार व्यवहार करू नये." यानंतर तीन दिवसांनी (१० जुलई) मुर्शिदाबाद येथील सर्व युरोपिअन व्यापाऱ्यांवर त्याने आपल्या शिपायांची देखरेख ठेवली आणि युरोपिअनांचा व्यापार थांबवा असे हुकूम आपल्या देशाच्या सर्व भागाकडे पाठविले.

८ नोव्हेंबर १७४४ च्या "बंगालचे पत्र" वरून आपल्याला समजते : "(सर्व) 'गरा-आरंग' मधील–(जाडयाभरडया सुती कापडाच्या वखारी) व्यापार व्यवहार थांबविण्यासाठी घोडेस्वार आणि पायदळ शिपाई पाठविण्यात आले. वखारीतील प्रत्येक व्यक्तीला पकडून चाबकाने (Preet Cotmah) मारण्याचे, नबाबाने चालविले. 'प्रीत कोटमाने' (Preet Cotmah) –(भा. वखारीच्या प्रमुखांपैकी हा एक असावा असे दिसते) एक लक्ष पस्तीस हजार रुपये देण्याचे कबूल करीपर्यंत, त्याचा छळ करण्यात आला. नंतर पुन्हा त्याला दुसऱ्या एका छळणाऱ्याच्या ताब्यात देण्यात आले ते, तीन लक्ष रुपये द्यावयाचे, त्याला कबूल करण्यास लावावे म्हणून. इंग्रज कंपनीच्या वकिलाना, काहीही खाण्यास न देता, दोन दिवस दरबारात ठेवून घेतले."

अशा परिस्थितीत बंगाल, बिहार व ओरिसा या सुभ्यात आपला व्यवहार पुन्हा सुरू करता यावा यासाठी, नबाबाची मागणी साडेतीन लक्षांपर्यंत खाली आणता आली यातही अखेरी (ऑक्टोबर १७४४) इंग्रज कंपनीला समाधानच वाटले. मात्र या समाधानासाठीही या रकमेशिवाय त्याना, नबाबाच्या सेनापतीना व मुर्शिदाबादेतील अधिकाऱ्याना ३०,५०० रुपये, पाटण्यातील अधिकाऱ्याना ८००० रुपये आणि डाक्क्यातील अधिकाऱ्याना ५००० रुपये द्यावे लागले. (बंगाल पत्र, ९ फेब्रुवारी १७४५).

इंग्रजांच्या तुलनेने चंद्रनगर येथील फ्रेंचांचा व्यापार थोडा होता, ही स्थिती लक्षात घेतली तर त्यानाही इंग्रजाइतकाच त्रास सहन करावा लागला. डिसेंबरमध्ये चंद्रनगर

कौन्सिलला, नबाबाच्या एक लाख रुपये मागणीला तोंड द्यावे लागले आणि अखेरी या मागणीचे पोटी १ण वरकरणी कर्जाचे नावाखाली ४५००० रुपये द्यावे लागले. यासाठी बंगालमधील, फ्रेंचांच्या खेडेगावात रहाणाऱ्या रहिवाशांवर कर बसवून तो वसूल करा असा अंतिम स्पष्ट हुकूम पाँडेचरी येथील फ्रेंचांच्या वरिष्ठ कौन्सिलने दिला. या करापासून २५००० रुपये वसूल होतील असा अंदाज होता. अशा रीतीने नबाबाच्या मागणीचे हे ओझे अखेरी असहाय हिंदी शेतकऱ्याच्या डोक्यावरच देण्यात आले ते तर नेहमी घडत असते त्याप्रमाणेच.

## § २२ : अफगाण सेनानायक मुस्तफाखान याचे अलिवर्दीबरोबर भांडण–१७४५

सरसेनापती भास्करराव आणि इतर मराठा सेनापती यांच्या कत्तलीनंतर, एक वर्ष शांततेचे गेले. पुढे १७४५ मध्ये, घरातीलच क्रांतीमुळे अलिवर्दीचे सर्वात दृढ मित्र त्याचे सर्वात कट्टर शत्रू बनले. या अंतर्गत भांडणामुळे अलिवर्दीच्या सुभ्यामध्ये दुही निर्माण होऊन राज्य दुर्बल झाले. या परिस्थितीमुळे नबाबाविरुद्ध सहज यश मिळण्याचा संभव दिसू लागल्याने, आपले हल्ले पुन्हा सुरू करण्याला मराठ्याना उत्तेजन मिळाले. अंतर्गत भांडणाची स्थिती निर्माण झाली नसती तर मराठ्याना यशाची अशी अपेक्षा वा संधी अशक्यच होती. बंगालवर दक्षिणेकडून वा पश्चिमेकडून स्वारी करून येणाऱ्या जमाती स्थानिक बंगाली लोकापेक्षा जास्त काटक होत्या. अशा परशत्रूच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी, दीर्घकाळ सतत परिश्रम करू शकणारी या कामासाठी दक्षतेने शिस्त पाळणारी अशी स्थानिक जमात असावी लागते. स्थानिक जमात संख्येनेही मोठी असते यामुळे आलेल्या शत्रूचा प्रतिकार करीत असतानाच्या आपल्या हालचालीत एकसूत्रता आणण्याचीही विशेष क्षमता तिच्यामध्ये असण्याची आवश्यकता असते. तसेच असा प्रतिकार करताना स्थिर चित्ताने सतत लढा देण्याची क्षमताही तिच्यामध्ये असावी लागते. पण असा गुणसमुच्चय असणारी स्थानिक जमात बंगालमध्ये नव्हती. राजवाडे वा शाही कुटुंबियांची स्वारी व खजिना ने-आण करणारी स्वारी, अशांचे संरक्षण करणे आणि महसूल अधिकारी व जकात-अधिकारी याना संरक्षण देणे ही सैनिकांची कामे प्रत्यक्ष युद्धापेक्षा वेगळी आहेत. पण दोन शतकापूर्वी मुघलानी या भागावर शांतता लादली. तेव्हापासून ते या वेळेपर्यंत, राजवाड्यांचे खजिन्यांचे आणि अधिकाऱ्यांचे संरक्षण या व्यतिरिक्त वेगळा युद्ध सदृश व्यवसाय करण्याची सवय असलेला एकही स्थानिक वर्ग बंगाल, बिहार, ओरिसा भागात नव्हता. या परिस्थितीत बंगाल, बिहार, ओरिसाचे नबाब दिल्लीच्या मध्यवर्ती सरकारापासून स्वतंत्र झाल्यावर त्यांच्या सैन्यातील सगळाच भरणा बाहेरच्या लढवय्यांचा झाला होता. त्यात अफगाण होते, (पायदळ सैनिक व घोडेस्वार दोन्हीही) आणि बक्सारचे हिंदू बंदूक बारदार (भा. बंदुकधारी पायदळ सैनिक) होते. यातच कोठे कोठे मिसळलेले, थोडेसे बऱ्हाचे सय्यद, उत्तर हिंदुस्थानात स्थायिक झालेले काही इतर परदेशी लोक आणि काही औंध प्रांतातले **बहेलिया** बंदूक बारदारही होते. या सर्वांमध्ये अफगाण सैनिक, हे इतर सर्वांपेक्षा संख्येने पुष्कळच जास्त आणि कार्यक्षम असा घटक असून आपल्या श्रेष्ठत्वाबद्दल, जन्मजात लढाऊ सवयीबद्दल आणि आपल्या जमातीच्या दृढ एकोप्याबाबत त्यांच्यामध्ये साभिमान जाणीवही होती. अशा परिस्थितीत त्याना एकाद्या थोर नेत्याच्या नेतृत्वाखाली एकत्र आणता आले की, कोणालाही प्रतिकार करता येणार नाही इतके ते बलाढ्य ठरत.

नबाबाच्या अफगाण अधिकाऱ्यामध्ये, गुलाम मुस्तफाखान हा सर्वात प्रमुख असून या वेळेपावेतो तो त्याचा उजवा हातच होता. पहिल्या वर्षीच्या मराठा स्वारीचा मोड करून

त्याना पिटाळून लावण्यातील मुस्तफाची वैयक्तिक कामगिरी व यश आणि नंतर तिसऱ्या वर्षी भास्करचा पूर्ण नाश करण्यासाठी त्याने आकस्मिक घातलेला यशस्वी घाला यामुळे जवळजवळ अलिवर्दीइतक्याच महत्त्वाला तो चढला होता. एक शूर व्यक्ती आणि कसलेला अनुभवी सेनानी म्हणून त्याची कीर्ति असून या दृष्टीने, त्याला जोड नाही असे मत बनले होते ते योग्यच होते. आपल्या स्वतःच्या अधिपत्याखाली त्याने, एक पायदळ विभाग व शिवाय ९००० घोडेस्वारांचे एकसंघ व आटोपशीर घोडदळ पथक जमविले होते. त्याचे शस्त्रबल, त्याची कर्तबगारी आणि महत्त्वाकांक्षा यामुळे, नबाबाच्या सिंहासनाला त्याच्या रूपाने एक भयंकर धोकाच निर्माण झाला होता.

आपल्या अतिशय अडचणीच्या वेळी, अलिवर्दीने विशेष विचार न करता मुस्तफाला वचन दिले होते की, तो जर भास्करचा खून करू शकला तर त्याला बिहारची सुभेदारी बक्षीस दिली जाईल. पण आता प्रत्यक्षात तशी वेळ आल्यावर मात्र आपल्या वचनाची पूर्ती करण्याचे तो टाळू लागला आणि मुस्तफाकडे गोडीगुलाबीचे निरोप पाठवीत पण मुख्य प्रश्नाबाबत निर्णय घ्यावयाचे पुढे ढकलीत तो, त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करू लागला. या विश्वासघाताबद्दल मुस्तफा अर्थात रागावला, हे योग्यच. आपली आशा-अपेक्षा प्रत्यक्षात येण्याचे दुरावू लागल्याने त्याच्या मनाला आता उबग वाटू लागली ; आणि नबाबाबरोबरची त्याची भाषा अधिक उद्दामपणाची आणि आग्रही बनू लागली ती, अखेरी तो आणि नबाब, यांच्यामधील सशस्त्र झगडा अगदी जवळ आल्याचे दिसेतोपर्यंत.

पण यावेळेपावेतो अलिवर्दीने सोने आणि अन्य प्रकारची प्रलोभने यांचा उपयोग करून, शमशिरखान व सरदारखान अशासारख्या इतर काही अफगाण सेनापतींना आणि मुस्तफाच्याच हाताखालील काही अधिकाऱ्यानाही, आपल्या बाजूला वळवून घेतले होते. मुर्शिदाबादेला एकत्र येत असलेल्या अशा 'शक्ती' पाहून मुस्तफाने, त्याच्यावर हल्ला करण्याच्या बेतापासून भीतीने माघार घेतली. पण त्याने नबाबाच्या नोकरीचा राजिनामा दिला आणि आपल्या सैन्याचा देणे राहिलेला पगार म्हणून एकूण १७ लाख रुपयांची मागणी केली. तेव्हा कोणत्याही प्रकारे हिशबाची तपासणी न करता वा हजेरीसाठीही सैनिकांना एकत्र न करता नबाबाने ही रक्कम ताबडतोब देऊन टाकली आणि अशा रीतीने आपली गादी व राजधानी याना असणारा हा धोका तत्परतेने बाजूला केला. (फेब्रुवारी १७४५). यावेळी पाटणा येथे अलिवर्दीतर्फे, डेप्युटी–म्हणून झइन-उद्-दिन अहमद हैबत जंग, हा होता. त्याच्याकडून बिहारची गादी हिसकावून घेण्याचा निश्चय करून, असमाधानी बनलेला सेनापती मुस्तफा हा पाटण्याकडे निघाला. वाटेत उघड बंड करून राजमहाल येथून त्याने सरकारचे काही हत्ती आणि तोफा जबरदस्तीने घेऊन आपल्याबरोबर नेल्या ; मोंगीरचा किल्लाही धडक मारून घेतला आणि अखेर तो पाटण्याजवळ येऊन पोहोचला. (मार्च १४, १७४५). तीन सुभ्यांचे नबाबपद बादशहाने नेमलेला कायदेशीर सुभेदार सराफ्राझ् खान याचेकडून जर अलिवर्दी हिसकावून घेऊ शकला तर आपणही (मुस्तफानेही) तसेच ते अलिवर्दीकडून का घेऊ नये ? असा विचार अर्थातच मुस्तफाच्या मनात होता. यावेळी त्याची मनधरणी करण्यासाठी झइन्-उद्-दिनने त्याच्याकडे निरोप पाठविला आणि त्याला उत्तर म्हणून मुस्तफा तर उघडपणेच म्हणाला की,–आपल्याही हातात आता विजयी तरवार असून, प्रस्तुत काळात तीच तर शाही सनदांपैकी सर्वश्रेष्ठ सनदच होय. [सियार, (२) १४१].

## § २३ : मुस्तफा खानाचा पाटणा शहरावर हल्ला

मुस्तफाकडून येणाऱ्या या संकटाची सूचना, अलिवर्दीने झइन-उद्-दिनला दिली होतीच, शिवाय गंगेच्या उत्तरेकडून, मुर्शिदाबादेला पळ काढून स्वतःला वाचविण्याबाबतही आग्रह केला होता. या बाजूने पळ काढण्यात मुस्तफाच्या चढाईचा रस्ता चुकविणे हाच हेतू होता. पण झईनने, आपल्याकडे सोपविलेल्या प्रांताचे रक्षण करावयाचे असा अधिक मर्दानी मार्ग पसंत केला. यावेळी तो तिऱ्हट ( Tirhat ) येथे होता. तेथे ही बातमी मिळाल्याबरोबर, घाईघाईने तो राजधानीला परतला आणि पाटण्याचे संरक्षण करण्यासाठी एक अतिशय चांगली योजना आखून तिची कार्यवाही चालविली. दूरदूरच्या ठिकाणी ठेवलेल्या आपल्या सैन्याच्या तुकड्या त्याने राजधानीला बोलविल्या तसेच सर्व स्थानिक सरदार व निष्ठावान जमिनदार यांना बोलावून आपल्याजवळ आणले आणि अशा रीतीने लवकरच सुमारे १४००० लढवय्यांचे सैन्य आपल्या भोवती एकत्र केले. या शस्त्रसज्ज सैनिकांची छावणी पाटणा शहराच्या पूर्वेला जाफरखान-बागेमध्ये ठेवली. तिच्याभोवती, जमिनीच्या बाजूने त्याने बंदुक बारदारासाठी (बंदुकधारी सैनिक) लाकडी बुरुजांचे एक कडे उभे केले, व दोन-दोन बुरुजांमध्ये पडदी घालून, ते सर्व एकत्र जोडले आणि असे हे कडे, शहराच्या नैर्ऋत्येला दलदलीचा भाग होता तेथील बंधाऱ्यापर्यंत नेले. हा बंधारा दलदलीच्या भागाकडून येणाऱ्या पुराचे पाणी अडविण्यासाठी, आधीच तयार केलेला होता. (या बुरुजाना **सणगर** व दलदलीच्या भागाला जल्ला असे म्हणत). या संरक्षण साखळीच्या बाहेरच्या बाजूने एक, चिखल व पाणी सतत राहील असा खंदक खणला आणि त्यातून निघालेली माती, चिखल व पाणी यांच्या सीमेच्या बाहेर टाकून, आणखी एक संरक्षक भिंत त्याने रचली. या भिंतीमधील बुरुजावर तोफा चढवून त्याने सबंध भिंतीचे, संरक्षणाच्या सोयीसाठी निरनिराळे भाग केले व त्यातील प्रत्येक वेगवेगळ्या सेनाधिकाऱ्याकडे रक्षणासाठी नेमून दिला.

मार्चच्या मध्यापर्यंत मुस्तफाखानाचे सैन्य १४,००० पर्यंत वाढले. त्यामध्ये काही त्याचे स्वतःचे कायम ठेवलेले नोकर व काही नोकरी हुडकत हुडकत त्याच्याभोवती जमलेले शिपाई होते. त्याच्याजवळ सुमारे ५० तोफा आणि १५० हत्तीही होते. त्याचे अफगाण सैनिक आपल्याबरोबर, युद्धभूमीवर तोडचाच्या बंदुका नेत आणि योग्य प्रसंगी त्या वापरीत. पण ते तोफांचा मात्र थोडाच उपयोग करीत. त्याच्या अफगाण स्वारांचे घोडे, त्यावेळी हिंदुस्थानात उपलब्ध असणाऱ्या घोड्यांपैकी, सर्वोत्कृष्ट असून, त्यातील सर्वांत कमी किंमतीच्या घोड्यालाही कमीत कमी चारशे ते पाचशे रुपये किंमत पडलेली होती. घोड्यावरील भपकेदार खोगीर आणि स्वारांचा भपकेबाज पोशाख व सोनेरी मुलामा दिलेले चकचकीत चिलखत, यामुळे हे घोडदळ म्हणजे एक मोठे भव्य, लखलखीत दृश्यच होत असे.

१४ मार्च १७४५ ला उजाडल्यावर सुमारे दोन तासांनी पाटण्याजवळ पोहोचल्यावर शहराच्या दक्षिणेस असलेल्या अनेक आंबरायात येऊन मुस्तफाने आपले कूच थांबविले व तेथे मुक्काम केला. नंतर त्याने सहा ते सात हजार सैनिकांचा एक, असे आपल्या सैन्याचे दोन भाग केले. त्यापैकी एक बुलंदखान रोहिला याच्यां हाताखाली देऊन त्याला, शहराजवळ उभ्या केलेल्या संरक्षक रचनेच्या पिछाडीस पाठविला व तेथून हल्ला करण्यास त्याला सांगितले. दुसरा स्वतःच्या नेतत्वाखाली घेऊन पुढे असलेल्या शेवटच्या मेढेकोटावर त्याने हल्ला केला. या लाकडी बुरुजाचे रक्षण टिकारीचा राजा आणि इतर जमिनदार करीत

होते. मुस्तफाच्या कसलेल्या व एकमेकास लागूनच चालणाऱ्या सैनिकी पथकांच्या एकसंघ फळीने पहिलीच धडक मारल्याबरोबर स्थानिक संरक्षक पथके विस्कळीत झाली आणि त्यानी पळ काढला. यावेळी नबाबाचे काही अधिकारी प्रतिकारासाठी पाय रोवून उभे राहिले पण त्याना मदत करण्याला मूठभर व्यक्तिगत मित्रांशिवाय कोणीही राहिलेले नाही असे त्याना दिसून आले. यानंतर मुस्तफाने लवकरच शत्रूला पळवून लावून पुढे थोडयाशाच रक्षकासहित, स्वतः झइन-उद-दिन उभा राहिला होता तेथपर्यंतची युद्धभूमि मोकळी केली.

आता मुस्तफाने झइनवरच चढाई केली, आणि या अफगाणाचा जय होत आहे असे दिसू लागले. इतक्यात बंदुकीच्या एका गोळीने मुस्तफाच्याच हत्तीवरील माहुत ठार झाला. आता हत्तीवरून आपण खाली उतरलो नाही तर नियंत्रण नाहीसे झालेला तो हत्ती आपल्या पिछाडीची पथके तुडवीत सैरावैरा धावू लागेल आणि हे पाहून, आपला सेनापतीच पळून जात आहे असे अनुयायांना वाटेल अशी मुस्तफाची कल्पना झाली व त्याने हत्तीवरून खाली उडी टाकली. पण त्याच्या या कृतीमुळे, त्याला जो परिणाम टाळावयाचा होता, बरोबर तोच घडला. त्याच्या लोकांना वाटले की काही मिनिटापूर्वी माहुत मारला गेला तसाच आता त्यांचा सेनापतीही मारला जाऊन हत्तीवरून पडला आहे. तेव्हा त्यानी आपली फळी विस्कटून रणांगणावरून मुक्कामाचे ठिकाणाकडे पळ काढला. अशा रीतीने यावेळी पाटणा वचले.

यानंतर पाच दिवस व पाच रात्री ही दोन्ही सैन्ये एकमेकासमोर आपापल्या ठिकाणीच राहिली आणि या काळात त्यानी एकमेकावर फक्त तोफांचा मारा केला तो निरुपयोगीच ठरला. अखेरी, शहर आणि छावणी धडाक्याने हल्ला करून घेण्याइतके सामर्थ्य आपल्याजवळ नाही हे मुस्तफाला कळून चुकले व २१ तारखेला, त्याने माघार घेण्यास सुरवात केली. पाटणा व बिहारवर आलेले इतके मोठे संकट अशा रीतीने इतक्या सहजी नाहीसे झाले आहे अशी बातमी आली तेव्हा प्रथम तर, झइन-उद्-दिनाचा तिच्यावर विश्वासही बसेना. यामुळे शत्रूचा परिणामकारक पाठलाग झाला नाही. मिठापूर, नौबतपूर, आणि मुहिब-अलिपूर अशा रस्त्याने, गोंधळलेला अफगाण सेनापती मुस्तफा, नैर्ऋत्येकडे शोण-नदीपर्यंत परत गेला. यानंतर लवकरच अलिवर्दी पाटण्याला आला आणि चाललेल्या पाठलागात सामील झाला. आता मुस्तफाला बिहारबाहेर झटपट पिटाळून झमानियापर्यंत (गाझीपूरपर्यंत) त्याचा पाठलाग करण्यात आला. अखेरी औंध सुभ्यापैकी चुनार किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या एका खेड्यात बंडखोरांनी आश्रय घेतला. अशा रीतीने बंडखोर दुसऱ्या सुभ्यात गेले आणि अलिवर्दी व झइन-उद्-दिन, आपापल्या राजधान्यांकडे एप्रिलमध्ये परत आले. [सियार (२) १३७–१४६; युसुफ ७२–८०; करम २७ अ–३१ अ.]

## § २४ : मुस्तफा खानाचा शेवट

हा पाठलाग चालू असताना मुस्तफाच्या आमंत्रणावरून रघूजी भोसल्याने बंगालवर स्वारी केली. (भा. पहा प्र. ३ § २२), यामुळे अलिवर्दी आपल्या प्रांताकडे जलदीने परतला आणि त्याला तेथेच रहावे लागले. या बातमीमुळे, पावसाळा सुरू होण्याचे थोडे आधी चुनारगडच्या परिसराबाहेर येण्याला मुस्तफाला उत्तेजन मिळाले, कारण लवकरच सुरू होणाऱ्या पावसाळ्यामुळे बादशाही म्हणजेच नबाबाच्या सैन्याला त्याच्याविरुद्ध मोहीम हाती घेणे अशक्य होणार होते. यामुळे, लुटालूट करून आपला खजिना पुन्हा भरण्याला मुस्तफाला वेळही मिळणार होता. या परिस्थितीत तो बाहेर पडला आणि शहाबाद जिल्ह्यात

शिरला, व उद्वंतसिंह उज्जैनिआ याचे जमिनदारी प्रदेशापर्यंत पोहोचला. हा उद्वंतसिंह म्हणजे जगदीशपूरचा धनी असून, तो बिहारच्या सुभेदाराचा दीर्घकाळ विरोधकच होता.

या घटनांची बातमी मिळाल्यावर, १३,००० सैन्य घेऊन, झइन-उद्-दिन, ताबडतोब पाटण्याहून निघाला व त्याने कोईलवाड्याजवळील उतारामधून शोण नदी ओलांडली. दुसऱ्या दिवशी दक्षिण-नैर्ऋत्य (S. W. S.) दिशेने १२ मैल चाल करून जगदिशपूर जंगलाच्या सीमेवरील कन्हाणी या ठिकाणापर्यंत तो आला. या खेड्याच्या पलीकडे दोन मैलांवर शत्रूसैन्य असलेले त्याला दिसून आले आणि लवकरच लढाई सुरू झाली (जून २०, १७४५). पूर्वी पाटणा घेण्यासाठी केलेल्या साहसात अपयश येऊन मुस्तफाचा सर्वच खजिना रिता झाला होता. आणि यामुळे त्याचे सैन्य आणि साधनसामुग्री फारच कमी झाली होती. पण जिवावर उदार होऊन त्याने, झइनच्या सैन्यावर निकराने हल्ला चढविला. यावेळी काहीही केले तरी त्याला थोपविता येईना. झइनच्या आघाडीच्या पथकांना त्याने पळवून लावलेही, पण याचवेळी बंदुकीची एक गोळी लागून तो ठार झाला. नबाबाच्या एका नोकराने या बंडखोराच्या हत्तीवर चढून त्याचे डोके कापले व ते भाल्याच्या टोकावर घेऊन, सर्वांना दिसेल असे धरले. ते दिसल्याबरोबर अफगाण सैन्याची फाटाफूट झाली आणि ते, मुस्तफाचा मुलगा मुर्तझा आणि जिवंत राहिलेले इतर सेनाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली मग्रोर खेड्याकडे पळाले. अशा रीतीने नबाबावर आलेले एक मोठे संकट नाहीसे झाले. त्याच्यावर याचवेळी कोसळलेल्या दुसऱ्या संकटाशी मुकाबला करण्यास तो आता मोकळा झाला. हे दुसरे संकट म्हणजे बार्गिसानी-मराठ्यांनी-केलेली चौथी स्वारी, हे होय[1] [सियार (२), १४६–१४८].

## § २५ : मराठ्यांची चौथी स्वारी

उघड बंड करून ज्यावेळी (सुमारे २० फेब्रुवारी १७४५) मुस्तफाने मुर्शिदाबाद सोडले त्यावेळी त्याने पत्र लिहून, आपल्या बिहारवरील योजलेल्या स्वारीबद्दल रघूजीला कळविले होते आणि त्यानेही पुन्हा, मराठ्यांची मोहीम सुरू करून अलिवर्दीचा नाश करण्यास सहकार्य द्यावे असे आवाहन केले होते. अशी ही संधी, रघुजीला जितकी अनपेक्षित तितकीच मोह पाडणारीही होती. १४००० घोडदळ घेऊन त्याने लगेच ओरिसाकडे चाल केली (मार्च १७४५) आणि एकही हल्ला करावा न लागता कटक शहर काबीज केले. कटकचा

---

१ मिठपूर : पाटणा जंक्शन रेल्वे स्थानकाचे ठिकाण. याच्या नैर्ऋत्येला १३ मैलांवर नौबतपूर आहे. नौबतपूरच्या नैर्ऋत्येला १९ मैलांवर शोण नदीच्या पूर्व किनाऱ्याला मुहिब-अलि-पूर असून ते मुसोवराहच्या दक्षिणेस ३ मैलांवर आहे. अराह शहराच्या पूर्वेला ८ मैलांवर कोइलवाड आणि नैर्ऋत्येला १८ मैलांवर जगदीशपूर आहे. अराहच्या दक्षिणेला ५ मैलांवर व जगदीशपूरच्या थेट पूर्वेला १५ मैलांवर कन्हाणी आहे. [ हिंदुस्थानच्या नकाशाचे अधिकृत पुस्तक... "इंडियन ॲटलस" नकाशा क्र. १०३ मध्ये कन्हाणी Karhani याचा इंग्रजी वर्ण विन्यास (Spelling) Khurownee असा आहे ]. अरवाल हे मुहिब-अलि-पूरच्या दक्षिणेस ८ मैल आहे.

मग्रोर (Magror) नावाचे खेडेगाव, भाबुआ उपविभागाच्या शहरापासून पश्चिमेला, २२ मैलांवर आणि चैनपूरच्या पश्चिमेस १४ मैलांवर आहे. खेयरा हे गाव मग्रोरच्या उत्तरेला ३ मैल आहे. ही दोन्ही ठिकाणे करमनसा नदीच्या दोन काठावर, आधुनिक उत्तर प्रदेशातील, मिर्झापूर जिल्ह्यात असून, हल्लीच्या बिहारच्या नैर्ऋत्य सीमेपलीकडे फक्त थोड्या मैलावर आहेत. (पहा इंडियन, ॲटलास न. पृ. १०३). सियार (२/१४८) मध्ये नमूद केलेल्या मक्री-खू या ठिकाणाबाबत मग्रोर-खेरा अशी दुरुस्ती केली पाहिजे.

त्यावेळचा मुख्य अधिकारी–गव्हर्नर–राजा दुर्लभराय (नवाबाचा दिवाण जानकीराम याचा मुलगा) हा भित्रा, पुरोहितांचे वर्चस्वाखाली गेलेला असा एक आळशी मनुष्य असून, त्याच्या हाताखालील सैन्यही, हल्ल्याचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने अगदी अपुरे होते. याचवेळी मुस्तफाशी लढा देण्यासाठी, नवाबही सर्व सैन्यानिशी बिहारमध्ये गेला असल्याने त्याच्याकडून कटकसाठी काही मदत येण्याची आशाही नाहीशी झाली होती. अशा परिस्थितीत, दुर्लभराम, बराबाती, या कटकच्या किल्ल्यात गेला व त्याचे दरवाजे बंद करून आतच बंदिस्त राहिला. असा पंधरवडा गेल्यावर त्याला इतका वाईट सल्ला मिळाला की, तो रघूजीच्या छावणीत त्याची भेट घेण्यास गेला. तेथे त्याला आणि त्याच्या बरोबरच्या लोकांना कैद करण्यात आले, व नंतर दुर्लभरामाला नागपूर येथे कैदेत ठेवण्यात आले. पुढे तीन लाख रुपये देऊनच जानकीरामाला, आपल्या मुलाला सोडवून आणता आले, आणि तेही, जवळजवळ दोन वर्षांनी (जानेवारी १७४७)! दुर्लभराम कैद झाल्यावरही, शूर अब्दुल अझीझ आणि फक्त ४०० लोकांची शिबंदी, यानी कटकचा किल्ला लढविला व शत्रुला दाद दिली नाही. पण किल्ल्याच्या तटाबाहेरील, मोदिनीपूरपर्यंतचा सर्व ओरिसा मराठ्यांच्या हाती पडला (एप्रिल), आणि अखेरी आपला राहिलेला सर्व पगार देण्याच्या अटीवर अब्दुल अझीझलाही, मराठ्यांना किल्ला देऊन टाकावा लागला.

अद्यापही बिहारला मुस्तफापासून भीति कायम असल्याने, ओरिसामध्ये मोहीम हाती घेण्याच्या परिस्थितीत अलिवर्दी नव्हता. यासाठी तह करण्याबाबत चर्चा करण्यासाठी, रघूजीकडे आपले जासूद पाठवून तूर्त वेळ मारून न्यावी हेच मुत्सदेगिरीचे असे त्याला वाटले. रघूजीला या वेळेच्या आपल्या बळकट परिस्थितीची जाणीव होती म्हणून त्याने ३ कोटी रुपयांची मागणी केली. तेव्हा अलिवर्दीने, याबाबतच्या वाटाघाटी अडीच महिने लांबवतच नेल्या आणि असे चालू असता, जूनच्या शेवटी मुस्तफाच्या मृत्यूची बातमी जेव्हा त्याला कळली तेव्हा त्याने या वाटाघाटी मोडून टाकल्या. पुढे दुर्लभरामाला कैद केल्याचे कळल्यावर, आपल्या पठाण अधिकाऱ्यांपैकी एक, सर्‌मस्तखान याला, अलिवर्दीने, दुर्लभरामाची सुटका करण्याबाबत बोलणी करण्याला पाठविले. रघूजीनेही निलोपंत नावाचा आपला एक प्रतिनिधी नवाबाकडे पाठविला. सर्‌मस्तखान रघूजीच्या छावणीत असतानाच, मराठ्यानी २०० लोकांना कैद करून, तेथे आणले आणि त्यांची नाके व कान कापले. वाटाघाटी चालू असतानाच अशा प्रकारचे क्रूर, दुष्ट कृत्य केलेले पाहून अलिवर्दी रागावला आणि या कृत्याचा सूड म्हणून निळोपंताला मारून टाका असा प्रथम त्याने, हुकूम दिला, पण निळोपंताच्या सुरक्षितेसाठी आधीच वचन दिलेले असल्यामुळे त्याला सोडून देण्याबाबत त्याचे मन वळविण्यात आले. तथापि या घटनेमुळे तात्पुरती असलेली शांतता भंग पावली आणि वाटाघाटी मोडल्या. [S. P. D. XXVII 11] (पेशवे दफ्तरातील निवडक पत्रे, खंड २७ पत्र ११.)

जूनमध्ये रघूजी ओरिसामधून बरद्‌वान जिल्ह्यात शिरला आणि तेथे त्याने, ७ लाखांचा महसूल जबरदस्तीने हस्तगत केला. यानंतर लगेच सर्व पश्चिम बंगालमध्ये मोठा गोंधळ उडाला आणि "या गोंधळामुळे अनेक आरंगमधील व्यापार बंद पडला." पण पुढे एक महिन्याने हल्लेखोरांनी हा जिल्हा मोकळा करून ते बिरभूमला, पावसाळ्यासाठी छावणी ठेवण्याला गेले. (जुलई). आता मुस्तफा मरण पावला असल्याने, आपल्या सर्व सामर्थ्यानिशी अलिवर्दी मुर्शिदाबादेचे रक्षण करीत होता. [सियार, (२) १४९–१५०; पेशवे द. नि. पत्रसंग्रह, खंड २७, ११].

## § २६ : रघूजीची बिहारवर स्वारी : अलिवर्दीबरोबर लढा

एक महिना छावण्यात घालविल्यानंतर, रघूजी दक्षिण बिहारमध्ये पाच आठवडे गेला. (ऑगस्ट-सप्टेंबर), यावेळी मुस्तफाच्या सैन्यापैकी शिलकी भागाला, अलिवर्दीशी निष्ठा असलेल्या जमिनदारांनी, वेढ्यात अडकविले होते. मदतीला येऊन आपणाला सोडविण्यासाठी वेढ्यात अडकलेले हे सैन्य रघूजीला वारंवार विनंती करीत असून, वेढ्यातून सुटल्यावर त्याच्याच निशाणाखाली येऊन मिळण्याचे आश्वासनही देत होते. या विनंत्याना प्रतिसाद देण्यासाठीच रघूजी बिहारमध्ये चढाई करून गेला होता. उत्तर बिरभूमचे जंगल आणि खरगपूरच्या टेकड्या अशा मार्गाने, तो, फातुआजवळ आला आणि ते, त्याने लुटले व जाळले. नंतर तो नैर्ऋत्येकडे वळला आणि वाटेत टिकारी जमिनदारीपैकी शेखपुरा व अनेक खेडी लुटत लुटत, पुढे चालला ते शोण नदीवर पोहोचेपर्यंत.

उतार पाहून ती नदीही त्याने ओलांडली. नंतर मग्रोरवर चाल करून वेढ्यात अडकलेले अफगाण सैनिक व त्यांची मालमत्ता त्याने सोडविली. अशा रीतीने दोन्ही सैन्ये एकत्र करून त्याने आपल्याभोवती १४,००० सैन्य जमविले. या सैन्यात चपळ, न थकणारे, सुटसुटीत मराठा घोडदळ १०,००० आणि बाकीचे शूर, धिप्पाड आणि निधड्या छातीचे अफगाण लढवय्ये होते. (मुस्तफाखानाचा मुलगा मुर्तझा याच्या नेतृत्वाखाली असलेले २००० आणि पठाण जमिनदारांचे २००० असे सैनिक यात होते). यानंतर रघूजी भोजपूरमध्ये (पश्चिम बिहारमधील अराह Arrah जिल्ह्यापैकी) शिरला आणि तेथील राजावर त्याने एक लाखाची पट्टी बसविली. यापैकी काही भाग त्याने दिलाही आणि बाकीच्याची तो तरतूद करीत होता अशावेळी, नवाब पाटण्याला येऊन पोहोचल्याची बातमी आली ; आणि राहिलेली बाकी देण्याचे भोजपूरच्या राजाने ताबडतोब थांबविले. आता रघूजी व त्याचे मित्र यानी अरवाल येथे शोण नदी परत उलट दिशेने ओलांडली आणि ते उत्तर दिशेने पाटण्याकडे पुढे निघाले, ते त्या राजधानीपासून दोन मुक्कामांचे अंतरावर त्याना शत्रू दिसेतोपर्यंत. [पे. द. निवडक पत्रे, खंड २७ प. ७ ; सियार (२) १५१ ; युसुफ ८१–९० ; करम २२ब–२३ब आणि ३१ब.].

दरम्यान रघूजीच्या अशा हालचाली चालू असताना, बिहारच्या बाजूने सुरू झालेल्या त्या हालचालींची माहिती मिळाल्याबरोबर लगेच अलिवर्दीही आपल्या राजधानीतून बाहेर पडला. बरोबर १२,००० निवडक सैन्य घेऊन तो पाटण्याकडे जलदीने निघाला. पण आता त्या शहराला काही धोका राहिलेला नाही व शत्रू दक्षिणेकडे दूर गेला आहे हे दिसून आल्यावर, आपल्या सैन्याला विश्रांती मिळून ते ताजेतवाने व्हावे व आपल्या सामुग्रीत पुन्हा भर घालता यावी म्हणून त्याने बंकीपूर येथे मुक्काम केला व सैन्याची पूर्ण व्यवस्था लावली. नंतर सामर्थ्यवान तोफखाना बरोबर घेऊन, दूर जाणाऱ्या मराठ्यांना गाठून अडविण्यासाठी, नौबतपूरच्या बाजूने त्याने आपल्या सैन्याची अगदी व्यवस्थित चाल पुन्हा सुरू केली. पण शत्रूही सतत पुढेच चालला होता व नेहमीच अलिवर्दीच्या तोफांच्या पल्ल्याबाहेर राहून, पुढे जाता जाता रस्त्यात लागणारी खेडी लुटीतही होता. असा हा पाठलाग, मुहिब अलिपूर जवळच्या "राणीच्या तलावा" पर्यंत शत्रू पोहोचेतो सुरू होता, त्या ठिकाणी रघूजीची छावणी होती. या ठिकाणी मात्र मिरजाफरच्या हाताखालील, नबाबाच्या आघाडीच्या पथकानी मराठ्यांच्या राजाला गाठून त्याच्यावर अनपेक्षित हल्ला केला आणि नंतर

लवकरच नबाबाच्या बाकीच्या सैन्याने त्याच्या छावणीभोवती वेढा घातला. वेढ्याबाहेरील मराठ्यांच्या पथकानी, आपल्या धन्याला सोडविण्यासाठी निकराची लढाई चालविली आणि तो अखेरी, समशीर खानाच्या ताब्यात दिलेल्या वेढ्याच्या उपभागातून सुटूनही गेला. याचे कारण त्या सेनापतीचे शैथिल्य असावे किंवा जास्त संभव म्हणजे त्याने लाच घेतली असावी. दरम्यान अतिशय जलदीने चाल करून या ठिकाणी अलिवर्दीही येऊन पोहोचला आणि सुरू असलेल्या मराठ्यांच्या पाठलागात सामील झाला. रघूजीचा एक दात, निर्जीव झालेल्या एका बंदुकीच्या गोळीने पाडला होता व त्याचे दोन अधिकारी–महिमाजी बाबा व शंकराजी बाबा–तोफेच्या गोळ्यानी ठार झाले होते (अनुक्रमे नोव्हेंबर १४ व २०) ते सगळे याच आठवड्यात झालेल्या लढायात [पे. द. निवडक पत्रे, खं. २०, प. ७४; खं. २७) प. ११ सियार (२) १५१–१५२].

सैन्याची चाल फार जलदीने झाल्यामुळे पाठीमागून येत असलेल्या सामानसुमानाला आणि तंबूना नबाबाने यावेळी फारच मागे टाकले होते. यामुळे त्याचे यापुढील कूच काही दिवस थांबवावे लागले. त्याच्या बेगमेने–सबंध आयुष्यात त्याला एकच पत्नी होती–आपण स्वत: पुढाकार घेऊन, रघुजीशी तह करण्यासाठी दूत पाठविले. यात तिचा उद्देश, युद्धामुळे थकून गेलेल्या आपल्या धन्याला विश्रांती मिळावी हाच होता. अशा प्रकारे देऊ केलेला मोबदला रघूजीने मोठ्या आनंदाने स्वीकारलाही असता पण मिरहबीबने त्याला वेगळाच सल्ला दिला. नबाब व त्याचे सैन्य यांच्या गैरहजेरीत मुर्शिदाबाद या बंगालच्या राजधानीत संरक्षणाची काहीही तरतूद नव्हती तेव्हा रघुजीने झपाट्याने दौड मारून मुर्शिदाबादेवर हल्ला करावा आणि ही बंगालची राजधानी लुटावी, असा हा सल्ला होता. यानुसार, शोण नदीच्या तीरावरून परत फिरून मराठ्यानी बंगालकडे दुप्पट वेगाने दौड केली आणि त्यांच्या पाठोपाठ अलिवर्दीही झपाट्याने येऊ लागला. या दौडीमध्ये अन्नाच्या तुटवड्यामुळे त्याच्या सैन्याला अतिशय हाल सहन करावे लागले.[1] मुनिर आणि पाटणा या रस्त्याने तो बंगालकडे वळला. चंपानगरच्या खोल नदीपात्रापासून, भागलपूर जवळ रघूजी एकाएकी मागे फिरला आणि त्याने अलिवर्दीवर अचानक हल्ला केला. यावेळी रघूजीजवळ ६००० सैन्य होते तर अलिवर्दीजवळ फक्त ६०० सैनिकांचीच एक संरक्षक तुकडी होती पण त्याने निकराचा लढा देऊन बाकीचे सैन्य येऊन मिळण्यास जरूर तितका वेळ मिळविला. दरम्यान ते सैन्य येऊन पोहोचले व त्याने मराठ्याना पिटाळून लावले.

## § २७ : बंगालमध्ये मराठे, १७४६

जंगलातील रस्त्याने चाल करून, नागपूर राजा रघूजी मुर्शिदाबादेजवळ २१ डिसेंबरला येऊन पोहोचला ; म्हणजे नेहमीच्या लष्करी रस्त्याने कूच करीत येत असलेल्या अलिवर्दीच्या आधी एक दिवस. या एका दिवसात, मुर्शिदाबादेच्या समोरील, पण नदीच्या अलीकडे

१ "रघूजीच्या ठिकाणाच्या दिशेने पाटण्याहून दोन मुकामांचे अंतराएवढी पुढे चाल, नबाबाने केली. या प्रांतातील आपल्या दोन महिन्यांच्या मुक्कामात रघूजीने सबंध प्रांतातील एकाही खेड्याला मोकळे न सोडता, सर्व लुटली. यात उद्देश असा होता की नबाबाच्या सैन्यापर्यंत काहीही अन्नपुरवठा पोहोचू नये. या हालचालीत नबाबाच्या सभोवती रघूजी रात्रंदिवस फिरत राहिल्याने सबंध प्रांतातच अस्वस्थता निर्माण झाली असून नबाबाचा धान्य पुरवठा तोडला गेला आहे आणि त्याच्या छावणीत दोन रुपये शेर या भावाने धान्य विकत आहे. म्हणून त्यान पाटण्याकडे परत कूच सुरू केले असून रघूजीही त्याच्या पाठीशी आहेच." [पे. द. निवडक प. खंड २७.७ यातील, २७ डिसेंबर १७४५ चे मराठी बातमीपत्र]; सियार (२) १५३ मध्येही याच म्हणण्याला दुजोरा आहे.

असलेली उपनगरे व त्यांच्या परिसरातील झपाइडा ( Zhapaidah ) सारखी अनेक खेडी आणि मिरजाफरची बाग, ही मराठ्यानी जाळली. शहराच्या नैर्ऋत्य भागात रघूजी तीन-चार दिवस राहिला पण अलिवर्दी पुढे चाल करून येत आहे हे कळल्यावर त्याने कटव्यापर्यंत माघार घेतली. कटव्याच्या पश्चिमेला राणी तलावाजवळ एक निकराची लढाई झाली. त्यात मराठ्यांचा पराभव होऊन त्याना मोठे नुकसान सोसावे लागले व अखेरी त्याना मागे हटविण्यात आले. यावेळी त्यांच्या पिछाडीची संरक्षक तुकडीच मुख्य सैन्यापासून वेगळी पाडण्यात येऊन त्यांचे निम्मे सामानसुमानही लुटण्यात आले. यानंतर रघूजी स्वतः नागपूरला परत गेला पण जाताना मात्र त्याने मिरहबीबच्या हाताखाली दोन ते तीन हजार मराठा सैन्य व चार हजार अफगाण देऊन आपली लूटमारीची मोहीम चालू ठेवण्यास मागे ठेवले. या वेळेपर्यंतच्या नऊ महिन्यात, नबाब आणि त्याचे सैनिक याना बिहारमध्ये दोन कष्टप्रद मोहिमा हाती घ्याव्या लागल्यामुळे दोघेही सारखेच थकून गेले होते. या थकव्यातून प्रकृती पुन्हा सुधारण्यासाठी त्याना आता मुर्शिदाबादेला रहावे लागले, आणि या परिस्थितीत मराठ्याविरुद्ध काहीही परिणामकारक कृति हाती घेता आली नाही. परिणामतः मराठ्यांनी आपली मुख्य छावणी कटव्यालाच राखली आणि तेथून त्यांची पथके सर्व पश्चिम बंगालभर हिंडत राहिली व मुर्शिदाबादेलासुद्धा त्यानी भीती दाखविली.

मार्च १७४६ च्या आरंभी अताउल्लाखानाच्या हाताखाली, एक बलाढ्य सैन्य, नबाबाने बरदवानकडे पाठविले. या सैन्याने मराठ्याना त्या जिल्ह्याचे बाहेर घालवून देऊन त्यांच्यापासून असणाऱ्या धोक्यातून कासिमबझार बेट मुक्त केले. लवकरच नबाब स्वतःही बरद्वानला गेला पण आता बंगालमधून शत्रूला घालवून दिलेले असल्यामुळे तो आपल्या राजधानीकडे एप्रिलमध्ये परत गेला. अशा रीतीने पुढे काही काळ बिहार व बंगालला शांतता उपभोगायला मिळाली पण ओरिसा मात्र संपूर्णपणे मराठ्यांच्या ताब्यातच राहिला. पुढील सबंध ऋतूत मिरहबीब, मेदिनीपुरालाच राहिला आणि त्याने गंगेच्या मुखाजवळील हिजली आणि त्याचा परिसर लुटला. [सियार (२) १५३–१५४; पे. द. निवडक पत्रे खं. २७, प.११.]

## § २८ : अफगाणांचे दुसरे बंड १७४६

१७४६ च्या पावसाळ्यात, उत्तरेकडील रस्त्याने मुर्शिदाबादेकडे येणाऱ्या धान्य वाहतुकीत मराठ्यांच्या फिरत्या पथकानी अडथळे आणले. या रस्त्यांचे संरक्षण करण्याच्या कामावर नबाबाने दोन अफगाण सेनापतींना ठेवले होते असे असताना हे अडथळे आले. नबाबाच्या दृष्टीने याचे कारण म्हणजे या दोन अधिकाऱ्यानी आपल्या कामात कुचराई तरी केली वा विश्वासघात करून मराठ्यांशी संगनमत तरी केले, हे होते. याच दोन सेनाधिकाऱ्यांनी पूर्वी १७४५ मध्ये शोण नदीवर रघूजीशी झालेल्या लढाईतही ढिलाई केलेली असल्याने ते लबाड आणि बिनभरवंशाचे असल्याचे दिसून आले होतेच आणि आता त्याच दोघानी, अलिवर्दीला काढून टाकून त्याचे तीन सुभे वाटून घेण्यासाठी रघूजीशी गुप्त करार केला असल्याचे म्हटले जात होते. यामुळे जून १७४६ मध्ये नबाबाने मुस्तफानंतर त्याच्या नोकरीत असलेल्या या दोन श्रेष्ठ अफगाण अधिकाऱ्याना त्यांच्या ६००० सैनिकांसह नोकरीवरून काढून टाकले. नंतर ते दोघेही त्यांचे मूलस्था दरभंगाकडे परत गेले; पण पुढे दीडच वर्षांनी पाटण्यामध्ये क्रांती घडविण्यासाठीच ! [सियार (२) १५४–१५६].

प्रकरण चौथे

# पूर्वेकडील सुभे–१७४६–१७५६

## § १ : बादशहा मराठ्याना चौथ देण्याचे मान्य करतो

१७४६ च्या उन्हाळ्याचे आणि पावसाळ्याचे महिने, बंगाल आणि बिहार यांच्या दृष्टीने, पूर्वीच्या मानाने शांततेचे गेले. नंतर नोव्हेंबरच्या प्रारंभी बादशहा महमदशहाने नबाबाला एक खलिता पाठवून कळविले की, बंगालचा चौथ म्हणून २५ लाख रुपये व बिहारचा चौथ म्हणून १० लाख रुपये शाहू राजाला देण्याचे वचन देऊन, मराठ्यांशी तह करण्याचे त्याने मान्य केले आहे. या रकमा नबाबाने दरवर्षी बंगालमधून दिल्लीला पाठवावयाच्या असून तेथे त्या मराठा राजाच्या प्रतिनिधीकडे सुपूर्द करावयाच्या आहेत. अशा प्रकारची कायम स्वरूपाची व्यवस्था केल्यामुळे, संबंधित सुभे भविष्यकाळात, संभाव्य अस्वस्थतेपासून मुक्त रहातील आणि तेथे व्यापारातील सुरक्षितता पुन्हा प्रस्थापित होईल अशी आशा आता लोकानाही वाटली. [११, जानेवारी १७४७ च्या पाँडेचरीच्या पत्रात निर्देश केलेले २४ नोव्हेंबर १७४६ चे चंद्रनगरचे पत्र (नवी मालिका New Series), कलकत्त्याहून कंपनी सरकारला पत्र, ३० नोव्हेंबर, १७४६].

यावेळी रघुनाथ जयाराम नावाचा मराठ्यांचा एक प्रतिनिधी मुर्शिदाबादेला होता. याच नोव्हेंबरच्या (१७४६) अखेरी त्याने पेशव्यांच्या नावाने बिहारच्या चौथाईची मागणी केली.––शाहूने, बंगालची चौथाई रघूजीला नेमून दिली होती. यामुळे ती या मागणीतून वगळली होती. या मागणीला नबाबाने उत्तर दिले की "बंगालच्या चौथाईबाबतही मजकडे बादशहाकडून **फर्मान** आले आहे. त्यानुसार हाही **चौथ** पेशव्याना नेमून दिला असून त्यांचा हा सर्वच पैसा शाही दरबाराकडे पाठवावयाचा आहे. तेव्हा प्रस्तुत मतभेदाच्या मुद्द्याबाबत माझे म्हणणे स्पष्ट करण्यासाठी मी पेशव्याना लिहीत आहे. 'पाटणा' हा सुभा माझा आहे आणि तसाच बंगालही माझाच आहे. तेव्हा चौथ देण्याच्या प्रश्नाच्या संदर्भात दोन्ही सुभे हे एकत्रच समजून मला वागले पाहिजे, दोन्ही सुभ्यांचा **चौथ** हा अविभाज्यच मानला पाहिजे." नबाबाच्या या म्हणण्याला मराठा प्रतिनिधीने आक्षेप घेतला. त्याचे म्हणणे असे : "पेशव्याना द्यावयाचा **चौथ** आणि रघूजीला द्यावयाचा चौथ हे एकत्र व अविभाज्य कसे मानता येतील ? रघूजी हा तुमचा शत्रू आहे. तुमच्या राज्यात शिरून त्याने **चौथाईच्या** दसपट किंमतीची लूट व नाश केलेला आहे. याउलट पेशवे सर्वस्वी तुमचे मित्रच राहिले आहेत. यापूर्वी त्यानी तुम्हाला लष्करी मदत दिली असून, त्यावेळेपासूनच तुमच्या प्रश्नांबाबत तडजोड व निश्चिती घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. अशा रीतीने तुमच्याबाबत पेशव्यानी आपले कर्तव्य केलेले आहे. आता तुम्ही आपली **चौथ** देण्याची जबाबदारी पुरी करा आणि आपल्या सुभ्याची व्यवस्था पहा. बिहारबाबत द्यावयाचा सबंध चौथ जर तुम्ही देऊन टाकला तर तुमचे प्रश्न सोडविण्याबाबतही (भा. बंगालच्या चौथाईबाबत ?) आमच्याकडून वेळ लागणार नाही." यावर अलिवर्दीने

कळविले की, त्याचा पेशव्यांच्यावर संपूर्ण विश्वास असून तो, पेशव्यांच्याकडे खलिता पाठवून आपल्या सरकारची बाजू मांडीत आहे. या खलित्याचा पेशव्यानी विचार केल्यावर, या देण्याच्या प्रश्नाबाबत कार्यवाही करण्यात येईल. अशा रीतीने प्रस्तुत देण्याबाबत काहीही निश्चित वचन देण्याचे त्याने टाळले आणि चालू असलेली ही चर्चा थांबविली. [पेशवे दप्तर, निवडक पत्रे, खं. २० प. २९ व ४९].

बंगाल व बिहारचा चौथ मराठ्यांना नेमून देण्यामध्ये त्यांनी बिहार, बंगाल व ओरिसा अशा तिन्ही सुभ्यांचा एकत्र विचार करून त्या सर्वांचे संरक्षण हा एकच विषय आहे असे मानावे, आणि एका मराठा प्रमुखाने दुसऱ्या मराठा प्रमुखाला, तीन्हीपैकी एकाद दुसऱ्या सुभ्यावर हल्ला करण्यास वा लूट करण्यास मोकळीक ठेऊ नये, हाच बादशहाचा मुख्य हेतू होता. अशा परिस्थितीत नबाबाने रघुनाथ जयारामला उडवाउडवीची उत्तरे देऊन चर्चा थांबविली यात विशिष्ट अंतर्गत उद्दिष्ट व अर्थ होता. फक्त बिहारच्या चौथाईबाबत पेशव्यांशी एक स्वतंत्र करार करावयाला तो तयार नव्हता. याला आणखीही कारण होते. पेशव्यांच्या स्वतःपुरत्या प्रश्नाबाबत त्याचे जरी समाधान केले असते तरी, बंगाल व ओरिसावर स्वारी करून लूट करणे व तेथून चौथ वा कर वसूल करणे याबाबत त्याने रघूजीला मोकळीक दिली नसती, याची नबाबाला काहीही खात्री वाटत नव्हती. याउलट चौथाईबाबत पेशव्यांचे समाधान करण्यात अपेक्षा मात्र होती की त्याच्या चौथाईची तरतूद झाली की तीन्ही सुभ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी एकत्र आहे हे समजून तशी ती त्याने स्वीकारली पाहिजे. साम्राज्याच्या सबंध ईशान्य भागाच्या (बिहार-बंगाल-ओरिसा) सुरक्षिततेसाठी द्यावयाचा जबरदस्तीने मागितलेला दंड म्हणजेच चौथ ही एकच रक्कम मानून, एकाच अधिसत्तेला द्यावयाची असली पाहिजे. दोन स्वतंत्र रकमा एकाच शत्रूच्या पण एकमेकापासून स्वतंत्र अशा दोन प्रमुख प्रतिनिधींना स्वतंत्रपणे द्यावयाच्या अशा असू नयेत, हेच उद्दिष्ट, नबाबाच्या प्रस्तुत धोरणामागे व कृतिमागे होते.

## § २ : चौथाईबद्दल वाद

नबाब व पेशवे यांच्यामधील वादाचा मुद्दा 'हिंगणे' यांच्या पत्रावरून स्पष्ट होतो. हिंगणे हे यावेळी दिल्लीच्या दरबारात पेशव्यांचे वकील (envoy) होते. त्यांनी अलिवर्दीला लिहिले : . . . . . "बादशहाच्या हुकुमानुसार बंगालच्या शांततेबाबत अटी, पेशव्यानी शाहू राजांच्या बरोबर निश्चित केल्या असून तद्नुसार रघूजीला आता बंगालच्या सुभ्यात शिरण्याला मनाई केली असल्याबद्दल पेशव्यानी त्याला कळविले आहे. . . तेव्हा तुम्ही आता बंगालमधील आपल्या अधिकाऱ्यांना कळवा की, त्यानी यापुढे आपापल्या ठिकाणी स्वस्थ मनाने रहावे आणि तुम्ही, बादशहाने केलेल्या करारानुसार तुमच्याकडील संपूर्ण शाही महसुलाचा चौथ पेशव्यांच्या मार्फत शाहू राजांच्याकडे पाठवावा. असा तो पाठविल्यानंतर तुमच्या प्रदेशातील अशांतता थांबेल." [पे. द. नि. पत्रे, खं. २, प. ४ व १०].

यानंतर अलिवर्दीने बादशहाला उत्तर पाठविले : "शहेनशहानी (Your Majesty) मजकडे खलिता पाठवून त्यात आधी निर्देश केल्याप्रमाणे पेशव्यांच्याकडे देण्यासाठी चौथ दिल्लीला पाठवा असे मला कळविलेच आहे. बाळाजीकडूनही मला पत्र आले असून, त्यात तो कळवितो की. . . . 'रघूजीने बंगालवर स्वारी केलीच तर तुमच्या संरक्षणासाठी,

आमचे दोन सरदार—होळकर व शिंदे—त्यांच्या सैन्यासह बुंदेलखंडाच्या सरहद्दीवर तयारीत ठेवलेले आहेत. ते लगेच पाटणा व गया जिल्ह्यात तुमच्या संरक्षणासाठी येतील." असे असूनही मजकडे रघूजीकडून पुन: पुन्हा पत्रे येत असून तो कळवितो की . . . मी बंगालमध्ये चाल करून येईन . . . तेव्हा पेशव्यामार्फत शाहूबरोबर केलेली व्यवस्था ही अशी कशी ! राजा शाहूबरोबर जर स्पष्ट करार झालेला असेल तर रघूजीने इकडे यावेच का ? आणि बाळाजीरावाने असे लिहिले आहे ते कोणत्या कारणासाठी ? कराराबाबतची अशी अनिश्चितता अद्याप नाहीशी का केली नाही ? तेव्हा रघूजीच्या स्वारीची भीती शिल्लकच रहाते तोपर्यंत मलाही माझ्या सैन्याला रजा देणे परवडणार नाही आणि माझ्या राज्यात पीकपाणी वा शांततेचे व्यवहार जोपासता येणार नाहीत. गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावरील जिल्हे उध्वस्त केलेले असून त्यांच्यामधून एक कवडीचाही वसूल गोळा होत नाही. नदीच्या पूर्वेकडील भागातून कसेबसे पाच रुपयेही जमा झाले तरी ते . . . माझ्या सैन्यावर खर्च होतात. अशा परिस्थितीत महसूल कोठून जमा होणार आणि मी तरी कशातून त्याची रक्कम आपल्याकडे पाठविणार ? अशी परिस्थिती असल्याने रघुजी किंवा त्याच्या सैन्याने चालू वर्षी जर राज्यावर स्वारी केली नाही तर वर्षअखेरी मी माझ्या सैनिकांना घरोघरी परत पाठवीन आणि त्यांचे देणे देऊन टाकल्यावर जो काही महसूल शिल्लक राहील तो शहेनशहांचे दरबारी पाठवून देईन."

याचप्रमाणे अलिवर्दीने हिंगणे यानाही लिहिले. तो लिहितो : . . . "अटी निश्चित होऊन त्यानुसार राजा शाहूबरोबर एकदा करार झाल्यावर रघूजी पुन्हा बंगालमध्ये येण्याची —हल्ला करण्याची—भीती का राहिली आहे ? तो तर राजा शाहूचाच नोकर आहे. या माझ्या सुभ्याबाबत राजांच्याबरोबर समझोत्याचा व मैत्रीचा करार आता झालेला असल्याने, त्याला माघारी बोलवा, आणि आमच्यावर हल्ला करण्याबाबत त्याच्यावर निर्बंध घाला. ज्याअर्थी स्वत: पेशव्यासारख्या व्यक्तीलाच, रघूजी बंगालवर स्वारी करेल अशी भीती वाटते त्याअर्थी माझ्या सैन्याला मी रजा द्यावी आणि तरीही माझ्या राज्यात प्रजेने पुन्हा वस्ती वाढवून सुस्थिर रहावे अशी आशा बाळगावी ही अपेक्षा कशी करता येईल ? माझ्या राज्याचा संपूर्ण वसूल बादशहाकडे कोठून पाठवावा ? या परिस्थितीत रघूजीबरोबर युद्धासाठी, पूर्णपणे सज्ज रहाण्याचा मी निश्चय केला आहे. त्याने जर स्वारी केली तर मी त्याच्याशी लढा देईन आणि तो जर आलाच नाही तर जो काही वसूल मला गोळा करता येईल तो वर्षअखेर मी पाठवून देईन. तुम्ही होळकर व शिंदे या तुमच्या सेनापतींना कळवा की, ज्यावेळी या माझ्या प्रदेशावर स्वारी करण्यासाठी रघूजी बाहेर पडेल त्यावेळी बोलावणे येण्याची वा पत्र येण्याची वाट न पहाता त्यांनी रघूजीला अडवून घालवून देण्यासाठी, रामगढ—पाचेत वा ओरिसाच्या रस्त्याने बंगालला यावे."

बादशहाच्या दरबारी असलेल्या मराठा वकिलाचा आग्रह व दबाव यामुळे, बादशहाने नबाबाला दोष देऊन कानउघाडणी करणारे पत्र पुन्हा लिहिले ते त्याच्याकडून आलेल्या पत्रातील विरोधी सूर व मुद्दे यांना उत्तर म्हणून. बादशहाने लिहिले . . . "रघूजी हा बंगालला निश्चितच जात नाही. मग तुम्ही सैन्य का बाळगीत आहा ? त्या सैन्याला रजा द्या आणि आपल्या प्रजेला योग्य रीतीने दिलासा देऊन उध्वस्त झालेल्या तुमच्या प्रदेशात पुन्हा पूर्ण वस्ती होईल असे करा. स्वत:च्या संशयानाच चिकटून का रहाता ? ठरलेल्या रकमेची पूर्ण भरपाई करण्याइतका वसूल इकडे पाठवून द्या. वसुलीमध्ये जर काही तूट

असेल तर बरोबर तितकीच रक्कम बाळाजीरावाचे हिशेबात देणे म्हणून दाखविता येईल. बाळाजीरावांना द्यावयाचा तनखा तुमच्याकडून यावयाचा असून, ती तुमची जबाबदारी असे ठरविलेले आहे. शिवाय तुमच्याकडून आणखी जी काही वसुलाची बाकी आमच्या दरबारी देण्याची राहील ती बाळाजीने आमचा प्रतिनिधी म्हणून ( . . . . सझावाल–Sazawal) वसूल करावी असे आम्ही त्याला सांगितले आहे. यासाठी ठरलेली रक्कम सत्वर पाठवावी. "

हिंगणे यानीही याचप्रमाणे संरक्षणाबाबत नबाबाची भीती नाहीशी करण्यासाठी पुन्हा आश्वासन दिले. त्याने लिहिले : " लक्षावधी मार्गांनी, पेशव्यानी रघूजीला दक्षिणेतच गुंतवून ठेवले असून बंगालमध्ये शिरावयाच्या वीस मार्गांपैकी एकोणीस मार्गांनी त्याला जाता येऊ नये असा बंदोबस्त केला आहे. बंदोबस्त न करता राहिलेल्या एकुलत्या एक मार्गाने तो बंगालमध्ये शिरण्यास कधी काळी निघाला तरी, बुंदेलखंडाच्या सीमेवर ठेवलेल्या आमच्या सेनापतींच्या भीतीमुळे तो पुढे बंगालकडे जाणार नाही. इतकेही करून तो जर बंगालकडे आला तर आमचे सेनापती त्वरेने त्याचा पाठलाग करतील व त्याला योग्य शासन करतील. तुम्ही फक्त आपल्या ठिकाणी दक्ष रहा आणि बादशहाच्या हिशोबाचा सर्व वसूल पूर्णपणे पाठवा. "

या सर्व चर्चेचा थोडक्यात मतितार्थ असा की, आपल्या राज्याच्या संरक्षण व्यवस्थेचा पाया निश्चित करण्याबाबत अलिवर्दीने अधिक शहाणपणाचा व मर्दानी बाण्याचा मार्गच पसंत केला. नबाबाच्याच खर्चाने त्याच्या सुभ्यांचेसाठी संरक्षक सैन्य ठेवावयाचे पण ते पेशव्यानी ठेवावयाचे आणि रघूजीने स्वारी केलीच तर नबाबाची बाजू घेण्यासाठी ते सैन्य पेशव्यानीच पाठवावयाचे आणि तेही बहुधा निम्मे अधिक राज्य लुटून उध्वस्त केल्यानंतर ! नबाबाच्या संरक्षणाचा असा हा मार्ग स्वीकारला तर सकृतदर्शनी तरी संरक्षण नसलेल्या स्थितीतच राज्यकर्ता नबाब त्याच्या प्रजेला दिसणार होता आणि यामुळे त्या प्रजेलाही कायमचेच भयाकुल वातावरणात रहावे लागणार होते. याऐवजी नबाबापुढे पर्यायी संरक्षण मार्गही होता. संरक्षणासाठी सैन्य, स्वतःचेच, व स्वतःच्याच ताब्यात ठेवावयाचे हाच तो मार्ग. अलिवर्दीने हा दुसरा अधिक शहाणपणाचा, अधिक मर्दानी बाण्याचा मार्गच पसंत केला.

## § ३ : १७४६ मधील रघूजी भोसल्यांचे धोरण व योजना

रघूजी भोसल्याच्या दरबारी यावेळी असलेल्या परिस्थितीचा आता आपण विचार करू. बंगाल व बिहारमधून माघार घेतल्यानंतर (एप्रिल १७४६ मध्ये) रघूजी सप्टेंबरमध्ये नागपूरला आला (भा. पहा प्र. ३§२७, २८) व तेथे सावकारानी त्याला अतिशय तगादा लाविला, त्याला घेरले. पुढे डिसेंबरअखेरी, ओरिसाच्या नायब-सुभेदाराला कैदेतून मुक्त करण्यासाठी त्याला ३ लाख रुपये खंडणी मिळाली असताही (भा. पहा प्र. ३ § २५) त्याने आपल्या कर्जाच्या थोड्याही भागाची परतफेड केली नाही. त्याचे सैन्यही आता कमी केलेले होते. दसरा झाल्यानंतर (१३ सप्टेंबर, १७४६) राहिलेले सैन्य म्हणजे सुमारे २००० घोडेस्वारांची (बारगीर) पागा आणि तितक्याच शिलेदारांचे आणखी एक घोडदळ पथक होते. एवढेच सैन्य बरोबर घेऊन तो वऱ्हाडमध्ये गेला. त्याचा मुलगा जानोजी याने बंगाल-मधील मोहिमेचे नेतृत्व करावे असे ठरले होते पण त्याच्या निशाणाखाली फक्त १००० च सैनिक असून फक्त त्यांच्यासहच तो नागपूर येथेच राहिला.

यावेळी ओरिसामध्ये मराठ्यांचा प्रतिनिधी म्हणून मिरहबीब मेदिनीपूर येथे होता (भा. पहा प्र. ३ § २७). हिवाळ्यात बंगालचा नबाब त्याच्यावर स्वारी करील अशी त्याला भीती वाटत होती. तेव्हा त्याने ऑक्टोबरमध्ये मोठ्या केविलवाण्या रीतीने रघूजीला विनंती केली की,. . . . "तुमचे सैन्य कटक येथे लवकरच आले तर ठीक, तसे ते येणार नसेल तर मी काय करावे हे तरी कळवा." मदतीला जे सैन्य पाठवावयाचे, त्याच्या खर्चासाठी ११ लाख रुपये रघूजीला देण्याचेही त्याने मान्य केले आणि या मोबदल्यात ओरिसाच्या संरक्षणासाठी कार्तिक महिन्यात (ऑक्टोबर) आपले सैन्य पाठविण्याचे रघूजीनेही वचन दिले. पण प्रस्तुत अडचणीच्या वेळी, या मोहिमेवर पाठवावयाच्या सैन्यासाठी जरूर ती साधनसामुग्री देऊन ते सज्ज करणे रघूजीला फार अवघड होते. त्याच्या वऱ्हाडमधील छावणीत असणाऱ्या एका वार्ताहराने (अखबारनवीस), ८ डिसेंबरला याबाबत लिहिले आहे ते असे :—" या मोहिमेसाठी रघूजी आपल्या सैन्यात भरती करू लागला आहे पण या लोकांना पगारापोटी रोख पैसा तो देऊ शकत नाही. जानोजीच्या अधिपत्याखाली बंगालमध्ये सैन्य पाठवावयाचे त्याने ठरविले असून, हे सैन्य काही अधिकाऱ्यांची पथके एकत्र करून तयार करावयाचे आहे. (या अधिकाऱ्यांची नावनिशिवार यादीही येथे दिली आहे.) पण यापैकी कोणाच्याही पथकात १०० ते ५०० पेक्षा जास्त सैनिक नाहीत. एकूण १०,००० सैन्य एकत्र करता येईल अशी त्यांची अपेक्षा आहे हे खरे पण इतके सैन्य जमविणे फारच असंभवनीय आहे." अशा परिस्थितीत मिरहबीबला ओरिसामध्ये मदत पाठविण्यास वेळ लागला.

[पे. द. निवडक पत्रे, खं. २०, प. ४१ व ४४].

## § ४ : मिरजाफर मेदिनीपूर येथे मराठा सैन्याचा पराभव करतो, डिसेंबर, १७४६

यावेळी मिरजाफर हा नबाबाच्या सैन्याचा मुख्य अधिकारी-बक्षी–होता. त्याला नबाबाने, ओरिसामध्ये आपला प्रतिनिधी–डेप्युटी सुभेदार–म्हणून नेमले. तो सुभा प्रत्यक्षात तर मराठ्यांच्याच ताब्यात होता. पण तेथून त्यांना हुसकावून लावण्यासाठी, मिरजाफरला बंगालच्या राजधानीतून १७४६ च्या मध्यापर्यंत बाहेर पडता आले नाही कारण त्याच्या सैन्यापैकी, शमशिरखान व सरदारखान यांची अफगाण पथके, नबाबाने नुकतीच काढून टाकली होती, (भा. पहा : प्र ३ §२८), आणि त्यांच्या जागी नव्या पथकांची भरती करण्याचे हुकूम दिले होते. ही नवी पथके तयार होऊन आपल्या सैन्याचे सामर्थ्य वाढवितोपर्यंत राजधानीजवळच थांबणे मिरजाफरला भाग पडले. अखेरी सैन्यात जरूर ती भरती झाल्यावर (सुमारे ७५००) व सैनिकांना सुसज्ज केल्यावर नोव्हेंबरमध्ये मिरजाफर मेदिनीपूर जिल्ह्यात चाल करून गेला. तेथे प्रथम एक-दोन मामुली चकमकी झाल्या, नंतर १२ डिसेंबरच्या सुमारास त्याने, मिरहबीबच्या हाताखालील एक सेनापती सय्यद याच्याशी निर्णायक लढाई देऊन, त्याचा पराभव केला ; पण यातून शिल्लक राहिलेल्या, विस्कळीत सैन्यासहित सय्यद स्वत: निसटला. तथापि त्याच्या सैन्यातील दोन वरिष्ठ अधिकारी मात्र मारले गेले. याचवेळी दुसरीकडे मिरहबीबने कानिका (Kanika) हे ठिकाण जिंकले होते आणि तेथील राजा व त्याचे कुटुंबीय यांना कैद करून, आपल्याबरोबर घेऊन तो येत होता. वाटेत बलेसारच्या दक्षिणेला त्याची व पळ काढणाऱ्या सय्यदाची गाठ पडली आणि मिरहबीबने त्याच्या विस्कळीत झालेल्या सैन्याची पुनर्घटना केली. यानंतर सय्यदाच्या पराभवामुळे निर्माण झालेल्या अडचणीच्या स्थितीतून पुन्हा मार्ग काढण्यासाठी त्याने उत्तरेकडे

घाईने कूच केले, व तो २० जानेवारी १७४७ च्या सुमारास बलेसारला येऊन पोहोचला आणि त्याने शहरापासून २ मैलांवर आपली छावणी ठेवली. यावेळी त्याच्याजवळ ८००० घोडदळ व २०,००० पायदळ होते. तेथे त्याने, बरा बालंग ( Bara Balang ) नदीच्या काठाने, तोफांचे मोर्चे उभे केले, ते पुढे चाल करून येत असलेल्या बंगाल-नबाबाच्या सैन्याला थोपविण्यासाठी. यावेळी जानोजीही आपल्या सैन्यासह कटकला येऊन पोहोचला होता. तोही आता मिरहबीबची बाजू बळकट करण्यासाठी उत्तरेच्या बाजूने निघाला. [बंगालचे पत्र २२ फेब्रुवारी १७४७ ; पांडेचरीचे पत्र ३१ जानेवारी १७४७ (नवी मालिका) ; पे. द. निवडक कागदपत्रे खं. २०, प. २९ ; युसुफ ९६–९८].

या हालचालींची बातमी मिळाल्यावर मिरजाफरला वाटले की आता मात्र शत्रूचे संख्याबल आपल्याहून वरचढ होणार असून, मराठे त्याला घेरण्याच्या बेतात आहेत. यामुळे त्याचा धीर सुटला आणि मेदिनीपूर ताब्यात राखण्याचा काहीही प्रयत्न न करताच व आपल्या सैन्याचे काही हत्ती व सामानसुमान शत्रूच्या भक्ष्यस्थानी पडण्यासारखे तसेच मागे टाकून, त्याने बरद्वानकडे घाईने पळ काढला. (फेब्रु. १७४७). नबाबाच्या दृष्टीने १७४७ हे साल उजाडले ते, अशा रीतीने त्याच्या नशिबाला अनपेक्षित उलटी कलाटणी मिळून !

शिवाय याचवेळी अतिशय आवडत्या व सर्वांत जास्त विश्वासातल्या सेनापतींनीच विश्वासघात केल्याने त्याचे हातच लुळे पडले. त्याचा बक्षी मिरजाफर व राजमहालमधील त्याचा फौजदार (भा. स्थानिक मुख्य अधिकारी) अताउल्ला या दोघांनी, एक दिवस, त्याला ठार मारावयाचे असा कट केला. त्या दोघांची, नबाबाबरोबर मुलाखत चालू असताना, त्याला ठार मारावयाचे व बंगाल आणि बिहार या त्याच्या दोन सुभ्यांची सुभेदारी आपल्या दोघात वाटून घ्यावयाची असा तो कट होता. पण या गुप्त कटाची बातमी नबाबाच्या कानावर आली तेव्हा त्याने, अताउल्लाला आपल्या पदाचा राजिनामा द्यावयास, सक्तीने भाग पाडले व मिरजाफरच्या सैन्याला रजा दिली आणि त्यांतीलच लोक स्वतःच्या नोकरीत घेतले. [सियार (२) १५७].

## § ५ : अलिवर्दीची जानोजीविरुद्ध मोहीम, मार्च १७४७

एकत्र झालेले अफगाण व मराठे यांना तोंड देण्याला अशा रीतीने अलिवर्दी एकटाच पडला. मुस्तफाखान, शमशिरखान, सरदारखान आणि इतर कसलेले, अनुभवी व मान्यवर सेनाधिकारी आपापली सैन्ये घेऊन गेलेच होते आणि आता तर, त्याच्या सैन्याची माहिती असलेल्या, युद्धाचा उत्तम अनुभव असलेल्या, त्याच्या स्वतःच्या दोन सर्वोत्कृष्ट नातलग सेनानींची मदतही त्याने गमाविली होती. पण कशानेही त्याचे धैर्य खचले नाही. ७१ वर्षांच्या या वृद्धाने आपल्या सैन्याचे नेतृत्व स्वतःच्या हाती घेतले व छावणीतून बाहेर कूच केले. नंतर बरद्वानजवळ अतिशय निकराची लढाई करून (मार्च १७४७), जानोजी आणि त्याचे सबंध मराठा सैन्य यांचा पराभव केला व त्यांचे फार मोठे नुकसान केले. यानंतर युद्धभूमीवर पुन्हा त्याच्यासमोर उभे रहाण्याचे धैर्य मराठ्यांमध्ये राहिले नाही. पण नबाबाच्या सैन्याला झुकांडी देऊन त्याच्या गैरहजेरीत, मुर्शिदाबादेवर झपाट्याने दौड करून हल्ला करावयाचा, हा त्यांचा जुना डाव, पुन्हा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण यावेळी, अलिवर्दीही, त्यांच्या पाठोपाठ जलदीने आला, आणि त्याने, मराठ्यांना राजधानीचे काहीही

नुकसान करू दिले नाही. तथापि त्यांनी, राजधानी जवळची काही खेडीमात्र, नेहमीप्रमाणे लुटली आणि जाळली. अशा रीतीने मुर्शिदाबादेवरील हल्ल्याला प्रतिबंध होऊन त्यांचा बेत फसल्याने गोंधळून त्यांनी परत मेदिनीपुऱ्याकडे माघारी पळ काढला आणि अशा रीतीने मुर्शिदाबाद व बरद्वान जिल्हे त्यांच्यापासून तात्पुरते मुक्त करण्यात आले. नंतर पावसाळा जवळ येण्याचे वेळी नबाब आपल्या राजधानीला परतला. [सियार (२) १५८].

१७४७ हे सबंध वर्ष, मेदिनापुरापर्यंतचा सर्व ओरिसा, काही प्रतिबंध न होता मराठ्यांच्या ताब्यात राहिला. बलेसारमध्ये व त्याच्या आसपास ते राहिल्यामुळे झालेल्या परिणामांचे वर्णन एका पत्रात केले आहे ते असे : "......या प्रांतात मराठे शिरले आहेत, अशा अर्थाची काहीही मामुली अफवा ऐकली की या भागातील लोक घरेदारे सोडून पळ काढीत असल्यामुळे व्यापार उदीम मोठ्या प्रमाणात बंद पडला असून या भागात सर्व प्रकारच्या धान्यांचा तुटवडा पडला आहे." [कलकत्त्याचे पत्र, १४ फेब्रुवारी १७४८].

## § ६ : पाटण्याचा सुभेदार, दरभंग्याच्या अफगाणांची आपल्या सैन्यात भरती करतो

शमशिरखान, सरदारखान व इतर अफगाण सेनानायक यांनी आपल्या हाताखालील ६००० अफगाण सैनिकांसह नबाबाची नोकरी १७४६ मध्ये सोडली व ते उत्तर बिहारमधील आपल्या घराकडे परत गेले ही हकीगत आपण पाहिली (भा. पहा-प्र. ३ §२८). यावेळी अलिवर्दीतर्फे, मुख्य राज्यकर्ता–गव्हर्नर–म्हणून झइन-उद्-दिन अहमद हैबत जंग हा बिहारचा कारभार पहात होता. त्याने पूर्वी अलिवर्दीला युद्धात, चढाईचे धोरण व हालचाली या बाबतीत सल्ला देऊन यश मिळवून दिले होते ते : (१) सप्टेंबर १७४२ मध्ये कटव्यातून भास्करला हुसकून लावण्यात (भा. पहा प्र. ३ §११), (२) मार्च १७४५ मध्ये मुस्तफाखानाचा पाटण्यावरील जबरदस्त हल्ला मोडून काढण्यात (भा. पहा प्र. ३ §२२ व २३) व (३) पुढे जून १७४५ मध्ये शहाबाद जिल्ह्यातील लढाईत मुस्तफाचा पुन्हा पराभव करून त्यात त्याला ठार करण्यात (भा. पहा प्र. ३ §२४) मिळविलेल्या या यशामुळे झइनला अमर्याद अहंकार वाटू लागला होता. वृद्ध अलिवर्दीला त्याच्या पदावरून काढून टाकून आपणच त्याच्या तिन्ही सुभ्यांचे नबाबपद घ्यावे अशीही त्याला आता स्वप्ने पडू लागली होती. झइनची ही स्वप्ने वास्तवात आणण्यासाठी यावेळी, आरंभी निर्दिष्ट केल्याप्रमाणे, उत्तर बिहारमध्ये परत गेलेले अफगाण सैनिक व त्यांचे पुढारी यापेक्षा अधिक चांगले साधन कोणते असणार! हे अफगाण, नबाबाच्याच पूर्वीच्या लढायात, कसलेले योद्धे असून यावेळी त्यांच्या प्रमुखांची या सबंध भागातील लष्करी कीर्ति सर्वांत मोठी होती.

अशा या अफगाणांची सैन्यात भरती करण्यासाठी झइन-उद्-दिन उत्सुक झाला होता. त्याने या संदर्भात अलिवर्दीला लिहिले त्याचा भावार्थ असा : "सुदृढ व कसलेले, इतके सैनिक दरभंगा येथील आपल्या घरी आळसात, बेकार रहात असून, चरितार्थाचे काहीही साधन त्यांच्या दृष्टिपथात आज नाही. ही परिस्थिती त्याच्या सुभ्यातील शांततेला धोका निर्माण करणारी आहे. तथापि बिहारच्या सुभेदाराला म्हणजेच त्याला स्वतःला, जवळ असलेल्या सैन्याचे जोरावर या बेकार अफगाण लोकांना आपल्या प्रांताबाहेर हाकून लावणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत या बेकार पण कसलेल्या लोकांमुळे उत्पन्न झालेल्या प्रश्नांची उत्तम सोडवणूक म्हणजे त्यांच्यापैकी ३००० लोक व सर्वांच्या सर्व अधिकारी याना आपल्या

नोकरीत ठेऊन घेऊन काही धोका निर्माण करण्यापासून दूर ठेवणे हीच होय. पण यासाठी लागणारा जादा लष्करी खर्च, नबाब बंगालच्या वसुलातून [illegible] असेल तरच हा मार्ग शक्य आहे." अलिवर्दीने या सूचनेला नाखुशीने संमती दिली, व अफगाणांना [illegible] नोकरीत सामील व्हावे असे निमंत्रण देण्यासाठी झइनने आपले जासूद दरभंग्याला पाठविले.

हे निमंत्रण स्वीकारण्यापूर्वी, अफगाणांना, नोकरीच्या व पगाराच्या अटींबाबत माहिती पाहिजे होती. शिवाय त्यांच्या मनात, विशेष संशयही होता. नोकरीच्या निमित्ताने अफगाणांना प्रथम आपल्या अधिकाराच्या व सामर्थ्याच्या कक्षेत आणावयाचे आणि नंतर त्यांना सहज चिरडून टाकावयाचे; यासाठी ही एक अलिवर्दीचीच युक्ती असावी असा तो संशय होता. अफगाणांच्या मनात काही भीती राहू नये, त्यांची आणखी खात्री पटावी व हा सर्वच प्रश्न लवकर सोडवावा यासाठी झइन-उद्-दिन याने, त्यांना पाटण्याऐवजी हाजीपूरला म्हणजे पाटण्याच्या समोरच पण गंगेच्या त्यांच्या बाजूकडील काठावर येण्यास सांगितले. तेव्हा, १० डिसेंबर १७४७ ला दरभंग्याहून निघून ते, १६ तारखेला हाजीपूरला येऊन पोहोचले आणि तेथे १५ दिवस आपली छावणी ठोकून राहिले. या मुदतीत पाटण्याच्या सुभेदाराबरोबर त्यांची, बोलण्याची देवाणघेवाण सतत चालू राहिली. या बहुमोल सैनिकांची आपल्या सैन्यात भरती करण्यासाठी व त्यांच्या, प्रबल नेत्याबरोबर मैत्री संपादन करण्यासाठी झईन इतका उत्सुक झाला होता की, तो अविवेकी व आंधळाच बनला होता बरोबर कोणीही संरक्षक न घेता तो त्यांच्या छावणीत जाऊन त्याना भेटलाही. पुढे जानेवारीच्या प्रारंभी ते पाटण्याला आले आणि तेथे जाफरखान बागेत त्यांनी मुक्काम केला. यावेळी त्यांच्या मार्गावरील आपल्या पहारेकऱ्याना काढून टाकण्याचे हुकूमही झईनने दिले, इतकेच नव्हे तर चिहिल सतुन (Chihil Satun) या आपल्या राजवाड्यातील पहारेकरीही हलविले. हे सर्व त्याने केले ते अफगाणांच्या मनात शंकेला काहीही जागा राहू नये या उद्देशाने !

## § ७ : अफगाण सैनिक, सुभेदार झईनचा खून करतात, पाटणा ताब्यात घेतात व लुटतात

अखेरी अफगाणांना नोकरीत घेण्याबाबतच्या अटी निश्चित करण्यात आल्या आणि अफगाण नेते व त्यांचे आश्रित सैनिक यांना, झईनच्या नोकरीत औपचारिकरीत्या दाखल करून घेण्याच्या समारंभासाठी, १३ जानेवारी हा दिवस निश्चित करण्यात आला. या दिवशी भरविलेल्या दरबाराचे वेळी, तीन ते चार हजार अफगाण सैनिकांचा गोंगाट करीत असलेला मोठा घोळका, नबाबाच्या वाड्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर जमला होता. हे सर्व सैनिक नखशिखांत शस्त्रसज्ज असून शमशिरखान हा त्यांचा प्रमुख नेता होता. याचवेळी वाड्यातील चिहिल सतुनमध्ये–दरबार हॉलमध्ये–(Chihil Satun) आणखी ५०० सैनिकांनी मुराद शेरखानाचे नेतृत्वाखाली गर्दी केली होती. मुराद आपल्या लोकांसहित आधी आला होता. त्याने आपल्या अनुयायांना, एकापाठोपाठ एक अशाप्रकारे नबाबासमोर सादर केले आणि नंतर शमशिरखानाचे लोकांना जागा करून देण्यासाठी, नबाबाचा निरोप घेऊन निघून जा, असे त्यांना सांगितले. पुढे हा निरोपसमारंभ चालू असताना, अब्दुर–रशिदखान नावाच्या एका अफगाणाने आपल्या कमरेच्या कटचारीने झइन-उद्-दिनवर वार केला. आधी ठरविलेल्या योजनेनुसारच हे सर्व चालले होते. पण या समयी आलेल्या घाबरटपणामुळे त्याचा हात इतका थरथरत होता की या शस्त्रप्रहाराचा काहीही परिणाम

झाला नाही. हे पाहून मुराद शेरखान स्वतः पुढे झाला आणि त्याने आपल्या तरवारीचा असा जबरदस्त वार केला की त्याने खांद्याच्या हाडापासून ते कंबरेपर्यंत झईनला चिरून त्याच्या दोन फाकी केल्या.

याच्या पाठोपाठ नबाबाचे अधिकारी व नोकर यांच्यावर सार्वत्रिक हल्ला झाला व त्यांना लुटण्यात आले. या हल्ल्यात त्यांच्यापैकी अनेक मारले गेले वा जखमी झाले, ते, काहींनी स्वसंरक्षणाचा प्रयत्न केल्यामुळे व काही तसेच असहाय व दीन राहिले म्हणून ! काही थोडे सुटूनही पळाले पण त्यांच्या अंगावरील मानाची वस्त्रे व त्यांची शस्त्रे हिसकावून घेतल्यावरच. आता नबाबाचा सबंध वाडा आणि सर्व शहर यात आरडाओरड सुरू होऊन सगळीकडे भीती पसरली. हा हल्ला अनपेक्षित व अचानक झाला होता. हल्लेखोर यावेळी संख्येनेही नबाबाच्या सैन्यापेक्षा जास्त होते आणि नबाबाच्या सैन्याला आता कोणी नेताही राहिला नव्हता व संरक्षणाची काही योजनाही माहीत नव्हती. या परिस्थितीत नबाबाच्या सैन्याला काहीही करता आले नाही. नबाबाच्या जनानखान्यातील नोकर व पहारेकरी यांनी आपल्या जागा सोडून पळ काढला परंतु झइन-उद्-दिनच्या विधवेने मात्र जनानखान्याचे दरवाजे झटपट बंद करून घेतले आणि अशा रीतीने त्यावेळी होणाऱ्या लुटीतून जनानखाना वाचविला. या परिस्थितीत अफगाणाविरुद्ध कोणीही प्रतिकार करू शकले नाही. त्यांनी, खून झालेल्या सुभेदाराचा वृद्ध पिता हाजी अहमद यालाही पकडले आणि त्याने, आपला खजिना लपवून ठेवण्याचे ठिकाण उघड करून सांगावे म्हणून त्याचा छळ चालविला, तो अखेरी, १७ दिवसांच्या छळानंतर, मृत्यूनेच त्याची सुटका करितोपर्यंत ; (३० जानेवारी). झइन आणि त्याचा पिता या, खून झालेल्या दोन उमरावांच्या वाड्याभोवती पहारे बसविण्यात आले. अशा रीतीने झइनची पत्नी व मुले ही कैदी झाली. राजधानीचे सबंध शहरच अफगाणांच्या ताब्यात जाऊन तेथील लोकांकडून पैसा उकळण्यासाठी, त्यांनी त्यांचा भयानक छळ व अपमान केला. यावेळी, अफगाण जमातीपैकीच एक सुलतान पुन्हा अफगाणिस्थानात पुढे आला असून त्याने काबूल व कंदाहार, ही दोन्हीही शहरे, जवळजवळ काहीही प्रतिकार न होता जिंकली आहेत आणि आता तो विजय मिळवीत मिळवीत पुढे दिल्लीवर चाल करून येत आहे ही बातमीही आली होती ; आणि तिच्यामुळेच ही दांडगाई व सत्ता बळकावण्याची कृती करण्यास दरभंग्याच्या अफगाणांना धारिष्ट झाले होते. पूर्वी एकदा एका बिहारी अफगाणाने (शेरशहाने) दिल्लीच्या तख्तावरून मुघल बादशहाला हुसकून लावले होते आणि हिंदुस्थानची शाहीसत्ता पुन्हा एकदा अफगाण घराण्याला मिळवून दिली होती. असेच दिवस आता पुन्हा परत येत आहेत अशी स्वप्ने या दरभंग्याच्या अफगाणांना यावेळी पडू लागली.

१३ जानेवारी ते १६ एप्रिल १७४८ पर्यंत तीन महिने बिहारला या अफगाण सत्तेचा अनुभव मिळाला. पण २०० वर्षांपूर्वी शेरशहाने आपल्या जन्मभूमीला–बिहार प्रांताला–मिळवून दिलेल्या बलाढ्य, सुव्यवस्थित आणि कल्याणकारी राज्यापेक्षा, आताच्या या सत्तेचा कारभार फारच वेगळ्या प्रकारचा होता !

हाजी अहमद आपला खजिना लपवून ठेवित असे ते ठिकाण अहमदाच्या वाड्यातच 'प्रेषितांचे पाऊल' उमटलेल्या दगडाचे खाली खोदून तयार केलेले होते. तेथून तो खजिना खणून बाहेर काढण्यात आला. सोने-चांदीच्या नाण्याच्या रूपाने त्यातून ६० ते ७० लाख

रुपयांची दौलत व शिवाय रत्नजडित दागिने अफगाणाना मिळाले. याशिवाय एका लोक प्रवादानुसार झइनच्या वाड्यातून तीन लाख रुपये मिळाले असे कळते, तथापि याबाबत दुसरे एक निवेदन मात्र, काही हजारांचाच ऐवज मिळाला असे सांगते. "पाटण्याला अफगाण सत्ता थोडे दिवसच होती पण या मुदतीत त्यानी तेथील जनतेला वर्णन करता येणार नाही इतके लुटले नि इतकी त्यांची अप्रतिष्ठा केली." –"याचप्रमाणे शहरांतील मोठ्या लोकांच्या वाड्यानाही त्यानी वेढे घातले आणि ते लुटले." अशाप्रकारे रोहिल्यानी चालविलेली लूट व हल्ले, यानी या काळात शहरामध्ये व त्याच्या परिसरात थैमान घातले. असंख्य लोकांचे जीवित, मालमत्ता आणि कौटुंबिक अब्रू यांचा नाश करण्यात आला आणि जिकडे तिकडे प्रलय कालाची चिन्हे दिसू लागली. [सलिम्-उल्लाह् १९२ अ; युसुफ १०६–११६; करम ३३ ब; सियार (२) १५९–१६३].

## § ८ : बंडखोर नेत्यांच्या हाताखाली अफगाण सैन्याचा जमाव

पाटण्याचा कारभार हस्तगत केल्यावर शमशिरखानाने शहराबाहेरील जाफरखान बागेमध्ये आपला तळ ठोकला आणि मुराद शेरखानाच्या ताब्यात शहर सोडले. आपण केलेल्या दुष्कृत्यांचा जाब विचाण्यासाठी अलिवर्दी स्वारी करून येणार ही त्याला खात्री होती म्हणून आपल्या सैन्याची अतिशय झपाट्याने वाढ करून व त्यासाठी मुक्त हस्ताने पैसा खर्चून, पुढे होणाऱ्या लढ्यासाठी त्याने तयारी चालविली. यासाठी देशाच्या सर्व भागातून येऊन, आपल्या जमात बांधवानी आपल्या निशाणाखाली सैन्यात दाखल व्हावे असे आवाहन त्याने केले आणि येणाऱ्या अशा सैनिकी उमेदवारासाठी सढळ हाताने पैसाही खर्च करण्यास सुरू केले. याचे एका ठिकाणी वर्णन आढळते ते असे : "जमिनी खालून वाळवीचे थवेच्या थवे बाहेर पडावे त्याप्रमाणे या वर्षी अफगाणांचे थवेच्या थवे येऊ लागले. दरदिवशी पाचसहा वेळा, पाटण्याचे नागरिक नगारे-दुदुंभी (Kettle Drums) च्या आवाजाने खडबडून पाहू लागत आणि चौकशी केली की त्याना कळे, अमुक अमुक नावाचा अफगाण सेनापती, अशा अशा ठिकाणाहून, इतके इतके लोक घेऊन आला असून तो शमशिरखान वा सरदारखान याच्या सैन्यात दाखल होणार आहे" आणि हा सेनापती आपल्या पथकाच्या संपूर्ण लष्करी इतमामात शहरातून छावणीकडे चालला आहे. अशाप्रकारे तीन महिन्यांच्या काळात येथील अफगाण नेत्यांच्या भोवती (भा. शमशिर-सरदार-मुरादखान) जवळजवळ ४०००० घोडे-स्वार आणि यापेक्षा थोडेसे कमी इतके पायदळ सैन्य जमा झाले. यापैकी बहुतेक सर्व घोडे-स्वार पठाण होते आणि पायदळामध्ये बहेलिया बंदुकबारदारांचा भरणा असून ते त्यांच्याच पैकी एका बक्षी या पदावरील सेनापतीच्या हाताखाली होते. याशिवाय याचवेळी बंगालमध्ये असलेल्या मराठ्यानाही पुनःपुन्हा लिहून, पाटण्याला या व अलिवर्दीवर स्वारी करण्यात सामील व्हा असे कळविले जात होते. नबाब आपल्या राजधानीपासून पुढे बिहारकडे येऊ लागला आहे अशी बातमी आली तेव्हा शमशिरखान आणि मुराद शेरखान यानी, अलीवर्दीची मुलगी अमिना बेगम (ही झइनची विधवा पत्नी होय) आणि तिची दोन छोटी मुले–मुलगी व मुलगा–याना पाटण्यातील त्यांच्या राजवाड्यातून बाहेर काढले, वर छत नसलेल्या एका उघड्या बैलगाडीत बसविले आणि अशा स्थितीत सर्व जनतेला दिसेल अशा रीतीने, शहराच्या रस्त्यातून शहराबाहेरील खानाच्या छावणीकडे नेले आणि अशी, त्यांची मानखंडना केली. यामुळे परिणाम झाला तो मात्र या निर्लज्य दुष्टांच्या या कृत्याबद्दल सर्व नागरिकांनी नापसंती व्यक्त करून त्यांना शिव्या-शाप देण्याचाच. [सियार (२) १६२]

## § ९ : अफगाण बंडखोराविरुद्ध, अलिवर्दीची बिहारमध्ये मोहीम

आपला जावई व भाऊ यांचा भयानक मृत्यू, मुलीचे वैधव्य आणि मानखंडना व सबंध बिहार प्रांत हातातून जाणे, या बातम्या आल्या आणि त्यांनी अलिवर्दीला घोर दुःखात आणि औदासिन्यात लोटले. नबाबाने आपल्या सर्व अनुयायांची एक बैठक घेतली आणि या भयानक कृत्याचा सूड घेण्याच्या धोकादायक साहसावर आपण जाणार आहोत असे त्याने सांगितले. त्याच्याबरोबर या धाडसी कामावर यावयाचे का मागे घरीच रहावयाचे हे, त्या अनुयायानी आपापल्या मताप्रमाणे मोकळेपणाने ठरवावे, असे निर्णय स्वातंत्र्यही त्याने आपल्या अनुयायाना या बैठकीत दिले. पुढे तो म्हणाला की माझ्यापुरते बोलावयाचे म्हणजे अशा प्रकारचे दुःख आणि अपमान यापुढे सहन करण्यापेक्षा मानाने लढता लढता मरण आले तरी ते त्याच्या दृष्टीने अधिक चांगलेच. यासाठी सन्माननीय युद्ध करण्याचाच त्याचा निश्चय आहे. यानंतर, त्याच्या सर्व अनुयायानी, मरण येईतो त्याच्या पाठोपाठ या धाडसी मोहिमेवर येण्याची शपथ घेतली. जवळच्या व दूरच्या भागातून त्याने घाईघाईने कर्जे उभारली आणि आपल्या सैनिकांच्या देण्यापैकी काही भाग देऊनही टाकला. आपल्या गैरहजेरीत मुर्शिदाबादेच्या संरक्षणाची चोख व्यवस्था केली आणि तो निघाला. वाटेत पूर्णियामधून आलेले १५०० सैनिक त्याला मिळाले. दरम्यान त्याने पेशवा बाळाजीरावाकडेही मदतीसाठी विनंती केली होती व त्यानुसार आता तो पश्चिमेच्या बाजूने पाटण्याजवळ येऊही लागला आहे अशी वार्ताही आली होती. [सियार (२) १६४–१६५].

फेब्रुवारी २९ ला, अलिवर्दी अमानिग्रंज येथील आपल्या छावणीतून बाहेर पडला आणि त्याने बिहारकडे कूच केले. याचवेळी बंगालमधून मिरहबीबच्या हाताखालील मराठेही त्याच्या पाठोपाठच घाईने निघाले (भा. पहा प्र. ४ §८. . . .भोसल्यांच्या पक्षाचे ;– अफगाणांना त्यांच्या विनंतीनुसार मिळण्यासाठी). फारसा कोणी वापरीत नव्हते अशा जंगलातील जवळच्या रस्त्याने येऊन त्यातून ते बाहेर पडले आणि चंपानगर नाल्यावर नबाबाच्या सैन्याच्या पिछाडीवर त्यांनी हल्ला केला. पण त्यांना पळवून लावण्यात आले. नंतर त्यांनी नबाबाच्या आधी, पश्चिमेच्या बाजूने घाईने दौड मारली आणि पाटण्याच्या पूर्वेला थोड्या अंतरावर ते अफगाणांना मिळाले. याच सुमाराला जानोजीची पथकेही येऊन अफगाणांना मिळाली. इकडे आपल्या थकलेल्या सैन्याला थोडी विश्रांती मिळावी म्हणून नबाबाने मोंगिर येथे काही दिवस मुक्काम केला, आणि नंतर त्याने पाटण्याच्या पूर्वेला ३४ मैलावर असलेल्या गंगेच्या काठावरील बाऱ्हपर्यंत, आपले सैन्य पुढे सरकविले (सुमारे १४ एप्रिल).

इकडे पाटण्यामधील अफगाणांनी मिरहबीब, मोहनसिंग आणि इतर काही मराठा सेनाधिकारी यांना भेटीसाठी बोलवून घेतले आणि त्यांना अडकवून ठेवले. अफगाणांचे म्हणणे असे की मराठ्यानी चयावणी दिल्यामुळे आणि त्यांचा खर्च देण्याचे कबूल केल्यामुळे त्यानी हे बंड केले होते. तेव्हा मराठ्यानीच त्यांच्या पगाराचे ३० ते ४० लाख रुपये द्यावे. अशी ही मागणी करून त्यानी या लोकाना अडकवून ठेवले. यावेळी मिरहबीबने– बँकर्सची–पेढीवाल्यांची दोन लाख रुपयांची जामिनकी दिल्यावरच या सेनापतींची सुटका करण्यात आली. यानंतर या सर्वच मित्रमंडळाने अलिवर्दीला विरोध करण्यासाठी बाऱ्हकडे

पुढे कूच केले.[१] ...... यावेळी अफगाणांचे सैन्य सुमारे ३५००० असून मराठे ३०००० होते असे म्हणतात पण मराठ्याची ही संख्या १२००० असावी असा संभव जास्त आहे. पाटणा किल्ल्यातील सर्व तोफखानाही या बंडखोर सैन्याबरोबर होता. यावेळी नबाबाच्या सैन्यात १५००० घोडेस्वार व ८००० बरकंदाज (बंदूकधारी पायदळ सैनिक) होते असा "सियार" मधील (२–१६४) अंदाज आहे.

## § १० : राणिसराई अथवा कालादिआराची लढाई

गंगानदी सतत आपल्या उजव्या बगलेजवळ राहील अशा रीतीने अलिवर्दीने आपल्या सैन्याचे कूच चालविले होते. यामुळे त्याच्या सैन्याला लागणारे अन्न व पाणी यांचा पुरवठा निर्वेध राहून त्याची उजवी बगल स्वाभाविकपणेच सुरक्षित रहाणार होती. बान्ह शहराच्या पश्चिमेला जवळच गंगानदीचे पात्र विभागून त्यातून अनेक फाटे फुटले असून या फाट्यांनी वेढल्यामुळे तेथे बेटांचा एक समूहच वा एक मोठे बेटच निर्माण झाले आहे. आज त्याला "रामनगर दिआरा" असे म्हणतात. नदीच्या प्रवाहाचा मुख्य भाग, सर्वात उत्तरेकडील फाट्यातून वहातो, त्याच्या दक्षिणेला जवळजवळ २ मैल अंतरावर गंगेचे जुने वा आता बदललेले मूळचे पात्र असून त्यातून पावसाळ्यानंतरच्या दिवसात एक अरुंद व उथळ प्रवाह वाहत असतो. सक्रीगलीपासून (Sakrigali) (बिहारच्या पूर्व सरहद्दीवरचे एक ठाणे) पाटण्याकडे जाणारा मुघलांचा लष्करी रस्ता, गंगेच्या दक्षिण किनाऱ्याजवळून जातो. उत्तरेकडे जाणारे अनेक लहान लहान प्रवाह हा रस्ता ओलांडतात व तोडतात आणि पुढे, ते सर्व, उत्तरेकडे वहात वहात अखेर तिकडील मुख्य पात्राला मिळतात.

नदीचे हे जुने पात्र, बान्ह शहराच्या पश्चिमेला थोड्याशाच अंतरावर ओलांडावे लागते. या पात्रामधील उताराच्या संरक्षणाची उत्तम तरतूद अफगाणांनी आधीच करून ठेवली होती. यासाठी त्यांनी सुरक्षित खंदक तयार केले असून आपल्या तोफांचे मोर्चेही मोक्याच्या ठिकाणी उभे केले होते आणि शत्रूला ज्या रस्त्याने पुढे यावे लागणार होते त्या रस्त्यावर मारा करण्याच्या दृष्टीने त्यांची चाचणीही घेतली होती. पण "त्याकाळी असफ्-जाह, निजाम, यांच्या व्यतिरिक्त दुसरा कोणीही, लष्करी डावपेचात, व त्यासाठी नेतृत्व करण्यात अलिवर्दीइतका निपुण नव्हता."—[सियार (२) १६६]. अशा या अलिवर्दीने तेथील परिस्थितीची पहिलीच पहाणी केल्याबरोबर, अफगाणानी व्यापलेल्या ठिकाणांच्या बळकटपणाची त्याला कल्पना आली. या परिस्थितीत कदाचित संधी मिळेलही, अशा भलत्याच व भरमसाट आशेवर विसंबून आपल्या हालचाली करावयाच्या नाहीत, विचारपूर्वक निश्चित योजना आखावयाच्या असे त्याने ठरविले. आधीच बळकट केलेल्या, शत्रूच्या अभेद्य जागांवर, नदी ओलांडून समोरून हल्ला करण्याऐवजी, बान्ह सोडल्यावर, त्याने, शत्रूच्या या ठिकाणाला वळसा घातला व त्यापासून आणि मुघलांच्या लष्करी हमरस्त्यापासून, आपली पथके दक्षिणेकडे दूर नेली व तेथून ती पुन्हा वळविली, नंतर एका स्थानिक जमिनदाराच्या मार्गदर्शनाखाली, नदीचे हेच

---

१ यावेळी शमशिरखानाने आपला दिवाण अहमदखान कुरेशी याला २५०० लोक बरोबर देऊन पाटण्याच्या व्यवस्थेसाठी मागे ठेवले (बंगालमधील सल्लामसलती—बंगाल कन्सलटेशन्स —मध्ये या व्यक्तीचे नांव हमीदखान कराची— Hameedkhan Carachea— असे नमूद केलेले आहे. हा शब्द विन्यास– Spelling चुकीचा आहे. बंगाल कन्सलटेशन्स ८ मार्च व २६ एप्रिल १७४८). हा अहमद म्हणजे दाऊदनगरचा संस्थापक दाऊदखान कुरेशी याचा नातू होय. [सियार (२) १२९].

पात्र, पश्चिमेला आणखी दोन मैलांवर असलेल्या व अफगाणांना माहीत नसलेल्या अशा दुसऱ्याच एका उतारातून ओलांडले. अशा हालचाली करून, नबाबाने आपली पथके पाटण्याकडे जाणाऱ्या हमरस्त्यावर पुन्हा आणली आणि पाटण्याशी दळणवळणाचा शत्रूचा मार्ग तोडण्याची भीती अफगाणापुढे उभी केली. नबाबाच्या या हालचाली अफगाणांना इतक्या अनपेक्षित होत्या की त्या त्याने केवळ काही जादूनेच केल्या असेच त्यांना वाटले. यामुळे अफगाणांना आपली आघाडी घाईघाईने बदलून, तिचे तोंड उलट बाजूला फिरवावे लागले. त्यांनी आपल्या तोफा होत्या तेथेच सोडून, नबाबाच्या सैन्यासमोर आपली आघाडी उभी करण्यास, पश्चिमेकडे धाव घेतली. अशाप्रकारे आपल्याजवळील, जवळजवळ सर्वच तोफखान्याचा उपयोग त्यांना गमवावा लागला. या घटनेचा दुसऱ्या दिवसाच्या युद्धावर निर्णायक परिणाम झाला. त्या रात्री ही दोन्ही सैन्ये एकमेकासमोर ठाण मांडून राहिली. अचानक हल्ला होऊ नये म्हणून या सबंध रात्री नबाबाने कडक पहाराही ठेवला. दुसरे दिवशी सकाळी अगदी लवकर त्याने परमेश्वरा-पुढे (maker) अतिशय नम्रतेचे लोटांगण घातले. करबाला येथील, इमामहुसेन यांच्या कबरस्तानातील पवित्र मृत्तिका आपल्या कपाळाला लावली. त्याच्या डोळ्यात अश्रू दाटले आणि त्याने परमेश्वराची प्रार्थना केली: "हे अल्ला, आता होणाऱ्या लढाईत मला विजय दे वा मरण तरी दे."

१६ एप्रिल १७४८ हा, या लढाईचा दिवस होता. बाऱ्हच्या पश्चिमेस ८ मैलांवरील राणिसराई[१] या खेडेगावापर्यंत आपले सैन्य पुढे नेऊन तेथील मैदानावर अलिवर्दीने त्याची व्यवस्थित मांडणी केली. त्याचा अवजड तोफखाना (तोप-इ-जिनसी Top-i-jinsi) पुढे ठेवला होता; त्याच्यामागे हलक्या तोफा (तोप-इ-दस्ती Top-i-dasti) ठेवल्या होत्या. त्यांच्यामागे या तोफखाना पथकाना पूरक म्हणून आघाडीची घोडदळ व पायदळ पथके ठेवली होती आणि नेहमीच्या पद्धतिनुसार नबाब स्वतः सैन्याच्या मध्यभागी राहिला होता.

अफगाणानीही तात्कालीन पद्धतिनुसार आपल्या सैन्याची मांडणी केली. तथापि तेथील भूपृष्ठाच्या नैसर्गिक वैशिष्ठ्यांचा, आपल्या सैन्याच्या मांडणीसाठी, त्यांनी एक नाविन्यपूर्ण क्लुप्ती वापरून उपयोग करून घेतला. राणिसराईपासून पूर्वेकडे कालादिआरापर्यंत, दोन मैल वा अधिकच लांब, अशी आपल्या सैन्याची फळी त्यानी उभी केली होती. पण त्याची डावी बगल मात्र, एक लहानसा ओढा या ठिकाणी गंगेला मिळत होता तो ओलांडून पलीकडे नेऊन उभी केली असून तिच्याबरोबर, पलीकडे काही मोठ्या तोफाही नेल्या होत्या. या पथकाचे नेतृत्व हयातखानाकडे होते. त्याच्यासमोर जेव्हा नबाबाची उजव्या बाजूची फळी येईल तेव्हा तिच्यावर तोफांचा मारा करण्याचा हुकूम त्यांना दिलेला होता. या डाव्या बाजूलाच मागे काही अंतरावर मराठेही दिसत होते. त्या दिवसाच्या लढाईत ज्या बाजूचा पराभव दिसू लागेल त्या बाजूची लुटालूट करण्याची वाट पहात ते उभे होते.

१ सियार (२) १६७, २६ एप्रिल. बंगालमधील सल्लामसलती यामध्ये कासिमबझारचे, ता. २३ एप्रिलचे पत्र नमूद केले असून त्यात या लढाईबाबत निर्देश आहे तो असा: "कलोदी येथील लढाईत नबाबाने शमशिरखान आणि मुराद शेरखान याना ठार केले आहे." या ठिकाणाचे नाव कोलाडेराह Colladerrah Koladiara असे रेनेल देतो. हे ठिकाण बाऱ्हचे नैर्ऋत्येस ६ मैल व राणीचोकच्या Ranny-chock पूर्वेस ४ मैल आहे. बाबू रामलाल सिंह B. L. हे मला (लेखक सरकार याना) सांगतात की, काला दिआरा हे खेडेगाव अद्यापही गंगेच्या दक्षिण किनाऱ्यावर असून ते खुस्रुपुर रेल्वेस्थानकाच्या ईशान्येस आहे.

मराठ्यांचे सुटसुटीत घोडदळ, आपण लक्ष देण्याइतक्या महत्त्वाचे नाही असे ठरवून अलिवर्दीने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आणि अफगाणांच्या दिशेने हाताने दाखवीत तो म्हणाला "तेथे आहेत—माझे शत्रू." आणि त्याने, त्या ठिकाणी जमवून मांडणी केलेल्या अफगाण पथकावर चाल केली. तोफांच्या माऱ्याने लढाईला तोंड लागले. या तोफांच्या माऱ्याबाबत अलिवर्दीला यावेळी निश्चितच अधिक अनुकूलता होती. कारण दोनच दिवसापूर्वी अफगाणांनी आपल्या तोफा, पूर्वबाजूला मागे चार मैल अंतरावरील नदी उताराजवळ सोडून दिल्या होत्या. तोफांची पहिली फैर झाडली त्यातच सरदारखानाचे डोके उडविले गेले. बंडखोरांचे जवळजवळ निम्मे सैन्य त्याच्या हाताखाली होते. आपल्या हत्तीवर बसला असतानाच झालेल्या व जवळच्या व दूरच्या अशा सर्व बाजूनी दिसणाऱ्या, त्याच्या या मृत्यूमुळे त्याच्या हाताखालील सैन्य विभागातील लोकांना हादराच बसला. हे पाहून अलिवर्दीच्या हाताखालील तरुण सेनाधिकारी शत्रूवर ताबडतोब तुटून पडण्याला आतुर झाले. पण शांत वृत्तीने नेतृत्व करीत असलेल्या त्यांच्या कसलेल्या नेत्याने त्यांना आवरून धरले व आपल्या तोफखान्याला व बंदुकबारदारांना आपले काम प्रथम परिणामकारक रीतीने करण्यास सवड दिली. त्याच्या बरकंदाजांनी नदीकाठाच्या रेताड मैदानात गर्दीने उभ्या असलेल्या अफगाण रांगामध्ये फैरी मागून फैरी झाडल्या आणि "उन्हाने लखलखत असलेला तो दिवस धुराने काळवंडून टाकला." शत्रूवर खरोखरीच मोठा दबाव पडला आहे हे पाहिल्यानंतर, आपल्या दोन सेनाधिकाऱ्याना त्यांच्यावर हल्ला चढविण्याचा हुकूम, त्याने दिला, पण या हुकुमाला ताबडतोब प्रतिसाद मिळाला नाही. या गोंधळात मराठे व मिरहबीबची अफगाण पथके यांनी पाठीमागच्या बाजूस असलेल्या अलिवर्दीच्या सामानसुमानावर मागून हल्ला केला आणि त्या ठिकाणच्या नोकराना मागे रेटीत रेटीत हे मराठे व अफगाण, अलिवर्दीच्या सैन्याच्या मधल्या फळीजवळ येऊन पोहोचले. (हे अफगाण म्हणजे पूर्वी मुस्तफाच्या सैन्यात ठेवलेले सैनिक होत). पण या शत्रूचा मुळीच विचार न करता अलिवर्दीने आपल्या आघाडीचे पथकांना समोर असलेल्या अफगाणांच्या मुख्य सैन्यावरच हल्ला चढवावयाला हुकूम दिला, आणि तो स्वतःही आपल्या संरक्षक पथकासह, या आघाडीच्या पथकांना पाठिंबा व मदत देण्यासाठी हत्तीवरून पुढे गेला. यावेळी त्याची रणवाद्यांची पथके विजयश्रीचे संगीत वाजवीत बरोबर चालली होती. शत्रूच्या रांगामध्ये आपले हत्ती घुसविण्यासाठी त्याचे सेनापती तर एकमेकाशी स्पर्धा करीत होते. लवकरच सर्व आघाडीवर दोन्ही सैन्ये एकमेकास भिडली आणि सर्वत्र हातघाईची लढाई सुरू झाली. या धुमश्चक्रीत बंदुकीच्या एका गोळीने जखमी होऊन मुरादशेरखान आपल्या हौद्यातच मागे पडला आणि नबाबाच्या दोन अधिकाऱ्यानी त्याच्या हत्तीवर उडी मारून त्याचे डोके कापले. युद्धभूमिच्या दुसऱ्या एका भागात, युद्धाच्या या गोंधळात शमशिरखान आपल्या हत्तीवरून खाली पडला आणि जमिनीवरच त्याचेही डोके कापण्यात आले. आता अफगाण सैन्य अगतिक होऊन त्याची फाटाफूट झाली आणि त्याने पळ काढला. मराठ्यांनी या युद्धात आपल्या मित्रांना कांहीही मदत केली नाही व लूट मिळविण्यासही त्यांना संधी मिळाली नाही. युद्धभूमिवरून तेही झटपट नाहीसे झाले. नबाबाला संपूर्ण जय मिळाला. शत्रूने सोडून दिलेली छावणी त्याने व्यापली आणि नंतर युद्धभूमिच्या पश्चिमेस १२ मैलांवर असलेल्या वैकुंठपुराकडे ( Baikunthapur ) त्याने कूच केले. तेथे तो काही दिवस थांबला आणि नंतर त्याने पाटण्यामध्ये विजयीवीराच्या थाटाने प्रवेश केला. पाटण्यातील सर्व जनतेच्या—श्रीमंत वा गरीब उच्च वा नीच सर्वांच्याच-छातीवरील भीतीचे मोठे दडपण जणू नाहीसे होऊन त्यांच्या शरिरामध्ये पुन्हा जिवंतपणा आला. [सियार (२) १६५–१६८; युसुफ १२०–१३०; करम ३४ब–३६ब.]

## § ११ : अलिवर्दी पाटण्याला सहा महिने राहतो, १७४८ : बंगालची परिस्थिती

पाटण्यात आल्यावर त्याने आपल्या विधवा मुलीचे व इतर नातेवाईकांचे सांत्वन केले. सुभ्याच्या कारभाराची पुन्हा घडी बसविली. युद्धामध्ये शमशिरखानाची बायको व मुलगी पकडली गेली होती. अतिशय उदार अंतःकरणाने व स्त्रीदाक्षिण्याने त्याने या दोघींची सर्व प्रकारे काळजी घेतली व त्यांना त्यांच्या घरी पोहोचविले, इतकेच नव्हे तर पोटगीसाठी त्यांना काही खेडेगावेही दिली. त्याने स्त्रियांविरुद्ध तर युद्ध केले नव्हते; याच वृत्तीतून हे सर्व केले. या लढाईच्या आधी एक दिवस तिकडे दिल्लीत महमदशहा मरण पावला होता. यानंतरचे सहा महिने अलिवर्दीने पाटण्याला काढले. बिहारच्या सुभेदारपदाबाबत काहीतरी समाधानकारक व्यवस्था करण्याच्या प्रयत्नात या काळात तो होता. शिवाय दिल्ली येथील शाही दरबारात आता कसकशा घडामोडी होत आहेत हे तो लक्षपूर्वक पहात होता. नवा बादशहा व त्याचे मंत्री यांचे बंगाल-बिहार-ओरिसाचे **सुभेदाराबाबत**-(भा. या तीन सुभ्यांचा एकच संयुक्त विभाग होऊन त्यावर सुभेदार व नबाब म्हणून अलिवर्दीच पूर्वीपासून होता. प्रत्यक्ष कारभारासाठी तो आपल्यातर्फे प्रतिनिधी सुभेदार वा नायब नेमून प्रत्येक सुभ्यांचा कारभार पाही.)–धोरण काय असेल याकडे त्याचे लक्ष होते. दिल्ली येथील राज्यकर्त्यात बदल घडत असलेल्या या काळात, हिंदुस्थानमध्ये अहमद अब्दाली स्वारी करून येण्याचीही अपेक्षा होती. तेव्हा या अब्दालीच्या हालचाली काय आहेत हेही तो पहात होता. अशा व्यवधानात अलिवर्दीने पाटण्यात हे सहा महिने काढले. पुढे सिराज-उद्-दौला याला बिहारचा **नायब नाझिम** (नबाबाचा प्रतिनिधी वा दुय्यम) नेमून त्याने, तेथे गैरहजर राहूनही हे पद चालवावयाचे व या नायब नाझीमच्या गैरहजेरीत राजा जानकीराम याने त्याचा प्रतिनिधी व कामचलाऊ राज्यकर्ता म्हणून प्रत्यक्ष काम करावयाचे असेही त्याने ठरविले. नंतर, ६ नोव्हेंबरच्या सुमारास नबाबाने पाटणा सोडले व तो मुर्शिदाबादेला त्याच महिन्याच्या शेवटच्या दिवशी पोहोचला. [सियार (२) १७१; फ्रेंच वखारीचे पत्र, १० सप्टेंबर १७४८ (नवासंग्रह N. S.); बंगालपत्र २२ डिसेंबर १७४८]

पठाणानी बिहारचा सुभा जबरदस्तीने ताब्यात ठेवला होता त्या काळात म्हणजे अलिवर्दी बिहारमध्ये येण्यापूर्वी सगळीकडेच वार्ता पसरली होती की, —"नबाबाच्या सर्व राज्यात विघटन सुरू झाले असून, त्याच्या राज्यात सामर्थ्याच्या जोरावर सुव्यवस्था राखावयाला आता कोणीही नाही. आपल्याला कोणी आडकाठी करील वा शिक्षा करील अशी मुळीसुद्धा भीती न वाटता, कायद्याची पर्वा न करणाऱ्या बेबंद व्यक्ती सगळीकडे डोके वर काढीत आहेत." १५ फेब्रुवारीला, कासिमबझार येथील इंग्रज वखारीने माल भरून, एक नावांचा ताफा कलकत्त्याकडे पाठविला. या नावांमध्ये ३,९५,०३१ रुपयांचा कंपनीचा माल (बहुतेक सर्व कच्चे रेशीम) आणि तिच्या नोकरांची ३५००० रुपयांची खाजगी मालमत्ता व व्यापारी माल, भरला होता. हा ताफा 'इंग्रजांचे निशाण' लावून म्हणजे इंग्रजांच्या मालकीचा वा त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यातला म्हणून चालला होता व त्याच्याबरोबर सैनिकांचे एक छोटे पथकही होते. या ताफ्याचा मार्ग कटव्या जवळून जात होता. यावेळी कटवा हे मराठ्यांचे **मुख्य ठाणे** असून जानोजी स्वतःच तेथे होता. ताफ्याबरोबर असलेल्या संरक्षक पथकाकडून काहीही विरोध न होता मराठ्यानी ही सर्व मालमत्ता लुटली (१७ फेब्रुवारी). पुढे फत्तेअलीच्या हाताखाली नबाबाच्या सैन्याचा एक भाग चाल करून जवळ आला आहे हे पाहून, तेथील सर्व मालमत्ता बरोबर घेऊन मराठ्यानी कटवा सोडले. यानंतर

काही काळ त्यांच्या सैन्याचा मुख्य भाग बरद्वानजवळ राहिला आणि याचवेळी कटवा भागात मागे रेंगाळत राहिलेली त्यांची बरीच पथके प्रांतभर जिकडे तिकडे पसरली. (बंगाल–सल्लामसलती, २५ फेब्रुवारी, ८ मार्च १७४८). यानंतर बंगालमधील मराठ्यांची सर्व सैन्ये बिहारकडे शमशीरखानाला मिळण्यासाठी घाईने गेली. (भा. पहा प्र. ४ §८ §९).

राणिसराई येथे आपल्या अफगाण मित्राचा निर्णायक पराभव झाल्यावर (१६ एप्रिल) जानोजीने आपले सर्व सैन्य व मिरहबीब यांचेसह, नबाबाला झुकांडी दिली व तो निसटला आणि मुर्शिदाबादेकडे वळला. पण वाटेतच त्याला आपली आई मरण पावल्याचे कळले. तेव्हा त्याने सैन्याचा मोठा भाग बरोबर देऊन मिरहबीबला मेदिनीपुराकडे पाठविले आणि स्वतः तो थोडेसे सैनिक बरोबर घेऊन, नागपूरच्या रस्त्याने निघाला. जानोजी घरी पोहोचल्यावर, रघूजीने आपला धाकटा मुलगा साबाजी[1] याला मराठ्यांचे एक सैन्य बरोबर देऊन मिरहबीबची बाजू बळकट करण्याला पाठविले.

राणिसराईच्या विजयानंतर, बंगाल व बिहार यांना **"बार्गीच्या"** (भा. मराठे बारगीर) हल्ल्यापासून एक वर्षभर मोकळीक मिळाली, पण मेदिनीपुरापासून दक्षिणेकडील ओरिसा मात्र, बिनविरोध मराठ्यांच्याच ताब्यात राहिला.

## § १२ : अलिवर्दीने कटक परत घेतले

१७४९ मार्च मध्याचे सुमारास अलिवर्दी कटव्याला गेला आणि तेथे त्याने ओरिसा परत मिळविण्यासाठी सैन्याची जमवाजमव करण्यास सुरवात केली. दक्षिणेकडून येण्याचा मराठ्यांचा नेहमीचा रस्ता बरद्वान मार्गे असे. तो अडविण्यासाठी ८००० सैन्याचा एक विभाग, त्याने काही महिन्यापूर्वीच बरद्वानला पाठविला होता. पुढे जेव्हा नबाब स्वतः बरद्वानला येऊन पोहोचला त्यावेळी त्याच्या इकडे तिकडे नेण्यासारख्या हलक्या तोफखान्यावरील (तोपखाना-इ-दस्ती) लोकांनी आपला राहिलेला पगार मिळावा म्हणून बंड केले आणि गडबड सुरू केली. तेव्हा रागावून नबाबाने त्या सर्वांना नोकरीतून काढून टाकले आणि बरोबर कसलाही तोफखाना न घेता तो शत्रूविरुद्ध चाल करून निघाला. आता उन्हाळा सुरू झाला होता. तो मोहिमेवर जात होता तो प्रदेश उजाड होता. उन्हाळ्यांच्या दिवसातील अशा उजाड प्रदेशातील मोहिमेत धोके आणि हाल होते ते चुकविण्यासाठी अलिवर्दीचे काही अधिकारीही पळून गेले. पण ७३ वर्षांच्या या वृद्ध अलिवर्दीने कशानेही न दबता, न डगमगता, मेदिनीपूरला असलेल्या शत्रूच्या दिशेने पुढे चाल केली. तो जवळ येत आहे ही बातमी मिळाल्याबरोबर मिरहबीबने आपल्या छावणीला आग लावली आणि दक्षिणेच्या बाजूने पळ काढला. नबाबाने मेदिनीपूर शहरात न शिरता त्याला वळसा घातला आणि कानसाई नदी ओलांडून तिच्या पलीकडच्या बाजूला तो थांबला. नंतर त्याला शत्रू मेदिनीपूरच्या जंगलात असल्याची बातमी मिळाली तेव्हा त्याने आपल्या सैन्याचा एक भाग वेगळा करून तिकडे पाठविला. या सैन्याने शत्रूवर रात्रीचा हल्ला करून त्याना पिटाळून लावले.

---

१ सियार (२) १७५ मध्ये, याला चुकीने मानाजी म्हटले आहे. पण रघूजीला मानाजी नावाचा कोणी, मुलगा नव्हता. पेशवा दप्तर नि. पत्रे खं. २० प. ५५ यात साबाणी भोसले १७४९ मध्ये, बंगालमधून. नागपूरकडे परत आला असा निर्देश आहे. "जानोजीची मोहिम" असा निर्देश 'युसुफ' १००–१०४ मध्ये आहे

अलिवर्दीने त्यांचा पाठलाग चालू ठेवला. बलेसारपर्यंत पुढे गेल्यावर त्याला कळले की साबाजी व मिरहबीब यानी आपले सैनिक नबाबाच्या सैन्याबरोबर लढा देण्यात टिकाव धरू शकणार नाहीत असे दिसून आल्याने, कटकच्या जंगलातून दूरवर पळ काढला आहे. तेव्हा अलिवर्दीने कटकच्या दिशेने आपले सैन्य पुढे घुसविले. वैतरणी नदीचे दोन्ही फाटे अनुक्रमे भद्रक व जाजपूर येथे ओलांडले व कटकच्या उत्तरेस सुमारे ३६ मैलांवर 'बरा' येथे आपले ठाणे ठेवले. या ठिकाणी त्याला सय्यदनूर सरांदाझखान आणि धर्मदास (हा त्याच्या तोफखान्यावरील बंड केलेल्या गोलंदाजांचा कप्तान होता.) यांच्याकडून पत्रे मिळाली. ते आधी मराठ्यांना जाऊन मिळाले होते व मराठ्यानी पळून जाताना, त्यांच्या ताब्यात बराबाती किल्ला व कटक शहराभोवतालचा प्रदेश देऊन त्यांना मागे ठेवले होते. या लोकानी आपल्या पत्रातून अलिवर्दीला आता कळविले की, तो ज्यावेळी त्या भागात येऊन पोहोचेल त्यावेळी ते त्याला शरण येतील.

पण नबाब हा इतका मुरलेला अनुभवी सेनापती होता की केवळ या पत्रावरून गैरसावधपणे घाईत त्याने काहीही हालचाली केल्या नाहीत. प्रथम काही काळ त्याने त्या दाट जंगलात हबीबचा शोध केला पण त्यात, मराठे असल्याची काहीही चिन्हे त्याला सापडली नाहीत. तेव्हा जंगलातून बाहेर पडण्याच्या मार्गावर देखरेख करण्यासाठी त्याने आपले काही सैन्य मागे ठेवले. नंतर बरोबर २००० सैन्य घेऊन बरापासून कटककडे अतिशय जलदीने कूच केले ते सतत रात्रभर व दुसरा अर्धा दिवस इतके, आणि तेही झाडही नसलेल्या रस्त्यावरून, मे महिन्यातील कडक उन्हाचा त्रास सहन करीत! अशा रीतीने १८ तास सलग खडतर प्रवास करून शेवटी 'बराबाती' ( Barabati ) समोर दुपारच्यावेळी येऊन तो पोहोचला, (सुमारे १७ मे १७४९) यावेळी त्याच्या बरोबरचे संरक्षक सैन्य, अतिशय दमलेल्या ३०० घोडेस्वाराइतके कमी झालेले होते. काहीही सामान-सुमान वा तंबू त्याच्या या झपाट्याच्या दौडीबरोबर राहू शकले नव्हते. तो आल्यावर किल्ल्यातील शिबंदीने दुसरे दिवशी शरण येण्याचे मान्य केले. त्या दिवशी सकाळी जेव्हा किल्ल्यातील अधिकारी नबाबाशी बोलणी करण्यासाठी आले, तेव्हा नबाबाने आधीच देऊन ठेवलेल्या हुकुमानुसार सय्यदनूर आणि धर्मदास याना कैद करण्यात आले. पण सरंदाझ-खानाने कैद करताना विरोध केला तेव्हा त्याला कापून काढण्यात आले. या परिस्थितीत किल्ल्यातील शिबंदीने दरवाजा बंद करून टाकला व लढा सुरू केला. यामुळे नबाबाला किल्ल्याला वेढा घालावा लागला. यानंतर नबाब स्वत: कटक शहरात शिरला (१८ मे चा सुमार) आणि १५ दिवसांनी बराबातीचा किल्ला शरण आला.

अशा प्रकारे ओरिसा परत जिंकून घेण्याचे काम पूर्ण झाले. पण बंगालच्या या राज्य-कर्त्याला, कटक (भा. ओरिसा) जिंकण्याचे काम, ते कायम हाती राखण्याच्या कामापेक्षा अधिक सोपे होते. याची कारणे तेथील विशिष्ट परिस्थितीत होती. कटकच्या पश्चिमेकडील व दक्षिणेकडील बाजू मराठ्यानी कायमच्या व्यापलेल्या होत्या. या भागातून बाहेर निसटून जाण्यासारख्या असंख्य वाटा या जंगलातून होत्या आणि याउलट बंगाल व कटक जोडणारा एकच रस्ता असून तोही लांबचा, अवघड व वर्षातून अर्धाकाळ पुरामुळे बंद पडणारा होता. अशा परिस्थितीत त्याने देऊ केलेली सुभेदारी पत्करण्याला एकामागून एक अशा त्याच्या अनेक सरदारांनी नकार दिला. त्याना माहीत होते की एकदा नबाब आपल्या सैन्यासह बंगालकडे परत जाण्याला निघाला की राहिलेल्या नेहमीच्या प्रांतीय छोट्याशा सैन्याचे

जोरावर, त्याना मराठ्यांविरुद्ध एक आठवडाही टिकाव धरता येणार नाही. अखेरी दुर्लभरामाच्या पथकामध्ये नोकरी करीत असलेल्या शेख अब्दुस सुभान नावाच्या एका अविचारी भिकारड्या माणसाने, ओरिसाचा डेप्युटी नबाब, म्हणजे एका सुभ्याचा प्रमुख शासक होण्याच्या या संधीवर झडप घातली व हे पद स्वीकारण्याचे ताबडतोब मान्य केले. तेव्हा नबाबाने त्याची गव्हर्नर म्हणून त्या ठिकाणी नेमणूक केली. आता पावसाळा जवळ येत होता. मग बंगालच्या रस्त्यावरील असंख्य नद्यानाल्यांना पूर येऊन ते ओलांडणे अशक्य झाले असते. ही परिस्थिती टाळण्यासाठी नबाबाने बंगालकडे घाईने कूच केले. [**सियार** (२) १७५–१७७, **युसुफ** १३७–१५१, **करम** २४अ–२५ब].

## § १३ : मराठ्यानी कटक पुन्हा जिंकले, जून १७४९

अशी व्यवस्था करून नबाब गेला, पण सगळ्यानीच आधी भाकित केल्याप्रमाणेच परिणाम झाला. कटकच्या बाहेर अलिवर्दीने कूच केल्यानंतर सहा किंवा सात दिवसांनीच या शहरासमोर मिरहबीब पुन्हा परत आला आणि त्याने सातच दिवस नायबनझीम पदावर असलेल्या शेख सुभानाचा पराभव करून त्याला कैद केले. मात्र यावेळी मिरहबीबपेक्षा दसपट अडचणी आपल्यापुढे उभ्या असतानाही शेख सुभानाने अतिशय शौर्याने लढा दिला आणि त्यात तो गंभीर जखमी झाला. अशा रीतीने मराठ्यानी ओरिसाची राजधानी पुन्हा मिळविली आणि अलिवर्दीने केलेले सर्व काम एका आठवड्यातच उधळले गेले. इकडे बंगालचे सैन्य ६ जूनला बलेसारला पोहोचले होते. ओढाताण व उपासमार झालेले हे सैन्य पुन्हा मोहिमेवर जाण्याच्या व सिसिफसच्या कष्टासारखे न संपणारे व फुकट जाणारे[१] अशा मोहिमेचे कष्ट, पुन्हा करण्याच्या परिस्थितीत व मानसिक अवस्थेत नव्हते. नुकत्याच केलेल्या कष्टामुळे आता नबाबाचीही प्रकृती ढासळू लागली होती. या परिस्थितीत त्याने आपला मोर्चा घराच्या दिशेनेच चालविला आणि जुलईच्या आरंभी तो मुर्शिदाबादेला पोहोचला. [**सियार** (२) १७८; **बंगाल-सल्लामसलती** २४, २७ व २९ मे, १७ जून १७४९].

## § १४ : अलिवर्दी–मेदिनीपूरमध्ये

एप्रिल १७४८ मध्ये अलिवर्दीने बिहार परत जिंकला आणि नंतर, १७४९ च्या उन्हाळ्याइतक्या लवकर ओरिसाही परत मिळविला, हे त्याचे यश नेत्रदीपक होते हे खरे पण ते त्याचे शेवटचेच ठरणार होते. एकही घाव न घालता कटकचा पाडाव झाला होता पण हे साध्य करण्यासाठी त्याला फारच निकडीने दमछाक करीत चाल करावी लागली होती. आठवडेच्या आठवडे चटके देणारे ऊन डोक्यावर सहन करावे लागले होते. चिखलाने भरलेले रस्ते व पावसाने दुथडी भरून वहात असलेले नद्या-नाले त्याला ओलांडावे लागले होते आणि हे सर्व करीत असताना त्या दरिद्री, जंगली भागात मिळणाऱ्या फक्त जाड्याभरड्या अन्नावर भागवावे लागले होते. या सर्व खडतर धडपडींचा, ७३ वर्षांच्या या अलिवर्दीच्या वृद्ध शरीरावर परिणाम झाला होता. शिवाय या वृद्धाने आपल्या सर्वच दीर्घ जीवनात सुखदायक गोष्टी तुच्छ लेखून, ते जीवन कष्टमय स्थितीत घालविले होते. स्वतः गादीवर बसल्यापासून बहुतेक प्रत्येक वर्षी त्याला कोणत्याना कोणत्यातरी, स्वकीय वा

१ सिसिफसचे कष्ट :

परकीय शत्रूला तोंड देऊन त्याचा मोड करावा लागला होता. या सर्व शत्रूंमध्ये त्याच्या कुटुंबियातल्या अगदी जवळच्या व्यक्तीपासून ते त्याच्याच हाताखालील अधिकाऱ्यापर्यंत, तसेच त्याच्या सरहद्दीपलीकडील परकीय, असे अनेक प्रकारचे शत्रू होते. या एकूण परिस्थितीत ओरिसाहून परत आल्यावर लवकरच तो गंभीर आजारी पडला आणि हा त्याचा आजार पुढे १७४९ च्या ऑक्टोबरमध्येही बराच काळ चालू राहिला. [बंगाल-सल्लामसलती, १८ ऑक्टोबर १७४९].

पण अलिवर्दीला विश्रांती मिळावयाची नव्हती. या आजारातून बरा झाल्यावर थोडे दिवस त्याने मिहिरपूर येथे (पलाशीच्या थेट पूर्वेस, २४ मैलांवर) करमणुकीसाठी हरिणांच्या शिकारीत खेळकरपणे घालविले आणि नंतर त्याने कटव्याला कूच केले. त्या ठिकाणी आपले सैन्य एकत्र जमविल्यावर बरद्वानच्या वाटेने मेदिनीपुराला तो पुढे गेला, (डिसेंबर १७४९) दरम्यान १५ ऑक्टोबरच्या सुमाराला मिरहबीब बलेसारला आला होता. मोहनसिंग व मराठा सैन्य हीही त्याच्याबरोबर असून त्याच्या एकूण सैन्यापैकी पिछाडीची पठाण पथके नंतर दोन दिवसांनी येऊन पोहोचली. (ही पथके मुस्तफाखानाचा मुलगा मुर्तझा याच्या हाताखाली होती.) अशा प्रकारे हे सर्व शत्रू सैन्य आता एकूण ४०,००० झाले. [**बंगाल-सल्लामसलती,** २६ ऑक्टोबर १७४९. **सियार** (२) १७९.]

आपल्या लष्कराची एक कायम छावणी मेदिनीपूराला ठेवण्याचा निर्णय अलिवर्दीने या वर्षी घेतला. बंगालमध्ये मोहिमा काढण्याचा मराठ्यांचा मार्ग कायम बंद करून ठेवावयाचा हे या निर्णयामागे उद्दिष्ट होते. मेदिनीपूरच्या छावणीत असताना आपल्या सैन्यात असलेल्या गैरव्यवहारांचा बंदोबस्त करण्याचा अलिवर्दीने प्रयत्न केला. याचा परिणाम मात्र सैन्याशी असलेले त्याचे सलोख्याचे संबंध तुटण्यात झाला. पगार वाटणारे कारकून आणि सैन्यातील अधिकारी (कॅप्टन्स) यांच्या दरम्यान दाट संगनमत असून त्यातून फार मोठा अपहार होत असे. सैनिकाना एकत्र जमवून हजेरी घेण्यात आली तेव्हा सरकारकडून पगार दिला जात असलेल्या सैनिकांच्या संख्येऐवजी सर्वसामान्यपणे फक्त १/४ सैनिकच प्रत्यक्षात नोकरीवर ठेवलेले असत, असे आढळून आले. एका कॅप्टनच्या हाताखालील पथकात तर, सरकारच्या पैशाची लुबाडणूक इतकी भयानक होती की, वर्षानुवर्षे वक्तशीरपणे सरकारातून १७०० लोकांचा पगार तो घेत असताना, खरोखरी फक्त ८० लोकच त्याच्या पथकात प्रत्यक्ष हजर होते, बाकीच्या सर्व याद्या पोकळ व खोट्या होत्या. अशा तपासणीनंतर नबाबाने आपल्या सेनाधिकाऱ्यांना द्यावयाच्या रकमा, त्यांच्या सेना विभागात जितके लोक प्रत्यक्षात होते त्यांच्या पगाराइतक्या, कमी केल्या, तेव्हा ते अधिकारी अतिशय नाराज झाले आणि परिणामतः त्याला ही सुधारणा बंद करावी लागली. [**सियार** (२) १८०].

मेदिनीपूरच्या छावणीत अशीही अंतर्गत अडचण खदखदत असताना, फेब्रुवारी १७५० च्या अखेरी कित्येक हजारांचा एक मराठा सैन्य विभाग त्याला झुकांडी देऊन पुढे गेला आणि राजमहल इतक्या, दूरपर्यंतचा प्रदेश त्याने लुटला. तेथून ते सैन्य मुर्शिदाबादेकडे वळले. त्यांच्या या हालचालींची माहिती मिळाल्याबरोबर अलिवर्दी झपाट्याने बरद्वानकडे मागे सरकला. पण त्याने अशी हालचाल केल्याचे कळल्या बरोबर हल्लेखोर बाजूला वळले आणि त्यानी पश्चिम बंगालच्या जंगलात आश्रय घेतला. बरद्वान शहराबाहेरील दिवाण माणिकचंदाच्या बागेमध्ये नबाब काही काळ राहिला आणि नंतर तो मेदिनीपूराला परत

आला (एप्रिल १७५०). मेदिनीपूरचा फौजदार म्हणून, ते धोक्याचे अधिकारपद स्वीकारावयास कोणीही अधिकारी तयार होत नसल्यामुळे नबाबाला स्वतःच तेथे रहावे लागले. तेव्हा सैनिक व त्यांचे अधिकारी यांच्यासाठी कायमची घरे व नबाबासाठी वाडे, तेथे बांधण्यात आले व नबाबाच्या जनानखान्यातील स्त्रियांनाही मुर्शिदाबादेहून बोलावून घेण्यात आले.

## § १५ : सिराजउद्दौला पाटण्यावर हल्ला करतो, जून १७५०

पण दुसरीकडे नबाबापुढे एक नवेच संकट उभे रहात होते. त्याचा लाडका नातू व नियोजित वारस सिराजउद्दौला याला सय्यद महदी निसारखान याने पाटण्यावर झपाट्याने चालून जाऊन हल्ला करण्यास चिथावणी दिली. सिराजने पाटण्यावर असा हल्ला करून, नबाबाच्या तेथील प्रतिनिधीच्या म्हणजे राजा जानकीराम याच्या हातातून बिहार सुभ्याचा कारभार हिसकावून घ्यावा आणि स्वतः तेथे स्वतंत्र सुभेदार व्हावे अशी ही चिथावणी होती. (चिथावणी देणारा सय्यद महदी निसारखान हा इतिहासकार गुलाम हुसेन याचा चुलता असून, नबाबाच्या सैन्यातील एक असंतुष्ट अधिकारी होता.) तेव्हा या मूर्ख आणि लहरी मुलाने–सिराजने मुर्शिदाबाद येथील राजवाडे व बागा पाहून येण्याची सबब सांगून, मेदिनीपूरची छावणी सोडण्याची परवानगी घेतली आणि नंतर त्या शहरातून, आपल्या पत्नीसह तो गुपचूप बाहेर पडला. पुढे पाटण्याला आल्यावर महदी निसारखानासमवेत त्याने त्या शहरावर हल्ला केला. प्रस्तुत धन्याचा लाडका नातू (हा नातू खुद्द धन्याच्या शरीराचा एक नाजूक भागच—जणू डोळ्यातील बाहुलीच—इतका लाडका होता.) आणि आपला भविष्यकालीन धनी, अशा या सिराजवर गोळीबार करावयाला पाटण्यातील शिबंदी कांकू करू लागली. शहराच्या पश्चिम दरवाजाजवळ, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी "बेगमपुऱ्याची खिडकी" नावाची, एका जुन्या नाल्याची वा मोरीची वाट होती, त्यातून सिराजचे काही लोक आत शिरले आणि त्यानी दरवाजा उघडून सिराजउद्दौल्याला आत घेतले. यामुळे हाजिगंजमधील अरुंद रस्त्यामधून सुरू झालेल्या लढाईत, नबाबाच्या एकनिष्ठ सैनिकाना, हळूहळू पण सतत मागे रेटण्यात येऊ लागले आणि सिराजचे अनुयायी सबंध शहर जिंकण्याच्या बेतात आले आहेत असे दिसू लागले. पण अशावेळीच प्रथम अमानतखान, नंतर मिर्झा मदारीबेग–दखवनी–आणि शेवटी महदी निसार, मारले गेले. अशा रीतीने आपले पुढारी पडल्याचे पाहून बंडखोरांचे धैर्य गळाले आणि ते शहराबाहेर पळून गेले. सिराज मात्र काहीही धक्का न लागता राहिला आणि त्याने एका खाजगी घरात आश्रय घेतला. हे पाहिल्यावर राजा जानकीराम आणि शहराची शिबंदी यानी सुटकेचा दीर्घ निश्वास सोडला. (सुमारे २७ जून १७५०). [सियार (२) १८२–१८५. युसुफ १६०. करम ३८ अ.].

दरम्यान इकडे मुर्शिदाबादेहून पाटण्याकडे सिराज पळून गेल्याचे कळल्याबरोबर लगेच पावसाळा सुरू होऊन रस्ते प्रवासास अयोग्य होऊ लागले असतानाही, अलिवर्दी मेदिनीपुराहून त्याच्या पाठोपाठ निघालाही. वाटेत मुर्शिदाबादेला फक्त एकच दिवस थांबून तो पुढे बिहारकडे जलदीने निघाला. वाटेत घियासपूरला (बाऱ्ह आणि फतुआ यांच्या मध्यावर) पोहोचला असताना, पाटण्यावर हल्ला झाला व सिराजचा पराभवही झाला ही वार्ता त्याला मिळाली. अमर्याद हळूवारपणे त्याने त्या तरुण बंडखोराचे सांत्वन केले आणि नबाबाची सर्व प्रकारची मेहेरनजर, पूर्वीचे सर्व अधिकार व मानपान त्याला परत दिले आणि त्याला

बरोबर घेऊन तो मुर्शिदाबादेला परत निघाला. पाटण्याला असतानाच नबाबाला अतिशय तीव्र तापाने पछाडले. पण मेदिनीपुराला मराठ्यांची भीती होतीच व नबाबाने तेथे मागे ठेवलेले अधिकारी कर्तृत्वशून्य आणि भित्रेही होते. यामुळे नबाबाला पाटण्याला रहाता येत नव्हते. यासाठी त्याने बरोबर वैद्य व हकीम (Physicians) घेऊन गंगेतून नावेने प्रवास केला व तो मुर्शिदाबादेला पोहोचला. तेथे त्याच्यावर आणखी उपचार करण्यात आल्यावरच तो या आजारातून बरा झाला. (सप्टेंबर).

या सर्व काळात, मेदिनीपुरातील छावणीत निराशा आणि भीती यांचे थैमान चालू होते. नबाब अतिशय वृद्ध झाला असल्याने हा त्याचा आजार अखेरचाच ठरणार असा विश्वास तेथे वाटत होता. आपल्या गैरहजेरीत मेदिनीपुरावर हुकमत चालविण्यासाठी नबाबाने मिरजाफर व राजा दुर्लभराम याना ठेवले होते. हे दोघेही पूर्णतया कर्तृत्वशून्य असून शिवाय पूर्वी मराठ्यांविरुद्ध झालेल्या त्यांच्या अपयशी व दुर्दैवी लढ्यामुळे ते अगदी भेदरून गेलेले होते. यावेळी मेदिनीपूर येथील परिस्थिती इतकी गंभीर व निकडीची झाली होती की, तापातून बरा झाल्याबरोबर त्याला मेदिनीपूरला जाण्यास निघावे लागले. तो अद्याप अशक्तच असून त्याची प्रकृती नेहमीइतकी पुन्हा सुधारावयाला अजून फार अवकाश होता; तरीही त्याला निघावे लागले. (डिसेंबर १७५०) तेथे आल्यावर त्याने मिरहबीबशी युद्ध करून त्याला पश्चिमेकडील जंगलात पिटाळून लावले. यानंतर ओरिसा प्रांत परत जिंकून घेण्याचे काम पुढील हिवाळ्यापर्यंत पुढे ढकलून नबाब कटव्याला परत आला. (फेब्रुवारी १७५१). [**सियार** (२) १८७].

## § १६ : मराठ्यांबरोबर शांतता तह, १७५१

दोन्ही पक्ष आता शांततेसाठी उत्सुक झाले होते. इतक्या त्रासदायक युद्धाने अखेरपक्षी मराठ्यांचा काहीही फायदा झालेल्या नव्हता. या परिस्थितीत या त्रासदायक लढाया चालू ठेवणे हे निरुपयोगीच आहे हे आता मिरहबीब व मराठे यांना समजून आले. पूर्वेकडील प्रांतावरील स्वारीपासून आर्थिक फायदा मिळेल हे रघूजीचे अंदाज व त्याची ही स्वप्ने फोल ठरली होती. उलट पूर्वी कधीही नव्हता इतका तो आता कर्जात बुडाला होता. ओरिसासारखा दरिद्री भाग जिंकून त्याला मिळालेल्या उत्पन्नातून त्याचा खर्चही वसूल झाला नव्हता. १७४९ मध्ये ज्यावेळी त्याचा मुलगा साबाजी याने त्या प्रांतातून नागपूरकडे घाईने माघार घेतली त्यावेळी त्याच्या सैनिकानी आपल्या पगाराच्या मोठ्या बाक्या देण्याबाबत रघूजीकडे अतिशय तगादा लावला. पण त्यांची मागणी वा अन्य कोणा सावकाराची बाकी चुकविण्याचे काही साधन राजाकडे नव्हते. याउलट नबाबाबरोबर मित्रत्वाची काही व्यवस्था व तडजोड करता आली तर मराठ्याना काहीतरी निश्चित उत्पन्न मिळाले असते. सामर्थ्याच्या जोरावर मिळणारे उत्पन्न अनियमितच असून शिवाय त्यासाठी खर्च व खटाटोप करावा लागतच होता. या अनुभवातूनच त्यांना आता तडजोडीची इच्छा निर्माण झाली होती.

अलिवर्दीखानही आता ७५ वर्षांचा वृद्ध झाला असून, वृद्धापकाळाचा स्वाभाविक थकवा व जवळ येत असलेला मृत्यू त्याला जाणवू लागला होता. अंतर्गत व घरगुती शत्रू आणि परकीय शत्रू यांच्या विरुद्ध अलिवर्दीच्या सैन्याला सतत मोहिमा काढाव्या लागल्या

होत्या, सतत निकडीने कूच करावे लागले होते आणि यामुळे नबाबाची ही सैन्ये अतिशय थकलेली होती. 'बारगी' सैन्याने प्रतिवर्षी केलेली लूटमार आणि नाश यामुळे पश्चिम व दक्षिण बंगालमधील त्याची प्रजा पूर्णपणे दरिद्री झाली होती. त्याची राज्यसत्ता जवळजवळ दिवाळखोर बनली होती. यातून पुन्हा सावरण्याला, त्याला व त्याच्या प्रजेला, दोघानाही शांततेची अनेक अनेक वर्षे अवश्य होती. या परिस्थितीत, त्याचे भले व्हावे असे इच्छिणारांचा सल्ला त्याने ऐकला आणि मिरजाफरला मध्यस्त म्हणून हालचाल करण्याला आणि मराठ्यांच्या बरोबर शांतता तहाबाबत बोलणी सुरू करावयाला परवानगी दिली. (मार्च १७५१). मिरजाफरने आपले दोन प्रतिनिधी मिरहबीबकडे पाठविले. मिरहबीबनेही त्याच्या तहाबाबतच्या सूचनेचे स्वागत करून मिर्झा सालिह या आपल्या प्रतिनिधीला बंगालच्या प्रतिनिधीबरोबर परत मिरजाफरकडे पाठविले. यावेळी नबाब कटव्याला होता. मिरजाफरने आलेल्या प्रतिनिधीला नबाबापुढे सादर करून ओळख करून दिली. यानंतर नबाबाकडील लोकांबरोबरच हा प्रतिनिधींचा ताफाही मुर्शिदाबादेकडे गेला आणि त्या ठिकाणी तहाच्या अटी निश्चित झाल्या. यातून तयार केलेला तहाचा मसुदा मान्यतेसाठी नागपूर दरबाराकडे पाठविण्यात आला आणि अखेरी मे वा जूनमध्ये तहावर सह्या झाल्या. यानुसार मान्य झालेल्या अटी अशा :

(१) आता मिरहबिब हा अलिवर्दीचा नोकर होईल आणि त्याच्यातर्फे, ओरिसाच्या नायब-नाझीम (डेप्युटी गव्हर्नर) म्हणून कारभार करील. प्रांताचा खर्च जाऊन शिल्लक राहणारा वसूल, तो रघूजीला त्याच्या सैन्याच्या पगारासाठी देईल.

(२) .....बंगालच्या वसुलापैकी १२ लाख रुपये त्या सुभ्याबाबत चौथ म्हणून रघूजीला प्रतिवर्षी देण्यात येतील.

(३) .....मराठे पुन्हा अलिवर्दीच्या सुभ्यात पाय ठेवणार नाहीत असे मराठा-दरबाराने मान्य केले. यावेळी जलसार जवळील सुवर्णरेखा[1] नदीपर्यंत व या नदीच्या पात्राचाही समावेश असणारी अशी बंगालची सरहद्द निश्चित करण्यात येऊन ही सरहद्द आपण पुन्हा कधी ओलांडणार नाही असे बंधनही मराठ्यानी मान्य केले.

अशा रीतीने मेदिनीपूर जिल्हा पुन्हा एकदा बंगालच्या सुभ्यास जोडण्यात आला. [**सियार** (२) १८८, युसुफ १८०].

## § १७ : मिरहबीबचा खून, १७५२

अनेक वर्षे सतत केलेले कष्ट व या सुभ्यात केलेला रक्तपात, लुटालूट आणि नासवून यानंतर अखेरी एकदाची मिरहबीबने आपल्या जीवनातली महत्त्वाकांक्षा पार पाडली—तो एका सुभ्याचा राज्यकर्ता धनी बनला. पण त्याने मिळविलेला हा नवा अधिकार व त्याचा डामडौल त्याला फार काळ उपभोगिता आला नाही. या पदावरून त्याचा त्वरेने झालेला शेवट मोठा शोक पर्यवसायी असून **सियार-उल्-मुताख्खरीनच्या** लेखकाला त्यामध्ये दैवी न्यायाचा प्रभाव दिसतो. तो लिहितो. "इतके कष्ट केल्यानंतर जेव्हा बिचारा मिरहबीब

१ या नदीचे नाव सोना-मकिआ Sona-Makia असे चुकीचे सियार (२) १८८ मध्ये छापले आहे.

आपण केलेल्या जुलमातून मिळणारा फायदा उपभोगण्याच्या बेतात होता त्याचवेळी त्याने केलेल्या क्रौर्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची पाळी त्याच्यावर आली. त्याच्या सैन्याने आणि मराठ्यांनी, मोहिमांचे वेळी असंख्य निरपराध व निरुपद्रवी लोकावर जुलूम जबरदस्ती करून त्यांचा नायनाट केला होता. यासाठीच त्याच्यावर नियतीचा हा सूड असून, त्यातूनच त्याला घोर निराशा व पुन्हा भरून काढता येणार नाही असा दंड सोसावा लागला व त्याचा मृत्यू ओढवला." [(२) १९०]. नबाबाशी तह झाल्यावर एक वर्षाने, आपल्या पित्याचा प्रतिनिधी म्हणून जानोजी कटकला आला आणि मराठा सैन्याचा ताबा त्याने आपल्या हाती घेतला. मिरहबीबच्या सत्तेखाली, मराठ्यांकडील ब्राह्मण अधिकारी चिडलेले होते. तहानंतर मिरहबीब अलिवर्दीचा अधिकारी झाल्याने, तो रघूजीचा अधिकारी राहिला नव्हता यामुळे यापुढे त्याचे हुकूम मानण्यास या मराठ्यांकडील अधिकाऱ्यांनी नकार दिला होता. नव्याने जिंक-लेल्या प्रदेशात लोकाकडून पैसा उकळणे आणि पैशाची अफरातफर वा अपहरण करणे या गोष्टी या मराठा अधिकाऱ्यांच्या आवडीच्या व अंगवळणी पडलेल्या होत्या पण प्रजेच्या हिताची काळजी बाळगणारा एक राज्यकर्ता या दृष्टीने मिरहबीब या गोष्टी चालू देणे शक्य नव्हते. याचवेळी, तो आपल्या प्रजेची घेत असलेली काळजी व त्याचा कारभारातील विश्वासूपणा यामुळे हे रक्तपिपासू मराठा अधिकारी, त्याचा द्वेष करू लागले. मिरहबीबने आपल्या १४–१५ महिन्यांच्या कारकीर्दीत ओरिसा सुभ्यातून केलेला वसूल व खर्च याचा आणि बंगालमधून येणारा चौथ व त्याची अफगाण व मराठा सैनिक यामधील वाटणी यांचा हिशेब मागून घ्या असा आग्रह या मराठा अधिकाऱ्यांनी जानोजीपुढे चालविला. आपल्या अधिकाराला अलिवर्दीचा प्रतिनिधी या स्वरूपात कोणी प्रतिस्पर्धी असावा, हे जानोजीलाही सहन होणे शक्य नव्हते. या परिस्थितीत जानोजीनेही हा आग्रह मान्य केला व यातून मिरहबीबला काढून टाकण्यासाठी एक कट तयार करण्यात आला. मिरहबीब व त्याचे ४०–५० प्रमुख अनुयायी याना एकदा जानोजीने आपल्या तंबूत बोलविले आणि ते आल्यावर सबंध दिवस त्यांच्याशी हसतखेळत गोड बोलण्यात घालविला आणि सूर्य मावळण्याच्या सुमारास, बाहेर जाऊन सायंपूजा करण्यासाठी त्यांचा निरोप घेतला. यानंतर लगेच मराठा सैनिकानी तंबूत घुसून गर्दी केली व मिरहबीबला घेरले आणि सांगितले की, त्याने आता सर्व हिशेब देऊन अफरातफर व अपहार केलेल्या पैशाबाबत हुंड्या वा करार दिल्याशिवाय त्याला तंबू सोडून जाण्यास परवानगी मिळणार नाही. यानंतर काही वेळ हबीबने त्यांच्याशी चर्चा केली पण या सर्व हालचाली म्हणजे त्याला ठार मारण्याचा एक कट आहे हे अखेरी त्याला समजून चुकले. तेव्हा मध्यरात्रीच्या सुमाराला त्याने व त्याच्या अनुयायांनी आपल्या तरवारी उपसल्या आणि भोवतालचे मराठ्यांचे कडे तोडून आपला मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न केला पण यात ते सर्व मारले गेले[1]. (२४ ऑगस्ट १७५२).

---

१ हीच निश्चित तारीख (नव्या गणना पद्धतीनसार ४ सप्टेंबर), फ्रेंचांचे वखारीतील एका पत्रावरून कळते. हे पत्र चंद्रनगरहून मच्छलिपट्टमला पाठविलेले असून, ते ११ ऑक्टोबर १७५२ (नव्या पद्धतिनुसार) या तारखेचे आहे. "Correspondence in Council de Chandranagar avec divers, ii. 435"

सियार (२), १८९–१९०.

सियार (२) १८८ मध्ये नमूद केले आहे की, या तहावर ११६५ हिजरीसनाच्या सुरवातीला सह्या केल्या. (हे हिजरी वर्ष ९ नोव्हेंबर १७५१ ला सुरू झाले.) पण सियारमधील ही नोंद चुकीची आहे कारण, त्यातील पुढील पृष्ठावरच, तहानंतर एक वर्ष व काही महिन्यानीच, हबीबचा खून करण्यात आला अशी नोंद आहे. यावरून तहावरील सह्यांबाबत वेळेची नोंद (११६५ हिजरी-आरंभ) चूक आहे हे दिसते. करम ३८ ब.

## § १८ : ओरिसा मराठ्यांचा सुभा कसा झाला

मिरहबीब नंतर त्याचे जागी रघूजीचा एक दरबारी, मुसालिह्-उद्-दिन महमदखान हा ओरिसाचा नायब नाझिम झाला. कायद्याच्या दृष्टीने तो जरी अलिवर्दीखानाचा प्रतिनिधी असला तरी सर्वंच बाबतीत तो, मराठा राजा रघूजी भोसले याचा नोकर असल्याप्रमाणे वागला, आणि कारभारावर हबीबने जशी खरीखुरी हुकमत चालविली होती तशी, प्रत्यक्ष हुकमत त्याची चालत नव्हती. [सियार (२) १९०]. अशाप्रकारे काही थोड्या वर्षातच बंगाल आणि बिहारच्या सुभेदाराचे ताब्यातून, ओरिसा जाऊन तो एक मराठ्यांचा प्रांतच बनला. आतापर्यंत झालेल्या मराठ्यांच्या मोहिमांचा झालेला हा एक कायम टिकावू परिणाम होय. या मोहिमांचा आणखी एक परिणाम झाला तो असा की, त्यांनी उत्तरेकडील प्रदेशातील लुटारू टोळयाना बंगाल व बिहारमध्ये योजनापूर्वक लूट कशी करावी याची पद्धत दाखवून दिली. या लुटारूंच्या टोळया स्वतःला **'संन्यासी आणि फकीर'** म्हणवीत असत. या टोळयानी चालविलेली ही लूटमार दडपून टाकण्याला, पुढे वॉरन हेस्टिंग्जच्या जन्मसिद्ध अलौकिक कर्तबगारीचीच जरूरी पडली.

अलिवर्दीने ओरिसा प्रांत मराठ्यांना देऊन टाकला असे म्हणणे चुकीचे आहे. १७५१ च्या तहातील कलमावरून स्पष्ट दिसून येते की, या सुभ्याचे दोन भाग करण्यात येऊन त्यापैकी एकाचा म्हणजे उत्तरेकडच्या कोपऱ्यातील अधिक सुधारलेल्या भागाचा संपूर्ण ताबा व त्याचा कारभार, नबाबाने आपल्या हाती ठेवला होता. यातच मेदिनिपूर व जलेसर ही महत्त्वाची शहरे होती. अधिक तुरळक वस्ती असलेला दक्षिणेकडचा भाग हा या विभागणीतला दुसरा वाटा असून त्यात बलेसा हे मोठे व्यापार केंद्र, राजधानी कटक आणि पुरी हे पवित्र क्षेत्र, असे होते. या दुसऱ्या भागाचा कारभारही नबाबाच्या अधिकाऱ्यानी करावयाचा असून, त्यातील महसूल मात्र मराठ्यांना द्यावयाचा होता. याचा अर्थ असा की, हा दुसरा भाग, मराठ्यांची एक विस्तृत जहागीर बनला पण त्याच्या प्रादेशिक सार्वभौमत्वात मात्र काहीही बदल झाला नाही. (भा. याचा अर्थ इतकाच की कारभार खर्च वजा करून राहिलेल्या महसुलापुरताच मराठ्यांना हक्क मिळाला.) तथापि हा सर्व अर्थ तहाच्या संदर्भात तात्त्विकच राहिला आणि प्रत्यक्षात वेगळीच परिस्थिती निर्माण झाली. अलिवर्दीनंतर (१७५६) नबाब पदावर आलेले नबाब दुर्बल होते. मुर्शिदाबादेच्या दरबारात क्रांतीकारक बदल झाला असून नबाब नामधारी बनून, खरी सत्ता इंग्रज कंपनीच्या हाती गेली होती आणि या सत्तांतराच्या काळात कारभारात गोंधळ निर्माण झाला होता. या एकंदर बदललेल्या व गोंधळाच्या परिस्थितीत मराठ्यांना ओरिसावरील आपल्या आर्थिक हक्काचे परिवर्तन संपूर्ण राजकीय सार्वभौमत्वात करून हा भाग आपल्या वऱ्हाडच्या राज्याला जोडता आला.

या परिवर्तनातील पहिली पायरी म्हणजे, मिरहबीबच्या मृत्यूनंतर (१७५२), या सुभ्यातील नबाबाचा अधिकारी–नायब नाझीम– म्हणून नागपूरच्या दरबारातील अधिकाऱ्यांपैकी एकाची निवड करण्यात आली ही होय. नेमलेला हा अधिकारी म्हणजे मुसालिह्-उद्-दिन महमदखान हा होय. या नेमणुकी पूर्वीचे त्याचे संबंध आणि त्याच्या नव्या स्थानाच्या संदर्भात असलेली त्याची दुर्बलता, यामुळे सर्व बाबतीत त्याने मराठ्यांच्या म्हणण्यालाच मान तुकविली. परिणामतः या प्रांतावरील अलिवर्दीचे सार्वभौमत्व नावालाच राहून मराठ्यांना जे वाटेल ते करता आले. ओरिसाच्या राजकीय स्थानामध्ये हे, जे परिवर्तन घडून आले ते **कलकत्ता–सिलेक्ट–कमिटीने**, ११ डिसेंबर १७६१ ला स्पष्टपणे मांडले आहे....हीं कमिटी

म्हणते–"कटक प्रांतातून काही ठराविक रक्कम "चौथ" म्हणून मराठ्यांना दिली जाईल असे बंगालच्या नबाबाने मान्य केले त्याला आता सुमारे १२ वर्षे झाली आहेत. आपला हिस्सा गोळा करण्याच्या निमित्ताने मराठ्यांनी, क्रमाक्रमाने सर्वच प्रांत बळकावला असून येवढ्या-वरही संतुष्ट न रहाता, जवळपासच्या बंगालच्या भागांना आणि विशेषत: मेदिनिपूर आणि बरद्वान या जिल्ह्यांना त्रास देण्याचे त्यानी चालू ठेवले आहे. हे जिल्हे आता कंपनीच्या मालकीचे झाले आहेत तरीही हा त्रास चालू आहे."(भा. मेदिनिपूर हा ओरिसाचा जिल्हा पण तो नबाबाच्या वाट्याचा होता म्हणून आता इंग्रजाकडे आला होता) [लाँगमन्स–निवडक कागदपत्रे (१) अनु. ५७२]. अशी परिस्थिती असली तरी तह झाल्यानंतर दहा वर्षेपर्यंत बंगालचे नबाब बलेसारला आपला फौजदार (भा. स्थानिक प्रमुख अधिकारी) नेमीत आणि मराठ्यांकडून त्याला वारंवार त्रास दिला जात असला तरीही नबाबाने हा अधिकारी नेमण्याचे या काळात चालूच ठेवले.

## § १९ : नबाब व मराठे यांच्यामधील, यापुढील काळातील संघर्ष

अशाप्रकारे नबाब व मराठे यांच्या दरम्यान संघर्षाचा हा एक विषय शिल्लकच राहिला. असा आणखी दुसराही होता. मुघल साम्राज्याच्या भौगोलिक वर्णनात निश्चित केलेला संपूर्ण ओरिसा सुभा नबाबाने त्याना दिलेला नव्हता, तर या सुभ्यापैकी सर्वात उत्तरेचा मेदिनिपूर जिल्हा, नबाबाने आपल्याकडे ठेवला होता आणि हाच जिल्हा तर त्याच्या दृष्टीने, बंगाल व बिहारवर स्वाऱ्या करण्याच्या मार्गावरील, थांबण्यास सोयीचा असा मधला टप्पा होता. तेव्हा कायदेशीररीत्या हा भाग आपलाच आहे यासाठी तो हिसकावून घेण्याचा प्रयत्न करावा अशी मराठ्यांची महत्त्वाकांक्षा होती आणि विशेषत: प्लासीची लढाई होऊन, त्यातून नबाबी सरकारची दुर्बलता सर्वांना उघडपणे दिसून आल्यावर तर ही महत्त्वाकांक्षा विशेषच तीव्र झाली. पुढे प्लासीनंतर इंग्रज, नबाबाच्या राज्याचे पालक बनले व यातून मराठ्यांचा इंग्रजाशी झगडा सुरू झाला.

नबाब-मराठे मतभेदामागे तिसरेही कारण होते, ते बंगालचा चौथ म्हणून द्यावयाच्या वार्षिक १२ लक्ष रुपयाबाबत. ही रक्कम १७५८ पर्यंत नबाबाने मराठ्यांना दरवर्षी दिली होती. पण या सुमारालाच, बंगालच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्रजानी स्वीकारली होती. त्यानी हा चौथ देण्याचे आता स्थगित केले आणि नागपूर दरबाराशी वाटाघाटी सुरू केल्या. चौथाईची रक्कम जर मराठ्यांना द्यावयाची तर कोणत्याही मराठा सैन्याने नबाबाच्या राज्याच्या कोणत्याही भागाला त्रास देऊ नये अशी हमी, इंग्रजांना पाहिजे होती. पण नागपूर दरबारला याबाबत कोणतीही खरोखरी परिणामकारक अशी हमी देता आली नाही; यामुळे, यानंतर काही वर्षे चौथही देण्यात आला नाही. परिणामत: मराठ्यांनी रागावून राजनैतिक पद्धतिनुसार निषेध व तक्रारी करण्यास आणि स्वारी करण्याच्या धमक्या देण्यास सुरवात केली. इतकेच नव्हे तर नबाबाच्या स्वातंत्र्याचा शेवट आणि पुढे बंगाल व बिहारचा कारभार इंग्रजानी उघडपणेच ताब्यात घेतला ती वेळ, (भा. १७५७–१७६४) या मधल्या काळात मराठ्यांनी मेदिनिपूर व बरद्वान जिल्ह्यात प्रत्यक्ष काही हल्लेही केले.

आपल्या प्रजेला शांतता आणि सुरक्षितता लाभावी या आशेने अलिवर्दीने मराठ्यांचे बरोबर १७५१ चा तह केला होता पण यामुळे त्यांची दुःखे काही लगेच थांबली नाहीत. तहावर सह्या झाल्या त्याच वर्षी पावसाने दगा दिल्याने बंगालचे भाताचे पीक संपूर्णपणे

बुडाले आणि भयानक दुष्काळाने सबंध प्रांत उध्वस्त झाला. बंगाल व बिहारवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या स्वाऱ्या थांबल्या हे खरे पण मराठा राजाच्या नियंत्रणाखाली नसलेल्या, मराठ्यांच्या भटक्या पथकांचे भक्ष्य, असाच ओरिसा प्रांत राहिला, याचे एक उदाहरण म्हणजे बलेसारच्या कोष्टचानी त्यावेळी केलेली एक तक्रार. त्यांची तक्रार अशी की, 'मराठ्यानी प्रदेश उध्वस्त केल्यामुळे तांदूळ आणि सर्व प्रकारचे खाद्य पदार्थ व उपयोगाच्या अन्य वस्तू यांचा मोठा तुटवडा पडला आहे. . . . . . .देश उध्वस्त करणाऱ्या या मराठ्यांची संख्या सुमारे ६०० असून बलेसार लुटल्यानंतर ते निलगिरी* टेकड्यात निघून-गेले आहेत.'. . . . . .अशी तक्रार ते जानेवारी १७५३ मध्ये करीत असल्याचे आपणास दिसून येते.

बंगालवरील हक्कासंबंधी मराठ्यांच्या मागण्याबाबत पेशव्याकडूनही हस्तक्षेप होऊ लागला. यामुळे रघूजी भोसल्याच्या अडचणी, त्याच्या आयुष्याच्या अखेर अखेरच्या दिवसात अधिकच वाढल्या. २१, जानेवारी १७५४ (?) ला रघूजीने सदाशिवराव भाऊना लिहिले . . . . . ."रघुनाथरावाने हस्तिनापुराहून, बंगालला, नबाब अलिवर्दीखानाकडे आपला वकील, पत्र देऊन पाठविला असून, गेली तीन वर्षे राहिलेला **चौथ** आपणाकडे पाठवावा असे कळविले आहे. अशाप्रकारे अतिक्रमण करून ते आमच्या अधिकार क्षेत्रात भांडणतंटा उपस्थित करीत आहेत. . . . . . .बंगाल बाबतचा तह तर, तुम्हीच निश्चित केलेला आहे. तरीही रघुनाथरावांचे वकील बंगालमध्ये गेले असून, अशाप्रकारे माझ्या कारभारात अडथळा निर्माण करण्यात आला आहे. कृपया तुम्ही रघुनाथरावांना लिहून, असे करण्यास बंदी करा आणि मान्य केलेल्या तहाच्या अटीनुसार वागण्यास अलिवर्दीलाही कळवा." (पेशवे दफ्तर निवडक पत्रे ; खं. २० प. ७७). पुढे १४ फेब्रुवारी १७५५ ला, रघूजी मरण पावला आणि जानोजी त्याच्या गादीवर बसला.

१७५९ पासून **चौथ** मिळण्याचे बंद झाले तेव्हा मराठ्यांनी पुन्हा बरद्वान व नडिया जिल्हे व्यापले आणि इंग्रजांचे अधिकारी व बरद्वान राजाचे प्रतिनिधी यानी वसूल करावयाचे बंद पाडले.

यावेळी ओरिसामध्ये मराठ्यांचा मुख्य अधिकारी–गव्हर्नर–शेवभट ( Sheobhet ) साठे, हा कधीही स्वस्थ न बसणाऱ्या धाडसी वृत्तीचा व महत्त्वाकांक्षी मनुष्य होता. डिसेंबर १७६० मध्ये तो धडाक्याने बंगालमध्ये घुसला आणि बरद्वान व बिरभूम जिल्ह्यातून पुढे जाऊन त्याने मोंगीरकडे दौड मारली. बरद्वान व बिरभूम जिल्ह्याचे राजे त्याला सामील झाल्याचा संशय होता. पण शेवभटला इंग्रजांची भीती वाटत असल्याने, दौड करून आलेल्या त्याच्या सैन्याला याच्यापुढे जाता येईना किंवा तेथेच दीर्घकाळ रहाताही येईना. तेव्हा मेदिनिपुराला मागे येऊन, तेथील इंग्रज जिल्हाधिकारी जॉन जॉन्स्टन याला त्याने २२ जानेवारी १७६१ ला वेढा घातला. यातून जॉन्स्टन आणि त्याचे शिपाई यांच्यावर फारच दडपण येऊन त्यांची कठीण परिस्थिती झाली. पण कलकत्त्याच्या कौन्सिलने त्याना सोडविण्यासाठी बरोबर २ तोफा देऊन सैन्याची एक तुकडी पाठविली व ती लगेच वेढ्याच्या जागी तत्परतेने येऊन पोहोचली तेव्हा मराठ्यांनी मुळीच लढा न देता आपला मुक्काम

( * भा. हे निलगिरी डोंगर ओरिसातील असावेत. सामान्यतः ओळखले जाणारे म्हैसूरकडील नव्हेत. ).
[ लॉंगमन्सः निवडक कागदपत्रे–खंड १, अनु. ११०. बंगाल सल्लामसलती १ फेब्रुवारी १७५३].

ताबडतोब हलविला आणि ते कटककडे निघून गेले. अशा रीतीने युद्धभूमिवरील आपले बेत उधळल्यानंतर शेवभटाने कटकहून कलकत्त्याला पत्रे लिहिण्याचे चालू केले. मेदिनिपूर हा ओरिसा प्रांताचाच एक भाग असल्याने त्याच्याबाबत **चौथ** वसूल करण्याचा त्यांचा हक्क आहे. तेव्हा तो चौथ द्या आणि त्या शहरातून तुमचे इंग्रज सैन्य ताबडतोब परत घ्या; अशी या पत्रातून मागणी करण्याचे त्याने सुरूच ठेवले. एप्रिलमध्ये व पुन्हा मेमध्ये कटकच्या या मराठा गव्हर्नराने, बंगालचा **चौथ** जर ताबडतोब त्याच्याकडे पाठविण्यात आला नाही तर स्वारी करण्याची धमकीही दिली.[१] ...... पण याच सुमाराला बंगालच्या कंपनी सरकाराने थेट नागपूर दरबाराशीच वाटाघाटी चालविल्या होत्या. आणि जुलईच्या आरंभी मराठ्यांचा वकील गोविंदराव चिटणवीस, चौथाईबाबतच्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी कलकत्त्याला आला होता. दरवर्षी बंगालकडून १२ लाख रुपये न मिळाल्याने जानोजी अस्वस्थ झाला असून, ताबडतोब **चौथाईची** रक्कम द्या असे कडक पत्र त्याने पाठविले होते. (Calendar)P.C. : पर्शियन पत्रव्यवहाराची जंत्री-गव्हर्नमेंट ऑफ इंडिया-(भारत सरकार)-८ खंड]

## § २० : ओरिसा मिळविण्यासाठी इंग्रजांची भोसल्यांचे बरोबर बोलणी

ओरिसाबाबत अशा हालचाली चालू असताना, त्याच काळात इंग्रज कंपनी आणि नबाब मिरकासीम यांच्यामधील संघर्ष गंभीर स्वरूप धारण करू लागला होता आणि अखेरी त्यातून जून १७६३ मध्ये युद्धही सुरू झाले. यामुळे आता काहीही करून जानोजीची तटस्थता निश्चित करण्याची आवश्यकता इंग्रजाना वाटली. तेव्हा कंपनीच्या कलकत्त्यातील कौन्सिलने त्याला लिहून कळविले की.... "बंगालच्या चौथाईबाबत कंपनी जामीन आहे असे तुम्ही माना आणि मिरकासिमला मदत करू नका वा मिरजाफरला दुखवू नका.. " यावेळी मिरकासीमने जानोजीकडे काही पैसे आणि देण्यासंबंधी काही बिले पाठविली होती. पण इंग्रजांच्या अशा पत्रामुळे जानोजीने या पैशांचा व बिलांचा स्वीकार करण्यास नकार दिला. नंतर युद्धामुळे नबाबपद गमावलेल्या या पूर्वीच्या नबाबाने—मिरकासीमने—कटक सुभ्यामध्ये आपल्याला आश्रय मिळावा अशीही इच्छा प्रदर्शित केली होती; पण तीही जानोजीने मान्य केली नाही. या घटनांवरून उघडच होते की या सुमाराला इंग्रजांनी चौथाईची काही रक्कम रघूजीला दिलीही होती. पण पुढे पुन्हा तशी देण्याचे स्थगितही केले होते, हेही जानोजीच्या दुसऱ्या एका पत्रावरून दिसून येते. (हे पत्र कलकत्त्यामध्ये १७ फेब्रुवारी १७६७ ला पोहोचले होते). या पत्रात तो तक्रार करतो की : "त्याच्याकडे काही पैसे पाठविल्यापासून आता दोन वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे.... " बंगाल **चौथाईबाबत** काहीतरी निश्चित तडजोड घडवून आणण्यास इंग्रजांनी अशा रीतीने दाखवलेला नकार आणि जानोजीशी मैत्रीचा तह घडवून आणण्याबाबत वाटाघाटीचे गुऱ्हाळ आठ वर्षांपर्यंत चालू ठेवण्यातील त्यांचा कावा, यामुळे जानोजीला चीड आली. [याबाबत जानोजीने आपला यावेळचा वकील,— गोपालपुरी गोसावी (Gosain) याच्याकडे तक्रार कळविली होती..... या वकिलाचा अहवाल कलकत्त्यात १६ ऑक्टोबर १७६७ ला

१ ५ ऑक्टोबर १७६४ ला कलकत्त्यामध्ये कंपनीला, ओरिसाचा दिवाण भवानी पंडित याच्याकडून एक पत्र आले. या पत्रात भवानी पंडित याने, जानोजीकडून एक पत्र आल्याचे नमूद केले आहे. त्यात जानोजी म्हणतो. "... पूर्वीच्या नबाबाच्या कारकीर्दीत, चौथ देण्याबाबतची बोलणी, सैन्य जवळ येऊ लागल्याचे दिसेतोपर्यंत, कधीही निर्णय घेण्याच्या अवस्थेपर्यंत येऊ दिली नाहीत" (भा.)...असेच इंग्रजही आता करीत आहेत.....तेव्हा) (लॉंगमन्स : निवडक कागदपत्रे अनु. ७२४.).

पोहोचला होता.... पर्शियन पत्रव्यवहार जंत्री (२) ११५४]. पण आता मराठा राज्यातील अंतर्गत भांडणामुळे त्याची बाजू दुर्बल झाली होती. शिवाय सगळीकडे विजयी होत असलेल्या इंग्रज सैन्याची त्याला इतकी भीती वाटत होती की, तहाने मिळालेले हक्क बजावण्यासाठी, युद्धाचा धोका पत्करण्यास तो तयार नव्हता. पुढे मार्च १७६८ मध्ये गणेश संभाजी ओरिसाचा **सुभेदार** म्हणून आला. हा सुभेदार "मोठा विद्वान व स्वतःच्या वागणुकीत अतिशय सभ्य" असून इंग्रजाबरोबर सलोखा राखणारा होता. तथापी इंग्रजांकडे **'चौथाई'** देण्याची मागणी करणे हे मराठा–सुभेदाराचे कर्तव्यच होते. त्यामुळे या नव्या सुभेदारानेही, तहातील कलमानुसार स्वीकारलेली, **चौथ** देण्याची जबाबदारी इंग्रजांचीच असे म्हणून **चौथाई** द्या अशी मागणी त्यांच्याकडे सुरू केली. पण त्याच्याही प्रयत्नांना, पूर्वीच्या, अधिक अडदांड सुभेदाराच्या प्रयत्नापेक्षा काहीही अधिक यश आले नाही. या वास्तवाचे स्पष्टीकरण अवश्य आहे. [पर्शियन पत्रव्यवहार जंत्री (२) ७७, ८९२, १०२].

अकबराच्या कारकीर्दीत ओरिसा जिकल्यापासून, जवळजवळ नेहमीच हा सुभा बंगालला जोडभाग ( annexe ) म्हणूनच होता. इतकेच नव्हे तर भौगोलिक परिस्थितीमुळे असलेली गरज आणि या सबंध भागाच्या प्रादेशिक संरक्षणाच्या दृष्टीनेही असलेली गरज, यामुळे या दोन्ही भागांचा संयुक्तपणा अवश्यकच ठरविलेला होता. पुढे इंग्रजानी बंगालवर आणि मद्रासच्या किनाऱ्यावर (उत्तर सरकारचा किनारा) ताबा मिळविला आणि सबंध किनाऱ्याच्या या दोन भागांच्या मध्येच असलेला, ओरिसा-किनाऱ्याचा नैसर्गिक दुवा, परक्या सत्तेच्या ताब्यात राहिल्याने, तुटला. तेव्हा तर ओरिसा प्रांत बंगालला जोडलेला असण्याची गरज फारच तीव्र झाली. इंग्रजांच्या ताब्यात आलेल्या किनाऱ्याच्या दोन भागांचे मध्येच असलेल्या परकीयांच्या ताब्यातील किनाऱ्यामुळे निर्माण होणारा लष्करी व राजकीय धोका अगदी सुरवातीपासूनच इंग्रजाना दिसत होता.

लॉर्ड क्लाइव्हने आपल्या गव्हर्नर पदाच्या दुसऱ्या कारकीर्दीतच, कंपनीला ओरिसा देण्याबाबत जानोजीबरोबर वाटाघाटी सुरू केल्या होत्या. यावेळी ओरिसाच्या बदला कंपनीने मान्य करावयाच्या अटीही त्याने पुढे मांडल्या होत्या–त्या अशा :—मागील तीन वर्षांच्या चौथाईपैकी निम्मी रक्कम कंपनीने प्रथम द्यावी, आणि राहिलेली अर्धी रक्कमही, मराठ्यानी, तो प्रांत मोकळा केल्याबरोबर द्यावी. याचबरोबर इंग्रजानी आणखी अशीही हमी द्यावी की, यापुढील भविष्य काळात १२ लक्षांचा वार्षिक चौथही ते वक्तशीर देतील. पण क्लाइव्हने जानोजीपुढे ठेवलेली ही योजना, त्याने स्वीकारली नाही व ती सोडून देण्यात आली. तथापि यापुढेही नागपूरच्या राजघराण्याशी मैत्रीचे संवर्धन करणे इंग्रजानी चालूच ठेवले विशेषतः वॉरन हेस्टिंग्जच्या कारकीर्दीत तर हे विशेषच चालू ठेवले.

"आपले कर्नाटकातील राज्य आणि बंगाल, या दरम्यानची दळणवळण व्यवस्था पूर्ण करण्यामध्ये ओरिसाचे महत्त्व फार मोठे आहे"–या दृष्टिकोनाचा मोठा प्रभाव कॉर्नवॉलिसच्या मनावरही इतका पडला होता की, मराठ्यांच्या दरबारातील ब्रिटिश वकील सी. डब्ल्यू. मॅलेट याला त्याने हा प्रांत मिळविण्याचा प्रयत्न करण्याचे अधिकार दिले. हा प्रांत मिळविण्यासाठी, त्याने अन्य एखाद्या ब्रिटिश मुलुखाचा बदलाही देऊ करावा आणि ओरिसा व या, बदला द्यावयाचा ब्रिटिश मुलुख, यांच्या मूल्यात काही तफावत असल्यास त्याबाबत जरूर तर आणखी पैशाच्या रुपानेही काही मोबदला देऊ करावा व अशा अनेक मार्गानी ओरिसा मिळविण्याचे प्रयत्न करावे, असे अधिकारही त्यात समाविष्ट केले होते. ओरिसा प्रांतात जगन्नाथाचे

तीर्थक्षेत्र–जगन्नाथपुरी–हे होते. हे क्षेत्र इंग्रजाना देण्यास मराठ्यांचे सन वळविण्यासाठी त्याने मॅलेटला आणखीही सूचना दिल्या व उपाय सुचविला. हे क्षेत्र मिळविण्यासाठी "....बनारस, गया, अलाहाबाद या क्षेत्रांच्या ठिकाणी व आमच्या ताब्यात जगन्नाथपुरी दिल्यावर तेथेही, यात्रेसाठी जाणाऱ्या मराठी-प्रजेला काही विशेष हक्क व सवलती, इतकेच नव्हे तर परक्या यात्रेकरूंवर बसवावयाच्या सर्व, सरकारी करांची सूटही देण्याचे" मान्य करण्याचा अधिकारही त्याने मॅलेटला दिला. याही पुढे जाऊन त्याने मॅलेटकडे रोख पैशाच्या रुपानेही काही साधने देण्यास तयारी दाखविली. याचा अर्थ असा की, "...ओरिसा मिळविण्याचे आपले उद्दिष्ट साध्य करण्यात ज्या कोणा मराठा मंत्र्यांची वा अधिकाऱ्यांची निर्णायक मदत मिळण्यासारखी असेल, त्यांची ती मदत मिळविण्यासाठी, त्याना पैशाच्या रूपाने सढळ हाताने देणग्या देण्यासाठी लागणारा पैसाही" मॅलेटच्या स्वाधीन करण्याची तयारी त्याने दाखविली. पण अखेरी कॉर्नवॉलीसला समजून आले की, "...बळाच्या वापराशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने, भोसले घराण्याकडून आपल्याला कटक प्रांत भेट मिळणे अशक्यप्राय आहे." अशा रीतीने त्याने सुरू केलेल्या वाटाघाटीही, क्लाइव्हच्या, पूर्वीच्या वाटाघाटीप्रमाणेच अयशस्वी ठरल्या आणि सोडून द्याव्या लागल्या.[1] जरूर असलेल्या बलाचा वापर करण्याचे काम मात्र पुढे वेलस्लीसाठी शिल्लक राहिले.

## § २१ : मराठ्यांच्या हल्ल्यानी केलेले नुकसान

अलिवर्दीने मराठ्यांबरोबर केलेला तह आणि नंतर बंगालसाठी दिलेला **चौथ** यांनी बंगाल व बिहारला ताबडतोब वा संपूर्ण शांतता मिळवून दिली नाही; तरी त्यामुळे एक चांगला परिणाम मात्र घडून आला. या तहामुळे व चौथाई देण्यामुळे मराठ्यांच्या हल्ल्यांचा प्रकार बदलला. पूर्वीचे हल्ले म्हणजे व्यवस्थित नियोजन केलेल्या व त्यांच्या राज्यकर्त्यांच्या हुकुमानुसार केलेल्या मोहिमा असून या मोहिमांच्या पाठीशी मराठ्यांच्या राज्याची सर्व साधनसामग्री होती आणि या मोहिमांचे नेतृत्व त्यांच्या राज्यकर्त्यांमध्ये मान्यवर असलेल्या व त्यानीच नेमलेल्या सरदाराकडे असे. तहानंतरच्या मोहिमा अशा प्रकारच्या नव्हत्या. या मोहिमा म्हणजे केवळ अनावर सैनिकांच्या टोळ्यानी वा एखाद्या स्थानिक अधिकाऱ्याने फक्त स्वतःला खाजगी फायदा मिळविण्यासाठी आतुर होऊन व वैयक्तिक जबाबदारीवर केलेले हल्ले होते. मराठ्यांची प्रस्थापित सत्ता हे हल्ले आपल्याला मान्य नाहीत असेच म्हणे. पण ते थांबविण्याइतकी वा या हल्लेखोराना शिक्षा करण्याइतकी, ही मराठा सत्ता प्रबळही नव्हती. शिवाय या पुढील काळात हे हल्ले संख्येनेही कमी झाले, इतकेच नव्हे तर त्यांचे क्षेत्रही व्याप्तीने कमी होऊन ते बंगालच्या नैर्ऋत्य भागाकडील सरहद्दीजवळच्या टापूतच मर्यादित राहिले. हा भाग म्हणजे मेदिनीपूरच्या पश्चिमेचा व बरद्वानच्या दक्षिणेचा असून, १७७५ इतक्या पुढील काळापर्यंतही रेनेलच्या सर्व्हे नकाशात (भा. भूमापन व पहाणी नकाशा) त्यांची नोंद होती ती अशी :.."आत शिरता येणार नाही असा." तथापि नियंत्रणातून निसटलेल्या आणि लुटारू टोळ्या म्हणून वावरणाऱ्या मराठ्यांच्या या टोळ्याकडून पुष्कळच हानी होणे शक्य होते. वॉरन हेस्टिंग्जने हे स्पष्ट केले आहे. [पहा : लंडन आवृत्ती, खं. २. २५९. वॉरन हेस्टिंग्ज...सरकारी कागदपत्रे, फॉरेस्ट जी. ].

अंतर्गत भांडणे, दूरदृष्टीच्या मुत्सद्देगिरीचा अभाव आणि राज्यकर्त्यांमधील अकार्यक्षमता, यामुळे नागपूर येथील राज्यकर्त्या घराण्याच्या सामर्थ्याचा ऱ्हास होऊ लागला होता आणि

१ रॉस, कॉर्नवॉलिसचा पत्रव्यवहार, २ री आवृत्ती. भा. १–३६६, ४११, ४५३.

यातून ज्या प्रमाणात ते कमी होई, त्याच्या व्यस्त प्रमाणात इंग्रजांचे सामर्थ्य वाढत होते. त्यांच्या सामर्थ्यातील ही वाढ, या काळी त्यानी हिंदुस्थानातील दूरदूरच्या भागात, एकामागून एक विजय मिळविले त्यामुळे होत होती. इंग्रजांचा एकही सैनिक जेथे फिरकलेला नव्हता अशा प्रांतात सुद्धा ब्रिटिश सैन्याच्या सामर्थ्याची व त्यांच्या मुत्सद्देगिरीची प्रतिष्ठा व दबदबा इतका मोठा होता की, टिपूच्या सत्तेशिवाय दुसरी कोणतीही, हिंदुस्थानातील सत्ता स्वेच्छेने इंग्रजाशी लढा सुरू करण्यास तयार नव्हती. या परिस्थितीत मराठ्यांच्या मोहिमांमुळे दीर्घ काळ सहन कराव्या लागत असलेल्या दुःखातून या प्रांतांची म्हणजे बंगाल-बिहार-ओरिसा यांची अंतिम सुटका होण्याचे सर्वांत परिणामकारक कारण म्हणजे, ब्रिटिश सार्वभौमत्व (British Paramounting) आणि या सार्वभौमत्वामुळे उदयास आलेली "ब्रिटिश साम्राज्य निर्मित शांतता" (Pan Britanica) ही कल्पना, याना हिंदुस्थानातील सत्ताधाऱ्यांनी मान्यता दिली हे होय. ही मान्यता प्रारंभी कायद्याच्या वा तात्विक दृष्टीने दिलेली नसेलही पण ती वास्तवात मात्र निश्चितच होती. हे ब्रिटिश सार्वभौमत्व व 'ब्रिटनने प्रस्थापित केलेली शांतता' ही विशिष्ट संकल्पना, केवळ यामुळेच, पुढे "नव्या हिंदुस्थाना"चा जन्म शक्य झाला.

**अलिवर्दीचे शिक्कामोर्तब (Seal) असलेल्या तहातील भाषांतरित उतारा :--**

"कुराणाची शपथ घेऊन मी नमूद करतो की, बंगाल, बिहार आणि ओरिसा या सुभ्याचा चौथ, छत्रपती रामराजाना देण्याबाबत मी मान्यता दिलेली असून त्या संदर्भात आता रघूजींच्या बरोबर दृढमैत्रीचा निश्चित तह करीत आहे. अहमदशहाच्या कारकीर्दीच्या चौथ्या वर्षाच्या ९ झिकाद ( १८ सप्टेंबर १७५१ ) या दिवसापासून प्रत्येक वर्षाला, बंगाल–बिहार- ओरिसा या सुभ्यांचा चौथ म्हणून, १२ लाख रुपयांची रक्कम त्याना देण्याचे मी मान्य करीत आहे, ही रक्कम त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने दर सहा महिन्याला एक याप्रमाणे वर्षातून दोन हप्त्यानी, बनारसला पाठविली जाईल. ही मान्यता मी दिली आहे ती अशा अटीवर की, रघूजी वा त्यांच्यानंतर राज्यावर येणारा कोणीही वा अन्य कोणी मराठे या सुभ्यामध्ये रहाणार नाहीत वा शिरणार नाहीत. . . . ."

**रघूजी भोसले यांचे शिक्कामोर्तब असलेल्या तहनाम्यातील उतारा :--**

"शांतता राखण्याच्या अटीवर मला वार्षिक १२ लाख रुपये मिळावयाचे असून यातच सर्व प्रकारच्या येणे असलेल्या रकमांचा समावेश आहे.

. . . . मी किंवा माझ्यानंतर माझ्या गादीवर येणाऱ्यापैकी कोणीही व माझ्याशी मैत्री असलेल्या बलिष्ठ सरदारापैकी कोणीही, नबाब अलिवर्दी खाँ यांच्या तीन सुभ्यामध्ये रहाणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे त्यातील जमिनदारांना त्रास देणार नाही. तसेच निर्दिष्ट केलेल्या तीन सुभ्यांचा चौथ ज्याने मला नेमून दिला आहे ते रामराजाही या सुभ्यामध्ये कोणाही अन्य सरदाराना पाठविणार नाहीत.". .

पुढे सिराज-उद्-दौला नबाब पदावर आल्यावर, त्याच्याशी असलेल्या वैयक्तिक वैरामुळे वाटणाऱ्या भीतिपोटी, मुसालिह-उद्-द्दिन (भा. पहा § १८ परि. ३) कटकहून नागपूरला पळून गेला आणि नंतर कधीही परत आला नाही. अशा रीतीने, ओरिसावर नाममात्र असलेला नबाबाचा ताबाही आता संपुष्टात आला.

[C.P.C.:–पर्शिअन पत्रव्यवहार जंत्री––खं. २ अनु. १२४५–४७].

प्रकरण पाचवे

# पंजाब–१७४८ पर्यंत-अहमद अब्दालीची पहिली स्वारी

## § १ : सुभ्यामधून स्वतंत्र घराण्यांचा उदय

मुघल साम्राज्याचे विघटन होऊन साम्राज्याने अनेक सुभे गमावले–ते स्वतंत्र झाले. अशा प्रत्येक घटनेच्या लगेच पूर्वी, स्वतंत्र झालेल्या या प्रत्येक सुभ्यात एखाद्या असाधारण कर्तृत्ववान सुभेदाराची सत्ता, अपवादात्मक इतक्या दीर्घकाळ चाललेली असे. अशा या सुभेदाराने आपले कार्य संपविले ते आपल्या अधिकार पदावर, आपल्या घराण्याची स्थिर स्थापना केल्यावरच. या सत्तांतराला वरकरणी, पण कायदेशीर मान्यता मात्र, दिल्लीच्या नामधारी सम्राटाला देणग्या देऊन तो मिळवी. पण वस्तुतः हे सत्तांतर त्याच्याच कुटुंबात वंशपरंपरागत वारसा म्हणून होत असे हेच खरे. पूर्वी साम्राज्यामध्ये पादशहा हाच खरा सत्ताधीश असे. त्या काळात, सुभेदार छोट्याशा कालखंडापुरतेच नेमले जात आणि त्यापैकी कोणालाही चार वर्षांपेक्षा जास्त काळ आपल्या सुभ्यावर सत्ता गाजविण्याला कधीही संधी मिळत नसे. अशा या, साम्राज्यसत्तेच्या काळातील सुभेदार आणि विघटन काळातील सुभेदार यांच्यामध्ये सहज लक्षात येण्यासारखी, उल्लेखनीय तफावत होती.

आपला सुभा स्वतंत्र करणारामध्ये बंगालचा सुभेदार मुर्शिदकुलिखान हा एक होता. [याचे कुलनाम (Surname), जाफरखान नासिरी, नासिर–जान मुतामन्-उल्-मुल्क, असे होते.] याने आपल्या सुभ्यावर आपली सत्ता, १७१० पासून ते १७२७ मध्ये त्याचा मृत्यू होईपर्यंत, अखंड चालविली आणि आपली गादी, आपला जावई शुजाखान याच्याकडेच सोपविली. दक्षिणेमध्ये निजाम-उल्-मुल्क असफ्जाह, हा असाच दुसरा सुभेदार होता. दख्खनचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक, प्रथम १७१३ मध्ये झाली आणि नंतर त्या पदावरून त्याला दूरही केले. पण पुढे १७२५ मध्ये पुन्हा, त्याची त्याच पदावर अंतिम नेमणूक झाली आणि यानंतर मात्र, १७४८ मध्ये मृत्यू होईतो, हे पद त्याने आपल्याकडेच राखले. शेवटी ते त्याने आपल्याच मुलाबाळाकडे सोपविले. अशीच हकीगत औधमध्ये सादतखानाची आहे. तेथे सुभेदार म्हणून त्याची नेमणूक प्रथम १७२३ मध्ये झाली आणि १७३९ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यावर त्या पदावर त्याचा जावई, सफ्दरजंग हा येऊन पुढे त्याचे जागी त्याचे वंशज आले. पंजाबची सुभेदारी प्रथम १७२३ मध्ये, सइफ्-उद्-दौला पहिला (Saif–ud–Daula-I ), दिलिरजंग याला देण्यात आली. १७२६ मध्ये त्याच्यानंतर त्याचा मुलगा झकेरियाखान (Zakariya) हाच, या सुभेदारीच्या पदावर आला. (याला सइफ्-उद्-दौला, २ रा, असे नाव मिळाले). पुढे १७४५ मध्ये झकेरियाखानाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या सुभेदारीचे, लाहोर व मुलतान हे दोन सुभे त्याचे दोन पुत्र याहियाखान (Yahiya) व हयातुल्लाखान यांच्याकडेच आले. (याहियाचे कुलनाम, झकेरियाखान २ रा व अझद्-उद्-दौला २ रा, असे आणि हयातुल्लाचे, शहानवाझखान आणि हिजबरजंग, असे पडले). सइफ्-उद्-दौला १ ला, यानेही अशा प्रकारे आपले एक स्वतंत्र, सत्ताधारी घराणे स्थापिले. पण पुढे त्याचे नालायक

नातू आपापसात भांडले आणि त्यांना, अफगाणानी त्यांच्या राज्यात केलेल्या अतिक्रमणापासून, आपल्या वडिलार्जित वारसाचे संरक्षण करण्यात अपयश आले, (१७४८). मृत्यूपंथी लागलेल्या मुघल साम्राज्याला गुजराथ व माळवा हे सुभे गमवावे लागले ते मात्र कोणत्यातरी सुभेदाराची सत्ता दीर्घकाळ चालली म्हणून नव्हे तर परकीय शत्रुनीच[1] ते जिंकून घेतले म्हणून.

## § २ : विविध घराण्यांच्या संस्थापकानी केलेले चांगले कार्य

या संस्थापक सुभेदारानी आपल्या प्रजेचे फार मोठे हित केले. अशा सुभेदारांच्या कारभाराचा लाभ, हे त्या प्रजेचे मोठे भाग्यच ठरे. ते सर्व बलाढ्य आणि कर्तबगार राज्यकर्ते होते. त्यानी आपापल्या ताब्यातील राज्यात यशस्वीपणे कायदा व सुव्यवस्था स्थापून, समृद्धी आणि लोकसंख्यावाढीला उत्तेजन दिले. लुटारू व परकीय हल्लेखोर यांच्यापासून आपल्या प्रजेला वाचविले, इतकेच नव्हे तर कारभाऱ्यांच्या हस्तकाकडून वा कनिष्ठ नोकरांच्याकडून, बेकायदेशीरपणे होणाऱ्या पिळवणुकीपासूनही त्याना वाचविले. त्यांच्यापेक्षा कमी कर्तबगार सुभेदाराना अशी कारभारविषयक कार्यवाही करणे शक्य नव्हते. या संदर्भात मुर्शिदकुली-खानाबद्दल आपणास वाचावयास मिळते ते असे :—"आठवड्यातून दोन दिवस तो स्वतः न्यायदान करी. त्याच्या निवाड्याबाबत तो इतका निःपक्षपाती आणि त्याच्या अंमलबजावणीत इतका कडक होता की, कोणालाही जुलूम करण्याचे धैर्य होत नसे. . . . मुर्शिदकुली-खानाचे कायदे कानू-नियम आणि हुकूम इतके निश्चित व निरंकुश (absolute) होते की, अतिशय शिरजोर, हट्टी व्यक्तीही त्याच्यासमोर कापत असत आणि त्याच्या आज्ञा मुकाट्याने पाळल्या जात असत. . . . ." (सलिमुल्ला–Salimullah).

अशीच परिस्थिती असफ्जाहबाबतही होती. त्याचा दिवाण महमद हाशिम काफिखान (Khafikhan), याने स्वतःच्या माहितीवरून लिहिले आहे की, . . . "पूर्वीचा सुभेदार दाऊदखान पनी (Pani) याने स्वतःसाठी म्हणून झिलादरी (Ziladari) नावाचा एक कर सक्तीने वसूल करण्याच्या, बेकायदेशीर, नव्याच पद्धतीची (Bidat बिदात) सुरवात केली होती. हा कर खानदेश, बालघाट व अशाच इतर दक्षिण सुभ्यामधील परगण्यातील, जमिनदार व रयत यांचेकडून सक्तीने वसूल केला जात असून त्याची एकूण रक्कम जवळजवळ ८० लाख रुपये होत असे. हा वसूल, तो, मराठ्यांशी संगनमत करून व त्यांच्या सैन्याच्या मदतीने करी. दूध आणि साखर ही जशी एकजीव होतात तसाच तो, या वसुलाबाबत मराठ्यांशी झाला होता. पुढे निजाम दख्खनमध्ये सुभेदार म्हणून प्रथम आला तेव्हा, महसूल अधिकाऱ्यानी त्याला या कराबद्दल सांगितले आणि तो वसूल करण्याबद्दल त्याची परवानगी मागितली,

१ पहा प्रक. ६§८— §१६.

लेखकाने प्रस्तुत ग्रंथात, गव्हर्नर, सुभेदार, व्हाइसरॉय अशी पदनामे वापरली आहेत ती सूक्ष्मभेद बाजूला ठेवून, लवचिकपणे व बहुतांशी समानार्थानेच वापरली आहेत. काही वेळा 'नबाब' हा शब्दही वापरला आहे. वस्तुतः 'नबाब' हा सुभ्यापेक्षा लहान भागाचा प्रमुख व बहुधा सुभेदाराच्या हाताखालील असे, तथापि हाही सूक्ष्मभेद डावलला आहे. शिवाय याकाळी या अधिकाऱ्यांच्या हाती अनेक वेळी एकापेक्षा अधिक प्रांतांचे वा सुभ्यांचे हेच अधिकारपद असे. औरंगजेबानंतर विशेषतः असे घडत राहिले. काही वेळी हा अधिकारी दिल्ली येथे दरबारी राहून आपल्या प्रतिनिधीमार्फत हा अधिकार चालवी तर काही वेळी हा प्रतिनिधी-नायब-हाच प्रत्यक्षात सत्ताधारी बनून गैरहजर सुभेदार नामधारी बने.

सुभेदार–नबाब–गव्हर्नर यांच्या दुय्यम अधिकाऱ्याला 'नायब' असे संबोधीत. सर्वच ग्रंथात या पदनामांचा असा वापर केलेला आहे.

तेव्हा त्याने तो रद्दच केला. इतकेच नव्हे तर याहीपुढे जाऊन त्याने आपल्या महसूल अधिकाऱ्यांच्या मागे सतत तगादा लावून, सुभ्यातील परगणे व महाल यावरील, त्यांच्या हाताखालील वसूल अधिकाऱ्याना–अमीलाना–, या नव्या कराच्या संदर्भात, आणखीही लेखी हुकूम पाठविण्यास लावले. अशा रीतीने त्याना कळविण्यात आले की, बादशहाने मनाई केलेला कोणताही जादा कर वा उपकर (आबवाब किंवा सेस–Abvab or cess) म्हणून एक कपर्दिकही त्यानी वसूल करू नये. सामान्य माणसांच्या परिस्थितीबाबत या थोर माणसाची अशी दयाबुद्धि होती." (२.७४८ काफिखान).

राज्यकर्ता या नात्याने या सुभेदारांचा संबंध एकाच सुभ्याशी दीर्घकाळ राहिल्यामुळे ते आणि त्यांची प्रजा यांच्यामध्ये वैयक्तिक ऋणानुबंधाची वृद्धी होण्यास मदतच झाली. शिवाय एखाद्या वंशपरंपरागत जमीनदाराला आपल्या कुळांच्या समृद्धीच्या जोपासनेबद्दल जशी आस्था वाटते तशीच, आपल्या प्रजाजनांच्या समृद्धीच्या वृद्धीबाबत आस्था, या सुभेदारानाही वाटू लागे. अशी आस्था अल्पशा काळासाठी नेमलेल्या कोणाही महसूल अधिकाऱ्याला वाटणे शक्य नसते आपल्या सत्तेखाली असलेल्या सुभ्याबाबत अशा प्रकारच्या कौटुंबिक जिव्हाळ्याची जोपासना झाल्यामुळे, हे संस्थापक सुभेदार आपल्या प्रजेकडे स्वतःच्या मुलाप्रमाणे पाहू लागले. नादिरशहाने, परत जात असताना झकेरियाखानाला काहीतरी वैयक्तिक अनुग्रह (वर-Boon) मागण्याचा आग्रह केला. यावेळी हा निष्ठूर विजेता आपल्याबरोबर काही हिंदुस्थानी लोकांना दूरच्या इराण देशात, गुलामगिरीतील मजुराप्रमाणेच काम करण्यासाठी सक्तीने नेत होता. झकेरियाखानाने, ओढून नेल्या जात असलेल्या या हिंदुस्थानी प्रजेची मुक्तता करा, अशा अनुग्रहाची उदार मनाने याचना केली (भा. पुढे § ५ पहा.) पाच नद्यांच्या प्रदेशावर–पंजाबवर–अशा या झकेरियाखानाच्या घराण्याची सत्ता स्थापन झाल्यापासूनच, त्या घराण्याने तेथे कायदा व सुव्यवस्था यांची कडकपणे अंमलबजावणी केली.

## § ३ : पंजाबमधील बंडखोर जमाती

उत्तर हिंदुस्थानातील, सरहद्दीवरील कोणत्याही सुभ्यांपेक्षा, १७ व्या शतकात, पंजाबने अधिक अंतर्गत शांतता उपभोगिली होती. जहागीर, शहाजहान, औरंगजेब, बहादुरशहा १ ला, यांच्या लाहोरला भेटी होत, या सुभ्याच्या पलीकडील भागात मोहिमांच्या निमित्ताने वा दौऱ्यांच्या निमित्ताने जातानाही त्यांचे कूच या सुभ्यातूनच होत असून मध्य आशिया, कंदाहार आणि खैबरखिंड या भागातील युद्धासाठी, त्यांच्या मोठमोठ्या फौजांचे कूच याच प्रांतातून होत असे. अशा अनेक हालचालीमुळे, या भागातील, कायदे मोडणाऱ्या सराईत बंडखोर स्थानिक लोकामध्ये, बादशहाच्या सामर्थ्याबाबत हितकर दबदबा निर्माण होऊन, त्याच्या सत्तेचा वचक बसे आणि शाही साम्राज्यात सार्वत्रिक शांतता नांदावी याबाबत त्याच्यामध्ये आदरही निर्माण होई. तथापि १७ व्या शतकात 'गुरु गोविंदसिंग' व १७१० आणि १७१३ मध्ये 'बंदा' यांच्या नेतृत्वाखाली शिखानी केलेल्या उठावामुळे या सुभ्यातील काही विशिष्ट भागातील शांततेचा भंग मात्र झाला व ते भाग ओसाड झाले, तेवढेच या शांततेला अपवाद होत.

बंदा आणि त्याचे व्यक्तिगत अनुयायी याना १७१४ मध्ये चिरडून टाकल्यानंतर, एका पिढीपेक्षाही जास्त काळ शीख निष्क्रियच राहिले आणि त्यानी सार्वजनिक शांततेचा भंग केला नाही. पण या सुभ्यामध्ये आणखी दुसऱ्याही बेबंद, कायदा न पाळणाऱ्या जमाती होत्या.

उपजत प्रवृत्ती आणि टोळचांच्या रूढी यानुसारही या जमाती लुटारूच होत्या. शहरे, व्यापाऱ्यांचे काफिले व खेड्यांचा वसूल, लुटण्याच्या संधीच्या शोधात त्या नेहमीच असत. रंधार ( Randuaro ) व गुजर या अशा प्रकारच्या जमाती असून पूर्वेला आणखी दूरवर राहणाऱ्या लुटारू जाटांच्या त्या भाईबंदच होत्या. पंजाबमध्ये शिखांच्या भ्रातृसमाजात (Fraternity) नव्या उमेदवारांची जी भरती झाली त्यात या जटांचाच मुख्य भरणा होता. पण शीख म्हणून त्यांच्या बंडाळीचे जे पुनरुज्जीवन झाले, ते मात्र १७५० नंतरच.

पाच नद्यांचा प्रदेश हा आता, आपल्या काळात, कृत्रिम पण खात्रीचा पाणीपुरवठा असलेला असा, एक अफाट धान्य कोठाराचा प्रदेश बनलेला आहे. याचबरोबर आता तो, झपाटयाने लोकसंख्या वाढत असणाऱ्या, मर्दानी वृत्तीच्या पण शांततामय मार्गानी समृद्ध होत असलेल्या, लोकांची मायभूमीं बनला आहे. पण मुघलकालीन पंजाबामध्ये, मानवाने अद्याप निसर्गाला आपल्या सेवेला जुंपलेले नव्हते. यामुळे आतापेक्षा कितीतरी कमी लोकसंख्येलाच, त्या प्रदेशात उदरनिर्वाह करता येई. याच प्रदेशात आज मात्र, आपण सगळीकडे, डोलणारी–हसणारी गव्हाची व कापसाची शेते, भरड धान्यांची आणि गळिताच्या बियांची शेते, क्षितिजापर्यंत पसरलेली पहातो. अशा या सलग शेतीत मधेच वेगळेपण येते, तुटकपणा दिसतो तो झपाटयाने वाढणाऱ्या नव्या शहरामुळेच होय. ही नवी शहरे, कारखानदारी व कलाकुसरीच्या व्यवसायांची केंद्रे म्हणून उदयास येत असून या सलग शेतीच्या समुद्रात मधे मधे निर्माण झालेली ती बेटेच होत. अशा आजच्या या, दोआबांच्या प्रदेशात मुघलकाली फार विस्तृत जंगले होती आणि या जंगलामध्ये त्यावेळच्या लुटारू टोळयाना रहाण्यासाठी सुरक्षित जागा आणि जरूर तेव्हा सहज मिळणारी आश्रयस्थाने उपलब्ध होती. यापैकी एक जंगल कर्नाळपासून (दिल्लीच्या उत्तरेस ७० मैल) ते सतलजजवळ लुधियानापर्यंत, स. १८०३ इतक्या अलीकडच्या काळापर्यंत पसरलेले होते. त्या काळीही सरहिंद हे शहर वाट लोकवस्तीचे व शेतीचे एक केंद्र होते यात शंकाच नाही पण जंगल तोडून मोकळ्या केलेल्या त्याच्या भोवतालच्या एका अरुंद पट्टयाशिवाय, त्याच्या सभोवती सगळीकडे दाट जंगलाचेच साम्राज्य होते. पुढे सतलज ओलांडून जालंदर दोआबामध्ये शिरल्यावरही अशीच स्थिती असून त्याच्याही पुढे दक्षिणेला, आणखी दूरवर, याहीपेक्षा जास्तच वाईट परिस्थिती होती. एका पंजाबी हिंदूने १६९५ मध्ये लिहिताना या प्रदेशाचे वर्णन केले आहे ते अशा शब्दात..."दिपालपूर सरकार (आधुनिक मॉन्ट गॉमेरी जिल्हा) हा, वाट्टू (Wattu) डोगर आणि गुजर या कुप्रसिद्ध जमातींचा मायदेशच असून या टोळया त्यांच्या दंगेखोर व बंडखोर वृत्तीबद्दल तर, कुप्रसिद्ध आहेत. प्रतिवर्षी या प्रदेशावर सगळीकडे दूरवर पुराचे पाणी पसरते आणि पूर ओसरल्यानंतरच्या ओलाव्यामुळे या भागात इतकी जंगले वाढतात की, पायी प्रवास करणाऱ्यालाही मोठया अडचणींना तोंड द्यावे लागते. मग त्यातून घोडेस्वार कसा प्रवास करू शकणार? या जंगलाला "लाखी जंगल" (लाखो झाडे असलेले) असेच साथ नाव असून ते अनेक 'लीग' लांब व रुंद पसरलेले आहे. (भा. लीग हे एक जुने, लांबीचे परिमाण....आपल्या मैलासारखे आहे ....थोडक्यात अर्थ–मैलचे मैल). अशा दुर्गम जंगलाचा आश्रय मिळत असल्याने त्यातील दुष्ट लोक, दबा धरून अचानक धाड घालणारे, वाटमाऱ्या करणारे व चोऱ्या करणारे असे बनलेले आहेत. त्याना शिक्षा करण्यासाठी साम्राज्याच्या लष्करी अधिकाऱ्यांचा हातही त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही," (सुजान राय याची खुलासत्-उत्-तवारिख.)

अशा या प्रदेशात सुव्यवस्था राखण्यास एखाद्या बलिष्ठ माणसाचीच गरज होती आणि या कामासाठी, अब्दुस समद खानाच्या रूपाने अवश्य असा बलिष्ठ मनुष्य मिळाला.

## § ४ : अब्दुस समदखानाने, कायदा व सुव्यवस्था यांची केलेली स्थापना

अब्दुस समदखान हा देशांतर करून, समरकंद येथून, हिंदुस्थानात आलेला (अहरार) तुर्की असून तो निजाम-उल्-मुल्क आणि इतिमाद-उद्-दौला १ ला, यांच्या जवळच्या नात्यातीलही होता. आल्यावर त्याला 'दिलिरजंग' असा किताब देऊन, पाच हजारी मनसबदार करण्यात आले व सन १७१३ मध्ये लाहोरचा सुभेदार म्हणून त्याची नेमणुकही करण्यात आली. बंदाच्या नेतृत्वाखालील शिखांचा; १७१४ मधील उठाव त्याने चिरडून टाकला ही त्याची पहिली मोठी कामगिरी. याबद्दल बक्षीस म्हणून 'सप्तहजारी' पदावर बढती आणि सैफ्-उद्-दौला (Saif-Ud-Daulah) हा किताब त्याला देण्यात आला. याच काळात रणघर जमातीतील एक छोटा जमिनदार, इसाखान याने, यशस्वीपणे वाटमाऱ्या करून आपले सामर्थ्य व प्रतिष्ठा, जवळजवळ एखाद्या राजाएवढी वाढविली होती. त्याच्याशी मोठ्या निकराचा लढा देऊन अब्दुस समदखानाने, १७१८ मध्ये त्याचाही नायनाट केला, ही त्याची दुसरी मोठी कामगिरी. इसाखानाच्या आजोबाने आपल्या नेतृत्वाखाली लुटारूंची एक टोळी जमा करून आपले सामर्थ्य व संपत्ती यांचा पाया घातला होता. अशा वारशाच्या जोरावर, इसाखानालाही एक महत्त्वाची व्यक्ती असेच मानले जात असे. जाजौच्या ( Jajau ) लढाईपूर्वी तो शहाजादा मुइझ्-उद्-दिन् याला (Muizz-Ud-Din) मिळाला आणि त्याने त्याला एक 'मनसबदार' म्हणून दाखल करून घेतले. पुढे १७१२ मध्ये लाहोर येथे चार[1] शहाजाद्यामध्ये झालेल्या लढायात तो, यशस्वी झालेल्या बाजूला होता. तेव्हा त्याने इतर शहाजाद्यांच्या खजिन्यानी भरलेल्या गाड्या पकडून स्वतःच्या संपत्तीत खूपच भर घातली. त्याच्या धन्याला, स्वतःला, शाही सिंहासन मिळाल्यावर त्याला पाच हजारी मनसबदार करून 'लाखी जंगल' भागाचा फौजदार नेमण्यात आले.[2] पुढे १७१३ मध्येच, जहांदरशहाची गादी गेली तेव्हा इसाखानाने स्वतःच्या ताब्यातील प्रदेशासाठी स्वतःच लढा दिला आणि जवळपासच्या स्थानिक फौजदारांचा पराभव करून आसपासचा प्रदेश लुटला व ताब्यात घेतला. तसेच दिल्ली आणि लाहोर दरम्यानचे व्यापारी तांडे लुटले. अशा प्रकारे त्याने स्वतःजवळ अफाट संपत्ती व रत्नभांडार जमविले. याच बरोबर नव्या बादशहाच्या (भा. फरुख सियार) मर्जीतील, सम्साम-उद्-दौला (खान-इ-दौरान) याला लाच देऊन, दरबारामध्ये आपल्याला एक पुरस्कर्ता मिळविण्याएवढा चाणाक्षपणाही त्याच्याजवळ होताच आणि त्याप्रमाणे त्याने, तो मिळविलाही. अशा प्रकारे उच्चस्तरावर संरक्षण मिळविल्यावर, अधिकच धीट होऊन त्याने आपला पूर्वीचा उद्योग पुढे चालविला. याचे एके ठिकाणी वर्णन केलेले आहे ते असे : . . . . "त्याने लोकांना पूर्वीपेक्षाही जास्तच लुटले. या भागातील रयतेकडून त्याने खंडही वसूल केला. यामुळे, या भागात ज्या

१ बहादुरशहा १७१२ फेब्रुवारी १७ ला मरण पावला. नंतर लगेच त्याच्या चार मुलात गादीसाठी लाहोरच्या आसपास लढाया झाल्या. पाचसहा महिन्यातच यामध्ये तिघांचा शेवट झाला आणि मोइझ-उद्दिन, जहांदरशाह असा किताब घेऊन जूनमध्ये गादीवर बसला. १७१२ च्या अखेरीस त्याचाही पराभव होऊन, जानेवारी १७१३ त फरुख सियार गादीवर आला. जहांदरशहाला फेब्रुवारीत मारण्यात आले. (गो. स. सरदेसाई, मुसलमानी रियासत भा. २ पृ. ३९० १९५८ च्या आवृत्तीवरून).

२ फौजदार—एखाद्या लहान भागावरील—गाव, लहानसे शहर वा लहानसा भाग यावरील— प्रमुख अधिकारी.

शाही अधिकाऱ्यांना जहागिरी नेमून दिल्या होत्या, त्याना, आपल्या जहागिरींच्या खेड्यातून एक पैचाही वसूल मिळू शकला नाही. बिआस नदीचे काठावर त्याने 'दरिसा' नावाचा एक किल्ला बांधला व तेथून सरहिंद जिल्ह्यातील सतलज नदीच्या काठावरील थार खेड्यापर्यंतच्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. यावेळी त्याचा दरारा इतका बसला होता की, त्याच्या भीतीने वाघही, घाबरून आपली नखे आत ओढून घेत असत." [काफीखान (२) ७६७-७६८ च्या आधारे मासिर-उल्-उमरा-(२) ८२५-८२८].

अशा या बंडखोर इसाखानाचा पूर्ण मोड करण्यासाठी, अब्दुस समदखानाने आपल्या हाताखालील, शाहदादखान खेशगी (Shahdad Khan) नावाचा एक अधिकारी १७१८ मध्ये पाठविला. यातून, थार या इसाखानाच्या मुख्य ठाण्याजवळ एक निर्णायक लढाई झाली. ३००० घोडदळाच्या अग्रभागी राहून, इसाखान अतिशय शौर्याने लढला. शाही सैन्यातल्या अनेकाना त्याने ठार केले आणि शाहदादलाही पाठ फिरवून परत निघण्यास भाग पाडले. पण याचवेळी इसाखानाच्या बापाला गोळी लागून तो मारला गेला. यामुळे त्याने रागाच्या भरात वेडा होऊन, विचार न करता, आवेशाने आपला हत्ती, शाहदादच्या हत्तीवर घातला आणि तो स्वतःही मारला गेला. परिणामतः मिळू लागलेल्या त्याच्या जयाचे रूपांतर, त्याच्याच सैन्याने सैरावैरा पळ काढण्यात झाले. यानंतर त्याच्या मुलाने शांततेचे जीवन स्वीकारले आणि आपल्या जमीनदारीचा उपभोग घेण्यास त्याला मोकळीक देण्यात आली. या मोहिमेनंतर लवकरच सुभेदार अब्दुस समदने, कासुरचा (Qasur) हुसेनखान खेशगी या आणखी एका बंडखोराशी लढाई करून त्याला ठार केले.

## § ५ : झकेरीयाखान–पंजाबचा गव्हर्नर

सैफुद्दौला १ ला, हा ट्रान्सोक्सिआनातून देशांतर करून येणाऱ्या लोकांचा आश्रयदाता होता. तेथून आलेल्या तुर्कांपैकी अनेकाना त्याने जमिनी देऊन व आपल्या सुभ्याच्या सैन्यात नोकऱ्या देऊन पंजाबमध्ये स्थायिक रहिवाशी केले. पुढे त्याचा मुलगा झकेरियाखान याला, अजदुद्दौला १ ला, हिजबरजंग असा किताब देऊन, आपल्या वडिलांच्या जागी, १७२६ मध्ये नेमण्यात आले. (भा. पहा §१ परि. २). नंतर १७३९ मध्ये झकेरियाच्या ताब्यातील लाहोर सुभ्याच्या जोडीला मुलतानची भर घालून त्याची जिम्मेदारी वाढविण्यात आली. याचवेळी नादिरशहाच्या शिफारसीनुसार "आठ हजारी मनसबदारी"च्या पदावरही बढती देऊन, सैफ-उद्-दौला २ रा, हा किताबही त्याला बहाल करण्यात आला. साम्राज्याचा वजीर इतिमाद-उद्-दौला १ ला (भा. पहा प्रक. १§४) याच्या मुलीबरोबर त्याचा विवाह झाला होता आणि त्याचा मोठा मुलगा याहियाखान याचा विवाह त्याच वजिराचा मुलगा–इतिमाद्-उद्-दौला २ रा, याच्या मुलीशी झाला होता. (भा. म्हणजे मामाच्या मुलीशी). झकेरियाखान हा एक फार बलाढ्य आणि न्यायी राज्यकर्ता असून सुभ्याच्या कारभारावर देखरेख करण्यात व जुलुमापासून प्रजेचे रक्षण करण्यात तो नेहमी दक्ष असे. त्याच्या या गुणामुळे त्याची कीर्ति सर्व देशभर पसरली, इतकेच नव्हे तर त्या काळात केवळ अतुलनीय असे प्रेम, प्रजेने त्याच्यावर करून ती त्याला 'देवाची प्रतिमाच' मानू लागली. त्याकाळी त्याच्या प्रदेशात व आसपास, गोंधळ निर्माण करणारे, दंगेखोर टोळ्यांचे काही प्रमुख होते; उदाहरणार्थ पना भाटी (Panah Bhatti ) नावाचा एक बंडखोर होता. त्याने 'हसन अब्दल' ते 'रावीचा काठ', एवढ्या भागात इतकी दहशत बसविली होती

की, तेथील लोकानी त्याचा धसकाच घेतला होता. रावी आणि सतलज या नद्यामधील दोआब, म्हणजे आपल्या शिकारीचे वा लुटीचे एक कुरणच, असे मानून वागणारा 'मिर मार' नावाचा दुसराही एक लुटारू म्होरक्या होता. अशा बंडखोर लुटारू म्होरक्यांना दडपून टाकणारे आपल्या पित्याचे चांगले कार्यही झकेरियाने पुढे चालविले.

झकेरियाच्या औदार्याचा कळस चढविणारी सर्वोत्तम कृती म्हणजे, दुःख व हालअपेष्टा सोशित असलेल्या, त्यावेळच्या एका विशिष्ट गटाला, त्यांच्या हालअपेष्टातून सोडविणारी कृती होय. या गटाला आपलेसे म्हणून मदत करण्याला दुसरे कोणीही नव्हते आणि मदत करणाऱ्याला मोबदला म्हणून, त्याच्यासाठी काहीही फायद्याचे करणेही त्यांना शक्य नव्हते. हा गट म्हणजे, नादिरशहा परत जात असताना, आपल्या बरोबर जबरदस्तीने पर्शियाकडे ओढून नेत असलेल्या दिल्लीतील कारागिरांचा व अशा अन्य लोकांचा गट होय. नादिरशहाचे झकेरियावर फार प्रेम होते. हिंदुस्थानातून लाहोर मार्गाने इराणकडे परत जात असताना त्याने झकेरियाला आग्रह केला की, स्वतःसाठी त्याने एखादी देणगी—एखादा वर—मागावा. तेव्हा त्या जगज्जेत्याकडे त्याने मागितलेला एकच 'वर' म्हणजे तो बरोबर जबरदस्तीने नेत असलेल्या "दिल्लीच्या कारागिरांना व अन्य लोकांना सोडून द्या" हा. नादिरशहानेही या मागणीनुसार त्या कारागिराना मुक्त केले. सुभेदार झकेरियाच्या या निस्वार्थी व औदार्याच्या कृतीमुळे पंजाबपासून दूरदूर असलेली हजारो हिंदुस्थानी कुटुंबे, सुखी झाली. [मु. उ. त. M. U. (२) १०६]. (भा. M. U. बहुधा : मुजमिल-उत- तोवारिख बाद नादिरिया हेच असावे. संदर्भसूची— Bibliography मध्ये संदर्भ १३ पहा. तेथे संक्षिप्त रूप M. U. मात्र दिलेले नाही. नजरचूक असावी).

आपल्या देखरेखीखाली दिलेल्या प्रांतामध्ये अशा रीतीने शांतता व समृद्धी यांची जोपासना केल्यानंतर, १ जुलई १७४५ ला झकेरियाखान मरण पावला. "यावेळी सर्व जनतेला विशेषतः लाहोर शहरातील जनतेला इतके तीव्र दुःख झाले की लागोपाठ तीन रात्री एकाही घरात दिवा लावला गेला नाही. त्याच्या शवपीटिकेची यात्रा चालू असताना तिच्या मागोमाग, रस्त्यामधून हजारोच्या संख्येने लोक, मोठमोठ्याने आक्रोश करीत, ऊर बडवून घेत आणि शवपीटिकेवर फुलांचा वर्षाव करीत, चालले होते. अखेरी तर शहरामध्ये नावाला देखील थोडीशीही फुले शिल्लक राहिली नाहीत." (आनंदराम, १३९).

झकेरियाबरोबरच पंजाबातील सौख्याचाही शेवट झाला. त्याच्यामागे त्याचे तीन मुलगे राहिले होते— याहियाखान (Surnamed—कुलनाम-अजदुद्दौला २ रा—) हयातुल्लाखान (कुलनाम–हिजबरजंग २ रा आणि शहा-नवाझखान—) आणि मिर बाकी. याहिया एक दुर्बल व नामर्द (Effeminate) युवक होता. हयातुल्ला नादिरशहाचा विशेष लाडका असून, सर्वांना धास्ती वाटत असलेल्या आपल्या पुरस्कर्त्यापासून त्याने, रक्तपिपासा, जुलमी वागणूक आणि लुबाडणारी लोभी वृत्ती, हे गुण घेतले असावेत असे दिसते. बापाच्या मृत्यूनंतर, दोन वडील भाऊ दिल्लीहून लाहोरला परतले आणि हयातुल्लाने आपल्या बापाच्या इस्टेटीची वाटणी मिळावी अशी मागणी केली. या मागणीबाबत तडजोड व निर्णय करण्यास दिरंगाई झाली. दरम्यान उभय पक्षांच्या सशस्त्र आश्रितामध्ये आपआपसात मारामाऱ्याही झाल्या. अखेरी या वाटण्याबाबत अटी ठरल्या. त्यानुसार रोख रक्कम व रत्ने यांच्या रूपाने वाटणी मिळाल्यावर, हयातुल्ला, जालंदर दोआबमधील आपल्या फौजदारी ठाण्याला परत गेला. (आशब (२) ४५२].

पण या तडजोडीने पंजाबला शांतता मिळाली नाही. या सुभ्यावर नव्या सुभेदाराची नेमणूक करण्याचे बादशहाने मूर्खपणाने पुढे ढकलले. याबाबत वजीराची (भा. इतिमाद-उद्-दौला २ रा याची) सूचना अशी होती की, लाहोर व मुलतान, या झकेरियाच्या दोन प्रांतावर, त्याच्या दोन मुलांना नेमावे, पण यातून या प्रांतामध्ये वंशपरंपरागत 'तुराणी' राज्ये निर्माण होण्याचा संभव आहे या सबबीवर बादशहाने या सूचनेचा अव्हेर केला. आधीच्या दोन सुभेदारांच्या आश्रयामुळे, मध्य आशिया सोडून, निघून आलेले बरेच तुराणी लोक, लाहोरमध्ये व त्याच्या आसपास, भोंवताली स्थायिक झाले होते. तेथे त्यांनी आपली घरे बांधली होती, कबरी बांधल्या होत्या आणि बागा तयार केल्या होत्या. परिणामतः "बालख व बुखारा ही जशी मुघलांची वसतिस्थाने होती तशीच, लाहोर आणि आसमंताचा भाग हीही त्यांची वसतीस्थाने बनली होती. अखेरी या प्रांतांची सुभेदारी स्वतः आपणालाच द्यावी अशी विनवणी करून, वजिराने आपल्या या तुराणी भाईबंदाना वाचविण्याचा प्रयत्न केला. यातून अर्थातच स्वतः गैरहजर राहून प्रतिनिधीमार्फत सुभेदारी चालविण्याची व्यवस्था सुरू झाली. पंजाबसारख्या अतिशय महत्त्वाच्या व सरहद्दीवरच्या प्रांतासाठी अशी प्रतिनिधी-मार्फत चालवावयाची, गैरहजर सुभेदारी निर्माण करण्यापेक्षा अधिक मूर्खपणाची व्यवस्था बादशहाला करता आली नसती! पण बादशहाने ही सूचना मान्य केली आणि वजीराने 'मिर मुमीनखान' याला आपला प्रतिनिधी–डेप्युटी–म्हणून तेथे नेमले. मिर मुमीन हा पूर्वी झकेरियाखानाचा प्रमुख कार्यकारी अधिकारीच (Man of Business) होता. अर्थातच ही निवड उत्तमच होती. वजिराला मात्र, सुभेदार म्हणून स्वतः या प्रांताला एकदाही भेट देता आली नाही.

झकेरियाखानाच्या न्यायी राजवटीमध्ये पंजाबला शांतता व सुबत्ता लाभली होती. पण आता अशा रीतीने निर्माण झालेल्या नव्या एकूण परिस्थितीचा, संकलित परिपाक ....."पंजाबला लाभलेली शांतता व सुबत्ता नाहीशी करण्यात झाला.....जिकडेतिकडे अंदाधुंदी सुरू झाली. या भागातील बंडखोर, लुटालूट करणारे, संधीसाधू, धाडसी लोक, जे या वेळेपर्यंत लपून राहिले होते ते, आपल्या गुप्त ठिकाणातून बाहेर पडले आणि त्यानी सारे राज्य उध्वस्त करण्यास सुरुवात केली......प्रांताच्या एका बाजूला जम्मूचा राजा बंड करून उठला तर दुसऱ्या बाजूने शिखानी गडबड-गोंधळ करून त्रास देण्यास सुरुवात केली." वजीराने प्रथम नेमलेला डेप्युटी, मिर मुनिम याच्याजवळ, ही अंदाधुंदी दडपून टाकण्यास जरूर तितकी साधने नव्हती. बादशहाचे मन वळविण्याचा दीर्घ काळ प्रयत्न केल्यानंतर, अखेरी १७४६ मध्ये, याहियाखानाला डेप्युटी-गव्हर्नर म्हणून नेमण्यास बादशहाने संमती दिली आणि वजीर स्वतः औपचारिकरीत्या सुभेदार म्हणून पुढेही राहिला. (आनंदराम २८९).

## § ६ : झकेरियाच्या मुलांमधील यादवी युद्ध

याहियानेही मिर मुनिमलाच आपला, प्रमुख कार्यकारी अधिकारी ठेवले. पण त्याच्या स्वतःच्याच मवाळ स्वभावामुळे त्याला अशा दंगेखोर प्रांतावर राज्य करणे अशक्य झाले. या त्याच्या अडचणीत भर पडली ती, २१ नोव्हेंबर १७४६ रोजी, त्याचा धाकटा भाऊ, हयातुल्ला हा लाहोरला परत आल्याने. परत आल्यावर हयातुल्ला, याहियाच्या शहराबाहेरील राजवाड्यात शिरला आणि त्याने आपल्या बापाच्या मालमत्तेची संपूर्ण वाटणी

करण्याची मागणी केली. चर्चेचे गुऱ्हाळ लांबत चालले, काहीही तडजोड होईना आणि दोघाही भावांचे सैनिक आपापसात, रस्त्यामध्ये वरचेवर लढू लागले. दरम्यान हे दोघे भाऊ, शहराच्या आपापल्या भागात, स्वतःच्या तटबंदीच्या मागे पाय रोवून राहिले. पुढे हयातुल्लाचे सैनिक, आपला राहिलेला पगार देण्याबद्दल ओरडा करू लागले आणि ही मागणी भागविण्याचे साधन मात्र हयातखानाजवळ नव्हते. अशा परिस्थितीत अखेर हयातुल्लाच्या संयमाचा शेवट झाला. त्याने आपल्या हाताखालचा अधिकारी, अदिनाबेग याला आपल्या भावाच्या खंदकांची पहाणी व टेहळणी करण्याचा हुकूम, १७ मार्च १७४७ च्या तिसऱ्या प्रहरी सुमारे तीन वाजता दिला. या हालचालीमुळे उलटबाजूने मिर मुनीमही सैन्य घेऊन बाहेर पडला. यातून एक छोटीशी व अनिर्णित चकमकही झाली आणि नंतर दोन्हीही पक्ष आपापल्या सुरक्षित जागामध्ये आश्रयास परत गेले. दुसरे दिवशी हयातुल्लाने स्वतःच अकस्मात हल्ला केला. आपल्या आघाडीवर, त्याने सहज वाहून नेता येण्यासारखा हलका तोफखानाही ठेवला होता. या तोफखान्याने थोड्याच वेळात शत्रूच्या सैनिकाना इकडे-तिकडे पळवून लावले आणि मिरमुनीम जखमी होऊन पकडला गेला. पळवून लावलेले याहियाचे सैनिक आता शहरात जमा झाले व त्यानी, देणे बाकी राहिलेल्या त्यांच्या चारपाच महिन्यांच्या पगारासाठी तेथे बंड केले. यामुळे विजयी हयातपुढे लाहोरही टिकाव धरू शकले नाही व त्याने काहीही प्रतिकार न होता त्या शहरात प्रवेश केला (२१ मार्च) आणि याहियाची मालमत्ता जबरदस्तीने बळकाविली. याह्याने आपल्या विधवा आत्याचे घरात आश्रय घेतला. [आनंदराम २८९–२९२, ३०४].

अशा रीतीने हयातने लाहोरची सत्ता बळकाविली, त्यावेळी लाहोरच्या कारभारात, हयातुल्लाचे "बाप व आजोबा यांच्या वेळेपासून नोकरीत असलेले व त्यातच वृद्ध झालेले काही सैनिकी नेते (कॅप्टन्स) होते." लाहोरची सत्ता हाती घेतल्यावर, हयातने या वृद्ध कॅप्टन्सना त्यांच्या अधिकारांच्या जागावरून काढून टाकून आणि त्यांची घरेदारे व मालमत्ता जप्त करून, आपण मिळविलेले स्थान बळकट केले. नंतर आपल्या एका कारभाऱ्याला (Stewar) बरोबर काही नजराणे देऊन बादशहाकडे पाठविले. आपण केलेल्या कृतीबद्दल क्षमायाचना करून वजीराच्या वतीने, त्याच्याच हाताखाली व त्याच्या शिक्का-मोर्तबीने कारभार चालविण्यासाठी, आपल्यालाच या प्रांताचा 'डेप्युटी गव्हर्नर' नेमावे अशीही विनंती केली. असे हे चमत्कारिक पत्र घेऊन, हा प्रतिनिधी ३ सप्टेंबरला दिल्लीत येऊन पोहोचला आणि आपल्या मालकाच्या विनंतीबाबत त्याने तेथील अधिकाऱ्याशी वाटाघाटीही सुरू केल्या. असल्या या वाटाघाटींचे गुऱ्हाळ लांबवत रहाणे हेच बादशहाच्या सल्लागारांना राजकीय चातुर्याचे होय असे वाटले. [आनंदराम २९३–२९५, ३००].

दरम्यान हिंदुस्थानचे राजकीय क्षितीज, संकटाच्या दाट छायेने झाकळल्यासारखे होऊन त्यातून दिल्लीच्या सिंहासनाला भेडसावणारे एक मोठे संकट निर्माण झाले होते. ९ जून १७४७ ला नादिरशहाचा खून करण्यात आला होता आणि त्याची बरीचशी संपत्ती आणि सैन्य, त्याच्या मर्जीतील सेनापती अहमदखान अब्दाली याच्या हाती गेली होती. नादिरच्या छावणीतून कंदाहारला जात असताना वाटेतच अब्दालीने स्वतःला तख्तावर राज्याभिषेक करवून घेतला (१२ जूनच्या सुमारास) आणि नादीरच्या वारशावर आपला हक्क सांगितला; (भा. पहा. सविस्तर हकीगत पुढे §७). यावेळी आपले स्थान बळकट करण्यासाठी जरूर तो पैसा जमवावयाचा हे त्याचे ताबडतोबीचे उद्दिष्ट होते. याला उपयुक्त असे तत्कालीन

सुप्रसिद्ध समृद्ध भांडार म्हणजे हिंदुस्थान हे असल्याने, त्याचीच लूट करून आपणासाठी ... जमविण्याचे त्याने ठरविले. या कामासाठी, एक चांगली संधीही त्याचवेळी त्याच्यापुढे चालून आली.

याहिया आणि हयातुल्ला यांच्यामधील यादवी युद्धामुळे पंजाबचे शासन दुभंगले असून, त्यामुळे, एखाद्या परकीय आक्रमकाला तोंड देण्याची त्या प्रांताची क्षमता कमी झाली होती. यातच हयातुल्लाने त्याला पत्र पाठवून, या प्रांताची अधिसत्ता हाती घेण्यासाठी निमंत्रणच पाठविले. आपल्या दिल्लीच्या धन्याचा कायदेशीर प्रतिनिधी असलेल्या व त्याचबरोबर वजिराचाही जावई असलेल्या व्यक्तीला–याहियाखानाला–आपण हाकलून दिले असल्यामुळे दिल्लीच्या आपल्या धन्याबरोबरचे आपले संबंध इतके तुटले आहेत की ते पुन्हा सांधण्याची आशा नाही याची हयातला जाणीव होती. या परिस्थितीत आपल्याला मित्र मिळविण्यासाठी त्याने हिंदुस्थानाबाहेर दृष्टी वळविली आणि अहमद अब्दालीला, या प्रांताची सार्वभौमसत्ता हाती घेण्यासाठी निमंत्रण पाठविले. आपल्या हुद्द्याच्या अधिकृत शिक्क्यावरील तैमूरवंशीय मुघल बादशहांची नावे त्याने काढून टाकून, त्याऐवजी बारा इमामांची नावे तेथे घातली व अशा रीतीने आपल्या सुनी पंथाचा त्याग करून, शिया पंथही स्वीकारला. पर्शियामधील शियापंथीय सैनिकी व्यावसायिकामधून आपल्याला मदतीसाठी मित्र मिळविता येतील अशी यामागे त्याला आशा होती. [आशब (२) ४५३ ; बयान २२१].

## § ७ : नादिरशहाची अखेरची वर्षे व मृत्यू

दिल्ली जिंकल्यानंतर, मुघल साम्राज्यापैकी, काबूलचा सुभा, आणि सिंधू नदीच्या पश्चिमेकडील, दक्षिणेस थेट समुद्र किनाऱ्यापर्यंत पसरलेला पंजाब आणि सिंधचा सर्व मुलूख आणि त्याचप्रमाणे ठठ्ठा प्रांत म्हणजे दक्षिण सिंधचा भाग आणि त्यामध्ये असलेली बंदरे, असा मोठा भाग नादिरशहाने आपल्या साम्राज्यात समाविष्ट केला. पूर्णपणे काढून घेतलेल्या या प्रांताशिवाय सिंधू नदीपलीकडील म्हणजे पूर्वेकडील काठावरचा, सियाळकोट, गुजरात, औरंगाबाद व पसरूर या चार महालांचा महसूलही त्याने कायमपणे आपणासाठी नेमून घेतला. या चार महालांचा वसूल, यावेळेपर्यंत, सतत तुटीचा असलेल्या मुघलांच्या अफगाणिस्तान या प्रांतासाठी लावून दिलेला असे याच कारणासाठी आता तो, नादिरशहाने आपणास नेमून देण्यास, बादशहाला भाग पाडले. या संदर्भात लाहोर येथील बादशहाच्या सुभेदाराने, या चार महालांच्या वसुलापोटी म्हणून नादिरला दरसाल वीस लाख रुपये पाठवून देण्याच्या करारावर सही केली. [आनंदराम ८०–८१, सियार (३) ३० आणि (२) ९७.].

यानंतर पर्शियाच्या बाजूने दिल्लीच्या दरबाराला शांतता व संरक्षण लाभले. नादिर हा तैमूरचा मोठा चाहता व कौतुक करणारा होता. मोहिमावर असतानाही तैमूरचे आत्मचरित्र तो आपल्याबरोबर नेहमी बाळगीत असे. अशा या तैमूरच्या घराण्याचा, वंशपरंपरागत, सरळ वारसा ( Leneal ) असलेल्या हिंदुस्थानातील मुघल बादशाहीचा शेवट करण्याची त्याची इच्छा नव्हती. यामुळे हिंदुस्थानातून परत आल्यावर या थोर पर्शियन विजेत्याने, महमदशहाशी मैत्रीचे संबंध ठेवले. स्वतःच्या कार्यमग्न, घाईगर्दीच्या जीवनात आणि दूरदूरच्या देशावर केलेल्या अतिशय कष्टप्रद स्वाऱ्यांच्या गर्दीतही, दिल्लीच्या

बादशहाला भेटी पाठविण्याचे तो विसरला नाही. अशा प्रकारे डिसेंबर १७४० मध्ये ११० खेचरांनी वाहलेले संपूर्ण ओझे भरून, खरबुजे ( Melons ), द्राक्षे व सफरचंदे, भेट म्हणून दिल्लीत आली होती, आणि मे १७४६ मध्ये बादशहासाठी ८१ इराकी घोडे आणि त्यांच्याचबरोबर दरबारातील प्रसिद्ध अमीर-उमरावांसाठीही आणखी अनेक घोडे, दिल्लीत येऊन पोहोचले होते. याला प्रतिभेट म्हणून महमदशहानेही डिसेंबर १७४० मध्ये, २५ लाख रुपये आणि जून १७४६ मध्ये ५१ आरोग्यसंपन्न तरुण हत्ती नादिरशहाकडे पाठविले. [आनंदराम १२१, १६८, ११५ आणि १७० ].

दिल्ली जिंकल्यानंतरच्या काळात, नादीरने, पश्चिम व मध्य आशियातील बहुतेक सर्व देशात सतत स्वाऱ्या करून ते देश हादरून सोडले. या स्वाऱ्यांच्या काळात त्याचा स्वभाव जलदगतीने, अधिकाधिक वाईट होत गेला. तो भयंकर जुलमी राज्यकर्ता बनला. बेपर्वाईने केलेले लहरी रक्तपात, क्रौर्य आणि अनावर राग व वेडपट संशय यातून वारंवार झालेले उद्रेक, यातच त्याला मौज वाटू लागली. त्याच्या जीवनामध्ये, गाढ विषण्णतेची छाया पसरली आणि आपले लोक व अधिकारी यांच्यावरील त्याचा विश्वास नाहीसा होऊन तो त्याना कठोरपणे वागवू लागला. 'दाघेस्तान' वरील त्याच्या मोहिमाना (१७४२ व १७४४) अपयश आले आणि त्याच्या अजिक्यत्वाचा काळ संपुष्टात आला. यापुढे त्याच्या साम्राज्याच्या अनेक भागात बंडांचा स्फोट होऊन प्रत्येक ठिकाणी बंडखोरानी आपापल्या स्थानिक सिंहासनावर, हक्क सांगणारे उभे केले आणि तेथील, नादीरच्या अधिकाऱ्यांना ठार केले.

सतत चालविलेल्या युद्धामुळे त्याचा खजिनाही रिता झाला आणि तो पुन्हा भरण्यासाठी त्याने आता जास्तीत जास्त क्रूर पद्धति अवलंबिल्या. महसूल अधिकाऱ्यानी जास्तीत जास्त वसूल आणून द्यावा म्हणून त्यांचा इतका छळ करण्यात येऊ लागला की, त्यापैकी अनेकांचा त्यात शेवट झाला. सर्व श्रीमंत प्रजा, जीविताच्या भीतीच्या दडपणाखाली सतत राहू लागली. त्याच्या सचिवाने एके ठिकाणी मान्य केले आहे की....."(यातून झालेल्या अनेक) अशा बंडामुळे झाली ती फक्त त्याच्या संतापाच्या उद्रेकातील जोर आणि क्रौर्य यांची वाढ.....यातून त्याच्या कृती आणखी जास्त जास्तच बेफाम व रानटी होत गेल्या." अगदी थोडाही संशय आला की, माणसाचे हातपाय तोडणे, त्याला आंधळे करणे व ठार मारणे असे होऊ लागले. इस्पाहानच्या बाहेरील मैदानावर, त्याने काही हिंदू, मुसलमान आणि आर्मेनियन याना जिवंत जाळलेही. जानेवारी १७४७ मध्ये आपल्या राजधानीतून तो खुरासानला जाण्यास निघाला. तेव्हा ज्या ज्या प्रांतामधून तो गेला त्या त्या प्रांतात अनेक स्थानिक उमराव व सामान्य प्रजा याना ठार करून, त्याने मानवी शिरांचे बुरूज बांधले. निष्ठुर क्रौर्याने प्रत्येक बंड तो दडपून टाकी पण लवकरच दुसरे नवे बंड, दुसऱ्याच भागात उभे राही, थोडक्यात म्हणता येईल की,......"नादिरशहाच्या कारकीर्दीचे अखेरचे दिवस, त्याच्या प्रजेच्या दृष्टीने, शब्दातीत हालअपेष्टानी भरलेले दिवस होते." [मुजमिल १०–४० ; साइक्स].

या काळी पर्शियामधील जनतेत सर्वात जास्त प्रभावी घटक म्हणजे 'किझिल बाश' ( Qizilbashes ) लोकांचा होता. (शब्दार्थाने :–लाल डोक्याचे लोक–हे लोक लाल तुर्की टोपी वापरीत–यावरून). दीर्घ काळ पर्शियामध्ये स्थायिक झालेल्या काही तुर्की जमातीचे

हे वंशज असून, पूर्वेकडील देशात, ते सर्वोत्कृष्ट सैनिक म्हणून प्रसिद्ध होते. असे हे किझिलबाशी अनेक वेळी "राजा-निर्माते"– King Makers –म्हणून वावरले–वागलेही. नादीरच्या अखेरीच्या काळात त्याच्या विश्वासातून व कृपेतून हे लोक उतरले व त्यांची जागा उझबेग व अफगाण सैनिकी नेत्यानी–कॅप्टन्सनी–घेतली. या उझबेग व अफगाण नेत्यांच्या मदतीने सर्व महत्त्वाच्या किझिलबाशी व्यक्तींचा नाश करण्याच्या योजनांचा, नादीरने विचार सुरु केला व लवकरच या नव्या भाडोती सेना नायकांच्या विचाराने किझिलबाशींच्या नाशाची एक योजना आखली. यानुसार दुसरे दिवशी सर्व किझिलबाशी पुढाऱ्याना आणि सेनानायकाना त्याच्यासमोर बोलावून घ्यावयाचे आणि तेथे त्यांची कत्तल करावयाची अशी त्याने व्यवस्था केली. नंतर नेत्याविना उघडया पडलेल्या त्यांच्या सैनिकांवर अचानक हल्ला करून त्यांनाही पूर्णपणे धुळीला मिळवावयाचे व त्यांची सगळी मालमत्ता लुटण्यास अफगाण व उझबेग सैनिकाना मोकळीक द्यावयाची अशीही यात योजना होती.

पण या कटाची बातमी बाहेर फुटली. राजवाडयाच्या संरक्षक दलाचा प्रमुख व महमदखान काचार ( Qachar ) या दोघांच्या नेतृत्वाखाली, किझिलबाशी नेत्यानी, या कटाविरुद्ध तातडीने कृती केली. आपल्यावर होणार असलेल्या आघाताआधीच त्याविरुद्ध घाव घालण्याचे ठरवून, कत्तलीसाठी ठरविलेल्या दिवसाच्या आदल्या मध्यरात्रीच, ७० किझिलबाशी नेते एकत्र येऊन, एकगटाने ते नादिरच्या तंबूकडे निघाले. पण या बलाढ्य राजाच्या भीतीमुळे, यापैकी ५७ किझिलबाशींचे पाय लटपटले आणि ते गुपचूप बाजूला निघून गेले. राहिलेल्या १३ जणांनी मात्र नादिरच्या तंबूत शिरून त्याला ठार केले. [मुजमिल १५–२० ; जहांकशा– Jahan Kasha –४६१].

## § ८ : अहमद अब्दालीचा उदय

ही शोकान्तिका, ९ जून १७४७ ला खुरासानच्या अतिशय दूरच्या ईशान्य कोपऱ्यात, कुचाननजीक घडली. नादिरशहाच्या मृत्यूमुळे, सत्ताक्षेत्र व्यापण्याचा अहमदखानचा मार्ग मोकळा झाला.[1] त्याचे पूर्वज मूळचे हिरात भागातील रहिवाशी असून ते अफगाणांच्या सद्-झाई ( Saddu-Zai ) टोळीपैकी होते. त्याचा बाप व आजोबा लढायांमध्ये मारले गेल्यामुळे तरुण अहमद कंदाहरमधील 'घिलझाइ' (Ghilzai) घराण्याकडे आश्रयासाठी पळून गेला. पुढे १७३७ मध्ये नादिरशहाने कंदाहार जिंकल्यावर अहमदाला आपल्या नोकरीत स्वतःच्या दिमतीसाठी वैयक्तिक नोकर (यसाव्वल—Yasawwal ) म्हणून घेतले. या विजेत्याने घिलझाई टोळीतील लोकांना कंदाहारमधील त्यांच्या घरातून माझेन्द्रान आणि खुरासान भागात हलविले आणि याचवेळी सर्वच अब्दाली टोळीवाल्यांना हिरात व खुरासान येथून कंदाहार जिल्ह्यात हलविले. अशा रीतीने, यापुढे कंदाहार, अब्दालींचा प्रदेश बनला.

१ अहमदशहाचा एक पूर्वज, चिश्ति पंथातील, ( Chishti Order ) ख्वाजा अबु अहमद अब्दाल, याचा शिष्य होता. या शिष्याने, आपल्या भक्तीने, गुरुला इतके खुष केले की त्याने त्याला आशिर्वाद देऊन 'अब्दाल' असे संबोधिले. 'अब्दाल' म्हणजे . . . "परमेश्वराशी अतिशय निकटचा संबंध ठेवण्यासाठी सतत भजन पूजनात रमलेला (Close communoon with God) व यामुळे पृथ्वीवरील पाशातून मुक्त झालेला मनुष्य." यावरून त्याच्या वंशात 'अब्दाली' हे नाव रूढ झाले होते. विजेत्या अहमदशहाने 'दुर-इ-दुराणी' (Durr-i-Durani) म्हणजे 'मोत्यांमधील प्रमुख मोती' हा किताब धारण केला आणि पुढे यावरून त्याच्या घराण्यालाही 'दुराणी' असे म्हणू लागले. [ हुसेनशाही, ६ ]

नादीरशहाच्या नोकरीत, अहमद अब्दालीने मोठा नावलौकिक कमाविला आणि शहाच्या 'अब्दाली' सैन्य विभागाच्या प्रमुख सेनापतीपदापर्यंत तो चढला. (या सैन्य विभागात सुमारे ६००० सैनिक होते). नादिर भर दरबारात म्हणत असे.... "कार्यक्षमता आणि चारित्र्य यांच्या बाबतीत इराण, तुराण आणि हिंद यामध्ये मला अहमद अब्दालीच्या तोडीचा अन्य कोणीही आढळला नाही." या संदर्भात एक मोठी मनोरंजक दंतकथा प्रचलित आहे. एके दिवशी, आपल्या सोनेरी सिंहासनावर बसून, नादिरशहा मंद वाऱ्यात आराम करीत होता आणि त्याच्यासमोर आदरोचित अंतरावर अहमद उभा होता. तेव्हा नादिर मोठ्याने म्हणाला, "अरे अहमद अब्दाली ! पुढे ये." अहमद पुढे आला पण नादीर पुन्हा म्हणाला... "आणखी जास्त जवळ ये." अहमद आणखी पुढे आल्यावर नादीरने त्याला सांगितले,— "अरे अहमद, लक्षात ठेव की, माझ्यामागून राज्यपद तुझ्याकडेच येईल. त्यावेळी, तू नादिरच्या कुटुंबियांना प्रेमाने वागविले पाहिजेस." यावर दचकून, अहमदने लगेच उत्तर दिले: "मी आपला 'बळी' होऊ का ! मला ठार करावयाची जर आपली इच्छा असेल तर मी येथे हजर आहेच. पण, महाराज आपण असे दुर्दैवी उद्‌गार काढावेत असे काहीच कारण नाही." नादीर पुन्हा म्हणाला, "मला खात्री आहे की, तू बादशहा होणारच. तशा पदाला गेल्यावर मात्र, नादीरच्या वंशजाना चांगले वागीव." या दंतकथेला इतिहासकार हुसेन यानी पुस्ती जोडली आहे की, अहमदशहा सत्ताधारी झाल्यावर, आपल्या जुन्या धन्याने केलेल्या कळकळीच्या विनंतीची आठवण त्याने नेहमीच ठेवली आणि नादिरचा नातू व वारस शाहरुख मिर्झा याला मदत केली.[1] [हुसेनशाही १४–१५].

मध्यरात्रीला नादिरचा खून केल्यानंतर, या खुनाची बातमी बाकीच्या सैन्यापासून सकाळपर्यंत गुप्त ठेवण्याची योजना या किझिलबाश कटवाल्यानी आखली. या मागे त्यांचा असा हेतू होता की, नादिरच्या मर्जीतल्या अफगाण सैन्यावर सकाळी अचानक हल्ला करून त्यांना चिरडून टाकावे, त्यांची छावणी लुटावी आणि नंतर मृत बादशहाची सर्व मालमत्ता, अन्य कोणास वाटेकरी न होऊ देता आपणच बळकवावी. पण नादिरच्या खुनाइतके मोठे गौप्य राखणे शक्य झाले नाही. उजाडण्याआधीच अहमदाला ही बातमी कळली आणि राहिलेली सर्व रात्र, स्वतःच्या संरक्षणासाठी सज्ज राहून त्याने जागरुकतेने काढली. नंतर लढाईच्या दृष्टीने सैन्याची संपूर्ण रचना करून त्याने नादीरच्या तंबूकडे कूच केले. तेथे काहीही तारतम्य न राखता, सरसकट लुटालूट करण्यात गुंतलेले किझिलबाश सैनिक व त्यांच्या छावणीच्या मागोमाग जाणारे लोक त्याला आढळले. अहमदाबरोबरची अफगाण आणि उझबेक पथकेही ( Uzbek ), तात्काळ या लुटालुटीच्या उद्योगात सामील झाली आणि.... "उजाडल्यापासून चार तासांच्या आताच नादिरशहाचे तंबू आणि मालमत्ता

१ तारिख-इ-अहमदशाही (TAH 3b) ३ब मध्ये एका ठिकाणी समासात (मार्जिन) एक पूरक नोंद आहे ती अशी: "हा अहमद प्रथम नादिरशहाचा हुक्का सांभाळणारा खाजगी नोकर होता. दिल्लीच्या दिवाण-इ-आममध्ये नादिरशहा रहात असताना एके दिवशी हा अहमद या दिवाण-इ-आमच्या जवळच्याच जाळीदार दरवाजाबाहेर बसला होता. अशावेळी निजाम-उल्-मुल्क असफ्जाहाने त्याच्याकडे पाहिले. एखाद्या व्यक्तीचा चेहरा पाहून त्याचे भविष्य समजण्याची कला निजामाला माहीत होती. तेथे बसलेल्या अहमदाच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर, तो पुढे बादशहा होईल असे भविष्य त्याने वर्तविले. भविष्य सांगण्याचे निजामाचे सामर्थ्य, नादिरशहाला माहीत असल्याने, निजामाने वर्तविलेल्या या भविष्याची बातमी त्याला कळल्यावर, त्याने आपल्या कट्यारीने अहमदाचे दोन्ही कान कापले आणि तो म्हणाला.... "तू जेव्हा बादशहा होशील तेव्हा या कापलेल्या कानामुळे लोकाना माझी आठवण होईल."!!!

यांचा मागमूसही त्या ठिकाणी राहिला नाही. सगळेच जिकडे तिकडे पळविले होते, नाहीसे झाले होते." [मुजमिल २०–२१, जहांकशा ४६१].

अफगाण सैनिकांनी, आपला पुरस्कर्ता त्राता मृत झाला असून, आपण स्वतः परक्या देशात विरोधी प्रतिस्पर्ध्याकडून घेरले गेलो आहोत हे जेव्हा पाहिले तेव्हा किझिलबाशींच्या हल्ल्यापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी आपल्या गटाची आटोपशीर रचना करून त्यांनी एकजुटीने कुचानहून झपाट्याने कूच केले. असे कूच सतत केल्यावर तिसऱ्या दिवसाचे अखेरी थांबून त्यानी, विचारविनिमयासाठी सभा भरविली. यावेळी त्यांचे सेनाप्रमुख आपापसात बोलू लागले की.... "आपल्या देशाकडे जाण्यासाठी लागणाऱ्या दूरच्या प्रवासासाठी, ज्याची आज्ञा सर्वांनाच मानावी लागेल अशा एखाद्या नेत्याची आपल्याला गरज आहे. अशा प्रकारचा सर्वश्रेष्ठ नेता असल्याशिवाय, आपली सर्व बायका-मुले व नोकर याना घेऊन, पर्शियन लोकांच्या विरोधाला तोंड देत देत, कंदाहरला पोहोचणे आपल्याला अवघड, नव्हे अशक्यच होईल. तेव्हा काहीही झाले तरी आपल्या सर्व शक्तिनिशी, अशा नेत्याची आज्ञा आपण पाळलीच पाहिजे." अखेर सर्वच अब्दालीनी हा दृष्टिकोन मान्य करून, अहमद याला आपला असा प्रमुख नायक–सेनानी– म्हणून निवडले, आणि अहमदशहा म्हणून त्याचा जयजयकार केला. [मुर्जमिल ७४].

या नव्या शहाने दैवी आशिर्वादही मिळविले. नादिरचा खून होण्याआधी तीन दिवस, शहा महमद साबिर[१] नावाचा एक लाहोरचा दरवेशी अहमदाला रस्त्यात भेटला होता. त्याने अहमदाजवळ, अशी भविष्यवाणी वर्तविली होती की, "तुझ्या कपाळावर मला राजचिन्हे दिसत आहेत." यानंतर या साधूने एक चमत्कार करून आपल्या दैवी सामर्थ्याची प्रचीतही दाखविली होती. नादीरच्या मृत्यूनंतर पळ काढीत असताना या साधूला आपल्या बरोबर घेण्यास अहमद विसरला नव्हता. पहिल्या मुक्कामाचे वेळी, या दरवेशाने, अहमदाला स्वतः राजा होण्याचा आग्रह केला. पण असे करण्यास आपण यावेळी असमर्थ आहोत आणि शाही इतमामास साजेल अशा थाटासाठी जरूर त्या वस्तूही आपल्याजवळ नाहीत अशी सबब अहमद सांगू लागला. पण अशा रीतीने त्या साधूला स्वस्थ बसविणे शक्य नव्हते. त्याने मातीचा एक लहानसा ढीग केला. अहमदाचा हात धरून त्याला त्या ढिगावर बसवीत तो म्हणाला... "हे तुझे सिंहासन." नंतर बार्लीचे काही कोंब त्याच्या मस्तकावर पसरून त्याने जाहीर केले की, "हे कोंब म्हणजे त्याच्या मस्तकावरील रत्नजडित तुराच होत"... आणि नंतर त्याला "दुराणि पादशहा" (Durrani Padshah) म्हणजे "पादशहांच्या मधील एक मोतीच" असा किताब दिला.

[हुसेनशाही १७–१८, २०; बयान २२५; मुजमिल ७४]. (पृष्ठ ११७ वरील टीप पहा.)

## § ९ : अहमद अब्दाली कंदाहार आणि काबूल घेतो

कंदाहारला पोहोचल्यावर अहमदशहाने नादिरशहाच्या मृत्यूची बातमी जाहीर केली. पर्शियन राजाने, कंदाहारच्या किल्ल्यात आपला गव्हर्नर म्हणून, एका घिलझाई (Ghilzai)

१ शहा साबिर (Sabir) हा काबूलचा सुप्रसिद्ध अश्ववैद्य (Farrier —नालबंद) उस्ता हलालखोर (Usta Halalkhor) याचा नातू होय. तुराणी, त्याची दरवेशी म्हणून भक्ती करीत. [सियार (३) १६]

अफगाणाला ठेवले होते. त्याने अहमदशहाला विश्वासघाताने ठार मारण्याचा कट केला. पण आपल्यावर असा आघात केला जाईल अशी अब्दालीने अपेक्षा केली होतीच. तेव्हा त्याने प्रमुख कटवाल्यांना ठार करून कंदाहारचा ताबा घेतला आणि तेथे आपण सिंहासनारुढ झाल्याचा समारंभ मोठ्या डामडौलाने साजरा केला व आपल्या नावाची नाणीही पाडली.

[मुजमिल ७५; सियार (३) १६.]

आता अहमद अब्दालीच्या निशाणाभोवती अफगाण जमातीचे लोक जमा झाले ते पूर्वी ज्याप्रमाणे गझनीच्या सुलतान महमुदाने अफगाणाना, लुटालुटीच्या मार्गाने यशस्वीपणे नेले होते त्याचप्रमाणे आताही आपणाला पुन्हा तशाच मार्गाने नेणारा आपला राष्ट्रीय नेता मिळेल या आशेने. यावेळी पंजाब आणि अफगाणिस्तानात, नादीरच्या सैन्यातील अनेक तुकड्या विखुरलेल्या होत्या, त्यांना आता तकीखान (Taqikhan Shirazi) शिराझीने (बेगलर-बेगी) एकत्र जमविले आणि अब्दालीच्या चाकरीत दाखल होण्यासाठी त्यांची मने वळविली. अशा प्रकारानी लवकरच ४०,०००, काटक लढवय्यांचा मेळावा अहमदशहाच्या हाताखाली जमा झाला. (यापैकी अल्पसंख्यच फक्त, किझिलवाशी जमातीचे होते.) नंतर या सैनिकांचा नेहमीचा खर्च भागविण्यासाठी, जरूर तो पैसा मिळविण्याकडे अहमदाने आपली दृष्टी वळविली आणि लवकरच असा पैसा मिळविलाही.

नंतर कंदाहारच्या कारभाराची व्यवस्था करून, त्याने, अब्दाली जमातीच्या सर्व लोकांकडून निष्ठेच्या शपथा घेवविल्या. इतके झाल्यावर अफगाणिस्तानातील निरनिराळे प्रांत, नादीरच्या अधिकाऱ्याकडून जिंकून घेण्यासाठी तो बाहेर पडला. प्रथम त्याने, थोड्याशा लढ्यानंतर, गझनीचा ताबा मिळविला आणि तेथे आपला गव्हर्नर नेमला. १७३९ च्या तहाने अफगाणिस्तान, नादिरशहाच्या, म्हणजेच पर्शियाच्या साम्राज्याच्या, स्वाधीन करण्यात आला होता. त्यावेळी नासिरखान नावाच्या, दिल्ली साम्राज्याच्या एका वंशपरंपरागत नोकराला, नादीरने आपल्यावतीने, अफगाणिस्तानचा गव्हर्नर म्हणून काम करण्यास भाग पाडले होते. पुढे काबूल, पेशावर व सिंध या प्रांताचा साठलेला महसूल आणून देण्यासाठी नादीरने, नासिरखानाला बोलाविले. यानुसार साठलेला महसूल देण्यासाठी, काबूल सोडून खुरासानकडे जाण्यासाठी, मे १७४७ मध्ये नासिरखान निघाला. साठलेला हा महसूल ३० लाख रुपयांचा होता. कंदाहारच्या आसपास तो पोहोचला त्या आधीच नादीरच्या खुनाची वार्ता जिकडे तिकडे पसरली होती. तेव्हा आसमंतातील काही टोळ्यांच्या नेत्यानी हा सर्व खजिना लुटून त्याची आपापसात वाटणीही करून घेतली. पण नंतर लवकरच अहमद तेथे येऊन पोहोचला व त्याने टोळीवाल्यांच्या या पुढाऱ्यांना कैद करून लुबाडलेला सर्व पैसा परत देण्यास भाग पाडले.

यानंतर अब्दालीने, नासिरखानाला, आपल्यावतीने गव्हर्नर म्हणून काम करण्यास काबूलला परत पाठविले. पण नासीरचे मन अशाप्रकारे नोकरी करण्याविरुद्ध होते. यासाठी दिल्लीशी संपर्क ठेवण्यास अधिक जवळ अशा पेशावरला (हे त्याचे हिवाळी मुख्य ठाणे होते.) जाण्यासाठी त्याने काबूल सोडले. यानंतर अब्दालीने उत्तरेला काबूलकडे पुढे चाल केली. यावेळी काबूलमधील नासीरचा प्रतिनिधी—डेप्युटी गव्हर्नर–शहर सोडून आधीच पळून गेला असल्यामुळे काहीही विरोध न होता अब्दालीने काबूलचा ताबा घेतला.

सिंहासनावर आल्यापासून, अहमदशहा अब्दाली, देशातील ठिकठिकाणच्या अफगाण टोळ्यांना, आपल्याला येऊन मिळण्यासाठी, आणि त्यांच्या जमातीचे गेलेले सार्वभौमत्व आणि साम्राज्य परत मिळविण्यासाठी, मदत करण्यास या, असे आवाहन वारंवार करीतच होता. लष्करी नेतृत्वाचे आणि राष्ट्रीय नेत्याचे जन्मजात गुण असलेल्या अब्दालीच्या, या हाकेला, प्रतिसाद देऊन, अफगाण टोळ्यांचे प्रमुख, अशा मोह घालण्यासारख्या लुटालुटीच्या संधीमध्ये सहभागी होण्यासाठी, त्याच्या निशाणाखाली गोळा झाले. नंतर अहमदाने काबूल येथूनच एक आघाडीची तुकडी पेशावर ताब्यात घेण्यासाठी आणि पुढे सिंधू नदीवरील अटकपर्यंतचा मुलूख लुटण्यासाठी पाठविली. स्वारी करून येणारे हे सैन्य जवळ येऊन पोहोचले आहे ही बातमी मिळाल्याबरोबर, नासिरखानाने पेशावर मोकळे केले, नदी ओलांडली आणि अलिकडे येऊन 'चाच हजाराच्या' ( Chach Hajara ) भागात आश्रय घेतला. पण अहमदाचा सरसेनापती सरदार-इ-जहान ( Sardar-i-Jahan ) याच्या हाताखालली दुसऱ्या एका अफगाण सैन्याने, त्याला याही भागातून बाहेर हाकून दिले. तेव्हा आपली सर्व मालमत्ता लुटीसाठी मोकळी टाकून, तो लाहोरला पळून गेला. (नोव्हेंबर).

आता अब्दालीने पेशावरमध्ये स्वतःचा कारभार प्रस्थापित केला. त्याच्या पाठीशी यावेळी अफगाणिस्तानचे मनुष्यबळ उभे असून पुढे हिंदुस्तानच्या वाटेवर त्याच्या मार्गात कोणताही भौगोलिक (Physical) अडथळा नव्हता. यामुळे हिंदुस्थानवर स्वारी करण्याला निघण्यासाठी एक सोयीचे ठिकाण म्हणून त्याला पेशावर शहराचा उपयोग झाला. थोड्याच वेळात खैबर भागातील अफगाणही त्याच्या भोवती झपाट्याने जमा झाले आणि हिंदुस्तानावरील स्वारीची योजना तयार करण्यात आली.

[आनंद ३००–३०२, सियार (३) १६–१७; बयान २२४].

## § १० : अब्दालीची पंजाबवर स्वारी आणि लाहोरचा पाडाव

अशा घटना काबूल-पेशावरकडे घडत असतानाच, अब्दाली पेशावरकडे चालून येत असल्याची बातमी हयातुल्लाला मिळाली. (भा. पहा §६) आणि त्याबरोबर तो लाहोरमधून बाहेर पडला. नंतर त्याने रावी नदीच्या काठावर खंदक तयार करून तेथे आपले ठाणे ठेवले आणि तेथून, आपल्याला मदत पाठवा अशी कळकळीची विनंती बादशहाकडे केली पण ही मदत कधीच आली नाही.

१७४७ च्या मध्याचे सुमारास अहमद अब्दालीने पेशावर सोडले आणि नावांच्या पुलाच्या सहाय्याने सिंधुनदी ओलांडली. नंतर झीलम ( Jhilam ) आणि चिनाब याही नद्या याच पद्धतीने ओलांडून, ८ जानेवारी १७४८ ला तो लाहोरजवळ येऊन पोहोचला. येताना त्याच्या मार्गावरील. त्याच्या हालचालींची व कृतींची निशाणी, त्याने लुटलेल्या व जळत राहिलेल्या खेड्यांच्या रांगेने मागे ठेविली होती. त्याच्याबरोबर १२००० निवडक घोडेस्वार होते. त्यांचा महत्त्वाचा भाग अहमदाच्या स्वतःच्याच टोळीवाल्यापैकी ६००० एकनिष्ठ व कसलेल्या घोडेस्वारांचा असून हे घोडेस्वार पर्शियापासूनच त्याच्याबरोबर आलेले होते. या घोडदळाशिवाय सरहद्दीवरील आणखी काही साहसी अफगाण पायदळ सैनिकही, हिंदुस्थानचा समृद्ध मैदानी मुलुख लुटायला मिळेल या आशेने त्याला येऊन

मिळाले. यामुळे स्वारी करून येणारे त्याचे सैन्य, बहुधा १८००० पर्यंत वाढले असावे. पण त्यांच्याजवळ तोफखाना मात्र मुळीच नव्हता.

अब्दालीचा धर्मगुरू बाबा साबिर हा एकटाच लाहोर शहरात शिरला. यावेळी त्याचा जाहीर उद्देश, त्या शहरात रहात असलेल्या आपल्या आईला भेटण्याचा व तेथील स्थानिक संतांच्या कबरींची यात्रा करण्याचा असा जरी असला तरी त्याच्या भेटीचे खरे कारण, आपल्याला येऊन मिळण्याबद्दल अब्दालीचे निमंत्रण हयातुल्लाला पोहोचविणे हे होते. जादूगार असल्याबद्दल त्याची कीर्ति आधीच लाहोरात पसरली होतीच. नादीरच्या मृत्यूनंतर लगेच, साबिरच्या जादूमंत्रामुळे, तंबू आणि घोडे यांची रूपे असलेल्या खेळण्यांचे रूपांतर, अहमदाच्या बाजूच्या खऱ्याखुऱ्या घोडदळात आणि युद्धसामग्रीत कसे झाले होते, याबद्दल लोक आपापसात बोलत होतेच. आता तर बातमी पसरली की, आपल्या जादू-मंत्राने मुघलांचा तोफखाना निर्बल व निरुपयोगी करण्यासाठीच यावेळी तो आला आहे. तेव्हा अशासारख्या प्रबळ शत्रूला निसटून जाऊ देणे, कसे चालेल ? हयातुल्लाच्या हुकमावरून त्याला तावडतोब पकडण्यात आले. दुसऱ्या दिवशी एका दुय्यम अधिकाऱ्याने, हयातला माहितीही न देता, त्याला ठार केले.

[बयान २२५, सियार (३) १७–१८; आनंद ३२५.]

या घटनेनंतर हयातुल्लाबरोबर सामोपचाराने घेण्याचा विचार, अब्दाली करणे शक्य नव्हते. १० जानेवारीला, त्याच्या सैनिकानी एकामागून एक अशा रीतीने, रावी नदी ओलांडली आणि ते शहराबाहेर पूर्वेला चार मैलावरील शालमार ( Shalmar ) बागेजवळ पोहोचले. दुसऱ्या दिवशी हे सैनिक शहा बलादिल ( Baladil ) मैदान आणि शहा हुसेनचा आश्रम या ठिकाणी मोठ्या संख्येने जमले. यावेळी हयातुल्लाच्या संरक्षक सैन्याच्या आघाडीची दोन ठाणी होती—एक, हजरत इशानचा छोटा किल्ला, ( Hazrat Ishan ); हे ठाणे हयातुल्लाच्या बक्षीच्या ताब्यात होते. दुसरे–शहाबलादिलच्या आश्रमाजवळच (परविझाबाद उपनगरात)[१] खंदकात, बंदिस्त जागेत असून ते मिर्झा अस्मतुल्ला आणि लचिन बेग यांच्या हुकमतीखाली होते. दोन्ही ठाण्यातील या दोन संरक्षक विभागात मिळून १६००० सैनिक होते, ते आता शत्रूला तोंड देण्यासाठी बाहेर मैदानावर आले. या मुघल सैन्यावर हल्ला करण्यासाठी अफगाणानी एक वेगळीच पद्धत वापरली. ते एकावेळी फक्त १००० बंदुकधारी घोडेस्वार पाठवीत. हे पथक मुघलांच्या आघाडीपर्यंत दौड करीत जाऊन, आपल्याजवळील बंदुकांच्या फैरी झाडे आणि तितक्याच झपाट्याने मागे दौड करून मुघल बंदुकांच्या टप्प्याबाहेर येत असे. अशा प्रकारे संध्याकाळपर्यंत लढाईची धुमश्चक्री चालू राहिली पण कोणत्याही पक्षाला आपल्या मूळ ठिकाणापासून पुढे सरकता आले नाही. शेवटी सूर्यास्ताचे सुमारास, या दिवसापुरती लढाई संपलेली आहे असे वाटून मुघली सैन्याने आपल्या खंदकाकडे परतण्यास सुरवात केली. अशा परतण्याच्या वेळी ते, ज्या निष्काळजीपणाने

१ बेगमपुऱ्याच्या पश्चिमेस जवळच, हजरत इशान, या, जहांगीरने सन्मान केलेल्या साधूची कबर असून ती शहाबाग रस्त्याच्या उत्तरेस लाहोर शहरापासून २ मैलांवर आहे. जुन्या लाहोर शहराच्या पूर्वेकडील मैदानी भागात दोघांमध्ये हे युद्ध झाले. या भागाचे वर्णन, लाहोर जिल्हा गॅझेटियर (आवृत्ती १८८३) पृ. १४९ मध्ये केले आहे ते असे..... "शहराच्या तटापासून ते शालमार मिआनमिर आणि इचरा (Ichra) पर्यंत, म्हणजे तीन ते चार मैल त्रिज्येच्या (Radius) वर्तुळाकृती भागात जमिनीवर, सगळीकडे पडझडीचे अवशेष आणि कचरा पसरलेला असून अधून मधून, पडत असलेल्या मशीदी, कबरी, कमानींचे दरवाजे आणि मोठमोठे ढिगारे पडलेले आहेत."

सामान्यतः परतत तसेच यावेळीही परत येऊ लागले. इतक्यात अफगाण घोडेस्वारानी त्यांच्यावर अकस्मात हल्ला करून, ते, अतिशय वेगाने तुटून पडले. यावेळी त्यानी आपल्या बंदुकातून इतक्या तीव्र व अचूक फैरी झाडल्या की, या एकूण प्रकारामुळे शाही सैन्य चकीत होऊन त्याचा पूर्ण पराभव झाला व आवरता येणार नाही असे सैरावैरा पळत ते रणांगण सोडून गेले. या मुघल सैन्याचा बक्षी (पे-मास्टर) व त्याच्या बरोबरचे अन्य सेनाधिकारी यानी, आपल्या सैन्याला सुरक्षित जागातून वा खंदकातून पुन्हा एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्याएवजी स्वतःच शहराच्या तटबंदीच्या आत आश्रयासाठी, ताबडतोब पळ काढला. त्यांच्यापैकी अदिनाबेग हा मात्र एकटाच आपल्या तुकडीसह, शहराबाहेर रात्रीच्या पहिल्या प्रहरात उभा राहिला. विजयाने बेहोष झालेले अफगाण पुढे येण्याचा प्रयत्न करीत होते आणि त्याना हजरत इशान बक्षी अधिक जवळ येता येऊ नये म्हणून अदिनाबेग आपल्या तोफांचा, त्यांच्यावर मारा करीत होता. नंतर आपला धनी हयात, याच्याकडे परत येऊन त्याने एकूण परिस्थितीची माहिती त्याला दिली. आता आपल्याला लाहोर राखता येणार नाही असे दिसून आल्याने, हयातुल्लाने मध्यरात्रीला शहरापासून दूर पळ काढला.[१] स्वतःचा बचावा कसा करता येईल याचाच फक्त विचार करणाऱ्या त्याच्या अधिकाऱ्यानी आणि सैनिकानीही त्याचेच अनुकरण केले.

अशा रीतीने पंजाबची ही समृद्ध राजधानी संरक्षणविरहित संपूर्णपणे उघडी पडली. यावेळी, पूर्वीचा गव्हर्नर मृत झकेरियाखान याच्या विश्वासातले, मिरमुर्मान व इतर काही अधिकारी, हयातुल्लाखानाने या राजधानीतच बंदिवासात ठेवलेले होते. ते दुसऱ्या दिवशी सकाळी (१२ जानेवारी रोजी) शहरासाठी दयेची याचना करण्याला अब्दालीच्या तंबूकडे गेले. तेव्हा, ३० लाख रुपये खंडणी देण्याच्या अटीवर, लुटीच्या आपत्तीतून शहराला मुक्त करण्यास विजयी अफगाणाने–अब्दालीने–मान्यता दिली आणि आपल्या सैनिकाना शहरात जाण्यापासून माघारी फिरविण्यासाठी आपले प्रमुख अधिकारी पाठविले. तरीही शहरातील सर्व शासनच कोलमडले असल्याने बरीच लुटालूट झाली–हे अटळच होते—.

लाहोर जिंकल्यामुळे अहमदाचे सामर्थ्य दुपटीपेक्षाही जास्तच वाढले. शहराबाबत खंडणीपोटी मिळालेली रक्कम (तात्काळ रोख २२ लक्ष रुपये मिळाले होते) व पळून गेलेला गव्हर्नर व त्याचे कुटुंबीय यांची मालमत्ता यांच्या रूपाने फार मोठी संपत्ती त्याला मिळाली. इतकेच नव्हे तर किल्ल्यात असलेला सर्वच्या सर्व शाही तोफखाना आणि लष्करी सामुग्री, त्याच्या ताब्यात आल्यामुळे त्याला आपले सैन्य आता सुसज्ज करता आले. असा तोफखाना व अशी सामुग्री यासारखे काहीही त्याने पेशावर येथून येताना बरोबर आणले नव्हते. याखेरीज लाहोर शहरात व आसमंतात जे घोडे व ऊंट त्याला आढळले

१ (सियार, १८ नुसार) हा पराभव अदिनाबेग निष्क्रिय बसल्यामुळे झाला. अफगाणांना खंदकामधून घालवून देण्याचे प्रयत्न बक्षी करीत असताना त्याला अदिनाबेगने मदत केली नाही. इतकेच नव्हे तर दिवसाचा स्वच्छ प्रकाश असतानाच त्याने शहरात भित्रेपणाने माघार घेतली. (TAH) त. इ-अ. ४ ब मध्ये मात्र या संबंध लढाईचाच भाग गाळला असून याबाबत एवढाच उल्लेख आहे की, हयातुल्लाने कसूरचा (Qasur) जुम्लाखान अफगाण याच्या हाताखाली सैन्य देऊन त्याला येणाऱ्या अब्दालीविरुद्ध पाठविला. पण शत्रूला, विरोध करण्याऐवजी, तो त्यालाच जाऊन मिळाला. तेव्हा हयातुल्लाला लढाई देणे अशक्य होऊन तो पळाला. मी (ज. सरकार) येथे लाहोरच्याच रहाणाऱ्या आनंदरामाने दिलेली हकीगत स्वीकारली आहे.

अब्दाली पुढे सरहिंदकडे कूच करून निघाला तेव्हा त्याने याच जुम्लाखानाला लाहोरमध्ये आपला गव्हर्नर म्हणून मागे ठेवले. (आनंद, ३३२).

तेही सर्व त्याने ताब्यात घेतले आणि आपल्या अफगाण पायदळ सैनिकांना घोडे पुरविले व आपल्या, "कड्यातील फिरक्या बंदुका" ऊंटावर चढविल्या. अशा प्रकारे, त्याने, सहज हालचाली करू शकणाऱ्या आपल्या आणलेल्या सैन्य विभागात आणखी ५–६ हजार कणखर सैनिकांची भर घालून शिवाय त्याना सहज व जलद नेता येण्यासारख्या बऱ्याच हलक्या तोफांनिशी सुसज्ज केले.

अशा प्रकारे आपल्या सैन्याची तयारी पूर्ण केल्यावर, आपण आता दिल्लीच्या, नियमित, खड्या सैन्याला ( Regular Army ) बरोबरीच्या नात्याने तोंड देऊ शकू असा आत्मविश्वास त्याला वाटू लागला, आणि त्याने १२००० सुसज्ज सैन्य बरोबर घेऊन, १९ फेब्रुवारी रोजी, दिल्लीच्या रस्त्याला लागण्यासाठी पूर्वेकडे, सरहिंदच्या रोखाने, लाहोर येथून कूच केले. निघताना तेथे, मागे त्याने आपला गव्हर्नर ठेवला. [आनंद ३१२, ३२५–३३२ ; बयान २२७ ; सियार (३) १७–१८ ; हुसेनशाही २५].

## §११ : दिल्ली दरबारातील शैथिल्य आणि संदेह

अशा प्रकारे हे भयानक संकट पुढे येत असताना, इकडे दिल्लीचे शाही सरकार काय करीत होते ते आता पाहू. येत असलेल्या स्वारीबद्दल अनेक भयसूचक सूचना आधीच बादशहाकडे आल्या होत्या, पण सबंध दरबारावर एक प्रकारची भुरळ पडली असून नादीरच्या स्वारीत भोगावे लागलेले नुकसान आणि सहन करावी लागलेली मानखंडना यांची आठवण ताजी असूनही, बादशहाच्या एकाही अधिकाऱ्याच्या मनात, आताच्या परिस्थितीत जरूर असलेल्या तरतुदींची आणि स्वतःच्या कर्तव्याची जाणीव निर्माण झाली नाही. पर्शिअन जेता नादीर, याचे संकट आले असता दिल्ली दरबाराच्या उपाययोजनेबाबत, सल्लामसलतीतील उलटसुलट विचार वा विरोध, दिरंगाई आणि अनिश्चितता या गोष्टी दिसून आल्या होत्या. आताही त्या जास्तच लाजिरवाण्या रीतीने, आपला प्रभाव दाखवू लागल्या.

१ सप्टेंबर १७४७, इतक्या लवकर, अमिरबेगकडून ( काबूल येथील नासिरखानाचा प्रतिनिधी. भा. पहा, §९ प. ३, ४ ) महमदशहाला अब्दालीने १५ जुलई १७४७ ला काढलेल्या एका जाहीरनाम्याची प्रत मिळाली होती. या जाहीरनाम्यानुसार महमदहाशिम आफ्रिडी याला पेशावर भागातील सर्व आफ्रिडी टोळीवाल्यांचा नायक ( "मालिक आणि शुभ्र दाढीवाला ".....भा. जेष्ठ प्रमुख ) म्हणून अब्दालीने नेमले होते. ( आनंदराम २९८ ). यानंतर पुढे नोव्हेंबर मध्याचे सुमारास अब्दालीने काबूल घेतल्याचा आणि त्याच्या सैन्याची एक तुकडी अटकजवळ, सर्व जिल्ह्यातच छळ व लुटालूट करीत असलेली दिसल्याचा अहवाल, महमदशहाकडे आला होता. त्या पोठापाठ आणखीही वार्ता आली होती की, या स्वारी करून येणाऱ्याने पेशावरही घेतले असून तेथून, नासिरखान लाहोरला पळून आला आहे.

हयातुल्लाने लाहोरची सत्ता बळजबरीने आपल्या हाती घेतल्यामुळे ( भा. पहा §६, मार्च १७४७ ) लाहोरमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीने, दिल्लीच्या दरबारास अतिशय मोठ्या गोंधळात टाकले. बळजबरीने सत्ता हाती घेणाऱ्या हयातुल्लाच्या हातात, कायदेशीरपणे नेमणूक असलेला डेप्युटी गव्हर्नर याहियाखान हा सापडलेला असून, तो तर वजीराचा जावई

होता.[1] जबरदस्तीने सत्ता बळकावणाऱ्या हयातला हुसकून लावण्यासाठी सैन्य पाठविले तर तो चिडून आपल्या हातातील महत्त्वाचा कैदी म्हणजे याहिया, याला मारून टाकण्याच्या संभव होता. अशा परिस्थितीत वजिराच्या सल्ल्यानुसार बादशहाने हयातशी प्रसंग पाहून वागण्याचा पवित्रा घेतला आणि त्याला गोडीगुलाबीचेच संदेश पाठविले. इतकेच नव्हे तर याच बंडखोराने स्वतःला सुभेदारी मिळावी अशी विनंती करण्यास पाठविलेल्या प्रतिनिधीशी दीर्घ व लांबत चालविलेल्या वाटाघाटीचे गुऱ्हाळही सुरू ठेवले. ही परिस्थिती जास्तच आणीबाणीची बनली ती अब्दालीने कंदाहार आणि काबूल जिंकल्यामुळे. अब्दालीने हिंदुस्थानवर स्वारी केली आणि त्याचवेळी जर हयातुल्लाला दिल्लीच्या दरबारातील वातावरण आपल्याला प्रतिकूल असल्याचे अगदी लहानसेही चिन्ह दिसले तरी तो लगेच स्वारी करून येणाऱ्या शत्रूच्याच बाजूला लोटला जाईल अशी भीती निर्माण झाली. तेव्हा या संकटाला धैर्याने तोंड देऊन, लाहोरच्या बंडखोराला तावडतोब चिरडून टाकण्याऐवजी प्रत्यक्षात काहीही कृती न करता, अनिर्णित चर्चा करीत बसण्यामध्ये आणि घडेल ते घडू दे, आपण पहात रहावे अशा धोरणातच अधिक शहाणपण आहे असे दिल्ली सरकारला वाटले.

आक्रमकानी पेशावर घेतले असून त्यांची आघाडीची पथके अटकजवळ दिसू लागली आहेत ( नोव्हेंबरचा प्रारंभ ) असे कळल्यावरही, लाहोरला उत्पन्न झालेल्या धोक्याचे गांभिर्य बादशहाच्या लक्षात आले नाही. २३ नोव्हेंबरलाच आपल्या तंबूंचा आघाडीचा संच, पंजाबच्या रस्त्यावर एका दिवसाच्या मुक्कामाएवढ्या, अंतरावर पुढे त्याने पाठविला होता हे खरे पण प्रत्यक्ष राजधानीतून निघण्याची तारीख मात्र यानंतर पूर्ण तीन आठवडे इतक्या दूरची ( १४ डिसेंबर ) ठरविली. हल्ला करून येणारे अफगाण अटकहून पेशावरकडे परत गेले आहेत अशीही त्याला आता वार्ता मिळाली आणि तिच्यामुळे गंभीर धोक्याबाबतचे त्याचे अज्ञान अधिकच दृढ बनले. त्याच्या दुर्बल आणि ऐदी स्वभावाच्या दृष्टीने ही बातमी खूपच उत्तेजक असल्याने तर त्याला या बातमीबद्दल कृतज्ञाच वाटली. सिंहासनावर बसल्यापासून आता २८ वर्षे तो दिल्लीतच राहिला होता. या काळात दिल्लीबाहेर थोड्याच मैलापेक्षा अधिक अंतरावर तो कधीही बाहेर पडला नव्हता. ( याला अपवाद म्हणजे फक्त दोन प्रसंग होते.—भा. पहा प्र. १ §३ परि. १ व प्र. २ §७. . . .हे प्रसंग असे— १. नादिरशहा विरुद्ध मोहिम व २. रोहिला मोहिम ). आत्यंतिक सुखासीनतेची आवडही- आता त्याच्यामध्ये वाढलेली होती. यातच आणखी भर पडली ती त्याच्या अफूच्या व्यसना-मुळे निर्माण झालेल्या परिणामांची. यावेळी तो पुन्हा आजारी पडला आणि डॉक्टरानी त्याला हालचाल करण्याची बंदी केली.

वायव्येकडून येत असलेल्या या संकटाला तोंड देण्यासाठी काय उपाय योजिले पाहिजेत या प्रश्नाबाबत बादशहाच्या दरबारात तीव्र मतभेद होते. बादशहाने स्वतःच सैन्याचे नेतृत्व स्वीकारून मोहीम हाती घेतल्याशिवाय हिंदुस्थानचे, सुखाला लालचावलेले सैनिक इराणच्या कसलेल्या सैन्याला तोंड देणार नाहीत, असे दरबारातील अनुभवी सेनापतीनी बादशहाला सांगितले. याउलट दरबारी ऐषआरामाला चटावलेल्या, स्वतः कोणत्याही लढाईत प्रत्यक्ष भाग न घेतलेल्या दरबारी उमरावानी बडबड चालविली की, 'शहेनशहांनी स्वतः मोहिम

१ यावेळी दिल्लीचा वजीर हाच लाहोरचा कायदेशीरपणे, नेमलेला गव्हर्नर असून झकेरियाचा मुलगा याहिया-खान याला त्याचा डेप्युटी म्हणून मान्यता दिलेली होती. प्रत्यक्षात लाहोरला डे. गव्हर्नरच रहात असून तोच सर्व कारभार करीत असे. पहा §५.

हाती घेऊन रणांगणावर उतरावे असे महत्व देण्याइतकी, येत असलेल्या अफगाण उपट-सुंभाची ( upstart ) लायकी नाही. बादशहाच्या उमरावापैकी कोणीही एकटा, हातपाय बांधून त्याला गिरफदार करून आणू शकेल.' या सर्वांच्यापेक्षा वजीर अधिक शहाणा होता. त्याने धोक्याचे गांभिर्य सुचवून सांगितले कीं, बादशहाना जर यश मिळवावयाचे असेल तर त्यानी स्वतः दिल्लीबाहेर पडले पाहिजे, पानिपत वा कर्नाळ अशा लाहोरला अधिक जवळ असलेल्या ठिकाणापर्यंत तरी गेले पाहिजे आणि तेथून पुढे वजीराच्या हाताखाली सैन्य पाठविले पाहिजे...."बोलण्यात तरी बादशहाने हा सल्ला मान्य केला, पण त्यानुसार प्रत्यक्ष कृती करण्याबाबत मात्र त्याला कधीही निश्चय करता आला नाही. यामुळे स्वतः मोहिमेवर निघण्यासाठी ठरविलेली तारीख तो वारंवार पुढे ढकलू लागला." परिणामतः प्रत्यक्षात त्याने काहीही केले नाही. मनाने दुर्बल असलेल्या लोकाना अतिशय आवडणारी गोष्ट म्हणजे कृतीचा अभाव.....काहीही न करणे हीच होय." ( मुजमिल ९९; आनंदराम ३०८–३१२).

## § १२ : अब्दालीला प्रतिकार करण्यासाठी दिल्लीहून सैन्याची रवानगी

बरोबर बलाढ्य सैन्य घेऊन, अब्दालीने पेशावरपासून लाहोरच्या दिशेने कूच सुरू केले आहे ही वार्ता, महमदशहाला, २२ डिसेंबरला ( भा. १७४७—पहा §१० ) मिळाली. नंतर बादशहाने दिल्लीतील सर्व सरकारी खजिने रिते करून, ६० लाख रुपये जमविले आणि ते, आपल्या सरदारामध्ये, त्याना या मोहिमेसाठी सज्ज होता यावे म्हणून वाटले. वृद्ध, दारुड्या आणि प्रस्तुत परिस्थितीत काहीही हालचाल करण्याची जरुरी नाही या मताचा, म्हणजेच संपूर्ण निष्क्रियतेचा पुरस्कार करणारा वजीर कुम्रुद्दिनखान याला, या मोहिमेचा सरसेनापती नेमण्यांत आले. सफदरजंग (औंधचा सुभेदार), ईश्वरीसिंग (जयपूरचा राजपूत राजा व राजपूत सरंजामदारांचा प्रमुख), आणि नासिरखान ( पूर्वी काबूलचा सुभेदार असलेला), या तिघांना त्याच्या हाताखाली, मदतनीस म्हणून देण्यात आले. इतके केल्यावरही, प्रत्यक्ष कूच करण्याबाबत त्यानी लावलेला वेळ लाजिरवाणाच होता.

यावेळी जमविलेल्या सैन्यात, लष्करी आणि सैन्याबरोबर पाठोपाठ जाणारे बिनलष्करी लोक अशी सर्व मिळून दोन लाखावर माणसे असून शिवाय भारी तोफखान्याचे अवडंबरही त्यांच्याबरोबर होते अशा या बोजड व अफाट सैन्याने अखेरी एकदा आपले दीर्घ, कंटाळवाणे, कूच हळूहळू सुरू केले आणि असे हे कूच, सुरू झाल्यावरही वाटेत वारंवार मुक्काम करणेही चालविले. अशा रीतीने चाललेले हे अवजड सैन्य नरेला पर्यंतही ( Narela–दिल्लीच्या उत्तरेस १६ मैल ) पोहोचले नव्हते इतक्यात बातमी आली की, अब्दालीने आधीच लाहोर घेतले असून, तेथे तो आणखी नव्या सैन्याची भरती करीत आहे. ( भा. पहा §१० प.४). या बातमीमुळे दिल्लीच्या सैन्याला शत्रूच्या भीतीने पछाडले आणि त्यांच्या सेनापतीनी, "आपल्या मुलाला-शहाजाद्याला–सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी पाठवा" अशी विनवणी करण्यासाठी, बादशहाकडे आपले एक शिष्टमंडळ पाठविले. आता असे करण्याशिवाय गत्यंतरच नसल्यामुळे बादशहाने ही विनवणी मान्य केली. यानुसार शहाजादा अहमद याने दिल्लीहून ३१ जानेवारीला कूच केले आणि सोनपतजवळ मुख्य सैन्याला गाठून त्याचाही वेग त्याने वाढविला. पुढे कर्नाळ होते. नऊच वर्षापूर्वी याच कर्नाळ येथे दुसऱ्या एका स्वारी करून येणाऱ्या परकीयाने ( भा. नादिरशहाने), दिल्ली सैन्याचा पराभव केला होता. हे दुश्चिन्ह टाळण्यासाठी त्याने, ते झपाट्याने ओलांडले ( १९ फेब्रुवारी). या ठिकाणी कळले की

सरहिंद येथील बादशहांचा फौजदार (भा. प्रमुख स्थानिक अधिकारी) अलि महमद रोहिला (भा. पहा प्र. २ § ८ § ९) याने आपले ठाणे सोडून देऊन, बरेली जिल्ह्यातील अबोनला या आपल्या गावाकडे पळ काढला असून लाहोर व दिल्ली या दरम्यानचे सर्वात महत्वाचे, मुख्य छावणीपासून दूर ठेवलेले संरक्षक ठाणे (Outpost) आता, संरक्षकाशिवाय उघडे पडले आहे. ही वार्ता मिळाल्यावर शहाजाद्याने आपली सैन्य शक्य तितक्या झपाट्याने पुढे रेटली आणि २५ फेब्रुवारीला, तो सरहिंदजवळ पोहोचला.

शत्रू कोठेही दिसल्याची वा त्याच्या हालचालींची काही वार्ता अद्याप शाही सेनापतीपर्यंत पोहोचलेली नव्हती. पण.....या दृष्टीने काही बातम्या मिळविण्याबाबत..... "मुघल सरदारानी, आश्चर्यचकित करण्याइतके अज्ञान आणि उपेक्षा दाखविली. शत्रूबद्दल माहिती मिळविण्याचा त्यांनी काहीही प्रयत्न केला नाही इतकेच नव्हे तर त्यांच्या पिछाडीला राहिलेल्या दिल्ली केंद्राशी आपले दळणवळण सुरक्षित राखण्याचा वा आपल्या छावणीकडे यावयाच्या सामुग्रीच्या रस्त्यांचे संरक्षण करण्याचाही काही प्रयत्न केला नाही. सरहिंदही दुर्लक्षितच ठेवले. अशा परिस्थितीत शत्रूच्या घोडदळाने दौड करून दिल्लीकडे चढाई केली असती तर वाटेमध्ये त्याना काहीही अडथळा झाला नसता." (आनंदराम).

सरहिंदच्या पुढे सतलज नदीच्या दिशेने, सैन्याचे कूच चालू झाले तेव्हा, वजीराच्या जनानखान्यातील स्त्रिया व सर्व अवजड सामान, खजिना आणि या अफाट सैन्याची शिलकी सामुग्री व गाड्या असे सर्व, सरहिंदच्या लहानशा किल्ल्यात, मागे ठेवण्यात आले. या सर्वांच्या रक्षणासाठी, घोडदळ व पायदळ मिळून फक्त १००० सैन्याची तुकडी वजीराच्या एका खोजाच्या (Eunuch) हाताखाली मागे ठेवली होती. सरहिंद व लाहोर या मधला सरळ रस्ता लुधियाना येथे सतलज ओलांडतो. पण यावेळी लुधियानापासून प्रवाहाच्या वरच्या म्हणजे उगमाकडच्या-उत्तरेच्या बाजूस २२ मैलांवरील मच्छीवारा (Machhiwara) उताराचे ठिकाणी, नदीच्या पाण्याची खोली कमी होती. यामुळे शाही सेनापतीनी, त्या लांबच्या रस्त्याने, मच्छीवाराचे बाजूने जाऊन नदी ओलांडण्याचे ठरविले. अशा रीतीने नेहमीचा व अधिक जवळचा रस्ता आपल्या डाव्या बाजूस दूर अंतरावर सोडून ते जाणार असले तरीही लुधियाना हाती राखण्यासाठी मात्र, त्यानी सैन्यातील कोणताही विभाग वेगळा करून, पाठविला नाही; इतकेच नव्हे तर त्या बाजूला शत्रू दिसतो का, इतके पाहण्यासाठी आपली कोणी टेहळी पथकेही ठेवली नाहीत. यापेक्षाही घोडचूक केली ती अशी की, पुढे जात असलेल्या सैन्याने, सरहिंद या आपल्या मूळ, पायाभूत ठाण्याशी संबंध राखण्यासाठी, सतत लांबत जाणारी अशी पूरक ठाण्यांची (Outposts) साखळीही अवश्य होती, तीही राखली नाही. यामुळे, पुढे जाणाऱ्या या सैन्याचा, सरहिंदच्या पुरवठा ठाण्याशी संबंध ताबोडतोब तुटला.

एका बाजूला, विश्वासही बसणार नाही इतकी बेपर्वाई, उन्मत्तता आणि लष्करी डावपेचाबाबत नालायकी दाखविली जात असताना, दुसऱ्या बाजूला शत्रूने मात्र असामान्य दक्षता आणि चपळाई दाखविली. अब्दालीच्या सैन्यात १२००० घोडेस्वार होते.[1] त्यांच्याजवळ

१ आनंदरामाच्या मतानुसार (पृ. ३३२) अब्दालीने, सुमारे ३०,००० सैन्य बरोबर घेऊन लाहोर सोडले होते..... आशब (२) ४५४ नुसार, पेशावरहून लाहोरला येताना अब्दालीबरोबर ६ ते ७ हजार सैनिक होते..... (३१२, आनंदराम यानुसार २५,०००).

भारी लांब पल्ल्याचा तोफखाना नव्हता पण हे सैन्य अतिशय जलद हालचाली करू शकणारे होते. त्यांच्याबरोबर, उंटावर लादलेल्या जवळजवळ एक हजार हलक्या तोफाही होत्या. ( Swivels, Jizails ....जातीच्या या तोफा-बंदुका, मान्याची दिशा बदलता येण्यासाठी, बहुतांशी गोलाकृती कड्यातून फिरविता येतील अशा असून त्या तोडयाच्या व हलक्या असत. ). हे बंदुकधारी सांडणीस्वाराचे पथक घोडदळाइतके जलद हालचाली करू शके. याशिवाय 'पर्शिअन नेपोलिअन' नादिरशहा याच्या हाताखाली कसलेल्या सेनापति-अब्दालीच्या कडव्या, व निष्ठुर सामर्थ्यामुळे, त्याच्या हालचालीबद्दलच्या बातम्याही अतिशय गुप्त राखल्या गेल्या..... "वजीराने वा कोणाही मुघल सरदाराने टेहळणी करण्यासाठीं पाठविलेला हेर जिवंत परत जाता कामा नये, यासाठी, आपल्या छावणीत वा हालचाली चाललेल्या प्रदेशात कोणीही हिंदुस्थानी मनुष्य आढळला तर त्याला ठार मारा असे हुकूम अब्दालीने आपल्या सैन्याला दिले होते.".....शत्रूचा ठावठिकाणा आणि बेत याबाबत, अशा रीतीने गाढ अंधारात राहिलेल्या व मृत्यूच्या दाढेत सापडलेल्या मुघल सैन्याने, २७ फेब्रुवारीला सरहिंदपासून पुढे कूच केले आणि ते भरवली ( Bharaoli –सरहिंदच्या उत्तरेस १४ मैल व मच्चीवरापासून ११ मैल अलीकडे ) येथे पोहोचले. या ठिकाणी त्यांचा मुक्काम असताना त्याना वार्ता मिळाली की, अब्दाली त्यांच्या पिछाडीच्या भागात शिरला असून, त्याने सरहिंद घेऊन तेथे ठेवलेल्या सर्व शिबंदीचा पूर्ण पाडाव व नाश केलेला आहे आणि तेथे ठेवलेला सर्व खजिना, तोफखाना आणि जनानखाना हीही आपल्या ताब्यात घेतलेली आहेत. या वार्तेने साहजिकच त्याना आश्चर्याचा धक्काच दिला. हे सर्व कसे घडले ते आता आपण पाहू. [ मुजमिल १०१; आनंद ३१३–३१५; ३२२–३२४, ३३३–३३७; बयान २२८, २३२; TAH त. इ. अ.–४ ब–५ अ. ].

## § १३ : अब्दाली सरहिंद जिंकतो

१९ फेब्रुवारीला लाहोर सोडल्यावर पुढे लुधियाना जवळील उतार पार करून अब्दालीने सतलज ओलांडली, ( १ मार्च ), आणि नंतर एकाच रात्रीत सरहिंदपर्यंत मजल मारली ( ४० मैल आग्नेयेस ). लगेच सकाळी अगदी लवकर त्याने, अतिशय आश्चर्यचकित झालेल्या, किल्ल्यामधील शिबंदीवर मोठ्या झपाट्याने जोराचा हल्ला केला. आरंभी त्याने उंटावरील तोफखान्याला मारा करून संरक्षक शिबंदीला किल्ल्याच्या तटापासून दूर पळवून लावले, नंतर त्याच्या अफगाण सैनिकानी एकदम मुसंडी मारून किल्ल्याचा दरवाजा गाठला, तो फोडला आणि ते, लुटालूट व कापाकापी करीत आणि किल्ल्यातील व शहरातील धाब्यांच्या घरांची ( Thatched Houses गवताची छपरे असलेली घरे ) जाळपोळ करीत, आत शिरले. बंदुकधारी शाही सैनिकांजवळील दारूगोळा लवकरच संपुष्टात आला नंतर त्यांची कत्तल झाली व स्त्रियाना गुलाम करण्यात आले. प्रस्तुत मोहिमेवर झालेल्या, या विजयाच्या परिणामाबाबत, अतिशयोक्ती करणे कठीण आहे. दिल्लीच्या सैन्याने आपल्या-बरोबर पुढे नेलेले तोफगोळे, अग्निबाण व अशीच लष्करी सामुग्री आणि नेलेला खजिना येवढेच सोडून मागे ठेवलेला बाकी सर्व अशाच लष्करी सामुग्रीचा साठा व खजिना, अब्दालीच्या हाती पडला आणि त्याच्या सामर्थ्यात खूपच भर पडली. याचबरोबर व याच प्रमाणात शाही बाजू कमकुवत व खिन्न झाली. स्वारी करून येत असलेल्या शत्रूने त्यांच्या पिछाडीच्या भागात शिरकाव केला होता आणि दिल्लीकडे जाणारा रस्ता त्यांच्यापुढे उघडा पडून, तो आता तिकडे कूच करू लागला आहे अशा वार्ताही येऊ लागल्या होत्या. या भयंकर धोक्याची

बातमी राजधानीत पोहोचली ती सुमारे १० डिसेंबरला. तेव्हा आपल्या सैन्यातील एका विभागाला, बरोबर तोफखाना घेऊन, दिल्लीच्या वायव्येस ७ मैलावरील सराई बादली येथे जाण्यास व तेथे शत्रूची वाट अडविण्यास बादशहाने हुकूम दिले. पूर्वी नादिरशहाने केलेल्या कत्तलीची पुनरावृत्ती होईल, त्यातून सुटण्यासाठी सामान्य नागरिकांनी, शहरातून पळ काढण्यास गर्दी केली. पण यावेळी काढलेल्या एका हुकुमानुसार, त्याना आत शहरातच अडवून ठेवण्यासाठी पोलिसानी शहराच्या तटाचे दरवाजे बंद करून घेतले. तथापि अनेक नागरिकानी आपल्या स्त्रियाना, वेश बदलून शहराबाहेर पाठविले. [ ता. -इ-अ-६ अ.].

सर्हिंद घेतल्यावर सैन्याजवळील ओझे कमी करण्यासाठी, अब्दालीने आपणास मिळालेली लूट, तंबू आणि अवजड सामान, शहाणपणाने लाहोरला पाठवून दिले. यामुळे त्याचे सैन्य हालचालीसाठी पुन्हा सुटसुटीत झाले. नंतर त्याने आपली मुख्य छावणी सर्हिंद बाहेरील शाही बागेत ठोकून तिचे रक्षण करण्यासाठी ४००० ची शिबंदी ठेवली आणि शाही सैन्याला हुडकून काढण्यासाठी तो बाहेर पडला. [ आनंदराम ३३७; सियार १९; मुजमिल १०२]

## § १४ : मानपूर (Manupur) येथे दिल्लीचे सैन्य

'सर्हिंद शत्रूने जिंकून घेतले' ही बातमी २ मार्च रोजीच पण उशिरा, शहाजाद्याकडे आणली ती, सफदरजंगाने १० पर्शिअन टेहळे पाठविले होते त्यांनी. पण वजीर मात्र स्वतःच्याच घमेंडीने अंध झाला असून, त्याने पाठविलेल्या हेरांपैकी कोणीही परत आलेला नसल्यामुळे या बातमीवर विश्वास ठेवण्यास तो तयार नव्हता. तेव्हा या बातमीबाबत निश्चित शहानिशा करण्यासाठी, दुसरे टेहळे पाठविण्यात आले आणि यात शाही सैन्याने आणखी एक दिवस फुकट घालविला. ही वार्ता खरीच असल्याचे दिसून आले तेव्हा, "......या बातमीने हिंदुस्थानी सेनापती व सैनिक इतके भांबावून गेले की, ते काहीही लढा न देता जिकडे तिकडे निघून जाण्याच्या बेतात आले." तेव्हा शहाजाद्याने भरावलीपासून सर्हिंदकडे घाईघाईने परत येण्यास सुरवात केली. त्याचे सैन्य सर्हिंदच्या वायव्येस १० मैलावर असलेल्या, मानपूर खेड्याजवळ पोहोचले त्यावेळी त्याना शत्रू दिसून आले. तेव्हा तेथेच थांबून, संरक्षणाची तरतूद म्हणून, आपल्या भोवती खंदक व अन्य संरक्षक सोयी करून आपला पाय रोवण्यास त्याने सुरवात केली. शहाजादा आणि इतर सरदार यांच्या तंबूच्या भोवती तोफांचे मोर्चे बांधून तुर्की पद्धतीनुसार तोफगाड्यांची चाके साखळीने एकत्र बांधण्यात आली. खंदक खणण्यात येऊन निघालेली माती रचून संरक्षक भिंती उभारण्यात आल्या आणि सोयीच्या ठिकाणी 'सणगरही' बांधण्यात आले. (सणगर :—Musket Houses-भा. बंदुका रोखून ठेवण्यासाठी जमिनीखाली वा बरोबर खोल्यासारखी तयार केलेली छोटी रचना वा घरे–Bunkers.) (मुजमिल १०३).

हे अफाट शाही सैन्य व त्याचे पाठोपाठ येणारे लोक मिळून एकूण छावणीचा विस्तार १४–१५ मैलांच्या परिघात पसरला होता. तो सर्व भाग कोरडा असून त्यात फक्त थोड्याच विहिरी होत्या. तेव्हा आणखी काही विहिरी खणण्यात आल्या, पण त्या सर्व मिळून, माणसे व जनावरे यांच्या या मोठ्या समुदायाला पुरेशा नव्हत्या, यामुळे लवकरच पाण्याची तीव्र कमतरता जाणवू लागली आणि याचबरोबर शत्रूच्या फिरत्या पथकानी त्यांच्या अन्नाचा पुरवठाही पूर्णपणे थांबविला. अशा रीतीने मोठ्या चपळाईने हल्ले करणाऱ्या या परकी सैन्या-समोर, शाहीसैन्य पूर्णपणे निश्चल बनले आणि परिणामतः त्याला संपूर्ण वेढा घातला गेला.

[ आनंद, ३३९, ३४३ ]. अब्दालीनेही सरहिदच्या वायव्येस पाच मैलावर व मानपूर येथील शाही छावणीच्या समोर, जवळजवळ तितक्याच अंतरावर आपला आघाडीचा तळ ठोकून त्याच्याभोवताली खंदकही तयार केले. त्याच्या फिरत्या पथकांच्या, दिल्ली सैन्याच्या सभोवार गस्तीसाठी फिरणाऱ्या त्यांच्या पथकाबरोबर, रोज चकमकी झडू लागल्या यावेळी अब्दालीने आपल्याबरोबर सहज वाहून नेता येतील अशा सातच तोफा (Top-i-Jilan) आणल्या होत्या. यामुळे शाही सैन्याच्या अधिक मोठ्या आणि संख्येनेही जास्त असलेल्या तोफांच्या माऱ्याला त्याला योग्य उत्तर देता येईना वा, या तोफांच्या टप्प्याच्या आत, मुघल खंदकाजवळ जाण्याचे धाडसही करवेना. तथापि बादशहाच्या या, मोठ्या सैन्याला, केवळ संरक्षणात्मक पवित्राच घेण्यास त्याने भाग पाडले. त्या सैन्याचा पसारा आटोपशीर नसल्याने, अनेक ठिकाणी त्यावर प्रहार करण्यासारखी स्थिती होती. यामुळे निव्वळ उपासमारीमुळे, त्याला शरणागती पत्करावी लागेल हा, केवळ काही काळाचाच प्रश्न बनला. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, जवळचा अन्नसाठा संपण्यापूर्वी, वेढणाऱ्या शत्रूशी लढा देऊन अडचणींचा सोक्षमोक्ष करावयाचा हा एक मार्ग होता पण दुर्बल वजीराने त्याला नकार दिला. हा मार्ग काढण्यासाठी त्याची स्वतःची एक योजना होती ती अशी. . . . . "आपण प्रत्यक्ष लढाई टाळावयाची. दाणावैरणीसाठी फिरणाऱ्या शत्रूच्या पथकांवर हल्ले करण्यास आसमंतातील जमिनदारास चिथावणी देऊन शत्रूचा पुरवठा तोडावयाचा. शेवटी आपल्या तोफखान्याच्या भडिमाराने त्याचा पराभव करावयाचा". . . . यानुसार ४ मार्च ते ११ मार्चपर्यंत मुघल तोफांचा, निष्फळ भडिमार चालू राहिला. आपण प्रत्यक्ष हालचाल वा चढाई न करण्याच्या, वजीराच्या निष्क्रीय धोरणामुळे प्रस्तुत संघर्षात, पहिला पवित्रा घेण्याच्या, पहिला डाव टाकण्याच्या, सर्व संधी मात्र शत्रूच्या हाती राहिल्या. अखेरी शत्रूला मिळालेल्या या पुढाकारामुळे शाही पक्षाला, द्याव्या लागणाऱ्या मोलाची जाणीव वजीराला होऊन, त्याला प्रत्यक्ष लढाई करणे भाग पडले. उसंत मिळालेल्या काळात अब्दालीने लाहोर येथून एक मोठी तोफ आणविली आणि ९ मार्चला ती, वजीराच्या छावणीच्या जागेपेक्षा अधिक उंच असलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर चढवून बसविली. आता तिच्या माऱ्यामुळे वजीराचे सैनिक व उंट मृत्यूमुखी पडू लागले. तेव्हा असहायपणे अशी कत्तल होऊ देण्यापेक्षा, समोरासमोर लढाईचा धोका पत्करणे बरे असा विचार करून, दोन दिवसानी ही लढाई द्यावयाचे त्याने ठरविले. (आनंद–३४५).

यानुसार निश्चित केलेल्या दिवशी ( ११ मार्च १७४८) सकाळी दिल्ली सैन्याचे सर्व विभाग सज्ज झाले. यावेळी वजीर स्वतः हत्तीवरून बाहेर पडून या हल्ल्याचे नेतृत्व करणार होता. त्यानेही आपली सकाळची प्रार्थना व धार्मिक पाठ जवळजवळ संपवीत आणले होते. इतक्यात त्याच्या तंबू बाहेरील जमिनीवर एक तोफगोळा येऊन आदळला. तेथून त्याने उसळी घेतली व भिंतीवरून तो तंबूच्या आत पडला आणि यामुळे वजीराच्या कंबरेत प्राणघातक जखम झाली.

त्या विशिष्ट तंबूपर्यंत तोफेचा मारा करता येऊन, त्यामध्ये बसलेल्या वजीराला मार लागेल इतक्या अचूक नेम धरून, एकच गोळा मारून, कार्यभाग साधता आला ही गोष्ट केवळ अपघाताने घडू शकली असेल यावर लोकांचा विश्वास बसू शकला नाही. या संदर्भात तत्कालीन लेखक आनंदराम एक गोष्ट सांगतो ती अशी :— या घटनेपूर्वी काही दिवस अब्दालीचे दोन हेर वजीराकडे आले. आपण पूर्वी झकेरियाखानाच्या तोफखान्यात नोकर होतो व आता, स्वारी करून आलेल्या शत्रूच्या, सक्तीच्या नोकरीतून पळून आलो आहोत

असा बहाणा त्यानी केला. त्यांच्यावर वजीराने पूर्ण विश्वास ठेवला आणि पुढे थोड्याच दिवसात, वजीराच्या राहण्याच्या जागेसंबंधी आणि निरनिराळ्या कामांच्या वेळासंबंधी त्यानी सर्व माहिती मिळविली. नंतर आपल्यासारख्याच, नोकरी टाकून पळून येणाऱ्या आणखी लोकाना घेऊन येण्याची सबब सांगून ते अफगाण छावणीकडे परत गेले. या हेरानी अफगाणी गोलंदाजाना दिलेल्या माहितीमुळे इतके मार्गदर्शन मिळाले की, वजीराला ठार करण्याला केवळ एकच गोळा पुरेसा ठरला. पुढे १८०७ मध्ये याच संदर्भात गुलाम अलि लिहितो "अब्दालीचा तोफखाना प्रमुख, महदी कुली बेग, तहासाठी वरकरणी एक योजना घेऊन वजीराला भेटण्यास आला व या भेटीच्या वेळी त्याने त्याच्या तंबूचे अंतर पावणारी मोजून ठरविले." [ आनंद, इयाद-उस्-सादत, ३८ ].

आपली जखम प्राणघातक आहे हे वजीराच्या लक्षात आले. तेव्हा त्याने आपला मुलगा, मुइन-उल्-मुल्क याला खंदकामधून बोलावून घेतले व सांगितले, ..... "...माझ्या मुला ! माझे आता सर्व संपले आहे पण बादशहाचे कार्य अद्याप पुरे झालेले नाही. माझ्या-बद्दलची ही बातमी बाहेर पसरण्याच्या आत, तू स्वार होऊन बाहेर पड आणि शत्रूवर हल्ला चढीव. हे काम केल्यानंतरच पाहिजे तर माझ्याबद्दल विचार कर." हे त्याचे अखेरचे शब्द होते. मुइनही प्रसंगाला साजेल असे वागण्याइतका थोर ठरला. पुत्राला स्वाभाविक असणारे, आपले अश्रू, त्याने दाबून टाकले. आपल्या बापाचा मृत देह, रक्ताने माखलेल्या त्याच्याच कपड्यात गुंडाळून, झोपण्याच्या त्या तंबूतील जमिनीतच पुरला आणि या अपघाताच्या सर्व खुणा नाहीशा करण्यासाठी वर वाळू सारखी केली. नंतर आपल्या पित्याच्या हत्तीवर स्वार होऊन तो रणांगणावर सैन्याकडे आला आणि वजीर सर्दीने आजारी असून त्याच्याऐवजी सैन्याचे नेतृत्व करण्यास त्याने मला पाठविले आहे, असे त्याने जाहीर केले.

पण इतक्या महत्त्वाची घटना संपूर्णपणे दडवून ठेवणे शक्य झाले नाही. वजीराच्या सैन्य विभागातील सेनाधिकाऱ्याना त्याने ही बातमी गुप्तपणे सांगितली आणि त्याना कळकळीची विनंती करून तो म्हणाला :—"हल्ला करण्याला माझ्याबरोबर पुढे चला वा लढाईपासून मागेच थांबा. यापैकी तुम्हाला पसंत पडेल ते करा पण लढाई चालू असताना पळ काढून आपल्या बाजूचा नाश करू नका. मी मात्र मला मृत्यू येईतो, लढतच राहीन."
( बयान, २३३.).

## § १५ : मानपूरची लढाई

बादशाही सैन्यात यावेळी सुमारे ६०००० लढवय्ये सैनिक असून त्यांची रचना पाच प्रमुख विभागात केली होती. हे विभाग असे :—**आघाडीचा** ( Vangaurd )विभाग—यात वजीराचे तुर्की पथक असून त्याचे नेतृत्व आता त्याचा मुलगा मुइन करीत होता. सैन्याच्या **उजव्या बगलेला** सफदरजंगाच्या नेतृत्वाखालील विभाग होता. त्यात नादीरच्या सैन्यातून घेतलेले निवडक इराणी सैनिक आणि शिवाय पुर्बिया ( Purbia Class) जमातीतील हिंदुस्थानी सैनिक होते. **मधला विभाग** शहाजादा अहमद आणि त्याचे पालक ( Guardians ) यांच्या हाताखाली होता. **डावी फळी**-बगल-राजपूत घोड-दळाच्या मोठ्या गटाची बनविलेली असून तिचे नेतृत्व जयपूरच्या ईश्वरसिंह व अन्य राजे

यांच्याकडे होते. सैन्याची पिछाडी सांभाळणारा विभाग नासिरखानाच्या हाताखाली होता. सबंध सैन्याच्या सामानसुमानाची छावणी मध्य विभागाच्या मागल्या बाजूस ठेवलेली होती. प्रत्यक्ष लढाईच्या वेळी आघाडीचा विभाग, दोन्ही बगलांच्या बरोबरीने, खांद्यास खांदा लावून, एकाच रांगेत होता.

याउलट अब्दालीचे सैन्य,[1] जास्तीत जास्त अचूक अंदाजानुसार, १२००० पेक्षा अधिक नव्हते आणि शाही फौजा संख्येच्या दृष्टीने त्याच्या पाचपट वरचढ असून शिवाय तोफखान्याबाबत तर अतिशयच बलाढ्य होत्या. हिंदुस्थानी सैन्याच्या रांगा, सामान्यतः नसाव्यात, इतक्या, लांबपर्यंत पसरून उभ्या केल्या होत्या. त्यांच्या सैन्याच्या मधल्या फळीच्या समोर भारी तोफांच्या रांगा करून तिला फारच मजबूत संरक्षण दिले होते. संस्थेच्या दृष्टीने आणि तोफखान्याच्या मारक शक्तीच्या दृष्टीने आपल्या सैन्यात असणाऱ्या कमतरतेची जाणीव अब्दालीला होतीच. तेव्हा त्याने, आपल्या सैनिकांची अधिक जलद हालचाली करण्याची क्षमता, व अधिक काम करण्याची ताकद, या गुणांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचा निश्चय केला. यासाठी, विभागाविरुद्ध विभाग अशी रूढ पद्धतीची लढाई द्यावयाच्या ऐवजी एक वेगळीच योजना त्याने आखली. त्यानुसार, शाही सैन्याच्या मध्य विभागाला फक्त अडवून धरावयाचे, त्या सैन्याच्या आघाडीच्या फळीवर आणि दोन्ही बगलावर आपले मुख्य हल्ले करावयाचे व त्यांत खिंडार पाडून घुसून जाऊन, शत्रूला पिछाडीचे बाजूने धोक्यात आणावयाचे, अशा डावपेचांची आखणी होती. याशिवाय आपल्या सैन्याचा एक खास विभाग वेगळा काढून, एकूण लढाईच्या गोंधळात, मिळेल त्या मार्गाने, शाही सामानसुमानाच्या विभागावर झडप घालावयाची, अशी कामगिरी त्याला दिली.

प्रत्यक्ष लढाई दुपारच्या वेळी सुरू झाली. हल्ल्याला सुरवात अफगाणांनी केली. त्यांच्या हल्ल्याचा मोठा तडाखा प्रथम, शाही आघाडी सांभाळणाऱ्या तुकड्यांवर बसला. अब्दालीचा मुख्य सेनापती महमद ताकीखान ( Taqi ) शिराझी याने ३०००

१ मानपूरची लढाई : यासंबंधीच्या उत्कृष्ट माहितीसाठी पहा : आनंदराम ३४७–३७७, त-इ-अ. ६ ब-९अ, आणि मुजमिल १०४–११२ (मुजमिलमध्ये शियापंथी–याबाबत पक्षपातीपणा आहे. या दृष्टीने, माहितीमध्ये काही अधिक उणे असणार त्याचा विचार करणे अवश्य आहे.) . . . बयान २३३–२३५ आणि सियार (३) १९. हे सर्व संदर्भ संक्षिप्त असले तरी उपयुक्त आहेत. हुसेनशाही २७–२९ हा संदर्भ बराच नंतरचा, त्रोटक व अपुरा असून शिवाय अन्य संदर्भावरून घेतलेला आहे. आनंदराम व त-इ-अ.– या दोन संदर्भामध्ये प्रत्यक्ष लढाईनंतरच्या घटनाबाबत खूपच फरक आहे पण या सर्वच संदर्भात त-इ-अ.–सर्वात अधिक विश्वसनीय प्रमाण आहे. इमाद-उस-साऽदत, लखनौ-गप्पा Lucknow Gossip हाही आणखी एक संदर्भ आहे. मानपूर येथील दोन्ही फौजांबाबत सर्वात जास्त बरोबर असलेल्या अंदाजानुसार अब्दालीच्या सैन्यात १२००० पेक्षा जास्त सैनिक नव्हते. शाही फौज साठ ते सत्तर हजाराच्या दरम्यान होती (त-इ-अ-५ ब). सियार (३) १९ मधील यासंबंधीचा अंदाज कमी असून त्यानुसार "अब्दालीचे सैन्य ६ वा ७ हजारापेक्षा जास्त नव्हते." याउलट आनंदराम अतिशयोक्ती करून हीच संख्या ३०,००० होती असे म्हणतो. याचबरोबर एका लोकवार्तेनुसार दिल्लीच्या सैन्याचा अंदाज '२ लाखापेक्षाही अधिक सैनिक आणि २०० तोफा' इतका फुगविलेला होता. [मुजमिल १००], इतकेच नव्हे तर तो अडीच लाख इतकाही फुगविलेला होता. [हुसेनशाही २४]. अब्दाली लाहोरवर चाल करून येताना, त्याच्या बरोबरचे सैन्य ६ ते ७ हजार होते असे आशब (२) ४५४ मध्ये नमूद आहे, (हा अंदाज 'कमी' आहे.) . . . हाच अंदाज 'हुसेनशाही' नुसार १२००० असा आहे, (हाच सर्वाधिक संभवनीय दिसतो) आणि आनंदराम ३१२ नुसार हे सैन्य २५००० होते, (हा आकडा फुगविलेला आहे). . . . . त-इ-अ-७ ब मध्ये आणखी एक नजरचूक त्यातीलच दुसऱ्या एका म्हणण्यास विरोधी अशी झाली आहे. यानुसार सफदरजंग डाव्या बगलेचा व ईश्वरसिंग उजव्या बगलेवरचा मुख्य होता असे असून हीच ती नजरचूक होय (प्रत्यक्षात याउलट होते.).

किझिलबाश (पर्शियात स्थायिक झालेले तुर्क) सैन्यानिशी शाही आघाडीवर हल्ला चढविला. या पथकानी, त्यांच्या नेहमीच्या पद्धतिप्रमाणे, एकामागून एक असे अनेक हल्ले करण्याचे तंत्र अंगिकारले. यानुसार ते प्रथम शत्रूच्या फळीपर्यंत दौडत जात ; तेथे पोहोचल्यावर झटदिशी आपल्या बंदुकांच्या फैरी झाडत ; शाही पथके पुढे येऊ लागली की, पहिल्याच वेगाने परत मागे दौडत येत, आणि पुन्हा ताजेतवाने झाल्यावर आणखी मदत घेऊन, तसाच हल्ला पुन्हा करण्यासाठी, पुन्हा पुढे दौडत जात. असे एकामागून एक हल्ले करावयाचे असे ते डावपेच होते. या विभागातील अशी ही लढाई अतिशय निकराने चालली. वजीराचा मुलगा मुइन व त्याचे जोडीदार यानीही जिवावर उदार होऊन शौर्याने लढा दिला आणि यामुळे अफगाण पथकात मोठी कत्तल झाली. शाही सैन्याच्या केवळ मोठ्या संख्येमुळे आलेल्या दडपणाने त्याना थोपविले आणि मुघल खंदकामधील भारी तोफांच्या माऱ्यामुळे त्यांच्या सैन्याची मोठी नासाडी झाली. पण अब्दालीनेही हा लढा चालू ठेवण्यासाठी एकामागून एक अशी वारंवार मदत पथकेही पाठविली. दुसरीकडे, मुइनलाही या लढ्यात आपले पुष्कळच लोक गमवावे लागले तथापि तोही आपल्या जाग्यावर पाय रोवून राहिला.

या लढाईत, अगदी आरंभीच डाव्या बगलेवर, राजपुतांमध्ये मात्र अफगाणांना अधिक सोपी शिकार सापडली. ३००० घोडेस्वार व त्यांच्याबरोबर, ऊंटावर लादलेल्या, फिरकीच्या बंदुका ( Swivels ) वापरणारे २०० सांडणीस्वार असा एक अब्दालीचा सैन्य विभाग या बगलेच्या बाजूला असून या विभागाची दोन पथकात रचना केलेली होती. प्रथम यातील एक पथक, राजपूत त्यांच्या माऱ्यात सहज येतील इतकी पुढे, दौड करून जाई व आपल्या फैरी झाडे आणि झटदिशी फिरून, वाऱ्यासारखी दौड करीत मागे येई. नंतर दुसरे पथक असेच करी व पुन्हा पहिले हल्ला करी ; असे डावपेच या पथकानी चालविले. दुसऱ्या बाजूला राजपूत, मिशाना पिळ देत, हातघाईची, नंग्या तरवारींच्या खणाखणीची निर्णायक लढाई सुरू होण्याची वाट पहात थांबले. अशी लढाई सुरू झाली म्हणजे आपले तरवार चालविण्याचे कौशल्य व बेफिकीर धैर्य, यांच्या बळावर आपण निश्चित जय मिळवू असा त्यांना आत्मविश्वास होता. पण अफगाण, अशा लढाईला येऊन भिडलेच नाहीत ; आणि इकडे त्यांच्या प्रत्येक हल्ल्यातील बंदुकांच्या फैरीच्या वेळी, राजपुताना, आपल्या स्वारांपैकी शकडो मरून घोड्यावरून कोसळत असलेले पहात, आणि शत्रूला तर स्पर्शही करता येत नाही अशा स्थितीत उभे रहावे लागले, दोन शतकापूर्वीचे व आता प्रचारात नसलेले लढण्याचे जुनाट डावपेचच राजपूत शिकलेले असल्याने अफगाणांचे हे अपरिचित डावपेच पाहून राजपुतांचे मनोधैर्य खचले. ही संधी साधून, गोंधळलेल्या आणि 'काय करावे' या अनिश्चिततेत हेलकावे खाणाऱ्या राजपुतांच्या त्या जमावात अफगाण घुसले आणि त्यानी "काकडीच्या ( Cucumber ) फाकी कापाव्यात" अशी त्यांची कापाकाप केली. राजपुतांचा पुढारी ईश्वरीसिंह याने आधीच वजीराच्या मृत्यूची वार्ता एकली होती आणि यातच त्याच्या प्रमुख सल्लागाराकडूनही–एका न्हाव्याकडूनही–त्याला निराशाजनक सल्ला मिळाला होता. तो न्हावी म्हणाला : "वजीर मरण पावला असताना, अब्दालीच्या विरुद्ध तुम्ही काय करू शकणार ?" तेव्हा, आपल्या सैन्यात झालेला अनर्थ पाहून व या परिस्थितीत लढाईमध्ये पुन्हा समतोल व चरस निर्माण करण्याला काहीही संधी नाही हे पाहून, राजा ईश्वरीसिंगाने, आपल्या ताब्यात असलेल्या खंदकांचा विभाग मोकळाच सोडून, युद्धभूमिवरून ताबडतोब पळ काढला. इतक्या घाईने त्याने पळ काढला की जाताना नगारे, दुंदुभी, पडघम, ढोलकी अशी आपली रणवाद्य व हलक्या तोफा (रहकला) ही, अनेक

विहिरीतून त्याने फेकून दिल्या आणि आपल्या सैन्यातल्याच गुंडानीही लुटावे अशा प्रकारे, आपले सामानसुमानसुद्धा मागे सोडून टाकले. तेव्हा नेत्याविना राहिलेले त्याचे अनुयायी सैरावैरा पळू लागले व अखेरी त्यानी, शहाजादा व मुईन यांच्या खंदकात आश्रयासाठी गर्दी केली.

अशा रीतीने मोकळ्या झालेल्या मार्गाने अफगाण सैन्याच्या एका तुकडीने शाही सैन्याच्या सामानसुमानाच्या भागात शिरकाव करून ते लुटले आणि पळणाऱ्या राजपुतांच्या पाठोपाठ ते, मुईनच्या खंदकाच्या पिछाडीकडे वळले इतकेच नव्हे तर शहाजादा असलेल्या शाहीसैन्याच्या मध्यभागालाही, त्यानी धोका निर्माण केला. तेव्हा घाबरलेल्या शहाजाद्याने सफदरजंगाकडे मदतीसाठी विनवणी केली. आता तर हिंदुस्थानी सैन्यातील नेते व सामान्य सैनिक दोघातही घबराट निर्माण होऊन, त्यानी, आपल्या जागा सोडून पिछाडीला जाण्यास सुरवात केली.

पण अफगाणांच्या मध्यविभागावर मुईनने प्रतिहल्ला चढविला आणि त्यांच्याशी भिडून हातघाईची लढाई दिली. यात दोन्ही बाजूला भयंकर संहार झाला. मुईनच्या कातडीला एक गोळी चाटून गेली, त्याचा भाऊ फक्र-उद्-दिन (Fakhr-ud-Din) याच्या पायाला गोळी लागली तर शूर, अदिना बेग, या नावाच्या अधिकाऱ्याला दोनदा जखम झाली. आणि याच सेनाविभागातील जातिशखान व इतर काही तुराणी सरदार मारले गेले. एकूण युद्धातील ही आणीबाणीची वेळ होती. अशा वेळी सफदरजंगाने दाखविलेले शौर्य व धडाडी आणि एक अनपेक्षित सुखदायक घटना यामुळे लवकरच हिंदुस्थानच्या सैन्याच्या बाजूने लढाईचा रंग पालटला.

अफगाणांच्या सैन्यविभागापैकी एक, सफदरजंगाच्या विभागासमोर (म्हणजे शाही सैन्याच्या उजव्या बगलेसमोर) ठेवला असून त्यात अब्दालीचे, कड्यामधून फिरविता येणाऱ्या बंदुकांनी ( Swivels ) सुसज्ज सांडणीस्वारही होते. यापैकी ७०० सांडणीस्वाराना, सफदरजंगाच्या भागावर लक्ष ठेवता येण्यासारख्या, पुढच्याच एका उंच टेकडीवर, अहमदशहाच्या हुकुमावरून नेण्यात आले. तेथे सर्व उंटाना खाली बसावयाला लावून त्या सर्वांचे गुडघे एकमेकास बांधण्यात आले आणि नंतर त्यांच्यावरील बंदुका हिंदुस्थानी सैन्याच्या दिशेने रोखण्यात आल्या. या संकटाला तोंड देण्यासाठी सफदरजंगाने आपल्या १७०० बंदुकधारी स्वारांना घोड्यावरून खाली उतरविले आणि त्यांना, पायी टेकडी चढून हल्ला करण्यास पाठविले. या स्वारांच्या जवळ असलेल्या लांबट बंदुका– (Jizails जिझाइल) तून, त्या सर्वांनी एकाच वेळी मारा करून, अफगाण बंदुकधारी सांडणीस्वारापैकी बऱ्याच जणाना ठार केले; जिवंत राहिलेल्याना पळवून लावले आणि त्यांच्या सर्व बंदुका ( Swivels ) आणि उंट ताब्यात घेतले. अशा रीतीने टेकडीचा माथा सफदरच्या सैनिकांच्या ताब्यात आला. तेव्हा अब्दालीच्या लोकांनी प्रतिहल्ला चढविला. ते टेकडीच्या चढणीवरून पळत वर येत असताना, माथ्यावरील सफदरच्या सैनिकांनी, मारा करून त्यांची कत्तल केली. आणि टेकडी परत मिळविण्यासाठी केलेला हा प्रतिहल्ला अयशस्वी ठरविला. अशा प्रकारे शाही सैन्याच्या उजव्या फळीशी लढणाऱ्या अफगाण विभागाचा निर्णायक पराभव होऊन सफदरजंगाला उसंत मिळाली व त्याने आपल्या विभागातील काही लोक बाजूला काढून त्याना, मध्यविभागाकडे शहाजाद्याच्या मदतीस पाठविले. शिवाय आघाडीवर लढत असलेल्या मुइनवर होत असलेला अफगाण हल्ला आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठी, त्याने आपल्या बाकीच्या सर्व सैन्यानिशी युद्धक्षेत्रात धडाडीने पुढे चाल केली. यावेळी सबंध सैन्याची फळी व्यवस्थित एका रांगेत रोखून ही चढाई होत असून या फळीच्या मागे क्षेपणास्ते-सज्ज

( Rockets ) लढाऊ पथक व लांबट बंदुका ( Jizails ) वापरणारे, बंदुकधारी पथक अशा सैनिकी तुकड्या आणि त्याचा हलका तोफखाना (Rahakala) अशी रचनाही होती.

दरम्यान, अब्दालीने, जिंकून ताब्यात घेतलेल्या अग्निबाणानी (रॉकेटस्) भरलेल्या गाड्यांना, लुटालूट करणाऱ्या लोकांच्या बेपर्वाईमुळे, आग लागली आणि एकाएकी हजारो अग्निबाण हवेत उडाले. त्यातून उडालेल्या ठिणग्यामुळे युद्धभूमिवरील, अफगाण तोफखान्याच्या दारूगोळ्यानेही पेट घेतला आणि या सर्व अग्निप्रलयात अब्दालीचे हजारभर सैनिक भाजून मरण पावले. या अपघातामुळे अफगाण सैन्यात अतिशय अव्यवस्था निर्माण झाली. याच सुमाराला आघाडीच्या विभागातील लढ्यात मुइनला मदत करण्यास सफ्दरजंग शिरत होता आणि याच वेळी मुइननेही याच्यावर झालेला अब्दालीचा हल्ला रोखला होता. अग्निबाणांचा अपघात आणि त्याचबरोबर मुइन-सफ्दरजंग यांच्या प्रतिकारास येत असलेले यश, यामुळे त्या दिवसापुरता एकूण लढाईचा निर्णय लागला. यापुढे अफगाण सैनिकानी आणखी प्रतिकार केला नाही. त्यांची फळी विस्कटली आणि त्यानी पळ काढला.

## § १६ : अफगाण सैन्याचा पराभव आणि माघार

तथापि अब्दालीसारखा कसलेला सेनापती इतक्या सहजासहजी संपूर्ण पराभव स्वीकारणे शक्य नव्हते. या दिवशी झालेल्या अशा पराभवाला त्याने धैर्याने तोंड दिले. युद्धभूमीच्या थोड्या मागे असलेल्या एका लहानशा मातीच्या किल्ल्यात मागे येऊन त्याच्या आश्रयाने त्याने कडवा प्रतिकार चालविला. तेथे आपले पाय रोखून बंदुकांच्या वर्षावाने मुघलांची पुढे होणारी प्रगती थोपवून धरली. किल्ल्यावर मारा करता येईल इतक्या पुढे, शत्रू आपल्या तोफा आणीतोपर्यंत रात्र झाली आणि नंतर अंधाराचा फायदा घेऊन अफगाणानी पळ काढला. हा विजय मिळेल असे मुघलाना मुळीच वाटले नव्हते. अशा विजयाच्या पाठोपाठ काही पूरक हालचाली, पाठलाग इत्यादी ताबडतोब करणे अवश्य होते पण त्या करण्याचे धैर्यही त्यांना झाले नाही. सबंध रात्रभर आपल्याच खंदकात, काळजीपूर्वक पहारा करीत थांबणे हेच अधिक शहाणपणाचे असे त्याना वाटले आणि त्यांच्यापैकी प्रत्येक सैनिक, शस्त्रसज्ज स्थितीतच, युद्धाच्या वेळी नेमून दिलेल्या आपल्या जागीच झोपला. सेनाधिकारी आपापल्या घोड्यावर स्वार होऊनच तयार राहिले, पहारेकरी नियमितपणे गस्त घालीत राहिले आणि सावधगिरीचा उपाय म्हणून अधूनमधून बंदुकाही झाडण्याचे चालूच राहिले. असे सर्व, दुसऱ्या दिवशी सकाळी उजाडपर्यंत चालले.

त्या रात्री, ज्यांच्यापैंकी अनेक जखमी झालेले आहेत अशा, बरोबर राहिलेल्या फक्त २ ते ३ हजार अनुयायांसहित, अहमद अब्दालीने युद्धक्षेत्रातून माघार घेतली. शाहीपक्ष मात्र शत्रूच्या प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल वा त्याच्या निश्चित ठिकाणाबाबत पूर्णपणे अंधारातच राहिला. यामुळे दुसऱ्या दिवशीही, पाठलाग करण्यास त्यांना निघता आले नाही, इतकेच नव्हे तर या विजयानंतर चार दिवसपर्यंतही, ते निघू शकले नाहीत. अफगाणांचा मुख्य सेनापती मारला गेला असून त्यांचा राजा-शहा-अब्दाली हाही मरण पावला आहे, निदान तो जखमी झालेला तरी आहे अशा वार्ता मुघल छावणीत पसरल्या. तथापि टेहळणी करण्यासाठी, एकट्याने बाहेर जाण्याचे धैर्य एकाही हिंदुस्थानी सैनिकाला झाले नाही. अशा वेळी अब्दालीनेही, शहाजादा व सफ्दरजंग यांच्याकडे तहाच्या अटींबाबत विचारणा करण्यासाठी प्रतिनिधी पाठवून

त्याना काही दिवस झुलवीत ठेवले आणि, अशा रीतीने मिळालेल्या सवडीचा उपयोग, आपले विस्कळीत झालेले सैन्य एकत्र करण्यासाठी व एका दुर्लक्षित रस्त्याने आपल्या छावणीचे सामानसुमान व खजिना लाहोरला पाठविण्यासाठी केला. अखेरी एका रात्री त्याने, कुणालाही चाहूल लागणार नाही अशा तऱ्हेने लाहोरकडे माघार घेण्यास सुरवात केली. दुसऱ्या बाजूला, शाही पक्षाने, १६ मार्चला, म्हणजे मानपूर लढाईनंतर पाच दिवस झाल्यानंतरच, आपले सर्व सैन्य व युद्धाचा संपूर्ण जामानिमा या निशी, अफगाण छावणीकडे कूच करण्यासाठी बाहेर पडण्याचे धैर्य केले. पण, आता ती छावणी सोडून दिलेली असल्याचेच त्याना आढळून आले तेव्हा त्यानी अफगाणांच्या पाठलागास सुरवात केली. पण सरहिंदपासून सतलज नदीपर्यंतचा सर्व भाग जंगलाने व्यापलेला असल्यामुळे पाठलाग तर मंदगतीनेच चालला, शिवाय तो निरर्थकच ठरत होता. टेहळ्यानाही शत्रूबद्दल, सत्वर आणि अचूक माहिती मिळविता येत नव्हती. १८ तारखेला मुघलानी सरहिंद परत मिळविले. त्यापूर्वीच एक दिवस, लुधियानाजवळ नदी ओलांडून अहमद अब्दाली पुढे लाहोरला गेला होता. तेथे पोहोचण्याचे सुमाराला त्याला बातमी मिळाली की, हिंदुस्थानात येताना त्याने मागे कंदाहारला डेप्युटी म्हणून ठेवलेल्या, लकमन (Laqman) खान नावाच्या त्याच्या, पुतण्याने आता बंड केले आहे. या बातमीमुळे, लाहोरला आल्याबरोबर, प्रथम त्याने आपल्या जवळची लूट लाहोरमधून हलवून बाहेर पाठविली आणि पाठोपाठ, पेशावर मार्गे, कंदाहारकडे जाण्यास तो निघाला. [आनंद. ३७०–३७७; त-इ-अ–८अ-९ब; मुजमिल ११२].

मुघल, अफगाणांचा पाठलाग करीत असताना त्यांची, शत्रूबरोबर अखेरची चकमक, १७ मार्चला झाली आणि नंतर दोन दिवसानी शहाजाद्याने आपले कूच पुन्हा सुरू केले व २१ मार्चला तो लुधियानाजवळ सतलजच्या काठावर पोहोचला. आतापर्यंतच्या लढ्यामुळे व जंगलातून कराव्या लागलेल्या चालीमुळे थकलेल्या सैन्याला पुन्हा ताजेतवाने होता यावे म्हणून या ठिकाणी काही दिवसासाठी त्याने मुक्काम केला. आता वजिराच्या मृत्यूनंतर सर्व मसलती व कामामध्ये सफदरजंगच प्रमुख बनला होता. तो या ठिकाणी आजारी पडला आणि १०–१२ दिवस बिछान्यात पडून राहिला. यामुळे सतलज काठावरील हा छोटासा होणारा मुक्काम आणखी काही आठवड्यांनी वाढविण्यात आला. पुढे शहाजाद्याला घाईने दरबारी परत येण्याबद्दल बादशहाकडून पत्रे आल्यामुळे या मोहिमेतील, पुढील सर्व हालचाली ९ एप्रिलला बंद करण्यात आल्या. याच पत्राबरोबर मुइन-उल्-मुल्क याला लाहोरचा आणि नासिरखानाला काबूलचा गव्हर्नर नेमल्याचेही हुकूम होते. तेव्हा आता या उभयताना आपापल्या अधिकाराच्या जागी जाण्यास निरोप देऊन १२ एप्रिलला शहाजाद्याने आपला मोर्चा दिल्ली-कडे वळविला. [त-इ-अ-९ब-१० ब ].

---

प्रकरण सहावे

# माळवा व राजपुताना–१७४१ पर्यंत

## § १ : साम्राज्य सत्तेच्या पडत्या काळातील राजपुतांची परिस्थिती

मेवाडचा राणा राजसिंह याच्या १६८० मध्ये झालेल्या मृत्यूबरोबर, सिसोदिया.[१] घराण्यातील अखेरच्या वीरपुरुषाचा अंत झाला. मुघल हिंदुस्थानात आले त्या वेळेपासूनच हिंदुराज्यकर्त्यांमध्ये महाराण्याचे स्थान, लोकांच्या दृष्टीने सर्वोच्च असे नेहमीच मानले जाई. परंतु राजसिंहाच्या मृत्यूनंतर त्या स्थानाची महती कमी होऊन ते बाजूला एकाकी पडले. तथापि त्यांची समाजातील.[१] हुकमी मानमान्यता व स्थान आणि त्यांच्या कुळाबद्दल असलेले गूढतेचे तेजोवलय, हे मात्र कायम राहून, याबाबत त्याना कोणीही प्रतिस्पर्धी निर्माण होऊ शकला नाही. पण राजकीय क्षेत्रातील त्यांचे अग्रस्थान जाऊन त्यासाठी, १८ व्या शतकाच्या प्रारंभापासून अंबरचे कच्छवाह[२] घराणे आणि मारवाडच्या राणांचे[३] राठोड घराणे यांच्यामध्ये झगडा सुरू झाला. एके काळी अंबरचे घराणे अगदी सामान्य (Third rate) व दुर्लक्षणीय असे मानले जाई, पण गेल्या दीडशे वर्षांच्या काळात, या घराण्यातील चार पिढयानी साम्राज्याच्या सेवेत, युद्ध क्षेत्रातील नेतृत्व व मुत्सद्दगिरी, या दोन्हीही क्षेत्रात व साम्राज्याच्या दूरदूरच्या भागात, अतिशय मोठी, बहुमोल व नेत्रदीपक कर्तबगारी दाखविली होती.————भगवानदास व मानसिंह यानी अकबराच्या कारकीर्दीत, मिर्झा राजा जयसिंह (मा. मिर्झा म्हणजे राजपुत्र–ही एक मानाची पदवी मानली जाई) याने शहाजहान व औरंगजेब यांच्या कारकीर्दीत आणि सवाई जयसिंह याने, या नंतरच्या मुघल बादशहांच्या काळात, ही कर्तबगारी दाखविली होती. जयपूर-कच्छवांच्या कर्तबगारीच्या या काळातील

---

१ प्रस्तुत प्रकरणात काही राजपूत घराण्यांची हकीगत व संदर्भ वारंवार येतो. त्यांच्या नामोल्लेखातही बदल दिसतो. यासाठी त्यांची निरनिराळी नावे, स्थाने व स्थिती या संदर्भातील जरूर ती पार्श्वभूमी पुढे दिली आहे. ही माहिती मुख्यतः मुसलमानी रियासत, गो. स. सरदेसाई, भाग १, आवृत्ती तिसरी प्रक. १८ पृ. ३३८–३५९ व त्यातच ग्रंथाचे शेवटी दिलेल्या वंशावळी, यावरून संकलित केलेली आहे.

मेवाडचे सिसोदिया, हे यापैकी सर्वात प्रसिद्ध घराणे. मेवाड म्हणजे मध्यवाड-मध्यदेश. येथील राजे सिसोदिया आडनावाच्या राजपूत घराण्यातील होत. अयोध्येच्या सूर्यवंशी राजघराण्यातील श्रीरामचंद्रापासून आपल्या घराण्याची उत्पत्ती आहे असे ते मानतात. आठव्या शतकातील सुप्रसिद्ध बापू रावळ या घराण्यातीलच. त्याच्यावेळी या घराण्याला 'रावळ' घराणे म्हणत. पुढे घेलोट हे नाव स्वीकारण्यात आले. अखेरी १३ व्या शतकाच्या आरंभी ही दोन्ही नावे सोडून, 'राणा' व 'सिसोदे' ही नावे घेण्यात आली. त्या वेळेपासून चितोडचे (पुढे उदेपूरचे) हे घराणे याच नावानी प्रसिद्ध आहे. बाबराचा समकालीन राणा संग्राम याच्या कारकीर्दीत मेवाडचा भाग्योदय कळसास पोहोचला. स्वातंत्र्यासाठी अकबराशी आजन्म लढा देणारा सुप्रसिद्ध स्वातंत्र्यवीर राणा प्रताप याच घराण्यातील होय. लावण्यवती पद्मिनीच्या 'जोहाराची' कथा याच मानी घराण्यातील. आणि छत्रपती शिवाजीचे भोसले घराणे मूळचे याच घराण्यातून निर्माण झालेले होते. अशा या सूर्य कुलोत्पन्न मेवाडच्या घराण्याची राजचिन्हे सूर्यांकित होती. राजकीय क्षेत्रातील, या घराण्याच्या अग्रस्थानाबाबत अंबरचे कच्छवाह व मारवाडचे राठोड यानी पुढे १८ व्या शतकात तीव्र झगडा केला. सामाजिक अग्रस्थानाबाबत तर आजही भावना व स्पर्धा तीव्र आहेत. १८ व्या शतकातील ही हकीगत या प्रकरणात आहे.

[पुढील पानावर]

अखेरचा खंड चालू असताना, दुसरीकडे मारवाडच्या राठोड घराण्यात मात्र जसवंतसिंहाच्या मृत्यूनंतर अजितसिंहाची अज्ञान कारकीर्द व तीस वर्षे अंतर्गत युद्धे चालू होती. यामुळे राठोडांच्या* अग्रेसरत्वाचा आधीच ग्रहण लागले होते. अशा स्थितीत कच्छवांच्या कर्तबगारीने, मुघल दरबारातील राठोडांच्या वंशपरंपरागत जुन्या अग्रेसरत्वाचा शेवट केला. तरीही जयपूर व जोधपूर ( भा. कच्छवा व राठोड ) यांच्यामधील ही मत्सरापोटी जन्मलेली स्पर्धा पुढे ब्रिटिश अमदानीतही, राजपूत समाजावर आपला पगडा बसविणारा एक घटक म्हणून कायमच राहिली.

अग्रस्थान मिळविण्यासाठी चालू असलेल्या स्पर्धेमधून जी अशांतता व नुकसानी होत होती तीमध्ये, राजपुतांच्या राजकारणात, १८ व्या शतकाच्या मध्याला एका नव्याच प्रश्नाची भर पडल्यामुळे, अनेकपटीनी वाढ झाली, आणि अखेरी ही प्रक्रिया संपुष्टात आली ते या उमद्या जमातीचा संपूर्ण नाश व मानखंडना झाल्यावरच. यावेळेपूर्वी दिल्लीच्या साम्राज्य-सत्तेने, हिंदुस्तानातील सर्व मांडलिक राज्याना एकत्र राखून, त्यांचे संरक्षणही केले होते. पण आता बादशहा स्वतः आपल्या अंतःपुरातच अडकून राहिलेला एक पुतळा बनला होता. तसेच वजीरांचाही एकच उद्योग, एकच हव्यास म्हणजे नेहमी चैन वा आराम करणे इतकाच झाला असून यात बदल व्हावयाचा तो फक्त दरबारातील त्याच्या प्रतिस्पर्ध्याशी होणाऱ्या झगड्यापुरताच. या परिस्थितीत साम्राज्यातील सर्व घटकाना एकत्र गुंफून, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी जी एक अधिसत्ता होती तिचे आता विघटन झाले. मांडलिक राज्याना, एकमेकांच्या संदर्भातील आपापले हक्क उपभोगू देणारी वा त्याना आपापल्या कर्तव्यांचे

[ मागील पानावरून ]

२ अंबर वा जयपूरचे कच्छवाह : हे दुसरे प्रसिद्ध राजपूत घराणे. अंबर हे जयपूर जवळच एक शहर असून ती या घराण्याची प्राचीन राजधानी होय. या घराण्यातील, १८ व्या शतकातील एक प्रसिद्ध राजा जयसिंह दुसरा (१६९९–१७४३) याने जयपूर हे नवे, रेखीव व सुंदर शहर वसवून तेथे नवी राजधानी स्थापिली. जयपूरचे राजे, सूर्यवंशी 'कच्छवाह' आडनावाचे आहेत. श्रीरामचंद्राचा मुलगा कुश याचा 'कूर्म' अथवा 'कच्छ' नावाचा मुलगा होता. श्रीरामचंद्राच्या या नातवापासून, या घराण्याची उत्पत्ती आहे असे मानतात, म्हणून हे कच्छवाह. अकबराचे कारकीर्दीपासून या घराण्याची विशेष भरभराट झाली. भगवानदास, मानसिंह, मिर्झा राजा जयसिंह (शिव कालातील, औरंगजेबाचा एक प्रसिद्ध सेनापती), दुसरा जयसिंह, हे या घराण्यातील एका काळातले थोर, कर्तबगार पुरुष होत. १८ व्या शतकात या घराण्याने मेवाडशी केलेल्या झगड्यांची व मुघल साम्राज्यासाठी केलेल्या कामगिरीची हकीगत या प्रकरणात आहे.

३ मारवाडचे राठोड : राजपुतामधील हे तिसरे प्रमुख घराणे. हे राज्य 'मारवाड' किंवा 'जोधपूर' या नावाने प्रसिद्ध आहे. येथील राज्यकर्ते चंद्रवंशी राठोड जमातीचे राजपूत आहेत. पृथ्वीराजाचा समकालीन व प्रतिस्पर्धी, कनोजचा जयचंद राठोड, हा याच घराण्यातील. हुमायुनाच्या व पुढे अकबराच्या काळाच्या आरंभी, या घराण्याने मुघलास फार त्रास दिला, पण अखेरीस त्यांचे स्वामित्व मान्य करून उदयसिंहाने, जोधाबाई या आपल्या बहिणीचा अकबराशी विवाह लावून दिला. या वेळेपासून या घराण्याने मुघल साम्राज्याची थोर सेवा केली व ते पुढे आले. १८ व्या शतकातील राजपुतामधील झगड्यातील हे आणखी एक प्रमुख घराणे होते. कोटा, बुंदी, अजमीर, ग्वाल्हेर, अब्रू अशा ठिकाणी इतर अनेक लहान लहान राजपूत राजघराणी होती. त्यांचाही संदर्भ या प्रकरणात येतो.

* १९२३ ऑक्टोबरमध्ये, जयपूर सरकारच्या आमंत्रणावरून मी (भा. लेखक सर ज. सरकार) जयपूरला तेथील ऐतिहासिक कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्या संस्थानातील एका फार बुद्धिवान व पिढिजात सरदाराने मला पहिलाच प्रश्न विचारला तो असा : "तुम्ही हिंदुस्थानच्या इतिहासाचा पुष्कळच अभ्यास केला आहे, त्यावरून तुम्हाला कच्छत्रावंशीय राजपूत राठोडांच्यापेक्षा श्रेष्ठ वाटतात की या उलट वाटते ?" देशाच्या या विभागातील लोकांची अशीही भावनिक स्थिती विसाव्या शतकातही आहे.

पालन करावयास लावणारी अधिसत्ता आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळे उत्पन्न होणारे आपापसातील झगडे थांबवू शकणारी अधिसत्ता, आता उरली नव्हती. तसेच एकाच घराण्यातील राजपुत्रांचे, एकमेकांच्या संदर्भातील हक्क त्याना उपभोगता येण्यासाठी वा त्याना आपापली कर्तव्ये करण्यास लावण्यासाठी लागणारी अधिसत्ता, आणि अशा राजपुत्रामधील आपापसातले झगडे थांबविण्यास अवश्य असणारी अधिसत्ता आता उरली नव्हती. उत्पन्न झालेल्या या नव्या परिस्थितीत, आतापर्यंत दबून राहिलेल्या व्यक्तीगत सर्व महत्त्वाकांक्षा आणि राज्याराज्यातील स्पर्धा, कोणताही धाक वा दबाव न रहाता उफाळून वर आल्या. यातून सबंध राजपुताना म्हणजे, पिंजऱ्याचे कठडे पाडून टाकून, संरक्षकही काढून घेतले आहेत, असे एक प्राणिसंग्रहालयच बनला. सर्व राजपुतान्यात जिकडे तिकडे अतिशय भयानक पशुवृत्तीचे थैमान सुरू झाले. तथापि अद्यापही मानवी हृदयातून निष्ठा, स्त्रीदाक्षिण्य व वृत्तीतील दिलदारपणा ( Chivalry ) संपूर्णपणे नष्ट झाली नसून जिकडे तिकडे उफाळत असलेल्या भयानक पशुवृत्तीच्या परिस्थितीतही निष्ठा व दिलदार वृत्ती यांची व्यक्तीगत उदाहरणेही अधूनमधून दिसून येत होतीच.

जमिनीसाठी कोणताही गुन्हा करण्याची राजपुताची तयारी असे. बाप मुलाला ठार मारी व मुलगा बापाचा खून करी. अतिशय उच्च कुळातील स्त्रिया त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या, नात्यातील व्यक्तीवरही विषप्रयोग करीत. कोणीही, मग तो भगवान रामचंद्रांच्या अति उच्च कुलात जन्मलेला असला तरीही आपल्या घरातील अंतर्गत भांडणाचा निकाल लावण्यासाठी, भाडोत्री परकीय लुटारूला पैसे देऊन मदतीला घेण्याला मागे पुढे पहात नसे.

स्वभाव, परंपरा आणि प्रशिक्षण यांच्या दृष्टिकोनातून विचार करता 'युद्ध करणे' हा असा एकच व्यवसाय आहे की जो सर्वसामान्य राजपूत आणि राजपूत सरदार याना साजेलसा आहे आणि जमीन ही अशी एकच चीज आहे की जी त्याला सन्मानाचे व सुखाचे जीवन देऊ शकेल. जेव्हा मुघल साम्राज्याचा विस्तार कळसाला पोहोचला आणि नंतरचे बादशहा आणखी नवी युद्धे न करण्याइतके भित्रे बनले व साम्राज्याच्या रक्षणासाठीही सैन्य ठेवणे न परवडण्याइतके एषेआरामी बनले तेव्हा राजपूत पुरुषांचे नशीबी बेकारी, आळस व दुर्व्यसने हीच आली. स्वतःच्या देशाबाहेर मानसन्मानाने करता येईल व आर्थिक फायदाही मिळेल असा कोणताही व्यवसाय वा संधी त्याना मिळण्यासारखी राहिली नाही. स्वतःच्या नापीक वा काहीही संधी नसलेल्या लहानशा प्रदेशातच कोंडून रहावे लागल्याने, त्यानी आपल्या तरवारी आता एकमेकावरच चालविण्यास सुरवात केली. यामुळे आता प्रत्येक घराण्यात अंतर्गत यादवी युद्ध पेटले. असे एखादे युद्ध एकदा सुरू झाले की लवकरच शेजारची राज्येही या वा त्या प्रतिस्पर्ध्याच्या बाजूने त्याचे मित्र म्हणून गोवली जात. शेजाऱ्याची जमीन बळकावण्याची ही संधी पाहून, यातून होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचारही मनात न येता, प्रत्येक राज्यकर्त्याची प्रादेशिक भूक उफाळून, प्रज्वलित झाली. मराठे व पेंढारी यानी सर्व प्रदेश उध्वस्त केला. उबग आणणारी ही कथा ८० वर्षे चालू राहिली. भारतीय इफिजेनिया कृष्णाकुमारी हिच्या आहुतीची शोकांतिका[1] ही

१ बापाने पाठविलेला विषाचा पेला घेऊन आत्मार्पण करणारी कृष्णाकुमारी ही मेवाडचा राणा भीमसिंह याची, एक अप्रतीम लावण्यसंपन्न सद्गुणी कन्या. ती उपवर झाल्यावर तिला अनेक मागण्या येऊ लागल्या. जयपूरचा राजा जगतसिंह याच्याशी तिचा विवाह निश्चित झाला. जोधपूरचा राजा मानसिंह यानेही या वधूसाठी मागणी केली होती. त्याने कळविले की "कृष्णा मलाच द्यावी. दुसऱ्याशी विवाह केल्यास त्याचे प्रायश्चित्त भोगण्यास तयार व्हावे."

[ पुढील पानावर ]

या काळातील, राजपूत इतिहासाला काळिमा लावणाऱ्या ज्या अनेक दुःखद घटना घडल्या त्यातील एक होय. अशा अनेक दुःखद घटनांचा काळ म्हणजे, राजपूत इतिहासातील खरोखरच 'अंधार युग' होय. महमदशहाच्या अवनतीच्या काळापासून, ते पुढे, या राजपुतान्याने ब्रिटिशांची सार्वभौमसत्ता स्वीकारली व त्या सत्तेने शांतता प्रस्थापित केली, तोपर्यंतचा दीर्घकाळ, इतके हे अंधार युग होते. या काळात राजस्थानमध्ये, अव्यवस्था सार्वत्रिक लुटालूट, आर्थिक दुरवस्था व नाश आणि नैतिक अधःपात हीच नित्याची, दृढमूल स्थिती बनली होती. अशा रीतीने, दीर्घकाल हाल अपेष्टा सहन करीत असलेल्या या जमातीच्या जखमा भरून येण्यास अखेरी, ब्रिटिशानी निर्माण केलेली शांतता यावी लागली. ही शांतता निर्माण झाल्यावर मात्र, अंतस्थ व परकीय लढाया थांबल्या आणि पुढे राजस्थानचे मर्दानी पौरुष अफूच्या गुंगीत शांतपणे पडून राहिले. यामागील कारणही उघडच आहे.....

"unknown to them, when sexual pleasures cloy to fill the languid pause with finer joy"

....."विषयासक्तीचा अतिरेक झाला की, एक प्रकारची सुस्ती निर्माण होते व जीवनात खंड पडतो. अशावेळी विषयासक्तीपेक्षा अधिक चांगल्या मार्गांनी, अधिक चांगल्या आनंदाने, जीवनातील पोकळी कशी भरून काढावी, हे त्याना माहीत नव्हते."

औरंगजेबाचे धोरण आणि त्याच्या कृती यामुळे राज्यकर्त्यापासून राजपूत दुरावले जाऊन, साम्राज्याच्या नोकऱ्यातून हाकलले गेले. यामुळे त्यांच्यावर संस्कार करणाऱ्या, त्याना सुधारणाऱ्या दिल्ली शासनाच्या प्रभावामधूनही ते बाहेर फेकले गेले. या सर्व परिणामातून सुटले, या प्रक्रियेला अपवाद ठरले ते फक्त 'हाडा' व अशाच अन्य बारीक सारीक गटांचे, असे थोडेसे राजपूत लोक तेवढेच. याचा परिणाम दिल्ली साम्राज्याला नुकसानकारक झाला हे आपणा सर्वांना माहीत आहे, पण एवढेच नव्हे तर याहीपेक्षा, तो, स्वतः राजपुतांच्या दृष्टीने तर जास्तच हानिकारक झाला. यापूर्वीच्या तीन शतकांमध्ये, हिंदुस्थानच्या इतिहासात राजपुतानी महत्त्वाचे स्थान व्यापिले होते पण आता १८ व्या शतकात याच राजपुताना आपण एक, जीवनातून बाजूला फेकली गेलेली, थकलेली, निर्जीव जमात असल्याचे

[ मागील पानावरून ]

मानसिंहाने शिंद्यांची मदत घेतली. त्याचेही जयपूरच्या राजाबरोबर भांडण होतेच. याने उदेपूरवर सैन्य पाठविले. कित्येक महिने लढाया चालू राहिल्या व त्यातून मोठी हानी होत राहिली. होळकराचा हस्तक-पेंढाऱ्यांचा पुढारी —अमीरखान याने हस्तक्षेप करून, भांडणाचे मूळ 'कृष्णा' हिचा अंत करावा अशी निर्घृण, क्रूर सूचना केली. जगतसिंह व मानसिंह कोणीही आपली मागणी सोडण्यास तयार नव्हते. भीमसिंहाला एकीकडे जगतसिंहाची जन्मभर भीति तर दुसरीकडे मानसिंहाचा पक्षपाती अमीरखान याची भीति वाटे. या परिस्थितीत दुबळ्या भीमसिंहाने आपली व राज्याची सुटका करण्यासाठी कृष्णाकुमारीचा बळी घ्यावयाचे ठरविले, आणि तिच्याकडे विषाचे पेले पाठविण्यात आले. आई जवळच होती ती तर वेडीच झाली. कृष्णाने ते, गंभीरपणे, शांतपणे, धैर्याने घेतले आणि ती कोसळली... माझ्या मृत्यूने घराण्यावरचे, पिताजीवरचे, राज्यावरचे संकट टळो हीच तिची प्रार्थना... तिची श्रद्धा होती. (कथा संदर्भ—र. ल. उपासनी यांचे पुस्तक, 'मेवाडचे वीर' —के. भी. ढवळे प्रकाशन १९३९ आवृत्ती. घटनेबाबत गो. स. सरदेसाई मूस. रि. भा. १ पृ. ३४७ आवृत्ती १९२७ पहा). राजपुतान्यात झालेल्या, आपापसातील झगड्यामधून निर्माण झालेल्या अनेक क्रूर, भीषण घटनांपैकी ही एक. ही कथा १९ व्या शतकाच्या प्रारंभीची; म्हणजे राजपुतान्यातील आपापसांतील तीव्र झगडे शंभरावर वर्षे चालूच होते हे दुर्दैवी वास्तव होय. (पहा प्र. ६ §१ परि. ४... प्रस्तुत ग्रंथ).

जाणवू लागले आणि यापुढे ते हळूहळू, हिंदुस्थानच्या जीवनात, मागच्या बाजूला, एका कोपऱ्यात ढकलले जाऊ लागले. यातून हे लोक हिंदुस्थानमधील एका बाजूच्या कोपऱ्यात स्वतःभोवतीच गुरफटून राहिले व आळसात बुडून निष्क्रिय रहाणेच त्यांच्या नशिबी आले. यामुळे, प्रगतिपथावर असलेल्या, या देशातील अन्य जमाती, वर्षांवर्षाला या लोकांच्या पुढे पुढे जाऊ लागल्या.

राजपूत जमात म्हणून त्यांचा एक विशिष्ट स्वभावधर्म आणि काही विशिष्ट संवयी होत्या. यामुळे राजपूत लोक, यावेळपर्यंत पुढे आलेले नव्या प्रकारचे युद्धतंत्र व दीर्घकाळ चालणाऱ्या लष्करी मोहिमा यांच्या संदर्भात निरुपयोगी ठरले. हे नवे युद्धतंत्र व दीर्घकाळ चालणाऱ्या लष्करी मोहिमा, १८ व्या शतकाच्या मध्याला प्रचारात येऊ लागल्या. युरोपिअन पद्धतींच्या अनुकरणाने अधिक लांब पल्ल्याच्या व अधिक जलद मारा करणाऱ्या बंदुका व तोफा प्रचारात येऊ लागल्या होत्या. लष्करात निरनिराळ्या प्रकारच्या शाखा-उपशाखा निर्माण होऊन त्याची एकूण रचना, मोठ्या परिश्रमाने व कौशल्यपूर्वक करण्यात येऊ लागली व ती खूपच गुंतागुंतीची बनली. लष्करी तंत्र व रचना यामध्ये झालेल्या या बदलाशी मिळतेजुळते घेण्याची क्षमता राजपुतामध्ये नव्हती. राजपूत सैन्ये, ही, खूपच लहान लहान गटात विभागलेल्या व आपापसात मत्सरग्रस्त असलेल्या छोट्या छोट्या जमातींचा (Clans), एकत्र झालेला घोळकाच असत. राजपूत जमातीची एकूण जोपासनाच अशा जमावांच्या जमान्यातच झालेली होती. या उलट नवी युद्ध पद्धती अशा जमावांच्या जमान्याशी सुसंगत रहाण्यासारखी वा जमवून घेऊ शकेल अशी नव्हती. शिवाय आताची नवी युद्धे अतिशय खर्चाची बनली होती. जुन्या पद्धतीत लढाईचे सर्वच काम, थोडीफार शतीभाती करीत रहाणाऱ्या, छोट्या जमिनदारांना, भाडोत्री सैनिक म्हणून तात्पुरते एकत्र करून केले जाई. असे काही छोटे जमिनदार बऱ्याच वेळी, मोठ्याशी सरंजामी पद्धतीने बांधलेलेही असत आणि काही असे बांधिल नसूनही, एखाद्या लढाईच्या मोसमापुरते, पैसे पगार-घेऊन सैनिक म्हणून येत हे सैनिक घोडा व भाला घेऊन आपले खेडे सोडीत व आपल्या धन्याच्या सैन्यात दाखल होत. मोहिमांच्या लहानशा मोसमात लढाई संपवून, हे शेतकरी–सैनिक आपापल्या शेतावर परत जात. युद्धे चालविण्याच्या या पद्धतीचे दिवस आता खूपच मागे पडले होते. राजपूत राज्ये आर्थिकदृष्ट्या दरिद्री होती. त्यांचा प्रदेश नापीक असून तेथील लोकवस्ती विरळ व आपापला भाग न सोडणारी होती. त्यांच्यामध्ये व्यापारधंदा नव्हता. या सर्व परिस्थितीमुळे त्यांच्या राजांची साधनसामुग्री इतकी तुटपुंजी असे की, त्यांचे सर्व-साधारण रहाणीमान, टंचाई व साधपणा यांच्या, जुन्यापुराण्या व खालच्या पातळीवरच राही. याउलट १८ व्या शतकाच्या मध्यापासून उदयास आलेले नवे युद्धतंत्र अनुसरावयाचे म्हणजे सर्व सैनिकांना बंदुका देऊन सज्ज करावे लागे ; तोफांचा वापर खूपच वाढवावा लागे; प्रत्यक्ष युद्धभूमिवर व तत्पूर्वी सैनिकांच्या प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या दारूगोळ्याकरिता खूपच खर्च करावा लागे. स्वतःच्या प्रांताबाहेर कराव्या लागणाऱ्या दीर्घ मोहिमांच्या काळात सैन्याच्या पोटापाण्याची सोय करावी लागे. १८ व्या शतकातील युद्धाना लागणारा हा सर्व खर्च करण्याच्या दृष्टीने राजपूत राजांची आर्थिक कुवत फारच अपुरी होती. या परिस्थितीत बाहेरून आलेल्या परक्या शत्रुविरुद्ध टिकाव धरणे आता आपल्याला शक्य नाही हे राजस्थान-मधील राजाना समजून चुकले आणि त्यानी यापुढे आपली शक्ती वापरावयाची ती फक्त आपल्या घरगुती भांडणातच, येवढीच शक्यता उरली.

## § २ : महमद शहाच्या कारकीर्दीतील राजपुतान्यातील भांडणाची प्रमुख केंद्रे

अठराव्या शतकाच्या दुसऱ्या चतुर्थात, राजपुतान्यातील तीव्र लढयांची तीन प्रमुख केंद्रे म्हणजे बुंदी, जयपूर आणि मारवाड ही होत. हाडा जमातीच्या प्रदेशात या जमातीच्या राजघराण्यापैकी जुनी वडील शाखा व धाकटी शाखा यांच्यामध्ये, जमातीच्या नेतेपदाबद्दल यावेळी नुकतीच स्पर्धा निर्माण झाली होती. वडील शाखेची गादी बुंदी येथे असून, धाकटी पाती, याच प्रदेशातील 'कोटा' भागाचा उपभोग, तिला दिलेली जहागीर म्हणून घेत होती. जहांगीर बादशहाने १६२४ मध्ये, कोटयाचा जहागिरदार, शाही दरबाराकडून थेट, जहागीर मिळालेला मांडलिक आहे असे जाहीर करून त्याला, बुंदीच्या राजकर्त्याच्या अधिकारातून मुक्त केले होते. पुढे १७०७ मध्ये कोटयाच्या त्यावेळच्या अधिपतीने आपणच सबंध 'हाडा' जमातीचे प्रमुख असल्याचा हक्क सांगून एकाएकी भांडण निर्माण केले. या दोन शाखांमधील स्पर्धेला औरंगजेबाच्या मुलांनी व नंतर सय्यदबंधू व दिल्ली येथील काही अन्य उमराव यांनी, आपापले हेतू साधण्यासाठी उत्तेजनच दिले. नंतर १७२९ मध्ये, या संबंध जमातीच्या प्रतिष्ठेला दुसराच एक अधिक मोठा धोका निर्माण झाला आणि त्यातच हे भांडण अंतर्भूत झाले. बुंदीच्या राजाला, जयपूरचा मांडलिक बनविण्याच्या, एका महत्त्वाकांक्षी मोहिमेची सुरुवात १७२९ मध्ये सवाई जयसिंहाने केली, ती बुंदीचा कायदेशीर औरस राज्यकर्ता बुधसिंह याला काढून टाकून व त्याची गादी दलिलसिंहाला देऊन. (दलिलसिंह हा कारवार-Karwar—घराण्यातील जमिनदार होता. भा. पहा पुढे § ६). यापुढील १९ वर्षे राजपुतान्याच्या या भागाचा इतिहास म्हणजे, हिसकावून घेतलेली आपली गादी परत मिळविण्यासाठी बुधसिंह व त्याचा शूर व उमदापुत्र उम्मेदसिंह यानी केलेल्या विविध प्रयत्नांचाच इतिहास होय. उम्मेदसिंहाला अखेरी पूर्ण यश मिळाल्यावरच या प्रयत्नांचा शेवट झाला.

जयपूरमध्ये ईश्वरीसिंह (कारकीर्द १७४३–१७५०) आणि त्याचा धाकटा भाऊ माधोसिंह ( Madho Singh ) यांच्यामध्ये तीव्र झगडा झाला. वडील भावाचा हक्क बाजूला सारण्याबाबत माधोसिंहाचे म्हणणे[१] असे की आपली आई ही महाराणाची[२]– मुलगी

१ ईश्वरीसिंह व माधोसिंह यांच्यामधील लढयाची पार्श्वभूमि, यातून निर्माण झालेले घोर रणकंदन, परकीय हस्तक्षेप, यांची थोडक्यात पण स्पष्ट कल्पना, गो. स. सरदेसाई यांची—'मुसलमानी रियासत' भाग १ पृ. ३५१—३५२, आवृत्ती तिसरी १९२७, यातील पुढील उताऱ्यावरून येते. ते लिहितात.— (सवाई) .... 'जयसिंहाचा वडील मुलगा ईश्वरीसिंह गादीवर बसला. त्याबरोबर राजपुतान्यामध्ये— युद्ध सुरू झाले. उदेपूरचा राणा अमरसिंह याच्या वेळेस सर्व रजपूत राजांत असा एक ठराव झाला होता की "मेवाडच्या घराण्यातील राजकन्या ज्या राज्यांत दिली असेल, त्यात, त्या कन्येचा मुलगा लहान किंवा मोठा कसाही असला, तरी, तोच गादीचा वारस समजला जावा." कित्येक रजपुतानी मोगलांचे– घराण्यात मुली दिल्यामुळे ते जातिभ्रष्ट झाले असा समज झाला होता, तो दूर करण्याकरिता व सर्व रजपूत घराणी पुनः शुद्ध होण्याकरिता वरील ठराव करण्यात आला. मेवाडच्या राजकन्येचा मुलगा माधवसिंह हा दोन भावात लहान असताही, या ठरावाप्रमाणे, तो जयपूरच्या गादीस जास्त हक्कदार होता, म्हणून मेवाडचा राणा जगतसिंहाने, माधवसिंहाचा हक्क स्थापन करण्याकरिता जयपूरशी युद्ध सुरू केले. घोर रणकंदन झाले त्यात जगतसिंहाचा पराभव झाला. तेव्हा मल्हारराव होळकर यास, कित्येक परगणे देऊन जगतसिंहाने आपल्या मदतीस बोलाविले. ही खबर ऐकून ईश्वरसिंहाने विष घेऊन प्राण दिला.... पुढे माधवसिंहास जयपूरचे राज्य प्राप्त झाले....

२ या उताऱ्यावरून राजपुतामधील आपापसातील भांडणे व तिसऱ्याचा हस्तक्षेप यांची कल्पना येते.
—उताऱ्यामध्ये राजपूत, मुघल, माधोसिंह हे शब्द अनुक्रमे रजपूत, मोगल, माधवसिंह असे आहेत. ही सरदेसाईनी वापरलेली रूपे होत.

असून तिच्याशी विवाह करण्याच्या वेळी, तिला होणाऱ्या मुलाला गादीचा वारसा देण्याचे आपल्या बापाने वचन दिले होते. ईश्वरीसिंहाने भावाला मोठमोठ्या सवलती देऊन आपल्या हयातीत आपले स्थान टिकविले. पण तो निपुत्रिक वारला आणि मग त्याचे सिंहासन माधोसिंहाला मिळाले.

मारवाडमध्ये महाराजा अभयसिंहाचा वारस रामसिंह आणि त्याचा चुलता बख्तसिंह—नागोरचा जहागिरदार—हे गादीसाठी एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते. अभयसिंहाचा मृत्यू झाल्यावर लवकरच, १७४९ मध्ये, त्यांच्यामध्ये लढा सुरू झाला आणि १७५१ मध्ये बख्त-सिंहाला ही गादी मिळाली. ती त्याने आपल्या मृत्यूनंतर स्वतःच्या वंशजांच्या नावे ठेवली. तथापि गादीवरून काढून टाकण्यात आलेल्या रामसिंहाचा मृत्यू १७७३ मध्ये होईतोपर्यंत या प्रदेशाला शांतता लाभली नाही.

घराण्यांतर्गत चालू झालेल्या या तीन झगड्यांच्या वावटळीत, हक्कासाठी भांडत असणाऱ्या विरोधी पक्षापैकी प्रत्येकाच्या, प्रमुख व्यक्तीतील, कोणत्या ना कोणत्या व्यक्तीच्या बाजूने तरी, तिच्या शेजारचे ओढले गेले आणि कांही काळातच ही तीन्ही भांडणे एकमेकात मिसळून गेली. अशा रीतीने एकाच प्रकारच्या प्रक्रियेतून तयार झालेले स्पष्ट दोन विरोधी संघ, झगड्यासाठी एकमेकासमोर उभे ठाकले. यातील प्रत्येक पक्षाने, बहुधा दरवर्षी, त्यांच्या-तील तंटा सोडविण्यासाठी मराठ्यांना बोलाविले. अखेरी, आधी निर्दिष्ट केलेल्या, तिघा हक्क सांगणाऱ्याना आपापल्या पूर्वजांच्या गाद्या मिळाल्या हे खरे पण हे घडले ते त्यांच्याच राज्यांचा नाश होऊन, ती दुर्बल झाल्यावरच. या आपापसातील झगड्यांत सर्वच राजपुताना, दरिद्री व दुर्बल होऊन, त्यातील राज्याराज्यात वैरभावही शिल्लक राहिला व ही राज्ये तुटक तुटक राहिली. अशा या तुकडे पडलेल्या, निराधार राजपुतान्यावर मराठ्यांची अधि-सत्ता निर्माण झाली व ते, राजपूत राजकर्त्याकडून वार्षिक खंडण्या जबरदस्तीने व प्रसंगी प्रदेश उध्वस्त करूनही वसूल करू लागले. राजस्थानची अशी ही शोकान्तिका असून तिच्या सविस्तर चर्चेकडे आपण आता वळू.

## § ३ : प्रमुख राजपूत राज्यकर्त्यांचे चारित्र्य व स्वभाव

राजपुतांच्या या शोक पर्यवसायी नाट्यातील प्रमुख नटांच्या स्वभावांचा अभ्यास, घडलेल्या घटनांचा ओघ अधिक चांगल्या प्रकारे समजण्याला मदत करील. उत्साह व हिम्मत चिकाटी आणि धैर्य या दृष्टीने पाहिले तर या काळातील, दोन महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे बख्तसिह राठोड आणि उम्मेदसिंह हाडा या होत. पण महमदशहाच्या कारकीर्दीतील असामान्य राजपूत राज्यकर्ता म्हणजे सवाई जयसिंह—दुसरा—हाच होय. हा सर्वांना उत्तम रीतीने माहीत आहे तो खगोल शास्त्रवेत्ता व जयपूर शहर वसविणारा राजा म्हणून. असामान्य तीव्र व अष्टपैलू बुद्धि, राजकीय शहाणपण, संस्कृतीची आवड आणि सुधारणांबाबत तत्कालीन समाजापेक्षा कितीतरी पुरोगामी कल्पना यामुळेच त्याचे मोठेपण सिद्ध झाले होते. अठरा वर्षांचा युवक असताना १६९९ मध्ये त्याची कारकीर्द सुरू झाली त्याचवेळी त्याच्याबद्दल अतिशय मोठ्या अपेक्षा होत्या. महाराष्ट्राच्या डोंगराळ कडेकपारीनी भरलेल्या प्रदेशातील खडतर लढायात, शहाजादा बिदारबख्तच्या हाताखालील अधिकारी म्हणून, खुद्द औरंगजेबाच्या नजरेखालीच त्याने आपली कर्तबगारी व प्रतिष्ठा प्रस्थापित केली होती. पुढे शाही दरबारात, हिंदूला जास्तीत जास्त मिळविता येईल इतके महत्त्व वा वजन त्याने

मिळविले तेव्हा आग्रा व माळवा अशा महत्त्वाच्या सुभ्यांची सुभेदारीही त्याला देण्यात आली; इतका तो वर चढला. पण यांपुढील कार्यात मात्र कांहीही कीर्ती वा यश त्याला मिळू शकले नाही. मराठ्यांविरुद्ध मोहिमेवर पाठविल्यावर त्यालाही अपयशच आले. मरणोन्मुख झालेल्या दिल्ली साम्राज्याच्या शासनयंत्रणेच्या आधारावर नवोदित, तारुण्याच्या चैतन्याने भारलेल्या मराठा सत्तेविरुद्ध झगडणे, निरर्थक होय हे त्यालाही समजून चुकले व या अपरिहार्य परिस्थितीला तो शरण गेला. स्वारी करून येणाऱ्या मराठ्यांना त्याला माळव्याबाहेर रोखता आले नाही. तेव्हा मराठ्यांच्या मागण्या पूर्णपणे मान्य करण्यास म्हणजेच त्यांना एक प्रकारे शरण जाण्यासच, त्याने बादशहाचे मन वळविले (१७३६)[१] यानंतर तो आपल्या राज्यात परत आला आणि यापुढील काळात तो अतिरिक्त विषयासक्तीत मग्न झाला. सवाई जयसिंह नेहमीच अतिशय दारू पीत असे. आता तर कमी होऊ लागलेल्या आपल्या शक्ती पुन्हा उत्तेजित करण्यासाठी तो वासना उत्तेजित करणारी औषधे घेऊ लागला आणि त्यामध्ये त्याची प्रकृती पूर्णपणे ढासळून अखेरी २१ सप्टेंबर १७४३ ला एका किळसवाण्या रोगाने तो मरण पावला. [वंश भास्कर ३३२२–Vam. Bh.].

ईश्वरीसिंह हा त्याच्या नंतरचा जयपूरचा राजा—(कारकीर्द १७४३–१७५०). बापाचे धैर्य आणि हुशारी याच्या अंगी नव्हती पण त्याच्या बहुतेक सर्व व्यसनांचा वारसा मात्र त्याने उचलला होता. मनाने तो दुर्बल असून, लबाड वा मूर्ख लोकांच्या मार्गदर्शनाखाली तो आपली मते लहरीनुसार व अकस्मात बदलण्याची शक्यता मात्र असे. त्याचा भित्रेपणा व नालायकी यामुळे लढाईमध्ये त्याच्या सैन्याचा नाश होण्याची वेळ येई पण अशा अनेक प्रसंगी त्याच्या घराण्याशी वंशपरंपरागत निष्ठा व भक्ती असलेल्या त्याच्या अधिकाऱ्यांनी आपल्या असाधारण कर्तबगारीने त्या सैन्याला नाशातून वाचविले होते.

"महाराजा राजराजेश्वर" अशी ज्याची अत्युच्च बिरुदावली होती तो अभयसिंह याकाळी जोधपूरचा राजा असून (कारकीर्द १७२४–१७४९), त्याने गुजरातची सुभेदारी स्वीकारावी अशी विनंती त्याला बादशहाने केली होती. (१७२९). या कामगिरीवर जाण्यासाठी जरूर ती तयारी करण्यात त्याने एक वर्ष खर्च केले व नंतर तो अहमदाबादला पोहोचला (ऑक्टोबर १७३०). अभयसिंहापूर्वी गुजरातमध्ये सुभेदार असलेला, सरबुलंदखान याला, बादशहाने, त्या पदावरून काढून टाकले असल्याने तो यावेळी बंडखोर बनला होता. अहमदाबादेला आल्यावर लवकरच या बंडखोर सरबुलंदखानाचा पराभव करून, अभयसिंहाने, आपली नेमणूक केली ते योग्यच होते हे दाखवून दिले. या त्याच्या यशस्वी मोहिमेत मिळालेल्या लुटीचे वर्णन करण्यात त्याच्या दरबारी-भाटांचे काव्यात अतिशयोक्ती असेल

१ १७०९ ते १७२९ या काळात मराठे, क्रमाक्रमाने माळव्यावर वर्चस्व वाढवीतच होते. निजाम व महमदखान बंगश यांचेही त्यांच्यापुढे काही चालले नाही. तेव्हा बादशहाने जयपूरचा राजा सवाई जयसिंह याजकडे माळव्याची सुभेदारी सोपविली. तो बाजीरावाचाही मित्र होता. परिस्थितीची जाणीव ठेवून अखेरी त्याने बादशहाचे मन वळवून मराठ्यांशी तह घडवून आणला तो माळव्याचा प्रत्यक्ष कारभार मराठ्यांकडे सोपवूनच—(१७३६) तथापि बादशहाचे मन पुन्हा बदलले व त्याने मराठ्यांशी पुन्हा लढा सुरू केला. यातून वजीर खानडौरान, तसेच कमरुद्दीनखान, अयोध्येचा सुभेदार व अखेर निजामाचाही पराभव झाला. बाजीरावाने दिल्लीवर चाल केली. पुन्हा शाही सेनापतींचा पराभव झाला व अखेरी माळवा आणि नर्मदा व चंबळ यामधील मुलूख, मराठ्यांना कायमचा मिळाला. (या सर्व घटना १७३७–३८ मधील). या मुलुखाबाबतच्या प्रत्यक्ष सनदा पुढे २ वर्षांनी मराठ्यांना मिळाल्या. (ही सर्व टीप गो. स. सरदेसाई—मुसलमानी रियासत भा. २ पृ. ४००, चौथी आवृत्ती या आधारे दिली आहे.)

पण ती क्षम्यच होय. या काव्यात ते म्हणतात.-- "चार कोटी रुपये, सर्व प्रकारच्या क्षमतेच्या (Calibre) व शक्तीच्या लहान मोठ्या १४०० तोफा आणि शिवाय सर्व प्रकारचे अन्य लष्करी साहित्य" त्याला मिळाले. त्याचे स्तुतिपाठक भाट गाऊ लागले.... "अभयमल्ल गुजराथमधील १७००० शहरांवर व इतर भागातील ९००० शहरांवर आपले अधिराज्य चालवीत आहे. इदार, भूज, पारकर, सिंध, सिरोही, जेसलमीर, झुनझुनो, डोंगरपूर आणि नागोर येथील राजे, रोज सकाळी अभयमल्लापुढे आपले मस्तक नमवितात." ... असे स्तुतिपाठ चालले असले तरी नंतर दोनच वर्षात त्याला आपल्या सुभ्याचा चौथ मराठ्यांना द्यावा लागला व त्यांच्याकडून अपयश पत्करून आपल्या घरी परतावे लागले. अशा लाजिरवाण्या अपकीर्तीत त्याचे गुजरातचे सुभेदारी पद संपले असले तरी चालू असलेले स्तुतिपाठ ऐकून अभयमल्लापेक्षाही अधिक खंबीर मनाच्या व्यक्तीचेही डोके फिरले असते. अशा परिस्थितीत तो तर घमेंडोने वेडाच बनला. त्याच्याबद्दल सुप्रसिद्ध इतिहासकार टॉड लिहितो, "त्याच्या क्रूर धाष्टर्याची तीव्रता काहीशी कमी केली ती फक्त त्याच्या बेसुमार आळसाने ...... आराम आणि अफू या विषयीं त्याची आसक्ती वर्षे लोटतील तसतशी वाढतच गेली." [टॉड (२) मारवाड प्र. ११].

त्याच्या मागून त्याचा मुलगा रामसिंह गादीवर आला (कारकीर्द १७४९-१७५१). त्याने आपल्या बापाचा उद्धटपणा व मग्रुरी तर उचलली होतीच शिवाय आपल्या आईच्या माहेरच्या—चौहान-घराण्याच्या उतावीळपणाचाही वारसा घेतला होता. (सिरोहीचे चौहाना हे रामसिंहाच्या आईचे माहेर घराणे). आत्मसंयमन दूरदृष्टी आणि स्वतःच्याच वयाच्याबद्दल विवेक यांचाही त्याच्याजवळ पूर्ण अभाव होता. अशा या तरुणाच्या हाती वयाच्य, १९ व्या वर्षी, अनियंत्रित अधिसत्ता आली आणि आपली अमर्याद घमेंड अतिरेकी संतापी वृत्ती आणि बोलण्यातील उद्धटपणा यामुळे त्याने आपले सरदार व जातिबांधव यांचा स्नेह गमावला.

## § ४ : मराठ्यांचा माळव्यावरील पहिला विजय-ताबा

मराठ्यांच्या माळव्यामधील पहिल्या आक्रमणामुळे त्याना, पुढे राजपुतान्यात स्वाऱ्या करण्यासाठी अतिशय सोयीचा असा पहिला टप्पा मिळाला. राजपुतान्यातील राज्ये ही जरी हिंदू राज्यकर्त्यांच्याच अंमलाखाली असली तरी ती मराठ्यांच्या आक्रमणापासून अलिप्त राहू शकली नाहीत. याला कारणेही होतीच. या राज्यातील संपत्तीच्या साठ्यास अद्याप हात लागलेला नव्हता. शिवाय या प्रदेशातील दोन, सर्वात श्रेष्ठ राज्यकर्ते म्हणजे मारवाडचा अभयसिंह व जयपूरचा सवाई जयसिंह यांना, बादशहाने अनुक्रमे गुजरात आणि माळवा या सुभ्यांचे सुभेदार नेमले होते. अर्थातच त्यांच्या ताब्यातील सुभ्यांमध्ये होणाऱ्या मराठ्यांच्या आक्रमणाला विरोध करणे हे त्यांचे कर्तव्यच झाले होते.

सप्टेंबर १७२२ ते नोव्हेंबर १७२८ पर्यंतच्या काळातील १७२३-१७२५ ही दोन वर्षे सोडून गिरधर बहादूर हा माळव्याचा सुभेदार होता. १७२३ ते १७२५ या मधल्या दोन वर्षात मात्र त्याला आपली सुभेदारीची जागा, निजामाने नेमलेल्या माणसाला द्यावी लागली होती. बाजीराव पेशव्याचा धाकटा भाऊ चिमणाजी अप्पा याने २९ नोव्हेंबर १७२८ ला अमझेरा (Amjhera) आणि तिर्ला (Tirla) यांच्यामधील मैदानावर

मांडूजवळ गिरधरचा पराभव करून त्याला ठार मारले.[1] यावेळी त्याचा पुतण्या दयाबहादूर हा त्याच्या सैन्याच्या एका एका बगलेचे (wing) अधिपत्य करीत होता, त्याचीही याच युद्ध-भूमीच्या दुसऱ्या एका भागात अशीच गत होऊन तो मारला गेला.

यानंतर गिरधर बहादूरचा मुलगा भवानीराम याची माळव्याचा तात्पुरता म्हणजे बदली (Acting) सुभेदार म्हणून, बादशहाने नेमणूक केली.[२] यावेळी सुभेदारापुढील अडचणी वाढल्या असल्या तरीही सुमारे एक वर्षापेक्षा थोडा कमी इतक्या काळापर्यंत (१७२९). आपली सत्ता टिकविण्यासाठी मराठ्यांशी निर्धारपूर्वक झगडा चालविला. नोव्हेंबर १७२९ मध्ये या सुभेदारीच्या पदावर सवाई जयसिहाची नेमणूक करण्यात आली.[३] पण पुढच्याच वर्षी १९ सप्टेंबरला जयसिंहाच्या जागी महंमदखान बंगशला नेमण्यात आले.[४] जानेवारी १७३१ मध्ये बंगश उज्जैनला पोहोचला आणि त्याने आपले सुभेदारीपद हाती घेतले. त्याच्या स्वतःच्या साधनसामुग्रीत बादशहा काहीही भर घालू शकला नाही आणि केवळ आपल्याच सामुग्रीच्या जोरावर त्याला काहीही परिणामकारक करता आले नाही. त्यांच्या या नव्या सुभेदारपदावर तो थोडा काळच राहिला आणि पूर्वी १७२९ मध्ये बुंदेलखंडात[६] त्याला मराठ्यांविरुद्ध जसे पूर्ण अपयश आले होते, तसेच पूर्ण अपयश येथेही त्यांच्याविरूद्ध आले. पुढच्याच वर्षी बंगशच्या जागी सवाई जयसिंहाची पुन्हा नेमणूक[५] होऊन, तेथे हजर होण्यासाठी तो आपल्या राजधानीतून २० ऑक्टोबर १७३२ ला निघाला आणि डिसेंबरमध्ये उज्जैनला पोहोचला.

पण बादशहाचे, माळव्यावरील जुने-नवे सर्वच सुभेदार मराठ्यांविरुद्ध सारखेच अपयशी ठरले. सैन्य तयार करावे व या सुभ्यामधून मराठ्यांना हाकलून द्यावे या अटीवर,

---

१ पूर्वी १९२० मध्ये (म्ह. या ग्रंथ लेखनाचे आधी) मी—(ग्रंथ लेखक-सरकार), डब्ल्यू. आर्यविन यांच्या "उत्तर काळातील मुघल" Later Mughals या ग्रंथाचे संपादन करीत असताना, गिरधर बहादूर व दयाबहादूर यांच्या मृत्यूच्या व भवानीराम यांच्या सुभेदारीच्या तारखा केवळ अनुमानानेच देऊ शकलो होतो; [आर्व्हिन ग्रंथ (२) २४३–२४९]; कारण त्यावेळी "आधार" म्हणून उपलब्ध असलेले पर्शियन भाषेतील लिखाण या तारखांबाबत मुग्ध होते. पण अलीकडे पेशवे दरबारची पत्रे—पे. द. नि. पत्रे, संग्रह १२ व सं. २२— ही प्रसिद्ध झाली असून त्यावरून या काळातील इतिहासाची प्रमुख वैशिष्ठ्ये आणि त्यातील कालनिर्देश Chronology ही बिनचूक सिद्ध झाली आहेत.

डॉ. रघुवीरसिंह यानी आपला ग्रंथ: "बदलता माळवा" .... "Malwa in Transition" ..... (१९३६ प्र. ४), यामध्ये या विषयाची सविस्तर चर्चा केली असून सत्य घटना सिद्ध केल्या आहेत.

२-५ स. १७२९ च्या आरंभापासून ते २० ऑक्टोबर १७३२ या काळात, मराठ्यांविरुद्ध माळव्याचे संरक्षण करण्यासाठी, बादशहाने माळव्यावरील सुभेदार वारंवार बदलले ... प्रथम

१ भवानी रामची बदली सुभेदार म्हणून नेमणूक (१७२९ प्रारंभी) ... नंतर

२ नोव्हेंबर १७२९ मध्ये सवाई जयसिहाची नेमणूक केली (पण बहुधा तो हजर होण्याआधीच....लवकरच) त्या जागी

३ १९ सप्टेंबर १७३० ला महमद बंगशची नेमणूक केली. . .त्याचे मराठ्यांविरुद्ध पुन्हा– अपयश १७३१. . . व

४ १७३२ ला सवाई जयसिंहाची पुन्हा नेमणूक –यावेळी जयसिंह २० ऑक्टोबर १७३२ ला आपल्या राजधानीतून निघाला व डिसेंबर १७३२ ला उज्जैनला हजर झाला..... अशीही मालिका आहे ती स्पष्टपणे लक्षात घेणे अवश्य आहे. नाहीतर वाचकांचा गोंधळ होण्याचा संभव आहे.

६ गो. स. सरदेसाई—मुस. रियासत भा. २ आवृत्ती ३ री १९५८ वरून.... माळव्याच्या या सुभेदारीच्या नेमणुकीच्या आधीपासूनच अलाहाबादची सुभेदारीही महमद बंगशकडेच होती. त्यावेळी बंगशने बुंदेलखंडाचा राजा छत्रसालावर स्वारी केली. तेव्हा बाजीरावाने छत्रसालाला मदत केली आणि ३०–३–१७२९ ला जैतपूरच्या लढाईत मराठ्यांनी बंकशचा पराभव केला. प्रस्तुत संदर्भ या बुंदेलखंडातील पराभवाचा आहे. . . (याचबरोबर पहा (१) भा. टीप §३ मधील व (२) §४ मधील भा. टीप पहिली.)

जयसिंहाला, दरिद्री बनलेल्या त्याच्या धन्याकडून मोठी रक्कम (२० लाख रुपये) मिळाली पण त्याने लढाई करण्याचा देखावा तेवढा केला आणि प्रत्यक्षात, या वेळेपुरते मराठ्यांना आपल्याला मिळालेल्या रकमेतून पैसा देऊन सुभ्याच्या संरक्षणाचा सौदा करण्याचे धोरणच अधिक पसंत केले.[1] (वरीद ११५–११६).

## §५ : मराठ्यांनी जयसिंहाचा माळव्यात केलेला पराभव

मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यानी चंपानिर (Champanir) घेऊन व पावागडावर रसदीची व्यवस्था करून, आपली गुजरातमधील कामगिरी संपविली आणि १७३३ च्या प्रारंभी माळव्यावर हल्ला करण्यासाठी ते आले. यावेळी जयसिंह मांदसोरला होता. मराठा सेनापतीनी आपली मुख्य छावणी मागे सोडून व बरोबर सुटसुटीत घोडदळ घेऊन पुढे चाल केली आणि जयसिंहाभोवती वेढा घालून त्याच्या सैनिकांचा धान्य व पाणी पुरवठा तोडला व त्यांची परिस्थिती मोठी हलाखीची केली. यावेळी कृष्णाजी पवार व उदाजी पवार या दोन मराठा सरदारांना पेशव्यांबद्दल मत्सर वाटत होता. या परिस्थितीत त्याना लालूच दाखवून, आपल्या सैन्यासह जयसिंहाला मिळण्यासाठी त्यांची मने वळविण्यात आली. तेव्हा होळकराने उदाजी पवाराच्या सामानसुमानापैकी काही लुटले. अशा वेळी पवार व होळकर-पेशवे या उभय पक्षियांच्या कांही सामायिक मित्रानी मध्यस्ती केली व आपल्या राष्ट्राच्या शत्रुशी हात मिळवणी केल्याबद्दल पवारांची कठोर कानउघाडणी करून, त्याना मुघल पक्ष सोडण्यास उद्युक्त केले. या परिस्थितीत मराठ्यांना ६ लाख रुपये देऊ करून, जयसिंहाला तहाची याचना करावी लागली. पण यापेक्षाही जास्त मिळविण्यासाठी होळकराने ओढून धरले. या वाटाघाटी चालू असतानाच, राजपुताना मदत करण्यासाठी बादशहा स्वतः दिल्लीहून आग्र्याकडे येत आहे अशी वार्ता आली. यामुळे राजपूत सेनापतीना धैर्य येऊन, ते लढाई देण्याला पुढे आले. या लढ्यात जयसिंहाची पिछाडी सांभाळणाऱ्या तुकड्यांचा सेनापती ठार मारला गेला. होळकरांच्या बाजूचेही शे-दोनशे घोडेस्वार व सुमारे १५ उच्च अधिकारी मारले गेले. यामुळे होळकरांनी आपली सैन्ये सुमारे ३० मैल मागे घेतली तर दुसऱ्या बाजूने, जयसिंहाने १६ मैल पुढे चाल केली. तेव्हा होळकराने झपाट्याने उलट फिरून, दुप्पट वेगाने जयसिंहाच्या सैन्यापर्यंत परत चाल केली. राजपूत राजाला आता पुन्हा लढाई देण्याची इच्छा उरली नव्हती. तेव्हा रोख सहा लाख रुपये व चौथाईपोटी २८ परगणे मराठ्यांना तोडून देण्याचे कबूल करून त्याने तह केला. ही घटना फेब्रुवारीच्या अखेरी घडली. [ पे. द. नि. प. (१४) २, (१५) ६ ]. यानंतर त्याने माळवा आपल्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपविला व तो स्वतः जयपूर या आपल्या राजधानीकडे परतला. मागे, आपल्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांचे हाती, आपल्या

---

१ शाहू राजाचे आज्ञापत्र, १८ मार्च १७३०

. . . . . ." जयसिंह उज्जैनच्या सुभ्यात आला आहे. तेव्हा दोन राजघराण्यातील (भा. जयसिंह व शाहू यांची) जुन्या वंशपरंपरागत मैत्रीच्या दृष्टीने त्याला आदराने व इतमामाने वागवावे अशी आज्ञा चिमणाजी, उदाजी पवार आणि मल्हार होळकर याना देण्यात येत आहे. त्याने जर मागणी केली तर त्याला मांडू किल्ला द्यावा." [ वाड (Vad) : (१) पृ. ९५ ].

(भा. टीप : हे आज्ञापत्र जयसिंहाची, माळव्याचा सुभेदार म्हणून प्रथम नेमणूक झाली (नोव्हेंबर १७२९) त्या काळातले आहे पण हेच धोरण पुढे तीन वर्षाच्या आतच पुन्हा नेमणूक झाली त्यावेळीही चालू राहिलेले दिसून येते.)

गैरहजेरीत, माळव्याचे काय होते याचा विचारही न करता आपले पुढचे दिवस त्याने तेथे राजधानीतच घालविले.[1]

एप्रिल ते डिसेंबर १७३३ या काळात बाजीराव जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर युद्धात गुंतला होता आणि मराठ्यांची मुख्य सैन्ये त्याठिकाणी एकत्र झाली होती. पिलाजी जाधवाने या वर्षाच्या अखेरीला, उत्तर हिंदुस्थानात स्वारी करून तेथे खंडणी वसूल करण्याचा बेत आखला. नरवर उजव्या बाजूला ठेऊन, त्याला बगल देऊन त्याच्या भोवतीने जावयाचे व कोटा आणि बुंदीच्या प्रदेशात शिरून तेथे सुमारे महिनाभर खंडणी वसूल करावयाची आणि अखेरीला, जेथे मराठ्यांनी आपली पकड आधीच बसविली आहे त्या और्छा व दातियाच्या बाजूने परत यावयाचे, असा त्याचा हा बेत होता. पण या योजनेत आता बदल करण्यात आला व डिसेंबर अखेरी तो निमारला आला आणि नंतर बुंदेलखंडात गेला. तेथे होळकर व शिंदे हेही जमा झाले होते. नंतर पिलाजी दातियापासून ग्वाल्हेरला (Gwalior) गेला. पण यावेळी हा भाग इतका ओसाड झालेला त्याला आढळला की, एखाद्या खेड्यात फक्त पन्नास रुपये मिळाले तरी ते त्याला विशेषच आभार मानण्यासारखे वाटावे. अशा परिस्थितीत तो नरवरला परत फिरला. तेथे तो ८ एप्रिल १७३४ ला असल्याचे दिसून येते. शेवटी आपल्या डाव्या बाजूला चंदेरी सोडून, तो दक्षिणेत परत आला आणि बुंदीवर स्वारी करण्याची कामगिरी शिंदे आणि होळकर यानी हाती घेतली. [पे. द. नि. प. (१४) १०, ११, १३].

गुजरात आणि माळवा हे प्रांत साम्राज्याने, व्यवहारात गमावले होतेच पण यावेळे-पावेतो तरी राजपुतान्यामध्ये कोणाही मराठ्याचा शिरकाव झालेला नव्हता. आता मात्र या दुर्दैवी प्रदेशात सतत चाललेल्या भाऊबंदकीच्या घरातील भांडणानी, दख्खनच्या मराठ्यांचा शिरकाव होऊ दिला. राजपुतानी त्याना प्रथम आणले ते पैशाच्या रूपात मोबदला-देऊन—भाडोत्री–मित्र म्हणून आणि शेवटी तर या प्रदेशाचे धनी म्हणून. बोलावून आणलेले हे 'मालक' तेथे राहिले ते मात्र, वर्षानुवर्षे या प्रदेशावर खंडणी बसवीत व ती वसूल करण्यासाठी देश उध्वस्त करीत. ही परिस्थिती क्रमाक्रमाने कशी निर्माण झाली यांची हकीगत आता आपण पाहू.

## § ६ : बुंदीच्या गादीबद्दल तंटे

बादशाही दरबारातील आपले स्थान व वजन, याना आता दुसरा कोणताही हिंदू मांडलिक राजा, प्रतिस्पर्धी म्हणून राहिला नव्हता हे जयसिंहाच्या लक्षात आले तसेच आपल्या बादशहाचे वाढते दौर्बल्य आणि अकार्यक्षमता हीही त्याला दररोज दिसत होती. अशा परिस्थितीत लहान सहान दुय्यम राजपूत राजावर "आपली अधिसत्ता"–( Suzerinity ) लादण्याची जी योजना तो आपल्या मनात खोलवर बाळगीत होता ती कार्यप्रवण करण्याच्या

१ यावेळी जयसिंहाला अधिक आस्था व काळजी वाटत होती ती वेगळीच होती. आपल्या नव्या राजधानीची सजावट करावयाची आणि खगोलशास्त्रविषयक चार नव्या वेधशाळांची बांधणी करावयाची याकडेच त्याचे अधिक लक्ष गुंतलेले होते. या वेधशाळांच्या बांधणीसाठी त्याने बंगालमधून 'जेझुइट फादर बुडियर' (Boudier) याला १७३३ मध्ये व पुढे १७३६ मध्ये आणखी दोघे 'फादर'––– अँटोनिक गॅबेल स्पर्गर (Antonic Gabel Sperguer) व आंद्रे स्ट्रॉबल (Andre–Stroble) याना जर्मनीमधून, या सर्वांचा खर्च देऊन बोलावून आणले. [ टीफेनथालर, भाषांतर––बर्नोली, ( १ ) ३०१–– Tiffenthaler Tr. by Bernolli. i. 301 ] पे. द. नि. प. (१३) ५१; भास्कर ३२१२.

मार्गाला तो आता लागला. आपल्या राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या व आपल्या पकडीत सापडण्यासारख्या सर्व महाला–परगण्यावर झडप घालून ते जबरदस्तीने ताब्यात घेण्याचा त्याने निश्चय केला. बुंदीचा राजा बुधसिंह, तेथे नसताना, जयसिंहाने आपल्या स्वतःच्या सैन्याचा वापर करून, बुंदीचा किल्ला ताब्यात घेतला आणि ते राज्य दलिलसिंहाला दिल्याबद्दल बादशहाकडून आज्ञापत्र मिळविले. (दलिल हा कारवारच्या—Karwar—सालिम–सिंह–Salim—हाडाचा दुसरा मुलगा—भा. आणखी पहा भा. टीप § २ हेच प्रकरण) जयसिंहाच्या या मदतीच्या मोबदल्यात, दलिलसिहाने, जयपूरचे राजघराणे हीच बुंदीची अधिसत्ता, होय अशी त्याची अटही यावेळी मान्य केली (सुमारे सप्टेंबर १७२९). बुधसिंहाची गादी गेल्यानंतर पुढे दहा वर्षे तो जगला (२६ एप्रिल १७३९ ला त्याचा मृत्यू झाला.) तो, सामान्यतःच फारसा समजुतदार वा समतोल मनाचा होता असे कधीही नव्हते. यातच दारू व अफू यांच्या अतिरेकी सेवनाच्या जोडीला, त्याच्या वाटयास आलेली दुःखे आणि निराशा यांची आता भर पडली, यामुळे लवकरच त्याची मनःस्थिती भ्रमिष्टासारखी बनली. तरीही त्याच्या या अखेरीच्या दहा वर्षात त्याने व त्याच्यानंतर त्याचा असामान्य शूर, उमदा व कर्तबगार मुलगा उम्मेदसिंह याने आपले राज्य परत मिळविण्यासाठी, सतत लढा चालवून, बुंदीची सत्ता बळकावणाऱ्याना मुळीच स्वस्थता लाभू दिली नाही. अखेरी आपल्या पूर्वजांच्या राजधानीत उम्मेदसिंह पुन्हा शिरला व त्याने आपल्याला बुंदीचा राजा म्हणून अभिषेक करून घेतला. (२३ ऑक्टोबर १७४८). तथापि त्याने मिळविलेल्या या पूर्वजांच्या वारशामध्ये, पुढेही अंतर्गत शत्रूपासून त्याला त्रास होत राहिलाच आणि मराठ्याकडून होणारे त्याचे शोषणही चालूच राहिले. [टॉड (२)–हरावती, प्रकरण ३. वंशभास्कर ३५४२, ३२८५].

बुंदी बळकावणाऱ्या दलिलला उचलून धरणारा एकमेव आधार म्हणजे जयसिंहच होता. १७२९ च्या अखेरीस त्याने आपली राजधानी सोडून माळव्याकडे प्रयाण केले, (भा. ही हालचाल जयसिंहाच्या माळव्यावरील पहिल्या नेमणुकीच्या वेळची पहा § ४) आणि इकडे बुधसिंहाने आपली गमावलेली राजधानी पुन्हा मिळविण्यासाठी चाल केली. यावेळी बुंदी शहराचा बंदोबस्त सालिमसिंहाकडे, त्याचा तरुण मुलगा दलिलसिह (बादशहाने याला बुंदीचा राजा म्हणून मान्यता दिलेली होती) याच्या वतीने होता. बुधसिंहाने बुंदीवर चाल केली तेव्हा सालिमच्या मदतीसाठी, जयपूरचे मोठे सैन्य त्वरेने आले, हे पाहून बुधसिंहाचे बहुतेक सर्व पुरस्कर्ते घाबरून दूर बाजूला निघून गेले तेव्हा बुधसिंहानेही आपल्या अनुयायांना लढाई न करण्याचाच सल्ला दिला. पण त्याच्याशी निष्ठा असणाऱ्या त्याच्या कुळापैकी (भा. हे सरंजामी पद्धतीतील सैनिक—वतन घेऊन, मोबदल्यात लष्करी सेवा करणारे) काहीनी हा सल्ला मानला नाही. त्यानी जयपूरच्या सैन्यावर हल्ला केला पण ६ एप्रिल १७३० ला कुसलथ (Kusalath) येथे त्यांचा पराभव झाला. अशा रीतीने आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या स्पर्धेतून मुक्त झालेल्या दलिलला, नंतर १९ मे रोजी राज्याभिषेक करण्यात आला व जयसिंहाच्या एका मुलीबरोबर त्याचा विवाहही झाला. (वंश भास्कर : ३१४७).

## § ७ : राजपुतान्यावरील मराठ्यांची पहिली स्वारी

पराभूत बुधसिंहाने प्रथम उदयपूरमध्ये व नंतर बेघम (Begham) येथे आश्रय घेतला आणि या ठिकाणी तो दारू व अफू यांच्या अधिकाधिक आधीन होत गेला व अखेरीस तो वेडा बनला. पण यावेळी त्याला एक अनपेक्षित मित्र सापडला. सालिम

सिंहाचा वडील मुलगा प्रतापसिंह हाडा याने, आपल्या कनिष्ठ भावाला बुंदीच्या राज्यपदावर चढविलेले पाहिले तेव्हा त्याचा अभिमान दुखावला गेला. यामुळे तो बुधसिंहाला येऊन मिळाला आणि स्वतःचाच बाप व भाऊ यांच्याविरुद्ध लढला. दलिलसिंहाविरुद्ध मराठ्यांची मदत पैसा देऊन मिळविण्यासाठी, दुधसिंहाच्या राणीने, आपल्या जवळचा पैसा देऊन, त्याला दक्षिणेत पाठविले. मराठ्यांनी मदत देण्यासाठी, त्यांना ६ लाख रुपये मोबदला देण्याचे ठरले. नंतर २२ एप्रिल १७३४ या सूर्यग्रहणाच्या दिवशी मल्हार होळकर व राणोजी शिंदे यांनी बुंदीवर हल्ला केला. यावेळी 'रीजंट' नात्याने बुंदी सालीमच्या ताब्यात होती. अखेरी मराठ्यांनी बुंदीचा किल्ला जिंकून सालिमसिंहाला कैद केले व त्याला आपल्याबरोबर घेऊन, ते गेले. यावेळी बुधसिंहाच्या राणीने मल्हाररावाच्या मनगटावर राखी बांधली.[1] आणि अशा प्रकारे प्रभु रामचंद्राच्या सूर्यकुलात जन्म झाल्याचे अभिमानाने सांगणाऱ्या राजकन्येने धनगर जमातीतील एक पुरुष आपला भाऊ आहे अशी एकप्रकारे सर्वांपुढे उघडपणे घोषण च केली. पण मल्हार होळकरची पाठ फिरते न फिरते तोच जयपूरचे २०,००० सैन्य आले अ णि त्याने पुन्हा दलिलसिंहाची बुंदीच्या गादीवर स्थापना केली. (वंश भास्कर–३२१६–३२२०).

मराठ्यांच्या राजपुतान्यातील पहिल्या आक्रमणाने राजपुतामधील विशेष विचारी राजांना आपल्यापुढे केवढी धोक्याची परिस्थिती निर्माण झाली आहे याची जाणीव झाली. या धोक्यातून निर्माण झालेली भीषण धास्ती. यापुढेही दीर्घ काळपर्यंत त्यांच्या आठवणीत राहिली.[2] ऑक्टोबर १७३४ च्या उत्तरार्धात जयसिंहाने राजपुतान्यातील सर्व राजांची एक परिषद मेवाड मधील अगौंच ( Agaunch ) या एका खेड्याजवळच्या हुर्डा या ठिकाणी बोलाविली. तिच्यामध्ये या राजमंडळाच्या पितृभूमीच्या बाहेर दख्खनी लुटारूंना थोपवून धरण्यासाठी सर्वांच्या योजनांमध्ये एकसूत्रीपणा आणण्याबाबत विचार करावयाचा होता. परिषदेचे हे उद्दिष्ट याच परचक्राविरुद्ध पाठविलेल्या बादशाही सैन्याबरोबर घनिष्ट सहकार्य करूनच साधणे शक्य होते. तथापि या परिषदेतून काहीही निर्णय निष्पन्न झाले नाहीत. मराठ्यांच्याविरुद्ध संरक्षणासाठी स्वीकारावयाचे, एकसूत्री, जोरदार व संयुक्त धोरण यावेळच्या मुघल सरदार मंडळातील नैतिक अधःपातामुळे खरोखरच अशक्य झाले होते. (वंश भास्कर ३२२७).

## § ८ : माळवा व राजपुताना यामधील शाही मोहिमांचे अपयश (१७३४–३५)

माळवा व राजपुताना यामधून मराठ्यांना घालवून देण्यासाठी ऑक्टोबर १७३४ मध्ये बादशाही दरबाराने एका मोठ्या मोहिमेची योजना आखली. या मोहिमेचे अधिपत्य

१ 'राखी' बांधणे ही एक हिंदू धर्मियामधील विशेष रूढी आहे. 'राखी' हे एक प्रकारचे मनगटावर बांधण्याचे कडे वा 'पोची' असते. ती मनगटी घड्याळाप्रमाणे बांधतात. ही सामान्यतः रेशमी धाग्याची व अन्यरीतीने सुशोभित केलेल्या वा रत्नजडित फुलासारखी असते. एखाद्या स्त्रीने, एखाद्या पुरुषाच्या मनगटावर राखी बांधली की हा पुरुष तिचा 'भाऊ' मानला जातो आणि राखी स्वीकारून, मानलेल्या बहिणीचे रक्षण करण्याची जबाबदारी त्याने स्वीकारावयाची असते. 'राखीचा' स्वीकार हे या जबाबदारीच्या स्वीकाराचे प्रतिक होय. इतिहासात हुमायून बादशहाने अशा राखीचा स्वीकार मेवाडच्या राणीकडून केल्याची हकीगत आहे. अन्यही अशा कथा आहेत. पठाण लोकामध्येही अशी चाल आहे. मात्र प्रतिक म्हणून राखीऐवजी या जमातीत स्त्रीचा 'रुमाल' वा 'बुरखा' फिरविला जाई व जमात बांधव संबंधित स्त्रीला भगिनी मानून मदत देत... असे संदर्भ प्रस्तुत ग्रंथातही आहेत.

२ टॉड—खंड १, मेवाड—प्रकरण १५.

वजीर कमरुद्दिन व बक्षी खान-इ-दौरान या दरबारच्या दोन सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यांकडे देण्यात आले. पुढील महिन्यात २५००० सैन्य बरोबर घेऊन, दिल्लीहून वजीर आग्रामार्गे बुंदेलखंडात जाण्यास निघाला. तेथे यावेळी पिलाजी जाधव धामधूम करीत फिरत होता. उभय पक्षात फेब्रुवारी १७३५ मध्ये दोन–तीन छोटयाशा चकमकी झाल्या. याचा परिणाम इतकाच झाला की, पिलाजीने सिप्री व कुलारसपर्यंत माघार घेतली आणि शत्रुच्या या ठिकाणापासून २४ मैल उत्तरेला नरवर येथे वजीराने मुक्काम केला. आणखी काही चकमकी झाल्यावर पिलाजीने आपला बाडबिछाना बुंदेलखंडातून मागे घेतला आणि तो चांद व देवगड मार्गे दख्खनकडे जाण्यास निघाला (एप्रिल). वजीर दिल्लीकडे परतला आणि तेथे ९ मे १७३५ ला पोहोचला. [पे. द. नि. प. (१४) २२, २१].

पश्चिम विभागातील मोहिमेची कामगिरी खान-इ दौरान याच्यावर सोपविली होती. तो दिल्लीहून या मोहिमेवर निघाला तो वजीर बुंदेलखंडाच्या मोहिमेवर निघाला होता त्याचवेळी अजमीरला जात असताना वाटेत जयपूरचा जयसिंह, जोधपूरचा अभयसिंह आणि कोटयाचा राव दुर्जनसाल हे आपापल्या पथकानिशी त्याला येऊन मिळाले. अशाप्रकारे त्याचे सैन्य हा एक अफाट घोळकाच बनले. (यावेळी पसरलेल्या वार्तेनुसार या घोळक्यातील संख्या २ लाखाइतकी फुगविलेली होती.) शिवाय या सैन्याबरोबर मोजताही येणार नाहीत इतक्या तोफांच्या व दारूगोळयाच्या गाडया होत्या. मुकुंदरा खिंड ओलांडून हे शाही सैन्य रामपुरा भागात पोहोचले तेव्हा या भागात होळकर व शिंदे असल्याचे त्यांना दिसून आले. (फेब्रुवारीच्या सुरवातीस). नियंत्रण व हालचाली करण्याच्या दृष्टीने शाही सैन्यातील संख्या व त्याचा आकार अवजडच होता. हे सैन्य संमिश्र असल्याने त्यात एकजिनसीपणाही नव्हता. शिवाय त्याच्या एकूण रचनेतही ढिलाई व विस्कळितपणा होता. याउलट मराठयांच्या सुटसुटीत घोडदळाला मल्हार व राणोजी यांच्यासारखे घोडदळाचे जन्मजात कुशल नेते लाभले होते. या परिस्थितीत अवजड शाही सैन्याचे अपयश आधीच ठरलेले होते. प्रथम मराठयांनी आठ दिवस खान-इ-दौरानच्या भोवती भोवती घिरटया घालून त्याचा दाणागोटा व वैरण तोडली त्याच्या सैन्यामधून उंट व घोडेही जिंकून आणले आणि त्याला पूर्णपणे जागच्या जागी खिळून ठेवले. नंतर मराठयांनी विजेच्या चपळाईने शत्रुच्या मुलखात दुसरीकडेच अचानक हल्ला केला. बक्षी आणि त्याचे मित्र, याना तेथेच सोडून त्यानी मुकुंदऱ्याची खिंड ओलांडली आणि बुंदी-कोटा गाठली. तेथून पुढे, आता संरक्षणरहित राहिलेल्या जयपूर व जोधपूर भागावरही त्यानी धाड घातली. तेव्हा शाही सैन्ये, त्यांच्या पाठीमागून, पण फार दूर अंतरावरून, कशीतरी रखडत रखडत पाठलागास जाऊ लागली. हा प्रदेश संरक्षण विरहित, आता मोकळा पडलेला सापडल्यामुळे, मल्हारने या भागातील अनेक ठिकाणावर अचानक हल्ले केले. यावेळी बादशहाच्या प्रत्यक्ष शासनाखाली असलेले 'सांभर' हे धनाढय शहर २८ फेब्रुवारीला त्याने लुटले. तेथे त्याला खूपच लूट मिळाली. तेथील फौजदार 'फक्रु' ( Fakru ) याचे सर्वस्वच लुबाडण्यात येऊन (३ लाख रुपये किंमतीची मालमत्ता व ३ वा ४ हत्ती) त्याला फक्त अंगावरील कपडयांनिशीचा सोडून देण्यात आले. शहराच्या काझीने यावेळी हिंदूंच्या 'जोहार' पद्धतिनुसार आपल्या स्त्रियाना ठार मारले आणि उन्मादाच्या भरात तो आवेशाने हल्लेखोरांशी लढला व जखमी होऊन पडला. मार्च महिन्याच्या आरंभी उभयपक्ष छावण्या ठोकून राहिले ते पुढीलप्रमाणे :— खान-इ-दौरान याने आपले ठाणे कोटयाला व जयसिंहाने आपल्या राजधानीजवळ ठेवले होते—

आणि मल्हार व राणोजी यानी आपली ठाणी जयसिंहापासून सुमारे २० मैलावर ठेवली होती. [सियार (२) ८३; पे. द. नि. प. (१४) २३ २१ इलियट (Elliot) मध्ये रुस्तुम अली (८) ५१].

अशा प्रकारे या युद्धाच्या दोन्हीही विभागात बादशाही सैन्याना काहीही निश्चित पदरी पाडून घेण्यात यश आले नाही. इतकेच नव्हे तर आपल्याच मोठ्या व बोजड सैन्यांचे रक्षण करणे व त्यांना दाणागोटा मिळवून देणे हेच काम त्याना अतिशय अवघड बनले. त्यांच्यापेक्षा लहान असलेल्या मराठा सैन्यानी या शाही फौजांना हालचाल करता येणार नाही इतके पूर्णपणे निश्चल व शक्तिहीन बनविले होते. अखेरी माळवा सोडून परत जाण्यासाठी, वजीराने पिलाजीला ५ लाख रुपये, 'खुशी' वा लाच देऊ केली. दुसरीकडे राजपुन्नान्यातही असेच घडले. तेथे खान-इ-दौरान याने प्रथम बरेच आठवडे बुंदी येथे निष्क्रियतेत घालवून नंतर मात्र जयसिंहाचा सल्ला मानला. या सल्ल्यानुसार माळव्याबद्दल २२ लाख रुपये चौथ देण्याचे, त्याने बादशहाच्यावतीने वचन देऊन, नर्मदेच्या पलीकडे परत जाण्याचे मान्य करण्यास मराठ्यांचे मन वळविले. यावेळी खान-इ-दौरान आणि जयसिंह यांच्या छावण्या कोटा येथे व मराठा छावणी बुंदी येथे होती. चौथाईबाबत हा समझोता झाल्यावर, जयसिंहाच्या मध्यस्तीने, खान-इ-दौरान आणि दोन्ही मराठा सरदार, यांत्री २२ मार्चला एकत्र बैठक होऊन त्या समझोत्याला तहाच्या रूपात, औपचारिक मान्यता देण्यात आली.[१]

या लाजिरवाण्या व अपयशी मोहिमेनंतर एप्रिल १७३५ च्या अखेरी, मुघल सैन्याचे हे दोन सेनापती दिल्लीला परतले. मराठा सेनापतीही परत गेले. राणोजी उज्जैनला, मल्हार कालाबागला (Kalabagh) आणि पिलाजी सिरोंजला. (जून) [पे. द. नि. प. (१४) २९].

## § ९ : पेशव्यांच्या मातोश्रीची उत्तर हिंदुस्थानातील यात्रा (१७३५)

यावेळी मुघल साम्राज्याबरोबर झालेला सशस्त्र संघर्ष पेशव्यांच्या दृष्टीने अयोग्यवेळी घडून आला होता. त्याने आपली आई राधाबाई हिच्यासाठी संपूर्ण उत्तर हिंदुस्थानच्या यात्रेची व्यवस्था केली होती. या यात्रेची सर्व व्यवस्था ज्योतिषी बाबूजी नाईक जोशी (ज. सरकार Nayek असा उच्चार लिहितात.) यांच्याकडे होती. हा जोशी बनारसला बराच काळ राहिलेला असून, उत्तर हिंदूस्थानातील मंदिरांची त्याला माहिती होती. त्याला मार्गदर्शनासाठी बरोबर घेऊन पेशव्याच्या आईने ९ मार्च १७३५ ला बऱ्हाणपूर येथे तापी नदी ओलांडली. ती जाई तेथे तेथे, शाही शासनाच्या अधिकाऱ्यानी व स्थानिक अधिपतींनी ( Chiefs ) तिला संरक्षण आणि लवाजमा यांची तरतूद करून दिली. ज्या ज्या राजपूत राज्याच्या राजधानीला तिने भेट दिली त्या त्या राजाने तिला उच्च ब्राह्मणकुलीन विधवेला

१ पे. द. नि. प. (१४) २७, २३; (२२) २८४. या मुद्द्याबाबत नंतर झालेल्या वाटाघाटींचे वर्णन पुढे करण्यात येईल.—पे. द. नि. प. (१४) ३१, ४७—
या संदर्भात अनुवादकाची टीप :—

खान-इ-दौरान व मराठे यांच्या दरम्यान ठरलेल्या या तहाला बादशहाने मान्यता दिली नाही व त्याने जयसिंह व खान यांची कानउघाडणीही केली. यामुळे बाजीरावाने स्वतःच्या नेतृत्वाखाली दुसरी मोठी मोहीम ऑक्टोबरपासून सुरू केली..... या मोहिमेची व बादशहाच्या हालचालींची, इत्यादी माहिती पुढे §११ §१२ §१६ मध्ये दिली आहे.

व सगळीकडे विजयी होत, जिंकीत चाललेल्या मुलाच्या मातेला, उचित अशा थोर आदराने वागविले. त्यानी स्वतः तिचे स्वागत करून आपल्या राण्यांशी तिची ओळख करून दिली आणि तिला उंची अहेर दिले. अशा रीतीने प्रवास करीत करीत राधाबाई ठिकठिकाणी गेली, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :— उदयपूर (६ मे) नाथद्वारा (Nathdwara), जयपूर ( सुमारे १६ जुलई ), मथुरा-कुरुक्षेत्र, अलाहाबाद. बनारस आणि गया (नोव्हेंबर) आणि नंतर पुन्हा बनारसला जाऊन तेथून ती जानेवारी १७३६ मध्ये बुंदेलखंडाकडे वळली आणि शेवटी पुण्याला २ मे रोजी पोहोचली. [पे. द. नि. प. (९) १२, १३, १४, (१४) २१, ३१, ३९, ५१, (२२) ३३०, वंश भास्कर ३२२३].[१]

## § १० : जयसिंहाने उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांच्या हितसंबंधाची जोपासना केली त्याची हकीकत

प्रचंड शस्त्रसामुग्री आणि अफाट खर्च करून काढलेल्या १७३५ च्या पहिल्या चतुर्थातील या शाही मोहिमेला, मराठ्यांना चिरडून टाकण्यात यश आले नाही इतकेच नव्हे तर तिचा शेवट झाला तो अखेरी, मराठ्यांनाच २२ लाख रुपयाची मोठी वार्षिक खंडणी देण्याची जबाबदारी पत्करल्यानंतरच. अशा या लाजिरवाण्या शेवटाबद्दल स्वाभाविकच बादशहाला फार राग आला. या मोहिमेबाबत, प्रत्यक्ष अगदी जवळचा संबंध असणारा अधिकारी म्हणजे, आग्रा व माळवा या सुभ्यांच्या सुभेदारीवर असणारा जयसिंह हाच असून दरबारात त्याचा सतत पुरस्कार करणारा मित्र म्हणजे खान-इ-दौरान हा होता. यामुळे संबंध शाही दरबाराने या मोहिमेतील अपयशाबद्दल सर्व दोष या दोघानाच दिला. या संदर्भात औंधचा गव्हर्नर 'सादत' हा बादशहाला म्हणाला. . . . "मराठ्यांना गुप्तपणे मदत व आधार देऊन, जयसिंहाने संबंध साम्राज्याचा नाश केला आहे. मला आग्रा व माळवा यांचे गव्हर्नरपद तेवढे द्या, यापलीकडे मी काहीही पैशाच्या मदतीची मागणी करीत नाही. या युद्धासाठी आपले सैन्य सुसज्ज करावयाला एक कोट रुपये द्या अशी मागणी जयसिंहाने केली आहे. याउलट माझ्याकडे या कामगिरीसाठी जरूर तितका खजिना माझा स्वतःचाच आहे. शिवाय निजाम हा माझा स्नेही असून तो मराठ्यांच्या नर्मदा नदी ओलांडण्याच्या कामात अडथळे निर्माण करील "थांबवीलही" सरबुलंदखानानेही, उघडपणे या इतकाच दोष जयसिंहाला दिला.

पैसा देण्याचे मान्य करून, मराठ्यांना गप्प बसावयास लावण्यासाठी सौदा केल्याबद्दल बादशहाने जयसिंह व खान-इ-दौरान याना फार दोष दिला. तेव्हा खानाने स्वतःची तरफदारी केली ती अशी. . . . "माळव्यामध्ये शिरलेल्या मराठा सेनापतीना, जे परगणे जहागीर

---

१ भा. टीप या तळ टीपचे स्थान ग्रंथात स्पष्ट दाखविलेले नाही. हा बहुधा मुद्रणदोष असावा. हे स्थान बहुधा १५९/१ अखेरी वा §९ मधील ओळ १ मध्ये असावे.

बाजीरावाच्या आज्ञेनुसार, १७३५ एप्रिलमध्ये होळकर व शिंदे यानी मारवाडवर स्वारी केली. या आधी थोडेच दिवस, अभयसिंहाने मराठ्याविरुद्ध शत्रुत्वाची कृती केली असल्याने त्याबद्दल त्याला शिक्षा करण्याचा उद्देश या स्वारीमागे होता. या स्वारीबद्दल शिंदे-होळकर याना मिळालेल्या पेशव्यांचे हुकुमात स्पष्ट आदेश होता की "जयपूर व मेवाडच्या प्रदेशाला धक्का लावण्याचे कटाक्षाने टाळावे." या आज्ञापत्राच्या संदर्भात बाजीरावाने आपल्या धन्याला— छत्रपतीना —लिहिल्यावरून दिसते की, अभयसिंहाचा मुलख लुटला, त्याची नासाडी केली तर जयसिंहाला खचितच बरे वाटेल असे बाजीरावाला वाटत होते. . . . . [पे. द. नि. प. (१३) ४९, (१४) १४. . . . हे पत्र बहुधा याच वर्षीच्या (१७३५) मार्चमधील असावे. ]

म्हणून देण्याचे आश्वासन मी दिले ते, या सुभ्यातील परगणे, आधीच बंडखोर रोहिले आणि अन्य लुटारू यांच्याच हातात होते. शिवाय मी त्याना अशीही अट घातली आहे की या सुभ्यातील बादशहाच्या प्रत्यक्ष हुकमतीखाली असलेल्या कोणत्याही भागाला त्यानी मुळीच उपद्रव देता कामा नये. बाजीरावही शहेनशहांचे हुकूम सर्वप्रकारे मानीत आहेच. पवित्र गंगानदीमध्ये स्नान करण्याच्या निमित्ताने त्याने आपल्या कुटुंबाला उत्तर हिंदुस्थानात आणले आहे याचाही विचार करावा. त्याची आईसुद्धा या भागामध्ये यात्रेसाठी आहे... शिवाय युद्ध करून मराठ्यांचा परिणामकारकपणे बंदोबस्त करता येणार नाही. त्यांना जिंकता येणार नाही. पण बाजीरावाने, निदान त्याचा बंधू चिमणाजी याने, इकडे येऊन बादशहाना भेटावे म्हणून मी त्याचे मन मित्रत्वाची बोलणी करून वळवीन. त्याच्या इच्छाना, जर बादशहानी मंजुरी दिली तर शाही मुलखाला होणाऱ्या त्रासातून तो यापुढील काळात मुक्त होईल. याउलट सादतखान (औंधचा) गव्हर्नर आणि निजाम यानी जर हातमिळवणी केली तर ते मात्र दुसऱ्याच व्यक्तीला बादशाही तख्तावर बसवितील." [पे. द. नि. प. (१४) ४७, ३९, ३१].

जयसिंहाकडे असलेल्या दोन प्रांतांच्या सुभेदारी-पदावरून त्याला दूर करण्याबाबत चाललेल्या अशा बोलण्यांची वार्ता जयसिंहाच्या कानी आली आणि तीमुळे त्याने सरळ-सरळ बादशहाच्या ठाम विरोधकाची भूमिका घेतली. तो तर मूळचाच स्वार्थी व संधीसाधू असून, शाही तख्ताबद्दल फारशी निष्ठा त्याला कधीच नव्हती. त्याने मराठ्यांच्या प्रतिनिधीला. गुप्त वाटाघाटीसाठी आपल्या दरबारी बोलावून घेतले आणि सांगितले.... "मी तुर्की राज्यकर्त्यावर—मुघल बादशाही घराण्यावर—विश्वास ठेवू शकत नाही म्हणून आजपर्यंत मी बाजीरावाची प्रतिष्ठा आणि हितसंबंध यांचे रक्षण केलेले आहे. या तुर्कांनी जर का दक्षिणी सैन्यावर जय मिळविला तर ते आमचीही उपेक्षाच करतील तेव्हा प्रत्येक बाबतीत मी पेशव्यांच्या आदेशांचे पालनच करीन." यानंतर (ऑगस्ट १७३५) त्याने पुढील हालचालीसाठी पेशव्याकडे एक योजना पाठविली ती अशी... पेशव्याने ५००० घोडदळ बरोबर घेऊन जयसिंहाकडे यावे.... येताना वाटेत कोणत्याही ठिकाणी लुटालूट न करण्याची दक्षता घ्यावी. बाजीरावाच्या या सैन्याचा रोजचा खर्च (रु. ५०००) जयसिंह देईल. याशिवाय माळव्याचा चौथ आणि पिलाजी जाधवाच्या जहागिरीबाबत खंडही जयसिंह देईल. या सर्वासाठी मिळून एकूण रोख रुपये वीस (२०) लाख देईल. पेशवा जयपूरला आल्यानंतर, जयसिंह त्याच्याशी एकूण परिस्थितीबाबत सल्लामसलत करील. नंतर पेशवा बादशहाला भेटण्यास जाईल तेव्हा त्याच्या संरक्षणाची हमी व तद्नुषंगाने आणाभाका, खान-इ-दौरानच्या मध्यस्तीने बादशहाकडून मिळवून, तो पेशव्याला बरोबर घेऊन बादशहाच्या मुलाखतीसाठी जाईल, असे करता आले नाही तर जयसिंहाच्या राजधानीतूनच पेशव्याने परत जावे. अशीही जयसिंहाची एकूण योजना होती. [पे. द. नि. प. (१४) ४७].

या उलट दुसरीकडे बादशहानेही मराठ्यांविरुद्ध आगामी हिवाळ्यात करावयाच्या हालचालींची आपलीही एक योजना सप्टेंबरच्या अखेरी तयार केली. त्यानुसार प्रथम त्याने अभयसिंह (भा. जोधपूरचा, पहा §२§३§८) व वजीर यांच्यामध्ये पुन्हा सलोखा घडवून आणला; आग्रा, माळवा इतकेच नव्हे तर गुजरातसुद्धा असे सुभे वजीराच्या ताब्यात द्याव-याचे ठरविले. जयसिंह, जर आपली पथके घेऊन, बादशाही कामगिरीवर निष्ठापूर्वक येऊन मिळाला तर त्याच्या मुलखाला त्रास द्यावयाचा नाही आणि तसे जर त्याने केले नाही तर

मात्र तो शिक्षेला पात्रच असे समजून योग्य ती शिक्षा त्याला करावयाची, असेही हुकूम वजीराला द्यावयाचे ठरविले. पावसाच्या अखेरी नद्यांचे पाणी जरूर तितके उतरले की लगेच, बादशहाने स्वतः दिल्लीबाहेर कूच करावयाचे, जयसिंह व खान -इ-दौरान, या दोघानी, जयपूरमार्गे दख्खनकडे जावयाचे, अभयसिंहासह वजीर व सादतखान यानी ग्वाल्हेरमार्गे निघावयाचे असे आणखी बेत या योजनेत होते. [पे. द. नि. प. (१४) ३९]

## § ११ : बाजीरावाची राजपुतान्यास भेट, १७३६

२२ मार्च १७३५ च्या कराराला (भा. पहा § ८ अखेर) बादशहाने मान्यता न दिल्यामुळे आगामी हिवाळ्यात आपल्या स्वतःच्या नेतृत्वाखाली, उत्तरेत एक मोठी मोहीम काढण्याची योजना बाजीरावाने आखली. या मोहिमेवर जाण्यास तो, पुण्याहून ९ ऑक्टोबरला निघाला. होळकरांच्या सुटसुटीत, चपळ, आक्रमक घोडदळाने हल्ले करून १७३४ आणि १७३५ मध्ये सबंध राजपुतान्यात दहशत निर्माण केली होती व तेथील लोकाना त्यांच्या अगदी दारातच मराठ्यांच्या लोभी लुटारुपणाची चांगलीच जाणीव करून दिली होती. साम्राज्याच्या दोन सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या, संपूर्ण फौजेलाही, मराठ्यांविरुद्ध १७३५ च्या पहिल्या चतुर्थात अपयश आले होते. यामुळे हिंदुस्थानातील सर्वांना ठामपणे वाटू लागले होते की, मराठे अजिंक्य असून त्यांच्याविरुद्ध दिल्लीकडून किंवा त्यांच्या स्वतःच्याच स्थानिक प्रमुखाकडून वा राजेरजवाड्याकडून काहीही संरक्षण मिळण्याची आशा नाही. आता तर ज्याची धास्ती वाटत होती तो, या मराठा सेनापतींचा 'सरसेनानी'च येत आहे ही वार्ता आली आणि यामुळे सबंध राजपुतान्याला भीती आणि निराशा यानी ग्रासले. पण निरनिराळ्या राजपूत दरबाराना स्वतः भेट देऊन, शक्यतर शांततापूर्ण वाटाघाटीनी मने वळवून, "चौथ" बसवावयाचा असा यावेळी बाजीरावाचा हेतू होता.

धार राज्याच्या गुजरातच्या सरहद्दीवरील, कुक्षी ( Kukshi ) नावाचा किल्ला बाजीरावाने घेऊन तेथून डोंगरपूर व लोनीवाडा मधून त्याने उत्तरेकडे कूच केले आणि तो मेवाडच्या दक्षिण सरहद्दीजवळ पोहोचला (सुमारे १५ जानेवारी १७३६). महाराणा जगत्‌सिंह (दुसरा) याने, बाजीरावाचे, त्याला साजेसे स्वागत करण्यासाठी सर्व तयारी केली. त्यांच्या भेटीच्या समारंभाचेवेळी पाळावयाचे शिष्टाचारही ठरले, त्यानुसार, पेशवा हा ब्राह्मण, म्हणजेच सर्व हिंदू जातीमध्ये सर्वांत पवित्र जातीचा म्हणून, महाराणाने त्याला प्रथम प्रणाम करावयाचा व नंतर आपण उपाध्याय म्हणून पेशव्याने त्या ऐहिक राजाला आशीर्वाद द्यावयाचे असे ठरले. नंतर उदयपूरच्या जवळ पोहोचल्यावर, 'अहर' (Ahar) खेड्यातील 'चंपाबाग' उद्यानात बाजीरावाचा मुक्काम ठेवण्यात आला व पाहुणा म्हणून स्वागताप्रीत्यर्थ त्याला[१] ५००० रुपयांची थैली, वस्त्रे, घोडे आणि एक हत्ती असा 'आहेर' देण्यात आला. दुसऱ्या दिवशी महाराण्याने एक भव्य दरबार भरविला. त्यासाठी पेशव्याला पाहुणा म्हणून निमंत्रण दिले असून, बैठकीवर एकमेकाजवळ दोन लोड मांडले होते. पेशवा येऊ लागला तेव्हा सभागृहाच्या दरवाजापर्यंत स्वतः महाराणा सामोरा गेला आणि तेथून त्याने पेशव्याना, त्यांच्यासाठी मांडलेल्या लोडापर्यंत आणले. पण बाजीराव मोठ्या नम्रतेने त्या ऊंच बैठकीच्या खाली जमिनीवरील महाराणाच्या बैठकीपेक्षा कमी ऊंचीवरील–बैठकीवर बसला आणि त्याने महा-

१ टॉड (१) मेवाड प्र. १५; बिहारीदास पांचोळी याला महाराण्याचे पत्र.

राण्याच्या डोक्यावर चौरीही ढाळली.[1] तेव्हा ही बाजीरावाची कृती पाहून.....'नको नको' म्हणत नम्रपणे हरकत घेत महाराणा म्हणाला....."आपण ब्राह्मण आहात, आपलाच सत्कार आम्ही केला पाहिजे," तेव्हा बाजीरावाने मुत्सद्दीपणाने उत्तर दिले... "मी येथे फक्त आपल्यालाच 'राजा' (महाराजा) असे मानतो कारण आपल्या अधिपत्याखाली १६ जहागिरदार–उमराव–(Chiefs – Umarao -राज्यकर्ते) आहेत"[2]

यानंतर प्रत्यक्ष वाटाघाटीला सुरवात झाली. दीर्घकाळ घासाघीस झाल्यावर, महाराण्याला तहावर सही करावी लागली. यानुसार महाराण्याने वार्षिक १,६०,००० रुपये खंडणी देण्याचे मान्य करून तिच्यापोटी बन्हाडा ( Banhada ) परगणा तोडून, मराठ्यांना दिला. या रकमेचे तीन सारखे हिस्से करून ते अनुक्रमे होळकर, शिंदे आणि पवार याना नेमून देण्यात आले. या करारानुसार सर्व व्यवस्था करण्याचे काम प्रथम होळकरांकडे सोपविण्यात आले पण नंतर या खंडणीबाबत प्रमुख व्यवस्थापक ( Receiver General ) म्हणून शिंद्यानी काम पाहिले. हा तह पुढे दहा वर्षे अंमलात राहिला आणि नंतर रद्दबातल झाला. [टॉड (१) मेवाड प्रकरण १५].

या वाटाघाटी चालू असताना त्यात एक खंड पडला होता. पिचोला तलावाच्या मध्यभागी जगमंदिर नावाचा (Jagmandir ....भा. बहुधा हे नाव जलमंदिर असावे.... मुद्रणदोष संभवतो) एक राजवाडा होता. या राजवाड्यास भेट देण्यासाठी महाराण्याने बाजीरावास बोलाविले. आपला खून करण्यासाठी हा एक सापळा तयार केला आहे असे वाटून, बाजीराव एकदम अतिशय संतापला आणि मेवाडच्या प्रधानानी दंडादाखल ७ लाख रुपये देण्याचे मान्य केल्यावरच तो शांत झाला. या रकमेपैकी रोख तीन लाख रुपये बाजीरावाला देण्यात आले ते, महाराणाच्या आजीच्या मालमत्तेतून, ब्राह्मणाला दिलेले विशेष प्रसंगावेळचे दान म्हणून. महाराणाची आजी नुकतीच निवर्तली होती तेव्हा प्रेतयात्रेच्या वेळी ब्राह्मणाला द्यावयाच्या 'सुवर्णदानाच्या' नावाखाली ही रक्कम देण्यात आली होती! यानंतर ४ फेब्रुवारीला या, बेटसदृश राजवाड्याला बाजीरावाने भेट दिली. [पेशवा दफ्तर-रोजकीर्द].

मेवाडचा व्यवहार अशा प्रकारे संपविल्यानंतर, बाजीराव उत्तरेला जयपूरकडे निघाला. जाताना वाटेत त्याने 'नाथद्वाराची' (Nath Dwara–उदयपूरच्या उत्तरेस २५ मैल) यात्रा केली. तेथून त्याने जहाजपूरला ( Jahajpur–बुंदीच्या वायव्येस २५ मैल) कूच केले.

---

१ अब्दागिरी, छत्रचामर, ही विशेष मानाची... प्रतिके–राजचिन्हे–होत. याना सोन्याचांदीचे, नक्षीदार दांडे असून यापैकी चामर वा चौरीच्या दांड्याच्या एका टोकाला, डौलदारपणे हलविता येईल असा लांब, शुभ्र, केसाळ असा झुबका असून तिची मूठ–दांडा नक्षीदार असतो. महाराणा-महाराजा– व विशेष मान बहाल केलेल्या व्यक्तीच्या डोक्यावर ती सतत ढाळली जाते–हलविली जाते. मंद, सुगंधी वायू मिळून समाधान वाटावे हा या मागे एक हेतू असतो. तथापि चौरी ढाळली जाणे हे एक विशेष मानाचे चिन्हच असे मानले जाई. छत्रचामराचे आधिकार हे विशिष्ट स्थानाचे चिन्ह होय ते विशिष्ट सत्ताधाऱ्यालाच मिळतात.

२ "महाराण्याबरोबर व्यवहार करताना फार लोभीपणा दाखवून, ताणून धरू नका" असा सल्ला, एका मित्राने बाजीरावाला दिला होता. आणखी त्याने असेही सांगितले होते की.... "राणाजीकडे करावयाच्या मागण्यात अतिरेक करू नये. तो समाधानी राहील अशा रीतीनेच वागा. तुम्हाला एका दिवसात काही, सर्व जग पकडीत धरता येणार नाही." [पे. द. नि. प. (१४) ५४]. वंशभास्कर ३२३६–३८ मध्ये ही हकीगत तपशीलवार दिलेली असून शिवाय त्यात, पुढील दोन परिच्छेदातील तपशीलही नमूद केलेले आहेत. संस्कृतमध्ये 'चक्रवर्ती' किंवा सम्राट (प्रमुख राज्यकर्ता—Sovereign) याची व्याख्या केली आहे ती अशी :—बारा मांडलिक राजांच्या (Sub kings) समुहावर अधिसत्ता असणारा तो चक्रवर्ती होय. [पे. द. नि. प. (१४) ५०, ५१].

दरम्यान, त्याला वाटेतच भेटण्यासाठी, आपले सर्व सैन्य बरोबर घेऊन जयसिंहही दक्षिणेकडे घाईघाईने निघाला होता. किशन गडाच्या आग्नेयेस १७ मैलावरील 'भांबोलाव'[१] (Bhambholao) खेड्यात या दोघांची मुलाखत झाली. आपणाला मेवाडच्या महाराण्याच्या बरोबरीचा मान दिला जावा अशी जयसिंहाने बाजीरावकडे मागणी केली होती. पण बाजीरावाने त्याला सांगितले की, उदयपूरच्या महाराण्याने मुसलमान बादशहाला आपला सम्राट–धनी–अशी मान्यता कधीच दिली नसल्याने तो महाराणा, बाजीरावाचा स्वतःचा धनी, छत्रपती राजा शाहू, याच्या बरोबरीच्या दर्जाचा आहे. याउलट जयसिंह केवळ बादशहाचा एक मनसबदारच आहे. या मुलाखतीसाठी मध्यावर शामियाना उभा केला असून, राजपूत मराठ्यांची दोन्ही सैन्ये, त्याच्या दोन बाजूला वेगवेगळी उभी राहिली होती. (सुमारे १५ फेब्रुवारी). उभयता प्रमुख नेते आपापल्या हत्तीवरून खाली उतरले, त्यांनी एकमेकास आलिंगन दिले आणि ते एकाच गादीवर बसले–पेशवा उजव्या बाजूला आणि जयसिंह डाव्या–.. बाजीराव हा जातीने ब्राह्मण, शिवाय हिंदुस्थानातील सर्वश्रेष्ठ हिंदुराजाचा मुख्यप्रधान होता तरीही त्याच्या वागण्याच्या रीतीभाती वा शिष्टाचार मात्र एखाद्या सामान्य शिलेदारासारखीच रांगडी होती. एखाद्या सैन्यपथकाला जोडून असलेल्या, दारू व सामान्य वस्तूंच्या दुकानातील, मुलीसारखीच नीतिमत्ता असलेल्या[२] (Morals of a Vivandiere) मस्तानी नावाच्या मुलीच्या मोहात तो गुरफटला होता. या मुसलमान मुलीच्या सान्निध्यामुळे त्याच्या रीतिरिवाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करण्यासारखी असली तरी, या सान्निध्यानेही त्याच्या वागण्यात काहीही सुधारणा झाली नव्हती.[३] बैठकीवर बसल्यावर तो आपला हुक्का ओढीत होता आणि आपल्या यजमानाच्या तोंडावर धूर सोडीतच होता. याउलट जयपूरचा राजा रजपूत असला तरी, त्याच्या आवडी–निवडी मोठ्या सुधारलेल्या सभ्य–शिष्टाचाराच्या होत्या. त्याचा विद्वान युरोपिअनांशी सहवास झालेला होता. तेव्हा या दख्खनी माणसाची ही ओबडधोबड, रांगडी वागणूक काही त्याला आवडली नाही पण ती थांबविण्यास वा तिला काहीसा आळा घालण्यास तो असमर्थ होता. अशा प्रकारे उभयता बसल्यानंतर, एकामागून एक असे सर्व मराठा सेनापती जयसिंहापुढे सादर करून त्यांची ओळख करून देण्यात आली. यावेळी मल्हार

१ इंडियन अॅटलास—हिंदुस्थानचा नकाशा संग्रह—नकाशा पृष्ठ N. E. ३४ (ईशान्य ३४)–यानुसार हे खडे अजमीर शहराच्या थेट पूर्वेस ३० मैल असून त्याचे नाव, 'भामोला' (Bhamola) असे तेथे नमूद आहे.

संपादकीय विचारार्थ विशेष सूचना

२ यामध्ये पेशवा बाजीरावाच्या व्यक्तित्वाबाबत ग्रंथकाराने अनुद्‌गार व विपर्यस्त वर्णन केले आहे असे, प्रस्तुत भाषांतर तपासणारे डॉ. कुंटे या तज्ज्ञांचे मत आहे..... त्यांच्याकडे पाठविलेल्या भाषांतर प्रतीच्या 'समासात' त्यांनी पुढील प्रमाणे लिहिले आहे :

"याबाबत" (बाजीरावाची वागण्याची रीत.... सामान्य शिलेदारासारखी रांगडी..... मस्तानीच्या सान्निध्यातही शिष्टाचार शिकला नाही..... ( विकेती मुलगी ) (doubtful morals) .... भाषांतरकाराने आपले मत द्यावे. पेशवे दप्तरात याबाबत सविस्तर हकीगत आहे. बाजीरावासंबंधी असे लिहिताना बाजीरावाचे कर्तृत्व सरकार पूर्णपणे विसरलेले दिसतात. सरकारांचा मराठ्यांविषयीचा आकस यात दिसून येतो. शिवाजीविषयी वाईट लिहिणारे सरकार बाजीराव किंवा शिंदे होळकर याबद्दल वाईट लिहितील यात काहीच शंका नाही. संबंधित भागाचे–परिच्छेदाचे योग्य भाषांतर मी केले आहे.

३ सरकारानी ग्रथित केलेले मत व वर्णन मी बदलणे वा गाळणे योग्य नसून....... मतभेदाबाबत, पुराव्यासकट टीप लिहिणे ही जबाबदारी 'तज्ज्ञांच्याकडे' सोपविण्यात येईल असे मला अधीच सांगितले असून.... ग्रंथातील प्रवाह, वर्णन, हकीगत स्पष्ट करण्यासाठी मी टीपा द्याव्यात असे ठरले आहे. त्याप्रमाणे अनेक टीपा दिल्या आहेत..... " मतभेदाबाबत वा संपादकीय प्रक्रियेबाबत मी टीपा दिलेल्या नाहीत.

होळकर मात्र एकटाच आपल्या तंबूत मागे फुरगटून राहिला होता, त्याला एक कारणही घडले होते. यापूर्वी प्रतापसिंह हाडा, बुधसिंहाला बुंदी परत मिळवून देण्यासाठी, मराठ्यांची मदत मिळावी अशी याचना करण्यास साताऱ्यास आला होता, तेव्हा बाजीराव व मल्हार यांनी ही मदत त्याला देण्याचे शाहूला वचन दिले होते.* पण आता मात्र बुधसिंहाला बुंदी परत द्यावी असे, बाजीरावाने जयसिंहाला सांगितले नव्हते.

नंतर जयसिंहाने बाजीरावाला सांगितले की, दिल्लीवर चाल करण्याच्या त्याच्या बेतासाठी, प्रस्तुत वेळ सोयीची नसल्यामुळे, त्याने आता दख्खनला परत जावे हे त्याच्या दृष्टीनेच अधिक बरे होय. पाहिजे तर पुढील वर्षी अधिक चांगली तयारी करून त्याने परत यावे. याचबरोबर जयसिंहाने त्याला वचनही दिले की, तो दरम्यानचे काळात बादशाही दरबारात आपले वजन खर्च करून शाहू राजाला चौथाई देण्यास आणि माळवाही त्याला देण्यास बादशहाकडून मान्यता मिळवील. असा सल्ला व वचन दिल्यावर जयसिंह आपल्या राजधानीत परत गेला आणि या ठिकाणापासूनच बाजीरावही दख्खनकडे परत निघाला. परत येत असताना, वाटेत 'बेघम' (चितोडच्या ईशान्येस २५ मैलांवर) येथे थांबून, त्याने, मल्हार व प्रताप हाडा यांच्या समवेत, 'बुंदी' गमावलेल्या बुधसिंहाला भेट दिली आणि त्याच्या दुखावलेल्या भावनांचे सांत्वन करण्यासाठी त्याच्याशी चार गोड व प्रेमळ शब्दही तो बोलला. [वंशभास्कर ३२३८–३२४०; पे. द. नि. प. (१४) ५२, ५६ (२२) ३३१, ३३३].

## § १२ : बादशाही पक्षाची बाजीरावाबरोबर, शांतता तहासाठी वाटाघाटीची सुरवात, १७३६

मेवाड व मारवाडबाबत या घटना घडत असताना, दरम्यान बाजीरावाच्या दुसऱ्याही हालचाली सुरू होत्याच. बाजीराव मेवाडमध्ये असतानाच (जानेवारी १७३६) त्याचा प्रतिनिधी, महादेवभट हिंगणे हा जयपूरला गेला. तेथे जयसिंहाचा प्रधान आयामल (राजामल) याने, त्याची जयसिंहाबरोबर ओळख करून दिली. या भेटीमध्ये, पेशव्याना ५ लाखाची देणगी देण्याचे जयसिंहाने मान्य केले व या देणगीपोटी २ लाख रुपये रोख व बाकी रक्कम उंची वस्त्रे, जडजवाहीर, पाच घोडे व एक हत्ती या रूपाने द्यावयाची, असेही ठरले. यावेळी राजा जयसिंहाने, बाजीरावाला निरोप पाठवून आपल्या राज्यात येण्याचे आमंत्रणही दिले व त्याचबरोबर, बाजीरावाला बादशहाकडे नेऊन तो त्यांची मुलाखत घडवून आणील व मुघल सत्ता आणि मराठी सत्ता यांच्यामध्ये टिकाऊ शांतता घडवून आणील असे आणखी वचनही दिले. यावेळी मुघलाबरोबर करावयाच्या तहानुसार मराठ्यांना रोख २० लाख रुपये व माळव्यामध्ये वार्षिक ४० लाख रुपयांची जहागीर मिळावी असे तो बादशहाकडून मान्य करवून घेईल हाही या वचनाचा एक भाग असून शिवाय यापैकी रोख मिळावयाची २० लाखांची रक्कम भोपाळचा, दोस्त–महमदखान याच्याकडून मिळावी अशी तरतूदही करावयाची, हेही त्यात होते. जयसिंहाने देऊ केलेल्या अशा अटी बरोबर घेऊन आयामल बाजीरावाच्या मेवाडमधील छावणीत गेला.[1] . . . . दुसरा मराठा वकील . . . दादाजीपंत . . ,

१ बाजीराव मेवाडमध्ये जगतसिंहाकडे गेला असतानाच जयपूरमध्ये, महादेवभट हिंगणे या अटीबाबत वाटाघाटी करीत होता व त्या ठरल्यानंतरच, यातील आमंत्रणानुसार बाजीराव जयपूरकडे गेला. §११ च्या उत्तरभागात वर्णन केलेली बाजीरावाची जयपूर भेट व तद्नुषंगिक घटना, महादेवभट हिंगणे याच्या या कार्याचीच फलनिष्पत्ती असून या पार्श्वभूमीवरच या घटना समजावून घेणे जरूर आहे.

* पहा : भा. टीप—प्र. ६ §६ व §७. . . .

खान-इ-दौरानच्या छावणीकडे गेला. तेथे त्याने राणोजी शिंदे व रामचंद्र बाबा शेणवी यांच्या-मार्फत वाटाघाटी चालविल्या. यातून बक्षी दौरान याने आपल्यातर्फे नेजाबन अलिखान याला बाजीरावाकडे नजराणा (पैसा) घेऊन पाठविले. [पे. द. नि. प. (१४) ५०, ५१].

या सर्व हालचालींचा थोडक्यात अर्थ, बाजीरावाने यावेळी आपल्या आईला लिहिलेल्या एका पत्रात लिहिल्याप्रमाणे, बादशहा आणि त्याचे सल्लागार, त्याच्याशी मैत्री करण्याला उत्सुक आहेत, असाच आहे. बाजीरावाला स्वतःला कोठेही सशस्त्र लढा द्यावा लागलेला नाही. तथापि घोलपूरच्या दक्षिणेकडील प्रदेशात त्याचे सेनापती आणि शाही अधिकारी (विशेषतः महंमदखान बंगश) यांच्या दरम्यान मात्र युद्ध परिस्थिती अस्तित्वात होती. पण दिल्ली येथून जयसिंहामार्फत तहाबाबत सूचना आल्याबरोबर "लढे थांबवा" असे आदेश बाजीरावाने आपल्या अधिकाऱ्यांकडे पाठविले (७ फेब्रुवारी)–(भा. म्हणजे जयसिंहाच्या भेटीपूर्वीच) आणि जोधपूर प्रदेशातील मराठ्यांची पथकेही त्याने मागे बोलाविली[१] खान-इ-दौरान याने, आपण स्वतःच दिल्लीहून येऊन पेशव्याला भेटावे असा प्रथम बेत केला. पण त्याने तसे न करता त्याच्याऐवजी यादगार काश्मिरी, कृपाराम व नेजाबत अलिखान हे ८ मार्चला दिल्ली येथून निघाले आणि त्यानी बादशहाच्या वतीने वाटाघाटीना सुरवात केली. यानंतर बाजीरावाने आपला प्रतिनिधी बाबूराव याला दिल्लीला पाठविले आणि तो स्वतः अहिरवाडी येथे गेला (अहिरवाडी–सिरोंजच्या ईशान्येस). तेथे शाही दरबाराचे उत्तर घेऊन बाबूराव परत आल्यावर, तो दख्खनकडे परत जाण्यास निघाला.––(१७३६ एप्रिल अखेर.) [पे. द. नि. प. (१४) ५१, ५६, ५८, ५२ ; सियार (२) ८४ ; अखेरचे मुघल–सम्राट (२) २८४].

## § १३ : १७३६ च्या आरंभीची मोहीम : शाही पक्षाचा पराभव

तीन आघाड्यांवर चाललेल्या या मोहिमांचे आपण आता थोडक्यात समीक्षण करू. माळवा, बुंदेलखंड व पूर्व राजपूताना या त्या तीन आघाड्या होत. आधीच्या उपभागात (१२) नमूद केलेल्या, शांतता-तहाच्या वाटाघाटीमुळे या मोहिमा लवकरच संपुष्टात

१ मल्हार व राणोजी यानी 'मेडता'ला (Merta मेर्ता) कूच केले. यावेळी त्याना प्रतापसिंह हाडा याने मार्ग दाखविला शहापुराचा उम्मेदसिंह सिसोदिया (अभयसिंहाचा प्रतिनिधी म्हणून तेथे असलेला) आणि भांडारी (Bhandari –मारवाडचा प्रधान) यांची प्रतापने प्रथम शहरात गाठ घेतली आणि त्यांच्याशी अटीबाबत वाटाघाटी केल्या. पण खंडणीविषयी काहीही एकमत न झाल्याने प्रताप, मराठा छावणीकडे परत आला, आणि उभयपक्षात चकमकी सुरू झाल्या. पहिल्या दिवशी मराठ्यांनी शहर जिंकले. तेथील रहिवाशी आधीच किल्ल्यात पळून गेले असल्याने शहर पूर्णपणे ओसाडच झालेले होते. नंतर मराठ्यांनी किल्ल्याला वेढा घातला आणि त्याच्या भिंतीच्या दिशेने खंदक तयार करण्याचे काम चालविले. शिवाय किल्ल्याच्या परिघाच्या अगदी बाहेरच्या रेषेतील, राजपुतानी आधीच सोडून दिलेले खंदकही त्यांनी व्यापले. किल्ल्यातील शिबंदीने या सर्वच खंदकावर एका मागोमाग एक असे हल्ले केले. यावेळी झालेल्या चकमकीत उभय पक्षांचे महत्त्वाचे काही अधिकारी मारले गेले. किल्ल्याच्या तटावरून मराठ्यांवर भडिमारही करण्यात आला व परिघाबाहेरील सर्वात दूरच्या खंदकातूनही त्याना हुसकावून लावण्यात आले. यानंतर रोज उभय-पक्षी एकमेकावर तोफांचा मोठा भडिमार चालूच राहिला. [पे. द. नि. प. (१४) १४––हे पत्र मल्हार व राणोजी यांनी मेडत्यासमोरच्या त्यांच्या छावणीतून पेशव्याना लिहिले होते. यावरील तारखेबाबत केलेल्या दुरुस्तीमध्ये, संपादकाने १ एप्रिल १७३६ अशी तारीख नोंदली आहे. पण सांभर ठाणे २८ फेब्रुवारी १७३५ ला लुटले होते, यावरून या पत्रावरील सनाची नोंद १७३५ अशी असण्याचा जास्त संभव असून, तारीख १२ एप्रिल १७३५ अशी असावी. पण या दुसऱ्या तारखेच्या व वर्षाच्या संदर्भात पत्रात निर्देश केलेल्या 'बाराचा'--दिवसाचा–विचार केला तर, तो मात्र १७३४ मधील १२ एप्रिलच्या वाराशी जुळतो.

आल्या. नोव्हेंबर १७३५ च्या अखेरीस, नर्मदेच्या काठावरून, पेशव्याने आपल्या सैन्याचा एक भाग माळवा आणि बुंदेलखंडावर स्वारी करण्यासाठी पाठविला आणि तो स्वतः मेवाडकडे निघाला. (भा. पहा § ११). बादशहाच्या बाजूने, अलाहाबादेचा सुभेदार महमद बंगश याला, माळव्याच्या संरक्षणासाठी निघण्याचे हुकूम देण्यात आले. त्याने पाठविलेल्या एका पठाण सैन्य विभागामुळे, ग्वाल्हेरीच्या किल्ल्याने, यशस्वीपणे आपला बचाव केला. तेव्हा तो किल्ला न घेता, तसाच सोडून, बाजी भीमराव जाधव याच्या हाताखालील एक मराठा सैन्य विभाग (Division) ग्वाल्हेरच्या उत्तरेला १५ मैलांवरील नुराबादकडे, पुढे निघाला. तेथे, या विभागाने काही आठवडे आपले मुख्य ठाणे ठेवले व या आपल्या तळाच्या आधाराने पुढे आणखी चाल करून नुराबादच्या वायव्येस ७ मैल आणि चंबळ नदीपासून चार–पाच मैलांवर असलेल्या सिलीया ठाण्यापर्यंत मजल मारली.

दरम्यान १४ जानेवारी १७३६ ला महमदखान बंगश धोलपूरला पोहोचला होता. तेथे त्याने चंबळच्या घळी व दऱ्यातून (Ravines) आपले ठाण मांडले आणि चाल करून येणाऱ्या मराठ्यांना थोपविण्यासाठी नदीवरील, त्या भागातील सर्वच उतारांच्या संरक्षणाची व्यवस्था केली. इकडे मराठा सेनापती सिलीयाजवळ सुमारे दहा दिवस थांबले व या काळात महमदखान बंगशवर नजर ठेवण्यासाठी, त्यानी, घोडस्वारांची टेहळी पथके दररोज नदीपर्यंत पाठविली. पण मराठ्यांना भिऊन, ..."बंगश मात्र एकदाही नदीच्या वाळवंटातील घळी व दऱ्या, यातील भुयारातून बाहेर पडेना." यामुळे मराठ्यांच्या टेहळ्या तुकड्यांची त्याच्याशी एकदाही चकमक होऊ शकली नाही. नंतर बाजी भीमरावाने बागोहिणी खेड्यावर अकस्मात हल्ला करून हे लुटले. हे खेडे सिकरबार जमातीतील एका लुटारू नायकाचे भक्कम ठाणे असून सिलीयाच्या पश्चिमेस ११ मैलांवर होते. अशा प्रकारे मुघल पक्षियांनी, सबंध जानेवारी महिना आणि फेब्रुवारीचा आरंभीचा काळही काहीही न करता स्वस्थ बसून काढला. यानंतर तहाच्या अटींबाबत विचारणा करण्यासाठी मराठ्यांच्याकडे बंगशकडून जासूद आले ; आणि याचवेळी, दिल्ली-दरबाराचा कल तहाचे बाजूने असल्याचे पाहून (भा. पहा १२) पेशव्यांकडूनही मराठा सेनापतीना हुकूम येऊन या विभागातील लढाऊ हालचाली थांबविण्यात आल्या. (हे हुकूम भीमरावाला १ मार्चला मिळाले). यानंतर, स्वारी करून आलेले मराठे माळव्यातून माघारी गेले. पुढे मे महिन्यात, जयसिंहाच्या सूचनेनुसार, बादशहाने बाजीरावाची नेमणूक, माळव्याचा डेप्युटी गव्हर्नर म्हणून करून, कच्छवा राजा जयसिंह याला औपचारिक व नामधारी सुभेदार नेमले.—(भा. याचा अर्थ असा की सुभेदारीच्या अधिकाराचा प्रत्यक्ष वापर पेशव्याना देण्यात येऊन, जयसिंह फक्त नामधारी सुभेदार राहिला). यानंतर पेशव्याने १७३६ च्या पावसाळ्यात आपल्या एका सैन्याचा तळ माळव्यातच स्थापन करून हा सुभा व्यापला [पे. द. नि. प. (१४) ५५, ५६, ६२ (१३), ४८ (२२), ३३१].

या मुघल-मराठा संघर्षातील बंदेलखंड ही दुसरी आघाडी. तेथे वजीराच्या सैन्याने नरवर मार्गाने जाऊन, ओर्च्छाच्या पूर्वेस १२ मैलांवर असलेल्या अर्जल सरोवरापर्यंत चाल केली. तेथे खंदक तयार करून त्यात वजीराने आपली छावणी ठोकली व उपवासाच्या रमजान महिन्यात, स्वारी करून येत असलेल्या शत्रूला तोंड देण्यासाठी तो राहिला (जानेवारी १७३६). या काळात उभय पक्षांच्या टेहळ्या पथकात वारंवार चकमकी झाल्या. अखेरी ३ फेब्रुवारीला मराठ्यांनी हल्ला चढविला पण दिवसभर लढाई दिल्यानंतर

त्यांनी रात्री माघार घेतली व ते दख्खनकडे झपाट्याने परत निघाले. तेव्हा शोध करून त्यांना गाठण्यासाठी मुघलांनी त्यांचा उज्जैनपर्यंत पाठलाग केला पण ते त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर मागेच राहिले. [उत्तर काळातील मुघल–Later Mughals–(२) २८२–२८३.][१]

या लढ्यातील तिसरी आघाडी म्हणजे पूर्व राजपुताना. लढ्याच्या या पश्चिम विभागात, मराठ्यांना राजपुतान्याबाहेर घालवून देण्यासाठी खान-इ-दौरान याला पाठविण्यात आले होते. त्याला जयसिंह येऊन मिळाला. तेव्हा, मल्हार व त्याचा मित्र प्रताप हाडा यांच्या छावणीकडे तोंड करून, खानाने 'तोडा टोंक' येथे खंदक तयार करवून त्यात आपली सुरक्षित छावणी ठेवली. पण मराठ्यांनी शाही सैन्याला, कांही हालचाल करू न देता, या छावणीतच निष्क्रिय बनवून, बरेच आठवडे रहाण्यास भाग पाडले. या हालचालीत एके दिवशी तर, चंदी-वैरण आणण्यासाठी, या छावणीतून बाहेर पडलेले, त्यांचे सुमारे १५०० सैनिकांचे एक पथक मराठ्यांनी जवळजवळ सगळेच कापून काढले. पुढे फेब्रुवारी महिन्यात सुरू झालेल्या तहाच्या वाटाघाटीमुळे या बाजूच्या हालचालींचा शेवट कण्यात येऊन मराठे निघून गेले[२] आणि अडकून राहिलेले बादशहाचे हे दोन सेनापती मोकळे झाले. [Later Mughals : उत्तर काळातील मुघल....(२) २८३–२८४.

## § १४ : बाजीरावाची उत्तर हिंदुस्थानावर स्वारी १७३७–३८

जयसिंहाने मध्यस्त म्हणून केलेल्या वाटाघाटीतून काहीही निश्चित स्वरूपाचा खरा समेट घडविता आला नाही. जयसिंहाला माळव्याचा औपचारिक पण प्रत्यक्षात नामधारी सुभेदार नेमून बाजीरावाला नायब सुभेदार (डेप्युटी गव्हर्नर) नेमण्याला जयसिंहाने बादशहाचे मन वळविले (भा. पहा §१३ परि. २)........"ही व्यवस्था म्हणजे राज्यकारभार चौकटीच्या औपचारिक दृष्टिकोनातून नसली तरी, परिणामाच्या दृष्टीने, प्रत्यक्षात हा सुभा मराठ्यांना देऊन टाकणारीच होती. मराठ्यांना द्यावयाच्या इतर सवलतींच्या दृष्टीने पाहिले तर त्यापैकी आणखी एकाच सवलतीला बादशहाने मान्यता दिली होती......"मुघल दख्खनच्या ६ सुभ्यावर, राजा शाहूला 'सरदेशपांडे' (Sar Deshpandya) हे अधिकार व वतन, वंशपरंपरागत रीतीने देण्यात आले......यासंबंधी शाहूला द्यावयाची रक्कम महसुलाच्या पाच टक्के असेल." .....अशी ही मान्यता दिलेली आणखी एकच सवलत होती. एकूण वाटाघाटीतून मिळालेल्या एवढ्याच फायद्यांनी मराठ्यांचे समाधान झाले नाही. तेव्हा जयसिंहाकडून आलेल्या गुप्त आमंत्रणानुसार, बाजीराव १२ नोव्हेंबर १७३६ ला

१ बुंदेलखंड मोहिमेचा हा वृत्तांत फक्त 'आशब (१) ३५७–३६२' या आधारावरच येथे नमूद केला आहे...... पण या मोहिमेबाबत मराठ्यांचे सर्व आधार मुग्ध आहेत. आशबचे हे लिखाण १७८४ मधील असून डॉ. आर. सिंह यानी सुचविल्याप्रमाणे या लिखाणात आशबने 'वर्ष' नमूद करताना गोंधळ केला आहे.

२ या संदर्भात आर्विनने (Irvine) नमूद केले आहे [(२) २८४] ते असे : "जयसिंह व बाजीराव यांची धोलपूर येथे, ८ रबी, ११४९ (६ जुलै १७३६, O. S.).... या दिवशी भेट झाली." पण (लेखक सरकार याबाबत लिहितात) हे घडणे अशक्य आहे कारण पेशव्याच्या नोंदीवरून [पे. द. नि. प. (२२) ३३३] दिसून येते की "तो २४ जून १७३६ रोजी पुण्यात परत आला." आर्विनने केलेला निर्देश "पर्शिअन लेखकांच्या आधारावरून" केला असून, प्रस्तुत घटनेबाबत या, पर्शिअन भाषेतील आधारभूत लेखनात "वर्षाचे नोंदीबाबत" गोंधळ केलेला आहे. एका पेशव्याची ८ रबी (१) या दिवशी जयसिंहाबरोबर भेट झाली हे खरे पण हे वर्ष ११५४ (भा. हिजरी) म्हणजे १३ मे १७४१ असून हा पेशवा म्हणजे बाळाजीराव हा होता. [पे. द. नि. प. (२१). २].

आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी, दिल्लीच्या दरवाजाला युद्ध नेऊन भिडविण्याला, पुन्हा पुण्यातून बाहेर पडला [वंश भास्कर २४०; पे. द. नि. प. (२२) ३४१; उत्तर काळातील मुघल (२) २८४].

उत्तर हिंदुस्थानावर केलेली १७३७ मधील ही, बाजीरावाची मोहीम, त्याने केलेल्या अनेक मोठ्या यशस्वी मोहिमांपैकी, सर्वांत अधिक प्रसिद्ध व पराक्रमी होय. त्याच्या या स्वारीची, संपूर्ण तपशीलवार माहिती, पर्शियन आधारावरून मिळवून, डब्ल्यू. आर्यविन याने "उत्तर काळातील मुघल" या आपल्या ग्रंथात दिली असून, प्रस्तुत लेखक-सरकार-यांनी संपादित केलेल्या, त्या ग्रंथाच्या, आवृत्तीनुसार येथे ती दिली आहे. [उत्तर काळातील मुघल-ज. सरकार संपादित आवृत्ती (२) २६८-३०६]. या मोहिमेतील सर्व तपशील येथे पुन्हा देण्याची जरुरी नसून त्यातील महत्त्वाच्या बाबींचा फक्त निर्देशच पुरा आहे; तो पुढील प्रमाणे : . . . . "(बाजीरावाने) भदौर ( Bhadaur ) वर स्वारी करून 'अतेर' जिंकले, . . . . . मल्हार होळकर व इतर काही सेनापती यांच्या हाताखाली आपल्या सैन्याचा एक विभाग वेगळा करून दोआबाकडे पाठविला. या पथकानी दोआबाच्या दक्षिण भागात ( Lower Doab ) भा. गंगा-यमुना दोआबाचा खालचा भाग म्हणजे दक्षिण भाग. . . .आग्रा-मथुरा भाग) जवळच स्वारी केली ; औंधच्या सादतखानाने जलेसार येथे त्यांचा १३ मार्चला पराभव केला. . . . . शाही पक्षाने मराठ्यांच्या या पराभवाबाबत खूपच अतिशयोक्ती केली आहे असा मराठ्यांनी पाठविलेल्या खलित्यात दावा केलेला आहे. . . . बाजीरावाच्या घोडदळाने दिल्लीच्या परिसरावर, दौड मारून झपाट्याने चढाई केली आणि काल्कादेवी लुटली-(३० मार्च); राजधानी व दरबारात दहशत पसरली; ताल कटोरा येथे बादशाही पक्षाची दाणादाण झाली ; बादशहापूर येथे वजीराने जय मिळविला (३१ मार्च); बाजीरावाने अकस्मात राजपुतान्याकडे माघार घेतली; बादशहाच्या मदतीसाठी निजाम आला (२ जुलै); त्याची, भोपाळजवळ बाजीरावाशी लढाई (डिसेंबर) पराभव—दोराह येथे त्याने मराठ्यांशी, अपमानकारक तह मान्य केला. . . . . बाजीरावाच्या या मोहिमेतील महत्त्वाच्या हालचाली व घटना यांचा एवढाच निर्देश येथे पुरा आहे.

राजपुतान्यावर मात्र या मोहिमेचा, एका हालचालीशिवाय, काही परिणाम झाला नाही. या प्रांताला स्पर्श करणारी या मोहिमेतील एकुलती एक घटना म्हणजे, डिसेंबर १७३७ मध्ये, भोपाळजवळ बाजीराव निजामाला वेढा घालीत होता त्यावेळची आणि त्या संदर्भातील होय. सफदरजंग आणि कोट्याचा महाराव दुर्जनसाल हाडा हे दोघे, निजामाला सोडविण्यासाठी चालून येत असताना त्याना मल्हार होळकर व जसवंत पवार यानी अडविले आणि त्यांचा पराभव केला. मराठ्यांशी केलेल्या या शत्रुत्वाच्या कृत्याबद्दल, निजामानंतर महारावाला मराठ्यांचा मोठा तडाखा सोसावा लागला. मराठ्यांशी तह करून निजाम दिल्लीला माघारी गेल्यावर, मल्हार होळकर व जसवंत पवार याना बरोबर घेऊन, बाजीरावाने कोट्याकडे चाल केली, किल्ल्याला वेढा घातला आणि "तो प्रांत लुटून संपूर्णपणे-उध्वस्त केला." (जानेवारी १७३८). दुर्जनसालाने गांग्रोणी (Gangroni) किल्ल्याकडे पळ काढला व १० लाख रुपये दंड देण्याचे मान्य करून तह केला. यातील ८ लाख तर ताबडतोब देऊन (१० फेब्रुवारीचे आत) आणि बाकीच्या दोन लाखाबद्दल, करारनाम्यावर सही करून दिली.[१]

१ पहा : उत्तर काळातील मुगल सम्राट (२) ३०४; पे. द. नि. प. (१५) ६८, (२२) १२०. पुढे एक वर्षापेक्षा अधिक काळ ही बाकी द्यावयाची राहिली. वंश भास्कर-३२४९ मध्ये म्हटले आहे की, कोट्यावर चाळीस दिवस भडिमार चालू होता. अखेरी दंडादाखल ही खंडणी मान्य करण्यात आली.

अवर्षणामुळे निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळाने, यमुनेच्या काठापर्यंतचा बुंदेलखंड व ईशान्य माळवा हा भाग, १७३७ या संपूर्ण वर्षभर उध्वस्त व ओसाड केलेला होता. रस्त्यावरील, पाणी मिळण्याची ठिकाणे कोरडी पडली होती व पुढील नवे पीक काढण्यापूर्वी, माणसांना वा घोड्यांना या मोठ्या प्रदेशात अन्न मिळणे शक्य नव्हते. पुढल्या वर्षी हा दुष्काळ दख्खनमधील औरंगाबाद व नगर जिल्ह्यात पसरला. पुढे लवकरच, दुष्काळापेक्षाही अतिभयंकर अशी नवीच आपत्ती या कमनशिबी देशावर कोसळली. [पे. द. नि. प. (१४) ५२, (१५) ८ व ६३].

१७३८ च्या अखेरी, अखेरी, हिंदुस्थानच्या वातावरणात नदिरशाहाच्या येणाऱ्या स्वारीची घनदाट छाया पडू लागली. १७३८–३९ च्या हिवाळ्यात माळवा व राजपुतान्यामध्ये मराठ्यांच्या योजनाबद्ध मोहिमा झाल्या नाहीत. पण या काळात नादिरच्या स्वारीने, दिल्लीचे साम्राज्य, पायापासून हादरून सोडले आणि परिणामतः तो परत गेल्यावर, 'माळव्यामध्ये साम्राज्याची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा आणखी काहीही प्रयत्न झाला नाही.

## § १५ : बाजीरावाबरोबर चाललेल्या बादशहाच्या वाटाघाटी कशा मोडल्या

१७३५ च्या मोहिमेच्या काळात, ज्यावेळी बादशाही अधिकाऱ्यांनी, बाजीरावाकडे तहाबाबत प्रस्ताव सुरू केले तेव्हा बाजीरावाने बादशहाला लिहून आपल्या मागण्या कळविल्या होत्या. . . . .त्यापुढीलप्रमाणे :

(१) माळवा आणि त्या सुभ्यातील, काही ठाणी व काही भाग वगळून, राहिलेल्या सर्व प्रदेशावरील सुभेदारी द्यावी. वगळावयाची ठाणी व भाग पुढीलप्रमाणे असावेत : १. बादशहाच्या स्वतःच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेले किल्ले आणि २. जहागिरदार, जुने सरंजामदार, करमाफी असलेल्या जमिनी देणग्या म्हणून धारण करणारे व रोजभत्ता घेत असलेले–अशा व्यक्तींच्या जमिनी.

(२) पेशव्याने या युद्धासाठी, पहिल्या वर्षी केलेल्या खर्चाची भरपाई म्हणून त्याला १३ लाख रुपये रोख द्यावे. ही रक्कम तीन हप्त्यांनी द्यावी हे हप्ते असे : . . . . . **पहिला हप्ता** . . . . . पिलाजी जाधव दरबारात येऊन हा तह निश्चित करील त्यावेळी ४ लाख रुपये द्यावेत. **दुसरा हप्ता**––पाच लाख रुपये, खरीप पिके काढण्याच्या वेळी (भा. पावसाळी पिके, काढण्याची वेळ ऑक्टोबर–नोव्हेंबर) द्यावे आणि **तिसरा हप्ता**––चार लाख रुपये, रब्बी पिके तयार होतात, त्यावेळी (भा. हिवाळी पिके. . . .तयार होतात, वसंत ऋतूत. . . .मार्च-एप्रिल).

(३) राजा शाहूला दिलेल्या हक्काच्या मोबदल्यात द्यावयाचा नजराणा हप्त्याने देण्यात येईल. . . . . .राजा शाहूला दख्खनमधील बादशहाच्या ६ सुभ्यांच्या " सरदेशपांडे " ( Sar Deshpandya ) वतनाचे हक्क देण्यात आले आहेत त्या निमित्ताने, नजराणा म्हणून ६ लाख रुपये द्यावयाचे त्याने मान्य केले आहे. यापैकी चतुर्थांश रक्कम ताबडतोब रोखीने दिली जाईल पण बाकीची तीन चतुर्थांश रक्कम, पुढे, त्याने हे सुभे प्रत्यक्षात आपल्या ताब्यात आणल्यावर हप्त्या-हप्त्याने दिली जाईल (बाजीरावाने लेखी पाठविलेल्या मागण्या अशा होत्या).

पिलाजी जाधव दिल्ली दरबारी येण्यापूर्वी 'बाबूराव' नावाचा एक खास मराठा दूत दिल्लीला पाठविण्यात आला होता. (भा. पुढील वाटाघाटींची पार्श्वभूमी तयार करण्यास

आणि कदाचित लेखी मागण्या आगाऊ देण्यास पाठविला असावा.). त्याने, बाजीरावाच्या लेखी मागण्याशिवाय, आणखी दोन लाख रुपये 'बक्षीस' म्हणून चिमणाजीला (पेशव्याचा भाऊ) द्यावे अशी मागणी केली. चिमणाजी हा, 'या' सरकारचा एकनिष्ठ सेवकच असून, बादशहाचे हितसंबंध जोपासण्याचे धोरण स्वीकारण्यास, त्याने, अनेक मार्गांनी, बाजीरावाचे मन वळविण्याचे काम केलेले आहे असे कारण या मागणीसाठी त्याने पुढे केले होते. यातील अर्धी रक्कम पिलाजी ज्यावेळी दिल्लीस येऊन पोहोचेल त्यावेळी द्यावी आणि राहिलेली अर्धी रक्कम, बादशहा व मराठे यांचा उभयपक्षी करार झाल्यानंतर, 'रब्बी' (वसंतऋतूची) पिके हाती येण्याचे वेळी द्यावी अशी ही सूचना बक्षिसाच्या या मागणीबरोबरच होती. वरील सर्व मागण्यापैकी प्रत्येक मागणीच्या समोर "मंजूर" असे बादशहाने लिहिले.

पण मंजूर केलेली अशा प्रकारची प्रत्येक सवलत म्हणजे बादशहाच्या दुर्बलतेचेच एक–एक चिन्ह होय असा याचा बाजीरावाने अर्थ लावला. यापुढे एकामागून एक केलेल्या मोहिमांचे वेळी दिसून आलेल्या शाही सरकारच्या दौर्बल्याच्या वाढत्या पुराव्यामुळे बाजीरावाने आपल्या मागण्या वाढवीतच नेल्या, त्या इतक्यापर्यंत की, अखेरी त्याने त्यांच्याबाबत आपला हक्कच आहे असा दावा केला. हक्काच्याच म्हणून मागणी चालविलेल्या या बाबी अशा :

(१) शाही लष्कराच्या मदतीने, भोपाळमधून यार महमदखानाला हाकलून दिले जावे—त्याचे वतन आणि मालमत्ता बाजीरावाला दिली जावी.

(२) दख्खनच्या सहा सुभ्यांमध्ये मिळून वार्षिक पन्नास लाख रुपये उत्पन्नाची जहागीर पेशव्याला मिळावी. [ या प्रदेशावर, प्रत्यक्षात गैरहजर असलेला सुभेदार म्हणून—म्हणजे औपचारिक पण नामधारी सुभेदार म्हणून,—बादशहाच्या एखाद्या मुलाची नेमणूक करावी (भा. म्हणजे हा अधिकार व्यवहारतः पेशव्यानेच वापरावयाचा आहे.) ]. याशिवाय दख्खनमध्ये, बाजीरावाच्या खटपटीमुळे जो काही महसूल बादशहासाठी म्हणून केला जाईल, त्यातील अर्धा बाजीरावाला मिळावा.

(३) तंजावरचे (Tanjaor) सबंध राज्य शाहूला मिळावे.

(४) पांडु, धार आणि राइसिन ( Raisin ) हे माळव्यातील किल्ले, पेशव्याला आपल्या कुटुंबियाना ठेवण्यासाठी मिळावे.

(५) उत्तरेकडे चंबळ नदीपर्यंतचा सर्व प्रदेश पेशव्यांना जहागीर म्हणून देण्यात यावा. मात्र या प्रदेशातील राजानी जर बाजीरावाचे वर्चस्व मान्य केले आणि त्यानी आपापली खंडणी दिली तर त्या राजांच्या जहागिरीना—जमिनींना—काहीही धक्का न लावण्याचे वचन बाजीरावाने द्यावे.

(६) माळवा व बुंदेलखंडमधील बादशहाच्या सर्व सरंजामदारांनी (भा. लष्करी नोकरीबद्दल जहागीर वा इनामे धारण करणारे) मिळून बाजीरावाला एकूण दहा लाख पाच हजार रुपये खंडणी द्यावी.

(७) दख्खनमध्ये बादशहाने करावयाची सर्व व्यवस्था, पेशव्याच्या मार्फतच करण्यात यावी.

(८) कर्जामध्ये फारच गुरफटलेल्या, बाजीरावाला, ५० लाख रुपये देण्याबाबत तातडीचा हुकूम बंगालच्या सुभेदाराला द्यावा.

(९) अलाहाबाद, बनारस, गया आणि मथुरा या ठिकाणी पेशव्यांना जहागिरी द्याव्या. (हिंदूंची अतिशय महत्त्वाची तीर्थक्षेत्रे पेशव्यांना आपल्या ताब्यात ठेवता यावी हा या मागणीमागचा हेतू आहे).

(१०) बादशहाची, स्वतः भेट घेण्यासाठी बाजीराव प्रथम आग्र्यापर्यंत जाईल. तेथून अमिरखान व जयसिंह यांनी त्याला दिल्लीला न्यावे, आणि तेथे, बादशहाची रपेट चालू असताना त्याची बादशहाशी भेट करवावी (दरबारात नव्हे), नंतर लवकरच बाजीरावाला घरी परतण्यास परवानगी द्यावी. (भा. औपचारिक रीतीच्या दरबारातील दुय्यम स्थान टाळण्यासाठीच ही मागणी होती हे उघडच आहे).

(११) १५ लाख रुपये बाजीरावाला द्यावे.—ते पुढीलप्रमाणे : पाच लाख रुपये तो माळव्यात पोहोचेल तेव्हा,—पाच लाख रुपये तो बादशहाला भेटेल तेव्हा आणि राहिलेले पाच लाख वर्षअखेरी द्यावे.

(भा. वरील कलम २ व ५ मधील रकमा वार्षिक द्यावयाच्या—कलम ८ व ११ मधील एकदाच द्यावयाच्या मात्र कलम ११ मधील रक्कम नमूद केलेल्या तीन हप्त्यांनी द्यावयाची. बाजीरावाने १७३५ मध्ये केलेल्या ३ लेखी मागण्या व पुढे ३–४ वर्षांनी केलेल्या या ११ मागण्या यातील फरक मोठा व बोलका आहे. . . . . . . १७३४–३९ काळातील मोहिमांतून हा फरक निर्माण झाला.)

२९ सप्टेंबर १७३६ ला, महमदशहाने, एक शाही 'फर्मान' काढून, बाजीरावाला अनेक गोष्टी बहाल केल्या. त्यानुसार त्याला, काही जहागिरी, त्याचा वैयक्तिक दर्जा दाखविणारी, स्वतःसाठी 'सप्तहजारी' ही मनसब, त्याने स्वतःचे म्हणून आधीच मिळविलेल्या वतनापैकी सर्व महालांची औपचारिक सनद, आणि काही अवांतर प्राप्तीचे व सवलतींचे हक्क, अशा गोष्टी या फर्मानाने त्याला देण्यात आल्या होत्या. (भा. या सर्व देणग्या कायम, स्वरूपाच्या व कायम उपभोगावयाच्या होते.) याशिवाय या मैत्रीच्या-तहाच्या प्रसंगाला अनुरूप म्हणून, सात निरनिराळे भाग अंतर्भूत असलेला, मानाचा पोशाख, (भा. अंगरखा, सुरवार, दुपट्टा, मंदिल, फेटा इ. सात) फेटयावर लावण्याचा तुरा—(जिघा—Jigha–Aigrette) आणि डोक्याभोंवती बांधण्याचा सरपेच (एक दागिना), असा, प्रसंगानुरूप मानाचा आहेरही त्याला या फर्मानाबरोबर बहाल करण्यात आला. या बरोबरच, साम्राज्याचा एक निष्ठावंत अधिकारी म्हणून साम्राज्याची सेवा करण्याची आज्ञाही त्याला दिली, आणि बादशहाचे इतर जामीनदार, कुळे व सेवक बादशहाला येऊन भेटतात त्याप्रमाणे त्यानेही स्वतः येऊन बादशहाला भेटावे असेही त्याला आमंत्रण देण्यात आले.[1]

## § १६ : १७४१ मध्ये माळवा बाजीरावाला देण्यात आला

अशा गोष्टी दिल्या तरी, कधीही समाधान करता येणार नाही, अशा, बाजीरावाच्या महत्त्वाकांक्षेमुळे, तह घडवून आणणे अशक्य झाले. बाजीरावाच्या नव्या* बेसुमार मागण्या मंजूर करण्याचे बादशहाने स्वाभाविकच नाकारले. (भा. १५ दुसऱ्या अर्धात नमूद

१ (भा. टीप : १७३६ च्या फर्मानाने मान्य केलेल्या मागण्या व दिलेल्या गोष्टी या १७३५ अखेरपर्यंतच्या मोहिमा व वाटाघाटी यासंदर्भात होत. बाजीरावाने बाबुराव व पुढे पिलाजी जाधव यांच्या हस्ते पाठविलेल्या तीन लेखी मागण्या (भा. पहा §१५ प्रारंभ) याच सुमाराच्या होत. पण §१५ दुसऱ्या अर्धात नमूद केलेल्या, खूपच वाढविलेल्या मागण्या या १७३७–३८ च्या मोहिमेच्या काळातील होत. ही मालिका वाचकांनी दृष्टीआड होऊ देऊ नये. . . . . या पार्श्वभूमिवरच पुढे §१६ अर्थ स्पष्ट होईल.

केलेल्या). अशा रीतीने, पेशव्याचा दिल्ली सरकारबरोबरचा झगडा बाजीरावाच्या उर्वरित आयुष्यात अनिर्णितच राहिला. त्याच्या मृत्यूनंतर (२८ एप्रिल १७४०) रघुजी भोसल्याने बाजीरावाचा मोठा मुलगा बाळाजीराव हा पेशवेपदावर येऊ नये म्हणून कारस्थाने केली ती मोडून काढून बाळाजीराव पेशवेपदावर आला. पूर्वी पित्याचे, दांडगाईचे व धाक-दपटशाचे डावपेच जेथे अयशस्वी झाले होते, त्या मुघलाबरोबरच्या तहाबाबत, आता नव्या पेशव्याची मुत्सद्देगिरी व व्यवहारचातुर्यही यशस्वी झाली. (या काळात नादिरशहाच्या स्वारीमुळे बादशाही सरकार विस्कळीत झाले होते. या परिस्थितीची. बाळाजीच्या डावपेचाना मदत झाली हेही मान्य केलेच पाहिजे). बाळाजीने १७४१ च्या मार्च महिन्यात, उत्तरेकडे जाण्यासाठी कूच केले. . . . .आणि ग्वाल्हेरपर्यंत तो पोहोचला. यावेळी जयसिंह आग्र्याचा सुभेदार होता. आपल्या हाताखालील लष्करी अधिकारी, दख्खनी शत्रूशी लढावयाच्या पद्धती व डावपेच याबाबत अगदीच अननुभवी आहेत, यामुळे बळाच्या जोरावर यावेळी लढा देणे अयशस्वी होईल असे जयसिहाने बादशहाला कळविले. नंतर त्याने आपले जासूद तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी बाळाजीरावाकडे पाठविले आणि त्याला कळविले की, तुम्ही गुजरात व माळवा हे दोन सुभे घेऊन तेवढ्यावर समाधान मानावे आणि दुसऱ्या कोणत्याही प्रांताबाबत ढवळाढवळ करू नये. यावर पेशव्याने उत्तर पाठविले की, सबंध हिंदुस्थानचा चौथ मिळण्याचा त्याचा हक्क असला तरी, निर्देशिलेले दोन सुभे घेऊन समाधान मानावयाला तो एका अटीवर तयार आहे. ही अट अशी की, बादशहाने आपले शाही 'फर्मान' काढून, हे दोन सुभे कायदेशीरपणे पेशव्यांचेकडे सुपूर्द केले पाहिजेत. या उत्तरा-बरोबरच, बादशहाला कमीपणा वाटू नये व औपचारिकपणे त्याचा मान राखला जावा म्हणून बाळाजीने एक विनंती अर्जही बादशहाकडे पाठविला आणि त्यात, आपण मुघल सिंहासनाशी इमानी आहोत असे व्यक्त करून पादशहाचे आपण एकनिष्ठ सेवक आहोत असेही जाहीर केले. या औपचारिक अर्जाला जयसिंहाच्या सल्ल्यानुसार बादशहाने प्रतिसाद दिला आणि ४ जुलै १७४१ ला, पेशव्याला माळव्याचे नायब सुभेदारपद बहाल केल्याचे फर्मान काढले. अर्थातच बादशहाने पूर्ण शरणागती पत्करली हे वास्तव झाकून ठेवून, बादशहाचा औपचारिक मान राखण्याचाच हा एक प्रकार होता [चहार गुलझार ३७६अ, ३७७ अ; पे. द. नि. प. (१५) ८६].

१२ मे ला, बाळाजीरावाने धोलपूरजवळ जयसिंहाची भेट घेतली. नंतर १५ तारखेला जयसिंह बाळाजीकडे परत भेटीसाठी आला आणि २० तारखेला पेशवा आपल्या घराकडे परत जाण्यासाठी निघाला. पुढे जुलैच्या प्रारंभी, निर्दिष्ट केलेले, ४ जुलैचे शाही फर्मान येऊन पोहोचले आणि तह[१] पक्का झाला. [पे. द. नि. प. (२१) २].

अशा प्रकारे, माळवा, दिल्ली साम्राज्याचा भाग म्हणून रहाण्याचे संपुष्टात आले.

१ या तहानुसार, बाळाजीरावानेही आपल्यातर्फे काही लेखी आश्वासने दिली ती पुढील प्रमाणे: (१) बादशहाला भेटण्याचे मान्य. (२) कोणीही मराठा नर्मदा ओलांडणार नाही. ती जर कोणी ओलांडली तर त्याच्या कृत्याबद्दल पेशवा स्वतः जबाबदारी स्वीकारेल. (३) माळव्याखेरीज इतर कोणत्याही सुभ्याला पेशवा हात लावणार नाही. (४) आतापर्यंत मंजूर केलेल्या पैशाव्यतिरिक्त अधिक मागणी यापुढे कधीही करणार नाही. (५) ५०० घोडेस्वारांचे पथक बरोबर घेऊन एक मराठा सेनापती शाही लष्करात सतत सेवा करील. (६) शाहीपक्ष जेव्हा एखाद्या मोहिमेवर निघेल तेव्हा ४००० सैनिक घेऊन पेशवा त्याना मिळेल. यापेक्षा जास्त लष्कराची मदत जर बादशहाने मागितली तर मात्र या जादा सैनिकांचा खर्च (Subsistance) दिल्ली सरकारने द्यावयाचा आहे. [पे. द. नि. प. १(१५) पृष्ठ ९७]

प्रकरण सातवे

# राजपुताना–१७४१–१७५१

## १ : गंगवानाची लढाई, जयसिंहाचे अखेरचे दिवस

नादिरशहाच्या स्वारीने, दिल्ली साम्राज्याला असा काही सर्वनाशी तडाखा दिला की, त्या स्वारीनंतर राजपुतान्यातील शाहीसत्तेचे समूळ उच्चाटन होऊन तेथे ती केवळ नावालाच उरली. यामुळे राजपूत राजे मात्र, आपल्या देशाच्या आत, आपापसात सतत कडवटपणे भांडण्यास व लढाया करण्यास मोकळे राहिले आणि यातून त्यांच्या दैवाबाबत, त्यांच्या भविष्याबाबत, निर्णय करणारा मध्यस्थ या नात्याने मराठे मात्र, त्यांचे नवे धनी म्हणून प्रस्थापित झाले. या आधीच्या काळातील साम्राज्याच्या राजकारणात, ज्या काही राजपूत राज्यकर्त्यांचे वजन व महत्त्व होते ते राज्यकर्ते पुढील अकरा वर्षांच्या काळात, मृत्यूमुळे राजकीय मंचावरून नाहीसे झाले—सवाई जयसिंह १७४३ मध्ये, अभयसिंह १७४९ मध्ये आणि इश्वरीसिंह १७५० मध्ये—यामुळे राजपुतान्यावरील सार्वभौम सत्तेमध्ये होत असलेला बदल अधिकच सुलभपणे झाला. या तिघांच्याही जागी आलेले राज्यकर्ते सामान्य–छोटे–असून त्यांनी मदतीसाठी ज्याच्याकडे पहावे असाही कोणी समर्थ, सार्वभौम बादशहा आता राहिला नव्हता. यामुळे हे नवे छोटे राजपूत राज्यकर्ते मराठ्यांविरुद्ध उभे ठाकण्यास स्वाभाविकच असमर्थ होते.[1]

---

१ १७४१ नंतरच्या सुमारे एकाच दशकात राजपुतान्यात अनेक झगडे झाले. त्यात प्रामुख्याने जयपूर–(कच्छवा घराणे), जोधपूर (मारवाड–राठोड घराणे) आणि बुंदी (हाडा घराणे), या राजघराण्यातील वारसा हक्कासाठी झालेले झगडे, हे विशेष अर्थाने राजपुतान्यात सर्वव्यापी व तीव्र बनले, शिवाय कोटा, रूपनगर-बिकानेर अशा अनेक छोट्या राज्यातही असेच लढे झाले. हे सर्व लढे एकमेकात गुंफले जाऊन, प्रत्येक लढ्यात जवळजवळ सर्व राजपुताना गुरफटलेला दिसू लागला. प्रत्येकाने आपल्याला मित्र व मदत मिळविण्यासाठी, दुसऱ्या सगळ्याच लढ्यातील कोणत्या ना कोणत्या पक्षाची बाजू घेतली. उदाहरणार्थ कच्छवा राण्यातील लढा इश्वरीसिंह व माधोसिंह या भावांच्या दरम्यान झाला पण माधोसिंहाच्या वतीने मेवाडचा महाराणा, बुंदीतील एक पक्ष... उम्मेदसिंह हाडा, रूपनगरचा बहादूरसिंह हाडा, दुर्जनसाल असे एकत्र झाले तर इश्वरीच्या बाजूला यांचे प्रतिस्पर्धी होते. हेच झगडणारे जोधपूर राठोड यांच्या झगड्यात शिरले. तेथे अभयसिंह (नंतर याचा मुलगा रामसिंह) विरुद्ध बख्तसिंह असा मूळचा झगडा होता. इतर झगड्यातल्या प्रतिस्पर्ध्यांनी या झगड्यातील प्रतिस्पर्ध्यांशी हातमिळवणी केली. अशीच कथा बुंदी येथील झगड्याची (बुधसिंह–उम्मेदहाडा विरुद्ध दलिलसिंह) झाली.

या सर्व झगड्यातील प्रतिस्पर्ध्यांनी मराठ्यांची मदत मिळविण्यासाठी धडपड केली.....त्याना पाचारण केले, पैसे दिले, खंडणी कबूल केली, शेवटी परगणे दिले.... ही मदत मिळविण्यासाठी आपापसात स्पर्धा केली. जोधपूर झगड्यात बक्षी सलाबतनेही हस्तक्षेप केला व यातून जाटही त्यात शिरले. अखेरी राजपूताना, मराठे हे नवा मध्यस्थ व नवा धनी म्हणून पत्करावे लागले.... मुघलसत्ता, मुघलांचे संरक्षण, शासन नादिरशहाच्या स्वारीनंतर, राजपुतान्यातून गेलेच होते..... त्यांच्या जागी मराठे प्रस्थापित झाले.

हे सर्व सूत्र डोळ्यापुढे ठेवले तरच प्रस्तुत प्रकरणातील झगड्यामधील गुंतागुत व अनेक नावांचा पुनःपुन्हा होणारा उल्लेख कळणे सोयीस्कर होईल.

जोधपूरचा महाराजा अभयसिंह याने गुजरातचा सुभेदार असताना ( भा. १७२९ ) सरबुलंदखानाचा पराभव करून खूप मोठी संपत्ती जमा केली होती आणि या यशाच्या घमेंडीने तो आपल्या कारकीर्दीच्या उत्तरकाळात उन्मत्त बनला होता. ( भा. पहा प्र. ६ §३ परि. ३ ). मारवाडचा हा राजा राठोड राजघराण्याचा व जमातीचा प्रमुखही होता. यावेळी या राजघराण्याच्या एका छोटया पण स्वतंत्र शाखेचा प्रतिनिधी, बिकानेरचा राज्यकर्ता असून तो नावाला मात्र, मारवाडचा राजा अभयसिंह याचा, तो राठोड घराण्याचा व जमातीचा प्रमुख म्हणून, मांडलिकही होता. अशा या मांडलिकाने काही थोडासा अपराध केला, येवढ्यासाठीच, अभयसिंहाने त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारले आणि त्याच्या राजधानीला वेढा घालण्यासाठी सैन्य घेऊन तो निघाला. अभयसिंहाचा धाकटा भाऊ बख्तसिंह, हा तर आपल्या थोरल्या भावाला गादीवरून ओढून काढण्याची सोयीस्कर संधी सदैव हुडकीत होताच. त्याने आता बिकानेरच्या राजाचा कैवार घेऊन, त्याची बाजू उचलून धरण्यास, जयपूरच्या जयसिंहाचे मन वळविले आणि दारूच्या पेल्यात बुडालेल्या जयसिंहाने, अभयसिंहाला धमकी देणारे पत्र लिहून, वेढा उठविण्याचा आदेश दिला. तेव्हा अभयसिंहानेही उघडउघड विरोध व तुच्छतादर्शक उत्तर पाठवून, बिकानेरचा हा तंटा म्हणजे राठोड घराण्यातील दोन कुटुंबामधील एक केवळ घरगुती प्रश्न असून त्यात 'कच्छवा' नायकाचा काहीही संबंध नाही असे कळविले. ( भा. या उत्तरात 'नायक ( Chieftain ) हा शब्द, 'महाराजा' या शब्दाऐवजी लेखकाने वापरला आहे यातून तुच्छताच ध्वनित होते. ) यानंतर दोन्ही राज्यांमध्ये युद्ध सुरू झाले. या दोन राज्यांमध्ये असे युद्ध सुरू झाल्यावर मात्र, बख्तसिंहाने, आपल्या जमातीच्या प्रतिष्ठेसंबंधीच्या अभिमानामुळे, एकाएकी आपले धोरण बदलले आणि जयपूरच्या प्रदेशातच हल्ला करून अनेक खेडी लुटली, तेव्हा स्वतःच्याच राज्याच्या रक्षणासाठी जयसिंहाला आग्र्याहून घाईने परत यावे लागले.[१] जयसिंहाबरोबर त्याचे जहागिरदार–कुळे– ( Vassals ) आणि मित्र अशा सर्वांचा मिळून एक मोठा घोळकाच आला. यात हाडा जमात, करौलीचे जाधव, शाहपुराचे सिसोदिया, खिची ( Khichi ) चौहान आणि जाट हे असून शिवाय तीन मुसलमान सेनापतीही होते. हे तीन मुसलमान सेनापती म्हणजे आग्र्याच्या ( म्ह. मुघल) बादशहाने मराठ्यांना उत्तर हिंदुस्थानाबाहेरच थोपवून धराण्यासाठी, जयसिंहाच्या मदतीस पूर्वीच पाठविलेले सेनापती होत. अशांच्या एकत्र झालेल्या या अफाट जमावाने जयसिंहाबरोबर अजमेरच्या रस्त्याने मारवाडकडे कूच केले. एक लाख लोकांचा हा अफाट पण विस्कळित समुदाय बरोबर घेऊन जयसिंह, पुष्वर सरोवराच्या ( Pushwar Lake ) ईशान्येस ११ मैलावरील गंगवाना येथे पोहोचला. तेथे त्याने आपली छावणी ठोकून तिच्या पुढील बाजूला आघाडीवर आपल्या तोफा रोविल्या. जयसिंहाबरोबर आलेले सैन्य मारवाड सैन्यापेक्षा इतके मोठे होते की त्यापुढे छोटयाशा मारवाड सैन्याला काहीही आशा करणे शक्य नव्हते. पण जीवावर उदार होऊन अविचारी बनलेल्या बख्तसिंहाने, आपल्या प्रमाणेच जीवावर उदार होऊन बेफिकीर बनलेल्या, एक हजार राठोड स्वारांच्या पथकाला बरोबर घेऊन, आलेल्या अफाट सैन्यावर धाडसाने हल्ला केला व तोफांच्या रांगामधून तो पुढे घुसला. "वाघानी मेंढ्याच्या कळपावर झडप घालावी" तशी त्याने यावेळी जयसिंहाच्या सैन्यावर झडप घातली तेव्हा

१ भा. टीप.... पहा प्र. ६ –१६ इ. यावेळी जयसिंह आग्र्याचा सुभेदार असून 'बाळाजी' त्या भागात मोहिमेवर होता.

त्यांच्या या मुसंडीपुढे कशाचाही टिकाव लागेना.[१] या हल्ल्यात जयपूर सैन्यातले हजारो सैनिक मारले गेले, शिवाय आणखी कितीतरी जखमी झाले, आणि हे घडले ते त्यातील बहुतेकांनी लढाईही न करताच. या परिस्थितीत कच्छवा सैन्याने दूर पळ काढला. अशाप्रकारे काही चौरस मैल पसरलेल्या या युद्धभूमिवरून, मृत व जखमीखेरीज इतर सर्वांना, अवघ्या चार तासांच्या अवधीतच पळवून लावून जणूकाय जादूनेच, अशी, ती मोकळी करण्यात आली.

इतके झाले तेव्हा जयसिंहाने दोन मैल माघार घेतली आणि काही वेळपर्यंत तेथे तो जवळजवळ एकटाच आणि गोंधळलेल्या स्थितीतच, उभा राहिला. जयसिंहाच्या सैन्यातील बादशहाच्या तीनही सेनापतीवर हल्ला झाला नव्हता. त्यांनी युद्धभूमीवरील आपापल्या जागा ( पहारी जवळच्या–Near Pahari ) सांभाळल्या. त्यांच्या सैन्यात यावेळी जवळजवळ दहा हजार सैनिक असूनही त्यांना मात्र सगळीकडे निर्माण झालेल्या धास्तीने पछाडले आणि त्यांच्यापैकी फक्त शंभर लोक सोडून इतर सर्वांनी पळ काढला. अशाप्रकारे या तीन्ही सेनापतीना आधार म्हणजे जवळजवळ दहा हजारांपैकी येवढेच शंभर अनुयायी तेथे राहिले. तथापि आपापल्या जागा सांभाळून स्थिर राहिलेले हे तीन शाही सेनापती, लवकरच, त्यांच्या पळून गेलेल्या सैनिकांना पुन्हा एकत्र होण्यासारखे आधारस्थान ठरू लागले. दुसऱ्या बाजूला, यावेळेपर्यंत बख्तसिंहाच्या उमद्या अनुयायांची संख्याही हजारावरून सत्तर-पर्यंत, कमी होऊन तो स्वतःही जखमी झाला होता. अशावेळी बादशहाच्या सेनापतींनी, बख्तसिंह व त्याचा उरलेला गट यांच्यावर, आपल्या जवळच्या अग्निबाणांचा ( Rockets ) मारा केला. युद्धभूमीवर तर, बख्तसिंहाला समोर कोणी शत्रू दिसत नव्हता आणि ही लढाई आपण जिंकलीच आहे असा विश्वासही वाटत होता. अशावेळी हा पुन्हा होऊ लागलेला अनपेक्षित मारा त्याला व शिल्लक राहिलेल्या त्याच्या मूठभर राठोड गटाला सहन करता येण्यासारखा नव्हता. तेव्हा आपल्या घोड्यांचे लगाम खेचून, नागोरच्या आपल्या बळकट किल्ल्याकडे ते वळले. या चमत्कारामुळे जयसिंह वाचला हे खरे, पण या युद्धभूमीवर लज्जास्पद पराभवाशिवाय दुसरे काहीही त्याच्या सैन्याला मिळविता आले नाही आणि त्याने आपल्या राजधानीचा रस्ता स्वीकारला. ही लढाई २८ मे १७४१ ला लढली गेली आणि नंतर लवकरच या दोन्ही राज्यात तहही झाला.

## § २ : इश्वरीसिंहाचा आपल्या भावाबरोबर झगडा

जयसिंह स्वतः हजर होता अशी ही, त्याची अखेरची लढाई. २१ सप्टेंबर, १७४३ ला, तो मरण पावला.[२] त्याच्यानंतर त्याचा मोठा मुलगा इश्वरीसिंह गादीवर आला. त्याची सात वर्षांची कारकीर्द म्हणजे त्याचा भाऊ माधोसिंह ( Madho Singh ) आणि

१ ही लढाई प्रत्यक्ष पाहून लिहिलेले तिचे सर्वोत्कृष्ट वर्णन, हरचरणदास याने, चहार गुलझार ३७७ व ३७९-ब यात केलेले आढळले. या लढाईची तारीख नव्या गणनेनुसार 'विर विनोद' (Vir Vinod) मध्ये दिली असून तिचे रूपांतर लेखकाने... (ज. सरकार) जुन्या पद्धतीत केलेले आहे. हीच तारीख वंशभास्कर ३३०४–३३१२ यामध्ये व टॉड (भाग २ मारवाड प्रकरण ११) मध्येही दिली आहे. या युद्धात मृत झालेल्यांची संख्या १२००० व जखमींची संख्या आणखी तितकीच असे हरचरण याने दिले असून, त्याने केलेली ही अतिशयोक्ती होय. दुसऱ्या दिवशी या युद्धभूमिवर मरून पडलेल्या सैनिकांमधून तो फिरला, त्यावेळी दिसलेल्या भयानक दृश्याचे वर्णनही त्याने केलेले आहे.

२ पण विर विनोदमध्ये ही तारीख ३० सप्टेंबर १७४४ अशी दिली आहे.

त्याचे मराठे व राजपूत पाठीराखे, यांच्या विरुद्ध चाललेल्या, एकाच दीर्घ झगडयाचा काळ होय. जयसिंहाच्या मृत्यूनंतर लवकरच, १७४३ च्या अखेरीस, मेवाडचा महाराणा जगतसिंह हा, आपला भाचा ( Nephew : भा. पहा प्र. ६ § २.... बहिणीचा मुलगा व टीप ) माधोसिंह याला, सामर्थ्याच्या जोरावर मारवाडचे सिंहासन मिळवून देण्यासाठी रणांगणात उतरला. त्याने प्रथम जहाजपूरच्या नैर्ऋत्येकडे ५ मैलांवरील जामोली खेडयापर्यंत चाल केली. ( जामोली, देवळी : Deoli कॅन्टोनमेंटच्या दक्षिणेस ११ मैलांवर आहे ). या ठिकाणी त्याने ४० दिवस मुक्काम ठेवला. त्याच्यासमोर जयपूरचे सैन्यही उभे राहिले होतेच. तथापि त्यांच्यामध्ये या काळात एकदाही लढाई मात्र झाली नाही. अखेरी इश्वरीसिंहाने आपल्या भावाला एक मोठी जहागीर वा वर्षासन (Appanage) देण्याचे वचन देऊन तह केला. पण या नंतरही माधोसिहाने, आपल्या आपल्या भावाविरुद्ध अनेक वेळी उठाव केल्याचे आपणास आढळते. यावरून दिसते की, आपल्या बापाकडून येणाऱ्या वारशापैकी अर्ध्यापेक्षा किंचितही कमी मिळाले तर माधोसिंहाला समाधान वाटण्यासारखे नव्हते. १७४५ च्या फेब्रुवारीच्या प्रारंभी त्याचा, असाच एक प्रयत्न अपूर्णावस्थेत असताना मुळातच मोडून काढण्यात आला. यावेळी इश्वरीसिंहाच्या पाठीराख्या मराठयांनी महाराण्याच्या छावणीवर मध्यरात्री अकस्मात छापा घातला व गोळीबार केला आणि उजाडण्याच्या सुमारास मेवाडच्या सैन्याला पळ काढण्यास भाग पाडले. माधोसिंह आणि त्याचा मामा यातून निसटून उदयपूरला पळाले आणि इश्वरीसिहाने, आपण पूर्वी दिलेले वचन आता अमान्य केले.[१]

१७४७ मध्ये, सबंध राजपुताना व पश्चिम हिंदुस्थान यामध्ये, अभूतपूर्व अशा अतिशय तीव्र दुष्काळाने थैमान घातले. यावर्षी मोसमी पावसाने (Seasonal Rains) संपूर्ण दगा दिला; कोणतेही पीक वाढू शकले नाहीं; पाण्याचे सर्व प्रवाह आटले; कोठेही एखादे सुद्धा हिरवे पाते दिसू शकत नव्हते; महिन्यामागून महिने सबंध क्षितीज धुळीच्या धुक्याने झाकळून गेले होते आणि पावसाचा वा दवाचा एखादा थेंबही कुठे दिसत नव्हता. चारावैरणीच्या अभावी गुरे, ढोरे आणि धान्याच्या अभावी माणसे मरू लागली. यावर एका मराठा निरीक्षकाने भाष्य केले आहे. तो लिहितो......"आपली तोंडे धुण्याइतकेही पाणी माणसाना मिळत नाही असे दिसते. सबंध प्रदेशच निर्जन व उध्वस्त झालेला आहे. उदयपूरचासुद्धा नाश झाला असून, आपले शहर सोडून देऊन धेबार ( Dhebar ) सरोवराच्या काठी जाऊन रहावयाचे, असे महाराणानी ठरविले आहे....." बुंदीच्या

१ वंशभास्कर ३३२८ आणि ३३८० (हा ग्रंथ १८४१ मध्ये लिहिलेला आहे.) मराठयांना २२ लाख रुपये देण्याचे वचन दिल्यानंतरच महाराण्याला मोकळे सोडण्यात आले असे या ग्रंथात नमद केलेले आहे. पण मराठयांच्या कागदपत्रात (Records) नमूद केल्यानुसार वंशभास्करमधील माहिती चुकीची आहे असे दिसते. महाराण्याने आपला प्रतिनिधी कानिराम याला मल्हारकडे पाठविले आणि त्याच्यामार्फत अतिशय गंभीरपणे वचन दिले की मराठे जर इश्वरीसिंहाकडून माधोसिंहाला वार्षिक २४ लाखांची जहागीर मिळवून देऊ शकले तर तो मराठयांना २० लाख रुपये बक्षीस देईल. महाराण्याने मांडलेली ही योजना स्वीकारण्यास, पेशव्याना उद्युक्त करण्यासाठी मल्हारने प्रयत्न केले. त्याने पेशव्याना कळविले की सफदरजंग आणि अमिरखान हे माधोसिंहाच्या बाजूचे आहेत तेव्हा मराठयांनी माधोसिंहाची बाजू उचलून धरली तर, यासाठी बादशहा आणि त्याचा दरबार मराठयांविरूद्ध जाण्याचा संभव नाही. [पे. द. नि. प. (२७) १८ व १९. या संग्रहाच्या संपादकानी, आपल्या तर्कानुसार या पत्रांवर ऑगस्ट १७४६.... अशा तारखा नमूद केल्या आहेत. पण ही पत्रे या आधी बरेच महिने लिहिली असावीत असे दिसते. याच विषयाची आणखी माहिती 'ऐतिहासिक पत्रसंग्रह (२) ६८ व ७६ मध्ये दिलेली आहे.]

उम्मेदसिंहाला आपल्या गरजा भागविण्यासाठी स्वतःचा सर्वोत्तम हत्ती विकणे भाग पडले. गुजरातेत हा दुष्काळ "त्रिलोत्रा" या नावाने (म्ह. विक्रम संवत १८०३ मधील) जनतेमध्ये, संबोधिला जात होता. तेथील जनतेने गवताचे 'बी' सुद्धा खाल्ले आणि यातून लोक अतिसाराने मरण पावले. अनेक खेड्यातून जनता निघून जाऊन तीं खेडी अगदी ओस पडली आणि पुढे अनेक वर्षे कोणीही रहाण्यास परत न येता ती तशीच ओसाड राहिली. इतके झाले तरी राजपुतानी आपापसातील भाऊबंदकीचे झगडे थांबविले नाहीत. (भा. पहा पुढे §३). आपल्या पैशाच्या जोरावर इश्वरीसिंहाने आपले सन्य लढाईच्या काळाइतकेच सज्ज ठेवले आणि महाराण्यानेही पेशव्यांच्या पाठिंब्यावर तसेच केले. [पे. द. नि. प. (२)४, (२१)१९; मिरात-इ-अहमदी (२)३६४; वंशभास्कर ३४४६].

उम्मेदसिंह हाडा [बुंदीवरील ताबा गमावलेला-बुंदीचा एक वारस-(भा. पहा प्र. ६ §६)] आणि माधोसिंह (जयपूर सिंहासनावर हक्क सांगणारा पण पराभूत झालेला) या दोघानी, ४ ऑक्टोबर १७४६ ला नाथद्वारा येथे महाराण्याची भेट घेतली आणि इश्वरीसिंहाने नुकत्याच केलेल्या त्यांच्या पराभवाबद्दल सूड घेण्याकरिता योजना आखल्या. मल्हारराव होळकरांचे सैन्य, पैसे देऊन मदतीला मिळविण्यासाठी त्यानी आपले जासूद काल्पीला त्याच्याकडे पाठविले आणि या मदतीसाठी त्याला २ लाख रुपये देऊ केले. तेव्हा ही योजना स्वीकारू नये असा सल्ला त्याला, राणोजी शिंदे व रामचंद्रबाबा शेणवी या त्याच्या दोन्ही सहकाऱ्यांनी दिला. तथापि या सल्ल्याविरुद्ध मल्हारने आपला मुलगा खंडेराव याला, एक हजार स्वार बरोबर देऊन, या तिघा राजपूत राजाना मदत करण्यासाठी आणि या मित्र गटाच्या मागण्या मान्य करून त्या पुऱ्या करण्यास इश्वरीसिंहाला भाग पाडण्यासाठी पाठविले. या मित्रगटाने इश्वरीसिंहाकडे केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या....(१) टोंक, टोडा, मालपुरा आणि नेवाई हे चार परगणे माधोसिंहाला द्यावे (२) उम्मेदसिंह हाडा याला बुंदी परत द्यावी आणि याच्या मोबदल्यात उम्मेदसिंहाने यापुढे इश्वरीसिंहाचे 'मित्र' म्हणून वागावे आणि मराठ्यांचा युद्धखर्च द्यावा. (३) नेनवे, समिधी आणि कारवार हे तीन परगणे कोट्याचा राव, राजा दुर्जनसाल आणि प्रतापसिंह हाडा (कारवारचा वारस) यांच्या ताब्यात ठेवण्याचे मान्य करावे. [पे. द. नि. प. (२) ३ [.

## § ३ : राजमहलची लढाई, मार्च १७४७

खंडेराव काल्पी येथून राजपुतान्यात, कूच करून आला आणि उदयपूर येथे दुर्जनसालाची पथके (उम्मेदसिंहाचा पुरस्कर्ता....याची) आणि मेवाडचे सैन्यही त्याला येऊन मिळाली. अशारीतीने या मित्र गटाच्या सैन्याची संख्या खूपच मोठी झाली. नंतर हे मोठे सैन्य जयपूर सरहद्द ओलांडून राजमहल (देवळी कॅन्टोनमेंटच्या उत्तरेस १० मैलांवर व बनास (Banas) नदीच्या वाकणाच्या दक्षिणेस) या ठिकाणी पोहोचले. तेव्हा तेथे त्याला अडविण्यासाठी, इश्वरीसिंहाचा सेनापती नारायणदास हा समोर आला. या दोन प्रतिस्पर्धी सैन्यानी एकमेकापासून दोन मैल अंतरावर आपापल्या छावण्या ठोकल्या. दरम्यान उभय पक्षामध्ये तह घडवून आणण्यासाठी दिल्ली व जयपूर येथून प्रयत्न करण्यात आले. इश्वरीसिंहाच्या सल्लागारांनीही त्याला, लढाई टाळण्याचा आणि शांतता तहासाठी वाटाघाटीच्या मार्गाने प्रयत्न करण्याचा आग्रह केला. याचवेळी उदयपूरच्या प्रधानानेही सेनापती नारायणदास यालाही अशीच कळकळीची विनंती केली होती· तेव्हा इश्वरीसिंहाचा हा सेनापती आघाडी-

वरून घाईने राजधानीकडे आला व त्यानेही इश्वरीसिंहाला तसाच सल्ला दिला. असे न करता सशस्त्र लढा झाला तर महाराणा व मराठे कायमचे शत्रू होतील असेही या सर्व-सल्लागारानी इश्वरीसिंहाला सांगितले. पण महाराणा येऊन शत्रूची संख्या आणखी फुगण्या-पूर्वी जलदीने आघाडीवर जाऊन, चालून आलेल्या शत्रूचा मोड करावयाचा असे इश्वरी-सिंहाने ठरविले. त्याने आपल्या आघाडीच्या सैन्य विभागाचे सेनापतीपद हरगोविंद नाटानी, या जातीने व्यापारी, पण असाधारण शूर आणि कर्तबगार सेनापतीकडे बदलले, आणि इश्वरी-सिंह स्वत: मदतीसाठी, मागे ठेवलेली आपली शिलकी फौज घेऊन, आघाडीच्या सैन्यापासून, मागे एक दिवसाच्या चाली इतक्या, पुढे, येऊन थांबला.

१ मार्च, रविवार या दिवशी दुपारी मध्यान्हीला लढाई सुरू झाली.[१] आणि दुसरे दिवशी सूर्यास्ताचे वेळी संपली. या लढाईत उभय पक्षांची खूपच हानी झाली पण हरगोविंदाचे वैयक्तिक नेतृत्व व कुशल योजना यामुळे 'मराठा-उम्मेद-माधो-जगत', या मित्र गटाचा त्यांत संपूर्ण पराभव झाला. या मित्र गटाच्या सैन्यातील वेगवेगळे विभाग व्यवस्थित संघटन केलेले वा गुंफलेले नव्हते, याचा योग्य फायदा हरगोविंदाने घेऊन त्यांच्या निरनिराळ्या विभागावर, एकामागून एकावर असे, वेगवेगळे हल्ले केले. या त्याच्या कुशल डावपेचामुळे, त्याचा अखेरी जय झाला. या लढाईत, कोलापूर-पटनचा जहागिरदार, या कोट्याच्या एका मांडलिकानेच फक्त रणांगणावर पाय रोवून विरोध केला. माधोसिंहाचा निशाण वाहक हत्ती व त्याचा रणवाद्यांचा ताफा, त्याचा सर्व तोफखाना आणि छावणीचे सामान, हे सर्व जयपूरच्या सैन्याने हस्तगत केले. रात्रीच्या वेळी विजयी जयपूर-सैनिक, मेवाडच्या सैन्याने सोडून दिलेल्या छावणीत झोपले. मराठ्यांच्या नेहमीच्या पद्धतिनुसार खंडेराव मात्र, लुटालूट करण्याच्या संधीची वाट पहात बाजूला राहीला होता. त्याने आता हाडा पथकांचा सेनापती भोपटराम चारन याच्याशी हात मिळवणी करून जयपूर सैन्याच्या छावणीवर हल्ला केला पण त्याने काही मालमत्ता लुटल्यावर, त्यालाही शेखावत संरक्षकानी मागे परतवून लावले.

लढाईत पराजय झाल्यावर दुर्जनसालाने कोट्याकडे पळ काढला आणि खंडेरावाने बुंदेलखंडाकडे माघार घेतली. या मित्राना मदत करण्यासाठी महाराणा पुढे चालून येत होता, त्याला या पराभवाची हकीगत वाटेतच कळली तेव्हा तेथूनच त्याने आपल्या घोड्याचे तोंड फिरविले आणि आश्रयासाठी तो आपल्या राजधानीस परतला.

इश्वरीसिंहाच्या सैन्याने मिळविलेला हा मोठा विजय होता. लढाई संपल्यावर तो स्वत: युद्धभूमीवर दाखल झाला आणि त्याने, आपल्या हाती पाठलाग घेतला. आता मेवाडला, या विजयी शत्रूचा मोठा तडाखा सोसावा लागला. भिलवाडा हे मेवाडचे समृद्ध व्यापारी केंद्र, विजयी शत्रूने जिंकले आणि तेथील व्यापाऱ्याना खंडणी व भरपाईसाठी अडकवून ठेवले. इतके झाल्यावर महाराण्याने तहासाठी विनंती केली, ती मंजूर करून विजयी इश्वरीसिंह मोठ्या विजयानंदात आपल्या राजधानीस परतला. (एप्रिल १७४७). यावेळी युद्ध पुढे चालविणे अशक्यच होते. धान्य दुष्काळी किंमतीने विकले जात असून गवताच्या एका भाऱ्यालाही एक रुपया पडत होता. महाराण्याचा रोजचा युद्धखर्च १२००० रुपयापर्यंत वाढला होता आणि असे हे ओझे त्याच्या गरीब राज्याला यापुढे सहन करणे शक्य नव्हते. (वंश भा. ३४७२).

---

१ राजमहल [पे. द. नि. प (२) ३, ४ (२१) २४. वंश भास्कर ३४६० ते ३४६८] (यामधील वर्षा-संबंधी नोंद चुकीची आहे.).

या वर्षाचे अखेरी, मुघल साम्राज्यावर वायव्येकडून झालेली अब्दालीची स्वारी परतवून लावण्यासाठी मदतीला येण्याचे आवाहन बादशहाने इश्वरीसिंहाला केले. तेव्हा या मदती-बद्दल मोबदला म्हणून महाराजाने बादशहाच्या रतनभोर या किल्ल्याची मागणी केली आणि ही जेव्हा फेटाळण्यात आली तेव्हा त्याने मदतीस जाता जाता रस्त्यातच मथुरा येथे अनेक आठवडे वेळकाढूपणा केला व अशा प्रकारे रेंगाळत अखेरी तो २४ डिसेंबर १७४७ ला दिल्लीला पोहोचला. पुढे अब्दालीबरोबर मानपुरा येथे झालेल्या लढाईत ( ११ मार्च १७४८. भा. पहा प्र. ५§१५ ) सुरवातीलाच त्याने रणांगणावर शत्रूकडे पाठ फिरविली, जवळच्या सामानाचे ओझे कमी करण्यासाठी आपल्या तोफा व पडघमसारखी रणवाद्ये अशी सामुग्री विहिरीत फेकून दिली आणि धाईने व अविचाराने परत आपल्या देशाकडे पळ काढला. राजमहल येथील विजयाने मिळविलेले सर्व श्रेय, त्याने अशा प्रकारे मानपुरा येथे गमावले आणि यापुढे जणूकाय गोंधळल्यासारखे होऊन, स्वतःला त्याने राजधानीतच कोंडून घेतले. [ पे. द. नि. प. (२७) ३० ].

## § ४ : मराठा राज्यकर्त्यांनी माधोसिंहाला मदत करण्याचे मान्य केले

इश्वरीसिंह कोंडून घेतल्यासारखा राहू लागला तरी, संकटाने तेथेही त्याची पाठ सोडली नाही. पंजाबच्या मोहिमेवरून परत आल्यानंतर फक्त थोडयाच महिन्यात त्याच्या धाकटया भावाच्या वतीने आलेल्या मराठा सैन्याने त्याचा पराभव केला.

तत्कालीन मराठा पत्रावरून आता आपल्याला, कच्छवा-मराठा राजकीय मुत्सद्देगिरीच्या ( Diplomacy ) हालचालींचे, गुंतागुंतीचे जाळे उलगडून, या कारस्थानांची स्पष्ट माहिती पुढे मांडता येते. तथापि त्यातल्या वेगवेगळया विधानात, काही विसंगती स्वाभाविकपणेच आढळते हे खरे, पण एकमेकानी मागणी केलेल्या व देऊ केलेल्या अटी, वेळोवेळी बदलत होत्या हेच याचे कारण होय. याची उदाहरणेही आहेत. इश्वरीसिंह गादीवर बसल्यावर थोडयाच काळात, त्याला, आपल्या धाकटया भावाला वार्षिक २४ लाखाचे वतन व वर्षासन देण्याचे मान्य करून, महाराणाशी तह करावा लागला होता ( १७४३ ). पण पुढे १७४५ मध्ये, त्याने उत्तर हिंदुस्थानातील काही मराठा सेनापतींची (प्रामुख्याने रामचंद्रबाबा, ) मदत, त्याना पैसे देऊन मिळविली आणि महाराणाच्या सैन्याचा धुव्वा उडविला व आपण पूर्वी दिलेले वचन पाळण्यास नकार दिला हे आपण पाहिलेच आहे...... (भा. पहा §२ परि. १ ). यानंतर मल्हार होळकराने आपल्याला पाठिंबा द्यावा म्हणून माधोसिंहाने त्याला पैसा दिला व मल्हारने आपल्या फौजेचे एक विभाग, माधोसिंहाला मदत करण्यासाठी १७४७ मध्ये पाठविला पण या प्रयत्नाला पूर्ण अपयश आले [ मार्च –भा. पहा §३ ]. या विजयाने इश्वरीसिंह बेसुमार गर्विष्ठ बनला आणि यापुढे त्याच्या भावाला त्याच्याकडून काहीही मिळण्याची अपेक्षा राहिली नाही. तेव्हा मेवाडच्या महाराण्याचा वकील ( Envoy ) पुण्याला गेला व तेथे मराठा दरबाराने, इश्वरीसिंहाला त्याच्या पहिल्या वचनाची पूर्तता करण्यास भाग पाडावे अशी विनवणी करून, मराठ्यांच्या या कामगिरीबद्दल, शाहूला दहा लाख किंबहुना काही अधिकच खंडणीही देऊ केली.

पेशवा प्रथम इश्वरीसिंहाची बाजू उचलून धरीत होता. पण आता मात्र ( ७ मार्च १७४७ ) त्याने रामचंद्रबाबाला सूचना दिल्या की माधोसिंहाने १५ लाखांची खंडणी मराठ्यांना दिली तर, त्याला २४ लाखाचा प्रांत इश्वरीसिंहाने तोडून द्यावा, असा त्याच्य

जवळ आग्रह धरावा. . . . . " अशा रीतीने दोन्ही राजपूत राजे राखले जातील आणि मराठ्यांच्या हिताचे रक्षण होईल". . . .असे पेशव्याचे यामागे कारण होते. या सूचनेनुसार वागण्याने, आपल्याला वास्तवाची जाणीव नाही असे दिसेल आणि आपली अशी कृती निरुपयोगीही ठरेल असे रामचंद्रबाबाला वाटत असल्याने त्याने या सूचनेला विरोध दर्शविला. यावेळी त्याने आग्रहाने मांडले की. . . . " आपल्या अशा हालचालीमधून आपल्याला काहीही पैसा मिळणार नाही. आपल्या राजाने आधीच इश्वरी सिंहाची बाजू घेतली असून त्यांच्या आज्ञेनुसारच मी जाऊन इश्वरीसिंहाला मदतही केली. आता जर तुम्ही इश्वरीसिंहाविरुद्ध गेला तर आपल्या प्रामाणिकपणाबद्दलचा लोकामधील विश्वास व याबाबतचा आपला नावलौकिक नाहीसा होईल. "

पेशव्याकडून आपल्या भाच्याला मदत मिळण्याबाबत निराश झाल्यामुळे महाराण्याने बादशाही दरबाराकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला आणि याच कामासाठी राठोड व हाडा मित्र जमविण्यासही सुरुवात केली. याचबरोबर त्याने मल्हार होळकराला पूर्णपणे वश करून घेतले. तेव्हा होळकराने, वारंवार, पेशव्यांपुढे, माधोसिंहाच्या बाजूची तरफदारी, भावनोत्कट अभिनिवेशाने चालविली. इतकेच नव्हे तर माधोसिंहाने जी खंडणी देण्याचे वचन दिले होते तिच्याबद्दल त्याने स्वत: हमीही दिली. अशा प्रकारे मल्हार आणि शिंद्यांचे दिवाण रामचंद्रबाबा, या दोघांच्या हालचाली एकमेकाविरोधी चालू होत्या. उत्तर हिंदुस्थानातील मराठ्यांच्या धोरणात चालू झालेला हा अंतर्गत मतभेद व संघर्ष त्या भागातील मराठ्यांचे स्थान व हितसंबंध याना हानिकारक असल्याने, पेशव्याने याबाबत अतिशय तीव्र नापसंती दर्शविली आणि यापुढे तिकडील हालचालीत एकसूत्रता आणा असा जोरदार आग्रह धरला. हे भाऊबंदकीचे भांडण, त्यातून अनर्थ उत्पन्न होण्यापर्यंत विकोपाला जाऊ देऊ नका. याऐवजी इश्वरीसिंहाने कबूल केलेला राज्याचा भाग, आपल्या भावाला देऊन या प्राणघातक भाऊबंदकीच्या भांडणात समझोता घडवून आणण्यासाठी इश्वरीसिंहाचे मन वळविण्यास शक्य ते सर्व उपाय तुम्ही वापरा, असा आदेश पेशव्याने शहाणपणाने, होळकर आणि रामचंद्रबाबा यांना दिला.

जेव्हा माधोसिंहासाठी २४ लाख उत्पन्नाच्या प्रदेशाची मागणी इश्वरीसिंहापुढे ठेवण्यात आली तेव्हा, आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या वतीने पेशव्याने दाखविलेला पक्षपात आणि विशेषत: कच्छवा राज घराण्याच्या कौटुंबिक भांडणात केलेला हस्तक्षेप पाहून इश्वरीसिंह संतापला हे योग्य होते. यावेळी, मराठ्यांच्या मागणीला त्याने उत्तर पाठविले ते पुढीलप्रमाणे :— " पेशवे आणि आम्ही या उभयतामध्ये वैशिष्ठ्यपूर्ण आणि पिढीजात मैत्री आहे. माझे वडील व बाळाजीराव यांचे वडील, यांच्या दरम्यान किती गाढ मैत्री होती आणि माझे पिताजी, बाजीरावांना किती उपयोगी पडले, याची बाळाजीरावाना कल्पना करता येणार नाही ( भा. पहा प्र. ६ §१०–१२ ). आजसुद्धा मी पेशव्याची विनंती बाजूला सारीत नाही. पण प्रस्तुतचा हा प्रश्न पूर्वजांच्या मालमत्तेवरील वारसा हक्काचा आहे. आम्ही ' राजपुरुष ' असून आमच्या राजघराण्याच्या पिढीजात रूढीच पाळल्या पाहिजेत. प्रस्तुतचा प्रश्न राज्याच्या प्रदेशाचा असून या बाबतीत मी, भावाची, प्रस्तुत इच्छा मानून त्यानुसार वागणे व त्याचे समाधान करणे कसे शक्य आहे ? राज्याच्या चांगल्यासाठी म्हणून माधोसिंहाला जे द्यावे असा आम्हाला मल्हारने आग्रह केला होता, ते आम्ही पूर्वीच दिले होते. आता, तो आणखी जास्त मागत आहे. तेव्हा, याबाबत लढा दिल्याशिवाय आम्ही ते त्याला देणे कसे शक्य

आहे ? धाकटया भावाबरोबर, आमच्या सबंध राज्याची वाटणी करून, आम्ही भिन्न आहो, या घराण्याचे नालायक पुत्र आहो अशी नामुष्कीची टीका आम्ही आमच्यावर ओढवून घेणे कसे शक्य आहे ? पेशवे व मल्हार यांची, आता आम्ही माधोसिंहाला पूर्वीपेक्षा जास्त मुलूख द्यावा अशी सूचना आहे पण असे करणे शक्य नाही. परमेश्वरच फक्त राज्ये देतो. आम्ही पूर्वीच मल्हारबरोबर पगडयांची अदलाबदल [1] केली होती—त्यांच्याशी मैत्री जोडली होती, मैत्रीच्या आणाभाका केल्या होत्या—या मैत्रीच्या कराराची कटु फळे आम्हाला आता दिसत आहेत ! " [ पे. द. नि. प. (२) ११, (२७) २६ आणि १८–१९, (२१) १७ ].

१७४७ मध्ये पेशव्याने जयपूरच्या मुलखात प्रवेश केला. माधोसिंह आणि इतर राजपूत राजे त्याला येऊन मिळाले व त्याचे सैन्य खूपच वाढून त्याचा एक अवाढव्य समुदाय बनला. यावेळी मानपूरच्या लढाईतून पळून आल्यामुळे ( भा. पहा प्र. ५ §१५ ) होत असलेल्या मानखंडनेच्या भाराखाली इश्वरीसिंह चिरडला गेला होता. मराठयांच्या सुटसुटीत चपळ घोडदळाने, त्याचा मुलूख संपूर्ण उध्वस्त केला होता आणि पेशवा यावेळी बादशाही दरबाराच्या अतिशयच मर्जीत होता. यामुळे आता इश्वरीसिंहाला कोठेही एकसुद्धा मित्र राहिला नव्हता. या परिस्थितीत त्याने खूपच पडते घेण्याची वृत्ती स्वीकारून आपला प्रधान केशवदास याला पेशव्यांकडे तहासाठी विनवणी करण्यास पाठविले. खंडणीदाखल पन्नास लाख रुपये द्यावे अशी यावेळी मराठयांनी मागणी केली पण इश्वरीसिंहाला या रकमेच्या निम्यापेक्षा अधिक रक्कम वाढविणे शक्य झाले नाही. जयपूर प्रदेशाचे दोन सारखे भाग करून ते दोन भावांनी घ्यावेत अशी सूचनाही मराठयांनी पुढे मांडली. या सूचनेलाही संमती देणे इश्वरीसिंहाला शक्य झाले नाही. तेव्हा युद्ध सुरू झाले. टोंक, तोडा, मालपुरा (यात फागीचा समावेश करून ) आणि नेवाइमधील बरवाडा (Barawada ) हे चार महाल, आपल्याला वतन म्हणून इश्वरीसिंहाकडून मिळवून द्यावे या अटीवर माधोसिंहाने मराठयांच्या राजाला दहा लाख रुपये नजराणा म्हणून देण्याचे मान्य केले. ही रक्कम १७४९–५० या वर्षात चार हप्त्यानी दिली जाईल अशी जबाबदारी आपण स्वत: स्वीकारीत असल्याचे मल्हारने आपल्या राजाला लिहून दिले आणि याबद्दल ती प्रत्यक्ष दिली जाईतो, हे महाल मल्हारने आपल्या ताब्यात ठेवावे असेही त्याचवेळी मान्य करण्यात आले. [ २९ एप्रिल १७४८; वाड (३) पृ. १४०–१४१; पे. द. नि. प. (२७) ३०, २६, १८, १९, (२) ११, (२१) १७. ]

## § ५ : बग्रुची लढाई, ऑगस्ट १७४८

जुलई १७४८ मध्ये, मल्हार होळकर आणि गंगाधर तात्या यांच्या नेतृत्वाखाली एक मराठा सैन्य उनिआरा (Uniara) जवळ जयपूरच्या प्रदेशात शिरले. या सैन्याने टोंक, टोडा आणि मालपुरा हे महाल सामर्थ्याच्या जोरावर हिसकावून ते माधोसिंहाच्या हवाली केले. हे सैन्य पिपलोद, फागी आणि लडाना या मार्गाने पुढे जाऊ लागले तेव्हा वाटेत कांही कच्छवा सरंजामदार व कुळे येऊन त्यानी माधोसिंहाची भेट घेतली आणि त्याचा राजा म्हणून सत्कार केला. उम्मेद व दुर्जनसाल हे दोन हाडा राजे आणि शिवाय इतर अनेक लहानसहान राजपूत राजेही त्याला येऊन मिळाले. एकत्रित झालेल्या सात राज्यांच्या संयुक्त सेनेला, ती बग्रुपर्यंत ( सांभर शहराच्या पूर्वेस २३ मैल ) येईतो, कोणी

१ तह ठरल्यावर, एकमेकांची मैत्री व विश्वास जोडल्याचे, बंधुभावाचे प्रतीक म्हणून पगडयांची वा फेटयांची अदलाबदल करण्याची प्रथा त्या काळी होती. असाच संदर्भ ग्रंथात अन्यत्रही आला आहे.

प्रतिकार करण्याला समर्थ आहे असे दिसले नाही. या ठिकाणी मात्र इश्वरीसिंह स्वत: त्यांच्यासमोर प्रतिकार करण्यास आला. १ ऑगस्टला प्रथम उभयपक्षी तोफांच्या माऱ्याने लढाई सुरू झाली; नंतर सैनिक एकमेकांशी भिडले. अखेरी पावसाचे एक मोठे सरवट आले आणि त्यामुळे, त्या दिवसाच्या लढाईचा शेवट झाला. सैनिक आणि सेनापती सर्वांनीच सबंध रात्र अतिशय हालात काढली. दुसरे दिवशी सकाळी लढाई पुन्हा सुरू होऊन तीत खूपच मनुष्यहानी झाली पण लढाईचा निर्णय मात्र लागला नाही. तिसऱ्या दिवशी गंगाधर तात्याने जयपूर सैन्याच्या पिछाडीच्या पथकाकडील तोफखान्यावर हल्ला केला आणि त्याने दारू शिलगावण्यासाठी असलेल्या तोफांच्या भोकातून (Port holes) खिळे ठोकले. पण इश्वरीसिंहाचा एक दोस्त, सुरजमल जाट, याने प्रतिहल्ला करून मराठ्यांचा हल्ला परतवून लावला. जयपूर सैन्याच्या आघाडीवर जाट पथके होती, त्यांनीही होळकरांच्या विभागाबरोबर खूपच रक्तपाती लढाई देत, समतोल राखला.

अशा रीतीने लढाईची ही धुमश्चक्री सहा दिवस चालली. या काळात अनेक वेळी पावसाच्या सरी आल्या त्यातही, ती, तात्पुरती सुद्धा न थांबता चालूच राहिली. या काळात जयपूर सैन्यासाठी जरूरीचे सामानसुमान व अन्नपुरवठा घेऊन येणाऱ्या तांड्याला मराठ्यांनी वाटेतच अडविले आणि त्यातील ओझे वाहकांची नाके व कान कापले. गंगाधरच्या हाताखाली, वेगळे काढलेल्या, ५००० घोडेस्वारांच्या मराठ्यांच्या एका पथकाने इश्वरीसिंहाच्या पिछाडीचा, जयपूरला जाणारा रस्ता अडविला आणि सांभर सरोवरापर्यंतचा त्याचा प्रदेश लुटला. तेव्हा मोठ्या हालअपेष्टा सोशीत इश्वरीसिंहाने बग्रुच्या किल्ल्यात आश्रय घेतला. तेथून आता तहाचे प्रयत्न सुरू झाले. यावेळी मल्हार होळकराने आपला आग्रह सोडावा म्हणून केशवदासाने (राजा आयामलचा मुलगा) गंगाधर तात्याला लाचही दिली. केशवदासाच्या अशा प्रयत्नामुळे, तहाच्या अटी जलदीने ठरविण्यात येऊन इश्वरीसिंहाने आपल्या भावाला पाच परगणे आणि उम्मेदसिंहाला बुंदी देण्याचे मान्य केले. ९ ऑगस्टला इश्वरीसिंहाने, होळकर, त्याचे सेनापती आणि तसेच उम्मेदसिंह यांची भेट घेतली आणि त्या सर्वांनी एकमेकांच्या मैत्रीबाबत शपथा घेतल्या. नंतर १० तारखेला मराठे व त्यांचे सहकारी मित्र, यांनी परत जाण्यास सुरवात केली. दुसऱ्या दिवशी इश्वरीसिंहानेही आपल्या राजधानीकडे कूच केले.[1]

१७४९ हे वर्ष जयपूरच्या दृष्टीने काहीही विशेष न घडता गेले. पण पुढील वर्षाचा पूर्वार्ध मात्र काळजीच्या ढगांनी व्यापलेला होता. यावेळी साम्राज्याचा बक्षी (Pay Master) सलाबत खान याने, जोधपूर सिंहासनावर हक्क सांगणाऱ्या बख्तसिंहाच्या वतीने राजपुतान्यावर स्वारी केली या स्वारीची हकीगत पुढे, 'मारवाडातील घडामोडी' या संदर्भात देण्यात येईल (भा. पहा § ९ ते §१२). याच वर्षाच्या उत्तरार्धात, सप्टेंबर १७५० मध्ये, रूपनगरचा जहागिरदार सामंतसिंह याने ते शहर परत मिळविण्यासाठी इश्वरी-

१ वंशभास्कर ३४९३–३५२५. सुजन चरित्र (२), जंग (Jang) टॉड, [ (२) हरावती प्र. ४ ] यामध्ये लिहिताना, सामान्यत: कल्पनेवर भर द्यावा, त्यापेक्षा जास्त भर देऊन लिहिले आहे. लेखक लिहितो की, बग्रुच्या युद्धभूमीवरून ... "इश्वरीसिंहाने बग्रुच्या किल्ल्याकडे माघार घेतली... दहा दिवस वेढा पडल्यानंतर, या ठिकाणी उम्मेदला बुंदी देण्याच्या करारावर त्याला सही करणे भाग पडले... अशी नाचक्की झाल्यानंतर राजा इश्वरीसिंहाला जगणे शक्य झाले नाही आणि त्याने विष घेऊन आत्महत्या केली.... यावेळी उम्मेद परत गादीवर आला याबद्दल विधियुक्त समारंभाचा आनंदोत्सव सुरू होता." .... खरी हकीगत अशी आहे की, बग्रुच्या लढाईनंतर दोन वर्षे चार महिन्यांनी इश्वरीसिंहाने आत्महत्या केली. या लढाईबाबत मराठी कागदपत्रातही नोंदी आहेत.... पहा... राजवाडे (६) पृ. २९१ व ६४८. पुरंदर दफ्तर (१) अनु. १८५ ब १९६ब

सिंहाची मदत मागितली कारण ते सामंतसिंहाचा धाकटा भाऊ बहादुरसिंह याने बळकाविले असून, सामंतसिंहाला ते परत मिळवावयाचे होते. तेव्हा बक्षी व इश्वरी हे दोघे दोस्त रूपनगरला गेले. तेथे, वेढा घालण्यासाठी आणखी जास्त सैन्य व तोफखाना मिळावा अशी सामंतसिंहाने विनवणी केली. पण त्याला या युद्धाचा खर्च देण्याचे सामर्थ्य नव्हते. तेव्हा आपला एक सेनापती कृपाराम ( एक बनिया ) याच्या हाताखाली दोनशे वा तीनशे घोडेस्वार देऊन त्याला सामंतसिंहापाशी ठेऊन इश्वरीसिंह आपल्या राजधानीला परत आला. यानंतर सामंतसिंहाने रूपनगरचा आसमंत ताब्यात घेतला पण राजधानी मात्र बहादुरसिंहाच्याच ताब्यात राहिली. (बहादुरसिंहाला बख्तसिंहाची गुप्तपणे मदत होती.) [ पे. द. नि. प. (२)१७, २३ ].

## § ६ : जयपूरवर मराठ्यांचे आक्रमण : इश्वरीसिंहाची आत्महत्या

१७५० च्या अखेरी, मराठ्यांचे एक नवे व अतिशय अनर्थकारक संकट जयपूरवर आले आणि यातून त्याच्या कारभारात क्रांती घडून आली. मेवाडचा महाराणा व माधोसिंह, या प्रतिस्पर्ध्याबरोबर असलेल्या भांडणात मदत मिळविण्यासाठी, इश्वरीसिंहाने, आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा जास्त पैसे देऊ करून, पूर्वी १७४५ मध्ये मराठा सेनापतींची (होळकरखेरीज करून) मदत मिळविली होती (भा. पहा २). बग्रु येथे (१७४८) मल्हारलाही वश करून घेण्यासाठी फार मोठी रक्कम नुकसानभरपाई म्हणून द्यावयाचे त्याने वचन दिले होते. तथापि या रकमा या वेळेपावेतो थकबाकी म्हणून राहिल्या होत्या. ही बाकी वसूल करण्यासाठी आलेल्या मराठा अधिकाऱ्यांची तक्रार होती की, त्याने पैशासाठी कितीही तगादा केला तरी काही उपयोग होत नाही. तो म्हणाला...... "हे जयपूरचे राज्यकर्ते देण्याच्या प्रश्नाकडे लक्षच देत नाहीत. पैसे देणे दिवसामागून दिवस पुढेच ढकलीत आहेत." याचवेळी जयपूरच्या अंतर्गत कारभारातही गोंधळच माजला होता. आपल्या बुद्धिमत्तेबाबत वा वृत्तीबाबत (Spirit) इश्वरीसिंह फारसा लक्षात येण्यासारखा कधीच नव्हता आणि आता तर तो अर्धवट मूर्खच बनला होता. आतापर्यंत, राज्याचे सामर्थ्य व समृद्धी सांभाळून ठेवणारे काही कर्तबगार प्रधान होते तेही यावेळेपर्यंत एकामागून एक नाहीसे झाले. राजा आयामल खत्री (राजस्थानी आणि मराठी नोंदीमध्ये वा पत्रव्यवहारामध्ये याला राजा मल किंवा मालजी असे संबोधिले आहे). हा जयपूरच्या मुत्सद्यांमध्ये सर्वात जास्त कर्तबगार असून आपल्या धन्याच्या हितसंबंधाची अतिशय जपणूक करणारा, होता. तो ९ फेब्रुवारी १७४७ मध्ये मरण पावला.[1] या संदर्भात मराठ्यांच्या एका प्रतिनिधीने पुढीलप्रमाणे लिहून कळविले होते : ......"इश्वरीसिंह आणि जयपूर शहरातले उच्च व सामान्य दर्जाचे अशा सगळ्यानाच त्याच्या मृत्यूमुळे फार दुःख झाले, इतकेच नव्हे तर सर्व हिंदुस्थानानेच त्याच्याबद्दल दुःख केले." यानंतर त्याचा मुलगा केशवदास हा मोकळ्या झालेल्या

१ आयामल पर्शियन भाषेत तज्ञ होता. याने औरंगजेबाच्या पत्राचे दोन संग्रह संपादित केले असून त्यांची नावे अनुक्रमे 'रम्झ-ओ-इशर-इ-अलमगिरी (Ramz-o-Ishar-I-Alamgiri) आणि 'दस्तुर-उल्-अमल-इ-आगाही (Dastur-ul-Aml-I-Agahi) अशी आहेत. या संपादित संग्रहासाठी त्याने 'आगाही' असे टोपण नाव धारण केले होते. आयामलचा मुलगा केशवदास, याच्या मृत्युनंतर त्याच्या सैनिकानी,देणे बाकी राहिलेल्या आपल्या पगाराबद्दल त्याच्या विधवेला फार त्रास दिला. तथापि राज्यकर्त्यांनी याबाबत केवळ चालढकलच चालविली. अखेरी या विधवेने आपल्या कुटुंबियांचे मानाचे पोशाख (Robes, पोशाखातील वरचे आंगरखे झगे. . . मानाचे पोशाख) आणि भांडीकुंडी विकून, ही बाकी भागविली. हरसाही व गुरसाही या केशवदासाच्या दोन मुलांना सरकारच्या नोकरीत बक्षी या हुद्द्यावर ठेवून घेण्यात आले आणि घोडदळातील एक जागा देऊन त्याच्या जावयाचे तेवढ्यावरच समाधान करण्यात आले. [ पे. द. नि. प. (२१) ३४ ].

प्रधानपदावर आला. पण राजद्रोहात्मक पत्रव्यवहार केल्याच्या एका खोटयाच आरोपावरून त्याच्या बेअकली धन्याने त्याला ठार मारण्याचा हुकूम दिला आणि विष घालून त्याला मारण्यात आले (सुमारे ऑगस्ट १७५०). हा राजद्रोही पत्रव्यवहार त्याचा प्रतिस्पर्धी हरगोविंद नाटानी याने, बनावट तयार केला होता. या वेळचा दुसरा एक वयोवृद्ध मुत्सद्दी विद्याधर हा आता आजारी आणि अशक्त अशा स्थितीत बिछान्याला खिळला होता. आणखी एक प्रमुख व्यक्ती म्हणजे तोफखान्यावरील जुना मुख्याधिकारी शिवनाथ भाया हा होय. त्याला, त्याच्या बायका व मुले आणि सर्व कुटुंबीय यांच्यासहीत, तुरुंगात टाकण्यात आले. आता इश्वरीसिंहाला सल्लामसलत देणारे व विश्वासातले असे दोघेच होते—एक न्हावी व दुसरा माहूत (Elephant Driver)—अशा वेळी, 'जयपूरचा सबंध प्रदेश हादरून, तेथे जीवघेणी खळबळ उडाली आहे,' असा अहवाल एका मराठा-निरीक्षकाने त्या वर्षाच्या नोव्हेंबरमध्ये पाठविला यात मुळीच आश्चर्य नाही. [पे. द. नि. प. (२) १५ आणि १].

जयपूरमध्ये अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे तेथील राजाकडून येणे असलेला आपला पैसा मिळण्याबाबत पेशव्यांची निराशा झाली; तेव्हा माळव्यातील कामगिरी पूरी केल्याबरोबर, जयपूरकडील बाकी वसुलीच्या कामगिरीवर जावे असे हुकूम त्याने आपल्या सेनापतीना पाठविले. जयपूरचा शेवटचा विश्वासू आणि मराठ्यांशी मैत्री असलेला प्रधान, केशवदास याचा दुःखद अंत झाल्यामुळे, आपला पैसा वसूल करण्यासाठी बळाचा वापर करण्याबाबत पेशव्यांचा निश्चय अधिकच दृढ झाला. मृत प्रधानाच्या कुटुंबियानीही त्याच्या खुनाचा बदला घ्यावा अशी विनवणी यावेळी मराठ्यांना केली होती असे दिसते. २९ सप्टेंबर १७५० ला, मल्हारराव होळकर खानदेशजधून निघाला आणि त्याने जयपूरकडे कूच केले. जयाप्पा शिंदे यालाही त्याच्याबरोबर जाण्याचा हुकूम पेशव्याने प्रथम दिला होता पण नंतर मात्र महिन्यापेक्षा अधिक काळ, त्याला दक्षिणेतच थांबवून घेण्यात आले. १९ नोव्हेंबरला, मल्हार होळकर आणि गंगाधर तात्या (आडनाव चंद्रचूड) मुकुंदरा खिंडीजवळ आणि पुढे २८ तारखेला नेनवेजवळ पोहोचले. तीन दिवसांच्या वेढ्यानंतर त्यानी नेनवे सर केले आणि त्याच्या कक्षेतील मोठा परगणा ताब्यात राखण्यासाठी त्या ठिकाणी, मराठ्यांनी आपल्या सरहद्दीबाहेरचे असे, आपले एक ठाणे—औटपोस्ट—स्थापन केले. तेथे दहा दिवस मुक्काम केल्यावर या आक्रमकांनी पुढे जयपूरकडे कूच केले व ते या शहरापासून २/३ दिवसांच्या अंतरावर पोहोचले असतानाच इश्वरीसिंहाचे वकील २ लाख रुपये घेऊन त्याना भेटले. इतकी छोटी रक्कम घेऊन ते आलेले पाहून, होळकर अतिशय संतापला व त्याने काही सबबी ऐकण्याचे नाकारून, कूच पुढे चालू करण्याचा हुकूम आपल्या सैन्याला दिला. [पे. द. नि. प. (२१) ३४, (२) ३१, १९].

केशवदासाच्या खुनाचा सूड घेण्यासाठी मल्हार येत आहे असे, जयपूरच्या घाबरलेल्या वकीलाने येऊन, आपल्या धन्याला सांगितले. हरगोविंद नाटानी आणि विद्याधर हे पूर्वीच दूर केलेले प्रधान, यावेळी इश्वरीसिंहाकडे गेले आणि सैन्य एकत्र करून, होळकराशी, उघडया मैदानावर किंवा तटाच्या आतील शहरातून तरी लढाई द्या असा सल्ला त्यानी दिला. राजाला हा सल्ला आवडला नाही व त्याने न्हावी आणि माहुत या आपल्या नव्या आवडत्या सल्लागाराना बोलावून घेतले आणि त्या दोघांना हुकूम दिले की, मराठ्यांच्या छावणीकडे जा, चार वा पाच लाख रुपये देऊन होळकराचा राग शांत करा आणि रस्त्यातूनच त्याला माघारी पाठवा. तेव्हा, केशवदासाच्या मृत्यूच्या बदल्यात होळकर आपणाला ठार मारील—आमच्या धन्यानी पाहिजे तर आम्हाला येथेच ठार करावे पण मराठ्यांच्या

रागाला तोंड देण्यासाठी पात्र पाठवू नये, असे म्हणत, अशा कामासाठी जाण्याचे त्यांनी साफ नाकारले. यावर राजा इश्वरीसिंह, आपल्या [illegible] करीत [illegible].

आता १२ डिसेंबरचा दिवस उजाडला,....सायंकाळ झाली आणि त्याचबरोबर, शहरापासून वीस मैलापेक्षाही जवळ, होळकर येऊन पोहोचल्याची वार्ता आली. काही औषध तयार करण्यासाठी आपल्याला एक जिवंत नागसर्प व काही अर्सेनिक पाहिजे, ते घेऊन ये, असा इश्वरीसिंहाने आपल्या नोकराला आता हुकूम दिला आणि त्यानुसार या वस्तु आणण्यातही आल्या. मध्यरात्रीला त्याने, विष पिऊन, त्याचबरोबर, आणलेला सर्पही चावेल अशी योजना केली. त्याच्याबरोबर त्याच्या राण्यापैकी तिघींनी आणि एका आवडत्या रखेलीने, विष घेतले आणि या पाचही व्यक्ती राजवाड्यातील त्या एका बाजूच्या, दिवाणखान्यातील शांत वातावरणात मृत होऊन पडल्या. शहरातील कोणालाही, राज्याच्या प्रधानांनाही या शोकान्तिकेची वार्ता मिळाली नाही. फक्त एका हुजऱ्याला हे गौप्य माहीत होते पण त्याने ते आपल्याजवळच ठेवले आणि पुढे १८ तासपर्यंत ही प्रेते, त्यांच्याकडे कुणीही लक्ष न देता, त्यांच्यावर अग्निसंस्कार न होता, तशीच पडून राहिली. [पे. द. नि. प. (२); वंश. भा. ३६०८–३६११].

इकडे दुसऱ्या दिवशी, सूर्योदयानंतर तीन तासानी, खंडेराव होळकर आणि गंगाधर तात्या, आघाडीच्या पथकासमवेत जयपूरसमोर येऊन पोहोचले आणि याचवेळी ६ मैलावरील फलाने कुंडाजवळ, (Phalane Kund) मराठ्यांच्या बाकीच्या सैन्यासह, मल्हारने आपली छावणी ठोकली. यानंतरही राजधानीतील संरक्षकाकडून, मित्रत्वाच्या वा शत्रुत्वाच्या कसल्याही हालचालींचे, काहीही चिन्ह न दिसता बरेच तास गेले. अखेरी दुपारी, मध्यान्हीच्यावेळी प्रधान राजवाड्याकडे गेला आणि त्याने महाराजाकडे निरोप पाठविला की,... "सैन्य पथके बाहेर पडू लागली आहेत. आपण अद्याप झोपून का राहिला आहात?" तेव्हा, महाराज आता जिवंत नाहीत हा गौप्यस्फोट हुजऱ्याने केला.

या शोकांतिकेची बातमी वाऱ्यासारखी पसरली, आणि अनाथ झालेल्या या शहराच्या सर्वच भागातून दहशत, तेधा व दुःख यांचा बेसुमार कल्लोळ उडाला. यावेळी हरगोविंद आणि विद्याधर या जुन्या, वृद्ध प्रधानांनी लोकाना कसेबसे शांत करून, ते शहराच्या वेशीबाहेरील मराठ्यांच्या सैन्याकडे गेले, त्यांच्या दोन्ही सेनापतींची त्यानी भेट घेतली आणि झालेल्या घटनेची बातमी मल्हारकडेही पाठविली. तेव्हा तिसऱ्या प्रहरी मल्हार, आपल्या सैन्यासह शहराजवळ आला व त्याने आपले काही लोक राजवाड्याकडे पाठविले आणि राजाच्या मृत्यूच्या वार्तेची शहानिशा करून घेतली व लगेच शहराच्या निरनिराळ्या वेशीवर आणि राजवाड्यात मराठा पहारेकरी बसविले. या दुसऱ्या दिवसाच्या सूर्यास्तापर्यंत राजाचे कलेवर अग्नी संस्काराशिवाय तसेच पडून राहिले होते. तेव्हा मल्हारने आपल्या स्वतःच्या खर्चाने प्रेतावर घालण्यासाठी एक मूल्यवान वस्त्र व प्रेतयात्रेसाठी जरूर त्या खर्चास पैसे देऊन आपले दोन मुलकी अधिकारी पाठविले आणि त्या मृतदेहावर राजवाड्याच्या बागेत अग्निसंस्कार करविला. यावेळी इश्वरीसिंहाची आणखी एक राणी आणि वीस[1] रखेल्या याही त्याच्याबरोबर सती गेल्या.

---

१ पे. द. नि. प. (२) ३१ मध्ये ही हकीगत नमूद केलेली आहे. (पहा २२ जानेवारीला मल्हारच्या छावणीमधून बाबुराव विष्णूचे पत्र.) पण वंश भा. पृ. ३६१५ मध्ये नमूद आहे की, खंडेराव होळकर या विषयासक्त तरुणाला, इश्वरीसिंहाच्या अतिशय निवडक रखेल्या आपल्या अंतःपुरात न्यावयाच्या होत्या तेव्हा त्यांच्यापैकी अकरानी स्वतःला जाळून घेतले.—ही घटना १४ डिसेंबरला घडली. (वंश भा. ३६१२–३६१६). (भा. म्हणजे इश्वरीसिंहावर अंयत्संस्कार झाल्यावर दुसऱ्या दिवशी.)

## ९७ : माधोसिंह जयपूरचा राजा होतो

दुसर[illegible]वशी (१४ डिसेंबर) एक[illegible] जासूदाला उंटावरून माधोसिंहाकडे पाठविण्यात येऊन, त्याने जलदीने निघून यावे व मोकळे पडलेल्या सिंहासनावर आरूढ व्हावे असे निमंत्रण देण्यात आले. हरगोविंद व विद्याधर मल्हारला भेटले आणि हे राज्य वाचवा अशी मोठ्या आर्जवाने त्यांनी विनवणी केली. यावर चार दिवस वाटाघाटी होऊन, नंतर राज्य आणि राजधानी यांच्याबद्दल मोठी खंडणी देण्याचे त्यानी मान्य केले. यानंतर मल्हारने, ठिकठिकाणी ठेवलेल्या चौक्यांवरून आपले सैनिक परत घेतले आणि तो, पैसा वसूल करण्याच्या कामाला लागला. माधोसिंह २९ डिसेंबरला येऊन पोहोचला. रस्त्यातच त्याचे मल्हारने स्वागत करून, दोघेही एकाच हत्तीवर आरूढ झाले आणि अशारीतीने मल्हारने त्याला राजवाड्यात पोहोचविले.

६, जानेवारी १७५१ ला जयाप्पा शिंदे येऊन पोहोचला आणि त्याने आपल्या फौजांची मल्हारच्या फौजांबरोबर हात मिळवणी केली. "खंडणीच्या प्रश्नाबाबत आधीच निर्णय झाला होता पण जयपूर राज्याचा एक-तृतियांश निदान एक-चतुर्थांश तरी प्रदेश, लेखी करार करून मराठ्यांना देण्यात यावा अशी नवीच एक मागणी आता करण्यात आली. या नव्या मागणीमुळे राजा आणि राजपूत हे दोघेही दुखावले गेले." दरम्यान राजाची कुळे वा सरंजामदार ( Vassals ), आणि विशेषत: शेखावत लढवय्यांचे एक मोठे पथक आता नव्या राजाच्या भोवती जमा झाले व माधोसिंहाचे धोरण बदलले. यापुढे आपण मराठ्यांवर अवलंबून रहावयाचे नाही असे ठरवून, यासाठी, (कधीही) समाधान करता येणार नाही अशा त्यांच्या लोभाच्या मगरमिठीतून खुनांच्या मार्गाने सुटका करून घेण्याकरिता त्याने एक योजना आखली. यानुसार त्याने मराठा नेत्यांना (सरदारांना) मेजवानीसाठी आमंत्रण देऊन या वेळच्या अन्नात विष मिसळण्याची व्यवस्था केली आणि याच उपायानी त्यांच्या संरक्षकानाही ठार करावयाचे असे ठरविले. याप्रमाणे आमंत्रण पाठविण्यात येऊन ते स्वीकारण्यात यावे असा आग्रहही त्याने वरचेवर चालविला. तेव्हा मल्हारने प्रथम आपला होकार दिला पण जयाप्पाने मात्र स्पष्टच नकार दिल्यामुळे, त्यानेही नंतर हे आमंत्रण नाकारले. यानंतर, काही दिवस मराठा सैनिकांसाठी मिठाई तयार करण्याच्या कामाला, माधोसिंहाने काही ब्राह्मण लावले आणि ती तयार झाल्यावर त्यात विष मिसळले. यावेळी त्याने दोन मण पांढरे अर्सेनिक मिसळून प्यावयाचे पाणीसुद्धा विषारी केले. . . . . .
"पण परमेश्वरानेच आमच्या सेनापतीना वाचविले. जयाप्पा आणि उम्मेदसिंह हाडा यांनी या घडत असलेल्या दुष्ट कृत्याच्या मार्गात अडथळे आणले तेव्हा माधोसिंहाने हे सर्व विषारी अन्न जमिनीत गाडले." यानंतरची माधोसिंहाची अशीच आणखी एक योजना म्हणजे तात्या गंगाधर आणि इतर मराठा वकील यांना वाटाघाटीसाठी बैठकीला बोलवावयाचे, व त्या ठिकाणी त्यांचे खून करावयाचे ही होय. या चार वकिलांच्या पालख्या आपल्या राजवाड्याकडे येऊ द्या आणि नंतर त्यांच्या मागोमाग येणाऱ्या अनुयायांना मात्र शहराचे दरवाजे बंद करा असे हुकूम त्याने आपल्या पहारेकऱ्यांना दिले. पण प्रत्यक्षात झाले ते असे की, हे सगळे मराठा सरदार, एकत्र होऊन त्याच्याकडे एकाचवेळी येऊ शकले नाहीत ; त्यांनी प्रत्येकासाठी वेगवेगळी वेळ ठरवून घेतली. यामुळे हा कटही अयशस्वी झाला.[पे. द. नि. प. (२) ३१ (२७) ६५].

## § ८ : जयपूर शहरात मराठ्यांची कत्तल

अशा प्रकारे दोन्ही कट उधळले गेले हे खरे, पण राजपुतामधील द्वेषाग्नीचा भडका उडण्याचे पूर्णपणे थांबविणे शक्य नव्हते. त्याचा स्फोट १० जानेवारीला झाला. मराठ्यांच्या शस्त्राच्या जोरावर, गादीवर बसविलेल्या राजाच्या सत्तेखाली यावेळी कच्छवा राज्य असून, ते अन्यथा निराधारच असल्याने, मराठे या परिस्थितीचा फायदा घेत होते. जयपूर शहर, त्यावर जोराचा हल्ला करूनच घेतलेले आहे असे त्याना वाटत असावे असे दिसते. खंडेरावाच्या विषयासक्त वागणुकीचे अनुकरण, मराठ्यामधील सर्वसामान्य लष्करी व्यक्तीनी केल्याचे आणि नागरिकांच्या घरातून स्त्रियांना पळवून नेण्याचा प्रयत्न केल्याचे कोठेही नमूद केलेले नाही, पण त्यांची लष्करी ठाण्यामधून वागण्याची सैनिकी रीत आणि वरचष्मा दाखविणारा अन्य वागणुकीतील डौल यामुळे अभिमानी राजपुतांचे पित्त खवळले होते. अशा वातावरणात १० जानेवारी या दिवशी सुमारे ४००० मराठे जयपूर शहरात आले ते, नियमबद्ध रचना व बांधणी आणि कलापूर्ण सौंदर्य यादृष्टीने हिंदुस्थानात अद्वितीय असलेल्या, नव्याने बांधलेल्या या शहरातील देवालये आणि अन्य प्रेक्षणीय स्थळे पहाण्यासाठी आणि घोडे, उंट व त्यावरील खोगीर इ. जामानिमा अशा ज्या वस्तूसाठी हे शहर प्रसिद्ध होते त्याही खरेदी करण्यासाठी आलेल्या मराठ्यांमध्ये जयाप्पाचेही अनेक आश्रित व नोकर ( Retainers ) असून, त्यात पालखीचा मान असलेले चार सेनाधिकारीही ( Captains ) होते. दुपारी माध्यान्हीच्या वेळी एकाएकी बंडाचा स्फोट होऊन, दगाफटक्याचा काहीही संशय नसलेल्या बेसावध मराठ्यांवर नागरिकांनी हल्ला केला. पुढे नऊ तासपर्यंत, शहराच्या पेठापेठांमधून रक्तपात आणि लुटालूट यानी थैमान घातले. या धुमश्चक्रीत सुमारे १५०० मराठे मारले गेले, सुमारे हजार जखमी झाले, (यापैकी पुष्कळाना प्राणघातक जखमा झाल्या होत्या) आणि आलेल्यांपैकी, फक्त सुमारे सत्तरच जखमी न होता, जीव घेऊन निसटले. पुष्कळानी शहराच्या तटावरून उड्या मारून जाण्याचा प्रयत्न केला पण असे करताना त्यापैकी अनेकांचे पाय वा पाठीचा कणा मोडला आणि फक्त थोडेच अशा प्रयत्नात वाचू शकले. यावेळी मरण पावलेल्या लोकांत जयाप्पा आणि मल्हार यांचे अनेक उच्च अधिकारी व नोकर, शंभर ब्राह्मण, पेंढारी दासी आणि मुलेसुद्धा होती. हे लोक स्वार होऊन आलेल्या घोड्यांपैकी १००० उत्कृष्ट घोडे तसेच त्यांच्या हातातील सोन्याची कडी—बांगड्या—तोडे इ., गळ्यातील मोत्यांचे कंठे—हार असे दागिने आणि लोकांनी स्वतःबरोबर आणलेला पैसा व अंगावरील सरंजाम—पोशाख अशा अनेकविध वस्तूंची राजपुतानी लूट केली.[१]

१ पहा : बाबूराव विष्णु याचे २२ जानेवारीचे पत्र. . . . राजाने विचारपूर्वक केलेल्या योजनेतूनच ही कत्तल झाली असा बाबूराव आरोप करतो आणि पुढे म्हणतो. . . . "पालखीतून जाणारे जयाप्पाचे चार सेनाअधिकारी कॅप्टन्स म्हणजे तात्या आणि त्याच्या बरोबरच, पूर्वी आमंत्रण दिलेले अधिकारी होत अशी चुकीची समजूत करून घेऊन, माधोसिंह आपल्या दरबारातून बाहेर पडला व राजवाड्याच्या छपरावर गेला. नंतर पूर्वीच ठरविलेल्या मनसुब्यानुसार त्याच्या लोकांनी वेशी बंद केल्या आणि मराठ्यांची कत्तल करण्यास सुरवात केली. . . . . ३००० ठार मारले गेले आणि १००० जखमी झाले." [पे. द. नि. प. (२) ३१]. वंशभास्कर ३६२२ मध्येही हेच आकडे दिलेले आहेत. पण हरबाजी राम, या दुसऱ्या एका मराठा प्रतिनिधीने जयपूरमधून ७ फेब्रुवारीला लिहिले असून त्यांत मृतांची संख्या १५०० होती असे तो म्हणतो. याचबरोबर १२ फेब्रुवारीला लिहिणारा हरी विठ्ठल, मृतांचा हाच आकडा पाचशे वा सहाशे असा देतो. [पे. द. नि. प. (२७) ६४ व ६५].

या अपघाताचा हादरा राजधानीच्या बाहेरही जाणवला. खेड्यापाड्यातूनही राजपुतानी उठाव केले आणि ज्या ज्या ठिकाणी त्याना मराठा जासूद (Conrier) पकडता आले त्या त्या ठिकाणी, त्याना राजपुत्रानी ठार केले. परिणामतः मराठ्यांच्या दृष्टीने त्याना रस्ते बंदच झाले. नंतर दोन दिवसांनी मराठा सैन्याने जयपूरच्या वेशीपासून दूर आठ मैलावरील एका ठिकाणाकडे कूच केले. युद्धाच्या धमक्यांच्या वातावरणात असे सात दिवस गेल्यावर माधोसिंहाच्या दोन वकिलानी मराठ्यांच्या दोन प्रमुख सेनापतींची भेट घेऊन झालेल्या बंडाबद्दल माधोसिंहाला आधी काहीही माहिती नव्हती आणि त्याने त्यात कसलाही भाग घेतला नव्हता असे त्याच्या वतीने सांगितले. हे बंड एक उत्स्फूर्त आणि अचानक झालेला भडका होता असेही आणखी त्यानी त्याचे वर्णन करून यात जे मेले त्याना परत आणणे अशक्य असल्याने आता तडजोड घडवून आणावी अशी त्यानी कळकळीची विनंती केली. आता मराठ्यांच्या नेत्यानाही वाटू लागले होते की, यावेळी त्यांच्या हाती असलेल्या फौजांच्या सामर्थ्यावर, झालेल्या कत्तलीबद्दल सूड उगविण्यास ते असमर्थ आहेत. जयपूर शहर, धडाक्याने हल्ला करून घेण्याच्या दृष्टीने अभेद्य आहे. हा एकूण प्रदेश बराच विस्तृत असून त्यात लढाऊ जमातींच्या लोकांची वसती आहे. अशा एकूण परिस्थितीत, झालेल्या अपराधाबाबत काही अटीवर क्षमा करण्याला त्यानी संमती दिली. त्यानी घातलेल्या या अटी अशा : ......(१) शहरामध्ये काढून घेतलेले सर्व घोडे परत करावे. (२) मराठ्यांकडून लुटून घेतलेल्या सर्व मालमत्तेची भरपाई करावी. (३) पूर्वी कबूल केलेल्या (भा. पहा–७ परि. १) खंडणीच्या सर्व रकमेबद्दल, पेढ्यावर हुंड्या द्याव्यात. (orders on Bankers).[१] अशा अटी ठरवून समझोता झाला, तरीही दुरावलेल्या भावना आणि उभयपक्षी संशयाचे वातावरण टिकून राहिले आणि राजा माधोसिंह व मल्हार यानी एकमेकास भेटण्यास नकार दिला यावेळी मराठ्यांच्या छावणीत सफ्दरजंगाचा वकील राजा रामनारायण, हाही होता मराठ्यांनी बंगशविरुद्धच्या मोहिमेत सफ्दरजंगाला मदत करण्यास लवकर यावे असा तो मराठा सेनापतीना सतत आग्रह करीत असून अशा मदतीसाठी, त्या अफगाणांचा पराभव केल्याबरोबर, ५० लाख रुपये देण्याचेही तो आश्वासन देत होता. तथापि जयपूरकरांबरोबर ठरलेला पैसा मिळवण्यासाठी तेथे थांबलेल्या मराठ्यांना, गोडगोड वचने देत, माधोसिंह प्रत्यक्ष पैसा देण्याचे मात्र दिवसामागून दिवस पुढे ढकलीत होता. यामुळे अखेरी मराठ्यांना जयपूर सोडता येईतो, तीन आठवड्यापेक्षा जास्त काळ फुकटच गेला. दरम्यान त्यांच्या छावणीत भयानक दुर्भिक्ष्य थैमान घालीत होते. तेथे रुपायाला तांदूळ चार शेर, तेल २ शेर, तूप १½ शेर, जोंधळा-बाजरी, अशा धान्याचे पीठ ८ शेर, आणि घोड्यासाठी चंदी–हरभरा इ.... १६ शेर, अशा भावाने विकले जात होते. नेहमीच्या व्यापारीमार्गाने त्यांच्या छावणीत कसलाही माल वा नित्योपयोगी वस्तू येत नव्हत्या. दाणागोटा–चंदी वैरण आणण्यासाठी जाणारी त्यांची पथके खेड्यावर हल्ले करून थोडे फार धान्य आणीत तेवढेच मिळे. ७ फेब्रुवारीला मल्हारचा तळ, जयपूरच्या पूर्वेस २४ मैलांवर होता. यानंतर थोड्या दिवसानी सफ्दरजंगाला जाऊन मिळण्यासाठी, आग्र्याच्या दिशेने, नेहमीच्या सामान्य टप्प्यानी, त्याने आपले कूच पुन्हा सुरू केले. [पे. द. नि. प. (२७) ६४ आणि ६५].

१ या अटींनुसार जयपूरमधून गोळा केलेल्या सर्व रकमांतून, माधोसिंहाच्या राज्याबाबत, छत्रपतींना द्यावयाचा नजराणा म्हणून, प्रतिवर्षी त्याना पन्नास हजार रुपये द्यावेत असे हुकूम, मल्हार व जयाप्पा यांना त्यांच्या राजाने––छत्रपतींनी––१८ जून १७५१ ला दिले.

## § ९ : सलाबतखानाची सुरजमलाशी लढाई : जानेवारी १७५०

माधोसिंह गादीवर बसल्यावर जयपूरमधील अंतर्गत, वारसा युद्ध संपले. आता आपण मारवाडकडील हकीगतीकडे वळू. मारवाडचा राजा अभयसिंह, २१ जून १७४९ ला मरण पावला आणि त्याचा मुलगा रामसिंह सिंहासनावर बसला. रामसिंह आणि त्याचा चुलता बख्तसिंह (नागोरचा अधिपती–Chieftain) यांच्यामध्ये वारशाच्या प्रश्नावरून युद्ध होईल अशी भीति, अभयसिंहाच्या मृत्यूपूर्वी बरेच दिवस वाटत होतीच (पहा : १ परि. १) हे अपेक्षित युद्ध अभियसिंहाच्या मृत्यूनंतर फार काळ टाळणे शक्य नव्हते हे खरे पण ते लवकर व एकाएकी पेटविले ते मात्र, नव्या तरुण महाराजाची अक्कलशून्य घमेंड, बेदरकार चढेलपणा आणि त्याने उद्धटपणे बख्तसिहाला दिलेले आव्हान, यानी. दिल्लीच्या दरबाराने बख्तसिंहाची, गुजरातचा सुभेदार म्हणून नुकतीच नेमणूक केली होती (२९ जून १७४८). यापूर्वीच गुजरातेत मराठ्यांची चढाई झालेली असल्यामुळे, याच चढाईचा पूर थोपवून धरण्याच्या निरर्थक आशेपोटीच बख्तसिहाची ही नेमणूक झाली होती हे खरे पण यामुळे, त्या दरबारातील त्याचे वजन अलीकडेच वाढले होते. अशा परिस्थितीत बख्तसिंहाच्या मनाप्रमाणे करून त्याची समजूत घालणे हे मुघल दरबाराच्या हिताचेच होय, अशी त्या दरबारात समजूत होती. तेव्हा मारवाडची गादी हिसकावून घेण्याच्या कामी त्याला सशस्त्र मदत द्यावी व या मदतीच्या मोबदल्यात त्यानेही शाही पक्षाला, आग्रा व अजमीर या दोन सुभ्यांचे (हे दोन्ही सुभे यावेळी मिरबक्षीच्या अधिकाराखाली होते). आक्रमक मराठे व अंतर्गत बंडखोर यांच्याविरुद्ध रक्षण करून तेथे बादशहाचा कारभार सुस्थिर करण्यासाठी मदत करावी, असे ठरविण्याचे अधिकार, यावेळी शाही दरबाराने मिरबक्षीला दिले होते. अशा प्रकारची व्यवस्था उभयपक्षी ठरविल्यावर, सैन्याची जमवाजमव करण्यासाठी बख्तसिंह आपल्या छोट्याशा राज्याकडे (Principality) गेला आणि बरोबर १८००० सैन्य घेऊन सलाबतखान अजमीरकडे निघाला. त्या ठिकाणी या दोघानी पुन्हा एकत्र यावयाचे असे ठरले होते.

अजमीरच्या वाटेवर, रमजान उपवासाच्या महिन्यातील पहिले दहा दिवस (३० नोव्हेंबर ते ९ डिसेंबर) बक्षी, पतौडी येथे (Pataudi—दिल्लीच्या नैर्ऋत्येस ३५ मैल) मुक्कामास राहिला. नंतर त्याने मेवाडच्या राज्यात नासधूस करीत जाट राजाच्या मालकीच्या निमराणा या छोट्याशा मातीच्या किल्ल्याकडे कूच केले (निमराणा—पतौडीच्या नैर्ऋत्येस ३५ मैल), त्यांच्या आघाडीच्या पथकानी, पहिल्याच हल्ल्यात तो किल्ला सर केला (३० डिसेंबर). निमराणाच्या पश्चिमेस १७ मैलावर नार्नोळ नावाचे एक, फौजदाराच्या हाताखालील ठाणे होते, त्याच्या दिशेने दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर, त्याची छावणी व सामानसुमान पुढे रवाना करण्यात आले. नंतर थोड्याच तासानी, त्याच्या मागोमाग जाण्यासाठी, सलाबत स्वतःही घोड्यावर बसला पण त्याने एकाएकी आपला बेत बदलला व आग्र्याच्या सुभ्याकडे जाऊन प्रथम जाट राजाशी लढा द्यावयाचे ठरवले आणि आपले सामानसुमान परत बोलावून आपला मोर्चा आग्र्याच्या दिशेने फिरविला. या दिवशी रात्री त्याने सराई सोभाचांद (Sobha-chand) मध्ये मुक्काम केला.[१] त्याच रात्री सुरजमलच्या हाताखाली, हालचालीस अतिशय सुटसुटीत व चपळ अशा ५००० सैनिकांच्या एका सैन्य

१ हिंदुस्थानचा नकाशासंग्रह (Indian Atlas) नकाशा नं. ४९ यानुसार, नार्नोळच्या थेट पूर्वेस, ५ मैलावर व निमराणाच्या वायव्येस १५ मैलावर सोबापूर (भा. जवळच सोभाचांद सराई असावी) आहे.

विभागाने मोठ्या निकडीने कूच करून त्यांना गाठले. दुसरे दिवशी (१ जानेवारी १७५०) चंदीवैरण आणण्यासाठी गेलेल्या मुघल मागविली. त्यांचा रस्ता जाटानी अडविल्याचे दिसून आले. तेव्हा त्यानी आपल्यासाठी मदत पथकाला ती सूर्यास्तापूर्वी दोन तास येऊन पोहोचली. येथे असलेले बक्षीचे सैनिक युद्धाचा अनुभव नसलेले व यावेळी भुकेलेले व तहानलेले होते. समोर जाटावर रोखून आपल्या तोफा बसविल्या तर रात्रीच्या वेळी हल्ला करून जाट त्या जिंकून घेतील अशी भितीही त्यांना वाटली. तेव्हा त्यांनी जाटाकडे पाठ फिरवून एका-मागोमाग एक असा पळ काढण्यास सुरवात केली. इतकेच नव्हे तर, पळताना, तोफाही आपल्या पुढे ठेवल्या (भा. म्हणजे शत्रूच्या बाजूला ठेवण्याऐवजी उलटचा बाजूला पळताना आपल्यापुढे). ही अव्यवस्था पाहून जाटानी एकामागून एक अशी पथके पाठवून हल्ले सुरू केले. या हल्ल्यात त्यांचे पुढचे पथक बंदुकांच्या फैरी झाडे व परते, तोच पाठी-मागचे पथक येऊन फैरी झाडे. एका पाठोपाठ एकाने मारा करण्याच्या या तंत्रामुळे मुघलांच्या-कडे खूपच कत्तल होई. बक्षीच्या सैन्याच्या उजव्या फळीचा सेनापती हकीमखान खेशगी हा, यावेळी बंदुकीच्या गोळीने मारला गेला आणि त्यांच्या आघाडीच्या पथकांचा प्रमुख अलि रुस्तुमखान, हाही जखमी होऊन अखेरी या शाही सैन्याचा पूर्ण पराभव झाला. आता विजयी जाट घोडदळाने सलाबतखानाच्या छावणीभोवती घिरट्या घालण्यास सुरवात केली आणि तिचा कांही भाग लुटलाही. यामुळे सलाबत आगतिक बनून भयभीत झाला. या लढाईपूर्वी जाट राजा बदनसिंह, बक्षीला नम्रतापूर्वक म्हणाला होता की, त्याने बादशहा-विरुद्ध काहीही अपराध केलेला नसून, तो त्याचा, एकनिष्ठ सरंजामदार सेवक (Vassal) म्हणूनच रहात आहे..... याचबरोबर त्याने बक्षीची विनवणीही केली होती की, त्याने बदनच्या जहागिरीची काही नासधूस करू नये. तेव्हा, 'मेवात ही आपली स्वतःची जहागीर असून, जाट राजाने तिच्यातील काही खेडी जबरदस्तीने घेतली आहेत व असदखान जाट याला ठार केले आहे' असे बदनच्या विनवणीच्या संदर्भात बक्षी त्यावेळी म्हणाला होता. या परिस्थितीत आता जर त्याने जाट राजाच्या बाबतीत सहनशीलता व संयम दाखवाव-याचा तर त्या मोबदल्यात जाट राजाने त्याला दोन कोट रुपये द्यावे. अशीही मागणी त्याने, त्याचबरोबर मगरूरपणे केली होती. सोभाचांद येथील जाटांच्या विजयाने आता ही स्थिती पालटली.... एक-दोन दिवस आपल्या मोर्चेबंद छावणीत अडकून पडल्यावर असहाय्य बक्षीलाच तहाची याचना करणे भाग पडले तेव्हा पिंपळवृक्ष तोडणार नाही वा त्याच्या पूजेमध्ये अडथळा आणणार नाही असे आश्वासन बादशाही सरकाराने द्यावे आणि बक्षीने जाट राजाचा सल्ला स्वीकारून नार्नोलच्या पुढे जाऊ नये या अटीवर जाट राजाने तहाची विनंती मान्य केली आणि यानुसार बक्षी नार्नोलच्या पुढे जाणार नाही याच्या मोबदल्यात आपण अजमीर सुभ्याच्या वसुलापोटी, राजपुतांकडून १५ लाख रुपये वसूल करू व त्या रकमेचा भरणा शाही खजिन्यात करू अशी जबाबदारी स्वीकारण्याचे त्याने मान्य केले.[१] (भा. बक्षीची मगरूरीची मागणी पूर्वी २ कोटीची होती. आता त्याला देऊ केले ते इतकेच !).

१ सियार (३) ३८–३९; मु झ. २८–३२; सुजान चरित्र (३) जंग, पे. द. नि. प. (२१) २६, यात आणखी म्हटले आहे की, बक्षीवरील हल्ल्यासाठी गोहदचा राणाही सुरजमलला मिळाला होता. या हल्ल्यात सुरजमलाने २ वा ३ आणि राणाने एक, असे हत्ती बक्षीकडून जिंकून घेतले. शेवटी ९ लक्ष रुपये लढाईचा खर्च म्हणून देण्याचे आणि सुरजमलबरोबर ५००० घोडेस्वार (आणि गोहदराणाकडून २०० सैनिकांचे पथक) बक्षीकडे नोकरीसाठी पाठविण्याचे जाट राजाने मान्य केले.

## § १० : सलाबतखानाची राजपुतान्यावरील मोहीम

यानंतर बक्षी पुन्हा आपल्या पहिल्या रस्त्याकडे वळला आणि नार्नोळला जाऊन पोहोचला, तेथे त्याला बख्तसिंह येऊन मिळाला. नंतर दोघांनी मिळून तातडीने कूच करून ते अजमीर जवळच्या गोकला टेकडीजवळ येऊन पोहोचले. बक्षी येत आहे अशी पहिली वार्ता आल्याबरोबर, जोधपूरच्या रामसिंहाने जयपूरच्या इश्वरीसिंहाकडे मदतीसाठी विनवणी केली. राजस्थानमधील कोणत्याही सत्ताधीशापेक्षा इश्वरीसिंह श्रेष्ठ असून, जोधपूरचे राठोड या त्याच्या पूर्वीच्या प्रतिस्पर्धी घराण्याचाही तोच खरा पुरस्कर्ता आहे अशी उघडपणे दाखविलेली सार्वजनिक मान्यताच, असा या बिनंतीचा अर्थ होत असल्याने, इश्वरीसिंहाने तिचे आनंदाने स्वागतच केले. नंतर त्याने जोधपूर येथे रामसिंहाची भेट घेतली आणि युद्धात "जय देणारा परमेश्वर आहे" असे उद्गार काढून येत असलेल्या शत्रूविरुद्ध युद्ध करण्याचा निर्णय घेतला. या दोघांचे संयुक्त सैन्य आता ३०,००० झाले असून त्यांच्या जोडीला भरपूर तोफखानाही होता. हे सैन्य मारवाडच्या पूर्व सरहद्दीवरील मेर्ता या किल्ल्याकडे निघाले आणि ४ एप्रिल १७५० ला सकाळी पिपारपर्यंत येऊन पोहोचले.

दरम्यान अजमीर येथे काही काळ विश्रांती घेतल्यावर, सलाबतजंगाने, बख्तसिंह समवेत पुन्हा पुढे कूच सुरू केले व पुष्कर आणि शेरसिंहाच्या रियानमार्गे (मेर्ताच्या आग्नेयेस १५ मैल व सरस्वती नदीच्या उत्तरेस दोन मैल) ते दोघे मेर्ताकडे निघाले मेर्तापासून खूपच तीव्र वळण घेऊन ते दक्षिणेकडे निघाले आणि लुनिआवास [ मेर्तापासून दक्षिण-नैर्ऋत्य दिशेला (S. S. W.) ११ मैल] मार्गे पुढे चालले. शेवटी इश्वरीसिंह होता. त्या ठिकाणच्या उजव्या बाजूला सुमारे ५ मैलावर येऊन तेथे त्यानी आपले कूच थांबविले. (हे ठिकाण म्हणजे मेर्ताच्या रस्त्यावरील, पिपारच्या पूर्वेस ७ मैलावर असलेले रावना–Raona खेडे असले पाहिजे असे दिसते). इतके पुढे येण्यासाठी, बख्तसिंहाने सलाबतचे मन वळविले ते यामुळे काही विशेष फायदे होतील अशी खात्री पटवून व यातून आशा निर्माण करूनच. बख्तसिहाने खात्रीपूर्वक, बक्षीला सांगितले होते की, आज पुष्कळसे राजे-जहागिरदार (Chiefs) असे, रामसिंहाच्या बाजूला असले तरी वस्तुतः ते असंतुष्टच असून आपण जरूर तितके जवळ येऊन पोहोचलो की, लगेच आपल्या बाजूला येऊन मिळतील आणि यामुळे जोधपूर राजा असहाय्य बनून त्याला खंडणी देणे भाग पडेल. दिलेल्या अशा ग्वाहीमुळेच सलाबत इतके पुढे येण्यास तयार झाला होता.

मुघल सैन्य जवळ आल्याचे कळल्यावर इश्वरीसिंह लढाईच्या पवित्र्यात, शत्रूच्या रोखाने पुढे सरकला. सलाबतनेही आपल्या बाजूने लढाईची तयारी चालविली. त्याने आपली छावणी व सामानसुमान पिछाडीला ठेऊन उभयता राजपूत राजांच्या समोर निधड्या छातीची आपली आघाडी उभी केली. तथापि सलाबतचे स्वतःचे सैन्य म्हणजे एकाच घरात दोन, अंतर्गत–विरोधी पक्ष एकत्र रहात असल्यासारखेच होते. बख्तसिंहावर त्याला पूर्ण विश्वास ठेवता येत नव्हता. तो म्हणाला . . . . "हे सगळेच रणगार (Rangar . . . . रानटी राजपूत) एकाच अवलादीचे आहेत. बख्तसिंह कोणत्या वेळी काय करेल याची मला खात्री नाही,"[१]

१ स्वतःचे हित आणि स्वतः दिलेले वचन पाळण्याबाबत आपल्यावरील विश्वास, यापेक्षा राठोड वंशाच्या प्रतिष्ठेबद्दल, बख्तसिंहाला अधिक महत्त्व व आस्था वाटत होती व या प्रतिष्ठेसाठी तो आपले हित वा आपण दिलेला शब्द बाजूला सारील हे पूर्वी एकदा सिद्ध झालेच होते. जोधपूरवर स्वारी करण्यात यावी म्हणून त्याने स्वतःच सवाई जयसिंहाला बोलाविले असताना, त्यातून निर्माण झालेल्या गंगवानाच्या लढाईच्या वेळी (१७४१) त्याने स्वतःच स्वारी करून आलेल्या जयसिंहाबरोबर, अतिशय निकराने लढाई दिली होती (भा. पहा १ : परि. २).

म्हणून त्याला माझ्याच हत्तीवर बसवून ठेवले पाहिजे." तथापि बख्तसिंहाला सलाबतच्याच हत्तीवर बसवून घेण्याच्या सूचनेला त्याचे आश्रित व अनुयायी यानी विरोध केला. त्याना भीती वाटत होती की, सलाबतच्या हत्तीवर बसवून घेतल्यावर जर यदाकदाचित त्याला कैदेत अडकविले तर ते मात्र, आपल्या नेत्याशिवाय उघडे पडून निराधार बनतील. असे अंतर्गत मतभेद व भांडण यामुळे त्या दिवशी कोणतीही लढाई देण्याचे मात्र रहीत झाले आणि दोन्ही सैन्ये एकमेकासमोर केवळ खडी राहिली. पण अशा प्रकारे पुढे आणि मागे अशी केवळ चाल करीत, सतत लढाईच्या पवित्र्यात उभे राहिल्याने सलाबतचे सैन्य अगदी थकून गेले. रामसिंहाकडील कोणीही राजा वा जहागिरदार त्याच्या बाजूला आला नाही, मध्यान्हीचा सूर्य डोक्यावर तळपत होता आणि दृष्टीपथात कोठेही झाड नव्हते. त्याच्या छावणीत पाण्याचे दुर्भिक्ष्यही निर्माण झाले आणि पाणी आणणाऱ्या भिस्त्यांच्या पखालीतून त्याचे सैनिक पाणी लुबाडू लागले. अशा परिस्थितीमुळे सलाबतखानाने, इश्वरीसिंहाला स्वत:च्या सहीने एक पत्र लिहिले. त्यात तो लिहितो... "युद्ध व्हावे अशी माझी मुळीच इच्छा नाही. आताचा प्रश्न हा बख्तसिंह आणि रामसिंह यांच्या मधलाच आहे. तो तुम्हीच मध्यस्त म्हणून सोडविणे बरे. तुमच्या आघाडीच्या पथकाना आणखी पुढे येण्यास तुम्ही जर परवानगी दिली नाहीत तर ते माझ्या मते व्यवहारी व उपयुक्त ठरेल. आता ज्या ठिकाणी मी आहे. त्या ठिकाणीच माझा तळ ठेवीत असून तुम्हीही आहात त्या ठिकाणीच आपला तळ ठेवावा. तुमच्याकडे व माझ्याकडे मिळून ३० ते ३५ हजार सैनिक असून शिवाय उभयतांकडे तोफखान्याचे मोठे तांडेही आहेत. बख्तसिंह या एकाच व्यक्तीसाठी आपण उभयतानी भांडत बसण्यात कोणता फायदा आहे ?" अशा प्रकारे सलाबत जंगाने आपण एक अधिक वरच्या दर्जाचे, उच्चपदस्थ उमराव असून सदिच्छा व उपकार बुद्धीनेच प्रेरित आहोत असा देखावा आपल्या भाषेमधून निर्माण केला. याचबरोबर त्याने आपल्या सैन्यासह, बाजूला तिरप्या दिशेने कूच करून, जयपूर–जोधपूरच्या संयुक्त सैन्यापासून चार मैलावर आपला तळ ठेवला.

इश्वरीसिंहाला आता दिसून आले होते की रामसिंहाला केवळ आपल्या संरक्षणाखाली घेतले एवढ्यानेच त्याला, सैन्याच्या खर्चासाठी म्हणून रामसिंहाकडून मोठी रक्कम आणि जयपूर–जोधपूर या दोन प्रतिस्पर्धी महाराजांमध्ये आपणच अधिक सामर्थ्यवान अशी राजपूत समाजाला दिसून आलेली प्रतिमा, असे फायदे आधीच मिळालेले चांगले बक्षीलाही आता वाटत होते की त्याने आपले सामर्थ्य आणि मोठेपण यासंबंधी चांगले मत, सामान्यपणे सगळ्यांमध्ये आधीच निर्माण केले असून आता जर आणखी पुढे जाऊन त्याने हे युद्ध, राठोड्यांच्यावर लादले तर मात्र ती संबध जमातच साम्राज्याचा कडवा शत्रू बनेल. प्रस्तुत झगड्यातील तिसरा पक्ष रामसिंहाचा. त्याच्याही आता लक्षात आले की, त्याच्या मांडलिकांपैकी अनेकांची निष्ठा संशयापद असून, ते आपल्याला किल्ल्यात तिऱ्हाइताप्रमाणे बाजूलाच रहात असल्यामुळे या मोहिमेचे सर्वच ओझे प्रत्यक्षात काहीही मदत न मिळता त्याच्या एकट्याच्याच खांद्यावर पडेल. प्रस्तुत लढ्यातील तीनही पक्ष अशा मनस्थितीत असल्याने, तडजोडीबाबत सलाबतने केलेल्या सूचनेचे सगळ्यांनीच स्वागत केले. यातून तडजोडीसाठी अटींबाबत चर्चा सुरू झाली आणि या चर्चेच्या काळासाठी रामसिंहाने बक्षीच्या समोरच २–३ मैलावर आपला तळ ठेवला.

बक्षीचा तळ होता त्या भागात पाण्याचे आधीच दुर्भिक्ष्य असून, उपलब्ध असलेले पाणीही वाटाघाटीच्या दोन दिवसात पूर्णपणे संपुष्टात आले. पण पाण्याचा अधिक चांगला

पुरवठा असलेल्या एकमेव भागाकडे जाण्याचा त्याचा रस्ता इश्वरीसिंह व रामसिंह या दोन्ही महाराजांनी अडविला होता. या परिस्थितीत आता, सलाबतचा तळ सांभाळण्यासारखा न राहिल्याने असहाय्य झालेल्या त्याने याचा सर्व दोष बख्तसिंहावर टाकला व त्याला तो म्हणाला.... "तुझ्यासाठी, मी अशा बदनामकारक स्थितीत सापडलो आहे... तू मात्र, दिलेल्या आश्वासनांपैकी एकही पुरे केलेले नाही."... नंतर आपल्याच या मित्राविरुद्ध आगाऊ तरतूद म्हणून आपल्या तंबूभोवती त्याने आपल्या तोफखान्याचे मोर्चे उभे केले. तेव्हा, ६ एप्रिलला, बिकानेरचा राजा, (बख्तबरोबर दृढ व टिकाऊ मैत्री असलेला), २००० लोक बरोबर घेऊन मुघल सैन्याच्या तळावर मदतीसाठी येऊन पोहोचला आणि त्याने बक्षीचा राग शांत केला. यावेळी इश्वरीसिंहानेही, त्याचे मन वळवून पुन्हा त्याला प्रसन्न करण्यासाठी त्याच्याकडे नम्रतापूर्वक निरोप पाठविला आणि त्यातून, सलाबतखान ही एक थोर व्यक्ती असून, या थोरवीला शोभेल अशा प्रकारे त्याने, लहानसहान व्यक्तींची थोर मनाने काळजी घ्यावी, फार उतावळे होऊ नये, अशी विनंतीही केली. या नंतर बक्षी तेथेच थांबला व तडजोडीच्या वाटाघाटी पुढे चालल्या. यातून जे काही रोखीने मिळेल ते घ्यावयाचे आणि बाकीच्या रकमेबाबत लेखी करार करून घ्यावयाचा.. बख्तसिंहासाठी काही पैसा रामसिंहाला द्यावयास लावावयाचा आणि अखेरी रामसिंहाच्या विनवणीलाही काहीसा मान देऊन त्याच्यावर बसविलेली खंडणीही थोडी कमी करावयाची, असे त्याचे विचार होते. अशा रीतीने दोन्हीही राठोड राजाना आपल्या उपकाराच्या ओझ्याखाली, त्याला राखावयाचे होते [पे. द. नि. प. (२) १६].

पण वाटाघाटीत घासाघीस चालूच राहिली आणि दहा दिवसातही उभयपक्षी संमत असलेला करार झाला नाही. तेव्हा मात्र बक्षीने बळाचा वापर करण्याचे ठरविले. यावेळी बख्तसिंहाने दिलेला सल्ला उद्धटपणे झुगारून, सलाबतखानाने आपल्या आघाडीच्या तुकड्यांना, रामसिंहाच्या आघाडीच्या पथकावर, त्याच्या पुढच्या रांगाबरोबर भारी तोफांचे मोर्चे उभे केलेले होते तरीही, हल्ला करण्यासाठी पाठविले. मुघल पथके हल्ला करून पुढे येत असताना, राजपुत्रानी प्रथम काहीही हालचाल केली नाही आणि ती जरूर तेवढी जवळ आल्याबरोबर त्यांच्यावर एकदम तोफांचा भडिमार केला. यामुळे मुघलांचे बरेच लोक मारले जाऊन बादशाही सैन्य थांबले आणि त्यानीही आपल्या तोफातून प्रत्युत्तर देण्याचे सुरू केले. (१४ एप्रिल १७५०). अशा प्रकारच्या काहीही निर्णय न लावणाऱ्या लढाईत, (चार तास दारूगोळ्याची निरर्थक हानी झाल्यावर अखेरी निसर्गानेच माणसावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. राजपुतांच्या ओसाड प्रदेशातील उन्हाळ्याचा तळपता सूर्य सैनिकाना असह्य ठरला. या विभागात ज्या काही विहिरी होत्या त्या राजपुतांच्या ताब्यात असल्यामुळे, मुघल सैनिक तहानेने व्याकूळ झाले.... "पाण्याच्या शोधात असलेले, यापैकी बरेचसे सैनिक, राजपूत होते त्या बाजूकडे गेले, तेव्हा मोठ्या दिलदार अंतःकरणाने राजपुतानी, या आलेल्या मुघल सैनिकाना व त्यांच्या घोड्याना तृप्त होईपर्यंत पाणी दिले आणि ते म्हणाले... "तुम्ही आता परत जा. तुमच्या व आमच्या दरम्यान युद्ध चालू आहे..." [सियार (३) ३९].

अशा परिस्थितीत लढाई आपोआपच थांबली. शाही पक्ष आपल्या तळावर परतला आणि याचेच अनुकरण करीत राजपूतही आपल्या तळावर परतले. या लढाईत उभय पक्षाकडील मिळून अवघे ७०–८० लोकच मारले गेले. दुसरे दिवशी, थेट समोरून हल्ला

चढवावा व तरवारीला-तरवार भिडवून लढाई द्यावी व प्रस्तुत भांडणाचा निर्णय लावावा अशाच अर्थाची उघडउघड, मोठमोठ्याने बोलणी, प्रथम दोन्हीही तळावर चालू होती; पण मारवाडच्या प्रखर सूर्याला पुन्हा तोंड देण्यास दिल्लीचे सैन्य तयार नव्हते. दुसऱ्या दिवशी आपल्या तळाभोवती, फक्त पहारेकरी पथके ठेवून, ते आपल्या तळाबाहेर मुळीच पडले नाहीत.

दुसरीकडे इश्वरीसिंहानेही हेच अवसान दाखविले. लढाईनंतरच्या रात्री त्याने स्वतःचे आणि मारवाडच्या महाराजांचे अनुयायी अशा सर्वांबरोबर उघडपणे सल्लामसलत केली. या दरबारात आवेशाने गर्जना करीत तो बोलला.... "राजपुतानी तोफांचा वापर करून लढाई द्यावयाची म्हणजे आपण भ्याड आहोत अशा लज्जास्पद दोषाला आणि सगळ्यांच्या शापाना पात्र आहोत हेच दाखविणे होय. तेव्हा तुम्ही आता कंबरा कसा आणि घोड्यावर स्वार होऊन समोरासमोर हल्ला करा. परमेश्वरच विजय देणारा आहे." या आव्हानाला सर्वांनी प्रतिसाद दिला.... "आम्ही महाराजांचे सेवक आहोत, सदैव आपल्या हुकमाप्रमाणेच वागणार. आपण फक्त मागे उभे रहा आणि उद्या आम्ही कसे लढतो ते तर पहा." तथापि हा सर्व आरडाओरडा म्हणजे जयपूर राजाने आपल्या मोठेपणाचा दिमाख राखण्यासाठी चालविलेले ढोंगच होते, असा तर्क, या महाराजाच्या तळावर त्यावेळी असलेल्या मराठ्यांच्या वकिलाने, मोठ्या चतुराईने, प्रारंभीच केला होता आणि तोच बरोबर होता. उघड्या दरबारात केलेल्या या जळजळीत निर्धारानंतर, इश्वरीसिंहाने आपल्या व रामसिंहाच्या मिळून सहा प्रमुख सल्लागारांबरोबर गुप्त सल्लामसलत केली. त्याच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यानी सांगितले की, यावेळी लढाई देण्यापेक्षा, पैसा देऊन तह करणे अधिक शहाणपणाचे होय. आपल्या धन्याचा, यावेळी शांततेच्या बाजूने कल आहे हे त्यानी ओळखले असून, त्याने आधीच हरिहकीमच्या मार्फत, मिरबक्षी बरोबर तहाच्या वाटाघाटी सुरू केल्याचे त्यांना माहीत होते, यामुळेच आताचा हा सल्ला होता.

## § ११ : सलाबत राजपुताबरोबर तह करतो

दोन्हीही पक्षानी तह करावयाचा असे मनापासून ठरविलेले असल्यामुळे, १६ तारखेला, म्हणजे लढाईनंतर दोनच दिवसात तहाच्या अटी ठरविण्यात आल्या. जयपूरकरांच्या छावणीमधील मराठा वकिलाने याबाबत आधीच लिहिले होते ते असे :.... "खरी परिस्थिती अशी आहे की, एका बाजूला मिरबक्षी ही मोठी असामी असून दुसऱ्या बाजूला, रामसिंह हा नव्यानेच राज्यावर बसलेला राजा आहे. दोहोंपैकी कोणत्याही पक्षाचा फार मोठा पराभव झाला तर तो, त्याच्या स्थानाला काळीमा लावणारे कारणच ठरणार आहे. तेव्हा कसे तरी करून या उभय पक्षात समझोता घडवून आणण्याचा आणि अशा रीतीने स्वतःही प्रसिद्धी मिळविण्याचा निश्चय इश्वरीसिंहाने केलेला आहे. त्याच्याजवळ यावेळी २५००० घोडेस्वार व हलक्या (रहकला) व इतर दर्जाच्या मिळून ४०० तोफा असून शिवाय युद्धाची उत्कृष्ट सामुग्रीही आहे. दुसऱ्या बाजूला बख्तसिंहाकडे मिरबक्षी, बिकानेरचा राजा, रूपनगरच्या राजाचा धाकटा भाऊ आणि अन्यही बरेच राजपूत, असे सर्व मिळून २० ते २५ हजार सैन्य आणि चांगला तोफखाना आहे. उभयपक्षापैकी कोणालाही युद्धाची इच्छा नाही. अशा परिस्थितीत बक्षीला काहीतरी, थोडीफार रक्कम (भा. खंडणी, नजराणा वा महसुलाचा वाटा म्हणून) देण्याबाबत संमती दिली जाईल व नंतर तह ठरेल आणि सर्वजण आपापल्या ठिकाणाला परत जातील अशी आमची अपेक्षा आहे." [पे. द. नि. ५. (२१) २७, ३५].

इश्वरीसिंह सलाबतला भेटण्यासाठी आला तेव्हा बख्तसिंहाने त्याला सलाबतकडे नेऊन त्याची भेट करविली. शाही सैन्याने राजपुतान्यातून माघारी जावे आणि बक्षीने, आग्र्याचा प्रत्यक्ष कारभार (नायब नाझिमी) इश्वरीसिहाकडे सुपूर्द करावा या अटीवर इश्वरीने सलाबतला २७ लाख रुपये खंडणी देण्याचे वचन दिले. रामसिहानेही रोख ३ लाख रुपये देऊन आणखी ४ लाख हप्त्याने द्यावयाचे वचन दिले. या देवघेवीच्यावेळी बख्तसिहाला मात्र काहीही मिळाले नाही. उभय पक्षीयांमध्ये, तह करण्याबाबत असलेल्या आतुरतेमुळे बख्तचे आक्षेप आणि त्याचे हक्क या दोन्हीचीही सारखीच उपेक्षा करण्यात आली, तेव्हा बक्षीचे सैन्य सोडून रागातच तो नागोरला परत गेला. जाट पथके आपल्या घरी व इश्वरीसिंह आपल्या राजधानीला, परतले. रामसिहाने मात्र आपले ठाणे आपल्या सरहद्दीवरील मेर्ता येथेच ठेवले. परतीची कूच चालू असता, सांभार येथे बक्षीने इश्वरीसिंहाचा निरोप घेतला आणि तो अजमीरपर्यंत गेला. आता त्याला राजपूत राजाकडून, त्यानी आश्वासने दिलेल्या खंडण्या वसूल करावयाच्या होत्या. तेव्हा या वसुलीचे प्रयत्न करीत त्याने अजमीर शहराबाहेर पाच महिने आपला तळ ठेवला, पण या मुक्कामात हे पैसे देण्याबाबत टाळाटाळ आणि दिरंगाई याशिवाय त्याला काहीही आढळले नाही.

सलाबतखानाचा अजमीरला मुक्काम पडला होता. त्या काळात गंगेच्या दोआबात गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. तेथे वजीराचा गुमास्ता–एजंट–नवलराय, याला अफगाणानी ठार करून[१] (२ ऑगस्ट) स्वतः वजीराचीही संपूर्ण दाणादाण उडविली होती— (१३ सप्टेंबर). वजीर मृत्यू पावला असून, शासनयंत्रणेवरील सर्वोच्च अधिकारी, आता नसल्याने दिल्लीचा कारभार कोलमडून पडण्याची अपेक्षा असल्याच्या अफवाही पसरल्या होत्या. सप्टेंबरच्या सुरवातीला (भा. म्हणजे वजिराच्या पराभवापूर्वी) बादशहाने सलाबतला लिहिले होते की, खलिता पोहोचताक्षणीच, तातडीने त्याने आपल्या सैन्यासह परत येऊन, अफगाणाविरुद्ध वजीराला मदत करावी. यानंतर तीनच आठवड्यानी वजीरावर मोठे संकट[१] कोसळल्याची बातमीही आली. तेव्हा दिल्लीला जाऊन तेथे मोकळे झालेले वजीरपद मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याला जाण्यास बक्षी उत्सुक झाला.[१] पण त्याच्याजवळ काहीही पैसा नव्हता आणि राजपुतानी आश्वासन दिलेल्या खंडणीपैकी काहीतरी वसूल होण्याची आशा मावळू लागली असली तरी अद्याप थोडीफार शिल्लक होतीच, यामुळे अजमीर येथेच रेंगाळणे त्याला भागच होते. शिवाय यावेळी मिळेल तो पैसा पदरात पाडून घेण्यात आणि बाकीबद्दल रोखे वा दस्तऐवज स्वीकारण्यात त्याला आनंदच वाटणार होता. अशा या मुक्कामाच्या काळात, आपल्या नव्या, सुंदर राजधानीला भेट देण्यासाठी, जयपूरच्या महाराजाने त्याला वारंवार आमंत्रणे दिली पण आपण आता दरबारात जाण्याच्या घाईत आहोत असे म्हणत बक्षीने ती नाकारली. तेव्हा त्याला निरोपाचा आहेर म्हणून इश्वरीसिंहाने एक लाख रुपयांची भेट पाठविली. नंतर ऑक्टोबरच्या अखेरी नार्नोळ जिल्हा जयपूर राजाला देऊन तो दिल्लीकडे जाण्यास निघाला तेव्हा जयपूर राजाने आपला दिवाण हरगोविंद नाटानी याला बरोबर २००० घोडेस्वार देऊन त्या जिल्ह्यावर आपला अधिकार चालविण्यासाठी पाठविले. पण बादशहाच्या सैन्याने तो जिल्हा सोडल्याबरोबर लगेच सबंध

१ वजीरावर संकटे आली होती. दरबारात त्याच्या विरोधी, कारवायाही चालू होत्या पण वजीरपद मोकळे झाले नव्हते. तो मेला या केवळ अफवाच होत्या...... (पहा : प्र. ८–७–८, व प्र. ९–४–७–इ.)

मेवात बंड करून उठले. या संदर्भात आपणास नोंद सापडते ती अशी. . . "मेवाती आणि जाट हे गोंधळ करीत आहेत, कारभार कोसळला आहे." [पे. द. नि. प. (२१) ३४].

या मोहिमेसाठी सलाबतखानाने १७–१८ हजार माणसे, एक संपूर्ण वर्ष (नोव्हेंबर १७५० ते ऑक्टोबर १७५१) नोकरीत ठेवली होती. पण त्याला विजय व पैसा, दोन्हीही मिळाली नाहीत आणि तो आर्थिक दृष्टया कफल्लक झाला. त्याची ही मोहीम म्हणजे शाही सरकारने, राजपुतान्यावर आपला अधिकार लादण्यासाठी केलेला शेवटचा प्रयत्न होय. यानंतर आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी वा आपले येणे असलेला पैसा वसूल करण्यासाठी शाही सरकारने काहीही प्रयत्न न करता, हा विस्तृत प्रदेश, तेथील राज्यकर्ते व मराठे, यांच्याकडेच मोकळा सोडून दिला. जयपूर महाराजाने रतन भोर ऑक्टोबर १७५३ मध्ये घेतले आणि अजमीर, जोधपूर राजाने १७५२ मध्ये घेतले. पुढे १७६५ नंतर ज्याप्रमाणे बंगाल, बिहार आणि ओरिसामधून साम्राज्य सत्तेची शेवटची खूणही नाहीशी झाली (भा. पहा प्र. ४–१९–२०) त्याचप्रमाणे १७५२–१७५३ पासूनच तिच्या सत्तेचा काही मागमूसही राजपुतान्यात राहिलेला नाही.

## § १२ : बख्तसिंहाने जोधपूरचे सिंहासन मिळविले

मिरबक्षी आणि इश्वरीसिह-रामसिंह यांच्या दरम्यान झालेल्या तहाच्यावेळी, बख्तसिंहाची उपेक्षा, त्याचा मित्र बक्षी यानेच करून, त्याला बाजूला सारले होते. पण बख्तला आणखी, काही थोड्या महिन्यांनीच पुन्हा संधी मिळाली. मारवाडचा प्रमुख सरदार खुशालसिंह चंपावत याचा रामसिंहाने अपमान केला, तेव्हा याचा सूड घेण्यास मदत मिळवावी म्हणून तो बख्तसिंहाकडे आला, हीच आता बख्तसिंहाला मिळालेली संधी होय. या दोघांच्या संयुक्त सैन्याची रामसिंहाशी, २७, नोव्हेंबर १७५० ला, मेर्ताच्या दक्षिण-नैर्ऋत्येस (S. S. W.) ११ मैलावर लुनिआवास[१] येथे गाठ पडली. या ठिकाणी झालेल्या लढाईत १५०० ते २००० लोक मारले गेले. यामध्ये जोधपूर राजाच्या बाजूचे शेरसिंह मेर्तिआ व आणखी एक–दोन प्रमुख नेते अशा, विशेष महत्त्वाच्या व लक्षात येण्यासारख्या व्यक्ती होत्या. झालेला नाश, विशेषतः बख्तसिंहाच्या, बिकानेरकडील मित्रांच्या गोटात तर फारच भयानक होता. या गोटातील सहा-सात कॅप्टन्स मारले गेले. भाला आणि बंदुकीची गोळी या दोहोनीही बख्त स्वतः जखमी झाला आणि शत्रूच्या पहिल्या धडाक्याबरोबर आरंभीच त्याला चार मैल माघार घ्यावी लागली, पण अखेरी रामसिंह त्या दिवसाच्या लढाईत हरला आणि त्याने राजधानीकडे पळ काढला.[२] पण राजधानी जोधपूर, हीही हाती ठेवणे शक्य न झाल्याने

१ लुनिआवास जवळची लढाई : पहा. . . . वंशभास्कर ३६२६–३६३० (दोन्ही पक्षांतले मिळून ५०० मृत व ८०० जखमी). पे. द. नि. प. (२) १५. . . . . यामध्ये लढाईच्या निर्णयाबाबतची चुकीची बातमी दिली आहे पण लढाईची तारीख मात्र बरोबर नमूद आहे. दियालजी ऋारनच्या कियांतमध्ये (Diyalji Craran's Kiyant) या लढाईचे स्थळ, मेर्ताजवळच्या दुदासर तलावाजवळ असे दिले असून, ११ नोव्हेंबर १७५०, अशी तारीख दिली आहे. यात आणखी ही नमूद केले आहे की. . . . "बिकानेरच्या गजसिहाशी हातमिळवणी करून बख्तने २१ जून १७५१ ला जोधपूर घेतले व तेथे ४ प्रहर लुटालूट चालू दिली." . . . . . पण "वीर-विनोद" मध्ये जोधपूर घेतल्याची तारीख ८ जुलै अशी दिली आहे.

२ बख्तसिंहाचा मृत्यू, वंशभास्कर ३६३४ (यामध्ये कारणाबाबत मौन पाळले आहे.) . . . . शाकिर–६५. . . यामध्ये, कॉलऱ्यामुळे झाला असे कारण दिलेले आहे. ता. इ. अ–(टी. ए. एच.) ४३ ब मध्ये

[पुढील पानावर]

त्याने जयपूरमध्ये आश्रय घेतला. इकडे जोधपूरने बख्तसिंहाला आपले दरवाजे खुले केले (८ जुलै १७५१) आणि तेथे त्याने आपल्याला राज्याभिषेक करवून घेतला. बख्तसिंहाने अजमीरचाही ताबा घेऊन मराठ्यांना आपल्या राज्याबाहेर रोखण्यासाठी मोठे सैन्य उभे केले. पण पुढे लवकरच सिंधोलिया ( Sindholia ) येथे तळ ठोकून रहात असताना कॉलऱ्याने त्याचे निधन झाले. (सुमारे २३ सप्टेंबर १७५२). तथापि त्याच्या भाचीने (Niece) म्हणजे जयपूरच्या माधोसिंहाची, राठोड घराण्यातून आलेली राणी, हिनेच त्याला विषारी पोषाख ( Robe.... सरदारी अंगरखा-वरून घालावयाचा) देऊन मारले असाच याबाबत लोकांना विश्वास वाटत होता. कारण त्याकाळी लोककथामधून आढळणारी, एखाद्याला ठार करण्याची हीच क्लृप्ती असे.[२] यावेळी त्याच्या राज्यात खूपच दुफळी माजली असून, ते मराठ्यांच्या अतिलोभी वृत्तीमुळे दुर्बलही बनलेले होते. अशा या राज्याच्या गादीवर त्याच्यानंतर त्याचा मुलगा विजयसिंह हा बसला पण यानंतरही या राज्याला रामसिंहाने अनेक वर्षे त्रास दिला. तथापि मराठ्यांची मदत घेऊनसुद्धा रामसिंहाला आपल्या बापाची गादी परत मिळविता आली नाही, (भा. बख्त हा रामसिंहाचा चुलता होता.) तेव्हा आपल्याला निर्वाहासाठी दिलेले साधन म्हणून 'सांभार' जिल्हा स्वीकारून तेवढ्यावरच त्याला अखेरी आनंद मानावा लागला. अशा स्थितीत जयपूरमध्ये एक निर्वासित म्हणून रहात असताना १७७३ मध्ये रामसिंह मृत्यू पावला.

## § १३ : बुंदी मिळविण्यासाठी उम्मेदसिंहाने केलेले झगडे

आता आपण बुंदीबद्दल चाललेल्या झगड्याची माहिती घेऊ. हा झगडा एका बाजूला दलिलसिंह आणि दुसऱ्या बाजूला बुधसिंह व त्याचा वारस उम्मेदसिंह यांच्या दरम्यान झाला. (भा. पहा प्र. ६§६). (दलिलसिंहाची बाजू त्याचा सासरा, जयपूरचा राजा इश्वरीसिंह, याने उचलून धरली असून त्याच्यावरच या झगड्याचे सगळ ओझे पडले होते.) उम्मेदने मराठ्यांची मैत्रीही संपादन केली असून शिवाय त्याला इश्वरीसिंहाचा प्रतिस्पर्धी माधोसिंह हाही सामील झाला होता-(१७४३ नंतर).... (यातील माधोसिंहाचा कैवार, त्याचा मामा, उदयपूरचा महाराणा याने घेतला होता.) बुधसिंहाची गादी आणि राजधानी दोन्हीही १७२९ मध्ये हिसकावून घेण्यात आली होती. (भा. पहा प्र. ६§६). पुढे एप्रिल १७३४ मध्ये मराठ्यांनी बुधसिंहासाठी बुंदी परत जिंकून घेतली पण त्यांची पाठ फिरल्या-नंतर लगेच जयसिंहाने ती, बुधसिंहाच्या वतीने तेथे असलेल्या अधिकाऱ्याकडून परत हिसकावून घेऊन आपल्या आश्रयास आलेल्या दलिलला परत दिली होती. (भा. पहा प्र. ६§७). जयसिंह मरण पावला त्यावेळी, (२१ सप्टेंबर १७४३), गादी गमावलेला बुंदीचा वारस; उम्मेद हा पंधरा वर्षाचा असून, जयसिंहाचा मृत्यू झाल्याबरोबर त्याने आपल्या बापाकडून यावयाचा वारसा परत मिळविण्यासाठी उठाव केला. तेव्हा या निर्वासित उम्मेदला कोटयाचा महाराज दुर्जनसाल (कारकीर्द १७२३-१७५७) याने मोठ्या सढळ हाताने, मदत दिली.

---

[ मागील पानावरून ]

म्हटले आहे की,..... "२१ सप्टेंबर १७५२ ला, त्याला ओकाऱ्यानी ग्रासले आणि नंतर थोड्या दिवसांनी तो मृत्यू पावला. विर-विनोदमध्ये या मृत्यूची तारीख २१ सप्टेंबर अशी दिली असून माधोसिंहाने त्याला, विषप्रयोग करून मारले अशी त्या काळच्या रूढीनुसार, माहिती नमूद केलेली आहे. दियाळजीच्या कियांतमध्ये ही तारीख २६ ऑगस्ट अशी नमूद आहे, पण त्यामध्ये त्याच्या मृत्यूच्या कारणाबाबत मौन पाळले आहे. (पहा : बिकानिर गॅझेटिअर-१८७४ पृ. ५४).

यावेळी जयपूरच्या महाराजाने नेमलेल्या किल्लेदाराच्या ताब्यात असलेल्या बंदीला, तोफखान्याने सुसज्ज अशा हाडा सैन्याने.– कोटयाच्या दुर्जनसालाच्या सैन्याने— १० जुलै १७४४ ला वेढा दिला. याचवेळी गुजरातवर नवीनच नेमणूक झालेला सुभेदार फक्रुद्दौला ( Fakhruddaulah ), आपल्या सुभेदारीच्या जागी जात असताना वाटेत अजमीरची यात्रा करण्यास आला होता. दुर्जनसालचा सेनापती गोविंदराम नागर याने त्याला १ लाख रुपये देण्याचे मान्य करून, बुंदीवरील आपल्या हल्ल्यासाठी त्याची मदत मिळविली. नंतर वेढा घालणाऱ्या सैन्याने २८ जुलैला जोराचा हल्ला करून बुंदी घेतली. तेव्हा पराभूत दलीलसिंहाने मागे सरकून तारागडाचा आश्रय घेतला आणि तेथून कडवा प्रतिकार चालू ठेवला. यावेळी इश्वरीसिंहानेही त्याच्या मदतीसाठी घाईघाईने सैन्य पाठविले होते. या झगडयात हाडा सेनापती गोविंदराम मारला जाऊन फक्र-उद्-दौलाची दाणादाण झाली आणि उम्मेद स्वतःही जखमी झाला. तथापि एकूण मोहीम अखेरी जयपूर पक्षाच्या विरुद्धच गेली आणि दलिलसिंहाला शेवटी आपल्या कुटुंबासह नेनवेला ( Nenve ) निघून जावे लागले व उम्मेदसिंहाने सबंध बुंदीचे राज्य ताब्यात घेतले. [वंश भा. ३३५४–३३६१].

यानंतर लवकरच इश्वरीसिंहाला बादशहाने दिल्लीला बोलावून घेतल्यामुळे, बुंदी परत घेण्याचे त्याला पुढे ढकलावे लागले. तथापि दरम्यानच्या काळात, योजलेल्या बुंदीच्या मोहीमेसाठी, त्याने आपला एक वकील राजा आयामल खत्री याला पाठवून मराठ्यांची मदत मिळविली. दुसऱ्या बाजूला, उम्मेदचीही मित्र मिळविण्यासाठी धडपड चालूच होती. त्याने अजमीरला जाऊन अभयसिंहाची भेट घेतली. महाराणा जगत्सिंह (मेवाडचा) हा दुसराही एक मित्र त्याला मिळाला कारण ही मैत्री करण्यात त्याचाही एक हेतू होता. त्याला, आपला भाचा माधोसिंह याला जयपूरचे सिंहासन मिळवून द्यावयाचे असून यासाठी उम्मेदची मैत्री पाहिजे होती. शिवाय याच कामात मदतीसाठी त्याने मल्हारराव होळकरला २० लाख रुपये देण्याचे वचन दिले व याचबरोबर त्याच्या एका वकीलाने जयाप्पा शिंदे बरोबरही पगड्यांची अदलाबदल करून म्हणजेच एकमेकास मैत्री व मदतीची आश्वासने देऊन, उद्दिष्ट पूर्तीसाठी एकमताने एकसूत्री हालचाली करण्याबाबतही तह केला होता. पण इश्वरीसिंहाचा हुशार वकील आयामल यानेही हालचाली करून उम्मेदच्या या मित्रसंघाचे विघटन घडवून आणले आणि आपल्या धन्यासाठी मल्हार खेरीज अन्य सर्व मराठा सेनापतींची मदत मिळविली. हे विघटन, अधिक पैसा देण्याचे मान्य करूनच घडविले असावे हे उघडच दिसते.

यानंतर मराठा मित्रांचे मोठे सैन्य बरोबर घेऊन, आयामल जयपूरला परत आला. वाटेतील कोटयाचा महाराव, त्याच्या धन्याचा प्रतिस्पर्धी उम्मेद याचा एक प्रमुख पुरस्कर्ता असल्याने, त्याने येताना कोटयावर भडिमार करून, त्या राजाचा बराच मुलूख लुटला (१७४५ जानेवारी अखेर). दरम्यान मेवाडचे सैन्यही जयपूर राज्यात शिरून, तोडा येथे होळकरांची वाट पहात थांबले होते. या ठिकाणी ते थांबले असताना, आयामलकडील मराठा जोडीदारानी (भा. मल्हारखेरीज इतर) मेवाडच्या छावणीवर मध्यरात्री अचानक हल्ला करून तिच्यावर तोफा-बंदुकांचा मारा केला व उजाडण्याच्या सुमारास त्यांना पळ काढण्यास भाग पाडले. या वेळी महाराण्याला परत जाता आले ते २२ लाख रुपये देण्याचे मान्य करूनच. अशाप्रकारे विजयी झालेल्या इश्वरीसिंहाने पुढे बुंदीवर चाल केली तेव्हा कोटा महारावाच्या तेथील

किल्लेदाराने तो किल्ला त्याच्या स्वाधीन केला.[१] यानंतर एका जयपूर सरदाराच्या मार्गदर्शनाखाली, मोठ्या मराठा सैन्याने कोटयावर चाल केली आणि त्यावर दोन महिने तोफांचा मारा चालविला. याच लढाईत जयाप्पाच्या दंडाला बंदुकीच्या गोळीने जखम झाली. अखेरी दुर्जनसालने काप्राणीचा किल्ला आणि परगणा मराठयाना देऊन आपली राजधानी वाचविली. मराठयाना दिलेला हा मुलुख, होळकर, शिंदे आणि पेशवा अशा तिघांमध्ये मिळून त्यांनी वाटून घ्यावयाचा असेही, यावेळी ठरले. (एप्रिल १७४५ प्रारंभ.) [ वंश भा. ३३७४-३३८४]

मराठे परत गेल्यावर झगडयाचे हे क्षेत्र उम्मेदला पुन्हा मोकळे झाले, यामुळे दुर्जनसालने दिलेली १६ लाखाची देणगी घेऊन, उम्मेदसिंहाने नवे सैन्य उभे केले आणि पुन्हा बुंदीवर चाल केली. यावेळी जयपूरचा एक अधिकारी नंदराम खत्री हा तेथे संरक्षणासाठी होता. २० जुलै १७४५ ला, नंदरामाने, उम्मेदला बिचोडी येथे प्रतिकार केला, पण निकराचा तीव्र लढा दिल्यावर त्याला माघार घेणे भाग पडले आणि उम्मेदने बुंदी मिळविली. पण ६ ऑगस्टला जयपूरच्या एका अधिक मोठ्या सैन्याने त्याचा देवपूर येथे पराभव केला आणि जयपूरच्या सेनापतीने बुंदी शहरात पुन्हा प्रवेश केला. अशा रीतीने बिचोडीच्या विजयी उम्मेदला बुंदी आपल्या हाती फक्त १६ दिवसच राखता आली. यानंतर काही काळतर, घरदार नसलेल्या नर्वासितासारखा उम्मेद भटकला. ४ ऑक्टोबर १७४६ ला त्याचा पुरस्कर्ता दुर्जनसाल याने, महाराणा जगतसिंह आणि माधोसिंह यांची नाथद्वारा येथे भेट घेतली. मग या तिघा मित्रांनी जयपूरविरुद्ध लढा देण्यासाठी, पैसा देऊन मराठा सैन्य मिळविण्याकरिता आपले वकील पाठविले. पण या मित्रांचा प्रयत्न राजमहल येथे अयशस्वी झाला (१ मार्च १७४७). ( भा. पहा प्र. ७–२ –३ –४ ) मित्रगटाच्या या अपयशात उम्मेदही भागीदार होताच. याच वर्षाचे उत्तरार्धात जयपूर आणि हाडा यांच्यामध्ये आणखी एक लढाई झाली पण ती अनिर्णित अवस्थेतच थांबली. या लढयानंतर इश्वरीसिंह बुंदीला गेला (१७ ऑगस्ट) आणि तेथे त्याने काही महिने घालविले. या वर्षाच्या अखेरी अब्दालीच्या स्वारीला तोंड देण्यासाठी बादशहाकडून बोलावणे आल्यामुळे, त्याला दिल्लीला जाण्यासाठी निघावे लागले.[२] पुढे मार्च १७४८ च्या अखेरीपूर्वी तो आपल्या राजधानीला परत आला नाही.

## § १४ : उम्मेदसिंह : बुंदीचा राजा म्हणून

बाग्रुच्या लढाईत (१-७ ऑगस्ट १७४८. भा. पहा §५) उम्मेदसिंह, आपल पाठीराखा माधोसिंह याच्या बाजूला हजर असून, त्यावेळी त्याच्या विजयामुळे मिळालेल्या फायद्यातही तो भागीदार होता. विजयी मित्रगट बाग्रुपासून पुढे पुष्करला गेला. (भा. मित्रगट-मल्हार, माधोसिंह, उम्मेद हाडा–दुर्जनसाल हाडा इ. ). तेथे आपल्या बंधुभावाचे प्रतीक म्हणून मल्हार व अभयसिंह यांनी आपल्या पगडयांची अदलाबदल केली आणि अनेक मोठ्या मेजवान्यापानोत्सव समारंभ, दोघांनी एकत्र करून आपली मैत्री अधिक घनिष्ट केली. तेथून ते सर्व बुंदीला गेले. त्या ठिकाणी, या सुमाराला राणाच्या वतीने असलेल्या किल्लेदाराने बुंदी, या मित्रांच्या स्वाधीन केली. (१८ ऑक्टोबर १७४८). . . . ( भा. हे बाग्रुच्या तहानुसार घडले तह. . . पहा §५ परि. २) बुंदी ताब्यात आल्यानंतर पाच दिवसांनी तेथे औपचारिकपणे उम्मेदसिंहाला राज्याभिषेक करण्यात आला. [वंश भा. ३५३४–४२].

१ जयपूर सैन्य प्रथम आयामलच्या नेतृत्वाखाली येत होते. महाराण्यावरील हल्ल्याच्या सुमारास इश्वरीसिंह स्वतः येऊन, त्याने आपल्या हाती नेतृत्व घेतले असावे असे दिसते.

२ वंश भा. ३३८४–३४१४, ३४५५–३४७५.

अशा रीतीने बुंदीबाबतचा दीर्घ लढा अखेरी संपला. या दीर्घकाळात तेथील कारभारात व आर्थिक व्यवस्थेत, गोंधळ निर्माण झाला होता. आता या कारभाराची घडी व्यवस्थित करण्याच्या आणि आर्थिक सुबत्ता पुन्हा आणण्याच्या कामाला, बुंदीचा नवा अधिपती उम्मेद-सिंह हा लागला. पण त्याच्या समोर उभा असलेल्या परिस्थितीचा एकूण देखावा अतिशयच भयाण होता... "...१४ वर्षे हद्दपारीत घालविल्यानंतर उम्मेदने आपल्या वाडवडिलांची गादी परत मिळविली होती..... पण या साठी झालेल्या एकूण झगडयाने, राजघराण्याच्या रत्नभांडारातील अनेक दागदागिने नाहीसे केले होते. शिवाय इतर कारणांचीही भर पडून हे राज्य अक्षरशः.... शब्दार्थाप्रमाणेच.... बंदीच्या (कापसाच्या) ढिगाच्या अवस्थेपर्यंत अवनतीला गेले होते. ....मल्हार होळकरला तरुण उम्मेदचा "मामु" हे नामाभिधान[१] मिळाले होते हे खरे पण या मानलेल्या नात्यामुळे, अन्याय होत असलेला तरुण भाचा उम्मेद याचे संरक्षण करावे अशा दिलदार विचाराने काही, त्याने आपली ढालतरवार उचलली नव्हती.....आपण केलेल्या मदतीसाठी त्याने, चंबळच्या डाव्या काठावरील पटन शहर व परगणा यांची मागणी केली आणि कायदेशीर लेखी करार करून ती पूर्ण करून घेतली. उम्मेदने मराठ्यांच्या मदतीनेच आपली राजधानी परत मिळविली असली तरी कधीही समाधान करता येणार नाही असा त्यांचा द्रव्यलोभ आणि त्यांचा प्रभावी वरचष्मा यामुळे आपल्या शक्तींचा संकोच झाला आहे, असेच उम्मेदला वाटू लागले." [टॉड (२) हरावती प्र. ४].

अशा निराशामय परिस्थितीतून काही मार्ग काढण्यासाठी उम्मेद ऑगस्ट १७४९ मध्ये दख्खनकडे जाण्यासाठी निघाला. आपली बाजू स्वतःच मराठा दरबारापुढे मांडून, त्यांच्याकडून होत असलेल्या कठोर वसुलीमधून काहीतरी सवलत मिळवावी हाच दख्खनमध्ये जाण्यात त्याचा उघड हेतु होता. वाटेत खानदेशमध्ये वाफगाव हे, होळकरांचे वडिलोपार्जित गाव होते. यावेळी मल्हार पुणे येथे गेला असल्याने, पित्याच्या गैरहजेरीत खंडेरावाने त्याचे तेथे स्वागत केले, (ऑक्टोबरचा उत्तरार्ध). पुढे लवकरच मल्हार परत आला आणि त्याने आपल्या कन्येचा विवाह साजरा केला. उम्मेद हा तर मल्हारचा दत्तक मानलेला भाचाच होता तेव्हा त्याने या समारंभाच्या वेळी मौल्यवान आहेर केले. यानंतर राजा शाहू मृत्यू पावल्याची (१५ डिसेंबर) बातमी आली, तेव्हा मल्हार व उम्मेद दोघेही घाईने सातार्‍याला गेले. छत्रपती रामराजा हे सिंहासनारूढ झाल्याच्या राज्याभिषेक समारंभाला ते हजर राहिले. यानंतर पेशवा आणि रघुजी भोसले यांच्यामध्ये झालेला झगडा आणि नंतर झालेला समझोताही उम्मेदने पाहिला आणि अखेरी १२ जुलै १७५० ला तो स्वतःच्या राजधानीला परतला. पुढे पाच महिन्यानी मल्हार ज्यावेळी जयपूरच्या वेशीजवळ येऊन थडकला त्यावेळी तेथे येऊन उम्मेद त्याला मिळाला आणि त्याने मल्हार व जयपूरचे कच्छवा यांच्या दरम्यान मध्यस्ताची भूमिकाही केली. (भा. पहा § ६ परि. ४ व § ७). [वंश भा. ३५८७–८८, ३६०३, ३६१३–२२].

उम्मेदला बुंदी मिळवून देण्याबाबत मराठ्यांनी जी मदत केली होती त्यासाठी मोबदला म्हणून त्यांना दहा लाख रुपये देण्याचे आश्वासन त्याने दिले होते. यांपैकी २ लाख रुपये १७४९ मध्ये दिलेही होते. पुढील तीन लाख रुपयांचा हप्ता वसूल झाल्यावर तो, मल्हार आणि जयाप्पा यांनी निम्मानिम्मा घ्यावा असे मराठ्यांच्या राजाने १८ जून १७५१ ला

१ पहा प्र. ६–७, उम्मेदच्या आईने म्हणजे बुधसिंहाच्या राणीने मल्हाररावाला राखी बांधली होती. .... भाऊ मानले होते.....

ठरवून देऊन राहिलेली ५ लाखांची बाकी सातारा खजिन्यात भरावी अशीही आज्ञा केली होती. या शिवाय, जून १७५१ पासून पुढे, बुंदी, नेनवे आणि इतर काही ठाणी यांचा चौथ, मल्हार व जयाप्पा यांना, त्यांनी सातारा राजाला वार्षिक ७५००० रुपयांची ठराविक रक्कम द्यावी या अटीवर, मक्त्याने नेमून देण्यात आला. [वाड (३) पृ. १४३ आणि १२९]

---

प्रकरण आठवे

# अहमदशहाची कारकीर्द–१७५२ पर्यंतच्या घडामोडी

## § १ : बादशहा अहमदशहा–त्याची व्यक्तीरेखा

महमदशहाचा एकुलता एक मुलगा अहमदशहा हा, १८ एप्रिल १७४८ रोजी वयाच्या २२ व्या वर्षी दिल्लीच्या सिंहासनावर बसला हे खरे, पण या वेळेपर्यंत त्याच्या शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले होते, त्याच्या संशयी व कंजूष बापाने त्याला दिल्लीच्या वाड्यातील बाजूच्या एका कोपऱ्यात निर्बंधात ठेवले होते. त्या एकीकडच्या भागात लाज वाटावी इतक्या कंजूषपणे, हात आखडून त्याचे संगोपन केले असल्याने, या शहाजाद्याचे व्यक्तिमत्व खुरटलेले–अविकसित असेच राहिले होते. तरुण अहमदाला कोणत्याही प्रकारचे युद्ध वा कारभार विषयक–शिक्षण मिळाले नव्हते. त्याच्या पूर्वीच्या शहाजाद्याना, शाहीवारस म्हणून अनुभवासाठी, स्वतःचा असा सैन्यविभाग देत व त्याचे प्रमुख म्हणून त्यानाच नेमीत. पण अशा प्रकारची कोणतीही नेमणूक अहमदशहाला कधीही दिलेली नव्हती. इतकेच नव्हे तर, सर्वसामान्य सुखसोयीत रहाण्याइतका पुरेसा तनखाही त्याला देण्यात आला नव्हता. त्याकाळी शहाजाद्याला योग्य असे मानले जाणारे पोलो, प्राण्यांच्या झुंजी आणि शिकार अशा खेळात भाग घेण्यास वा ते पाहून त्यांचा आस्वाद घेण्यास त्याला परवानगी मिळाली नव्हती. परिणामतः त्याच्या नैसर्गिक मंदबुद्धीची शिक्षणामुळे सुधारणा झाली असती तीही झाली नाही. एक सुस्वभावी पण मंद बुद्धीचा (imbecile), स्वतःचे असे काहीही व्यक्तिमत्व विकसित न झालेला आणि सदैव इतरांच्याच वर्चस्वाखाली रहाणारा असा एक तरुण, इतकाच त्याचा विकास झाला. त्याच्या प्रारंभीच्या जीवनात त्याला शिक्षण असे काही मिळालेच नाही, इतकेच नव्हे तर त्याला जे काही वळण लावण्यात आले तेही शक्यतितके जास्तीत जास्त वाईट असेच होते.... "त्याच्या बाळपणापासून ते, तो २१ वर्षांचा होईतो (म्हणजे तो सिंहासनावर आरूढ होईतो-पर्यंत) जनानखान्यातील स्त्रियांमध्येच, दुर्लक्षित अवस्थेत आणि दारिद्र्यात त्याचे संगोपन झाले असून शिवाय त्याला बापाचा धाकदपटशाही वारंवार सहन करावा लागे... "सिंहासनावर आरूढ होण्याचेवेळी, अशा प्रकारे, तो युद्ध आणि कारभार, या दोन्हीही बाबतीत सारखाच अनभिज्ञ राहिला असल्यामुळे या अपक्व तरुणावर, त्याला मिळालेल्या निरंकुश सत्तेचा, स्वाभाविकच दुष्परिणाम झाला. चैन व सुखाला लालचावलेल्या हीन व्यक्तींनी त्याला तात्काळ वेढले, मोह पाडणारे सर्व प्रकार त्याच्यासमोर ठेवले आणि अशा परिस्थिती आपले राज्य व आपली प्रजा यांच्यासंबंधीच्या आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करून, भोवतालच्या मोहजालात तो सहजच गुरफटून गेला. त्याच्या अंगी काही सुप्त शक्ती, काही कर्तबगारी असलीच तर ती, त्याच्यावर आता पडलेल्या जबाबदारीच्या वेळी बाहेर येणे अवश्य होते. पण तो मोहजालात सापडल्यावर, ती उघड होण्याऐवजी, त्याच्या स्वभावातील दुर्गुणमात्र जास्तीत जास्त विकृत स्वरूपात लोकासमोर उघडे पडले. त्याने, बादशहा म्हणून असलेली आपली कर्तव्ये पूर्णपणे, आपल्या जनानखान्यावरील प्रमुख अधिकारी, जाविदखान, याच्याकडे

व्यवहारतः सुपूर्द केली आणि बादशहाकडे येणारे सर्व प्रश्न आणि सर्व अर्जदार, याबाबत निर्णय करण्याचे काम उघडपणेच त्या खोजाकडे सोपविले. अशा प्रकारे या जनानदाऱ्यांनाच्च स्वतःवर काहीही बंधन न राखता वा आपले लक्ष वेधून घेईल अशी काहीही बाब आपल्याकडे न राखता त्याने स्वतःला विषयासक्तीत झोकून दिले. जाविदखानानेही, आपल्यापरीने या दुर्दैवी, दुःखी तरुणाला दारू पिण्यास उत्तेजन देऊन, त्याचा जनानखाना स्त्रियानी भरून टाकला. पण या चारित्र्यहीन स्त्रियांबरोबर तितकेच चारित्र्यहीन पुरुषही तेथे जमले. त्यांचे एकच काम म्हणजे या तरुण बादशहाच्या विकारांचा व त्याच्या लहरी व आवडी यांचा अनुनय करणे व त्याना उत्तेजन देणे एवढेच होते. "क्रमाक्रमाने बादशहाचे मन अशा हलकट लोकांच्या सहवासाकडेच वळू लागले आणि साम्राज्याला आपल्या बादशहाची लाज वाटावी अशी वाईट कृत्ये तो करू लागला".[१]

ही नैतिक अधोगती वाढत्या प्रमाणात आणि झपाट्याने चालूच राहिली आणि त्याच्या कारकीर्दीच्या दुसऱ्याच वर्षाच्या अखेरी आपल्याला दिसून येते की ...... "सर्वच कारभार अतिशय दुर्बल होऊन, फारच खालच्या पातळीवर घसरला होता, साम्राज्याच्या आधारस्तंभाना रोज हादरे बसत होते,..... साम्राज्याची सर्वसाधारण अवस्था, लष्कर व खजिना, या तीनहीबाबत ... म्हणजेच साम्राज्याच्या मुख्य तीन पायाभूत बाबीबद्दल, बादशहाने कधीही चौकशी केली नाही..... राज्यकारभाराचा संपूर्ण ताबाच जाविदखानाने बळकावला असून, तो आपल्या नैसर्गिक (दुबळ्या!), कार्यक्षमतेनुसार कारभार चालवू लागला आणि बादशहाला मात्र आश्वासनपूर्वक सांगत होता की, सगळे काही नियमानुसारच केले जात आहे. यामुळे ज्या काही थोड्याशा गोष्टीकडे बादशहा पूर्वी लक्ष देत असे त्याकडेही लक्ष देण्याचे त्याने बंद केले. ऐषआरामात तो आता इतका गढून गेला की, त्यासाठी सबंध एक कोसभर भागाचे, (चार चौरस मैलांचा भाग) स्त्रियांचा राखीव विभाग म्हणून रूपांतर करण्यात येऊन सर्व पुरुषांना त्यात येण्यास मज्जाव करण्यात आला. या राखीव विभागातील लताकुंजातून, पुष्पवाटिकातून वा राखीव बागातून स्त्रियांच्या सहवासात क्रीडा करण्यात, मनोरंजन करण्यात बादशहा आठवडा आठवडाभर, कधी कधी महिनाभरही आपला वेळ घालवू लागला."

अशा प्रकारच्या वैषयिक अतिरेकातून येणाऱ्या थकव्याच्या व कंटाळ्याच्या काळात, आपल्या सम्राटपदाच्या डौलात, पोरकट कृती व खेळ करून तो विविधता व रुचिपालट शोधू लागला, याची मजेदार उदाहरणेही वाचायला मिळतात— उदाहरणार्थ १७५३ च्या फेब्रुवारी मध्ये एके दिवशी त्याने आपला मुलगा महमदशहा या छोट्या बालकाला, फुललेल्या नार्सिसस फुलाच्या ताटव्याकडे आपल्याबरोबर नेले. (Narsisus–वसंत ऋतूत फुलणाऱ्या फुलांची एक जात.) सूर्योदयाचे वेळी बादशहा प्रजेला दर्शन देऊन मुजरे स्वीकारी त्या सज्जा–खिडकीच्या खालील मैदानात असलेल्या या ताटव्याजवळ बाल शहाजाद्याला नेल्यावर, त्या भागात येण्यास परवानगी असलेल्या अमीर-उमराव, दरबारी यांच्या सर्व छोट्या मुलांना, त्याने बोलावून घेतले, आणि त्यांना या बाल शहाजाद्याला 'नजराणे' (Nazars) द्यावयाला लावून

१ त.-इ.-अ. ; १३ब-१४अ, २१अ, २५अ; सियार (३) २७ ; या संदर्भात मेजर पोलिअर (Polier) याने १७७७ मध्ये दिल्ली येथून लिहिले आहे ते असे : ......सिंहासनावर बसल्यावर अहमद ...... "आपला सर्व काळ दारू, भांग, चरस आणि अन्य मादक पेये यांच्या सेवनात घालवू लागला आणि आपल्या आईचा प्रियकर, (Gallant) असलेल्या एका खोजावरच, आपल्या सर्व कामांची वासलात लावणे त्याने सोपवून टाकले. [ As .... Annual Register for 1,800 Misc. Tr. P 40.... स. १८०० सालाच्या वार्षिक नोंद-पुस्तकानुसार......किरकोळ भाषांतरे पृ. ४० ].

त्याच्या मागोमाग लवाजम्याच्या थाटात रांगेने जाण्यास लावले! नंतर या बालकाला त्याने स्वतः बरोबर, आपली जन्मदात्री माता आणि मलिका-इ-झमानी (भा. टीप : ही उमराव घराण्यात जन्मलेली अहमदशहाची सावत्र आई. . . पहा § २ परि. १) या दोन्ही मातांच्या सज्जाकडे नेले आणि पूर्वीचे बादशहा येऊन आपल्या माताना जसा बाहेरच्या बाजूने 'सलाम' करीत तसा, त्याला, या बेगमाना बाहेरच्याच बाजूने औपचारिक पद्धतीने 'सलाम' करण्यास लावले. या शहाजाद्यासाठी मुद्दाम नव्यानेच तयार केलेला, एक छोटा तंबूही, यावेळी जवळच होता. बेगमाना सलाम केल्यावर शहाजाद्याला त्याने या तंबूत नेऊन, शाही बैठकीवर लोडाशी बसविले. शहाजादा बैठकीवर विराजमान झाल्यावर अमीर-उमरावांच्या मुलांना, त्यांच्या सभोवार उभे रहाण्यास त्याने पाठविले आणि बालकांच्या या दरबारास भेट देण्यासाठी तो स्वतः गेला. तेव्हा छोटया शहाजाद्याच्या खोजांनी, बादशहा येत असता त्याचे स्वागत केले आणि आपल्या 'धन्याच्या वतीने' त्याला आहेर दिले! अशा खेळांच्या प्रकारानंतर, यापुढील त्याच्या काही इतर कृती व घटना, याबद्दल आपणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. नोव्हेंबर १७५३ मध्ये या शहाजाद्याची (यावेळी त्याचे वय केवळ ३ वर्षांचे होते). पजाबसारख्या महत्त्वाच्या सुभ्याचा गव्हर्नर . . .सुभेदार. . . .म्हणून त्याने नेमणूक केली आणि हेही त्याला योग्यच वाटले! याच वृत्तीला अनुरूप अशाच या पुढच्याही काही घटना होत्या. या नेमणुकीबरोबरच दुसऱ्या एका, एक वर्षाच्या बालकाची त्याने या बाल सुभेदाराचा 'डेप्युटी-सुभेदार' (दुय्यम-सुभेदाराच्या गैरहजेरीत त्याचे काम करणारा) म्हणून नेमणूक केली. या नेमणुका झाल्या तेव्हा नियुक्त गव्हर्नर, शहाजादा, दिवाण-इ-खासकडे 'तुरुतुरु' गेला आणि तेथे त्याने भर दरबारात बादशहाला आभारदर्शक कुर्निसात केला. याचवेळी दुसरीकडे, सोनेरी, भरजरी कापडाचा बनविलेला, छोटया बाळाचा पोषाख या गव्हर्नराच्या 'डेप्युटी' बाळासाठी, लाहोरला पाठविण्यात आला. दुसरी एक कथाही अशा प्रकारचीच आहे. काश्मीरचा सुभा हा आणखी एक, पंजाब इतका महत्त्वाचा सुभा. शिवाय, यावेळी या सुभ्यावर अब्दालीचा सेनापती जहान्खान (Jahan Khan) याची स्वारी होण्याची भीती होती. अशा वेळी, अशा सुभ्याचा गव्हर्नर, हे प्रमुख पद, दुसऱ्या एका अधिकच लहान अशा, तालसयिदशहा या बाल राजपुत्राला (. . .एक वर्षाचे बालक!) बहाल करण्यात आले! अर्थातच या नामधारी, गैरहजर सुभेदाराचे काम नायबकडेच जाणार असताना, नायब नाझिम (Nazib) म्हणूनही त्याने एका पंधरा वर्षे वयाच्याच मुलाची नेमणूक केली! (हा आणखी एक, दरबारातील लाडका मुलगा होता). अहमदशहाचा कारभार हा असा होता! त्याच्या दरबारातील वृत्त निवेदकाला (Analist. lit. वार्षिक वृत्तान्त लेखक) मोठया संयमाने लिहितानाही म्हणावे लागले की, 'अशा प्रकारच्या कृती, बादशहाजवळ व्यवहार चातुर्याचा अभाव असल्याचेच दाखवितात.' [त-इ-अ. ४६ ब, ८५ ब, ८६ अ.].

क्वचित प्रसंगी, उदाहरणार्थ पुढे सफ्दरजंगाच्या बंडाच्यावेळी घडले त्याप्रमाणे, रागाचा झटका येऊन त्याच्या बोलण्यात आवेश आणि भावनोत्कटता यांचा अविष्कार दिसे पण यांचाही शेवट केवळ शब्दातच होई. लष्करी बाणा आणि लष्कराचे नेतृत्व करण्याची क्षमता, इतकेच नव्हे तर व्यक्तीगत धैर्य यांचा अहमदशहापाशी संपूर्ण अभाव होता. आपल्या शाही किल्यामधील सुरक्षितता आणि जगापासून एका बाजूला असलेला निवास यातून बाहेर पडून, आपल्या सैन्याच्या अग्रभागी उभे राहण्यासाठी, त्याचे मन वळविणे शक्य नसे. . . . त्याचे जीवित व सिंहासन यानाही धोका उत्पन्न झाला व उठाव करणाऱ्या बंडखोरामध्ये घबराट व गोंधळ

निर्माण करण्यासाठी व स्वतःच्या पुरस्कर्त्यांना धीर देऊन उत्तेजित करण्यासाठी, त्याने बाहेर पडून आघाडीला उभे रहाण्याची आवश्यकता असली तरीही बाहेर येण्यास त्याचे मन वळविणे शक्य होत नसे. काहीही हक्क वा अधिकार नसलेल्या लोकांनी, अनेक सुभे बळकाविलेले असून या उपटसुंभाकडून दिल्लीकडे काहीही वसुल येत नव्हता. यामुळे शाही वाड्यातले नोकरचाकर आणि सैनिक यांचे दीर्घ काळातले पगार द्यावयाचे बाकी राहिले असून त्यांची उपासमार होत होती. अशा परिस्थितीत शाही सैन्य त्याच्या वाड्याच्या सज्जाखाली जमले व आरडा-ओरडा करीत त्याला आग्रह करू लागले की त्याने बाहेर येऊन, गमावलेले सुभे परत आपल्या अंमलाखाली आणण्यासाठी त्याना मोहिमेवर न्यावे आणि महसुलाचा ओघ पुन्हा दिल्लीकडे सुरू करावा.—असे केले तरच त्या सर्वांचा थकलेला पगार देणे शक्य होणार होते—पण या आग्रहालाही तो प्रतिसाद देत नव्हता. त्याचा तळ सिकंदराबाद येथे असताना[१] त्यावर मराठ्यांचा हल्ला होण्याची चिन्हे दिसू लागली. यावेळी मराठ्यांनी निर्माण केलेल्या सामर्थ्याच्या केवळ देखाव्यामुळेही, अतिशय घाबरून जाऊन, आपल्या कुटुंबातील स्त्रिया मागे राहिल्यास त्या मराठ्यांच्या बंदिवासात सापडण्याची व त्यांची बेअब्रुही केली जाण्याची शक्यता असतानाही, त्याना तसेच मागे सोडून, त्याने तेथून रातोरात पळ काढला.[२] या घटनेमुळे हिंदुस्थानच्या इतिहासात त्याच्या नावाला काळोखी लागलेली आहे ती कायमचीच होय. [त. -इ- अ.—६६ ब, १७७ अ.]

आपल्या कारकीर्दीच्या अखेरच्या दोन–तीन वर्षांत मात्र राज्याच्या कारभाराकडे त्याने जातीने लक्ष दिले. रोज सकाळी याकरिता, खाण्यासाठी वा पिण्यासाठीही वेळ न घालविता तो, पुरे सहा तास देत असे. यावेळी राज्याच्या चारी दिशांनी आलेल्या वार्ता व अहवाल तो वाची, सुभेदाराकडून आलेल्या खलित्याना उत्तरे लिही, निरनिराळ्या तक्रार अर्जी ऐके, सैनिकांची हजेरी पत्रके तपासी आणि महसूल वा कारभारविषयक प्रश्नाबाबत आपले सविस्तर हुकूम लिही. या हुकूमातून तो, संबंधित प्रश्नासंबंधीच्या कागदपत्रातील मजकुराचा स्पष्ट गोषवारा लिहून, त्याबाबत निर्णयही सविस्तर व स्पष्ट नमूद करी. पण त्याच्याजवळ अनुभवजन्य व्यवहारज्ञान, कारभार यंत्रणेला सतत चालना देण्याचे सामर्थ आणि चिकाटीने प्रयत्न करण्याची क्षमता ही मात्र नव्हती. यामुळे त्याचा हा उत्साह व त्याने खर्च केलेली शक्ती यातून काहीही फलनिष्पत्ती वा यश त्याला लाभले नाही. २५ वर्षांचा हा हट्टी तरुण बादशहा या काळात कोणाचाही सल्ला ऐकत नसे आणि काही विचारविनिमय न करता एखाद्या अनियंत्रित हुकूमशहासारखे; हुकूम सोडीत असे पण ते अंमलात मात्र कधीही येत नसत. आपल्या बंदिस्त जागेत बसून, अशा प्रकारे कितीही नेटाने त्याने काम केले तरी त्यातू साम्राज्याच्या प्रत्यक्ष कारभारात थोडी फारही सुधारणा झाली नाही. अशा कामाची, ठरविलेली सहा तासांची वेळ संपल्यावर मात्र, तो पुढील १८ तास, सर्व लोकांच्या दृष्टी-पथातून बाजूला निघून जाई व या काळात त्याच्या जनानखान्यातील आणि एका बाजूला असलेल्या बागांमधील स्त्रिया त्याच्या व्यक्तित्वाचा पूर्ण ताबा घेत. अशा प्रकारे दररोज या

१ व २ : ही घटना २६ मे १७५४ ची. सफ्दरजंगाचे बंड संपले व तो आपल्या औंधच्या सुभ्याकडे गेला–(१७ नोव्हेंबर १७५३). नंतर लवकरच बादशहाच्याच पक्षातील एक प्रमुख–बक्षी इमाद–याने, बादशहा व वजीर यांच्याविरुद्ध कारवाया चालविल्या. तेव्हा वजीर इन्तिझाम व बादशहा यांच्या ज्या हालचाली झाल्या त्यात बादशहा सिकंद्राबादेला आला असून तेथे छावणी ठोकून राहिला होता. यावेळी मराठे व इमाद यांचा तह होऊन पुढे मल्हारराव बादशहाचे छावणीपासून २४ मैलांवर आल्याची बातमी आली. येथे निर्दिष्ट केलेली बादशहाच्या पलायनाची घटना यावेळची होय. (पहा : प्र. XI§२० XII§१०§११).

काळात 'शाही-स्थान व व्यक्ती' जणूकाय तात्पुरती सुप्तावस्थेतच जाई. अशा या नित्याच्या बादशाहीच्या सुप्तावस्थेत त्याच्या सर्वोच्च प्रधानाचे–त्याच्या वजीराचेही काही म्हणणे ऐकून घेण्यास तो नकार देई. या काळात भेट द्यावी अशी तातडीची विनंती आली तरी त्रासून, रागाने तो म्हणे .... "मी स्वतः जातीने रोज दुपारपर्यंत कारभारविषयक कामाला वाहून घेतो, शिवाय ठराविक निमित्तांच्या प्रसंगी दरबारही भरवितो, असे असूनही मी माझे मन, माझ्या शक्ती पुन्हा उत्तेजित करण्यात गुंतलो असताना, तुम्ही मला त्रास देण्यास आला आहात. काही विशेष कामासाठी मी स्वतः बोलाविल्याशिवाय, ठरविलेल्या सकाळच्या सहा तासांनंतर व दरबाराच्या दिवसांव्यतिरिक्त, कोणीही उमरावाने मला भेटण्यास येऊ नये."[१]

## § २ : राजमाता उधमबाई ( Queen Mother–Udham Bai)

राजमाता उधमबाई ही प्रथम एक सर्वमान्य व्यावसायिक नर्तकी होती. (Public Dancing Girl) अमिरखानाची मुलगी खदिजाखानम हिने प्रथम तिला महमदशहाच्या नजरेला आणले. त्यावेळी तिने बादशहाला इतके भारावून टाकले की, त्याने तिला आपल्या बेगमेच्या पदावर चढविले. मुसलमानी रियासतीत अनेक राण्यांनी, सिंहासनाच्या पाठीमागे बुरख्यात राहून, सत्तेचा प्रभावी वापर करण्यात वैशिष्टच दाखविले आहे. अशा बुरख्यातील सत्ताधारी व्यक्तींचे कार्य करता येण्याच्या दृष्टीने उधमबाईचा हीन कुळातला जन्म आणि आधीचा हीन व्यवसाय किंवा शाही जनानखान्यातील तिचे नंतरचे जीवन, यापैकी कशानेच तिची तयारी झालेली नव्हती. अखेरपर्यंत ती प्रथम होती तशीच ढिल्या वर्तनाची एक कुलंटा स्त्री अशीच राहिली. ( Vulgar woman of loose character ) तिच्या मुलाला बादशाही सिंहासनावर बसविण्यात आले या त्याच्या पदोन्नत्तीचा तिने उपयोग करून घेतला तो दरबारातील आपले महत्त्व अधिक प्रभावी करण्यात आणि अधाशीपणे आपल्या पदरी पैसा घट्ट बांधून ठेवण्यात. बादशहाबरोबरच्या तिच्या वैवाहिक जीवनातील उत्तर काळात, तिच्या वर्तनामुळे तिच्यावर बादशहाची खप्पा मर्जी झाली होती, इतकेच नव्हे, तिचा छळही झाला होता. या एकूण काळात बादशहाच्या मर्जीसाठी, तिच्या प्रतिस्पर्धी म्हणजे, उच्च कुलोत्पन्न दोन बेगमा, मलिक-इ-झमानी आणि साहिबा-महल या होत्या. या दोन्ही बेगमांना दिल्लीतील सर्वच समाज मोठा मान देत असे. अहमदशहा गादीवर बसल्यावर उधमबाईच्या हाती सत्ता आली तेव्हा तिने, या दोन्ही पूर्वीच्या प्रतिस्पर्ध्यांचा तिरस्कार व उपहास करून, त्यांचा उपमर्द करून आणि त्यांना दारिद्र्यात जीवन कंठायला लावून, सूड उगविला. तिच्या अशा या स्वभावातील

१ जदुनाथ सरकार म्हणतात : त.-ई.-अ.-१०१ब, ११५ अच्या लेखकाची या बाबतची विधाने मला काही समजू शकत नाहीत. तो लेखक म्हणतो : ...... "बादशहाच्या तारुण्यामुळे त्याचा स्वभाव, त्याची वृत्ती जरी मौजमजा यांची आवड असणारी असली तरी त्याच्याजवळ परिपक्व बुद्धी आणि कोणत्याही प्रश्नाला तात्काळ उत्तर देण्याची तयारी आहे." ......किंवा, हाच लेखक आणखी म्हणतो...... "बादशहापेक्षा कोणीही मनुष्य अधिक विद्वान नव्हता." ...... (बादशहाने एक पत्र स्वतःच्या हस्ताक्षरात, तुर्कीभाषेत लिहिले आहे ही वास्तव घटना हे या विद्वत्तेसंबंधीच्या विधानाला, स्पष्टीकरणार्थ उदाहरण म्हणून दिले आहे!) त.-इ.-अ.-१०३अ, १०४ब,......अशी ही, सर जदुनाथ याना न पटणारी विधाने त्यात आहेत. सर जदुनाथ पुढे म्हणतात......काहीही प्रत्यक्ष कृति स्वतः करणे, संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या स्वभावाची पारख करून आपल्या योजनांच्या कार्यवाहीसाठी योग्य व्यक्तींची निवड करणे, अशासाठी लागणाऱ्या गुणांचा त्याच्याजवळ पूर्ण अभाव होता. त.-इ.-अ. च्या लेखकाच्या निर्देशाप्रमाणे त्याच्याजवळ खरोखरच बुद्धिसामर्थ्य असलेच तर त्याच्या या वैगुण्यामुळे ते निष्प्रभ झाले असावे.

दोषांची काहीशी भरपाई करणारे दोन गुणही तिच्या अंगी होते,...एक, तिचे आपल्या मुलावरील अतिशय उत्कट, आंधळे, रासवट प्रेम ( Animal affection ) आणि दुसरा, तिच्याकडून अव्याहत केला जाणारा भरपूर व निस्वार्थी दानधर्म. यावेळी पूर्वीच्या बादशहांचे पुतणे आणि नातवंडे असे आप्त, दिल्लीच्या शाहीवाड्यात, दारिद्र्यात व दुर्लक्षित अवस्थेत खितपत पडले होते. असे आप्त आणि वाड्याबाहेरील अनेक गोरगरीब लोक, याना मात्र तिच्या परोपकारी वृत्तीमुळे जीवनातील सुखसोयी व सभ्यतेच्या मर्यादा राखता येतील असे व्यवस्थित जीवन उपभोगावयास लाभले. (त.–इ.–अ.–१६).

आपल्या हाताखाली काम करण्यास कर्तबगार माणसांची निवड करून, त्यांच्यामार्फत राज्यकारभार करण्याचा सूज्ञपणा तिच्याजवळ नव्हता, पण राज्याचा कारभार स्वतः चालवून नूरजहानशी स्पर्धा करावी असे मात्र तिला वाटे. "—साम्राज्याचे श्रेष्ठ अधिकारी रोज तिच्या महालाच्या देवडीवर (Porch–Deorhi) येऊन बसत. नंतर पडद्यामागे बसून ती त्यांच्याशी विचारविनिमय करी. (हा विचारविनिमय खोजांचे मार्फत चालत असे). राज्याच्या कारभारासंबंधी जे काही अर्ज, विनंत्या, प्रकरणे ( Petitions, Mutalibs ) आणि बंद खलिते जनानखान्यात पाठविले जात ते सर्व तिला वाचून दाखविले जात आणि या सर्वांवर ती आपले निर्णय देई. तिचे हे हुकूम 'अंतिम' होत असेच मानले जात." या तिच्या कारभाराचा परिणाम काय झाला असेल याची कल्पना त्यावेळच्या दरबारातील एका इतिहास लेखकाने देवावर हवाला टाकून काढलेल्या दुःखोद्गारावरून समजून येते. तो म्हणतो..... "अरे अल्ला ! इतक्या मूर्ख बाईकडून हिंदुस्थानचा कारभार चालविला जावा ना ? " कारभाराची अशी अवस्था झाली असली तरीदेखील जनतेच्या भावना अतिशय दुखावल्या गेल्या आणि शाही प्रतिष्ठा जास्तीत जास्त अधोगतीला गेली, ती उधमबाईने जाविदखानाशी केलेल्या जवळीकीने. कोणाही पुरुषाने, शाही जनानखान्यात रात्री राहू नये असा दीर्घकाळ अंमलात असलेला नियम होता पण तो डावलून शाही जनानखान्यात, रात्री घालविण्यापर्यंतही जाविदखानाची मजल गेली तेव्हा मात्र जनतेच्या भावना कमालीच्या दुखावल्या गेल्या आणि शाही प्रतिष्ठा अतिशयच खालावली. लोकापवादाच्या या विषयाची इतकी अपकिर्ती झाली होती की, अखेर यातून बादशाही रक्षकांनी एक उपहासगर्भ नाटचही एकदा उभे केलेल्या रक्षकांचा पगार वर्षापेक्षाही जास्त काळ दिलेला नसल्याने त्यांची उपासमार होत होती. बादशहा वा त्याचे 'नियंत्रक अधिकारी' यांच्याकडून या संरक्षक पथकांच्या प्रश्नाचे निरसन होत नव्हते, आणि त्यांना पगार मिळत नव्हता अशा स्थितीत हे नाटच उभे करण्यात आले होते. त्यानी एक तरुण गाढव व एक गाढवीण, राजवाड्याच्या दरवाजाजवळ बांधून ठेवली. पुढे उमराव व अधिकारी जेव्हा दरबाराला हजर रहाण्यासाठी आले तेव्हा हे रक्षक मोठ्या बेदरकारपणे त्याना म्हणाले.... "प्रथम याना मुजरा करा..... (गाढवाकडे बोट दाखवून) ते पुढे म्हणत हे नबाब बहादूर आणि त्या (मादीकडे दाखवीत) हजरत कुदसिया (Hazrat Qudsia)– राजमाता– होत".[1]

१ पहा : त.-इ.-अ.-४५ब व शाकिर, ३४-३५. याबाबत ग्रंथलेखक म्हणतात......या कथेचा लेखक (भा.त.-इ.-अ.- चा) उदार अंतःकरणाचा, बादशाही सिंहासनाचा, वंशपरंपरागत नोकर असून ही कथा निवेदन केल्यावर, आपल्या हृदयास झालेल्या वेदनांमुळे खरोखरच ओरडला असेल......"हे थोर परमेश्वरा ! ......आपल्या सम्राटाबद्दलची सर्व भीती, सभ्यता यांचा आदर व विचार, ही या लोकांनी गमावली आहेत ! "

आपला दीर्घ काळ न दिलेला पगार मिळण्यासाठी सैनिक जेव्हा रोज बंडे करू लागले तेव्हा राजवाड्यातील थाळ्या-तबके विकून सरकारला २ लाख रुपयेही उभे करता आले नाहीत. अशा परिस्थितीतही २१ जानेवारी १७५४ हा आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी २ कोट रुपये खर्च करण्याचा गुन्हेगारी-मूर्खपणा उधमबाईने केला. (त.–इ–अ. १०८).

उधमबाईचा मुलगा सिंहासनावर आल्यावर तिला, बाइ-जिउ-साहिबा ( Bai-Jiu-Sahiba ), नवाब कुदसिया ( N. Qudsia ), साहिबा-उझ्-झमानी ( S.-Uz-Zamami ) साहिब-जिउ-साहिबा (Sahib-Jiu-Sahiba), हजरत (Hazrat) आणि किब्ल-इ-अलम ( Qibla-I-Alam ), असे एका पाठोपाठ एक, किताब देण्यात आले शिवाय पाच लाख घोडदळाची मनसबदारी (औपचारिक व दर्शनी दर्जा) तिला बहाल करण्यात येऊन खुद्द बादशहाच्या वाढदिवसापेक्षाही अधिक मोठ्या थाटामाटात आणि अधिक सढळ हाताने उधळपट्टी करून तिचा वाढ दिवस साजरा केला जाऊ लागला. तिचा भाऊ मान-खान (Man-Khan) या वेळेपूर्वी गल्ली बोळातून वावरणारा एक उडाणटप्पू असून, कधी-मधी तो, गाणाऱ्या मुलींच्या मागे उभे राहून नाच्याचे काम करणाऱ्या पुरुष-नर्तकाचा तिरस्करणीय व्यवसायही करी. अशा या तिच्या भावालाही सहा-हजारी मनसबदारी देऊन मुतकद्-उद्-दौला-बहादुर (Mutaqad-Ud-Daulah-Bahadur) असा किताब देण्यात आला. [त.-इ-अ.-१६ अ, १७ अ; चारगुल. ४०० अ.].

## § ३ : खोजा जाविदखान याच्याकडे सर्व सत्ता येते

अहमदशहाच्या आधीच्या कारकीर्दीत, जाविदखान, जनानखान्यातील नोकरावरील सहाय्यक नियंत्रक (Asstt. Controller) आणि बेगमांच्या इस्टेटींचा (भा. जमिनजुमला-मालमत्ता इ.) व्यवस्थापकही होता. उधमबाईच्या नवऱ्याच्या निधनापूर्वीही त्याने तिच्या शरीरावर आणि मनावर पूर्ण पगडा बसविला होता. आता तिचा मुलगा सिंहासनारूढ झाल्यावर तर, जाविदची प्रगती व पदोन्नती झपाट्याने आणि मर्यादेपलीकडे होऊन, तो तर हिंदुस्थानचा 'मझरिनच' बनला. नव्या बादशहाने त्याला लगेच 'सहा हजारी मनसबदार' या पदावर चढविले. जाविदच्या या पदोन्नतीमुळे, त्याच्यावरील अधिकाऱ्याच्या म्हणजे जनानखान्यावरील मुख्य नियंत्रक–नाझिर–याच्या, संदर्भात चमत्कारिक स्थिती निर्माण होणार होती. रोझ–अफझून–खान (Roz-Afzun-Khan) हा यावेळी नाझिर असून तो तर औरंगजेबाच्या काळापासूनचा, आता शिल्लक असलेला असा जुना अधिकारी होता. आता तो खूपच वृद्ध झाला असून, अशक्तपणा व संधीवात यामुळे त्याला चालताही येत नव्हते. तथापि यावेळी त्याला बाजूला सारणेही प्रशस्त नव्हते. अशावेळी, निर्माण होत असलेली चमत्कारिक स्थिती टाळण्यासाठी रोझ अफझुनलाही तीच मनसब देण्यात आली. पुढे लवकरच जाविदला, पिढीजात उमरावांच्याही वर, प्रिव्हि कौन्सिलचा–– 'दिवाण-इ-खास, या बादशहाच्या सर्वोच्च सल्लागार मंडळाचा–'अधीक्षक' (Superintendent) या पदावर नेमण्यात आले, (१९ जून १७४८). कोणालाही बादशहाची भेट घेता येणे संपूर्णपणे या अधीक्षकाच्या हाती असे. अशा या अधिकारपदामुळे, बादशहाला सल्ला देणाऱ्या विश्वासू सल्लागारांचे, बादशहापाशी येणेच रोखून, आपली सत्ता कायम करणे त्याला आता शक्य झाले. अशा अनेक उच्च पदांचा त्याच्यावर वर्षाव चालूच राहिला, आणि यातून माहिती

व हेरखाते (Intelligence Dept.), शाही हत्ती-दल, निरनिराळ्या नेमणुका करणारे व पैसा मंजूर करणारे खाते (अर्झ-इ-मुकर्रर–Arz-i-Mukarrar), बेगमांच्या इस्टेस्टींचे नियंत्रक खाते आणि बादशहाच्या 'खाजगी कडील' पैशाचे नियंत्रण खाते, अशा अनेक खात्यांची मुख्याधिकारपदे त्याच्याकडे सोपविण्यात आली. [त.-इ-अ.-१४ ब, डी. सी.— दिल्ली क्रॉनिकल, शाकीर ६३].

जनानखान्यात सतत बादशहाच्या सान्निध्यात असल्यामुळे, जाविदखानाने त्या भोळसर बादशहाच्या मनावर छाप पाडून, आपले शहाणपण, कारभारविषयक ज्ञान आणि बादशहावरील निष्ठा इ. आपल्या गुणाबद्दल (!) त्याच्यावर छाप बसविली. बादशहा जसजसा व्यसनात आणि आळसात खोलवर रूतू लागला तसतशी सर्व सत्ता या खोजाच्या हातात गेली. काही काळानंतर तर बादशहा स्वतः जनानखान्यातच गुंतून राहू लागला आणि त्याने उघडपणेच शाही कारभाराचे सर्व प्रश्न निर्णयासाठी जाविदखानाकडे सोपविले. आता त्याला 'सप्त हजारी मनसब' बहाल करण्यात येऊन 'नबाब बहादूर' हा किताबही देण्यात आला. याचबरोबर शक्य तेवढी सर्वोच्च सन्मान चिन्हे म्हणजे महि-ओ-मरातिब (Mahi-O-Maratib) हे पदक, निशाण (Standard), झेंडा (Banner), नगारा-पडघम-दुंदुभी (Kettle Drums) असा वाद्यवृंद आणि झालर-गोंडे इत्यादींनी सजविलेली पालखी, अशा मान चिन्हांचा अधिकारही त्याला देण्यात आला.... "यापूर्वी कोणाही खोजाला इतक्या उच्च पदावर, मानमरातबावर चढविलेले नव्हते आणि कोणत्याही सरदार-उमरावाला नबाब (दरबारामध्ये) हा किताब दिलेला नव्हता." यासंदर्भात दिल्लीमधील एका इतिहासकाराने, मोठ्या दुःखित अंतःकरणाने, ठपका दिला आहे ते साहजिकच होय. तो म्हणतो..... "तैमूरच्या वेळेपासून ते आजपर्यंत, कोणाही खोजाने राज्य-कारभारात अशी सत्ता वापरली नव्हती. आता ती हा खोजा वापरीत असल्याने कारभार अस्थिर व खिळखिळा झाला आहे. पिढिजात उमरावांना आपले अर्ज-विनंत्या या गुलामा-मार्फत सादर कराव्या लागत असल्यामुळे आणि कारभाराबाबत कोणत्याही प्रश्नाचा विचार व निर्णय होण्यापूर्वी त्याला दरबारी रिवाजानुसार मान-मरातब द्यावा लागत असल्यामुळे त्यांना आपली मानखंडना झाल्याचेही वाटते." [चा. गुल. ३९९ ब. त.-इ-अ.-१५ अ, १४ ब, २५ अ. ].

जाविदखानाचे वय यावेळी पन्नास वर्षे असले तरी तो पूर्ण निरक्षरच राहिला होता. यापूर्वी कारभारविषयक कोणत्याही पदावर त्याने काम केलेले नव्हते वा आपल्या उभ्या आयुष्यात एखादी लढाईही पाहिली नव्हती. तरीही आता तो युद्ध आणि शांतता, महसूल आणि कारभार अशा क्षेत्रातील सर्व प्रश्नांबाबत सर्वोच्च अधिकारी या नात्याने निर्णय देऊ लागला.[1]

हिंदुस्थानातील मुसलमान रियासतीच्या दीर्घकालीन इतिहासात हबशी आणि तुर्की गुलामांनी अत्युच्च अशी लष्करी आणि कारभारविषयक क्षमता व कौशल्यही

१ या संदर्भात त.-इ.-अ.-च्या लेखकाने उद्‌गार काढले आहेत की......"अरे देवा ! ज्या ठिकाणी बादशहाने स्वतः युद्धे केली, वजिरांनी रात्रंदिवस साम्राज्याच्या कारभाराकडे लक्ष दिले, त्या ठिकाणी आता हा खोजा एकमेव राज्यकर्ता बनला असून, तो स्वतः तर, सर्व बाबीत अज्ञानी आहे, त्याने आपल्या उभ्या आयुष्यात लढाई पाहिलीही नाही, नव्हे तिचा आवाजही कधी आपल्या कानानी ऐकला नाही. असा हा खोजा आता एकमेव राज्यकर्ता बनला आहे." (२८ब).

दाखविले होते पण जाविद मात्र अशांच्या जातीचा नव्हता. बादशहाच्या व्यसनासक्तीला मदत करून उत्तेजन द्यावयाचे, त्याच्या आईची खुषमस्करी करून मर्जी सांभाळावयाची व आपण सर्वांत जास्त प्रभाव संपादन करावयाचा आणि त्याच्या जोरावर स्वतःची तुंबडी भरावयाची इतकीच त्याची हीन महत्वाकांक्षा होती. त्याने स्वतःसाठी जास्तीत जास्त फायद्याच्या जहागिरी मंजूर करून घेतल्या. बादशहाची 'खाजगी' आणि 'सैन्य' यांच्या खर्चासाठी वापरावयाचा वसूलही त्याने स्वतःसाठी बळकावला. अर्जदारांना काही मिळवावयाचे असले की, बादशहाच्या कानाला लागून, त्याच्याकडून ते करवून घेण्यासाठी हे अर्जदार त्याच्या पदरात लाखो रुपये टाकीत.

एका खोजाला एका गुलामाला आपणास दरबारी मान द्यावा लागणार, या कल्पनेने साम्राज्याच्या उमरावांची मने बंड करून उठत. मंत्री बादशहाकडे त्यांची कारभारविषयक दरबारी कामे घेऊन आले की, बादशहा जाविदकडे निर्देश करून त्यांना सांगे की, 'त्याच्याकडून तुमच्या कामाबाबत हुकूम घ्या'. अशा रीतीने कारभाराबाबत, जाविदकडून निर्णय घेण्यास सांगितले की, या मंत्र्यांना साहजिकच अपमानास्पद वाटे. आपण अमीर आणि तो तर एक गुलाम, यातील उमरावीवृत्तीला स्वाभाविक असा तिरस्कार, त्याना, जाविदबद्दल वाटे आणि ते त्याच्यापासून दूर, तुटक असेच रहात. या त्यांच्या द्वेषाला व तिरस्काराला, जाविदही प्रत्युत्तर देई. ते त्यांची उपेक्षा करून, त्यांचा उपहास वा तिरस्कार करून, मध्यमदर्जाच्या उमरावांना आपल्या भोवती जमवून आणि आपल्या आधीन असलेल्या हलकट व्यक्तीनाही मानमरातबाला चढवून व त्यान अधिकारपदे देऊन ! याचा परिणाम झाला तो, तरुण व अननुभवी बादशहा आणि त्याच्या सलतनतचे पिढीजात आधारस्तंभ यांच्या दरम्यान संपूर्ण फारकत निर्माण होण्यात. [त.-इ-अ.-२० ब, १५ ब].

## § ४ : नव्या सरकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुका

नवा बादशहा सिंहासनावर बसल्यावर निरनिराळचा अधिकारपदांची वाटणी नव्याने झाली. आधीच रिकामे झालेले वजीरपद सफ्दरजंगाला बहाल करण्यात आले (भा. पहा प्र. ५–१४). आधीचा बादशहा महमदशहा मृत झाला त्यावेळी शहाजादा अहमद याची छावणी पानिपत येथे होती. शहाजाद्याबरोबरची संरक्षक व इतमामी पथके यावेळी सफ्दरजंगाच्या अधिपत्याखाली होती. महमदशहाच्या मृत्यूची वार्ता शहाजाद्याला मिळाली तेव्हा सफ्दरजंगाने, मानाचे पोषाख आणि निशाणे यातून सोनेरी जराचे कापड काढून, त्यातून एक 'सोनेरी शाही-छत्री' तयार केली. ती शहाजाद्याच्या मस्तकावर धरून तो मोठ्याने म्हणाला..... "बादशहा झाल्याबद्दल, शहेनशहांचे (Your Majesty) मी अभिनंदन करीत आहे".... याला अहमदशहाने प्रतिसाद दिला की,... "तुला वजीरपद मिळत असल्याबद्दल मीही तुझे अभिनंदन करतो." पण सफ्दरला वजीरपद देण्यात, निजाम-उल्-मुल्क असफ्दजाची भीती होती म्हणून सफ्दरजंगाची ही नेमणूक यावेळी गुप्त ठेवण्यात आली. सफ्दरजंगाला, वजीरीची 'वस्त्रे' व मानमरातब इत्यादी बहाल करणे, असे अधिकारग्रहणाचे संस्कार मात्र यावेळी केले नाहीत. पुढे लवकरच बऱ्हाणपूर येथे निजाम मरण पावला (२१ मे). ही बातमी दिल्लीला पोहोचल्यावर मात्र (१९ जून) वजीरपदाची वस्त्रे व अधिकार ही सफ्दरला औपचारिकपणे व समारंभपूर्वक बहाल करण्यात आली. यानुसार वजीराच्या कचेरीत, वजिराच्या गादीवर बसून, उघडपणे वजीर म्हणून, कारभार,

विषयक कागदपत्रावर त्याने सह्या केल्या त्या प्रथम २० जूनला. तोफखान्यावरील नियंत्रकाचे, मिर अतिष हे अधिकारपद (Superintendentship of Artillary) यावेळेपर्यंत सफदरजंगाकडेच होते, ते लवकरच (६ जुलै) त्याचा मुलगा जलालुद्दिन हैदर याला देण्यात आले... असफजाच्या मृत्यूमुळे साम्राज्याचे सर्वोच्च 'बक्षीपद' (Chief Paymastership मिरबक्षीपद) रिकामे झाले होते ते आता सय्यद (Sayyid) सलाबतखान झुल्फिकारजंग (Zulfiqar Jung) याला देण्यात आले. (२९ जून). सय्यद सलाबतला पूर्वी सादातखान (Sadat) नावाने ओळखीत. पूर्वी एका सादातखानाची मुलगी गौहर-उन्-निसा हिचा विवाह फरुखसियार बादशहा बरोबर[1] झाला होता आणि तोच सादात बादशहाचा 'मिर आतिष' होता. आता प्रमुख बक्षीपद देण्यात आलेला सादातखान (सयिद सलाबत) हा फरुखसियार बादशहाच्या या सासऱ्याचा मुलगा, म्हणजे बादशहाचा मेहुणा होता. बापावरूनच यालाही प्रथम सादातखान म्हणून ओळखले जाई. साम्राज्याचा 'पहिला बक्षी' या पदाला "अमिर-उल्-उमरा" हा किताबही होता, तोही त्याला मिळाला. दुसऱ्या अनुक्रमाचे बक्षीपद माजी वजीर, पै. कम्रुद्दिन याचा मुलगा म्हणजेच माजी निजामाचा वडील मुलगा गाजिउद्दिन याचा मेहुणा (बायकोचा भाऊ), इन्तिझाम-उद्-दौला, खान-इ-खानान याला देण्यात आले. शाही जमिनींची दिवाणी[2] इशाकखान नज्मुद्दौला याला आणि 'सदर पद' अब्दुल्लाखान याला देण्यात आले. सादुद्दिनखान मात्र आपल्या खान-इ-सामान (Lord High Steward) या पदावर पुढेही राहीला.

महत्त्वाच्या सुभ्यापैकी लाहोरचा सुभा हा, महमदशहाच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या दिवसातच, दिवंगत वजीराचा दुसरा मुलगा मुइन्-उल्-मुल्क याला सुभेदार म्हणून, देण्यात आला होता. (भा. पहा प्र. ५§१६ शेवटचा परि.). अलाहाबाद आणि आग्रा हे सुभे

---

१ मु.-उत्.-त. (M. U.) (२) ५२४-५२६ : फरुखसियार आणि गौहर-उन्-निसा यांची मालिका-उझ्-झमानी नावाची मुलगी होती, ती महमदशहाची प्रमुख बेगम-पट्टराणी-होय (भा. पहा—२ परि. १). याच बरोबर झुल्फिकार जंग, याच्या स्वतःच्या मुलीचा विवाह यांच बादशहाबरोबर झाला होता. हिचे नाव 'साहिबा महल' असे होते. (भा. पहा §२ परि. १) यातून साहिबा महलला बेगम साहिबा नावाची मुलगीही होती. सरहिंदच्या मोहिमेच्यावेळी (भा. पहा प्र. ५§१३§१६) झुल्फिकार जंग हा साम्राज्याचा 'चौथा' (चौथ्या क्रमाचा) बक्षी या पदावर असून या मोहिमेत तो शहाजादा अहमद याचा 'पालक', या अधिकार पदावर होता. आपण सिंहासनावर आल्यावर अहमदने त्याला "पहिला-बक्षी" या वरच्या पदावर नेमले. अहमदशहा, त्याला 'नाना बाबा' म्हणजे आईकडून आजोबा, या नावाने संबोधित असे याचे कारणही होते. मालिका-उझ्-झमानी हिला स्वतःला मूल नव्हते आणि तिने अहमदाला स्वतःच्या मुलाप्रमाणे वाढविले होते. झुल्फिकार जंग व अहमदशहा यांची अशा प्रकारची जवळीक होती. बादशहाची जवळीक असलेल्या या झुल्फिकारबद्दल जाविदखानाला मत्सर वाटू लागला. यामुळे अखेरी बादशहा या झुल्फिकार विरुद्ध जाईल अशी कारवाई त्याने केली.

२ 'दिवाणी'-'दिवाण'......दिवाण हे मुघल साम्राज्यातील अधिकारपद म्हणजे प्रमुख महसूल अधिकाऱ्याचे पद होय. मध्यवर्ती सरकाराप्रमाणेच, प्रत्येक सुभ्याच्या शासन यंत्रणेत व जहागिरी इ. ठिकाणीही असे पद असे. दिवाणाने सर्व वसूल करावयाचा, यासाठी लागणारा खर्च व आपला ठराविक वाटा ठेऊन घेऊन राहिलेला सर्व, बादशहाच्या वा सुभ्याच्या खजिन्यात भरावयाचा असे. सुभ्यातही, सुभेदाराखालोखाल महत्त्वाचा अधिकारी, दिवाणच असे. याचे महत्त्व ईस्ट इंडिया कंपनीच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. लोभी ईस्ट इंडिया कंपनीने बंगालची सर्व सत्ता हाती आली असताही सुभेदारी ऐवजी 'दिवाणी' आपल्याकडे ठेवली व कारभार नबाबाकडेच ठेवला पण त्याला ठराविक व तुटपुंजी रकम देण्याचे ठरविले. (क्लाइव्ह—दिवाणीची सनद—१७६४). कंपनीने पैशावरील सत्तेचा गैरवापर केल्याने, पैशाअभावी नबाबाचा कारभार मोडकळीस आला, प्रजेला हालअपेष्टा, अन्याय भोगावे लागून तिची फार पिळवणूक झाली. ...... कंपनीने व तिच्या नोकरांनी अफाट पैसा मिळविला. ......'दिवाणीचे' स्थान हे असेही वापरले जाई.

प्रथम सलाबत खानाला दिले होते आणि अजमीर सुभा, औंधला जोडून तो एकत्र मोठा भाग, सुभेदार म्हणून सफ्दरजंगाच्या ताब्यात होता. पण संरक्षणाच्या दृष्टीने, अजमीर भाग, आग्रा सुभेदाराच्या ताब्यात ठेवणे, आणि तितक्याच स्वाभाविकपणे अलाहाबाद हा औंध सुभ्याला जोडून ठेवणे अवश्य आहे, हे लवकरच लक्षात आले. यामुळे, या दोन सुभेदारांमध्ये संबंधित प्रांतांची अदलाबदल करण्यात आली. बंगाल तर अलिवर्दीखानाच्या सत्तेखाली अनेक वर्षे प्रत्यक्षात स्वतंत्रच झालेला असल्यामुळे आता, शहाणपणाने त्याच्या अधिकारात काहीही ढवळाढवळ करण्यात आली नाही. १७४१ मध्ये माळवा पेशव्याकडे सुपूर्द करण्यात आला होता, त्यातही आता काही बदल करण्यात आला नाही-पण मराठ्यांच्या हातातून गुजरात प्रांत मात्र परत मिळविण्यासाठी शेवटचा प्रयत्न म्हणून एक साहसी योजना तयार करण्यात आली. यानुसार, यावेळी हयात असणाऱ्या राजपूत राजांपैकी सर्वात शूर असलेल्या बख्तसिंह राठोडला या प्रांताचा सुभेदार नेमण्यात आले, (२९ जून) (भा. १ला-प्र. ७§९), पण या प्रयत्नातून काहीही निष्पन्न झाले नाही. बख्तसिंहाचे गुप्तहेर या सुभ्याकडे आधीच गेले होते. त्यानी त्याला माहिती दिली की, त्या सुभ्यातील परिस्थिती आता हाताबाहेर गेलेली आहे. अशा .रिस्थितीत बख्तसिंहाने या वांझोट्या नामधारी सुभेदारीचा मान नाकारला. [ सियार (३) ३७, मिरात-इ-अहमदी (२) ३७४–३७७ ].

या नेमणुका होत असताना 'दख्खन' च्या सुभेदारीवरील नेमणूक मात्र एक वर्षपर्यंत स्थगित ठेवली गेली. (भा. असफ् जाह निजाम, २१ मे १७४८ ला मृत्यू पावला होता.) निजामाच्या मृत्यूच्यावेळी, त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा दख्खनमध्येच असून त्याच्या हाताखाली सैन्यही होते. बापाच्या मृत्यूमुळे मोकळे झालेले सुभेदारपद, आपल्या दख्खनमधील उपस्थितीचा फायदा घेऊन, त्याने आपल्या हाती आधीच घेतलेले होते. त्याचा मोठा भाऊ गाजी-उद्-दिन हा मात्र, आधीची आठ वर्षे दिल्लीतच रहात असे. अखेरी दिल्लीच्या दरबाराने, निजाम असफ्जाच्या मोकळ्या झालेल्या जागी, सुभेदार म्हणून, नासिरजंगाची औपचारिकपणे नेमणूक, एप्रिल १७४९ मध्ये केली व त्याला निजाम-उद्-दौला हा किताब दिला. [ हडिकत-उल्-आलम (२) १९१ ].

## § ५ : बादशाही साम्राज्याचा कारभार कसा कोसळला

महमदशहाच्या मृत्यूनंतर साम्राज्याचे भवितव्य अधिकच विषाद वाटण्यासारखे बनले. महमदशहाचा नेहमीचा आळस आणि कारभाराकडील दुर्लक्ष यामुळे सर्वत्र लष्करी दौर्बल्य आणि आर्थिक दिवाळखोरी, अटळपणेच आलेली होती. सर्वांना वचक वाटावा असा एकच धनी आणि कोणीही न्यायासाठी वा संरक्षणासाठी ज्याच्याकडे जावे असा सर्वांना समान असा एकच शासनकर्ता उरला नव्हता. यामुळे प्रत्येक उमराव, त्याला जितके शक्य होईल तितके सरकारी महसुलातून स्वतः बळकावू लागला. प्रत्येक जमीनदार आपल्या जहागिरीच्या परिसरातील जमिनी लुबाडू लागला वा आपल्या अधिकारकक्षेबाहेरील खेडी आणि रस्ते यावर जबरदस्तीने खंडणी बसवू लागला. साम्राज्याच्या दक्षिण सरहद्दीवरील सुभे तर मराठ्यांनी आधीच आपल्या ताब्यात घेतले होते आणि आता १७४६ नंतर दरवर्षी, बंगाल-ओरिसात, ते करीत असलेल्या स्वाऱ्यामुळे, त्या प्रांतातून येणारा वसूलही तुटला (भा. पहा प्र. ४). परिणामतः शाही खजिना रिता पडला आणि यातून निर्माण झालेले अतिशय भयाण

दारिद्र्य आणि हाल अपेष्टा यामुळे बादशहा आणि त्याचे कुटुंबीय यांना सर्व प्रजेच्या दृष्टि-कोनानुसार, घोर मानखंडना सहन करावी लागली.

निर्माण झालेली दुस्थिती, एका दुष्टचक्राच्या फेऱ्यात सापडून तशीच चालू राहिली. आतापर्यंत सुभ्यातून येणाऱ्या वसुलातून शाही दरबार आणि त्याची सैन्ये यांच्या खर्चाची तरतूद होत असे. आता केंद्रसत्ता 'पक्षघात' झाल्याप्रमाणे विकलांग झाली असल्यामुळे, वसूल देणारे हे सुभे स्वतंत्र तरी झाले वा शत्रूंनी तरी जिंकले आणि केंद्राकडे नियमित येत असलेला वसूल बंद पडला. सैनिकांचा पगार देणे वा एखाद्या मोहिमेसाठी अवश्य असणारी सामुग्री व दारुगोळा यांचा पुन्हा पुरवठा करून, तिची जुळवाजुळव करणे अशक्य झाले. यामुळे बंड करून स्वतंत्र होणाऱ्या गव्हर्नरापैकी वा जमिनी व खंड बळकावणाऱ्यापैकी एकालाही वठणीवर आणून पुन्हा ताब्यात आणणे व राहिलेला महसूल द्यावयास लावणे यासाठी काहीही प्रयत्न करणे शक्य नव्हते. काळ जाईल तसतशी, दरबाराची दिवाळखोरी जास्त जास्तच तीव्र होत गेली. यानंतर दरबारातील बलिष्ठ मंत्री आणि आवडत्या बेगमा यांच्या दरम्यान चुरस व धडपड सुरू झाली. ती, स्वतःसाठी अतिशय सुपीक व कारभार चालवायला सोप्या अशा जहागिरी मिळविण्यासाठी, उत्तम वसूल देणारी, बाजार पेठेची शहरे मिळविण्यासाठी आणि त्याच सारख्या, भरपूर वसूल मिळवून देणाऱ्या कराच्या-उत्पन्नाच्या बाबी मिळविण्यासाठी. १७ व्या शतकात सुरत या बादशहाच्या बंदरातील आयात-निर्यात कराचे नाके व त्यातून मिळणारा कर, ही तर भरपूर पैसा देणारी, सुप्रसिद्ध दुभती गायच होती. हे नाके साम्राज्याच्या हातातून जाऊन आता बराच काळ लोटला होता. तथापि राजधानी जवळच्या धान्याच्या बाजारपेठा अद्यापही खात्रीचे व मोठे उत्पन्न मिळवून देत होत्या. यमुना नदीचे कालवेही त्यांच्यावरील अधीक्षकाला ( Superintendent ) वर्षाकाठी, २५ लाखांचा निव्वळ फायदा मिळवून देत. [ कालव्यापासून मिळणाऱ्या या उत्पन्नाचा उपभोग, सफ्दरजंग घेत असे. . . . पहा : सन १८०० सालाचे आशिया संबंधिचे वार्षिक नोंद–पुस्तक. . . .विविध पुस्तिका, ३७, पोलिअरचे पत्र. Asiatic Annual Register for 1800. Misc. Tracts, 37, Polier's letter ]

या काळात, उत्कृष्ट व अतिशय शांत रहाणारी, अशी खेडी, शाहीजमिनी–खालसा– ( Crown lands ) म्हणून आणि बादशहासाठी वैयक्तिक नेमणुकीचे वतन ( सर्फ-इ-खास Estates of the Emperor's Privy Purse ) म्हणून राखून ठेवली जात. बादशहाचे व त्याच्या कुटुंबियांचे जीवन आणि त्यांच्या नेहमीच्या खर्चाची तरतूद ही तर सर्व दृष्टींनी, वसुलीच्या या बाबीवरच अवलंबून असत. पण आता अहमद-शहाच्या कारकीर्दीत प्रथम जाविदखान व सफ्दरजंग आणि कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षात, इमाद्-उल्-मुल्क, अशासारखे, सर्व दृष्टीने बलिष्ठ सरदार, बादशहाच्या या वैयक्तिक जहागिरी-वतनी जमिनी यातून जमा केलेल्या वसुलाची अफरातफर करू लागले. अशा अपहारातून जे काही राही ते, बादशहाचे, केवळ कसेबसे भागण्याइतकेच असे. येवढ्यावरच न थांबता हे उमराव, आपले गुमास्ते पाठवून या राखीव शाही भागातील व्यापारी-शेतकरी, यांची लूट करीत. परिणामतः बादशहाच्या खर्चासाठी राखून ठेवलेला हा अखेरचा झराही बुजवला गेला आणि बादशहा, त्याचे कुटुंबीय, त्याचे व्यक्तीगत नोकर-चाकर आणि संरक्षक या सर्वांच्याच समोर उपासमार उभी राहिली. देशाबाबत वा स्वतःच्या भविष्याबाबतही विचार न करता प्रत्येक उमराव, आपल्याला तात्काल मिळेल, तेवढ्याच फायद्याला घट्ट बिलगून राहू लागला.

निरनिराळ्या प्रांतांचे सुभेदार आपापल्या सुभ्यांच्या मर्यादेत, सर्व सत्ताधारी राज्यकर्ते बनले असून ते मात्र आता स्वतंत्रपणे आणि समृद्धीत राहू लागले. दरबारात राहून, तेथील कामे करावयासाठी नेमलेले किंवा काहीही नोकरी नसल्यामुळे राजधानीत रहाणारे काही सरदार-उमराव होते. अशा सर्वांपैकी फक्त तीन वगळून, बाकी सगळ्यांचे आपापल्या वतनामधून नियमित जमा होणारे उत्पन्न, आता बंद झाले होते. त्यांच्याजवळ असलेली शिल्लकही खर्चून गेली तेव्हा यापुढे आपल्या पदरचे सर्व नोकर व सैनिक यांना नोकरीतून काढून, ते आपले जीवन दारिद्र्यात कंठू लागले. यातून सुटलेले तीन भाग्यवान अपवाद म्हणजे जाविदखान, सफ्दरजंग व झुल्फिकारजंग येवढेच उमराव होत. राजकीय क्षेत्रात या तिघांचा वरचष्मा असल्यामुळे, पुरेसे उत्पन्न आणि सैन्याची बलाढ्य पथके या त्यांच्या गोष्टींना कधीच धोका पोहोचला नाही. यापैकी तिसरा–सलाबतखान झुल्फिकारजंग, याचा, १७५० मध्ये, त्याने हाती घेतलेल्या राजपुतान्यातील मोहिमेमध्ये पूर्ण नाश झाला होता. ( भा. पहा प्र. ७§१०§११ ). या सर्वांचा सर्वसाधारण अर्थ असा की, बहुतेक उमरावांनी आपल्या सैनिकी पथकांना रजा दिली असून जे काही थोडे सैनिक राजवाड्याच्या संरक्षणा-साठी आणि राजधानीतील तोफखान्यावर काम करण्यासाठी नोकरीत ठेवले होते त्याचाही पगार देण्याचा इतका बाकी राहिला होता की तो देता येण्याबाबत निराशाच वाटत होती. या परिस्थितीचा एकूण परिणाम झाला तो प्रत्यक्ष व्यवहाराचे दृष्टीने साम्राज्याच्या सशस्त्र दलांचे सामर्थ्य नाहीसे होण्यात ![1]

साम्राज्य सरकारच्या दिवाळखोरीमुळे सैनिकांचे पगार देणे सरकारला अशक्य होऊन तो देणे बाकी राहिला ते प्रथम १४, नंतर १८ आणि अखेरी ३६ महिन्यांचा. अशा-रीतीने उपासमार होऊ लागलेल्या सैनिकांनी बंडे केली. लष्कराच्या बक्षींच्यावर (Pay-masters ) त्यांनी हल्ले केले; राजवाड्यातून व उमरावांच्या वाड्यातून कोणाला बाहेर पडता येऊ नये वा कोणाला आतही जाता येऊ नये आणि आतील लोकांची उपास-मार व्हावी. म्हणून त्यांनी या वाड्यांच्या दरवाजांची नाकेबंदी केली. अमीरखान मेला तेव्हा त्याच्या पथकांचा १४ महिन्यांचा पगार द्यावयाचा राहिला होता. त्याचा मृत्यू झाल्या बरोबर त्याच्या पथकातले सैनिक त्याच्या वाड्याच्या दरवाजात जमले आणि त्यांच्या देणे असलेल्या बाक्या चुकत्या होईतो त्यांनी त्याचे दफन होऊ दिले नाही. या वा त्या प्रकारच्या सैनिकांनी, बहुतेक प्रत्येक महिन्यात केलेल्या अशा प्रकारच्या बंडाच्या त्याच त्या प्रकारच्या कंटाळवाण्या हकीगतीनी अहमदशहाच्या कारकीर्दीचे वर्णन करणारा एक इतिहास भरलेला असून, त्यात या घटनांचा उद्वेगजनक तपशीलही वर्णन केलेला आहे. हा इतिहास दिल्लीच्या दरबारातील एका, एकनिष्ठ व्यक्तीने लिहिलेला असून अशीच हकीगत, थोडक्यात व मुद्देसूद अशा लिहिलेल्या "दिल्लीचा वृत्तान्त" ( Delhi Chronical ) या मध्येही नमूद आहे. बाबराच्या घराण्याचा एक पिढीजात, एकनिष्ठ सेवक 'शाकिरखान' हाही यावेळच्या शोचनीय स्थितीचे वर्णन करतो ते असे......"अहमदशहा सिंहासनारूढ झाल्यावर, काही काळातच परिस्थिती इतकी विकोपाला गेली की, शाही कोठ्यातील सर्व प्रकारच्या वस्तूंची वर्णनासहित यादी करण्यात येऊन या वस्तू दुकानदार व फेरीवाले यांना विकण्यात आल्या. या वस्तूत शस्त्रास्त्रे, गालिचे ( Carpets ) व सतरंज्या, स्वैपाकाची भांडी आणि जेवणाच्या थाळ्या, ग्रंथ व वाद्यवृंदातील वाद्ये ( Band

१ शाकिर ३५, त.-इ.-अ.-१४ब, २०ब, २१अ.

instruments) व अन्य सर्वंच 'कारखान्यातील' (शाही खाजगीकडील वा कारभारातील विशिष्ट खाती–Karkhane ) अशा वस्तु होत्या. अशा विक्रीतून उभा राहिलेला सर्वच पैसा सैन्याचे पगार देण्यातच खर्च करण्यात आला. यातून लोकांकडून अनुचित व वर्णन करताही येणार नाही इतकी टवाळकी व अपमान केला जाण्यास अनिबंध संधी निर्माण झाली......समृद्धी होती त्याठिकाणी दुर्दशा आली. मध्य आशियातले ( विलायती. )[1] सैनिक आणि बादशहाच्या खाजगीकडील सैनिक यांनी, 'वजीर लोक' ( सामान्यार्थाने–मोठे अधिकारी ), अमीरलोक, साहू लोक, व्यापारी आणि कारागीर, अशा अनेकांची घरे व दुकाने, यामधील सर्व प्रकारच्या वस्तू पळवून नेल्या ( आणि विकल्या ) आणि एक प्रकारे सरदार-उमराव इत्यादींची बदनामी केली. आपल्या अंगावर होते तेवढेच कपडे वापरणे आणि मातीच्या थाळीतून खाणे याशिवाय अमिरांना गत्यंतर राहिले नाही. ......या संदर्भात चौकशी करण्याचे हुकूम बादशहाने दिले, तेव्हा त्यातून आढळले की या सैनिकांचा पगार तीन वर्षे देण्याचा राहिला होता. अशा परिस्थितीत, खजिन्यात एक कर्पादिक तरी शिल्लक रहाण्याचा काय संभव होता? एकंदरीत ही कारकीर्द म्हणजे छोटचा छोटचा जमाती व टोळचा यांच्या नायकांचा कारभार–या नायकांचे राज्य–बनले." ( मुलुक-उत्-तवाइफ् ) –[ शाकिर, ३४ ].

## § ६ : वजीर सफ्दरजंग, त्याचे प्रतिस्पर्धी आणि शत्रू

अशा अवस्थेप्रत घसरलेल्या राज्याला पुन्हा सावरणे, 'बिस्मार्क'[2] सारखी क्षमता व हुकुमशाहीचे अधिकार असलेल्या वजीरालाच शक्य झाले असते. पण सफ्दरजंगाजवळ दोन्हीपैकी काहीच नव्हते. खरे पहाता त्याची परिस्थिती असामान्य अडचणींचीच होती. तो तर मूळचा, एक परदेशात जन्मलेला साहसी मनुष्य असून त्याचा चुलता म्हणजे, दिल्लीच्या नोकरीत दाखल होणारा, त्या कुटुंबातील पहिला पुरुष होय. त्याला आपल्या एका पिढीच्या काळात, दिल्लीतील अमीर-उमरावांशी संबंध जोडणे आणि स्थानिक प्रभाव निर्माण करणे शक्य झाले नाही. साम्राज्यातील जुन्या सरदार वर्गाचे पिढीजात स्थान, औरंगजेब वा

१ 'विलायत' हा शब्द 'मूळचे ठिकाण' या अर्थाने वापरतात. एखाद्या ठिकाणी परकीय रहातात तेव्हा, या ठिकाणी, या परकीयांची 'विलायत' म्हणजे ते, मूळ जेथून येतात ते ठिकाण, असा अर्थ असतो. येथे दिल्लीमध्ये यावेळी असलेले परके सैनिक असा अर्थ असून हे परकीय मूळचे मध्य आशियातील होते. त्यांना यावेळी 'विलायती' म्हणत–त्यांची विलायत म्हणजे मध्य आशिया. पुढे इंग्रजांनाही आपण विलायती लोक म्हणू लागलो. त्यांची विलायत म्हणजे इंग्लंड, पुढे इंग्लंडमधील वस्तू वा त्या लोकांच्या पद्धती यानाही आपण 'विलायती' म्हणू लागलो. आपले मूळ ठिकाण सोडून दूरच्या भागात गेलेला मनुष्य आपल्या मूळ ठिकाणाला आपली 'विलायत' म्हणतो. ही शब्दयोजना आता कमी होत आहे.

२ प्रिन्स बिस्मार्क (१८१५–९८). जगातील अतिशय कर्तबगार व राजकारणी पुरुषांपैकी हा एक होय. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात याने आधुनिक बलाढच जर्मन साम्राज्यांची निर्मिती, आपल्या कर्तबगारीने घडवून आणिली. त्या आधी तेथे अनेक लहान लहान स्वतंत्र जर्मन राज्ये अस्तित्वात होती. तथापि त्यामध्ये अशियाचे राज्य काहीसे मोठे व बराच काळ बलाढचही होते पण १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात त्याचीही पिछेहाट झाली होती. या अनेक जर्मन राज्यांमधून बलाढच केंद्रसत्ता असलेले, एकसंघ, चैतन्याने भारलेले साम्राज्य साकार करण्याची कर्तबगारी बिस्मार्कची. तो, जर्मनीचा पोलादी चॅन्सेलर, जर्मन साम्राज्याचा निर्माता, एका राजाला सम्राट बनविणारा, राजनिष्ठ, कर्तबगार चॅन्सेलर होता. अशा या बिस्मार्कचा जन्म, जोपासना, प्रारंभीचे जीवन, ही, अनेक शतके सामान्य शेतकरी असलेल्या घराण्यात होती. अशा व्यक्तीची ही कर्तबगारी असामान्य होय. पुढे पहिल्या जागतिक महायुद्धात या साम्राज्याचे विघटन झाले हे वेगळे.

त्याहीपेक्षा पूर्वीपासूनचे असून, हा वर्ग सफदरजंगाला एक उपटसुंभ, दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करणारा, असेच मानीत असे. साम्राज्यातील अधिकाराच्या जागा या वंश-परंपरागत मालमत्ताच असून, त्या, त्या जागांवरील व्यक्तींच्या वंशजास वा कुटुंबियासच मिळावयाच्या, असे आता मानण्यात येऊ लागले होते. या जागाच्या संदर्भात गुणवत्ता, प्रशिक्षण वा धन्याने करावयाची निवड यांचा काही संबंध असल्याची जाणीव आता राहिली नव्हती. अर्थातच ही अवस्था म्हणजे राजकीय अवनतीचे अगदी अचूक व खात्रीलायक लक्षणच होते. माजी वजीर कम्रुद्दिनचा मुलगा, इन्तिझाम-उद्-दौला, याला वाटत होते की, साम्राज्याचे वजीरपद, हा त्याचा वडिलोपार्जित वारसा असून, सफ्दरजंगाने तो, त्यांच्या-पासून लुबाडून घेतला आहे. इन्तिझामच्या बहिणीचा विवाह, निजाम असफ्जाचा मोठा मुलगा गाजिउद्दिन याच्याशी झालेला होता (म्ह. कम्रुद्दिन व निजाम असफ्जहा हे व्याही होत आणि गाजिउद्दिन हा इन्तिझामचा मेहुणा होता.) आणि शिवाय या दोन उमरावांचे पणजोबा हे तर सख्खे भाऊ होते. यामुळे साम्राज्यातील सत्ता व प्रतिष्ठा या संदर्भात, या दोन घराण्यांत अतिशय जवळचे व परस्परात गुंफलेले कौटुंबिक हितसंबंध होते. याशिवाय निजामाच्या मुलाचे स्वतःचेही आणखी एक गाऱ्हाणे होते. त्याच्या बापाकडे साम्राज्याचा 'मिरबक्षी', हे पदही असल्याने, (१७३९ ते त्याच्या मृत्यूपर्यंत–१७४८). ते, जन्मसिद्ध हक्काने आपलेच आहे असे गाजिउद्दिनाला वाटत होते, पण निजामाच्या मृत्यूनंतर या पदावर सलाबतजंग या सफ्दरच्या एका मित्राची नेमणूक झाली. अर्थातच ही घटना म्हणजे वारसा म्हणून मिळणे अवश्य असा आपला हक्क, काढून घेतला गेला आहे असेच त्याला वाटत होते.

या उभयपक्षातील वैयक्तिक हितसंबंधाबाबतच्या लढ्यात, जमातीबाबतच्या विरोधाची आणखी भर पडून त्यांच्यातील वितुष्ट विकोपाला गेले. निजाम, माजी वजीर कम्रुद्दिन आणि झकरियाखान ( पंजाबचा माजी सुभेदार. भा. पहा प्र. ५ §५ ) हे सर्व मध्य आशिया-तील (अहरार ) तुर्क असून शिवाय वरचेवर झालेल्या आपापसातील विवाहसंबंधातून त्यांच्या-मधील नात्याचा दुवा अधिक दृढ झाला होता. ते पगार वा वर्षासने देऊन आपल्या पदरी ठेवावयाचे आश्रित ( Retaineıs ), मध्य आशियातून व हिंदुस्थानात स्थायी झालेल्या तुर्कांमधून घेत. याउलट सफ्दर हा स्वतः पर्शियन असून त्याने, पूर्वी नादिरशहाकडे सैनिक म्हणून असलेले आणि आता हिंदुस्थानात आलेले इराणी ( खरे वा तसे असल्याचे ढोंग करीत असलेले ), असे फक्त पर्शियन लोकच आपल्याभोवती जमा केले.

या दोन पक्षातील शत्रुत्व, त्यांच्यामधील धार्मिक भेदामुळे आणखी जास्तच कडवट झाले. सफ्दरजंग शिया पंथी होता पर्शियन लोकांची सर्वसाधारण बुद्धिमत्ता आणि वागणुकीच्या सभ्य व सुसंस्कृत रीतीभाती अधिक चांगल्या असल्या तरी हिंदुस्थानातील मुसलमानामध्ये, या शिया पंथियांचा गट फारच अल्पसंख्य होता. महसुलाची व्यवस्था, सचिवालयीन चिटणीसी काम आणि मुलकी शासन व्यवस्था, या कामात पर्शियन सामान्यतः फार कुशल असले तरी कणखर लढाऊ क्षमता आणि हाताखालच्या लोकांवर हुकूमत चालविण्याची, त्यांचे नियंत्रण करण्याची आणि त्यांच्या कामात एकसूत्रता आणण्याची हातोटी, यांचा त्यांच्या-जवळ अभावच असे. या गुणाबाबत मात्र, तुर्क आणि ॲबिसिनिअन (हबशी) हेसुद्धा एक वर्ग या दृष्टीने अनेकवेळा श्रेष्ठ असत.

शिया जमात संख्येने कमी होती म्हणून काही अंशी आणि तिच्या धार्मिक व सांस्कृतिक रीतीभातीमागील प्रेरणाशक्ती फक्त पर्शियामध्येच होत्या म्हणून काही अंशी, हिंदुस्थानातील

या जमाती यामध्ये, आपला एक वेगळा वर्गच बनविण्याची व स्वपंथियाव्यतिरिक्त बाकीच्या मुसलमान समाजापासून वेगळे रहाण्याची वृत्ती वाढत होती. अशा प्रकारे त्यांच्यामध्ये, आपापसातच विवाह करण्याची बंधने वा केवळ आपल्या गटातच वंशवृद्धी राखण्याची आवड आणि अनेकवेळी, सामाजिक संबंधही असेच आपापसात ठेवण्याची रीत, प्रचलित झाली होती. अशी आवड, अशी बंधने व अशी रीत यामुळे हे शिया पर्शियन आपल्या पंथाच्या मर्यादेतच व फक्त पर्शियन जमातीच्या वर्तुळातच रहात आणि यामुळे त्यांचे वेगळेपण अधिकच वाढे. अशा प्रकारच्या जमातीनिष्ठ (Racial) आणि सांस्कृतिक वेगळेपणाच्या भावनेमुळे, इस्लाम धर्मियांतील अन्य जमाती आणि हिंदुस्थानातील धर्मांतरित मुसलमान, याना आपल्यामध्ये सामावून घेण्याच्या कामात शिया पंथियाना अडथळे आले. या उलट 'सुन्नी' पंथियानी अशा सर्व लोकांना आपल्यामध्ये सामावून घेण्यासाठी, सगळीकडे अगदी स्थूल आणि तात्पुरत्या म्हणून योजलेल्या पद्धती वा प्रक्रिया वापरल्या. परिणामतः हिंदुस्थानात एकीकडे विशिष्ट आणि स्थानिक अशाच, शिया वसाहती (Specific & Local Shia Settlements) ) निर्माण होत राहिल्या तर दुसरीकडे मोठा व सतत वाढत असलेला असा सुन्नी मुसलमान समाज निर्माण झाला व हे दोन मुसलमान गट, त्यांच्यामधील, या मोठ्या फरकामुळे वेगवेगळेच राहिले. तुर्की हे सुन्नी होते म्हणून हिंदुस्थानातील मुसलमानामध्ये त्यांचे विवाह आणि सामाजिक संपर्क व देवाणघेवाण चालू राहिली व दोन्ही गट एकमेकात अधिक सुलभतेने मिसळले. दक्षिणेतील हबशी मुसलमानातही ते असेच मिसळले. यामुळे या सुन्नी गटाला, आपले स्थान बळकट करण्यासाठी, हिंदुस्थानीय मुसलमानांची आणि हबशी लोकांची मदत मिळविता आली.[१] हिंदुस्थानातील सुन्नींच्या स्थितीशी तुलना करताना शियांच्या स्थितीत असा हा फरक असून, शियांची मूलभूत दुर्बलता यातच होती. तथापि बादशहा आणि इतर उमराव यांची पायमल्ली करून त्याना बाजूला सारावे व आपण एक प्रबळ वजीर बनून दिल्ली साम्राज्यावर राज्य करावे अशी सफ्दरजंगाची महत्त्वाकांक्षा होती. पण शिया पंथियांचे मूलभूत दौर्बल्यच या त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या आड आले.

हिंदुस्थानातील मुसलमानात शियांचे प्रमाण मूलतःच कमी असले तरीही या लहानशा गटापैकी काही थोडेच, सफ्दरजंगाला आपल्या बाजूला मिळविता आले. हिंदुस्थानी शियापैकी बहुतेक, उदासीन वृत्तीने त्याच्यापासून अलगच राहिले. पर्शियन लोक, इतर जमातीपेक्षा, इतकेच नव्हे तर स्वपंथियातील-शियापंथीयातील–पर्शियन व्यतिरिक्त इतर जमातीपेक्षाही, आपण श्रेष्ठ आहोत असे मानीत व या सर्व अन्य जमाती याबाबत, आपल्या श्रेष्ठत्वाची आणि यातून निर्माण झालेली इतराबाबत तुच्छतेची वृत्ती बाळगीत. या त्यांच्या वृत्तीपद्दल, हिंदुस्थानातील बहुसंख्य शियापंथीयही त्यांच्यावर रुष्ट होत. औरंगजेबाच्या अनेक दंतकथा (Anecdotes of Aurangzib) वरून दिसून येते की, हिंदुस्थानातील पर्शियन लोकांना, त्यांच्या उपहासगर्भ बोलण्याबाबत आणि मर्मभेदक विनोदाबद्दल, आशियातील अन्य भागात तर तोड नाही. हिंदुस्थानातील लोकांच्या रीतिभाती विदुषकी धाटणीच्या, गावंढळ असून त्यांची पर्शियन भाषा व वाक्प्रचार, रानटी आहेत असे ते उपहासाने म्हणत आणि त्यांची टर उडवीत. या सर्व कारणांमुळे हिंदुस्थानातील मुसलमानांपैकी फारच थोडे सफ्दरजंगाच्या बाजूचे होते.

१ या संदर्भात गुलाम अलीने आणखी म्हटले आहे की, हिंदुस्थानातील सर्वच लहानमोठे मुसलमान "राजे" (Chiefs) हे सुन्नीच होते व आहेत असे हिंदु राजाना आढळून आले असल्यामुळे, त्यांनीही तुराणी वा सुन्नी पक्षाचीच बाजू घेतली (इमाद-६०).

## § ७ : सफ्दरजंगाचा पाडाव करण्यासाठी दरबारातील कट

सफदरजंगाला वजीर म्हणून नेमण्यात आले हे खरे पण त्याचे हे पद, सत्तेचे स्थान बनण्याऐवजी, यावेळी एक दौर्बल्याचे आणि धोक्याचे स्थान मात्र झाले असून सिंहासनाच्या दर्शनीसत्तेमागे असलेली खरी सत्ता होती ती जाविदखांनाची. या परिस्थितीत, 'वजीर' म्हणजे साम्राज्याचा पहिल्या क्रमांकाचा सर्वश्रेष्ठ सेवक, या भूमिकेतून, आपल्याकडे कायदेशीरपणे आलेला शासकीय-नियंत्रण-अधिकार वापरण्याचा सफ्दरने काहीही प्रयत्न करणे म्हणजे जाविदखानाचे शत्रुत्व ओढवून घेणेच होते. तथापि त्याच्या सत्तेला अधिक जवळचे व सतत भेडसावणारे संकट, माजी वजीर कम्रुद्दिन याच्या मुलांच्याकडून असून ते त्यांनी नीटसे दडवूनही ठेवलेले नव्हते. या मुलांची स्वतःची साधनसामग्री, सफदरला वजीरपदावरून हुसकून देण्याच्या दृष्टीने, अपुरी होती. यांच्यापैकी इन्तिझाम हा तर अद्याप दुसऱ्या क्रमाकांच्या बक्षीपदावर असून पंजाबमध्ये सुभेदारीवर असलेला मुइनही ( भा. पहा प्र. ५ §१६ व §१४, §१५ ) तेथील कामात पूर्णपणे गुंतला होता. तेथे बाहेरून अब्दालीच्या स्वारीची व आतून शिखांच्या धोक्याची भीती निर्माण झालेली होती. तेव्हा या भावांना आपले उद्दिष्ट साधण्याच्या कामी आशा होती ती फक्त त्यांच्या चुलत-चुलत घराण्यातील एक पुतण्या 'नासिरजंग' या, निजामाच्या मुलाकडूनच.[१]

अस्थिरवृत्तीच्या, निर्बुद्ध बादशहाचे मन, त्याने सफ्दरजंगाचा तिटकारा करण्याइतके लवकरच वळविण्यात आले. जाविदखानाने बादशहाला चिथावणी देऊन, त्याच्याकडून नासिर-जंगाला एक गुप्त पत्र पाठविले आणि बरोबर बलाढ्य सैन्य आणून, सफ्दरजंगाला त्याच्या पदावरून काढून लावण्यास या असे कळविले. बादशहाच्या या लाडक्या खोजाला, स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या मार्गात अडथळा म्हणजे, कर्तबगार, उत्साही व शूर वजीर हा एकटाच होय अशी भीतीही वाटत असल्याने, त्यानेही बादशहाच्या पत्रासारखाच आपला निरोपही निजामाचा वारस नासिरजंग याला पाठविला पण नासिरजंगाला दक्षिणेतून ताबडतोब निघणे शक्य झाले नाही. साम्राज्याच्या वजीराबरोबर सामर्थ्याची तोडीस तोड करावयाची, त्याच्याशी लढा द्यावयाचा म्हणजे त्यासाठी तयारीला पैसा आणि कालावधी यांची जरुरी लागणार होतीच. शिवाय या लढण्यासाठी उत्तरेत येण्यापूर्वी, त्याच्या स्वतःच्या दक्षिणेतील सहा सुभ्यांचे, त्याच्या गैरहजेरीतील रक्षण व कारभार यांची व्यवस्था करणे अवश्य असल्याने यासाठीही सविस्तर योजना आखून काळजीपूर्वक तरतूद करणे जरूर होते. याबाबत काळजी वाटावी असे योग्य कारणही त्यावेळी होते त्याचा पुतण्या हिदायत मुहिउद्दिन (Hedayet Muhiuddin-Muzaffar Jung–मुजफ्फरजंग) याच्या मनात, असफजाचा वारसा मिळ-विण्याबद्दल सतत विचार व योजना घोळत असल्याची त्याला जाणीव होती. यासाठी सर्व व्यवस्था करून, आपल्या सुभ्यातून बाहेर पडता येण्याला नासिरजंगाला बरेच महिने लागले, आणि २५ मे १७४९ ला तो, जेमतेम नर्मदा नदीच्या दक्षिण काठावरील अकबरपुरापर्यंतच पोहचला. येथे त्याला बादशहाकडून घाईघाईने आलेला एक नवाच खलिता मिळाला.

१ माजी वजीर कम्रुद्दिन आणि मुले मुइन व इन्तिजाम यांचे घराणे व निजाम-उल्-मुल्क आसफजा व मुले गाझिउद्दिन-नासिरजंग, हे घराणे–अशी दोन्ही घराणी मूलतः चुलत-चुलत घराणी या नात्यांनी जोडलेली असून शिवाय कम्रुद्दिनच्या एका मुलीचा विवाह गाझिउद्दिन या निजामाच्या मुलाशी झाला असल्याने ही दोन्ही घराणी आणखी नव्यानेही एकत्र गुंफली गेली होती. या दोन्ही घराण्यांचे, सफ्दरशी वैर व चुरस होती. ......एकाकडून वजीरपद गेल्यामुळे व दुसऱ्याकडून मिरबक्षीपद गेल्यामुळे–(पहा प्र. ८ §६ इ.)

यामधून, त्याला पूर्वी पाठविलेले आमंत्रण रद्द करण्यात येऊन त्याने परत दख्खनमध्ये जावे असे हुकूम देण्यात आले असून, याच खलित्यात, त्याच्याकडील दख्खनच्या सर्व सुभ्यावर त्याला सुभेदार नेमल्याचे औपचारिक हुकूमही होते. बादशहाच्या धोरणात अशा प्रकारे जी एकाएकी उलटापालट झाली त्याचे आता स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. [हडीकत-उल्-आलम (२) १९०].

सफ्दरजंगाने वजीरपद उघडपणे स्वीकारले होते ते २० जून १७४८ ला. यानंतर पाचच महिन्यांच्या आत त्याच्या शत्रूंनी त्याच्यावर पहिला आघात केला. २० नोव्हेंबरला, सार्वजनिक प्रार्थना संपल्यावर इदगा[1] मैदानावरून तो परत येत होता. तेव्हा त्याच्या रहात्या वाड्यात आत जाणाऱ्या रस्त्यावरील दरवाजा-इमारतीच्या घुमटाखालील, कमानींच्या रांगेच्या पहिल्या दरवाजापाशी, तो जवळजवळ पोहोचला असताना, तेथील अरुंद रस्त्यातील, सुटीच्या दिवशी जमणाऱ्या लोकांच्या गर्दीमुळे, त्याची चाल खुंटली. अशावेळी उजव्या बाजूच्या एका दुकानातून एकाएकी, हलक्या तोफेतून ( Rahakala – रहकला ) गोळा उडाला, त्याचवेळी एक अग्निबाण (Rocket) आणि एक 'कांरबाइन'ही ( घोडस्वाराच्या हातीतील, आखूड, हलकी–यंत्रचलित बंदूक–लाइटमशीनगन) उडाले आणि हे सर्व स्फोट सफ्दरच्या लोकांच्या रांगेवर आदळले. [ त्याचा हा राहता वाडा म्हणजे एकेकाळी शहाजादा दाराशुको रहात असे तो वाडा. हा वाडा शहराच्या निगमबोध भागातील कालव्याजवळ होता. तसाच तो दिल्ली किल्ल्याच्या आधुनिक, कलकत्ता दरवाज्याच्या उत्तरेला होता. ] शस्त्रातून एकाएकी झालेल्या या वर्षावामुळे त्याचा घोडा आणि त्याच्या पुढेच चालणारे दोनतीन घोडेस्वार यांना प्राणांतिक जखमा होऊन ते मारले गेले. तो स्वतःही खाली पडला पण त्याला काहीही दुखापत झाली नाही. यानंतर शोधशोध होऊन त्यातून दिसून आले की, ही अग्निवर्षक शस्त्रे, त्या दुकानावर पुढे येत असलेल्या एका गच्चीवर, पडद्यामागे बसविलेली असून, ती, खालच्या रस्त्यावरून जाणाऱ्या घोडेस्वाराच्या पातळीवर, नेम धरून, रोखून ठेवली होती. यातून झालेल्या अग्निवर्षावाने बरोबर वेधही साधला पण त्यातून थोड्या इंचानीच वजीर, मात्र बचावला. हे काम कोणातरी तरबेज गोलंदाजाचेच होते हे उघड आहे परंतु पूर्ण चौकशी अंतीदेखील या गोलंदाजाला मात्र शोधून काढता आले नाही. शस्त्रे रोखून ठेवलेल्या या खोलीत कोणीही असलेले न आढळता मागच्या बाजूने ती बंदही केली होती. . . .अर्थातच ती सोडून बाहेर पडल्यावरच, बाहेरून बंद केली गेली असली पाहिजे आणि हे घडले असणार तेही, शस्त्रातून गोळीबार केल्याबरोबर एका क्षणातच, हे उघड आहे. या मारेकऱ्याची योजना, इन्तिझाम-उद्-दौला ( भा. पहा § ४ कम्रुद्दिनचा मोठा मुलगा : २ रा बक्षी) यानेच केली असून या घटनेनंतर त्यानेच त्याला लपवूनही ठेवले असले पाहिजे असाच सर्वसामान्याना विश्वास वाटत होता. यानंतर सफ्दरजंगाने शहराचा तो भाग लुटण्याचे हुकूम दिले. अग्निबाणातून उडालेल्या ठिणग्यांमुळे, त्या रस्त्यातील दुकानावरील धाब्याची छपरे आधी जळालीच होती आणि आता कालव्याच्या पायऱ्यापासून ते वजीराच्या वाड्यापर्यंतची सर्वच घरे त्याने पाडून टाकली. या निगमबोध भागातील नदी किनाऱ्यावर फार पुरातन काळापासून हिंदु साधु रहात असत, त्यांना आता हाकलून देण्यात आले आणि त्या ठिकाणी वजीराचे लोक राहू लागले [ त-इ-अ–१७ ब; बयान २४८; शाकिर ७१; मुझ. ९; दिल्ली वृत्तान्त (D. C.). पण सियार, इमाद आणि चहा-गुल हे याबाबत मुग्ध आहेत. ]

१ सफ्दरजंगाविरुद्ध केलेल्या या कटाचे संपूर्ण वर्णन, 'तारिख-इ-अ' 'अलि' या हस्तलिखितामध्ये आहे. (O. P. I. Ms.).

आपल्याला ठार करण्यासाठी आणखीही प्रयत्न होतील या भीतीने वजीराने दरबारात हजर रहाण्याचे सोडून दिले आणि तो शहराबाहेर येऊन तंबूत राहू लागला. (२५ नोव्हेंबर)

अशा प्रकारे बादशहा आणि वजीर यांच्या दरम्यान उघडपणेच बेबनाव निर्माण झाला. नासिरजंगाने येऊन वजीराला हुसकून लावावे आणि दरबाराला त्यांच्या वर्चस्वातून सोडवावे असे जे गुप्त पत्र, त्याला गेले होते ते या दुराव्याच्या काळातले. यानुसार नासिरजंग निघालाही होता पण आपण दिल्लीकडे जात आहोत ते फक्त आपल्या नव्या बादशहाला व्यक्तिशः आदर दाखविण्यासाठी, असे कारण मात्र उघडपणे सांगत तो निघाला. त्यांचा भाऊ गाझिउद्दीन हा दिल्लीमध्ये दरबारात होता, त्याला मात्र आपले खरे कारण त्याने लिहिले की, 'साम्राज्याचा कारभार व्यवस्थित मार्गाला लावावा, उपटसुंभ सफ्दरजंगाला अधिकारपदावरून घालवावे आणि वजीरपद इन्तिझाम-उद्-दौला याला द्यावे हे त्याचे दिल्लीकडे येण्यास खरे हेतु आहेत.' याचबरोबर सफ्दरजंगालाही एक पत्र लिहून त्याचीही मर्जी सांभाळण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याला त्याने लिहिले......"मला येथे (भा. दख्खन-मध्ये) फक्त, मराठ्यांना अद्दल घडवायची असून त्यानंतर मी दरबाराकडे येईन. आपण माझ्याशी मैत्री ठेवून दख्खनच्या सुभेदारीवर माझी नेमणूक निश्चित करवून द्यावी. या व्यतिरिक्त मला साम्राज्याचे प्रमुख बक्षीपद तेवढे पाहिजे आहे. ते तर माझ्या वडिलांना दिलेलेच असून, त्यांच्याकडेच होते. आता मात्र झुल्फिकारजंग याने मजकडून ते लबाडून घेतले आहे. आपण व मी मिळून एकदिलाने साम्राज्याच्या व्यवस्थेकडे वळू या. बाळाजीने अगदी 'हिंदुस्थानपर्यंतचे'[१] आपले साम्राज्य बळकाविले आहे. आपण जर त्याच्यावर विसंबून रहाल तर आपली निराशा होईल. तो मोठा दगाबाज असून, त्याचे लक्ष नेहमी पैशाकडेच असते, अन्य कशाकडेही नव्हे. तिकडे येण्यासाठी मला परवानगी आणि सुरक्षिततेची खात्री आणि (विश्वासार्ह) विसंबून रहाता येईल अशी आश्वासने व शपथा दरबाराकडून मिळवून द्या म्हणजे आपण दोघे बाळाजीला शासन करण्यासाठी एकत्र येऊ. मी आपल्या आज्ञेबाहेर नाही."

सफ्दरजंगाने, नासिरजंगाकडून आलेले हे मूळ पत्रच, यावेळी दिल्ली येथे असलेला मराठ्यांचा वकील हिंगणे याला दाखविले. तेव्हा या मराठा वकिलाने, नासिरजंगाने आपला वडील भाऊ गाझिउद्दीन याला पत्रातून जे लिहिले होते ते उघड करून नासीरची दुटप्पी वागणूक सहज उघड केली आणि तुराणी पक्षाच्या अशातऱ्हेच्या दीर्घसूत्री, सखोल व गुप्त कारस्थानाबाबत दक्ष रहाण्याबद्दल सफ्दरजंगाला पूर्व सूचनाही दिली आणि सांगितले की सफ्दरला आलेले हे पत्र म्हणजे पेशवा आणि सफ्दर यांच्या दरम्यान दुरावा निर्माण करण्याचीच एक निव्वळ क्लुप्ती असून त्यातून सफ्दर एकटा पडला की मग त्याला चिरडून टाकावयाचे, असा हा डाव आहे. मराठा वकिलाकडून अशी धोक्याची सूचना मिळण्याची सफ्दरला आवश्यकता नव्हतीच कारण निजामाचे घराणे आपले कडवे शत्रू आहे हे त्याला स्वाभाविकच माहीत होते. नासिरजंग उत्तरेकडे येण्यास खरोखरच निघाला आहे हे कळल्यावर त्याने संरक्षक पवित्राही घेतला. यानुसार त्याने, नासिरजंगाला वाटेतच अडविण्यासाठी,

१ १९ व्या शतकापर्यंत रूढार्थाने 'हिंदुस्थान' म्हणजे उत्तर हिंदुस्थान—नर्मदेच्या उत्तरेकडील भाग—असे सामान्यतः मानीत. येथे याहीपेक्षा विशेषार्थाने गंगायमुना यांचे खोऱ्यापर्यंतचा भाग असावा. बाळाजीने तेथपर्यंतचा भाग आपल्या वर्चस्वाखाली या वेळेपावेतो बहुतांशी आणलाच होता.

आपल्या मराठा मित्रांचा [मल्हार होळकर व जयाजी (Jayaji) शिंदे यांचा] तळ, कोटा येथे ठेवला. चंबळच्या उत्तरेकडील, आपल्या सुभ्याला युद्धाची झळ लागू नये हाही यामागे हेतु होता. याचबरोबर हिंगण्यांच्यामार्फत त्याने पेशव्यानाही एक कळकळीची विनंती केली. त्यात तो म्हणतो :......" आपल्या मैत्रीच्या कराराची परीक्षा घेण्याची हीच वेळ आहे. तुम्ही जर माझे खरोखरच, मित्र असाल तर तुमच्या सेनापतींनी नासिरजंगाला विरोध केला पाहिजे. (मराठ्यांच्या) सैन्याला सुसज्ज करून नासिरजंगाशी लढण्यासाठी सर्व प्रकारची तयारी करण्याला जरूर तो पैसा मी हिंगण्यांच्याकडे देत आहे. तथापि मराठ्यांनी जर नासिरशी लढण्यासाठी अवश्य ती तयारी केली नाही तर माझ्याजवळ यावेळी ५०,००० सैनिक असून, मी आणखीही जरूर तितके सैनिक, या लढ्यासाठी सर्व बाजूंनी उभे करीन." अशाच धिटाईने तो बादशहालाही बोलला आणि शत्रूवर आपण स्वतःच पहिला आघात करण्यासाठी त्याने अधिकच धडाडीने तयारीही चालविली. त्याच्या अशा हालचालींनी भेकड बादशहा आणि त्याचा खोजा हे दोघेही फारच घाबरून गेले. तेव्हा ७ एप्रिल १७४९ ला, अहमदशहा, आपल्या आईला बरोबर घेऊन, सफदरच्या तंबूकडे त्याला भेट देण्यास गेला. असे आपल्या लीनतेचे प्रदर्शन करून आणि मित्रत्वाच्या भावनेतून त्याची बाजू उचलून धरण्याची व त्याला मदत करण्याची वचने देत, त्याने त्याचा राग शांत केला आणि त्याला, स्वतः बरोबर आपल्या राजवाड्याकडे आणले. अशा प्रकारे बादशहाने त्याच्याबरोबर पुन्हा समेट घडवून आणला हे खरे पण यासाठी त्याला मोबदलाही द्यावा लागला. बादशहाने यावेळी, नासिरजंगाला पाठविण्यासाठी एका फर्मानावर सही केली व ते नासिरजंगाकडे पाठविण्यात आले. हे फर्मान ज्या ठिकाणी मिळेल त्या ठिकाणाहून त्याने तात्काल परत फिरावे असा हुकूम त्यात होता. तथापि अशा हुकूमाने दुखावल्या जाणाऱ्या त्याच्या भावना, शांत करण्यासाठी, याच फर्मानामध्ये, त्याला औपचारिकरीत्या दख्खनचा सुभेदार नेमल्याचे आणि निजाम-उद्-दौला हा किताब बहाल केल्याचे हुकूमही देण्यात आले होते.[१] [पे. द. नि. प. (२) १३, १२ इ ; हदिकत-उल-आलम् (२) १९१ ; बयान २४८ ; त.-इ.-अ-१८ ब, ३५ब.]

## § ८ : मिरबक्षी सलाबतखान याचा शेवट

इन्तिझाम व नासिरजंग यांच्याबरोबरचा तंटा मिटल्यानंतर थोड्याच महिन्यांनी वजीर, रोहिल-खंडामधील अडचणीत अतिशयच गुंतून पडला आणि त्यातच तो, नोव्हेंबर १७४९ ते सप्टेंबर १७५० पर्यंत आणि पुन्हा फेब्रुवारी १७५१ ते एप्रिल १७५२ पर्यंत गुंतलेलाच राहिला. दिल्लीतून बाहेर जावे लागलेल्या या दोन कालखंडापैकी दुसऱ्या काल-खंडात, दिल्लीतील त्याचा एक प्रमुख मदतनीस मिरबक्षी सलाबतखान, याच्या मदतीला तो मुकला, त्याची हकीगत अशी : साम्राज्याचा हा प्रमुख बक्षी (भा. पहा प्र. ८§४ व १) त्याच्या राजपुतान्यातील मोहिमेवरून नोव्हेंबर १७५० च्या सुरवातीस परत आला तो एक पूर्ण नाश झालेला वा दिवाळखोर बनलेला उमराव अशा अवस्थेतच. (भा. पहा प्र.७§ ११, ९, १०). या मोहिमेसाठी त्याने, १८००० लोकांचे एक मोठे सैन्य व शिवाय तोफ-खान्याचा एक विभाग (Corp of Artillery) एक संपूर्ण वर्षभर बाळगले होते आणि यासाठी, त्याला, अगदी कमीतकमी अंदाज केला तरी ६० लाख रुपये खर्च आला होता.

१ भा. टीप– पहा हाच उपभाग–§–परि.२–नासिरला नर्मदेच्या जवळपास पोहोचल्यावर मिळालेला खलिता तो हाच.

याउलट या मोहिमेसाठी, राजपुतांकडून, या खर्चातील त्यांचा वाटा म्हणून, ५ लाखापेक्षा जास्त रोख रक्कम त्याला वसूल करता आली नव्हती. अशा प्रकारे आर्थिक सट्टेबाजीच्या दृष्टीने मोहिमेचे हे साहस, पूर्णपणे अपयशी झाले होते. जाटांचे शत्रुत्व ओढवून घेण्याच्या त्याच्या मूर्खपणाच्या धोरणामुळे, आग्रा आणि अजमीर या त्याच्या सुभदारीच्या सुभ्यामधूनही त्याला काहीही वसूल मिळाला नव्हता. त्या भागात शांतता व सुव्यवस्था राखावयाची तर ते काम फक्त जाटच करू शकणार होते. पण हे लक्षात न घेता त्याने त्यांचा विरोध ओढवून घेतला. केंद्र शासनाकडे मदतीसाठी त्याने अर्जही केले पण तेथे सर्व सत्ताधारी असलेला खोजा जाविदखान याने त्यांची वासलात लावली. यावेळी त्याला मदत करण्यासाठी जरूर तो पैसा शाही खजिन्यात नव्हताही आणि जाविदखानाला, त्याला आपल्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी मदत करण्याची इच्छाही नव्हती. सलाबतखानाची बक्षी पदावर झालेली नेमणूक ही काही, जाविदखानाने केलेल्या अनुग्रहामुळे नव्हती. सलाबत एक पिढीजात उमराव असून त्याच्या घराण्याने, आपल्या दोन मुली व एक नात यांचे दिल्लीच्या बादशहांशी विवाह करून दिले होते. यामुळे जाविदखान, या उपटसुंभ गुलामाला, दरबारी मान देणे सलाबतने तुच्छतापूर्वक टाळले होते, त्याचाच हा परिणाम होता.

उपासमार होत असलेल्या सलाबतच्या सैनिकानी आपल्या पगाराची बाकी चुकती केली जावी म्हणून त्याच्याकडे रोज तगादा चालविला आणि त्यामुळे त्याला आपले जीवन असह्य झाले. तेव्हा वैतागून तो, आपल्या वाड्याबाहेर जाईनासा झाला. आपल्या पगारी नोकराना त्याने कामावरून काढून टाकले आणि दरबारात जाण्याचे वा आपल्या अधिकारपदाचे काहीही काम करण्याचे सोडून दिले. या त्याच्या वृत्तीबद्दल त्याच्या मित्रानी कुरकूर केली व त्याला ते रागावले की, त्यांना तो म्हणे :...... "......येथे आता बादशहा राहिलेला नाही, एका खोजाच्या दरबाराला, अपमान करून घेण्यासाठी आम्ही का जावे? माझी बाजू, माझी अडचण ऐकून घेतली जावी म्हणून मी ती कुणापुढे मांडावी?" ......त्याचे असे हे बोलणे, जाविदखानाने बादशहा आणि त्याची आई याना सांगितले आणि दुसरा एखादा शहाजादा सिंहासनावर बसविण्याचा त्याने कट केला असून, त्याचाच हा पुरावा असा निष्कर्ष मांडला. अखेरी काहीही उपाय न उरल्याने अगदी बेफिकीर बनून सलाबत एके दिवशी बादशहाच्या वाड्याकडे गेला आणि त्याची स्वतःच विनवणी करण्याचा त्याने प्रयत्न केला. तेव्हा जाविदखानाकडून आधीच मिळालेल्या हुकुमानुसार, शिपायांनी त्याला अडविले. अशा अडवणुकीने अधीकच भडकून त्याने मूर्ख बादशहा व त्याचा हलकट, आवडता खोजा यांना अकस्मात शिवीगाळ केली. असे घडवून आणण्यासाठीच तर जाविदच्या हालचाली सुरू होत्या! यानंतर तात्काल, सलाबतची सर्व अधिकारपदे, त्याचा विशेष दर्जा आणि त्याच्या सर्व पदव्या वा बिरूदावल्या काढून घेण्यात आल्या. (७ जून १७५१). त्याच्या वैयक्तिक जहागिरीही काढून घेण्यात येऊन त्याच्या वाड्याभोवती तोफांचे मोर्चे बसविण्यात आले आणि अशा प्रकारे त्याला आतच स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. आता स्वतःजवळ जे काही होते ते त्याने विकले व आपल्या सैनिकांचे देणे शक्य झाले तितके भागविले आणि यापुढे तो एकाद्या दरवेशाप्रमाणे अतिशय दारिद्र्यात, एकाकी जीवन कंठू लागला. [त.-इ.-अ.-२९अ-३०अ ; सियार (३) ४० ; मुझ. ३४].

या पुढची पायरी म्हणजे मोकळे झालेले प्रमुख बक्षीपद, जाविदखानाने धूर्तपणें आखलेल्या आपल्या धोरणानुसार गाझिउद्दिनखानाला देवविले. शिवाय त्याला 'अमिर-उल्-

उमरा' ही पदवी आणि आग्ऱ्याची सुभेदारीही देवविली. याचबरोबर गाझिउद्दिनचा मेहुणा इन्तिझाम-उद्-दौला याला, अजमीरच्या सुभेदारीवर नेमून त्याला 'खान-इ-खानान' ही पदवी देण्यात आली. (७ जून १७५१.—भा. सलाबतखानाकडे मिरबक्षी पद व आग्रा आणि अजमीर या दोन सुभ्यांच्या सुभेदाऱ्या होत्या). अशा प्रकारे मुघल शासनातील, वजीराखालोखालची दोन उच्च अधिकारपदे आता तुराणी पक्षाच्या दोन प्रमुखांना देण्यात आली. यामुळे एकीकडे वजीराचा अतिशय सामर्थ्यवान मित्र चिरडला जाऊन त्याचवेळी वजीराखालोखालची दोन उच्चपदे, तुराणी पक्षाच्या दोन प्रमुखांकडे गेल्याने, वजीर सफ्दरजंग याच्यावरही नियंत्रण निर्माण झाले. अशा प्रकारे जाविदखानाने एकाच दगडाने दोन पक्षी मारले. या घटनांच्या आधी नासिरजंगाच्या खुनाची (५ डिसेंबर १७५०) बातमी दिल्लीत १६ जानेवारी १७५१ ला पोहोचली होती आणि यानंतर पाच दिवसांनी त्याचा थोरला भाऊ गाझिउद्दीन खान फिरुझजंग[१] याला दख्खनचा सुभेदार नेमण्यात येऊन निजाम-उल्-मुल्क ही पदवीही देण्यात आली होती. यानुसार आपल्या सुभेदारीवर जाण्यासाठी त्याने कूच सुरू करून दिल्ली बाहेरील सराईकाझी या पहिल्याच मुक्कामावर तो पोहोचला त्यावेळी त्याच्या सैनिकांनी, त्यांचा देणेबाकी राहिलेला पूर्ण पगार चालू दिवसाअखेर दिला गेल्याशिवाय त्याच्याबरोबर पुढे एकजुटीने जाण्यास नकार दिला. तेव्हा त्याने त्यांचा पगार दिला पण पुढच्या काळासाठी मात्र पूर्वीपेक्षा कमी पगार म्हणजे दरमहा तीस रुपये देऊ करून त्यांना सांगितले की हा कमी केलेला पगार मान्य तरी करा, वा तुम्हाला नोकरीतून कमी करण्यात येईल ते तरी पत्करा. त्याच्या सैनिकांपैकी बहुतेक सर्व दिल्लीचे रहिवासी असल्याने, त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन घरीच रहाण्याचे पसंत केले. यामुळे त्याच्या सैन्यातील संख्या इतकी कमी झाली की त्याला आपले कूच सोडून देऊन तेथेच थांबावे लागले. [त.-इ.-अ.-२९, ३६ब ; सियार (२) ४३ ; दिल्ली वृतांत (D. C.). इमाद ६१ यात मात्र याबाबत भिन्नता आहे.]

## §९ : अब्दालीविरुद्ध, मराठ्यांबरोबर, सहाय्यासाठी तैनातीपद्धतीचा[२] तह करण्याची योजना

अब्दालीने लाहोरवर स्वारी केली तिच्या आरंभापासूनच बादशहा आपल्या वजीराकडे विनवण्या करणारे संदेश पाठवीत होता की, त्याने रुहेल्यांचेबरोबर कसातरी तह घडवून आणावा आणि दिल्लीच्या रक्षणासाठी घाईने परत यावे. असा तो आला नाही तर नादीरच्या स्वारीच्यावेळी आलेली भयानक संकटे, अफगाणिस्तानातून येणाऱ्या या नव्या स्वारीमुळे पुन्हा कोसळतील अशी भीती त्याला वाटत होती. पण रुहेला मोहीम संपविल्यावर सफ्दरजंगाने

१ यालाच पुढे जून १७५१ मध्ये मिरबक्षी पद व आग्ऱ्याची सुभेदारीही देण्यात आली.

२ या शीर्षकात वापरलेला इंग्रजी शब्दप्रयोग– Subsidiary Alliance –, त्यातील अर्थबोधाच्या दृष्टीने, पुढे ई. इं. कंपनीचा गव्हर्नर जनरल वेलस्ली याच्या कारकीर्दीत विशेष निश्चित झाला. मराठ्यांकडून सहाय्य मिळविण्यासाठी, या काळात मुघलानी मराठ्यांशी केलेले तह, मूलतः त्याच प्रकारचे असले तरी त्यातील तपशीलात काही फरक व काही मोघम निर्देशही असे, शिवाय त्यात निरनिराळ्या तहांचे वेळी त्या त्या परिस्थितीनुसार आणखीही काही बदल केले जात. मराठ्यांचे हे तह 'चौथाईचा' हक्क वा, 'सैन्याचा खर्च' त्याना देणारे असत व या मोबदल्यात ते संरक्षण देत. इंग्रजांच्या 'तैनाती' पद्धतीतील, 'संरक्षण' जबाबदारीत सैन्य, त्याचा खर्च व नियंत्रण या बाबी तर येतच शिवाय ते, हा तह स्वीकारणाराच्या 'अन्य राज्याशी' संबंधावरही कडक नियंत्रण ठेवीत.

आपल्या मराठा मित्रांना रजा दिली आणि तो, औध या स्वतःच्या सुभ्याकडे-तेथील कारभाराची पुन्हा व्यवस्था लावण्यासाठी गेला. वजीर हा, त्या सुभ्याचा सुभेदार असला तरी तो तेथे स्वतः हजर न राहता दिल्लीला वजीर पदावर व आता तर दीर्घकाळ रोहिलखंडात होता. त्याचा प्रतिनिधी नवलराय हा तेथील प्रत्यक्ष कारभार, 'गव्हर्नर' या नात्याने पहात असे. (भा. गव्हर्नर हा शब्द काहीसा लवचिक अर्थाने वापरला आहे. गव्हर्नर–प्रत्यक्ष कारभार करणारा, हा गैरहजर सुभदाराचा प्रतिनिधी वा डेप्युटीही–असे. काहीवेळी सुभेदार स्वतःही प्रत्यक्ष कारभार पहाणारा म्हणजे गव्हर्नरही असे.) हा नवलराय या सुमारास मरण पावला व यामुळे तेथील कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला होता. त्याची पुन्हा व्यवस्थित घडी बसविण्यासाठी वजीर तिकडे गेला. अशाप्रकारे साम्राज्याचा मुख्य प्रधान—वजीर—आपल्या मुख्य कर्तव्याकडे दुर्लक्ष करीत, पूर्वेकडील स्वतःच्या सुभ्याकडे, म्हणजेच आपल्या वैयक्तिक हितसंबंधाकडे लक्ष देण्यासाठी गेला असताना इकडे, स्वारी करून आलेल्या अफगाण अब्दालीचे हाती, ६ मार्च १७५२ ला लाहोर पडले. ही बातमी दिल्लीला १३ मार्च रोजी पोहोचली आणि यामुळे तेथे अतिशय घबराट निर्माण होऊन सर्वांची पाचावर धारण बसली. बहुतेक सर्व लोकांनी आपल्या स्त्रियांना राजधानीबाहेर, मुख्यतः मथुरेला पाठविले. कारण यावेळी मथुरा जाट राजाच्या समर्थ हातात होती, या गोंधळामुळे, यावेळी काही दिवस दिल्लीला खेड्यापाड्यातून काही धान्यही येऊन पोहोचले नाही. अशा परिस्थितीत बादशहाने, वजीर सफ्दरजंगाला परत बोलाविण्यासाठी अतिशय निर्वाणीचा हुकूम पाठविला व येताना आपल्या बरोबर मराठ्यांचे बलाढ्य सैन्य, लागेल ती किंमत देऊन आणावयाचा आग्रहही केला. हे पत्र सफ्दरजंगाला १७ मार्चला पोहोचले पण यानंतरही निघण्यासाठी त्याने एक आठवडा लावला. या वेळपावेतो माळव्याकडे परतीच्या मार्गावर असलेले मराठा सैन्य गंगेच्या काठावर पोहोचले होते, त्याचे पुढील कूच थांबविण्यासाठीही त्याने आपले जासूद पाठविले. नंतर त्याना गाठून त्याने, पेशव्यांबरोबर, तैनातीपद्धतीचा एक संरक्षक तह काही अटींवर घडवून आणला. या अटी पुढीलप्रमाणे होत्या :–

(१) पेशव्याने बादशहाला सशस्त्र मदत द्यावी. यासाठी बादशहाने त्याला ५० लाख रुपये द्यावे. यापैकी ३० लाखाची रक्कम, अब्दालीला साम्राज्याबाहेर रोखण्यासाठी आहे.

(२) पंजाब, सिंध आणि चार महाल [सिआळकोट, पसरूर, औरंगाबाद व गुजरात (भा. हे सर्व पंजाबातील महाल होत. दक्षिणेतील औरंगाबाद व गुजरात सुभा ही वेगळी होत.)] यामधून यावयाच्या साम्राज्याच्या वसुलापैकी 'चौथाई', यापुढे मराठ्यांना त्यांच्या लष्करी खर्चासाठी देण्याचे मान्य करण्यात आले. यापैकी चार महालांचा महसूल पूर्वी नादिरशहाला आणि नंतर अब्दालीला देण्यात आला होता. त्याचप्रमाणे आताची ही व्यवस्था करण्यात आली. (भा. पहा प्र. ५§७ परि. १–नादिरने सिंधुच्या पश्चिमेकडील पंजाब व सिंध हे प्रांत आणि या चार महालांचा महसूल आपल्याकडे घेतला होता.) या सर्व प्रांतांच्या एकूण वसुलापैकी अर्धा, बादशाही खर्चासाठी शाही खजिन्यात भरावयाचा आणि राहिलेला चौथा भाग वजीर आणि जाविदखान यांच्या पथकांच्या खर्चासाठी वापरावयाचा असेही ठरले.

(३) पेशव्याची नेमणूक अजमीर आणि आग्रा या सुभ्यांच्या सुभेदारपदी करावी असे ठरले. (अजमीरच्या सुभ्यात नार्नोळच्या फौजदारीचा आणि आग्र्याच्या

सुभ्यात मथुरा व तशाच अन्य पोट-विभागांची फौजदारी यांचा समावेश असावा असेही ठरले.) या नेमणुकीमुळे, सुभेदार आणि फौजदार याना नेहमी मंजूर असलेला पगार आणि रूढीनुसार द्यावयाचे अन्य लाभ, भत्ते इत्यादी ........अशा बाबी मिळण्याचा हक्क आता पेशव्याना मिळवायचा आहे.

(४) पेशव्याने साम्राज्याच्या सर्व शत्रूंना—स्वारी करून येणारे अन्य देशीय आणि अंतर्गत बंडखोर या सर्वांना—आपल्या सेनापतीद्वारा दडपून टाकून, त्यांचा बंदोबस्त करावा आणि स्थानिक राजांनी व जमिनदारांनी, बळकाविलेल्या जमिनी त्यांच्याकडून हिसकावून घेऊन, त्या साम्राज्याच्या अधिकाऱ्यांकडे परत द्याव्या.

(५) सुभ्याचा कारभार करण्याबाबत साम्राज्याचे जे काही प्रस्थापित नियम आहेत, त्याबरहुकूम काटेकोरपणे पेशव्यानी या सुभ्यांचा कारभार करावयाचा असून या सुभ्यांतील राजनिष्ठ जहागिरदार आणि अधिकारी यांच्या हक्कांचा त्याने योग्य आदर केला पाहिजे. प्रस्तुत तहानुसार ज्या जमिनी व जो पैसा, स्पष्टपणे पेशव्यांना देण्यात आलेला नाही अशा कोणत्याही जमिनी वा पैसा पेशव्याने बळकावयाचा नाही. या तहानुसार पेशव्याकडे सोपविलेल्या सुभ्यामधील, न्यायालयांच्या कामात आणि या सुभ्यामध्ये असणाऱ्या पण प्रत्यक्ष शाही शासनाच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यांच्या व्यवस्थेतही पेशव्यानी काहीही हस्तक्षेप करू नये. जमिनी बळकावणाऱ्याकडून ज्या जमिनी परत मिळविल्या जातील आणि महसूल चुकविणाऱ्याकडून ज्या जमिनी काढून घेतल्या जातील त्यापैकी निम्म्या, या जमिनी परत मिळविण्यासाठी होणाऱ्या खर्चापोटी, पेशव्याना मिळावयाच्या आहेत.

(६) साम्राज्याच्या इतर उच्च दर्जाच्या मनसबदारांप्रमाणेच मराठा सेनापतीनीही शाही दरबारास हजर रहावे आणि शाही सैन्याच्या मोहिमांतही सामील व्हावे.

साम्राज्यावरील असे सर्वाधिकार, व्यवहारतः, मराठ्यांना दिले जात असता, बादशहाचा मान आणि वरकणी अधिसत्ता राखण्यासाठी, पेशव्यांच्यावतीने, मल्हार होळकर आणि जयाजी शिंदे यांनी यासंबंधीचे करारपत्र, विनंती अर्जाच्या रूपात, बादशहाला सादर केले आणि त्यावर सह्या करणारे मराठे, सगळी कलमे निष्ठापूर्वक पाळतील असे, सर्व हिंदू देवांना साक्षीस आवाहन करून व तशा शपथा घेऊन, आश्वासनपूर्वक मान्य केले. यानंतर बादशहाने, मराठ्यांचा असा हा विनंती अर्ज मान्य केला! या निमित्ताने बादशहाने दयाशील (!) दृष्टीने काढलेल्या फर्मानाच्या प्रास्ताविकात, मान्य केलेल्या सर्व अटी पुन्हा नमूद करण्यात आल्या. [राजवाडे (१) १]. (भा. मराठ्यांच्या इतिहासात बाळाजीने मिळविलेली मोठी सनद म्हणून नमूद असलेली सनद हीच होय. यातूनच पुढे 'अटकेपार' व 'पानिपत' ही मराठ्यांच्या इतिहासातील नाट्य निर्माण झाली.)

अब्दालीकडून येणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी म्हणून साम्राज्याचा वायव्य सरहद्द प्रांत, औपचारिकरीत्या बादशहाच्या अधिसत्तेखाली ठेवून, व्यवहारतः मराठ्यांच्या ताब्यात द्यावयाचा अशी आणखी एक योजना सफदरजंगाने पुढे मांडली. यामुळे अब्दालीला विरोध करण्यात, मराठ्यांचे हितसंबंध गुंतलेले रहातील आणि त्या प्रांताचे रक्षण करण्याच्या जबाबदारीतून बादशहाही मोकळा होईल अशी या मागे कल्पना होती. भावीकाळात, औधच्या पश्चिम सरहद्दीच्या संदर्भात वेलस्लीने स्वीकारलेल्या धोरणाचे पूर्वदर्शन यात होत होते

हाच याचा अर्थ. वेलस्लीच्या वेळी, औधच्या पश्चिम सरहद्दीवरील काही जिल्हे इंग्रजांना देण्यात आले असताना ते प्रत्यक्षात व व्यवहारत: आपल्या ताब्यात ठेवावे का, असा प्रश्न निर्माण झाला होता. असे ते ताब्यात ठेवले तर इंग्रजांची सत्ता शिंद्यांच्या सरहद्दीसमोरच प्रस्थापित होऊन औधच्या पूर्वेला असलेल्या इंग्रजांच्या प्रदेशात होणाऱ्या मराठ्यांच्या संभाव्य शिरकावाचा मार्गच अडविला जाणार होता. यासाठीच इंग्रज कंपनीला वेलस्लीने, हे जिल्हे प्रत्यक्ष ताब्यात ठेविण्यास लावले. या धोरणाचे पूर्वदर्शनच सफ्दरच्या, वरील दुसऱ्या योजनेत घडत होते. मराठ्यांची मदत घेऊन यापुढे, काबूलही पुन्हा जिंकावयाचे असेही तो बोलून दाखवित होता. साम्राज्याच्या दक्षिण सरहद्दीच्या संरक्षणासाठी, बख्त-सिंहाला, इतर राजपूत राजे बरोबर देऊन, नर्मदा नदीच्या काठाने सरहद्द ताब्यात राखण्यासाठी पाठवावयाचे अशीही त्याची आणखी एक योजना होती. नर्मदा ओलांडून, त्याबाजूने मराठे विश्वासघाताने साम्राज्यात शिरकाव करू लागले तर त्यांना अडविण्यासाठी ही योजना होती. पण त्याचीही सबंध विविधांगी संयुक्त योजना, तिच्या जन्माबरोबरच दडपून टाकली गेली. अब्दालीला सरहद्दीबाहेर रोखण्यासाठी केलेला संरक्षक तह, फर्मान रूपात पूर्ण करण्यात आला होता ते, वजीर स्वत: राजधानीत येऊन पोहोचण्यापूर्वी पण त्याच्याच पुढाकाराने व योजनेनुसार. सफ्दरजंगाने औधमधूनच आपले दूत मराठ्यांच्याकडे व बादशहाकडे पाठवून हे सर्व घडवून आणले होते. यानुसार बादशहाने काढलेले फर्मान मराठ्यांना मिळालेही पण त्याच सुमारास, लाहोर जिंकणाऱ्या अब्दालीचा वकील कलंदर बेग खान हाही दिल्लीस आला. तेव्हा बादशहा फारच गोंधळला आणि सफ्दर दिल्लीत येऊन पोहोचण्यापूर्वीच या भेकड बादशहाने त्यालाही एक नवे फर्मान देऊन त्यानुसार पंजाब व सिंध अब्दालीला देऊन टाकले, (भा. आधीच्या फर्मानाला बाजूस सारून, हाच याचा अर्थ) व हे फर्मान घेऊन हा वकील परतही गेला. ही घटना सफदर दिल्लीत येऊन पोहोचण्यापूर्वी फक्त १२ (बारा) दिवस आधी घडली आणि ती घडत असताना दुसरीकडे परत येण्यामधील सफ्दरची दिरंगाई चाललीच होती. या नव्या फर्मानामुळे पेशव्याबरोबरचा आधीचा तह व त्यानुषंगाने काढलेले फर्मान ही सुरवातीलाच कागदाचा चिटोऱ्यासारखी रद्दबातल झाली. अब्दालीला दिलेल्या फर्मानाच्यावेळी सफ्दर तर दूरच होता आणि बादशहाला सल्ला देण्याला तेथे फक्त जाविदखानच होता. तेव्हा बादशहाने दिलेल्या या भेकड शरणागतीबाबत जबाबदारी वजीराच्या पक्षपात्यानी जाविदखानावरच टाकली. पण या शरणागतीबद्दलच्या दोषात मोठा वाटा सफ्दरजंगाकडेच गेला पाहिजे. यावेळी राजधानीला अतिशय गंभीर परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते. (भा. पहा§९ परि. १ व प्र. १०§६ व ७). लाहोर जिंकणाऱ्या विजयी अब्दालीने तेथून जर आपल्या घोडदळाची दौड करून झपाट्याने राजधानीवर धाड घातली असती तर त्याला बादशहा आणि राजधानी दोन्हीही काहीही संरक्षण नाही अशा असहाय्य स्थितीत सापडली असती. राजधानीच्या अशा गंभीर परिस्थितीत सफ्दरने तातडीने तेथे येणे त्याचे कर्तव्य होते पण आपल्या जबाबदारीची अवश्य तितकी जाणीव न ठेवता त्याने आपल्या परतीच्या प्रवासात अगदी अकारण दिरंगाई केली व बादशहा आणि राजधानी ही पूर्णपणे संरक्षण विरहित राहू दिली. यासाठीच, यावेळी अब्दालीच्या वकिलापुढे बादशहाला द्याव्या लागलेल्या भेकड शरणागतीच्या जबाबदारीच्या मोठा वाटा सफ्दरलाही घ्यावा लागेल. . . . . . [त.-इ.-अ.-३३ब ; शाकिर ६५]. सफ्दरजंग औध-मधून २४ मार्चला निघाला होता. (भा. म्हणजे बादशहाचे पत्र मिळाल्यावर एक आठ-वड्याने) तथापि दिल्लीला पोहोचण्यास त्याने ३४ दिवस घेतले. जलद जाणाऱ्या जासुदाला

हा रस्ता कापण्यास त्याकाळी चार दिवस लागत. असे असताना, राजधानीवर कोसळत असलेल्या संकटाच्या संदर्भात, सफ्दरजंगाने गोगलगायीच्या गतीने केलेल्या या हालचालीचे फक्त एकच स्पष्टीकरण होते. पंजाबमध्ये अब्दालीने संपूर्ण पराभव केलेला सुभेदार हा माजी वजीराचा मुलगा होता. (भा. पहा प्र. ५§१६ व प्र. ८§४......माजी वजीराचा दुसरा मुलगा मुइन-उल-मुल्क हा, तो सुभेदार होता.) त्याच्या या पराभवामुळे, तुराणी पक्षाचा एक प्रमुख पुढारी नाहीसा होऊन, यामुळे, सफदरने भ्यावे असा त्याचा एक प्रतिस्पर्धी कमी झाला असल्याने त्याला आनंदच वाटत होता. याचबरोबर, दरबाराला, भीतीमुळे सहन कराव्या लागत असलेल्या तीव्र वेदना आणि परिस्थितीच्या अनिश्चिततेतून वाटणारी चिंता, जाणूनबुजून लांबविण्याचेही त्याने चालविले होते. यामागे त्याचा हेतु होता तो असा की, राजधानीत परत आल्यावर, आपण एकटेच राजधानीचे 'तारक' आहोत असे वाटावे आणि आपले महत्त्व व सत्ता वाढावी. या परिस्थितीत, त्याने परत येताना केलेल्या दिरंगाईचे हेच एक स्पष्टीकरण होते हे मात्र खरे. [त.-इ.-अ.-१८ब, ३०ब].

## § १० : मराठ्यांना खर्चासाठी द्यावयाच्या पैशाबाबत (Subsidy) सफ्दरजंग व जाविदखान यांच्यामधील भांडण

२५ एप्रिलला दिल्लीच्यासमोर, यमुनेच्या काठावर सफ्दरजंग, मराठ्यांच्या ५०००० सैन्यासहित येऊन पोहोचला. दुसऱ्या दिवशी तेथे येऊन जाविदखानाने त्याची भेट घेतली. आता आपल्या मराठा मित्रांबरोबर पुढे पंजाबात जाऊन तेथून अफगाणाना हुसकून लावावयाचे, असा वजीर सफ्दरजंगाचा बेत होता. पण या भेटीच्यावेळी जाविदखानाने त्याला सांगितले की, आता तो सुभा अब्दालीला देऊन, आधीच त्याच्याशी तह घडवून आणलेला आहे. हे ऐकल्यावर वजीराला आश्चर्य वाटले आणि रागही आला. बादशहाच्या हुकुमावरूनच साम्राज्याच्या रक्षणासाठी त्याने मराठ्यांना ५० लाख रुपये देण्याचे वचन देऊन, बंधन स्वीकारले होते. तेव्हा यावेळी स्वाभाविकच त्याने जाविदला विचारले की, अब्दालीशी असा तह केला तर, त्याने मराठ्याना दिलेले वचन कसे पाळावे ? अशा प्रकारे झालेल्या मत-भेदातून त्यांच्या संबंधात कडवटपणा निर्माण झाला आणि शहरात यावयास, वजिराने रागाने, नकार देऊन नदीपलीकडच्या आपल्या तंबूतच तो राहिला.

मराठ्यांना कबूल केलेली रक्कम मिळाली नाही, तेव्हा ते दिल्लीजवळच थांबले. दाणागोटा आणावयास जाणारी त्यांची पथके, दिल्लीच्या आसमंतात ४० मैलातील खेड्यातून दररोज फिरू लागली आणि जी काही दाणावैरण व सामुग्री त्यांना हस्तगत करता येईल ती घेऊन ही पथके आपल्या तळावर येऊ लागली. ......"त्यांच्या या जुलुमामुळे हजारो लोकांचा नाश होऊन, हा आसमंतातला प्रदेश ओसाड बनला. यमुनेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बादली-(Badli), रेवारी (Rewari)- व त्याबाजूची अशीच इतर गावे यापैकी एकही खेडे लुटल्याशिवाय राहिले नाही." ..... खुद्द राजधानीवरही मोठ्या धास्तीचे सावट पडले होते. पैशाबाबत मराठ्यांच्या हक्काबद्दलची मागणी जोपर्यंत भागविण्यात येत नव्हती तोपर्यंत ते, संरक्षण करण्याला कोणीही नाही अशा त्या शहरात, कोणत्याही दिवशी घुसून तेथील संपत्ती लुटतील, अशी भीती होती आणि अशावेळी चिडलेला वजीर तर बाजूला स्वस्थच बसला होता. तेव्हा जाविदखानाने स्वतःच मल्हार बरोबर वाटाघाटींना सुरवात केली. याच सुमारास मराठा साम्राज्याच्या अंतर्गत राजकारणात एक

क्रांती घडून आली असल्याने जाविदखानाकडून वाटाघाटीला सुरवात झाल्याबरोबर मल्हारनेही, दिल्ली सरकारबरोबर उभयपक्षी तडजोड घडवून आणण्याच्या या संधीला ताबडतोब प्रतिसाद दिला.

मल्हारच्या या कृतीबाबत अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. नासिरजंगाच्या मृत्यूनंतर (५ डिसेंबर १७५०) त्याचा सर्वांत वडील भाऊ गाझी-उद्-दिन याला मोकळ्या झालेल्या दख्खनच्या सुभेदारीवर बादशहाने नेमले होते. (२१ जानेवारी १७५१)—(भा. पहा §८ परि. शेवटचा). आपल्या दख्खनवरील नेमणुकीबद्दल पेशव्याने बादशहाकडे शिफारस करावी अशी गाझी-उद्-दिन याने पेशव्याला विनंती केली होती. यानुसार या सुभेदार पदावर गाझी-उद्-दिन याला नेमल्यास, दक्षिणेतील मुघल शासनाला मराठ्यांचाही पाठिंबा मिळेल असे पेशव्याने वचन दिले होते. अशा प्रकारे पेशव्याने गाझी-उद्-दिन याचा पुरस्कार करण्यामागे कारणही होते. तो, नेहमीच मराठ्यांशी मैत्री राखणारा असून शिवाय लष्करीदृष्ट्या नालायक, वृत्तीने सुखलोलुप आणि काहीही साहस करणारा नव्हता. अशी व्यक्ती दख्खनच्या सुभेदारपदी आली तर ती नामधारीच राहून मुघलाच्या 'दख्खन' वर प्रत्यक्षात वर्चस्व मराठ्यांना मिळणार होते. अशा प्रकारे गाझी-उद्-दिन याला 'दख्खन'ची नेमणूक मिळाली तरी ते नवे पद प्रत्यक्ष हाती घेण्यासाठी अवश्य असणारे सैन्यबळ त्यांच्या-जवळ नव्हते म्हणून तिकडे जाण्यासाठी निघण्याचे त्याने पुढे ढकलले. यानंतर काही महि-न्यानी त्याला प्रमुख बक्षीपदावरही (मिरबक्षीपदावर) नेमण्यात आले. (भा. पहा § ८ परि. शेवटचा). यामुळे त्याला आता दरबारात रहाणेच अवश्य झाले. तेव्हा त्याने दख्खनच्या सुभेदारीवर आपल्यावतीने 'डेप्युटी' म्हणून पेशवा बाळाजी बाजीराव याची नेमणूक केली. पण यावेळी दख्खनमधेच रहात असलेल्या गाझी-उद्-दिन याच्या धाकट्या भावांनी, आपल्या वडिलाकडून येणारा हा सुभेदारीचा वारसा, त्यात ढवळाढवळ करणाऱ्या या हिंदु राज्यकर्त्याकडे देण्याला नकार दिला आणि त्यांनी जाविदखानावरही प्रभाव पाडून, सुभेदाराचा प्रतिनिधी-डेप्युटी—या पदावरील नेमणूक, मृत असफ्जा याचा तिसरा मुलगा सलाबतजंग याच्या नावावर मिळविली.

तेव्हा सलाबतचे प्रतिनिधी वा अधिकारी यांना जेथे जेथे जाऊन गाठता येईल तेथे तेथे आणखी सैन्ये पाठवून, सलाबतचा प्रतिकार करण्याचे बाळाजीने सुरू केले आणि अशा प्रकारे त्यांच्यामध्ये युद्ध सुरू झाले. या युद्धासाठी, सलाबतजंग याला यावेळी अनपेक्षितपणे एक मित्र मिळाला. शाहूराजा १५ डिसेंबर १७४९ ला मरण पावला आणि त्याच्या—मागून रामराजा मराठ्यांच्या छत्रपतींच्या सिंहासनावर बसला. यावेळी ब्राह्मणवर्गीय पेशव्यांनी मराठ्यांच्या कारभारावर वर्चस्व प्रस्थापित केले होते. तेव्हा हुकमत चालविण्याचे सामर्थ्य अंगी असलेली मराठ्यांची माजी राणी ताराबाई[१] हिने ब्राह्मणांनी बळकावलेल्या या प्रभुत्वाविरुद्ध, 'मराठा' या लढाऊ जमातीच्या प्रमुखांचा (Chiefs : राजे—सरदार—जहागिरदार इत्यादींचा) एक गट तयार केला आणि दुर्बल मनाच्या तरुण रामराजावर लवकरच मात करून त्याला बंदिवासात ठेवले. यातून मराठ्यांच्यामध्ये अंतर्गत यादवीयुद्ध सुरू झाले. यात दमाजी गायकवाड व त्याचे गुजरातमधील सैन्य यांच्याबरोबर बाळाजी लढत असतानाच, वऱ्हाडच्या बाजूने रघुजी भोसलेही त्याला भोडसावीत होता. बाळाजीपुढे

१ रामराजा हा सातारा येथील छत्रपतींच्या सिंहासनावर आला. ताराबाई ही कोल्हापूर येथील म्हणजे छत्रपतींच्या "धाकट्या पातीची" माजी राणी होय.

ही दोन संकटे उभी असतानाच सलाबतजंगानेही आपल्या फ्रेंच पथकासहित महाराष्ट्रावर स्वारी केली आणि त्याने पुण्यापर्यंत मुसंडी मारली. (नोव्हेंबर १७५१–मार्च १७५२). या परिस्थितीत बाळाजीला, स्वारी करून आलेल्या सलाबतबरोबर कसाबसा तह करावा लागून, हैदराबादेला परत जाण्यास त्याचे मन वळवावे लागले.[१] अशा प्रकारे बाळाजीवर अनेक बाजूंनी दडपणे येत असताना व त्याच्या पक्षाचे लोक विखुरले जात असताना मल्हार या त्याच्या एकनिष्ठ अनुयायाने त्याच्यासाठी दिल्लीकडून काही मदत मिळविण्याचा प्रयत्न चालविला. अशा परिस्थितीत आधी नमूद केल्याप्रमाणे (भा. पहा §१० परि. २) जाविदने मल्हारशी वाटाघाटीना सुरवात केल्याबरोबर मल्हारनेही त्याला तात्काल प्रतिसाद दिला. जाविदने सुरू केलेल्या या वाटाघाटीत मल्हारने मान्य केले की :

(१) गाझी-उद्-दिन जर स्वत: दख्खनकडे सुभेदार म्हणून जाणार असेल तर दिल्ली शासनाने, अब्दालीविरुद्ध मदतीसाठी, मराठ्यांना द्यावयाचे, जे ५० लाख रुपये मान्य केले होते ते देण्याच्या जबाबदारीतून शाही शासनाला ते मुक्त करतील आणि गाझी-उद्-दिन याजबरोबर ते, दिल्ली येथून जातील. इतकेच नव्हे तर शिवाय;

(२) या ५० लाखापोटी, फक्त ३० लाखावरच भागवून घेण्यास ते तयार असून, ही तीस लाखाची रक्कमही दिल्ली शासनाऐवजी गाझी-उद्-दिन या नव्या नबाबाने द्यावी यासही मान्यता देतील.[१]

गाझी-उद्-दिन याला प्रथम जेव्हा दख्खनचा सुभेदार म्हणून १७५१ मध्ये नेमणूक देण्यात आली होती त्यावेळी 'पेशकश' (Peshkash) म्हणून २ कोटी ८० लाख रुपयांची मोठी रक्कम[२] देण्याचे त्याला मान्य करण्यास लावले होते. तथापि यापैकी केवळ १५ लाख रुपयेच त्याला त्यावेळी प्रत्यक्षात देता आले होते.[३] पुढे एप्रिल १७५२ मध्ये मल्हारशी झालेल्या तडजोडीनुसार, त्याने मल्हारला बरोबर घेऊन, म्हणजे प्रत्यक्षात त्याचे संरक्षण स्वीकारून दख्खनकडे जावे व सुभेदारी हाती घ्यावी असे पुन्हा ठरले. त्यावेळी

---

१ या घटनेची सविस्तर माहिती हदिकत-उल्-आलम् (२) २३०–२३३ यामध्ये आहे.

२ वरील अट १ व २ यांचा मिळून थोडक्यात अर्थ असा की, दिल्ली शासनाने मराठ्यांना द्यावयाच्या ५० लाखापासून त्याला आता सूट मिळणार होती पण याऐवजी गाझी-उद्-दिन याने मराठ्यांना ३० लाख रुपये द्यावयाचे होते. तथापि प्रत्यक्षात, दिल्ली शासनाला ही सूट वरकरणीच होती कारण याचे मोबदल्यात त्याला, गाझी-उद्-दिनकडून मिळावयाचे 'पेशकश' खूपच कमी व्हावयाचे होते (पुढील परिच्छेद व त्या संदर्भातील भा. टीप *पहा). मराठ्यांनाही आता ५० लाखाऐवजी ३० लाखावर तडजोड करावी लागत होती. मात्र पूर्वीच्या ५० लाखाच्या मोबदल्यात अब्दालीविरुद्ध व अंतर्गत बंडाविरुद्ध दिल्ली शासनाला संरक्षण द्यावयाचे होते, त्याऐवजी आता, गाझी-उद्-दिन याला दख्खनमध्ये सुभेदार पदावर, त्याच्याकडून तीस लाख रुपये घेऊन उचलून धरावयाचे होते इतकेच. अशा प्रकारे दिल्ली शासन ५० लाखाच्या जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे होते.

३ 'पेशकश' हा, वारसा हक्काने अधिकार, जहागिर इ. मिळण्याच्यावेळी द्यावयाच्या, विशेष अर्थाने एक वारसा-करच होता असे म्हणता येईल. पूर्वी या कराबाबत काही प्रथा, नियम असले तरी यावेळी ते जसेच्या तसे पाळले जात नव्हते. वारसा मिळणाऱ्या व्यक्तीची परिस्थिती, प्रभाव, महत्त्व, बादशहाची परिस्थिती व मिळणाऱ्या वारशाचे महत्त्व अशा अनेक बाबींच्या संमिश्र विचारातून 'पेशकशची' रक्कम ठरे. यावेळी (१७५१) दख्खनच्या समृद्ध सुभ्याचा वारसा गाझी-उद्-दिन याला द्यावयाच्या होता. तो निर्बलही होता, म्हणून त्याला ही मोठी रक्कम द्यावयाचे मान्य करावे लागले. तथापि प्रथम ही नेमणूक झाली त्यावेळी गाझी-उद्-दिन दख्खनकडे जाऊही शकला नाही (पहा §८). पुढे १७५२ मध्ये मल्हारबरोबर झालेल्या वाटाघाटी व तडजोडीनुसार बादशहाला, प्रत्यक्षात काहीही 'पेशकश' मिळू शकले नाही.

ही पेशकशची रक्कम कमी करून, ती ६० लाख रुपये ठरविण्यात येऊन या रकमेबाबतही केवळ आश्वासन घेण्यावरच भागविण्यात आले. शिवाय यापैकीही ३० लाख रुपये त्याने मराठ्यांना द्यावे असेही मान्य झाले. पूर्वी अब्दालीविरुद्ध मराठ्यांनी मदत द्यावी म्हणून त्यांना ५० लांख रुपये बादशहाने द्यावे असे मान्य करण्यात आले होते. त्या मदतीऐवजी आता गाझी-उद्-दिनाला मदत द्यावयाची व तिच्या मोबदल्यात त्यांनी त्याच्याकडून तीस लाख रुपये घ्यावयाचे आणि आपल्या, पूर्वीच्या ५० लाख रकमेची पूर्ण भरपाई मानावयाची अशी ही आताची तडजोड होती.[१] दिल्लीजवळ नको असलेले हे मराठा पाहुणे, तेथून एकदा लवकर जावे म्हणून, जाविदखानानेही मराठ्यांना काही थोडे लाख रुपये रोख दिले. तेव्हा मराठे दिल्लीचा परिसर सोडून, तेथे आल्यापासून नऊ दिवसांनी, म्हणजे ४ मे ला परत जाण्यास निघाले. यानंतर राजधानीत पुन्हा शांतता निर्माण होऊन पळून गेलेले नागरिक, आपल्या कुटुंबियाना घेऊन तेथे परत आले. मराठ्यांशी केलेल्या या सर्व वाटाघाटी व ही सर्व नवी व्यवस्था वजीराला बाजूला ठेऊन इतकेच नव्हे तर त्याला याबाबत काही माहितीही न देताच खोजा जाविदनेच घडवून आणली होती. या तडजोडीच्या घटनेबाबत आणखीही काही विशेष आहे. यावेळी शाही खजिना आधीच रिता झालेला होता. अशा परिस्थितीत मुघल साम्राज्यातील सर्वांत समृद्ध सुभ्यावरील सुभेदारपदाचा वारसा आता प्रत्यक्षात दिला जात असताना, यापासून बादशहाला द्यावे लागणाऱ्या 'पेशकश' वा 'नजराणा' या रूपाने त्याच्या खजिन्यात एक पैसाही आला नाही. जाविदने केलेल्या प्रस्तुत तडजोडीतील नामुष्कीचे असे, हे, आणखी एक विशेष होय. [ त.-इ.-अ.-२३-३७ब ; सियार (३) ४४ यात चूक आहे ; हर्-अल्-(२) २३५-२३६ ; पुरंदर दप्तर (१) २२८. ]

अशा प्रकारे जाविदखान, वजीराच्या विरोधात कायमचाच उभा राहिल्याने, यापुढील वजीराच्या सर्व योजनांत बिघाड निर्माण होऊ लागला. यात अपवाद होई तो फक्त एखाद्या योजनेबाबत जाविदला खूपच लाच चारली तर. वजीराबाबत असलेल्या जाविदच्या या वृत्तीमागे, विरोधी कृत्यांची एक लांबचलांब मालिकाच होती. प्रथम त्याने सफ्दरजंगाला हुसकावून लावण्यासाठी, नासिरजंगाला गुप्तपणे आमंत्रण पाठविले होते (१७४८—भा. पहा § ७). १७५० मध्ये महमद बंगषकडून पराभव झाल्यामुळे काळिमा लागलेल्या वजीराने आपल्या पदाचा राजिनामा द्यावा असे हुकूम देण्यास त्याने बादशहाला उद्युक्त केले होते— (भा. पहा प्र. ९§७) आणि नंतर कित्येक लाख रुपयांची देणगी मिळाल्यावर हा हुकूम परत घेण्यासही त्यानेच त्याचे मन वळविले होते. या खोजानेच, सफ्दरचा सर्वांत जास्त जिवलग मित्र सलाबतखान मिरबक्षी याला अधिकारावरून बडतर्फ करावयाला लावले असून शिवाय सफ्दरच्या अतिशय कडव्या विरोधकांना—तुराणी पक्षाच्या प्रमुखांना— बढत्या देवविल्या होत्या. बादशहाला राजधानीबाहेर मोहिमेवर नेऊन, यातून निरनिराळ्या सुभ्यामधील शाही सत्ता पुन्हा प्रस्थापित करावी, असे प्रयत्नही सफ्दरजंगाने केले पण यातील प्रत्येक प्रयत्न, त्या मूर्ख तरुण बादशहावरील जाविदच्या प्रभावामुळे अयशस्वी झाला. रोहेल्यांच्यावरील मोहिमांमुळे आणि औधला दिलेल्या, कारभारविषयक भेटीमुळे, वजीर

---

१ पहा §९ तह व अटी : अब्दालीविरुद्ध संरक्षक तहाचा एक भाग म्हणजे मदतीच्या खर्चापोटी मराठ्यांना ५० लाख रुपये द्यावयाचे होते. वजीराने या तहाला बादशहाची संमतीही घेतली होती. पण नंतरच्या हालचालीतून अब्दालीविरुद्ध संरक्षणाचा प्रश्न संपला होता. त्याऐवजी आता मराठ्यांनी गाझी-उद्-दिन याला दक्षिणेतील सुभेदारी हाती घेण्यास मदत घ्यावयाची व यासाठी ५० लाखाऐवजी ३० लाख मराठ्यांना देऊन भागवावयाचे ठरले. ही ३० लाखाची रक्कम ६० लाखाच्या पेशकशीमधून द्यावयाची होती.

दीर्घकाळ, दरबारात गैरहजर राहिला ; यामुळे त्याचे तेथील अस्तित्व पूर्णपणे बाजूला सारले गेले असून, साम्राज्याच्या शासनावरील त्याची कार्यकारी सत्ता ( Executive authority) आणि बादशहावरील प्रभावी छाप ही जाविदच्या हातात गेली आहेत असे वजीराला आढळून आले. या सर्वाचा थोडक्यात अर्थ असा की, आपण आता साम्राज्याचे मुख्य वजीर ( Emperia Chancellor ) म्हणून काम करू शकणार नाही, अशी त्याला जाणीव झाली. बादशाही सिंहासनामागे उभ्या असलेल्या दुष्ट शक्तीमुळे, आपण आता एक निरुपयोगी, रद्दबातल व्यक्ती बनलो असून लोकांच्या तिरस्काराचा विषय बनलो आहो असेही त्याला वाटू लागले. अशा प्रकारे वजीर व जाविद यांच्या संदर्भात या सर्व वर्षांमध्ये जे एक वादळ जमा होत होते ते आता लवकरच बालू-जाटाच्या प्रश्नामुळे अकस्मात सोसाट्याने वाहू लागले.

## § ११ : बलराम जाटाचा इतिहास

बलराम जाट (लोक याला 'बालु' असे म्हणत) हा, दिल्लीच्या दक्षिणेला १८ मैलावर असलेल्या, फरिदाबादेच्या एका छोट्या, महसूल जमा करणाऱ्या अधिकाऱ्याचा मुलगा होय. यावेळच्या, भरतपूरच्या, बदनसिंह नावाच्या जाट राजाशी बालूचे कौटुंबिक नाते असल्याने. त्याची मदत घेऊन, बालूने आपल्या आसमंतातील खेड्यांमधून तेथील कायदेशीर हक्कदार मालक व कोतवाल ( Magistrates—न्यायाधिकारी ) यांना हाकलून दिले आणि ती खेडी बळकावून आपली सत्ता वाढविली. दिल्ली आणि आग्रा या मधील रस्त्यावरील हा काटा तेथे राहू देणे दिल्ली शासनाला शक्य नव्हते. अशा स्थितीत बालु-जाटाच्या लोकांनी, जेव्हा राजधानीच्या बाहेरील 'शम्सपूर' ठाण्यातील शाही शिबंदीला हाकलून दिले तेव्हा वजीराने तेथे दुसरी पथके पाठविली. याही शिबंदीला त्या जाटाने धिटाईने विरोध केला तेव्हा वजीराने स्वतःच त्याच्याविरुद्ध चाल केली. वजीर फक्त खिजिराबादपर्यंत पोहोचला (बहुधा ३० जून १७५०) तोच, घाबरून, नम्रतापूर्वक बलराम तेथे आला आणि त्याने मराठा प्रतिनिधीमार्फत शरणागती देऊन, वजीराचा अनुयायी होऊन रहाण्याचे वचन दिले. पुढे थोड्या दिवसांनी त्याला त्याच्या गावी परत पाठविण्यात आले. नंतर त्याने एक मातीचा किल्ला बांधून त्याला वल्लभगड असे नाव दिले, (फरिदाबादेच्या दक्षिणेस ५ मैलावर) आणि पलवल व फरिदाबाद या ठाण्यांचा वसूल करण्याचे अधिकार "मुदत-बंदीच्या भाडेपट्टीने" वा खंडाने (Lease) मिळविले. (ही ठाणी निजामाच्या जहागिरीत होती.) अशा रीतीने तो एक, जिल्ह्याचा—कारभारी (District Governor) व सरदार-राय बनला. [त.-इ.-अ.-२२ब-२३अ; दिल्ली वृत्तांत–(D. C.) तथापि या हकिकतीबाबत चाह. गुल. ४०२ अ, यामध्ये फरक आहे. दिल्ली जिल्हा गॅझेटिअर, २ (२).]

२ जुलै १७५२ ला, सफदरजंगाने यमुना नदीपलीकडील आपला तळ उठवून तो दिल्ली शहरातील आपल्या वाड्याकडे येण्यास निघाला. तेव्हा जाविदखान किल्ल्यातून बाहेर आला आणि 'अंगुरीबाग' उद्यानात येऊन, तेथे त्याने आपली बैठक मांडली. असे करण्यामागे त्याची अपेक्षा होती की, आपल्या वाड्याकडे जाताना वाटेत सफदरजंगाने त्याच्याकडे येऊन त्याला आदर दाखवावा. आपण बादशहाचे प्रतिनिधीच आहोत तेव्हा सफदरने असा मान दिलाच पाहिजे हीच या मागे उघडउघड भावना होती. पण अशा प्रकारे या खोजाला मान द्यावयास वजीर तयार झाला नाही आणि तो थेट आपल्या वाड्याकडे घोड्यावरून निघून गेला. अशा

रीतीने झालेली मानहानी लपवून ठेवण्यासाठी जाविदने, यावेळी दिल्लीतच असलेल्या बालू जाटाला, आपल्याकडे त्या ठिकाणीच बोलावून घेतले आणि तेथेच दरबारी थाटात 'बैठक' घेऊन त्याच्याशी बोलणी केली, त्याला मानाचा पोशाख दिला आणि नंतर तो किल्ल्यातील आपल्या रहात्या घराकडे परत आला. या वेळात त्याने, त्या जाटाला लालूच दाखवून, सफदरजंगाच्या बाजूकडून आपल्या बाजूला वळवून घेतले. सफदरजंगाच्या कृतीमुळे चिडलेल्या खोजाने जाटाला कोणत्या खोडसाळ सूचना दिल्या असतील याचा अंदाज, जाटाने यानंतर केलेल्या कृतीवरूनच आपल्याला करता येईल. यानंतर दिल्ली येथून बालू आपल्या घरी परत गेला व तेथे त्याने आपले सैनिक एकत्र केले. नंतर नदी ओलांडून तो सिकंदराबाद येथे गेला आणि त्याने तेथील स्थानिक फौजदारावर हल्ला करून त्याला हाकलून दिले व शहरातील घरांच्या जमिनी खणून काढून ते शहर लुटले. स्थानिक व्यापाऱ्यांकडून पैसा उकळण्यासाठी, त्याने, त्यांना पकडून आणले व टांगून झोडपून काढले. हे सिकंद्राबाद तर दिल्लीपासून अवघे ३२ मैलावर असून, बादशहाच्या खाजगी खर्चासाठी राखून ठेवलेल्या वतनांपैकीच होते. तेव्हा अन्यायपीडित प्रजाजनांनी आपले दूत दिल्लीला पाठवून, त्याच रात्रीच्या बैठकीत बादशहापुढे आपली गाऱ्हाणी मांडली. यावेळी तेथेच असलेल्या सफदरने जविदखानाला विचारले की... "तुम्ही जर बालूची या ठिकाणाचा 'नवा फौजदार' म्हणून नेमणूक केली असेल तर तो तेथील जनतेला का लुटीत आहे? का ठार मारीत आहे? तो जर तुमच्या इच्छेविरुद्ध वागत असेल तर, मला तेथे जाऊ दे आणि त्याला शासन करू दे." ....तेव्हा जाविदने उत्तर दिले... "आपण स्वतःच बालूला शिक्षा करण्याचे काम हाती घेणार आहोत"... त्याने आपला एक (कॅप्टन) सैन्यातील अधिकारी नरसिहराय याला, बरोबर छोटीसी फौज देऊन सिकंद्राबादेला पाठविले. या अधिकाऱ्याने बालूवर हल्ला करण्याऐवजी, त्याच्याशी केवळ वाटाघाटीच केल्या आणि अखेरी, त्याला मिळालेल्या लुटीसह त्याला सहीसलामत जाऊ दिले व जाविदखानाच्याच जहागिरीतील दनकौरच्या (Dankaur) किल्ल्यात आश्रय घेऊ दिला. (दनकौर: वल्लभगडच्या थेट पूर्वेस १५ मैलावर). पुढे त्याठिकाणी जेव्हा सफदरची फौज आली तेव्हा त्याना आढळलेली परिस्थिती ही अशी होती. या सफदरच्या फौजेशी थोडीफार लढाई दिल्यानंतर, बालूने त्या किल्ल्यातच काही नावा मिळविल्या आणि वल्लभगडकडे, सुरक्षितपणे आपली सुटका करून घेतली. अशा प्रकारे बादशहाच्या स्वतःच्याच वतनवाडीत, इतकेच नव्हे तर राजधानीपासून इतक्याजवळ असलेल्या इस्टेटीत, लूटालुट करणाऱ्याला काहीही शासन होऊ शकले नाही. सिकंद्राबादेच्या जनतेने न्याय मिळावा म्हणून आरडाओरडा केला, टाहो फोडला पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. अशा प्रकारे सफदरजंगची बालूविरोधी मोहीम निष्फळ ठरल्यावर, उघड्या दरबारात त्याने जाविदखानावर आरोप केला की त्यानेच या दुष्ट कृत्यामध्ये बालूला पाठिंबा दिला आहे. हा आरोप होत असताना आपली मान खाली वाकवून तो खोजा मात्र न बोलता स्तब्ध राहिला. [त.–इ–अ.–३८ अ; शाकिर ७१]

या घटनेमुळे सफदरजंगाचा राग अनावर झाला. त्यावेळचे काही इतिहासकारही या घटनेबाबत ठामपणे सांगतात की, आपल्या प्रत्यक्ष देखरेखीखाली असणाऱ्या वतनवाडीतील स्वतःच्या कुळांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टामुळे, बादशहाही कष्टी होऊन इतका हेलावला की, "या खोडसाळ खोजाला नाहीसा करा"....असा निरोप, त्याने सफदरजंगाला पाठविला......पण त्याने खरोखरच असा निरोप पाठविला असला तर तो तात्पुरत्या उफाळून आलेल्या रागाच्या भरातच असला पाहिजे. [बयान २७४; इमाद ६०; खा-आम ८५, (Khazina-i-Amira)].

## § १२ : जाविदखानाचा खून, २७ ऑगस्ट १७५२

सुरजमलच्या प्रश्नाबाबत, त्याच्याशी विचारविनिमय करण्यासाठी व त्याला मदत करण्यासाठी, सफ्दरजंगाने त्याला दिल्लीस बोलाविले. यानुसार येऊन, जाट राजाने आपला तळ शहरापासून सुमारे ६ मैलावर काल्कापहाडी (Kalka-Pahari) येथे ठेवला. त्याच्याबरोबर जयपूरच्या राजाचा एक प्रतिनिधी व बालू जाट हेही आले असून त्यांच्याबरोबर आपापले काही सैन्यही होते. पूर्वी हे लोक आपल्या मागण्याबाबत वा प्रश्नाबाबत, जाविदखानाचा पुरस्कार मिळावा व त्याची मर्जी संपादन करता यावी म्हणून विनवण्या करीत. आताही त्यांनी प्रथम आपली मुलाखत घ्यावी आणि नंतर आपल्यामार्फतच 'सरकारशी वाटाघाटी कराव्या अशी यावेळीही जाविदखानाची इच्छा होती. पण आता वजीर स्वत: राजधानीत हजर असल्यामुळे, त्यांनी, यावेळेस, दरबारातील आपल्या कामासाठी, या खोजाला आपला मध्यस्थ म्हणून घेतले नाही. अखेरी ठरविण्यात आले की, जाविदखानाने वजीराच्या घरी जावे व तेथे उभयतांनी मिळून, सुरजमल व त्याच्याबरोबर आलेले इतर यांना मुलाखती द्याव्या आणि त्यावेळी बादशहाकडे असलेल्या त्यांच्या कामाबाबत निर्णय घ्यावे. या बैठकीसाठी २७ ऑगस्ट हा दिवस ठरला. त्या दिवशी सकाळी लवकरच जाविदखान, सफ्दरजंगाच्या वाड्याकडे गेला. त्या दोघानी सकाळची न्याहरी एकत्रच घेतली. सुरजमल तिसऱ्या प्रहरी तेथे आला आणि नंतरही त्यांच्यामधील वाटाघाटी दीर्घकाळ चालल्या. यामध्ये, थोड्या वेळानंतर, सफ्दरजंगाने, जाविदखानाचा हात धरून त्याला आपल्या वाड्याच्या बागेमधील एका बाजूंच्या, एकांत असलेल्या, बंगलीवजा बुरुजाकडे (Alcovel / Bastion) नेऊन तेथे, सुरजमलबाबत तो त्यांच्याशी बोलला. नंतर महमद अलि जार्चि (Muhammad Ali Jarchi) आणि आणखी काही तुर्की सैनिक त्या बंगलीत शिरले, तेव्हा वजीर तेथून उठला. महमद अलीने मागील बाजूकडून, जाविदखानाच्या पोटात, यकृताच्या जागी तीक्ष्ण शस्त्राने भोसकले..... या वेळी तो ओरडत होता..... "घे, तुझ्या विश्वासघाताचे हे फळ घे." आता बाकीचे लोकही पुढे आले आणि त्यांनी हे रक्तलांछित काम पुरे केले. नंतर त्यांनी जाविदचे मुंडके धडापासून वेगळे करून ते वजीराच्या वाड्याबाहेर, बुरुजाखाली जमिनीवर बसलेल्या जाविदच्याच नोकरांच्या घोळक्यात भिरकावून दिले आणि त्याचे धड नदीच्या वाळवंटात फेकले. तेव्हा हे लोक अतिशय भयभीत होऊन पळून गेले. या रक्तलांछित कृत्यामागील केवळ बेफिकिरी व धाडस, यामुळे, या विरुद्ध होऊ शकणाऱ्या सर्व संभाव्य हालचाली मुळातच दडपल्या गेल्यानंतर अशा प्रकारे खून झालेल्या, जाविदच्या मालमत्तेचे किल्ल्यातील व किल्ल्याबाहेरील सर्व कोठे व खजिने याना, शाही जनानखान्यावरील प्रमुख अधिकारी (Superintendent-Roz-Afzunkhan) वृद्ध रोझ अफझुनखान याने सील ठोकली आणि त्याच्या निरनिराळ्या अधिकारपदांचा व संबंधित कचेऱ्यांचा ताबाही घेतला. इतके झाले तरी या घटनेने दिल्लीत काहीही गडबड वा खळबळाट यांचा त्रास झाला नाही.[1]

जाविदखानाचा खून हा प्रत्यक्षात एखाद्या गुन्ह्यापेक्षाही वाईट होता....राजकीय दृष्ट्या ती एक घोडचूकच होती. यामुळे बादशहा, त्याची आई आणि सर्व शाही कुटुंब यांचा सफ्दरजंगाला विरोध इतका वाढला की, यापुढे या बाबतीत पुन्हा काहीही समेट... काहीही तडजोड होण्याची आशा उरली नाही. याहीपेक्षा शाहीसत्तेच्या संदर्भात तर याचा अतिशय

१ पहा : त.-इ.-अ.-४०अ-४१ब ; सियार (३) ४५ ; शाकिर ७१ ; बयान २७३ ; मूझ.६०-६२, पण चहार

[पुढील पानावर]

वाईट परिणाम झाला. या घटनेनंतर दरबारी पक्षाचे नेतृत्व आणि कळसूत्री बाहुल्यासारख्या बादशहावरील नियंत्रण, ही एका मूर्ख व भित्र्या खोजाच्या हातातून गेली, ती, साम्राज्यातील एका अतिशय उच्चकुलीन, अतिशय कार्यक्षम, अतिशय उत्साही व अतिशय दूरदर्शी आणि विशेष म्हणजे सर्वांत अधिक निष्ठूर व महत्त्वाकांक्षी व्यक्तीच्या हाती गेली, हे आपल्याला पुढे प्रकरण ११ मध्ये दिसून येईल.

---

[ मागील पानावरून ]
गुल ४०८अ मध्ये मात्र निराळेच नमूद केलेले आहे. ......त्यात म्हटले आहे की, ......ही घटना घडल्यावर, त्या संध्याकाळी ६ तास, दिल्लीमध्ये भयानक गोंधळ व आरडाओरड चालली होती. मुझमिल ६२ मध्ये मान्य केले आहे की, जाविदखान सफदरजंगाकडे जाताना त्याच्या बरोबर गेलेल्या लवाजम्याजवळ जी काही त्याची चीजवस्तू, मौल्यवान जिन्नस इ. होते ते सर्व मुघलिया सैनिकांनी (वजिराच्या तुर्की सैनिकांनी) आणि (बहुधा) शहरातील गुंडानीही लुटले. हा शेवटचा लेखक-मुझमिल–,जाविदखानाने बांधलेल्या इमारतीबाबत त्याची स्तुतीही करतो. ही स्तुती केलेली बांधकामे–इमारती इ.–अशी : ...... यमुना नदीच्या काठावरील एक राजवाडा ; मतिन-इ-मजहब (Matin-I-Mazhab) ही, सोन्याचा मुलामा केलेले घुमट असलेली, किल्ल्यासमोरील एक मशीद ; हैदरगंज बाजाराच्या भोवती एक बळकट भिंत ; हैदरगंजजवळच एक विस्तीर्ण व खोल विहीर (बावडी) आणि एक पूल. ....... अशा बांधकामाबद्दल स्तुती करून हा लेखक पुढे म्हणतो ........"जो आपल्यामागे पृथ्वीवर पूल व मशीद, विहीर व प्रवाशांसाठी विश्रामधाम ठेवतो तो मृत होत नाही." "He is not dead, who leaves behind on earth, Bridge and Church, Well and Travellers' Rest House"

प्रकरण नववे

# सफ्दरजंगचे अफगाणाबरोबर झगडे

## १७४८–१७५२

### § १ : अलिमहमद रुहेलाचे वंशज

अलिमहमद रुहेलाने मार्च–एप्रिल १७४८ मध्ये रोहिलखंड झपाट्याने आपल्या ताब्यात कसा आणला ही हकीगत प्रकरण २ मध्ये आली आहे. ( भा. पहा प्र. २ § ९ अखेरचा भाग ). पण आपल्या या यशाचा उपभोग घेण्यास तो त्यापुढे सहा महिन्यापेक्षाही कमी काळच जगला. त्याच्या पाठीमध्ये कॅन्सरचा आजार ( भा. कर्करोग) होऊन तो बिछान्याला खिळून पडला आणि त्याच वर्षात १५ सप्टेंबरला मरण पावला. त्याच्या ६ मुलांपैकी फैझुल्ला आणि अब्दुल्ला या दोघा मोठ्या मुलांना कंदाहार येथे बंदिवासात ठेवलेले होते. अब्दालीने पूर्वी सरहिंद घेतले त्यावेळीच त्याने या दोघांना बंदिवान म्हणून तिकडे पाठवून दिले होते. बाकीचे चार मुलगे अद्याप फार लहान होते. अशा परिस्थितीत बिछान्यावर पडून असताना ......"त्याने आपल्या प्रमुख सरदारांना बोलाविले आणि त्यांच्यासमक्ष आपले मृत्यू-पत्र केले. त्यानुसार त्याने आपला तिसरा मुलगा सादुल्ला याला आपला वारस म्हणून नियुक्त केले आणि ही व्यवस्था त्याचे मोठे मुलगे जर कधी परत आले तर मात्र त्यावेळेपर्यंतच टिकावयाची आहे असेही ठरविले. रहमतखानाला या अज्ञान वारसाचा पालक ( हाफिझ ) आणि दुंदिखानाला मुख्य सेनापती म्हणून नेमण्यात आले.... फतिखानाची नेमणूक कारभारी म्हणून (Steward खान-इ-सामान ) करण्यात येऊन त्याच्याकडे महमदाच्या तीन लहान मुलांची काळजी घेण्याचे काम सोपविण्यात आले. याचबरोबर सरदारखान या आणखी एका सरदाराची सैन्याचा बक्षी म्हणून नेमणूक करण्यात आली. रुहिल्यांच्या हितसंबंधास समान धोका निर्माण झाला आणि सर्वांनी एकजुटीने कारवाई करण्याची गरज निर्माण झाली तर या सर्व सरदारांनी एकत्र सल्लामसलत करावी असे बंधनही, ही व्यवस्था करताना, त्यांच्यावर घालण्यात आले."....( बरेली गॅझेटिअर ६६१; गु.-इ-र. २८ ). अलिमहमद रुहिला याचा वारसा म्हणून रहाणाऱ्या विस्तीर्ण मुलुखाचा कारभार अशा प्रकारे सरदार-उमरावांच्या एका छोट्या गटाच्या हाती देण्यात येऊन त्या प्रदेशाची, प्रत्यक्षात त्यांच्यामध्ये विभागणीही करण्यात आली. अलिमहमदाचे काही वारस परागंदा असून बाकीचे अद्याप 'अज्ञान' होते आणि त्याच्या ताब्यातील प्रदेशाचे शेजारी तर बलाढ्य शत्रूच होते. अशा परिस्थितीत या शेजाऱ्याकडून अफगाणांचा पराभव होऊन प्रदेश जिंकला जाण्याची व त्यांची हकालपट्टी होण्याची भीती होती. यातून अफगाणाना वाचवावयाचे तर अलिमहमदाने केलेली व्यवस्था अटळच बनली होती...."हाफिज रहमत, दुंदीखान आणि त्यांचे बाकीचे जोडीदार, यापैकी प्रत्येक, अलिमहमदाच्या एकएका मुलाचा सासराच होता. तेव्हा या सर्वांनी, अलिमहमदाने जिंकून मिळविलेल्या सर्व प्रदेशाची

वाटणी करून आपापल्या जावयाच्या नावाने एक एक भाग ठरविला व त्यानुसार आपापल्या वाट्याचा मुलुख ताब्यात घेतला, आणि त्यापैकी प्रत्येकी काही थोडी खेडी आपापल्या जावयाच्या खर्चासाठी दिली व बाकीच्या सर्व मुलुखाचा ते अमिरी-इतमामात उपभोग घेऊ लागले." .. अलिमहमदाचा वारस "सादुल्ला याचा स्वभाव व वर्तन इतके वाईट बनले की, राज्याचा संबंध महसूल आणि सैन्ये यावरील ताबा आणि त्यांचे नियंत्रण ही पहिल्याप्रमाणेच हाफीजवर अवलंबून राहिली." संबळ, मुरादाबाद, ठाकुरद्वारा आणि काशीपूर हे परगणे, दुंदीखानाला स्वतःच्या आणि त्याचे पायदळ व घोडदळ मिळून १२००० चे सैन्य, यांच्या खर्चासाठी म्हणून देण्यात आले. पिलिभित हे हाफिजच्या स्वतःच्या जहागिरीचे केंद्र होते. अशाच प्रकारच्या जहागिरी, इतर रुहिला सरदारानाही देण्यात आल्या. [ सियार (३)२७; सर्व रोहिला प्रदेशाच्या, १७५१ मध्ये केलेल्या प्रत्यक्ष वाटणीचे वर्णन, गु.-इ-र.–४५ मध्ये केलेले आहे].

हाफिझ रहमतखान ( जन्म १७०९ च्या सुमारास ) हा तुरु शहामतपुर येथे स्थायिक झालेला एक अफगाण धर्मगुरु व साधू याचा नातू होता. त्याचा बाप रहमत हा, अलिमहमदाला दत्तक घेणाऱ्या दाऊद या रुहिला सरदाराचा ( भा. अलीचा दत्तक पिता– Adoptive Father of Ali पहा : प्र. २ § ४ ) शिक्षक होता. त्याच्या ठायी असामान्य बुद्धिमत्ता, शासकीय कौशल्य व जन्मजात लष्करी प्रतिभा हे गुण असून स्वभावानेही तो विश्वासू होता. या गुणामुळे, हिंदुस्थानात आल्यावर तो अलिमहमदाचा उजवा हात बनला. नादीरची स्वारी होऊन गेल्यानंतरच्या काळात, आपला पुरस्कर्ता अलिमहमद याच्या ताब्यातील प्रदेशाची, त्याने, हिंदुराजे आणि मुघल जहागिरदार यांचे प्रदेश जिंकून, वाढच केली. [ गु.-इ-र–१३–२० ].

अलिमहमदाचा मृत्यू व त्याच्या मोठ्या मुलांचा परदेशातील बंदिवास, यामुळे शेख कुत्बुद्दिनची महत्त्वाकांक्षा पुन्हा बळावली. ( भा. पहा प्र. २ § ९ परि. ४ ). रुहिल्यांचे आधी, त्याच्या आजोबाकडे असलेली रोहिलखंडाची फौजदारी, रुहिल्यानी हिसकावून घेतली होती ( भा. प्र. २ § ४ § २), यामुळे कुत्बुद्दिनाला, रुहिला अफगाण जमात ही, पूर्वजाकडून वारसा म्हणून त्याला मिळावयाच्या फौजदारी वतनामध्ये घुसलेली एक उपटसुंभ जमात होय, असे वाटे. दांडगाईने घुसलेल्या या लोकाना तेथून हुसकून देऊन त्या भागाची फौजदारी पुन्हा मिळवावी असे त्याला उत्कटतेने वाटे. (भा. त्या काळी या भागाला 'कटेहार' म्हणत. पहा प्र. २ § २ ). तेव्हा अलिमहमदाचा मृत्यू व याचवेळी त्याची दोन प्रौढ मुले परागंदा असण्याचा योग, ही आता आपल्याला लाभलेली संधी आहे असे त्याला वाटे. यावेळी मुरादाबाद प्रत्यक्षात अलिमहमदाकडे असले तरी, औपचारिकरीत्या त्याची फौजदारी इन्तिझामउद्दौलाकडे ( पूर्वीचा वजीर कमरुद्दिन याचा वडील मुलगा ) होती. यामुळे, महत्त्वाकांक्षा पुन्हा उत्तेजित झालेला कुत्बुद्दिन, इन्तिझामउद्दौलाकडे गेला आणि आपल्याला त्याचा प्रतिनिधी–फौजदार (डेप्युटी) म्हणून पाठवूण मुरादाबादेचा प्रदेश ताब्यात घेण्यास सांगावे, अशी त्याने, त्याची विनवणी केली. इन्तिझामने या विनंतीला मान्यताही दिली; ( सुमारे १५ नोव्हेंबर १७४८ ); पण ही फौजदारी मिळविण्यासाठी वेडावून गेलेल्या या आपल्या प्रतिनिधीला, ती, प्रत्यक्षात मिळविण्यासाठी जरूर तो पैसा व साधनसामग्री यांची मदत मात्र तो देऊ शकला नाही. तथापि कुत्बुद्दिन हा, एक उमदा व शूर लढवय्या आहे अशा त्याच्या कीर्तीला भाळून प्रस्तुत साहसासाठी त्याच्याभोवती काही सैनिक गोळा झाले आणि यातून लवकरच त्याने ७००० सैनिकाचा एक लष्करी गट एकत्र केला. नंतर त्याने गंगा नदी

ओलांडून, बिजनोर जिल्ह्यामधून मुरादाबादेच्या दिशेने पुढे चाल केली. पण त्या शहराच्या वायव्येस ३८ मैलावर, धामपूर येथे त्याला, दुंदीखानाच्या नेतृत्वाखालील, त्याच्यापेक्षा कितीतरी मोठ्या आणि भरपूर तोफखाना व दारूगोळा यानी सुसज्ज, अशा सैन्याने अडविले. प्रस्तुत वादातील प्रदेश, गोडीगुलाबीने आपसात वाटून घेण्याबाबत, यावेळी अफगाणांनी मांडलेली एक योजना त्याने तिरस्काराने झिडकारून त्यांच्याशी लढाई दिली. पण या लढाईत आपल्या मूठभर एकनिष्ठ अनुयायांना बरोबर घेऊन व त्यांच्या आघाडीला राहून, एक निकराचा हल्ला करीत असताना तो मारला गेला. [ सियार (३) २८; मुझ. ३६–३७; बिजनोर गॅझेटिअर ३४९ ].

## § २ : काइम (Qaim) बंगश रुहिल्यांच्यावर हल्ला करतो — दाउन्रीची (Daunri) लढाई

रोहिलखंडात बादशहाची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी केलेला हा धामपूर येथील प्रयत्न अयशस्वी झाला तो १७४९ च्या प्रारंभी. यापुढे काही काळ हा प्रयत्न पुन्हा करणे शक्य झाले नाही, कारण रुहिल्यांचा मूळपासूनचाच स्वाभाविक शत्रू वजीर सफ्दरजंग हा, या काळात दुर्मुखला होऊन, नाखुषीत, दिल्ली शहराबाहेर तंबूतच रहात होता. याला कारण म्हणजे या आधी २० नोव्हेंबरला, राजधानीच्या रस्त्यातच त्याला ठार मारण्याचा जो प्रयत्न झाला होता ( भा. पहा प्र. ८§७ ) तो बादशहाच्या मर्जीतल्या, शाही दरबारातील लोकानीच केला होता असा त्याचा दावा होता. अशा प्रकारे आपल्या विरोधी, झालेल्या कटामुळेच, वजीर, कुत्बुद्दीनच्या अयशस्वी प्रयत्नाचेवेळी, दिल्लीबाहेर तंबूत दुर्मुखला होऊन नाखुषीत रहात होता. यामुळेच रुहिल्याविरुद्ध काही काळ हालचाल होऊ शकली नाही. तेव्हा रुसून बसलेल्या वजीराच्या छावणीत स्वतः जाऊन तरुण बादशहाला त्याची समजूत घालावी लागली ( ७ एप्रिल ) आणि नंतरच वजीर आणि बादशहा यांच्यामध्ये निर्माण झालेला दुरावा हळूहळू नाहीसा झाला. यानंतर वजीराने, प्रदेश बळकावून बसलेल्या उपटसुंभ रुहिल्यांना दडपून टाकण्याची एक नवी योजना तयार केली. ... " स्वतःच्या सुभ्याच्या इतक्या जवळच्या जिल्ह्यात, अफगाणांचे राज्य असावे हे त्याला आवडत नव्हते..... हे रुहिले म्हणजे दिल्लीकडे जावयाच्या आपल्या रस्त्यावर सतत त्रास देणारे सर्पच होत असे त्याला वाटे." एका अफगाणाविरुद्ध दुसऱ्या अफगाणाला हाती धरून त्याच्याकरवी पहिल्याचा नाश करावयाचा..... या लढ्यात कोणाचाही पराभव झाला, नाश झाला तरी वजीराचा स्वतःचा एक शत्रू कमीच होईल, अशी ही त्याची योजना होती. [आशब (२) ४२५].

अलिमहमदाने आपल्या मागे प्रचंड संपत्ती ठेवली होती असा सर्वांचा समज होता. अलिमहमदाला, काइमखान नावाचा अफगाणापैकीच एक, लोभी व महत्त्वाकांक्षी प्रतिस्पर्धी होता, (भा. पहा प्र. २§९) त्याला, रुहिल्यांचा काटा काढण्याच्या आपल्या योजनेमध्ये हाती धरण्याचे ठरवून, सफ्दरजंगाने त्याच्या लोभी वृत्तीला व महत्त्वाकांक्षेला चाळविले व त्याची रोहिलखंडाचा फौजदार म्हणून नेमणूक करणारे शाही फर्मानही त्याच्याकडे पाठवून दिले रुहिल्यांच्याकडे असलेल्या या 'फौजदार' पदामध्ये धोका असल्याने ते स्वीकारण्यास काइमखान प्रथम आढेवेढे घेऊ लागला. पण महमदखान आफ्रिडी या त्याच्या एका आवडत्या अधिकाऱ्याने (बक्षी) अखेरी त्याचे मन वळविले. नंतर काइमने मुअझ्झमखान (बक्षीचा

भाऊ) याला आपला प्रतिनिधी म्हणून रुहेला पुढाऱ्यांच्याकडे पाठवून त्यांना कळविले की, त्यांनी जो, शाही मुलुख बळकाविलेला आहे तो आता सोडून द्यावा आणि काइमखान आपले अधिकारपद हाती घेत असताना त्याला विरोध करू नये. असे करण्यासाठी मोबदला म्हणून ५००० सैन्य बाळगता येईल इतक्या जहागिरीही त्यांना देण्याचे वचन त्याने याचबरोबर दिले. "अज्ञान" रुहिला नेत्याचा पालक, हाफिज रहमत याने काइमच्या या (सांगण्यावर उलट उत्तर दिले की, ज्यावेळी बादशहाला हा मुलुख आपल्या ताब्यात घेता येत नव्हता त्यावेळीच अफगानांनी तो (बादशहाच्यावतीने) जिंकून घेतलेला असल्याने (भा. पहा प्र. २§९) आता बादशहाशिवाय दुसऱ्या कोणाला ते आपला धनी म्हणून मान्य करणार नाहीत. आताची नेमणूक, बादशहाच्या हातून सत्ता काढून घेणाऱ्या वजिराने केलेली असल्याने ती काइमखानाने स्वतःच नाकारणे योग्य होईल..... असे हे हाफिज रहमतचे उत्तर ऐकून काइमचा प्रतिनिधी चिडून बोलू लागला तेव्हा त्याची बदनामी करून, त्याला अवोनला बाहेर घालवून देण्यात आले. आपल्या वकिलाबरोबर काइमने आपली काही निशाणेही पाठविली होती व आपल्या अधिकाराचे प्रतीक म्हणून ती, बरेली व अन्य शहरात उभी करण्यास हुकूम दिले होते. त्याच्या या कृतीचा उपहास करण्यासाठी रुहिल्यांनी ही निशाणे उलटी उभी केली. [गु.-इ-र-२९; इमाद ४४].

अपमानित होऊन हा दूत परत आला तेव्हा रागावून, काइम रुहिल्यांचेबरोबर लढाई देण्यासाठी बाहेर पडला. २ नोव्हेंबर १७४९ ला, फरुखाबाद सोडून त्याने कादिरगंज येथे (Quadirganj) गंगा नदी ओलांडली व अवोनलाकडे कूच केले. दरम्यान रुहिला सैन्यही अवोनला येथून निघाले होतेच. त्याने पुढे बुदाऊन (Budaun) शहराच्या आग्नेयेस चार मैलावरील दाउन्री (Daunri) खेड्यानजिक बंदिस्त तळही ठोकला होता. या ठिकाणाजवळ काइमखानही[1] ता. ११ ला येऊन पोहोचला. तेथे, त्याला युद्धापासून परावृत्त करण्यासाठी त्याच्याकडे हाफिज रहमतने, तीन सय्यिद साधुंच्या बरोबर, एक मैत्रीचा संदेश पाठविला, पण त्याला नकार देऊन त्याने दुसरे दिवशी शत्रूवर हल्ला केला.

लढाईला सकाळीच सुरवात झाली. तेथील वनराईच्या दक्षिण व उत्तर कोपऱ्यात रुहिल्यांचे दोन सैन्यविभाग अनुक्रमे दुंदीखान आणि सादुल्लाखान यांच्या हाताखाली ठेवलेले होते. या दोन भागावर, काइम व मुआझ्झमखान यानी आपल्या सैन्याचे दोन विभाग घेऊन हल्ला केला. चढाई करून येणाऱ्या पथकांच्या आघाडीला अनेक हत्तीही होते. अशा या चढाईत, हल्ला करून येणारे, आपल्या समोरील सर्वांना, रेटीत, दडपीत, जय मिळवीत पुढे जात आहेत असे प्रथम दिसू लागले. दुंदिखानाचा तोफखाना शत्रूने जिंकून घेतला आणि त्या सेनापतीला आपल्या हत्तीवरून उतरून, शत्रूशी भिडून, तरवारीला तरवार भिडवून खणाखणीची लढाई करण्यासाठी, पायीच आपल्या लोकांनी पुढे न्यावे लागले. सादुल्लाच्या सैन्य विभागापुढेही धोका उभा राहिला होताच. अशावेळी मदत येऊन पोहोचली आणि लढाईचा नूर चढाई करून आलेल्याविरुद्ध वळला. या प्रतिहल्ल्यात मुआझ्झमखान आणि

---

१ काइमच्या सैन्यात घोडदळ व पायदळ मिळून ६०,००० सैनिक, ४०० हत्ती व तोफखान्याचे एक मोठे पथक होते असे सांगितले जाते. याचबरोबर रुहिला सैन्यात २५००० लोक होते असे म्हणतात (गु.-इ.-र.-३०). ही संख्या फुगवून सांगितली आहे असे दिसते तथापि काही असले तरी काइमखानाकडे, सैनिक संख्या व मोठ्या तोफा या दोन्हीबाबत निश्चितच वरचढपणा होता. या लढाईच्या ठिकाणाला डुमरी (Dumari) असे नाव आहे पण या ठिकाणाचा निर्देश "दाउनरी (Daunri) आणि रसुलपूर या खेड्यामधील जागा" असाही आहे.

त्याचा भाऊ व त्याचप्रमाणे महमदखान बंगशची अनेक मुले, ही गोळ्या लागून मरण पावली. तेव्हा आपल्या हाताखालील सेनाधिकारी व हिंदु मित्र यांच्यासमवेत, स्वतःच पुढे राहून काइमखानाने शत्रूवर हल्ला चढविला. रुहिल्यांचा मोड होऊन ते, युद्धभूमीच्या मागच्या बाजूस असलेल्या एका लांबट व खोलगट दरीकडे पळ काढू लागले. काइमखान व त्याच्या सैन्य विभागाने त्यांचा जोरदार पाठलाग चालविला पण लवकरच हा पाठलाग म्हणजे त्याच्या स्वतःच्याच मृत्यूचा सापळा ठरला. हाफिझ-रहमतची लष्करी डावपेचाबाबतची दृष्टी मोठी तीक्ष्ण असल्याने त्याला परिस्थितीचे आकलन आधीच होऊन त्याने त्या दरीच्या भागात अकस्मात हल्ला करण्याची योजना आखून त्यानुसार तयारी केली होती. दरीच्या दोन्ही बाजूस तीव्र चढावाच्या, कड्यांच्या असून त्यांच्या माथ्याचा भाग दाट, उंच, टोकदार, बाजरीच्या पिकांनी झाकून गेला होता. या दाट पिकामध्ये त्याने ८००० अफगाण सैनिक बाहेरून मुळीच दिसून येणार नाहीत असे लपवून बसविले होते व तोड्याने शिलगावण्याच्या त्यांच्या बंदुका भरून जमिनीवर टेकून तयार ठेवलेल्या होत्या.

युद्धभूमीवरून पळून येत असलेले अफगाण सैनिक, दरीतून, मोठ्या घाईघाईने पायीच येत होते. तो सर्वच भू-भाग त्यांना चांगलाच परिचित असल्यामुळे, दरीच्या डाव्या काठाच्या चढावावरून, माकडाप्रमाणे जलदीने चढून जाऊन, त्याच्या माथ्यावरील पिकात ते लवकरच दिसेनासे झाले. त्यांच्या पाठोपाठ आनंदाने बेहोष होऊन पाठलाग करीत येणारे शत्रू दरीतील अरुंद वाटेने पाण्याच्या मोठ्या लोंढ्याप्रमाणे जोरात पुढे घुसू लागले. दरीतील सुमारे निम्मा रस्ता ओलांडून ते पुढे आले, इतक्यात त्यांच्या डोक्यावरील दोन्ही बाजूच्या दाट झुडुपातून ज्वालांचे रुंद पट्टेच, त्यांच्यावर झेपावले. गोंधळ, आरडाओरड करीत चाललेला त्यांचा दाट गर्दीचा घोळका, जवळ जवळ थेट व अचूक नेम मारण्याच्या टप्प्यात आल्याबरोबर, एकाएकी ८००० बंदुकातून त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव करण्यात आला व त्यातूनच हे ज्वालांचे पट्टे झेपावले. शत्रूच्या या लोंढ्याचे पुढारी, सैन्याच्या घोळक्याच्या आघाडीला राहून, हत्तीवरून चालले होते. यामुळे ते तर, या बंदुकांच्या फैरी झाडणाऱ्यांना अगदी स्पष्ट ओळखण्यासारखे लक्ष्य होते. थोड्या मिनिटांतच ते सर्व मारले गेले. यातून निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन, अफगाण सैनिकांनी, हातात तरवारी परजीत, ओरडत, दरीच्या दोन्ही काठावरून खाली शत्रूवर हल्ला चढविला. यानंतर झाली ती शत्रूची सरसहा कत्तलच. आलेल्या शत्रूपैकी फक्त अगदी मागचेच काही, या मृत्यूच्या दरीतून निसटले. अफगाणावर स्वारी करून आलेल्या सैन्याच्या इतर विभागाना, आपल्या आघाडीच्या विभागाच्या दूर्दशेची हकीगत कळली तेव्हा त्या सर्वांनी पळ काढला.

काइमखानाच्या कपाळातून गोळी जाऊन तो आपल्या हौद्यात मरून पडला होता, त्याचा माहुत त्याच्या हत्तीला रणांगणाबाहेर नेत होता, तेव्हा रुहिला सैनिकांनी त्या हत्तीला गाठले आणि काइमखानाच्या अंगावरील मौल्यवान पोशाख व रत्नजडित अलंकार त्यांनी लुबाडले आणि त्याचे शीर धडावेगळे केले. काइमखान स्वतः त्याच्या भावांपैकी बरेच आणि त्याचे जवळ जवळ सर्वच सेनाधिकारी–कॅप्टन्स––रणांगणावर मृत होऊन पडले. फार मोठी लूट आणि काइमच्या सर्व तोफा व हत्ती विजयी रुहिल्यांच्या हाती पडले. अशा प्रकारे अफगाणांना सपूर्ण विजय मिळाला. उमद्या हाफीज-रहमतने, काइमखानाचे शीर त्याच्या धडाला शिवून बसविले, तो मृतदेह शालींनी आच्छादला व पालखीत ठेवून योग्य इतमामाने, फरुखाबादेला दफन करण्यासाठी पाठविला. अशा विजयाच्यावेळी त्याने,

शहाणपणाने संयमही दाखविला. गंगेच्या डाव्या, म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील, बंगश घराण्याचा सर्व प्रदेश (तीन परगणे वगळून), रुहिल्यांच्या या पालक-राज्यकर्त्याने (रीजंट) आपल्या राज्याला जोडला हे खरे, पण विजयाने उल्हासित व उतावीळ झालेल्या जमात बांधवांना, गंगा ओलांडून पलीकडे पश्चिम किनाऱ्यावर जाण्यापासून व तेथील काइमखानाच्या प्रदेशावर चढाई करण्यापासून त्याने परावृत्त केले. त्यांना तो म्हणाला, अफगाणांनी आपापसात युद्धे करून एकमेकांचा नाश करू नये.[१]

## § ३ : सफदरजंग बंगशांचा मुलुख हिसकावून घेतो

महमदखान बंगशचा, ११ वा मुलगा इमामखान याला त्याची आई 'बिबीसाहिबा' हिने फरुखाबादेच्या अधिकार पदावर (Lordship) बसविले पण त्याच्या अंगी फारच थोडे कर्तृत्व वा सामर्थ्य होते. अशा परिस्थितीत त्या खंबीर स्त्रीने मराठ्यांची मदत मिळविण्यासाठी, उत्तर हिंदुस्थानातील त्यांच्या सरदारांना, सैन्याच्या खर्चासाठी २० लाख रुपये देऊन (Subsidy) त्यांची मदत मिळविण्याचा बेत आखला. काइमखानाच्या मृत्यूनंतर ज्या घटना घडल्या त्यावरून त्या काळी दिल्ली येथील दरबाराच्या नैतिक अधिष्ठानावर किंबहुना नैतिक अध:पातावर काहीसा अंधुक प्रकाश पडतो आणि यावेळी झालेला त्या दरबाराचा ऱ्हास म्हणजे दैवी न्यायाचाच भाग होता असेच त्यातून स्पष्टीकरण मिळते. काइमखान हा तर वजीराचा हस्तक (Agent) म्हणून पुढे गेला होता. तेव्हा त्याच्या नाशाबद्दल सूड घेणे व रुहिल्यांचेवर आपल्या धन्याची — मुघल बादशहाची — सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वजीराने करणे अवश्य होते. पण असे करण्याऐवजी, आपलाच प्रतिनिधी म्हणून, रुहिल्यांशी लढण्यास जाऊन फसलेल्या असहाय काइमच्याच मालमत्तेमधून स्वत:ला संपन्न करण्यासाठीच त्याने ही संधी वापरली. एखादा सरदार-उमराव-आपल्या इस्टेटीबाबत मृत्यूपत्र वा तत्सम व्यवस्था न करता मरण पावला तर त्याची मालमत्ता बादशहाकडे यावी अशी मुघलांच्यामध्ये एक फार जुनी रीत होती. ती आता नामशेष व कालबाह्यही झाली होती, तरीही वजीराने मात्र तिचे आता काइमखानाच्या इस्टेटीचे संदर्भात पुनरुज्जीवन केले. त्याच्या जमिनी व संपत्ती यांचे संरक्षण करण्यास आता कोणी राहिलेले नाही या सबबीवर, ती शाही सरकारात परत घ्यावी असे हुकूम देण्यास त्याने बादशहाचे मन वळविले. काइमच्या मृत्यूनंतर फक्त १७ दिवसांनीच (२९ नोव्हेंबर १७४९), बादशहाला बरोबर घेऊन सफ्दरजंगाने दिल्लीबाहेर कूच केले. थोडे दिवसांचेच कूच झाल्यावर ते कोइल (Koil. . .अलिगड) येथे पोहोचले. तेथे बादशहाला ठेवून, वजीराने स्वत:चे सैन्य बरोबर घेऊन, पुढे फरुखाबादेच्या वायव्येस ४५ मैलावरील दरियागंजपर्यंत (इटा जिल्हा) मजल मारली. याचवेळी त्याच्या हुकूमावरून त्याचा औधमधील प्रतिनिधी राजा नवलराय याने पुढे चाल करून फरुखाबादेच्या आग्नेयेकडील १६ मैलावरील खुदागंज व्यापले.

तेव्हा, बंगश घराण्याचा वारसा काही किंमत देऊनही वाचविण्यासाठी, काइमच्या आईने वजीराबरोबर बोलणी सुरू केली आणि ती स्वत: सुफ्दरजंगाच्या छावणीत २४ डिसेंबरला आली. दीर्घ वाटाघाटी झाल्या व काइमखानाच्या मालमत्तेसंबंधी बादशहाच्या खजिन्यात, वारशाबाबत 'नजर' म्हणून ६० लाख रुपये भरावे म्हणजे त्या सरदाराचा सर्व

१ इमाद ४५ ; मुज्ञ. ११ ; बयान २५१–२५५ ; सियार (३) २९ ; गु.-इ.-र.-२८-३१ ; फरुखाबाद गॅझेटिअर :–१५८-१७१ ; बुदाऊन गॅझेटिअर २३५ ; त.-इ.-अ.-२२अ.

प्रदेश इमामखानाकडे देण्यात येईल व त्याला नबाब म्हणून मान्यताही मिळेल असे ठरले. वारशाबाबत द्यावयाच्या या 'नजरापैकी' (३/४) तीन चतुर्थांश रोख व वस्तू यांच्या रूपात देण्यातही आली आणि बाकीच्या चतुर्थांश रकमेची जबाबदारी मात्र या विधवा बेगमने सादुल्लाखान रुहिल्याकडे टाकली. (भा. अलिमहमदाचा तिसरा मुलगा, त्याच्या जागी आलेला : पहा § १) कारण सादुल्लाखानानेच काइमचे हत्ती व छावणीची मालमत्ता दाउन्री येथे हिसकावून घेतली असल्यामुळे, या लुटीबद्दल मोबदला म्हणून अशी रक्कम वजीराने वसूल केली पाहिजे असे तिचे म्हणणे होते.

यानंतर सफ्दरजंगाने आपले खरे रूप प्रगट केले. आपल्या छावणीत त्याने, काइमची आई, बिबीसाहिबा हिला नजरकैदेत ठेवले आणि याचवेळी नवलरायने चाल करून खुद्द फरुखाबाद शहर ताब्यात घेतले, मात्र बिबीसाहिबाला स्वतःच्या खर्चासाठी म्हणून, फरुखाबाद शहर व १२ खेडी यांचा वसूल नेमून देण्यात आला, कारण बादशहा फरुख सियारने ही देणगी बंगश कुटुंबाला पूर्वीच दिलेली होती. महमद बंगशाच्या विस्तीर्ण राज्यापैकी बाकीचा सर्व मुलुख मात्र वजीराच्या स्वतःच्या अंमलाखालील प्रदेशाला जोडण्यात येऊन नवलरायच्या ताब्यात देण्यात आला आणि नवलरायने यापुढे, आपले ठाणे कनोज येथे ठेवले. काइमखानाच्या भावांपैकी पाच जणाना पकडण्यात येऊन, त्यांना कैदी म्हणून, वजीराच्या अलाहाबाद किल्ल्यात पाठवून दिले. हाती घेतलेले काम अशा प्रकारे संपवून सफ्दरजंग दिल्लीला परतला (२५ मे १७५०). येताना त्याने काइमखानाच्या पाच प्रमुख गुलांमाना व कारभाऱ्यांना (men of business) कैद करून बरोबर आणले.

## § ४ : सफ्दरजंगविरुद्ध अफगाणांचा सार्वत्रिक उठाव

आता संबंध फरुखाबादच वजीराच्या पायाशी लोळण घेत पडले होते. पण त्याच्या अधिकाऱ्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून आणि आपला लोभ व चढेलपणा यांच्या आहारी जाऊन, अभिमानी व लष्करीवृत्तीच्या अफगाण जमातीची मने दुखविली. याचा परिणाम मात्र असा झाला की, सफ्दरजंगाची तेथील सत्ता सहा महिन्यातच उखडली गेली. बादशाही खजिन्यात, 'नजर' म्हणून मान्य केलेल्या रकमेपैकी जो वाटा वसूल व्हावयाचा होता तो मिळविण्यासाठी काइमच्या आईला कनोज येथे अडकवून ठेवले होते. पण काइम घराण्याशी एकनिष्ठ असलेल्या साहिबराय नावाच्या एका वंशपरंपरागत मुनशीच्या सहाय्याने ती तेथून निसटून गेली. या माणसाने प्रथम नवलरायच्या सभोवतीच्या लोकात स्थान मिळविले व नंतर, तो एकदा दारूच्या धुंदीत असताना, बिबीसाहिबाना मुक्त करण्याच्या हुकुमावर त्याने त्याची सही मिळविली. ही वेळ मध्यरात्रीची होती पण हा हुकुम ताबडतोब दाखविण्यात येऊन बिबीसाहिबाची मुक्तता करून घेण्यात आली आणि जलदीने प्रवास करून तिला माउरशिदाबाद (mau-R) येथे तिच्या लोकात नेऊन पोहोचविण्यात आले. तेथे तिने आपल्या प्रदेशातील निरनिराळ्या खेड्यातील ग्राम प्रमुखामधून आपला बुरखा फिरविला आणि या प्रतिकाद्वारे आपल्या लोकांच्या जमातनिष्ठेच्या व प्रतिष्ठेच्या भावनेला आणि स्वातंत्र्याच्या आवडीला चाळविण्याच्य व त्यातून सर्व अफगाणांना उठाव करण्याला प्रवृत्त करण्याच्या कामाला ती लागली.[१]

१ मान्यवर पण संकटात वा अपमानित असलेल्या स्त्रीचा बुरखा पाठवून भ्रातृभाव व जमातीचा अभिमान जागृत करण्याच्या अफगाण प्रथेचा संदर्भ या आधीही आलेला आहे. पहा प्र. २ §५ राजपूत–हिंदू लोकामधील रक्षाबंधन प्रथाही जवळ जवळ याच प्रकारची होय.

तत्कालीन बहुसंख्य अफगाण जनतेला वजीराचा कारभार आधीच असह्य झाला होता. शिवाय हा कारभार करणारा त्याचा प्रतिनिधी वर्ग हा तर, आधीच, अफगाण तिरस्कार करीत असलेल्या हिंदूंचा असल्याने, तो अधिकच असह्य वाटत होता. वजिराने नेमलेल्या नव्या गव्हर्नराच्या . . . मुख्यकारभारी नवलराय याच्या—एका पोलीस हस्तकाची, माऊच्या बाजारात एकदा एका विक्रेत्या बाईशी बाचाबाची झाली तेव्हा काही काळ एकमेकास शिवीगाळ झाल्यावर त्या पोलीसाने तिला आपल्या पादत्राणानी मारले. अन्याय सोसावा लागलेली ही स्त्री एका आफ्रिडी सैनिकाची विधवा होती. तिने अहमद बंगशकडे (काइमचा एक धाकटा भाऊ) तक्रार नेली. ती त्याला म्हणाली की तुम्हाला जर आपल्या बापाच्या प्रजेचे, होणाऱ्या बेअब्रुपासून रक्षण करता येत नसेल, तर तुम्हीं पुरुष म्हणवून घेण्याला, पुरुषी फेटा-वेश-धारण करण्याला लायक नाही. तुम्हीं स्त्रीच्या जन्माला आला असता तर अधिक बरे झाले असते.[1]

आता फरुखाबादमधील जनतेचा उद्रेक शिगेला पोहोचला होता. यातून प्रत्यक्ष स्फोट होण्यासाठी, ‘नेत्याच्या’ रूपातील ठिणगीचीच तेवढी आवश्यकता होती. बिबीसाहेबाने, आपला सावत्र मुलगा अहमद याच्याशी शहाणपणाने ‘सख्य’ घडवून आणले आणि द्रव्य, शस्त्रे वा माणसे याविना असलेल्या त्याला, अफगाण—उठावाचा नेता म्हणून स्वीकारण्यात आले. रुस्तुमखान आफ्रिडी याने आपले घरगुती सामानही विकून ५,००० रुपये उभे केले व व ते अहमदला उसने दिले. या रकमेपैकी काही खर्चून त्याने सुमारे ४०० लोकाना गुप्तपणे नोंदवून घेतले व शस्त्रसज्जही केले. नंतर त्यानी माऊपासून ३२ मैलावर असलेल्या खेडयातील एका धनाढ्य हिंदु पेढीवाल्यावर एका रात्री दरोडा घालून, त्याला व त्याच्या नोकराला ठार केले व त्याची संपत्ती लुटून घेऊन ते निघून आले. यातून आणखी अफगाणांना नोंदवून त्यांच्या अन्नपाण्याची सोय करणे त्याला शक्य झाले. या मोठ्या कामगिरीनंतर ८ दिवसांनी, अहमदाने ६,००० सैनिक बरोबर घेऊन, फरुखाबाद परत मिळविले. आणि नंतर आपल्या बापाच्या राहिलेल्या जहागिरीतून सफदरजंगाच्या लोकांना हाकलून देण्यासाठी तेथून तो पुढे दक्षिणेच्या बाजूने निघाला.

तेव्हा उठाव करून येत असलेल्या या बंडखोरांचे बळ जास्तीत जास्त वाढण्याआधीच त्यांना गाठून त्यांचा मोड करण्यासाठी, नवलरायाने ताबडतोब कनोज येथून पुढे कूच केले. कालीनदीच्या उत्तरेला जवळच व फरुखाबादेच्या दक्षिणेस १६ मैलावर असलेल्या खुदागंज येथे तो थांबला. येथून त्याच्या उत्तरेला सुमारे २ मैलावरच अफगाणांचा तळ होता. नवलराय हा साक्सेना (Saksena) कायस्थ जातीचा होता. दिवाणी कारभार करण्याबाबत व हाताखालील माणसांचा चांगला उपयोग करून घेण्याबाबत, त्याचे कौशल्य व कार्यक्षमता फार मोठी होती. यामुळे एका साध्या खालच्या पदापासून ते औधच्या डेप्युटी गव्हर्नरपदापर्यंत आणि वजीराच्या उजव्या हाताच्या स्थानापर्यंत तो चढला होता. त्याचा स्वभाव,

१ या कथेच्या संदर्भात गप्पिष्ट सय्यिद गुलाम अलीने आणखी लिहिले आहे की, आपली अशी निंदा ऐकून स्वतःच्या निर्बलतेबद्दल अहमदखानाला फार मोठी शरम वाटली व मानखंडना झाल्याचे जाणवले, आणि त्याने पुढील दोन रात्री दुःख करण्यात आणि दिवस उपवासात घालविले. नंतर आपल्या लोकांवर चाललेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी त्याने आपली कंबर कसली (इमाद, ४६) ; नवलरायचे पतन, त.-इ.-अ.-२३ब, २५ब-२६अ ; सियार (३) ३०-३१ ; तारखाबाबत 'डी. सी.' दिल्ली वर्तमान पहा. गु.-इ.-र.-३५-३७ ; (चहारगुल.), चहारगुल ४०२ब-४०३अ. ; इमाद ४५-४८ ; बयान २५६-२५९ ; मुझ. ४४-४५ ; फरू. गॅझेटिअर १६०-१६३ ; पे. द. नि. प. (२१) ३२ (थोडक्यात).

वृत्ती आणि अनुभव यांच्या संदर्भात, तो जिल्ह्याचा लष्करी राज्यकर्ता होण्याएवजी एक प्रमुख दिवाणी व महसूल अधिकारी (रेव्हिन्यू कलेक्टर) होण्यालाच अधिक लायक होता. त्याच्याजवळ धैर्याची उणीव नसली तरी सैनिकी व्यवसायाला अवश्य अशी उपजत बुद्धी व आवड त्याच्याजवळ नव्हती. शिवाय सैन्याचा योग्य वापर व त्याच्या हालचालींचे संयोजन करण्याला अवश्य ते प्रशिक्षणही त्याला नव्हते. खुदागंज येथे त्याला सफ्दरजंगाकडून एक पत्र मिळाले. त्यातून त्याला कळविले होते की, दिल्ली येथून त्याला मदत पाठविली असून ती मार्गावर आहे. ती येऊन पोहोचेतो त्याने शत्रूशी लढाई टाळावी. तेव्हा त्याने योग्य ती काळजी घेतली. त्याने आपल्या तळाभोवती पहारेकऱ्यांच्या चौक्या बसविल्या व पुढच्या बाजूला आपला तोफखाना उभा केला आणि आपल्या सैनिकांना अशीही ताकीद दिली की, त्यांनी आपल्या छावणीतच ठाण मांडून रहावे आणि हल्ला झाला तरच लढा द्यावा.

खुदागंज येथील औधच्या सैन्याला, दिल्ली येथून मदत निघालेली आहे ही बातमी अहमद बंगशला एका मित्रराजाकडून पोहोचली. तेव्हा शत्रूचे सामर्थ्य दुप्पट होण्याआधीच त्याच्यावर हल्ला करण्यास त्याने एक दिवसही दवडला नाही. १ ऑगस्टच्या काळोख्या रात्री, पाऊस पडत असताना त्याचे ९००० अफगाण पायदळ व २००० घोडदळ आपल्या छावणीतून गुपचूप बाहेर पडले व नवलरायचा तळ बाजूला सोडून, लांब दूरवर गेले व तेथून वळसा घेऊन त्यांनी नवलरायच्या सैन्यावर पाठीमागून हल्ला केला[1] या पिछाडीचे भागाला तोफखान्याचे संरक्षण नव्हते. नवलरायच्या छावणीच्या या बाजूच्या संरक्षणाचे काम बाऱ्हच्या सय्यदांचेकडे सोपविलेले होते. झालेला हल्ला त्यांनी प्रथम परतवून लावला. "तेव्हा आपल्या पळू लागलेल्या सैनिकांना अहमदखानाने धमकी दिली की, न पळता त्यांनी पुन्हा हल्ला करण्यासाठी एकत्र व्हावे नाहीतर तो स्वतः आत्महत्या करील. त्याच्या या धमकीमुळे, पळणाऱ्या सैनिकांना पुन्हा एकत्र करून, दुसरा व अधिक यशस्वी हल्ला चढविण्यात त्याला यश मिळाले." यावेळी अहमदाच्या सैनिकांनी नवलरायच्या तळामध्ये शिरकाव करण्यात यश मिळविले आणि तेथे त्यांनी गोंधळ उडवून दिला. रात्र अंधारी असून पाऊस पडत होता आणि गोलंदाजानी शत्रू कोठे आहे न कळताच आपल्या तोफा डागल्या पण त्यांना कोणालाही मारता आले नाही. दरम्यान नवलराय तर दैवावर पूर्ण हवाला ठेऊन प्रार्थना करीत बसण्यातच गुंतला होता. तथापि थोडीफार खटपट करून त्याला आपल्या हत्तीवर बसविण्यात आले. अशा प्रकारे उजाडेपर्यंत गोंधळात व काळोखात हाणामारी व लढाई चालू राहिली. सूर्योदयानंतर थोड्या वेळाने, नवलरायला गोळी लागून तो मृत झाला. तेव्हा त्याच्या माहुताने आपल्या हत्तीला धन्याच्या शवासह नदीतून पलीकडे नेऊन, कनोजकडे पळ काढला. या पाठोपाठ सगळीकडेच त्याच्या सैन्याची माघार सुरू झाली. त्याचे पळणारे बरेच सैनिक आपल्या धन्याच्या कलेवराच्या पाठोपाठ, नदीतून पलीकडे जाण्याच्या प्रयत्नात बुडून मेले. यानंतर वजीराच्या सैन्याने कनोज सोडले व ते अहमदखानाने व्यापले. पठाणांच्या हाती अमाप लूट पडली आणि परिणाम असा झाला की,. . . . "दरिद्री आणि उपासमार होत असलेले अफगाण आता खूपच समृद्ध झाले आणि वतनवाडी सारख्या मालमत्तेचे व जडजवाहिरासारख्या खजिन्याचे धनी बनले." (बयान २५९), त्यांनी आता गंगा नदी ओलांडली आणि तिच्या पूर्व किनाऱ्यावरील अथवा औध (Audh/वा अवध) च्या बाजूकडील अनेक ठिकाणे लुटली वा व्यापली [इमाद ४८, फरु. गॅझे. १६३].

१ हल्ल्याचे अगदी निश्चित ठिकाण हे कैथा– (Kaitha) आणि गंगुई (Gangui) या खेड्यांची सरहद्द होती असे म्हणतात. ही हद्द खुदागंजच्या पश्चिमेस सुमारे एक मैल आहे. (फरु. गॅझेटिअर १६२ ब).

## § ५ : सफदरजंगाची अफगाणाविरुद्ध चढाई

बंगशांचा नेता आपले निर्णय, अशा प्रकारे झटपट घेऊन, त्यांची कार्यवाही तत्परतेने करीत असताना दुसरीकडे वजीराचा या प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टिकोन उमरावी थाटाचा असून तो त्याकडे सावकाशीने, रमतगमत पहात होता. प्रस्तुत धोक्यामधील गांभीर्य, तो वाजवीपेक्षा कमी लेखीत असून या शत्रूकडे तुच्छतेनेच पहात होता. इतकेच नव्हे तर यावेळी शत्रूकडे कोणी मोठा नेता नसल्यामुळे, त्याची ही वृत्ती विशेषच वाढली होती. ६, जुलै इतक्या आधी (भा. खुदागंजची लढाई पुढे १ ऑगस्टला झाली.) फरुखाबादेला जाण्यासाठी त्याने दिल्ली येथे, बादशहाचा औपचारिक निरोप, उघडपणे घेतला होता. पण त्यानंतर राजधानी बाहेरील एका बागेत तीन आठवडे तो थांबला. त्याच्या सैन्याच्या पहिल्या विभागाने, इस्माइल बेग व राजा देविदात ( Devidat ) यांच्या नेतृत्वाखाली २२ जुलैला कूच सुरू केले. पण वजीर स्वतः मात्र २५ जुलैला निघाला आणि कूचही आस्ते आस्तेच करू लागला. दोन दिवसांच्या चालीला तो तीन वा चार दिवस लावी.

ऑगस्टच्या प्रारंभी तो मार्‍हर ( Marhara—इटा जिल्ह्यात—इटा शहराच्या वायव्येस १३ मैलावर)[१] येथे येऊन पोहोचला.....या ठिकाणी त्याला खुदागंज येथील अरिष्टाची बातमी कळली. तेव्हा अधिक सैन्य बोलावून घेण्यासाठी त्याने तेथेच आणखी एक महिना मुक्काम केला. या मुक्कामात त्याच्या सैनिकानी, ते रहात असलेल्या व एकनिष्ठ असलेल्या खेड्यांची, खुद्द वजीर तेथे असताना लूट केली. या घटनेवरून त्याच्या सैन्यातील बेशिस्त आणि ज्यांचे संरक्षण या सैनिकांनी करावयाचे ती जनता व हे सैनिक यांच्यामधील दुरावा ही पूर्वीचीच स्थिती दुःखदायक होण्याइतकी स्पष्ट होतात. "एका मुघल कॅप्टनाच्या सांडणीस्वारीने (म्हणजे सफदरजंगाच्या एका पर्शियन-तुर्की सैनिकाने), इनायतखान नावाच्या एका अधिकाऱ्याच्या फाटकाजवळ वाढलेले एक झाड तोडले. हा इनायतखान याच गावातला रहिवाशी असून वजीराचाच एक अधिकारी होता. झाड तोडले म्हणून इनायत त्या सांडणीस्वाराला रागावला व त्याने त्याला काही शिक्षाही केली. तेव्हा या स्वाराच्या धन्याने (कॅप्टनने) इनायतखानाला पकडून आणण्यास आपले एक पथक पाठविले. यावरून या खेड्यांची सार्वत्रिक लुटालूट करा असे हुकूम वजीराने दिले आहेत अशी कल्पना करून इतर मुघल सैनिकांनीही हाती शस्त्रे घेतली आणि सायंकाळी ते खेडे लुटले व ते जमिनीसपाट, धुळीत मिळविले. यावेळी इनायत व त्याचा लहान मुलगा, शिवाय त्या खेड्यातील आणखी ५८ लोक ठार मारले गेले. अनेक सय्यिद, शेख व कंबूह (Kambuh) यांच्या आणि अनेक प्रतिष्ठित लोकांच्या व सामान्य लोकांच्याही स्त्रियांना ओढून नेऊन गुलाम करण्यात आले." [सियार (३) ३२, खजिना-अमि. ८१].

१ डी. सी. (दिल्ली क्रॉ.) मध्ये वजिराच्या गोटामध्ये एक अंतर्गत भांडण नमूद केलेले आहे. ...... त्यानुसार......इस्माइलखान (एक गुलाम व सफदरजंगाचा एक, अतिशय विश्वासातला सल्लागार) आणि महमद अलिखान (वजिराच्या सैन्यातील एक वरच्या दर्जाचा सेनापती व घोडदळ प्रमुख) या दोघामध्ये १८ डिसेंबर १७४९ ला वजिराच्या छावणीत एक अंतर्गत झगडा झाला. ......याचप्रमाणे पाटणा येथील इंग्रजांच्या वखारीतील अधिकाऱ्यांनी डिसेंबर १७४२ मध्ये लिहिले आहे की ........ "औधचा सुभेदार ४०००० घोडदळ बरोबर घेऊन या बाजूने पुढे चाल करीत आहे. ......त्याचे लोक जुलूम-दांडगाई-बलात्कार करीत असून ते कोणाच्याही हुकमतीच्या शिस्तीत नाहीत. ......"

भा. टीप : वरील टीप मुघल सैन्यातील या काळच्या बेशिस्तीची आणखी उदाहरणे देते. यातील स. १७४२ ही मुद्रण-चूक असावी. .......येथे '१७४९' असे असावे वा सैन्यातील बेशिस्त बरेच वर्षांची होती असे सूचित असावे.

अखेरी त्याला पाहिजे तितकी सैन्यभरती झाल्यावर, १० सप्टेंबरला सफ्दरजंगाने पुढे कूच केले ते त्या खेड्यातील लोकांचे, त्यांनी लपविण्याचा फारसा प्रयत्न न केलेले शिव्याशाप, घेतघेतच. नंतर तीन दिवसांनी त्याला शत्रू दिसून आले ते मान्हराच्या पूर्वेस जवळजवळ २२ मैलावर व इटाच्या उत्तरेस १८ मैलावर असलेल्या रामचटौनी (Ramchatauni) या ठिकाणाजवळ[1] त्याच्याजवळ यावेळी ७० ते ८० हजार सैनिकांचा एक अफाट जमावच असून तो एकंदरीत खूपच निरनिराळ्या प्रकारच्या निरनिराळ्या वृत्तीच्या सैनिकांचा धेडगुजरी घोळकाच होता. त्यात अननुभवी सैनिकांचीच बरीचशी भरती असून त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची शिस्त नव्हती. मोठ्या सैन्यात अनेक विभाग असतात. हे सर्व विभाग एकत्र गुंफून, सर्वांच्या हालचालीत समन्वय साधून एकसूत्रीपणा राखणे अवश्य असते. हे साधण्याला अशा सैन्याच्या मुख्य सेनापतीमध्ये, सर्व विभागांवर सतत लक्ष ठेवण्यासाठी, जलद हालचाली करण्याची क्षमता असावी लागते व याचबरोबर ज्याच्या हाताखालील सर्व सेनापती व सेनाधिकारी यांच्याकडून तत्परतेने सहकार्यही मिळवावे लागते. या सैन्यात या सर्वांचाच अभाव होता. आपले हुकूम व्यवस्थित अंमलात आणणारे कार्यक्षम प्रतिनिधी वा हाताखालचे अधिकारी निवडण्याचे कौशल्य ही एक राज्यकर्त्याला अवश्य अशी देणगीच वा गुण होय. राज्यकर्त्याला अवश्य असा आणखी एक गुण म्हणजे त्याला एकदा चांगला सल्ला दिला गेला तर तो स्वीकारण्याची व त्यानुसार वागण्याची वृत्ती. पण हे दोन्हीही गुण सफ्दरजंगजवळ नव्हते. आपल्या सैनिकांना आपल्याबद्दल निष्ठा वाटावी, ते आपल्याशी एकनिष्ठ व निगडित रहावे म्हणून त्यांना आपल्या जोडीदाराप्रमाणे वागवून, त्यांच्याबरोबर स्वतःही कष्ट करावे लागतात. शिवाय सैनिकांना अवश्य ती तालीम वा सराव ही औरंगजेब करी त्याप्रमाणे त्यांच्याकडून स्वतःच्या देखरेखीखाली वारंवार करवून घ्यावी लागतात. पण याऐवजी, आपल्या सैनिकांची निष्ठा मिळविण्यासाठी सफ्दरजंग मात्र, आपल्या लहरीप्रमाणे, त्यांना पैशाच्या उदार देणग्या देई आणि त्यांनी जनतेची लूट केली तरी त्याकडे कानाडोळा करी. त्याची सत्ता आता शिगेला पोहोचली होती परंतु त्याचा चढेल स्वभाव आणि त्याची ऐषआरामाची अतीव आसक्ती यामुळे त्याच्या प्रामाणिक आणि कर्तबगार सल्लागारांना त्याच्याबद्दल घृणा वाटू लागली आणि तो मर्जीतल्या फक्त एकदोघा माणसांच्या हातातले कळसूत्री बाहुलेच बनला. अशा या त्याच्या लाडक्या व्यक्तीत प्रामुख्याने इस्माइलखान हा होता. हा इस्माइल पूर्वी एक गुलाम असून आता तर वस्तुतः त्याचा मुख्य प्रधान आणि त्याच्या कारभाराचा प्रमुख व्यवस्थापक बनला होता. कांही थोडेसे घरंदाज उमराव, व्यक्तीगत प्रेम वा तो शाही दरबारात असलेल्या त्यांच्या पंथियांपैकी (शिया) सर्वात प्रमुख होता म्हणून, निष्ठापूर्वक त्याच्या पाठीशी राहिले होते. पण या उमरावांच्या हाताखाली त्यांचे परिणामकारक सैन्यही नव्हते आणि त्यांना, त्यांच्या सैन्याच्या लष्करी हालचालींना मार्गदर्शन करण्याला वा त्यांच्या कारभाराचे नियमन करण्याला परवानगीही दिलेली नव्हती. सफ्दरजंगाचे सैन्य म्हणजे या एकूण परिस्थितीत निर्माण झालेला,

---

१ (रामचटौनी) : सहावरच्या पूर्वेस सात मैलावर व पतिआलीच्या पश्चिमेस पाच मैलावर. [आर्यावन : फरू. गॅझे. १६३]. काही जुन्या इतिहासात पतिआलीवरून तेच नाव या लढाईला दिलेले आढळते. हे पतिआली इटाच्या ईशान्येस २२ मैल, मरेन्हाच्या (Marehra) थेट पूर्वेस २७ मैल आणि फरूखाबादेच्या वायव्येस ४२ मैल आहे. (हिंदुस्तान ॲटलस–नकाशा संच नं. ६८). रामचटौनी हे एक हिंदूंचे पवित्र देवालय असून, एक स्थानीय (Local) यात्रास्थानही आहे. ते दंडवरगंज या रेल्वेस्टेशनच्या आणि मोहनपूर खेड्याच्या अगदी जवळ आहे." [A. L. Srivastava : ए. एल्. श्रीवास्तव यांचा ग्रंथ–औधचे पहिले दोन नबाब, १५९ न.].

सर्वसामान्यपणे असला हा बेशिस्त, बाजारबुणग्यांचा घोळकाच होता. या सैन्याजवळ, त्याच्या हालचाली, चढाया इ. बाबत एकसूत्री योजना नव्हती. लढाई सुरू झाल्यावर तासातासाला निर्माण होत जाणाऱ्या परिस्थितीनुसार, लढाईच्या ओघावर, त्यातील हालचालींवर नियंत्रण ठेऊ शकेल असा खराखुरा प्रमुख सेनापतीही तेथे नव्हता. उलट बाजूचे अफगाण जमातीचे सैन्य अधिक लहान पण अधिक एकसंघ, अधिक संघटित असून सतत एकामागून एक, ओळीने मिळविलेल्या यशामुळे त्यांच्यामध्ये सार्थ आत्मविश्वास होता हे योग्यच होते. याबरोबरच लढाईच्या प्रस्तुत प्रदेशात, योग्य हालचाली करण्यात व छापे घालण्यातही हे अफगाण मुरलेले होते. अशा या अफगाण सैन्यावर सफ्दरजंगाच्या मोठ्या घोळक्याने आता हल्ला चढविला.

## § ६ : रामचटौनी येथे सफ्दरजंगाचा पराभव

१३ सप्टेंबर १७५० ला, सूर्योदयानंतर तीन तासानी, नेहमीच्याच रचनेनुसार मांडणी केलेल्या वजीराच्या सैन्याने, अफगाणांच्या सैन्यावर चढाई सुरू केली. दोन्ही छावण्यामधील चार मैलांचे अंतर तोडण्याला सुमारे दोन तास लागले व नंतर उभयपक्षांच्या तोफांचा एकमेकावर मारा सुरू झाला. तोफांच्या सामर्थ्यात मोठ्या, अवजड तोफांच्या दृष्टीने सफ्दरजंगाकडे स्पष्टच वर्चस्व होते. या गोळागोळीनंतर सुरजमल जाटाच्या नेतृत्वाखालील वजीराच्या उजव्या बगलेने व इस्माइल बेगखानाच्या हाताखालील डाव्या बगलेने आपापल्या समोरील अफगाणांवर जोराने हल्ले केले. या दोन्ही बगलांवर दीर्घकाळ निकराची लढाई चालली. अफगाणांनी अतिशय निकराची झुंज दिली. अखेरी त्यांच्यापैकी ६००० लोक, त्यांचा सेनापती रुस्तुमखान आफ्रिडी याच्यासह, रणांगणावर मारले गेल्यावरच, त्यांच्या दोन्ही बगलांचा मोड होऊन, ते पळू लागले, आणि अनेक मैलपर्यंत इस्माइलबेग व सुरजमल यानी त्यांचा पाठलाग केला. सफ्दरजंगाला अफगाणांचे, युद्धविषयक डावपेच ( Tacties ) कळत तरी नसावे किंवा त्या डावपेचाकडे तो तुच्छतेने तरी पहात असावा. आपल्या बगलांच्या विभागाचा काहीसा जय होऊन ते अफगाण बगलांवरील विभागांचा पाठलाग करू लागले, तेव्हा जणू काय संबंध शत्रू सैन्याचाच पराभव झाला आहे व आता मिळालेल्या जयाच्या पाठोपाठ जरूर तो पाठलाग व हालचाली करून जास्तीत जास्त यश व फायदा मिळविण्याचेच तेवढे राहिले आहे अशी त्याची समजूत झाली. यामुळे रणक्षेत्राच्या आपल्या बाजूकडील, स्वतःच्या विभागापैकी तोफा, स्विव्हेल्स ( Swivels ) : वाटोळ्या कड्यामधून फिरत्या असणाऱ्या व ऊंटाच्या वा हत्तीच्या पाठीवरून नेत असलेल्या छोट्या तोफा वा बंदुका) व अग्निबाण (रॉकेटस) आणि आणखी सैन्य, ही शत्रूचा पाठलाग करणाऱ्या आपल्या बगलांना अधिक बळकटी आणण्यासाठी त्याने, मूर्खपणाने पाठविली.[१] यामुळे युद्धावर पुढे गेलेले त्याचे सैन्य दोन भागात विभागले गेले, शिवाय ते परत बोलावता येणार नाही इतके दूर, पाठलागास गेल्यामुळे त्यांच्यातील संबंधही तुटला. याचबरोबर स्वतः सर्व सैन्याचा प्रमुख सेनापती असूनही, जवळ फक्त लहानसेच संरक्षक पथक व सभोवती वा जवळपास तोफखानाही नाही अशा स्थितीत, रणभूमीच्या मुख्य क्षेत्रात मात्र,

१ सफ्दरजंगाचा पराभव :—सियार (३) ३१-३४ ; त.-इ.-अ.-२६ब ; बयान २६०-२६२ ; मुझ. ४६-४९ ; चहारगुल. ४०३ब-४०६ब ; इमाद ४९, शाकिर ६४; फरू. गॅझे. १६३-१६४ ; गु.-इ.-र.-३७-३९ ; सुजन चरित्र (४) ; जंग (पृ. ५९-९९) ; पे. द. नि. प. (२) २० व २३ (फारच उपयुक्त), (२१) ३६ खजिना-इ-अमिरा ८१-८३.

तो मागेच राहिला, आणि अशावेळी त्याच्यासमोर अजूनही विस्कळीत वा पराभूत न झालेले अर्धे अफगाण सैन्य उभेच असून त्याच्याशी अद्याप लढाई देऊन ती जिंकावयाची होती.

उलट बाजूला अहमद बंगशने मात्र शांत राहून, संरक्षक पवित्राच घेतला होता. आपल्या सैन्याच्या मध्यभागी राहून तेथून तो अनुयायांच्या हालचालींचे मार्गदर्शन व संयोजन करीत होता. आपल्या दोन्ही बगलांवरील सैन्य विभागांची दाणादाण झाली असून रुस्तुमखान मारला गेला आहे हे जेव्हा त्याला कळले तेव्हा ही घातक बातमी त्याने दडविली आणि उलट आपल्या जवळच्या सैन्य विभागाला, ओरडून सांगितले की, रुस्तुमने विजय मिळविला आहे. तेव्हा तुम्हाला .. माझ्या बंगश लोकांना... तुमच्या आफ्रिडी मित्रांनी (रुस्तुमच्या लोकांनी) मागे टाकू नये असे वाटत असेल, त्यांचा वरचष्मा होऊ नये असे वाटत असेल तर तुम्हीही आता विशेष परिश्रम केले पाहिजेत. अशाप्रकारे प्रोत्साहन दिल्याने त्याच्या लोकांनी पुन्हा लढाई सुरू केली.

आता मध्यान्ह ( Meridian ) होऊन सूर्य अस्ताकडे झुकू लागला होता. हिंदुस्तानात जन्मलेल्या सैनिकांमध्ये, ते विशेषत: सकाळ पासून सतत सशस्त्र हालचाली करण्यात गुंतलेले असले तर दुपारी सुमारे एक वाजल्यानंतर आपले प्रयत्न शिथिल करण्याची आणि अन्नपाणी शोधण्याची सवय आहे. यामुळे आता वजीराच्या सैन्यामध्ये एकप्रकारची सुस्तीही आली होती. अशा परिस्थितीत मिळालेली संधी, अफगाणांनी वाया जाऊ दिली नाही. त्यांनी ताबडतोब पुन्हा हल्ला सुरू केला. ताज्या दमाचे ६००० सैन्य— यातील बरेचसे पायदळच होते... बरोबर घेऊन, स्वत: अहमदाने झुडपांनी भरलेल्या रणभूमीवरून, लपत छपत पुढे चाल केली आणि वजीराच्या आघाडीच्या पथकावर एकाएकी हल्ला केला. यानंतर झालेल्या लढाईत नासिरुद्दीन हैदर (वजीराच्या मामाचा मुलगा व वजीराच्या सेनापतींपैकी एक प्रमुख) मारला गेला. आघाडीच्या पथकापासून जवळच्याच आणखी एका सैन्य विभागाचा प्रमुख, कामगारखान... ( Kamagarkhan ) बलुच हा आणखी एक मोठा अधिकारी पळून गेला. त्याचे हे पलायन बहुधा 'बंगश शत्रूच्या' संगनमतानेही असावे.

सैन्यातील पर्शियन सैनिकांचा विभाग तर वजीराच्या एकूण सैन्याचा कणाच होता. या विभागाचे धैर्यही आता गळाले..... "त्यांचे पाय लटपटू लागले आणि आता पराभव निश्चित आहे असे त्यांना वाटले"... वजीराच्या आघाडीची फळी कोसळली आणि संपूर्ण गोंधळ निर्माण झाला. या फळीच्या ठिकाणी आता भटकणारे सैनिक, हत्ती, हाकणारे नसलेल्या गाड्या, अशांचा एक बेशिस्त घोळकाच तयार झाला आणि त्याने, वजीराच्या सैन्याचा मध्यविभाग व आघाडीची फळी यांच्यामधील जागेत वजीराला अडथळे निर्माण केले. वजीराने आपल्या बिनीच्या विभागाकडून आघाडीच्या मदतीसाठी, मदत-पथके पाठविण्याचे हुकूम दिले पण निर्माण झालेल्या अडथळ्यांच्या गर्दीतून, महमद अलिखान आणि सय्यिद नुरुल हसन बिलग्रामी यांच्या अधिपत्याखालील फक्त ३०० घोडेस्वारानाच आघाडीला लढत असलेल्या फळीपर्यंत मार्ग काढता आला आणि तोही जबरदस्तीनेच-मदतीसाठी आलेल्या या मूठभर सैन्याला, अर्थातच आघाडीवर लढणाऱ्या सैन्याचा गेलेला आत्मविश्वास पुन्हा आणता आला नाही. या सुमाराला धुळीच्या वादळासहित सोसाटयाचा वाराही, सुरू होऊन आधीच निर्माण झालेल्या गोंधळात अधिकच भर पडली आणि वजीराच्या लोकांपैकी अनेकानी आता युद्धभूमी सोडण्यास सुरवात केली. [सियार (३) ३३; गु.-इ-र.-३८].

अशाप्रकारे औध सैन्याच्या आघाडीच्या विभागाचा मोड केल्यावर त्या सैन्याच्या मध्यभागी असलेल्या वजीराकडे, अहमदखानाने निश्चयाने लढत लढत, मार्ग काढिला. यानंतर तेथे काही काळ गोंधळातच लढाई चालली. यावेळी वजीराजवळ शिल्लक राहिलेल्या सैन्यापाशी काहीही तोफखाना राहिलेला नसून त्यांच्यासमोर मोठ्याच अडचणीही उभ्या होत्या. या उलट या लढाईत हालचाली करण्याबाबत आधीच पुढाकार घेण्याची व आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे लढा चालविण्याची संधी ( Initiative ) संपूर्णपणें अफ़गाणांच्याच हाती होती. तीन हजार पायदळ व त्याच्या मागच्या बाजूस थोडेसे घोडेस्वार अशा त्यांच्या एका आटोपशीर सैन्य विभागाने आता आपली एकाद्या पाचरासारखी रचना करून रजि-वजीराच्या डाव्या फळीविरूद्ध चाल केली. महमद अलिखान व त्याच्या बंदुकधारी पथकानी त्यांना जेव्हा थोपविले तेव्हा या अफगाण सैन्याने गोलाकार वळून वजीराच्या सैन्याच्या मध्यभागाकडे मोर्चा वळविला. या ठिकाणी वजीर आपल्या हत्तीवर स्वार होऊन, बसलेला असून त्याच्या भोवताली अगदी थोडे पण कट्टर अनुयायी होते आणि बाकीचे सर्व मैदान, पळून जाऊन भटकत आलेल्या त्याच्या सैनिकांच्या गटागटानी भरलेले होते. अफगाणांनी प्रथम, हत्तीवर बसलेल्या लोकांच्या बाजूने गोळीबाराच्या फैरी झाडल्या. नंतर हातात तरवारी परजत त्यांनी वजीराच्या सैन्यावर धडक मारली. सफ्दरजंगाच्या माहुताला गोळी मारून ठार करण्यात आले. सफ्दरच्या स्वतःच्या मानेला गोळी लागून तोही मूर्छित होऊन, पितळी पत्र्याने मढविलेल्या आपल्या हौद्यात पडला. यानंतर माहुताविना राहिलेला तो हत्ती त्या मैदानावर सैरावैरा भटकत होता पण तो वजीराचा आहे हे अफगाणाना ओळखता आले नाही. आणि यामुळे वजीराचा जीव मात्र बचावला. [सियार (३) ३३].

अफगाणांचा निर्णायक जय झाला. औधचे सैन्य सैरावैरा पळू लागून विस्कळीत झाले. विजयी अफगाणानी काही थोड्या अंतरापर्यंत त्यांचा पाठलाग केला. या पाठलागाच्या वेळी अगदी शेवटपर्यंत लढत असलेला नज्मुद्दौला इशाकखान २ रा, हा मारला गेला. नज्मुद्दौला शाही वतनवाड्यांचा ( Crown lands ) दिवाण असून वजीराचाही भाईबंद व जिवलग मित्रही होता. त्याला जेव्हा शत्रूनी घेरले होते तेव्हा त्याने, आपणच सफ्दरजंग आहोत असे ओरडत, शत्रूचे लक्ष वजीरापासून बाजूला वळविले होते. दुसरीकडे यावेळी जगत नारायण (राजा लछमी नारायण याचा धाकटा भाऊ) वजीराच्या हत्तीवर स्वार झाला आणि त्याने त्याला रणांगणातून सुरक्षित बाहेर नेले.

युद्धात जखमी झालेला वजीर व त्याचप्रमाणे महमदखान, या जखमी झालेल्या दोघांनी, युद्धभूमीच्या पश्चिमेस २२ मैलांवरील मऱ्हारा खेड्यापर्यंत माघार घेतली. यावेळी त्यांच्याबरोबर, दोनशेपेक्षाही कमीच सैनिक असले तरीही, जवळ असलेल्या लोकांमध्ये काही शिस्त व लष्करी रचना असल्याचा देखावा निर्माण करीत ते, दुसरे दिवशी सकाळी तेथून दिल्लीला परत जाण्यास निघाले. वजीराच्या मालमत्तेपैकी बरीचशी त्याच्या स्वतःच्याच मुघल सैनिकांनी आणि बाकीची भोवतालच्या खेडुतांनी लुटली. वजीराकडील औध-सैन्याच्या उजव्या बगलेवरील, विजयी विभागाने (पहा –६ परि. १) रुस्तुमखान आफ्रिडीच्या विभागाचा दूरवर पाठलाग केला. तेथून जेव्हा ते परत आले तेव्हा, त्यांच्या गैरहजेरीत झालेल्या एकूण लढाईत, पुन्हा भरून काढता येणार नाही, पूर्वस्थिती प्राप्त करून घेता येणार नाही इतका पराभव व वाताहात झाली असून त्यांचा धनी—वजीर—हाही कोठे दिसत नाही, असे त्यांना आढळले. तेव्हा पश्चिमेच्या बाजूने त्यांनीही माघार घेतली.

अफगाणांना जय मिळाला तोही अगदी मोक्याच्या वेळेला मिळाला. सकाळपासून त्यांचा दीर्घकाळ फारच अनिश्चिततेच्या वातावरणात व अतिशय परिश्रमांच्या कष्टप्रद प्रयत्नात गेला असून अशा दिवसाच्या अखेरी त्यांना विश्रांतीसाठी काही अवसर आवश्यक होता अशावेळी हा विजय त्यांना मिळाला. त्यांच्या एकूण सैन्यापैकी एका विभागाचा पूर्ण नायनाट झाला असून, त्यात सुमारे ६००० सैनिक व संबंध सैन्यातील दुसऱ्या स्थानाचा प्रमुख सेनापती, हे नष्ट झाले होते. सकाळ पासूनचा एकूण झगडाच, इतका गोंधळ उडविणारा झाला होता की, त्यातून झालेला वजीराचा पराभव किती पूर्णपणे झाला आहे हे त्यांना कळून येईतो सूर्यास्तही होऊन गेला होता. यामुळे विजयी अफगाणांना शत्रूचा पाठलाग करणे शक्य न झाल्याने, त्यांना आपल्या विजयाचा पुरेपूर फायदा ताबडतोब उठविता आला नाही—वजीराचा पाठलाग करता आला नाही. तथापि वजीराची उभी असलेली छावणीमात्र अफगाणांनी ताब्यात घेतली, पण तीही त्यातील चीजवस्तू वजीराच्या सैनिकांनी व सभोवतालच्या खेडुतांनी लुटून नेल्यावर.

## § ७ : सफ्दरजंगाची शाही दरबारातील मानखंडना

सफ्दरजंग जीव बचावून दिल्लीला परतला पण आता लवकरच त्याच्या मानखंडनेचा पेला काठोकाठ भरला. मुघल साम्राज्याच्या इतिहासात यावेळी प्रथमच, साम्राज्याच्या सर्वोच्च वजीराचा पराभव, एका उपटसुंभ जहागिरदाराच्या मुलाने व त्याच्या गावंढळ सैन्याने, समोरासमोर झाल्या लढाईत केला होता. वजीराला लढाईत झालेली जखम तापवलेल्या लोखंडाने भाजून काढून (Cauterized) लढाईनंतरच्या रात्रीच तिच्यावर उपचार करण्यात आले व ती झपाट्याने भरूनही आली. पण दिल्लीच्या वाटेवरील त्याचा प्रवास मात्र, आपली अतिशयच मानखंडना झाली असल्याचे डाचत आहे अशा मनस्थितीतच त्याने चालविला होता.[1] त्याच्या पराभवाची बातमी प्रथम आली ती, तो मारला गेला आहे अशा अफवांनी अतिरंजीत केलेली होती. (भा. पहा : प्र. ७–११ परि. ३). अशी ही अतिरंजीत बातमी आल्याबरोबर दरबारातील त्याच्या शत्रूंनी डोके वर काढले. या विरोधी गटात जाविदखान, बादशहाची आई आणि इन्तिझाम-उद्-दौला (माजी वजीराचा मुलगा) हे पुढारी असून या गटाने त्याचा वाडा व मालमत्ता खालसा करण्याचा बेत आखला. पण आलेल्या बातमीबद्दल खात्री करून घेण्यासाठी काही दिवस ते थांबले. दरम्यान त्यांच्या या दुष्ट बेताची बातमी बाहेर फुटली व सफ्दरजंगाच्या दिल्लीतील वाड्यात असलेल्या त्याच्या पत्नीला कळली तेव्हा या हिंमतवान बेगमने, ही बातमी मिळाल्याबरोबर आपला मुलगा व कुटुंबीय याना हुशारीने व दक्ष रहाण्यास आणि पहारा ठेवण्यास सांगून आपल्या

१ "माहुताने त्याचा हत्ती रणभूमीवरून बाहेर काढला आणि नंतर एक दिवसात, सुमारे ४० कोसावर इतक्या दूर असलेल्या, कोइल (Koil) या ठिकाणाजवळ तो येऊन पोहोचला. सर्वच चीज वस्तू लुटल्या गेल्या होत्या. त्या रात्री हत्तीची राहुटी (Housing of his Elephant) जमिनीवर बिच्छान्याप्रमाणे पसरून व मिळू शकेल ते खाऊन, वजीर जमिनीवरच झोपला. .......नंतर २२ शव्वल, (Shawwal) या दिवशी, बादशहाला न भेटताच तो दिल्लीमध्ये आपल्या स्वतःच्या वाड्यात शिरला. (लेखक सरकार :– हा दिवस २९ शव्वल म्हणजे २२ सप्टेंबर असला पाहिजे.) पुढे जवळ जवळ २ महिने तो दरबाराला आला नाही. नंतर एके दिवशी बादशहा एका उद्यानाकडे (पार्क) भेट देण्यास जात असताना वजीराच्या वाड्याच्या बाजूने गेला. तेव्हा वाड्यातून बाहेर येऊन वजीराने त्याची मुलाखत घेतली. बादशहाने त्याच्या प्रकृतीबाबत चौकशी केली. त्याच्या जखमेचेही परीक्षण केले आणि त्याचे सांत्वनही केले. जखम बरी झाल्यावर शरमलेल्या मनस्थितीत व भीतभीतच वजीर दरबारात आला (त.-इ.-अ.-२६ब-२७अ.).

वाड्यात सैन्यही एकत्र केले, दरवाजे बंद करून टाकले आणि वेढा घातला तर त्याला तोंड देण्यास ती सज्ज राहिली. दिल्लीसमोर सफ्दरजंग येऊन पोहोचला (२० सप्टेंबर) ते यानंतर तो मेलाही नव्हता वा सैन्याशिवायही नव्हता हे त्याच्या विरोधकांना कळून आले. "मी तुम्हाला, मेलो आहे असे जरी वाटत असले तरी कोणाही जिवंत व्यक्तीपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे"... असा इशाराही त्याने जाविदखानाला पाठविला. तेव्हा त्याच्यापुढे त्याच्या शत्रूंचे अवसान गळाले आणि त्यानी, आपल्या नुकत्याच झालेल्या वागणुकी-बाबत सबबीही सांगितल्या.

पण पराभूत झालेल्या वजीराने आपल्या धन्याला तोंड कसे दाखवावयाचे हा प्रश्न होताच. अशा परिस्थितीत इन्तिझाम-उद्-दौला याने बादशहाला पटवून त्याच्याकडून वजीराला संदेश पाठविला की, युद्धभूमीवरून वजीराने जर पळ काढला तर त्याला अधिकारावरून काढून टाकून निवृत्तीत रहावयाला लावले पाहिजे असा बादशाही घराण्याचा नियम असल्याने आता दरबारात येण्यास तो वजीराला मनाई करीत आहे. विरोधकांच्या या चालीला 'कटशह' देण्यासाठी वजीराने जाविदखानाला ७० लाख रुपयांची लाच देण्याचे वचन दिले आणि त्या सर्व शक्तीमान खोजाने बादशहाचा राग घालवून, वजीराचा दरबारात पुन्हा प्रवेश करून दिला. [मुझ. १९; सियार (३) ३६, बयान २६३; इमाद ५०].

आपल्या झालेल्या पराभवाबद्दल अफगाणावर सूड उगविण्यासाठी योजना तयार करण्याच्या कामाला, आता सफ्दरजंग लागला. हे उद्दिष्ट साधण्यासाठी मराठे व जाट यांच्यापेक्षा ,अधिक चांगले साधन त्याला कांही दिसले नाही, तेव्हा रोहिलखंडात नवी मोहिम काढण्यासाठी योग्य मोबदला देऊन त्यांची मदत मिळविण्यासाठी त्याने वाटाघाटी सुरू केल्या.

## § ८ : दो आबाच्या खालच्या (–) आग्नेय ( Lower Doab ) भागावर बंगशची स्वारी : अलाहाबादेचा वेढा

दिल्लीकडे अशा हालचाली चालू असताना, रामचटौनीच्या लढाईचा दुसरीकडेही परिणाम झाला होता. या लढाईमुळे वजीराच्या अंमलाला पायापासून हादरा बसला होता. दिल्लीच्या पूर्वेकडील संपूर्ण दोआब आणि अलाहाबादेच्या किल्ल्यासहित औधप्रांत, म्हणजेच वजीराच्या अमलाखालील भाग, हा आता संरक्षण विरहित उघडा पडला होता. अहमद बंगशने आपल्या विजयापाठोपाठ, अलिगड पासून ते अकबरपूर–शाहपूर इतका कानपूर जिल्ह्यातील भाग आपल्या ताब्यात घेतला आणि नंतर तो फरुखाबादला परतला. हे करीत असतानाच त्याने, एक सैन्य, आपला मुलगा महमद याच्या हाताखाली देऊन, औधवर स्वारी करण्यास पाठविले व शिवाय दुसरेही एक सैन्य शादिलखानाच्या हाताखाली, अलाहाबादेच्या दक्षिणकडील दोआब जिंकण्यासाठी पाठविले. याचबरोबर त्याच्या अधिकाऱ्यांनी (गव्हर्नरानी) फापुंड (Phapund), शम्साबाद आणि छिब्रामाऊ (Chibramau) हीही व्यापली. पण कोराजवळ (Kora फत्तेपूर जिल्हा), वजीराचा स्थानिक अधिकारी बकाउल्लाखान (Baqaullah) याने, शादिलखानाचा पराभव करून त्याबाजूची त्याची प्रगती रोखली. तेव्हा अहमदाने स्वतः फार मोठे सैन्य घेऊन तिकडे कूच केले व अलाहाबादेला वेढा घातला. [फरु. गॅझे. १६४-१६५]

बकाउल्लाखानाच्या नेतृत्वाखालील या अजिंक्य किल्ल्याने अहमदाविरुद्ध दीर्घकाळ व शौर्याने लढा दिला. या लढ्याच्या कामात, बकाउल्लाखानाला एक तऱ्हेवाईक मित्र, 'नाग--लोक' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या त्याच्या अनुयायांसह मिळाला. हा मित्र म्हणजे राजेंद्र गिरी गोसाई (R. Gosai) नावाचा एक लढवय्या महंत असून त्याचे क्रूर अनुयायी आपल्या सबंध शरीराला भस्म फासून विणलेल्या, लांब केसांच्या, जटा राखीत व संपूर्णतया नग्न रहात. हा शूर माणूस, दोन नद्यांच्या संगमाजवळ (प्रयाग) एक देऊळ होते त्याच्या नजीकच एका झोपडीत रहात होता. ही झोपडी किल्ल्याच्या पायथ्याशी तटाबाहेर होती. वेढा पडल्या-वरही ही झोपडी सोडून किल्ल्याच्या तटांचे आत सुरक्षिततेसाठी जाण्याचे या वीराने नाकारले. वेढा घालणाऱ्यांमध्ये काही निष्काळजीपणा वा एकादा कच्चा दुवा दिसला की, आपल्या साठ अनुयायांच्या टोळीच्या आघाडीला राहून तो, त्या दुर्बल ठिकाणावर विजेच्या चपळाईने हल्ला करी. यावेळी ते सर्व, तरवारी परजत, चपळ तट्टावरून अति झपाट्याने हल्ला करीत आणि शत्रूला भिडल्याबरोबर आपल्या डाव्या–उजव्या, दोन्ही बाजूच्या अफगाणांवर बेभानपणे तरवारी चालवीत आणि लगेच पूर्वी प्रमाणेच विजेच्या चपळाईने आपल्या ठिकाणी परत जात. असे प्रसंग दिवसातून दोनतीनदा घडत. किल्ल्यातील तोफांच्या संरक्षणाखाली, बकाउल्लाने यमुना नदी पलीकडे जाण्यास नावांचा पूल तयार केला. नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशातून आपल्यासाठी लागणारा पुरवठा मिळविण्याची व त्या भागाशी संपर्क साधण्याची अशी सोय त्याने आपल्या हाती सुरक्षित केली. दुसरीकडे डाव्या बाजूला अहमदखानाचे प्रमुख ठाणे झुसि (Zhusi . . अलाहाबादेच्या समोर. . . . नदीपलीकडे) येथे होते. तेथून तो आपली पथके पूर्वेच्या बाजूला जोनपूर (Jaunpur), अझमगड आणि बनारसकडे पाठवू लागला. परतावगड (Partabgarh–वा– प्रतापगड) चा राजा पृथिपत ( Prithipat –may be पृथ्वीपाल वा पृथ्वीपति ) सोमवंशी, अहमदखानासमोर हजर होऊन, स्वारी करून आलेल्या त्या अफगाणाला आपल्या पथकासह मिळाला. हा अफगाण सेनापती पुढे पुढे येत असताना, बनारस येथील प्रमुख पेढीवालेही आपल्या बाजूने पुढे आले आणि वाटेतच त्याच्यासमोर हजर झाले आणि त्यांनी त्याला सात लाख रुपये देण्याचे वचन देऊन, त्याने बनारसला येण्याचे, वाचविले. यामुळे बनारस जिल्ह्याचा कोणताही भाग स्वारी करून आलेल्या अफगाणांनी व्यापला नाही.[१]

अलाहाबादसारखा मोठा व बळकट किल्ला घेण्यासाठी अवश्य ती सामुग्री व क्षमता यापैकी एकही अफगाण सैन्याजवळ नव्हती. अशा परिस्थितीत इकडे-तिकडे, अशा विस्कळित-पणे चकमकी करीत हा वेढा चार महिने रेंगाळत चालला. यानंतर फरुखाबादेलाच धोका निर्माण झाल्याने, तो वेढा घाईने उठवून सोडून देण्यात आला. (एप्रिल १७५१ च्या प्रारंभी). तथापि हा भाग सोडून निघून जाण्यापूर्वी अहमदाच्या सैनिकांनी जे केले ते असे :–. . कांहीही भीती वाटत नसलेल्या, शूर, रक्तपिपासू असलेल्या अशा या सगळ्याच अफगाणांनी खुल्दाबाद वेशीपासून ते किल्ल्याच्या पायथ्यापर्यंतचे सबंध अलाहाबाद शहर लुटले, जाळून टाकले आणि तेथील खानदानी कुटुंबातील ४००० स्त्रियांना ओढून नेऊन गुलामीत लोटले, त्यांनी, फक्त शेख अफझल अलाहाबादीचे मकान ( Daira–रहाण्याचे ठिकाण ) आणि ज्या दरियाबाद मोहल्यात सगळेच रहिवासी अफगाण होते, तो मोहल्ला, या दोन भागांनाच तेवढा हात लावला नाही." [सियार (३) ३४, मुझ.५३, इमाद ६४; पे. द. नि. प. (२)२९].

१ इमाद-५०. यावेळी बनारसच्या लोकांना बसलेला धसका व त्यांच्यात निर्माण झालेला गोंधळ, त्यांनी पाटण्याकडे केलेले पलायन, वाटेत झालेले दरोडे व लूट आणि शहरात निर्माण झालेले अराजक, यांचे वर्णन राजवाड्यांच्या खंडात आलेले आहे. पहा : राजवाडे (३) ३७६ व ३८३.

## § ९ : बंगशांच्या औधवरील मोहिमेला आलेले अपयश; १७५१

अफगाणांची औधवरील स्वारीही इतकीच अपयशी झाली होती. महमद बंगश (अहमदाचा एक मुलगा), १ फेब्रुवारी १७५१ ला, मोठ्या सैन्यानिशी, बिलग्रामच्या पश्चिम बाजूला पोहोचला. (बिलग्राम–फरुखाबादेच्या आग्नेयेस ३२ मैलावर). या ठिकाणी त्याने आपली छावणी ठेवली आणि त्याच्या लोकानी त्या प्रसिद्ध शहराची लूट करण्यास सुरुवात केली या शहरातील रहिवाशांपैकी बऱ्याच जणांचा उच्च कुटुंबियांशी वा बड्या लोकाशी संबंध असून, पेशाने ते सैनिक होते. त्यांनी लूटालूट करणाऱ्या अफगाण सैनिकांशी लढा दिला. या लढ्यात उभय पक्षांचे थोडे थोडे लोक जखमी होऊन, स्वारी करून आलेल्या सैन्याची सुमारे २०० जनावरे पळवून नेण्यात आली. तेव्हा रागावून, त्या शहरावर जोराचा हल्ला करण्यासाठी महमदाने आपल्या सैन्याची तयारी केली; पण तेथील साधूसंतानी त्याचा राग शांत केला. (काहीतरी पैसा देण्याचे मान्य करून वा देऊनच त्याला शांत केले असले पाहिजे हे उघडच आहे). या ठिकाणापासून नंतर त्याने आग्नेय बाजूने, गंगा नदीच्या उत्तर काठावर, म्हणजे अलाहाबादेच्या उलट बाजूच्या काठावर, समोरच असलेल्या फाफा माऊ (Phapa Mau) कडे कूच केले आणि याबरोबरच, त्याच्या दुसऱ्या एका सेनापतीबरोबर पायदळ व घोडदळ मिळून वेगळे, २०,००० सैन्य देऊन त्याला लखनौकडे पाठविले. हा सेनापती वाटेतच थांबला कारण या वेळेपर्यंत लखनौमधील सफ्दरजंगाचे अधिकारी पळून गेले होते. तेव्हा तेथूनच त्याने आपल्या सैन्यापैकी ५००० चा एक विभाग, लखनौ ताब्यात घेण्यासाठी पुढे पाठविला. (लखनौ, बिलग्रामच्या आग्नेयेस ५६ मैलांवर). या विभागाच्या सेनापतीने संरक्षणाविना राहिलेले हे शहर ताब्यात घेऊन, आपला एक पोलीस अंमलदार तेथील कारभार करण्यासाठी प्रमुख म्हणून नेमला. या पोलीस प्रशासकाने इतका जुलूम केला की, त्यामुळे तेथील नागरिक निराश होऊन अविचारी बनले व त्यांनी काही शेखजाद्यांच्या नेतृत्वाखाली उठाव करून बंगश प्रशासकाला हाकलून दिले आणि तेथे सफ्दरजंगाचा अधिकार पुन्हा प्रस्थापित केला. तेव्हा याचा सूड घेण्यासाठी अफगाणांच्या आघाडीच्या संरक्षक पथकाने शहरात शिरून ते लुटण्याचा प्रयत्न केला, पण 'इस्माइलगंज' या उपनगराजवळ (लखनौच्या पूर्वेला) त्याला विरोध करून त्याचा पराभव केला. या अनपेक्षित पराभवाची बातमी कळल्याबरोबर, स्वारी करून आलेल्या मुख्य सैन्यामधून पुढे पाठविलेल्या दोन्ही पथकांनी, मागील बाजूस फाफामाऊ येथील मुख्य छावणीत असलेला आपला धनी महमूदशहा याच्याकडे पळ काढला. पळून आलेल्या पथकांच्या निराशेने महमूदशहालाही ग्रासले आणि त्यानेही घाईघाईने फाफा माऊपासून माघार घेतली. औधचा प्रदेश बळकावणाऱ्या बंगशने, तेथे, आपले न्यायाधीश (मॅजिस्ट्रेटस) व महसूल अधिकारी नेमले होते त्यानाही आता औधमधून घालवून देण्यात आले. [सियार (३) ३५; इमाद ५०–५१; मुझ. ५३].

## § १० : मराठे व जाट यांच्यासह सफ्दरजंगाची रोहिलखंडावर स्वारी

आता महमद बंगशला, रोहिलखंड या त्याच्याच मातृभूमीत जाऊन तेथेच शिक्षा करण्याचे तेवढेच राहिले होते. रामचटौनी येथे आलेल्या अरिष्टानंतर (१३ सप्टेंबर १७५०) कांही महिन्यात सफ्दरजंगाने दिल्लीदरबारातील आपले स्थान पुन्हा प्रस्थापित केले असून, मराठा सेनापती बरोबर, मदतीसाठी मैत्रीचा तह पूर्ण केला होता. अफगाणाना दडपून टाकण्याचे सामर्थ्य असलेली अशी, हिंदुस्थानात त्यावेळी असलेली एकमेव शक्ती म्हणजे मराठ्यांचीच

असल्याने त्याने आता हा पवित्रा घेतला होता. यानंतर त्याने रोहिलखंडावर स्वारी करण्याची योजना आखली. त्यानुसार मदत करण्यास येण्यासाठी जयाप्पा शिंदे आणि मल्हारराव होळकर याना, मदतीसाठी त्यानी आणावयाच्या सैन्य विभागासाठी, रोज २५,००० रुपये (वा ३५०००) व सुरजमलाला त्याच्या सैन्यासाठी रोज १५,००० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले. दारूगोळा व अग्निबाण हीही जमा करण्यात येऊन, जाविदखानाच्या मध्यस्तीने, युद्धसाहित्याच्या बादशाही कोठारातून काही तोफाही मिळविण्यात आल्या. [गु.–इ–र.–४०; सियार (३) ३६].

हिंदुस्थानात लष्करी मोहिमा काढण्यास हिवाळयाचे दिवस, निसर्गाचे दृष्टीने सोयीचे होत. पण मराठे-मित्र येऊन पोहोचण्याला वसंत ऋतू उजाडला. या मराठामित्रांनी आधीच स्वीकारलेले एक काम राजपुतान्यात चालू होते. त्यांना जयपूरच्या सिंहासनावर माधोसिंहाला बसवावयाचे असून त्या राज्याने (State) आधीच कबूल केलेली खर्चाची रक्कम, त्याकडून वसूल करावयाची होती (भा. पहा : प्र. ७ – ६ – ७). दुसराही एक प्रश्न होता तो असा की, राजपुतान्यातील काम पूर्ण केल्यावर लगेच, निजामाला उलथून टाकून दक्षिणेतून घालवून देण्याचा पूर्वनियोजित प्रयत्न करण्यास त्यांनी दक्षिणेत परत यावे असे पेशव्यांचे, आधीचेच हुकूम होते. तेव्हा राजपुतान्यातील कामानंतर ताबडतोब दक्षिणेत जाण्याऐवजी रुहिला मोहिम हाती घेण्यास, पेशव्याला लिहून त्याची संमती घेणे या सरदारांना अवश्य होते. अशा एकूण परिस्थितीत, त्यांना जयपूर येथून पुढे जाता येईतो फेब्रुवारीचा दुसरा आठवडा उजाडला. अखेरी आपली सर्व व्यवस्था पूर्ण झाल्यावर, सफ्दरजंगाने ११ फेब्रुवारीला, बादशहाचा औपचारिक निरोप घेतला व तो 'महाबतखानाच्या' * वाळवंटी काठावरील आपल्या प्रवासी तंबूत येऊन दाखल झाला. (*भा. येथे महाबतखान हे व्यक्तीचे नाव नसून एखाद्या तलावाचे वा महाबतखान नावाच्या व्यक्तीच्या मालकीच्या तलावाचे नाव असावे.) तेथून १८ तारखेला त्याने पुढे 'किसनदासाच्या' तलावाकडे कूच केले. नंतर दोन दिवसानी त्याचा मित्र मल्हारराव येऊन त्याला मिळाला. आपल्या जाट सैन्यासह सुरजमलही येऊन पोहोचला आणि नंतर मोहिमेची आखणी करण्यात आली. [पे. द. नि. प. (२१) ४०; (२) ३१].

लढाई चालवावयाच्या आघाडीपासून,[1] पिछाडीस सुमारे वीस मैल अंतरावर वजीर राहिला. युद्ध बरेच दिवस चालल्यानंतर त्याच्या पुढील अवस्थेच्या काळात तर तो आपल्या दिल्लीतील रहात्या वाड्यात परत आला. प्रत्यक्ष लढाईच्या तडाख्याला तर त्यांच्या मित्रांनीच तोंड दिले. यावेळी कोइल ( Koil–अलिगड) व जालसार या भागावर शादिलखान हा बंगश अधिकारी गव्हर्नर म्हणून होता. त्याच्याजवळ ४००० घोडेस्वार आणि तितकेच पण बिनभरंवशाचे पायदळ होते. प्रथम मराठ्यांच्या, सुटसुटीत व चपळ अशा २०,००० घोडदळाने दौड मारून, शादिलखानावर., "अकस्मात आलेल्या अरिष्टाप्रमाणे" धाड घातली. तेव्हा तुलनेने फार मोठ्या अशा विषम शत्रूपुढे निभाव लागणार नाही म्हणून शादिलखानाने कालीनदी व गंगा ओलांडून पलीकडे, फरुखाबादेकडे पळ काढला. या हल्ल्यात विजयी शत्रूनी, त्याच्या अफगाणांपैकी बरेच ठार केले वा कैद केले; त्यांची मालमत्ता हस्तगत केली (सुमारे २०

१ फरू. गॅझेटिअर १६६ ; पे. द. नि. प. (२) ३२, (२६) १७६ ;–"......मराठे व जाट दोआबात शिरले......अहमद बंगशने आपल्या आघाडीचे संरक्षक सैन्य, मल्हार व जाट यांना विरोध करण्यासाठी पाठविले पण त्याचा पराभव होऊन, त्याला ७ वा ८ हत्ती व चार ते पाच हजार घोडे मागे सोडून पळावे लागले व ते शत्रूंनी लुटून नेले. यावेळी अनेक पठाण मारले जाऊन त्यांची छावणीही लुटली गेली

[पुढील पानावर]

मार्च) आणि अशाप्रकारे एकाच चढाईत तो मोठा प्रदेश बंगश पक्षियांच्या प्रतिनिधींच्या हातातून मुक्त केला. या आपत्तीची वार्ता मिळाल्याबरोबर अहमदखानाने ताबडतोब अलाहाबादेचा वेढा उठविला व तो फरुखाबादेला परतला. (भा. टीप–पहा – ८ परि. शेवटचा). अशा रीतीने माघार घेत असताना वाटेतच त्याच्या सैन्यापैकी भाडोत्री सैनिक त्याला सोडून गेल्यामुळे, तो परत आला तेव्हा त्याच्या सैन्यापैकी थोडेसेच लोक त्याच्याजवळ शिल्लक राहिले होते.[१]

या परिस्थितीत त्याने, आपली राजधानी सोडावयाची व दुसऱ्या एका लहान किल्ल्यामधून शत्रूविरुद्ध लढा द्यावयाचा असे ठरवले. हा किल्ला फरुखाबादेच्या पूर्वेस तीन मैलावर गंगानदीच्या हुसेनपूर उताराजवळ, नदीवर लक्ष ठेवता येईल असा ऊंच व काठावरच आहे. या किल्ल्याला आता फतेगड–( Fatehgarh ) असे म्हणतात. नदीपलीकडे रुहिल्यांचा प्रदेश असून फक्त त्यातूनच, सशस्त्र मदत व रसद त्याला मिळविता येणे शक्य होते. या ठिकाणी त्याने खंदक व बांध तयार केले. शिवाय या किल्ल्याच्या जमिनीकडील बाजूला खोल घळीही असल्यामुळे, त्याला नैसर्गिक संरक्षण सोयही लाभली होती.

मराठ्यांनी दोआबातून पुढे पूर्वेकडे झपाट्याने चाल केली. यामध्ये त्यांना फारच थोडा किंबहुना जवळजवळ मुळीच विरोध झाला नाही. त्यांनी फतेगडच्या अफगाण ठाण्याला वेढा घातला. यानंतरच्या हालचालींचे वर्णन आढळते ते असे :. . . "किल्यापासून पश्चिमेला अर्धा मैलावरील कासिमबाग येथे आपले मुख्य ठाणे स्थापन करून मराठ्यांनी फतेगड येथील अफगाणाच्या ठाण्याला वेढा दिला आणि त्याचवेळी, गंगानदीच्याच काठावर आणखी पुढे सुमारे ११ मैलावर सिंगीरामपूर नावाचे एक खेडे व नदीचा उतार होता त्याच्याकडे वजीराने कूच केले. या ठिकाणी उतारमधून पलीकडे जाण्यासाठी एक पूल तयार करण्याचा त्याने प्रयत्न केला पण तो, नदीपलीकडच्या बाजूला, फतेगडसमोर तळ ठोकून बसलेल्या, महमदखानाच्या एका अधिकाऱ्याने उधळून लावला. दरम्यान मराठे फतेगडाचा वेढा रोजच आवळीत आणि त्याच्यावर हल्ले चढवित. उलट वेढले गेलेले पठाणही पुनःपुन्हा अचानक हल्ले करीत. तथापि या झटापटीत कोणत्याही पक्षाचा फारसा प्रभाव पडला नाही. अशा प्रकारे महिन्यापेक्षाही दीर्घकाळ वेढा चालल्यानंतर, सादुल्लाखान (अलि महमदाचा मुलगा) आपल्या १२००० रुहिला सैन्याची कुमक घेऊन तेथे येऊन पोहोचला.

"१७ एप्रिलला सिंगिरामपुर येथे वजीराने नदीवरून पलीकडे जाण्यासाठी नावांचा पूल तयार केला आणि त्यावरून मराठे व जाट यांनी नदी ओलांडली व ते डाव्या म्हणजेच पूर्व किनाऱ्यावर आले. दुसरे दिवशी सादुल्लाखानही त्या किनाऱ्यावर फत्तेगडच्या समोर येऊन पोहोचला व त्याने आपल्या सैन्याची महमदखानाच्या सैन्याशी हातमिळवणी केली. अहमद पश्चिम किनाऱ्यावरून नदी ओलांडून येऊन त्याला मिळण्यापूर्वीच, तारुण्यसुलभ अविचारी उतावळेपणाच्या आहारी जाऊन, सादुल्लाखानाने मराठ्यांच्यावर हल्ला केला, तेव्हा मोठी लढाई झाली आणि शेवटी अफगाणांचा पराभव झाला. यावेळी निव्वळ जीव

[मागील पानावरुन]
व त्यांची दोन वा तीन ठाणीही हस्तगत होऊन त्या सर्व भागात मराठ्यांची मोठी दहशत पसरली." पे. द. नि. प. (२१) ४१ब व ४३, (२) १४व १४अ ; (२७) ६६, (२६) १७५; खजिना-इ-अमि.- (३) ८३-८४.

१ दोआबातील, मराठ्यांच्या या स्वारीच्या तपशिलासाठी पहा : राजवाडे (३) ३८३-३८४.

बचावून सादुल्ला आणि महमद यांनी दूर पळ काढला—सादुल्लाने अवोनलाकडे व महमदाने फतेगडकडे. त्यांच्या सैन्यापैकी दहा हजारावर सैनिक मारले गेले वा जखमी झाले. हत्ती, घोडे, सतरंज्या—बैठका आणि कपडे अशी त्यांची सर्व मालमत्ता मराठ्यांच्या हाती पडली.

"रात्र पडल्यानंतर नदीपलीकडील किनाऱ्यावरील रुहिल्यांच्या छावणीवर तोफांचा व अग्निबाणांचा मारा करण्यात आला. यातून लागलेल्या आगीचे लोट पाहून अहमदखानाच्या फतेगडमधील शिबंदीच्या हृदयात धडकी भरली. . . . . . .तेव्हा रात्रीच्या रात्री नबाबाने (अहमदखानाने) आपले नातलग व जहागिरदार—सरदार यांच्यासह किल्ला सोडला व ते फतेगडच्या वरच्या बाजूला म्हणजे प्रवाहाच्या उलट दिशेला (पश्चिमेला– Up the river) १५ मैलावरील, कामराउल या उताराकडे पळाले व तेथे त्यांनी नदी ओलांडून अवोनलामध्ये आश्रय घेतला. पळून जात असताना, यापैकी अनेकांना, फतेगडपासून नदीच्या वरच्या बाजूला चार मैलावर, शिकारपूर घाट येथे, मराठ्यांनी गाठून, त्यांच्यापैकी अनेकांना ठार केले. पुढे दुसरे दिवशी सकाळी (१९ एप्रिल) मराठ्यांनी फतेगडमध्ये मागे राहिलेल्या शिबंदीपैकीही अनेकांना ठार करून पुष्कळांना कैद केले आणि फतेगड किल्ला ताब्यात घेतला. इकडे अवोनलांच्या रुहिल्यांनी, अहमदबंगशची बाजू व हितसंबंध म्हणजे आपलीच बाजू आणि हितसंबंध असे मानून त्याच्याशी ते पूर्णपणे एकरूप झाले. नंतर त्या सर्वांनी शक्य तितक्या जलदीने तेथून हिमालयाच्या पायथ्याकडे कूच केले." . . . . . .जाताना आपल्या घरातील स्त्रियांना व प्रमुख लोकांना बरोबर घेऊन ते गेले.

आता पावसाळा सुरू होण्याची वेळ जवळ आली होती, म्हणून वजीराने मोहीम, पावसाळा संपेतो स्थगित केली व तो लखनौला गेला. मराठ्यांनी आपली पावसाळी छावणी बंगश प्रदेशातच ठेवून या काळात त्यांनी त्या प्रदेशाची मन मानेल तशी लूट केली. त्यांनी यावेळी मिळविलेल्या लुटीचे मूल्यमापन करण्यात, इतिहासकार गुलाम हुसेन याचीही संभ्रमीत अवस्था होऊन त्यालाही तिची गणती करता येईना. तो म्हणतो. . . . . . "त्यातील केवळ एक जिन्नसच १६ लाख रुपये किंमतीचा होता." . . . . . .दुसरा एक इतिहासकार सय्यिद गुलाम अलि लिहितो. . . . . . "रुहिला देशाच्या मोहिमेत मल्हारला रोख दोन कोट रुपये मिळाले. . . . . . .शिवाय त्याने शहरांतून वस्तुंच्या रूपाने जे काही लुटले होते ते वेगळेच [सियार (३) ३६ ; इमाद ५७–५९ ; फरु. गॅझे. १६६–१६७ ; त.-इ.-अ.-२७ब–२८अ ; मुझ. ५४-५९ ; गु.-इ. र.-४०-४१ ; सुजानचरित्र ; जंग (४). ].

पावसाळा संपल्यावर, पठाणांनी फरुखाबादेच्या दिशेने चाल केली. तेव्हा त्याच्यासमोर मराठ्यांनी माघार घेऊन, गंगा ओलांडली आणि ते तिच्या पश्चिम बाजूला आले. वजीरही घाईने लखनौ येथून आला. त्यानेही गंगा ओलांडून तो मराठ्यांना मिळाला, आणि उभयतांनी पुन्हा चढाई सुरू केली. आता रुहिला पठाणांना मागे मागे रेटण्यात आले व त्यांनी, गंगेच्या डाव्या किनाऱ्याने नदीच्या प्रवाहाच्या उलट दिशेने अवोनलापर्यंत माघार घेतली. तेथे त्यांनी व बंगश सरदारांनी आपल्या मालमत्तेपैकी अतिशय मूल्यवान भाग एकत्र गोळा करून बरोबर घेतला, अवोनला सोडून दिले व चिल्कियाजवळ जाऊन तेथील डोंगराळ भागाच्या पायथ्याशी आश्रय घेतला.

त्या ठिकाणी त्यांनी जंगलामध्ये खंदक वगैरे खणून मोर्चेबंद ठाणे तयार केले. तेथे अल्मोराच्या राजाने त्यांना जरूर तो पुरवठा देण्याचे काम केल्याने त्याच्या जोरावर, त्यांनी, अनेक महिने आपला बचाव करण्यात व आपले ठाणे सांभाळण्यात यश मिळविले.

पोहोचता येणार नाही अशा त्यांच्या या ठाण्यातून, त्यांना हुसकावून बाहेर काढण्याचे सर्व प्रयत्न अपयशी झाले. पण या तराई भागातील अतिशय विषारी जंगल तापाने अफगाण व मराठे, दोघेही सारखेच, हजारोंनी मृत्यू पावले. अशाप्रकारच्या विस्कळीत लढायात मार्च १७५२ पर्यंतचे चार महिने रखडत गेले. "......ज्या लढ्यात काहीही लूट मिळण्याची शक्यता नव्हती आणि विशेष प्रकारच्या रोगट हवेत निर्माण होत असलेल्या रोगामुळेही त्रास होत होता त्या या लढ्याला मराठे कंटाळले," आणि परत जाण्याला उत्सुक झाले.[1]

## § ११ : सफदरजंग याचा रुहिले व बंगश यांच्याबरोबर तह

अब्दालीच्या पंजाबवरील स्वारीची बातमी आल्यावर (१७५२ च्या प्रारंभी); बादशहाने वजीराला आग्रह केला की त्याने रोहिल खंडातील अफगाणांच्याबरोबर तह करून राजधानीकडे घाईने परत यावे. तेव्हा १७५२ च्या प्रारंभी असा तह करण्यात आला त्यानुसार पुढीलप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. ......"स्वारीच्या खर्चासाठी सफदरजंगाने मराठ्यांचे जे देणे होते, त्याची सर्व जबाबदारी आता अहमदखानाकडे सोपविण्यात येऊन हे देणे संपेतो, त्याच्यापोटी, अहमदाने आपला अर्धा प्रांत मराठ्यांच्या स्वाधीन केला. ..... तथापि मराठ्यांना देण्यात आलेल्या परगण्यांचा कारभार मात्र अहमदाच्याच हाती ठेवण्यात आला होता असे दिसते. त्याने या कारभारासाठी लागणारा खर्च भागवून शिल्लक रहाणारा वसूल, कनौज (Kanauj) आणि अलिगंज या ठिकाणी ठेवलेल्या दोन दक्षिणी पेढीवाल्यांच्याकडे द्यावा असेही ठरलेले दिसते." (भा. अर्धा प्रांत तोडून दिला म्हणजे प्रत्यक्ष मुलुख न देता त्याच्या कारभाराचा खर्च वजा करून बाकीचा महसूल देण्याचे ठरले असाच याचा अर्थ). 'सियार-उल-मुतख्खरिनच्या' लेखकाने याबाबत आणखीही तपशील दिला असून या तपशिलाला 'बयान-इ-वकाई' (Wakai) मध्येही पुष्टी दिलेली आहे : मराठ्यांच्या देण्याबाबत केलेल्या या व्यवस्थेबरोबरच अहमद आणि महमदखान बंगशची इतर मुले यांच्यासाठी फरुखाबाद आणि इतर काही महाल ठेवण्यात आले. या महालातून १६ लाख रुपये वसूल (किंवा बयानमध्ये मानले आहे तसे २२ लाख) मिळण्यासारखा होता. याचबरोबर मिराबाद व आणखी दुसरे काही जे महाल, अलिमहमद रुहेल्याच्या मुलांनी काइमखानाच्या मृत्यूनंतर बळकावले होते ते यापुढेही, त्यांनी या महालाबाबत महसूल पट्टीमात्र द्यावी या अटीवर, त्यांच्याचकडे रहावे असे ठरले. कनौज, अकबरपुरशाह व बंगश-कुटुंबाच्या मालकीचे असेच इतर भाग, गोविंदपंत बुंदेले या मराठ्यांच्या प्रतिनिधीच्या ताब्यात ठेवण्यात आले. एकूण प्रांतापैकी काही ठाणी सफदरजंगाने आपल्यासाठीही ठेऊन घेतली. अशाप्रकारे, रुहिले व बंगश हे, त्यांना दडपून टाकण्यासाठी झालेल्या या, त्यांच्या तुलनेने अतिशय मोठ्या स्वारीमधून, आश्चर्य वाटण्याइतकी थोडी व कायमची नुकसानी सोसावी लागून मुक्त झाले.

"जानेवारी १७६१ मध्ये पानिपतची लढाई होईतोपर्यंत ही स्थिती अशीच राहिली." त्या लढाईतील विजेता अब्दाली, याच्यासाठी रुहिले आणि बंगश यांनी चांगली कामगिरी

१ सियार (३) ३७ ; गु.-इ.-र.-४३ ; एके दिवशी जंगलातील एका लढाईमध्ये मल्हारचा लाडका मुलगा खंडेराव पकडला गेला. त्याला अहमदखानाने प्रेमळ वागणूक देऊन नंतर मुक्तही केले. अहमदाच्या या वागणुकीमुळे मल्हारराव होळकर त्याचा अगदी मनापासून कृतज्ञ होता. त्याने वजीराला स्पष्टच सांगितले की तो काही अहमदखानाविरूद्ध अगदी निकराच्या व कटु शेवटापर्यंत लढणार नाही. (बयान २६५).

बजावली. यामुळे त्या विजेत्या अफगाणशहाने दिल्लीच्या शासनाबाबत नव्या व्यवस्थेची जी घडण केली त्यात हे रुहिले व बंगश महत्त्वाच्या उच्च स्थानावर चढले. ....... "पानिपत येथे मराठ्यांचा पराभव झाल्यावर त्यांनी उत्तर हिंदुस्थानातून आपले अंग काही काल काढून घेऊन तेथील आपल्या हालचाली काही वर्षे मागे घेतल्या. तेव्हा अहमदखान बंगशने या संधीचा फायदा घेऊन, १७५२ च्या तहाने त्याला ज्या प्रदेशाला मुकावे लागले होते त्यापैकी बहुतेक सर्व परत घेतला". [फरु. गॅझ. १६७-१६८ ; सियार (३) ३७ ; बयान २६५-२६६ ; इमाद ५९ ; चहार गुल. ४०७ ; गु.-इ.-र.-४४-४३ (यामध्ये तहाच्या अटी दिलेल्या नाहीत)].

प्रकरण दहावे

# पंजाब १७४८-१७५४

## § १ : मुइन-उल्-मुल्क-पंजाबचा सुभेदार : त्याचे अंतर्गत शत्रू

अब्दाली पंजाबवर स्वारी करून आला तेव्हा त्याचा मानपूर येथे मोठा पराभव झाला पण या लढाईच्या सुरवातीसच बादशहाचा वजीर कमरूद्दिन हा मारला गेला. (११ मार्च १७४८: भा. पहा प्र. ५§१५). ही वार्ता बादशहा महमदशहाला जेव्हा कळली तेव्हा त्याने, वजीराचा मुलगा मुइन्-उल्-मुल्क याला लाहोरचा सुभेदार नेमले (भा. पहा: प्र. ५§१६) व अफगाण शहाचा पाठलाग करून त्याला हिंदुस्थानच्या बाहेर घालवावे व गमावलेल्या पंजाबचा ताबा पुन्हा मिळवावा असे हुकूम पाठविले, पण हे काम काही सोपे नव्हते. पंजाबमध्ये झकरिया खानाच्या मुलांची, लाहोरची सुभेदारी मिळविण्यासाठी आपापसात युद्ध, नुकतीच झाली होती व त्यानंतर लवकरच अफगाणांची पंजाबवर स्वारी होऊन[१] त्यातून पंजाब सुभ्याचा कारभार पूर्णपणे विस्कळित झाला होता, तेथील बादशहाची सत्ता उधळली गेली होती व सर्वत्र बेबंदशाही माजलेली होती. या परिस्थितीत पंजाबचे गमावलेले भाग परत मिळविण्याचे काम काही सोपे नव्हते. मानपूरच्या लढाईनंतर शहाजादा अहमद व मुइन यांनी लाहोरच्या दिशेने पुढे चाल केली व लुधियानाजवळ सतलज नदीवर पोहोचल्यावर तेथे २२ दिवस मुक्काम केला. या मुक्कामाचे अखेरी त्यांना कळले की, अब्दालीने अटकजवळ सिंधूनदी ओलांडली आहे आणि मागे पंजाबचा सुभा मोकळा करून तो कंदाहारकडे परत गेला आहे. याचवेळी ९ एप्रिलला, त्या ठिकाणी बादशहाचा खलिताही येऊन पोहोचला. त्यानुसार शहाजाद्याला आता दिल्लीला परत बोलावण्यात आले असून मुइनला लाहोरचा सुभेदार नेमण्यात आले होते. या हुकूमाप्रमाणे लवकरच मुइनची लाहोरकडे सुभेदार म्हणून रवानगी करण्यात येऊन, शहाजादा शाही फौजांसह दिल्लीकडे परत येण्यास निघाला (१२ एप्रिल) (भा. पहा प्र. ५§१६—शेवट.). या घटनेमुळे मागे राहिलेल्या मुइनजवळ मात्र, अनावर पंजाबच्या कारभारावर पुन्हा नियंत्रण बसविण्याच्या कामी आधार म्हणून उपयोगी पडण्यासारखी, स्वतःच्या सैनिकी पथकाशिवाय काहीही साधने राहिली नाहीत. त्याची स्वतःची या वेळची फौज म्हणजे मानपूरच्या लढाईत अफगाणाच्या धडाक्याच्या हल्ल्यानंतर वाचलेली अशी, त्याच्या मूळ फौजेचा काहीसाच भाग होता. लाहोरकडे निघण्यापूर्वी सतलज नदीवरील छावणीत असतानाच तो, आपल्या बापाच्या जोडीच्या जुन्या सेनापतींना (कॅप्टन्स) त्यांच्या तंबूत जाऊन भेटला होता आणि त्यांनी त्यांच्याबरोबर लाहोरकडे यावे अशी त्याने विनवणीही केली होती. त्याच्याबरोबर लाहोरला जाण्यात, त्याच्या महत्त्वाकांक्षेला वाव मिळणार होताच, शिवाय त्यात पै. वजीराबद्दल कृतज्ञताही

---

१ पहा: प्र. ५–५, ६, १० इ. या लढाईच्या आरंभीच वजीर मारला गेला पण त्याचा मुलगा मुइन् याने लगेच बरीचशी सूत्रे आपल्या हाती घेतली. लढाई चालविली व जय मिळविला. यावेळी त्यावेळचा शहाजादा अहमद, या सैन्याबरोबर होता. ......सविस्तर हकीगत प्र. ५ मध्ये पहा.

दिसणार होती. पण बापाच्या या जुन्या मित्रांवर, महत्त्वाकांक्षेला संधी व कृतज्ञता, यांच्यापेक्षा, स्वतःच्या कुटुंबावरील प्रेम आणि राजधानीतील सुलभ, सुखासीन जीवनाचे आकर्षण, यानीच मात केली आणि त्याच्या विनवण्यांना नकार देऊन ते बादशहाच्या वारसाबरोबर दिल्लीला परतले.

अशा परिस्थितीत, फक्त स्वतःच्याच उरलेल्या छोट्या सैन्यानिशी, आपल्या नव्या सुभेदारीच्या राजधानीकडे निघण्याशिवाय आता मुइनपुढे दुसरा मार्ग नव्हता. तेव्हा २००० पेक्षाही कमी झालेले घोडदळ व त्याच्याशी व्यक्तीशः निष्ठा असणारे आणखी थोडेसे इतर सैन्य एवढेच बरोबर घेऊन तो लाहोरकडे निघाला आणि थोड्याच दिवसात तेथे पोहोचला. त्या ठिकाणचे पूर्वीचे अधिकारी व प्रमुख नागरिक यांनी शहराबाहेर येऊन त्याचे स्वागत केले. शहराच्या तटांच्या पलिकडील, फिदाइखानाच्या राजवाड्यात त्याने आपला मुक्काम ठेवला व तो सैन्य उभारण्याच्या कामाला लागला. तो भरती करून घेत असलेले सैनिक स्वाभाविकपणेच त्याच्या स्वतःच्या जमातीपैकीच, म्हणजे मध्य आशियातील तुर्कच होते.[1] यांना सामान्य जनता मुघल वा मुघलाई लोक असे म्हणत असे. नादीरशहाच्या सैन्याचे विघटन झाल्यावर या तूर्कांपैकी बरेचसे, नोकरीधंदा पहाण्यासाठी, यावेळी इकडे तिकडे भटकत होते. त्यातूनच त्याला आता आपल्या सैन्याची भरती करता आली. [ मिस्किन; त.-इ.-अ.-१०ब].

पंजाबचा हा नवा सुभेदार बुद्धिमान व न्यायी होता पण याचबरोबर तो सुखासीन, राजेशाही व शांतताप्रिय वृत्तीचा राज्यकर्ता होता. त्याच्यासमोर यावेळी साम्राज्यांतर्गत आणि साम्राज्याबाहेरील असे दोन्ही प्रकारचे शत्रू होते. यानंतर अधिकारावर आलेला नवा वजीर सफ्दरजंग हा तर त्याच्यादृष्टीने दिल्लीच्या आकाशातील एक घातकी दुष्ट ग्रहच होता. या वजीराजवळ दूरदर्शी राजकारण पटुत्व, देशाभिमान वा बादशाहीशी निष्ठा यापैकी काहीच नव्हते. आपली व्यक्तिगत भरभराट व वर्चस्व वाढविण्याच्याच दृष्टीने त्याने आपले धोरण अंधपणे चालविले. परिणामतः यातूनच मुघल साम्राज्याचा ऱ्हास घडवून आणण्याचे त्याच्या नशिबी आले. दिल्लीच्या दरबारात आणि निरनिराळ्या सुभ्यांमध्ये, आपण ज्यांच्यावर विसंबून राहू शकू अशा आपल्या माणसांचे एक कडेच आपल्याभोंवती कसे निर्माण करावयाचे व त्याच्या सहाय्याने आपले दिल्ली शासनातील स्थान कसे सुरक्षित राखावयाचे, एवढा एकच विचार व ध्यास सतत त्याच्यापुढे असे. सर्व ठिकाणी अधिकार पदावर, सरदार-उमरावामधील फक्त पर्शियन गटाचे लोकांचाच व त्यांच्याबरोबर इतर

१ मुइनने आपल्या नोकरीत घेतलेल्या या भाडोत्री वा पगारी सैनिकात (Mercenance) सबातुद्दिन व नाझीर महमद बेग या नावाचे दोन कॅप्टन्स–(जमादार) होते. मुइनबरोबर या दोघांची पहिली मुलाखत झाली त्यावेळी त्यांनी, मुइनला ८ वर्षे वयांची तीन मुले 'नजर' म्हणून दिली. यामध्ये 'तहमास्प' (Tahmasp) हा एक होता. आपल्या जीवनात तो पुढे दिल्लीमध्ये एक सरदार झाला. नंतर त्याने टोपण नावाखाली (१७८० मध्ये मिस्किन या टोपण नावाने) मुइनकडे आल्यानंतरच्या दहा वर्षात पंजाबमध्ये घडलेल्या घटनांची अतिशय महत्त्वाची, स्वतःच्या अनुभवातील नवी व मूळस्वरूप माहिती सांगून, लिहून घेतली आहे. तसेच या पुढील एका पिढीच्या काळातील, सबंध दिल्ली साम्राज्यातील घटनांची तशीच हकीगत सांगून लिहून घेतली आहे. (ब्रिटिश म्युझि.-पर्शि. ८८०७). १७९३ मध्ये दिल्लीमध्ये असलेल्या परकीय राज्यांच्या राजनैतिक वकिलाती वा आलेले राजनैतिक वकील यांच्याजवळ तो नोकरीवर असलेलाही आपणास आढळतो. [ हिंगण्यांचे मराठी खलिते (Despatches) ...... दिल्ली येथील,–पहा : संदर्भ-सूचि–मिस्किन–"तहमास्प खानाच्या आठवणी" ].

जमातीपैकी फक्त शिया पंथीयांचाच भरणा करावयाचा असेच त्याचे धोरण व कृती असे. सय्यद बंधूंचा शेवट झाल्यापासून ते यावेळेपर्यंत सतत तीस वर्षे, महमद अमीनखान अहरारी याच्या घराण्याने, दिल्लीचे वजीरपद आपल्याकडे राखले होते. तुर्की गटातील, निजाम व त्याच्यासारख्या अन्य सरदार–उमरावांच्या सहाय्याने हे वजीरपद, या अहरारी घराण्याचे वंशपरंपरागत पदच वा मालमत्ता बनले होते. ही प्रक्रिया थांबविलीच पाहिजे हाच सफदरचा सर्वांत महत्त्वाचा हेतू व ध्यास होता. याचदृष्टीने त्याची सर्व कृती आणि खटपट होती पण पंजाबमध्ये आता सुभेदार म्हणून नेमलेला 'मुइन' हा पै. वजीराचा मुलगाच होता. त्यावेळी मानपूरच्या युद्धातील यशाची प्रतिष्ठा त्याने मिळविली होती. पंजाबचा सुभा हा उत्तम लढवय्या सैनिकांची भरती करण्याच्या दृष्टीने, साम्राज्यातील एक उत्कृष्ट सैनिकी वृत्तीचा सुभा होता. अशा पार्श्वभूमीवर जर, या सुभ्यात, या सुभेदाराला आपले आसन बळकट व स्थिर करता आले तर तो आपल्या लष्करात भरती करण्यासाठी या सुभ्याचा उपयोग करील व तुर्की पक्षाला एकत्र येण्यासाठी एक केंद्रस्थान बनेल अशी सफदरला भीती होती. इतकेच नव्हे तर असे केंद्र बनल्यावर, वजीर पदासाठी तो सफदरला एक बलाढ्य प्रतिस्पर्धी होईल आणि आपल्या बापाकडून येणारे वजीरपद, या निमित्ताने त्याचा हक्क अनावर होईल अशीही भीती सफदरला होती. या एकूण परिस्थितीत स्वतःचे वजीरपद व वर्चस्व सुरक्षित करण्याच्या दृष्टीनेच सफदरची धोरणे व हालचाली होत्या.

मत्सरापोटी जन्मलेला, सफदरचा हा दुष्ट हेतू साध्य करण्याच्या योजनासाठी त्याने मिळविलेला पहिला हस्तक म्हणजे काबूलचा पूर्वीचा सुभेदार नासिरखान हा होय (भा. पहा प्र. ५–९). या सुमाराला तो बेकार असून शासनाने दुर्लक्षिलेल्या अवस्थेत दिल्ली येथे रहात. होता. आता दिल्ली सोडून नोकरीच्या शोधात तो लाहोरला आला. तेव्हा मुइनने त्याचे खूपच प्रेमळपणे स्वागत केले व सिआळकोट, पसरूर, गुजरात व औरंगाबाद अशा चार महालांचा फौजदार म्हणून त्याची नेमणूक केली, त्याला काही पैसाही दिला आणि या नव्या अधिकार पदावर त्याने आपला ताबा व प्रतिष्ठा प्रस्थापित केल्यावर, अब्दालीकडून काबूल परत मिळविण्याच्या त्याच्या प्रयत्नात आपणही ( मुलकी ) त्याला मदत देऊ असे आश्वासनही दिले. पण नासिरखान हा मात्र दुष्ट व कृतघ्नच ठरला. दिलेली नोकरी सुमारे एक वर्ष केल्यानंतर, आपल्या उपकारकर्त्यांवरच उलटण्याइतके आपण सामर्थ्यवान झालो आहोत असे त्याला वाटले. यावेळी सफदरजंगाकडूनही त्याला फूस लावण्यासाठी मोह पाडण्यासारखे निरोप येत होतेच. नासिरने आपले सैन्य वाढवावे, मुइनशी लढा द्यावा आणि त्याच्या हातातील लाहोरची सुभेदारी हिसकावून घ्यावी ; असे केल्यावर वजीरही दरबारातील आपल्या वजनाचा उपयोग करून त्याने हिसकावून घेतलेली ही सुभेदारी, औपचारिकरित्या त्याला देत असल्याचा रीतसर, दरबारी खलिता, त्याला मिळवून देईल ; असा या निरोपांचा थोडक्यात सारांश होता. यानंतर, अधिक पगार देण्याची लालूच दाखवून, मुइनकडील १००० उझबेक घोडेस्वारांना, नासीरने आपल्याकडे, फूस लावून घेतले, पण अशा प्रकारे केलेला हा एकूण कट बाहेर फुटला. मुइनने मोठ्या तत्परतेने, एक सैन्य सुसज्ज करून सियाळकोटवर स्वारी केली. चार तास लढाई देऊन त्याने नासीरचा पूर्ण मोड केला, आणि अशा प्रकारे ज्याची सर्वत्र छीथू झालेली आहे अशा नासीरची दाणादाण करून, त्याला दिल्लीकडे पिटाळून लावले. (जुलै १७४९ चा सुमार) [ मिस्किन ५–६ ; मुझ. ९, २६ ; त.-इ.-अ.-२४ब.].

या हालचाली चालू असतानाच, सफ्दरने मुइनच्या कुशीत आणखीही एक काटा, टोचून ठेवला होताच. या कामासाठी शहानवाझखान, (हिझबरजंग-झकरियाखानाचा २ रा मुलगा. भा. पहा. प्र. ५–५, ६.) हा आणखी एक उपयुक्त हस्तक त्याला मिळाला होता. हा शहानवाझ जन्माने तुर्क असला तरी, आता त्याने, सफ्दरचा शियापंथ स्वीकारला असून त्याचा पुरस्कार (Patronage) व मर्जी संपादण्याचा प्रयत्न चालविला होता. त्याला वजीराने सांगितले, "लाहोरची सुभेदारी वारसा हक्काच्या न्यायाने तुझीच आहे. सर्व प्रकारच्या साधनांनी ती जिंकून घेण्याची तयारी जरूर कर. मुलतानला जा ; तेथे आपल्या सैन्याची वाढ कर आणि सामर्थ्याच्या जोरावर मुइनला लाहोरमधून हाकलून दे." यावेळी मुलतानच्या सुभेदारीवर शहानवाझची नेमणूक करणारे शाही फर्मानिही देऊन, वजिराने त्याला मुलतानकडे पाठविले (मे १७४९ चा सुमार). याचबरोबर आपला स्वतःचा काही पैसा व सामुग्रीही वजिराने त्याला दिली. तेव्हा हा उमराव मुलतानला आला व नंतर लगेच त्याने आपले सैन्य वाढविण्यास सुरवातही केली. यासाठी त्यानेही मुइनच्या सैनिकांना अधीक पगार देण्याचे आमिश दाखवून आपल्याकडे वळवून घेतले. अशा प्रकारे आपल्या निशाणाभोवती त्याने १५००० सैनिक—घोडदळ व पायदळ मिळून आणि काही तोफा जमविल्या. नंतर आपल्या बापाच्या लाहोर येथील कबरीला भेट देण्यासाठी परवाना द्यावा असे त्याने मुइनला लिहून विचारले. यातील डाव अगदी उघड होता ! यावेळेही मुइनने तत्परतेने हालचाल केली. त्याने आपला बक्षी अस्मतखान व दिवाण राजा कुरामल यांच्या बरोबर सैन्य देऊन त्यांना मुलतानला पाठविले. तेथे शहानवाझचा पराभव करण्यात येऊन त्याच्या सैन्याला रजा देण्यात आली व मुइनतर्फे राजा कुरामलची मुलतानचा गव्हर्नर म्हणून नियुक्ती करण्यात आली. (सुमारे १७४९ चा सप्टेंबर वा ऑक्टोबर). [मिस्किन ७-८ ; मुझ. २६ ; त.-इ.-अ.-२५अ.].

## § २ : अतादलाची दुसरी स्वारी साम्राज्याने 'चार महाल' गमावले

स्वतःचे सुभेदारपद दृढ करता येण्याच्या दृष्टीने व यासाठी जरूर तेवढे लष्करी सामर्थ्य मिळविण्याच्या संदर्भात अवश्य तितका दीर्घकाळ, मुइनला अद्याप पंजाबमध्ये मिळाला नव्हता. त्याला हुसकावून लावण्यासाठी, नुकतेच झालेले दोन प्रयत्न उधळून लावण्यात त्याने यश मिळविले होते हे खरे पण या खटपटीत त्याला, आपला फार मोठा महसूल खर्च करावा लागला असून शिवाय त्या मुलुखातही अस्वस्थता निर्माण झाली होती. अशा दुर्बल अवस्थेत असतानाच आणि यातील दमछाकीतून पुन्हा नीट श्वास घेऊ लागण्याला पुरेसा वेळ मिळण्याआधीच, त्याला एका परचक्राला तोंड द्यावे लागले हे त्याच्या नशिबाचे क्रौर्यच होय. अशा प्रकारची अंतर्गत युद्धे हिंदुस्थानात चालू असताना सीमेवरील पर्वतातील खिंडी-पलीकडील शत्रू झोपून रहाणे शक्य नव्हते. पंजाबमध्ये चालू असलेल्या आपापसातील झगडयांची बातमी मिळाल्यामुळे अहमद अब्दालीला आपल्या महत्त्वाकांक्षांचा पाठपुरावा करण्यास पुन्हा उत्तेजन मिळाले. महमूद गझनीच्या पावलावर पाऊल टाकून त्याच्या जीवनाने व करामतीचे अनुकरण, हिंदुस्थानच्या भूमीवर करण्यासाठी व आपल्या नशीबाची परीक्षा पुन्हा पहाण्यासाठी (भा. अहमदाने असा प्रयत्न प्रथम १७४७–४८ मध्ये केला होता पहा प्र. ५§१०§१६) अहमद अब्दाली १७४९ च्या पावसाळयात निघाला.

इकडे मुइननेही आपली सैन्ये एकत्र केली व येणाऱ्या परचक्राला अडविण्यासाठी तो उत्तरेच्या बाजूने पुढे निघाला. चिनाब नदीपर्यंत पोहोचल्यावर, त्याने साद्रा येथे आपले

मुख्य ठाणे ठेवले. हे ठिकाण आधुनिक वजीराबादेच्या पूर्वेला ३ मैल आहे. या ठिकाणापासून अफगाणांचे ठाणे अनेक मैल दूर होते.[1] दोन्ही पक्षाकडील टेहळे आणि दाणागोटा मिळविण्यासाठी गेलेली घोडदळ पथके, ही दोघांच्या तळांचे दरम्यान असलेल्या भूपट्टीमध्ये रोज फिरत, त्यांच्या चकमकी झडत आणि ती सायंकाळी आपापल्या तळावर परत येत. अशा प्रकारच्या विस्कळीत चकमकी काही महिने चालल्या. दोन्हीही पक्ष दुर्बल असल्यामुळे कोणाही पक्षाला या मोहिमेचा निर्णायक शेवट लावण्यासारख्या हालचाली करणे शक्य झाले नाही. आपल्या सरहद्दींचे संरक्षण करण्याची मुघल साम्राज्याची ताकद कितपत आहे याचा अंदाज ठिकठिकाणी चाचपडून घ्यावयाचा येवढाच खरा हेतु, अब्दालीच्या या मोहिमेचा होता. पण या युद्धाचे क्षेत्र मात्र या प्रकारच्या हालचाली व चकमकी यातून उध्वस्त झाले. सतत चालू राहिलेल्या तणावामुळे व हल्ल्यामुळे मुंइनच्या मुघलिया सैन्यावर परिणाम होऊ लागला, ते कंटाळू लागले, थकू लागले. तेव्हा त्याने मौलवी अब्दुल नावाच्या एका फकिराच्या ( holyman ) मध्यस्थीने अखेरी तह केला (फेब्रुवारी १७५० चा सुमार). या तहानुसार सियाळकोट, पसरूर, गुजरात आणि औरंगाबाद या चार महालातून कारभाराचा खर्च भागल्यावर शिल्लक रहाणारा महसूल म्हणून, अब्दालीला वार्षिक १४ लाख रुपये देण्याचे वचन देण्यात आले. यामागे एक कारणही होते, ते असे की, हा शिलकी वसूल, महमदशहाने पूर्वीच नादिरशहाला एका तहाद्वारे नेमून दिला होता. या महालांचा कारभार मात्र दिल्लीच्या बादशहाच्या प्रतिनिधीनीचा आपल्या बादशहाच्याच नावे करावा हेही यावेळी मान्य झाले ; पण याचा खरा स्पष्ट अर्थ हाच कीं, आलेल्या या अफगाणाला हिंदुस्थानचा पहिला लचका तोडून मिळाला. [सियार (३) ३० ; मुझ. २७ ; बयान २४७-२४९ ; त.-इ.-अ.-८ ; मिस्किन ४].

## § ३ : शीख बंडखोर व लुटारू, त्यांचा स्वभाव

यापुढील दोन वर्षे पंजाबला अफगाणिस्तानच्या बाजूने शांतता लाभली पण त्यातील अतर्गत स्थिती या पूर्वीपेक्षा अधिक शांत वा सुखी होती असे मात्र नव्हे. सुभ्यातील, ठिकठिकाणचे, शिरजोर जमिनदार वा नायक आणि लूटमार करणारे खेड्यातील गुंड यांना दडपून टाकण्यासाठी सुभेदाराने आपल्या सुभ्यात वारंवार दौरे काढले. शीख तर आधी पासूनच प्रस्थापित शासनाच्या बगलेत सलणारे काटेच बनू लागले होते. शाही सत्तेची मोडतोड होऊ लागली, तुकडे पडू लागले, तेव्हा, यातून या जन्मजात बंडखोरापुढे तर सुवर्णसंधीच चालत आली. गुरु गोविंदाच्या लष्करी वृत्तीच्या धर्माने शिख-लोकाना एकत्र

१ या प्रदेशांतील स्थानांचे, मिस्किनने केलेले सविस्तर भौगोलिक वर्णन व दिलली माहिती गोंधळाची व सदोष दिसते. तो म्हणतो की, अब्दालीने चिनाब नदी ओलांडून, धिटाईने पुढे चाल केली. (ही चाल पूर्वेच्या दिशेने लाहोरकडेच असली पाहिजे. मुइनही लाहोर येथून निघाला आणि त्याच नदीवर पोहोचून, शत्रू १५ कोस दूर असताना (५ कोस हे अंतर अधिक बरोबर होईल). त्याने साद्रा येथे आपला तळ ठोकला. .......हे वर्णन पाहिले की प्रश्न उभा रहातो की मुइनचा तळ असा साद्रा येथे असेल तर मग अब्दालीचा तळ कोठे होता ? चिनाबच्या पलीकडे पश्चिमेच्या बाजूला की चिनाबच्या अलीकडे आग्नेयेला ......म्हणजेच मुइनच्या पिछाडीला......(पिछाडीला,—हे असंभवनीय) ? हा लेखक या घटनांच्या वेळी ९ वर्षाचे मूल होता (भा. पहा प्र. १०§१ तळटीप पृ. २६०), पुढे ३० वर्षानी त्याने हे वर्णन आपल्या आठवणींच्या आधारावर केलेले आहे. तेव्हा या दोन्ही सैन्यांच्या ठिकाणाबाबत त्याने उलटचा दिशेचा निर्देश केला आहे हे उघडच दिसते. अब्दाली साद्रा येथे आणि मुइन त्याच्या पूर्वेला सुमारे १० किंवा १५ मैल अंतरावर व लाहोरला अधिक जवळ होता.

गुंफले होते. त्याने त्यांच्यामधून एकजिनसी समाज निर्माण केला असून त्यातून आता व्यवस्थित रचना केलेल्या सैनिकी टोळ्या तयार झाल्या होत्या व त्यांच्यामध्ये आपापसात पूर्ण घनिष्ट बंधूभाव निर्माण झाला होता. जातिभेद, सामाजिक पातळीवरील उच्चनीच भेद, खाण्यापिण्याबाबत भेद असे अनेक भेदभाव पुराणमतवादी ( Orthodox ) हिंदुमध्ये निरनिराळे गट निर्माण करतात व त्याना अडचणीत टाकतात. अशा भेदभावापासून गुरु गोविंदाचे शीख अलिप्त होते. ते बहुतांशी जाट शेतकऱ्यांच्या कणखर जमातीमधून, शीख पंथियात आलेले असून काटक, बळकट बांध्याचे व "मुंग्या व टोळ यांच्यासारखे," संख्येत झपाट्याने वाढ होणारे होते. शिवाय हमरस्त्यावर लूटमार करणे हा एक वंशपरंपरागत व सन्माननीय धंदाच होय असे मानण्याची सवय झालेलेही होते. मराठ्यांच्या छोटेखानी तट्टापेक्षा कितीतरी उच्च दर्जाची घोड्यांची जात पंजाबात निपजते. प्रत्येक शीख लुटारू हा "चांगल्या घोड्यावर स्वार झालेला असून, भाला, तरवार व चांगली तोड्याची बंदूक (मॅच लॉक) यानी सुसज्ज असे." हे शीख लुटारू आपापल्या छोट्या छोट्या नायकांच्या नेतृत्वाखाली, गटागटाने आपल्या कारवाया करीत. शिवाय, हा लुटारू व्यवसाय करताना जरूर तेव्हा, आपल्या सारख्याच आणखी अनेक इतर नायकांच्या बरोबर हात मिळवणी करण्याचे शहाणपणही या नायकांच्या जवळ होते. "हा शीख 'उल्हान'"[१] — मोठा लोभी तर होताच शिवाय या आधाशीपणा इतकीच मोठी तीव्र सहनशक्ती व हालचालीतील चपळाई हेही गुण त्याच्यामध्ये होते. यामुळे, त्याच्याविरुद्ध अधिक संख्येने शासक वा शत्रू आले तर, त्यांचा उघड प्रतिकार त्याला करता आला नाही तरी तो त्याना गोंधळात पाडू शके..... अडचणीत सापडला तर तो एका दिवसात वीस ते तीस मैल दौड करी आणि तेही केवळ थोडेसे फुटाणे आणि स्वच्छ थंड पाणी एवढ्याच आधारावर! यापेक्षा अधिक चांगल्या आहाराचीही त्याला गरज लागत नसे. तंबू व राहुटीचा तर तो तिरस्कारच करी आणि सामान्य अर्थाने, त्याच्याजवळ बाडबिछाना सामानसुमानही काहीच नसे. .....त्याच्या शस्त्राखेरीज त्याच्या जवळचे सामान म्हणजे खोगीर व अशाच सारखा घोड्याचा इतर जामानिमा, अगदी साधी थोडीशीच स्वयंपाकाची त्याला आणि २ कांबळी. ..... एक त्याला स्वतःसाठी आणि एक त्याच्या प्रामाणिक उमद्या घोड्यासाठी. त्याच्या डावपेचांचे नीट विश्लेषण केले तर अखेरी दिसून येते की हे डावपेच म्हणजे छोट्याछोट्या चकमकींची एक दीर्घ मालिकाच चालवावयाची असे असून या झटापटी साधारणपणे प्राचीन पार्शिअन पद्धतीप्रमाणे ते करीत. पण माणसामाणसात एकमेकांशी हातघाईचा व खणाखणीचा झगडा करण्याची वेळ आली म्हणजे तर तो भयंकरच असे. तथापि चांगल्या तोफखान्यासमोर वा बंदुकांच्यासमोर मात्र तो असहाय्य बने." कलकत्ता समालोचन (रिव्ह्यू—Calcutta Review.) क्र. ११९, १८७५ मध्ये, जी. आर. सी वुइल्यमस.]. हातघाईच्या लढायातील त्यांचे हे वैशिष्ठ्य त्यांच्या घोड्यांचा मोठा व उत्तम बांधा आणि चपळाई, ते करीत असलेला बंदुकांचा सर्रास वापर या सर्वांमुळे हे शीख, लढाऊ लोक म्हणून, मराठ्यांच्यापेक्षा खूपच सरस होते.

शिखांच्या या प्रदेशातून १७८३ मध्ये, जॉर्ज फॉर्स्टर नावाच्या एका इंग्रज मुलकी अधिकाऱ्याने प्रवास केला होता. त्याने या शिखांच्या डावपेचांचे वर्णन केले आहे. तो लिहितो :......"त्यांचे लष्कर म्हणजे प्रामुख्याने घोडदळच असे ......शिख -घोडेस्वारा-जवळ एक तोड्याची बंदूक व उत्तम पोलादाची बाकदार तरवार (Sabre) ही शस्त्रे

१ भा. टीप–उल्हान (Uhlan)–हा शीख लुटारू......त्याकाळी समाजामध्ये सामान्यपणे 'उल्हान' या विशिष्ट नावाने संबोधिला जात असावा असे दिसते.

असून त्याचा घोडा दणकट व चांगल्या बांध्याचा असतो. . . . . . .शीख-घोडदळाच्या हल्ल्याच्या पद्धतीत आणि हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही घोडदळाच्या हल्ल्याच्या पद्धतीत फरक आहे. शीख घोडेस्वारांचा ४० ते ५० जणांचा गट, शत्रू त्यांच्या बंदुकांच्या टप्प्यात येईल इतक्या अंतरापर्यंत वेगाने दौड करीत जातो. नंतर आपल्या आखूड बंदूकातून (Carbine कारबाइन) निघणाऱ्या आगीचा वर्षाव अधिक अचूक व्हावा म्हणून, त्यातील सर्व स्वारांना, ते पुढे एका रांगेत घेतात आणि सर्वांच्या बंदुकातून एकाचवेळी मारा करतात. लगेच सुमारे १०० पाउले (Paces) घाईने परत येतानाच ते आपल्या बंदुका पुन्हा ठासतात आणि वळून, पूर्वी प्रमाणेच, शत्रूला अति तापदायक असा आपला हल्ला, पुन्हा करतात. या पद्धतीच्या हल्ल्यासाठी, त्यांनी घोडचांना इतक्या कौशल्याने शिकविलेले असते की, घोडा भरधाव जात असतानाही त्याला फक्त हाताची थाप मारून इशारा दिला की तो एकदम थांबतो. . . . . . .त्यांच्या यशाचे मूळ त्यांच्या चपळ हालचाली व अतिशय श्रम करण्याची त्यांची शक्ती यामध्ये असून त्यांचीही चपळाई हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रामध्ये (भा. त्या काळी, हिंदुस्थान या देशात अनेक राष्ट्रे आहेत असे इंग्रज मानीत) आढळत नाही. याचप्रमाणे हे मूळ, यांच्या आहारातील नेमस्तपणा व हिंदुस्थानातील मुसलमान ज्या विषयासक्तीमुळे कमजोर बनतात त्या विषयासक्तीबाबत संयम पाळण्यातही आहे. त्यांच्या घोडदळाचे पथक दिवसाला ४० ते ५० मैलाची दौड करी व असे श्रम ते सलग अनेक दिवसही करीत अशी माहिती मिळाली आहे." ('बंगाल ते इंग्लंडचा प्रवास लंडन १७९८, खंड १ पृ. २८८–२९०–कर्नल पोलिअरने १७७७ मध्ये केलेल्या वर्णनातील उताऱ्यासहीत.)

प्रादेशिक विभागांच्या संदर्भात, मुघल साम्राज्याच्या शीख शत्रूंचे दोन वर्ग पडतात या वर्गापैकी प्रत्येकाचा इतिहास व त्याच्या कृती व वागणूक यांची तऱ्हा ही, वेगवेगळी आहेत. हे दोन वर्ग म्हणजे एक सतलजच्या अलिकडचा व दुसरा पलीकडचा (cis Satlaj Trans Satlaj)—अलीकडचा म्हणजे सतलजच्या आग्नेय भागातील,– लुधियाना आणि कर्नाळ या भागात रहाणाऱ्या शीखांचा आणि दुसरा, सतलज पलीकडचा म्हणजे सतलजच्या वायव्येच्या भागात, लुधियाना आणि लाहोर यांच्या दरम्यान ज्यांची घरेदारे आहेत अशा शिखांचा–यापैकी पहिल्या वर्गातील शिखांच्या प्रदेशातून दिल्ली-लाहोर हा साम्राज्यातील एक हमरस्ता जात असे. या रस्त्यावर ते लुटारूपणा करीत. प्रारंभी असा काही काळ गेल्यावर यातूनच वाढत वाढत ते व त्यांचे नायक, प्रादेशिक बडे वजनदार नायक बनले. यातील प्रमुख, म्हणजे पतिआळा, कपुरथळा, नाभा आणि झिंद येथील राजे व शिवाय आणखीही काही लहान लहान राजे हे होत. दुसऱ्या गटातले शीख, हे प्रथम लाहोरच्या सुभेदाराचा मुलकी कारभार न जुमानणारे, त्याच्याविरुद्ध सतत उठाव करणारे नायक होत. आपण स्वतंत्र आहोत असे ते प्रतिपादन करीत व आपल्या दुर्बल शेजाऱ्यांची लूट करून या आपल्या म्हणण्याला दुजोरा देत. अशाप्रकारे शिखांची प्रगती होत असताना, त्यांच्या या प्रगतीच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे १७६१ नंतर, सतलजच्या आग्नेयकडील शीख राजे आपापल्या छोटचा राज्यात स्थिर झाले. याच काळात सतलज नदीपलीकडील वायव्येचे शीख म्हणजे माझा शीख ( Manjha Sikhs ) प्रतिवर्षी नदी ओलांडून आग्नेयकडील भागात येत आणि सामान्यतः दिल्ली ते मिरत, सहराणपूर आणि हरद्वार या सबंध भागातील खेडी व तटाशिवाय असलेली शहरे, यांना धाकदपटशा दाखवून तेथे दहशत बसवीत आणि ती लुटीत वा जाळीत. या त्यांच्या लुटीत व दहशत बसविणाऱ्या कृत्यात

त्यांच्या तेथील बांधवांचे सहकार्य मात्र नसे. शिखांच्या प्रगतीचा तिसरा टप्पा सुरू झाला तो १७९४ मध्ये सतलज पलीकडील "उनाच्या" बेदीसिहाने आणि १८०६ मध्ये रणजितसिंहाने, नदीच्या अलीकडील प्रदेशावर केलेल्या नव्या स्वाऱ्यानी. पण या स्वाऱ्यांच्या माहितीकडे वळणे म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासातील ब्रिटिश काळात शिरणे होय. यासाठी त्यांची एवढीच ओळख येथे पुरी आहे.

## § ४ : शीख सामर्थ्याचे १७३९ नंतर पुनरुज्जीवन–त्याच्या वाढीचा ओघ

औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धापासूनच शीख हे विशेष बंडखोर व लढाऊ जमात[१] म्हणून उदयास आले होते. त्यांचा ढोंगी गुरु 'बंदा'[१] आणि त्याची, भयानक क्रूर व धर्मवेडचा अनुयायांची टोळी यांना पूर्णपणे दडपून टाकल्यानंतर (१७१३) शीख हे एक बंडखोर व लढाऊ जमात यादृष्टीने पुढील एक पिढीतरी दडपलेल्या अवस्थेतच राहिली. पुढे नादीरशहाला दिल्लीविरुद्ध सहज व पूर्ण जय मिळाला आणि त्यातून दिल्ली साम्राज्याचे दौर्बल्य उघडे पडले; तेव्हा स्वाभाविकपणेच या संधीचा फायदा घेऊन आपले डोके पुन्हा वर काढण्याचा मोह शीखाना झाला. तथापि पुढे, १७४५ पर्यंत सतलज पलीकडील भागात (हा भाग झकेरियाखानाच्या लाहोर सुभ्यात होता). झकेरियाखानाचा समर्थ आणि दक्ष कारभार सुरू राहिला व तेथे शांतता नांदली. पण सतलजच्या अलीकडील प्रदेश दिल्ली सुभ्याचा भाग होता, तेथे मात्र अव्यवस्था आणि लुटालूट यांची पुन्हा सुरवात झाली असल्याचे दिसू लागले होते. १७४० मध्ये जाट व शीख लोकांची एक मोठी टोळी एकत्र जमा झाली व तिने आपला नेता निवडून त्याला दरानत शहा (Daranat Shah) असे नाव दिले. नंतर तिने सरहिंद जिल्ह्यातून चाल करून तेथे गोंधळ निर्माण केला आणि अनेक खेडी बळकाविली. यामुळे अझिमउल्लाखानाच्या हाताखाली दिल्ली येथून सैन्य पाठविले तेव्हाच या टोळीचा पराभव करून तिला पांगविता आले. (चहार गुलझार ३७३ अ.)

---

१ शीख पंथीयांची प्रारंभीची जवळजवळ दोन शतके, शांतताप्रिय धर्मपंथीय म्हणून गेली. १६६० नंतर त्यांचे हे स्वरूप बदलून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. पुढे औरंगजेबाने त्यांना दडपून टाकण्याचे प्रयत्न केले, त्यांचा छळ केला. त्यांना पूर्णपणे दडपण्यात तो जवळ जवळ यशस्वीही होत आला होता पण त्यांची दख्खनची दीर्घ स्वारी, मृत्यू व पुढील मुघल साम्राज्यातील झगडे वगैरेमुळे शिखांचे लढे चालूच राहिले. ...... "गुरू गोविंद हाच शीखांचा शेवटचा धर्मोपदेशक होय. त्याच्या नंतरचे गुरू, सेनानायक म्हणून प्रसिद्धीस आले..... ते धर्मोपदेशक नव्हते." ...... "औरंगजेबाच्या कारकीर्दीत शिखांचा जो छळ झाला त्याचा सूड त्यांनी उगविला." बंदासिंग हा...... "एक क्रूर, साहसी व धीट असा बैरागी, गुरू गोविंदसिंगाचा प्रिय शिष्य होता."..... त्याच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन शीख, मुघल राज्यात शिरले.... "त्यांनी मशिदी मोडल्या, मुल्ला मंडळींची, स्त्री-पुरुषांची कत्तल केली." ..... हे, सरहिंद भागात घडले. पुढे ते दिल्लीकडे येऊ लागले. फरुखसियारने शीख उठावांचा बंदोबस्त करण्यासाठी मोठे प्रयत्न केले..... "शिखांचा पराभव करून पुष्कळास जागच्याजागी ठार मारले आणि बंदासुद्धा ७४० लोकास पकडून दिल्लीस पाठविले..... धर्म न सोडल्यास हालहाल करून ठार मारण्याची धमकी दिली पण त्या सर्वांनी धैर्याने वागून धर्मासाठी प्राणार्पण केले."..... "बंदासिंगाला पिंजऱ्यात कोंडून चवाटचावर आणले. त्याच्या अनुयायांची शिरे भाल्यावर टोचून सभोवार ठेवली.... त्याच्या मुलांस जाळून मारले ..... शेवटी तापलेल्या चिमटचांनी त्यास विदारून त्यांनी त्याचा प्राण घेतला. बंदासिंग शेवटपर्यंत मोठचा धैर्याने वागला, त्याने सर्व हाल शांतवृत्तीने सहन केले." .... अशा अनेक तऱ्हानी शीख लोकांचा निःपात केला. (ही सर्व टीप प्रायः गो. स. सरदेसाई यांच्या, मुसलमानी रियासत ख. (२) प्र. २९ § २ ब § ३ वरून तयार केली असून उदधृतेही त्यातीलच आहेत.)

अलासिंह जाट याने सर्रहिंद जिल्ह्यात पतिआळाचे राज्य स्थापले. त्याला असाधारण दीर्घ आयुष्य लाभले (१७१४ ते १७६५ पर्यंत तो अधिकारावर होता) व त्याच्या अंगी अलौकिक कर्तबगारीही होती. यामुळे त्याला त्या जिल्ह्यात पतिआळाच्या राज्याची टिकाऊ पायावर स्थापना करता आली. त्याच्या जीवनाच्या अखेरी त्याला सर्रहिंदचा कायदेशीरपणे नेमलेला मुख्य अधिकारी म्हणजे फौजदार, म्हणूनही मान्यता मिळून (१७६४) त्याच्या यशस्वी जीवनावर कळस चढला. ही मान्यता मिळण्यापूर्वीच्या कालखंडात, तो या भागातील सर्व बेकायदेशीर उठावांचे केंद्र बनला होता. या काळातच रायकोटचे राय घराणे (या घराण्याचे, १३ व्या शतकात मुसलमान धर्मात, धर्मांतर करण्यात आले होते). सर्रहिंद जिल्ह्यातले एक प्रमुख जमिनदार घराणे होते. त्याला १८ व्या शतकाच्या मध्याला अलासिहाच्या पतिआळा घराण्याने बाजूला सारेपर्यंत ते तसेच प्रमुख राहिले. या राय घराण्याने, प्रथम १७४० च्या सुमारास दिल्ली सरकारची सत्ता झुगारून दिली. पुढे लवकरच १७४१ मध्येच सरहींद येथील, बादशहांचा फौजदार व अलासिंह यांनी मिळून या घराण्याचा पराभव करून त्याला जिल्ह्याबाहेर हाकलले. पण यानंतर लवकरच त्या घराण्याने आपली वडिलार्जित जमीनदारी परत मिळविली. नंतर १७६० मध्ये त्याने लुधियानाही मिळविले आणि पति-आळाचा राजा अलासिंह व जिल्ह्यातील इतर प्रमुख, यांच्याबरोबर, प्रत्येकाच्या वर्चस्वा-खालील भागाबद्दल, समजुतीने व्यवस्था ठरवून आपल्या मालकीचा व वर्चस्वाचा प्रदेश वाढविला. पण पुढे १७६७ मध्ये मात्र, अलासिंहाचा वारस व नातू अमरसिंह याला अहमदशहा अब्दालीने 'महाराजा' असा किताब देऊन सर्रहिंदच्या 'फौजदार' पदावर कायम केले आणि अंबाला शहरापर्यंतचा सर्व भाग अखेरी शिखांच्या हाती गेला. (Phulkian and their Manjha allies–फुलंकिआं आणि त्यांचे माझा मित्र यांच्या हाती). या हस्तांतरात प्रत्येक शीख नायकाने वा टोळीने (मिसलने) आपल्याला शक्य झाली तितकी खेडी बळकावली. (Misl. भा. मिसल्–विशिष्ट टोळी, प्रत्येक शीख नायक हा एक एका टोळीचा प्रमुख असावा. या टोळीची म्हणजेच मिसल्ची रचना एखाद्या संघासारखी असावी व ही टोळी आपल्या नायकाच्या नावाने ओळखली जात असावी असे दिसते) [ लुधियाना गॅझेटिअर, २२–२४ ].

सतलजच्या अलिकडील भागात म्हणजे आग्नेयेकडील भागात, १७६१ नंतरच्या घडा-मोडींमुळे निर्माण झालेली स्थिती, ही, अशी होती. मुघलकालीन हिंदुस्थानच्या राजकीय भूगोलानुसार, हा आग्नेयेकडील प्रदेश पंजाबच्या सुभ्याचा भाग नव्हता तर दिल्लीच्या सुभ्याचा होता. पण या प्रकरणामध्ये आपल्याला पंजाब सुभ्यामधील शिखांची म्हणजे लाहोरपासून पूर्वेस सतलजपर्यंतच्या भागातील शिखांच्या उठावांची माहिती ध्यावयाची आहे.

१७४५ नंतर पंजाबात जो राजकीय बदल सुरू झाला त्याने शीख जमातीमध्येही एका नव्या उत्थापनाला चालना दिली. झकेरियाखानाचा कारभार बळकट व जागरूक होता. त्याला न्यायाची आवड होती आणि आपल्या प्रजेबद्दल आदरही होता. या गुण-समुच्चयामुळे त्याने प्रजेमध्ये समाधान आणि समाजात सुव्यवस्था राखली होती. त्याच्या मृत्यूनंतर सुभ्यामध्ये वारशाबद्दल आपापसात युद्धे झाली आणि त्यांच्या पाठोपाठ अब्दालीने स्वारी केली. परिणामतः सुभ्याचा कारभार आणि आर्थिक तरतुदी यांचा विनाश झाला. १७४८ मध्ये मुइन-उल्-मुल्क हा कायमचा सुभेदार म्हणून आला हे खरे पण सबंध सुभ्यामध्ये पुन्हा सुव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि नित्याचा कारभार पुन्हा पूर्णपणे सुरळीत

चालविण्याच्या दृष्टीने, त्याची सैन्ये व सामर्थ्य अपुरे होते. मोठ्या उदार देणग्या वा बक्षिसे देऊन, मध्य आशियातून आलेल्या नव्या उमेदवारांची भरती करून, त्याला मोठे सैन्य बाळगावे लागले. त्याच्या स्वतःच्या राहणीची पद्धत मोठ्या उमरावी थाटाची आणि फार मोठी उधळपट्टीची असल्यामुळे त्याचा स्वतःचा खर्चही फार मोठा होता. याचे उदाहरण आपल्याला, त्याच्या पाठीशी रहाणारा त्याचाच एक हुजऱ्या ( Page ) तहमास्प मिस्किन ( Tahmasp Miskin ) याने लिहिलेल्या "आठवणी" वरून दिसून येते. तो लिहितो—"आपल्या मित्रांना काहीही देण्यास तो नकार देऊ शकत नसे." या परिस्थितीत मुइनची जमा, त्याच्या खर्चाच्या मानाने फारच कमी पडे आणि यामुळे त्याला शेतकऱ्यावर दुःसह कर, जबरदस्तीने लादावे लागले आणि ते वसूल करण्यासाठी त्यांचा छळही करावा लागला. आपल्या धर्मपंथियापैकी सर्वांनी, जास्तीत जास्त प्रयत्नपूर्वक एकमेकाना मदत करावी, हे आपले धार्मिक कर्तव्य होय असे शीख लोक मानतात, हे सर्वांना माहीत होते. तेव्हा अशी मदत मिळविता यावी म्हणून, ज्या ज्या ठिकाणी खेडुताना मुइनच्या कारभाराचा छळ सोसावा लागला त्या त्या ठिकाणी त्यांनी आपले केस वाढविले, दाढी वाढविली आणि 'अकाल'–'अकाल' अशी घोषणा देत, गुरु गोविंदाचा शीख धर्म स्वीकारला. यामुळे इतर शीखही आता त्यांच्या मदतीला येऊ लागले आणि यातून त्यांच्या धर्माचा पंजाबात जलद गतीने प्रसार झाला. राज्यकर्त्याकडून आपल्या शेतकरी वर्गाचा जसजसा अधिकाधिक छळ होऊ लागला तसतशी शिखांची संख्या अधिकाधिक वाढत गेली. ही अपूर्व घटना अतिशयच स्पष्ट झाली ते मुइनच्या मृत्यूनंतर, त्याची विधवा, 'मुघलांनी बेगम' हिची, अज्ञानपालक-रीजंट–म्हणून, नालायक व लहरी राजवट सुरू झाल्यावर. [मुझ. ८१, सियार (३) ५१ ].

## § ५ : मुईनचे शीखांबरोबर झगडे

मुइनच्या राजवटीमध्येसुद्धा शीखांच्या लहान लहान टोळ्या सुभ्यात ठिकठिकाणी लुटालूट करीत असून शासनाचा उघड प्रतिकार करीतच होत्या. त्यांच्या या हालचाली सुभ्यातील लाहोरचा पूर्वेकडील भागात, विशेषतः वटाला आणि कालानूर जिल्ह्यात चालत असून, त्यांना शिक्षा करून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सतत मोहिमा पाठवाव्या लागत, इतकेच नव्हे तर काही वेळी स्वतः सुभेदाराच्या हाताखाली त्या काढाव्या लागत. त्या काळात, तोफा-बंदुकांविरुद्ध मात्र, शिखांचे काही चालत नसे. म्हणून मुइनने, मोठ्या विचारपूर्वक, ९९०, जिझाइल जातीच्या छोट्या तोफा करवून घेऊन, त्यांचा या शीख लुटारूविरुद्ध वापर केला. मिस्किनने याचे वर्णन केलेले आहे. तो लिहितो :—मुइनची पथके "या दळभद्र्या दुष्ट लोकांच्यामागे २८ कोसांपर्यंत दौडत, त्यांचा पाठलाग करीत आणि ज्या ज्या ठिकाणी ते लढाई देत त्या त्या ठिकाणी त्यांना ठार मारीत. जो कोणी मुइनकडे, मारलेल्या शिखाचे डोके आणून देई त्याला आणलेल्या प्रत्येक डोक्यासाठी दहा रुपये बक्षीस मिळे. जो शिपाई, शिखाचा घोडा जिंकून आणी, त्याला तो घोडा स्वतःसाठी ठेऊन घेण्यास दिला जाई. एखाद्या शिपायाचा स्वतःचा घोडा जर या मोहिमेत नष्ट झाला तर त्याला सरकारच्या पागेतील घोडा दिला जाई." (मिस्किन, १२ ).

१७५२ च्या अखेरी, शीखांविरुद्ध, अशीच एक मोहीम स्वतः मुइनच्या नेतृत्वाखाली काढली होती. त्याच्या याच हुजऱ्याने ( म्हणजेच मिस्किनने ) तिचेही वर्णन केले आहे.

तो म्हणतो :—" नबाबसाहेब ( म्ह. मुइन-उल्-मुल्क ) बटाला जिल्ह्यात कारभारविषयक दौऱ्यावर असताना, त्यांना कळले की, शिखांची एक मोठी टोळी त्या भागात रस्ते अडवीत आहे. शेतकऱ्यांचा नाश करीत आहे आणि सर्वसाधारणपणे गोंधळ उडवून देत आहे. तेव्हा त्यांना अद्दल घडविण्यासाठी, त्याने सय्यद जमिलुद्दीन खानाला, त्याच्या बरोबर आपला बक्षी गाझीबेगखान याला देऊन पाठविले. या अधिकाऱ्यांनी त्या भागात जाऊन शीखांशी लढा दिला व त्यांना पिटाळून लावले. या दंगेखोर शीख पायदळापैकी ९०० लोक 'चाक गुरु हरगोविंद' (हे एखाद्या खेड्याचे वा शीखांच्या एखाद्या धार्मिक स्थानाचे नाव असावे). याच्या नजीक असलेल्या रामराउनीच्या ( Ram Rauni ) छोटया किल्ल्यात शिरले. तेव्हा जामिलुद्दिनाने त्या किल्ल्याला तात्काळ वेढा घातला. थोडयाच दिवसांनी किल्ल्यातली ही शिबंदी, हातात तरवारी घेऊन, मुसंडी मारून बाहेर आली आणि त्यांनी वेढा घालणाऱ्या सैन्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात ते सर्व शीख मारले गेले" (मिस्किन, १७). पण अशी कत्तल झाली तरी वाळवीच्या थव्यावर पाऊल दाबल्यावर त्यातील शेकडो किडे चिरडले जातात पण यामुळे त्या थव्याच्या एकूण वाढीवर व हालचालीवर काहीही परिणाम होत नाही तसेच यावेळीही झाले. शिखांच्या टोळयांबरोबर असे लढे मुइनच्या अगदी मृत्यूच्या दिवसापर्यंत चालले (३ नोव्हेंबर १७५३)[१] आणि त्यानंतर तर अधिकच वाढले.

## § ६ : अब्दालीची तिसरी स्वारी : त्याने लाहोर घेतले

ठिकठिकाणी विखुरलेल्या शीख उठावांच्या वहात्या जखमांमधून पंजाब सरकारचे जीवनरक्त सतत झिरपून जात असतानाच, या सुभ्यावर अब्दालीने पुन्हा स्वारी केली. १७५० च्या तहाने "चारमहाला" बद्दल त्याला खंडणी देण्याचे वचन देण्यात आले होते (भा. पहा २). पण या खंडणीचा काही अंशसुद्धा देण्यात आला नव्हता. तेव्हा सरहद्दीवरून अब्दालीने मुइनला लिहिले, त्यात तो म्हणतो—"तहाचा असा भंग झाल्याने मला यावे लागले आहे. गेल्या तीन वर्षांबद्दल मला २४ लाख रुपये पाठवा म्हणजे मी निघून जात आहे."—याला मुइनने उत्तर पाठविले की, यापैकी पहिली दोन वर्षे नौसिरखानाने त्या चार महालांचा कारभार केला आणि तेथील सर्व वसूल घेऊन तो पळून गेला आहे. मुइनने स्वतः त्या भागावर फक्त तिसऱ्या वर्षीच सत्ता चालविली व कारभार केला तेव्हा या तिसऱ्या वर्षापुरतीच ठरलेली खंडणी देणे त्याला शक्य आहे".—पण अशा प्रकारे अब्दालीला सहजासहजी बाजूला सारणे शक्य नव्हते. पूर्वी कधीही नव्हते इतके मोठे सैन्य बरोबर घेऊन, अब्दालीने १७५१ डिसेंबरमध्ये तिसरी स्वारी केली.' तो जेव्हा सिंधुच्या काठी येऊन पोहोचला तेव्हा, संबंधित चार महालांचा त्याला द्यावयाचा महसूल म्हणून मुइनने

१ मुइनचा हाच हुजऱ्या लिहितो : "ज्या ज्या ठिकाणी शिखांचा उठाव झाला आहे असे त्याला कळले त्या त्या ठिकाणी त्यांना दडपून टाकण्यासाठी, त्याने ख्वाजा मिर्झाला (Khwaja Mirza) सैन्यासह पाठविले. जे शीख जिवंत पकडले जात त्यांना लाकडी हातोडयांनी (Mallot गदे सारख्या) ठोकून ठेचून नरकात पाठविले जाई...... काही वेळी अदिना बेग, दोआब जिल्ह्यात (जालंदर) पकडलेल्या ४० ते ५० शीख कैद्यांना मुईनकडे पाठवी तेव्हा त्यांना लाकडी हातोडयांनी ( Hammer घणासारख्या ) घाव घालून ठार मारीत." (मिस्किन १९) पुढे मुइन नंतर त्याच्या मुलाला सुभेदार नेमले. हा मुलगा तर लहान बालकच होता. या बाल सुभेदाराच्या काळात शिखाबरोबर झालेल्या आणखी एका लढाईचे वर्णन, "मिस्किन २२–२३,' मध्ये केलेले आहे. या लढाईचेवेळी मिस्किन स्वतः हजर होता.

त्याच्याकडे ९ लाख[1] रुपये पाठविले. अहमद अब्दालीने तो पैसा घेतला पण आपली स्वारी तशीच पुढे चालविली. मुइनने आपले सर्व कुटुंब सुरक्षिततेसाठी जम्मूच्या डोंगराळ भागात पाठविले आणि लाहोरच्या श्रीमंत नागरिकानी भयभीत होऊन दिल्ली आणि अशाच अन्य ठिकाणाकडे पळ काढला [ त-इ-अ.-३० ].

पुढे येणाऱ्या शत्रूला वाटेतच अडविण्यासाठी मुइ-उल्-मुल्क घाईघाईने आपल्या राजधानीपासून निघाला. रावी ओलांडून, शहादराच्या बाजूने, लाहोरच्या उत्तरेस २२ मैलावर असलेल्या शहादौला पुलाकडे त्याने कूच केले आणि तेथे एका बळकट ठिकाणी आपला तळ ठोकला. या तळाला त्याने पुष्कळ तोफांचेही संरक्षण दिले. त्याचा असा तळ पडला असताना, दोन्ही बाजूच्या टेहळचा पथकामध्ये दररोज चकमकी होत राहिल्या.

युद्धकलेत कसलेल्या अफगाणशहाने यावेळी एक धाडसी हालचाल केली. मुइनच्या तळासमोरच काही अंतरावर आपलाही तळ तसाच ठेऊन त्याने स्वतःबरोबर, निवडक, सुटसुटीत घोडेस्वारांचा एक सैन्य विभाग घेतला आणि मुइनच्या छावणीच्या उजव्या बाजूने लांबून जाऊन, दूर अंतरावरुन त्या छावणीला वळसा घातला आणि तो, एकाएकी लाहोरच्या आसमंतात येऊन पोहोचला. तेथे त्याने शहाबलादिलच्या पवित्र स्थानाजवळ आपले ठाणे ठेवले व शहराच्या तटाबाहेरच्या उपनगरातील काही घरेही लुटली. त्याच्या या सैन्य विभागातील आघाडी-रक्षक पथकानी जहानखान नावाच्या, अब्दालीच्या एका अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली, फैजबक्ष बाग व्यापली. या आघाडीच्या पथकात १०,००० सैनिक होते असे म्हणतात.

अशा प्रकारे आपल्या पिछाडीला जाऊन, शत्रू बसला असल्याचे पाहून, मुइन लाहोरकडे घाईने परत फिरला आणि रावी नदीच्या काठावर राजघाट येथे पोहोचल्यावर तेथेच तो थांबला. नंतर त्याने आपल्या मुख्य सैन्यापासून ख्वाजा मिर्झा खानाला, जिझाइलनी सज्ज असलेल्या त्याच्या ९०० मुघलिया सैनिकांच्या संबंध पथकासह वेगळे काढून, नदीपलीकडे पाठविले. तिकडील बागेमधून अफगाणांना हुसकून लावण्याची कामगिरी त्याच्याकडे सोपविली आणि त्यानेही ती, दीर्घ व निकराची लढाई देऊन पूर्ण केली.

दुसरे दिवशी अफगाण शालमार बागेकडे निघून गेले. नंतर मुइननेही रावी ओलांडली व तो लाहोरच्या बाजूकडे आला. तेथे त्याने शहराबाहेर, आपल्यासाठी एक मोर्चेबंद, भक्कम ठाणे तयार केले. आता हे युद्ध, काहीही निर्णय होऊ शकत नाही अशा कुजलेल्या डावाच्या अवस्थेला येऊन पोहोचले. अब्दालीच्या जवळ तोफखाना नसल्यामुळे, त्याला लाहोरवर धडक मारता येईना वा मुइनलाही त्याच्या खंदकाबाहेर हाकलता येईना. दुसरीकडे मुइनजवळही जरूर तितके मोठे, सहज हलविता येईल व हालचाली करता येईल, असे सैन्य नसल्यामुळे त्यालाही बंदिस्थ जागेबाहेर येऊन, उघड्यावर अफगाणाशी सामना देऊन निर्णय लावण्याचा प्रयत्न करता येत नव्हता. या परिस्थितीत दोन्ही बाजूच्या टेहळचा पथकाचे दरम्यान मात्र

---

१ अब्दालीची दुसरी स्वारी १७४९ च्या पावसाळ्यात झाली. तह व वर्षाला १४ लाख खंडणी देण्याचा करार ही घटना फेब्रुवारी १७५० मधील पहा –२ आता तो तीन वर्षाचे २४ लाख रुपये मागतो आणि ही स्वारी १७५१ डिसेंबरची, म्हणजे या हिशेबात मागणीची मुदत व एकूण रक्कम यांचा, स्वाऱ्यांचा काळ, तहाचा काळ व खंडणीचा दर याशी मेळ बसत नाही; तेव्हा या एकूण हिशेबात तत्कालीन काही रीवाजांचाही समावेश असावा वा ही एकूण ठोकळ मागणी असावी शिवाय मूइननेही आपल्या वाट्याचे म्हणून ९ लाख रुपये पाठविले याचा हिशोबी मेळही बसत नाही.

वारंवार चकमकी झाल्या. अहमद आपल्या बलिष्ठ तुकड्या रोज बाहेर पाठवू लागला. या तुकड्यांनी रोज पद्धतशीरपणे, अहमदाच्या ठाण्याच्या दोन्ही बाजूचा ४० मैलापर्यंतचा प्रदेश लुटण्याचे काम चालविले. यामुळे, " या भागात ३ दिवसांच्या चाली इतक्या दूर-पर्यंतच्या प्रदेशातील एकाही घरात, एकही दिवा लावला जात नव्हता आणि तेथे धान्य अतिशय महाग झाले होते " ( मिस्किन, १४ ).

आणीबाणीच्या या चार महिन्यात, लाहोरचे संरक्षण करीत असलेल्या मुइनकडे दिल्ली-कडून काहीही मदत येऊन पोहोचली नाही. सरहद्दीवरच्या या प्रांतात निर्माण झालेल्या धोकादायक परिस्थितीबद्दल आणि यातून उत्पन्न झालेल्या तातडीच्या प्रश्नाबद्दल बादशहाने आपल्या वजीराला वरचेवर लिहिले पण सफ्दरजंगाने याबाबत काहीही कृती केली नाही. ( भा. पहा प्र. ९ §१०, ११ ). यावेळी स्वतःच्या, खाजगी शत्रूंना चिरडून टाकून आपल्या औधच्या सुभ्यात स्थिरस्थावर करण्याचीच, त्याला अधिक आस्था व जरूरी वाटत असल्याने बादशहाच्या पत्रांबाबत त्याने काहीही केले नाही. बादशहाचे इतर सरदार तर, काहीतरी मदत देता येण्याच्या दृष्टीने यावेळी फारच निर्धन झालेले होते. यामुळे ते काही मदत करण्याचा संभव नव्हताच. मुइनच्या स्वतःच्या गोटातही मतभेद होते. काहीही किंमत द्यावी लागली तरी ती देऊन तह करा असे बिहकारीखान प्रतिपादन करी तर कुरुमल आग्रह करी की, जी खंडणी अब्दालीला द्यावी अशी सूचना येत होती, ती, मुइनने आपल्या सैनिकात वाटावी आणि अशा प्रकारे त्यांना प्रोत्साहन देऊन शत्रूशी लढाई द्यावी. या दोघांच्या अशा वेगवेगळ्या सल्ल्याशिवाय तिसराही प्रकार होता तो अदिनाबेग व मुमीनखान यांचा—ते दररोज, युद्ध व तह या दोन विचारांचे दरम्यान हेलकावे घेत होते ( त.-इ-अ.-३२ अ. ).

अशा प्रकारे हे युद्ध १½ महिना रखडत रखडत चालले.[१] नंतर आकस्मिक एक महान आपत्ती कोसळली. लाहोर-सैन्य आपल्या खंदकामध्येच दीर्घ काळ अडकून राहिल्यामुळे त्यातील जागा अतिशय घाणेरडी आणि आरोग्यास विघातक बनली. या तळाच्या आसमंतातील गवत आणि झाडे नष्ट झाली आणि विहिरींचे पाणी संपले. अखेरी हा तळ सुमारे १० मैलावर, चांगले पाणी, गवत आणि जळण यांचा भरपूर पुरवठा असलेल्या अशा अधिक चांगल्या दुसऱ्या जागेत हलविण्याचे ठरविण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी उजाडतानाच ( ५ मार्च १७५२ ) तिकडे जाण्यासाठी कूच सुरू झाले. तेव्हा मुइनच्या या सैन्याच्या आघाडीच्या भागाचे नेतृत्व अदिनाबेगकडे असून पिछाडीची जबाबदारी दिवाण कुरामलकडे होती आणि मध्यभाग स्वतः मुइनच्या हाताखाली होता. या मधल्या सैन्य विभागाबरोबरच सैन्याचे सर्व सामानसुमान, गाड्यांमध्ये व वाहतुकीच्या जनावरांच्या पाठीवर लादून चालविले

१ 'हुसैनी' पृ. ३१ नुसार हा काळनिर्देश येथे स्वीकारला आहे. पण सियार (३) ४३, मूझ. ५७ आणि मिस्किन १६, यानुसार मूइनने अब्दालीला चार महिने विरोध केला. ही कालनिश्चिती, म्हणजे शहा-दौलाच्या पुलापाशी बळकट ठाणे तयार करून त्यात पाय रोवून मूइन बसला त्यावेळेपासून ते, लाहोरचा पाडाव होईपर्यंतचा सबंध काळ विचारात घेऊन केलेली काळनिश्चिती असावी हे उघडच आहे.

अब्दालीने लाहोर घेतले. त.–इ–अ.–३० अ, ३२; मिस्किन १३–१६. या माहितीसंबंधीची आधारभूत अन्य साधने (Sources), ही या साधना नंतरची वा अप्रत्यक्ष व दुय्यम होत. त्यातील संदर्भ असे सियार (३) ४३–४४; मूझ. ५७–५९; हुसैनी ३१–३४, इलियट (८) १६७–१६८. लाहोर गॅझेटीयर १८३३ मध्ये, यातील घटनांच्या स्थानाबद्दल नमूद केलेले आहे ते असे : ...... अब्दालीचा तळ शालमार बागेजवळ, मूइनने तयार केलेला खंदकातला बळकट तळ : .... " शाहादरा या उपनगरापासून थोड्याशाच अंतरावर " आणि या मोहिमेतील शेवटची लढाई " महमद बुटीच्या " खेड्याजवळ.....

होते. पण स्थलांतराच्या या हालचालीची बातमी बाहेर फुटली होती आणि सैनिक, छावणी-पाठोपाठ जाणारे बाजारबुणगे व ओझ्याची जनावरे यांचा हा अफाट घोळका रेंगाळत रेंगाळत चालू लागल्याबरोबर, सहज हालचाली करू शकणाऱ्या, सुटसुटीत अफगाण घोडदळाने त्यांच्या आघाडीवर आणि पिछाडीवर असा दोन्ही बाजूंनी हल्ला केला. मुइनच्या तोफखान्याने सोडून दिलेली जुन्या विटांची बांधलेली उंच टेकाड शत्रूने तात्काळ व्यापली आणि त्या उंच टेकाडावरून तो, आपल्या, कड्यातील, छोटचा फिरत्या बंदुकातून ( Swivel Guns ) पुढे जात असलेल्या मुइनच्या सैन्यावर मारा करू लागला व त्यांच्यावर वर्चस्व बसवू लागला. याचबरोबर त्याचे चपळ घोडेस्वार मुइनच्या सैन्याच्या सभोवारही घिरट्या घालू लागले यातून "लाहोर सैन्यातील व्यवस्था कोलमडून तेथे गोंधळ निर्माण झाला."

अशा प्रकारे मुइनच्या आघाडी-पिछाडीवर, असे दोन्ही बाजूने एकाच वेळी जोरदार हल्ले झाले आणि त्याच्या दोन्ही बगलानाही धोका निर्माण झाला. तेव्हा त्याने आपल्या जिझाइलधारी मुघलिया पथकापैकी ३०० लोकांच्या एका तुकडीला आघाडीवर अदिनाबेगला आणि तितक्याच लोकांच्या दुसऱ्या तशाच जिझाइलधारी तुकडीला पिछाडीकडे कुरामलला मदत करण्यास पाठविले. जिझाइलधारीपैकी राहिलेले ३०० आणि ख्वाजा, मिर्झा याना त्याने आपल्याजवळ ठेवले. त्यावेळचे काही समकालीन लेखक, या लढाईच्या संदर्भात अदिनाबेगवर आरोप करतात की, त्याने विश्वासघात करून, कुरामलला मदत करण्यात दुर्लक्ष केले. परिणामतः मुइनच्या सैन्याच्या तीन विभांगामधील सबंध व मिलाफ ( Cohesion ) नष्ट झाली.[१] कुरामल आपल्या धन्याच्या संरक्षणाला घाईने जात असताना एका तोफगोळ्याने त्याचा हत्ती जखमी झाला. तेव्हा जखमी हत्ती बदलून दुसऱ्यावर जात असताना तो स्वतः बंदुकीच्या एका गोळीने मारला गेला. यामुळे भयभीत होऊन गोंधळलेले त्याचे सैनिक जिकडेतिकडे पांगले. अशा प्रकारे मुइनच्या सैन्याची पिछाडी पूर्णपणे उघडी पडली आणि त्या बाजूने, शत्रूने त्याच्या स्वतःच्याच विभागावर म्हणजे मध्य भागावर हल्ला चढविला. या हल्ल्याचा, मोठ्या शौर्याने प्रतिकार केल्यावर, त्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांपैकी दोघे जखमी झाले आणि या रणभूमीवर मोठी धास्ती, गोंधळ आणि मृत्यू यांचे थैमान सुरू झाले, पण देवाची दयाच म्हणून आता लवकरच अशा या रणभूमिवर सायंकाळच्या सावल्या आणि नंतर अंधार पसरला व हिंदुस्थानचे उरले सुरले सैन्य वाचले. यातून पळून आलेले सैनिक लाहोर शहरात घुसले आणि त्यांच्या पाठोपाठ, गोंधळ करीत घोळक्या घोळक्याने काही अफगाणही तेथे शिरले व त्यांनी लुटालूट करण्यास सुरवात केली. त्या रात्रीच्या गडद अंधारात शहरातल्या रहिवाशांना वा सैनिकांना, कोणालाच काही स्पष्ट दिसत नव्हते. सर्वच गोंधळले आणि केवळ पळून जाण्यानेच काहीतरी संरक्षण लाभेल या कल्पनेने सर्वांनीच पळापळ सुरू केली.

तथापि अद्यापही मुइन-उल्-मुल्क जवळ, बोलावून आणता येतील इतक्याच अंतरामध्ये, सुमारे १०,००० सैनिक होतेच. तेव्हा पिछाडीकडे असा गोंधळ झाला तरी त्याने स्वतः रणभूमीवरील आपली जागा धरून ठेवली. पण त्याच्याजवळ आता तोफखाना व जिझा-इलसाठी दारूगोळा, ही मात्र नव्हती, जवळच दोन मैलावर असलेल्या इदग्याजवळ ( भा.

१ सियार (३) ४३; मुझ. (५८); शकीर (७८); फऱ्हात-उन्-नाझिरिन [ इलियट मध्ये : पहा (७) १६८ ]. यापैकी शेवटच्यात, कुरामलला पाठीमागून गोळी घालून, अदिनाबेगने ठार केले, असा आरोप केला आहे.

मुसलमानांची सार्वजनिक प्रार्थनेची जागा–सामान्यतः गावाबाहेर जवळच, मोकळ्या माळावर असते. )—अदिनाबेगची गाठ पडेल अशी आशा मुइनच्या सैन्यातील अधिकाऱ्यांना (कॅप्टन्सना) वाटत होती, म्हणून त्यांनी, त्याला आपल्या बरोबर त्या इदग्याकडे नेले. पण तो सेनापती-अदिनाबेग-आपल्या धन्याचा काहीही विचार न करता, केवळ स्वतःच्याच सुरक्षिततेचा विचार करून आधीच पळून गेलेला होता. तेव्हा अंधारात चाचपडत चाचपडत, लाहोरच्या दरवाजापैकी एखाद्याने, त्या शहरात जाण्याशिवाय मुइनला आता दुसरा मार्ग नव्हता. तेव्हा तेथे जाऊन मिर अमीनखानाच्या वाड्यामध्ये रात्रीसाठी त्याने मुक्काम केला. त्या भयानक रात्री पंजाबच्या त्या राजधानीत संपूर्ण गोंधळाचे साम्राज्य चालू राहिले आणि कोणालाही दुसरा कोण शहरात आहे वा कोण कोठे आहे हे कळले नाही.

## § ७ : मुइन–अब्दालीला शरण जातो

अशा रात्रीनंतर उजाडले आणि प्राप्त परिस्थितीत संरक्षणासाठी ज्या काही तरतुदी करता येणे शक्य होते त्या, मुइनने आता तातडीने केल्या. ज्या ज्या ठिकाणी शहराचे तट व खंदक संरक्षणाच्या दृष्टीने कमकुवत होते त्या त्या ठिकाणी त्याने आपले अतिशय विश्वासू सैनिक ठेवले. तह ठरविण्यासाठी, बैठकीस या असे आमंत्रण, अब्दालीने त्याला पाठविले, तेव्हा न भिता, बरोबर फक्त तीन नोकर घेऊन, मुइन त्याच्याकडे गेला. बरोबर नेलेले हे तिघे म्हणजे जाननिसार खानाचे दोन मुलगे व एक खोजा असे होते. अफगाणांकडील, अतिशय उच्च दर्जाच्या सरदारांपैकी दोघानी त्यांचे स्वागत केले व त्याला आपल्या शहापुढे नेऊन सादर केले. तेव्हा अहमदशहाने त्याला विचारले—"तुम्ही जर मला पकडले असते तर माझ्याबाबत काय केले असते ?" मुइनने उत्तर दिले—"मी तुमचे डोके कापून ते माझ्या धन्याकडे–बादशहाकडे–पाठविले असते."—अब्दालीने पुन्हा विचारले—"तुम्ही माझ्यापुढे शरण येण्याला इतका दीर्घ वेळ लावला. . . .यासाठी मी तुम्हाला आता कसे वागवावे ?" पुराभूत झालेल्या सुभदाराने अगदी निर्भयपणे उत्तर दिले. . . ."तुम्ही जर व्यापारी वृत्तीचे, दुकानदारच असाल तर खंडणी घेऊन मला विका–सोडा; जर खाटीक वृत्तीचे असाल तर मला ठार मारा पण जर "पादिशहा' असाल तर शाही कृपादृष्टी ठेऊन मला क्षमा करा"—या उत्तराने अफगाण शहा अतिशय खूष झाला. त्याने मुइनला आलिंगन दिले; 'फरझंद खान बहादूर' म्हणजे माझ्या मुला' असेही तो त्याला म्हणाला आणि एक सन्माननीय किताब व मस्तकावर धारण करण्यासाठी एक रत्नजडित तुरा ( Aigrette ) त्याला बहाल करून, स्वतः वापरीत असलेला फटाही दिला ( मिस्किन १६–१७, हुसैनी ३३ ).

यानंतर मुइनने विनवणी केली की आता त्याच्यावर जो अनुग्रह करण्यात आला, जी दया दाखविण्यात आली, तोच अनुग्रह आणि तीच दया त्याच्या लोकानाही दाखवावी. या विनंतीनुसार, पकडलेल्या त्याच्या पंजाबी लोकाना शहाने मुक्त केले. शिवाय आपले सैनिक शहरातील लोकांना लुबाडतील वा वाईट वागवितील, हे थांबविण्यासाठी त्याने शहरात ठिकठिकाणी आपले मुख्य व्यवस्थापक-अधिकारीही ( Provost Marshals ) नेमले. चाललेले युद्ध व घातलेला वेढा यामुळे तटाच्या आतील लोकांचा धान्य पुरवठा थांबला होता आणि त्यांची आधीच उपासमार होऊ लागली होती. या परिस्थितीत दुसऱ्या दिवशी मुइन आपल्या रहाण्याच्या ठिकाणाकडे परतला आणि त्याने शहरातून काही थोडे लाख

रुपये उभे करून ते, अब्दालीला व त्याच्या लोकांना द्यावयाच्या मेजवानीऐवजी, तिचा खर्च म्हणून दिले. यावेळी झालेल्या तहाच्या अटींनुसार, लाहोर आणि मुलतान हे दोन सुभे अफगाणच्या शहाला देण्यात आले. त्यांचा औपचारिक स्वीकार केल्यावर, अब्दालीने तेथील कारभार व्यवस्थेत काहीही बदल न करता, पूर्वीप्रमाणेच मुइनने तेथील कारभार, सुभेदार नात्याने पहावा म्हणून ते त्याच्याकडे सोपविले. मात्र आता फरक केला तो एवढाच की, या सुभ्यातील खर्च भागून उरणारा शिलकी वसूल यापुढे अब्दालीकडे ( भा. दिल्लीकडे नव्हे ! ) पाठवावा व सुभ्याच्या कारभारातील अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांबाबत अंतिम हुकूमही त्याच्याकडूनच घ्यावे असे ठरविले.[1] यावेळी अब्दालीचा प्रथम विचार होता की त्याने आता लाहोर येथे आपल्या नावाची नाणीही पाडावीत पण याबाबत त्याने मुइनचा शहाणपणाचा सल्ला मानला आणि हाही विचार सोडून दिला ( मिस्किन : १६ ).

याचप्रमाणे मुलतानचा सुभाही अब्दालीच्या हाती गेला व तोही अब्दालीच्या आज्ञा मानणाऱ्या एका प्रतिनिधीच्या हाती सुभेदार म्हणून देण्यात आला. या सुभ्यातील जमिनींच्या देणग्या देऊन अनेक सदझाई ( Saddazai ) अफगाणाना ( हे अहमदशहाचे जमात बांधव होते ). या सुभ्यात रहाण्यासाठी ठिकठिकाणी ठेवण्यात आले. परिणामतः हा सुभा, अफगाणांची एक वसाहतच बनला. ( हुसैनी ३३. ).

विजयी अफगाण-शहा आता लाहोर येथेच थांबला. तरवारीच्या जोरावर त्याने मिळविलेल्या फायद्याना व अधिकाराच्या तरतुदींना दिल्लीची मान्यता मिळविण्यासाठी, तेथूनच त्याने, कलंदर बेग नावाच्या आपल्या वकिलाला दिल्लीला पाठविले. हा वकील दिल्लीला १ एप्रिलला पोहोचला. भीतीने मोठा धसका घेतलेला बादशहा आणि तसलेच त्याचे मंत्री यांनी या तहाला, म्हणजेच लाहोर आणि मुलतान हे सुभे अब्दालीला देऊन टाकण्यास औपचारिक मान्यता दिली.[2] या तहाचा प्रत्यक्षात अर्थ असा की या सुभ्यांच्या नामधारी मालकीच्या मोबदल्यात त्यांचा शिलकी वसूल म्हणून वर्षाला ५० लाख रुपये अब्दालीला देण्याचे मान्य करण्यात आले.[1] नंतर १३ एप्रिलला या अफगाण वकिलाला बादशहाने दिवाण-इ-खासमध्ये ( Hall of Select Audiance ) निरोप दिला. या निरोपाचे वेळी बादशहाने त्याला सांगितले :—" मी माझ्या वचनाना दृढपणे चिकटून राहीनच पण तुमचा धनी जर मान्य केलेल्या अटीपासून ढळला, बदलला तर मात्र मी लढाईला तयार आहे. " तेव्हा या वकिलाने तहाच्या अटी नमूद असलेले पत्र आपल्या मस्तकावर ठेवले आणि तो म्हणाला :—" परमेश्वराने दिलेल्या या साम्राज्याकडे जो दुष्ट हेतूने पाहील तो परमेश्वरी कोपाग्नीत भस्म होऊन जाईल. " नंतर हा वकील आणि त्याच्या बरोबरीचे

---

१ अशा प्रकारे सर्व अधिकार व प्रत्यक्ष सत्ता अब्दालीकडे गेली असली तरी बादशहाची अब्रू राखावी, वरकरणी तरी त्याचे नाव रहावे म्हणून, अब्दालीने निवडलेल्या व्यक्तींचीच लाहोरच्या सुभेदार पदावर नेमणुका केल्याचे हुकूम मात्र, दिल्ली येथील बादशहाच्या मुख्य कचेरीतूनच निघावे व हे दोन्ही सुभे नावापुरते तरी दिल्ली साम्राज्याचेच भाग म्हणून रहावे असेही ठरले.

२ पहा : प्र. ८§९§१०. याचवेळी दुसरीकडे वजीर सफ्दरजंगाने, पंजाब व सिंध या सुभ्यातून अब्दालीला हाकलून देण्यासाठी मराठ्यांना ५० लाख रुपये देण्याचे ठरवून त्यांची मदत मिळविण्यासाठी त्यांच्याशी तह केला होता. बादशहाचा कलंदरबेगशी झालेला हा तह, अर्थातच वजिराने मराठ्यांशी केलेल्या तहास विरोधी होता. पण बादशहाच्या हुकुमानुसार, वजीर, मदतीसाठी लवकर न आल्यामुळेच बादशहाने हा तह मान्य केला होता. या विरोधी तहामुळे, लवकरच मराठ्यांशी अडचणी तंटे-निर्माण झाले. सविस्तर माहिती प्र. ८ §९ §१० मध्ये पहा.

तीन जोडीदार याना मौल्यवान आहेर देण्यात येऊन त्यांची पाठवणी करण्यात आली. [दिल्ली क्रॉनिकल; पे. द. नि. प. (२१) ५३, ५५: त.-इ-अ.-३३ब.].

अशा प्रकारे सहजासहजी झालेल्या साम्राज्याच्या या विघटनाला विरोध करू शकला असता व याविरुद्ध मर्दपणाने, निश्चयी प्रतिकार करण्याचा सल्ला देऊ शकला असता असा एकच उमराव त्यावेळी होता, तो सफदरजंग हाच होय. पण यावेळी तो खूप दूर, पूर्वेला असून कुमाऊं ( Kumaun ) टेकड्यांच्या पायथ्याशी रोहिल्यांबरोबर युद्धात गुंतलेला होता. तो २५ एप्रिलला दिल्लीला परत आला. अर्थातच विघटनास मान्यता देणारा हा तह थांबविण्याच्या दृष्टीने फार उशिरा तो परतला. [ दिल्ली क्रानि., त.-इ-अ-. ३३ ब ].

## § ८ : मुइन-उल् मुल्कचे अखेरचे वर्ष—मृत्यू

अशा प्रकारे शस्त्राच्या बळावर मिळविलेले हे विशेष मोठे यश आणि पाठोपाठ, मुत्सद्देगिरीने त्याला मिळविलेली मान्यता, यानंतर लगेच, हिंदुस्थानातील उन्हाळा जवळ आला असल्यामुळे, अहमदशहा अब्दालीने कंदाहारकडे प्रयाण केले. इकडे मुइन-उल्-मुल्कही आपल्या सुभेदारीच्या कामाकडे वळला. अफगाणांच्या या स्वारीमुळे सुभ्यातील कारभार आणि सार्वजनिक व्यवस्था यावेळी विस्कळीत झाली होती. या कारभाराची व सार्वजनिक व्यवस्थेची बिघडलेली घडी पुन्हा बसविण्याचे काम आता त्याच्यसमोर होते, त्याकडे तो वळला. यामध्ये सर्वात तातडीचे व महत्त्वाचे काम म्हणजे पांगापांग होऊन ठिकठिकाणी विखुरलेले व उपासमार होत असलेले त्याचे सैनिक एकत्र करण्याचे काम होते. हे काम उरकून बटाला जिल्ह्यांत तो दौऱ्यावर गेला. तेथे "चाक गुरु हरगोविंद" जवळ आतताई शिखांच्या एका टोळीतील ९०० जणाना ठार करून त्या टोळीला त्याने दडपून टाकले. या लांबत गेलेल्या दौऱ्यानंतर तो लाहोरला परत आला आणि पुढे ६ महिने तेथेच राहिला. पण शिखांनी त्याला शांतता लाभू दिली नाही. नुकत्याच झालेल्या या युद्धाने, या सुभेदाराचा कमकुवतपणा सर्वांपुढे उघडा केला होता आणि साम्राज्य सरकारची अखेरची, उरली सुरली प्रतिष्ठाही नाहीशी केली होती. पुढलाच हिवाळा सुरू झाल्याबरोबर ( ऑक्टोबर १७५३ ), शिखांचे लुटारू हल्ले पुन्हा सुरू झाले. तेव्हा मुइन आपल्या राजधानीतून बाहेर पडला आणि लोहोरच्या ईशान्येस ४० मैलांवरील 'मालकपूरला'—(Malakpur) गेला. तेथे दीर्घ मुक्काम करून त्याने आपले मुख्य ठाणेही तेथेच ठवले. ज्या ज्या भागातून शिखांच्या उठावाची बातमी येई तिकडे, तो उठाव दडपून टाकण्यासाठी आपली पथके, तो, या मुख्य ठाण्यातून पाठवू लागला. पण बेकायदेशीर लुटारू हल्ल्यांच्या साथीचा नायनाट करण्याच्या त्याच्या प्रयत्नाना यश आले नाही.

२, नोव्हेंबर, १७५३ ला सकाळभर शिकार करून परतल्यावर त्याने दुपारी जड जेवण केले आणि नंतर वामकुक्षी घेतली. पुढे तिसऱ्या प्रहरी, आपल्या सैन्याला जाऊन मिळण्यासाठी तो घोड्यावरून भरधाव दौडत निघाला असताना एकाएकी आजारी झाला. डॉक्टरांनी आपल्या सर्व उपायांची शिकस्त केली पण त्यांना यश आले नाही व तीन तारखेच्या रात्री तो मृत्यू पावला. या आजारात आणि मृत्यूच्या वेळी दिसून आलेल्या सर्व चिन्हावरून त्याच्यावर विषप्रयोग होऊन तो मरण पावला असला पाहिजे असा समज निर्माण झाला. आता विधवा झालेली त्याची पत्नी मुघलानी बेगम ही मोठी अधिकारलालसा असलेली व कर्तबगार व्यक्ती होती. "तिने खजिन्याचे दरवाजे उघडले. मुइनचे सैनिक व अधिकारी

यांचे देणे असलेले पगार देऊन टाकले आणि त्याना आपल्याकडे वळवून घेतले. हे पगाराचे वाटप तीन दिवस व तीन रात्री चालू होते." नंतर तिने मुइनचे कलेवर लाहोरला आणून तेथे हजरत इशानच्या कबरस्तानात पै. नबाबखान बहादुर याच्या कबरेजवळच त्याचे दफन केले.[१]

## § ९ : मुइन नंतरचे पंजाबचे सुभेदार

मुइनच्या मृत्यूची वार्ता दिल्ली येथे १२, नोव्हेंबर रोजी पोहोचली. दुसरे दिवशी सकाळी बादशहाने, तीन वर्षे वयाचा शहाजादा महमूद ( Mahmud ) या आपल्या बाल राजपुत्राची, पंजाबचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. ( भा. पहा–प्र. ८ §१ परि. ३ ). या घटनेबाबत तारिख-इ-अहमदशाहीच्या लेखकाला चीड येऊन, संतापाच्या भरात तो लिहितो :––

"सरहद्दीवरच्या अतिशय महत्त्वाच्या आणि ज्यावर अब्दालीच्या स्वारीची सतत भीती आहे अशा या, वायव्येकडील सुभ्यावर बालसुभेदाराची–३ वर्षाच्या बालकाची नेमणूक जाहीर झाली, तेव्हा दिवाण-इ-खासमध्ये, आपल्याला मिळालेला वायव्येकडील सुभ्याच्या सुभेदारीसारख्या उच्चपदाबद्दल बादशहापुढे या बाळाने कुर्निसात केला. याचबरोबर आणि यालाच शोभण्यासारखी आणखीही एक नेमणूक यावेळी करण्यात आली. या बाल सुभेदाराला त्याचा प्रतिनिधी म्हणून, नायब सुभेदार देण्यात आला. तोही एक बालकच! मुइनचा मुलगा महमद अमीनखान यावेळी दोन वर्षाचे बालक होता. या बालकाला, बालक शहाजाद्याच्या वतीने नायब-सुभेदार म्हणून नेमण्यात आले आणि बहाल केलेल्या या पदाचा निदर्शक सन्माननीय पोशाखही, योग्य त्या गांभिर्याने दिल्लीच्या दरबारातून त्याच्याकडे पाठविण्यात आला. ( भा. या दुहेरी घटनाबाबत पहा प्र. ८ §१ परि. ३ ). असा हा कळसूत्री बाहुल्यांचा खेळ पाच दिवस चालला होता. नंतर १७ नोव्हेंबरला साम्राज्याचा त्या वेळचा वजीर इन्तिझाम-उद्-दौला याची पंजाबचा सुभेदार––पण तेथे प्रत्यक्ष हजर न रहाणारा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. त्याच्या गैरहजेरीत प्रत्यक्ष कारभार पहाण्यासाठी त्याच्या प्रतिनिधीचे पद मुमीन खानाकडे सोपविण्यात आले. शिवाय या मुमीन खानाबरोबर जोडीदार म्हणून बिखारी खानाला ठेवण्यात आले.[२] ( त.-इ-अ..-८५ब, ८७ ब, ८८ ब ).

पण पंजाबच्या खऱ्या सत्तेचे अधिष्ठान दिल्लीच्या दुर्बल दरबारात नसून दुसरीकडेच-काबूलला, अब्दालीकडे–होते. यावेळी लाहोरमध्ये नेमणूक झालेल्या गैरहजर सुभेदाराचा "नायब" म्हणजेच प्रतिनिधी, या जागी दोन व्यक्ती होत्या, या जोड नायब सुभेदारानी

१ मिस्किन १७, २०–२१; त.–इ–अ.–८५ब–(मृत्यू) ९३ब (दफन). "मुइनचे दफन शाहिदगंज जवळ करण्यात आले. (शहराच्या ईशान्येस) या ठिकाणी त्याच्या कबरीचे अवशेष अद्यापही दिसतात. पुढे शेरसिंहाच्या कारकीर्दीत शिखांनी या कबरीची इमारत पाडली, कबरीमधील मिरमन्नूचे (भा. मुइनचे) अवशेष खणून बाहेर काढले आणि ते जिकडेतिकडे वाऱ्यावर भिरकावून दिले."

२ बादशहाकडून तहाला मान्यता घेऊन अब्दाली परत गेला ती वेळ एप्रिल १७५२ ची. मुइन सुभेदार म्हणून राहिला व पुढे मरण पावला हा काळ एप्रिल १७५२ ते ३ नोव्हेंबर १७५३ पर्यंतचा. यानंतर बालकांना सुभेदार व नायब सुभेदार नेमले जाण्याचा खेळ झाला तो नोव्हेंबर १७५३ मध्ये. यापैकी १३ मे १७५३ पर्यंत सफदरजंग हाच पूर्वीचा वजीर अधिकारावर होता. पण २६ मार्च, १७५३ पासूनच तो व बादशहा यांच्या दरम्यान झगडे व युद्धही सुरू होते. अखेरी १३ मेला सफदरला वजीर पदावरून काढून टाकून त्याच्या जागी इन्तिझामला वजीर नेमले. अशा प्रकारे इन्तिझाम हा, 'बाल सुभेदार' नेमण्यात येण्याचा खेळ झाला त्या नोव्हेंबर १७५३ मध्ये वजीर होता. ही सर्व हकीगत पुढे (प्र. ११मध्ये विशेषत: –९, १०, १५ मध्ये आहे.)

शहाणपणाने, आपला एक प्रतिनिधी, पेशावर सुभ्याचा अफगाण सुभेदार जहांखान याच्याकडे पाठविला आणि त्या सुभदारामार्फत त्याच्या धन्याची म्हणजे अब्दालीची या नेमणुकांबाबत संमती विचारली. नंतर जानेवारी १७५४ च्या शेवटी अब्दालीकडून याबाबतचे फर्मान व पंजाबच्या सुभेदार पदाचे प्रतीक म्हणून मानाचा पोशाख यांच्याकडे आला. या फर्मानानुसार मुइनचा मुलगा महमद अमीनखान या बालकाला अब्दालीची मान्यता असलेला सुभेदार म्हणून नेमण्यात येऊन, याचबरोबर त्याला त्याच्या वडिलांची "मुइन-उल्-मुल्क" ही पदवीही देण्यात आली. तसेच यावेळी मुमिन खानाचीही या बालक सुभेदाराचा प्रतिनिधी डेप्युटी-म्हणून नेमणूक करण्यात आली.[१] (भा. म्हणजे बादशहाने केलेली शहाजाद्याची, सुभेदार म्हणून नेमणूक व डेप्युटीचा जोडीदार बिखारीखान याची नेमणूक बाजूला सारण्यात आली! बादशाही सत्तेच्या पोकळपणाचाच हा पुरावा !

१ त.–इ–अ.–९३बी, ११ सी ए.... या हकीगतीचे वर्णन केल्यानंतर तारीख–इ–अहमदशाहीचा लेखक याबाबत आपला शेरा मारतो तो असा. ..... कोण हे आश्चर्य ! हिंदुस्थानच्या साम्राज्याचा मुगुट धारण करणाऱ्या आणि ज्याची नाणी सबंध देशभर चालू होती अशा या बादशहाचा काय हा दुबळेपणा ! इराणी आणि तुराणी उमरावांच्या दुष्टपणाचाच हा सर्व परिपाक होता."

## प्रकरण अकरावे

# सफ्दरजंगाचे बंड–१७५३

### § १ : सफ्दरजंगाचे स्वभावविशेष–त्याचे दोष

आपण काहीही करू लागावे तोच एखादा अनपेक्षित अडथळा समोर उभा रहावा आणि झगड्यात रक्तबंबाळ होऊन मागे फिरणे भाग पडावे अशी निकराची स्थिती सफ्दरच्या जीवनात निर्माण झाली तेव्हा तो अतिशय चिडला. अशाच एका तीव्र संतापाच्या भरात त्याने आपला प्रतिस्पर्धी जाविदखान याचा खून करून, हा काटा काढून टाकण्याचे कृत्य आटोपले होते. (भा. पहा : प्र. ८, ११, १२). पण या गुन्ह्यामुळे आपल्या शासकीय कारवायाना मोकळे मैदान मिळेल अशी आशा त्याने बाळगली असली तर मात्र त्याची याबाबत लवकरच निराशा झाली. जाविदखानाच्या खुनामुळे तात्काळ झालेल्या परिणामांचे रसभरीत वर्णन त्यावेळच्या एका दरबारी इतिहासकाराने केले आहे. तो लिहितो... " या खुनाची बातमी बादशहापर्यंत जेव्हा पोहोचली तेव्हा तो खूपच गोंधळला पण त्याला याबाबत काहीही करण्याचे धैर्य झाले नाही. वजिराचा प्रतिनिधी ख्वाजा तमकिन (Khwaja Tamkin), बरोबर मोठे सैन्य घेऊन, किल्ल्याकडे आला. नंतर नाझिर रोझ अफझुनखान याच्या मध्यस्तीने त्याने बादशहाची मुलाखत मिळविली आणि केलेल्या या धाडसी कृत्याबद्दल वजीराची कारणे सादर करून, बादशहाच्या प्रत्येक हुकुमाची वजीर अंमलबजावणी करेल अशी आश्वासनेही पुन्हा दिली..... जाविदच्या अशा मृत्यूमुळे बादशहा आणि त्याची आई याना अतिशय तीव्र दुःख झाले. उधमबाईने आता पांढरी वस्त्रे परिधान केली व आपल्या अंगावरील रत्ने आणि दागिने काढून टाकले (एखाद्या विधवेप्रमाणे) असेही म्हटले जाते. पण या विषयाबाबत बादशहा मात्र कोणाजवळ एक शब्दही बोलला नाही."[१] एखाद्या सिंहीणीचा जोडीदार तिच्यापासून जबरदस्तीने दूर केला तर ती क्रोधाने जशी जळफळेल तशी बादशहाची माता मनातल्या मनात गुपचूप, संतापाने तडफडली आणि पै. खोजापेक्षा कितीतरी जास्त सामर्थ्यवान असलेल्या, वजीराच्या दुसऱ्या दोन शत्रूंच्या पूर्णपणे आहारी गेली. जाविदखान हलक्या कुळात जन्मलेला व एकाएकी मोठेपणाला चढलेला एक उपटसुंभच होता. साम्राज्याचा अमीर-उमराव वर्ग आणि सामान्य जनता अशा दोघाकडूनही त्याचा तिरस्कारच होत होता, तथापि बादशहावर मात्र त्याचा दृढ पगडा बसला होता. यामुळे अधिकाराच्या अनेक पदावर त्याची नेमणुकही झाली होती. त्याचा संपत्तीचा लोभ अगदी हीन दर्जाचा असल्याने, तो पुरा करण्यासाठी बादशहावरील आपला प्रभाव आणि मिळालेली अनेक अधिकारपदे यांचा उपयोग करून, तो पुरा करण्याची त्याची नेहमी खटपट असे. त्याच्याजवळ शासकीय क्षेत्रात (Administrative) काही कर्तबगारी दाखवावी वा काही प्रदेश मिळवावा अशीही महत्त्वाकांक्षा नव्हती आणि खरे पाहिले तर, राजधानीमध्ये शाही जनानखान्याच्या कामावर सतत हजर रहावे लागणाऱ्या

---

१ त.–इ–अ.–४१.

त्याच्यासारख्या खोजाला शासकीय कामे व प्रादेशिक आकांक्षा अशा गोष्टीकडे लक्ष देणे अशक्यच होते. पण इन्तिझाम-उद्-दौला याची गोष्ट वेगळी होती. (भा. हा माजी वजीराचा वडील मुलगा होय. यावेळी तो २ ऱ्या क्रमांकाच्या बक्षी पदावर होता.) समाजातील सर्वोच्च स्तरावरील अतिशय उच्च घराण्यातील, तो असल्याने, त्याला मुघल अमीर-उमरावामध्ये एक वेगळीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. याचप्रमाणे इमाद-उल्-मुल्कचे वैशिष्टच होतेच. त्यावेळी हयात असलेल्या कोणत्याही सरदारापेक्षा अधिक चांगले व्यवस्थापकीय व रचनात्मक सामर्थ्य, अधिक खोलवर विचार करू शकणारी बुद्धिमत्ता आणि अधिक कणखर इच्छा शक्ती त्याच्यामध्ये होती. जाविदच्या खुनानंतर, असे हे दोघे प्रतिष्ठित दरबारी पक्षाचे पुढारी बनले.

दरबारी वर्तुळात आता सफ्दरला एकही मित्र राहिलेला नव्हता. सलाबतखान बंदिवासात होता. (भा. पहा : प्र. ८ § ८ परि. २). नज्मुदौला (भा. पहा प्र. ८ § ४) मरण पावला होता. पूर्वी पैशाची लाच चारून जाविदखानाला वश करून घेता येई, पण आता बादशहाच्या कानाशी लागलेल्या या दोघा प्रतिष्ठित शत्रूंना तसे वश करून घेणे शक्य नव्हते. वजीराच्या परिस्थितीत निर्माण झालेल्या या अडचणीतून त्याला सावरून धरता येईल, त्याची बाजू सांभाळता येईल असे त्याचे स्वभाव गुणही नव्हते. सफ्दरजंग स्वत: चांगला प्रमुख लष्करी नेता—सरसेनापती–नव्हता वा जनतेचे नेतृत्व करता येईल असे उपजत गुणही त्याच्यामध्ये नव्हते. त्याच्या अंगी वैयक्तिक शौर्य खचितच होते पण हाही गुण निरुपयोगी ठरे तो त्याच्या उतावळ्या स्वभावाने आणि अधिक शहाण्या माणसांच्या सल्ल्याची मगरूरीने उपेक्षा करण्याच्या स्वभावाने. चांगल्या नेत्याला दूरदृष्टीने योजना आखता आल्या पाहिजेत आणि त्याची कार्यवाही करताना नानाविध हालचालीमध्ये समवाय साधून त्या अमलात आणता आल्या पाहिजेत. युद्धभूमीवर परिस्थिती बदलत रहाते. अशा बदलत्या स्थितीवर त्याला ताबडतोब आपली हुकमत प्रस्थापित करता आली पाहिजे किंवा एखादे अरिष्ट कोसळले तरी स्थिरचित्ताने, स्वत: नेतृत्व करून आपल्या कणखर निश्चयाने त्या अरिष्टातून पुन्हा मार्ग काढता आला पाहिजे. पण खऱ्या नेतृत्वाच्या या गुणसमुच्चया-पैकी सफ्दरजवळ काहीच नव्हते.

स्वभावानेही तो अशा काही उमरावी वृत्तीचा व पैशाबाबतही इतका बेफिकीर, अव्यवस्थित व उधळचा होता की त्याने आपल्या मुलाच्या विवाहासाठी ४६ लाख रुपये खर्च केले. याउलट पाहिले तर, मुघल बादशहामध्ये सर्वांत जास्त भव्य वैभवशाली जीवन लाभलेल्या बादशहाच्या ज्येष्ठ व लाडक्या शहाजाद्याच्या विवाहालाही, शंभर वर्षांपूर्वी फक्त ३० लाख रुपयेच खर्च आला होता. [इमाद, ३६]. या वजीराच्या हिंदू चिटणीसानी व कारभाऱ्यानी त्याची चांगली सेवा करून, त्याच्या सुपीक सुभ्यामधून, त्याला खूपच मोठा वसूल मिळवून दिला याबद्दल तर शंका नाहीच पण त्यांचे हे सर्व प्रयत्न, वजीराच्या उधळपट्टीमुळे निरर्थक ठरले. खऱ्या नेत्यामध्ये, कर्तबगार सेवकवर्ग निवडण्याचा आणि त्यांच्या सल्ल्यानुसार वागण्याचा जन्मजात गुणधर्म असतो पण तोही त्याच्याजवळ नव्हता. राजकीय दूरदृष्टी व राजकारणातील डावपेच लढविण्याचे कौशल्य या दोन्हीचाही सारखाच अभाव त्याच्यामध्ये होता. त्याचा धनी–बादशहा–चंचल व अविश्वासू वृत्तीचा होता. अशा सिंहा-सनाधिपतीच्या दरबारात ज्याला सत्ताधारी म्हणून टिकावयाचे असेल त्याला स्वत:च्या पाठीशी निरनिराळ्या गटांची समर्थ संयुक्त आघाडी जोपासावी लागते. सफ्दरला अशी फळी

आपल्या पाठीशी उभी करता आली नाही. या सर्वांचा थोडक्यात अर्थ असा की, त्या काळचे दिल्लीचे साम्राज्य टिकवून धरण्यासाठी अवश्य असणारा शहाणपणा व जरूर तितकी हिंमत ही दोन्हीही सफदरजंगजवळ नव्हती. काही बुद्धिमान शिया अधिकारी त्याच्या भोवती जमा झाले होते, ते अखेरपर्यंत त्याच्याशी एकनिष्ठही राहिले हे खरे, पण ते सर्व केवळ निरनिराळ्या व्यक्ती म्हणून–एकसंघ शासकीय यंत्रणेतील, व्यवस्थित गुंफलेले, परस्पर पूरक घटक म्हणून नव्हे. एकच धर्मपंथ वा कौटुंबिक संबंध या कारणानीच केवळ, त्याच्याकडे आकर्षित झालेल्या त्या व्यक्ती होत्या. त्याला उत्तम संधीही मिळाल्या होत्या. त्याचे स्वतःचे सुभे निसर्गतःच समृद्ध असून त्याचे सैनिकही व्यक्तिशः उत्कृष्ट लढवय्ये होते. या सर्व सोयी त्याच्याकडे असल्या तरी त्याची कारकीर्द, त्याची जीवन गाथा, अपयशातच संपुष्टात आली. तेव्हा इतिहासकार अखेरी निश्चितच म्हणतील की, सफदरजंग हा परदेशातून आलेल्या इतर काही कर्तबगार पर्शियन व्यक्तींच्या तुलनेने कर्तबगारी व स्वभाव वैशिष्ट्ये या दृष्टीने खूपच कमी प्रतीचा होता. अलिमर्दान आणि सादुल्ला, मिरजुम्ला आणि रुहुल्ला व अशाच, पर्शियातून आलेल्या अन्य व्यक्ती, शहाजहान आणि औरंगजेब यांच्या कारकीर्दीच्या भूषण ठरल्या होत्या. या सर्वांपेक्षा, सफ्दर खूपच खालच्या दर्जाचा होता. इतकेच नव्हे तर, सफदरनंतरच्या पिढीतील मिर्झा नजफखान याच्यापेक्षाही तो कमी प्रतीचाच होता.

इन्तिझाम-उद्-दौला, खान-इ-खानान [१] हा महमदशहाचा वजीर कम्रुद्दिन याचा मोठा मुलगा. त्याने आपल्या बापाच्या सुखासीन स्वभावाचा वारसा उचलला होता. तो भित्रा व काहीही साहसात न पडणारा मनुष्य होता. लढाईपासून तो नेहमीच मागे फिरे आणि धोक्याची थोडीही भीती दिसली की, आपल्या वाड्यात स्वतः बंदिस्त राहून संभाव्य धोक्यापासून सुरक्षित रहाण्याचा तो प्रयत्न करी. त्याच्याजवळ लष्करी जीवनाची आवडही नव्हती वा त्याची क्षमताही नव्हती. शांततेच्या काळात वा युद्धात केव्हाही त्याला लहानशा सैन्याच्याही हालचाली हाताळणे शक्य झाले नाही. साम्राज्याचा वजीर म्हणून तो पंधरा महिने (मार्च १७५३ ते मे १७५४) राहिला आणि एवढ्या अवधीतच, आपली नालायकी आणि भित्रेपणा यामुळे, त्याने स्वतःला, संपूर्ण, लाजिरवाण्या बदनामीने झाकळून टाकले. पण त्याची विधवा आई शोलापुरी बेगम ही मात्र निराळी होती. तिने आपल्या नवऱ्याच्या कौटुंबिक क्षेत्रावर आपला अधिकार चालविला होता. (शोलापुरी बेगम ही औरंगजेबाच्या कारकिर्दीतील जाननिसारखान याची मुलगी होय.) या बेगमेने आता उधमबाईवर आपला प्रभाव पाडला आणि पुढे (पहा. § ७) सफ्दरजंगाला अधिकारावरून उलथून टाकण्यासाठी शाही वाड्यात झालेल्या कटाचे ती माध्यम बनली. [सियार (३) ४६ ; इमाद २२]

## § २ : इमाद-उल्-मुल्कचे व्यक्तिचित्र

इमाद-उल्-मुल्कचा बाप म्हणजे पहिला निजाम असफ् जाह याचा मुलगा गाझिउद्दीन-खान फिरुझजंग हा होय. फिरुझखान, अतिशय भिडस्त आणि धार्मिक वृत्तीचा असून त्याने आपले दिवस धर्मशास्त्र व्यासंगी ( Theologians ) लोकांच्या संगतीत आणि रात्री परमेश्वर चिंतनात घालविल्या. एखाद्या कर्मठ व्यक्तीच्या, कडव्या पद्धतीने त्याने आपल्या कौटुंबिक क्षेत्रात शिस्त राखली. हे गुण त्याने आपल्या आईकडून घेतलेले दिसतात. ही

१ याचे मूळ नाव मिर निजामुद्दिन खान असे असून पुढे त्याला कम्रुद्दिन आणि इतिमाद्-उद्-दौला या, त्याच्या बापाच्या पदव्या मिळाल्या होत्या. पण प्रस्तुत ग्रंथात सगळीकडे त्याचा निर्देश, इन्तिझाम या नावाने करण्यात येईल.

बेगम गुलबर्गा येथील सय्यद घराण्यातील एका धर्मनिष्ठ शेखाची कन्या होती. गाझिउद्दिनाचा विवाह वजीर कम्रुद्दिन याच्या झेब-उन्-निसा—(लोक हिला सामान्यतः सुलतान बेगम म्हणून ओळखीत.) या मुलीशी झाला होता. (भा. म्हणजेच, इन्तिझामचा हा मेहुणा होय–बहिणीचा पती.) या विवाहातून जन्मलेला त्याचा मुलगा म्हणजे शहाबुद्दिन, या मुलालाच पुढे इमाद-उल्-मुल्क, गाझिउद्दिनखान बहादुर, फिरुझजंग, मिरबक्षी, अमीर-उल्-उमरा, निजाम-उल्-मुल्क असफ् जाह अशा अनेक पदव्या मिळाल्या आणि अखेरी जून १७५४ मध्ये तो साम्राज्याचा वजीरही झाला. इमादचा जन्म नखर येथे, १ फेब्रुवारी १७३६ मध्ये झाला. त्याच्या धर्मनिष्ठ बापाने, विश्वासही बसणार नाही इतक्या कडक शिस्तीने त्याला वाढविले. समवयस्क मुलात त्याला कधीही मिसळू दिले नाही. त्याकाळी, नर्तकींचे कार्यक्रम करणे ही तर सर्वच वर्गातील लोकांची नेहमीची, सार्वत्रिक पसरलेली करमणूकच असून, ती प्रत्येक सामाजिक प्रसंगी, साहजिकच घडणारी बाब होती. तरीही इमादला मात्र मुलींच्या अशा नृत्याला हजर रहाण्यास कधीही रवानगी देण्यात आली नाही. त्याने आपले बालपणीचे दिवस फक्त त्याचे शिक्षक आणि मुल्ला यांच्याच सहवासात घालविले आणि मुसलमान धर्मानुसार पाळीत असलेले विश्रांतीचे दिवस–सबाथ–खोजांचे संगतीत काढले. याचा परिणाम असा झाला की, त्याच्या बुद्धीचा, प्रयत्नपूर्वक, मोठ्या घाईने विकास केल्यासारखे होऊन तो अकाली प्रौढ बनला. तुर्की भाषेसहीत अनेक भाषांवर त्याने प्रभुत्व संपादन केले. अरेबिक लिपी लिहिण्याच्या सातही निरनिराळ्या पद्धतीने, ती, नीटनेटकी वळणदार लिहिण्यासही तो शिकला. एक विद्वान म्हणून अनेक ज्ञान शाखात तो पारंगत झाला असून त्याच्या काळात काहीशी मान्यता पावणारी अशी कविताही त्याने लिहिली. त्याने संपादन केलेल्या या बौद्धिक गुणसंपदेमुळे, त्याची कृतिक्षमता मात्र कमी झालेली नव्हती. त्याचा बाप निष्क्रिय व निवृत्त वृत्तीचा असला तरी हा मुलगा मात्र तसा झाला नाही. तो युद्धामध्ये शूर व कृतीमध्ये साहसी होता. अद्याप एकोणिसावे वर्षही न ओलांडिलेल्या युवकाच्या मानाने, आश्चर्य वाटावे इतका चांगला नेतृत्वाचा गुणही त्याच्या ठायी होता. पण त्याच्या व्यक्तिमत्वातील गुणांच्या या सर्व मौलिक देणग्यांचा उपयोग कमी झाला तो त्याच्या इतर काही दुर्गुणांमुळे. नीतिमत्तेच्या जाणिवेचा संपूर्ण अभाव, अमर्याद महत्त्वाकांक्षा, निर्लज्ज बनण्याइतकी पैशाचा लोभ आणि वृत्तीत भिनलेले भयानक क्रौर्य हे त्याचे विशेष दुर्गुण होते. त्याच्या अशा दुर्गुणांमुळे, दिल्लीच्या इतिहासातील भयंकर दुष्ट मनुष्यांपैकी एक, असा तो बनला. त्याच्या बापाचे साधे जीवन आणि विलासाचा तिटकारा यामुळे त्याने अफाट संपत्ती साठविली होती. यापैकी रोकड व रत्ने यांच्या रूपाने ७० लाखांची संपत्ती, इमादने, सफदरजंगाविरुद्ध केलेल्या युद्धासाठी, अतिशय शहाणपणाने व यशस्वीपणे वापरली. [इमाद., ६१-६२; सियार (३) ४६ ].

## § ३ : सफदरजंगाची शासकीय अकार्यक्षमता व नालायकी-त्याच्या ऱ्हासाची कारणे

जाविदखानाचा खून झाल्यानंतरचे, सात महिने, सफदरजंग साम्राज्याचा खऱ्या अर्थाने, सर्वश्रेष्ठ, पहिला मंत्री–खरा वजीर–म्हणून राहिला. या काळात त्याला कोणीही प्रतिस्पर्धी नव्हता, साम्राज्यात कोणतेही बंड नव्हते वा कोणतेही परचक्र त्याला भेडसावीत नव्हते. त्याच्या अंगी जर खरोखरीच काही कर्तबगारी वा काही मुत्सद्देगिरी असती तर शांततेच्या या मध्यंतरात, त्याला साम्राज्याच्या कारभाराची पुन्हा घडी बसविता आली असती आणि

त्याची संरक्षण व्यवस्था आणखी मजबूत करता आली असती. पण साम्राज्याच्या सैन्याची पुनर्बांधणी करणे वा आर्थिक स्थिती सुधारणे यासाठी त्याने काहीही केले नाही. इतकेच नव्हे तर याउलट अतिशय वाईटच केले ते, अडचणी व धोके निर्माण करूनच. दूरदृष्टीच्या धोरणाचा अभाव, पैसा व अधिकार यांचा लोभ व बेमुर्वत घमेंड या आपल्या दोषांमुळे त्याने बादशहाला घाबरवून सोडले, अन्य अमीर-उमराव व सरदार यांचा स्नेह गमावला आणि दिल्लीच्या जनतेमध्ये आपल्याबद्दल तिरस्कार निर्माण होऊ दिला.

आतापर्यंत आपल्या वजीरपदाचा वापर त्याने, स्वतःसाठी अतिशय सुपीक व शांतता असणाऱ्या जहागिरी मिळविण्यासाठी केला होता. तसेच ज्या ज्या वेळी शाही शासनाला, एखाद्या सरदाराच्या मरणानंतर त्याची मालमत्ता खालसा करण्याचा कायदा–( Law of escheat )–अंमलात आणण्याचे धैर्य झाले त्या त्या वेळी त्या सरदाराची दौलत स्वतःकडे घेण्यासाठीही आपल्या पदाचा त्याने वापर केला होता. जाविदखान असताना आपल्या अधिकाराचा हा स्वार्थी वापर त्याने केला तो त्याच्याशी भागीदारी करुनच त्याला दूर केल्यावर तर, तो या लुबाडणुकीचा मक्तेदारच बनला. इतर सर्व सरदारांची त्याच्या कारकिर्दीत उपासमार झाली. आपली बेकारी आणि होत असलेले आपले हाल याबद्दलची जबाबदारी ते त्याच्याच माथी मारू लागले. पण त्याना कोणी मित्र वा पुरस्कर्ता नसल्याने, याबाबत, फक्त मुकाटयाने, मनातल्या मनात धुसफुसत बसावे लागे. साम्राज्याच्या सर्व आर्थिक व्यवहाराचा ताबा, अधिकृतपणे सफ्दरच्याच हाती होता. या परिस्थितीत, खजिन्यात येणारे सर्व प्रकारचे वसूल, स्वार्थीपणाने त्यानेच हस्तगत करून आपल्या हाती ठेवले व ते स्वतःच्या खाजगीतील सैन्य विभागासाठी खर्च केले. परिणामतः साम्राज्यातील अन्य अधिकाऱ्यांच्या सैनिकी पथकांचा पगार, इतकेच नव्हे तर बादशहाच्या वाडयातील संरक्षक पहारेकरी पथकांचा पगार आणि तोफखाना विभागातील सैनिकांचा पगार, वर्षानुवर्षे न देता, बाकीच राहिला. यामुळे उपासमार होत असलेले सैनिक वारंवार बंड करून उठत, रस्त्यामधून दंगली करीत, आपल्या अधिकाऱ्याना, जमाव करून आडदांडपणे अडवीत. बादशहा वा बक्षी ( Paymaster ) यांच्या वाडयांचे दरवाजेही ते अडवीत आणि या वाडयातून बाहेर वा आत जाणारी रहदारी रोखून धरीत. यामुळे या वाडयात रहाणाऱ्या लोकांचा अन्नपुरवठा व पाणीपुरवठा काही दिवसच्या दिवस बंद पडे. हुकुमशाही वृत्तीच्या सफ्दरच्या कारभाराचे निर्माण झालेले, असे हे दृश्य फल होते.

अशा बंडखोरीतून बादशहालाही त्याच्याच सैनिकांमुळे उपासमार व अपमान सहन करावा लागे. पण वजीर आपल्या धन्याला या संकटापासून वाचवू शकला नाही. इतकेच नव्हे तर याचवेळी राजधानीवर होणारे अत्याचार व तिची लूटमार यापासूनही तो तिचे रक्षण करू शकला नाही. यावेळी मराठयांनी दिल्लीच्या आसमंतात लुटालूट केली इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष राजधानीतच जबरदस्तीने शिरण्याचा धाकही ते दाखवू लागले. पण सफ्दरजंगाला मात्र आपल्या सामर्थ्याच्या जोरावर वा लाच देऊन तरी त्याना घालवून देता आले नाही. दिल्ली सभोवतालच्या प्रदेशातील हमरस्त्यावरही काहीही प्रतिबंध न होता लूटमार चालू होती मग दूरच्या प्रदेशासंबंधी सांगण्याची गरजच नाही. बलिष्ठ मनुष्य, दुर्बल माणसाच्या वतनवाडीतून खुशाल, न भिता वसूल करू लागला. आणीबाणीच्या परिस्थितीत असलेल्या मुघल साम्राज्यासारख्या साम्राज्याचा सर्वश्रेष्ठ मंत्री–वजीर–हाच शासनाच्या राजधानीतूनच यावेळी गैरहजर राहून, औध वा रोहिलखंड अशा आपल्या स्वतःच्या

सुभ्यात, स्वतःच्या हिताकडे पहाण्यासाठी जात असे. (भा. पहा प्र. ८§९ व प्र. ९ सर्व). साहजिकच मध्यवर्ती शासनाचा कारभार जवळजवळ बंदच पडला, आणि शासनाची सर्वच कामे दिशाहिन स्थितीत, काहीही उद्दिष्ट नाही अशा अवस्थेत वहावत राहिली.

शासनातील प्रत्येक बाब, आपल्या हातीच घेण्याच्या प्रयत्नात सफ्दरने अखेरी सर्वच गमावले. त्याला प्रतिस्पर्ध्याविरुद्ध यश मिळाले तेव्हा जर तो संयमाने वागला असता तर आपली सत्ता त्याला कायमची टिकविता आली असती. त्या काळात सार्वजनिक क्षेत्रातले अधिकाराचे प्रत्येक पद हे वंशपरंपरागत मिळण्याची बाब आहे असेच सर्व मानीत. मुलगा, आपल्या बापानंतर, त्याच्या अधिकारापदावर हक्क सांगे ते त्या अधिकारपदासाठी उपलब्ध असलेला सर्वोत्तम उमेदवार म्हणून नव्हे तर आपल्या बापाकडून मिळावयाचा कायदेशीर वारसा म्हणून. अशा या काळात वजीरपदावर आलेला सफ्दरजंग हा स्वतःच, वंशपरंपरागत नव्हे, तर नवाच आलेला मनुष्य होता. यातच त्याने, साम्राज्यातील सत्तेचे आणि वेतन व फायद्याचे प्रत्येक अधिकारपद तुराणी अमीर-उमराव आणि त्यांचे अनुयायी यांच्यापासून दूर ठेवण्याचा, त्याना ते मिळू न देण्याचा प्रयत्न केला. यातून त्याने आपल्याविरुद्ध, शत्रूंचा एक मोठा घोळकाच उभा केला. सफ्दरपूर्वी, तीन पिढ्यांच्या काळात, 'तुराणी' गट, साम्राज्याच्या शासन यंत्रणेवर संपूर्ण हुकमत चालवीत असून, त्याने, या काळात आपल्या हाताखालचा अधिकारी व नोकरवर्ग, आपली कुळे, आपल्यावर अवलंबून रहाणारा सरंजाम रयतवर्ग (Vassals) अशांची एक बळकट फळीच तयार केली होती. ही परिस्थिती सफ्दर विसरला. कोणत्याही खऱ्या मुत्सद्याला, तो सभोवतालच्या ज्या परिसरात व परिस्थितीत वावरणार असेल, तीमधील सत्तेच्या वास्तव, मूलभूत घटकाकडे दुर्लक्ष करणे परवडण्यासारखे नसते. आपणालाही जगता यावे, दुसऱ्यालाही जगू द्यावे, या वृत्तीतून खऱ्या मुत्सद्याला आपल्या परिसरातील शक्तींच्या बरोबर तडजोड करावीच लागते. पण सफ्दरजंगाला हे काही शक्य झाले नाही. यावेळी इशाकखान (भा. पहा प्र. ८§४) मरण पावला होता आणि सलाबतखान बदनामी होऊन बंदीत पडला होता. (भा. पहा : प्र. ८§४§८, प्र. ७§९§११). यानंतर सफ्दरला जुन्या सरदार-उमरावामध्ये एकही मित्र उरला नव्हता. बंगाल व बिहारचा सुभेदार अलिवर्दीखान हा तर धर्मपंथाच्या दृष्टीने त्यांच्या बाजूचाच होता तरीही सफ्दरचे अलिवर्दीखान बरोबरचे संबंध, आपल्याच मूर्खपणामुळे दुरावले होते. बादशहाची भेट घेण्यासाठी येणाऱ्याबाबत, आपल्या हिताला सोयीच्या तेवढ्याच लोकांना या भेटीची परवानगी देण्याचे धोरण त्याने ठेवले आणि राज्याच्या इतर नोकराबाबतही त्याने दांडगाईची, अरेरावीचीच वृत्ती ठेवली. यामुळे बादशहाच्या मनामध्येही, अपमानित होत असल्याची भावना आणि स्वतःच्या सुरक्षिततेची भीती निर्माण झाली. या संदर्भात दरबारचा इतिहासकार लिहितो—"बादशाही पदाचा संपूर्ण नाश झाला होता. ते नामशेषच झाले होते. अस्वस्थता व गोंधळ यांची वजीराला असलेली आवड, हीन लोकाना वरच्या पदावर चढविण्याची त्याची रीत, त्याच्या वृत्तीमधील दुष्टावा आणि या सगळ्या गोष्टीबाबत आपली स्वतःची असहाय्यता, हे सर्व बादशहाला स्पष्ट दिसून आले. यामुळ त्याने साम्राज्यातील सर्व सत्ता असहाय्यपणे वजीराच्या हाती सोडून दिली आणि तो, आपले दिवस, जनानखान्यात ऐषआराम भोगण्यात घालवू लागला..... सर्व सत्ता हाती मिळविणारा हा वजीर तर साम्राज्य उध्वस्त करणारा आणि आपल्या धन्याला दरिद्री बनविणाराच होता." [त.-इ-अ.-४४, १८ अ.].

साम्राज्याच्या त्यावेळच्या परिस्थितीत, शहाण्या वजीराचे पहिले अवश्य कर्तव्य म्हणजे साम्राज्याच्या सैन्याची पुनर्व्यवस्था करण्याचे होते. यासाठी सततचा, वक्तशीर व भरपूर पैशाचा पुरवठा निश्चित करणे अवश्य होते. पण सफ्दरजंगाने फक्त स्वतःचा खाजगी खजिना भरण्याकडेच लक्ष दिले आणि यामुळे साम्राज्याच्या सशस्त्र संरक्षणाची तरतूद करणे अशक्य झाले.

अशा लोभी, हुकुमशाही वृत्तीच्या निरुपयोगी वजीराला अधिकारावरून खाली ओढून घालवून देण्यासाठी झगडा होणे अटळच होते आणि तो सफ्दरजंगाच्या आंधळेपणामुळे, जाविदखानाच्या मृत्यूनंतर सहाच महिन्या इतक्या थोडया अवधीत सुरूही झाला. अदूरदर्शी आणि स्वार्थी लाभ उपटण्याच्या धोरणाव्यतिरिक्त अन्य कोणतेही निश्चित धोरण नसणाऱ्या सफ्दरजंगाने शक्य त्या सर्व प्रकारच्या चुका केल्या. परदेशातून हिंदुस्थानात आलेल्या, इराणी आणि तुराणी या दोन्ही पक्षियात त्यावेळी जो झगडा चालला होता त्यामध्ये स्थानिक अफगाण ज्या पक्षाला मिळतील त्या पक्षाचे पारडे जड होणार होते तरीही त्याने अफगाणांना डिवचून आपले कट्टर वैरी बनविले. त्याच्याशी प्रत्यक्ष तरवारीचे दोन हात करण्याला प्रारंभी ते अतिशय नाखूषच होते; त्यांना फक्त, आपल्या भागापुरती, काहीं आडकाठी न आणता, मोकळीक दिली जावी एवढीच इच्छा होती. पण सफ्दरजंगाने त्यांना बऱ्याच वेळा डिवचले, चीड येण्यासारखे वागविले आणि यातून निर्माण झालेल्या लढचात, त्यांच्याविरुद्ध काढलेल्या मोहिमाही मूर्खपणाने चुका करीत चालविल्या (भा. पहा : प्र. ९ सर्व). यामुळे अफगाणही लवकरच त्याच्या लष्करी सामर्थ्याला तुच्छ मानू लागले. याचबरोबर क्वाइमखान ( Qaimkhan ) मेल्यावर त्याच्या कुटुंबियाना सफ्दरने अगदी वाईट हलक्या प्रकारची वागणूक दिली आणि त्याच्या मराठा मित्रानीही, अफगाणांवर फार जुलूम जबरदस्ती केली. या सर्वामुळे गंगेच्या पूर्व व पश्चिम अशा दोन्ही भागात वसाहती करून स्थाईक झालेले अफगाण त्याचा कायम तिरस्कार करू लागले. अशा प्रकारे, ज्यांचा इराणी-तुराणी भांडणात उपयोग होऊ शकला असता अशा अफगाणांचे शत्रुत्व ओढून घेण्यास तो स्वतःच जबाबदार ठरला होता, ही त्याचीच चूक होती. त्याने मदतीसाठी आणविलेली मराठा सैन्ये तर केवळ भाडोत्री सैन्येच ( Mercenaries ) होती आणि जो त्याना जास्त पैसा देऊ करेल त्याच्या बाजूला जाण्यास व त्याच्या बाजूने आपल्या लोभी पैशाला लालचावलेल्या-तरवारी चालविण्यास ते तयार असत. या पार्श्वभूमिवर पहाता, पुढे इमादबरोबर झालेल्या लढचात मराठ्यांची मदत मिळविण्याच्या कामी सफ्दरच्या रित्त होत चाललेल्या खजिन्याला, अद्याप हातही न लावलेल्या इमादच्या मोठ्या खजिन्याशी स्पर्धा करणे शक्य झाले नाही. (भा. पहा पुढे प्र. ११§११ व §१८.) त्याचे विश्वासू मित्र म्हणजे जाट. रोहिल्यांच्याविरूद्ध ते कुचकामी ठरले होतेच आणि यापुढे आपापसात जे युद्ध सुरू झाले त्यातही त्याना एकाही लढाईत सफ्दरच्या बाजूने जय मिळविता आला नाही. इतकेच नव्हे तर, या उलट पुढे त्यानी दिल्ली आणि तिचा परिसर ही, अशी लुटली की (भा. पहा पुढे § १४), यामुळे पुढे दीर्घकाळ जाटानी घातलेला यावेळचा गोंधळ, जाटमर्दी या अशुभ कुत्सित व भयसूचक नावाने ओळखला जाऊ लागला. शिवाय या लुटीने वजीरावर अतिशय मोठा ठपका येऊन, राजधानी व तिचा परिसर यातील लोकमात्र त्याला दुरावले—कारण, लुटीचा जणूकाय परवानाच असलेल्या या लुटारूंचा इतरांच्या दृष्टीने तोच पुरस्कर्ता होता.[१]

१ सुरजमलने "जुनी दिल्ली" हा भाग लुटला. यावेळी या भागाची लोकसंख्या शहाजहानच्या वेळेच्या शहराएवढी, कदाचित थोडी जास्तच होती. लोकांचे जीवन, मालमत्ता आणि त्यांच्या कुटुंबाची अब्रू. . . .

[पुढील पानावर]

त्याच्याशी एकनिष्ठ असलेला व नेहमीच त्याची बाजू घेणारा शूर राजेंद्रगिरी गोसाई यानेही सहराणपूर जिल्ह्यात शाहीही भेदभाव न करता सगळ्यांकडून सारख्याच कडकपणे वसूल गोळा केला... त्याने या जिल्ह्यातील "जे पूर्वी कधीही, कोणत्याही फौजदाराची हुकूमत मानीत नव्हते अशा सर्व प्रमुख जमीनदाराना– उदा. बाऱ्हचे सय्यद, अफगाण आणि गुजर अशा सर्वांनाच नमविले." त्यांच्याकडून वसुलाची बाकी वसूल करताना त्याने, त्यांच्या बायकामुलांनाही विकले, गुलामगिरीत लोटले आणि अशा कठोरपणे वसूल केला. (कर्ज न फोडणारे वा वसूल न देणारे, याना अशी शिक्षा देण्याची त्या काळी चाल होती). गोसाईच्या आधीचे या जिल्ह्यातील मुसलमान फौजदारही वसुलीच्या कामात बहुधा गोसाई इतकेच कठोर असतील, पण त्यानी सय्यद व शेख कुटूंबाना यातून मोकळे सोडले होते. गोसाईने मात्र त्यानाही मोकळे सोडले नाही. तेव्हा गोसाईच्या या कृतीमुळे सर्व मुसलमान समाजात सफ्दरबद्दल तीव्र चीड निर्माण झाली [त.–इ–अ.–१२१ अ.].

मूळ आर्यन वंशातील व शियापंथीय असलेले स्थानिक पर्शियन लोक हे, सैनिक या-दृष्टीने अगदी कमी प्रतीचे ठरत. यामुळे चांगले सैनिक मिळविण्यासाठी सफ्दर मुख्यतः तुर्की सैनिकी व्यवसायिकावरच अवलंबून असे. या तुर्की सैनिकांना हिंदुस्तानच्या इतिहासात "मुघलिया" आणि "कुलपॉश" (Kula Posh— हे लाल टोपी वापरीत, यावरून त्याना टोपीवाले असेही म्हणत) असे म्हणतात. हे तुर्की सैनिक सफ्दरच्या सेवेत रहात ते फक्त पैशासाठी. त्याना जोडणारा दुवा म्हणजे फक्त मिळणारा रोख पैसाच होता. यामुळे जेव्हा इमादने, बादशहाची परवानगी मिळवून व त्याच्याच वतीने, त्याना अधिक पगार व अधिक प्रतिष्ठा देऊ केली तेव्हा ते सहजासहजी सफ्दरची बाजू सोडून इमादकडे आले. त्यांच्या लाचखाऊ लोभी हृदयात जर कांही स्वाभाविक सहानुभूतीचा उबारा असलाच तर ती सहानुभूति इमाद-उल्-मुल्क आणि इन्तिझाम यांच्याबद्दलच असणार होती, कारण हे दोघे वंशाने तुर्कच असून, मध्य आशियातून हिंदुस्तानात येऊन स्थायिक झालेल्या लोकांचे, म्हणजेच तुर्कांचेच पुढारी म्हणून मान्यताही पावलेले होते.

## § ४ : इमाद-उल्-मुल्क याची मिरबक्षी म्हणून नेमणूक

इमाद-उल्-मुलकचा स्वभाव व वागणूक याबाबत सफ्दरजंगाची मते व निष्कर्ष चुकीचे होते. या चुकीमुळे त्याने तरुण इमादला साम्राज्यातील सर्वांत मोठ्या अधिकाराच्या आणि प्रतिष्ठेच्या (भा. वजीराखालोखाल) पदावर चढविले आणि हीच त्याची सर्वांत मोठी घोडचूक झाली. ज्यावेळी गाझि-उद्-दिनाच्या मृत्यूची पहिली बातमी दिल्लीला पोहोचली (२९ ऑक्टोबर, १७५२, भा. पहा प्र. ११§२....) त्यावेळी त्याच्या कुटुंबियाना भीती वाटत होती की आता गरजू बादशहा इन्तिझामच्या चिथावणीमुळे, गाझिउद्दिनाने आपल्या दिल्लीच्या वाड्यात ठेवलेला सगळा खजिना जप्त करील. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी गाझिउद्दिनाचा तरुण मुलगा शिहाबुद्दिन (इमाद) याला, त्याचा गुरू अकिबत महमद कश्मिरी ( Aqibat Mahmud Kashmiri ) याने पढविले आणि हा तरुण मुलगा

[ मागील पानावरून ]

(स्त्रियांचे पावित्र्य) यांचा नाश करण्यात आला आणि एखाद्या साधू पुरुषाच्या घरात आश्रय घेऊनही, कोणाला, या जाट लुटारूंच्या तडाख्यातून सुटता आले नाही." (सियार (३) ४८). हा साधूचा निर्देश सफ्दरजंगाचा आध्यात्मिक गुरू, (पिर) ख्वाजा महमद बासीत याचा आहे (बयान–२७९).

तावडतोब सफ्दरच्या घरी गेला. त्या रात्री नऊ वाजल्यापासून ते दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत ते तेथेच दुःखातिशयात रडत ओरडत बसला. या काळात त्याने कसल्याही सांत्वनपर बोलण्याकडे लक्ष दिले नाही वा काहीही खाण्याला अगर पिण्यालाही तो कबूल झाला नाही. सफ्दरजंगही त्याच्याशी सांत्वनपर बोलला तेव्हा त्याच्या सहानुभूतीच्या शब्दाना त्याने उत्तर दिले की "तुम्हीच आता माझे पिताजी आहात आणि पै. गाझिउद्दिन तुमचे बंधूच असल्याने, माझे तर खरोखर काकाच गेले आहेत. आता तुम्हीच एकटे माझे संरक्षक आणि पुरस्कर्ते आहात." (हे मानभावी ?-उत्तर अर्थातच अकिबतच्या शिकवणीनुसार होते.) अशा प्रकारच्या शिहाबुद्दिनाच्या चिकाटीपुढे अखेरी सफ्दर थकला आणि आपण त्याच्या बापाच्या ठिकाणीच आहोत असेच यापुढे त्या पोरक्या मुलाला आढळून येईल अशी त्याने शपथ घेऊन ग्वाही दिली. नंतर सफ्दरने, शिहाब-उद्-दिनाला, स्वतःचा वारस मुलगा, शुजा-उद्-दौला याच्याबरोबर आपापल्या फेटचांची अदलाबदल करावयास लावले. (अशी अदलाबदल करण्याची प्रथा, त्याकाळी बंधुभावाचे प्रतिक मानली जात होती). पुढे शिहाबला त्याने जनानखान्यात नेले. तेथे त्याच्या पत्नीने, मुलासमोर आईने आपला बुरखा बाजूला करावा तसा आपला बुरखाही काढून टाकला. शेवटी, पोरका झालेल्या या शिहाबला, आता त्याच्या बापाची सर्व मालमत्ता, जहागिरी, अधिकारपदसुद्धा, वारसा म्हणून मिळवून देण्यासाठी आपण स्वतः बादशहावरील आपले सर्व वजन वापरू असे वचनही सफ्दरने दिले. इतके झाल्यावरच उपवास सोडण्यास या मुलाचे मन वळविणे शक्य झाले (भा. अशा प्रकारे शिहाबला पढवून तयार केलेले ढोंग यशस्वी होऊन सफ्दरची यात घोडचूक झाली. पहा पुढे §११ परि. ३).

गाझिउद्दिनाबद्दलच्या दुखवटचाचे दिवस संपल्यानंतर, सफ्दरजंग शिहाबुद्दिनाला दरबारात घेऊन गेला. शिहाबला मिरबक्षी (साम्राज्याचा मुख्यबक्षी) नेमण्याची बादशहाची प्रथम इच्छा नव्हती पण सफ्दरने अखेरी त्याचे मन वळवून या नेमणुकीसाठी त्याची संमती मिळविली. या नेमणुकीबरोबरच शिहाबला गाझि-उद्-दिन खान बहादुर, फिरुझजंग, अमीर-उल्-उमारा, इमाद-उल-मुल्क या पदव्याही देण्यात आल्या (१२ डिसेंबर १७५२). नंतर काही दिवसांनी 'निजाम-उल्-मुल्क असफजाह' हीही पदवी त्याला बहाल करण्यात आली. हा तरुण तर यावेळी फक्त १६ वर्षाचाच एक मुलगा असून प्रत्यक्ष युद्धामधून त्याला काहीही प्रशिक्षण व अनुभव अद्याप मिळालेला नसल्याने युद्धशास्त्रात तो अनभिज्ञच होता. तो नुकताच धर्मगुरू व खोजे अशा शिक्षकांच्या हाताखालून मोकळा झाला होता. अशा या तरुणाला आता साम्राज्याच्या संबंध लष्कराचा कार्यकारी प्रमुख ( Executive Head भा. मिरबक्षीचे असे स्थान होते). म्हणून नेमण्यात आले आणि ते अशावेळी की, साम्राज्याला पश्चिमेकडे अफगाणाकडून व दक्षिण बाजूने मराठचांच्याकडून, धोका निर्माण झाला होता तेव्हा! मिरबक्षी पदासाठी केलेल्या या निवडीबद्दल फक्त सफ्दरजंगालाच नव्हे तर दिल्लीपती अहमदशहा आणि साम्राज्यातील लोक, यानाही पश्चाताप करून याची फळे भोगावी लागली. थोडचाच महिन्यात आपली घोडचूक कळून येण्याचे दुर्भाग्य सफ्दरजंगाच्या नशिबी येऊन त्याला कळून आले की, गोड गोड बोलणारा, लाचारीने अंगाशी झोंबणारा हा मुलगा म्हणजे खरोखरच, आपण आपल्या छातीशी केवळ अज्ञानानेच काही काळ जो बाळगू शकलो असा एक महाभयंकर विषारी साप आहे. एकामागून एकाचा असा दिल्लीच्या दोन बादशहांचा त्याने वध केला आणि सिंहासनाच्या आणखी एका वारसाला त्याच्यापासून प्राण वाचविता आले ते निव्वळ अज्ञातवासात जाऊनच (भा. पहा पुढे प्र. १२ § १३ व या ग्रंथाचा पुढील खंड).

## §५ : जाविदखानाच्या खुनानंतर सफ्दरजंगाची चढेल वागणूक

सफ्दरजंगाच्या लोभी वृत्तीला लाज वा संयम दोन्हीही माहीत नव्हती. यामुळे त्याच्या व्यक्तीगत नोकराव्यतिरिक्त इतर सर्व, लवकरच त्याचे विरोधक बनले. त्याच्या अशा वागणुकीमुळे दुखावलेले अधिकारी व अधिकार, वारसा व मालमत्ता गमवावी लागलेले सरदार-उमराव यांना तो आपल्या सामर्थ्याच्या अगदी शिखरावर असताना, त्याच्याविरुद्ध कांहीही बोलण्याचे धैर्य होत नव्हते हे खरेच, पण बादशहाच्या आधाराने एका मोठ्या उमरावाने सफ्दरला विरोध करण्यास सुरवात केली तेव्हा या त्याच्या विरोधी केंद्राभोवती, हे दुखावलेले अधिकारी व सरदार ताबडतोब जमा झाले आणि यानंतर मात्र सफ्दरचा ऱ्हास झपाट्याने झाला. हा शेवट ज्या पायऱ्यापायऱ्यानी घडून आला त्यांची क्रमवार माहिती आता आपण घेऊ.

वजीरपद ही आपली वंशपरंपरागत दौलत होय असे तुराणी पक्षियांना वाटत होते. पण असे हे वजीरपद तर सफ्दरने हिसकावून घेतले होतेच, शिवाय आपल्या वजीरीच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच त्याने या तुराणी पक्षियांविरोधी आणखी एक शत्रुत्त्वाचे कृत्य केले होते. यावेळेपर्यंत इन्तिझाम-उद्-दौला याच्याकडे, दुसऱ्या अनुक्रमाचे बक्षीपद असून त्यासाठी त्याला सरहिंद हा प्रांतही दिलेला होता. या पदाच्या व प्रांताच्या मोबदल्यात बादशहाच्या ५००० तुर्की सैनिकांच्या पगाराची रक्कम वा थेट त्यांचा पगार त्याने द्यावयाचा होता. सफ्दरने आपल्या वजिरीच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच हा सरहिंद प्रांत आपल्याकडे, बदलून मिळविला. या नुकसानीबद्दल संबंध तुराणी जमात कुरकुरली, त्या जमातीतील सैनिकांची उपासमार झाली आणि त्यावेळी जरी, याबद्दल उघड तंटा झाला नाही तरी यातूनच या जमातीयांच्याबरोबर पुढे सुरू झालेल्या त्यांच्या भांडणाचे बीज, त्याच्या कारकीर्दीच्या इतक्या आरंभीच पेरले गेले होते. पुढे जून १७५२ मध्ये त्याने बादशहाला धमकावणी देऊन धाकदपटशा वापरून, औध आणि अलाहाबाद सुभ्यातील सगळ्या जहागिरी आपल्याकडे बदलून द्यावयाला लावल्या. परिणामतः ज्या अनेक अधिकाऱ्यांना या वतन-वाड्यांचा महसूल नेमून दिला होता त्यांच्या चरितार्थाचे साधन बादशहाच्या लेखणीच्या एका फटकाऱ्याने, असे आता हिरावून घेतले गेले. त्यानंतर त्याने सहराणपूर आणि त्या-भागाची फौजदारी अशी दोन्ही, बादशहाच्या मामेभावाकडून (Maternal Uncle's Son) काढून घेवविली व ती राजेंद्रगिरी या आपल्या अनुयायाला देवविली. या दोन वतनांपासून मासिक ६००० रुपये मिळत असत. याचप्रमाणे इटावा आणि कोरा या भागामधील व तसेच सफ्दरच्या स्वतःच्या दोन्ही सुभ्यातील सर्व 'शाहीवतने' (Crowlands) हीसुद्धा आपणालाच देऊन टाकण्यास, त्याने बादशहाला जबरदस्तीने भाग पाडले. [त.-इ-अ.-१५ ब, ३७ ब, ३८ अ.].

जाविदखान मारला गेला ते २७ ऑगस्ट १७५२ च्या संध्याकाळी. आपल्या प्रति-स्पर्ध्याला नाहीसे केल्यावर आपले स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सफ्दरजंगने तातडीने हालचाली केल्या जाविदखानाची मालमत्ता बेवारसी म्हणून जप्त करण्यात आली आणि त्याच्या वतनाचा व मालमत्तेचा व्यवस्थापक आणि त्याचा वैयक्तिक सेवक यांनी, त्याचे सर्व खजिने बाहेर काढून द्यावे म्हणून, त्याना डांबून ठेवण्यात आले. जाविदच्या खुनानंतर चौथ्या दिवशी वजीराने आपला एक आश्रित, अबू तुराबखान याला, शाही-वाड्याच्या किल्याचा 'किलादार' आणि पोलीस प्रमुख ... (Superintendent) म्हणून

नेमले. बादशहाच्या रहात्या वाड्यातील अगदी अंतर्गत भागातही बादशहावर घट्ट पकड बसविता यावी, हाच अर्थात, या मागे हेतु होता. बिचाऱ्या अहमदशहाला या नेमणुकीला नकार देण्याचे धैर्य झाले नाही व त्याने सफ्दरच्या या हस्तकाला, अशा प्रकारे देण्यात आलेल्या पदाची अधिकार पत्रे, औपचारिकपणे देऊन, त्यावर त्याची रूढीनुसार समारंभपूर्वक स्थापनाही केली. इतके केल्यावरही, स्वतःचे स्थैर्य व सुरक्षितता याबाबत सफ्दरजंगाच्या मनात विश्वास निर्माण झाला नाही आणि त्याच्या मनाला शांतता लाभली नाही. बादशहाची माता त्याच्या शत्रूबरोबर गुप्तपणे पत्रव्यवहार करील असा त्याला संशय होता. तेव्हा त्याने शाही जनानखान्यात जाण्याच्या व त्यातून बाहेर येण्याच्या दरवाजावर आपले स्वतःचे पहारेकरी नेमले आणि आपल्या आठ स्त्रीहस्तकांना शाही वाड्यातील स्त्रियांच्या विभागात रहाण्यासाठी व तेथून बाहेर पाठविली जाणारी सर्व पत्रे वाचण्यासाठी पाठविले. पण त्याने केलेली इतकी ही कारवाई, शाही वाड्यात सर्व सत्ता चालवीत असलेल्या बादशहाच्या मातेला. . . उधमबाईला—सहन होण्यापलीकडची होती. तिने रागावून या स्त्रीहेरांना बाहेर घालवून दिले. तथापि यावेळी तिच्याशी लढा देण्याचे धाडस सफ्दरजंगाला झाले नाही व त्याने माघार घेतली, पण या प्रसंगाने तो रागावला तर होताच. आता आपल्या अधिकाराबाबत पुन्हा विश्वास वाटण्यासारखे करण्यात आल्याशिवाय, यापुढे दरबारात हजर रहाण्याचे त्याने नाकारले आणि तो आपल्या वाड्यातच दुर्मुखलेला होऊन राहिला. अखेरी बादशहालाच याबाबत माघार घ्यावी लागली. २३ सप्टेंबरला बादशहा आणि त्याची आई अशी दोघेही वजीराच्या घरी गेले आणि त्यांनी त्याला, शाही वाड्यात पुन्हा आणले. . . . अशा रीतीने, जाविदखानाच्या मृत्यूनंतर प्रथमच तो शाही वाड्यात आला. (भा. म्हणजे ४ आठवड्यानी आणि दरम्यान इतक्या कारवाया झाल्यावर). दुर्दैवी शहेनशहाला यापेक्षाही आणखी खाली उतरावे लागले—पडते घ्यावे लागले. २८ सप्टेंबरला त्याने वजीराला आपला शब्द दिला की, वजीराच्या संमतीशिवाय कोणत्याही नेमणुका तो करणार नाही, यानंतर वाड्यातील सर्वच सेवकांच्या बदल्या करण्यात आल्या आणि अनेक लहानसहान पदावरही सफ्दरजंगाच्या हस्तकाना, जुन्या पदाधिकाऱ्यांच्या जागी नेमण्यात आले. या दिवशी सफ्दरचा तरुण मुलगा. . . . शुजा-उद्-दौला याच्याकडे बादशहाच्या व्यक्तिगत परिसरातील चार महत्त्वाची खाती सोपविण्यात आली. ही खाती अशी. . . . (१) अहादिज खाते ( Ahadis ), (२) नेमणुका व खर्च इ. साठी द्यावयाच्या रकमांना निश्चित व अंतिम मंजुरी देणारे खाते. (३) भालदार-चोपदार व्यवस्था खाते (Mace-bearers. . . . राजदंड इ. सांभाळणारे लोकासंबंधी) आणि (४) बादशहाची वैयक्तिक पागा–गाडीखाना–वहातूक, अशा कामावरील सेवक, वहाने इ. संबंधी खाते. अखेरी १ जानेवारी १७५३ ला तर याच तरुणाकडे बादशहाच्या खाजगी मुलाखतींची व्यवस्था करणाऱ्या खात्यावरील अधीक्षक–(सुपरिंटेन्डेंट) म्हणून संपूर्ण अधिकारही देण्यात आला. याचा अर्थच असा की, बादशहाच्या दरबारात येण्याला कोणाला परवानगी द्यावयाची याबाबत पूर्ण अधिकार त्याच्याकडे देण्यात आला. जाविदखानानेही आपल्या कारकीर्दीत असाच अधिकार पूर्वी वापरला होता [ त.-इ-अ.-४१, अ-४३अ, दिल्ली वर्तमान D. C. ].

## § ६ : सफ्दरजंग, बादशहा व अमीर-उमराववर्ग याना दुखवितो

अशा प्रकारे आपल्या हस्तकांच्या हाती, शाही वाड्यातील सर्व लष्करी सत्ता आल्यावर बादशहाकडे भेटीस येऊ इच्छिणाराना परवाना देण्याबाबत मनमानेल त्याप्रमाणे निर्बंध

घालून, या भेटी निर्बंधित करण्यास त्याने सुरवात केली. नवा 'किलादार' (Qiladar) किल्ल्याचा मुख्य दरवाजाजवळ आणि किशन नारायण (वजीराचा एक हस्तक–एजंट)–राजा लछमी नारायण याचा मुलगा) दिंवाण-इ-खास महालाच्या दरवाजाजवळ उभे राहून कोणालाही आत येऊ देण्यावर नियंत्रण ठेवीत असत. परिणामतः ज्या मनसबदाराकडे, किल्ल्यामधील पहारे बसविण्याची कामगिरी असे अशालाही आता येता येईना. याला अपवाद म्हणजे वजीराच्या मुलाच्या हाताखाली असलेल्या तोफखाना खात्यातील घोडेस्वार व पायदळ शिपाई आणि वाड्यात काम करणारे खोजे, शिपाई, कचेऱ्यातील कारकून एवढेच होते. याहीपुढे जाऊन वजीराने हुकूम काढला की कोणाही सैनिकाने घोड्यावरून वा शस्त्रे घेऊन किल्ल्यात येऊ नये. सरदार उमराव यांच्याबरोबर नेहमी येणाऱ्या लवाजम्यातील व संरक्षक पथकातील लोकाना या नियमाचा फटकारा बसला. तेव्हा या सरदारांना हा हुकूम अपमानास्पद व भयसूचकही वाटला आणि त्यानी बादशहाकडे भेटीस येण्याचेच बंद केले. किल्ल्यातील लाकडी मशिदीमध्ये, आपली सार्वजनिक प्रार्थना करण्यासाठी, १४ सप्टेंबर शुक्रवार या दिवशी अहमदशहा घोड्यावरून बाहेर पडला (या मशिदीमध्ये जामिया मशिदीमधून आणलेले पैगंबराचे अवशेष जपून ठेवलेले होते.) पण त्याच्या स्वारीबरोबर कोणीही उच्चपदस्थ आला नाही इतकेच नव्हे तर त्या दिवसासाठी पहाऱ्याचे काम दिलेले अधिकारीही या स्वारीतून गैरहजर राहिले. तेव्हा त्याने विचारले.... (भा. कोणीच आले नाहीत!—)...."म्हणजे त्यांना येण्यास 'किलादार परवानगी देत नाही, का त्यांना वाड्यात येण्यालाच वजीराने बंदी घातली आहे?" किलादाराने त्याला उडवा-उडवीचे उत्तर दिले.... "जो येतो (भा. स्वारीत येण्यासाठी, दरवाजाजवळ येतो) त्याला आत येण्यास मी परवानगी देतो पण (दरवाजापर्यंत) कोण आलेच नाही तर मी तरी काय करणार?".... १६ व १७ सप्टेंबरला दरबार भरविण्यात येतील असे जाहीर करण्यात आले होते पण सफ्दरजंगाच्या पक्षपाती सरदार-उमरावा व्यतिरिक्त अन्य कोणीही सरदार या दरबाराना हजर राहिले नाहीत आणि बादशहाने प्रमुख अनुपस्थिताना जेव्हा बोलावणे पाठविले तेव्हा आजारी असल्याची सबब पाठवून त्यानी अनुपस्थितीबद्दल क्षमा करावी अशी विनंती केली. इन्तिझाम तर तीन महिने चिनी काष्टौषधी—(China wood) —भा. आजारावर उपचार म्हणून घ्यावयाच्या विशिष्ट काष्टौषधी असाव्या) घेत असल्याचे सांगण्यात आले व इतर गैरहजर असलेल्या उमरावांचे, हजर रहाण्यासाठी मन वळविण्यात आल्यावरसुद्धा, इन्तिझाम मात्र दरबारातून गैरहजरच राहिला. [त.–इ–अ.–४१ ब ते ४३-अ].

सफ्दरजंगाच्या पक्षपातीयांनी अशा प्रकारे बादशहाचा अन्य समाजाशी संपर्क तोडला आणि त्याची बंदिवानासारखी स्थिती केली. आपल्याला अशा अवस्थेला आणल्याबद्दल बादशहाला तीव्र संताप आला. पण वजीर तर बादशहाच्या संबंधात हुकूमशहाच बनला होता. या हुकूमशहाच्या कारकीर्दीत, मराठ्यांची एक कायमची छावणी राजधानीच्या दाराशी पडली असून, राजधानीला तर हे लांछनास्पदच होते. याच हुकूमशहाचे कारकीर्दीत साम्राज्याचे सुभे, केंद्र सत्तेच्या नियंत्रणातून निसटले होते आणि शाही खाजगीकडील अधिकारीवर्ग व सैनिकीपथके अशा सर्वांचीच उपासमार होत होती. ज्याच्या कारभाराचे असे हे परिणाम दिसत होते त्या हुकूमशहाच्या अपकारक प्रभुत्वाविरुद्ध सार्वत्रिक बंडाळीस उत्तेजन मिळणे अर्थातच अपरिहार्य होते.

२२, ऑक्टोबर १७५२ रोजी सुमारे ३५०० लोकांच्या एका मराठा सैनिकी तुकडीने दिल्लीच्या नैऋत्येस चार मैलावर तालकटोरा (Talkatora) येथे आपला तळ ठोकला. पुढे ६ फेब्रुवारी १७५३ ला त्यांचे असेच दुसरे ४००० चे छोडदळ पथक कालका टेकडीपाशी आले. सर्हिद येथे प्रस्थापित कायद्यानुसार नेमलेल्या फौजदाराला दुसऱ्या एका व्यक्तीने तेथून बाहेर हाकलून देऊन ते पद स्वतः बळकावले, पण या उपटसुंभाविरुद्ध दिल्ली येथील शासनाने काहीही इलाज केला नाही. बादशहाच्या कौटुंबिक नोकरांचा पगार जवळ जवळ दोन वर्षे थकला होता. पण याबाबत एक महिनाभर चर्चा करूनही, शाही खजिन्याला शेवटी यापैकी चारच महिन्यांची बाकी देणे शक्य झाले. याचे कारण असे होते की, शाही जमिनी–वतने–यावर आक्रमणे होऊन ती दुसऱ्यानी बळकाविली असून तेथे अव्यवस्था निर्माण झाली होती व त्यातून येणारा वसूल बंद पडला होता. यावेळचा दरबारातील एक वृत्तांत लेखक ( Court Analist ) दुःखोदगार काढतो ते असे :....... "यावरून सैन्याच्या व सरदार-उमरावांच्या परिस्थितीची कल्पना करणे शक्य होते. वजीराशिवाय कोणाजवळही भरपूर सैन्य नव्हते. मग शत्रूंचा मोड करून देश नियंत्रणाखाली, सुरक्षित ठेवणे कसे शक्य होणार? साम्राज्याचा संपूर्ण नाश झाला होता..... आपल्याला जे वाटेल ते, शाही जमीनजुमल्यातून वजीर नेत असे; यामुळे बादशहाच्या खजिन्यात एक पैसाही पोहोचेना. अशा प्रकारे हा वजीर आपल्या धन्याला दरिद्री बनविणारा होता." [त.–इ–अ.–४३ ब–४४ अ, ४७ अ].

पंजाबवर आणखी नवी स्वारी करण्यासाठी अब्दाली तयारी करीत आहे अशा वार्ता नोव्हेंबरात आल्या आणि लाहोर ते दिल्लीपर्यंतचे सर्व लोक घाबरले. साम्राज्याच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी आता बादशहाने स्वतःच कूच करावे असे वजीराने सुचविले तेव्हा बादशहाने उत्तर दिले ते अगदी योग्य होते. तो म्हणाला की, त्याच्या हाताखाली आता कोणीही सैनिक वा काहीही युद्धसामग्री नाही पण त्याने एकट्याने जाण्यामुळे काही चांगले होईल, उपयोगी पडेल असे वजीराला वाटत असेल तर एकटा जाण्यालाही तो तयार आहे! बादशहा वजीराला आणखी म्हणाला—"आता तुम्ही एकटेच सर्व शासनाचे केंद्र आहात, संबंध राज्य आणि त्यातील उत्पन्न तुमच्याच हातात आहे. सैन्याला देण्यासाठी व मी मोहिमेवर जाण्याची तयारी करण्यासाठी, पैसा गोळा करण्याचा प्रयत्न करा." बादशहाच्या या बोलण्याने अर्थातच वजीर गप्प झाला. यानंतर एक महिन्यातच सरहद्दीकडील या प्रश्नाची काळजी अधिकच तीव्र झाली. ८ डिसेंबर रोजी वजीराने बादशहाला सांगितले की, अब्दाली लाहोरच्या दिशेने चाल करीत येत आहे अशी बातमी वरचेवर आलेली असल्याने, त्याला विरोध करण्यासाठी आता बादशहानी बाहेर पडणे अवश्य आहे. यासाठी या महिन्याची १६ तारीख हा शुभदिवस असल्याचेही त्याने सांगितले. हे ऐकून बादशहा विचारात पडला. नंतर आईचा सल्ला घेऊन त्याने वजीराला उत्तर दिले..... "सैन्याची आणि देशाची स्थिती तुम्हाला स्पष्ट दिसतेच आहे. (निघण्यासाठी अवश्य तो पैसा शक्य त्या ठिकाणापासून आणण्याचा प्रयत्न करा." बादशहाच्या या म्हणण्याला वजीराला काही उत्तर देता आले नाही. [त.–इ–अ.–४५].

हे संकट आणखी जास्तच जवळ पोहोचले. ५, फेब्रुवारी १७५३ रोजी, अफगाण शहाचा वकील, आपल्या धन्याचे पत्र घेऊन दिल्लीस येऊन पोहोचला. त्याच्याबरोबर २००० घोडेस्वारांचे संरक्षक पथकही होते. अब्दाली साम्राज्याच्या सीमेवर अटक येथे थांबला

होता. या वर्षापुरती खंडणी म्हणून ५० लाख रुपयांची मागणी, वकिलामार्फत त्याने केली होती. ही मागणी पुरी न केल्यास, तो आपल्या सैन्यासह दिल्लीवर चाल करून येईल अशी धमकीही त्याने दिली होती. या वकिलाला बादशहाने १३, तारखेला मुलाखत दिली. उत्तरासाठी आठ दिवस वाट पहा असे त्याला सांगून, बादशहाने आपल्या उमराव मंडळाची बैठक घेऊन विचारविनिमय केला. त्याच्या सर्व सरदारांनी त्याला सांगितले.... "मराठ्यांनी तुमच्या शत्रूशी लढा देण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. यासाठी तुम्ही त्यांना आग्रा आणि अजमीर हे दोन सुभे आणि सगळ्याच २४ सुभ्यांचा चौथही दिला आहे. अशाप्रकारे त्यांना पैसा देऊन, त्यांच्या हातात सर्व सत्ताही दिली आहे. तेव्हा आताच्या अडचणीबाबत काय करावे हे त्यांना विचारा." वजीराने आपल्या धन्याला आश्वासन दिले की, आता दिल्ली येथील मराठा सैन्यात वाढ करून एका पंधरवड्यात ते १०,००० करण्यात येईल. त्याच्या स्वतःच्या सैन्यातही ३०,००० लोक आहेत. तेव्हा ही दोन्ही सैन्ये मिळून ४०,००० चे सैन्य अफगाण शहाबरोबर लढा देण्यास तयार होईल. अशा रीतीने अब्दालीबरोबर लढा देण्याची तयारी चालू असतानाच, दुसरीकडे निरनिराळ्या सबबी पुढे करीत, वजीराने अफगाण वकिलाला थोपवून धरले. शेवटी त्याला परत पाठवून दिले ते (२२ मार्चला), दिल्लीच्या दरबारातील अंतर्गत भांडणे विकोपाला जाऊन त्यांचा स्फोट, यादवी युद्धात होण्याची वेळ आली तेव्हा. [पे. द. नि. प. (२१) ५३, ५४, ५५, दिल्ली वर्तमान; त.–इ–अ.–४६ ब, ४९ अ.].

## § ७ : सफ्दरजंगविरोधी दरबारातील कट

सफ्दरजंगाच्या कारभाराविरुद्ध असलेल्या सार्वत्रिक असंतोषामुळे, त्याला अधिकारावरून हुसकावून लावण्याच्या, बादशहाच्या आईच्या योजनेला पुष्टीच मिळाली. सफ्दरला हुसकावून लावण्याचा हा कट गुप्तपणे शिजविण्यात येऊन अखेरी मार्च १७५३ मध्ये अंमलात आणण्यात आला. यावेळेपर्यंत बादशहाची आई, हीच, शासनामागे असणारी त्याच्या बाजूची प्रेरक शक्तीच होती. या संदर्भात त.–इ–अ.–मध्ये नोंद आहे ती अशी, "(कारभारातील) सर्व कासांची चौकशी व निर्णय, ती करीत असे. आपल्या मुलाखतीच्या दिवाणखान्यासमोर, ख्वाजा तमकिन, राजा लक्ष्मीनारायण, राजा नागरमल (शाही वतनांचा दिवाण आणि अन्य उच्चाधिकारी, यांना ती बसवून घेई व स्वतः पडद्यामागे बसून कारभारविषयक निरनिराळ्या प्रश्नांबाबत त्यांच्याशी चर्चा करी. साम्राज्याच्या प्रत्येक भागातून आलेले व काहीना काही मागणी करणारे जे विनंती–अर्ज–मुतालिब– व जे मोहोरबंद लखोटे, जनानखान्यात तिच्याकडे पाठविले जात ते सर्व तिला वाचून दाखवीत व त्या सर्वांबाबत ती आपले निर्णय देई. या सर्व हुकुमांची अंमलबजावणीही करावीच लागे." [त.–इ–अ.–४५ ब]. अशा प्रकारच्या सर्वोच्च सत्तेचे स्थान तिला प्राप्त झाले असल्यामुळे वजीराविरोधी तयार होणाऱ्या संयुक्त गटामागील केंद्र व मूळ प्रेरणास्थान ती बनली. इन्तिझाम तर सफ्दरजंगाचा सांगून-सवरून व निश्चितच शत्रू असून तो वजीराच्या भीतीमुळे, उघडपणेच दरबारापासून दूर रहात होता आणि सफ्दरजंगही इन्तिझामच्या वाड्याच्या बाजूने जाण्याचे नेहमीच टाळीत होता. कारण त्यालाही भीती वाटे की, तो असा गेला तर वाड्यातून त्याच्यावर गोळीही झाडली जाईल..... "दोघांमधील संघर्ष दररोज वाढतच चालला. बादशहा वरकरणी सफ्दरजंगाची बाजू घेई आणि त्याची मर्जी राखण्याचा प्रयत्न करी पण त्याने

गुप्तपणे इन्तिझामला आपल्या बाजूला वळवून घेतले होते." इमाद-उल्-मुल्क हा फक्त १६ वर्षांचाच मुलगा असला तरी या वजीराविरोधी कट करणाऱ्यामध्ये तो सर्वांत जास्त खोल मनाचा, व आतल्या गाठीचा होता. सफ्दरजंगाच्या मागे असल्याचे नेहमी दाखवून आपल्याबद्दल त्याला संशय येण्याचे त्याने टाळले हे खरे पण वजीराला हुसकावून लावण्याकडेच त्याचे लक्ष केंद्रित होते.

सफ्दरजंगाच्या बंधनातून बादशहाला मुक्त करण्यासाठी पहिले आवश्यक पाऊल म्हणजे सफ्दरच्या बाजूच्या अधिकाऱ्यांना राजवाड्यातून बाहेर घालवून तो त्यांच्यापासून मुक्त करणे आणि बादशहाच्या व्यक्तिगत आसमंतात त्याच्याशी एकनिष्ठ असलेले विश्वासू सैनिक व वजीराला विरोधी असलेले ठेवणे, हे होते. तेव्हा हे साध्य करण्याकडेच, सर्व घडामोडींचा रोख स्वाभाविकपणेच होता. यावेळी अहमदशहा भरवीत असलेल्या सल्लामसलतींच्या बैठकांना व दरबाराला फक्त सफ्दरजंगाचे हस्तकच हजर रहात असत. दिल्लीच्या दरबाराचे वैभव आणि तेथील मोठा जमाव. ही आता लुप्त झाली होती. दरबाराच्या दिमाखात झालेल्या अवनतीबद्दल बादशहाला तीव्र चीड येत होती पण सफ्दरजंगाने साम्राज्याच्या मुगुटावर आपले हुकूमशाही वर्चस्व स्थापले असून बादशहा नामधारीच बनला होता. सफ्दरने लुबाडलेले हे वर्चस्व संपुष्टात आणण्याच्या बादशहाच्या इच्छेच्या पाठीशी दिल्लीतील उच्चस्तरीय समाज आणि सामान्य जनताही होतीच. अशा प्रकारे सर्व बाजूंनी सफ्दरविरोधी वातावरण तयार झाले होते. अशा परिस्थितीत शाही तोफखाना विभागाचा प्रमुख आणि शाहीवाड्याच्या संरक्षण व्यवस्थेचा पदसिद्ध प्रमुख सेनापती म्हणून, अधिकारावर असलेला व वजीराचा पक्षपातीही असलेला शुजा-उद्-दौला, याच्या जागी आपला पक्षपाती अधिकारी आणण्यासाठी, योग्य व्यक्तींच्या शोधात बादशहा होता. पण कोणी उमरावाने बादशहा देऊ करीत असलेले हे अधिकारपद स्वीकारले तर त्याने सर्वसत्ताधारी वजीराला दिलेले हे आव्हानच ठरणार होते. यामुळे उमरावामागून उमरावाने हे पद स्वीकारण्यापासून भीतीने माघार घेतली. पण अखेरी, ते स्वीकारून बादशहाच्या हातातील एक साधन बनण्यास तयार असलेला एक उमराव सापडला. यानंतर सफ्दरवर आघात करण्यात आला, त्याची हकीगत पुढील उपविभागात दिली आहे.

## § ८ : सफ्दरजंगाच्या लोकांची दिल्लीच्या किल्ल्यातून हकालपट्टी

वजीर व इन्तिझाम यांच्या दरम्यान मोठा लढा आता अगदी जवळ आला आहे अशा बातम्या मार्च, १७५३ पासून वारंवार पसरत राहिल्या पण याचबरोबर बादशहा मात्र मुत्सद्देगिरीने, उघडपणे दाखवित होता की, तो सफ्दरजगाचा पुरस्कर्ता असून इन्तिझाम व वजीर यांच्यामध्ये समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. असे बादशहाकडून चालले असले तरीही लढा जवळ येत असल्याच्या बातम्या वारंवार पसरत राहिल्याच आणि यातून दिल्ली शहर हादरून जाऊ लागले. या परिस्थितीत जवळजवळ दरदिवशीच, दिल्ली शहरात मोठा गोंधळ आणि भीतीचे वातावरण यांचा पगडा बसे. या महिन्याच्या पहिल्या तारखेला मध्यरात्रीच, सफ्दरजंगाने आपला खोजा तमकिन, याला बादशहाकडे पाठवून कळविले की,--"इन्तिझामला माझ्यावर रात्रीच हल्ला करावयाचा आहे असे मी ऐकले आहे. यासाठी मी सुद्धा, माझ्या सैनिकांना तयार ठेवले आहे." हे कळल्यावर बादशहाने आपले स्वतःचे दोन गुलाम ( Slaves ) इन्तिझामकडे पाठवून चौकशी केली

तेव्हा, कोणत्याही प्रकारची शत्रुत्वाची व लढ्याची तयारी आपण केल्याचे वा अशी केवळ इच्छाही असल्याचे इन्तिझामने नाकारले. पण या उत्तराने सफ्दरजंगाचे समाधान झाले नाही. दुसरे दिवशी सकाळी या घटनेची बातमी सगळ्यांना कळली आणि सर्व बाजारपेठा, गडबड गोंधळ व आरडाओरड यानी भरून गेल्या. व्यापाऱ्यांनी आपला माल दुकानातून अधिक सुरक्षित जागेकडे हलविला. प्रत्येकाने आपल्याला घरात त्याला शक्य झाले तितके सशस्त्र संरक्षक पहारेकरी, पैसा देऊन गोळा केले आणि मराठेही इन्तिझामच्या वाड्यासमोर एकत्र जमले. ही सगळी बंडाळी पसरत जाऊन बादशहाच्या वाड्यातही शिरेल असे वाटल्याने आता तोफखाना खात्याचे लोक, बादशहाच्या शरीरक्षक पथकाचे मुनसबदार आणि त्याच्या लवाजम्यातील व परिवारातील नोकर-चाकर (खास चौकी आणि जिलौ-इ-खास— Khas-I-Chauki and Jilau-I-Khas ), असे सर्व, किल्ल्यामध्ये त्याच्या संरक्षणासाठी जमले. अशा प्रकारे आता बादशहाच्या सभोवती सैनिकांचे मोठे संरक्षक कडेच तयार झाले. यावेळी दोघाही प्रतिस्पर्ध्यांना बादशहाने वारंवार हुकूम पाठविले की, त्यांनी आपापली सैन्ये शहरातून काढून मागे घ्यावी. तेव्हा या हुकूमाना मान देण्यासाठी, अखेरी या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांनी आपापले सैनिक पुढील तीन दिवसात माघारी घेतले आणि यावेळचा हा विशिष्ट गोंधळ थांबला.

आपण आता पूर्वी इतके असहाय्य नाही असे बादशहाला वाटू लागले. (भा. आता सफ्दरचे विरोधक खूपच वाढले असून ते सामर्थ्यवानही होत होते)— १७ मार्चला त्याने, शुजा-उद्-दौल्यातर्फे उप प्रमुख म्हणून तोफखाना खात्याकडे प्रत्यक्ष काम करीत असलेल्या अधिकाऱ्याला बोलावून घेतले व त्याला दोष देऊन तो टाकून बोलला. (भा. हा अधिकारी म्हणजे उपमिर-अतीष. शुजा-उद्-दौल्याकडे अनेक अधिकारपदे होती त्यांपैकी मिर-अतीष हे एक. प्रत्येक खात्याला, शुजातर्फे उपमुख्य नेमलेला असून हा उपमुख्य शुजातर्फे प्रत्यक्ष कारभार पाही व अंतिम अधिकार शुजाचा चाले.) बादशहा म्हणाला.... "किलादार माझ्या सेवकाना किल्ल्यात येऊ देत नाही. याउलट मला असेही सांगण्यात आले आहे की, वजीराचे लोक मात्र किल्ल्यात येतात. महलाच्या आतल्या खोलीत (निवडक मुलाखतींच्या महालाला जोडून असलेल्या) बसतात आणि त्यांना वाटेल अशानाच आत येऊ देतात, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे." उपमिर-अतीषला यावर केवळ काही सबबी सांगणेच शक्य झाले आणि यातून तो निराश झाला. या घटनेपासून उपमिर-अतीषच्या हाताखालील अधिकाऱ्यांनी योग्य तो बोध घेतला आणि यापुढे आपले हुकूम समजावून घेण्यासाठी या उप-प्रमुखाकडे जाण्याचे त्यांनी बंद केले.

बरोबर मोठे सैन्य घेऊन किल्ल्यात शिरण्यासाठी वजीर येऊ लागला आहे, असा ओरडा, त्याच दिवशी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास किल्ल्यात सुरू झाला. ही अफवा ऐकल्याबरोबर, किल्ल्यातले सर्व मनसबदार आणि शाही वाड्यातील नोकरवर्ग यांनी, आपल्या बादशहाचे रक्षण करण्यासाठी आपापली शस्त्रे उचलली. तोफखान्यावरील सेनाधिकाऱ्यांना (कॅप्टन्स) बादशहाने हुकूम दिले की, किल्ल्याबाहेर जा आणि दरवाज्यात ठाण मांडून तयारीत रहा. तेव्हा किलादार अबुतुराबखान प्रक्षुब्ध होऊन, अशा मनस्थितीतच किल्ल्यातून वजीराकडे पळून गेला. (भा. पहा §५ परि. ३-अबु-तुराब याची 'किलादार' म्हणून नेमणूक, जाविदचे खुनानंतर चौथ्या दिवशीच वजीराने करविली होती. वजीराचा हा हस्तक व वजीराचा मुलगा शुजा यांच्याकडे शाही वाड्यातील सर्वच अधिकार

प्रत्यक्षात गेलेले होते.) धोका आला आहे म्हणून उठलेली ही भीतीची आवई पूर्णपणे खोटी होती पण त्यातून साधावयाचा तो परिणाम शाही पक्षाने साधलाच. यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत, सफ्दरजंगाचा हस्तक किलादार अबुतुराबखान हा काहीही दंगा व झगडा न होता, मुकाट्यानेच किल्ल्याबाहेर हाकलला गेला होता. त्या संबंध रात्रभर सर्व शहरात मोठा आरडाओरडा, गोंधळ उफाळत राहिला आणि कोणालाही झोपता आले नाही. किल्ल्याच्या तटावरील तोफा ठासून भरल्या गेल्या आणि त्यांची तोंडे सफ्दरजंगाच्या वाड्यावर रोखून त्या तयार ठेवण्यात आल्या. या तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यातच तो वाडा असल्याने त्यावर या तोफांचा ताबा होताच. (पूर्वी हा, दारा-शुको-शहाजहानचा मुलगा... याचा वाडा होता. आता तो सफ्दरजंगाकडे होता.)

उजाडल्यावर खरी परिस्थिती कळून आली आणि निर्माण झालेली घबराट संपली एकही आघात करावा न लागता, सफ्दरच्या हातातील किल्ल्याचा ताबा काढून घेण्यात आला होता. हे साधण्यात आले तेही वजीरापेक्षा जास्त हुशारीने, त्याच्याच डावावर, प्रतिडाव टाकून. यानंतर लवकरच पुन्हा वजीराचा अंदाज चुकला आणि यामुळे त्याला, राजधानीवर असलेले आपले वर्चस्वही गमवावे लागले. १८ मार्चला, बादशहाने आपला स्वतःचा फेटा वजीराला बक्षीस देऊन त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. यामुळे सफ्दर-जंगाला वाटले की आपण आपल्या धन्यावर अजूनही दडपण आणून त्याला आपल्या प्रभावा-खाली ठेवू शकू. या अंदाजाने त्याने आता एक डाव टाकला..... त्याने बादशहाला लिहिले.... "शहेनशहांचे मन आता माझ्याविरुद्ध कलुषित झाले आहे तेव्हा शहेनशहांच्या मर्जीस येईल तिकडे निघून जाण्याचा त्यांनी मला हुकूम द्यावा. माझ्याकडील रोख रकमेतून आणि जिंदगीतून माझ्या सैनिकांचा पगार देऊन टाकावा आणि नंतर राहील ती माझी जिंदगी आपण खालसा करावी. माझ्याकडे असलेले वजीरपद आणि अन्य अधिकाराची पदेही आता, शहेनशहांच्या मर्जीस येतील त्या व्यक्तीना बहाल करावी."..... यावर बादशहाने त्याचे म्हणणे तात्काळ पण अंशतः मान्य केले (भा. बादशहा आपणाला, पूर्वी-प्रमाणे पुन्हा आग्रह करील.... जाण्यास सांगणार नाही असा वजीराचा अंदाज होता. यातच तो फसला) आणि स्वतःच्या हस्ताक्षरात त्याला लगेच कळविले की, त्याला आता आपल्या औधसुभ्याकडे जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि यावेळी त्याच्याकडील अधिकारपदाना मात्र त्याने हात लावला नाही. नंतर २३ तारखेलाच बादशहा व त्याच्या मातेने, प्रघातानुसार निरोपादाखल द्यावयाचे पोशाख आणि देणग्या सफ्दरजंगाकडे पाठवूनही दिल्या. त्यानेही आपल्या प्रयाणाचे प्रस्थान म्हणून आगाऊ पुढे पाठवावयाचे तंबूही, शहराबाहेरील आपल्या पहिल्या मुक्कामाचे ठिकाण, नुराबाद, येथे पाठविले. तथापि जरूर ते भारवाहक हमाल मिळत नाहीत या सबबीवर, आपले प्रत्यक्ष निघणे मात्र पुढे ढकलले.

अखेर आपली परिस्थिती कोणत्याही प्रकारे सुधारलेली नाही हे आढळून आल्यावर, दिल्ली शहरातील आपल्या वाड्यातून, प्रवासास निघण्यासाठी सफ्दरजंग, २६ मार्चला बाहेर पडला. जाताना वाटेत शाही वाड्यासमोर पोहोचला असताना तो आपल्या हत्तीवरून खाली उतरला, आपले तोंड त्याने बादशहाच्या रहाण्याच्या ठिकाणाकडे वळविले आणि तेथून दिसू शकत नसलेल्या आपल्या धन्याला, त्याने अगदी वाकून सलाम केला. यावेळी पावसाची हलकीशी सर पडत होती आणि सलाम केल्यावर वर पहात असताना पावसाचे थेंबही त्याच्या डोक्यावर पडले आणि आधीच उभे राहिलेल्या अश्रूत मिळाले. हा प्रसंग म्हणजे त्याच्या

वजीरपदाचा खरोखरच शेवट होता पण त्याला मात्र हे अद्याप कळले नव्हते. अशा प्रकारे वजीराच्या मगरमिठीतून बादशहा आता मोकळा झाला आणि सगळे सरदार-उमराव व अन्य सर्व नागरिक यांना, बादशहाची भेट घेण्यास पुन्हा मोकळीक मिळाली. सफ्दरजंगाने जबरदस्तीने हाती घेतलेल्या सर्वाधिकारी हुकूमशाहीच्या सहा महिन्यांत बंद पडलेला जुना शाही दरबार आता पुन्हा सुरू करण्यात आला व दिल्लीतील प्रत्येक सरदार आणि अधिकारी हे, या दरबारासाठी येऊन गर्दी करू लागले.[१]

## § ९ : बादशहा आणि सफ्दरजंग यांच्यामधील युद्धातील विविध टप्पे

सफ्दरजंग आणि बादशहा यांच्यामधील यादवी युद्ध २६ मार्च १७५३ ला सुरू झाले आणि पुढे पराभव होऊन, ७ नोव्हेंबरला सफ्दरजंग औधकडे परतला तेव्हा संपले असे मानायाला हरकत नाही. या एकूण युद्धाचे स्पष्ट दिसून येतील असे तीन टप्पे पडतात. यापैकी पहिला टप्पा सहा आठवड्यांचा (२६ मार्च ते ८ मे) होता. या काळात काहीही सशस्त्र संघर्ष, उतावळेपणाने लवकर घडवून आणण्यास, दोन्हीही पक्ष सारखेच नाखूष होते. मुकाट्याने औधकडे निघून जावे की, आपला बादशहा व धनी, यांच्याविरुद्ध बंड करून उठावे याबाबत सफ्दरच्या मनात या काळात काहीही निर्णय होऊ शकत नव्हता. अशा स्थितीत काहीही निश्चित हेतू समोर न ठेवता हे ६ आठवडे राजधानी भोवती तो भटकत राहिला. उलट बाजूला त्याचे दरबारातील प्रतिस्पर्धी या काळात सैनिकांची भरती करण्याच्या आणि वजीराच्या, अफगाण व मराठा मित्रांना आपल्या बाजूस वळवून घेण्याच्या उद्योगाला लागले. या परिस्थितीत हा काळ कोणत्याही पक्षाकडून प्रत्यक्ष शत्रुत्वाची वा झगड्याची काहीही कृती न होताच संपला. अंतर्गत झगड्यातील हा टप्पा, सुरजमल व सलाबतखान, वजीराच्या छावणीत येऊन दाखल झाले व त्यांनी आक्रमक धोरण उघडपणेच स्वीकारण्यास वजीराला उद्युक्त केले तेव्हा संपला. (सुरजमल १ मे ला व सलाबत ४ मे ला वजीराच्या छावणीत आले.). आक्रमणाच्या या निर्णयाचा पहिला अविष्कार म्हणजे जाटांनी केलेली जुन्या दिल्लीची लूट. (९ मे). या लढ्याच्या दुसऱ्या भागात, उभय पक्षियात उघडपणे घोषित युद्धच चालू

१ त.-इ.-अ.-४७ब-४९अ; सियार (३) ४६; मुझ-६९; चहार गुल. ४०८ब; शाकीर ७२. या माहितीचे संदर्भात मी फक्त त.-इ.-अ.-मधील माहिती स्वीकारली आहे. अंताजी माणकेश्वर याने, २८ मार्च १७५३ या दिवशी दिल्ली येथून पेशव्याना एक पत्र लिहिले आहे त्यात या संदर्भात माहिती नमूद आहे ती अशी :– "वजीराला काही खाजगी सल्लामसलतीच्या निमित्ताने शाही किल्ल्यात आणावयाचे व तेथे त्याला नाहीसा करावयाचे आणि मोकळे झालेले वजीरपद खान खानानला द्यावयाचे असा कट खान खानान, मिरबक्षी आणि पै. खानदौरान याचा मुलगा (समसाम) या तिघानी महिन्यापूर्वीच केला होता. यावेळी ५००० मराठा घोडेस्वार बादशहासमोर एकत्र जमवावेत, ते तेथे मोजलेही जातील असे हुकूम देणारे पत्रही मला बापूराव हिंगणे यानी दाखविले. तेव्हा मीही तयार होऊन किल्ल्यात गेलो. खान खानान व दुसरे दोघे हेही तयार होऊन तेथे आले. काही तातडीच्या कामासाठी घाईने यावे असे आज्ञापत्रही बादशहाने वजिरास पाठविले. पण बादशहाची सावत्र आई मलिक-उझ्-झमानी हिने गुप्तपण, वाड्यातून वजिराकडे पत्र पाठवून होणार असलेल्या विश्वासाघाताची माहिती त्याला दिली व तेथे येऊ नका असे सांगितले. तेव्हा वजिराने आपल्या सैन्यापैकी २५००० लोक व तोफखाना ही तयार केली व तो किल्ल्याच्या दरवाजापाशी आला ते म्हणतच की, हा कट ज्याने केला त्याच्याशी मुकाबला करून त्याला जशास तशीच मी शिक्षा करीन, अहमदशहाला कैद करीन आणि दुसऱ्या एखाद्या शहाजाद्याला बादशहा बनवीन. यावेळी सबंध शहरात मोठा आरडा-ओरडा व गोंधळ उसळला. तेव्हा "माझी सर्व आशा आता तुमच्यावरच आहे, मी बाळाजीरावांचाच मनुष्य आहे, मला वाचवा" असे एकामागून एक निरोप बादशहाने मराठा वकिलाकडे पाठविले. (ऐति. पत्रे (२) ८६). या हकीगतीला त.-इ.-अ.-मध्येही पुष्टी मिळते. बयान २७५ मध्येही, सर्वसामान्यपणे ती तशीच आहे.

होते. (९ मे ते ४ जून). या काळात सफ्दरजंग अगदी विजयी होण्याच्या अवस्थेला पोहोचला असून त्याचे प्रतिस्पर्धी तटाच्या आतील शहर भागात थोड्याशाच जागेत, असहाय स्थितीत कोंडून पडले आहेत असे दिसू लागले. पण नजीबखान व त्याच्या नेतृत्वाखालील रोहिले बादशहाच्या मदतीला आले (२ जून) आणि वजीराच्या विजयाची भरती उलटली व युद्धातील स्थिती पालटली. याचा पहिला पुरावा दिसतो तो सफ्दरजंगाने दिल्लीवर ५ जून रोजी केलेल्या मोठ्या धडाक्याच्या हल्ल्याला आलेल्या अपयशात. युद्धाच्या तिसऱ्या टप्प्यात (५ जून ते ७ नोव्हेंबर) युद्धाचा नूर हळूहळू पण सतत व निश्चितपणे सफ्दरच्याविरुद्ध बदलत राहिला. शाही पक्षाच्या बाजूने वळलेल्या भरतीची व त्यांच्या चढाईची पहिली निशाणी दिसली ती, या पक्षाने तटाच्या आतील शहरामधून बाहेर येऊन जुने दिल्ली शहर व्यापले ही होय. येथून त्यांची प्रगती संथपणे पण निश्चित होत राहिली. या काळात जवळजवळ रोजच उभयपक्षीयांत चकमकी होत होत्या व याचबरोबर शाहीपक्षीयांत बंडखोर सैनिकांमुळे अंतर्गत अडचणीही येत होत्या तरीही ते बंडखोरांना मागे मागे, दूर रेटीतच राहिले. यातून त्यानी दिल्लीच्या दक्षिणेस २२ मैल, वल्लभगडापर्यंतचा प्रदेश बंडखोरांपासून हिसकावून घेतला. इतके झाल्यावर, अखेरी ७ नोव्हेंबरला, सफ्दरने पराभव स्वीकारून पाठ फिरविली आणि तो आपल्या स्वतःच्या सुभ्याकडे निघाला ते अर्थातच आपल्या सर्व राजकीय महत्त्वाकांक्षा मागे टाकूनच.

## § १० : या लढ्यात सफ्दरजंगाचा पराभव होण्याची कारणे

या लढ्याचा पहिला भाग, काहीही प्रत्यक्ष लढाऊ हालचाली न होता जे घडले ते पहात बसण्यात गेला. या काळातील प्रत्येक दिवस सफ्दरच्या दृष्टीने अनिष्ट आणि त्याच्या शत्रूवर इष्ट परिणाम करीत मावळला. या लढ्याच्या प्रारंभी सफ्दरच्या हाती असलेले सैन्य त्यावेळच्या स्थितीतील शत्रूला चिरडून टाकण्याइतके समर्थ होते. याउलट त्याचे शत्रू प्रारंभी विस्कळीत, विभागलेले व मित्रहीन अशा स्थितीत होते. पण इमादने न थकता, सतत खटपट व उद्योग केला त्याच्याजवळ अनेक व्यक्तींनी एकत्र गुंफून त्याच्यामधून एक संघ गट उभे करण्याचे सामर्थ्य होते. शिवाय काहीही संधी निर्माण झाली की, लगेच तिचा चांगला उपयोग करून घेण्याचे उपजत, स्वाभाविक चातुर्य व कौशल्यही त्याच्याजवळ होते. यामुळे सफ्दरच्या शत्रूपुढे असलेल्या अडचणींचे इमादने, झपाट्याने निराकरण केले. शिवाय ६ आठवडे मिळालेल्या उसंतीमुळे, इमादने पैसा देऊन मिळविलेल्या मराठा व रोहिला मित्रांनाही दिल्ली येथे येऊन पोहोचण्यास अवधी मिळाला, व त्याचा त्यांनी उपयोगही केला. याउलट वजीर निष्क्रिय राहून, वाया घालवीत असलेल्या काळाने त्याचा साठविलेला खजिना संपविण्याचे काम मात्र केले. शिवाय या झगड्यात, प्रारंभापासूनच, बादशहा स्वतः आणि राजधानी अशी दोन्हीही वजीराच्या शत्रूंच्याच हातात होती. त्यांना यापासून उठविता येणाऱ्या फायद्याची वजीराला प्रथम कल्पना आली नाही. वजीरपदावरून सफ्दरला काढून टाकल्यानंतर (१३ मे. भा. पहा § पुढे § १५), बादशहाच्या नावाने कोणताही 'हुकूम काढणे' त्याला शक्य नव्हते. यापुढे उघड उघड एक बंडखोर आणि आपल्या धन्याचा विश्वासघात करणारा अशी त्याची स्थिती होती. त्याला पूर्वी असलेली प्रतिष्ठा आणि त्याच्या अधिकाराचा कायदेशीरपणा यांचे उगमस्थान व आधार म्हणजे बादशहा हीच व्यक्ती होती. हे उगमस्थानच, त्याने दिल्लीतून बाहेर पडताना इन्तिझामच्या हातात सोडून दिले होते आणि हाच इन्तिझाम आता वजीर झाला होता. उच्च

पदवी मिळविण्याच्या वा आपल्या बरोबरीच्या अन्य व्यक्तींच्यापेक्षा अधिक उच्चपदी बढती मिळविण्याच्या मागे लागलेला प्रत्येक राजपूत राजा, आपणाला सरंजामदाराच्या पदावर बढती मिळावी म्हणून आकांक्षा बाळगणारा, भाडोत्री सैनिकांचा प्रत्येक कॅप्टन; आपल्या सैन्याची मदत व सेवा देण्याच्या मोबदल्यात आपल्याला साम्राज्यातील काही मुलुख वा एखाद्या चौथाईची सनद, कायदेशीरपणे मिळावी म्हणून आकांक्षा बाळगणारा मराठा सेनापती, असे सर्व आपापल्या आकांक्षा पूर्तीसाठी दिल्लीच्या तटाच्या आत बंदिस्त असलेल्या बादशहाकडेच पहात. हा बादशहा आता मात्र, इन्तिझामच्या, सफदरच्या शत्रूच्या–हातात गेला होता. शिवाय याच तटांच्या आत, सफदरचे अनेक पक्षपाती होते ते आता त्यानेच नकळत मागे ओलीस ठेवलेले असेच, त्याच्या शत्रूच्या हाती सापडले होते. याला एक कारणही होते. या आधीच्या काही वर्षांत, जाटांनी चालविलेली लुटालूट आणि मराठ्यांचे हल्ले, यामुळे कोणीही सधन व्यक्ती व आपल्या स्त्रियांच्या अब्रुला महत्त्व देणारा कोणीही मनुष्य मोकळ्या प्रदेशात राहण्यास धजत नसे. असे सर्व लोक आता दिल्ली शहरात राहण्यास आले होते. तसेच सफदरजंगाचे प्रमुख पक्षपाती व अधिकारी यांच्यापैकी बहुतेक सर्वांनी, तो वजीरपदावर असताना, दिल्लीमध्येच आपली घरे केली होती. याशिवाय आणखीही एक अशीच अडचण होती. सफदरच्या सैन्याचा कणाच म्हणजे तुर्की वंशीय सामान्य सैनिक होता. (याना सामान्यतः मुघलिया सैनिक म्हणत). सफदरबरोबर दिल्लीबाहेर पडताना, या सैनिकांनी आपली कुटुंबे आणि कौटुंबिक मालमत्ता ही दिल्लीच्या मुघलपुरा भागातच मागे ठेवली होती. हा मुघलपुरा त्यांच्या जमातीच्या पूर्वजांनी १३ व्या शतकाच्या अखेरी, खिलजी सुलतानांच्या कारकीर्दीतच वसविला होता. [भा. सफदरच्या सैनिकांनी मागे ठेवलेली ही कुटुंबे, त्याचे पक्षपाती सधन लोक व त्यांची घरेदारे, ही सर्वच आता, त्याच्या शत्रूच्या हाती ओलीस राहिल्यासारखीच ठरली.]. सफदरजंग उघड बंड करून, एकदा दिल्लीच्या बाहेर पडल्यावर, बादशाही पक्षाकडून होणाऱ्या, या लोकांच्या लुटीपासून व त्यांच्यावर होणाऱ्या जुलुमापासून, त्यांचे संरक्षण करणे, त्याला शक्य नव्हते. असे संरक्षण करावयाचे म्हणजे त्याला राजधानीवर ताबाच मिळविणे अवश्य होते आणि हे काम तर त्याला आता अशक्यच होते. या वास्तव परिस्थितीमुळेच त्याचा अखेरचा पराभव इतका पूर्ण आणि त्याच्या पक्षपातीयांना इतका नाशकारक झाला.

## § १९ : सफदरच्या अनिश्चित, घुटमळणाऱ्या मनःस्थितीचा मध्यंतरीचा कालखंड— बादशाहीची संरक्षक व्यवस्था व रचना सुव्यवस्थित करण्यात आली

२६ मार्चला सफदरजंग दिल्लीतून बाहेर पडला हे खरे, पण आपल्या सुभ्याकडे जाण्याची मात्र त्याला घाई नव्हती. वाहतुकीची सोय होत नाही या सबबीवर, राजधानीच्या आसमंतातच तो वेळ काढू लागला. पण त्याच्या या रेंगाळण्याचे खरे कारण वेगळेच होते. पूर्वी बादशहा-सफदर यांच्यामध्ये उद्‌भवलेल्या मतभेदांचे अनेकवेळी, बादशहा अखेरी नम्रपणे सफदरकडेच आला असून, सफदरला अधिक अधिकार वा सवलती देऊन त्याने त्याला परत दरबारात नेले होते. (भा. पहा प्र. ११ § ५). आताही असेच होईल, बादशहा आपल्यापुढे माघार घेईल आणि आपल्याला सर्वश्रेष्ठ अधिकार देऊन, परत दरबारात बोलावील अशी त्याची अपेक्षा होती, हेच त्याच्या रेंगाळण्याचे खरे कारण होते. आपल्याला सशस्त्र विरोध होऊ शकेल अशी त्याला कल्पनाही होणे प्रथम शक्य झाले नाही, इतकेच नव्हे तर क्वचित दुसऱ्या एखाद्यालाही अशी कल्पना येणे कठीणच होते. यामुळे दिल्लीच्या उपनगरातील आपल्या

छावणीत राहूनही, त्याने दररोज, बादशहाबरोबर, वजीर या नात्याने, कामाबाबत विचार-विनिमय व चर्चा चालू ठेविली होतीच. तसेच या छावणीतूनच तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांना आव्हानेही पाठवीत राहिला पण हे प्रतिस्पर्धी मात्र आता राजधानीच्या तटांच्या आत सुरक्षितपणे आश्रयास राहिले होते. याचबरोबर पूर्वी धन्याविरुद्ध उठलेल्या सय्यद बंधूंना भोगावे लागलेले परिणाम त्याच्या डोळ्यासमोर होतेच. यामुळे आपल्याही शाही धन्याविरुद्ध हात उगारण्याला त्याला इच्छा होत नव्हती. [बयान २७७; त.–इ–अ.–५०ब–५१अ; चहार गुल. ४०८ ब; मुझ. ६९; सियार (३) ४६ ].

१७ मार्चला, आकस्मिक व निर्णायक डाव टाकून बादशहाने राजवाड्याच्या किल्ल्यावर आपले नियंत्रण पुन्हा एकाएकी प्रस्थापित केले होते (भा. पहा § ८). यानंतर सफ्दर जरी वजीर म्हणून राहिला असला तरी यापुढे त्याच्याकडून शासकीय प्रकरणाबाबत येणाऱ्या त्याच्या प्रतिनिधींना बादशहापाशी येण्यास परवानगी देण्याचे बंद झाले. पूर्वी ख्वाजा तमकिन आणि राजा लक्ष्मीनारायण हे त्याचे प्रतिनिधी त्याच्या शिफारशी व योजना घेऊन, त्यावर बादशहाचे हुकूम घेण्यासाठी, त्याच्याकडे येत. आता त्यांना बादशहासमोर येण्यास परवानगी देणे बंद झाले. वजीराकडील कामे घेऊन ते आले की, त्यांना आता थांबवून ठेवित आणि बादशहा व वजीर यांच्या दरम्यानची सर्व कामे यापुढे अलविखान २ रा या, बादशहा व वजीर या दोघानाही औषधोपचार करणाऱ्या हकीमामार्फत चालवीत. आपल्या सुभ्याकडे ताबडतोब जा., असा आग्रहही आता अहमदशहा सफ्दरजंगाला करीतच होता, पण त्याने याबाबत दिरंगाई चालविली. यानंतर वजीराने आपले सैन्य आणखी वाढविण्यास सुरूवात केली आणि लढाईमधील त्याचा मदतनीस राजेंद्र गिरी याला, सहराणपूर येथून बोलावून घेतले.

पण आता त्याला इमाद-उल्-मुल्कला मुकावे लागले. यावेळेपर्यंत हा तरुण उमराव आपण सफ्दरच्या बाजूचे, त्याच्याच संरक्षक छत्राखालील आहोत असे सांगत होता. प्रस्तुत झगड्याची पहिलीच भयसूचक चिन्हे दिसल्याबरोबर (१७ मार्च, वजीरानेच त्याला आपला प्रतिनिधी म्हणून, इन्तिझामकडे, त्याच्याच घरी, त्याच्याशी तडजोड घडवून आणण्यासाठी पाठविले होते. इमादने तेथे इन्तिझामचा पाहुणा म्हणून एक दिवस आणि एक रात्र घालविली. या काळात वरकरणी तो, इन्तिझाम व वजीर यांच्या दरम्यान सलोखा करण्यासंबंधी अटींची चर्चा करीत होता, पण प्रत्यक्षात लवकरच वजीराविरुद्ध होऊ घातलेल्या युद्धामध्ये, इन्तिझाम व तो मिळून एकसूत्री हालचाली कशा कराव्या याबाबत करार, तो गुप्तपणे करीत होता. सफ्दरजंग दिल्लीमधून बाहेर पडल्यावर तीन आठवड्यांनी, इमादने आपला बुरखा फेकून दिला आणि यापुढे दरबारपक्षियाच्या सैन्याची जुळवाजुळव करण्याच्या कामाला त्याने जोमाने सुरुवात केली. सैन्याची जमवाजमव करण्यासाठी बादशहाच्या आईने, स्वतःच्या खजिन्यातून त्याला २ कोट रुपये दिले. यात त्याच्या बापाच्या साठ्यातून ७० लाख रुपयांची आणखी भर घालण्यात आली. मराठा वकील बापू महादेव हिंगणे याला त्याने बोलावून घेतले आणि सांगितले की, निरनिराळ्या ठिकाणाहून मराठा सैनिक दिल्लीत एकत्र आणा आणि लवकरच तेथे अंताजी माणकेश्वर याच्या हाताखाली ४००० ची फौज जमा करा. आता दोन्ही प्रतिस्पर्धी पक्ष, मराठ्यांची मदत मिळविण्यासाठी, एकमेकापेक्षा वरचढ मोबदला देण्याची भाषा करू लागले. बापूरावाने ५००० दख्खनी घोडदळ आणून ते बादशहाच्या हुकमतीखाली ठेवण्याचे मान्य केले आणि याच्या मोबदल्यात त्याच्याकडे दोन शाही फर्माने देण्यात आली. या फर्मानानुसार, पेशव्याने वजीराचा मोड करावा या अटीवर, अलाहाबाद

आणि औध या सुभ्यांची सुभेदारी त्याला बहाल करण्यात आली. याउलट वजीराने मराठ्यांना वार्षिक १० लाख रुपये मिळवून देतील अशा जहागिरी देऊ करून शिवाय पूर्वी दोआबमध्ये, केलेल्या मोहिमांचेवेळी, मल्हार होळकराशी केलेल्या मैत्रीची व सहभागाची (भा. पहा. प्र. ९ § १० § ११) आठवणही दिली आणि तशाच सहकारासाठी विनंती केली. पण त्याच्या या विनंतीचा काहीही उपयोग झाला नाही. पेशव्याचे कायमचे व निश्चित असे एक उद्दिष्ट होते; ते असे की, दख्खनच्या सुभ्यावर, त्याच्या तंत्राने चालणारा, त्याला सहाय्यक होणारा असाच उमराव सुभेदार म्हणून नेमला जावा. यामागील त्याचा हेतु अर्थातच उघड होता. असा सुभेदार नेमला गेला म्हणजे तेथे खरे राज्यकर्ते मराठेच रहाणार होते आणि पेशव्याना हेच तर साधावयाचे होते.[1] पेशव्यांच्या या उद्दिष्टाच्या पार्श्वभूमीवर, बापूरावाने, आपल्या अचूक, जन्मजात चतुराईने बादशहालाच पाठिंबा दिला. या हालचाली चालू असताना आता १४ एप्रिलला इन्तिझाम दरबाराला हजर राहिला. जाविदखानाच्या खुनानंतर असे हजर रहाण्याची ही त्याची पहिलीच खेप होती. [त.–इ–अ.–४८ब; मुझ. ६६; इमाद ६३].

## § १२ : सफ्दरजंगाने युद्धाला सुरवात कशी केली

सफ्दरजंग दिल्लीच्या उपनगरातून काहीही निश्चित हेतू न ठेवता, भटकत राहिला होता. या भटकण्यात तो शहराच्या उत्तरेकडून, पश्चिमेच्या बाजूने, शहराच्या दक्षिणेस जात असे. एक तत्कालीन लेखक (बयान २५५)–म्हणतो की सुरुवातीला सफ्दरचा वरचढपणा कळसाला पोहोचलेला असून त्याच्या शत्रूंची लढयाची तयारी नव्हती, पण या परिस्थितीतही शहराभोंवती फिरणारा सफ्दर, शहरावर हल्ला करण्याच्या कृतीपासून मागेच फिरला. अशा हल्ल्यामुळे शहराची जी लूट झाली असती, तिच्यापासून, नागरिकांना वाचवावयाची त्याची इच्छा होती. शिवाय या वेळी त्याला विश्वासही वाटत होता की, त्याच्या लष्करी सामर्थ्याच्या दहशतीने, दरबारी पक्षाला, तहाची याचना करीत येणे भाग पडेल. त्याने प्रारंभीच शहरावर हल्ला न करण्यामागे अशीही आणखी कारणे होती. पण अशा प्रकारे त्याने निष्क्रियतेत घालविलेल्या प्रत्येक दिवसाबरोबर, या दोन पक्षियांच्या सामर्थ्यामधील फरक कमी कमीच होत गेला, आणि शिवाय याचबरोबर सफ्दरचा पैसा मात्र खर्च होत होत संपत चालला. सफ्दरचे अफाट सैन्य आणि त्याच्या मागोमाग येणारे बाजारबुणगे, यांच्या दाणागोटयाची तरतूद करण्याच्या प्रश्नाने लवकरच गंभीर स्वरूप धारण केले. अशा गंभीर अडचणींची अखेर, फक्त अव्यवस्था आणि झगडे यातच होणे शक्य होते. अखेरी २२, एप्रिलला यमुना ओलांडून पलीकडे पूर्वभागात जाऊन शक्य होईल त्या रीतीने, तेथील खेडयातून जरूर तो दाणागोटा घेऊन येण्याचा हुकूम त्याने राजेंद्रगिरीला दिला–म्हणजे लुटून आणा हाच याचा अर्थ होता. (पूर्वकडील ही सर्व खेडी, बादशाही जमिनी व वतने–Crown lands–वा अन्य सरदारांची वतने यापैकी होती.) सफ्दरने केलेल्या या जबरदस्तीच्या कृत्यामुळे, दिल्लीचा धान्य पुरवठा थांबला आणि राजधानीतील अन्न पदार्थांच्या किंमती एकदम भरमसाठ चढल्या. तेव्हा याबाबत लिहून, बादशहाने नापसंती व तक्रार व्यक्त केली. पण वजीराने आपले लोक तेथून

१ हिंगण्यांचा मत्सरग्रस्त प्रतिनिधी अंताजी माणकेश्वर, याला, शुजा-उद्-दौलाच्या मध्यस्थीने, १७ जानेवारी १७५३ लाच, चार हजारी मनसबदार करण्यात आले होते, (दिल्ली वार्ता. D.C.) (भा. पहा§५, शुजा-उद्-दौला हा वजीराचा मुलगा होय), पण आता तो तुराणी पक्षाला (भा. इन्तिझामच्या पक्षाला–म्हणजेच आता बादशहाच्या पक्षाला) मिळाला आणि १९ एप्रिलला त्याला बादशहापुढे सादर करण्यात येऊन आणखी वरच्या दर्जाची मनसबदारी देण्यात आली...... [त.-इ.-अ.-५०ब; ऐति. पत्रे (२) ८६].

माघारी बोलावण्यास नकार देऊन शिवाय वर उत्तर दिले की "इन्तिझाम व इमाद हे माझे शत्रू असून माझा हा झगडा त्यांच्याशी आहे. त्यानी माझ्याविरुद्ध बादशहाचे मन वळविले आहे. त्यांना सांगा की राजधानीतून बाहेर पडा (भा. बादशहा व नागरिकांना सोडून) आणि वजीराबरोबरचे भांडण लढून सोडवा.[1] (त.–इ–अ.–५१ब–५२अ.).

३० एप्रिलला उजाडल्यानंतर २ तासांनी, इन्तिझाम व इमाद, आपापल्या पालख्यातून दरबारला येत होते. किल्ल्याच्या पुढच्या दरवाजाजवळ ते पोहोचले तेव्हा दोघा घोडेस्वारांनी त्यांच्यावर आपल्या बंदुका झाडल्या. पण दोघांवरीलही नेम चुकले आणि त्यातील एक गोळी, आपल्या धन्याच्या मागे अगदी जवळच असलेल्या अकीबत महमदाच्या पोटालाच फक्त चाटून गेली. हल्लेखोरांनी यमुना नदीकडे दौड मारली, ते नदीत शिरले आणि पुढे वजीराच्या छावणीच्या रस्त्याला लागले. पण त्यांपैकी एक पकडला जाऊन त्याला ठार मारण्यात आले. या एकूण घटनेबाबत इमाद म्हणाला —. . . . "वजीर आणि मी यामध्ये आता उघड शत्रुत्व आहे, तेव्हा मला आता लढाई दिलीच पाहिजे." आणि असे म्हणत म्हणत त्याने सैनिकांची भरती करण्यास सुरवात केली. त्याच दिवशी पूर्वीच्या दोन शाही बेगमानी. . राण्यानी. . . . माजी मिरबक्षी सलाबतखान याने (सादतखान झुलफिकारजंग) दरबारात पुन्हा यावे असे त्याचे मन वळविले व त्याला तेथे आणविले. पूर्वी जून १७५१ ला अधिकारावरून काढून टाकल्यापासून (भा. पहा प्र. ८ §) तो आपल्या घरात अपमानित मनःस्थितीत आणि बंदीवासात रहात होता. तो आता दरबारात आल्यावर, त्याला पुन्हा बादशहाच्या मर्जीत घेण्यात आले. (भा. पण पुढे लवकरच हा सलाबत सफदरला मिळाला. पहा हेच प्रकरण पुढे § १३)

## § १३ : सलाबत खानाची सफदरजंगबरोबर हात मिळवणी : त्याने सफदरला बंड करण्यास दिलेली चिथावणी

मे महिना सुरू झाला आणि येथून पुढे या लढ्यातील घटना वेगाने सुरू झाल्या. २३, एप्रिलला सुरजमलने घोर रक्तपाती लढा देऊन अखेरी घासेरा किल्ला घेतला. (हा किल्ला बहादुरसिंह बर-गुजर- Bar Gujar चा होता.) या रक्तपाती लढ्यातून मोकळा झाल्यावर, वजीराकडून आलेल्या निकडीच्या बोलावण्यानुसार, १ मेला, सुरजमल १५,००० घोडेस्वार घेऊन, वजीराचे छावणीत येऊन त्याला मिळाला. आल्यावर त्याने, वजीराला, जोरदार चढाई करण्याचा सल्ला दिला. यानंतर तीन दिवसांनी, सलाबतखान आपल्या कुटुंबासह, शहामर्दानच्या पवित्र तीर्थाला ( Shrine ) यात्रेसाठी गेला. पण यात्रेला जाण्याचे हे तर एक ढोंगच होते. तेथे गेला असताना, सफदरजंगाच्या सैन्याच्या एका पथकाने त्याला पकडले व वजीराच्या तळावर नेले. सलाबताचे यात्रेचे ढोंग आणि त्यात त्याला पकडणे हे सर्व संगनमतानेच घडले होते. सलाबतला सफदरच्या छावणीत आणले तेव्हा त्याचे, मनापासून सलोख्याने स्वागत करण्यात येऊन, त्याला, सर्वांत जास्त मान असलेल्या, सफदरच्या मितासारखे वागविले, व त्याचा प्रमुख सल्लागार म्हणून त्याची अधिकारावर नेमणूक करण्यात आली. सलाबतच्या तरुण धन्याने–बादशहाने–पूर्वी त्याला कृतघ्नपणे वागविले होते. ( भा. पहा प्र. ८ §८ बादशहाचे हुकूम मिळवून जाविदखानाने

१ या आपापसातील युद्धाचा उपयुक्त तपशील, महमद सालिह कुद्रात (Md. Salih Qudrat) याने आपल्या "तारीख-इ-अला" या ग्रंथात दिला असून तो (A. L. Shrivastav) 'ए. एल् श्रीवास्तव' यानी "औधचे पहिले दोन नबाब" या आपल्या ग्रंथात वापरला आहे.

खानाने सलाबतचे मिरबक्षीपद व मालमत्ता १७५१, मध्ये काढून घेतली होती. ) सलाबतला वाटत होते की, या बादशहाला आता इन्तिझाम व इमाद असे नवे तरुण सल्लागार असून ते सफ्दर-सलाबतसारख्या जुन्या वरिष्ठ सरदारांना तुच्छ लेखीत असतात. यामुळे सलाबतने, सफ्दरला आता, टोचून उपरोधिक बोलून चिडविले. सालाबत त्याला म्हणाला की, या नव्या दरबारी बगलबच्चा पोराना तुम्ही सहज चिरडून टाकून आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित करू शकला असता इतके उत्तम सैन्य तुमच्याजवळ आहे. असे सामर्थ्य असताना तुम्हाला सत्तेवरून हुसकावले याला तुमचा भित्रेपणाच कारण आहे. तो आणखी म्हणाला :—"तुम्ही आता प्रयत्न करून शाही कारभार असा सुधारला पाहिजे की, या पोराना पुन्हा आमच्या सारख्या जुन्या प्रतिष्ठित उमरावांचा अपमान करता येऊ नये." [चहार गुल. ४०९ अ: त.-इ-अ.-५२ब; मुझ. ७१.].

अशी चिथावणी मिळाल्यावर, दुसऱ्या दिवशी ( ५ मे ) वजीराने राजेंद्रगिरीला बारापुलाकडे ( Barapula ) व इस्माइल खानाला 'नंगली' खेड्याकडे ( यमुनानदीजवळ ) तेथे असलेल्या तुराणी सरदारांच्या वाड्यावर हल्ले करण्यास पाठविले. अशाप्रकारे लढ्याला एकाएकी सुरवात होऊन यामुळे शहरात खळबळ व भीती निर्माण झाली. तेव्हा वजीराच्या एका अगदी जवळच्या नातेवाईकाला बादशहाने लिहिले की, अशा कृत्यापासून परावृत्त होण्यासाठी वजीराचे मन वळवा. पण याला सफ्दरने उर्मटपणे उत्तर पाठविले की, "शांतता निर्माण करता येईल पण यासाठी मिरबक्षीपद, दुसरे बक्षीपद आणि लाहोर व मुलतानची सुभेदारी अशी अधिकारपदे, तुराणी उमरावाकडून काढून घेऊन ती, मी सांगेन त्या व्यक्तीनाच द्या, इमाद आणि इन्तिझाम यांना बादशहा जवळून बाजूला घालवा.....असे न कराल तर लक्षात ठेवा की उद्या त्यांच्या घरावर निश्चितच हल्ले करण्यात येतील. इतकेच नव्हे तर बादशहांचा किल्लाही जवळच आहे त्याकडेही माझी दृष्टी राहील." [ त.-इ-अ.-५३ अ ].

आता मात्र उभय पक्षामधील उघड झगडा टाळणे शक्य नव्हते. ८ मे ला बादशहाने शुजाला, शाही तोफखान्याच्या प्रमुख पदावरून काढून टाकले आणि ते अधिकारपद समसामुदौल्याला दिले. ( नादिरशहाबरोबर झालेल्या युद्धात मरण पावलेल्या खान-इ-दौरानचा मुलगा. भा. पहा प्र. १ §२ ). याचवेळी नदीच्या तीरावरील, किल्ल्याची संरक्षक मोर्चेबंदी तातडीने पूर्ण करा असेही हुकूम त्याने दिले आणि याचबरोबर किल्ल्यातील शस्त्रागारातून सर्व प्रकारच्या क्षमतेच्या निरनिराळ्या तोफा बाहेर आणवून, खुद्द बादशहाच्या देखरेखीखाली हे मोर्चे सुसज्ज करण्यात आले. शुजाकडे असलेली अन्य अधिकारपदेही काढून घेऊन ती दुसऱ्या व्यक्तींना देण्यात आली. काढून घेतलेल्या या अधिकारपदात बादशहाच्या खास मुलाखतीबाबत नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे (Superintendent of the Private Audience) आणि अहिंदींच्या ( Ahindis ) पगार वाटपाचे बक्षीपद ही महत्त्वाची पदेही होती. याचप्रमाणे बादशहाच्या वाड्याची 'किलादारी' सफ्दरचा हस्तक अबुतुराबखान याच्याकडून काढून घेऊन अहमद अन्गा ( Ahmad Anga ) कडे बदलण्यात आली.

## § १४ : जाटानी केलेली जुन्या दिल्लीची लूट

प्रत्यक्ष लढाई करण्याला वजीर आताही धजला नाही. पण सुरजमल आणि राजेंद्रगिरी याना त्याने जुनी दिल्ली लुटण्याला, विशेषत: धान्य बाजार आणि शहाजहानाने वसविलेल्या

नव्या शहराच्या ( भा. शहाजहानबाद ) लाल दरवाज्याबाहेरील घरे लुटण्याला, चिथावणी दिली. या भागात कोणाही सरदाराचा वा सधन माणसाचा वाडा नसून तेथे फक्त मध्यमवर्गीय आणि गरीब यांचीच घरे होती. या परिस्थितीत, सफ्दरच्या या अविचारी क्रौर्यामुळे मध्यम व गरीब वर्गीयांची ही घरे लुटली गेली आणि त्यांच्या कुटुंबियांना वाईटपणे वागविण्यात आले. ज्याना शक्य झाले त्यानी जुन्या शहरातील आपली घरे सोडली आणि आश्रयासाठी नव्या दिल्लीच्या तटाच्या आत जाऊन तेथे गर्दी केली. दुसऱ्या दिवशी (१० मे) जाटांनी चालविलेली ही नासधूस, सय्यदवाडा, बिजल (Bijal) मशीद, तारकागंज आणि अब्दुलनगर ( जयसिंगपुराजवळ ) अशा, शहराच्या अन्य उपनगरात पसरविली. पण यावेळी, ज्या ठिकाणचे रहिवासी एकत्र जमून विरोध करीत वा ज्या ठिकाणी अशा लोकांना धीर देऊन मार्गदर्शन करण्याला काही थोडेसे सैनिक असत त्या ठिकाणापासून मात्र हे जाट मागे फिरत. "जाटानी शहराच्या वेशीपर्यंतच्या भागात लुटालूट केली. यावेळी लाखो लोकांना लुटण्यात आले, घरे जमीनदोस्त करण्यात आली आणि सर्व उपनगरे(Pura), चुरानिया ( Churania ) आणि वकीलपुरा हे भाग इतके उध्वस्त करण्यात आले की, तेथे दिवाही राहिला नाही[1]. झालेल्या या नासधुसीची आठवण, "जाट गर्दी" या नावाने आणि ती मराठे आणि अफगाण यांच्या हल्ल्याच्यावेळी झालेल्या नासधुसीच्या तोडीची म्हणून, पुढे दीर्घकाळ दिल्ली नागरिकांनी ठेवली. [ इमाद ६३ ].

त्याच दिवशी संध्याकाळी, सूर्यास्तापूर्वी सुमारे तीन तास, बादशहाच्या पक्षाने आपल्या खंदकातून बाहेर पडून, राजेंद्रगिरीने सांभाळलेल्या, वजीराच्या आघाडीच्या फळीवर हल्ले केले. आपल्या अधिक चांगल्या तोफातून मारा करून तिची दाणादाण केली आणि नंतर आपले खंदकी मोर्चे लुत्फ अलिच्या ( Lutf Ali ) उतारापर्यंत पुढे सरकविले. अंताजी माणकेश्वराच्या हाताखालील ४००० मराठा सैनिकांचा विभाग, अद्याप बादशहाच्या पगारी सैन्यात दाखल केलेला नव्हता हे खरे पण या पहिल्या लढाईत या विभागाने, नावाजण्यासारखे काम करून प्रसिद्धी मिळविली.

'जुनी दिल्ली' हे शहर लुटण्याचे काम जाटानी रोजच चालू ठेवले. ज्या ठिकाणी लुटीच्या वेळी शाही पथके येऊन पोहोचू शकत वा जी ठिकाणे शाही तोफखान्याच्या माऱ्यात येऊ शकत तेवढीच या लुटीतून वाचली. "जुनी दिल्ली आणि अन्य उपनगरे यातील सर्व नागरिक, बरोबर नेता येईल तेवढी मालमत्ता घेऊन, नव्या शहराकडे पळून गेले आणि नव्या शहरातील नागरिकही, लुटीच्या भीतीने आपल्या मौल्यवान वस्तू आपल्या बरोबर घेऊनच वावरू लागले. ते सर्व गोंधळून निराशेने एका घरापासून दुसऱ्याकडे, एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत असे भटकत होते. एखादे फुटलेले जहाज लाटांवर हेलकावे खात इकडे

१ त.-इ.-अ.-५५ब ; बयान २७८ ; चहार गुल.-४१०अ ; शकीर ७४....... "शहाजहानाबाद इतकी वा यापेक्षा थोडी जास्तच लोकवस्ती असलेले 'नवी दिल्ली' हे शहर सुरजमलने लुटले. या लुटालुटीत लोकांचे जीवित, मालमत्ता आणि स्त्रियांची अब्रू यांचा नाश झाला. जाटांच्या या वेळच्या आधाशीपणात साधू-फकीर अशासारख्यांचे घरही सुरक्षित आश्रय ठरू शकले नाही." ( सियार (३) ४७-४८ ). अनेक नागरिकांना पळून जाण्यातही सुरक्षितता लाभू शकली नाही म्हणून त्यांनी निराशेने आत्महत्या केल्या (मुझ. ७१). बयान २७८ मध्ये म्हटले आहे कीं, वजीराच्या सैन्यातील "किझिल बाशी" सैनिकही या लुटालुटीत सामील झाले होते. सुरजमलच्या दरबारातील स्तुतिपाठक-भाट, या लुटीचे वर्णन करताना सामान्यतः आढळत नाहीत इतके, लांबलचक कंटाळवाणे (१४ पृष्ठे) वर्णन करतो. सुजनचरित (६) जंग.

तिकडे फेकले जावे, वहात रहावे तसेच हे चालले असून प्रत्येक जण, गोंधळात पडलेल्या आणि स्वतःची काळजी घेऊ न शकणाऱ्या अशा वेड्यापिशा माणसाप्रमाणे सैरावैरा पळत होता."—शहरातले सगळे बाजार, गल्ल्या-रस्ते आणि घरे अशा ठिकाणी निर्वासितांची मोठी गर्दी उसळून, ती सर्व तुडुंब भरून गेली होती. यावेळी बादशहाने मोठ्या विचार-पूर्वक हुकूम सोडून आपल्या शासनाच्या मालकीची घरे, साहिबाबाद बाग (चांदणी चौकातील) तीस हजारी बाग ( Garden of thirty thousand ), आणि अशा इतर बागा ही सर्व मोकळी करा व त्यात ज्याना रहावयाची इच्छा असेल त्याना राहू दे असे सांगितले. तेव्हा उच्च व नीच अशा सर्व प्रकारच्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथे रहाण्यास गेल्या. दुकानदार आणि कारागीर यानीही तेथे आपली छोटी दुकाने उभी केली आणि तेथेच ते आपापले व्यवसाय चालवू लागले. [ त.-इ-अ.-५४ ब; चहार गुल्. ४१० ब. ].

## § १५ : बादशहा सफदरजंगाला बडतर्फ करतो—त्याच्याविरुद्ध युद्धाची घोषणा करतो

अशा प्रकारे ज्या माणसाने, अविचारीपणाने सर्वच माणसांवर हाल अपेष्टा लादल्या त्याच्या बरोबर आता तडजोड होणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत बादशहाने सफदरजंगाला अधिकारपदावरून काढून टाकले आणि त्याच्या जागी वजीर म्हणून इन्तिझामची नेमणूक केली. या नव्या वजीराला त्याने कम्रुद्दिन खान बहादुर आणि इतिमाद्-उद्-दौला अशा पदव्या दिल्या (१३ मे). याचवेळी मिरबक्षी ( Pay Master General ) इमाद-उल्-मुल्क याला, निजाम-उल्-मुल्क व असफ जाह या त्याच्या आजोबाच्या पदव्या बहाल केल्या. बादशहाने, सफ्दरला मारलेल्या या तडाख्याला, त्याने प्रतितडाखा देऊन उत्तर दिले ते, एका सुंदर तरुण खोजा मुलाला, अकबर अदिलशहा नावाने बादशहा म्हणून सिंहासनावर बसवून! या मुलाचा जन्म व कुळ माहीत नसून तो शुजा-उद्-दौला याने नुकताच विकत घेतलेला एक खोजा होता असे सामान्यपणे सगळीकडे मानले जात होते. असा हा मुलगा कामबक्षाचा नातू होय असे जाहीर करून सफ्दरने त्याला, अकबर अदिलशहा या नावाने सिंहासनावर बसविले. याचबरोबर स्वतःला त्याचा वजीर आणि सलाबतखानाला त्याचा मिरबक्षी, म्हणून नेमणुकाही जाहीर केल्या. [ त.-इ-अ.-५४ ब; चहार गुल. ४०९ ब; बयान २७६; सुजनचरि. जंग (६) ].

दोन्हीही पक्षांनी आपापल्या तरवारी उपसून म्याने फेकून दिली होती अशा अवस्थेला आता हा लढा पोहोचला होता. बंडखोर माजी वजीर आणि सिंहासनावर हक्क सांगणारा तोतया, यांच्याविरुद्ध लढा देण्यासाठी आपल्या भोवती जमावे, असे आदेश देणारी पत्रे, आता बादशहाने पाठविली. अशी पत्रे जमीनदार, सरंजामी-जहागिरदार व राजे ( भा. लष्करी नोकरीबद्दल जहागिरी दिलेले राजे ), रोहिले इतकेच नव्हे तर जाट, मेवाती व गुजर लुटारूंचे प्रमुख यानाही, अशा प्रकारे सर्व बाजूला पाठविली. इमाद आणि त्याचा व्यवस्थापक अकीबत महमद (Aqibat Mahamad) यानी, बादशाही संरक्षणाची आखणी व व्यवस्था केली. तथापि बादशहाच्या विजयाला सर्वांत जास्त हातभार लावला तो विशेष दोन कृतींनी—सफ्दरजंगाच्या मुघलिया सैनिकाना लालूच दाखवून बादशहाकडे वळवून घेण्यात आले ही एक आणि सफ्दरजंग विरोधी युद्धाला धर्मयुद्ध, म्हणजेच, एका बेइमान, पाखंडी माणसाविरुद्ध युद्ध (निमक हराम राफिजी विरुद्ध Nimak Haram Rafizi) म्हणून पुकारण्यात आले ही दुसरी—अशा या विशेष हातभार लावणाऱ्या दोन हालचाली होत्या. यावेळी इमादने

काही मुल्ला-मौलवी अशा धर्मतत्त्व पारंगत गुरूंच्या (Theologians) सह्या घेऊन त्यांचा एक फतवा जाहीर केला. या फतव्यानुसार माजी वजीर हा एक 'शिया' म्हणजे धर्मद्रोही आहे असे पुकारण्यात येऊन पहिल्या तीन खलिफाना मानणाऱ्या खऱ्या मुसलमानांना, या पाखंडी पुढाऱ्याविरोधी धर्मयुद्धात सामील होण्यास सांगण्यात आले. (या तीन खलिफांना शिया पंथीय शिव्याशाप देतात.—भा. सुनी पंथीय त्याना मानतात—म्हणूनच शिया पंथीय सफ्दर हा जातीवंत मुसलमानी या धर्म द्रोह्याविरुद्ध युद्धात सामील व्हावे हे या फतव्याचे आवाहन). धर्मद्रोही—अशारीतीने इमादने सुन्नी पंथियांच्या धर्मवेडात तेल ओतून त्याना वजीराविरुद्ध चेतविले. पैगंबरांचा हिरवा झेंडाही (Banner) फडकविण्यात येऊन निमकहरामाविरुद्ध होणाऱ्या या युद्धासाठी, लोकांच्या उत्साहाला उधाण येईतो त्यांना चेतविण्यात आले. असा हा प्रचार, पंजाबी आणि काश्मिरी, यानी विशेष जोमाने चालविला. यांपैकी काश्मिरी तर पूर्वीपासूनच शिया पंथीयांचे कट्टर विरोधक होते. त्यानी आपल्या सुभ्यातील शिया पंथीयांची क्रूर, रक्ताने थबथबलेली, अशी कत्तल अनेक वेळा, शहाजहान व औरंगजेब यांच्या कारकीर्दीत केलीच होती, इतकेच नव्हे तर अशी कत्तल, प्रस्तुत घटनांच्या संदर्भात, १७२४ इतक्या अलीकडच्या काळातही केली होती. आतापर्यंत सफ्दरचा पगार घेऊन त्याची नोकरी करीत असलेल्या रोहिल्यांपैकी बहुतेक सर्वच, तो शिया होता म्हणून त्याचा द्वेष करीत होतेच. या परिस्थितीत त्यांचा पुढारी नजीबखान याने, भावनावेगाने कळकळीची विनंती केल्याबरोबर, या रोहिल्यांनी आपला राजकीय व धार्मिक शत्रू म्हणून सफ्दरला नेस्तनाबूद करण्यासाठी उठाव केला. यातून काही बाजूला राहिले ते आपापल्या घरी निघून गेले आणि धर्मनिष्ठा व नोकरीच्या निमित्ताने सफ्दरची निष्ठा यातील आताच्या लढ्यापासून, त्रयस्थ म्हणून बाजूला राहिले. [ सियार (३)४७; मुझ. ७३; इमाद ६० ].

इमाद स्वतः तर तुर्क होताच. शिवाय त्याचे आजोबा म्हणजे पहिला निजाम आणि इन्तिझामचा पिता कम्रुद्दिन (महमदशहाचा वजीर) हे दोघे हिंदुस्थानातील मुघलियांचे (तुर्की लोकांचे) एका पिढीच्या काळात, मान्यवर नेते होते. आता इमादने सर्व लोकांपुढे जाहीर केले की, सफ्दरचे सैन्य सोडून, जो कोणी तुर्की सैनिक येईल त्याला ५० रुपयांची उदार देणगी आणि १ महिन्याचा आगाऊ पगार ( रु. ५० ) देण्यात येईल. त्यांच्या नेत्यांना-कॅप्टन्सना–घोडे, हत्ती, पैसा, पोषाख आणि रत्ने अशी बक्षिसे दिली जातील. अशा प्रकारच्या लालचावणीशिवाय सफ्दरकडील मुघलिया सैनिकाना बादशहाच्या बाजूला येऊन मिळण्यासाठी आणखी भीतीही दाखविण्यात आली. सफ्दरच्या या मुघलिया सैनिकांची घरे व बायकामुले मुघलपुरा भागात होती. या परिस्थितीत या सैनिकाना आता भीतीही घालण्यात आली की, बादशहाच्या बाजूला ते आले नाहीत तर इमादच्या हुकुमाने त्यांची घरेदारे लुटली जातील आणि त्यांच्या स्त्रियांची अब्रू घेतली जाईल. अशी लालूच व असा धाक यामुळे थोड्याच काळात २३००० तुराणी आणि हिंदुस्थानी सैनिकांनी सफ्दरची बाजू सोडून दिली व ते शहरात आले. तेथे त्यांना शाही सैन्यातील 'सिनडाग' (Sin Dagh) नावाच्या सैन्य विभागात नोंदवून घेण्यात आले. या सैन्य विभागाला सामान्यतः बदक्षी (Badakshi) असे संबोधिले जात असे. शाही पक्षात याशिवाय आणखीही भर पडली ती नजीबखानाच्या नेतृत्वाखाली, घोडेस्वार व पायदळ मिळून आलेल्या १५,००० रोहिल्यांची आणि जेतासिंह गुजर याच्या नेतृत्वाखाली आलेल्या २,००० हिंदुस्थानी सैनिकांची या जेतासिंहाला, २ जूनला मुलाखत देण्यात आली होती. या एकूण हालचालीतून लढ्याचा ओघ संपूर्णपणे सफ्दरजंगाविरुद्ध

उलटला आणि यामुळे धाडसी व थोपविता येणार नाही अशी चढाई करण्याला शाही पक्षांत सामर्थ्य आले.[१]

इमादने अशी मोठी कामगिरी केली तरीही, त्याने सर्वांत जास्त चाणाक्षपणाने सफ्दरजंगाला दिलेला शह म्हणजे त्याच्या अनुयायांची शहरात असलेली घरे सरकारजमा केली हा होय. बादशाही तोफखाना अधिक मोठ्या क्षमतेचा व अधिक शक्तीशाली असून तो बसविलेले शहराचे तट उंच होते. या तटाबाहेरील मैदानावर सफ्दरपक्षीयांच्या घरांच्या रांगा असून स्वाभाविकच, त्या भागावर शाही तोफखान्याचे नियंत्रण होते. तोफांच्या या नियंत्रणामुळे सफ्दरला मात्र तटापासून, त्यांच्या माऱ्याच्या कक्षेबाहेर, सुरक्षित इतक्या दूर रहाणे भाग पडले. मिर्झा अलिखान (तिसरा बक्षी) व सलारजंग हे दोघे, सफ्दरचा मुलगा शुजा-उद्-दौला याच्या पत्नीचे भाऊ होते. तथापि या यादवी युद्धात बादशहाच्याच बाजूला ते नोकरीत होते. त्यांचा वाडा शाही सैन्याच्या संरक्षक खंदकांच्या एका भागावर, ताबा ठेवण्याइतका उंच होता. इमादने आता आरोप केला की, १७ मे च्या आदल्या रात्री या वाड्याच्या बाजूने तोफगोळे व अग्निबाण, या वाड्याच्या खालच्या पातळीवर आणि माऱ्याच्या कक्षेत असलेल्या खंदकावर पडले होते. या आरोपाबाबत काहीही चौकशी न करता, या दोघा भावांचे घर लुटण्यास व त्याना शाही जनानखान्यातील मुख्य अधिकाऱ्याच्या ताब्यात डांबून ठेवण्यास बादशहाने हुकूम दिले. —"तेव्हा या घराच्या झालेल्या सर्वसाधारण लुटीमध्ये, तेथे आधीच जमलेल्या असंख्य लोकांचा नाश झाला. हे दोघे बंधू शुजाचे मेहुणे असून, याचबरोबर बादशहाचेही अनुयायी, म्हणजे त्याच्या पक्षातीलही होते, हे जमलेल्या या लोकांना माहीत असल्याने त्यांना वाटत होते की, या दुहेरी संबंधामुळे आपल्या स्त्रिया व मालमत्ता या बंधूंच्या वाड्यात ठेवणे सर्वांत सुरक्षित होय. यामुळेच ते, तेथे आधीच जमले होते. या परिस्थितीत या वाड्याच्या झालेल्या सर्वसाधारण लुटीत अनेक लोकांचा, काहीही तारतम्य न राहता, सरसकट नाश झाला." पण सफ्दरपक्षीयावर करण्यात यावयाच्या आघातांची ही तरी नुसती सुरवात होती. यावेळी बादशहा व त्याचे मंत्री पैशाबाबत इतके गरजू होते की, असा हल्ला व लूट करण्याच्या संदर्भात ते काही न्याय अन्यायाचा विचार करणे शक्य नव्हते. सफ्दरजंगाचा अनुयायी म्हणून माहीत असलेल्या प्रत्येकाचे, जन्माने पर्शियन असलेल्या प्रत्येकाचे आणि सफ्दरचे अनुयायी आहेत असा केवळ संशय असलेल्या

---

१ सियार (३) ४७ ; त.-इ.-अ.-५६अ ; शाकिर ७४, इमाद ६३, बयान २७७. औधचा नबाब सादतखान (मृ. १७३९) याच्या किझिलबाश तुर्की सैनिकी पथकाना प्रथमतः 'सिन डाग' म्हणत असत. Sin (सिन) अशी खूण या पथकातील घोड्यावर डागलेली असे. 'सिन' हे सादत शब्दातील पहिले अक्षर (अरेबिक वा उर्दू लिपीतील असावे).

इमाद या वेळी केवळ १७, वा १८ वर्षांचाच युवक असला तरी, सैन्याची जमवाजमव करण्याच्या कामात त्याने जास्तीत जास्त परिश्रम घेतले, आपल्या पित्याने व आजोबाने साठवून ठेविलेला अफाट खजिना या सैन्यावर खर्च केला आणि स्वतःच्या तबेल्यातील घोडे आणि आपला तोफखाना, त्याना वाटून दिला. याचबरोबर, बादशहाची माता ही मूळची केवळ एक नाचणारी मुलगी असली तरी तिनेही सैन्य तयार करण्याच्या या कामात उच्च व शुद्ध खानदान घराण्यातून आलेल्या बेगमा व असेच शहाजादे यांच्यावर, ताण केली. वाड्याच्या झरोका-सज्जाच्या आत बसून तेथून ती सैन्याच्या हालचालीबाबत हुकूम देत असे. दिवाण-इ-खास महालाच्या जवळच असलेल्या 'प्रार्थनाघरात' (Chapel चॅपेल) पड्द्यामागे बसून ती सरदाराबरोबर सल्लामसलत करी. तिने आपले स्वतःचे आणि जनानखान्यामधील व त्या बाहेरील शाही कोठ्यातील सोन्या-चांदीची भांडी, असा पैसा सैन्यावर खर्च केला. अशा रीतीने इमादप्रमाणे तिनेही या लढ्यात मोठी कामगिरी बजावली. "यामुळे बादशहाचे सामर्थ्य वाढले आणि सफ्दरजंगाला निराशेने ग्रासले." त.-इ.-अ. ५६अ आणि ब.

पण वस्तुत: सफ्दर पक्षाबाबत तटस्थ व निरपराध असलेल्यांची, अशी अनेकांची घरे शाही-पक्षीयांनी लुटली. या सर्वांचा एकच गुन्हा म्हणजे त्यांच्याजवळ संपत्ती होती हाच होता. प्रथम ही लूट, शाही हुकूमानुसार झाली पण पुढे शाही सैन्यातील पथक-प्रमुखांच्या म्हणजे सर्वसामान्य कॅप्टनांच्या वैयक्तिक व खाजगी पुढाकारानेही झाली आणि ती सुद्धा बादशहाने अशा लुटीला बंदी घातल्यावरही झाली. अशा रीतीने बादशहाच्या आवाक्यात येऊ शकतील अशा सर्व ठिकाणामधील माजी वजीराच्या पक्षियांचा सर्वनाश झाला. [ शाकीर ७४; त.-इ-अ.-५५ ब; चहार गुल. ४११ ब; बयान २७९. ].

## § १६ : सफ्दरजंगाने दिल्लीवर फार मोठा हल्ला केला—तो अयशस्वी झाला त्याने कोहतिला घेतले आणि सोडून दिले

या आपापसातील युद्धात, दररोज होत असलेल्या छोटया छोटया चकमकी वगळून त्यातील मुख्य ओघाच्या फक्त रूपरेषेची आता आपण माहिती घेऊ. प्रत्यक्ष सशस्त्र लढयाच्या काळातील १७ मे, हा दिवस गाजला ते सफ्दरजंगाने नव्या दिल्लीच्या दक्षिणेस ३ मैलांवर असलेला, फिरुझशहाचा 'कोहतिला', हा उंचवटयाचा भाग घेतला यामुळे. यावेळी शाही सैन्याचा "बालाशाही" हा विभाग कोहतिला येथे ठेविलेला होता. सफ्दरजंग 'काबुली' वेशीमधून प्रथम जुन्या शहरात शिरला. तेथून बालाशाही सैन्य विभागातील शाही अधिकाऱ्यांच्या संगनमताने त्याला कोहतिलामध्ये प्रवेश मिळाला. तेव्हा इमादचे सेनापती–सादतखान आणि देवीदात यांनी दुसऱ्या गल्ल्यातून तेथे प्रवेश करून सफ्दरजंगाशी लढाई दिली. ही लढाई सूर्यास्तापर्यंत चालली आणि तीत उभयपक्षांचा खूपच नाश झाल्यावर, दोन्हीही बाजू आपापल्या तळावर परतल्या. नंतर रात्री, सफ्दरजंगाने पुन्हा हल्ला केला आणि कोहतिला जिंकले. तेथील टेकडीवर आपल्या तोफा चढवून बसविल्या व तेथून शाही किल्ल्यात गोळे टाकले. पण शहराच्या सर्वात दक्षिणेकडील वेशीवर ( दिल्ली दरवाजा ) बसविलेल्या भारी तोफांच्या माऱ्यात कोहतिला होते. सफ्दरच्या या चढाईला, शाहीपक्षाकडून, या तोफांचा मारा करून उत्तर देण्यात आले व कोहतिलाच्या बुरुजांपैकी व तटांपैकी बरेच पाडले जाऊन त्यांचा नाश झाला. [ त.-इ-अ.-५५ ब ].

पुढे पाच दिवसांनी, बंडखोरांनी नवी दिल्ली या शहरावरच मोठा हल्ला चढविला. या शहराच्या दक्षिण तटांना लागूनच नवा वजीर इन्तिझाम याचा वाडा होता. या हल्ल्याच्या आधीच माजी वजिराच्या काही सेनापतींना-इस्माइलखान व इतर यांना–कोहतिला भागात ठेवण्यात आले होते. त्यांची, इन्तिझामचा हा वाडाच जिंकून घेण्याची इच्छा होती. यासाठी त्यांनी कोहतिला व हा तट यांच्या दरम्यान असलेल्या एका मोठ्या घरातून, जमिनीखालून, तुरुंगासाठी एक भुयार खणत खणत ते तटाच्या बुरुजाखाली नेले होते. ५ जूनला सकाळी लवकरच हा सुरुंग उडविण्यात आला. यामुळे बुरुजाचा काही भाग कोसळला. वजीराच्या वाड्याला जोडलेले एक घरही या सुरुंगाने उडवून दिले जाऊन या धडाक्यात तेथे असलेले २०० लोक मारले गेले. हे लोक बंडखोराविरुद्ध सुरुंग तयार करण्यातच गुंतलेले होते. या धडाक्या पाठोपाठ सफ्दरच्या लोकांनी नदी काठच्या वाळवंटातून या कोसळलेल्या भागावर हल्ला चढविला. तेव्हा इन्तिझामच्या वाड्याच्या मैदानावरून, ४००० तुर्की सैनिकांनी त्याच्याशी लढा दिला आणि याचवेळी आसमंतातील शाही खंदकामधील सगळ्या तोफातूनही हल्ला करून येणाऱ्या शत्रूवर मारा करण्यात आला. नजीबखानाच्या हाताखालील रोहिलेही आपल्या

खंदकातून पुढे आले आणि त्यांनी शत्रूच्या जवळ जाऊन त्याच्याशी हातघाईची लढाई दिली. तेव्हा हल्ला करून आलेल्या बंडखोरांनी आपल्या बरोबर अगदी पुढे आघाडीला आणलेल्या मैदानी तोफा तशाच सोडून पळ काढण्यास सुरवात केली. पण याच सुमारास लढाईचा नूर, पुन्हा सफ्दरच्या बाजूला वळवून घेण्यासाठी, किझिलबाशी सैनिकांची, बंडखोरांना मोठी कुमक येऊन, रणभूमीवर दाखल झाली.—दुसऱ्या बाजूने शाही पक्षियानीही आपल्या ताज्या दमाच्या तुकड्या पुढे आणून सफ्दरच्या या हालचालींना प्रत्युत्तर दिले. यातून दीर्घकाळ व निकराची लढाई झाली. नजीब व त्याचा भाऊ गोळ्या लागून जखमी झाले आणि त्यांच्या जमातीपैकी ३०० ते ४०० लोक मारले गेले. सफ्दरच्या बाजूलाही फार मोठी हानी झाली. झाली. (त.-इ-अ.-५७ अ मध्ये नमूद आहे की, "१०,००० लोक मारले गेले व अनेक जखमी झाले." पण हे विधान अतिशयोक्तीचे आहे). सर्व रात्रभर तोफा आणि अग्निबाण यांचा धडधडाट चालूच राहिला, पण उजाडण्यापूर्वी सुमारे २ तास सफ्दरच्या लोकांनी कोहतिला सोडून दिले. जाताना त्याना आपला तोफखाना मात्र नेता आला नाही. त्यात एक मोठी तोफही होती. दुसरीकडून शाही सैन्ये त्या जागी आली आणि त्यानी मोठ्या तोफेसहित, शत्रूने मागे सोडून दिलेल्या तोफा आपल्या ताब्यात घेतल्या. हाती आलेल्या या उंच ठिकाणा-पासून, विजयी शाही सैन्याने सफ्दरच्या, तंबूच्या तळावर तोफांचा परिणामकारकपणे मारा करण्यास सुरुवात केल्यामुळे सफ्दरला आपला तळ शहरापासून अधिक दूर, मागे घेणे भाग भाग पडले. कोहतिला सफ्दरने व्यापले होते तेव्हा त्या उंच ठिकाणावरून मारलेले गोळे दिल्लीच्या तटाच्या आत पडत. अर्थातच सफ्दरला घ्यावी लागलेली ही माघार म्हणजे शहराची झालेली मोठी सोडवणूक व त्याला मिळालेली विश्रांतीच होती. [त.-इ-अ.-५६ ब-५७ ब; बयान २७९-२८० ].

सफ्दरचा हा पराभव निर्णायक असून शाही पक्षाच्या या विजयाचे सर्व श्रेय, तेथे नव्यानेच आलेल्या रोहिल्यांनाच होते. यानंतर लढ्याला विस्कळीत स्वरूप आले. या काळात सफ्दरजंग व त्याचे जाट मित्र हे शहराभोवती फिरत व फिरता फिरता या वा त्या उपनगरात लुटालूट करीत, असे चालले होते. एखाद्या ठिकाणी अशी लूट होत आहे असे कळले की शाही पक्षीय, त्या ठिकाणाकडे धाव घेत आणि लुटारू शत्रूला, पिटाळून त्या ठिकाणी एखादे नवे संरक्षक ठाणे स्थापित वा असलेले अधिक बळकट करीत. एकूण युद्धाचा ओघ मात्र आता हळूहळू पण निश्चितपणे सफ्दरविरुद्धच जात होता. रोज होणाऱ्या चकमकींपैकी प्रत्येकीतच त्याला काही लोकांना आणि विशेषतः निकराने होणाऱ्या लढायात, खूप जास्त लोकांना मुकावे लागे. विशेषतः १२ जूनला झालेल्या इदगा मैदानावरील लढाईत तर त्याच्या जाट मित्रांचा फारच नाश झाला.

## § १७ : राजेंद्रगिरी गोसाईचा मृत्यू

धडाडीने हल्ला करून दिल्ली घेण्याचा हा प्रयत्न फसल्यावर नऊ दिवसांनी, सफ्दर-जंगावर सर्वांत मोठे अरिष्ट कोसळले. १४ जूनला सूर्यास्तापूर्वी सुमारे अडीच तास, त्याने बादशाही सैन्याच्या सर्वच खंदकांवर एकाच वेळी हल्ला चढविला. या सार्वत्रिक हल्ल्याच्या वेळी झालेल्या लढाईतील मुख्य भार माजी वजीर, जाट व किझिलबाशी यांच्यावर पडला. यावेळी शाही बाजूला बदक्षी व मराठे याना मोठी हानी पत्करावी लागली. पण इदग्या-पासून पुढे, इमाद स्वतः घोड्यावरून आपल्या खंदकांमधून हिंडला आणि स्वतःच्या अशा

उदाहरणाने त्याने आपल्या लोकांना उत्तेजन दिले. अखेरी हा हल्ला परतविला जाऊन विजयी शाही सैन्ये मध्यरात्रीला आपल्या तंबूत परतली. या संध्याकाळी 'कालीपहाडी' वर हल्ला करीत असताना राजेंद्रगिरीला, बंदुकीची गोळी[1] लागली आणि यातून दुसरे दिवशी तो मरण पावला. "राजेंद्रगिरीच्या मृत्यूमुळे सफ्दरजंग भग्नहृदय व अति दुःखी झाला. यानंतरच्या कोणत्याही लढाईत तो स्वतः पुढे गेला नाही. निधड्या छातीचा हा फकीर मेल्यानंतर, लढा देण्याला उत्सुक असणारा कोणीच सफ्दरच्या बाजूला उरला नाही." [ त.-इ-अ.-५९ अ. ].

रागाने बेभान झालेल्या एखाद्या रानटी नॉर्स लढवय्याप्रमाणे (Inspired by the Berserkar's rage. ref. ox. Dic.) हा लढवय्या महंत रणांगणामध्ये शिरत असे. लढण्यासाठी त्याची विशिष्ट अशी ठरलेली वेळ नसे की आपल्या जोडीच्या इतर सेनानायकाशी एकसाथ हालचाली करण्यासाठीही तो थांबत नसे. इतकेच नव्हे तर, त्याकाळी, अगदी कडकपणे पाळला जाणारा शिस्तीचा एक विशेष नियमही तो पाळीत नसे. युद्धभूमीवर कोणतीही हालचाल करण्यापूर्वी, त्यासाठी आधी सर्वश्रेष्ठ सेनापतीची परवानगी घेतली जावी अशी, कडक शिस्तीची पद्धत त्याकाळी होती, तीही तो पाळीत नसे. ज्यावेळी युद्धाची खुमखुमी, त्याच्या रक्तात उसळून येई वा शत्रूच्या फळीत एखादी मोकळी वाट त्याला दिसे तेव्हा तो शत्रूवर धावून जाई. त्याचे सर्व शिष्यही त्याच्या सारखेच साहसी, जिवावर उदार असेच लढवय्ये असून, तोफखान्यावरही ते अगदी बेपर्वाईने चालून जात. मरणाला तुच्छ मानणारा हा त्याचा जथा, त्या काळच्या पगारी सैनिकांपेक्षा लढण्यासाठी इतका अधिक चांगला व कडवा होता की, सफ्दरजंग त्याच्या मुख्याला–राजेंद्रगिरीला–काहीही नाकारू शकत नव्हता. या हिंदू महंताला, घोड्यावर बसविलेले आपले पडघम, नगारे आदी वाजवीत जाण्याला वजीराने परवानगीही दिली होती. (मुघल अमीर-उमरावांपैकी अत्युच्च दर्जाच्या सरदारानाच फक्त हा मान बहाल करीत.) तसेच सफ्दरजंगाला कधीही सलाम न करता, सर्वश्रेष्ठ धर्मगुरू (पोप) प्रमाणे आशीर्वाद देण्यालाही त्याला परवानगी दिली होती! तो एक जादुगारच असून, तरवार वा बंदुकीची गोळी, याना दाद न देणारा, यानीही मरण न येणारा आहे असा सर्वसाधारण समज होता.— [ इमाद ६४; सियार (३) ४७ ].

या घटनेनंतर दहा दिवसांपर्यंत लढाई करण्याचे सफ्दराने स्थगित केले. पण या काळात दरदिवशी, सफ्दरच्या सैन्याला सोडून, जास्त जास्त लोक निघून गेले आणि यातून शाही पक्षाची संख्या आणि सामर्थ्य वाढले.[2] त्यानी आता शहराबाहेर नवी नवी ठाणी वसवून बंडखोरांना अधिक अधिक दूर मागे रेटले.

१ 'इमाद' पृ. ६४ वर नमूद आहे की, इस्माइलखानाच्या चिथावणीने, त्याच्या एका माणसानेच राजेंद्रगिरीला गोळी घालून ठार केले, कारण हा इस्माइलखान व राजेंद्रगिरी हे, आपल्या धन्याच्या मर्जीमध्ये, जास्तीत जास्त जवळ जाऊन, तेथे पहिले स्थान मिळविण्याबाबत प्रतिस्पर्धी होते. पण याबाबत मला वाटते की, राजेंद्रगिरीला अशा प्रकारे मागून गोळी लागून मृत्यू आला असला तर तो त्या काळच्या सैनिकांच्या वाईट व निष्काळजी नेमबाजीमुळेच असावा, मुद्दाम मारल्याने नव्हे. अशा वाईट व बेफिकीर नेमबाजीसाठी तत्कालिन हिंदी सैन्ये कुप्रसिद्ध होतीच.

२ बादशहाच्या मदतीला आलेली निरनिराळी सैन्ये पुढील प्रमाणे होती :—अंताजी माणकेश्वर ४००० सैनिक घेऊन (त.-इ.-अ.-५०अ), १९ एप्रिलला हजर झाला; पुढे नजीबखान १५००० सैन्य–घोडेस्वार व पायदळ मिळून, व जेटा गुजर २००० लोकांसहित, २ जूनला आले (५६ब) ; बहादुरखान बलुच (५८अ), रेवारीचे

[ पुढील पानावर ]

## १८ : विस्कळित रूपात अधूनमधून चाललेल्या लढाया

राजेंद्रगिरीच्या मृत्यूनंतर सफ्दरने अंमलात आणलेला १० दिवसांच्या युद्ध तहकुबीचा काळ संपल्यावर पुन्हा लढाया सुरू झाल्या पण त्या फारसे लक्ष न देता, सहजासहजी चालविलेल्या आणि काहीही परिणाम न करणाऱ्या अशाच होत्या. लढायांची ही तऱ्हा एका दरबारी इतिहासकाराने केलेल्या वर्णनावरून स्पष्ट होते. तो लिहितो :—"सकाळच्या प्रहरी दोन्ही बाजू तयारीत रहात, पण पुढे फक्त छोटचा छोटचा चकमकीच झडत, सूर्यास्तापर्यंत तोफातून मारा चालू राही आणि नंतर दोन्ही सैन्ये आपापल्या छावण्यात परत येत."—सफ्दरजंगाची बाजू आता उघड उघड निराशामग्नच होती. दरदिवशी, त्याच्या बाजूचे काहीतरी मोठे अधिकारी त्याला सोडून जात असलेले दिसत. या परिस्थितीत सुरजमलने, ताबडतोब, नव्या वजिराशी वाटाघाटी सुरू केल्या. सफ्दरजंग आपली सैन्ये अधिकाधिक मागे घेऊ लागला आणि असे चालू असतानाच त्याच्या अफाट तळाच्या पिछाडीची बाजू, मराठे लुटू लागले. "दरदिवशी सकाळी, दुपारी वा सायंकाळी सफ्दरजंग बाहेर पडे, थोडचाशा चकमकी करी आणि नंतर परत येई. अशा प्रकारे युद्ध लांबत चालले होते." [ त.-इ-अ.-५९ ब–६१ब. ]

यावेळेपावेतो (१९ जुलै) मागे जाता जाता सफ्दरजंगाने शहराच्या दक्षिणेस सुमारे १५ मैल, बदरपूर व फरिदाबाद यांच्यामधील भागापर्यंत माघार घेतली होती. तो, जो जो भाग सोडून देई तो तो भाग व्यापीत शाही सैन्य पुढे येई. अशा प्रकारे या सैन्याने आपल्या रांगा यमुना नदीपासून पश्चिमेकडे कालकादेवी टेकडीपर्यंत पुढे नेल्या. या शाही सैन्यातील रोहिला विभागाने तुघलकाबाद जवळची काही खेडीही लुटली आणि तेथून पैसा, मालमत्ता, गुरेढोरे, पुरुष व स्त्रिया अशी लूट नेली. पण पुढे गाऱ्हीं मैदान नावाच्या खेडचाच्या, मातीच्या तटावर हे रोहिले हल्ला चढवीत असताना पावसाची मोठी सर आली. या पावसातच जाट सैन्याने त्यांचा पराभव करून त्याना उधळून लावले, ( २५ जुलै ), आणि त्यांच्या सर्व तोफा व शस्त्रे हस्तगत केली. [ त.-इ-अ.-६४ अ, ६६ अ, ७०; सुजन चरि. जंग(६) ४. ] यावेळेपर्यंत यमुना ते तुघलकाबाद इतक्या लांबवर शाही सैन्याच्या रांगा पसरल्या होत्या. १९ ऑगस्टला दूरवर पसरलेल्या या रांगांमधील काही ठिकाणी निकराची लढाई झाली पण या लढाईत तोफखान्याचे वर्चस्व राहून सायंकाळ होईतो बंडखोरांचे हल्ले निष्फळ ठरले व ते परत गेले. पुढे, १ सप्टेंबरला सफ्दरजंगाने आणखी ९ मैल सिक्रीपर्यंत माघार घेतली. ( वल्लभगडच्या दक्षिणेला ३ मैल ). तेव्हा इमादनेही आपली सैन्ये फरिदाबादेपर्यंत आणि त्याही पलीकडे बंडखोर शत्रूपासून २ मैलांपर्यंत पुढे सरकविली. "फरिदाबादेमध्ये तो शिरला त्या दिवशी, त्यानेच म्हणजे या सैन्य प्रमुख मिरबक्षीने–लुटालूट करण्यावर बंदी घातली होती तरीही त्याचे न ऐकता, त्याच्या सैन्याने तेथील सर्व रहिवाशांना लुटले." अशाच प्रकारे दोन्हीही पक्ष एकामागून एक, खेडचात शिरत व पुढे निघून जात. यामुळे

---

[ मागील पानावरून ]

दोन हिंदु जमिनदार (१७०० सैनिक), अनुपनगरचा जमिनदार (१७००–सैनिक) आणि सय्यद कुत्ब पिरझादा (४००० सैनिक) –१८ जूनला ; अवोनलाच्या सादुल्लाकडून (५००० सैनिक) २७ जूनला (५९ब) ; मुइनने पाठविलेला जमिलुद्दिन खान (३५०० सैनिक), ११ जुलैला (९२ब.) ; अहमद बंगशचे सैनिक (दसना येथे पोहोचले–१५ जुलै, ६२ब) ; कुंजपुरा येथील मुसलमान जमिनदार (५००० सैन्य घेऊन) १९ जुलैला (६४ब) ; बिकानीरचे पथक (७५००) २१ जुलैला (६५ब) ......; असे येऊन हजर झाले. या सर्वांची एकूण संख्या सुमारे ५७००० झाली होती. यात, सफ्दरजंगाची बाजू सोडून बादशहाला येऊन मिळालेल्या आणखी २३००० 'सिनडाग' सैनिकांची भर पडली.

गरीब बिचारी, निरपराध नागरी जनता दोन्हीही पक्षांकडून, एका पाठोपाठ दुसऱ्याकडून अशी, दोन्हीही वेळा लुटली गेली. युद्ध हे असे असते.

मदतीस आलेली रोहिला, बलूच आणि गुजर पथके शाही सैन्याच्या रचनेत, आघाडीला ठेवलेली होती. त्यांचा पगार देण्यात आला नसल्याने, त्यांची यावेळी उपासमार चालली होती. तेव्हा यातील सैनिकांनी आपली ठाणी सोडली व ते बारापुलापर्यंत (दिल्लीच्या दक्षिण दरवाजाजवळ) मागे आले आणि तेथे काहीही न करता बसून राहिले. " परत येत असताना त्यानी रस्त्यावरील प्रवासी आणि बारापुलाचे रहिवासी याना लुटले." लुटलेले हे सर्व बादशहाचे एकनिष्ठ नागरिकच होते. बादशहाच्या मोठ्या तोफांच्या पथकातील लोकानीही आपले खंदकी मोर्चे सोडून दिले आणि तेही रागाने शहरात परत आले. अशा प्रकारे या सगळ्या सैनिकांनी आपली ठाणी सोडल्याची संधी पाहून, मोकळ्या सोडलेल्या या भागावर, सफदरजंगाने धिटाईने पुढे चाल केली. ६ सप्टेंबरला त्याने " अगणित सैन्य " बरोबर घेऊन खंदकावर हल्ला केला, पण यावेळी इमादने मदतीसाठी ताजी पथके पुढे सरकवली आणि त्याचा पराभव केला. तथापि दुसऱ्याच दिवशी सफदरच्या जाट मित्रांनी, दिल्लीच्या तटापासून ११ मैलांपर्यंतच्या प्रदेशातील रस्त्याने, शहर व शाही खंदक यांच्या दरम्यान जाणारे येणारे सर्व प्रवासी व धान्य व्यापारी याना लुटले. लगेच पुढच्या दिवशीही ( ८ सप्टेंबर ) फिरणारे हे जाट लुटीसाठी पुन्हा बाहेर पडले. अशा प्रकारामुळे, शाही सैन्याला काहीही धान्य पोहोचू शकले नाही आणि यामुळे त्यांच्या विजयी प्रवाहाला कलाटणी मिळत असलेली पाहून इमादला निराशा वाटू लागली. तेव्हा १२ सप्टेंबरला, खंदक भागातून, तो शाहीवाड्याकडे आला व त्याने बादशहा व त्याची माता याना भेटून सैनिकांचे पगार देण्यासाठी व त्याना मदत पाठविण्यासाठी पैसा देण्याची विनंती केली. पण त्यांच्याशी तीन तास निष्फळ चर्चा करून अखेरी तो आपल्या वाड्याकडे परत गेला. जाताना तो वैतागाने बोलत होता :—" आतापर्यंत मला जे शक्य होते ते मी केलेले आहे. यापुढे बादशहाने आपले काम दुसऱ्या कोणाकडेही सोपवावे." इमादच्या यावेळच्या रणांगणावरील गैरहजेरीत सफदरजंगाने एकाएकी हल्ला करून फरिदाबादेच्या उत्तरेकडील त्याने मोकळी सोडलेल्या, सराई ख्वाजा, बख्तवार, बदारपूर व अशाच काही अन्य शाही ठाण्याचा, इतर ठाण्याशी असलेला संबंध तोडला. [ त.-इ-अ.-७० ब-७२ ब. ].

या झटापटी चालू असतानाच दुसरीकडे सफदर आणि सुरजमल हे नव्या वजीराकडे तहासाठी हालचाली करीतच असून, असे, हे घटनांचे चमत्कारिक मिश्रण चालूच होते. युद्ध करावेच या मताचा ठामपणे सतत पुरस्कार करणाऱ्या इमादविरुद्ध, अशा हालचालीतून द्वेष निर्माण करावा व त्याची नाचक्की करता यावी हाच या चमत्कारिक हालचालीमागे हेतू होता. यातील दुटप्पीपणा व विश्वासघात अखेरी उघडा पडला तो, एका रात्रीच्या विश्वासघातकी हल्ल्याने. तहाच्या बोलण्यासाठी आलेले नव्या वजीराचे प्रतिनिधी परत जाताना त्याना पोहोचविण्यासाठी बरोबर एक जाट पथक गेले होते. परत येत असताना या जाट पथकाने, रात्रीच्या वेळी उत्तरेकडून म्हणजे दिल्लीच्या बाजूने, शाही ठाण्यांच्या खंदकी मोर्च्यावर एकाएकी हल्ला केला. हा हल्ला सफदरच्या अन्य सैन्यविभागांच्या संगनमतानेच केला होता कारण या हल्ल्याबरोबरच शाही सैन्याच्या याच विभागावर दुसऱ्याही बाजूने, म्हणजे दक्षिणेकडून, फरिदाबादेच्या बाजूने, सफदरच्या दुसऱ्या लोकानीही हल्ला केला. या हल्ल्यामुळे शाही बाजूचे इतके लोक मारले गेले की, बादशहाची सर्व राजधानीच

आता, असा कपटी हल्ला करणाऱ्या विश्वासघातक्याबरोबर तह करण्यास विरोधी बनली. यामुळे अर्थातच तहाच्या वाटाघाटी बंद करण्यात आल्या. ( २२ सप्टेंबर ).

## § १९ : २९ सप्टेंबरची घनघोर लढाई

अखेरी नजीबखानाला त्याच्या सैन्यासाठी द्यावयाच्या बाकीपैकी काही भाग देण्यात येऊन, फरिदाबादेजवळच्या आपल्या खंदकविभागाकडे परत जाण्यास त्याचे मन वळविण्यात आले. (२४ सप्टेंबर ). त्या ठिकाणच्या तोफासाठी दारूगोळाही किल्ल्यातून पाठविण्यात आला. अशा प्रकारे आणखी अधिक तयारी झाल्यावर, बंडखोरांशी पुन्हा लढा देण्यासाठी इमादही शहरातून बाहेर निघाला. २९ सप्टेंबरला सुरजमल आणि सफ्दरचे इतर सेनापती यानी, सबंध सेना आणि अनेक मोठ्या व निरनिराळ्या प्रकारच्या छोट्या तोफा इ. घेऊन मराठ्यांच्या खंदकांवर हल्ला चढविला. हे खंदक बादशाही सैन्याच्या उजव्या बगलेकडे असून तेथे मोठ्या तोफा नव्हत्या. यावेळी मोठी निकराची लढाई जुंपली व अनेक मराठे मारले गेले पण त्यांच्याकडे सतत मदत पाठवणे चालू ठेवल्यामुळे, उभयपक्षी समतोल लढाई टिकविण्यात त्याना यश आले. अखेरी रणांगणावर इमाद आणि नजीब येऊन पोहोचले व त्यानी मोठ्या धडाडीने सफ्दरवर प्रतिहल्ला चढविला. काहीही भीती न बाळगता, इमादने, मोठ्या धैर्याने आपला हत्ती शत्रूंच्या रांगांमध्ये घुसविला. त्याचे निशाण नेत असलेला हत्ती मारला गेला आणि तो स्वतः बसलेल्या हत्तीचे सुळे, गोळा लागून मोडले, तेव्हा त्याने घोड्यावर स्वार होऊन हल्ला चढविला आणि जाटांची दाणादाण केली. यावेळी उभयपक्षी खूप मोठ्या संख्येने लोक मारले गेले व इस्माइलखान स्वतः भाला फेकीने जखमी झाला. पळून जात असलेल्या शत्रूंचा चार मैलपर्यंत पाठलाग करून नंतर सूर्यास्ताला इमाद आपल्या तंबूत परत आला. बादशहाच्या विजयी सैन्याने, या विजयाच्या पाठोपाठ दुसऱ्याच दिवशी बंडखोरांना आणखी दूर दक्षिणेकडे पिटाळून लावले व स्वतःची आघाडी वल्लभगडच्या जवळपास इतकी पुढे नेली. [त.-इ-अ.-७५ ब-७६ अ. ].

## § २० : बादशहाच्या भित्रेपणामुळे निर्णायक यश हुकले

यापुढेही शाही पक्षाने सफ्दरजंगाचा प्रत्येक हल्ला परतवून लावला आणि हळूहळू पण सतत व निश्चितपणे ते त्याला राजधानीपासून दूर मागे रेटीत राहिले. तथापि त्याना निर्णायक विजय मिळविता आला नाही. आपल्या लष्करी वरचढपणाचा जास्तीत जास्त लाभ उठ-विण्यामध्ये त्याना आलेल्या अपयशाचे एकमेव कारण म्हणजे बादशहाचा भित्रेपणा हेच होते. आता सर्व सैन्यानिशी चढाई करण्यास बादशहाने हुकूम द्यावे आणि आपल्या सैनिकाना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतःही स्वार होऊन रणांगणावर बाहेर पडावे असा सल्ला इमाद, नजीब आणि इतर सेनापतीनी, बादशहाला वारंवार दिला. पण सैन्याच्या पिछाडीसारख्या सुरक्षित ठिकाणी राहूनही लढाईत सामील होण्यास बादशहाला धैर्य होत नव्हते. इदगा मैदानावरील आपल्या खंदकामधून, २९ जूनला इमाद, बादशहाकडे आला होता. त्यावेळी त्याने बादशहा व त्याच्या आईला सांगितले होते की,—" माझे वडील आणि आजोबा या दोघांनी साठवून ठेवलेला सर्व खजिना मी माझ्या सैनिकांचा पगार देण्यात आता खर्च केला आहे आणि ते, त्यांचा आणखी बाकी राहिलेला पगार देण्याबद्दल तगादा लावीत आहेत. तेव्हा बादशहाना जर लढाई द्यावयाची असेल तर त्यानी यापुढे आणखी उशीर करता कामा

नये. त्यानी जर तह करण्याचे ठरविले असेल तर, मला माझ्या सैनिकांना रजा देऊ दे." ११ जुलैला नजीबखान रोहिला व बहादुरखान बलूच यांनी अहमदशहाला सांगितले की; यावेळेपर्यंत त्याच्या निशाणाखाली मोठे सैन्य जमा झाले असून आताही युद्धाच्या हालचाली केवळ खंदकामधूनच चालविल्या तर युद्धाचा निर्णय खूपच लांबणीवर पडेल आणि सैन्याच्या पगारावर व अन्नपाण्यावर होणारा खर्च निष्कारण वाढेल. तेव्हा आता उघड्यावर येऊन लढाई देणे हेच सर्वोत्तम धोरण होय. यानंतर झालेल्या चर्चेतून, अशा प्रकारच्या चढाईसाठी, १६ जुलै हा दिवस ठरविण्यात आला. त्या दिवशी इमाद, शाही वाड्यावर आला आणि बादशहाने आता स्वार होऊन बाहेर पडावे नाहीपेक्षा त्याच्या लष्करी प्रतिष्ठेची लाजिरवाणी अवस्था होऊन त्याला नुकसानही सोसावे लागेल, अशी बादशहाला विनवणी, त्याने वारंवार केली पण अहमदाने काहीही उत्तर दिले नाही. पुन्हा २६ जुलैला इमाद, प्रत्यक्ष लढाई चालू असलेल्या आघाडीवरून बादशहाकडे आला आणि समोरा समोर हातघाईची लढाई देण्यास हुकूम द्यावा आणि स्वतः त्यात सामील व्हावे, असा जास्तीत जास्त आग्रह त्याने केला. पण वजीराचा सल्ला घेऊन बादशहाने त्याला नकार दिला. त्याच्या "आईनेही मवाळकीने, गोड बोलून, इमादला आपल्या घरी परत पाठविले !" [ त.-इ-अ.-६३ अ-६६ ब. ].

लष्करी निर्णय मिळविण्यात अशा प्रकारे झालेल्या विलंबामुळे बादशहाची आर्थिक परिस्थिती कोलमडून पडली. त्याच्या भोवती अफाट सैन्य ( कमीत कमी ८०,००० सैनिक) जमा केलेले होते. या सैन्याचा खर्च महिन्यामागून महिने चालूच होता. या अफाट खर्चामुळे त्याचे खजिने, त्याचे रत्नभांडार, सोन्याची ताटे-तबके, त्याच्या आईची साठविलेली मोठी संपत्ती, शाही कोठारातील आणि कारखान्यातील मालमत्ता आणि सफ्दरजंगाचे पक्षपाती म्हणून संशयित व त्याचे अनुयायी याना लुटून दररोज आणीत असलेली लूट, ही सर्व संपुष्टात आली. बहुतेक प्रत्येक दिवशी पगार द्यावयाचा बाकी राहिलेली, कोणती ना कोणती तरी पथके आपली खंदकातली ठाणी सोडून दिल्लीत येऊ लागली आणि रस्त्यात दंगल करू लागली. वजीर आणि मिरबक्षी यांच्यातील वाढत्या मत्सरामुळे, बादशहाच्या सल्लागार मंडळात दोन तट निर्माण झाले. बादशहाला, स्वतःवर उपासमारीने मृत्यू ओढवून घ्यावयाचा नसेल तर काहीही किंमत मोजून बंडखोरांशी तह घडवून आणणे आता निकडीचे झाले होते. पण या प्रश्नाबाबतही इन्तिझाम आणि इमाद यांच्या दरम्यान आपापले हितसंबंध आणि धोरण यांच्या संदर्भात झगडाच होता. मिरबक्षी इमादला आता सफ्दरजंगाचा पूर्ण नायनाट करण्याची इच्छा असून त्याचे सुभे स्वतःसाठी मिळवावयाचे होते. पण असे झाले तर स्वतःच्याच वर्चस्वाला सफ्दरजंगपेक्षा अधिक बलवान प्रतिस्पर्धी निर्माण होईल ही भीती वजीर इन्तिझाम याला होती. यासाठी व पुढे इमादबरोबर होणाऱ्या आपल्या झगड्यासाठी मित्र जोडता यावा म्हणून माजी वजीराला वाचवावे असेही इन्तिझामला यावेळी वाटत होतेच.

१२ सप्टेंबरला सुरजमलने वजिराबरोबर गुप्त वाटाघाटी सुरू करून तो जर तह घडवून आणू शकला तर त्याला १२ लाख रुपये देऊ केले. पण यावेळी पुढे केलेले हे आमिष अयशस्वी झाले. नंतर ऑक्टोबर मध्याच्या सुमारास या जाट राजाने आपले वकील थेट इमादकडे पाठविले आणि सुचविले की आज जो प्रदेश त्याच्या (म्हणजे जाटांच्या) ताब्यात आहे त्यावरील त्याचाच ताबा कायमचा रहावा हे मान्य करण्यात आले तर त्याच्या मोबदल्यात काही लाख रुपये खंडणी द्यावयास तो तयार आहे. पण या जाटाने अलीकडे बळकाविलेले भाग त्याला परत द्यावयाला लावावे व त्याच्याकडे त्याचा बाप बदनसिंग याकडे

असलेले भाग तेवढेच राहू द्यावे अशी इमादची इच्छा होती. तेव्हा याहि वाटाघाटी फिसकटल्या [त.–इ–अ.–७२ ब ७३ ब ७४ ब ७८ अ.].

## § २१ : माधोसिंहाचे आगमन–त्याने तह घडवून आणला

अशा प्रकारे नवा वजीर आणि मिरबक्षी यांच्यामध्ये सुरू झालेल्या या नव्या भांडणामुळे बादशाही राज्याचा नाश होण्याची भीती निर्माण होत असताना दरम्यानच्या काळात बादशहा मात्र पूर्ण निराधार बनला. तेव्हा बादशहाच्या सरंजामी-मांडलिकांमध्ये श्रेष्ठ असे मानले जाणारा. माधोसिंह या राजपूत राजाला, 'या आणि मला वाचवा' अशी त्याने विनवणी केली. यानुसार, मोठे सैन्य बरोबर घेऊन माधोसिंह निघाला. येताना वाटेत त्याने आपल्या सैन्याच्या खर्चासाठी रेवारीच्या जमीनदारांच्या कडून, ५० लाख रुपयांच्या 'हुंड्या' ( Bonds ) घेतल्या (पुढे बादशहाने या हुंड्या वा करारनामे ४ लाख इतक्या कमी केल्या) आणि १० ऑक्टोबरला, यमुनेच्या काठावरील 'नागला' येथे येऊन तो पोहोचला. हे नागला दिल्ली शहराच्या दक्षिणेला व रायसिनाच्या ( Raisina ) पूर्वेला आहे. पुढे १५ तारखेला एका रपेटीच्या वेळी त्याने बादशहाची मुलाखत घेतली. नंतर वजीराबरोबर, एकाच हत्तीवर बसवून त्याला दिवाण-इ-खास महालाकडे नेण्यात आले, आणि त्याची बादशहाच्या मातेबरोबर मुलाखत झाली. यावेळी त्याला 'माही' व 'मरातब' ही मानाची पदके वा चिन्हेही मिळाली, (भा. पहा प्र. ८ §३. सर्वश्रेष्ठ मानाची चिन्हे......याचबरोबर विशेष झेंडा, नगारे, गोंडे लावलेली पालखी इ. असत. हा मान जाविदखानालाही दिला होता.). २३, ऑक्टोबरला बादशहा आणि माधोसिंह यांनी गुप्तपणे दीर्घ विचारविनिमय केला. यावेळी बादशहाने त्याला विनवून आवाहन केले की, "तुमच्या पूर्वजांच्या एकनिष्ठ सेवेचा विचार केला तर तुमच्या-सारख्या जुन्या वंशपरंपरागत, सेवकाने अशा प्रकारच्या आणीबाणीच्या संकटकाळी साम्राज्याला वाचविणे हे कर्तव्यच आहे. .... नाहीतर या पृथ्वीवर, या साम्राज्याचे नाव व खूण म्हणून त्याच्या धुळीशिवाय काहीही शिल्लक रहाणार नाही."......नंतर त्याने सफ्दर, इन्तिझाम आणि इमाद या तिघांच्याही कृतघ्नपणाबद्दल त्याच्यापुढे तक्रार केली की, या तिघानाही, बादशहा महमदशहाने मुलाप्रमाणे वाढविले पण तेच तिघे आज त्याच्याविरुद्ध कारवाया करीत आहेत, माधोसिंह अनुभवी राज्यकर्ता असल्याने यावेळी त्याने बादशहाचे सांत्वन मात्र केले. [त.–इ–अ.–८०; पे. द. नि. प. (२७) ८३ ].

पण इतक्या सहजासहजी तह घडवून शांतता निर्माण करणे शक्य झाले नाही. इमादला न कळता सफ्दरजंगाशी तह करण्याची बादशहाची गुप्त योजना, विश्वासघातामुळे बाहेर फुटली. वजिरामार्फत तह करावा अशा अर्थाची पत्रे पूर्वी बादशहाने सफ्दरला लिहिली होती. २३ ऑक्टोबरला सफ्दरने या पत्रांच्या नकला अकिबत महमदाला ( Aquibat Mahmad ) दिल्या. अकिबतने त्या इमादला दाखविल्या आणि इमादने त्या बादशहाकडे पाठविल्या. तेव्हा बादशहाने घाबरून, थरथरत, इमादला लिहिले की, सफ्दरजंगाने खोट्या सह्या करून ही पत्रे लिहिली आहेत ! पण बादशहा तह करण्याबाबत इतका ठाम असल्याचे पाहून इमादनेही स्वतःच तहासाठी वाटाघाटी सुरू केल्या. आता वजीराला इमादच्या या हालचालीत बिघाड निर्माण करावयाचा असल्याने त्याने दुसराच एक डाव टाकला. बादशहाने खिजिराबाद बागेला भेट देण्यास जावे आणि ती संधी साधून, बादशहाकडून क्षमा मिळविण्यासाठी, सुरजमलला, माधोसिंहाने तेथे बोलावून घ्यावे, अशी वजिराने योजना केली.

यानुसार २५ ऑक्टोबरला हालचाली झाल्याही; मात्र सुरजमल ऐवजी, त्याच्यामार्फत तेथे त्याचा प्रतिनिधी आला व त्याने आपल्या धन्यासाठी क्षमा मागितली आणि ती देण्यातही आली. इमादमार्फत तह झाला नाही म्हणून वजिराला आनंद वाटला. नंतर वल्लभगडाच्या दक्षिणेस असलेल्या आपल्या छावणीमधून, थोडेसे लोक बरोबर घेऊन सुरजमल, माधोसिंहाकडे आला व त्याने त्याची भेट घेतली. या पूर्वीच ठरविल्याप्रमाणे वजीरही तेथे येऊन वाट पहात थांबला होताच, त्याचीही त्याने भेट घेतली. नंतर सायंकाळी वजीर आपल्या वाड्याकडे परत गेला. सुरजमल मात्र त्या रात्री व पुढे आणखी पाच दिवस माधोसिंहाच्या छावणीतच राहिला (भा. अर्थातच तहाच्या वाटाघाटीसाठी). [त.-इ.-अ.-८१ब-८३अ.].

अशाच गुप्तरीतीने व नेहमीची पद्धत बाजूला ठेवून सफ्दरजंगाशीही तडजोड करण्यात आली. ५ नोव्हेंबरला फत्तेसिंह नावाच्या, माधोसिंहाच्या एका अधिकाऱ्याने, बादशहाकडील एक फर्मान, मानाचा पोषाख, तुरा ( Aigrette ), शिरपेच–फेट्यावर बांधण्याचा दागिना ( Crest Ornament )–, मोत्याचा हार आणि एक घोडा, असे सफ्दरजंगाकडे नेऊन पोहोचविले (भा. नवा वजीर व माधोसिंह यांच्यामार्फत केलेल्या तडजोडीचेच हे प्रतिक असावे.). या हालचालीविरुद्ध इमादने तक्रार केली, तेव्हा अहमदशहाने उत्तर दिले:—"मला यातील काहीच माहीत नाही. या वस्तू सफ्दरकडे मी कधीच पाठविल्या नाहीत."—वजिरानेही याबाबत स्पष्ट बोलून अज्ञानाची बतावणी केली आणि काही दरबारी म्हणाले की या सर्व वस्तू म्हणजे अलीकडेच बादशहाने माधोसिंहाला भेट म्हणून पाठविलेली 'खिलात' असून, त्या राजाने पुढे ती सफ्दरजंगाकडे पाठविली ! या घटनेबाबत काहीही सत्य असो, पण सफ्दरजंगाबरोबर चाललेले युद्ध आता औपचारिकपणे संपले हे मात्र खरे. तह व शांतता घडवून आणण्याचे माधोसिंहाचे काम अशा प्रकारे आता संपले असल्याने, औपचारिक निरोप न घेताच आपल्या राज्याकडे परत जाण्यास त्याला परवानगी देण्यात आली. या त्याच्या कामगिरीबद्दल त्याला बक्षीस मिळाले ते, बादशहाचा रतनभोर हा किल्ला. हाच किल्ला मिळावा म्हणून त्याचा पिता व बंधू हे दोघेही महमदशहाची विनवणी करीत पण ती व्यर्थ ठरत असे. [त.-इ.-अ.-८३अ-८४ब]. असा हा किल्ला आता त्याला मिळाला. नंतर ७ नोव्हेंबरला सफ्दरजंगाने सिक्रीजवळचा आपला तळ उठविला (वल्लभगडच्या दक्षिणेस ३ मैलांवर) आणि तो औधकडे जाण्यास निघाला. आता तडजोड झाली होती तरीही त्याने पूर्वी ५ मे ला बादशहा म्हणून सिंहासनावर बसविलेला बनावट शहाजादा औधला जाताना आपल्याबरोबर ठेवलाच होता आणि तेही भोवताली लाल पडदे उभे करूनच ! [भा. गडद लाल पडदे-किनातींचा तंबू हे बादशहाच्या खास तंबूचे, थाटाचे प्रतीक होते.] तथापि हा प्रवास चालू असताना त्याने मधूनच या बनावट बादशहाला अमरसिंहाच्या देखरेखीखाली आग्र्याला पाठवून दिले आणि नंतर मथुरेजवळ यमुना ओलांडून तो औधच्या रस्त्याला लागला. [त.-इ.-अ.-८४ब-८९ब.].

या पूर्वीची अनेक वर्षे दिल्लीच्या शासनात सुधारणा करून त्याची घडी पुन्हा बसविण्याची खटपट, दरबारातील अतिशय कर्तबगार, अनुभवी व वरिष्ठ दर्जाचे काही उमराव करीत. पण शासन सुधारून पुन्हा घडी बसविण्याचे हे काम अखेरी निराशेने सोडून त्यातील प्रत्येक, कोणत्या तरी दूरच्या सुभ्यात जाऊन राहिला. अशा प्रकारे निराशेने दिल्ली सोडून जाताना त्याना आशा वाटे की, दूरच्या व लहानशा क्षेत्रात का असेना, पण तेथे तरी त्याना काही खरोखरी मोठे व चांगले घडविता येईल. अशा बाहेर जाणारांच्या खटपटींचा

हा कालखंड होता. सफ्दरजंग दिल्लीचे क्षेत्र कायमचे सोडून औधकडे गेला तेव्हा हा कालखंड संपला. य हालचालीतील प्रमुख व्यक्ती म्हणजे बंगाल, औध, दख्खन येथील सुभेदार असून ते व्यवहारतः स्वतंत्रच बनले होते, व दिल्लीच्या घडामोडीबाबत त्यांच्यामध्ये तिरस्कार-मिश्रित तिऱ्हाइतपणा निर्माण झाला होता. यांच्या जोडीला भर पडली ती, मराठ्यांनी गुजराथ व माळवा बळकाविला व अफगाणांनी पंजाब घेतला याची. या सर्वातून हिंदुस्थानच्या साम्राज्याचा खूपच संकोच होऊन ते फक्त, दिल्लीच्या आसमंतातील लहान लहान भाग आणि आधुनिक उत्तर प्रदेशाच्या (भा. लेखकाच्या म्हणजे ब्रिटिश काळातील संयुक्त प्रांत) काही थोड्या जिल्ह्यांचे क्षेत्र, एवढ्याच भागात शिल्लक राहिले. या छोट्या साम्राज्यात आता छोटे लोकच आपापल्या छोट्या छोट्या स्वार्थी उद्दिष्टासाठी एकमेकाविरुद्ध लढत आणि एकमेकाविरुद्ध कट-कारवाया करीत राहिले.

प्रकरण बारावे

# अहमदशहाचा शेवट

## § १ : सफ्दरजंग निघून गेल्यानंतरच्या शाही शासनाच्या अडचणी

सफ्दरजंगाच्या बंडाचा शेवट झाल्यावर बादशहा अहमदशहाने फक्त सहा महिनेच राज्य केले. हा काळही राजधानीच्या आत आणि बाहेर दोन्हीही ठिकाणी, सतत चालू राहिलेला गोंधळ व अव्यवस्था आणि बादशहाला भोगाव्या लागणाऱ्या वाढत्या हालअपेष्टा व अपमान यांचाच होता. बादशहाबरोबर झालेल्या झगडयात पराभूत होऊन माजी वजीर माघारी परतला पण यामुळे दिल्ली शासनात पुन्हा काही शांतता व सुबत्ता येऊ शकली नाही. केवळ माजी वजिराचा असा मोड होणे एवढे एकच कारण, शांतता व सुबत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा चमत्कार घडविण्यास उपयोगी पडणे शक्य नव्हते. झालेल्या झगडयातील अतिशय धामधुमीच्या काळात, बादशहाची धनदौलत संपुष्टात आली होती. वसुलाचे मूळ, झरे आटले होते आणि त्याची सर्वच कारभार यंत्रणा कर्जाच्या ओझ्याखाली दडपली गेली होती. हा झगडा चालू असताना, त्याला आणि त्याच्या सल्लागारांना आपले सर्व लक्ष, साधनसामुग्री व शक्ती, त्यांच्यासमोर खडा उभा असलेल्या शत्रूचा मोड करण्याबरच सर्वकाळ केंद्रित करावी लागून इतर सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष करावे लागले होते. अखेरी जेव्हा हा धोका नाहीसा झाला तेव्हा त्यांना आढळून आले की, मागे शिल्लक राहिलेल्या गोंधळा-मधून, संपूर्णतया नवे साम्राज्य उभे करण्याइतकेच कठीण काम आता त्यांच्यापुढे उभे राहिलेले आहे. पण असे नवे साम्राज्य उभे करण्यासाठी अवश्य ती कर्तबगारी व गुणवत्ता, अहमदशहा, त्याचा वजीर वा त्याचा मिरबक्षी सैन्य प्रमुख इमाद यापैकी कोणाजवळही नव्हती. साम्राज्याचा खजिना तर पूर्णपणे रिताच झालेला होता ; शिवाय या दिवाळखोरीत भर पडली ती, साम्राज्यातील दोन सर्वोच्च मंत्री, म्हणजे नवा वजीर व मिरबक्षी यांच्यामधील जीवघेण्या मत्सराची, या दोघांचा समान शत्रू म्हणजे सफ्दर याला एकदा बाजूला सारल्यावर, या दोघामधील हा जीवघेणा मत्सर व शत्रुत्व, ही सर्व प्रकारच्या लज्जास्पद अविष्कारासह उघडी पडली. सफ्दरजंग आणि बादशहा यांच्यामधील संघर्ष उघड होण्याच्या आधीच एक महिना, दिल्ली येथील मराठ्यांच्या चाणाक्ष प्रतिनिधीने तुराणी पक्षियामधील अंतर्गत हेवेदावे हेरले होते. तुराणी पक्षामध्ये अंतर्गत दुफळया-दुरावे असून यातून त्यांच्यामध्ये चार अंतर्गत गट झाले आहेत. यापैकी कोणताही गट दुसऱ्या कोणत्याही गटाची आज्ञा मानणार नाही वा कोणत्याही गटाबरोबर संगनमताने काही करणार नाही असे त्याला दिसून आले होते. सफ्दरजंगाशी झालेल्या लढाईच्या काळातच, इमादने नव्या वजिराला उपरोधिक बोलून, उघडपणेच दोष दिला होता. इमाद म्हणे की नवा वजीर भित्रा आहे. दिल्लीच्या तटांच्या संरक्षणाखाली, बादशहाबरोबर सुरक्षित रहाण्याचेच तो पसंत करीत असून, प्रत्यक्ष लढाईचा सर्व भार, इमाद व त्याचा वैयक्तिक सैन्य विभाग यांच्यावरच तो टाकीत आहे. घाबरट व दुर्बल बादशहा या दोन बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांच्यामध्ये सापडला होता. तेव्हा इमादबरोबर

खोटे बोलून (भा. पहा प्र. ११§२१ सफ्दरशी समेट घडवून आणण्यासाठी माधोसिंहाच्या मध्यस्थीच्या हालचाली......यात माधोसिंहाकडे 'खिलात' पाठविल्याबाबत केलेल्या बतावण्या इ.) व याचबरोबर इन्तिझामचा सल्ला गुप्तपणे मानून, तो स्वतःची बाजू सांभाळण्याचा प्रयत्न करीत होता. पराभव पत्करून सफ्दरजंग बाजूला गेल्यावर मात्र नवा वजीर आणि मीरबक्षी यांच्यामध्ये उघडपणे लढा होणे अटळ होते. या लढ्यात जेव्हा अहमदशहाने वजीर इन्तिझामची बाजू घेण्याचे ठरविले तेव्हा, आपल्या वजिराच्या नशिबी येणाऱ्या भवितव्यामध्ये तोही गुरफटून जाणे अटळच होते. [नि. प. पे. द. (२१) ५५].

सफ्दरबरोबरच्या यादवी युद्धामुळे, झालेल्या कर्जाचा बोजा इतका मोठा होता की साम्राज्याला त्यातून मुक्त करणे कोणाही व्यक्तीच्या शक्ती पलीकडचे होते. या झगड्यासाठी उभी केलेली नवी, तात्पुरती, पगारी शाही सैन्ये व मित्रांची सैन्ये असा एकूण ८०००० लढाऊ लोकांचा सेनासंभार निर्माण झाला होता. खर्चाच्या[1] अगदी किमान अंदाजानुसार यापोटी मासिक २४ लाख रुपये लागणार होते. अशी ही सैन्ये सात महिने बाळगिली होती. म्हणजे त्यांच्यावरील खर्चाचा एकूण किमान बोजा १ कोटी ६८ लाख रुपयांचा झाला. याशिवाय बादशहाची पूर्वीची सैन्ये होतीच. यादवी युद्ध सुरू झाले त्यावेळी या जुन्या सैन्याचाही दोन वर्षपेक्षा जास्त काळाचा पगार देणे, शिल्लक राहिलेले होतेच. हा सर्व भार खजिन्यावर पडला तो खजिना रिता झालेला होता अशावेळीच. यावेळी आपली सोन्याचांदीची ताटे, तबके व रत्नजडित दागदागिने विकून बादशहाला कसेबसे २ लाख रुपयेच उभे करता येणे शक्य होते. कोणत्याही सुभ्यामधून यावयाच्या वसुलावर 'हुंडी' घेऊन ( Order on the revenue ), आगाऊ पैसे देण्यास पेढीवालेही नकार देत होते. बंगालमधील प्रमुख पेढीच्या मालकाच्या ( Banker ) दिल्लीमधील गुमास्त्याकडील (त.-इ.-अ.-मध्ये याचा नगरशेट असा निर्देश असला तरी तो जगतशेट या नावानेच अधिक ओळखला जातो.) पैसाही, या युद्धाच्या आधीच्या दुष्काळी वर्षातच वापरला, गेल्यामुळे त्याच्याकडेही आता काही शिल्लक नव्हती. अशा परिस्थितीत पगार न मिळालेल्या व भुकेने पिडलेल्या सैनिकानी सतत आरडाओरड व गडबड चालविली व यातून शासनामध्ये सतत अडथळे येऊ लागले, त्रास होऊ लागला. अहमदशहाच्या कारकीर्दीच्या अखेरच्या सहा महिन्यांच्या काळात अशी ही खूपच अस्वस्थता व गोंधळ माजला असून हा, जाविदखानाच्या कारकीर्दीतील गोंधळापेक्षाही अधिकच होता. राजवाड्यातील अधिकारी व कनिष्ठ सेवकवर्ग यांचा पगारही आता ३२ महिने न देताच बाकी राहिला होता. (१७५३). बादशहाच्या शासनाविरुद्ध चाललेली ही निदर्शने करण्यास सैनिकाना उद्युक्त करण्याचे काम, इमाद आणि त्याचा उजवा हातच असलेला अकिबत महमद हेच करीत आहेत व यामागे शाही शासनाची असहाय्यता वाढविण्याचा त्यांचा हेतू आहे असा आरोप शाही दरबार करीत होता. शासनाकडे होत असलेल्या सगळ्या मागण्याना बादशहाने यावेळी उत्तर दिले की, आता त्याने आपला सर्व खजिना आणि सर्व मुलुख इमादच्या ताब्यात दिला असून कोणाला

---

१ दिल्ली येथील मराठ्यांच्या वकिलाने कळविले होते की, दिल्लीमध्ये एका घोडेस्वारासाठी रोज एक रुपया खर्च येतो. [नि. प. पे. द. (२१) ५५ ; ऐति. पत्रे (२) ८९]. गाझिउद्दिनाने आपल्या सैन्याचा पगार, प्रत्येकी मासिक रु. ३० इतका कमी केला होता (भा. पहा प्र. ८§८). दिवाळखोर बनलेल्या शासनाला मेहेरबानी व तात्पुरती सवलत म्हणून, रोहिला घोडेस्वाराचा रोजचा पगार १२ आणे व पायदळ सैनिकाचा रोजी ४ आणे असा (सप्टेंबर १७५३) ठरविण्यात आला. (त.-इ.-अ.-६७अ.). तथापि या काळात घोडदळातील प्रत्येक स्वाराचा मासिक पगार सामान्यतः रु. ५० असे.

काही देण्याला त्याच्या स्वत:जवळ काहीही नाही. २८ डिसेंबर १७५३ ला त्याने इमादला सांगितले......"मी तुझ्याकडे दिलेल्या १५ लाखांमधून तोफखान्याकडील गोलदाजांचे ( Musketears ) देणे द्या. बाकीच्या सैन्य विभागांचा, विशेषत: सिनडाग रिसाल्याचा पगार, मी तुम्हाला दिलेले वल्लभगड व अलाहाबादेचा सुभा यांच्यामधील वसुलातून भागवा. या व्यवस्थेचे पूर्ण अधिकार आता मी तुमच्याकडे सोपवीत आहे. पण हे वापरताना तुम्ही छळ-दडपशाही मात्र करता कामा नये." [त.-इ.-अ.-१०३ब].

शाही शासनाकडे सर्वात जास्त तातडीची मागणी म्हणजे, सहाय्यासाठी आणविलेली रोहिले व मराठे यांची भाडोत्री सैन्ये ( Auxiliaries )[1] आणि लालूच दाखवून मिळविलेली सफ्दरजंगाकडील बदक्षि सैनिकांची पलटण, यांची होती. या सर्व देण्यांबाबत जबाबदारी इमादकडे होती. यासाठी दिल्लीच्या दक्षिणेकडील भाग पुन्हा जिंकून घेण्याच्या कामाला इमाद आता बाहेर पडला. या भागातील खेडी आधीच बळकावून त्यावर जाटांनी आपले वर्चस्व बसविले होते. ती परत घेण्याचे हे काम होते. हे काम झाल्यावर. जाटांच्या भरतपूरच्या मोठ्या राज्यावर हल्ला करावयाचा व त्यांच्यावर मोठी खंडणी लादावयाची अशी त्याची योजना होती. या सर्व कामासाठी लवकरच एक सविस्तर योजनाही ठरविण्यात आली यानुसार—"नजिबखान रुहिला आणि बहादुरखान बलुच यांचे एकूण देणे १५ लाख रुपये होते, ते, गंगा-यमुना दोआब व गंगेच्या पूर्वेकडील काही खेडी, यांच्यामधून गोळा होणाऱ्या वसुलामधून (भा. महसूल-खंडणी इ. Revenue ) भागवावयाचे असे ठरले. हा भाग पूर्वी रुहिल्यांच्याच हातात होता. रुहिल्यांच्या देण्याबाबत ही व्यवस्था ठरल्यानंतर त्यांनी आपल्या मायभूमिकडे परत जाण्यासाठी दिल्ली सोडली, (२६ नोव्हेंबर). पण यमुना नदी ओलांडल्यावर पुढे आपल्या प्रांताकडे न जाता त्यांनी लगेच पत्पारगंजला (Patparganj) वेढा घातला तेथील मुख्य अधिकाऱ्याला पकडून आणून त्या बाजारपेठेकडे लाखो रुपयांची मागणी केली आणि यासाठी त्याला मारही दिला. असाच प्रकार त्यांनी शाहदरा (Shahdara) येथेही केला. नदीकाठावरील जकातनाकी जबरदस्तीने व्यापून जाणाऱ्या येणाऱ्याना लुबाडले. अशाप्रकारे ३५००० रुपये जमा केल्यानंतरच त्यांनी पत्पारगंज सोडले." पुढे मार्चमध्ये (भा. १७५४) नजिबखानाने, सरहिंद येथील बादशहाच्या प्रमुख महसूल अधिकाऱ्याकडून ( Official Collector ) त्याचा प्रांत काढून घेतला. नंतर एप्रिलमध्ये सहराणपूर आणि त्या भागातील वजिराची जहागिर हीही व्यापली पण पुढे मे १७५४ मध्ये हे सर्व त्या अधिकाऱ्याकडे परतही दिले. [त.-इ.-अ.-८७अ-८८ब, १२१अ, १२५अ.].

## § २ : दिल्लीच्या दक्षिणेकडील प्रांत इमादने जिंकून घेतला, बाळू जाटाचा खून

दिल्लीच्या दक्षिणेकडील फरिदाबाद जिल्हा औपचारिकदृष्टीने बक्षीच्या जहागिरी पैकीच होता (भा. पण यावेळी तो जाट वर्चस्वाखाली गेलेला होता.) बक्षीचा मुख्य (Agent) प्रतिनिधी—अकिबत महमदखान याने आता हा भाग परत जिंकून घेण्यासाठी मोहिमेस सुरुवात केली. या ठिकाणी बंडखोरी करून, शासकीय कारभार व सुव्यवस्था मोडणारी प्रमुख व्यक्ती म्हणजे बाळू जाट ही होती. ५०० बदक्षि व २००० मराठा स्वार घेऊन अकिबत आला आणि त्याने.. या प्रांताचा वसूल व बादशहाला द्यावयाची खंडणी

१ १३ सप्टेंबर १७५३ इतक्या आधी, बादशहाला रोहिला सैनिकांचे २५ लाख रुपये देणे झाले होते. त्यांपैकी फक्त ४ लाखच त्याला १६ तारखेला देता आले (त.-इ.-अ.-६७अ.)

(Tribate नजर) यांची बाळू जाटाकडे मागणी केली. पण या बाबी द्यावयाच्या आपल्या पूर्वीच्या वचनापासून बाळू माघारी फिरला व त्याने लढा देण्याची तयारी दाखविली. तेव्हा वल्लभगड ( Ballabhgarh ) येथील तोफांची बरोबरी करण्यासाठी इमादने आणखी ७००० सैन्य व तोफगोळे वा अग्निबाण यासहीत ३० हलक्या प्रकारच्या तोफा अकिबतकडे पाठविल्या. थोडाफार लढा दिल्यावर बाळू शरण आला व त्याने अकिबतची भेट घेतली आणि आपण देणे असलेला वसूल व बादशहाला द्यावयाची खंडणी, ही देण्याचे मान्य केले. नंतर वल्लभगडच्या दक्षिणेस १४ मैलांवर असलेल्या पलवल ( Palwal ) पर्यंत, खंड वसूल करण्यासाठी अकिबत पुढे गेला पण, बाळूही पुन्हा हाच खंड देण्याची सक्त मागणी करेल या भीतीने येथील शेतकरी अकिबतला खंड देण्यास भीत आहेत असे त्याला आढळून आले. या ठिकाणाच्या ज्या वसुल अधिकाऱ्याला ( Revenue Collector ) बाळूने पूर्वीच हाकलून दिले होते त्याने आता अकिबतला सांगितले की वल्लभगड जिंकून बाळूला ठार केल्याशिवाय, या प्रांतावर नियंत्रण बसविण्यात त्याला अपयशच येईल. याचवेळी अकिबतने फतेपुरला आपला एक ठाणेदार पाठविला पण तेथील रयतेने त्याला, बाळूच्या सांगण्यावरून हाकलून दिले. तेव्हा वल्लभगड जवळच्या एका मैदानापर्यंत मागे अकिबतने कूच केले आणि बाळूकडून यावयाच्या एकूण वसुलाच्या रकमेची व्यवस्था त्याने येऊन करावी असे तेथून त्याला कळविले. तेव्हा बरोबर आपला दिवाण, एक मुलगा आणि २५० लोकांचे संरक्षक पथक घेऊन बाळू तेथे आला. अकिबतने त्याला यावेळी सांगितले की, इमादने बादशहाकडून बाळूला क्षमा मिळवून दिली असल्यामुळे, बादशहाला त्याने द्यावयाची खंडणी देण्याबद्दल, बादशहा आता इमादाना तगादा लावीत आहे. यासाठी आता हा पैसा तुम्ही द्या. अकिबतने अशी मागणी केली तेव्हा बाळूने बेदरकारपणेच उत्तर दिले. तो म्हणाला. . . . . . "मी काही यावेळीच माझ्याबरोबर खिशातून पैसे आणलेले नाहीत. वसूल जमा केल्यानंतरच, तो देण्याचे मी वचन दिलेले आहे. या परिस्थितीत हा प्रदेश जर तुम्हाला माझ्याकडून जबरदस्तीनेच घ्यावयाचा असेल तर मात्र त्यासाठी लढावेच लागेल." यानंतर दोघामध्ये चिडाचिडी होऊन बोलाचाली झाली आणि रागाच्या भरात बाळूने आपल्या तरवारीच्या मुठीला हात घातला. पण अकिबतच्या " पालकी भोवती (भा. टीप दोघांची बोलणी चालली होती ती अकिबतकडे. बहुधा ही तंबूतच असणार. तेव्हा येथे 'पालकी' म्हणजे आपण सामान्यतः मानतो ती, प्रतिष्ठिताना बसवून नेण्याची 'पालखी' नव्हे, तर 'पालखी' सारखी सुशोभित केलेली, भोवताली कठडे असलेली इकडे तिकडे नेता येण्यासारखी बैठक असावी). कडेकरून उभे असलेल्या बदक्षीनी बाळूवर झडप घातली आणि तो, त्याचा मुलगा, दिवाण आणि इतर नऊ जण, याना ठार केले.[१] (२९ नोव्हेंबर १७५३). या घटनेनंतर वल्लभगडमधील शिबंदीने तोफाचा मारा सुरू केला व तो मध्यरात्रीपर्यंत चालू ठेवला आणि नंतर किल्ला मोकळा करून, शिबंदीचे सैनिक निघून गेले. तेव्हा अकिबतने आतील सर्व तोफखाना व शस्त्रास्त्रे यांच्यासहित किल्ल्याचा ताबा घेऊन तेथील बाकीची मालमत्ता आपल्या सैनिकाना लुटण्यासाठी सोडून दिली. यानंतर बादशहाने हा प्रांत इमादला पुन्हा दिला.

१ त.-इ.-अ.- ; बदक्षी पथकातील जमादार ख्वाजा अफ्तबखान याने बाळूचे शीर धडापासून वेगळे केले होते. यासाठी त्याला, मारलेल्या जाट नायकाच्या कानातून लोंबणारी मोत्याची दोन कुंडले–(Pendant) काढून ती बक्षीस देण्यात आली. हे शीर सगळयाना दिसण्यासाठी फरिदाबादेजवळच, रस्त्याच्या बाजूला खांबावर लटकावून ठेवण्यात आले (९२ब, ९८ब.). यावेळी इमादला निजाम-उल्-मूल्क असफ्जाह ही नवीन पदवी नुकतीच मिळाली होती. तेव्हा या निमित्ताने वल्लभगडला आता निजामगड असे नवे नाव देण्यात आले (१०६ब).

या यशाच्या पाठोपाठ अकिबतने आपला चढाईचा पवित्रा कायमच ठेवला. पुढच्याच आठवड्यात मितनौल ( Mitnaul ) व हाथिन ( Hathin ) ही ( पलवलच्या दक्षिणेस व नैर्ऋत्येस १२ मैलांवर) सभोवती तट असलेली खेडी लुटली. यावेळेही या खेड्यातील बंडखोर शेतकऱ्यानी आधी दिवसभर लढा दिला व नंतर रात्री ती खेडी मोकळी सोडून ते गेले. पुढे पलवलच्या आसमंतातील जाटांच्या मालकीच्या, मातीच्या तट असलेल्या छोट्या छोट्या किल्ल्यावर त्याने हल्ले चढविले आणि ते आपल्या शासनाखाली आणले यानंतर एकदा दिल्लीला जाऊन, पुन्हा तो फरिदाबाद जिल्ह्याकडे येण्यास निघाला. (२७ डिसेंबर). यावेळी निघताना त्याने खंडोजी होळकर आणि त्याचे सैन्य, या मोहिमेमध्ये मदतीसाठी बरोबर घेतले. त्याने गाऱ्ही हाथिन ( Garhi Hathin ) आणि अशाच काही अन्य, नव्याने जिंकलेल्या ठिकाणी आपली ठाणीही बसविली. तथापि यावेळी त्याच्या सैनिकानी त्याच्या प्रतिनिधींचे–अधिकाऱ्यांचे–हुकूम मानण्यास नकार दिल्यामुळे, फरिदाबाद जिल्ह्यावर नियंत्रण ठेवणे त्याला काही जमले नाही. जाटानी या सधीचा फायदा घेतला. अकिबतने गाऱ्ही हाथिन व नव्यानेच जिंकून घेतलेल्या ठिकाणी आपली ठाणी बसविली होती, ती, आता यासंधीचा फायदा घेऊन जाटांनी हाकून दिली. तेव्हा त्याने आपला धनी इमाद याला, स्वत: येण्याची विनवणी केली व यानुसार इमादने दिल्ली येथून कूच केले.

खंडोजीने आपला तळ होडाळजवळ (पलवलच्या दक्षिणेस १७ मैलावर) ठेवला. तेथून त्याने आपली पथके पाठवून आसमंतातील बरसान आणि नंदगाव (१२ब १७ मैल दक्षिणेस) इतक्या दूरपर्यंतच्या खेड्यातून, सुरजमलाच्या मुलाचा असलेला ताबा नाहीसा केला, ती लुटली आणि तेथे मराठ्यांची ठाणी बसविली, (डिसेंबर १७५३ अखेर). यामुळे अकिबतची स्थिती मजबूत होऊन त्याने बाळूच्या एका भावाच्या मालकीचे, घनगौला ( Ghangaula ) हे जाट खेडे लुटले व तेथे स्वत:चे ठाणे स्थापले. (५ जानेवारी १७५४). ८ जानेवारीला इमाद स्वत: वल्लभगडपासून पलवलपर्यंत पुढे आला आणि त्याने होडाळ येथे खंडोजीशी संपर्क साधला पूर्वी २३ एप्रिल १७५३ ला बहादूरसिंह बरगुजर याच्याकडून घासेराचा किल्ला (पलवलच्या थेट पश्चिमेस १५ मैल) सुरजमलने हिसकावून घेतला होता. त्यावेळी अखेरच्या लढाईपूर्वी त्या नायकाने आपल्या स्त्रियाना ठार केले व नंतर तो स्वत: पुढे होऊन जिवावर उदार झालेल्या आपल्या २५ अनुयायांच्या पथकाच्या आघाडीला आला. नंतर त्या सर्वांनी शत्रूवर निकराने तुटून पडून मरण पत्करले. (भा. राजपूत जोहार व केशरिया रूढीचाच हा प्रकार.) त्या वेळेपासून या किल्ल्यावर, सुरजमलची शिबंदी होती. आता इमाद–खंडोजीची जोड मोहीम सुरू झाल्यावर, घाबरून जाऊन, घासेरा किल्ल्यातील या जाट शिबंदीने आपला किल्ला सोडून दिला. इमादने बहादुरचाच (बरगुजरचा) मुलगा, यालाच त्याच्या मृत बापाच्या किल्ल्याचा 'धनी' म्हणून नेमणूक दिली. अशा प्रकारे आता या किल्ल्यावर जाटांच्या एका कट्टर शत्रूचीच स्थापना करण्यात येऊन, आसमंतातील जाटांच्या वसतिस्थानावर–झोपड्यांवर–हल्ले करण्यास त्याला हुकूम देण्यात आले. या सर्व उलाढालींचा थोडक्यात अर्थ असा की, आता यमुनेच्या दोन्ही तीरावरील बहुतेक सर्व जाटांची घरे इमादच्या हातात सापडली. जाटानी पूर्वी या भागावर जबरदस्तीनेच ताबा बसविला होता. दक्षिणेस मथुरा व आग्रा येथपर्यंतच्या या भागातून, तो जबरदस्तीने ताब्यात घेणारे जाट शत्रू आता पळून गेले आणि या सर्व भागावर इमादची सत्ता स्थापन झाली. इमादच्या दुसऱ्या एका अधिकाऱ्याने, पूर्वी कोइल (Koil) आणि जलेसर जबरदस्तीने घेणाऱ्या आणखी एका जाट सैन्याला तेथून हाकलून दिले. या सर्व भागात आतापर्यंत बराच

काळ, अशांततेचा व गोंधळाचा गेला होता. तेथे आता मुलकी कारभाराची पुन्हा घडी बसविण्यासाठी आणि पुन्हा शेतीची कामे सुरू करण्यास शेतकऱ्यांची मने वळविण्यासाठी, इमादने आपले लोक या प्रांतात ठिकठिकाणी पाठविले. (जानेवारीच्या मध्याला). यानंतर लवकरच मराठ्यांनी कुंभेरला वेढा घातला आणि खंडोजीला तिकडे बोलावून घेतले. [त.-इ.-अ.-९३ब, ९४ब, १०२अ, १०४ब-१०७अ.].

## § ३ : मराठ्यांच्या एका नव्याच सैन्याचे उत्तर हिंदुस्थानात आगमन, त्यांचे धोरण

सफदरजंगाचे बंड सुरू झाल्याबरोबर बादशहाकडून, पेशव्यांकडे, मदत द्यावी म्हणून विनवणीपत्र आले होते. याचबरोबर पेशव्यांच्या दिल्लीमधील प्रतिनिधींच्याकडूनही, हिंदुस्थान-कडे मोठे बलाढ्य सैन्य पाठवावे अशी पत्रेही त्याला वारंवार आली होतीच. पेशव्यांच्या प्रतिनिधींच्या पत्रानुसार अशा सैन्याची जरूर होती ती, दिल्ली येथे असलेले मराठ्यांचे स्थान आहे तसे सांभाळणे, त्यांना पूर्वीच दिलेल्या निरनिराळ्या सवलतीवरील त्यांची पकड कायम ठेवणे आणि आता सुरू झालेल्या अंतर्गत झगड्याचा उपयोग करून या सवलतीत आणखी वाढ मिळविणे, अशी होती. या झगड्यात मराठ्यांची मदत मिळविण्यासाठी, झगड्यातील दोन्हीही पक्षानी आपापले प्रतिनिधी त्यांच्याकडे पाठविले. (भा. पहा प्र. ११§ ११ परि. ३). पण बंड करून उठलेल्या वजिराच्या बाजूला मदत द्यावयाची नाही असा शहाणपणाचा निर्णय, पेशव्यांनी घेतला. तथापि या झगड्यातील आरंभीच्या लढायात भाग घेण्याइतक्या व शाही शासनाकडील पगारी सैन्य म्हणून नियमित पगार घेता येण्या-इतक्या लवकर, पेशव्यांच्या येणार असलेल्या सैन्यापैकी फक्त ४००० सैन्यच दिल्लीला येऊन पोहोचले होते. (भा. पहा प्र. ११§११). नंतर पुढे या सैन्यामध्ये आणखी भर घातली गेली ती बहुधा ६००० स्वारांची असावी. तथापि मागाहून येत असलेल्या मुख्य मराठा सैन्याला काही वेगळ्या सूचनाही दिल्या होत्या. लगेच लढ्यात सामील होण्याऐवजी, दोन्ही पक्षियांच्या संदर्भात काहीसे तटस्थच राहून वाट पहात थांबा, या झगड्याचा शेवट होऊ लागेल त्याकडे लक्ष ठेवा आणि नंतर विजयीबाजूला जाऊन मिळा ; वा दोन्ही बाजू लढ्यामुळे थकून जातील त्या संधीचा उत्तरेकडील मराठा वर्चस्व वाढविता येईल अशारीतीने उपयोग करून घ्या. मुख्य मराठा सैन्याला दिलेल्या सूचना या अशा होत्या. मराठ्यांचे हे मुख्य सैन्य पेशव्यांचा धाकटा बंधू रघुनाथराव याचे नेतृत्वाखाली येत होते. त्याला मल्हार होळकर नर्मदेच्या काठावर येऊन मिळाला. (२२ सप्टेंबर–५ ऑक्टोबर १७५३ भा. म्हणजे बादशहा सफदर लढ्यातील तिसरे पर्व चालू असताना–पहा प्र. ११§९). याच सुमाराला रघुनाथरावाला कळले की बादशहा आणि सफदरजंग यांच्या दरम्यान आता तह झालेला आहे. तेव्हा मराठ्यांच्या या सैन्याने माळव्याचा काही भाग ओलांडल्यावर मुकुंदराखिंड पार केली व ते जयपूरच्या प्रदेशात गेले. (२९ ऑक्टोबर) पण मल्हारचा मुलगा खंडोजी याच्या हाताखाली ४००० घोडेस्वारांच्या एका तुकडीने ( विभागाने ) दिल्लीजवळ येऊन किशनदासाच्या तळ्याजवळ २१ नोव्हेंबरला, तळ ठोकला.[१]

१ (भा. टीप : मुख्य मराठा सैन्य नर्मदेवर आले ते ऑक्टोबरच्या आरंभी, याच महिन्यात सफदर–माधोसिंह–बादशहा यांच्या तहाच्या हालचाली चालू होत्या. : पहा प्र. ११ § २१. या पार्श्वभूमिवर, या मराठा सैन्याच्या हालचालींच्या काळाचा विचार केला पाहिजे.

पुढील परिच्छेदातील हकीगत यापुढील काळातील आहे. या प्रकरणांतील §२ परि. १, २ मध्ये आधीच नमूद केलेली खंडोजीची मोहीम त्याने दिल्लीजवळ तळ ठेवल्यानंतरची म्हणजे डिसेंबरमधील होय.

दिल्लीच्या आसमंतात चालू असलेल्या लढ्यातून यावेळेपर्यंत (२१ नोव्हेंबर) सफदरजंग बाजूला झाला होता. तेव्हा आता आलेले मराठ्यांचे सैन्य आपल्या बाजूला मिळविण्यासाठी इन्तिझाम आणि इमाद यांच्यामध्ये लज्जास्पद धडपड सुरू झाली. खंडोजी दिल्लीजवळ आल्यावर दुसऱ्या दिवशीच इमाद त्याला भेटला. नंतर २५ तारखेला वजिराने, राजा जगल किशोरला या तरुण मराठा सरदाराकडे पाठविले. तेव्हा, "मल्हारजीनी मला मिर बक्षीकडे पाठविले आहे, दुसऱ्या कोणाकडेही माझे काही काम नाही" असे म्हणून त्याला आपली भेट घेऊ देण्यास खंडोजीनै नकार दिला. नंतर १ डिसेंबरला, बापूराव हिंगणे, अंताजी माणकेश्वर आणि दिल्लीतील अन्य मराठा प्रतिनिधींना, बादशहाने बोलावून घेतले आणि ते व वजीर यांच्याबरोबर दीर्घ चर्चा केली. आता आलेल्या मराठा सेनापतीनी मिर बक्षी इमाद बरोबरचा संबंध सोडावा आणि आपल्या सूचना मानाव्या अशी वजिराची इच्छा होती. पण आलेले दख्खनचे सेनापती याला नकार देत होते. आपल्या, दक्षिणेतील हित-संबंधाचे आम्हाला संरक्षण केले पाहिजे. यासाठी निजाम घराण्याशी आम्हाला मित्रत्वाने राहिले पाहिजे. तसेच सुरजमल विरुद्धही आमचे बेत व हालचाली ( Designs ) असून वजीर तर सुरजमलचा पाठीराखा आहे, आणि हा सुरजमल मिर बक्षीचाही शत्रू आहे असे या मराठा सरदारांचे म्हणणे होते. अशा परिस्थितीत बादशहाशी झालेल्या या बैठकीत अखेरी त्यानी उडवा उडवीचे उत्तर दिले की—"रघुनाथराव व मल्हारराव आल्यानंतर त्यांना जे योग्य वाटेल ते करण्यात येईल." —"अशा प्रकारे झिडकारले गेल्यावरही न कचरता, वजिराच्या सांगण्यावरून, बादशहाने खंडोजीकडे २२००० सोन्याची नाणी, मानाचे पोशाख आणि अन्य देणग्या, १० डिसेंबरला पाठवून दिल्या. पण या मराठा सरदारने ही खिलात स्वीकारण्यास तुच्छतापूर्वक नकार दिला आणि असा नकार देताना तो वर म्हणाला— "बादशहांनी मला खिलातीं द्याव्या (भा. मेहरबानीचे प्रतिक) असा काही मी त्यांचा नोकर नाही. बक्षीची सुरजमल विरूद्ध मोहीम सुरू आहे. या मोहिमेत, येऊन बक्षीला मिळावे म्हणून मी माझ्या पित्याच्या हुकुमावरून आलो आहे. हे माझे पिताजी आता थोड्या दिवसातच येऊन पोहोचतील. तेव्हा ते आल्यावर आपण त्याच्याशीच काय बोलावयाचे असेल ते बोला आणि ज्या काही भेटी द्यावयाच्या असतील त्या त्यांनाच द्या." खंडोजीने दिल्ली येथून परत जावे व रोज होणाऱ्या लुटीपासून दिल्लीचा परिसर वाचवावा यासाठी लालूच म्हणून पाठविलेली सोन्याची नाणीही स्वीकारण्यास खंडोजीने नकार दिला. हे अर्थातच बक्षिकडून चिथावणी मिळाल्यामुळेच त्याने केले. नंतर याबाबत काहीतरी करण्यासाठी बाद-शहाने इमादलाच विनवणी केली तेव्हा बादशहाची भेट घेण्यासाठी खंडोजीचे मन वळविण्यास इमादने अकिबतला त्याच्याकडे पाठविले. [त.-इ.-अ.-८८अ-९८ब.].

## § ४ : खंडोजी होळकरची बादशहाबरोबर मुलाखत

बादशहाबरोबर व्हावयाच्या खंडोजीच्या मुलाखतीसाठी, २६ डिसेंबर हा दिवस निश्चित करण्यात आला. ही मुलाखत किल्ल्याच्या उत्तरेस यमुना नदीच्या जवळच 'निळीछत्री' बागेत एका तंबूत झाली. मुलाखतीच्या दालनातील व्यवस्था पहाणाऱ्या मुख्य 'खाजगी' कारभाऱ्याने, ( Chamberlain ) खंडोजीला मुलाखतीसाठी आत नेण्यापूर्वी विचारले की, त्याने बादशहापुढे नजराणा म्हणून (नझर व निसार) सादर करण्यासाठी काय आणले आहे ? तेव्हा अशा मुलाखतीची आपणाला आधी काहीच कल्पना नसल्यामुळे, येताना बरोबर मी कोणताही नजराणा वा सोन्याची नाणी आणलेली नाहीत, असे खंडोजीने

उत्तर दिले. चंद्रग्रहणाच्या निमित्ताने मी यमुनेमध्ये स्नानासाठी आलो असताना, अकिबत महमदाने मला आग्रहाने बादशहांचे भेटीस आणले आहे, असेही तो आणखी म्हणाला. तेव्हा बादशहाच्या त्या कारभाऱ्याने, आपल्या खिशातून २१ मोहरा काढल्या, त्या बादशहासमोर ठेवल्या आणि पुकारा केला :......"खंडोजी राजे आपल्यापुढे १०० मोहरा, एक हत्ती आणि एक घोडा असा नजराणा सादर करीत आहेत." तेव्हा बादशहाने खंडोजीला "खिलात" देण्याचा हुकूम दिला. यानुसार खिलात म्हणून आलेला मानाचा पोशाख घालण्यासाठी खंडोजीला बाजूच्या एका आतल्या छोटया खोलीत नेण्यात आले, तेव्हा ही खिलात स्वीकारण्यास नकार देत तो म्हणाला : "...... अंताजी माणकेश्वर एकेवेळी आमचा नोकर होता. त्याला तुम्ही आता तुमच्या दरबारचा सरदार केलेले आहे. या माणकेश्वराला जर तुम्ही बादशहासमोर कधीही येऊ देणार नसाल तरच मला ही खिलात स्वीकारणे शक्य होईल." यावर तेथे बराच वेळ, खडाजंगी चर्चा होऊन त्यात असहाय बनलेल्या खोजानी अखेरी खंडोजीची अट मान्य केली आणि नंतरच त्याला तो पोशाख चढविता आला व बादशहाकडे परत नेता आले. अशाप्रकारे हा नवा 'दरबारी' बादशहापुढे आल्यावरही त्याने; रूढीनुसार आभारदर्शक चार वेळा सलाम करण्याऐवजी दोनच वेळा केला. यानंतर या नव्या सरदाराला रूढीनुसार तरवार बक्षीस देण्याचे हुकूम झाले पण अशी ही तरवार बादशहाने स्वतःच त्याच्या खांद्यावरून लटकाविली पाहिजे अशी त्याने मागणी केली. यावेळीही, ही तरवार शस्त्रागार अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यास त्याचे मन बळविता आले ते फार मोठ्या कष्टानेच. यानंतर त्याने पुन्हा सुद्धा दोनच सलाम (तसलिम-आभार दर्शक सलाम) केले! अखेरी बादशहा त्याला म्हणाला—"मी तुम्हाला बोलाविले होते ते फक्त सफ्दरजंगाशी लढा देण्यात मला मदत करण्यासाठी. आता परमेश्वर कृपेने ते काम संपले असल्यामुळे, तुम्हाला घरी परत जाण्यासाठी मी निरोपाचे विडे देत आहे. ( Conje ). पुन्हा जेव्हा मला तुमची गरज लागेल तेव्हा मी तुम्हाला परत बोलावेन." यावर खंडोजीने उत्तर दिले :—"मी आता आपल्या पुण्यशील (पवित्र) पायाशी आलो आहे आणि येथेच रहाण्याची माझी इच्छा आहे." यानंतर बादशहाने त्याला, निघून जाण्यासाठी, वारंवार औपचारिक निरोप दिले पण त्याने मात्र काहीही उत्तर दिले नाही. प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशी होती की, खंडोजीला आपले सैन्य व त्याचे शौर्य याबद्दल फाजील घमेंड असून शिवाय तो, रात्रंदिवस दारूच्या अमलाखाली, तंद्रीतच रहात असे. त्याला यावेळी बादशहाशी सभ्य, विनयशील संभाषण करणे काही शक्य झाले नाही. अखेरी त्याने बादशहापुढे दोनदा सलाम केला आणि मग त्याला जाण्यास सांगितले. यानंतर त्याला वजिराच्या घरी नेण्यात आले व तेथे मध्यरात्रीपर्यंत त्याचा आतिथ्यपूर्वक पाहुणचार करण्यात आला. [त.-इ.-अ.–९९ब-१००ब].

## § ५ : मराठ्यांचा कुंभेरचा वेढा : खंडेराव होळकरचा मृत्यू

१७३६ मध्ये राजपुतान्यात बाजीराव येऊन गेला त्यावेळेपासूनच तेथील निरनिराळ्या राज्यांकडून चौथ वा खंडणी ( Contribution ) अशा देण्याबाबत हक्क सांगून मराठे मागण्या करीत असत. या मागण्या विशेषत: बुंदी जयपूर आणि मारवाड या तीन राज्यातील वारसा लढ्यांच्या संदर्भात तर विशेषच होत होत्या. (भा. पहा प्र. ६ व प्र. ७). ते मागणी करीत असलेली ही देणी वसूल करण्यासाठी पेशव्यांचा धाकटा भाऊ रघुनाथराव याच्या हाताखाली, मराठ्यांच्या एका बलाढ्य सैन्याने, आता सप्टेंबर १७५३ च्या अखेरी नर्मदा ओलांडली. तेथे त्याला मल्हारराव होळकर येऊन मिळाला. (भा. § ३ या उपभागात

मराठ्यांच्या मुख्य सैन्याने सप्टेंबर अखेर नर्मदा ओलांडल्याचा निर्देश आहे. पण त्या ठिकाणी, बादशहा–सफ्दर भांडणात, बादशहाच्या बोलावण्यानुसार आलेले हे सैन्य असा निर्देश आहे. प्रस्तुत ठिकाणी निर्देश आहे तो देणी वसूल करण्यासाठी म्हणून.–याचा अर्थ असा की विविध उद्देश पुढे ठेवून आलेले हे सैन्य, बादशहा–सफ्दर लढा संपल्याने आता या कामाकडे वळले होते.) नंतर हे सैन्य जयपूरच्या प्रदेशात शिरले आणि तेथे या सैन्याने दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ घालविला. (९ नोव्हेंबर १७५३ ते १५ जानेवारी १७५४). आणि या काळात जयपूरकडून (१२ लाख) व अन्य छोट्या राज्यांकडून देणी वसूल केली. या सुमाराला दुसरीकडे, सफ्दरचा बादशहाबरोबर तह घडवून आणल्यावर (भा. पहा प्र. ११§ २१ परि. २, ३) दिल्ली येथून सुरजमल व माधोसिंह परत येत होते. या परतीच्या प्रवासात सुरजमलने, माधोसिंहाबरोबर, एक गुप्त, संरक्षणात्मक समझोता ( defensive understanding ) घडवून आणला. नंतर त्याने रूपराम कोठारी नावाचा आपला एक वकील मराठ्यांच्या छावणीत पाठविला. त्याच्याकडे मल्हारने २ कोटी रुपयांची मागणी केली आणि यासाठी कारण सांगितले की दिल्लीची उपनगरे लुटण्यात, यापेक्षाही पुष्कळच जास्त पैसा सुरजमलने गोळा केला आहे! तेव्हा पैसा देऊन मराठ्यांची समजूत घालण्यासाठी आलेल्या जाट वकिलाने, त्याना बादशहाकडून यावयाची ठराविक खंडणी (भा. चौथ व खर्चासाठी पैसा यासाठी कारण यावेळी मराठे आले ते बादशहाला मदत करण्यासाठी) व शिवाय चार लाख रुपये देऊ केले. पण मल्हारने एवढेच न स्वीकारता जाटांच्या मुलुखावर स्वारी केली. यावेळी जाट राजा बदनसिंह वृद्ध होता पण सुरजमल हा त्याचा वारस व मंत्री असून या सुरजमलने जाट सरदाराना प्रोत्साहन दिल्यामुळे त्या सर्वांनी मराठ्यांच्या प्रस्तुत अन्याय्य मागणीला विरोध करण्याचे ठरविले. मराठे स्वारी करून येत आहेत हे पाहून या जाटानी आपले किल्ले सुसज्ज करून संरक्षणासाठी खंबीर पवित्रा घेतला. जाटांचे पुढारी अशी तयारी करीत असतानाच त्यांच्या सामान्य सैनिकातही जाट जमाती याबाबत विशेष बंधुभावाची तीव्र जाणीव असून आपला कधीही पराभव झालेला नाही असा त्याना अभिमानही होता. यातून त्यांच्यामध्येही आता विशेष चैतन्य निर्माण झाले होते.

मराठ्यांचे सैन्य जेव्हा दिग (१६ जाने. १७५४), भरतपूर व कुंभेर या जाटांच्या प्रसिद्ध किल्ल्याजवळ येऊन पोहोचले तेव्हा या किल्ल्यांच्या तटावरून तोफांचा मारा करण्यात येऊन त्याना मागे रेटण्यात आले. मैदानावरही एक समोरासमोर हातघाईची लढाई झाली. या लढाईत दोन्हीही बाजूकडील बरेच लोक मारले गेले. शत्रूकडील मोठ्या संख्येमुळे जेरीस येऊन यानंतर सुरजमल कुंभेरच्या किल्ल्यात गेला व तेथे आतच तो बंदिस्त राहिला. तेव्हा मराठ्यांनी किल्ल्यासमोर आपले ठाण मांडले, पण त्यांच्याजवळ वेढ्याला उपयोगी पडण्यासारख्या तोफा नव्हत्या, तेव्हा त्यानी सभोवतालचा मुलुख तेवढा लुटला व व्यापला. रघुनाथरावाने २० जानेवारीला, आपला तळ पिंगरे ( Pingare– कुंभेरजवळ ) येथे ठेवला आणि पुढे २८ फेब्रुवारीला, किल्ल्यासमोरील मैदानावर[1] तो हलविला. तेथेच

१ जाटांच्याकडून जो काही पैसा आणि अन्य लूट जिंकून मिळण्याची अपेक्षा होती त्यापैकी एक चतुर्थांश देण्याचे, इमाद-उल्-मूल्क याला, लेखी आश्वासन, १५ मार्चला रघुनाथरावाने दिले. जयपूरचा दिवाण हरगोविंद नाटानी, हा, या काळात आपल्या धन्याच्यावतीने मराठ्यांच्या छावणीत हजर होता. वेढ्याच्या कामात मराठ्याना मदत करण्यासाठी, तो तेथे असला, तरी स्वारी करून आलेल्या मराठ्यांच्या मार्गात अडचणी उभ्या करण्याची व त्यांच्या कार्याला वेळ लागेल असे करण्याचीच कारवाई, प्रत्यक्षात त्याने केली. [नि. प. पे. द. (२७) १०४ व ९४].

तो २२ मे पर्यंत राहिला. या काळात जानेवारीच्या प्रारंभी खंडेराव होळकराने होडाळ येथे आपला तळ ठेवला असून, त्या प्रांतातील जाटांनी, त्यांच्या केंद्रापासून दूरवर ठेवलेली, त्यांच्या सीमेवरील संरक्षक ठाणी ( Out–post ), उठवून लावण्याच्या कामात तो गुंतला होता. आपले ४००० स्वारांचे पथक घेऊन कुंभेरला चाललेल्या वेढयाच्या कामासाठी जाऊन त्यात सामील व्हावे असे हुकूम आता त्याला त्याच्या पित्याने दिले. तेव्हा तिकडे तो निघाला आणि वाटेत मेवातचे भाग लुटून तो कुंभेरला येऊन पोहोचला. मल्हारने आपला मित्र इमाद-उल्-मुल्क याच्यामार्फत, वेढयाच्या कामासाठी लागणाऱ्या तोफा, दिल्ली व आग्रा येथील शाही शस्त्रागारातून, आपणाला उसन्या म्हणून मिळाव्या अशी बादशहाकडे विनवणी केली. पण वजिराच्या शिकवणी-मुळे, बादशहाने ही विनंती मान्य करण्यास दिरंगाई चालविली. तोफखान्यावरील माणसाना पगार देण्यास आणि सफदरजंगाबरोबर झालेल्या युद्धात संपलेला दारूगोळा पुन्हा साठविण्यास जरूर तो पैसा आपल्याजवळ नाही, असे कारण मात्र त्याने या दिरंगाईसाठी पुढे केले.

मल्हाररावाच्या बोलावण्यावरून मार्चमध्ये, इमादने मथुरा येथून कुंभेरकडे कूच केले कुंभेरला अकिबत त्याला येऊन मिळाला. तथापि मराठयांच्याकडे तटाना खिंडारे पाडण्या-सारखा तोफखाना नसल्याने ते व त्यांचे मित्र यानी, किल्ला सर करण्यासाठी रोज चालविलेले प्रयत्न निष्फळच ठरले. किल्ल्यात कोणालाही जाता येऊ नये व आतून कोणालाही बाहेर येता येऊ नये असा पूर्ण वेढा घालणेही अशक्यच होते. तेव्हा किल्ल्याच्या तटापर्यंत, झाकलेल्या भुयारासारख्या व खंदकातून जाणाऱ्या निरूंद वाटा खंडेरावाने तयार केल्या व तो तटापर्यंत जाऊन पोहोचला. एके दिवशी (सुमारे १५ मार्च १७५४) या खंदकांची तपासणी करण्याकरिता तो आपल्या पालखीतून गेला. यावेळेसही, तो आपल्या नेहमीच्या धुंदीच्या परिस्थितीतच ( Tipsy Condition ) होता. अशावेळी किल्ल्यातून तोफांचा मारा सुरू होऊन जंबुरकचा ( Zamburak ......एक प्रकारची तोफ ) एक गोळा लागून तो मारला गेला. याप्रसंगी त्याच्या चितेवर त्याच्या स्त्रियांपैकी नऊजणी सती गेल्या, मागे राहिली ती एकटी अहिल्याबाई. याच अहिल्याबाईला, आपली कर्तबगारी व साधूवृत्ती यामुळे पुढे, भारतातील अतिशय थोर राज्यकर्त्या स्त्रियांपैकी एक व अतिशय साधूवृत्तीची गतधवा, अशी कीर्ति मिळविण्याचे भाग्य लाभले. आपल्या लाडक्या मुलाच्या मृत्यूच्या दुःखामुळे, मल्हारराव जवळजवळ इतका वेडापिसा बनला की, याचा सूड म्हणून जाट जमात समूळ नाहीशी करण्याचीच शपथ त्याने घेतली. प्रथम आपल्या मुलाच्या मृत्यूनंतर, धार्मिक रूढीनुसार करावयाच्या उत्तरक्रिया करण्यासाठी तो मथुरा क्षेत्री गेला. त्याच्या दुःखात सहानुभूति दाखविण्यासाठी इमाद त्याच्याकडे येऊन भेटला आणि सांत्वनपर म्हणाला, "......यापुढे खंडोजीच्या जागी मीच–आपला पुत्र आहे असे माना......" सुरजमलने सुद्धा युद्धातून निर्माण झालेल्या या दुःखद घटनेबाबत तीव्र दुःख प्रगट केले आणि मल्हार व खंडेरावाचा मुलगा यांच्याकडे रूढीनुसार प्रतिकात्मक पोषाखही पाठविले (भा. जवळच्या नात्यातील व्यक्तीच्या कुटुंबातील एकाद्या वडिलधाऱ्या वा कर्त्या माणसाचा मृत्यू झाला तर, आपल्या दुखाःवर आता पांघरूण घाला......आम्हीही त्यात सहभागी आहो...... आम्ही तुम्हाला घरच्यासारखे मदत करणारे–सांभाळणारे आहोत हे दाखविण्यासाठी, मूळच्या दुःखी व्यक्तीला नात्यातील अन्य वडिलधाऱ्यानी असा प्रतिकात्मक पोषाख देण्याची चाल हिंदूमध्ये अद्यापही रूढ आहे). बादशहाने सुद्धा पुढे ९ एप्रिलला, बापूराव हिंगणे यांच्यामार्फत, मल्हाररावावर कोसळलेल्या या घोर दुःखाबद्दल, त्यालाही सहानुभूति वाटत आहे याचे प्रतिक म्हणून मल्हारला पोषाख व मल्हारच्या पत्नीला काही दागिने पाठविले.

कुंभेरचा वेढा रेंगाळत रेंगाळत चार महिने चालला. अखेरी मे महिन्यात मध्याचे सुमारास तह करण्यात आला. आपल्या धन्याच्यावतीने रूपरामने लेखी करारपत्र (Bond) देऊन, तीन वर्षांत हप्त्या हप्त्याने, मराठ्याना तीस (३०) लाख रुपये देण्याचे मान्य केले. याशिवाय आणखीही एक महत्त्वाची अट मान्य केली. जाटराजाने पेशखस म्हणून बादशहाला २ कोटी रुपये द्यावे अशी मागणी इमादने पूर्वीच केली होती पण ते वसूल होत नव्हते. आता या करारात ते देण्याचेही रूपरामने मान्य केले. पण जाटराजाने ही रक्कम बादशहाला देण्याऐवजी आता इमाद व मराठे याना द्यावी असे मात्र प्रस्तुत तहानुसार ठरविण्यात आले. असा तह झाल्यानंतर वेढा उठविण्यात आला. इमादने हे रणांगण १८ मेला सोडले व पुढे २२ ला रघुनाथरावानेही ते सोडले आणि दोघेही मथुरेला आले. [त.–इ–अ.–१०८ ब–११० अ, ११७ ब, १२१ ब, १२८अ. सुजान चरित्र, जंग (७) हे अपुरे आहे. पे. द. नि. प. (२७) अनु. ७९–पृ. ९४ मध्ये या करारपत्राची तारीख २८ मे अशी दिली आहे].

## § ६ : बादशहा व इमाद यांच्यामधील झगडा

कुंभेरकडे अशा घटना चालू असतानाच बादशहा आणि त्याचा बक्षी यांच्यामधील मतभेद विकोपाला गेले आणि या दोघांमध्ये उघड झगडा होण्याचीच वेळ आली. या झगड्याचा शेवट अहमदशहाच्या नाशात झाला. सफ्दरबरोबरच्या झगड्यातून, सफ्दर निघून गेल्यानंतरच्या (भा. पहा प्र. ११§२१) काही महिन्यातच इमादचे भाग्य सतत संथपणे चढत्या श्रेणीतच होते. त्याची एक अडचण म्हणजे पैशाचा अभाव ही होती. सफ्दरजंगाशी झालेल्या ६ महिन्याच्या जीवनमरणाच्या झगड्यात, त्याच्याकडे असलेला वाडवडिलानी साठविलेला खजिना तर संपुष्टात आलाच होता शिवाय त्याने आपणावर कर्जाचा बोजाही लादून घेतला होता. याचवेळी सरकारी खजिनाही (Public Treasury) रिताच झालेला असून सुभ्याकडून यावयाचा वसूल येणे बंद झाले होते. या परिस्थितीत राजधानीपासून सहज पोहोचता येईल अशा अंतरामधील बादशहाच्या स्वतःच्या जमिनी वा जहागिरी (Crownlands–भा. या बादशहाच्या 'शाहीपदाच्या' खर्चासाठी राखून ठेविलेल्या जहागिरी असाव्या, खाजगी म्हणून नव्हे) आणि अन्य सरदारांच्या जहागिरी यांच्यामधून येणारा वसूल सक्तीने ताब्यात घ्यावयाचा एवढाच एक पैसा उभा करण्याचा मार्ग आता इमादला मोकळा होता.

सफ्दरबरोबरचे युद्ध प्रथम ज्यावेळी सुरू झाले त्यावेळी बादशहा आणि त्याचे मंत्री यांच्यासमोरच, या युद्धाच्या खर्चाबाबत एक विस्तृत योजना मान्य करण्यात आली होती. यानुसार साम्राज्याची सर्व दौलत, बंडखोराला चिरडून टाकण्याच्या कामी प्रथम खर्च करावयाची असे ठरले होते. बंडखोराचा पाडाव केल्यावर पैसा पुन्हा जमा करण्याबाबतही योजना याचवेळी निश्चित ठरविण्यात आल्या होत्या. या पाडावानंतर, जुन्या व नव्याने भरती केलेल्या सैनिकांच्या पगारावर खर्ची पडलेल्या रकमा, दख्खनच्या वसुलामधून वजा करून बाकी राहिलेला वसूल इमादने (निजाम-उल्-मुल्क या नात्याने) शाही खजिन्यात भरावा असे ठरले. वजिराकडे (इन्तिझाम) असलेल्या पंजाब व काश्मीर या सुभ्याबाबतही असेच करण्याचे त्यानेही मान्य केले होते. बंडखोर सफ्दरजंगाकडे असलेले सुभे काढून घ्यावयाचे व त्यापैकी औध, वजीर व बक्षी याना अर्धा अर्धा वाटून द्यावयाचा व अलाहाबाद सुभा 'सिनडाग' सैनिकाच्या पगारासाठी केलेल्या खर्चाबद्दल ठेवावयाचा. सफ्दरविरुद्धच्या

युद्धाच्या आरंभी ठरविलेली अशी ही सविस्तर योजना असून ती सर्व, बरेच हिशोब व अंदाज करून त्यावर आधारली होती. पण पुढे प्रत्यक्ष व्यवहारात हे हिशोब निरुपयोगीच ठरले व पैशाबाबतच्या अडचणी अधिकाधिक तीव्र होत गेल्या. हळूहळू इमाद बेइमान बनला आणि सामर्थ्याच्या घमेंडीत, सिंहासनही जबरदस्तीने घेण्याची स्वप्नेसुद्धा त्याला पडू लागली [त.–इ–अ.–९६ अ, ९७ ब, १०२].

सैनिकांच्या देण्याच्या बाकीबद्दल बादशहा आणि बक्षी यांच्यामध्ये तीव्र मतभेद होते. इमाद बादशहाला आग्रह करीत होता की त्याने इमादबरोबर बाहेर पडून राजधानी जवळच्या भागातील बंडखोरांचे पारिपत्य करावे आणि येणे पैसा वसूल करावा, किंवा मुहाकम सिंहाला (चुरामनचा मुलगा) जाटांचे राज्य विकून पैसा जमा करावा. हे जाट राज्य, पूर्वी या मुहाकमकडूनच, चुरामनचा पुतण्या बदनसिंहाने हिसकावून घेतले होते, हेच इमादच्या दृष्टीने याचे कारण होते. पण जाटांचा प्रश्न इमादच्या हाती सोपविण्याला बादशहा तयार नव्हता. तो, अशा बाबतीत वजिराचा सल्ला मानीत असून, बक्षीला दिलेल्या जहागिरीमधून तो आपल्या सैन्याचा खर्च सहज भागवू शकेल असेच त्याचे मत होते. यामुळे इमादने मांडलेल्या योजनांना अनेक वेळी तो नकार देई. सैनिकांचा पगार देण्यासाठी १५ लाख रुपये इमादकडे दिले असताना देखील त्याने हे पैसे आपल्यासाठीच ठेऊन घेतले, आणि बादशहा, त्याचे खाजगीपैकी अधिकारी आणि त्याचा वजीर, यांच्याविरुद्ध उपासमार होऊ लागलेल्या सैनिकांना रोज बंडे करण्यास उत्तेजन दिले. बादशहाच्या खाजगी खर्चासाठी नेमून दिलेल्या कोइल व सिकंद्राबाद या जहागिरी आपल्या ताब्यात घेण्यासाठी इमादने फेब्रुवारी १७५४ च्या आरंभी आपल्या सैन्याची काही पथके पाठविली. याचवेळी त्याचा एक हस्तक अकिबत महमद याने, रेवारी या आणखी एका शाही जहागिरीच्या प्रांतातील शेतकरी रयतेला पिळून, पैसा गोळा केला. इमादने केलेल्या, अशा प्रकारच्या बेकायदेशीर, सक्तीच्या लुबाडणुकीने, बादशहाचे उत्पन्न मात्र संपुष्टात आले व शाहीवाड्यातील व्यक्तींची जवळ जवळ उपासमारच होण्याची वेळ आली. शाहीवाड्यात अशी अवस्था होत असतानाच दिल्ली शहरातही पगार न दिलेल्या सैनिकांचा आरडाओरडा, गोंधळ, २ महिने चालूच होता. तथापि ही परिस्थिती सुधारण्यासाठी काहीही करणे बादशहाला शक्य झाले नाही. त्याने मिरबक्षीला मात्र लिहिले की, तुम्ही दिलेले वचन पाळून, या सैनिकांचे देणे देऊन टाका. पण इमादने या प्रश्नाची सोडवणूक मात्र, दिवसेंदिवस पुढे ढकलण्याचेच चालविले. [त.–इ–अ.–१०३–१०४, १०९ ब, १११. ब, ११३ ब.]

## § ७ : अकिबत महमदाने दिल्लीमध्ये शिरून बादशहावर दहशत बसविली

कुंभेर येथे असताना (भा. मार्च ते मे १८, पहा § ५) किल्ल्याच्या वेढ्यासाठी लागणाऱ्या मोठ्या तोफा उसन्या द्याव्या अशा विनंत्या इमादने बादशहाकडे पुन्हा पुन्हा पाठविल्या. पण वजिराच्या सल्ल्यावरून बादशहाने या विनंत्याना उत्तर पाठवावयाचे टाळले. अखेरी, अकिबतने बादशहाला भेटावे व या तोफासाठी व्यक्तीशः आग्रह करावा असे ठरवून त्याच्याबरोबर एक बलाढ्य मराठा सैन्य देऊन त्याला दिल्लीला पाठविण्यात आले. असे बलाढ्य सैन्य घेऊन तो येत आहे ते आपला अपमान करण्याला, आपल्यावर दडपण आणण्यालाच येत आहे अशी भीति बादशहाला वाटली. तेव्हा येणाऱ्या अकिबतला शहरात शिरण्यालाच जोरदार, सशस्त्र विरोध करावा असा बादशहाने, प्रथम विचार केला. आपल्या

जवळ उपलब्ध असतील अशा सैनिकांची नोंद वा हजेरी पत्रके यांची त्याने तपासणी केली. सफ्दर बरोबरच्या युद्धाचे काळात पूर्वी ज्याप्रमाणे दिल्लीमधील मोठ्या मोक्याच्या ठिकाणी चौक्या बसवून संरक्षणाची जशी व्यवस्था केली होती तशीच आताही करण्याला त्याने हुकूम दिले. पण अकिबतबरोबर येत असलेल्या अधिक चांगल्या सामर्थ्यवान फौजेला तोंड द्यावयाच्या विचारापासून त्याच्या अधिकाऱ्यानी माघार घेतली आणि त्याच्या हुकुमाबाबत त्यानी काहीही केले नाही. तरीही, मागितलेल्या तोफा देऊन टाकून पुन्हा शांतता निर्माण करण्याबाबत मूर्ख बादशहा काहीही करीना [त.–इ–अ.–११५ ब, ११६ ब.].

अकिबतमहमद १६ मार्चला दिल्लीमध्ये शिरला. आधीचे अनेक आठवडे आपला पगार द्या म्हणत असलेल्या बंडखोर सैनिकांच्या ताब्यात शहर गेलेले होते. या सैनिकांचा यापूर्वीच्या २६ महिन्यांचा पगार द्यावयाचा राहिलेला होता. कायद्याचा अमल व व्यवस्था शहरामधून नाहीशी झालेली होती. बादशहा आणि वजीर आपापल्या वाड्यात अडकून वेढ्यात पडले होते. अकिबत आल्यावर त्याच्या बदक्षि सैनिकानी, पैशासाठी सराफांचा छळ करण्यास सुरुवात केली (२० मार्च). २४ मार्चला हे सैनिक राजधानीच्या उपनगरातून भटकू लागले. यामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण होऊन, शाही किल्ल्यावरही हल्ला होण्याची शक्यता दिसू लागली. असा हल्ला झालाच तर तो परतून लावण्यासाठी सज्ज रहाण्याचे हुकूम, किल्ल्यातील गोलंदाजानाही देण्याची पाळी बादशहावर येऊन त्याने तसे हुकूम दिलेही. "सधन आहेत असे ज्या व्यक्तिबाबत कळे त्या सर्वांना पकडून आणण्यासाठी अकिबतने आपले नोकर पाठविण्याचे चालू ठेवले. अशा व्यक्ती आणल्या की, त्यांच्याकडे, सफ्दरजंगाने आपली संपत्ती ठवलेली आहे असा खोटाच आरोप करण्यात येऊन त्यांच्याकडून पैसा उकळला जाई. याचप्रमाणे यमुनेच्या पूर्वेकडील शाही जहागिरीतील खेडी लुटण्यासाठीही त्याने आपले नोकर पाठविण्याचे चालविले."

## § ८ : दिल्लीमध्ये रस्त्यारस्त्यातून चाललेल्या लढाया, ८–९ एप्रिल १७५४

अखेरी ८ एप्रिलला, बादशहाला घाबरवून तोफा द्यावयास भाग पाडण्यासाठी, अकिबतने आपल्या दंगेखोर बदक्षि सैनिकांची निदर्शने घडवून आणली. त्याच्या चिथावणीमुळे हे सर्वच्या सर्व (५०००) भाडोत्री परदेशी सैनिक, किल्ल्याच्या सर्व बाजूना गेले आणि किल्ल्यात जावयाचे व आतून बाहेर यावयाचे सर्व मार्ग रोखून, त्यांनी बंद केले. त्यांच्यापैकी ५०० चे एक पथक आपल्या बंदुका भरून व हातात पेटविलेले पलिते घेऊन शाही वाड्याच्या झरोका (jharoka Window) सज्जाखाली आले. तेव्हा तेथील पहारेकऱ्याने त्यांना हटकले व आव्हान दिले. या आव्हानाला त्यांनी उत्तर दिले की... "आम्ही सिनडाग पथकातील बादशहाचेच सैनिक असून, एक वर्षभराचा आमचा पगार द्यावयाचा राहिला आहे. आम्हाला आमचा पगार द्या." शहरात असलेल्या प्रत्येक जकात नाक्यावरील 'अडथळ्या'पाशी आणि किल्ल्याबाहेरील मैदानावर त्यांची अनेक टोळकी जमा झाली आणि तेथील वहातूक अडवून, हाती लागतील त्या जाणाऱ्या येणाऱ्या सर्वांना त्यांनी लुटले. यावेळी "आपल्यावर हल्ला झाल्याशिवाय लढा देऊ नका असे हुकूम बादशहाने आपल्या लोकांना दिले. यावेळी किल्ल्यात असलेल्या शाही तोफखान्यावरील व कोठ्यांवरील (Stores) लोकांपैकी कोणालाही जेवण्यासाठीसुद्धा, सबंध दिवस व रात्र किल्ल्याबाहेर येणे शक्य झाले नाही. ते सर्व तेथेच अडकले जाऊन (बंदी होऊन) दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत तसेच अन्नाशिवाय राहिले. आत्यंतिक भीतिमुळे गर्भगळित होऊन बादशहाही तेथेच लटपटत राहिला."

या सैनिकाना पैसा देण्याची काही सोय करण्यासाठी, सूर्यास्तानंतर शाही वाड्याचा अधीक्षक ( Superintendent ) ख्वाजा बख्तावर खान (Khwajah Bakhtawar Khan) वजिराच्या घराकडे गेला. परत येताना संरक्षण म्हणून त्याने वजिराकडून पांच हलक्या तोफा (भा. रहकाला) उसन्या घेतल्या आणि त्या, आपल्या बरोबरच्या पथकाच्या आघाडीला ठेऊन तो चालला. जामा मशिदीजवळ हे पथक पोहोचले तेव्हा त्याच्यावर बदक्षी बंडखोरांनी एकाएकी झडप घालून त्या तोफा हिसकावून घेतल्या. यावेळी बंडखोरांची संख्या मोठी असल्याने ख्वाजाच्या मूठभर लोकांचा त्यांनी धुव्वा उडविला. झालेल्या चकमकीत बंडखोरांना विरोध करण्याचा प्रयत्न करीत असताना ख्वाजाच्या लोकांपैकी बरेच मारलेही गेले. तेव्हा वजिराने आपल्या तोफखान्यावरील एक अधिकारी मिर बर्खुरदार ( Barkhurdar ) खान याच्या हाताखाली ख्वाजाला मदत पाठविली. चकमकीच्या जागी पोहोचल्यावर त्याने बंडखोरांवर गोळीबारही केला पण एकूण झगड्यात त्याचा पुढील रस्ताच अडवला गेला असल्याचे आढळून आल्यावर आपल्या मुघलिया अनुयायांसहीत गर्दीतून वाट कापीत कापीत तो संरक्षणासाठी जामा मशिदीत शिरला. अशा प्रकारे तो निसटल्याचे आढळून आल्यावर, जवळच असलेल्या फैजबाजारमध्ये बदक्षी बंडखोर मोठ्या संख्येने गोळा झाले. पण यामुळे ते आता दोन्ही बाजूनी सुरू केलेल्या गोळीबारात सापडले. येथील रस्त्यात दोन्ही बाजूच्या घरांच्या रांगांमध्ये, काहीही संरक्षणाशिवाय हे बंडखोर सापडलेले पाहून, रस्त्याच्या एका बाजूला असलेल्या बख्तवारच्या लोकांनी आणि दुसऱ्या बाजूच्या घरातून बर्खुरदार ( Barkhurdar ) च्या लोकांनी त्यांच्यावर मारा चालविला. तोफा-बंदूकातून सुटणाऱ्या गोळ्यांमुळे, जामा मशिदीच्या दरवाजासमोरील खासबाजारमधील दुकानांच्या कुडाच्या भिंती व छपरांनी (Thatches–गवत पेंढा व माती यानी तयार केलेल्या) पेट घेतला. अखेरी आपल्यातील बरेच लोक गमावून व हिसकावून घेतलेल्या वजिराच्या तोफा मागे टाकून, बदक्षी दंगेखोर पळून गेले व ख्वाजा बख्तवार किल्ल्यामध्ये परत आला. यानंतर मोठे सुसज्ज सैन्य बरोबर घेऊन, तो पुन्हा किल्ल्याबाहेर पडला आणि त्याने अकिबतचा मुक्काम असलेल्या बरादरी वाड्यावर तोफांचा मारा केला. या माऱ्यामुळे त्या इमारतीपेक्षा कमी ऊंचीची व त्या इमारतीच्या बाजूला पुढे आलेली इतर घरांची पेंढ्यांची छपरे जळून कोसळली आणि बरादरी वाड्याच्या भिंतीलाही खिडार पडले. तेव्हा हे घर सोडून अकिबत, नदीवर तळ ठेवलेल्या आपल्या लोकाकडे गेला. तेथून जवळच 'झरोका–सज्जाच्या' खाली बादशाही पक्षियांची एक तुकडी, खोजा बसतखानाच्या हाताखाली होती. या टोळीवर अकिबतच्या बदक्षि लोकांनी हल्ला केला. तेव्हा किल्ल्याच्या तटावरील तोफातून त्यांच्यावर मारा करण्यात आला व त्यांनी तेथून पळ काढला. अखेरी या सर्व झटापटीत, अकीबतने पराभव पत्करून, उजाडण्यापूर्वी दोन तास, शहर सोडले आणि तो जयसिंगपूराला (भा. एक उपनगर) माघारी फिरला. नंतर बादशहाने आपल्या लोकांन लढाई थांबविण्याचे हुकूम दिले.

या रात्री झालेल्या, रस्त्यातील या लढाईत अनेक सैनिक व इतर लोक मारले गेले वा त्यांची घरे जळून जमीनदोस्त झाली व त्यांची मालमत्ता लुटली गेली. या अनेक लोकांत सैनिकांबरोबरच रस्त्यातून हिंडणारे बघे व बाजारातले लोक असे नानाविध लोक होते. अशी लढाई व ही स्थिती खास बाजार (भा. जामा मशिदीसमोरचा) आणि खारीबावली भाग, अशा दोन्हीही ठिकाणी निर्माण झाली..... खारीबावली या दुसऱ्या भागात बदक्षिच्या दुसऱ्या एका टोळीने याच रात्री रस्त्यात लढाई करून, लूट, कत्तल आणि जाळपोळ

या गोष्टी चालविल्याच होत्या, त्या, त्यांचाही पराभव करून लाहोर दरवाज्याच्या बाजूने, त्यांना हाकलून देईतो. दुसऱ्या दिवशी सकाळी दिल्ली राजधानीवर जोरदार हल्ला करून जिंकलेल्या व लुटलेल्या शहरासारखी दिसू लागली.[१]

दिल्लीतून हाकलून दिल्यावरही अकिबतने त्रास द्यावयाचे काही थांबविले नाही. राजधानीच्या आसमंतात व्यापाऱ्यांना लुटण्याचे व ज्या ज्या ठिकाणी सुस्थितीतील लोक असल्याचे कळे त्या त्या ठिकाणी जाऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने पैसे उकळण्याचे त्याने चालूच ठेवले. असे करीत असताना तो नेहमीच ढोंगीपणाने म्हणे मात्र की, पगार न दिलेल्या तुर्की सैनिकांनी (बदक्षी) आपले नियंत्रण झुगारून दिले असून, याबाबत त्याला आता काहीही करता येत नाही [त.–इ–अ.–१२५ अ.–१२७ अ.].

## § ९ : इमाद आणि मराठे यांच्या त्रासातून बादशहाला सोडविण्यासाठी वजिराची योजना

झालेल्या यादवी युद्धातून, दिल्लीच्या दरबारातील सर्वांत जास्त बलाढ्य व प्रसिद्ध उमराव म्हणून वादातीत स्थान इमादला प्राप्त झाले होते. इमादचे स्वतःचे सैन्य आता मोठे व लढाईत कसलेले असून त्याची मराठ्यांशी निकटची आणि दृढ मैत्री होती. अशा प्रकारे इमादच्या विशेष वाढलेल्या सामर्थ्याला आता विरोध करू शकतील असे लोक म्हणजे फक्त जाटच शिल्लक राहिलेले होते. तेव्हा आपले कसलेले सैन्य व मराठ्यांबरोबरची मैत्री यांच्या जोरावर जर, इमादला जाट राजाला चिरडून टाकता आले व त्याने आपल्या बळकट कोठारात साठवून ठेवलेली विश्वासही ठेवता येणार नाही इतकी मोठी संपत्ती इमादने जर हस्तगत केली तर या बक्षीचे सामर्थ्य कोणालाही विरोध करता येणार नाही असे होणार होते. या परिस्थितीत तैमूरच्या घराण्यालाच (बादशहालाच) सिंहासनावरून खाली खेचून त्यावर स्वतःच आरूढ होण्यापासून त्याला थोपविणे कोणालाही शक्य झाले नसते. तेव्हा असे होऊ नये म्हणून त्याला प्रतिबंध करण्याची योजना, वजिर प्रथमपासूनच आखीत होता. वजिर इन्तिझाम चांगला लढवय्या वा लष्करी नेता नसला तरी हिकमती राजकारणी होता. यादवी युद्धाच्या सुरवातीपासूनच सफ्दरला संपूर्ण नाशापासून वाचवण्यासाठी व जाटांचे सामर्थ्य जसेच्या तसे राहू देण्यासाठी तो डावपेच लढवीत होता. वाचविलेला सफ्दर, जाट व राजपूत राजे यांचा बादशाही निशाणामागे एक गटच निर्माण करून उत्तर हिंदुस्तानातून मराठ्यांना हाकलून द्यावयाचे व त्यांच्या पुन्हा होणाऱ्या हस्तक्षेपापासून शाही साम्राज्याचे रक्षण करावयाचे असा, इन्तिझामच्या डावपेचांचा आणखी एक भाग प्रथम पासूनच होता. या मूलभूत डावपेचांचा विचार न करता साम्राज्याच्या दख्खनी शत्रूशी मैत्री करण्याचा इमादने जर हट्टच धरला, तशी मैत्री ठेवणे चालूच ठेवले तर मात्र त्यालाही ठेचून टाकावयाचे हाही या योजनेचाच आणखी एक भाग होता. या एकूण योजनेला अवश्य त्या खड्गधारी-हस्ताची-लढाऊ सामर्थ्याची–तरतूद त्याने योजली होतीच. राजपुतान्यातील हिंदुराजे व भरतपूरचे जाट असे मिळून साम्राज्याच्या या नव्या संरक्षण धोरणासाठी लागणारा 'खड्गहस्त' सिद्ध करावयाचा होता. "राजपुतान्यातील या हिंदु राजांचा मुलुख, प्रत्येक वर्षी साम्राज्याच्या मुलुखापेक्षाही अधिकच, मराठे उध्वस्त करीत." (मुझ-८८). दक्षिणेकडून येणाऱ्या याच धंदेवाइक लुटारूंचा (Spoilers) मत्सर व लोभ, भरतपूर जाटांच्या साठविलेल्या संपत्तीमुळे अधिकच चेतविला जात होता. यामुळे या राजपूत

१ त.-इ.-अ.-११२अ-१२४अ. दिल्ली वर्तमान. (घटनांच्या तपशिलाबाबत यात फरक आहे).मूझ. ८५-८६.

व जाटांच्या रूपाने जरूर तो, 'खड्गहस्त' सिद्ध करता येण्याची अपेक्षा वजिराच्या या योजनेच्या बुडाशी होती. वजिराचे असे एकूण विस्तृत डावपेच आरंभापासूनच असून अखेरी (भा. यादवी युद्ध संपल्यावर) त्यांना आणखीही बळकटी आणावयाची होती ती, सफ्दर-जंगाचा दीर्घ अनुभव, अमीर-उमराव वर्गातील त्याचे प्रमुख स्थान आणि त्याच्या हाती असलेले कसलेले सैन्य यांच्या जोरावर. अशी नवी फळी वा मित्रसंघ तयार करावयाचा तर इन्तिझाम व सफ्दर या जुन्या शत्रूंनी एकत्र येऊन बादशहाची मुलाखत घेणे अवश्य होते. या मुलाखतीत बादशहाबरोबर वैयक्तिक विश्वास व निष्ठा याबाबत खात्री व आणा-भाकांची देवाणघेवाण करून आता करावयाच्या मित्रगटाबाबत वाटाघाटीने अटी निश्चित करणेही अवश्य होते. यासाठी आता इन्तिझामने व्यवस्था केली. शिकार करण्याच्या व राज्यातील शाही बागांना भेटी देण्याच्या निमित्ताने बादशहाने दिल्लीबाहेर पडून सिकंद्राबादेला जावे (बादशहा दिल्लीमध्ये वस्तुतः सैनिकांच्या हातातील बंदिवानापेक्षा बऱ्या स्थितीत नव्हताच) व तेथे सुरजमल व सफ्दरजंग यांना त्याने भेटावे, अशी ही व्यवस्था होती. यासाठी वजिराने सुरजमल व सफ्दरजंग यांना गुप्त पत्रे पाठविली होतीच. या भेटीनंतर सर्वांच्या एकत्रित फौजांनी मुख्य मोहीम (भा. नवा बंडखोर इमाद व मराठे यांच्याविरुद्ध) सुरू करावी असाही या योजनेत भाग होता. सिकंद्राबादला जाताना बरोबर, बादशहाच्या अवजड मोठ्या तोफाही दिल्ली येथून बाहेर न्यावयाच्या असेही ठरले पण या नेण्यासाठी वरकरणी कारण मात्र बादशहाच्या या स्वारी बरोबर द्यावयाचे संरक्षक पथक म्हणून त्या न्यावयाच्या असे सांगण्याचे ठरले. तथापि या मागे खरा हेतू म्हणजे यावेळी सुरू करावयाच्या मुख्य संयुक्त मोहिमेला आधारासाठीच हे तोफांचे पथक न्यावयाचे होते. ही पुढची संयुक्त मुख्य मोहीम (भा. बादशहा–वजीर, सुरजमल, सफ्दर यांची) सिकंद्राबाद बाजूच्या 'शाही जमिनी' नव्या बंडखोरानी (भा. इमाद व अकिबत यांनी पहा § २.) बळकावल्या होत्या त्या परत मिळविण्यासाठीच होती.

या मूलभूत धोरणाच्या संदर्भातच सल्ला देऊन, नवा वजीर, बादशहाच्या निर्णयावर व कृतीवर सतत आपली छाप पाडीत होता. सफ्दरकडे असलेल्या बादशहाच्या सुभ्यांचा कारभार काढून घेऊन त्याला पूर्णपणे भिकारी बनवावे अशी इमादची मागणी होती. तेव्हा या मागणीला मान्यता देण्याचे टाळावे असे बादशहाच्या मनावर, वजिरानेही सतत दडपण ठेवले होते. कुंभेर घेण्यासाठी मराठ्यांना मदत करावी म्हणून इमाद इतक्या आग्रहाने बादशहाकडे मोठ्या तोफांची मागणी करीत होता. या तोफांमुळे सुरजमलचा नाश झाला असता. यातून त्याला वाचविण्यासाठीच बादशहाने या तोफा देण्याचे टाळावे असा त्याचे मन वळविण्याचा प्रयत्नही वजिराने केला. राजा लछमीनारायण व जगलकिशोर हे दोघे, सफ्दरचे दोन सर्वात महत्त्वाचे मोठे, हिंदु अधिकारी होते. बंडाच्या काळात त्यांची घरे व मालमत्ता बादशहाने सरकारजमा केली होती. आता नव्या धोरणाचा पाठपुरावा करताना नव्या वजिराने (इन्तिझामने—या दोघाना "बादशाही क्षमा" १९ डिसेंबर १७५३ ला मिळवून दिली व पुढे १७ मे १७५४ ला जप्त केलेली त्यांची घरे व मालमत्ता हीही परत देण्याचे हुकूम बादशहाकडून देवविले. (इन्तिझामच्या या सर्व हालचाली म्हणजे त्याच्या मूलभूत इमाद-मराठे विरोधी धोरणाचाच आविष्कार होता.) [त.–इ–अ.–९६ ब. दिल्ली वर्तमान (D. C.)].

विशिष्ट कृतीवर अवलंबून असलेल्या अशा प्रकारच्या धोरणाला (Policy of action) यश मिळावयाचे तर त्याचा पुढाकार करणाऱ्या नेत्याजवळ धैर्य, पुढाकार घेण्याची वृत्ती

आणि स्वयंकर्तृत्व असावे लागते पण बादशहा तर सतत पिण्यात वा ऐषआरामात गढलेला असून त्याचा वजीरही कृतिशीलतेच्या दृष्टीने नालायकच होता. दोघेही अतिशय भित्रे व ऐषआरामाचे भोक्ते होते. तिसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे बादशहाची माता, हीही स्त्री-सुलभ नैसर्गिक हट्टी व रुसव्या स्वभावामुळे एकेवेळी बंड करून उठलेल्या पूर्वीच्या वजिराशी पुन्हा तडजोड करण्याच्या विचारांना आता विरोध करू लागली. [सियार (३) ४९]. या सर्वांमुळे बादशहाची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी, कागदावर आखलेली ही इन्तिझामची एकूण सुंदर योजना, अमलात आणावयाला लागल्याबरोबर मोडकळीस आली. यानुसार पहिलीच हालचाल म्हणजे बादशहाने सिकंद्राबादकडे दौऱ्यावर बाहेर पडण्याची. या एकाच कृतीमुळे ताबडतोब परिणाम झाला तो, अहमदशहा व वजीर दोघांचाही, पुन्हा भरून काढता येणार नाही असा नाश. या अपयशाबद्दल दिल्लीचे इतिहासकार, इन्तिझामने आपल्या धन्याचा यावेळी विश्वासघात केला असा त्याच्यावर आरोप करतात. पण या त्यांच्या आरोपाला काहीही समर्थनीय आधार नाही. प्रारब्धानुसार होणारे परिणाम जसे अटळ ठरतात त्याप्रमाणेच, या दोघा नेत्यांचा स्वभाव व गुणधर्म यामुळे, त्यांच्यावर आता कोसळलेली आपत्ती अटळच होती.

## § १० : बादशहाचे सिकंद्राबादेकडे कूच

सिकंद्राबादेकडे बादशहाने निघावे अशी योजना ठरली खरी, पण दिवाळखोर बनलेल्या या सम्राटाने आपले सर्व कुटुंब, कुटुंबीय नोकरवर्ग आणि तोफखाना घेऊन हा प्रवास कशाच्या आधारावर करावयाचा? आपला देणे राहिलेला पगार दिल्याशिवाय प्रवासासाठी हलण्याचे तोफखान्यावरील लोकांनी नाकारले. बादशहाच्या हत्तींना एकएकावेळी चार-चार दिवस उपाशी ठेवलेले असल्याने काहीही ओझे नेता येणार नाही इतके ते अशक्त झालेले होते. तोफखाना खात्याकडे तोफगाड्या ओढणारा एकही बैल शिल्लक नव्हता. शाही कोठ्यातील वस्तूंचे साठे संपवून ते रिकामे केलेले होते, रोख पैसा दिल्याशिवाय कोणीही चाकरगडी वा ओझेवाला मिळविता येत नव्हता. पण आपल्या मातेसह बादशहा व वजीर यांनी दिल्ली येथून निघण्याचे तरी, कसेबसे जमवून आणले आणि २७ एप्रिलला ते लुनी येथे गेले. शाही कुटुंबातील इतर स्त्रिया व शहाजाद्या (Princesses) आणि बादशहाचा तोफखानाही, काही दिवसानी तेथे येऊन पोहोचला. तेव्हा अकिबत महमद, गाझिआबादेपासून (लुनी पासून आग्नेयेला १० मैल) सिकंद्राबादेपर्यंत मागे सरकला आणि असे मागे जात असतानाच रस्त्यातून जाणारे लोक व दिल्लीकडे जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गाड्या लुटीत तो गेला. हे चालू असताना शाही जहागीरीच्या जमिनी बळकाविणाऱ्याकडून (भा. इमाद पक्षीय व इतर) त्या सोडवून घेण्यासाठी सिकंद्राबादेपर्यंत पुढे चला असा आग्रह, वजीर बादशहाला करीतच होता. अखेरी, आपल्याजवळ या प्रवासासाठी व हा भाग सोडवून घेण्यासाठी आखलेल्या मोहिमेकरिता लागणारा पैसा नव्हता तरीही बादशहाने वजिराच्या आग्रहाला संमती दिली. ८ मे ला लुनी सोडून, सिकंद्राबादे पलिकडे काही मैलावरील आपल्या छावणीत तो १७ तारखेला पोहोचला. दरम्यान अकिबत आणखी माघारी जात जात खुर्जाच्या दक्षिणेस पोहोचला. पण तेथे पोहोचण्यापूर्वी रस्त्यामधून जाणाऱ्या स्थानिक व्यापाऱ्यांच्या मालाच्या गाड्या अडवून त्याने कापड व तूप यांच्या रूपाने त्यांच्याकडून ५०,००० रुपये उकळलेले होतेच. तथापि बादशहा सिकंद्राबादेच्या दक्षिणेस पोहोचल्याने, तेथपर्यंत आता त्याचा कारभार पुन्हा प्रस्थापित झाला.

सिकंद्राबादेच्या पलीकडील छावणीत येऊन पोहोचल्यावर मात्र, बादशहाकडे एक भीतिदायक व धोकासूचित करणारी बातमी येऊन पोहोचली. इमाद व मराठे यानी जाटांच्या बरोबर तह केला असून ते आपल्या अफाट सैन्यानिशी मथुरेला येऊन पोहोचले आहेत. (भा. पहा § ५ शेवटचा परि.) आता आपल्या या मोठ्या सैन्यानिशी बादशहावर वा त्याच्या राजधानीवर हल्ला करण्याचा त्यांचा बेत उघड दिसत आहे अशी ही भयानक बातमी आलेली होती. इतके झाल्यावर अकिबतने वजिरामार्फत बादशहाची मुलाखत मिळविण्याचा प्रयत्न केला. बादशहाला तर "नेहमीच युद्धापेक्षा शांतताच अधिक प्रिय असल्याने" त्याने या मुलाखतीसाठी मान्यता दिली. यावेळी आपण पूर्णपणे निराधार असून नाशाच्यासमोर उभे आहोत असे बादशहाला वाटत होते. २४ मे शुक्रवारी त्याने आपल्या तंबूतच दीर्घकाळ प्रार्थना केली आणि परमेश्वरासमोर अश्रु ढाळले. या नंतर अकिबतने येऊन त्याची मुलाखत घेतली. यावेळी हा धूर्त काश्मिरी, दरवेशाचा झगा घालून आला (दरवेशाचा झगा-पोशाख-एक लांबट गुल् आर्माणि Gularmani झगा. जगाचा त्याग केलेला संन्यस्त मनुष्य असा झगा वापरतो—हा झगा अशा माणसाचे बोधचिन्हच, असे हिंदुस्थानात मानतात. मुझ. ८९) आणि कुरकुरत म्हणाला की, माझ्या धन्याला. . . . इमादला—माझ्या कामाचे काही चीज नाही, काही कौतुक नाही तेव्हा मी आता निवृत्त होऊन संन्याशाचे जीवन पत्करण्याचे ठरविले आहे. या बोलण्यामुळे बादशहाला आश्चर्य वाटून त्याचे मन द्रवले आणि त्याला, त्याने स्वतःच्या नोकरीतच एक अधिकारपद दिले! तेव्हा खुर्जा प्रांत आपल्या या नव्या धन्याच्या हुकमती खाली आणण्याचे वचन देऊन तिकडे जाण्यासाठी त्याने बादशहाचा निरोप घेतला.

दुसरे दिवशी अकिबतने बादशहाला लिहून कळविले की, मल्हार होळकर आता ५०,००० घोडदळ बरोबर घेऊन दिल्लीवर चाल करून निघाला आहे. सलिमगढ येथील शासकीय तुरुंगातून एखाद्या शहाजाद्याला मुक्त करून त्याला सिंहासनावर बसविण्याचा त्याचा विचार दिसतो. ही बातमी आल्याबरोबर अहमदशहाचे धैर्य गळाले आणि घाबरून त्याने दिल्लीकडे परत जाण्याचे ठरविले. पण त्याच्यापासून ५० मैलाच्या आसमंतात अद्याप कोणी मराठा शत्रू येऊन पोहोचल्याची बातमी नसल्याने त्याने काहीच संरक्षक काळजी घेतली नाही वा आपल्या छावणीच्या भोवती फिरती पहारेकरी पथकेही ठेवली नाहीत. त्याने २५ तारखेलाच (भा. म्हणजे अकिबतकडून बातमी आली त्यावर बादशहाने निर्णय घेतला त्याच दिवशी. . . अकिबतच्या मुलाखतीनंतरचा हा दुसरा दिवस). आपल्या पुढील मुक्कामासाठी आगाऊ पाठवावयाचे तंबू तेवढे दिल्लीच्या रस्त्यावर झौंसि येथे पाठविले. ( Jhaunsi ) सिकंद्राबादेच्या उत्तरेस १० मैल. . . . (भा. हे ठिकाण झांसी नव्हे. झांसी, सिकंद्राबाद. . . मथुरा यापासून दक्षिणेस बरीच दूर आहे.) त्या ठिकाणी जाण्यास दुसरे दिवशी निघण्याचा त्याचा विचार होता. [त.–इ–अ.–१२५ब–१२८ब; मुझ. ८९–९० सियार ४९].

## § ११ : मल्हाररावाचा सिकंद्राबाद येथील, बादशहाच्या छावणीवर अचानक हल्ला : २६ मे १७५४

पण दरम्यानच्या रात्रीच म्हणजे ता. २५ च्या रात्रीच, बादशहाच्या हेरानी बातमी लागली की, मल्हाररावाच्या हाताखाली मराठ्यांचे २०००० सुटसुटीत चपळ घोडदळ

बादशहाच्या छावणीपासून २४ मैलाच्या आत येऊन पोहोचले आहे.[१] तेव्हा अहमदशहाने वजिराला सल्लामसलतीसाठी बोलाविले. पण आता आपल्या नालायक धन्याचा वजिराला वीट आला असून आपल्या या मोहिमेच्या एकूण योजनेला आलेल्या अपयशामुळेही तो चिडला होता. अशा मन:स्थितीत, बादशहाला त्याने रागानेच उत्तर दिले. तेव्हा ताबडतोब कूच सुरू करण्यासाठी इशारा म्हणून नगारे वाजविण्यास बादशहाने हुकूम दिले. आपले तख्त-इ-रवान ( Takht-i-Rawan ) सहज इकडेतिकडे नेता येण्यासारखे तख्त–खुर्ची ही—प्रवासी पालखीही आणण्यास सांगितले व त्याच रात्री, सिकंद्राबादेच्या उत्तरेस ७ मैलावर असलेल्या शोराजपूर या ठिकाणापर्यंत जाऊन पोहोचावयाचे असेही हुकूम त्याने दिले. कूच करण्यासाठी एकाएकी सुटलेल्या या हुकुमाची अपेक्षा करण्याच्या दृष्टीने कोणाचीही आधी मानसिक तयारी केलेली नसल्याने, हा अनपेक्षित हुकूम झाल्यावर छावणीतले सर्व नोकर अगदी गोंधळून गेले व त्रासले. ही छावणी दोन रस्ते एकमेकास ओलांडतात अशा चौकाच्या ठिकाणी होती. तेव्हा कोणत्या रस्त्याने जावयाचे याबाबत सर्वांच्यासाठी एकत्रित योजना (Concerted plan) व योग्य मार्गदर्शन अवश्य होते. पण ते नसल्याने, प्रत्येक जण कूच करून निघाला हे खरे पण काही एका रस्त्याने व काही दुसऱ्या रस्त्याने असे गेले व या स्थलांतरात विस्कळितपणा गोंधळ येऊन माजला.

या प्रवासासाठी, शाही कुटुंबियांकरिता बादशहाने एक योजना आखली होती. यानुसार उधमबाई (त्याची आई), इनायतपुरी बाई (त्याची आवडती पत्नी), महमदशहा उर्फ शहाजादा बंका (त्याचा मुलगा) आणि साहिबा बेगम (सावत्र बहीण), यानी शाही दरवाजाने त्याच्या खाशा स्वारीबरोबर आपापल्या वाहनातून निघावे (पालख्या–झाकलेल्या गाड्या-रथ इ.) राजघराण्यातील इतर स्त्रियांनी छावणीच्या खवासपुरा दरवाजाजवळ, त्यांच्यासाठी व्यवस्था केलेल्या गाड्यातून निघावे आणि त्यांच्या गटाला, नाझिर रोझ अफझुनखान याने मार्गदर्शन करावे अशीही व्यवस्था होती. बादशहा निघाल्यावर त्याच्या मेहुणीने (पत्नीची बहीण) आपल्याबरोबर त्याची मुलगी दिलाफरोझ ( Dilafroz ) बानु उर्फ महमदी बेगम हिला घेतले व या दोघी आणि जनानखान्यातील इतर काही स्त्रिया व दासी शाही दरवाजाजवळ तयार असलेल्या बांबूच्या काठ्यातट्ट्यांच्या छपरानी झाकलेल्या रथात.... (Waggon-Rath) बसल्या आणि बादशहाच्या स्वारी पाठोपाठ निघाल्या. "अशा प्रकारच्या गोंधळात निघालेल्या स्वारीत काही येऊन मिळाले आणि काही तसेच मागे राहिले. कोण आले आहे आणि कोण नाही, हे कोणालाही माहीत नव्हते वा याबद्दल कोणी काळजीही केली नाही. खवासपुरा दरवाजामध्ये शाही कुटुंबातील स्त्रियांचा एक मोठा ताफाच आपापल्या झाकलेल्या. रथातून बसला होता. यात मालिका-इ-झमानी व साहिब (महमदशहाच्या दोन विधवा... अहमदशहाच्या सावत्र माता), अहमदशहाच्या दोन मुली आणि सरफराझ महल व राणी उत्तम कुमारी (बादशहाच्या उपस्त्रियापैकी दोघी–(Seondary Wives) अशा कुटुंबीय स्त्रिया होत्या. अशा या स्त्रिया रथात बसल्या असतानाच मराठे येत आहेत असे दिसू लागले आणि सगळीकडे संकटाची सूचना देण्यात आली." हा दिवस अमावस्येनंतरच्या चतुर्थीचा होता. (शुक्ल पक्षातील—या पंधरवड्यात चंद्रोदय सायंकाळी होतो– क्रमाक्रमाने

१ याबाबत त.-इ.-अ.-१२८ब-१३१अ यामध्ये अतिशय सविस्तर व बिनचूक माहिती असून तीच येथे अनुसरली आहे. शाकिर (७७) चा लेखक शाकिरखान यावेळी हजर होता पण सविस्तर हकीगत देत नाही आणखी पहा-सियार (३) ४९ ; मूझ. ९०-९२ ; दिल्ली वर्तमान-दिल्ली क्रॉनिकल, बयान २८३-२८४ (हे विश्वसनीय नाही, पे. द. नि. प. (२१) ६०, यात मराठ्यांच्या दृष्टिकोनातून हकीगत दिली आहे.)

उशिरा मावळत जातो.) संकटाची सूचना मिळाली त्यावेळी पहाटेचे दोन वाजले असून चंद्र मावळून बराच वेळ झाला होता. छावणीतून निघालेल्या दारू गोळ्याच्या अनेक गाड्या व नानाप्रकारच्या शाही सामानसुमानाच्या व कारखान्यांच्या (कर्मशाळांच्या Work Shops) मालाच्या गाड्या[१] आणि सैन्यामागून येणाऱ्या लोकांचे अफाट थवे यांच्या गर्दीमुळे रस्ते अडवले गेले होते. यामुळे वर्णन करता येणार नाही इतका गोंधळ निर्माण झाला. रात्रीचा अंधार असतानाच आपल्या तोड्याच्या बंदुकातून मारा करीत मराठ्यांनीही हल्ला सुरू केला, तेव्हा अंधार व हल्ल्यामुळे उत्पन्न झालेली मोठी भीती, यामुळे आधीच निर्माण झालेल्या गोंधळात अधिकच भर पडली. या परिस्थितीत आपले कर्तव्य वा मैत्री ही सर्व विसरून प्रत्येकजण वाट मिळेल तिकडे पळाला.

शोराजपूरकडे निघालेल्या बादशहाच्या या स्वारीमध्ये जनानखान्यातील स्त्रिया असलेले अनेक रथ व गाड्या होत्या. निर्माण झालेल्या गोंधळात या गाड्याना आपला एक सलग काफिला टिकविता आला नाही. त्या निरनिराळ्या भागात विखुरल्या गेल्या. परिणामतः कूच चालू असताना त्याना योग्य मार्गदर्शन करता येईना वा त्यांचे योग्य संरक्षणही करता येईना. रोझ-आफझून खानाने त्याला शक्य झाले तितके संरक्षण, राजकुटुंबातील स्त्रियांना दिले. [आता तो सत्तरीच्या घरात असून आजारी व अशक्तही झाला होता तरीसुद्धा]. पण "शंभर सैनिक हजाराना कसा विरोध करणार, कसे थोपविणार?" मलिका-इ-झामानी हिला मराठ्यानी पकडले आणि आता त्यांच्या हाती पडलेल्या शाही छावणीत तिला परत नेले. साहिब महल आणि इतर काही स्त्रिया यांच्या गाड्या व त्याबरोबर स्वतः रोझ आफझुन, याना अकिबतच्या भावाने गाठले आणि त्याना शहराच्या काझीच्या घरी नेले. अशारीतीने रात्र संपली. या रात्री कोणाला खाण्यालाही काही मिळाले नव्हते.

आपल्या बरोबरच्या मूठभर सोबत्यांसहित अहमदशहा शोराजपुरला पोहोचला तेव्हा हेरानी त्याच्याकडे वार्ता आणली की मराठे पाठलाग करीत पुढे येत आहेत. लगेच एका चपळ हत्तीणीवर तो व त्याचा मुलगा, आणि दुसरीवर, बंद अंबारीतून (वा झाकलेली पालखी) त्याची आई व पत्नी असे स्वार झाले व त्यानी शक्य तितक्या वेगाने दिल्लीकडे पळ काढला. २६ मेच्या दिवशी तिसऱ्या प्रहरी सुमारे २ वाजता (भा. म्हणजे मूळ छावणीतून निघाल्यानंतर १२ तासापेक्षाही जास्त सतत दौड झाल्यावर) दिल्लीला पोहोचून तेथील शाहीवाड्यात, अष्टकोनी (टॉवरच्या) बुरुजाच्या बाजूने, त्याने गुपचूप प्रवेश केला. त्याच्या-पाठोपाठ येणारे थोडे काही रथ व गाड्या दक्षिणेच्या दरवाजाने आत आल्या. अशाप्रकारे पळून येताना बादशहाचे रत्नभांडार व दागदागिने ( Royal Jewellary ) एवढेच काय ते सुरक्षित परत आणता आले. छावणीतील, शासनाची व त्याचप्रमाणे व्यक्तींची इतर सर्व प्रकारची मालमत्ता तोफखाना (यात निरनिराळ्या सर्व क्षमतेच्या मिळून ५०० तोफा होत्या असे म्हणतात, बयान २८३), सर्वप्रकारचे सामानसुमान (Stores), खजिना (काही लाखांची सोन्या-चांदीची नाणी), तंबू, इत्यादी सर्व शत्रूच्या हाती पडले. पण सर्वात मोठे नुकसान झाले ते शाही कुटुंबाच्या अब्रूचे—दक्षिणेकडून आलेल्या या लुटारूनी राण्या आणि शहाजाद्या ( Queens and Princesses ) याना बंदिवासात अडकवून ठेवल्याने झालेल्या अब्रूच्या हानीचे— अशा प्रकारची आपत्ती, तैमूरच्या घराण्यावर पूर्वी कधीही कोसळली नव्हती. अशा अपत्तीने दिल्लीतील प्रत्येकाचे मस्तक नमविले.

---

१ सैन्याबरोबर अवश्य असे लोहार-सुतार अशांचे कारखाने असतात त्यांच्या गाड्या.

बादशहा येऊन पोहोचल्यावर तीन तासानी वजीर तोफखान्यावरील प्रमुख (समसाम)[१] आणि इतर काही अधिकारी दिल्लीला येऊन पोहोचले आणि बादशहाकडे आले. तेव्हा बादशहाने त्याना विचारले.... "तुम्ही येताना, तेथे छावणीत असलेल्या जनानखान्यातील स्त्रिया व माझ्या वैयक्तिक ( People of the harem and my Honour ) प्रतिष्ठेशी संबंधित असलेल्या व्यक्ती ( बेगमा--राण्या, शहाजाद्या...अशा ) यांना तुमच्याबरोबर का आणले नाही ? " तेव्हा वजिराने उत्तर दिले की "रात्रीच्या अंधारात काहीही कळणे शक्य झाले नाही आणि या स्त्रियांच्या झालेल्या दैन्यावस्थेची बातमी कोणीही मजकडे आणली नाही."

राजधानीत पोहोचलेल्या व्यक्तींची ही हकीगत झाली. आता आपण, शत्रूच्या तडाख्यातून सुटण्याइतक्या नशीबवान नसल्याने, बंदीवासात सापडलेल्या व्यक्तींची हकीगत पाहू. हल्ल्यामुळे उडालेल्या गोंधळात, स्त्रियांच्या रथापैकी अनेक जिकडे तिकडे भटकत पांगले. भरकटलेल्या अशा रथांना मराठ्यांनी गाठले; त्यांचे पडदे ओढून फाडले, त्यातील पेट्या वा हौदे यातील पैसा आणि स्त्रियांच्या अंगावरील दागिने काढून घेतले. यातच अनेक स्त्रियांची विटंबनाही करण्यात आली. यातील काही रथ वा व्यक्ती निरनिराळ्या बाजूला निसटल्याही व काही चालत चालत दिल्लीला येऊन पोहोचल्या. मलिका-इ-झमानी व पकडलेल्या इतर स्त्रिया, याना मल्हाररावाने मानाने वागविले व त्यांची काळजी घेण्यासाठी, त्याना सिकंद्राबादेमधील शाही अधिकाऱ्यांच्याकडे सोपविले पण या सर्वांवर मराठा सैनिकांचा पहारा मात्र ठेवला. यापैकी अनेक स्त्रियांबरोबर, अंगावरील कपड्यांव्यतिरिक्त, बदलण्यासाठी म्हणून जास्त असलेले कपडे लुटले गेले होते. दिल्लीशी असलेले दळणवळण तोडण्यात आले असल्यामुळे, या छावण्यात बंदिवान म्हणून ठेवलेल्या जनानखान्यातील स्त्रियांना...उच्चपदस्थ व खालच्या दर्जाच्या सर्वानाच–अतिशय हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

या सर्व प्रकारामुळे इमादलासुद्धा लाज वाटली.--२८ मे, ला तो मल्हाररावाच्या छावणीत आला. नंतर मलिका-इ-झमानीकडे जाऊन त्याने, तिला ५ मोहरांचा नजराणा दिला आणि आपला फेटा काढून तो तिच्यापुढे जमिनीवर ठेवला. तिला ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्यात, त्याची स्वत:चीच बेअब्रू झाली असून, हे सर्व त्याला लाजिरवाणेच आहे असे म्हणत म्हणत तो तिच्यापुढे रडलाही, आणि रडता रडता त्याने आपल्या बाजूने सबबही पुढे मांडली ... "या सर्व बाबतीत मी असहाय बनलो होतो हे दख्खनी कोणाचेही ऐकेनात मी त्यांच्या नोकरासारखाच बनलो असून माझ्या तोंडाला काळे फासले गेले आहे." यावेळी या माजी सम्राज्ञीने झालेली बेअब्रू व हालअपेष्टा याबद्दल, उदासीनतेने नशीबालाच दोष दिला.

## § १२ : इमाद-उल्-मुल्कचा, मराठ्यांच्या मदतीने बादशहाला धाकदपटशा

बंदीत सापडलेल्या रोझ आफझुन खानाचा, अवल कारकून, मल्हाररावाकडून एक पत्र घेऊन, ३० मे रोजी बादशहाकडे आला. या पत्राद्वारे मल्हारने आपल्या काही मागण्या कळविल्या होत्या. राजधानीला लुटीपासून आणि बंदीवान केलेल्या स्त्रियांना बेअब्रुपासून वाचविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे या मागण्या मान्य करण्याचाच होय अशी शिफारसही रोझ अफझुनाने या पत्राबाबत केली होती. यावेळी इन्तिझामने, या मागण्यांना विरोध करावा असा

---

१ 'दिल्ली वर्तमान' यानुसार, छावणीवर झालेल्या हल्ल्याच्यावेळी, समसामने एक तासभर लढाई दिली होती आणि यामुळे काही बेगमाना, राजधानीस सुरक्षित पोहोचणे शक्य झाले.

दांडगाईचा सल्ला दिला व यासाठी मराठ्यांविरुद्ध लढण्यास आपण तयार आहो असे सांगितले. फक्त थोड्याच दिवसांपूर्वी इन्तिझामच्या सैन्याने बंड केले होते व त्याच्यावरच गर्दी करून उठण्याची धमकी दिली होती, तरीही यावेळी त्याने असा ताठरपणाचा सल्ला दिला हे चमत्कारिकच होते. अशा परिस्थितीत मल्हाररावाला उत्तर देण्यापूर्वी विचार करण्यास एक दिवसाची सवड द्यावी असे बादशहाने सांगितले.

दुसऱ्या दिवशी (३१ मे) आणखी बातमी आली की, मराठ्यांच्या एका सैन्याने यमुना ओलांडली असून, ते सैन्य आता दिल्ली शहराच्या नैऋत्येस असलेली जयसिंगपूरा आणि तशीच इतर उपनगरे लुटीत आहे. तेव्हा राजधानीही लुटली जाईल व स्वत: बादशहालाही सिंहासनावरून काढून टाकण्यात येईल या भीतीने अहमदशहाने एक फर्मान काढून होळकरांच्या सगळ्या मागण्या मंजूर केल्या व आलेली ही पहिली मराठा तुकडी, तिसऱ्या प्रहरी माघारी फिरली. पण याचवेळी त्यांच्या दुसऱ्या एका पथकाने खिजिराबादजवळ यमुना ओलांडली, निजामउद्दिन अवलियाच्या पवित्र स्थानाचा कठडा ( Katra ) व इतर काही ठिकाणे लुटली, आणि खुर्मा बाजार जाळला. ही बातमी ऐकल्यावर इमादने मल्हाररावाकडे जाऊन विचारले, ...."हे काय चालले आहे?" याला त्या मराठा सेनापतीने उत्तर दिले...."हे तर सैनिकच आहेत. ते नेहमीच असे करतात." तेव्हा भावनावेगाने इमाद ओरडला..... "अशा कृत्यापासून आपले हात मागे तरी घ्या वा मला ठार तरी करा;" आणि असे म्हणत त्याने आपली कटयार उपसून ती आपल्या मित्राच्या समोर ठेवली. इतके झाल्यावर मल्हारराव घोड्यावर स्वार झाला व त्याने सायंप्रार्थनेच्या संध्येच्यावेळी यमुना ओलांडली, व आपल्या सैनिकांकडे जाऊन, त्याना रागावून, शिक्षा करूनही, त्याने त्या सर्वांना परत नदी ओलांडून माघारी घेतले, तेव्हा त्या भागातील आरडाओरड व गोंधळ थांबला. पण आता ज्याना शक्य झाले ते सर्व लोक या परिसरातून पळाले व सभोवार तट असलेल्या "नवी दिल्ली" या शहर भागात ते गेले. यामुळे "आलेल्या या दुष्ट-पापी लोकांच्या (भा. मराठ्यांच्या). unclean people हाती सापडलेल्या उपनगरांचा संपूर्ण नाश झाला व ती मेलेल्या माणसांच्या घरासारखी ओस पडली.

झालेल्या या एकूण प्रकारामुळे बादशहा दिङ्मूढ होऊन दुबळा व लाचार बनला. अशावेळी १ जूनला अकिबत महमद त्याच्याकडे आला आणि त्याने, इमादला वजीर करण्यास व रोझ अफझुनखानाला प्रिव्ही कौन्सिलचा बादशहाच्या वरिष्ठ सल्लागार मंडळाचा प्रमुख अधिक्षक ( Superintendent ) करण्यास त्याची मान्यता मिळविली. अशाप्रकारे इन्तिझाम कडून त्याची दोन्हीही उच्च अधिकारपदे आता काढून घेण्यात आली. याच्या मोबदल्यात, अकिबतनेही कुराणाला साक्षी ठेवून शपथ घेतली की, यापुढे इमाद आणि मल्हार दोघेही बादशहाचा विश्वासघात करणार नाहीत, त्याच्याशी लबाडी करणार नाहीत वा त्याला आणि त्याच्या राज्याला त्रास देणार नाहीत. [त.–इ–अ.–१३१ ब–१३४ ब].

## § १३ : बादशहा अहमदशहाचा शेवट

दुसऱ्याच दिवशी म्हणजे २ जूनला उजाडल्यानंतर ३ तासांनी, इमाद-उल्-मुल्क दरबारात आला. यावेळी त्याच्याबरोबर तात्या गंगाधर (होळकरांचा दिवाण), अकिबतमहमद व त्याचा भाऊ सैफुल्ला हेही होते.[१] इमाद दरबारात आल्यावर अहमदशहाने, प्रथम

१ त.-इ.-अ.-१३५अ ते १३६अ ; दिल्ली वर्तमान D. C.

त्याच्या हातात पवित्र कुराण दिले आणि तो कधीही बादशहाचा विश्वासघात करणार नाही अशा शपथा घेण्यास त्याला सांगितले. तेव्हा इमादने तशा अगदी खंबीर, ठाम शपथा घेतल्या आणि बादशहाने त्याला औपचारिक पद्धतिनुसार वजिरीची वस्त्रे बहाल केली. नंतर इमाद वजिराच्या कचेरीत गेला. तेथे यावेळी कचेरीचा कारकूनवर्ग हजर होताच. नंतर इमादने प्रचलित नियमानुसार कामाच्या काही कागदावर सह्याही केल्या. (भा. वजिरीची वस्त्रे औपचारिकपणे मिळाल्यावर नव्या वजिराने आपल्या अधिकाराचा वापर, प्रत्यक्ष काही काम करून, कागदपत्रावर सह्या करून करावा म्हणजेच तो वजीरपदावर प्रत्यक्ष अधिष्ठित झाला असे त्याकाळी मानीत. आजही नेमणुकीचा हुकूम मिळाला तरी प्रत्यक्ष कामावर हजर झाल्याशिवाय निर्दिष्ट पद मिळाले असे मानीत नाहीत.) . . . . नंतर मिर आतिश व हजर असलेल्या इतर सर्व अधिकाऱ्यांना रजा देऊन, आपल्या मुख्य कचेरीच्या मागच्याच बाजूस असलेल्या एका छोटया खोलीत तो गेला. तेथून लगेच त्याने, अकिबतला, बरोबर जनानखान्यावरील उपमुख्याधिकारी व ५० बदक्षि सैनिकांचे एक संरक्षक पथक देऊन राजवाड्यातील एका विशिष्ट भागाच्या दरवाजापाशी पाठविले. या भागात काही शहाजाद्याना बंदिवासात ठेवलेले होते. तेथे गेल्यावर अकिबतने, आपल्या स्वतःच्या खोजाला आत पाठवून, महमद अझिझ-उद्-दिन या शहाजाद्याला बाहेर आणले. हा शहाजादा, शहा अलम बहादुरशहा १ ला, याचा नातू. . . . आणि या बहादुरशहाचा मुलगा मुइझ्-उद्दिन याचा मुलगा होता. या शहाजाद्याला घेऊन अकिबत आपल्या धन्याकडे परत गेला. तेव्हा इमादने वजिराच्या कचेरीतून बाहेर येऊन या शहाजाद्यापुढे नम्रतेने मुजरे केले आणि त्याच्या पाठोपाठ तो निघाला. 'तीन कमान' दरवाजाने ( Triple Arch Gate ) हे सर्व आता दिवाण-इ-आम मध्ये आले. तेथे आल्यावर या शहाजाद्याला सिंहासनावर बसविण्यात येऊन त्याच्यावर, शाही छत्र ( Royal Umbrella ) धरण्यात आले आणि त्याला. 'पादिशहा अलमगीर २ रा' म्हणून जाहीर करण्यात आले.

यानंतर लगेच, या नव्या बादशहाने, आपल्या पूर्वीच्या बादशहाला बंदीवान करून घेऊन या, असे हुकूम दिले. तेव्हा आपल्या बदक्षि पथकासह सैफुल्ला ( Saifulla ) खास महालाच्या द्वार मंडपामधून ( Porch ) जनानखान्यात शिरला. तेथे रंगमहालासमोरील छोटया बागेतील झाडामध्ये अहमद आणि त्याची आई लपून बसलेली त्याला आढळली. आलेल्या सैनिकांनी प्रथम माजी बादशहाला पकडून, बाहेरच्या एका खोलीत डांबून ठेवले. नंतर त्याच्या आईचा चेहरा झाकण्यासाठी तिच्यावर एक शाल टाकून तिलाही त्याच तुरुंगात ओढून नेले. अशाप्रकारे अखेरीच्या या संकटात आईची व मुलाची ताटातूट करण्यात आली नाही ! सिंहासनावरून खाली ओढण्यात आलेला हा बादशहा, तहान व मानसिक दुःख यानी व्याकुळ होऊन आता पाण्यासाठी ओरडू लागला. तेव्हा मातीच्या, फुटक्या भांड्याचा एक तुकडा तेथेच मातीत पडलेला होता, त्यातून थोडेसे पाणी, सैफुल्लाने त्याच्या ओठाजवळ नेले आणि . . .एका तासापूर्वीच शहांचा शहा असलेला हा माजी शहेनशहा आता मातीच्या भांड्याच्या त्या फुटक्या करवंटयातून आनंदाने पाणी प्याला ! . . . . .त्याच्या कारकीर्दीचा एक वृत्त लेखक ओरडून सांगतो . . . . . "काय हा नशिबाचा फेरा—दैवाचा दुर्विलास !"

---

शामुको.—वाय १२-११४५-५.९०

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर